Selections from the Peshwa Daftar

29

Affairs of Northern India: Peshwa Madhavrao I

1761-1772

Editor—G. S. SARDESAI, B.A.

Government Central Press, Bombay
1933—Price Rs. 6 As. 11 or 10s. 9d.

(Government do not assume any responsibility for the comments and views expressed by the editor.)

AFFAIRS OF NORTHERN INDIA : PESHWA MADHAVRAO I

(1761–1772)

This selection deals mainly with the efforts made by Madhavrao I to retrieve the situation created by the catastrophe at Panipat. The first few letters give an illuminating picture of the actual state of the country when the Marathas, after their crushing defeat at the hands of the Abdali, had evacuated Hindustan and retired to safer positions beyond the Chambal. One remarkable fact which stands out prominently in these papers is, that the victory of 14th January 1761 availed the Abdali king comparatively little. For three years he negotiated for the friendship of the Marathas from beyond the Indus and ultimately ratified a formal peace with them in 1764. The Maratha chiefs in Bundelkhand lost no time in regaining their original position and once more pushed their conquests beyond the Jumna as soon as the Afghan army had evacuated the Punjab. The Peshwa's conflict with his uncle, and the various phases through which it subsequently passed, seriously hampered Maratha interests in the North, whence repeated but fruitless requests for military help and financial support appear to be pouring into the Deccan almost from day to day.

The correspondence here printed is so eloquent that it hardly needs any introduction. Its fascination is enhanced by the variety both of style and detail, coming as it does from the pens of more than a dozen different writers with some of whom the reader is not already familiar. The Jats, the Rajputs, the Rohillas, and ultimately the Imperial Court of Delhi, contribute their share to these papers, which make essential additions of incident and detail to the scanty knowledge we have so far possessed of the subject. The rise of Mahadaji Sindia, his flight from the wrath of Raghoba, the contemporary movements of the English, always on the look-out for an opportunity to checkmate Maratha efforts for supremacy and conquests, and the development of events in various quarters of India,—these and other points are graphically described, and culminate in the instalment of the Emperor by the Marathas on his ancestral throne at Delhi towards the end of 1771. In the midst of these glorious achievements came the premature death of the brilliant young ruler whose unremitting labours had so greatly contributed to secure them. A few papers for the years 1773-74 are included in order to show how that tragic event quickly ended almost all the good work that had been accomplished.

At the end are given some letters and some important entries extracted from the Peshwas' Diaries, giving various useful details of an expedition against Delhi despatched by the Peshwa Madhavrao I under the joint command of Ramchandra Ganesh and Visaji Krishna supported by Tukoji Holkar and Mahadji Sindia. The expedition started from Poona in October 1768 and the Maratha armies after humbling the Bhonsles of Nagpur in the early months of 1769 proceeded to the North in the summer. They defeated the Jats, captured Delhi, overcame the Rohillas and having brought the Emperor Shah Alum from Allahabad,

MO-III Bk Ca 73—*a*

placed him on the Imperial throne. This was the crowning triumph of Madhavrao's regime, which came to an end by his death in November 1772 and which necessitated the return of the Maratha forces to the Deccan in 1773 after the murder of Peshwa Narayanrao became known to them.

Many useful details of this five years' period are discernible from the Peshwas' Diaries which the student of Maratha history will love to learn. How money was raised and spent, how diplomacy was carried on, who were the principal agents that were employed on various missions, how mutual jealousies often frustrated the main object of the expedition—these and similar topics will be found well illustrated in these extracts. Presents of animals, dresses and other articles will be found scrupulously credited to the Government; many letters and dispatches are now and then quoted and many fresh names are come across, thereby throwing new light on individual exploits. This paper is thus intended to serve as a sample of what a Maratha expedition was like.

The following itinerary of Ramchandra Ganesh will be found helpful in studying the campaign conducted by him. The Peshwas' Diaries give his daily movements with dates and halts; but if they were to be printed *in extenso*, they will occupy many printed pages and are hence omitted :—

8th May 1769	.. Ramchandra Ganesh reached Burhanpur.
25th May 1769	.. Nerbudda south bank.
16th July 1769	.. At Arun in Malwa.
22nd August 1769	.. At Raghavgad, Malwa : halt for two months.
12th December 1769	.. At Lakheri in Bundi.
26th December 1770	.. At Lalsot in Jaipur.
28th March 1770	.. At Kumbher in Jatvada.
12th May 1770	.. Crossed the Jumna near Muttra.
24th June 1770	.. On the Ganges in the Doab.
22nd July 1770	.. At Kol near Aligad.
17th December 1770	.. At Itawa in the Doab.
5th February 1771	.. At Patpatganj.
18th March 1771	.. Crossed the Jumna into Delhi and halted there upto January 1772.
24th January 1772	.. Crossed the Jumna back into the Doab.
12th February 1772	.. At Ghosgad against the Rohillas.
4th March 1772	.. At Pathargad against the Rohillas.
17th June 1772	.. Near Moradabad.
5th December 1772	.. Back to the south of the Jumna.
21st December 1772	.. Halt at Delhi.
18th February 1773	.. Back into the Doab at Ramghat.
23rd March 1773	.. Back to the south of the Jumna at Agra.
4th April 1773	.. On the Chambal.
21st July 1773	.. At Sironj.
13th August 1773	.. On the north bank of the Nerbudda.
1st September 1773	.. Near Burhanpur.
20th September 1773	.. Reached Poona.

कृपावलोकणेकरून येथास्थित असे विशेष. राजश्री जनकोजी सिंदे याचा बक्षी सिऊबा सेनवाई हा हिंदुस्थानचे लढाईत मयेत जाला. त्याजला पुत्र संतान नाही. येक कन्या मात्र आहे. तिचा भ्रतार सिऊबाचे घरी आहे, व सिऊबाची स्त्री यैसी आहेत. घरात द्रव्य बहुतसे आहे. त्याजला धनी कोन्ही नाही यैसा प्रकार आहे. सेवेसी श्रयत्यें होये. राजश्री जणकोजी सिंदे याजकडील मुत्सदी दोन तीन असामिया व येक दोन साहुकार यैसे आहेत. ते द्रव्यानें थोर आहेत. द्रव्य बहुत आहे, म्हनोन गावात वार्ता बहुत आहे. रोज दररोज द्रव्य लांबवितात. भये निर्मान त्याजला साहेबाकडील जाले आहे यास्तव लांबवितात. मथुरे-कडून पत्रे राजश्री चिंतोपंत याची निंबाबाईस येतात की जनकोजी सिंदे पाणपता-नजीक आहेत; परंतु ठिकान लागत नाही. मणुशे शोधास पाठविली आहेत, यैसी पत्रें येतात. राजश्री बलवंतराव गोपाल हेहि भयाभीत बहुत आहेत. श्रीगोंदियात वार्ता यैसी जे, चिमाबाई सिंदी पुण्यात आहे तिने श्रीमंतास विनंती करून जफतिया उठविल्या. राजश्री रवलोजी सिंदे तुकोजी सिंदे याचे पुत्र याच्या बावाला राजश्री जणकोजी सिंदे याचा सरंजाम श्रीमंत करनार यैसी वार्ता बहुतसी आहे. सेवेसी श्रृत्ये होये हे विज्ञापना.

¶*Gundo Kashi, who appears to be an informant, suggests that the estates of one Shivba Shenvi, Sindia's Bakshi, be confiscated as he was killed at Panipat and has left no male-issue. The writer refers to the presence of Jankoji Sindia near Panipat—as mentioned in a letter to Nimbabai by Chintopant.*

No. 5] *[25-6-1761*

छ २८ जिल्काद

श्री

श्रीमंत राजश्री ‌ ‌ ‌ ‌ पंतप्रधान स्वामीचे शेवेसीं

विनंती. सेवक बालाजी गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। जेष्ठ वद्य ८ स्वामीचे कृपावलोकनेकरून शेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. आज्ञापत्र सादर जाले तेथे आज्ञा कीं सुजाउदौले याणी पत्र लिहिलें कीं सरकारची ठाणी बसवावी. त्यावरून त्यास थैली पाठविली आहे. तुम्ही याउपरी अंतरवेदींत ठाणी बसवणे म्हणून आज्ञा. त्यास अंतरवेदींत उतरल्याचे व ठाण्याचे बंदोबस्त केल्याचें शेवेसी दोनच्यार पत्रीं लिहिलेंच आहे. अंतरवेदीत उतरल्यावर रोहिले पठाण याचे दोन ठाण्यासी मात्र झुंज जाले. तेथे स्वामीचे प्रतापेकरून नक्षच

जाला. वरकड ठाणी रोहिल्यानी पठाणानी सलुखानेच सोडिली. सुजाउदौला याणीहि सलुखानेच सोडिली. येक गाजीपूरचा किला सुजाउदौलाकडील फौजदाराने खिचरास दिल्हा. त्यामुळें खिचरानें मातबर सरंजाम करून बसला आहे. वरकड तमाम जमीदार गढीबंद जाले आहेत. रयेतचे घरांत पैसा राहूं दिल्हा नाहीं. मुलुक काही पठाण रोहिले याणी लुटला. बाकी जमीदारानीं पैसा खाऊन गढ्या बलकाऊन बसले. आहेत. येकाद्याचें पारपत्य करावे त्यास राजश्री मल्हारजी बावाचे फौजेचा शह या प्रांतातून ढलला, यामुले फिरोन रोहिले याणी लबाडी करून आलीकडे उतरले. हाफीज रहमत, दुंदेखा वगैरे आंबल्याहून कूच केले. पुढें फौज आलीकडे आली. सकुराबादेचे ठाणे त्याणी बसविले. आम्ही येथून फौज पाठविली आहे. जमिदारांसी तूर्त स्नेहच करून थोक थोक हाती घेतले आहेत. अहमदखान आम्हासी बाह्यात्कारे श्नेह दाखवितो; परंतु अंतरी लबाड आहे. आम्हास कुमक कोणाकडील व्हावी तो अर्थ राहिला नाही. स्वामीचे प्रतापेकरून आमचे वस्तु होईल तेथवर बंदोबस्त करीतच आहो. रा गंगाधरपंत तात्या मथुरेस आहेत. सुरजमल जाट याणे आगरेयाचे किल्यास मोर्चे लाविले. किलेदार मजबुदीने झुंजत आहे. नजीबखान व पारचे रोहिले येकमते सर्व आहेत. अलीगोहर यासी आणावयाच्या विचारात आहे. सुजाउदौला जीवनपुरास दाखल जाला. अलीगोहर पटण्यातून तीन मजली अलीकडे आला आहे. फिरंगियाचे स्वाधीन आहे. मागाहून येईल वर्तमान सेवेसी लिहीत जाऊ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Balaji Govind reporting his efforts to restore Maratha prestige in the North.*

No. 6] *[27-6-1761*

श्री

श्रीमंत राजश्री त्रिंबकराव नाना
स्वामीचे सेवेसी

पोष्य बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागाईत ज्येष्ट वद्य १० पर्यंत आपले कृपेकरून येथास्थित असें विशेष. प्रस्तुत आपणांकडून पत्र येऊन् वर्तमान कलत नाहीं, तर निरंतर पत्रीं परामृष करीत जावा. इकडील वर्तमान तर सर्व आपण पाहून गेलेच आहेत. अलीकडे आम्ही अंतरवेदींत उतरल्यानंतर मंगलपूर फफुंद दोन जागा पठाण व

ाहिल्यांसी जुंज जालें, परंतु श्रीमंत स्वामीचे प्रतापेंकरून नक्षच जाहाला. ारकड ठाणीं रोहिले पठाणानीं सलूखेंच खाली करून दिलीं. कुरा व कडा येथें ावाब सुज्यातदौले याणीं ठाणीं बसविलीं होतीं तींहि सलूखेंच खाली जाहालीं. ाेक गाजीपूर मात्र वेणीबाहादर याणी कांहीं लोभावर नजर देऊन खिचराच्या ्वाला किल्ला केला. तेथें रूपराव खिचर मातबर सरंजामानिशीं राहिला आहे. ा प्रांतीं राजा कुशलसिंग व पंचमसिंग वगैरे तमाम जमीदार गढ्या बांधोन .फिरोन राहिले आहेत. रयेतेचें घरीं दाणा अगर पैसा राहूं दिला नाहीं; सर्व मुलूख लुटून जालोन खराब केला. कसब्यांतून मात्र सरकारी ठाणीं बसलीं आहेत. येखादे जागां गढ्यास लागोन जमीदारांचे पारपत्य करावें तर रोहिले फिरोन दंगा करावयाचे विचारावर आले. गंगातीरानें जागांजागां फौजा ठेऊन राहिल्या आहेत. कांहीं फौज सोरेमचे घाटीं उतरून सकुराबादेस आली. त्यास तिकडील सर्व जमीदार सामील होऊन सरकारी ठाणें ऊठविलें. येथूनहि फौज सकुराबादेकडे रवाना केली आहे. सकुराबादेस रोहिले आले. येणेंकरून तमाम माहालांत जमीदारांनीं दंगा करावयाचा विचार केला आहे. आम्हास कोणाचा उपराळा नाहीं. श्रीमंत स्वामीच्या प्रतापें जेथवर बंदोबस्त होईल तो करीतच आहों. मागाहून होईल वर्तमान तें लेहून पाठऊं. वरकड तीर्थस्वरूप राजश्री बाबूराव काका यासीं लिहिले आहे तें आपणांस विदित करतील. वरकड सर्व प्रकारें भरवसा आपला आहे. सदैव पत्रीं सांभाळ करीत असिलें पाहिजे. बहुत काय लिहिणें? कृपा लोभ असो दीजे हें विनंती.

¶*Balaji Govind and Gangadhar Govind are attempting to restore order in the Doab after the disaster of Panipat.*

No. 7] [*29-6-1761*

श्री

श्रीमंत राजश्री महिपतराव दादा गोसावी यांसी

स्नेहपूर्वक चिमणाजी रंगनाथ कृतानेक आसीर्वाद विनंती उपरी. येथील क्षेम ताा छ २९ जिल्काद मुाा पाहाडी प्रांत झासी सुखरूप असो विशेष. तीनचार वेळां पत्रें पाठविली परंतु पत्राचें उतर येकहि न आलें. तेणेकरून चित सापेक्षित असे. तरी येसें न पाहिजे. सदैव पत्र पाठऊन तोषवीत जावे. राजे खेतसिंग याचा मजकूर तरी पूर्वी सरकारांत येकनिष्ठता दाखविली. लढाईचा प्रकार झाल्यास पूर्वीच्या बुधीस ठिकाणा राहिला नाहीं. तेंसमई राजे हिंदुपत जागाहि काही

देत होता परंतु ते समई भेटला नाही. दिलीकडील प्रकार जाल्यास कितीका प्रकारचा ध्यानांत आंदेशा आणून उभयेता बंधु येकत्र जाले. राजानीं खर्चास कांहीं एक दिल्हे नाहीं. येथें लोकांचे कर्जदार जालो. देसी जावे तो मार्ग फुटत नाहीं. रा॥ गणेश संभाजी यापासीं आहो. राजकी वर्तमान तर श्रीमंताच्या पत्रीं सविस्तर व राज्याकडील साद्यंत विस्तार लिहिला आहे. आपण आम्हास आश्रे आहेत दुसरा कोन्ही नाहींत. श्रीमंतास पत्र पाठविलें आहे ते आक्षरशा वाचून दाखवावे आणि जाब सत्वर लेहून पाठवावे. पुढे जैसी आज्ञा येथें राहावें कीं देसी श्रीमंतापासीं यावें. ज्याप्रमाणें आपण लेहून पाठवितील त्याप्रा॥ वर्तणूक करीन. कासिदास मार्गाकरितां खर्चास त्यानीं थोडी घेऊन गेले. त्यास सरकारातून खर्चास देवावे म्हणजे मार्गाची त्याची बेगमी होईल. बहुत काय लिहिणे हा आसीर्वाद.

¶Chimanaji Ranganath writes to Mahipatrao that he has been detained in the camp of Ganesh Sambhaji owing to the unsafe condition of roads. He further adds that the news of the defeat of the Marathas at Panipat has encouraged the Bundela chiefs Hindupat and Khetsing to throw off Maratha allegiance.

No. 8] *[June 1761 ?*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री चिंतोपंत दाजी स्वामीचे सेवेसी

पौ॥ गोपालराव गणेश सां॥ नमस्कार विनता उपरा. यथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले ते प्रा॥ जाहाले. लिहिले वर्तमान सविस्तर कलो आले. त्यास पत्रे आज आम्हास व राजश्री गणेशपंत आणास आली. तेथे लिहिले आहे जे अबदाली आपल्या देशास गेला. सुज्यातदौला लखनूस पलोन गेला. नजीबखान व गाजदीखान दिलींत आहे. त्याजकडून वकील सलूखास आले आहेत. त्यास दिलीकडील बंदोबस्तास राजश्री गंगाधरपंत तात्यास पाठविले आहे. सलूख सत्वरच होऊन दिलीचा बंदोबस्त करितो. आम्ही रायेपुरास येणार होतों. परंतु दिलीकडेस जावयाची जलदी जाहाली आहे. आम्ही जातो. तुम्ही व राजश्री बालाजी गोविंद व राजश्री गणेश संभाजी अंतरवेदींत उतरोन बंदोबस्त करणें. कमावीसदारांसहि

पत्रे पाठविली आहेत म्हणून सुभेदारानी लिहिलें होते ती पत्रे बजिनस रामाजीपंत याणी पाहिली आहेत. त्यास तुम्ही आजपावेतो धीर धरून नक्षोनसी[१] राहिला. त्यास संवछर प्रतिपदेच्या मुहुर्ते येमुनापार प्रस्तान काढून उतरत आहो. तुम्ही आम्ही येकत्र होऊन अनुक्रमे तुम्हापासोन ठाणी बसवीत जाऊ. बालाजीपंत पार उतरत आहेत किंवा उतरले असतील. तुम्ही सिजेपावेतो राहिला, पुढे निवेपावेतो उतावली न करावी. याजउपरी अंतरवेदींतील ठाणी पार उतरताच खाली होऊन गंगापार जात आहेत. आपण चिंता न करावी. आकबरपूरांत पाच चार दिवसांत जाऊन बसाल. द्वितीयेस आम्ही रायेपुरास जाणार आहो. तेथे गेल्यास तेथूनच उतरावयाचा विचार ठरल्यास आपणास लिहून पाठऊन. येका दोन रोजात येथेच तजवीज ठरल्यास त्याजसारखे आपणास पत्र पाठऊ. कलले पाहिजे. आपण मोठा इस्तकलाल केला. मोठी गोष्ट गेली. आता तर फलादेश आहे. सत्वरच पार उतरून. कलले पाहिजे. बहुत काय लिहिणे कृपा करीजे हे विनंती.

¶*Letter from Gopalrao Ganesh to Chintopant describing how earnestly he was trying to re-establish Maratha influence at Delhi after the disaster of Panipat.*

No. 9] [*1-7-1761*

पैा छ ९ मोहरम श्रावण

श्री

श्रीमंत राजश्री महिपतराऊ दादा स्वामी गोसावी
यासी

श्री सदासिव खंडेराव आसीर्वाद विनंती उपरी. येथील क्षेम ता छ २७ जिलकाद पावेतो आपले कृपेकरून अमदाबादेस कुशलरूप असो विशाष. बहुत दिवस स्वामीकडील वर्तमान कलत नाही. तेणेकरून चित उद्विग्न आसे. तर यैसे न पाहिजे. सदोदित आलिया वार्तिकासमवेत कृपापत्र पाठऊन चितास आनंदवीत व सांभालीत असिले पाहिजे. यानंतर आपण व श्रीमंत राजश्री नाना व सर्व मंडळी हिंदुस्थानातून सैा पार्वतीबाई समवेत स्वास्तिक्षेम आला हे वर्तमान श्रीमंत राजश्री नानानी आम्हास पत्र लिहिले त्यात मजकूर लिहिला तो वाचून परम आनंद जाहाला. आपले भेटीचा लाभ घ्यावा हा हेत बहुत आहे. परंतु ह्या

---

१ महत्त्व, दबाव.

प्रांती दंगा येंदा हिंदुस्तानचे हगामाकरिता जाला तो आपल्यासी व श्रीमंत राजश्री नानास पूर्वी पत्री मजकूर लिहिला होता त्याजवरून सर्व वर्तमान अवगत जाले असेल तेच वर्तमान अद्यापिपर्यंत आहे. काहीसे जाले म्हणोन येता न ये येसेहि करून येऊं परंतु राजश्री आपाजी गणेश सुभेदार येऊ देणार नाहीत. बरे जे दिवसी भेटी होईल तो दिवस सुदिन असे. आम्ही पदरचे आसो. सदोदित कृपापत्री सनाथ सांभाल करीत जावा. विदित असे. वरकड वर्तमान श्रीमंत राजश्री नानाचे पत्रावरून सर्व अभिप्राये श्रवण होईल. पत्राचें प्रत्योतर पाठवणें. आपले कुशलतेचें व दरबारी राजकी नवल कीं हिंदुस्थानांतील वगैरे सर्व वर्तमान तपसीलवार लिहिलें पाहिजे. बहुत काये लिहिणें. कृपा लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶*Sadashiv Khanderao congratulates one Mahipatrao on his safe return from Panipat and expresses a desire to meet him.*

No. 10] [*Recd. 2-7-1761*

छ २८ जिल्काद इसने

श्री

पुा श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

विज्ञापना. सकुराबादेस रोहिल्याची फौज दाखल जाली. त्यांचे बल विशेष आहे. नजीबखान दिलीहून बाहीर निघणार. आगरेयास जाटानें मोर्चे लाविले. सबब दिलीहून साहजादे यास बाहीर काढून हंगामा करावा हा हेत त्याचा आहे. जाटासी पेच आहे. गाजुदीखान जाटाजवल आहे. रोहिले दंगा करावया तयार आहेत. राजश्री गंगाधरपंत तात्यास आम्ही लिहिले आहे. त्याजकडून काही सलुखाचा प्रकार सुरजमल याचे विद्यमाने जाला तर उतम; नाही तर सकुराबादेचे ठाणे त्याचे बसले. पुढेहि यावयाचा विचार करितील. हाफीज रहिमत वगैरे अलीकडे उतरणार. ते उतरल्यावर भारी होईल. आम्ही सकुराबादेच्या मोहोरावर फौज रवाना केली आहे. मागाहून होईल ते सेवेसी लिहून पाठऊं. सागर प्रांती जमिदारानी मोठा हंगामा करून हटयास मोर्चे लाविले. तमाम ठाणी दमोई तेजगड रहिली बसविली. आम्हास अंतरवेदेचे शहामुलें फौज तिकडे पाठविता नये. राजे प्रीथिसिंग याणीहि बदनियत करून दुंडी केली. सागरास मोर्चे लावावयाचा विचार आरंभिला. तेव्हा राजश्री जानोजी भोसले यांस सागर प्रांती आणिले आणि हटयाचे मोर्चे उठविले. जमीदाराचेंहि पारपत्य केलें तों

राजश्री मल्हारजीबावा रामपुऱ्याकडे लांबले; व राजश्री जानोजीबावाहि नागपुराकडे जाऊं लागले. तेव्हां बुंदेल्यासी कलले त्या रितीने सल्लख केला. राजे प्रीथिसिंग यांसहि तूर्त मायेत घेतले. जाणोजीबावा जाणार यामुळे तेजगड अभान वगैरे ठाणीं येणार नाहींत. झासीकडेहि गुजरानी दंगा आरंभिला आहे. चौकडे दंगाच तूर्त दिसतो. या प्रांती फौज मातबर येईल त्याचा बंदोबस्त होईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Balaji Govind reports the movements of Najibkhan, the Jat, Holkar and Rohilla chiefs in the North. The letter also refers to disturbances in Bundelkhand and the Doab.

No. 11] [*2-7-1761*

छ १ जिल्हेज इसने

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक आज्ञाधारक गुंडो कोसी[1] मुा श्रीगोंदे चरणावर मस्तक ठेऊन साा नमस्कार विज्ञाप्ति. येथील वर्तमान ताा छ २८ माहे जिल्कादपावेतो साहेबाच्या कृपावलोकणेकरून येथास्थित असें विशेष. छ २९ माहे जिलकाद साहेबाकडून राजश्री आबाजी माहादेव येऊन संध्याकाली दाखल जाले. राजश्री बलवंतराव गोपाल याची भेट घेतली. छ २७ माहे जिल्काद प्राथकाली निंबाबाईचे भेटीस गेले. भेट जालियावर साहेबाच्या आज्ञेप्रमाणें निंबाबाईसी बोलले. वर्तमान ऐकताच निंबाबाई रागास आली. राजश्री नारोबा सेनवाई दिवान याच्या वाडियावर चौकी पाठविली; सबब जे तुम्हीच सरकारात कुषमांडे करीता, हा विचार ध्यानास आणून रागास आली. संध्याकाली राजश्री आबाजी माहादेव याजला निंबाबाईनी बोलाऊन बोलले जे आमचे अकारीक राा साबाजी सिंदे व चिंतोबा यैसे हिंदुस्थान प्रांतात आहेत. ते चाकरीवर आहेत. ते आलियावर पुढें आनखी फौज ठेवणे ते ठेविली जाईल; परंतु माहादाजी सिंदे याचे अनकूल पडत नाहीं यैसे पष्ट बोलली. राा आबाजी माहादेव याजला पागोटे १ व सेला १ यैसी वस्त्रें २ देऊन रुकशात केले. सेवेसी श्रुत होय छ २८ माहे जिल्काद. राजश्री जाणूजी निंबालकर यानी बरंकदाज ३०० तीनसे श्रीगोंदियासी

---

१ सिंद्यांचा कारकून, श्रीगोंदास.

बंदोबस्तीस मदत पाठविले होतें ते तीन दिवस होतें चौथे रोजी मागारे गेले. जे वेलेस अगत्य लागेल ते वेलेस मागती येनार आहेत. छ २६ माहे जिल्काद. उजनीहून राजश्री चिंतोबा याचा पुत्र श्रीगोंदियासी आले. राजश्री जणकोजी सिंदे जिवंत आहेत म्हणोन वार्ता मात्र सांगतात. राजश्री जाणूजी निंबालकर करमालियाहून रातोरात पुण्यास साहेबाच्या भेटीस येऊन मागारे गेले, यैसी वार्ता श्रीगोंदियात बहुतसी आहे. सेवेसी शृत्ये होये हे विज्ञापना.

¶Gundo Kashi writes to Dadasaheb from Shrigonda describing an interview between Abaji Mahadev and Nimbabai Sindia who did not accept the proposal regarding Mahadaji Sindia's succession but promised to raise a larger force on the return of Sabaji and Chintoba from the North. The letter incidentally refers to rumours that Jankoji Sindia is living.

No. 12] *[12-5-1761*

छ २४ जिलकाद इसने

सितैन

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक गोपाल केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ ६ माहे शवल मुकाम भांडेर प्रांत झासी राजश्री बाबूराऊ कोनेर याजसमागमे आपल्या प्रतापेकरून सेवकाचे वृत्त येथास्थित आसें विशेष. पाा उचडचे वृत सेवेसी विनंती लिहिली होती. आज्ञापत्र सादर जाले कीं राजश्री मल्हारराऊ सुभेदार व राजश्री नाना पुरंदरे याजला निवेदन करणे, ते सांगतील त्याप्रमाणें वर्तणूक करणें. आज्ञेप्रमाणें उभयेतांचे सेवेसी आपाजी मैराल कारकून पाठविला. महिना दीडमहिना समागमें राहिले. सर्व सरदारांस पाा मजकुरचे वर्तमान सांगितले कीं दुसाला मिळून कमजाद तीन लक्ष रुा घेणे. त्यापैकीं पाऊण लक्ष रुा वसूल, सवादोन लक्ष हमी घेणें. जमीदार दरोबस्त बदलले आहेत. पैसा देत नाहींत. पारपत्य करावे अगर दोन हजार फौज द्यावी; परंतु कांहीं केल्यानें दोनी विचार घडून न आले. प्रस्तुत तों फौजा देशास गेल्या. सालबाईचे ठाणे राजश्री विठलरायानी नरवरकरास दिले. त्यावरून पछोरकर जाट गोहदेंसी बळजू जाटाकडें गेला. उचडकरहि दरोबस्त बळजू जाटानें बोलाऊन नेले. सर्व जाट येकत्र जाले आहेत. दतियेकरासी व

नरवरकरासी बिघाड करणार. आजीपरयंत उचड परगणियात भरोलीस गढी आहे, ते जतन केली आहे. दोनसे माणूस व सरंजाम पोख्त केला आहे. कसबियात माझे व सिलेदार मिळून संभर राऊत सेदिडसे माणूस ठेविले आहे. याउपर कसे ठरतील ते पाहवे. झासीस कर्जे घेऊन त्याजला खर्चास देतो. कोण्या गावास माणूस जाऊ पावत नाहीं. साल मजकूरची रसद दिलीस नेऊन दिली. त्यापैकीं येक रुपया प्राप्त नाहीं. याप्रमाणे वर्तमान आहे. पुढे आज्ञा येईल त्याप्रमाणें वर्तणूक केली जाईल. राजश्री गोपालराऊ बापूजी झासींच्या मदतीस आले होते. येक मास जाला तो आहिरानी आहिरवाडा पूर्वीच हस्तगत केलाच आहे. गढाउडिरा दोन किले पूर्वी सरकारात होते ते राजश्री राघो गोविंद यानी पाडिले. प्रस्तुत तेथे आहिर जाऊन बसले आणि किले बांधितात आणि गोपालरायाकडील भोरासे वगैरे माहाल आहेत तेथे आहिरानी धामधूम करून गढ्या घेतल्या. राहिल्या त्यास मोरचे लाविले आहेत, यास्तव हे कूच करून त्या प्रांतास गेले. झासी प्रांती वोडसेकराचा वगैरे रजवाडियाचा दंगा बहुत आहे. कांहीं फौज या प्रांतास छावनीस राहिली असती तर इतका दंगा न होता. आपल्या प्रतापेकरून होईल ते खरे. विशेष काय लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*Gopal Keshav, from Bhander in the province of Jhansi, writes to the Peshwa news about the Jats and other petty chieftains who have turned rebellious and are creating trouble.*

No. 13] [*24-8-1761*

छ २३ मोहरम

इसने.

श्री

शेवेसी भगवंत बिष्णु विज्ञापना येसीजे. वारानसीहून साहुकारियात पत्र आले की सुजायेतद्वला शाहजादियास बंगालियातून घेऊन जेष्ठ वद्य सप्तमीस कासीस दाखल जाले. तेथून कूच दरकूच दिलीस जाणार आहेत; परंतु त्याचे मनसबे सिधीस जानार नाहीत. माहराजास मुलुक काबल खंदारपर्यंत श्रीजीने दिधला आहे; परंतु त्याची वर्मे समजलियास सर्व मनसबे सिधीस जातील. माहराज म्हनतील की ती वर्मे कोनती तर जेव्हां ब्राम्हनाचे राज्ये जाले तेव्हा सहजच सत्ययुग लागले. जेथपरियेंत कल्युगचा संचार आहे तेथपरियंत

ब्राह्मनाचे राज्य आहे; परंतु थोडकेशे राज्ये श्रीमंताणी सोडविले. परंतु जितके राज्ये सोडविले तितकियाचा बंदोबस्त सत्ययुगाचे धर्माप्रमाणे जाला नाही. याजकरिता पुरता मुलुक सर जाला नाही. स्वामी म्हनतील की सत्ययुगचे धर्म कोनते त्याचा विस्तार लिहिल्यात येत नाही. माहाराजाचेहि संग्रही कोन्ही तत्वव्येत असतील त्याचे विचारे वर्तणूक जालियास सर्व मुलुक सर होऊन माहराजाचे मनोदयानरूप मनसबे सिधीस जातील. स्वामी म्हनतील की तत्वव्यता काशावरून जानावा, त्याची वलख कैसी जानावी; तर तत्वव्यत्याची परीक्षा ऐसी आहे की ज्या दंडदीपाच्या आष्ट दिशा आहेत तेथे जे दिशेची मोहीम योजून आलियास तिकडे त्याचे विचारे पाठऊन ज्यास सांगितले त्याची उभारनी करून सत्वर रवाना करावे. तिकडील बंदोबस्त जालियावर ज्या ज्या दिशेची मोहीम योजून आलियास त्याचे विचारेच पाठऊन अष्ट दिशेचा बंदोबस्त करून जे दिशेचा बंदोबस्त जाला तेच दिशेस सतयुगाचे धर्माप्रमाने मर्यादा बांधोन दुसरी दिशा सर करावी याचे प्रमाने मुलुक सर जालियास त्याचप्रमाने सतयुगचे धर्म चालवावे. ऐसे जालियावर सर्व बंदोबस्त आपले मनोदयानरूप घडोन येईल. या दिशेची मोहीम योजून आलियास सेवकासहि लिहून पाठविले पाहिजे. स्वामीचे अन्नाचे प्रतापे जो मनसबा सुचल तैसे लिहून सेवसी पाठऊन. रा॥ जानोजी भोसले सेनासाहेब सुभा त्याचे बातमीचे वर्तमान येथून कोन्ही मातबर माणूस व वकील येसे माहराजाचे सेवेसी पाठविनार आहेत. येथील विचार आपले आज्ञेविरहित नाहीत. परंतु सरदारी येथील वोढगस्त आहे. परंतु याचे णिष्ठेत सांप्रत तर काही आंतर आपले ठाई नाही. याचे हते कितेक बंदोबस्त सिधीस जातील. आपनहि सर्वजान आहेत. मायेत घेतील. आम्ही सेवक लोकानी ल्याहावेसे नाही. बहुत विस्तार करोन लिहिला म्हनऊन सेवकावर विश्याद न करावा. सेवसी विज्ञाप्ति.

¶*The writer states, inter alia, that Shuja-ud-daula along with the Shahzada has left Bengal with the intention of marching on Delhi, but opines that he will not reach his objective.*

No. 14] [*15-10-1761*

पो छ १६ रबिलावल

श्रीगजानन

श्रीमंत राजश्री रावसाहेब

स्वामीचे सेवेसी

आज्ञांकित त्रिंबक विश्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम तागाईत छ १६ माहे रबिलावल जाणोन स्वकुशल लेखन करीत गेलें पाहिजे

विशेष. इकडील वर्तमान तर रावराजे यांचा मुकाम आज सागरीं केला आहे. यांची नजर ठिकाणी नाहीं, पजनसिंग वगैरे याची भेट येथेंच होणार. आपले तालुकियाचे गांवगना चिठ्या केल्या आहेत. कोणा गावास शंभर कोणा गांवास दोनसें याप्रमाणें आहे. यांचा मनसुबा कीं आवघे भाऊबंद येके ठिकाणी जाले म्हणजे सागरी ठाणें बसवावें. याप्रमाणें वर्तमान आहे. तर पत्र पावतांच यांजला सरकारांतून येकपत्र रावराजे यांस व येक पत्र राजश्री तीर्थाजीपंत यास लिहावें की, तुम्ही सागरीं मुकाम केला तर हे गोष्ट कार्याची नाहीं ऐसें यांस पत्र सत्वर पाठवावें. नाही तर आम्हीं याजला येथून उठऊन देतों. परंतु आपली आज्ञा व उभयेतांस येक पत्र ऐसें सत्वर पाठवावें. पुढें जमाव जालिया मग कठिण. यास्तव विनंती लिहिली जाते. व राजश्री चिमणाजी मोरेश्वरहि आपले जवलच आहेत त्यासहि सत्वर महूस रवाना करावें. यांचा मनसुबा विपरीत दिसतो. येकायेकींच सागरास खरगापुरीहून दोन दिवसांत आले व ठहरोलीकरांचे भाऊबंद प्राणसिंग विजनावाले तेहि समागमें आहेत. आज येथून पत्रें टहरोलीस व चिरगांवास गेलीं कीं तुम्हीं सागरीं भेटावयास येणें. त्यास यांस पत्र सत्वर पाठवावें व चिमणाजीपंताची लवकर रवानगी करावी. यांची भीडभाड जमाव थोडकाच आहे. तर येवडियांतच यांचें पारपत्य करावें. हे मोठे भले माणूस आहे. भीड जमाव जालिया आटोपणार नाहींत यास्तव आज्ञा लिहितों. पत्रोत्तर सत्वर पाठवावें. रातोरात जाबसाल देविला पाहिजे. बहुत काय लिहिणें? गढीचा बंदोबस्त येथास्थित आहे, गढीची चिंता न करावी. विनंती सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति.

¶*Disturbances in Bundelkhand are reported to Vishvasrao Lakshman and immediate succour is solicited in order to nip the trouble in the bud.*

No. 15] [*18-10-1761*

पो छ १९ रावल

श्रीगजानन

श्रीमंत राजश्री रावसाहेब
स्वामीचे सेवेसी

आज्ञांकित त्रिंबक विश्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम तागाईत छ १९ माहे रावल मुकाम ठाणें सागर स्वामीचे प्रतापे सुखरूप

असों विशेष. इकडील वर्तमान तर राबराजे व तीर्थराजपंत आज कूच करून येथून जाणार. तीर्थराजपंत तर वोंडशास जातात व राजे राव सुजानपूर वोंडशानजीक सतारा येथें कूच करून जातात. त्यास माहाराजाचे पुण्येकरून याजला साफ सांगितलें कीं सागरीहून कूच करून जाणे. नाहीं तरी तुम्हांसी व झासीहून स्वार आलेत त्यांसी कजिया होईल. त्यास त्यानी विनंती केली कीं आम्हीं येथून जातों. येथें राहात नाहीं. त्यास ते आज येथून कूच करून जातात. हे गेलिया आज्ञा होईल तर ब्राम्हणुव्याचे तालुक्यांत ठहरोलीकराचीं माणसें गांवगना बसलीं आहेत, आज्ञा होईल तर तिकडे जाऊन उठऊन देऊं व किर(कोळ) बुंधेल आहेत याचे पारपत्ये थोडक्यांतच होईल. याची काये आज्ञा ते करावी व धमणावाले ठाकूर यानी आमचा गांव मौजे चपलोटा दरोबस्त लुटून पस्त केला. आणखी जमाव म्हणावा तर दाहा तुबका जमा आहे यास्तव आज्ञा होईल तर पारपत्ये करूं. फौज आलीकडे उतरऊ. विना फौज येथें राहिल्यावांचून समीपील बुंधेल्याचें पारपत्ये होणार नाहीं. याची आज्ञा देवावी व राव राजे येथून जाते परंतु जेव्हां फौज पैलतीरीं आली तेव्हां गेले ऐसें वर्तमान आहे. सिष्टाचारी बहुत करितात, परंतु याजसारिख भले हेच आहे. यांची कोणी भरवसियावर राहील म्हणजे यानी त्याजला दबकाविलें याप्रमाणें वर्तमान आहे. तर च्यार दिवस फौज सागरींच राहूं द्यावी. भक्षावयासहि आज्ञेप्रमाणें कर्ज करून देत जातों परंतु या किरकोल बुंधेल्याचें पारपत्ये आपले पुण्येकरून करितों याची परवानगी सत्वर लिहून पाठवावी. येथून तरकारी हरजिंनसी डालिया २ पाठविल्या आहेत पावतील. बितपसील परवरे १२० दोडके १० भोपले २ तोंडाली ८८।। साखरनिंबें पाठविलें आहे पावेल. सरसेंब्याकडे पजनसिंगानें मोठी धूम आरंभिली आहे. जमाव तों शंभर प्यादा व पंचवीस स्वार आहेत. परंतु बुंधेल्याची दहशत मोठी गावास आहे यास्तव बाम्हणुव्याकडे गेलिया तेहि दबावाखाले येतील. यास्तव विनंति लिहिली जाते याची आज्ञा खामखा करून पाठवावी. आणखी स्वार आम्हां नलगे. येवढी स्वारीनसी ठहरोली देखील भयाभीत होईल. आपण पुण्यवान आहे. मोठें अरिष्ट भगवतें शम केलें, त्यावर हे गरीब काये करणार ? येंदा देशच्या फौजा आल्या म्हणजे या भशागढीचे चिरगाव टहरोली याचे पारपत्य अगत्यरूप करवावे. ज्याप्रमाणें बडेगांवची गत जाली याप्रमाणें त्यांचीहि करावी हें आमचें मानस आहे. आपण पुण्यवान आहेत. आमचें मानस ईश्वर पार पाडील. यांची बुंधेल्याची मर्जी ठिकाणी नाहीं. हे मोठे भले माणूस आहेत ! तर या पत्राचें उत्तर सत्वर पाठवावें. सेवेसीं विनंती शृत होये हे विज्ञप्ति.

¶*Immediate help is requisitioned to put down disturbances in Bundelkhand.*

4136

No. 16] [27-10-1761

छ २७ राखर इसने

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामी साहेबांचे सेवेसी

विनंती सेवक बालाजी गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ २८ माहे रबिलावल मुकाम नेणवें स्वामी साहेबांचे कृपाकटाक्षें येथास्थित असों विशेष. इकडील वर्तमान तो पूर्वी तपसिलेंकरून अजुरदार जोडीसमागमें विनंती केलें. आ * * जाहलें असेल. सांप्रत स्वामीकडील आज्ञापत्र छ * [पत्राचा पुढील भाग तुटला आहे. त्यानंतर पत्राचे पाठीमागील मजकूर.] * जबरदस्त आहे. यापुढे कांही पुरुषार्थ कोणाचाहि चालत नाही. गिलजीहि अटकेस पावला म्हणोन वदंता. बातनी ठीक आली नाहीं. आली म्हणजे सेवेसी विनंती केली जाईल. वरकड वर्तमान पुर्वणीवरून श्रुत होईल. बहुत काये लिहिणें? कृपा लोभ केला पाहिजे हे विज्ञापना.

¶*Balaji Govind informs Dadasaheb that the Gilchas have penetrated as far as Attock.*

No. 17] [27-10-1761

छ २७ राखर इसने

श्री

पुा श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामी साहेबांचे सेवेसी

विज्ञापना ऐसीजे. राजे बिजेसिंग यांचे कूचाची आवाई जोधपुराहून मेडत्यासी येणार म्हणोन आहे; यास्तव की राजे माधोसिंग यानी राजे रामसिंग याचा अभिमान धरला आहे. चांपावतानी बोलाऊन सांभरेंत ठेविलें, आणिकहि रजपूत रुसवा करून राजे माधोसिंगजवळ येणार म्हणोन वंदता आहें. निश्चयात्मक बातनी * * * तिकडेहि बातनीस्तव जोड्या

(यापुढील पत्राचा भाग फाटून गहाळ झाला आहे.)

¶*Balaji Govind to Dadasaheb, informing him that Bijesing is proceeding to Merta from Jodhpur and that Madhosing has espoused the cause of Ramsing,*

No. 18] [27-10-1761

छ २७ राखर इसने

श्री

पुा श्रीमंत राजश्री दादासाहब
स्वामी साहेबांचे सेवेसी

विज्ञापना ऐसिजे. सेवकासी राजियांकडूनहि रोजमरा मिलत नाहीं. याकरितां स्वामीसहि वारंवार विनंती दोनच्यारदां लिहिली; परंतु येकदा तो आज्ञा पावली की तिकडे राजश्री मल्हारजी होलकर आहेत त्याजला लिहिणें. ते थोडी बहुत बेगमी करणें ते करतील. तेथोन ऐवज पाठवावया * सुरक्षित पोहचणार नाहीं. अगर अगत्य अगत्य खर्चापुरते * दोनशे मेलऊन मजला इकडे देविले तर सरकारातून * * * कोणी सावकार मिलत * (पत्राचा पुढील भाग फाटून गहाळ झाला आहे. त्यानंतर पत्राचे पाठीमागील मजकूर.) * * याकरिता विनंती * * * सेवकांचा निर्वाह लस्कर * * * स्वामी खावंद आहेत. सेवकांचा प्रतिपाल करणार साहेब समर्थ आहेत. कासिदांच्या जोड्या स्वामीजवल जातात त्याजला दिवसगत लागते. विनंती की लवकर जाब सरकारातून जाहलियां सेवकासी तिकडील खबरदारी राहत जाईल. सर्व प्रकारे प्रतिपाल करणार स्वामी साहेब समर्थ आहेत. बहुत काये लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.

¶*Balaji Govind to Dadasaheb, complaining that the Raja of Jaipur has not paid him any remuneration and requesting him to send some money.*

No. 19] [27-10-1761

छ २७ राखर इसने

श्रीशंकर

पुा श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामी साहेबांचे सेवेसी

विज्ञापना ऐसीजे. राजे माधोसिंग यानी दवलतसिंग चत्रभुजोत याजसमागमे सरंजाम देऊन बादशाहजाद्यासी बोलावयाकरितां नजीबखानाजवल पाठविलें. तो जाऊन दिलीस पावला. नजीबखानासी भेटी जाली. * प्रहरपावतो येकांत केला. तदनंतर तोरें २ व रक्कम जवाहिर १ दवलतसिंगासी दिली व समागमचे

लोकांसी तोरे दिले. हा कालपावेता * जाणतच आहेत. बादशाहाचे घरांत काही बाकी * * * * गोष्टी तो बसले. ठिकाणी कांही—(यापुढील पत्राचा भाग फाटून गहाळ झाला आहे.)

¶*Balaji Govind to Dadasaheb, informing him that Madhosing has deputed Daulatsing to Najibkhan to confer with the son of the Emperor.*

No. 20] [*27-10-1761*

छ २७ राखर इसने

श्रीशंकर

पुा श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामी साहेबांचे सेवेसी

विनंती सेवक बालाजी गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ २८ माहे रावल मुकाम नेणवें स्वामी साहेबांचे कृपाकटाक्षें येथास्थित असों विशेष. येथील मजकूर तर पूर्वी अजुरदार जोडीसमागमें विनंती पत्रें (पाठविलीं) आहेत, त्यावरून श्रुत जाहलें असेल. सांप्रत इकडील प्र * * * नासी व ब्रम्हपोता यांनी केशवरायाचे * (पत्राचा पुढील भाग फाटून गहाळ झाला आहे. त्यानंतर पत्राचे पाठीमागील मजकूर.) * * अनायासे उपायाने शत्रूस कमजोर करून टाकावे. राजश्री मल्हारजी होलकरासी पत्र पाठवणार साहेब समर्थ आहेत. तीन दिवसपावेतो मनसबा राहिला. दिवाण नंदलाल यांजला हुकूम केला कीं तुम्ही बमैफौज सुरतरामाजवल जाऊन शामील व्हा. यावरून नंदलालानी अर्ज केला कीं तिवडियासीं आम्हांसमागमें द्या. तिवडियानी राजियासीं म्हटलें कीं माहराज माझे तो काम जुजात जावयाचे नाहीं. दिवाणच जातील. राजियानीं नंदलालासी आज्ञा केली कीं तुम्हीं नेणवियाची फते करून पाटणासी जा. दिवाणासी रुखसत केलें; तेहि दिवसा येका दोंमधे येथें येणार. आलियावर जे वर्तमान होईल ते सेवेसी विनंती केलें जाईल. वरकड कितेक वर्तमान पुर्वणीवरून श्रुत होईल. बहुत काये लिहिणे? कृपा केली पाहिजे हे विज्ञाप्ति.

¶*Balaji Govind to Dadasaheb, informing him that the Raja has deputed his Diwan Nandlal to proceed with an army to Nenave and capture it.*

No. 21] [27-10-1761

छ २७ राखर इसने

श्री

पुा श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामी साहेबांचे सेवेसी

विज्ञापना ऐसीजे. दोन तीनदां सेवेसी विनंती लिहिली कीं राजे माधोसिंग याजकडून खर्चास रोजमरा पूर्वी मिलत होता तो गिलजी या प्रांतास आला व श्रीमंत भाऊसाहेबासी व त्यासीं जुंज जाले त्या तागाईत रोजमरा राजियांकडून मिलत नाहीं. याहीवर सेवकाजवल खर्च बहुत, श्रीमंताचे आज्ञेनसार दहा जोड्या * * बातनीस सेवकाजवल राहतात. जागजागा * * * करितो त्याचाहि रोजमरा (पत्राचा पुढील भाग फाटून गहाळ झाला आहे. त्यानंतर पत्राचे पाठीमागील मजकूर.) * * चिटी आम्हावर पाठवणें. सर * * पोहचते केले जातील तर तसा सावकार कोणी मिलत नाहीं; आणि साहेब तेथोन पाठवितील तर मार्गात पोहचणार नाहीं याजकरितां संदेह. यास्तव विनंती की इकडे राजश्री मल्हारजी होलकर आहेत यांजला पत्र सादर होये की राजश्री बालाजी गोविंद यांसीं खर्चासी याप्रमाणें पावतें करणें. इतके पत्र सादर जाले म्हणजे होलकरांजवल पाठऊन खर्चाची नेमणुकी करून कासिदासी आजपावेतो ऐवज चुकवून देऊं. आजपावेतो कासिदासी आज्ञेप्रमाणें ठेविलें. आतां आज्ञा येईल तर ठेऊ; नाहीं तर दूर करूं. दोनीतून येक आज्ञा. व परामृश घेणार साहेब समर्थ आहेत. बहुत काये लिहिणें. कृपा केली पो हे विज्ञाप्ति.

¶*Balaji Govind complains to Dadasaheb that he has not been receiving his remuneration from Madhosing who has stopped paying it since Bhausaheb's encounter with the Gilchas. He requests him to write to Holkar to make payment to him so that he can pay the wages of the several messengers in his service. Otherwise he will have to discharge them.*

No. 22] [13-11-1761

पौ छ २२ जावल

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक त्रिंबकराम फडणीस सुभा कालपी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ १९ रबिलाखर मुकाम नजीक मुकुंदबारी येथें राजश्री

मल्हारजी होळकर याचें लष्करांत स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. राजश्री गणेश संभाजीकडे मामलत आज दोन वर्षे जाली त्यापासून फडनिशीचें काम येकंदर न घेतलें. येविशी दोनच्यार विनंतीपत्रीं सविस्तर वर्तमान लिहोन पाठविलें त्यावरून विदित जाहालेंच असेल. यैशास राजश्री बाबूराव कोन्हेर यांणीं झांशीचा किल्ला हवाला केल्यावर केवळच बदमामलीवर नजर देऊन झांशी शहरापासून येक लाख तीस हजार दंड घेतला व आणखी गांवांतील राजश्री केशवराव हरकारे यांचा पुत्र वगैरे दक्षिणी ग्रहस्त बावन आसामी लिहोन कैद करून दंड घ्यावा ऐसा विचार केला. राजश्री माधवराव वेंकटेश याकडे नारो शंकर याणी झांशी संस्थानच्या सनदा पाठविल्या त्या मशारनिलेनीं दाखविल्या. परंतु अमल न दिल्हा. उलटें गांवांतून काढून दिल्हा. सुज्यातदौलाकडे गोसावी याचे विद्यमानें चाकरीचें सूत्र लाऊन वकील पाठऊन ठीक केलं. सेवक सरकारांत विनंतीपत्रें लिहितो हें वर्तमान पुण्याहून मशारनिलेचा वकील सदाशिव बल्लाल व त्याचा भाऊ गोपाळ संभाजी यांणीं लिहोन पाठविलें त्यावरून सेवकांस कैद करावें असा विचार योजिला. तेव्हां येकायेकींच गणेश संभाजी बडेगाव नजीक झांशी दोन कोस येथें होता व सेवक झाशींस होता तेथून भाद्रपद वद्य द्वादशीस सर्व वस्तभाव व कागदपत्र सोडून कारकून न ठेवतां निघोन लांब लांब मजली करून नरवरावरून शिरोंजेस आलो. पुढें सोबत पाहून वरकड घांट बंद, याकरितां इंदूरचे वाटेनें आलों तों सैंधव याचा घाट राजश्री मल्हारजी होळकर यांणीं बंद केला. याकरितां इंदुराहून येक मजल कूच करून उजनीचे वाटेवर सुभेदाराचा मुकाम होता तेथें भेट घेऊन सविस्तर वर्तमान विदित केलें. इतकियांत सुभेदारास स्वामीचें पत्र आलें कीं तुम्ही हुजूर येणें. त्यास राजे माधोसिंग यांणीं नेणव्यास मोर्चे लाऊन माळव्यांतील अंमल उठवावा म्हणोन फौजसुद्धां चमेलीवर आला. त्याचें पारपत्य न करावें तरी माळवा राहाणार नाहीं. याकरितां सुभेदार दरमजल कूच करून येथें आले. पुढें राजश्री गंगाधर येशवंत सडे फौजेनिशी रवाना केले आहेत. आठा पंधरा दिवसांत राजे माधोसिंग माघारां जैनगरास गेला तरी उत्तम, नाहीं तरी युद्धप्रसंग होईल. परंतु यापाशीं फौज थोडी आहे. देशीं लोक नालबंदी घेऊन गेले ते आले नाहींत. शिंद्याकडील खानाजी जाधव वगैरे दोन हजार आहेत ते उजनीस आहेत, अद्यापवर पोहोंचले नाहींत. लौकर फौज येऊन पाहोंचल्ये तरी उत्तम आहे. बिजेसिंग व कोटेवाले व बुंदीवाले याचे वकील (आले) आहेत. येक सुभेदाराची हिंमत व स्वामीच्या पुण्यप्रतापेंकरून शत्रूचा पराभव होईल. माधोसिंग उन्हेलावर होता. तेथून कांहीं फौज

नेणव्यास व केशवराव पाटणे येथें ठेऊन आपण दोन मजला मागें जैनगरच्या रोखें गेला म्हणोन वर्तमान आलें आहे. ईश्वर सर्व उतमच करील. गणेश संभाजीनें सरकारआज्ञा न मानून बुंदेल्यांशीं बिघाड केला व झांशीस येऊन वोंडसे दतियावाले वगैरे यांशीं बिघाड केला आहे आणि सुज्यातदौलाकडे चाकरी ठीक केली. शाहा आलम पातशाहाचे परवाने आणिले. कागदींपत्रीं गणेशराव बाहादर लिहितात. केवल यैवनमये जाले. सेवक निघोन आल्यावर राजश्री केशवराव हरकारे यांचा पुत्र बद्रीनाथराव यांस कैद केलें. तीन लाख रुपये मागत आहे. आपलें घरीं बोलाऊन बसविला. दोन दिवस अन्न खादलें नव्हतें. तिसरें दिवशीं भोजन कैदेंतच केलें. रुपयाचा ठराव जाहला नव्हता, सर्वस्व घेऊन मला जाऊं देणें ऐसें म्हणत होता म्हणोन मशारनिलेचें पत्र सुभेदारास घेऊन काशीद आला तो जबानी सांगत होता व पत्रीं लिहिलें आहे. येविशी बद्रीनाथराव याचें पत्र स्वामीसहि आलेंच असेल. दुसरें पाणिपताहून आल्यानंतर राजश्री सुभेदारांनीं व राजश्री त्रिंबकराव सदाशिव नाना यांणीं किल्ले भिंड प्रांत भदावर येथें जगन्नाथ धोंडाजी म्हणोन ग्रहस्थ ठेविला होता; त्यास अश्विन शुद्धांत भदावरचे राजानें मोर्चे लाविले; पंधरा दिवस जुंजला. गणेश संभाजीस कुमकेविशीं बहुत पत्रें पाठविलीं परंतु कुमक न केली. शेवटीं तग धरवेना तेव्हां ठाणें सोडून जगंनाथ धोंडाजी झांशीस आला. त्यावर लटकें निमित्य ठेऊन लुटून घेऊन झांशी किल्लयांत कैद केलें आहे. त्यापाशीं प्रतापशा निसर कारभारी तो सांगतो तैसें करितो. आज दोन वर्षें कालपी वगैरे तालुका दुसालां चौवीस लाख व बुंदेलखंडची जफ्ती मिळोन कमकसर पंनास लाख व झांशीचे संस्थानांत दांड वगैरे मिलोन दाहा बारा पावेतों इतका पैसा घेऊन लटका खर्च वाढऊन नास केला व आपलें घर केलें. सरकारांत सितैनमध्यें पुण्यांत लोकांपासून रसदा घेऊन च्यार लाख सरकारांत दिल्हे, त्यांपैकी ज्यास मामलती सांगोन पैसा घेऊन आपण खादला, त्याचा तसाच दोन लाख ऐवज राहिला तेव्हां सरकारांत दोन लाखच पावलेसें जाले, व इहिदेत दिल्लीत वराता वगैरे मिलोन पावती साडेतीन पावेतों वरकड वरातास ऐवज पावला नाहीं. शेळ्याची वरात व किल्ले ग्वालेरचे बेगमीची वरात यांस पैसा पावला नाहीं याप्रमाणें सितैन व इहिदेची गत. या सालची रसद सरकारांत दिल्ही नाहीं. यैवज वसूल घेऊन उडव * * * * बुंदेलखंडची जप्ती तशीच आहे. विना गणेश संभाजीचे पारपत्य केल्याखेरीज रजवड्याशीं सलूख होऊन पूर्ववतप्रमाणें अमल चालोन सरकारांत ऐवज येणार नाहीं. याकरितां राजश्री सुभेदारानीं सेवकास समागमें ठेऊन घेतलेच. त्रिंबकराव शिवदेव यांचें नांवें कालपी

वगैरें माहालची कमाविशीची सनद पाठऊन द्यावी म्हणोन स्वामीस विनंतीपत्र लिहून सेवकांजवळ दिल्हें तें सेवेसी पाठविलें आहे; पावोन सर्व अर्थ ध्यानांत येईल. विना सुभेदार ते प्रांतें गेल्यावांचून बंदोबस्त होत नाहीं. झांशी चाळीस लाखाचें संस्थान व बुंदेलखंड राजश्री बाळाजी गोविंद यांकडे आहे. त्यासुद्धां तीस लाख व ग्वालेर वगैरे पांच सात लाख रुपयाची जागा राहात नाहीं. सुभेदार गेल्यानें इतकी जागा राहोन अंतरवेदी गेली आहे तेथीलहि बंदोबस्त होईल. परंतु राजे माधोसिंग याचा शह बारून ते प्रांतें जाऊं याची सुभेदारास आज्ञा जालियास जातील. सेवेसी सविस्तर विदित व्हावें म्हणोन लिहिलें असें. आज दोन वर्षें गणेश संभाजीपाशीं कर्ज खाऊन राहिलों व हल्लीहि येथें कर्ज खात आहे. सेवकास आज्ञा येईल तदनुसार वर्तणूक करीन. राजश्री बाबूराव कान्हेर याची सरकारांतून तहगिरी[१] होऊन आठ नव महिने जाहाले. लोक सर्व उठोन गेले. संस्थान राहाणें कठीण जाणून सरकारचें आज्ञापत्र गणेश संभाजी पाठऊन आपण जाऊन झांशीस आणिलें. कुमकी पथकाप्रमाणें राहेना, उठोन जाऊं लागला, किल्ला हवाला करणें तरी राहेन म्हणोन गणेश संभाजीनें आड घातला; याकरितां झांशी किल्ला हवाला केला. त्याजवर बाबूराव यासी बदमामली करून कैद करावेंसें केलें. येविशी मशारनिलेचें पत्र सेवकास व राजश्री कृष्णराव गोविंद यास पत्र आलें तेच बजिनस पाठविलें आहे त्यावरून विदित होईल. बाबूराव कान्हेरे यांचा शोध बहुत केला परंतु दुसरा विचार नाहीं. सरकार चाकरींत येकनिष्ठ आहेत; परंतु गणेशपंताचे पेचांत आहेत. वरकड वर्तमान राजश्री कृष्णराव गोविंद वकील यांणी विनंतीपत्र लिहिलें आहे त्या वरून विदित होईल. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶*Trimbak Ram Fadnis reports to the Peshwa the mischievous activities of Ganesh Sambhaji in Bundelkhand, Jhansi and other Maratha possessions and requests the addressee to mete out severe punishment to the offender for his disloyal conduct. Madhosing's irruptions in the Maratha territory are also referred to.*

No. 23] *[17-11-1761*

पौ छ ३० सावान इसने

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री पंत प्रधान

माधवराव स्वामींचे सेवेसी

पोष्य राव बदरीनाथ केशव साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम तागाईत १९ माहे रबिलाखर जाणून स्वानंदलेखन आज्ञा कीजे. विशेष. आपलें कृपापत्र

---

१ तगीरी, बडतर्फी.

सविस्तर पावलें, लेखनार्थ कळों आला. दक्षणचें कामकाज जाल्यावर फौजा हिंदुस्थानास रवाना होतील. ऐशियास हाहि विचार उत्तमच आहे. आतां कां(हीं) तिकडील निवाडा होण्यास विलंब लागणार नाहीं. आजपावेतों कामकाज सिद्धीतें पावलें असेल, फौजा रवाणा जाल्या असतील. इकडे फौजेचें येणें आगत्यच आहे. दाहा पंधरा (हजार) फौज झांशीपावेतों येऊन पावली तर आवाईनें काम बहुत होईल. राजश्री मल्हारराव सुभेदार यांस माधोसिंगाकडीलहि काम आगत्यच आहे. पूर्वपश्चमचें अंतर आहे. दोहीकडील काम सांभाळलें पाहिजे. पातशाहा आजपावेतों जाजमऊजवल होते, आतां कूच केलें. कालपी-जवळ उतरणार, दिलीकडे जाणार हे वदंता आहे. सुजाउदौलानें सर्व आपली सामोग्री लखनौंतून काहाडली, प्रयागचे किलियांत नेऊन ठेविली. आपण समागमें पातशाहाचें दिलीस जाणार. दिलीचे हवेलीची तयारी त्याणें करविली आहे, व नजीबखान दिलींत होता तो कूच करून हिसार प्रांतीं बंदो(बस्ती करावयास) गेला. जाटासी त्यासी सुलेहचा जाबसाल * * * * प्रसंग कांहीं दिसत नाहीं. नजिब [पुढील सुमार तीन ओळी फाटल्या आहेत] तालुका आपलें स्वाधीन करून घ्यावा. दर * * दालीचें चापर म्हणजे सजावले राजे नागरिमल * * आले आहेत. सुरजमल जाटाची मामलत व * * * ची मामलतेचा पैका मागावयास आले आहेत. * * * * * * जे नागरमल दिलीहून जाबसालाकारणें जाटाजवळ येणार आहेत. चापर बोलत आहेत कीं, अबदालीची फौज पिशावरेपावेतों पावली, सिखांहीं लाहोर प्रांतीं हगामा केला आहे. त्या (पार)पत्याकारणें येणार व जाटानें पैका न पाठविला तर माघमासपावेतों आपण शाहा येणार आहे. सत्य मिथ्य तेच जाणेत. कळलें वर्तमान आपले सेवेसी विनंती केलें असें. आमचें वर्तमान तर आम्ही कोठवर लिहावें ? परस्परें माहाराजांसी विदित जालें असेल. आम्ही सविस्तर चिरंजीव राजश्री राव मुकुंदराव आमचे बंधु देशीं आहेत ते सविस्तर सेवेसी विनंती करितील. * * वा तर आपलें राज्यांत आजपावेतों नीत, व मर्यादा व धर्मन्याय व दया व प्रजापालन व दुसऱ्याचें दुख ऐकणें व त्याचें पारपत्य तात्काळ करणें यथास्थित आहे. येणेंकरून जय व प्रताप विशेष आहे, व पुढेंहि होईल. येथें अविचार कर्म केलें परिणाम न विचारला. शासन व नीत माहाराजाची विस्मरण करून अल्पबुद्धीनें करणें तें केलें. सर्व प्रकारें आपण न्यायें निष्ठुर व शासने व नियंते आहेत, मुलाजा कोणाची करणार नाहींत. विशेष काय ल्याहावें हे विनंती.

¶*Badrinath Keshav sends news from the North and speaks of the activities of the various potentates—Najibkhan, Shuja-ud-daula and others.*

4144

No. 24] [*17-11-1761*

पो छ ३० साबान इसने

श्रीकृष्णोजयती

श्रीमंत माहाराज राजेश्री
रघुनाथरावजी दादा स्वामींचे सेवेसी

पोष्य राव बदरीनाथ केशव साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम तागायत छ १९ माहे रबिलाखर जाणून स्वानंदलेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. माहाराजाचें कृपापत्र छ २९ मोहरमचें पावलें. लेखनार्थ कळों आला कीं, सातारियास जाऊन पेशवाईची वस्त्रें व हस्ती घोडे सिरपेच व तुरा मोत्याचा व पथक व तलवार व ढाल व बाजे बहुमान पेशवाईचे पदाचे श्रीमंत माधोरावजीस देवऊन तेथून पुण्यास स्वारी येऊन फौज लक्ष जमा केली. बंदोबस्त करून हिंदुस्थाना(स) ये(ऊ) ऐेशियास महाराज प्रतापवान आहेत. वडील पूज्य सर्वांस आहे. येथायोग्य होतें तें केलें. सामोग्री विपुळ घरची सिधच आहे. आपल्या तपोतेजेंकरून सर्व पादाक्रांत होतील. आल्पबुधीनें वर्तनूक ज्याने केली असेल त्यास सिक्षा त्वरीतच होईल. आपले आपुनच सर्व लयातें पावतील. माहाराजाचे सर्व करतलामल आहे. आपला पराक्रम व दर्प सर्वांस बरें प्रकारें विदित आहे. आबदालीसहि आपलेंच भय विशेष आहे. त्यानें येकदां आपले तेज अनुभविलें आहे कीं, आटकपावेतों त्याचा उछेद केला होता. त्या भयास्तव आतां वरच्यावर याकूब अलीखानास पत्रें पाठवीत आहे कीं, हरप्रकारें सलुक करून सरहद मुकरर करणे * * * कांहीं होणार नाहीं. यैसें * * * इकडील वर्तमान तर * * * मऊ जवळ फार दिवस सुजा-उद्दौलानें आपलीं मुलें मानसें व खजिना वगैरे सरंजाम * * * मुनका (?) बांधून श्रीप्रयागाचे किल्यात पाा * * * घेणे तो घेतला. आतां पातशहास व * * * यास्तव तेथील हवेलीचीहि तयारी करविली आहे. कोणत्या घांटी उतरतील तें पाहावें. जमिदाराचे मनांत कीं, काल्पीच्या घांटें उतरून बुंदेलखंडांत आपला आमल बसोन दिलीस जावें. पाहावें काये ठहरतें. दिलीहून नजिबखानानेंहि कूच करून बंदोबस्ताकारणें हिसार प्रांती गेला. त्याणे वकील अबदालीकडे पाठवणें मुकरर केलें आहे कीं, त्याजपासोन लाहोरची सुबेदारी व सिरहंदचा तालुका आपले स्वाधीन करून घ्यावा. परंतु प्रस्तुत अबदालीचे चपर म्हणजे सजावल राजे नागरमलाजवळ दिलीस आले आहेत. सुरजमलाची मामलत व गाजुदीखानाची मामलतेचा पैका मागावयास आले आहेत.

यास्तव राजे नागरमल दिलीहून जाबसालाकारणें जाटाजवल येणार आहेत. चापर म्हणत आहेत कीं, आब्दालीची फौज पशावरेपावेतों, सिखांही लाहोर प्रांतीं हगामा केला आहे त्याचे पारपत्यास जाणार व जाटानें पैका न पाठविला तर माघ मासीं आपणच शाहादाखल होईल. सत्य मिथ्य तेच जाणेत. कलले वर्तमान आपलें सेवेसीं विनंती केले आसे. झांसीचें व आमचे वर्तमान तर परस्परें माहाराजास विदित जाले असेल. चिरंजीव राजश्री राव मुकुंदरावजी आमचे बंधू देशीं आहेत ते सविस्तर सेवेसी विनंति करतील, आम्हीं काय ल्याहावें. आपले राज्यांत आजपावेतों नीत व मर्यादा व धर्म व न्याय व दया व प्रजापालन व परदुःख येकणे व त्याचें पारपत्य तात्काल करणें यथास्थित आहे. येणेंकरून जय व विपुल प्रताप आहे व पुढेंहि वृध होईल. येथें आविचारित कर्म केलें परिणाम न विचारला. शासन व नीत माहाराजाची विस्मरण करून आल्पबुद्धीनें क्षुलक कर्म करूं नये तें केलें असो. * * * येकनिष्ट व शासते व नियंते आहेत. मुला * * * * करतील. विशेष काय लिहावे. हे विज्ञापना.

¶*Badrinath Keshav draws a graphic picture of the North after the Panipat disaster had banished Maratha influence for the time being. With the Sikhs in revolt the Abdali had no peace in the Punjab and was pressing for some sort of understanding with the Marathas. Shuja-ud-daula had occupied Prayag and was casting a covetous eye upon Bundelkhand. As regards Najibkhan, he was active in Hissar and trying to secure for himself the Subhedarship of Lahore and Sarhind from the Abdali.*

No. 25] [*22-11-1761*

पो छ २४ रबिलाखर

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब
स्वामीचे सेवेसी

आज्ञांकित त्रिंबक विश्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम तागाईत छ २४ माहे रबिलाकर जाणोन स्वकुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. इकडील वर्तमान तों हा कालवर बुंधेल्यांची दुंडी मिटत नाहीं आणि पोल्यांचें काम चालू होत नाहीं. सेवेसीं विनंती दाहापांचदां केली परंतु ब्राम्हणुव्यास स्वार राहिल्यानें बंदोबस्त होईल तर स्वारांची रवानगी

करावी. जलद आलिया पुढें उन्हारीची जोतपार्त[१] होईल. नाही तर उन्हारी पडेल, यास्तव वारंवार पत्र लिहितो तर राजश्री बालाजी गोविंद यांची रवानगी जलद करावी आणि ब्राम्हणुव्यास राहिलें म्हणजे बंदोबस्त होईल, नाहीं तर होणार नाहीं. मौजे बिंझारे येथील महतिया जिवें मारून टाकला. च्यार माणसें मारलीं गेलीं, याप्रमाणें बुंधेले हरामखोरी करितात. सेवेसी विनंती श्रुत होय हे विज्ञप्ति.

¶*Trimbak Vishvanath to Vishvasrao Lakshman stating that the riots in Bundelkhand make it impossible for him to realise revenue from the district.*

No. 26] [*26-12-1761 ?*

पौ छ १ जमादिलाखर

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब साहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक रामचंद्र दरोगे व पुंजाजी कृतानेक सां नमस्कार आण सां दंडवत विनंती विज्ञापना. सेवक लोकाचें वर्तमान ता। छ २८ जोवल मुा। दमुवा साहेबाचे प्रतापेकरून येथास्थित असे विशेष. साहेबाची आज्ञा घेऊन स्वार जालो ते छ मजकुरी लस्करदाखल जालो. राजश्री भाऊची भेट जाली. उपरांतिक खासबरदार आा। वीस तोफा बरोबर दिल्हे. त्यापैकी पाव आसामी ठेऊन घेतल्या. बाकी पंधरा आसामी याची रवानगी केली. ते सेवेत येऊन पोहोचतील. उदईक कूच करून महूमोहनीस राजश्री भाऊ जाणार. आम्हीहि समागमेच आसो. सेवेसी श्रुत होये. विशेष काये लिहिणे हे विज्ञापना.

¶*The writer one Ramchandra Daroge informs Vishvasrao Lakshman that he has interviewed Bhausaheb (the pretender) and will accompany him as far as Mahumohani.*

No. 27] [*Recd. 30-12-1761*

छ ३ जमखर

श्री

श्रीमंत राजश्री राऊसाहेब
पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

सेवक आज्ञाधारक धनसिंग साष्टांग दंडवत विज्ञापणा यैसी जे. सेवकास मारवाड प्रांतीं राजा बिजेसिंगाकडे पाठविलें होतें तेथें जाऊन श्रीमंत कैलासवासी-

---

१ लावणी, मशागत.

जीची आज्ञाप्रमाणें जाबसाल केला. उंटाची फरमाविसविसीं सांगितलें. ते सर्व तजवीज त्याणी केली होती. इतकियांत श्रीमंत कैलासवासीजीचें वर्तमान आलियावर ते सर्व तजवीज मोकुफ जाली. आम्हास व राजश्री गोविंदराम महतास आपलाकडोन वकील यैसे रवाना केले ते उजेनीस आले. ते येक तर मार्ग बंद चालत नाहीं. दुसरे सरिरास बरें वाटत नाहीं. खर्चाची विपत विशेष आहे. येथें कोन्ही वलखीचा नाहीं की कर्जवाम देईल. सर्व भरंवसा स्वामीचे पायांचा आहे. त्यासी कृपाळु होऊन कांही खर्चास पाठविनार स्वामी धनी समर्थ जाहेत. नाहीं तर येथील कमाविसदारास येक आज्ञापत्र सेवकाचे विसई सादर होये कीं आम्हांस खर्चास देऊन स्वामीचे सेवेसी पावते करून देणें, यैसें आज्ञापत्र सादर केलें पाहिजे. यानंतर राजकी वर्तमान यैसे जे राजश्री मल्हारराव सुभेदार दरकूच कोट्यास जाऊन कोटेकराची फौज समागमे घेऊन कछवायेची फौज चमल उतरून आली होती त्यासी जाऊन बुडविली. राजसिंग घोडचड्या जखमी होऊन व पळाली फौज यैसे खोपरास जाऊन लपाली आहे. मागें राजश्री सुभेदारहि जाऊन खोपरास लागले आहेत लोकांचे कर्जाखाले फसून राहिलों आहों. त्यासी कृपालु होऊन खर्चाचा प्रमृश करनार स्वामी धणी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

¶*Dhansing informs the Peshwa that Malharrao Holkar after combining his forces with those of the Chief of Kotah has crushed the army of Jaipur which had crossed the river Chambal.*

No. 28] *[1761-62?*

[पहिले चार बंद गहाळ]

५

श व होलकर सिंदे पांच हजार याप्रमाणे पाठवावे. नजिबखान याची फौज तिकडे आहेच. त्याणी याणी मिळून धामधूम करावी याप्रमाणे नेमणूक जाली आहे. मामलत जालियास फौज जाणार नाहीं. नवाब गाजदीखान आले. त्याचे मनसबे, आपल्यास वजिरी द्यावी वगैरे राजकारणे होती. परंतु प्रस्तुत कांहीच कोणी मान्य न करीत जाणून त्याणी निरोप घेतला आणि सिंद्याचे सेजारी राहिले आहेत. आंमदखान याचा वकील आलियामुले राहिले आहेत, परंतु जातील. नजीबखान समागमेच आहेत. उभयता सरदार व सरकार मिलोन च्यार ठिकाणे. येकादा नवीन मजकूर करणे तर आपले घरीं करून सरदारांस सांगोन त्याचा जाबस्वाल घेऊन नजीबखानास सांगोन ठीक करावे तर

आठ रोज लागतात. मग सेवटास जाणे तर जाईल अथवा कोणाचा गुढगा बसोन राहेल असा होये विचार आहे. जाले वर्तमान सेवेसी श्रुत असावे म्हणौन लिा असे. सेवेसी श्रुत हे विज्ञापना.

¶This paper, which contains the concluding portion of a letter, the first four sheets of which are missing, refers to some joint activity in the North of Sindia, Holkar and Najibkhan and further speaks of Ghazi-ud-din as trying to win for himself the office of the Vazir-ul-Mulk.

No. 29] *[1761-62*

(पहिला बंद गहाळ)

पडोन संकोच्याते पावले येदर्थी संदेह नाही. खासा स्वारी देशास गेली. सरदार इंदूर उजन प्रांती राहिले. राजश्री विठलराऊ सिवदेव ग्वालेरीहून देशास गेले. इकडे मातबर फौज नाही. सुने रान पाहून जाटाने पाय पसरोन सर्व आकर्षण करून केवल आरूढ जाला आहे. जैनगरवाल्यास व बिजेसिंग यांस लेहून पाठविले कीं दक्षणिया * * मुलुक सर्व घेतला तमाम ठाणी उठविली. तुम्ही उजनप्रांत जफ्त करणे तोपर्यंत आम्ही इकडून बंदोबस्त करीत येत असो येसे प्रकार जाटाने योजिले आहेत. त्याच शत्रुने येखादे मातबर स्थल हस्तगत करून घेतल्या येणे कठीण पडेल. आम्ही श्रीमंतास व सरदारास पत्रावरी पत्रे पाठवीत गेलो परंतु आद्याप फौजेचे आगमन दिसत नाही. बरसातीकरिता आनमान किंवा काये मनसबा आसेल तो न कले. येथील प्रसंग तो लिहिता येत नाहीं. आम्ही साहेबकामास प्राणसंकल्प केले आहेत. तथापि उपराळा जाला पाहिजे. येसियास आपणहि मुजरत सरदाराकडे व श्रीमंताकडे पत्रे पाठऊन तावडतोब फौज येऊन पोहोचे ते करावे. मुख्य गोष्ट श्रीमंत स्वामीचे कल्याण आसल्या सर्वास * * * झासी करेरा लाहान जागा नाही. मालव्यातील मोठा नाका आहे. हा राहिल्या अमित्र पुढे येऊ पावणार नाही. याजकरिता इकडील साहित्य होऊन बंदोबस्त राहे ते करावे श्रीमंतास तपसीलवार लेहून इकडे फौज सत्वर येई ते करावे. बहुत काय लिहिणे लोभ कीजे. सदैव पत्र पाठवीत आसावे हे विनंती.

¶The writer advises that the danger arising from the Jat's attitude has taken an aggravated form and must be dealt with firmly and immediately.

No. 30] [10-1-1762

नकल

श्री

राजश्री विष्णु माहादेव कादार प्रा

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्ये श्रो मल्हारजी होलकर व जनकोजी[१] सिंदे दंडवत सुा इसने सितैन मया व अलफ. श्रीमंताकडून मालवे प्रांतच्या बंदोबस्तास राजश्री विश्वासराव लक्ष्मण आले आहेत. यासी खर्चास तुम्हाकडून रुपये १३००० तेरा हजार देविले आसेत. तरी सदरहू तेरा हजार रुपये प्रा मार येवजी मारनिलेस पावते करून कबज घेणे. पा मजकुरचे येवजी तुम्हास मजुरा पडतील. जाणीजे छ १४ जमादिलाखर. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Vishvasrao Lakshman has been appointed to administer the province of Malwa.*

No. 31] [10-1-1762

नकल

श्री

राजश्री सदासिव कृष्ण कादार पा सिऊरदुऱ्हाये गोसावी यासी

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो मल्हारजी होलकर व जनकोजी सिंदे दंडवत सुा इसने सितैन मया व अलफ. श्रीमंतानी राजश्री विस्वासराव लक्ष्मण माल्वे प्रांतच्या बंदोबस्तास पाठविले आहेत. तरी यास खर्चास तुम्हाकडून रुपये १०००० दाहा हजार देविले असेत तरी सदरहू दाहा हजार रुपये पा मजकुरचे येवजी मारनिले पावते करून कबज देणे. तुम्हास सरकारातून पा मारचे येवजी मजुरा पडतील. जाणीजे छ १४ जमादिलाखर हे विनंती.

¶*An order upon Sadashiv Krishna from Malharrao Holkar to deliver to Vishvasrao Lakshman the amount of rupees ten thousand to enable him to meet his expenses.*

No. 32] [1-2-1762

छ २८ शाबान

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक बालाजी गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता माघ शुध ७ मुकाम सागर स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित

१ शिंद्याच्या दौलतीवर नवीन माणसाची नेमणूक होईपर्यंत जनकोजीच्या नांवें कारभार चालला असें दिसतें.

असे विशेष. इकडील वर्तमान दोनचार पत्री सेवेसी लिहिलेच आहे. हाली वर्तमान तरी सुजाउदौला पातशाहा कालपीस आलियाउपरी राजश्री गणेश संभाजी भेटले. आम्हासहि भेटीस बोलाविले होते. परंतु दग्याचा प्रकार आढलल्याउपरी आम्ही न गेलो. शेवटी त्याची फौज चालोन मुकाबला जाल्यावर त्याचे सामान फार यामुले आम्ही बुनगे सुधा सर्व संभालून झासीस आलो. तेथील करऊन राजश्री बाबूराव कोनेर करारेयासी राहिले तेथीलहि बंदोबस्त जालियावर सिरोंजेस आलो. तो लोकानी फार गवगवा केला. रोजमरेयाकरितां यास्तव व मालव्यातील कमादार सर्व उठोन जाऊं लागले. हटे वगैरे जागा तमाम दंगा जाला. सर्व मालवा जातो जाणून कांहीं फौज रा। वासुदेव संभाजी बरोबर उठोन गेली. राहिली ती व रा। धोंडो दत्तात्रेय पथकसुधा आम्हाबरोबर आले. हे घेऊन इकडे आलो. सुजाउदौला झासीस मोर्चे लाऊन आहे. येथून पाचसा मजलीवर आहे. झासी घेतल्यावर इकडे तो आला तर टिकाव होणे नाहीं. तमाम जमीदाराची सूत्रे त्यांकडे आहेत देखील रोहिले मालव्याचे. यास्तव जर जलदीने खासा स्वारी अथवा फौज मातबर पुढे रवाना होईल इकडे येईल तरीच स्थित राहील नाहींतर राहिले किले हेहि जातील. सविस्तर वर्तमान तीर्थस्वरूप राजश्री बाबूराव काका विनंती करितील. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Balaji Govind reports to the Peshwa that being outnumbered by the large force of Shuja he fell back upon Jhansi. From thence he moved on to Sironj where the discontented troops threatened him for their arrears. Shuja has advanced upon Jhansi and the writer says Jhansi cannot hold out long unless succour is sent.

No. 33] [*16-2-1762*

श्री

श्रियासह चिरंजीव राजमान्य राजश्री विश्वासराव यांसी प्रति नारो शंकर आसीर्वाद उपरी. येथील कुशल ता। छ २१ रजब मुकाम पाटोदे येथास्थित असे विशेष. तुम्ही पत्र पाठविलें तें पावलें. लि। अर्थ सविस्तर अवगत जाहाला. पत्रोत्तरे येथून वरचेवर पाठविली आहेत त्याजवरून कललेच असेल. राजश्री मल्हारराव सुभेदार यांच्या व आमच्या उदईक भेटी होतील. तदनंतर सविस्तर मजकूर तुम्हास लिहोन पाठऊ. याउपरी इकडे गुंता किमपि नाही. मजल दरमजल त्या प्रांते येत असो. तुम्ही कोणेविसी चिंता न करावी. झासीकडील बातमी वरचेवरी लिहोन पाठवावी. बहुत काये लिहिणे आसीरवाद.

¶Naro Shankar writing to Vishvasrao Lakshman says he is meeting Malharrao Holkar the next day and thereupon proceeding to the north.

4151

No. 34] [26-2-1762

श्री

श्रियासह चिरंजीव राजमान्य राजश्री विश्वासराव यांसी प्रति नारो शंकर आसीर्वाद उपरी. येथील कुशल ताा छ १ साबान मुाा मलगाव यथास्थित असे विशेष. तुम्ही माघ वद्य द्वितीयेचे पत्र पाठविले ते पावलें व आणखी तीन च्यार पत्रें पाठविली व झासी माघ शुध ७ शत्रूस वश जाहली याचें पत्र पाठविलें तें व कमावीसदारांची पत्रें तुम्हास आलीं ती तुम्ही बजिनस आम्हाकडे पाठविलीं ती पावलीं. तिकडील वर्तमान विस्तारयुक्त लिहिलें तें साद्यंत अवगत जाहाले. आमच्या व राजश्री सुभेदाराच्या भेटी नांदगाव साकोरे याचे मुकामी होऊन येथे आलो. पुढें मजल दरमजल त्या प्रांती येत असो. याउपरी इकडील गुंता किमपि उरला नाहीं. सत्वर येतो. कोणेविसी चिंता न करावी. बहुत काये लिहिणे हे आसीर्वाद. तुम्हापासी ऐवज जमा असेल तों आम्हाकडे रवाना करावा व फौजेचा खर्च भारी त्यांप्राते येईल त्यास दोन च्यार लक्ष रुपये जमा करून ठेवावें. आम्ही सत्वर येतो हे आसीर्वाद.

¶*Naro Shankar acknowledges receipt of the letter giving news of the loss of Jhansi and writes that he is returning to the north to relieve the situation.*

No. 35] [26-2-1762

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री चिमणाजीपंत
व खंडोपंत स्वामी गोसांवी यासी

पाो नारो शंकर कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहित असावे विशेष. तुम्ही पत्रे पाठविली ती पावलीं. झांसी गेलियाचे वगैरे वर्तमान तपशीलवार लिहिले ते अवगत जाहाले. ऐसियासी कालानुरुप होणे ते होतच आहे. आमच्या व राजश्री सुभेदाराच्या भेटी जाहल्या. याउपरी इकडेस गुता नाही. मजल दरमजल त्याप्रांते येत असो तुम्ही वरचेवर वर्तमान लिहोन पाठवीत जाणे. राा छ १ साबान बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Naro Shankar acknowledges receipt of the letter giving news of the fall of Jhansi.*

No. 36] [26-2-1762

पौ छ ६ साबान मुा महुखेडा
प्रा कायेथे बुधवार दोन घटका
रात्र

श्री

श्रियासह सहस्त्रायु चिरंजीव विजईभव राजश्री विश्वासराव यासी नारोशंकर कृतानेक आशीर्वाद उपरी येथील क्षेम ताा छ १ साबान गुरुवार मुा ठाणे मळगाव सुखरूप असो विशेष. तुम्ही पत्रे दोन येक छ २२ रजब दुसरे छ २३ रोजचे पाठविलीं तीं पाऊन सकल लेखनार्थ अवगत जाला. झांशी वगैरे हिंदुस्थान प्रांतीचें वर्तमान लिहिलें ते सर्व तपशीलवार अवगत जालें. तुम्ही डाक बशिवली म्हणून लिहिले तर बहुत उतम केले. वरचेवर जाले वृत लिहित जाणें. पनासा हजाराची हुंडी पत्रें सुमार १३ पाठविली ती यादीप्रमाणें पावलीं. शहरीं रवाना केलीं आहेत. येवज पावलियांचे जाब आलियावरी तुम्हास लिहूं. पेशजी पंचाशीं हजारांच्या हुंडिया आल्या त्याहि पाठविल्या आहेत त्या खर्च्या[१] होऊन जाब आलियानंतर तुम्हास लिहूं. पेशजीच्या व हालीच्या हुंडियाच्या पेटा घेऊन पाठऊन देणे. नेमिला येवजाचे निमे पदरी पडला. त्यापैकी दोही रवानग्याच्या चिठिया पाठऊन बाकीच्या हुंडिया गडबडीमुळें न होत म्हणून येवज सराफियात अनामत राहिला म्हणून लिहिले. त्यास येथे आम्हाजवल येवजाची खतूट आहे तर कळेल तशी तजवीज करून हुंडी पत्रांही ताबडतोब येवज येथे पावता होई तो अर्थ करणें. आम्ही ताबडतोब हिंदुस्थानांत येत असों. राा मल्हारजी होलकर या प्रांतात आले म्हणून त्यांचे भेटीगोष्टीमुळे आठचार दिवस लागले. आतां अविलंबेच येत असो. तुम्ही बहुत खबरदारीने राहात जाणे. याउपर सुज्यातदौलाने लबाडी केली. वरकड पातशाह व नजीबखान याचे मनात इतका अर्थ नाही. परंतु माधोसिंग राठोड सुज्यातदौला यानी लबाडी केली. याचा परिणाम सुधा होणार नाही. आम्ही दरमजलीने मालविया प्रांते लौकर येतो तोपर्यंत पाचलाख भरणा साहुकारास सत्वर पावता करणे. बाकी वसूल दाहपैकी होईल तो * * * रोजमरियासी पाहिजे याची फिकीर असो देणे. अवंदा फारच कठीण गोष्टी जाल्या. या प्रांती मोगलाचे मनात मागती बिघाड करावा यैसे मानस परंतु खर्चास नाही याजमुले बिघाड करणार नाही. असो होणार ते होईल. आवंदा झासीची रसदेतील लाख दीड लाख सुरोज देऊन तुमचे चाकरी केली ते वृथा जाली. या खेरीज फौजेस खर्च दोनचारपर्येंत जाला आणीकहि होणार. सिंदे

---

१ स्वीकारलेली पण न पटवलेली.

याची सरदारीत चिवडा दिसतो. पेसवे बदमामली (करितात) भेटीनंतर सविस्तर सांगू. तुम्ही तूर्त पंतप्रधान याचा भरणा सत्वर करणे. फौज बरानपूरपर्येंत आली नाही तो येवज लिा प्रा़ो रवाना करणे. जासूद तुम्हाकडील सा रोजानी पावले. त्याचा करारप्राा मजुरा देणे. पुढे येवज परभारे औरंगाबादेस राा करणे. कासिदास खबरदारी सांगणे की कागदपत्र दुसरियासी नेमल नाही तरी आम्हाकडेच पाा परंतु लस्करात आम्हासीच गांठ घालून पत्रे प्रविष्ट होये ते करणे. येसी ताकीद पत्रे अणनारास करणे. प्रकार फारच बारीक जाला असे. सूचनार्थ लिहिला असे. दाह लाखचा तगादा करून येवज वसुलास येते करणे. हाती सर्व उजनीस आणने. फौजाहि लौकरच येतील. मग जैसा विचार करणे तो केला जाईल. तुम्ही उजनीस राहिलिया फारच कार्याची गोष्ट जाली. खर्च आटोपून करीत जाणे. तुम्ही शाहाणेच असा. सावधपणे राहात जाणे. वरचेवर वर्तमान लिहित जाणे बहुत काये लिा आसीर्वाद.

राा खंडोपंत व राा चिमणाजीपंत स्वामीस नमस्कार लिा

¶*Naro Shankar's letter to his nephew Vishvasrao Lakshman discussing plans to be pursued after his arrival in the North. He concludes with a demand for funds to be remitted to Poona.*

No. 37] *[28-2-1762*

छ २८ शाबान

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक त्रिंबक राम कृतानेक साा नमस्कार विज्ञापना. ताा छ ३ साबान मुकाम नजीक संगनेर राजश्री सुभेदाराचे लस्करात स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. पूर्वी दोनच्यार विनंतीपत्रें सेवेसी पाठविली. परंतु उतर न आले व कासीदहि माघारे न आले. मार्गी मारले किंवा काये जाहालें हे ईस्वर जाणे. त्यास इकडील वर्तमान तरी राजश्री गणेश संभाजीचे वर्तणुकेचा आर्थ पूर्वीपासोन सेवेसी लिहीत गेलो व परस्परे विदित जाहलाच आहे. गणेश संभाजीमुले सरकारचा करोड रुपयाचा मुलुक गेला. * * * * जाहला आहे. शाहाजादा काल्पीत आहे व सुज्यातदौला झासीस आहे. किला जु * * * आहे परंतु कोणी * * * * त नाही. राजश्री नारो शंकर वगैरे सुभेदाराचे भेटीस आले होते. सेवकाचीहि

भेट जाहाली. आद्याप खानदेशातच आहेत. कोणाची हिंमत दरमजल जाऊन पोचतीलसी नजरेने पाहिली नाही. येक स्वामीचे पुण्यप्रतापें काही दिवस झासी राहील तरी कलेंना. नाहीतरी ठीकता दिसत नाही. गणेश संभाजीकडे झासी होती परंतु राजश्री बाबूराव कोन्हेर याणी छल करून हस्तगत केली. तेथील बंदोबस्त करून आपण कन्हेरा किला येथे आहेत. गणेश संभाजीचे कुटुंब व येक पुत्र व भाऊ वासुदेव संभाजी यास घेऊन राजश्री बालाजी गोविंद सिरोंजेस येऊन आपण सागरास गेले. धोंडो दत्तात्रेय गणेश संभाजीची माणसे घेऊन देसी येत आहेत. आठदाहा दिवसात पुण्यात येतील. राजश्री नारो शंकराकडील विस्वासराव लक्ष्मण झार्सीस म्हणोन गेले. परंतु रा सुभेदारास जखम लागली तिणे बहुत जेर होऊन माघारे फिरले याकरितां ते उजनीतच आहे. * * * * * सुभेदारास आजपावेतो आरोग्य नाही. बहुत क्षीण. तीन महिने स्नान नाही. शरीर बहुत तुटले. परंतु स्वामीचे पुण्ये आरोग्य होईल. सुभेदार इकडे आले यामुले सर्वांचा धीर सुटला. दुसरे गणेश संभाजी जाऊन सुज्यातदौलास भेटला. घरचा मुदई तग निघेना. म्हणोन बालाजी गोविंद आले. किला गेल्यावर पुढे श्रम बहुत लागले. दिवसेंदिवस शत्रु भारी होत जात आहे. स्वामी पुण्यवान प्रतापी आहेत. पुढे सर्व उतमच होईल. प्रस्तुत जाले वर्तमान सेवेसी लिहिले आहे. गणेश संभाजीपासून निघोन यावेसे नव्हते. जीवाचा ग्राहीक होता. परंतु स्वामीचे कृपेकरून सर्व वस्तभाव व कागदपत्र सोडून जीव घेऊन सडा सुभेदारापासी आलो. त्याणी ठेऊन घेतले म्हणोन आज सा महिने समागमेच आहे. सेवेसी कलावे म्हणून विनंती लिहिली आसे. आज्ञा येईल त्याप्रमाणे वर्तणूक करीन. श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Trimbakram informs the Peshwa that Jhansi has been attacked and cannot be expected to hold out long as the besieged are not being supported. Ganesh Sambaji is reported to have joined the ranks of Suja. The letter also refers to the illness of Malharrao Holkar.*

No. 38] [*3-3-1762*

श्री

श्रीसहश्रायु चिरंजीव राजमान्य राजश्री विस्वासराऊजी यास नारो शंकर कृतानेक आसीर्वाद उपरी येथील क्षेम ता छ ६ माहे शाबान मुक्काम किले मलगाव सुखरूप जाणोन स्वकीये लेखन करणे विशेष. तुम्ही छ २९ रजबाची पत्रे पाठविली तें छ मजकूर पाऊन त्या प्रांतातील दिलीपासोन उजेनपावेतो जाले वर्तमान मुलकातील व खानाजी जाधवराऊ याजकडील पत्राचा मजकूर दुसरे

पारसी पत्राच्या नकला पाठविल्या ते प्रविष्ट होऊन सविस्तर विदित जाले. त्यासी झासीचा प्रकार होणें तो भगवतसत्तेन जाला. पुढे होणार ते होईल. तुम्ही बहुत खबरदारीने बातमी राखून फौजसुधा संस्थान उजेनचा बदंबस्त राखून उत्तम प्रकारे सावध असणे. झासीचा कारभार तुम्हास सांगितला त्याचा प्रकार ऐसा जाला. पुढे उजेनची सुभेदारीचा कारभार दरोबस्त तुम्हाकडेच सांगितला आहे. तरी तेथील मामल्याच्या बंदबस्त राखून ऐवज तुम्हापासी जमा जाला आहे तो हुंडीपत्राने आम्हाकडे पाठऊन देणे. या कामास विलंब सहसा न करणे. हुंडणावळ आणा दोन आणे आधिक पडले तरी मुजाका नाही. इतके दिवस तुम्हापासी ऐवज जमा असोन आजपावेतो तुम्ही रवानगीची पैरवी न केली हे गोष्ट तुम्हापासोन दूर आहे. देशकाल मुलकातील तुम्ही पाहत असतात गाफिली केली आणि करीता हे आपूर्व. अथ:पर लिहिल्याप्रमाणे साहुकाराचे विद्यमाने हुंड्यापत्रे हरतजवीज करून लौकर मार्गस्त आम्हाकडे करणे. हुंडीपत्रे पाठविल्यावरी मागाहून पेटाहि सदरहू ऐवजाच्या पाठऊन देणे. सारांश ऐवजाचा निकाल करून देशी आम्हास पावता होये या तरतुदीस सहसा न चुकणे संस्थान उजेनची सुभेदारी तुम्हाकडे आहे. पुढेहि जो पैसा वसुलात येईल त्याचीहि पैरवी करून आम्हाकडे पाठऊन द्यावा. इकडून चिरंजीव त्रिंबकराऊ आवचितराऊ पांडुरंग शंकर फौज देऊन त्या प्रांतास रवाना केले आहेत. याचे हाती येक पैसा लागू न देणे, आम्हाकडे हुंड्या करून पाठऊन देणे. तुम्हापासी कामास येणार नाही. फौजेची उस्तवारी उत्तम प्रकारे राखून बहुत खबरदारीनें असणे. फौज त्या प्रांतास मातबर रवाना केली आहे. श्रीकृपेने सर्व गोष्टीचा बंदबस्त उत्तम प्रकारे होईल. तुम्ही कोणे गोष्टीची चिंता न करणे. याउपर बाबाजीपंताचे पनास हजार रुपये घेतले आहेत व रा धोंडोपंत कढे याचे पनास हजार हर तरतूद करून सुरोंज आहीरवाडियाचे येवजी अथवा दरयेक येवजीयात करणे. हे काम करणे जरूर असे. याउपर येवजाची रवानगी सत्वर करणे. तुम्ही उजनेप्रांतीच राहून पैका लौकर वसूल करणे. परभारा साहुकारीत येवज जमा करून दस्तायेवज आपले नावे घेणे. हुंडिया वरीचे वर रवाना करणे. मागाहून फौजहि लौकर त्या प्रांते येतील. फौज रुपये तुम्ही देणे. माहलचा येवज जमा करून कर्जदारास पावला पाहिजे. फौजेस (अपूर्ण)

¶*Naro Shankar while regretting the loss of Jhansi instructs his nephew to guard his position at Ujjain against further advance of the enemy and remit to Poona collections from Districts under his administration.*

+ येथून अक्षर वेगळें.

4156

No. 39] [19-12-1735 ?

छ १६ रमजान

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे शेवेसी.

विनंती सेवक आज्ञाधारक नारो सिवदेऊ कृतानेक साष्टाग नमस्कार विनंती. स्वामीचे कृपाद्रिस्टीकरून ताा छ १९ साबान मुा लस्कर नजीक मेडते सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. वार्तिकासमागमे आज्ञापत्र आले ते छ २ साबानी सादर जाले. आज्ञेप्रमाणें सविस्तर आर्थ माहाराजे अभयसिंगजीस विदित केला. थैली त्यास होती ते दिल्ही. जबानी कितेक मजकूर सांगितला. त्याजवरून यानी उतर दिल्हे जे हे मातबर मनसबा आहे. ये गोस्टीचा जाबसाल येका दिवसात होत नाही. प्रस्तु(त) कूच दरकूच मेडतियास जातो. तेथे गेलियानंतर ये गोस्टीचा पोख्ता मनसबा करून जे गोस्टीने राजश्री रायाचे कर्जाचा परिहार होय आणि फौजेची उस्तवारी होऊन महद येश पदरी पडे तो आर्थ करून, येविषी तुम्ही आपले समाधान आसो देणे. इतके दिवस दिगत लागली त्याचा विचार तुम्ही जाणता याजवरी ढील होणार नाही. मेडतियास गेलियानंतर कार्याचा निश्चय करून तुम्हासहि आज्ञा देऊन. याजप्रकारे जाबसाले जाला. सेवेसी विदित होय. स्वामीचे पत्रांपूर्वीच माहाराजे आभयेसिंगजीनी पत्र स्वामीस लिहीले होते तेच पाठविले आहे. प्रविष्ट होईल. सरकारचे जासूद आम्हासमागमे होते. त्यास येक जोडी पूर्वीच बिदा केली. हाली येक जोडी राहिली ते सेवेसी पत्रे देऊन बिदा केली आसे. विदित होय हे विज्ञप्ति. मेडातियास गेलियानंतर पांच सात रोज राहोन पुढे आजमेरस जाणार. कमरुदीखान याजकडून येक ग्रहस्त पत्रे घेऊन आला आहे याजकारितां पुढे जरूर जाणार. विदित होय हे विज्ञाप्ति.

¶*Naro Shivdev writes to the Peshwa that Abhaysing promises to relieve the Peshwa of his debts.*

No. 40] [25-4-1762

छ २४ जिलकाद इसने सितैन

श्री.

राजश्री मल्हारजी बावा होळकर सुभेदार

गोसावी यासीं

ꣲ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री बाळाजी गोविंद आशीर्वाद विनंती. येथील कुशल ताा. वैशाख श्रुा १ पर्यंत आपल्ये

4157

कृपेकरून यथास्थित असे विशेष. या प्रांताचे वर्तमान आपणास दोन च्यार पत्री लिहिलें, त्याजवरून विदित जाहलेच असेल. अंतर्वेदीत सर्व जागा कनोज आदिकरून ठाणी सरकारची बसविली. एक गाजीपूरचा किला रूपराय व कीरतसिंग खिचर याणे घेतला. तेथें त्याचा जमावहि जाला आहे. त्यास्थली मेहनत पडेल. वरकड ठाणीं कसब्यांत मात्र बसली. परंतु तमाम गावगना जमीदार गढ्या बांधोन फिरोन राहिले आहेत. रबीचा अमल खाऊन जुजायाची तयारी करून बसले आहेत. त्याचे परिपत्यास दिसगत लागेल; सालमारी तो पैसा मिळणे नाहीं, खळ्यांत दाणा एक ठेविला नाहीं. येक तालगावी तीनसे गढी जाहली. याप्रमाणे वर्तमान आहे. पुढें यथास्थित जाहल्यास पारपत्य सर्वांचे होईल. प्रस्तुत आम्ही सलुखानेंच त्यासी आहो. बहुत काय लिहिणे, कृपा केली पाहिजे. हे विनंती.

¶Balaji Govind to Malharrao Holkar, reporting risings in the Doab on the part of the Jamindars.

No. 41] *[25-5-1761*

छ २४ जिलकाद इसने सितैन

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामींचे सेवेसी.

विनंती सेवक चिमणाजी रंगनाथ. कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम ता। छ १९ माहे सवाल मु॥ उमरगड[1] स्वामीचे पुन्यप्रतापेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. श्रीमंत राजश्री भाऊसाहेबीं राजे खेतसिंग राजे हिंदुपतीचा धाकटा भाऊ याजकडे हुजूर न्यावयाकरितां पाठविले. त्यास राजे यास कितेका प्रकारें समजोन सांगत गेलों, तेव्हां कार्ति(क) मासापासून हुजुर येयाचे तरतुदीत होते. आपले स्थळीहून कूच करून राजश्री गणेश संभाजी यापासी आले. आठा दहा रोजांत दिलीकडे यावें तो तिकडे लढाई जाली. तेव्हां पंत मारनुलेपासून राजे मार आपले माघारे ठिकाणास गेले. मीहि त्याबरोबर गेलों. पांच महिने राहिलों; परंतु त्याची नजर पूर्वत प्रो न राहिली. परस्परे दरबारचे वर्तमान कले कीं मी येथें न राहावें ऐसा त्याच्या चितांतील

---

१ जिल्हा ईटावा, जलेश्वरजवळ.

मनोदय देखिला; आणि दरबारचाहि रंग त्याप्रकारचा पाहिला. तेव्हां हुजूर यावयाकरितां आज्ञा मागू तेहि देईनात. समागमें सिबंदी खर्च बहुत; खर्चास पैसा देईनात. राजश्री गोविंद बलाळ याचे तर्फेने तहसिलीस राघो विष्णु होते यामुळें स्वामीचे पुण्यप्रतापेकरून सेवकाची खर्चाविषई स्थित राहेली. तहसीलीस पंत मारनुले होते त्यास रुो देईनात तेव्हां ते उठोन आपले यजमानाकडे गेले. बुंधेल्याचा कारभार लबाडीचा, त्यास स्वामी पूर्वीपासून जाणतच आहेत. तेव्हा मीहि त्यापासून रो गणेशपंतापासीं आलों. राजे पहाडसिंग याकडे स्वामीनी रो कृष्णराव गोविंद यास पाठविले होते. त्यास सरकारचे आज्ञाप्रो पंत मारनुलेस कितेका प्रकारें उमजोन सांगितलें; परंतु त्यानी न यैकिलें. याकरितां येथून श्रीमंत राजश्री सुभेदार याजकडे जावयासी पंत मारनुले आले. त्यासमागमे मीहि आलों. त्याकडे जावे तों मार्ग फुटत नाहीं. स्वामीपासीं एकासी मार्ग चालेना. एसा प्रकार जाला आहे. समागमे खर्च बहुत मार्ग चालेना सबब राजश्री बाळाजी गोविंद यापासीं आहे. याजला आज्ञा खर्चविशाई लिहिल्याने देतील. पंत मारनुलेनी पहिली ठाणी काही बसविलीं, कांहीं राहिली आहेत तेहि बसतील. कितेक तपसीलवारें राा कृष्ण गोविंद यांही लिहिले आहे त्यावरून सविस्तर अर्थ स्वामीस निवेदन होईल. जैशी सेवकास आज्ञापत्र येईल, तैसी वर्तणूक करीन. सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति.

¶*Chimnaji Rangnath to the Peshwa from Umargad, requesting orders for the payment of his troops. He reviews the position of the various Maratha chiefs in the Doab and Bundelkhand.*

No. 42] *[28-9-1762 ?*

पौ छ २३ रजब.

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसी

विनंती सेवक माहादजी सिंदे कृतानेक दंडवत विज्ञापना. येथील सेवकाचें वृत तागायेत छ ९ माहे रबिलोवल मुाा प्रांत जैपूर नाा फागी स्वामीचे आसीर्वादे येथास्थित असे विशेष. गुलराज व नंदराम हे उभैता शाहाकडून राजश्री पुरुशोतम माहादेव याजबराबरी आले ते आम्हाजवळ येऊन कितेक वृतांत सांगितला त्यावरून कळलें. येशास मशारनिलेचा सन्मान बहुता प्रकारे करून येथून बिदा

4159

महाराजाचे सेवेसी केले असे. हे कितेक अर्थ तेथे आल्यानंतर सेवेसी श्रुत करितील. त्यावरून विदित होईल. तदोतर याजवरी कृपा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Mahadaji Sindia informs the Peshwa that Gulraj and Nandram, two ambassadors, have been dispatched by Ahmedshah Abdali to settle terms of peace.*

No. 43] [*20-12-1761*

नकल

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री गोविंद कल्याण स्वामी गोसावी यांसी

सो नारो शंकर नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २२ जमादिलावल मुाा पेडगाव भीमातीर जाणून स्वकीय लिहिणे विशेष. तुम्ही वरचेवर पत्राचा पूर केला. सिरोंज आहीरवाडा येथील मामलतीविसी वारंवार लिहीत गेला. त्याजवरून दोन लाख रुाा रसद करार करून मामलत करून घेतली. याजउपरी पत्रदर्शनी दोन लाखाच्या चिठ्या पुण्याच्या तुम्ही पाठऊन देणे. तुम्हाकडून विलंब लागल्यास सरकारात येवजाचा वोढा फार याजकरिता दुसरे हरकोणापासून येवज घ्यावा लागेल. मग आम्हाकडे शब्द न ठेवणे. पैकियाची निकड बहुत आसे. पहिली तुम्हास पत्रे लिहिली आहेत ती पावलीच आस्तील. हाली हें पत्र लिाा आहे. क्षणाचा विलंब न लाविता पत्रदर्शनी दोन लक्षाच्या चिठ्या रवाना करणें. चिरंजीव राजश्री रावजीची रवानगी केली आसे. इजतखान सुज्याखान त्यासमागमे दरोबस्त फौजेनसी रवाना करणे. आहिरासी सलुख करून आहीरहि रावजीसमागमे देऊन भारी जमावानसीं झासीस जाऊन तेथील बंदोबस्त येथास्थित होऊन झांसी व किले कन्हेरा यांचा बंदोबस्त जाल्यानंतर वरचेवरी कागदपत्र पाठऊन वर्तमान लिहोन पाठवणे. सिरोंज आहीरवाडा येथील मामलतीचा बंदोबस्त तुम्ही करणे. पैका रसदेचा दोन लाख रुपये लौकर पाठऊन देणे. तिकडील नवल विशेष लिहून पाठविणे. इकडील सविस्तर चिरंजीव राजश्री रावजीचे पत्रावरून कळो येईल. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Naro Shankar instructs Govind Kalyan to send to Poona revenue collections from the provinces of Sironj and Ahirwada.*

No. 44] [Recd. 1-7-1761 ?

पो। छ ९ जिल्हेज

श्रीशंकर

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री महिपतरावजी
स्वामीचे सेवेसी

सेवक महिपतराव गोविंद कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशललेखन करीत असिले पाहिजे विशेष. पत्र पा। ते पावले. लि। सावधपणे राहणे चिंता न करावी. झासीहून दारूगोली व संभर गारदी पा। आहेत ते पोहचतील. त्यास आम्ही बहुत हुशार आहो. खावंद आहेत उपराळा करतीलच. आज रोहिलेयाची फौज हजार स्वार आले आहेत. गस्त देऊन बाजारात उभे राहिले आहेत. त्यास आम्हासी मोहरा जुडलियावर ईस्वर साहे होईल, चिंता नाही. श्रीमंताचे प्रतापेकरून सर्व उतमच होईल. उदईक त्याची सारी फौज येईल. आम्ही बहुत खबरदारीने आहो. चिंता न करावी. श्रीमंत राजश्री राजश्री रावसाहेबाकडे वर्तमान पोहचाऊन देणे. कळले पाहिजे. कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

(पुढील चार ओळी मजकूर गैरउपयोगी सबब गाळला.)

¶*Mahipatrao Govind writes to Mahipatrao at Jhansi that he is ready for the attack of the enemy reported to be one thousand strong, and thanks the latter for the reinforcements sent by him.*

No. 45] [21-3-1763 ?

छ २१ रमजान

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक कासी नरसी, कृतानेक साष्टंग नमस्कार विज्ञापना. तागाइत छ ९ रमजान, मुक्काम कालपी, स्वामींचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. आज्ञापत्र सादर जालें. तेथें आज्ञा कीं, नरसिंगडच्या जाबसाला-विशीं हुजूर येणें व राजश्री चिंतो अनंत यांणीं लिहिलें कीं, नरसिंगड तालुका गणेश संभाजी यांजकडून बापूजी नारायेण यांजकडे होता त्यास पाठीशीं घातला होता म्हणोन हुजूर जाबसालास येणें, यैसी आज्ञा जाली आहे. त्यास राजश्री गणेश संभाजी पेशजी हुजुरून मामलत करून आले. त्याउपर या प्रांतीं

धामधूम जाली. पातशा(हा) व सुजातदौले येमुना उतरले, तेव्हां गणेश संभाजी त्यांस भेटोन मोठीं मोठीं कामें केलीं. कोणी मामलेदार ठाणें राहूं पावले नाहीं. तमाम प्रांताच्या सनदां पातशाहापासून घेऊन मुल्लक लुटून पस्त केला. दीड वर्ष चाकर आविंदाचे जाले. तेथें ठीक न पडे. तेव्हां राजश्री माहादजी शिंदे यांजकडील संताजी वाबळे वगैरे सरदार आले, त्यांजला भेटोन सागराकडे आले. येऊन आमचे तालुक्यांतील गाव राहिले होते, त्यासच लुटूं लागले. यास्तव सांगोन पाठविलें कीं, आपण सरकारचे माहाल कां लुटितांत ? या प्रांतीं यावयासी कारण काये ? तेव्हां पंत मशारनिल्हेनीं जाबसाल केला कीं, नरसिंगडचे बंदोबस्ता(स) जातों. तेव्हां गणेशपंत पातशाही चाकर होते. स्वामींचे आज्ञे-शिवाये फिरोन प्रांतांत जाऊन गांवजागा लुटतील. आम्हांकडील तालुक्याची जागा लुटली जाईल. बापूजी नारायेणहि आम्हांकडील ठाणीं राहिलीं, याच आसरेयानें राहिलें. जागा रक्षिली. राजे जगतराज यांजकडील कुवरमण याणें नरसिंगड तीन वेळ घेतला, जागा सर्व लुटली. तेच गत आमचेही जाग्याची जाली. बापूजी नारायेण यांचा बच्याव होणार नाहीं म्हणोन तेच आगोदरच गणेश संभाजीच्या भयानें देवरीकडे गेले. आम्ही च्यार गोष्टी पंत मशारनिल्हेस सांगितल्या. वरकड नरसिंगडचा रुपया व हिशेब आम्ही घेतला नाहीं. बापूजी नारायेण हिशेब घेऊन पुण्यास गेले. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Kasi Narsi explains to Raghunathrao that he is in no way responsible for the Narasinggarh affairs. It was all the work of Ganesh Sambhaji.*

No. 46] *[21-3-1763 ?*

पो छ २२ रमजान

श्री

श्रीमंत राजश्री दादा साहेब स्वामीचे
सेवेसी

विनंती सेवक बाळाजी गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ ९ रमजान मुकाम कालपी स्वामीचें कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असें विशेष. आज्ञापत्र सादर आलें तेथें आज्ञा कीं काशी नरसी यास हुजुर पाठवणें व राजश्री चिंतो अनंत यांणीं लिहिलें कीं नरसिंगड तालुका गणेश संभाजी याजकडून बापूजी नारायण याजकडे होता, त्यास काशीपंतांनी पाठीशीं घातला. त्याचा जाबसालास पंत मशारनिलेस हुजुर पाठवणें म्हणोन अज्ञा जाली

आहे. त्यास राजश्री गणेश संभाजी हुजुरून मामलत करून आले. तदोत्तर दुंडी[1] जाली, तेव्हा गणेश संभाजी याही मोठींमोठीं कामें केलीं; कोणी मामलेदार राहूं पावले नाहीं(त). तमाम प्रांताचा इजारा नवाब सुज्यादौला याजकडून करून घेतला. पातशाही चाकर जाले, दीड वर्षपर्यंत चाकरी केली, तेथें ठीक न पडें. तेव्हां राजश्री माहादाजी बावा शिंदे याजकडील संताजी वाबळे वगैरे सरदार आले. त्यांजला भेटोन सागराकडे आले. तिकडे आमचे तालुक्यांतील गांव राहिले होते त्यांसच लुटों लागले. यास्तव तीर्थस्वरूप राजश्री काशीपंतीं सांगोन पाठविलें कीं आपण सरकारचे माहाल कां लुटतां? याप्रांतीं यावयास कारण काय? तेव्हां पंत मशारनिलेनीं जाबसाल केला कीं नरसिंगडचे बंदोबस्तास जातों. तेव्हां काशीपंतीं विचार केला कीं गणेशपंत पातशाही चाकर होते. स्वामीचे आज्ञेशिवाय फिरोन प्रांतांत जाऊन गांव जागा लुटूं लागतील. आम्हांकडील तालुक्याची जागा लुटली जाईल. बापूजी नारायणहि आम्हाकडील ठाणीं राहिलीं याच आसरेयानें राहिले. जागा रक्षिली, तीन वेळ नरसिंगड राजे जगतराज याजकडून कुवरमणानें घेतला. जागा लुटली, आमचेहि जाग्यांत तेच गत जाली. बापूजी नारायण याचा बच्याव होणार नाही, यास्तव पंत मशारनिलेस च्यार गोष्टी सांगितल्या. मशारनिले अगोदरच गणेश संभाजी याचें दर्पानेंच देवरीकडे गेले, त्याजकडील रुपया हिशेब काशीपंतीं घेतला नाहीं. हिशेबकितेब बापूजी नारायण घेऊन पुण्यास गेले. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Balaji Govind tries to explain why Kasi Narsi befriended Bapuji Narayan, a servant of Ganesh Sambhaji who has turned disloyal.*

No. 47] [*28-5-1763*

पौ छ १९ जिलकाद

श्री

श्रीमंत राजश्री विश्वासरावजी स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक त्र्येंबक कृष्ण कृतानेक सां। नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम ता। छ १४ जिलकाद मंदवासर प्रातःकाल मु। भरोली येथास्थित जाणून स्वकीय कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. आम्ही राजश्री

---

१ दुंडी—दंगा.

बालाजी गोविंद याचे लस्करात फौज आणावयासी गेलो होतो. त्यासी तेथील प्रकार पाहिला तर सारा गोगा होता म्हणून तेथून उठोन आलो. पेशजी चिरंजीव राजश्री बालाजीपंतानी राजश्री यादवराऊ यास विनंती केली की जाठ गरविष्ट फार जाहाला आहे. त्यास तुम्ही या प्रसंगी राजश्री सुभेदाराचा उपराला करावा यैसे बहुत प्रकारे सांगितले, परंतु त्याचे मर्जीस न आले. सांप्रत्य सेवेसी विनंतीपत्र पाठविले आहे. त्यास पाचसातसे राऊत चांगले निवडक सरंजाम उतम करोल यैसे नेहमी असेल ते आम्हाकडे पाठऊन द्यावे. त्याचा रोजमरा येथातथ्य जो असेल तो लेहून पाठवावा. जैसे आपणाजवळ बसोन खात आहेत तैसे इकडेच पाठऊन च्यार दिवस राजश्री सुभेदाराचा उपराला करावा यात महद येश येईल आणि श्रीमंताजवळ लौकीक होईल. जाटहि पंचमाहालाकडे आला आहे. त्यासी आम्ही सिमथारवालेहि नेमस्त केले आहे. आणि आपणहि चिती धरून जे स्वार पाठवावयाचे ते पाठवावे म्हणजे सिमथरकर व आपले स्वार यैसे येकत्र होऊन जमावासी गालेरीस जाऊ. तुम्ही संस्थानी सरदार विसा कोसावर आसता गालेरीस हा गोहदकर गुलाम उपद्रव देतो, उपराला न होये, आश्चर्य आहे. दक्षणी लोकास कालच पाठीस लागला. मागे श्रीमंत राजश्री नाना श्रीमंत विठलराऊजीचा उपराला करीत होते. भीमसिंग मारला तेव्हा राजश्री चिमणाजीपंत आठ महिने फौजसुधा आपले पदरचे खाऊन गोहदेस मोरचे लाविले होते. विठलराऊ कितिक वेल कामास त्यास आले. आता तो प्रकार नाही. तोतयाचे वेलेस आपले देहाल्याचा कटा केला. घोडी पडली. खिना-रियावर आमचे पागेचे भले माणूस पडले. घोडी पडली. काही तरी ध्यानास आणावे. रावसाहेब, प्रसंग राहाणार नाही. आमचा येत्न आम्ही केला. कोन्ही साह्ये व्हाना, हे थोरपणास योग्य नाही. सेक इमाम वगैरे पाचसे स्वार तरी पाठवावे. किल्याचे दक्षणेस जाठ आला आहे. आमची फौज पाठोपाठ आहे. यैसिया प्रसंगी मानपान पाहावा यैसे नाही. रावसाहेब, परस्परे आगत्यवाद न धरावा, विहित नाही. यैशा प्रसंगी खासा कंबरबस्ती करून कोन्ही न ये तर आपणच यावे. गोविदपंत सुभेदार बहुत थोर आहेत, याचे साहित्य करावे. ईश्वराजवल मजरा आहे. सिंदेच्या कडेस येऊन यादवराऊ माघारे गेले, पंधरा कोस गोलेरीस न गेले. आसो याउपरी तरी कृपा करावी. लोभ कीजे हे विनंती. देसीहून काही वर्तमान कागदपत्र आला असेल तरी लिहून पाठवावे हे विनंती.

¶*A touching appeal to Vishvasrao Lakshman of Jhansi by Trimbak Krishna (Kanitkar) requesting him to send help to Govindpant Subhedar and the Holkar against the aggression of the Jats. The writer also reminds him of past occasions when the Peshwas helped their sardars and thus impressed on him the necessity of supporting the Deccanis in general.*

4164

No. 48] [19-9-1763

पौ छ ११ रावल

श्रीमोरया

शेवेसी विज्ञापना. राजश्री माहादजी सिंदे यासी हुजूर यावयाकरितां पत्रे पाठविली; परंतु त्याचा यावयाचा प्रकार न दिसे. तों सखूबाई हुजूर अली म्हणून मशार-निलेहि येऊन भेटले. त्याजला आज्ञा केली कीं सखूबाईची कृपा संपादून घेणे. परंतु हे त्याजला अनकूल न पडले. तेव्हा सखूबाईचे मर्जीस्तव राजश्री मानाजी सिंदे यासी सरदारीची वस्त्रे देऊन राजश्री माहादाजी गोविंद कारभारी करून दिल्हे. येका मासांत दाहा हाजार फौजनसी तुम्हापासीं पोंहचतील. माहादजी सिंदे यासी चौ हजारा फौजेची सरदारी देत होतो तें अमान्य करून उठोन तिकडे आले म्हणून विस्तारे करून आज्ञापिले. यैसियासी आपणास सखूबाईचे श्रम न देखवत. यास्तव साहेबी राजश्री मानाजी सिंदे याजवर कृपालु होऊन पूर्ववतप्रों स्थापना करून सरदारीची वस्त्रे दिधली. बहुत उत्तम. खावंदाची मर्जी ते मान्य आसे. स्वामीचे आज्ञेविरहित कोण आहे? राजश्री माहादजी सिंदे उजनीस दाखल जाहाले. स्वामीचे खानाजाद सरदार खावंदाच्या पायांखेरीज कोठे जातील? सर्व बडवार खावंदाच्या पायांपासी जाली आहे. इकडे बोलाविले आसेत. सर्व उर्जित करणार खावंद समर्थ आसेत. शैवेसी श्रुत होये हे विज्ञापना.+

¶Gangadhar Yashvant writes that as Mahadji Sindia could not settle matters amicably with Sakhubai Sindia, the robes of honour were conferred on Manaji Sindia, at which Mahadji took offence and went back to Ujjain. The letter is perhaps addressed to Raghunathrao.

No. 49] [End of 1763

श्रीमोरया

चिरंजीव राजश्री बालाजीपंत व राजश्री गंगाधरपंत यांसी प्रति गंगाधर यशवंत आसीर्वाद उपरी. येथील क्षेम जाणून स्वकीय कुशललेखन करीत जाणे विशेष. तुम्ही सर्व सरंजामानसी सुरंजच्या मलात आला म्हणोन येकिले. देशासी जाणार येसियासी देशी मोगलाने हतवीर्य होऊन नवी जागीर श्रीमंतास देऊन सला केला.

+ पत्र गंगाधर यशवंताचें रघुनाथरावदादांस असावें.

तिकडील गुंता उरकला. झाडून फौजा रवाना जाल्या. दरमजल येतात. येथून राजश्री तुकोजी होलकर फौजसुधा ते प्रांतच्या बंदबस्तास रवाना केले ते व राजश्री विश्वासराव लक्ष्मण मिलोन येतील. तुम्ही त्यासी सामील होऊन ते प्रांतचा बंदबस्त होये ते गोष्ट करणे. दुरंदेशी घ्यानात आणून तूर्त देशी जावयाचे न करावे. सविस्तरे येजमान पत्रावरून देसी सलुख जाहाला. दरबारी बेगमी केली पाहिजे. येथूनहि फौज रवाना केली आणि राजश्री नारोपंत नाना व राजश्री विठलराव तात्या मातबर फौजनसी येत आहेत. तुम्ही व चिरंजीव राजश्री विस्वासराव वगैरे दम धरून पूर्ववत करार करून च्यार पैसे खावंदास जागा जाहाली म्हणिजे स्वामिसेवा उतम आहे. सर्व तुम्हास कलत आहे. विस्तारे काये लिहिणे लोभ असो दीजे हे आसीर्वाद. मुखवचने राजश्री चिमणाजीपंत आपा सांगतील ते धानास धरून व राजश्री जनार्दनपंत बावा सांगतील ते येकून उत्तम दिसेल ते करावे हे आसीर्वाद.

¶*Gangadhar Yashvant writing to Balaji Govind and Gangadhar Govind informs them that the campaign against the Nizam resulted in a great victory for the Marathas. The forces thus relieved will soon march to the north under the command of Vishvasrao Lakshman. Tukoji Holkar, Balaji and Gangadhar are advised not to leave the north where their presence was indispensable.*

No. 50] *[1764*

श्री

पुा श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

विज्ञाप्ति ऐसीजे. पातशाह व सुज्यातदौले फौजेसुधा पटण्याआलीकडे पस्तीस कोस जाऊन मुकाम केला. पटणियाकडून फिरंगी अले. अगोधर जाबसाल सलुकाचा फिरंगियानी लाविला होता, त्याचा मातबर माणूस पातशाहपाशीं आला कीं मुलाजमतीस येतात; मामलत करूं. त्यावरून सुज्यातदौले यानी विचार केला, की फिरंगी हरामजादे आहेत, भरवसा नाही म्हणोन पातशाह व बुणगे ऐसे माघे ठेऊन बारा कोस आणिक पुढें पंचवीस तीस हजार फौजेनसी सडेच गेले. तिकडून फिरंगी दहापंधरा हजार फौजेनसी आले. पहिला प्रहर पावेतों सलुखाची गोष्टमात होती. कोसा दोकोसाचें अंतर राहिले होते. तेथेंच लढाई मातबर सुरू झाली. तरवारी तरवार जाली. संध्याकाळ जाला. फिरंगियाकडील तीन

हजार माणूस ठार जाले व धरले आले. जखमी बहुत जाले. राहिले ते पळोन गेले. सब्या फौजेचे बुणगे मागे होते त्यावर माघारे दुसरी टोळी फिरंगियाची येऊन पडली. बुणगे लुटले. मागती युध्य जाले. सुज्यातदौलाकडील शुज्या-कुलीखान व बेणीबाहदर याकडील गुलाम कादरखान ऐसे दोघे सरदार ठार झाले. रात्र बहुत जाली. शुज्यातदौले फौजेसुधा शिकस्त खाऊन माघार निघोन कूच दरकूच येत होते, तो सुवर्णभद्रात[१] दाहा बारा हजार माणूस बुडोन मेले; वस्तभात्र गेली आता राहिली फौज घेऊन वाराणसीस दाखल जाले. बुणगे व पातशाह मागे होते तेहि मागून येतात. फिरंगी जेथे होते येथेच आहेत. पुढें पाहावे निदर्शनास येईल ते सो विनंती लिहूं. बेणीबाहद्र याने अयुधेकरास म्हटलें कीं बेहिमत न होणे, नवी फौज ठेवाल त्यास करोड रुपयाचा सरंजाम करून देईन. या प्रो करार करून फौज नवी ठेवितात +हे विनंती.

¶*The battle of Baxar between Shuja-ud-daula and the English and the losses that it entailed on the former are described in this letter addressed to Dadasaheb.*

No. 51] [*Just after 9-4-1758*

श्री

सेवेसी राजाराम गोविंद विज्ञाप्ति ऐसी जे. पूर्वी सेवेसी विनंतीपत्रें पाठविली आहेत त्याजवरून वृत श्रृत जाहाले असेल. हालीचे वर्तमान ; नवाब वजीर व या उभयता सरदाराच्या फौजा व याचे सरदार ऐसे छ ३० रजबी फरुकाबादेहून कूच करून बाहीर डेरे दाख(ल) जाहाले. येथून कूच दो चौ दिवसात होऊन मजल दरमजल जगमनपूरचे घाटास येमुना उतरावयासी येतील. त्यास तेथे नावा पाहिजेत. तर कृपा करून रा। बालाजी गोविंद यास येक पत्र पाठवले की नावा पंचवीस जगमनपूरचे घाटास पाठवीत म्हणजे लस्कर लवकर उतरून सो हाजर होये ते करणार स्वामी समर्थ आहेत. वजिरानी सांगितले जे, आम्ही कोणे स्थली येऊन पोहोचावे? उतरी सनाथ करिणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Rajaram Govind informs Dadasaheb that the Vazir accompanied by the Rohilla chiefs has started for Delhi.*

---

१ शोणभद्र नदी. + येथून अक्षर वेगळें.

No. 52] [February 1765

पो छ २९ साबान

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेसी

सेवक आज्ञाधारक राघो निळकंठ सां नमस्कार विज्ञापणा ऐसीजे. ता छ साबान मुा पुणे जाणोन स्वामीचे कृपेकटाक्षेकरून सुखरूप असो विशेष विज्ञप्ति ऐसिजे. सेवेसी येऊस बारा महिनियांत रोजमरा एक रुपये २०० दोनसे सरकारातून पावलेत. बाकी दीड हजार रुपये लोकांचे कर्ज घेऊन कालक्षेप केला. त्याचे देणे गुंतामुळे खासी स्वारी बरोबरहि येणे न जाले. श्रीमंत राऊ साहेबाची स्वारी निघोन गेली, त्या समागमेंहि जाणे न जाले. कर्जदाराचे तगादामुळे पुण्यातच फसून बसलों आहो. येथें तर कोन्ही मायेच स्नेही कोन्ही नाहीं. स्वामीचे पायाखेरीज आणि उपाय नाहीं. स्वामी धणी समर्थ आहेत. कृपा केलिया आबरू राहत आहे; नाहीतर स्वामीचे शेवेसी अंतरतो. घरसंवसारातूनहि जातों. वीस बावीस वर्षे सेवा करून स्वामीचे पायांखेरीज एक पैसा घरीं व येथें कर्जा-सिवाय असला तर शिवनिर्माल्य असे. मिथ्या विनंती सेवेसी असली तर आपले कुलस्वामिनीची सपत असे. त्यासी विज्ञप्ति ऐसीजे. एक पत्र राा नाना फडनीस यांसी कृपा करून पाठविलें पाहिजे कीं पुण्यांत राघो निळकंठ यांसी कर्जदाराणी अडविलें आहे; तर त्यासी ताकीद करणे कीं तुमचा कर्ज देणे आहे तर आतां मााईलेणी कोठून द्यावें? सोयेणे तजवीज करून देतील ऐसी कर्जदारास ताकीद करून मााईलेस हजूर राा करणे, ऐसी आज्ञापत्र व राा बाळाजी गोविंद यांसीं ताकीदपत्र कीं तुम्हाकडे सरकारची वरात एक हजार तीस रुपयाची मााईलेची असून तुम्ही आपले हजार रुपयेचा तगादा करता तर हे गोष्ट कारियाची नाहीं. सरकारची वरात तुमचे नावी आहे ते मााईले नावी खर्च लिहून मााईलेपासून हजार रुपयेचा रोखा लिहून घेतला आहे तो माघारे देणे; येविसई स्वामीही ताकीद-पत्र द्यावयाची आज्ञा राा कुकाजी सिवरायासी आज्ञा केली; परंतु हस्तगत न जाली. त्यासी आतां हे ताकीदपत्र व राा नाना फडनीस यांसी पत्र ऐसी दोन पत्रे कृपा करून पाठविलें पाहिजे म्हणजे येथील निकाल पाडून सेवेसी येईन. नाहीतर स्वामीचे पायाखेरीज मुरबी वसिला दुसरा कोन्ही नाहीं. स्वामीचे पाय अंतरतात. संवसारातून गेलो. पुढें स्वामी धनी समर्थ आहेत. यानंतर हिंदुस्थान प्रांतीचे वर्तमान श्रीकासीहून कर्जदाराची कासीद जोडी येक महिना पांचा रोजाची आली. पत्रांत वर्तमान लिहिले होते कीं जाफर महंमदखान सुबा बंगालाचा, त्याची फौज

व फिरंगी व प्यादे तेलंगी वगैरे मिळोन विशेक हजार पटणाहून अलीकडे पंनास कोस श्रीकासीहून पंचवीस तीस कोस मोहणीया जागा आहे तेथें पडली आहे. मीरकासम अलीखान सुभा बंगालाचा होता तो पळोन सुजावदौला व अली गोहर याजपासीं आला. जगतसेटाचे दोघे पुत्र कैदीत घेऊन आला. दोन हजार स्वार, च्यारपांच हजार प्यादा तेलंगी, हजार फिरंगी, ऐशी फौज व दाहा करोडाची मालियत घेऊन आला आहे की वजीर व पातसाह यांची व याचे मारफत रा मल्हारराऊ होळकर व सिंदे वगैरे फौज दक्षणियांची करारमदार करून तिकडे घेऊन जाऊन मीरजाफर अलीखानाचे पारपत्य करून बंगालाचा बंदोबस्त करावा या येराद्यावर कासम अलीखान वजीराकडे आला आहे. त्यासी तूर्त बुंदेला अनुपगीर गोसावी दिा वजीर याणी लुटून घेतले होते म्हणोन बुंदेले याचे पारपत्या-करितां अलीगोहर व वजीर, व कासमअलीखान ऐसे मळोन कालंजरगडास येऊन मोरचे लाविलेत. बुंदेलाचे मुलकांत मोगलाई अमल बसविला. फौज तीस चाळीस हजार आहे. बुंदेले फार दिक जाले आहेत. मामलत चुकवितील. इजतखान वगैरे यांची लिहिली नवाब मजकुरास जात असतात याप्रा वर्तमान आले होते ते सेवेसी विनंती लिहिली आहे. सेवकाविसई दोन पत्रे राजश्री नाना फडनीस व राजश्री बाळाजी गोविंद यासी अगत्य कृपा करून पाठविले पाहिजे. बहुत काय लिहिने हे विज्ञाप्ति.

¶*Ragho Nilkanth solicits Raghoba's favour to enable him to pay off his debts. He further sends him news of the revolution in Bengal which he gathered from the letters of his creditors. Mir Kasim has been defeated by the English and seeks an alliance with Shuja-ud-daula and the Marathas in order to make an attempt to win back his province.*

No. 53] [*15-3-1764*

छ १६ रमजान

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेबाचे सेवेसी

प्रतिपूर्वक संखूबाई[1] सिंदे दंडवत विज्ञापना. येथील कुशल ता फाल्गुण सुध्य १२ जाणून येथास्थित आसे. याउपरी चिरंजीव माहादजी सिंदे यासी आपण येथे पाठविले. साहेबीं पाठविले म्हणून आम्हीं त्यासी कोणे गोष्टीचे

---

१ जयाप्पा सिंद्याची स्त्री सखूबाई रघुनाथरावदादाकडे महादजीबद्दल तक्रार करिते. हिचा मुक्काम बहुधा जांबगांवास असावा.

द्वैत न धरिता त्याचे (लोका)स व त्यास वाडियातच ठेविले. दोन तीन महिने आम्हापासी होते. सांप्रत्य कजिया करून दुसऱ्या वाडियात जाऊन राहिले. आम्हास आनेक प्रकारचे उपद्रव अरंभिला आहे. चहुकडोन बेतंग केले आहे. आमच्या जवलील माणूस देखील आम्हापासी येऊ देत नाहीं. सेतेपोते आमच्या पोटापाण्याची होती ते झाडून बंद केली. ब्राम्हण येक दोघे जवळ होते त्यासी पीडा करितात. आमची अन्नावस्त्राची विपत्ये आहे. आणखी उपद्रव आम्ही कोठेवर ल्याहावें? आम्हावर ईश्वर गहजब केला कीं येकायेकी येकदाच मृत्य पावले. आम्हास कोठे उभे राहावयासी जागा नाहींसी जाली. दुखाचे परवत जालें आसता माहदजी सिंदे पाठी लागले आहेत. येक खावंदाचा भरवसा, त्यासी साहेबहि परामृश (घेत) नाहींत. यैशा मणुशाकडून आमची आबरू घेवितात तेव्हा आम्ही उपाय काय करावा? साहेबापासी वर्तमान ल्याहावयासी चोर जालो यैशा गती जाल्या आहेत. दासीचे दाशत्व आम्ही करावें यैसे साहेबाच्या मर्जीस येत आसले तरी सुखरूप करावें; परंतु ईश्वरास ह्या गोष्टी मानत नाहींत. साहेबाच्या चितात आमची विपत्ये करावी यैसे आसले तरी तैसेच लिहून पाठवावें. विश भक्षून सर्वत्र प्राणत्याग करू. दुसरा उपाय नाहीं. हे जाचणूक आमच्याने सोसवत नाहीं. दौलत साहेबी त्याच्या हवाली केली. आज च्यार माहिणे येथे येऊन बसले आहेत. येक राऊत आद्यापि ठेविला नाहीं. पागेची बंदोबस्ती आगर शागीर्द (ये) कोणे गोष्टीची तरतूद तिलमात्र नाहीं. सारा बखेडा चहूकडोन जाला आहे. कोणी पाठऊन परामर्ष करावा. पुढें आमच्या संसाराचा कांहीं बंदोबस्त करून देतील तरी आमची जगणूक होईल. माहदाजी सिंदे याच्या जाचणुकेपासोन सोडवावें. बहुत काये लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*Sakhubai Sindia, wife of Jayapa Sindia, complains to Raghunathrao against the ill-treatment of Mahadaji Sindia and pathetically appeals to Raghoba Dada for help.*

No. 54] [*31-3-1764*

पौ छ ६ सवाल सन
आर्बा चैत्र

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यांसी

पौ रघुनाथ बाजीराव नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणे विशेष. राजश्री पुर्षोत्तम माहादेव वकील याची रवानगी शाहा अब-

१ धाबरे.

दली याजकडे व जवाहिरसिंग जाटाकडे केली असे. त्यास वस्त्रें बहुमान न्यावयास येणेप्रमाणें पोशाख

वस्त्रे सिरस्तेंप्रमाणे पोशाख
३ शाहा अबदली
२ खाशास
१ शाहावलीखान
३ जाटास
२ खास बंधु
१ रूपराम कटोर
यास सनगे २ यो
३
६

हती नग
२ शाहा अबदली
१ खासा
१ शाहावलीखान
२
१ जवाहिरसिंग यांस
३

येकूण साहा पोशाख सिरस्तेप्रमाणे व तीन हत्ती देविले असत. तर सदरहू-प्रमाणे याचे स्वाधीन करून याची रवानगी लवकर करणें. रा छ २७ रमजान सुरू अर्बा सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

Purushottam Mahadev Hingne is sent on an embassy to the Abdali. The letter is addressed by Raghunathrao to Nana Fadnis.

No. 55] *[Apr. 1764*

२

श्री

पुरवणी साहेबाचे शेवेसीं

हेमराज कवेर याचे पुत्र परसुकजी याजलाहि पाठविले. त्याजला हलचंद दिवान याचे कबिल्याविषई सांगितले. त्याजवरून कबिले जोहारमल जाट यानी सोडून दिल्हे. राज्यापासी पाठविले. ते जयेपुरास दाखल जाले. हलचंद याचे पुत्र चौधे याची मुलाजमत हुजूर जाली. कामकाज त्याजवरी आहे. राजे माधोसिंगजी बहुत सावधानीनें तरतुदीनें चालत आहे. सिकार बहुत खेलतात. स्वारी नित्या होत आहे. जाटाची नजीबखान रोहिले याची लढाई जाली. यावरी नजीबखानाकडे बहुत नवाजीस सिस्टाचार देऊन मुनसी रामकिसन याजला

पाठविले होते. ते दिलीपलीकडे जाऊन रामझ्याचे घाटीं नवाब नजीबखान यासी मुलाजमत घेऊन सिरपाव घोडे बक्षीस मोत्याची माळा सिरपेच जो सरंजाम दिल्हा होता तो प्रविष्ट करून बहुत स्नेहवाद संपादून दहा पांच दिवस राहून मुनसी रामकिसन याचा बहुत सिस्टाचार वस्त्रे बहुमान घोडा देऊन बिदा केले. ते चैत्र शुा ३ जयेपुरास दाखल जाले. राज्याची मुलाजमत जाली. नजीबखानासी आंत्र बहुत ममतेनें राखिले आहे. सिखाचा उपद्रव दिलीपलीकडे बहुत जाला. याजकरितां नजीबखान यांनीं जाटाकडील मनसुबा सोडून सिखाकडे जाऊन पैगाम लाऊन अका लक्ष रुपये मामलीतीचे ठराऊन सला मामला करून उपद्रव मिटविला. सीख माघारे गेले. जाटाचा उपर सिखानीं बहुत केला. मुलुक वाचविला. नजीबखान् रामझ्याचे घाटीं आहे. दिलीस येणार. जाट जोहारमल मथुरेस आहे. फौज पार पाठविली आहे. त्यानीं तमाम आपल्या मुलकाची ठाणी कायेम केली. नजीबखानाची फौज वान्हा (?) कड उतरली होती, ते मारोन घेतली. जाटाचा बंदोबस्त जाला. पुढें जो विचार होईल ते लिहीत असो. दिलीस पातशाहजादा नजीबखानाचा पुत्र आहे. बंदोबस्त उत्तम आहे. पठान आबदाली माघारे गेला. आपल्यामध्ये फिसाद फार जाला याजकरितां उठोन गेले. सिखाचाहि दबाव पडला. सिखानीं लाहोरांत ठाने बसविले. तमाम बंदोबस्त सिखाचा जाला. आलीगोहर पातशहाकडील वर्तमान तरी पातशहा व सुजावतदौले काशीसंनिध पावले, पटण्यास जात आहे, तिकडील मनसुबा पडला आहे. कासमआलीखान बराबर आहे. त्याचा बंदोबस्त करून घ्यावा, हा विचार आहे. प्रस्तुत कासीसंनिध आहेत. पुढें जे वर्तमान येईल, ते साहेबाचे सेवेसी लिहीत असो. वरकड राजेरजवाडे आपल्या आपल्या जागाच आहेत. गुलराज वकील व नंदराम मुनसी शाहकडील कोठ्यात होते ते सांप्रत जयेपुरास दाखल जाले. राजे माधोसिंगजी याची मुलाजमत जाली. प्रस्तुत राहतील. हवेली (अपूर्ण)—

¶*Letter reporting news to the Peshwa from the North. The Jats with the help of the Sikhs are holding out against Najib. Mir Kasim is marching back upon Patna with his new allies, Shuja-ud-daula and the Emperor. The Abdali has withdrawn from the Punjab owing to risings in his own country.*

No. 56] *[12-6-1759*

श्री

वडिलाचे सेवेसी सा। नमस्कार विज्ञापना. ता। छ १९ शौवाल मंगळवार दीड प्रहर दिवस सकालचा मुकाम मेरठे सुखी असो विशेष. शुक्रतालचे पत्र

आले ते बजिनस पाठविले आहे. पावेल. रा बाबास पत्र लिा आहे. विचारास आल्या द्यावे. सारांश फौजाचे पुढे कूच होऊन आल्यास आमचा येथील बंदोबस्त राहेल; आणि इकडे फौज पाठवावयाची ते पाठवावी. वारंवार काय लिहू, होणे जाणे ईस्वराधीन. आम्ही आल्यापासून लिहिता थकलो; परंतु कोणी एक स्वार मागाहून येक म्हणतो. सेयाजी गाईकवाड पालखीसुधा काल आले दुसरे कोणी आले नाही; तरी पतके फौजे पाठवावी; व फौजाचे कूच लौवकर होये ते करावे तरच इकडील ठाणी वाचतील, नाही तर कळतच आहे. हालीमाजीचा समये, कितीक गोष्टी ध्याना आणौन दादास विनंती व रावजीस करणे ते करावी. फार काय लिहू. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.

¶*The writer asks for the immediate despatch of contingents to retain Meerut and other places captured recently.*

No. 57] [29-4-1767

पैा छ १० जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामी चे सेवेसी

विनंती सेवक गोविंद रघुनाथ सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल वैशाख शुध १ बुधवार मुा नाा झोकर जाणून स्वकीय लेखन करीत असिले पाहिजे विशेष. छ १९ जिलकादचे पत्रे पाठविली ते पावोन वर्तमान विदित जाहले. रा रावजीची पत्रे रावजीस दिल्ही. त्यानी उतर केले की, येकदा फडनिसाची पत्रे सालसीची आल्या मग सर्व जाबसाल श्रीमंत दादासाहेबापासी करीन. दिकत कारकुनाची काहडीतात. आमच्या मर्जीप्राा वर्तत नाहीत याजकरिता विनंती लिहीत गेलो. दुसरे वडिलानी पत्र लिहिले त्याचा भावगर्भ ध्यानास आणून जपत उतम. त्याप्राा उतर ल्याहावे. पत्रे परभारा न पाठवावी. आम्हापासी पाठवीत जावी. चिंता नाही. मधे त्याजपासी आज्ञा मागितली परंतु न दिल्ही. उतमच जाहले. दाहा हजार रुाची हुंडी पाठवणे म्हणून लिहिले. त्यासी रा यादवरावभाऊनी बारा हजार रुाची निशा रा गंगाधरपंत याची करून * * * रावजीस पाठविले. बहुत उतम जाहले. कारकुनाची पत्रे जरूर पाठवावी. राजकी वर्तमान होलकराचा श्रीमंता(चा) आद्यापि तह ठरला नाही. दादासाहेबाचा आग्रह नवी जाहगीर घ्यावी सिवाय नजर घ्यावी. त्याचे मानस पंचवीस लाख रुा पावेतो नजर कबूल करितात परंतु जाहगीर न

देऊं. नित्य जाबसाल होतात. रा अव्वचितरावहि त्यांत आहेत. होलकराचा ठराव जाहाला म्हणजे होलकराची व सिंदे याची रवाणगी हिंदुस्तानात होणार आहे. भोसल्यासहि पाठविणार. काय ठराव होईल तो पाहावा. रा विठल सिवदेव याची पत्र नित्य श्रीमंतास येतात की, जाटाची फौज व रोहिल मिलोन दाहा पंधरा हजार भिंड कछवाधार येथे आली. गोसावी पलोन गेला. रा बालाजी गोविंद डंघाईत गेले. कोचेस फौज येणार. जर मातबर फौज येती तर मुलूक राहातो. नाहीं तर जाठ, रोहिले येकत्र होऊन मुलूक घ्यावा यैसे त्याचे मानस यैसी वार्ता आहे. त्यासी लोक श्रीमंताच्या कह्यात नाहीत. सरदार मात्र बेदील. आम्हास मोठी आपली चिंता. कुटुंब समागमे आहे. आपण बहुत सावधता राखावी. आम्हास खर्चास रा गोपाळराव यानी लिहिले कीं हुंडी करून पाठविली ते घेणे. पत्रीमात्र लिहिले. हुंडी नाही. येक रुा नाही. यैसे लटके लिहिल्याने आमचे कैसे चालेल? आमची येथीलच निश्चंति नाही. तेव्हां घरचा प्रकार काय ल्याहावा? तथापि स्वामीस न ल्याहावे तर कोन्हास ल्याहावे? अंगीकाराचा अभिमान धरून सांभाल करावा. हाहि प्रकार न लिहितो. म्या सर्व वर्तमान सेवेसी येक दोनदा निवेदन केले होते. इतके लिहिले म्हणून राग न करावा. धनी मायबापसारखा आहे म्हणून लिा. आपली आज्ञा कीं, मजला लिहिल्यावाचून स्मरण होत नाही. याजकरिता येक दोनदा लिहीत गेलो. आता लिहिणार नाही. वरचेवर आपल्याकडील वर्तमान लिहीत जाणे. आपण येक डौलें[१] पुढील कमाविसीचे दुसरे मख्ताचे (अपूर्ण. दोन बंद गाहाळ)

¶*An incomplete letter from Govind Raghunath to Vishvasrao Lakshman (Raosaheb) reports that an agreement has not yet been reached about the succession to the Holkar's estates. The writer further informs that the Jats have been joined by the Rohillas and have captured several outposts near Gwalior.*

No. 58] [*Recd. 10-5-1764?*

पैा छ ८ जिलकाद

श्रीभवानीशंकर

श्रीमंत राजश्री दादा साहेब

स्वामीजीचे सेवेसी

सेवक गोविंद यादव दोन्ही कर जोडून सिरसाष्टांग नमस्कार विज्ञाप्ति यैसी जे. स्वामींनी कृपाळु होऊन पत्र पाठविलें तें पावोन वाचून बहुत संतोषातें पावलों.

---

१ शिक्याचा कागद.

तें पत्र बजिनस नवाब दरगाहकुलीखानास वाचून दाखविलें व नवाब दरगाह-कुलीखानानी पुसलें कीं आम्हांस पत्र लिहिलें कीं नाहीं ? आम्ही उत्तर दिल्हे मागून पत्र येणार. दरगाहकुलीखानाची ममता साहेबाचेठायी फार आहे.

जगजीवनराऊ पोवार याजला पांच लक्षा रुपयाची जागीर दिल्ही. याचा दिवान आपाजीपंत नासिककर ग्रहस्त आहे व येक साहुकार यैसे आले आहेत. आमील धुंडितात. कोन्ही परगणे कबूल करीत नाहीं. बदमामली दुसरे तुम्हां-कडील संसये याकरितां रीघ (?) करीत नाहीं. आमाजी परगणे देतात परगणेची यादी लिहा पाठा.

सदाशिव रामचंद्र धारुरावर व हैदरयारखाहि समागमेच आहे. बापूजी करंड्याची फौज मधें पडली होती, याकरितां पुढें गेले नाहीं. धारूरीहून सदाशिव रामचंद्राने निजामआलीस आर्जी लिहून पाठविली. मदत पाठविता तर लस्करास पोंहाचणें होतें.

लस्करांतून लटकी वार्ता आली कीं मुरादखानास बसविले. निजाम आलीखान बेदरच्या किल्यांत गेला तेव्हां नवाबाचे समागमे मुरादखान वगैरे लाहान मोठे सरदार गेले. सर्व सरदारांस रजा देऊन येकला महमद मुराद-खानास नवाबानीं आपल्यापासीं ठेविलें. त्यावरून लोकांनी हें तुफान रचिलें. हे गोष्ट नवाबाचे कानीं गेलीं. दुसरे दिवशीं नवाब व मुरादखा येके हवद्यांत बसून किल्यांतून लस्करास दाखल जाले. तेंच फरमाविलें मुरादखानास कीं दाहा बारा हजार स्वार व बाण व तोफा जानोजी व खंदारचा राजा वगैरे यांजला समागमें घेऊन जाऊन बापूजी करांड्यास तंबी पोंहचाऊन सदाशिव रामचंद्रास घेऊन येणें. हुकूम निघतांच मुरादखानानें सांगितलेप्रमाणें सरंजाम घेऊन रातोरात चालून करांड्यावर छापा घातला. दोन हजार स्वारानसी करांड्या पलाला. वराडाकडे गेला. मुरादखान रेणापुरावर आहे. सदाशिव रामचंद्र मुरादखां भेटले; कलले पाहिजे. निजामआलीचा रूख पहिला जानोजी भोसल्याकडे जायाचा होता. जानोजी भोसल्यानें आपला वकील पाठऊन जवाब सवाल केला, कांहीं पैकाहि देऊं केला, आंतस्त येक आहे. जानोजीविशंई रामचंद्र जाधव जवाबसाल केला. कितीक वर्तमान येसू जुबानी सांगतां कलो येईल. जानाजी भोसल्याचा इतबार[१] न धरणें.

निजाम आलीखानापासीं वकील हैदरनायेकाचा दुसरा आला कीं माझी मदत करा, खरचायास मी देतों. हैदरनायेकाकडे जायाचा रूख आहे. नवाब

---

१ विश्वास.

कलबुर्गाकडे आहे. जनवार्ता आहे कीं आदोनी रायचुरास जातो, मोगल आपले काबूंत आहे. छावणीची वार्ता आहे कीं धारुराव्र करावी. सर्वांचा मनसुबा हाच आहे.

अबदालीच्या लस्करांत बहुत महर्गता, खर्चायास नाहीं. आपल्याआपल्यात कजिया जाला. अबदाली जिवंत आहे. फौज थोडीसी, आंगचा जोरा फार; हार येऊ सकना. तो आपल्या मुलकाकडे गेला.

रोहिल्यासी व जाटासी कजिया होता, नजिबखानानें जाटास सांगून पाठविले कीं जे होणार तें जालें; तुझा बाप युद्ध केल्यानें जिवंत होत असला तर युद्ध आम्हांसी कर. तुझा कांही मुल्क घेतला नाहीं; उगाच कां हैराण होतोस? येश अपेश भगवानाचे हातीं आहे, इतकी गो(ष्ट) बोलून नजिबखा जमना उतरून पलीकडे आहे. जाटासी चौघाही समजाऊन कागदीपत्रीं येक जाले.

राजे माधोसिंग आपल्या मुलकांत आहेत. जाटाकडेहि फौज पा। रोहिल्याकडे फौज पाठविली. हा दुतरफा आहे.

मल्हारजी होलकर * * आहे जैरामपंत वकील शहरांस हिमतखांपासी आला भेट घेऊन तो नवाबाचे लस्करास गेला. येसू जासूद जुबानी सांगतां कलों येईल. जेरामपंतासी बहुत घरोबा आहे कलावे.

¶*News-letter giving tidings to Raghunathrao about the progress of events at the court of the Nizam and news about the Rohilla, the Jats, and others.*

No. 59] [*20-5-1764 ?*

श्री

श्रीमत माहाराज राजश्री दादासाहेब
साहेबांचे सेवेसी

चेरणरज चिमाबाई सिंदे साष्टांग दंडवत. अर्ज विनंती विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ १९ रोज माहे जिलकाद जाणून स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आपण चिरंजीव माधवराव शिंदे याजला वाटें लावावया-बदल गंगातीरपावेतों गेलों. गंगास्नान करून माघारें साहेबाचे पायांपाशीं यावें ऐसा आपला मनोदये होताच, तों आपलीं पत्रें चिरंजिवास अलीं कीं, मातोश्रीस

समागमे घेऊन न जावे म्हनवून अज्ञा. त्याजकरून चिरंजिवास हिंदुस्थानाकडे वाटे लाऊन आपन परगणे अंबड येथील मुकामीहून स्वार होऊन, छ १७ रोज माहे जिलकाद वैशाख वद्य ९ शेनवारी श्रीगोंद्यास येऊन दाखल जालों; साहेबास श्रुत्ये व्हावें. पुढें आपले खर्चावेंचाची वगैरें राहावयाची बंदोबस्ती जैशी साहेब करून देतील त्याजप्रमाने वर्तनूक केली जाईल. आपल्यांस राहावयासी स्थल कोनते नेमून द्यावयाचें तें कृपा करून नेमून द्यावें; व राजश्री अवचितराव तेहि तेथें आहेत तरी साहेबीं आमची खर्चवेंचाची व राहावयाची बं(दोब)स्ती करून द्यावी. आणि राजश्री अवचितराव त्यासी चिरंजिवाकडे कृपा करून सत्वर वाटें लावावें. सदैव पत्र पाठऊन सांभाळीत असावें. पेडगावची सनद आपलें नांवाचीं कृपा करून तेवढी पाठऊन द्यावी. आपणांस साहेबाचे पायांशिवाय जोड काय आहे? आपण सर्वप्रकारें येकनिष्ठ साहेबांचे पायांपाशीं आहेत, साहेबीं कृपावृद्धि करावी. विशेष काय लिहिणें हें विज्ञापना.

¶*Chimabai, mother of Mahadaji Sindia, requests Raghoba to assign a Jagir for her residence and maintenance.*

No. 60] [*7-9-1755*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वा-
मीचे सेवेसी

विनंती सेवक विठल सिवदेव कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २९ जिलकाद मुाा लालेर नजीक जिगनी प्राा गालेर येथे स्वामीचे कृपेकरून सुखरूप असो विशेष. पूर्वी स्वामीस पत्रे लिहिली की, राणा भिमसिंग जाठ गोहदकर याणे हरामखोरी करून आमचे गालेरचे मोरचे उठऊन दिल्हे आणि किला घेतला. आम्हाजवल फौज नाही. दिलीस फौज अटकली. रांगडे सामान मेलऊन किला जेर केला. गडावर अन्न नव्हते. येका दो रोजात किला येणार, पेगाम आले तों ज़ाटाने लबाडी केली. त्याजवर त्याचे अमचे जुंज जाले. पहिलियाने त्यास मोडून शहरात घातले. दुसरे वेलेस आम्ही युद्धास गेलो तो रांगडे सामान पलोन गेले. त्याजवल अगीचे बल रेकले जेजाला फार, याजमुले आमची फौज निघाली. हे वर्तमान सेवेसी लिहिलेच होते. त्यासी आम्ही अंत्रीत येऊन राहिलो. सर्व जमीदार कुल फिरले.

ठाणियास आमच्या लागोन दोन ठाणी घेतली. अवघा मुल्खकच फिरला. आमची कुमक कोणी केली नाही. आमची फौज श्रीमंत राजश्री दादासाहेबाजवल, आम्हाजवल पाच सातसे श्वार. त्यास सिरा माणूस कुल जाया जाले. घोडी से पनास पडली. माणूसहि खासे खासे ठार जाले. कोणी धर न धरी. जाठाने तो फार शोकी केली. जिंगणीचे ठाणियास मोरचे लाविले त्यास नवी सिबंदी ठेऊन मोरचे मारून काढले. त्याजवर जाठाने सुरजमल त्याजकडे आपला फतेसिंग पाठऊन तेथून कुमक पाचसे स्वार, दोन हजार प्यादा पाठविला. त्यास मागती ठाणी घ्यावयास उदेग जाटाने केला. आम्ही फौज पाठविली. गोविंदराव सिवदेव याजबाा हजार स्वार दोन तीन हजार प्यादा नवी सिबंदी ठेऊन राा केले. परंतु बारा हजार बंदुख, तीन हजार स्वार, परंतु जाठ भारी. त्यास आम्ही अंत्रीहून कूच करून आलो. गोविंदरायाजवलचे सामान व आपले सामान येकत्र करून बढोखरावर (?) गेलो. त्याची फौज बढोखेरावर होती. त्यासी तेच दिवसीं आपल्यास काहिली जाली होती. फौजेचे युद्ध होऊ लागले. परंतु जाट भारी तेव्हां कुलस्वामीचे व स्वामीच्या चरणाचे स्मरण करून घोड्यावर बसलो आण तैसीच हला केली. त्याची फौज मोडून ताराज केली. रेकले दोन घेतले. घोडी दाहा वीस उंटे दाहा नगारा निशाण घेतले. सरदार फतेसिंग यास जिवे मारिले आण डोचके खिजमतगारापासून उरूबरू कापविले. दोनतीनिसे माणूस ठार केले. से दोनसे जखमी. फौज कु (अपूर्ण)

¶Vithal Shivdev reports to the Peshwa the details of his victory, despite heavy odds, over Bhimsing Jat. The concluding portion of this letter is printed as No. 45 of Selection 2.

No. 61] *[17-6-1764*

पेाा छ मोहरम.

श्री

श्रीमंत राजश्री राऊ साहेबाचे सेवेसी

विनंती सेवेसी नारो श्रीनिवास कृतान्यक सिर साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा ज्येष्ठ सुाा ४ मुाा भांडेर जाणोन स्वकुशललेखनास आज्ञा झाली पाहिजे विशष. येथील वर्तमान येसज. काल भिंडेहून माणूस आले ते सांगत होते की जाटाची फौज अटेरीजवल अकोडीस लागली आहे म्हणून सांगतो. दुसरे कोंचेहून बेपारी आले ते सांगत होते की कोंचेची पेट गडबडली आहे येस

सांगत होता. सेवेसी कळावे. आमचे खासगी वर्तमान येथील मामलेदार निघून स्वामीपासी गेले मणून गावात गडबड जे, कोणी येथ नाही. अणि काही सिबंदीहि नाही. दुसरे अणियेक प्रकारे फिकीर करतात. सेवेसी कळावे. तरकारी डाली पाा आहे. विशेष लिहिणेस की नवे. सेवेसी श्रुत होय विज्ञापना.

¶*Naro Shrinivas reports that the Jats have advanced as far as Ater and are threatening Konch.*

No. 62] *[2nd June 1764*

पौ छ ९ दोन प्रहर रात्र

मुाा धामणगाव पाा मेहुणबारे

श्री

राजाश्रिया विराजित राजमान्य राजश्री
त्र्यंबक नारायण व अंबादास बलाल
स्वामीचे सेवेशी

सेवक नारो कृष्ण साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहावें विशेष. राजश्री माहादजी सिंदे याची सरदारी दूर करून मानाजी सिंदे याजकडे सांगितली, त्यामुळें श्रीमंताची आज्ञा न घेतां पळोन गेले, ते मजल दर मजल मालवियांत जातील, त्याचें पारपत्य जालें पाहिजे म्हणून रुबरू येविसी कितेक प्रकारें सांगितलें. त्यावरून हें पत्र तुम्हांस लिहिलें असे व आपले निसबत तैनाती पथकें आहेत त्या सरदाराचे नांवें सरकारचीं पत्रें अलादा आहेत ती पो असेत. तुम्हीं व सर्वांनी येविसीचा अर्थ ध्यानांत आणून, रात्रीचा दिवस करून, माहादजी सिंदे याचें पारपत्य करावें. हें पत्र पावतांच मार्गाची बंदोबस्ती मेहेनत करून करावी. ही वेळ स्वामिकार्याची मेहनत करून करावयाची आहे. येक घटकेचा विलंब, हरयेक सावधता करावयाचा नव्हे. तापीस पाणी असेल. ज्या ठिकाणी उतरावयाचा मार्ग असेल तेथें तरदूद करावी. तुम्ही सत्वर बऱ्हाणपुरास जाऊन जागा जागा नांवा असतील त्या झाडून येके जागां गोळा करून बंदोबस्तींत ठेवणें आणि नाकेबंदी करून सावध राहणें. हुजुरून राजश्री कुकाजी सिवराम रवाना जाले आहेत, ते तिकडे येतील. तुम्हांस येविसीं व हरयेक बंदोबस्ताविसीं लिहितील त्याप्रमाणें त्या घटकेस फौजसुधां तुम्ही जातींनसी जाऊन पोहचणें. ज्याप्रमाणें कामकाज सांगतील त्याप्रमाणें करावें. याजला यखादा दिवस अधिक उणा मार्गी लागलियास तुम्हांजवळ हे पत्रें अगोधर पावतील. तुम्ही

खबरदारी चांगली करणें. तुम्हीं शाहाणें खबरदार आहां. खानदेशांत होलकराकडील जागाजागा कमाविसदार आहेत, त्यांजला पत्रें गेलीं आहेत. तुम्ही सर्वांस ताकीद करून साहेब नक्ष करणें. हे कार्य तुम्ही कराल हा भरंवसा जाणोन आम्ही आलों नाहीं. सरकारचा शब्द आम्हांकडे न ये तें करावें. हरयेक ठिकाणी अडचणीची जागा पाहून त्या ठिकाणी गाठून पारपत्य करावें. मुख्य गोष्ट तापी उतरोन यावत जागा जागा नाकेबंदीचें काम पोख्त करून खबरदारी करणें. तुम्ही तापी उतरून उत्तर तीरीं राहावें. चांगदेव वगैरे ठिकाणी नावा असतील त्या दरोबस्त येके जागा गोला करून, तुम्ही फौज सुधां, ज्या ठिकाणी उतरावयासी येतील, तेथें मुकाबलियासी परतीरी उभें राहून ज्या ज्या ठिकाणी उतरावयाचा मनसुबा करितील त्या ठिकाणी तुम्ही जावें. कदाचित वराडचा रोख त्याणी धरला तर तिकडे आडवें व्हावें. झाडून माहालो-माहालीं येविसींची ताकीद करून तुम्ही खबर(दार) राहाणें. हे गोष्टीचे श्रीमंतास जरूर आहे. याजकरितां आम्हांस बहुत प्रकारें सांगितलें आहे कीं, जसा प्रसंग पाहाल तसी तरतूद करून बंदोबस्त करणें, म्हणून आज्ञा केली आहे. मशारनिलेबराबर स्वार तीनसें आहेत. सरंजाम कमीच आहे. तुम्ही हिमत धरून सावधता केलियास हें येश तुमचें पदरीं पडेसें दिसतें. थालनेर वगैरे होलकराकडील माहालकरी यासी सरकारचीं पत्रें व आम्हीं पत्रें येथून परभारी पाठविलीं आहे. रनाल्याकडील तापी किनारियाचा बंदोबस्त माधवराव कदम यांस सोपिला आहे त्याप्रमाणे करितील. माहादजी सिंदे याचा येक रोख कासारबारी उतरोन थालनेराकडे जावयाचा आहे. येक बुराणपुरासनिध होऊन जावें यैसे आहे. तुमचे लत्यातून[1] चोपड्यापासून बराणपुरापावेतों, अटकाव कराल हा भरंवसा आहे. तें न जालें तरी नामोसी पुर्तेपणें आपले माथां येईल,. यैसें न करणें. थालनेराकडून जाऊं लागल्यास तुम्ही परतीरानें त्यांचा होल-कराकडील कमाविसदारांचा व बांड्याचा उपराला करणें. ऐसेंहि करितां येकादे जागा तापी उतरून पार जालें तर अशेरचे किल्यावरील लोक वगैरे व बराण-पूरचे लोक व भिलाण आणून, धूलकोट वगैरे घाट व नाक्याचा बंदोबस्त करून, तेथें त्यांस आडवें होऊन, पारपत्य करणें. बहुत सावधता करून त्यांस तापीपार होऊं न दिलियास तुमचें ऊर्जित होईल. अंबादासपंत व तुम्हीं निराले असाल तर पत्र पावतांच येकवट होणें. एके घटकेची सुस्ती न करणें. बातनीस दाहा जोड्या व राऊत पाठऊन बातनी वरचेवर आणवीत जाणें. त्यासुमारें बंदोबस्त येथास्थित करणें. माहालोमाहाल रोल्यावर राऊत गेले असतील

---

[1] बाजू.

ते रातोरात जमा करून जथून राहणें. तिकडील वर्तमान दिनचर्येचें वरचेवरी लिहीत जाणें. इकडून पत्रें वरचेवर तुम्हांकडे पाठवीत जाऊं. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती.

¶*Defying orders not to quit the capital Mahadji Sindia left Poona for his territories in Malwa. Naro Krishna Subhedar of Barhanpur instructs his officers as to how Mahadji Sindia's march into the North was to be circumvented at various strategic points on the different routes he was likely to take.*

No. 63] [*1-7-1764*

पौ छ ९ मोहरम

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक महादाजी विश्वनाथ सा। नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम ता। छ १ मोहरम जाणोन स्वामीचे कृपेकरून यथास्थित असे विशेष. चिरंजीव राजश्री चिमणाजीपंत स्वारीस बुंधेल्याच्या पारपत्याकरिता आज च्यार दिवस नदीपार मुकाम करून राहिले आहेत. बुंधेल्यानी शोकी चहुकडून फारच केली आहे. धण्याच्या प्रतापेकरून बंदोबस्त होऊन येईल. यानंतरी इकडील सविस्तर वृत राजश्री महिपतराव सेवेसी निवेदन करितां सेवेसी श्रृत होईल. आपण स्वामीची सेवेसी श्रृत येकनिष्ठपणे जाणतो. दुसरा अर्थ जाणत नाही. सेवेसी श्रृत होये विज्ञाप्ति.

¶*Vishvasrao Lakshman is informed that Chimanajipant is leading an expedition against the rebellious Bundelas.*

No. 64] [*4-7-1764* *

पौा छ १७ मोहरम
च्यार घटका दिवस
१ राहता.

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री त्रिंबक
नारायेण व अंबादास बल्लाळ स्वामीचे सेवेसी

सेवक नारो कृष्ण साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये लिा। विशेष. राजश्री माहादजी शिंदे श्रीमंताची आज्ञा न घेतां पळोन

हिंदुस्थानांत चालले; त्याचें पारपत्य करावें म्हणोन आज्ञा जाली आहे. येविशीचा मजकूर तुम्हास सोमवारचे दोन प्रहर रात्रीस मुजरद जासूदजोडी दुसरें दिवशीं तुम्हाजवळ पोहोंचावें असा करार करून रवाना केलें तीं पत्रें पावोन त्यांप्रमाणें बंदोबस्त केलाच असेल. शिंद्याचा मुकाम सो(म)वारीं निफाडेजवळ होता. काल मंगळवारीं बारीखाली मुक्काम जाला. येथून श्रीमंतांनीं त्याजकडे भानगडी करितां पाा होतें, त्याची त्याची भेट जाली; न आइकत. निघोन मजल दरमजल चालले. गृहस्थ फिरोन श्रीमंताकडे आजच दोन प्रहरीं आले, त्यावरून हें पत्र जलद तुम्हाकडे पाठविले आहे. तुम्ही आपली फौज दरोबस्त येकें जागां करून तापी परतीरीं उत्तरेकडे गट करून झाडून नावा परतीरीं आडचणी जागा नेऊन नाकेबंदी चांगली करून ते ज्या ठिकाणीं तापी उतरावयासी येतील ते बातमी राखोन मुकाबलियास उभे राहून काम साधावें. ही वेळ बहुत कामाची आहे. आपले सरदारांस हुजुरचीं पत्रें वगैरे निसबत * * * यांस पाा आहेत. मेहनत करावयाचा समय आहे, न चुकावें. बातमी राखून नदीस पाणी आलें आहे याजमुळें तुमचा डाव फावेल ऐसें आहे; परंतु बातमी राखून मुकाबला तापी किनारियावर पाडला पाहिजे. निदानीं उतरू न पावत इतकें तर केलेंच पाहिजे. चोपडे बेटावदापासून माजरोदपर्यंत घाट नावा असतील तितक्या बंद करून उत्तरतीरीं तुम्ही फौजसुद्धां ते जिकडे उतरावयास जातील तेथें उभे राहून मुकाबला कराल म्हणजे उतरूं पावणार नाहींत. सारांश विशेष लिहावेंसे नाहीं. हें काम गांठ पडून लांबत चाललें तर दाहापांच हजार रुपये शिबंदी खर्चीहि पडल्यास करावा ऐशी श्रीमंतांची परवानगी आहे. जर हें गोष्टी कळेल तैसी तर्तूद करून साधितां तर मोठा नक्ष आहे. माहादजी शिंदे याजबराबर सरंजाम थोडके पांचशें राऊत चांगले आहेत. दशाअवधान करून कार्य साधावयाचे प्रसंग आहे. माधवराव बांडे यांसहि थालनेराकडील मार्गास अवरोध करावयाविषयीं सरकारचीं व आमचीं पत्रें गेलीं आहेत. तिकडीलहि बातमी तुम्ही राखून होईल बंदोबस्त तो करावा. सारांश अकस्मात हें कार्य प्राप्त जालें आहे. याची सर्वसहा (?) जालियास फार कसबाची परीक्षा आणि पराक्रम आहे. नद्या भरल्या आहेत. याजमुळें उतरणार दोन सहस्र आणि बंद करणार दोनशें बराबर आहेत. तुम्ही पांचसातशें हजारपर्यंत समयास मिळवावें. साहेबकाम करून दाखवावें ऐसें आहे. बहुत लिहावें ऐसा पदार्थ नाहीं. पत्रदर्शनीं पेशजीच मुस्तेद होऊन त्याचे सुमारें बातमी राखून गेलेच असाल. तुमचा फौजेचा त्यास भ्रम फार आहे त्याजप्रमाणें दबावानेंच काम होईल. पोंहचले

मात्र पाहिजे. येदलाबादेस देखील नांवा वगैरे बंदोबस्त केला पाहिजे. तुम्हास सुचेल तें करणें. रवाना छ ४ मोहरम बुधवार दीड प्रहर दिवस (दिवस) बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे हें विनंती.

¶*Naro Ballal reiterates his orders to intercept Mahadaji Sindia's march.*

No. 65] [*19-7-1764*

छ २४ मोहरम

श्रीशंकर

यादीपत्र

१ मानाजी सिंदे यास पत्र की दताजी सिंदे याचे कालकीर्दीचे मलकापुरचे घासदाणियाबा नारो शंकर याचे विद्येमानची चिटी रूा ६५८१ पास्टश येक्यांयशीची आहे. येविशई पेशजी महादजी सिंदे याजकडे सरदारीचा कारभार होता. त्याजला पत्र दिल्हे होते. हली याजकडे सरदारी जाली आहे. सबब माहादजी सिंदे याचे पत्राप्रमाणे याजला पत्र द्यावयाची आज्ञा.

महादजी सिंदे याचे नांवे सरकारचे पत्र सोबत आहे त्याप्रमाणें मनाचिटी देणे म्हणून पत्र.

१ माहादाजी गोविंद यास पत्र की मानाजी सिंदे यास पत्र आहे त्या पत्राबमोजिब याची चिटी यास देणे म्हणून पत्र.

येणेप्रमाणे पत्र.

२

सदरहू प्रा येकूण दोन पत्रे.

छ १९ मोहरम आषाढ

खमस सितैन

¶*Orders issued to Manaji Sindia for the payment of ghasdana dues.*

No. 66] [*4-8-1764*

पो छ ९ सफर

श्रावण मास सन खमस

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब

स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक केदारजी सिंदे कृतानेक दंडवत विज्ञापन।. ५५।७ सेवकाचें वृत तागायेत छ १ माहे मोंहरम माहाराजांचे असीर्वादें येथास्थित असे विशेष.

4183

स्वामीचें आज्ञापत्र छ २ मोहरमचें आलें तें प्रविष्ट जाहालें; तेथें आज्ञा कीं, हुजूर दर्शनास येणे. हुजूर आलियावरी जो बंदोबस्त करणे तो केला जाईल म्हणून आज्ञा लिहिली. यैशास स्वामीचे सेवेंत तीर्थरूप राजश्री नानाबावा आलेच आहेत, त्यांसच जे माहाराजांनी आज्ञा करणे ते केली पाहिजे. आम्हींहि त्यांचे आज्ञांकित असो. स्वामीच्या आज्ञेप्रमाणेच जे चाकरी करणे ते सर्वेहि सेवा चाकरी करून. तीर्थरूपांत व सेवकांत कांहीं द्वैतार्थ न जाणावा. विदित जाहलें पाहिजे. सेवेसी ख्यात होये हे विज्ञाप्ति.

¶Kedarji Sindia informs Raghunathrao that whatever commands are to be communicated, should be delivered to Mahadji with whom the writer has no difference ; since, he adds, Mahadji is with the addressee, there is no need of the writer's presence there.

No. 67] *[16-8-1764*

पौ छ २४ मोहरम
सन खमस.

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक आज्ञाधारक नारो बलाल भुसकुटे कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ता छ १७ मोहरमपावेतो तालुके मजकूर व सेवकाचे वर्तमान येथास्थित असे. यानंतर नारायेणजी मोरे याजबराबर आज्ञापत्र रवानगी छ ४ रोजी जाले ते छ ९ मोहरमी दोहो प्रहर दिवस चढता पावले. तेथे आज्ञा की माहादजी सिंदे येथून गेले आहेत. यासी बढव्याचे घाटे आले तरी नाव बंद करून उतरू न देणे, व ठाणेयाचा बंदोबस्त करणे. त्यावरून घाटाचा बंदोबस्त केला तो छ १३ मोहरमी माहादजी सिंदे महेस्वरचे घाटे उतरोन पार जाले. कूच दरकूच महेश्वराहून उजनीस जातात. आपल्या घाटे आले नाही. इकडील वर्तमान तरी बढवेकर राजे याचा तूर्त लावणीचा हंगाम जाणोन सलुक केला आहे. सलुक न करावा तरी रयेतीस धीर पुरोन लावणी होत नाही. हे लावणीचे दिवस निघोन गेलियासीं पुढे माहाल कमती बहुत येतो. पुढे निर्वाह करणार स्वामी धनी समर्थ आहेत. हांडे सरकारात खेमा गोंड याचे लेकाने

लबाडी करून कसबे हांडे येथील गुरे नेली आहेत. त्यांचे पारपत्य केले पाहिजे. तिकडे आठा दिवसी जातो. पो। खांडवे येथे रामपुरे व मकराइकर व धारडी व सिलाणीकर मवास बहुत उपद्रव देतात यार्करिता मवासाचे तोंडावरी तीन ठाणी मुस्तकीम ठेऊन मुलुकाचा बंदोबस्त करून लावणी केली आहे. ठाणेयामुळे सिबंदी जाजती लागली आहे. सरकारच नक्ष राखिला. पुढे निभाव करणार स्वामी समर्थ आहेत. यंदा या मुलकातून सटवाजी गाईकवाड नि॥ मल्हारराऊ होलकर याचा पथक्या गेला. त्याणे प्रगणयात बहुत धामधूम केली. मागाहून सिंदे गेले त्याची पथके आजपावेतो जातच आहेत. धूम बहुत करितात. मनमाने-सारिख्या भेटी वगैराये घेतात. त्यामुले व मुलकात आरदानीमुले बाकी रूपये वीस पंचवीस हजार वसूल-करून साहुकाराचा थैवज रसदेस घेतला आहे, त्याचा भरणा करणे आहे तो करून, सारे माहालचा हिशेब घेऊन भेटीस येतो. भेटीनंतर बढव्याचे राजेयाचे सलुकाचे व मुलकाचे वर्तमान सविस्तर निवेदन करील. पुढे माझा निर्वाह करणार स्वामी समर्थ आहेत. नारायेणजी मोरे यासी सिंदे याचे बंदोबस्ताकरिता आजपावेतो ठेऊन घेतले होते. आज रवाना केले असेत. इकडील सविस्तर वर्तमान निवेदन करितील. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Naro Ballal reports that Mahadaji Sindia eluded his attention by crossing the Tapte at the Maheshwar ford. He further refers to his difficulties in realizing revenue in Khandesh.*

No. 68] [*22-8-1764?*

श्रीपांडुरंग

श्रीमंत राजश्री दादासाहेबाचे शेवेसी

आज्ञाधारक सखूबाई सिंदे दंडवत विज्ञापना तागाईत छ २३ सफरपर्यंत साहेबाचे कृपेकरून सेवकाचें वर्तमान यथास्तित असे विशेष. साहेबाची आज्ञ घेऊन स्वार जाहलो तो श्रीगोंद्यास दाखल जाहलों. धण्याच्या आज्ञेप्रमाणे वर्तणूक करितों. फौजेचे वगैरे कामकाज चाली लाविले आहेत. माहाराजांच्य. कृपेकरून सिध्धीस जाईल. आम्हास सर्व गोष्टीनें लोभ करून उर्जित करणे त्याचा परिणाम खावंद लावितील हा पूर्ण भरवसा आहे. त्या अभयेकरून स्वस्थचिते वर्तणूक करितों. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sakhubai Sindia to Raghunathrao reporting her safe arrival at Shrigonda.*

No. 69] *[14-9-1764*

पौ छ १८ रावल सनवार

मुा तळेगांव

श्री.

राजश्रियाविराजित राजमान्य

राजश्री अंबादासपंत स्वामीचे शेवसी.

सेवक नारोकृष्ण सां नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ जाणोन स्वकीये लेखन करणे विशेष. तुम्ही पा ते पावले. किले देहरचे+ राजकारणाचा मजकूर लिा तो कळला. ऐशास किला हस्तगत युक्तीने आणि लौकर होत असिला तर राजकारण करून, यामुळे हजार दोन हजार पावेतो खर्चहि पडला तर लौकर स्थळ हस्तगत करणे. श्रीमंताची स्वारी जलदीने निघणार. राऊत हजूर बोलवावे लागतील यास्तव त्वरा करून कार्यभाग स्वाधीन करून घेणे. तुमचे पत्राचे सविस्तर उत्तर व जफ्तीच्या संदा मागाहून रवाना करूं. सूचनार्थ हे पत्र लिहून मुजरद पा आहे. याउपर विलंब न करणे. उत्तर सत्वर पाठवावे. रा छ १७ रावल सुा खमस सितैन मया व अलफ. दौलताबाजकडून लक्ष्मण कोन्हेर याजकडील कांहीं लोक किल्याखालते आले होते तो अर्थ तुम्ही काहीच लिा नाहीं, आणि तुम्ही किल्यापासून दूर आहां ऐसी त्याजकडील कारकून बातमी दरबारी सांगत असतो. त्याजकडील लोकांनीं किला हस्तगत करावयाचे राजकारण केले होते ते बिघडलें. पुढेहि ते उद्योगात आहेतच असे बोलतात. यास्तव तुम्हास पत्र लिा असे तर कळेल तैसे कसब करून किल्याचे सूत्र करून हस्तगत होयसा असिला तर करणे. दुसरेयाकडील काम करतील तुम्ही पाहत राहाल यास्तव लिा असें. फार दिवस बसतां बननार नाहीं. मोर्चेहि समीप बसवितां मसलत पडते. मोगलाचे निसबतचा किला यास्तव ठीक पडणार नाही. गडबडीत झटपट काम जालियासच मात्र सोईस पडेल यास्तव काय मजकूर तो लिहून पाठवणे. देहर चाळीसगावचे अमलाचा बंदोबस्त कराल तर चिंता नाहीं. तूर्त फिसादच पडली आहे. माहाल कांही राजश्री आबाचे सरंजामात नाहींत. मागाहून सविस्तर पत्रे पाठवितो. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Naro Krishna asks Ambadas Ballal to forestall the attempts of Lakshman Konher for the capture of the fort of Deher and to effect its capture on his behalf by whatever means possible.*

\+ खानदेशांत.

No. 70] [16-9-1764

पौ छ ६ रजब

असल बमोजीब नकल.

श्री

राजश्री मानाजी सिंदे गोसावी
यांसी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणे विशेष. बाा देणे रदकर्ज गुाा त्रिंबक विठल मालपूरकर साहुकार यासी रुपये ४६७१६७ च्यार लक्ष सतसष्ट हजार येकसे सतसष्ट रुपये देविले असेत. यासीं हप्तेबंदी साले बाा रूपये

११६७९१।।। सन आर्बा सितैन साल गुाा

११६७९१।।। सन खमस सितैन साल मजकूर

११६७९१।।। सन सीत सितैन

११६७९१।।। सन सबा सितैन

४६७१६७

येणेप्रमाणे दरसाल येक लक्ष सोळा हजार सातसे पावणे ब्यानव प्राा चौसाला मिळोन च्यार लक्ष सतसष्ट हजार येकसे सतसष्ट पेशजी राजश्री केदारजी व माहादजी सिंदे याजकडून सरदारी दूर करून तुम्हास सांगितली, सबब तुम्हाकडून देविले असेत; तर सदरहू हप्तेबंदीप्रमाणे दरसाल स्वारीत सरकारचा यैवज जमा होईल त्या ऐवजी पावते करून पावलियाचे कबज घेणे. जाणीजे छ १९ रबिलोवल सुाा खमस सितैन मया व अलफ. बहुत काये लिहिणे हे आसीर्वाद.

बार.

¶*The Peshwa orders Manaji Sindia to pay off the debts of Malpurkar by fixed instalments as he has been recognised lawful claimant to Sindia's estates.*

No. 71] [Recd. 10-7-1757

पौ छ २२ रावल

श्री

विनंती उपरी, बुधवारीं तिसरे प्रहरीं पाऊस मात्र उघडला. रात्रीस पाऊस उघडतो तरी प्रातःकाली कूच करून रा तात्या आम्ही आठ कोस जातों. अंतर नाही. दर कूच जातो. रा सुभेदाराची पत्रें ३ सोमवारचे मंगलवारचे रविवारचे दो दो दिवसाची आली. जगहाजखान गंगापार फरकाबादेच्या सुमारेच आहे. इकडे उतरत नाहीं. गडमु(क्ते)श्वरी येऊ पोचत नाही. आमची आवई गेली कीं, गडमुक्तेश्वरापर्यंत फौजानी घाट बांधले. आता जगहाजखानाची बंदोबस्ती तरी इकडे नाही. परंतु नजीबखानाच्या कबिल्या खजिनियाची खबर स्वामिनी लिहिली. तरी आम्ही तरी जातच आहो. परंतु मध्ये पाऊसाची झड जे दिवशी लागेल ते दिवशी विलाज नाहीं. व ज्यास खजिना बायका लावणे ते काही बेवकूफ नाहीत. गनीमच तेहि नाहीत. दो दिवसात चाळीस कोस निघोन गंगापार आपल्या ठिका(णा)स जातील. मध्ये कैसे राहतात ? असो. आम्ही आज्ञेप्रमाणे जातो. आपण राजे नागरमलाचे मारफातीने वजिरास वरचेवरी बोलाऊ पाठवावे. परंतु त्रिंबकपंत सुभेदार आहे, त्याची काही तरी मालुमात लिहीत जावी. केवळ निर्माल्य नसावे. त्याचे नावच कागदीपत्री नसले तरी काय करावे ? याचा विचार काय ? तरी आम्ही तरी, इकडे स्वामी पत्रे पाठवितील, त्यात सुभेदारास पत्र व वजिराचे पत्री त्याची मालुमात ल्याहावी. आपणहि लौकर यावे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Report addressed probably to Raghunathrao about Maratha activities and the enemy's movements in the Doab across the Jumna.*

No. 72] [28-9-1764

होळकरास पत्र.

श्रीहेरंब

जाटाची व नजीबखानाची आदावत पडोन उभयेतात फारच कलह वाढला आहे. दोघेहि लढाईची तरतूद करितात. तुम्हास सामील करून घ्यावयाची साधने दोघेहि करीत असतील. वकील आले असतीलच. त्यास आपणास जो मनसुबा युक्त आणि सरकारकामाचा दिसेल तोच करितील. जाटाची नेकी

सरकारात कैसी आहे हेहि तुम्ही जाणतच आहा. नजीबखा कोणेप्रकारे सरकारात रुजू आहे तेहि जाणता. त्यास सर्वथैव जाटाचे साहित्य करणे. यात त्याचे निष्ठेचे स्मरण व मनसुबास उपयोग आणि नफाहि आहे. यास्तव जाटाचे ठिकाणी ममता धरून याचे साहित्य करावे. इकडील मर्जी व तुम्हासहि याच आन्वयाचे आगत्य आहे व उपयोगी प्रकार हाच आहे. कामाची आणि चांगली तऱ्हा करावी. छ २[1] रबिलोवल सुा खमस आस्विन.

¶*Holkar is advised to support the Jat should his assistance be solicited by either of the two, Najibkhan or Jawahirmal between whom deadly hostilities have sprung up.*

No. 73] [*7-10-1764*

श्रीवेंकटेश

श्रीमंत माहाराज राजश्री दादा-
साहेब स्वामी राजाचे सेवेसी

सेवक कृष्णराव भास्कर हरकारे पादशाही रिकाबसा आदत व सुबे आवरंगाबाद सा। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ ११ माहे रबिलाखर जानऊण स्वामी राजाही निजानंदवैभव लेखकास आज्ञा करीत गेले पाहिजे विशेश. पूर्वी दोन तीन विनंतीपत्रे येथील सविस्तर वर्तमानाची सेवेसी पाठविली. सांप्रतचे वर्तमान छ मा।र परियेंत ऐसेजे, पृथवीपति प्रधानासहित छ २९ रबिलोवल परियेंत कसबे बालासरांत मुकामात आहेत. सवाल जेबाब मामलत सुलहचा ज्याफर अलीखान सुबदार बंगाला व फिरंगियाकडून आहे. वजीर निगोदास्त[2]सिपाह करितात, व सुरजमल जाटाचा पुत्र जवाहरसिंग तीस पसतीस हजार स्वार प्याद्याचे जेमियेतेनें जोधगडाहून कूच करून बलंबगडाआलीकडे तीन कोस येऊण मुकाम केला. तेथून अमरागीर चेला गोसावी व रामकृष्ण महंत वगैरे सरदारास पुढे मुरशदाबादेपासी पाठविले. तेथे त्यास कायम करून आपन मागती बलंमगडास जाऊण बलंमगडची मजबुती उत्तम प्रकारे केली. आपले समागमी तोफखान्याचे सरदार विस्वासुख गडमजकूरचे निगेबानीसाठी[3] ठेविले. तदनंतर तेथून कूच करून फरिदाबादेस आले, तळयावर स्नान करून दानधर्म ब्राम्हणास करून फरिदाबादेस उजवे टाकून येमुनातिरावर येऊण उतरला मकान युधे करायाचा पाहून तोफखाना जिनसी[5] तेथे उतरविला. हे वर्तमान नवाब नजीबखान बक्षिजीस पावतांच याही नासीरखान दराती रोहिल्यास बैजमियत[4] स्वार प्यादे

---

१ रबिलाखर असावें. २ फौजभरती. ३ बंदोबस्त. ४ सैन्यासह.

५ अवजड तोफखाना.

खिजराबादेस पाठविले व आनीक सरदार रोहिले त्यास लिहिले की, खानमजकुराची कुमक करणे व नवाब मजकूर हा दिलीकडे नजदीक मडई नमक ? जाऊण उतरले. नवाब नजीबखानाबाो फौज मातबर तीस चालीस हजार स्वार व या वेगला तोफखाना जमा जाला आहे. जाटासी व नवाबाचे फौजेसी फासला[१] एक मजलेचा राहिला आहे. नवाब मजकूरहि आपले ठाई बलवंत आहे. युधेप्रसं(ग) एका दो दिवसा होनार व मल्हारराव होळकर सुबेदाराचे वर्तमान आले की, जोगनेर सांभराजवळ आहेत. राजे माधोसिंगासी जाबसाल सुलहचा दरमियान आहे व शाहा आबदाली याचे वर्तमान आले कीं, शाहा मजकूर कंधारेत आहे. मेघराज वकील नवाब नजीबदौला जेमूचे पाहडांत पोहोचला. आबदालियापासीं जाबस्वालास गेला आहे. सांप्रत सिखाचे सरदार चेलागुरू संस्थानास गेले आहेत. दिपवाली जालियावर मागती लाहोर प्रांतास येणार. वरकड वर्तमान यथास्थित आसे. माहाराजाही विनंतीपत्राचे उत्तर पाठऊन तोशवीत गेले पाहिजे. सेवक पदरचा आहे. रा॥ बाबूराव सेवकाचे नायेब आवरंगाबादेस हरकारगिरीचे कामावर आहेत त्यावर कृपा असो द्यावी. त्याचे विनंतीप्रमाने साहित्य पुरविले पाहिजे. विशेश काय लिहीन. कृपा निरंतर असो द्यावी हे विनंती.

¶Krishnarao Bhaskar sends news from Delhi about the preparations being made by Najibkhan and Jawahirmal the Jat for a severe struggle.

No. 74] *[18-11-1764 ?*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री खंडोपंत व राजश्री चिमणाजीपंत स्वामी गोसांवी यांसी

सेवक नारो शंकर सा॥ नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता॥ छ २३ जमादिलोवल मुकाम पेडगाव भीमा दक्षणतीर जाणून स्वकीयें लिहिणे विशेष. इकडील वर्तमान सविस्तर चिरंजीव राऊजीचे पत्रीं लिहिलें असें. त्याप्रमाणें तुम्ही जलदीनें झासींस जाऊन दोन्ही स्थले हस्तगत करून माळव्याचा बंदबस्त उतम प्रकारे करणे. सिरोंज अहीरवाडा येथील मामलतीची सनद सरकारची पाठविली असे तेथील बंदबस्त करणे. पा॥ इंदोर पा॥ कदवा ? पा॥ अथई खेडा तिन्ही तालुके राजश्री विठलराऊ तात्या याणी आपल्या जिमेस केले आहेत. तेथे शाहणा माणूस ठेऊन बंदबस्त करणें. गणेश संभाजीने बखेडा केला आहे तरी तुम्ही इजेतखान सुज्याखान व अहीर ऐसा जमाव भारी करून वोडसेवाले दतियेवाले वगैरे मदनसिंग यास सामील करून घेऊन जबरदस्ती पोहचाऊन

---

१ फासला = अंतर.

स्थले हस्तगत करून घेणे. गंगापुरी गोसावी यास तजविजेने हाताखाली घेऊन जमायेत गोऊन आपला मतलब करून घेणे. उपरांतिक त्याचे वर्तणुकेप्रमाणें तुम्ही करावयास न चुकणें. राजश्री गोपाल केशव व चिरंजीव राजश्री माधवराऊ याचे समाधान करणें. माधवरायास सेवढे याचे काम सांगणे. आपल्याकडील वर्तमान वरचेवरी लिहोन पाठविणे. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Naro Shankar instructs Khandopant and Chimanajipant to attack Jhansi.*

No. 75] [*8-11-1767*

पौ छ १ रजब

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
विस्वासराऊजी स्वामींचे सेवेसी

पों रामचंद्र सामराज कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ १९ जमादिलाखर मुा सिवपुरी जाणून स्वकीयें कुषल लेखनाज्ञा करीत गेले पाहिजे विशेष. आपणाकडील सांप्रत पत्र येऊन परामर्ष होत नाही तरी यैसे न करावे. निरंतर पत्र पाठऊन सांभाळ केला पाहिजे. यानंतर वेदशास्त्रसंपन्न राजश्री प्राणनाथ पुराणिक कासीकर आम्हाजवळ दोन तीन वरसे होते. सांप्रत श्रीकासीस जातात. याजसमागमें कालपीपर्यंत दोस माणसे देऊन पोहचते केले पाहिजे. कालपी व रायेपूर डभुवा येथील ठाणी जाटाची उठोन गेली. राजश्री बालाजी गोविंद याची व आपली ठाणी पूर्ववत्प्रा काईम जाली म्हणौन गालेरीहून लिहिले आले. हा नक्षच जाला. जाट सांप्रत: पुष्कराकडे चालिला आहे. राजे बिजेसिंग रा(ये)ठोर याची भेटी घेऊन मातबर मनसुबियाच्या विचारात आहेत. पुराणिकबावास छेत्रपूर कालपीकडे सुभेता आसेल उतम मार्गे रा करावे. लोभ आसो दीजे हे विनंती.

पो धोंडो पद्माजी कृतानेक सां दंडवत विनंती. बहुत दिवस पत्री सांभाल न जाला यैसे नसावे. आम्ही पदरीचे आसो. सदैव पत्री सांभाल करीत आसावे. सर्व भरोसा आपला आहे. बहुत काय लिहिणे ? लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Ramchandra Shamraj requests Vishwasrao Lakshman to arrange for the safe journey as far as Kalpi of one Prananath Puranik proceeding to Benares and refers to the evacuation of Kalpi Raipur and other posts by the Jat. He further adds that Jawahirsing is on march to Pushkar.*

No. 76] [18-12-1764

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री बालाजी जनार्दन स्वामी
गोसावी यांसी.

पो रघुनाथ बाजीराव नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणे विशेष. राजश्री दमाजी गायकवाड शेनाखासखेल समसेरबाहादर याजकडे साल मजकूरचा यैवज सवापाच लक्ष रुो येणे त्यापौ यैवजाची नेमणूक जिकडील तिकडे होऊन बाकी अजमासे सवादोन लक्ष रुो येणे. त्यास खासा स्वारीचे फौजेस नालबंदीस यैवज पाहिजे याजकरिता सदरहू यैवज हजूर आणविला असे तर या यैवजावर तुम्ही गायकवाडावर वरात कोणाची न करणे. येथे कागद गड्याचा तोटा आहे. त्यास सांडणीस्वार पाठविला आहे तर कागद गड्या

१० थोर कीर्दीच्या
१० मद गड्या

येकून वीस गड्या कागद सत्वर पाठऊन देणे रा छ २४ जमादिलाखर सुा खमस सितैन मया व अलफ बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Raghunathrao receives money from Damaji Gaikwad for his army expenses and therefore asks Nana Fadnis to write it off the account.*

No. 77] [1764 ?

पो छ २४ रोवल

श्री

पुा श्रीमंत राजश्री साहेबाचे सेवेसी

विज्ञापना येशीजे माहादजी शिंदे यानी केदारजी सिंदे यास पुढे पाठविले. तेसमई त्यानी माहालोमाहाली घासदाण्याचे रोखे केले येसे राजश्री नारो कृष्ण दरवे सांगतात. कोठे काये घेतले हे ठिकाण लागत नाही. यागी होऊन त्याची संख्या माणसात आहे येसे नाहीं. गुदस्ता राजश्री आंताजीराम माजी कामदार पा येदलाबाज याजपासून सातहजार रुपये वैशाख मासी घेतले आसोन सांप्रतकाले धावचा देशमुख व पाटील यासी मसाले करून परगण्यात दंगा मांडला आहे. बराणपुरास धरून नेहले आहेत. परगण्यात राऊत पाठविले आहेत. त्याजमुले

परगणा उज्याड होतो. आखेर धण्याचा माहाल उपद्रव लागल्याने खराबी होईल. त्यांच्या रावतासी व आमच्यासी कटकट होईल. खावंद शब्द लावितील तरी मारनिलेस ताकीद करावी जे परगण्यास उपद्रव दिल्हा तरी तुम्ही जाणा येविसी निक्षूण आज्ञा करावी. सेवेसी श्रुत होय. राजश्री नारो कृष्ण दरवे यासी ताकीदपत्र सरकारचे येदलाबादेविसी देवावे जे येवज घेतला आसल तो माघारा देणे. फिरून परगण्याच्या वाटे न जाणे म्हणोन आज्ञा आसावी. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Peshwa's orders restraining Naro Krishna are solicited.*

No. 78] [*1764 ?*

श्री

पुा विज्ञापना. राजकी वर्तमान राा अवचितराव द्वादशी शुक्रवारी येथे दाखल जाहाले. प्रथम श्रीमंत नानासाहेबाची[1] भेटी घेऊन मग श्रीपतराव साहेबास भेटले. मग तेथून वाडीकडे येऊन त्याचेच घरी राहिले. बराबर कारकून मंडली व दोनतीनसे स्वार कारखाना सर्व नदीपलीकडे राहिला. रावजी सडे जातीने येथेच वाडीला जी वसरीवर खोली होती ते दिवसी तेथे राहिले. भोजन-स्नान सर्व येथेच होत आहे. राा महादजी सिंदे व केदारजी सिंदे घोडनदीवरी सोडून हे पुढे आले. ते सोमवारी येथे येणार. मुहूर्त भेटीचा सोमवारी काहडिला आहे. अजी कोरगावचा मुकाम, उदईक येथे येणार. रावजीची भेटी आम्हीही घेतली. वर्तमान (सविस्तर निवेदन) करावे तर त्यासी आवकाश नाही. दुपारे नानासाहेबाचे घरी राहिले. फार येकांती बोलावे तर कार्यात पडत नाहीं. संधि पाहून सर्व निवेदन करू. दुसरे रावजीच्या बोलण्यांत भाव दिसतो कीं माहादजी सिंदे आम्ही येकचित आहो. बाजी[2] नरसिंह याजला राजी नाहीत. त्यासी माहादजीबावा येथे आल्यावरी काय ठरेल ते पाहणे. बाजी नरसिंह याने पाच लाख रुा नख्त भरले. श्रीपतरावसाहेबास अभिमान बाजी नरसिंह याचा आहे. मग सिंदे आल्यावरी कोणास हाता धरून दिवाणगिरी सांगतात पाहणे, माहादाजीबावा ज्याजला हाती धरतील त्याजला दिवाणगिरी सांगावी येसे सरकारचे मानस. रावजी दैववान आहेत मागाहून काय निश्चयात येईल ते लिहूं. मुख्य गोष्ट रावजीचे कल्याण असावे. राा. गंगाधरपंत तात्या व नानासाहेब

---

१ नारोशंकर हा सिंधाचा कारभारी कांहीं काळ होता. २ महादजीचा कारभारी.

दोहीकडेहि वाजवयासी सिध आहेत. जिकडे सरकारचा डौल पडेल तिकडे हात लावितील, अभिमानी पुरुष नाहीत, दामुष्यायेणी आहेत. येथे सिंदे आल्यावरी रवाणगीहि सत्वरीच होईल. फौजा फालगुण मासी मालव्यात येतील. आम्ही आपल्याविशयी रा बापूस विनंती केली, त्यानी उतर केले कीं तुम्हाकडे रा नारो शंकर राजेबहादर याचा काहीं वरातेचा लढा असिला तर तितका मात्र तुम्ही वारणे. मग तुम्हास काही चिंता नाही. त्यासी ताकीद करणे ते केलीच आहे. मागती रा तात्यास व सिंदे यासी करू. नानाचा कजिया ठेविला तर ते कजिया करितील. जर त्याजला तुम्हाकडून रो पावले असतील, मग ते कजिया करितील तर येथून ताकीद करून तुम्ही त्याचे समाधान करणे तसे करावे वरकड मामलतीचा प्रकार तुमचा तुम्ही केल्या गुंता (नाहीं)? येसे भाषण जाहालें. तुम्ही सतोटीस उतरल्या किमपि दुसरा अर्थ होणार नाही. मोटेविशई+ विनंति केली. त्यानी उतर दिल्हे कीं, पहिले श्रीमंत दादासाहेबी येलचेत जाहागीर दिल्ही तेव्हा मोट जाहागिरीत लाऊन दिल्ही ते परिछिन कागदपत्र पाहिले. गोसावी सिरत होता त्यासाठी तुम्ही राखिली, उत्तम केले. आता त्यासी देणे. सिबंदी जे पडली असेल वाजवी ते देतील. तुम्ही जाहीगिरीपैकी येवज घेतला असेल तो माघारे देणे, दुराग्रहात न पडणे. आम्ही विनंती जे करणे ते केली. उतर केले की वडिलासी केवळच बिघडावे येसे नाही. त्याची कृपा संभाळून घ्यावी, यात तुमचे कल्याण. याप्रकारचा जाबसाल जाहाला. वरकड मागाहून सविस्तर लिहूं. हुंड्यांचे वर्तमान निश्चयात आले नाही. मागाहून येईल त्याप्रो लिहूं. आपण पनास हजाराच्या हुंड्या जलद पाठविल्या पाहिजेत. दरबार खर्चाचाहि येवज पाठवणे हे विज्ञापना.

¶*The writer gives news about Avachitrao arriving in Poona, Mahadji Sindia settling the question of appointing a Diwan. The letter shows that Mahadaji was getting gradually powerful at the court of the Peshwa at Poona.*

No. 79] [*1764 ?*

श्री

आमचे तर्फेनें श्रीमंत राजश्रीरघुनाथपंत याजपासी जाऊन त्याची व सखारामपंत त्यांचे दिवाण यांच्या भेटी घेऊन आमचे तर्फेनें सांगणें कीं तुमचा

+Near Jhansi.

आमचा भाईपना कदीम व पागोटें बांधलें याची शरम उभयपक्षीं आगत्य आहे. भाऊसाहेब व जनकोजी व दत्ताजी याणी आम्हासी गरसलुक केला म्हणून काम या थरास पोहचले. ईश्वर तुम्हास सलामत राखो. तुम्ही अम्हासी स्नेह पहिलेपासून एकसारिखाच आजवर चालवीत अहां. पहिले तुम्हास अबदाली व आली गौहर व नजीबखान याच्या ज्या गोष्टी सांगितल्या होत्या त्या तुम्हासी स्मरण असतील. परिणाम तदनुसार घडोन आला. त्यांची कर्मे दगाबाजीची प्रसिद्ध आहेत. सांप्रत्ये सुरजमण याजला नजीबखान यास कौल दिलासा देऊन बोलाऊन मारून टाकिले. आतां हिंदोस्तानांत तुमचा स्नेही व हिंदु आम्हा-वेगळा व सुरजमणाचे पुत्रावेगळा आणिक कोन्ही नाहीं. आम्ही पूर्व स्नेहावर व भाईपनावर द्रिष्ट ठेविली आहे व सुरजमनाचे पुत्र यासी वर्णाश्रम विचारें तुम्हा यास श्रेष्ट व सपूज्ये अहा व शत्रूचे पारिपत्यहि तुमचे साहेतेन होणार याची पूर्ण निष्टा तुमचे ठाई आहे विशेष. दक्षणेचे सरदार दगाबाज व फुंदी तुम्हासी सदैव शत्रुत्व चालवितात. दरसाल दक्षणेची मोहीम तुम्हास पुरवती. फार दिवस जालेत की या मुल्कांतील आमल व बंदोबस्त उठला. चार वर्षे जालीत कीं मुबदला न जाला. यामुलें मुदई दिवसानदिवस अधिक जोर धरितात. निर्भर जालेत. जर दक्षनेचे कामाविषयीं तुमची खातरजमा असली तर तुम्ही मातबर फौजेनसी इकडे येणे. सुरजमन याचे पुत्राजवल खजाना फार आहे तेहि देतात व हाफीज रहिमतखान व सुरजमनाचे पुत्र व नवाब अहमदखान बहाद्दर गालीबजंग हे आमचे रफीक[१] आहेत. अपणासी भेटल्यावर उत्तम प्रकारें बंदोबस्त हिंदोस्तानचा तुमचे चित्तानरूप घडोन येईल. अबदाली वगैरे याचे मनसुबे आपणापासी फार आहेत. अबदाली कांहीं मुजाहीम होणार नाहीं. श्रीकृपेकरूण हा जिमा आपला असे. अबदाली एकीकडे राहिल्यावर हे सरदार व आपण एकत्र जालियास सहजांत नजीबखान व सुजायेतदवले याचे पारपत्य होईल. अगर दक्षणेविषयीं तुमची खातरजमा नसल, आम्हास आपणाजवल बोलावाल तर येऊन लौकरच मुदयाचे पारपत्ये करूण. श्रीकृपेकरूण हिंदोस्तनचा बंदोबस्त उत्तम प्रकारें करूं. दक्षणेचा बंदोबस्त तुमचे चितानरूप जालिया पुढें तुम्हास चिरकालवरी सौख्यें विश्रांत आहे. उपाध बाकी राहात नाहीं. आम्हास बोलावाल तर येविषयीं शाहावलीखान याचे लिहिले दस्तावैज बाहित्यात्कारचे अगत्य आसल तर श्रीकृपेकरूण आपुले स्वाधीन असे.

---

१ स्नेही.

कासम आलीखान बंगालेवाला याजपासी आठ करोड रुपये खजाना आहे. पैकीं तीनसें हत्तीवर खजाना व पंधरा हजार फौजेनसी वारानसीजवळ आला आहे. त्यासहि आपणाजवळ बोलावाल तर तोहि येईल.

¶*This fragmentary letter contains the instructions of some Hindu Prince who has sent his envoy to the Peshwa's court. Suggestions are made that the Marathas could easily reassert themselves in the North against Najibkhan and Shuja-ud-daula if they agree to act in concert with Jawahirmal, son of Surajmal, and the writer.*

No. 80] [*13-6-65?*

पौ छ २९ जिल्हेज

श्रीपंढरीनाथ

विनंती पोष्य बाजी बलाल सा। नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता। छ २३ जिल्हेज मुकाम झाशी शुक्रवार प्रहररात्रीपावेतो स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्थित असे विशेष. स्वामीनी पत्र पाठविलें तें पावोन परम संतोष जाहाला. स्वामीनी दुर्गाचा समयावर बंदोबस्त केला. श्रीसांबदयेने व दृढप्रयत्ने स्वामीस येश आले. परम उत्तम जाहाले. पुढें निष्किल्मिष राहें ते असावे. स्वाम सर्वज्ञ आहेत तेथे विस्तार किमर्थ? मसुदे आपल्या पत्रापूर्वीच आपणाकडेस राजश्री आपाही पाठविले ते पावलेच असतील. श्रुत होय कृपा वर्धमान करा हे विज्ञापना.

¶*Baji Ballal congratulates his master for the latter's prompt action in defending Jhansi.*

No. 81] [*May 1765*

(*First sheet missing.*)

श्री

पुरवणी साहेबाचे सेवेसी

तरी उणियारवाला सरदारसिंग नरुके यासी कजिया पेसजी लागला होता. त्याजवरोन त्याच्या तालुकियात राजसिंग चव्हाण गाव उज्याड करावयासी च्यार

हजार फौजेनसी बिदा केले होते. ते मुलकात धूम करून होते. त्यांजकडील सलुखाचा पैगाम काहीच न ये. याजकरिता दिवान नंदलाल पाच हजार फौजेनसी पुढे बिदा केले. त्यामागून आपणच तोफखाना बाहेर काढोन वैशाख शुध १२ लग्नसिधि रतलामकर राजे येथ आहित त्यासी सेरीरसमध करून ते दिवसीच कार्यसिधि करून कूच करून सांगानेरास दाखल होऊन मुकाम केला तेथून अजी झिलायेस जाणार. दोन तीन मेजमानिया तेथे होतील. तेथून पुढे उणियारेस जावे दबाब द्यावा पैगाम न आला तरी मोर्चे लाऊन घ्यावे हा विचार आहे. त्यासी सरदारसिंगजी याजकडून काली काही पैगाम लागला येसे वर्तमान आहे. पुढे जों जाबसाल होईल ते लिहीत असो. प्रस्तुत उणियारीवरी शेह दिल्हा. पुढें तेथून रणथंबोर किल्यास जाणार. रामपुऱ्याकड जावे हा विचार आहे. किला पाहून जे तरतूद करतील ते लिहीत असो. सोपारकर इंद्रसिंग येऊन सामलि जाला तो बराबर आहे. त्याजवरी कृपा बहुत मसलतीत सामील. बुंधीचे हाडे येऊन सामील जाले. कोटे करोली खेचिराऊ याचे येऊन सामील होणार. पुढे चाल करावी हे मानस आहे. राजश्री मल्हारजीबावा सुभेदार गांगरोणगडास मोर्चे लाऊन मुकाम करून आहे. कोट्यावरी शह घातला आहे. रांगड्यानी बहुत अधिक विचार आरंभिला होता. परंतु रामपूरा सरकारच्या फौजानी घेतला. हजारपाचेसे माणूस मारले. याजवरोन दबाव बहुत पडिला. सुरतराम राम पोता इगलजगडाकड बिदा केला होता तो शेह भारी देखोन मुकुंदबारीपासोन माघारे सिरोन कोटियासी येऊन मुकाम करून आहेत. सांप्रत राजे बाहेर निघोन उणियारेयावरी चाल केली आहे. पुढें जो विचार ध्यानास येईल ते सविस्तर साहेबाचे शेवेसी लिहित जाऊ. राजे रामसिंग जयेपुरी आहेत. यासीहि बोलाविले आहे. दोचौदिवसानी कूच करून सामील होणार. राजे विजेसिंगजी जोतपुरी आहेत. लाला * * * यानी सर्व मारवाडचा बंदोबस्त केला आहे. मेडत्याजवळ फौज ठेविली आहे. सांबरेचाहि बंदोबस्त करणार आहेत. राजश्री गोविंद कृष्ण अजमेरीचा बंदोबस्त उतम प्रकारे करून आहेत. नेणवियात राजश्री सदासिव गोपाल आहेत. ते हा कालवरी मजबुतीने आहेत. तेथे पैगाम (अपूर्ण).

¶Letter from Malhar Tukdeo, the beginning and the end of which are unfortunately missing, reports situation in Rajputana where heavy fighting appears to be going on between Madhosing and one Sardarsing of Uniyar. Malharrao Holkar is active, investing Kota.

4197

No. 82] [27-1-1766 ?

श्रीनरहरिवरद

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री माहादाजीपंत
स्वामीचे सेवेसी

पो आपाजी माहादेव सा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ १९ माहे साबान मुा झासी येथे आसो विशेष. आपण बहुता दिवसी स्मरणपूर्वक पत्र पाठविले तें पावले. श्रीमंत रा रामचंद्रपंत तात्या ग्वालेरीस आले होते. येथून रा रघुनाथ हरि याणी ग्रहस्त विसाजीराम ग्वालेरीस पाठविले होते. वस्त्रे सरदारीयेग्य सेलापागोटे किनखाप दोन महमुद्या याप्रमाणे पाठविली होतीं. झांसीवरून आणावे येसा विचार होता. परंतु तेच आले नाहीत. तेथे मुकाम बहुत होते. मागून रा लक्ष्मणपंत येणार यास्तव त्यांची वाट पाहात राहिले होते. आलियावर दसरियास निघोन दरमजल देशास गेले याप्रमाणे वर्तमान. दुसरे वोडसे येथील ठाणे रा रघुनाथ हरि याणी घेतले. तेथील भेद लागला होता. स्वारी पाठऊन ठाणे खाली केले. तेथे पजनसिंग ठहरोलीकर होता तो घेऊन झासीस आणून ठेविला आहे. ठाणे आपले बसले यामुले अष्टभया बुंदेले याणी दुंडी आरंभिली आहे. त्यानंतर येथून फौज घेऊन कारभारी गेले आहेत. येथे कोणी बुंदेला राजा जाहलियाखेरीज बुंदेले * * डो देणार नाहीत. याविशी श्रीमंत राजश्री दादासहि पत्रे पाठविली आहेत व पुण्यास पत्रे पाठविली आहेत. जेसी आज्ञा येईल त्याप्रमाणे वर्तणूक करितील. मल्हारजी होळकर याणीं राजा हटेसिंग बसविला तो दतियामध्ये आहे त्यास कोणी अष्टभया राजी नाहीत कोणी आहेत. दुसरा प्राणसिंग लुधोरावाला तोहि राजा होईन म्हणतो. त्याणे दुंडी आरंभिली आहे. तिसरा पजनसिंग वोडशामध्ये होता. तो झांसीस आणून ठेविला आहे. याउपरी श्रीमंत राजश्री दादा यांची आज्ञा होईल त्याप्रमाणे वर्तणूक करितील. उतरे येतील त्याप्रमाणे वर्तणूक करितील. श्रीमंतास पत्र लिहिले आहे. पावते करावे. देशीहून पत्र वीस रोजाचे आले होते. श्रीमंत रावसाहेब उभयता कचेश्वरानजीक गंगातिरी दक्षिणातिरी आहेत. नाना फडनीस वगैरे सर्व कारभारी समागमेच आहेत. रा तात्या व रा संपतराव त्रिंबकराव समागमेच आहेत. श्रीमंतास आराम चांगले जाहले म्हणोन वर्तमान आहे. रा बाबूरावजीस पत्र पाठविले आहे. पावते करून सदैव कृपा करीत असावे. याप्रमाणे विनंती करावी. बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶*Apaji Mahadeo reports disturbances in Bundelkhand.*

4198

No. 83] *[10-2-1765*

पो छ ३० सफर श्रावण
सन सीत सितैन.

श्रीराम

श्रीमंत राजेश्री दादासाहेबाचे सेवेसी

सेवानसेवक किंकर गोविंद भिकाजी कृतानेक सिरसाष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील वर्तिमान माघ वद्य ९ परयेंत मुकाम मकसुदाबादेत स्वामीच्या कृप्य करून सुखरूप असे विशष. येथील वर्तिमान पुरवी कासीद अजुरदार समागम्य सर्व समाचार लेहून पाठविल आहेत. सेवेसी पत्र पावली असतील किंवा पावतील. सांप्रत येथील वर्तिमान तर हे सर्व पटन्यची लढाई फात्ख (?) करून सर्व सईन ठेऊन आपन जरिदा स्वार होऊन तांब्रमुखीन बालाऊन पाठविले होत यास्तव हे मजलदरमजल कलकत्यास गेले. ते च्यार महिनेपरयंत राहिले होते. कितीक गोष्टीचा जाबसाले होता. तो सर्व फाइसल केला. बंदोबस्त जाहाला. येक ला(ख) परयेंत रुपये कबूल केले. मग समसुदवला तांब्रमुखी याजपासून बिदा होऊन इलाइतीस गेला. कलकत्यात दुसरा साहेब जाहाला आहे. येथील अधपतिचे सर्व मालीक तांब्रमुखी आहेत. हे नावाचे मात्र धनी आहेत. येथील समाचार सर्व याजप्रकारचा आहे. त्यास जसा रावनास ब्रव जाहाला होतो त्याचा ब्रवप्रहार श्रीरामचंद्रजीनी क्षेनमात्र करून लंका इजय करून अईध्यस पट अभिशाक होऊन राज्यधीस जाहाले त्याजप्रमान इस्वरान इकडील सर्व पदाधीश आपन आहेत. आम्ही लोक जसा चातक प्रजनाचा मार्ग लक्षीत आहेत त्याजप्रमान आम्ही आपले सेवकजन रात्रंदिवस इश्वरापासी प्रार्थना करून निजध्यास करीत आहे. ईश्वर आम्हा लोकाची कामना कधी सिधीस पावईल तो दिवस सुदीन जानू. विशाष काये लेहू? परंतु हे काही आपनापुढे पदार्थ नाहीत. परंतु दूरचा डोंगर सौभित्रंत दिसत आहे. याजप्रमान सर्व वर्तमान स्रुत होये. राजेश्री जाणोजीबावा याजकडून वकील मामलतीस राजेश्री रघुनाथपंत आले आहेत. चार पाच महिने जाहले. अदेप कांहीं मामलतीचा बंदोबस्त जाहाला नाही. सांप्रत वीस पंचवीस हजार रुपये मात्र अलला (?) हिसाब दिल्हा आहेत. लाऊन मात्र ठेविल आहे. सांप्रत त्याजला तांब्रुमुखीसी येवज बहुत देन आहे. त्याजपुढे याची मामलत किसगनतीत आहे. त्यास उगाच लाऊन ठेविले. परंतु कांहीं लक्षन मिलायाचे दिसत नाही. जर काही आपला हिंदुस्थानात दबाव जाहल्यास काही प्रपत हाविले[१] नाहीतर प्रपत

---

१ प्राप्ति होईल.

होता दिसत नाही. स्वामीच सेवेसी श्रुत होय यास्तव विनंती लिहिली आहे. विशष अईध्यवाल्याचा सर्व समाचार आपणास इदित जाहला असल किंवा राजेश्री धोंडोपंत याच्या पत्रावरून सर्व निवेदन होईल विशष.

¶*Bhikaji Govind from Murshidabad writes how completely the Nawab Muzafar has been overshadowed by the English and requests Dada to send an expedition to Bengal.*

No. 84] *[11-3-1768*

पो छ २९ सवाल जाबसूद.

श्री

श्रीमंत+ राजश्री विस्वासरावजीप्रति

आश्रित अग्निहोत्री बाल मुकुंद वृत निरोप बहुतां दिवसापासून कृपापत्र आलें नाही तरी चिंता अस्ते. कृपापत्र पाठवूनि चिंता दूरि करावी. श्रीकाशीहूनि आमचे येथे पत्र आले. तीर्थरूप श्रीवास करीत होते. त्यास मुक्ति प्राप्त माघ शुद्ध सप्तमीस झाली म्हणोनि सपिंडी करावयास श्रीवटेश्वरी आलो आहे. विशेष. पूर्वी या प्रांताहूनि जाटाचा अमल पौशमासी उठला. तत्क्षणीच आपणाकडे दोनी माणसे वर्चेवर पाठविलीत. हें लिहिले होते की पत्रदर्शनी फौज या प्रांती सत्वर रवाना करावी. ते त्या समई सत्वरता न झाली. मग आम्ही हे लिहलें की सनदा भदावर कछवाए घारच्या आपल्या येथे आल्या आहेत त्या कच्या कीं पक्या लिहा. आपण हे लिहिले कीं सनदा बहुत पक्या आहेत इतकेहि आपण लिहिले. पण फौज थोडीसीहि न पाठविली तो पावेतो बालाजी गोविंद फौजेसहित कछवाए घारेत आलेत. मागूनि यादवरावजी आलेत तो पावेतो बालाजीपंताही सरसईचे तालुक्यात पांच शत स्वार पाठविलेत. काशीपंत पाठविलेत ते सर्वप्रकारची खातरजमा आमचे अधिकारी ग्रहस्तांची करूनि घेऊनि गेलेत. कछवाएचे रावराजे आलेत. सर्वांची खातरजमा केली. कमबेश सर्वांची मामलति केली. त्यासमई आमचे अधिकाऱ्याहि मला दोनी चारिदां पत्रे पाठविलीत बोलाविले. यादवरावजीचेहि पत्र आले. पण मी अटेरिहूनि न गेलो. आमचे ग्रहस्तांची काहीक प्रतीति बालाजीपंताकडे विशेष म्हणोनि मी या प्रसंगात न पडलो. श्रीमंत राजेबहादुराचा प्रसंग जेथे नाही

+ सर्व पत्र बाळबोध लिपींत आहे.

तेथे आमसी प्रयोजन नाही. आपण समई फौज न पाठविली तोपावेतो सिंध्याच्या सनदाहि बाळाजीपंतायचे येथे आल्यात. इथूनि क्रिया राज्यापासूनि ऐसी केली होती. ज्यांत आमचे ग्रहस्तासी - बाळाजीपंतासी वणवन होय इतकें केलेहि. पुढेहि बहुत प्रकार कर्तो तोपावेतों त्यहांस सनदा आल्यात. यादवराव कूच करूनि गेलेत. त्यानंतर आपणाकडील वर्तमान कांहींच कलत नाही म्हणोनि दुश्चित्त आहो. यानंतर पश्चिमेकडील वर्तमान ऐसे जे राजे माधवसिंहाची फौज काम्यास आहे. जाटाची फौज पाच कोस डीगेकडे आहे. पाचा कोसाचे अंतर. सिखांची फौज दहाहजार जाटाने बोलाविली ते ठेविली आहे. फालगुण शुद्ध १२ सोमवारी एक युद्ध झाले. त्यांत जाट हारलेत. च्यार शत माणस जाट मारले गेलेत. दानसाहि चेथे तीराचा घाव आहे. सिखासुधा जाट पळालेत. माधवसिंघजीची फौज भारी आहे. काही पंध्रा सोला सहस्र आपलेहि सैन्य आहे. आणखी सिंधे होलकर दरमजल येतेत हे आइकतो. हे वर्तमान आपण लिहाल तिव्हां निश्चय वाटेल. जटवाड्याचे युध्याचे वर्तमान तर सर्वतो-मुखी याप्रमाणेच आहे. लिहिले नाही आले. हरकारे गेले आहेत ते दों चौ दिवसात आल्यावर लिहू. देशचे वर्तमान राजेबहादुरांचे व आणखी सर्दारांचें या दिवसांत लिहिलें आलें असेल ते लिहावें. हा समय उद्योगाचा आहे. बसूनि राहायाचा नाही. बहुत दिवसापासूनि कृपापत्र आले न होते म्हणूनि माणस पाठविले असे. किंव्हा मिती चैत्र वदि ८ शुक्रे मुकाम श्रीवटेश्वर.

आश्रित जयरामपंत कृतानेक आशीर्वाद कृपा असे हेच अपेक्षा आहे.

¶*A priest Balmukund reports the hotly contested battle between Madhosing and Jawahirmal in which the latter's forces were routed.*

No. 85] [*23-2-1765*

श्री

पुरवणी रामकिसन महंत यास बलगडी जावयास सांगितले आणि तोफखाना त्याजबराबर होता त्याबराबर मनुलाल यास सांगाती देऊन निराला जमणाचे किनारे बलगडी पाठविला. याजप्रमाणे ते निघाले. दरमजल गेले. यानंतरी नजीबखान रोहिले रामेरयाचा (रामघाटाचा?) घाट उतरून येमुना पार गेले. त्यास शाहाची पत्रे फिरोन आली की खजिना घेऊन लोकर येणे म्हणौन रोहिले यांस पत्रें आलीं, त्यावरून रोहिले पार गेले. याजप्रमाणे येथे वर्तमान आले.

तदनंतर आज गंगाप्रसाद राधाकुंडी गेले आहेत. जाट किलेयाची तयार करू लागला आहे. रोहिला येकायेकी जात नाही. किरपाराम वगैरे गेले आहेत. त्याची व यांची बोलणी होऊन जो मजकूर ठरणे तो ठरे. तशाहीमध्ये सिक लागले आहेत त्याचे काये होईल व जाटाकडील वगैरे याजकडील मजकूर ठरयाल (त्या?)वर जाणार तर जाईल. याजप्रमाणे रोहिले याचा मजकूर आहे. याजप्रमाणे वर्तमान आले आहे. यानंतरी जाट याणी आपले कासिदाचे मिध्र्यास ताकीद केली की, मराठे याचे बातमीचे पत्र दिवसास येत का नाही याजप्रमाणे चौकसी केली. माहाराजास कलावे. रा। छ २ रमज़ान.

¶*Supplement to a letter informing that hostilities are likely to break out between the Jat and Najibkhan.*

No. 86] [*24-2-1765?*

पो। छ २९ सफर (मोहरम?)
श्रावण शु॥ १

श्री

तीर्थरूप राजश्री दादा साहेब वडिलांचे सेवेसी.

अपत्यें धोंडो खंडेराव चरणावर मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार विनंती. येथील सेवकाचें वर्तमान तागाईत फालगुन शुद्ध ५ पंचमी पावेतों स्वामीचे आशीर्वादेंकरून श्रीकाशीमध्यें सुखरूप असें विशेष. स्वामीनी कृपाकरून अशीर्वाद पत्र पाठविलें तें श्री शिवरात्रीस येथें पावलें. गोविंद दादाजी याचे जबानी निरोप पाठविला तो सर्व तपशीलवार त्यांणीं सांगितला, त्यावरून मला बहुत पश्चाताप जाला तो पत्रीं लिहितां पुर्वत नाहीं. स्वामीची येथें भेटी होईल ते समयीं विदित करीन. मी सर्वप्रकारें अपराधी आहे. स्वामीस वाईट लिहिलें त्याचें फल मला येथें श्री विश्वेश्वरानें फिरंगी व गारदी यांजकडून उत्तम प्रकारें देविलें! ते जीवेंच मारीत होते; परंतु आपलें नांव पदरीं होतें म्हणोन वांचविले! ते समयीं सर्वांनी दंड रुपये दीडहजार रुपये देखीलव्याज पावेतों पडला तो देविला. आणखीहि दंड रुपये मागतात. मी लपत फिरतों; ती आपत्ति पत्रीं कोठवर ल्याहावी.? वेदशास्त्रसंपंन्न राजश्री श्रुतिधरभट पुराणिक येतील ते सांगतील. सर्व मातबर ब्राम्हणांवर कष्ट बहुत जालें तें पत्रीं कोठवर ल्याहावें? मागती सुज्यातदौला दिल्लीस गेला आहे तो राजश्री मल्हारजी होलकर व

जांट व रोहिले यांसी घेऊन येतों. सत्वरच येईल ऐसें आहे. यास्तव मागती मोठी गडबड येथें आहे. ये समयीं घरें व जत्राहीर कोण विकत घेतों?. जत्राहीर सोनें रुपें याचें नांव घेतलें म्हणजे फिरंगी लुटतील. राजा बलवंतसिंग येथील मातबरास दाऊन देतों, याचें भयास्तव कोण्ही बाहेर निघत नाहीं. आपण धर्म अवतार आहां, कर्णाप्रमाणें श्रीकुरुक्षेत्रीं रुपये वाटिलें, बलिराजाप्रमाणें आपण उदार, अर्जुनाप्रमाणें पराक्रमी आहेत; सर्व सेवकांस व सर्वांस विदित आहे. मजकडून जे अपराध जाले असतील ते सर्व माफ करावे; अत:पर कधीं वाईट लिहिणार नाहीं. आपले चरणांची शपथ असें. मजवर कृपा आपल्यासारखी कोण करील.? मजला आपल्यासारखा कोण्ही रक्षिता नाहीं. आपण उपेक्षा केलियाणें माझा प्राण राहणार नाहीं. वेदशास्त्रसंपन्न राजश्री रामचंद्रभटास हिशेब दाखविले; त्याचे मतें सर्व लबाड कारभार आहे. ते कांहीं माझी अब्रू ठेवीत नाहींत, तो विस्तार कोठवर लिहावा.? येथें स्वामीच्या आज्ञेवरून सरकारचे वाड्यांत आहे; सर्व लोक हेंच जाणतात कीं स्वामीचा पुत्र आहे, त्यास रुपयास काय कमी ? माझें घरीं तरी मजला अन्न वस्त्र मिळत नाहीं, तृण-काष्टहि नाहीं, पुत्र मुंजीचा जाला आहे. सर्व आपत्ति बहुत आहेत. कर्जदार बहुत उपास पाडतात. रामचंद्रभट आपले आज्ञेखो येक कवडी देत नाहींत. म्यां कर्जदारांस येक गाहाणाचें घर व्याजामध्यें दिल्हें, व येक गाहाणाचें घर मुदलामध्यें दिल्हें. बाकी वीस हजार कर्ज राहिलें, व पोटखर्च दांड वगैरे शिबंदी मिळोन पंचवीस तीस हजार रुपये कर्ज राहिलें. आपण कृपा करतील तरी कांहींच नाहीं. आपण उदार दानशूर आहेत. पूर्वी राजश्री गणेश संभाजी याजवर तिसा हजारांची वराल पाठविली होती तेच रुपये राजश्री बाळाजी गोविंदाकडून देववावें. अथवा राजश्री मल्हारजी होळकर याजकडून हरयेक ऐवजीं देववावें, म्हणजे सर्व कर्ज फेडून मी निश्चित होईन; हें आपल्यांवांचून माझा उद्धार कोण करील.? आपण क्षमाशील दाता आहेत, आपली तारीफ म्यां पत्रीं कोठवर ल्याहावी.? येक दोन घरे घेतलीं तीं बहुत उत्तम आहेत, निर्दोष अंतरगृहीं बाहेर आहेत; श्री गंगातीरीं आहेत. याप्रमाणें घरें श्रींत आणखीं नाहींत. येक स्वामीकारणें व येक छत्र घालावयासी ब्राम्हणभोजनास पाहिजे, यास्तव घेतलें असें. याचा मनोरथ आपल्यांवाचून कोण माझा पुरवील ? अद्यापि पुरती खरेदी जाली नाहींत. च्यार दिवसा जाले नाहींत तों मागती विकावीं हा अर्थ उत्तम नाहीं. आपण राजश्री रामचंद्राप्रमाणें, मी आपला किंकर आहे. ज्यांचा वंश नसतो तेहि श्रीकाशींतील घरें विकीत नाहीं.

यास्तव सेवकानें तपशीलवार लिहिलें असें. येकदां मजला कर्जदारांपासून मुक्त करावें. आपण कृपा करितील तरी सर्व होईल. अत:पर आज्ञेशिवाय कर्ज करणार नाहीं व आज्ञेशिवाय घरेंही घेणार नाहीं. हीं घरें कोणांस देऊं नयेत. घरें थोर थोर आहेत. ब्राम्हणांस दान घरें देणें तरी सेवकास लेहून पाठवावें, चौ पांचा हजारांत घरें बहुत मिळतात. नवीं घरें घेऊन ब्राम्हणांस आज्ञेप्रमाणें देईन. हीं घरें दोन सरकारांत ठेवावीं, बहुत उत्तम आहेत. पत्रीं कोठवर ल्याहावें.? राजकी वर्तमान पारशी पत्रीं लिहिलें आहे त्यावरून सर्व विदित होईल; त्याप्रमाणें सेवकाविशी शिफारसपत्रें पाठवावीं. राजश्री मल्हारजी होळकर व माहादजी शिंदे व राजश्री बाळाजी गोविंद यांसी माझेविशी पत्रें शिफारशीचीं पाठवावीं कीं धोंडो खंडेराव राजकारणी मजकूर लेहून पाठवील त्याप्रमाणें सरकार किफायेती असल्यास करणें. ऐशीं पत्रें सेवकाकडे सत्वर पाठवावीं. येथें राजकारणें सेवकापाशीं स्वामीचें नांवास्तव बहुत येतात यास्तव जरूर पारशी येवनास व सर्वांस पत्रें पाठविणार स्वामी समर्थ आहेत. मागील वेदशास्त्रसंपन्न राजश्री बाळकृष्ण दीक्षित याजकडील ऐवज आला होता त्याचा खर्च पूर्वी कोन्हेर भटाबराबर पाठविला होता, हल्लीहि पाठविला असें. मागाहूनहि राजश्री गोविंद दादाजी व भोजराज शंकर कारकून यांजबराबर मागती पाठवीन. तूर्त आज्ञेप्रमाणें येक कावड पाठविली आहे. आरधें श्रीत्रिवेणी जल व अर्धें श्रीमणिकर्णिकाजल असें. त्यासी वीस रुपये द्यावें. आणखी रुद्राक्ष व हिरडें व गंगावन वगैरें शंखोदर गोल्या पाठवाव्या तरी मजपाशीं रुपये नाहींत. रामचंद्रभटास पुसावें तरी ते म्हणतात की तुम्हास या कारभारांवाचून काय पडलें आहे? जे समयीं त्यांचे विचारास येईल तेव्हां पाठवितील. सेवकास स्वामीचा आशीर्वाद व कृपा मात्र पाहिजे, व आज्ञेप्रमाणें सेवा करावी हा मात्र मनोरथ आहे. रामचंद्रभट बहुत उदास होतात, पत्रीं लिहिता पुर्वत नाहीं. तेहि मी गुरुच मानितों. म्या पूर्वी जवाहीर व सोनेरुपें स्वामीचे जयास्तव संकल्प घातला कीं सर्व धर्म करावा तो मनोरथ पूर्ण करणारे स्वामी कर्णावतार आहेत. स्वामीवाचून या जगतांत कोण उदार आहे.? माझे पूर्वील सर्व अपराध क्षमा करावें, रुपये पाठऊन कर्जापासून मुक्त करावें. स्वामी वाचून माझी अबरू कोण ठेवील? बहुत काय लिहिणें हें विनंती.

¶*This is a letter of one Dhondo Khanderao from Benares supplicating Raghoba's mercy. He informs that the English have driven Shuja out of Benares and are mercilessly plundering the city. Shuja has fled to Delhi to raise another force and try his luck once more.*

4204

No. 87] [31-5-1765

श्री

सेवेसी नरसिंगराऊ राम साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा ज्येष्ट शुध येकादसी मुाा उदेपूर येथे माहाराजाचे कृपावृधि करून शेवकाचे वर्तमान येथास्थित आसे विशेष. शेवकावर कृपा करून आज्ञा केली की तुम्हास जाऊन सा महिने जाहाले. यैवजाची तरतूद करून सत्वर पाठवणे म्हणून आज्ञा. त्यास येथे येऊन पांच महिने जाहाले परंतु आद्यापि प्रथम दिवस आहे. आम्ही जो उपाये आपणाकडून आहे तितका करितो परंतु काही सिधीस जात नाही. उपास केले, गोटातूनहि निघोन गेलो, लांब जाऊन राहिलो, तरी काही येथील मतलब कलत नाही. बाजी नरसी कारभारी होते ते दुखण्यानी आजपर्यंत हैराण होते. येथून बरे व्हायाकरितां उजनीस जात होते. तेथे वाटेस मंदोसरी ज्येष्ट शुध चतुर्थीस बुधवारी मृत्य पावले. येथे राघोबा पोतनीस आहेत. सरदाराचा मजकूर काये आहे तो कलत नाही. काही गोष्ट बोलावी ती प्रमाणात नाही. करभारी मातबर म्हणावा तरी दुसरा कोणी नाही. जे आपले मरजीस येईल ते खरे. यैवजाविसी निकड फार केली. त्यास दोन लाख रुपयाच्या हुंड्या आठ दिवसानी करून पाठवितो म्हणून करार केला आहे. येतील तेव्हां खरे. येथे खरी गोष्ट काही आढलत नाही. आजपावेतो भरोसा फार वाटत होता की सरदार चांगला बोलतात हे खरेच आसेल परंतु आपणास भरोसा पुरत नाही. चितात काये आहे हे कलत नाही. उदेपूरचे कामकाज थोडक्यावर आले आहे. मेहनत फार न करिता शहरातील लोक बाहीर निघोन आले. धारण दोसेराची आहे. पायेदल पांच हजारपावेतो शहरात आहे. ज्या दिवसी पाटीलबावाचे मरजीस येईल ते दिवसी शहरावर चढाई करितील त्या दिवसी हस्तगत होईल. वाबल्यानी दाहा लाख रुपयाची निशा सरकारात दिडा महिन्यांत रांगड्याकडून करारी करून सरकारात माहाराजाचे नावे खत लिहून घेतले. आम्हापासी रुपयाची निशा करून घ्यावी त्यास करार ठरविला आहे त्याप्रमाणे सरदारकडून कोणती गोष्टी सिधीस गेली नाही. मुदत भरत आली. रुपयाचीहि तरतूद केली आहे. वाबल्याचा निश्चये आहे की मुदतीस रुपये पावते करून देऊ परंतु ज्या गोष्टीनी रुपया मागावा तो आर्थ काही दिसत नाही. तोफा लागू करीत नाही. मोरचे लावीत नाही. उदेपूर घेऊन राजे रतनसिंगास गादीवर बसवावे ते काही नाही. रुपयाचा मात्र तगादा करितात. याप्रमाणें जानराव व येस्वंतराऊ वाबले बोलतात. सरदाराचीहि कृपा नाहीसारिखी दिसते. वाबल्याकडे सिकाकडील वकील आले आहे. चालीस हजार

4205

फौजेनिसी तुम्हास सामील होतो. जाट व नजीबखान दोघाचे पारपत्य करू. रांगड्या लोकामध्ये व राजेरजवाडियात उभयेता वाबल्याचा इतबार फार आहे. आपले सरकार उपयोगी आहेत. धण्याची चाकरी करून दाखऊ ऐसे म्हणता सध्या दिसोन आली आहे. सरदाराची कृपा विशेष नाही याजकरिता भरोसा पुरत नाही तरी उभयेतास सरकारची पत्रे दिलदिलासा देऊन समाधा(ना)ची पाठविली तरी उपयोगी फार पडतील. उदेपूरचे कामात मातबर तेच आहेत. येथील कची बातमी लिहितो. राग न यावे. मर्जीस आले तरी सेवेसी लिहून पाठवीन. येथे कासीदजोड्या सरकारच्या येतात. जाब मिलत नाही. महिना दोन महिने उगेच राहात काही काम होऊन येत नाही. पत्रे पाठवितो ही चौकीपार होता की नाही हे कलत नाही. येथील चोकी देहवरीचे (?) बाहेर आहे. तेथे कागदाची चौकसी होऊन मग आला तर ये नाहीतर येत नाही. सर्व वर्तमान मुखजबानी कासीद सांगितील. शेवेसी श्रुत होई हे विज्ञापना. येथे मिरजा रहीमबेग याची मातबरी पाटीलबावापासी फार आहे. कोणते काम सिधीस जाऊ देत नाही. कलावे याचा उपाये केला पाहिजे हे विज्ञा(पना).

¶*Narsingrao Ram explains his difficulties in getting the promised amount from Mahadaji Sindia who at this time is investing Udaipur.*

No. 88] [*April-May 1765*

[पहिला बंद गहाळ आहे.]

* छ राजश्री मल्हारजी होलकर याचा व फिरंगी याचा तहनामा जाला आहे, त्याची नकल आलाहिदा सेवेसी पाठविली आहे त्याजवरून सेवेसी विदित होईल. पंचवीस फिरंगी याविशई आपली आज्ञा होती. त्याचे उतर त्यानी सांगितले कीं तूर्त कोन्ही फिरंगी जमाव टाकून फुटत नाही. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*This mutilated letter refers to a treaty between Malharrao Holkar and the English.*

No. 89] [*Just after 13-4-1771*

श्री

येथील वर्तमान पातशाहाकडील सैफुदी महंमदखान समागमे आहेत. त्याणी मामलतीचा करार केला. जुमाबक्ष पातशाजादे हाली वलीहत करितो. यास

बाहेर काढून मुजरा करावा. चहुकडून वर्तमान पातशाहास जातील. खुसी मानून यावयाची तयारी करील. त्यावरून वलीहद यास छ ४ जिल्हेजी बाहेर काढून नजरा करून सारे सरदार जाऊन मजुरे करून आले. सैफुदीमहंमद-खानाने मामलतीचा करार करून दिल्हा. चालीस लाख रुपये द्यावे. मेरट वगैरे आठ माहाल द्यावे. पातशाहास दोन महिनेयात येथे आणावे. कडाकुरा सोडावा; ते न होई तर मुबलक मुलुक दिलीजवळ द्यावा. चालीस लाख रुो पैकी तूर्त शहरचा अमल आपले स्वाधीन करावा. वीस दिवसात दाहा लाख रुा द्यावे म्हणजे किला स्वाधीन करावा, तो पातशा येतील. ते आलियावर जतीचे माहाल सोडून तेथील यैवज मजुरा देऊन पंधरा लाख द्यावे. बाकी पंधरा लाख साता महिनेयात द्यावे याप्रोा याद करून वलीहदाची मोहर करून दिल्ही. वाइदा जाहला. तूर्त दाहा लाख यावे, त्यापैकी दोन लाख प्रयागाहून पातशाहाने हुंड्या दोन लाखाच्या पाा. तीन लाख. मागाहून पाा म्हणोन लिाा आहे. पातशाचे छ २७ जिल्हेजी प्रयागाहून कूच जाले. दिलीस येतात याप्रमाणे वर्तमान आहे. प्रस्तुत शहरचा अमल सैफुदीमहंमदखान याजकडे करारप्रमाणे दिल्हा. किल्याचे पहिल्याप्रोा सरकारात बंदोबस्त करून राजश्री माधवराव सिवदेव तेथे पहिल्याप्रो आहेत. दाहा लाख रूपये आले म्हणजे किला त्याचे स्वाधीन करावा. इतकियांत पातशाहा यावेसे आहेत. जाबतेखान शुक्रतालास आहेत. कल्लूमल्लून गंगापार आहेत. त्याचा कटाक्ष लागला आहे. जाबते-खानास दोहीकडून पायेबंद; आशात त्याणे काहीं सलुख करावा तर आपलेकडील मातबर आश्रा यामुले सलूख करीत नाहीं. मुलकाची जप्ती जाली, परंतु पेंढारी याणी मुलुक मारून सत्यनास केला. जप्तीचा पैका यावासी बाकी राहिली नाहीं. जाटाचा सलूखच तूर्त राखिला आहे. पुढे काये होते ते पाहावे.

¶*The news of an agreement with the Emperor and of his having started towards Delhi under Maratha protection is reported to the Peshwa.*

No. 90] *[June-July 1765*

(पहिले दोन बंद गहाळ.)

प्रयागाचे किल्यात चारसे गोरा आहे. या देसचे माणूस कमी आहे. जेथे नाजूक जागा आहे तेथे आपले जातीचेच माणूस ठेवितो. किल्यात सता दुसरियाची नाही. जेणेप्रो पातशाहास सांगावे तेणेप्रो करावे. सुज्यातदोल याचे चिरंजीव जाले आहेत. जे इंग्रज सांगेल तेणेप्रो करावे. दुसरे या प्रांती

कोणी नाही. पाच माहाल सुज्यातदौलेयास इंग्रजाने दिल्हे आहेत तितके खाऊन बसावे इतके त्याचे स्वाधीन आहे. कलकत्यास पासून यमुनापावेतो अमेल इंग्रजाचा मधे, दुसरा कोणी नाहीं. पातशाहास चालीस लाख रुपये द्यावे ते कसकसे तरी बंगाल्याचे चोवीस, बाकी कुरा वगैरे प्रयाग मिलोन सोला याजप्रो द्यावे. बाकी काही नाहीं. सर्व आपण खातो. सुज्यातदोल व मल्हारबा वगैरे सर्व सरदार मिलोन कुऱ्यास आले. फौज लाख पावेतो होती. तेथे नज्यफअली-खान व फिरंगी गोरा पाचसे व या देसीचे तीन हजार व तोफा होत्या पाच सात हजार फौज याजप्रो याचा सरंजाम कमी असता लाख फौज मोडिली. याजकरिता इंग्रजास मराठे म्हणजे काही नाही असे हावभरी जाला आहे. परंतु बाजतबरसाद देसीहून सरंजाम चांगला आणून दिलीस जावे हे आहे. बाजारआवई प्रयाग देणे घेणे हे कठीण आहे. इंग्रज येक पाऊल जागा साधावी हे करील परंतु देणे हे त्याच्या वस्तु कठीण दिसते. येथील गंगेच्या उदकास विपर्यास रामनवमीचे दोन प्रहरापासून उदक हिरवे जाले. आत काही अनीक विपर्यास दिसतो. अस कधी जाल नाही म्हणून संभर बरषाचे माणूस येकादों आहे ते सांगते. बगाल सारा इंग्रजाचे स्वाधीन. सर्व हिकडे याचे, दुसरे काही मध्ये कोणी नाही. जे आहे ते ते याचे स्तापित आहेत. या मुकामावरून प्रयाग सोला कोस येथून लस्कर ठेऊन पुढे जातो. येथे लस्करावर मी दाहा रोज आहे. याजवली येथे बारीक मोठे वर्तमान कळले. आम्हाकडील माणूस आहे ते वर्तमान सविस्तर सांगते. सर्व तिकडे यावयास उमेदवार बहुत आहे हे लिा याचा अंदेशा तेथे माझे स्नेही कोणी असतील ते म्हणतील की निलोपंताची देसी लिा तरी त्यास न कलत पते लाऊन मी लिा आहे. सुभेदाराकडील वकील येऊन फजीत पडून गेला असे न जाले. येक गोष्टीने तरी वकिलावरी सरफराजी केली आणि बाहेर जाहीरण्यात मराठ्यासी सल्लक झाला याजप्राो इंग्रज येथे आहे आणि दुसरे मराठ्यासी ठीक केले असे आपले काम ठीक केले असे. येथे कारभारी मुनीर-द्वला आहे. माारनिलेस खर्चास नाही म्हणून श्रमी होत होते. येथे कर्ज मिलत नाही. आणि दरबारखर्चास दोनसे पावेतो लागले. याखाा राऊतास वगैरे खर्च भारी सर्व विकत घ्यावे (लागते?). सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

¶*The occupation of Prayag by the English and the abject surrender of the Emperor and Suja-ud-daula to their authority is reported. The letter further refers to the defeat of Malharrao Holkar.*

4208

No. 91] [15-7-1765

पौ छ ९ रावल सन सीत शितैन भाद्रपद.

श्रीमोरया

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती शेवक गंगाधर येशवंत कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा आषाढ कृष्ण त्रयोदसी मुाा आलमपूर नजीक सेवढे स्वामीचे कृपाकटाक्षें येथास्थित आसे विशेष. छ ९ जिल्हेजचे आज्ञापत्र सादर केले ते छ १४ मोहरमी प्रविष्ट होऊन संतोषावाप्ति जाली. दिवाण देणियाचा यैवज देणे तो मुदतीप्रमाणे पावला नाही. तुम्ही परभारे गेला. इकडे आह्मी यैवज माहालातून घेतला म्हणून राजश्री मल्हारजी होळकर यानी (सी) कितेक प्रकारे लिहिले. त्यास मल्हारबा वाजबी सरकार देणियासी दिकत करतील हे होणे नाही. तुम्ही समजाऊन सांगितल्यास गुता पडणार नाही. तूर्त यैवज देविला तो सत्वर ताकीद होऊन सरकारात पावे ते करावे म्हणून आज्ञा. यैसियासी यैवजाविसी देसी आस्ता यैवजाची विनंती केली त्याप्रमाणे पैसा पावला पाहिजे. या आशये स्वामिकार्यावर द्रिष्ट देऊन इकडे आलो. राजश्री सुभेदारास सविस्तरे विदित करून यैवजाची रवानगी केली त्यास मार्गी पावता च्यार दिवस आधिक उणे लागले. पुढेहि रात्र दिवस बोलून खावंदाचे लक्ष राखावें याअन्वये होतो तो परभारे देसी यैवज घेतलियाचे वर्तमानें परस्परें आली. हे गोष्ट लोकोपवाद पाहता अनुचित जाणून सुभेदार चितात बहुत खिन्न जाले. त्याचा परिहार विनंतीपत्री काये ल्याहावा? धण्यानें आजपर्यंत लौकिकांत प्रताप वाढवून लोकविरुद्ध प्रकार न घडला त्याप्रमाणे खावंदानी कृपा करीत जावी. सेवकानी चाकरी (सी) अंतर न करावें. आम्ही येथे नानाप्रकारें बोलावयासी कमी न केली. त्याचा विस्तार किती लेखन करावा? अस्तु आपण कायावाङ्मन:पूर्वक स्वामिकार्यावरी लीन आसो. दुसरा पदार्थ विशेष जाणत नाही. कृपा करणार साहेब समर्थ आहेत. यैवजाविसी वारंवार बोलून उदेपूर यैवजी साहा पावते करावयासी अगोदर लिहिले होते. आणीक च्यार येकूण दाहा सिवाये पव्या वाा बाकी येणेप्राा निक्षुण्ण ताकीदपत्रे पाठविली आहेत. जाटाकडील यैवज तूर्त येत नाही. सरकारांत निकड जाणून, प्रस्तुत हरतजवीज कर्जवाम करून त्या यैवजी यैवज द्यावा यैसा निकाल काढून राजश्री सुभेदारानी गंगाजलनिर्मळ अहिल्याबाई याजला लिहिले आहे, त्याप्राा यैवज पावेल. आम्हास स्वामिसेवेसिवाय रात्रंदिवस चिंतन दुसरे नाही. फलदाता श्री असे. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापि.

¶*Gangadhar Yeshvant to Raghunathrao begs to be excused for the little unavoidable delay in sending the stipulated amount. There was, he adds, no sufficient excuse for the addressee to realize the amount direct from Holkar's provinces. Pleading for the inability of the Holkar to pay off the Government dues. He however promises to arrange for an early payment.*

4209

No. 92] [3-8-1764

पौ छ १३ सफर
खमस श्रावण

श्री

श्रीमंत राजश्री दादा
साहेब स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक आज्ञाधारक नारो बलाल भुसकुटे कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ ४ माहे सफर पावेतो प्रां। मजकुरचे व सेवकाचे वर्तमान यथास्थित असे. यानंतरी राजश्री माहादाजी सिंदे महेस्वरचे घाटे उतरोन उजनीस गेले. तेथे गेलियावर प्रा। बढवे येथील किला व घरगावचे ठाणे घ्यावे. जासूद जोडी बातमीसहि आली होती की किलेयात स्वार प्यादे किती ते निघोन उजनीस गेली. इतकियांत आमचा ग्रहस्त उजनीस आहे, त्यासहि सिंदे याचे दरबारची बातमी पुर्ती लागली की दगा करून बढवे याचे ठाणे घ्यावे. त्यावरून त्या ग्रहस्ताने ताबडतोब पत्र पाठविले त्याची नकल सेवेसी करून पाठविली आहे त्यावरून विदित होईल. बढव्यात सिबंदीची नेमणूक स्वामीनी पाच हजार रुपये करून दिल्ही त्याचे शंभर प्यादे होतात. तितक्यानें किलेयाची व शहरची रखवालीहि होत नाही; तेव्हा मी जाजती दुसरे शंभर प्यादे व पंचवीस स्वार ठेऊन आजपावेतो प्रगणेचा बंदोबस्त केला, ही बातमी येताच दुसरे दोनसे प्यादे व पंचवीस स्वार नवे ठेऊन बढव्यास पाठविले आहेत; परंतु च्यारसे प्यादे व पनास स्वाराच्यानें ठाणे राहणार नाही. सिंदे दोन हजार स्वार व येकाधी तोफ काही प्यादे पाठविणार; तरी स्वामीनी तीनसे च्यारसे स्वार पत्रदर्शनी पाठवावे, व प्यादे दुसरे च्यारसे पाचसे ठेवावयासी परवानगी पाठवावी. सात आठसे प्यादे ठेवावे तेव्हा किला व शहर राहील. नाहीतरी ते ठाणे घेतील. आपण रागे भरतील यास्तव विनंती लिहिली आहे. केरोजी पवार पथक होते ते निघोन गेले हे सविस्तर पहिले सेवेसी लिहिले आहे. येथे राऊत पाठवावे ते नामांकित पथक मातबर पाठवावे. येथे प्रगणा राखोन राहातील यैसे पाठवावे. किलेयाची येकेक च्यार साडे च्यारसे हात यैशा च्यार भुजा बुरूज सिवाये किलेयासी दरवाजे दोन यैसा किला अफाट, सिवाये शहरपना प्यादे बहुत रखवालीस लागतात; यास्तव याची आज्ञा लौकर पाठवावी. किलेयात दारू दाहा मण व सिसे सा मण यैसे खरेदी करून ठेविले आहे. काही गला वगैरे

जिनस बेगमी केली आहे; परंतु राऊतासिवाये व प्यादेयासिवाये बंदोबस्त होणार नाही. याची आज्ञा स्वार प्यादे यावयासी ढील लागल्यास ठाणे राहाता कठीण आहे; यास्तव त्वराच जाल्यास उतम आहे. हा बखेडा जाहला तरी मजला दोन मइने यावयासी कामास येणार नाही. याची आज्ञा तेहि ल्याहावी. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Naro Ballal Bhuskute requests Raghunathrao to reinforce Barwha without loss of time as the place is threatened by Mahadaji Sindia.*

No. 93] [*4-7-1767 ?*

श्री

राजश्री दमाजी गायेकवाड सेनाखासखेल समशेरबहादर गोसावी यांसी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो रघुनाथ बाजीराव आसीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशललेखन करीत असिले पाहिजे विशेष. खासा स्वारी मातबर मोहिमेस हिंदुस्थानात आली असता समागमे आपण पांच हजार फौजेनसी यावें ते गोष्ट घडली नाही. राजश्री सयाजी गायेकवाड समागमे होते ते गेले तेव्हां राजश्री रामचंद्र बसवंत तीन च्यार महिने होते. हाली आपणाकडील फौज म्हणावी तर आहे ती समजलीच आहे. गुदस्तांपासून फौजेस कर्ज रुपये दिले त्याचे ठिकाण नाही. सालगुदस्तांचे सवापाच लक्ष रुपये येणे त्याची निर्गत केली म्हणून आपले पत्री मात्र लिहिलें आलें; परंतु येवजाचे वसुलास हुजरून रा। केसो बहिरव आहे त्याचे पत्र आले नाही. त्यास येवजाची रवानगी सत्वर करावी. राजश्री आपाजी गणेश येथून गेले त्यांचे मामलतीचे बंदोबस्ताचा मजकूर फार आगाध नव्हता. परंतु त्या कार्यास बहुत दिवस लागोन मागती कोणताहि मजकूर सेवटास गेला नाही. त्यास आत:पर त्यांचा आमल यथास्थित होये ते कार्य सत्वर करून श्रावण अखेर-पावेतो आपण तयारी करून फौजसहवर्तमान यावे. रा। रामचंद्र बसवंत यांस निरोप दिल्हा ते वेलेस येवज आणावयाकारिता हुजरून माणको वासुदेव कारकून दिल्हा आहे. त्यासमागमे येवजाची रवानगी करावी. रा। छ ७ सफर बहुत काय लिहिणे हे विनंती. गोपालरायाचे पारपत्य अद्यापि होत नाहीं हे अपूर्व आहे. हरतजवीज करून गोपालरायाचे पारपत्य करणे. मुलकाचा वसूल आपाजी गणेशाकडे चालल्यास शहरात किती दिवस दम धरील, शिबंदीस काये

देईल ऐसे तजविजेने हातास येईल. शहरातहि भेदाभेद केला तरी होइसा आहे. तुम्ही वाकीफ आहा. तुम्हास येथून त्याहावेसे नाही. चार रुपये खर्चहि भेदास पडला तरी सरकारात कबूल असे. परंतु गोपालराव गणेशाचे पारपत्य उतम रितीने जाहालेच पाहिजे. तुमच्याने नच होये तरी खासा स्वारीस यावे लागेल. सरकारचा ऐवज तरी पाठविला असेलच परंतु हिंदुस्तानचा बंदोबस्त बहुत उठला आहे. खासा स्वारीहि बहुता दिवसी आली यास्तव तुम्ही हजूर येऊन शेवा करून दाखविल्यास उतम आहे. येविसी रामचंद्र बसवंताचे जबानी-वरून कलेल. छ मजकूर बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Raghunathrao orders Damaji Gaikwad to send forces to quell disturbances of Gopalrao Ganesh.*

No. 94] [*29-7-1765 ?*

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक विस्वासराव लक्षुमण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा छ १० सफर मुा किले कन्हेरा स्वामीचे प्रतापेकरून येथास्थित आसे विशेष. या प्रांतींचे वर्तमान तरी तीन वर्षे जाहाली. किले मजकुरास आलो तो राा बाबूराव कोनेर याणी किला शुष्क येक सेर धान्यदेखील नसता स्वाधीन केला. मुलकाची अवस्था म्हणावी तर तीन वर्ष राज्याणी व जमी-दारानी येक रुा कोणास न देता स्थल बलकाऊन बसले आहेत. मातबर सरदार फौजसुधा कोन्ही येता तर रुजू होते तो प्रकार न जाहाला. गतवर्षी राा माहादजी सिंदे मारवाडप्रांतास आले. त्याजला बंदोबस्ताविशई कागदाचा स्वेत केला. निदानी राा संताजी वाबले पाच सात हजार फौजेनिसी पाठविले. त्याणी येऊन मुलुकात लुटफाट करून कोन्ही आडवे न येता भये खाऊन गछ करून गेले. त्याबरोबर आमची फौज दोन हजार उठून गेली. आम्ही त्याजबरोबर यावे तर सरकारचे स्थल कैसे सोडोन यावे ? खावंद शब्द ठेवितील यास्तव हजार राऊत दोन हजार प्यादेयानिसी राहाणे प्राप्त जाहाले. तदनंतर सविस्तर वर्तमान श्रीमंत पंतप्रधान स्वामीस व तीर्थस्वरूपास विनंतीपत्र लिा तेथून अज्ञा आली की दोन च्यार महिणे दम धरून राहाणे. मागाहून सरदार त्या प्रांताच्या बंदोबस्तास येतील. त्याजला तुमचे मामलतीच्या बंदोबस्ताविशई उतम प्रकारे सांगितले जाईल ते आज्ञेवरून सरदारांची मार्गप्रतीक्षा करीत राहिलो

4212

तो रा। मल्हारराव सुभेदार आले ते प्रभारे जैनगरच्या मुलकांत गेले. मागाहून रा। माहादजी सिंदे येणार हे वर्तमान आईकोन रा। विठल जानराव आगाव उजनीस पा। की कदाचित हेहि त्याजकडेस जैनगरास गेले तर आपला बंदोबस्त होणे कलतच आहे. बकसी मारनिले येकमासपर्यंत उजनीत राहून मार्गप्रतीक्षा केली. त्यास रा। माहादजी सिंदे याचा प्रकार होणे तो हुजुरच जाहाला. फौज आणावयासी बकसी गेले म्हणून मुलकात व राज्यासी दबाव होता. त्याजला दिवसगत लागल्याणे इकडील दबाव सुस्त पडला. आम्ही तीन वर्षे कर्ज खाऊन लोकाचा दंगा सोसून राहिलो त्याचे फळश्रुत काहीच न जाहाली. आता कोन्ही कर्जहि देत नाही. मागल्या कर्जाचा तगादा सावकार करितात आणि सिलेदार व किल्याचे लोक वगैरे रोज उठोन हंगामा करितात. कोन्ही दिवस धरणीपारणी केलियाविरहित जात नाही. निमित्य खावंदास विनंती लिहिली आहे की इकडील बंदोबस्ताविशई ज्यास आज्ञा जाहाली असेल त्याजला समक्ष आमचे उपरालियाची आज्ञा करावी अथवा त्याजला साहित्यपत्रे पाठवावी की त्याचा बंदोबस्त आधी करून देणे म्हणजे सेवकाचे राहिल्याचे सार्थक व सावकाराचे व लोकाचे देण्यापासून मुक्तता होईल. खावंदावेगले कोण परामृश करणार यास्तव विनंतीपत्र सेवेसी लिहिले आहे. कृपावंत होऊन जेणेकरून सेवकाचा आब राहे तो अर्थ खावंद करणार समर्थ आहेत. बहुत काय लिहिणे हे विज्ञाप्त.

¶*Vishvasrao Lakshman appeals to Dadasaheb to send troops to restore order in his districts.*

No. 95] [*3-8-1765?*

श्री

राजश्रियाविराजत राजमान्य राजश्री रावजी स्वामीचे सेवेसी

पो। महिपतराव विश्वनाथ कृतानेक सा। नमस्कार विनंती. येथील कुशल ता। छ १९ माहे सफर मु। कसबे वारणावा येथास्थित जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असिले पाहिजे. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. लेखनार्थ अवगत जाहला. पाच हजार रुपयेची वरात करीत होतो. परंतु राजश्री नानानी[१] रदबदली करून राहविली आहे. त्यास रुपये सत्वर पाठवणे म्हणून आज्ञा.

---

१ नारो शंकर.

यैसियासी ठाणी उठली. येवज जमा जाहला होता तो पाठऊन दिल्हा. आम्ही लस्करांत बसलो आहो. येथे येवज कोणता आहे? लस्करांत रात्री चोरांची हुलड याजमुले होता येवज तो पाठऊन दिल्हा. तूर्त ठाणी बसवावी म्हणून सरकारचीहि आज्ञा आणि येथील सरदारानी सांगितले त्याजवरून छ १३ सफरी राजश्री दामोदरपंत समागमे पनास स्वार व शंभर प्यादे देऊन ठाणेस पाठविले. जमीदारासी सलुकच होता. ठाणे बसले. रोहिल्याचे दाहावीस प्यादे होते ते उठोन गेले. परंतु प्रगणेत बेतालिसी गांवात तेरा गाव वाचले आहे. त्यांत पाच गावचे जरीबे[1] केले होते. केवलच धाकटी (?) परवानगी वस्तीस राहून सेते करितात. त्याचा दाणा करार करून काही घेतला आहे. काही त्याजकडे राहिला आहे. घेतला दाणा तो घरात भरून ठेविला होता. निघावयाचे गडबडीत जेसा गेला तेसा दोन तिनसे रुपयेचा दिल्हा. बाकी तेसाच राहिला. त्याची गत काये जाहिली ते पाहवी. दाहावीस ठाणेत प्यादे न्यामतसिंगाचे होते. गेला राहिला दाणा कळेल. बाकी गावकर आहे. ते परगावी राहतात. गाडे पाठऊन देऊ. गला दिल्हा तरी उतम न दिल्हा तरी जबरदस्ती आसावी. तो विचार दाहा हजार फौज येथ आहे, परंतु यांचेनेहि काही होत नाही. तेरा गावापैकी पांचा गावची येसी वाट आहे. सात गाव व कसबा, त्यास कसबा तो अगदी मिलका आहेत, खालसा पाच सातसे रुपये रबीचे बसतात, त्यापैकी कांही वसूल जाहला आहे. बाकी राहिली आहे. ती माहाल हे बाकी करील तेव्हा आम्हासीहि घेणे. गावच्या रबीचा पैसा नाही. आम्ही जवल म्हणून निंमे दिल्हे. आतां सर्व बरोबरी घेणे. हा त्याचा स्वालजाब सात गाव जे राहिले ते पके गढीबंद आहेत. या फौजिसहि मानीत नाहीत. तोफा आसत्या तरी मानीते. आम्हापासी त्यांच्या वोली होत्या तेव्हाहि वोलीची अस्ता सोडली म्हणून बोलत होते. आता तो वोलीहि त्याच्या सुटल्या(ची) चिठी देऊन स्वार पाठविले होते. गावांत घेत नाहींत येथून तीन कोसावर दोघट म्हणून अजाचे प्रगणेचा गाव आहे त्याजवल मोकम करावयाविसी राजश्री त्रिंबक भास्कर व बगाजीपंत व अणखी सरदार आहेत. त्यास विनंती केली. परंतु त्यास अनकूल पडत नाही. तो गाव कांहीं तोफाविरहित बधत नाही. त्या गावची गुदस्ताचे रबीची जमा साडेसात हजार आहे. सालमजकूर पाच सातसे रुपये मात्र दिल्हे आहेत. पुढे वसूल विचार विचारे करीतच होतो. तोफा फौजेने आब तोडला. आता फिरोन गोष्ट सांगतात. त्याचप्रमाणे साती गाव गढीबंद आहेत. वसुलास

---

१ मोजदाद.

हजार बारासे तीन हजार पावतो आहेत. दोघट तो भारी आहे. परंतु बिना जबरदस्ती पैसा देत नाहीत यास उपाय काय करावा? ठाणे मात्र बसले. आम्ही येथे लस्करात अहो. येथून फौजेचे बले गावास तसदी करावी, जमीदार अणावे, या अन्वये बसलो. परंतु त्या गोष्टी येथे अगदीच नाहीत. बेतालीस गावात सात गाव जमेचे राहिले, त्याची वाट येसी आहे. आणि स्वामी तो म्हणतात जे पाच हजार रुपये देणे. त्यास येवज कोणता आहेत? गाव तेच सालसुदीने पैसा देते तरी दाहा हजार रुपये सरकारांत पाठऊन देता. प्रस्तुत आमच्या अनोपाय जाहाला आहे. ठाणेत जाऊन सिबंदी मात्र वाढवावी. वसुलाचे काम बंद जाहाले. तोफा आल्यातरी वसूल होईल, दबाव बसल. आणखी ठाणी राहिली आहेत ती बसतील. बुढाणेत ठाणे पोवाराचे आठ दिवस गेले आहे. परंतु गढीत रोहिलेचे प्यादे बसले आहेत ते निघत नाहीत. त्यास जबरदस्तीने काढावे तेहि विचार संकटातच आहे. कोठेहि दबाव बसेनासा जाला आहे. याजमुले गढीबंद गाव आहेत, ते बधत नाहीत. सारांश तोफा आल्यातरी काही कामकाज चालीस लागल. नाहीतरी काहीच होत नाही. ठाणी माघारी येतील. स्वामीस कलावे याजकरिता लिहिले असे. राजश्री त्रिंबक भास्कर यास आमचे साहित्याविसी सरकारचें पत्र अगत्यरूप पाठविले पाहिजे. बहुत काये लिहिणे. लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Mahipatrao Vishwanath, an officer of Naro Shankar, writes to Vishvasrao Lakshman of Jhansi, about difficulties in realising the revenue.*

No. 96] [*3-8-1765*

पौ छ २४ सफर.

श्रीगजानन.

श्रीमंत माहाराज राजेश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक खंडेराव रघुनाथ कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ १९ माहे सफर मुा अवंतिका क्षेत्र माहराजाचे प्रतापेकरून सेवकाचे वृत यथास्तित असे. यानंतर इकडील मजकूर तर रा॰ माहादाजी सिंदे यासी व सकूबाईसी भेट जाली. यानंतर फौजेची नालबंदी द्यावेयाचा करार उजेनीत होता. यासी यैवज माळव्यातील प्रगणेयाची पुढले सालाची रसदेचा जमा करून नालबंदी दिली. परंतु फौज मोठी व यैवज थोडका याजकरिता

जितकी फौजेची समजाईस जाली तितक्यानसी रा माहदजी सिंदे व सकूबाई पुढे कूच करून कोठ्या प्रांती अले. रा बाजी नरसिह व रावोराम व अच्युतराव दिवान यानी माघे राहून लोकाची कर्जे घेऊन समग्र लोकास समजाईस करून लस्करास जाणार होते. इतकियात रा माहादाजी गोविंद याजला तीन लक्ष रुपये देत होते ते न घेऊन इंदुरांस गेलेत व रा त्रिंबकपंत अबा व गोविंदराव हे उजेनीत होते व बाईची मोजमी याजला होती. यास्तव याजला माघारे घेऊन जायास्तव रा माहादाजी गोविंद हे माघारे उजेनीस अले व रा अबा व गोविंदराव याजला बरोबर घेऊन जावे. इतकियात गावकरासी व बिनेचे मनुशासी कजिया जाला. त्यास गावकर येऊन या त्रिवर्गाजवळ फरियाद जालेत. यानी त्या गोष्टीची सनद करून गांव मारले व लुटल्याचे नाव करून त्याजवरून आर्धरात्र समई दग्याने जाऊन खासिरापटी[१] खजान्याची त्यावर जाऊन पडले. लूट पुजकल हाती लागली व रा माहदाजी गोविंद याजला चार जखम लागले व परिनाम शांत जालेत. काही जुज जाले नाही व मग जाऊन हे त्रिवर्ग सिंद्याचे लस्करात गेले व कोठ्याची मामलत पंधरा लक्षावर चुकली. त्यापैकी तूर्त पवणे साहा लक्ष नगद व पोण लक्षाची हती घोडे वगैरे द्यावे याप्रा करार होऊन यैवज द्यावयास्तव रावो शंकर वगैरे मातबर गेले अहेत. यैवज वसूल जालियावर राजा खुद भेटावयास येणार व श्नेह भाऊपण करनार व राजेश्री मल्हारजी होळकर सुभेदार मोटेचे गडीस मोर्चे लाऊन बसले आहेत. फोज सात अठ हजार अहे. वडसेकरानी घेतली याजकरिता दबाव देत अहे. राजा मात्रागमनी आहे, यैकत नाही, सिंद्यासीहि वरचेवर बोलावतात व त्यास हेहि जाणार आहेत. मारवाडेची [अपूर्ण].

¶*Khanderao Raghunath informs Raghunathrao of the scuffle in which Mahadji Govind Kakde was killed.*

No. 97] [*23-8-1765*

श्री

राजश्री जानोजी भोसले सेनासाहेब सुभा

गो यासी.

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो रघुनाथ बाजीराव आसीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत

---

१ राहुटी.

4216

असिलें पाहिजे विशेष. आपण पत्राची उत्तरें पाठविली ती पावलीं. श्रावण वद्ये येकादसीस डेरे दाखल होऊन फौजेचा गाहा करितों म्हणोन विस्तारें लिहिलें ते कळलें. ऐशास श्रावण मासी निघावयाचे जालेंच असेल. याउपरी गंगाथडीस टोक्याचे सुमारे अविलंबे यावे. खासा स्वारीहि सत्वरच येत असे. सविस्तर राजश्री दिवाकर पुरुषोत्तम याचे पत्री लिहिले असे त्याजवरून कळेल. रा छ ९ रोवल.

¶*Raghunathrao asks Janoji Bhonsle to join him in his campaign in the North.*

No. 98] [*25-8-1765*

पौ छ ७ रावल

श्रीमोरया

शेवसी विज्ञापना. नवाब सुज्यातदौला यानी येऊन आनुपशहरचे मुकामी बहुत बाजीद होऊन दारमदार केला आणि फिरंगी याच्या पारपत्यास चलावे, आमचे साहायेंकरून पातशाही बंदोबस्त सर्व तुम्ही आम्ही मिळून करावा याप्रमाणे ठहराऊन गेले. (या)प्रमाणे आम्ही थोर मनसबियावर नजर दे(ऊन) इटावियाचे वगैरे काम सर्व येकीकडे ठे(ऊन) त्याचेच कामावर गेलो. रोहिले पठाणास * * * सामील करितो ते न आले. आपण मात्र येऊन सामील जाले. बिठुरीहून कूच करून जाजमहूस नेले. तेथून कुरा नजीक नजफखांन फौजसहवर्तमान त्यास तंबी करणे प्राप्त जाणून त्यासी गाठून हास्तगत केले. त्याउपरी मुकाम कुरियांसीच होते. प्रयागाकडून फिरंगी आलियावर लढाईचा प्रसंग पडला. करारापा पैसा येणे तो न आला. रोहिले पठाण येऊन सामील न जाले. सेवट काल्पीस बुनगे पावले तोपावतो बराबर आले. तेथे आम्हासी करार केला की मी फरोकाबादेस जाऊन पैसा आणितो आणि पठाण रोहिले याजला तुमचे सामीन करितो. आठा दिवसात फिरून येईन. आम्ही उचित जाणून त्यास आज्ञा दिल्ही. ते फरोकाबदेस गेले. तेथे आहांमदखांन पठान हाफिज रोहिले होते. त्यानी काही त्याचा सन्मान आगर जाबसाल सुधा न केला. सेवट त्यानी परिणाम जाणून याजकडील लक्ष सोडून * * शाहासच शरण गेले. तेथे इंगरेज वगैरे * * * * मारफातीने मुलाजमत केली. पातशा(हानी) सर्व त्याचा आन्याये माफ करून सर्फराजी

+ पत्र होळकराकडील.

केली. यानीहि नजरन्याज देऊ करून आपला प्रांत खेरीज प्रयाग चरनाल व कासी दरोबस्त सोडून घेतला. त्यांची मनुशे बरे * * हाफिजाचे जवल होती तेहि त्यांनी आपल्या सुभ्यांत नेली. येकूण रोहिल्याचे त्याचे आंतर शुध नाही. त्याजकडील त्रिंबकदास खत्री वकील आम्हापासी आहे. त्याच्या विद्येमाने कागदपत्र येतात की मी त्याजवेगळा नाही. त्यासी बोल्याप्रमाणे वर्तणूक करीन ऐसी मिष्ट भाशेण मात्र करितात. तूर्त आम्ही इकडे छयावणीस आलो. दोन तीन महिने बरसांत तोपावेतो सारा भाव निदर्शनास येईल. त्याप्रमाणे बादजबरसात उपयोगी मनसबियांची योजना हो(ई)ल. शेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Chandrachud reports the development in the North particularly the abject surrender of Shuja-ud-daula to the English.*

No. 99] [*11-11-1765?*

श्री

रामचंद्र तुकदेव जयनगर कार्तिक वा १२ रोज (गुा)

पादशानी डेरे बाहेर दिल्हे. सुज्यातदौले अयोध्येहून आलियावर ते व अमदखान वगैरे एकत्र होऊन आगरियास येणार. १

दिलीत पादशाहाजादा व जाबतेखान रोहिले आहेत. १

अनरुधसिंगाचा भाऊ रतनसिंग कानोडेस आहे. त्यानें रोहिल्याकडे पैगाम लाविला सबब माधोसिंगानें बक्षी वगैरे रा केले की त्यास तंबी देणे. नोकर सरकारचा पैगाम[2] लावीत फिरतो. सा १

सीख सरहंदेहून पुढे आले. कांही बुढ्या सारंगपुराकडे उतरले. जोहरमल जाट व सीख एक होणार. पैगाम आहे. १

फरासिसानें कलकता व मकसुदाबाद[1] घेतली. रोहितास गडास कजिया पडला आहे तो गड घेऊन काशीस येणार. इंग्रजावर दबाव पडला आहे. १

नजीबखान दहा हजारानसी हसीहसाराकडे येऊन भोवानी शहर मारिले. प्रस्तुत तेथेच आहे. नारनालेकडे दबाव दिल्हा आहे. मुलकाची खंडणी करितो सबब सिखाचा कजिया होणार. ते भारी आहेत भटनेरचा राजा व आला जाटाचे पुत्र रोहिल्याकडे येणार. १

माधोसिंग तरतूद करितात. चतूर (?) बोलाविले आहेत. १

अच्युतराव याणी उदेपूरची मामलत विल्हेस लाऊन पुढें आले आहेत

---

१ मुर्शिदाबाद. २ बोलणें, सूत्र.

रहिमतखां तुमतीजी (?) नवाब दाऊदखां पा। जाफराबाद येथें अड्डीच गांव दोन हजार तनख्याचे आहेत. थोडा आबाद, बाकी उज्याड असे. १

आपले वडिलानी आमचे वडिलांचे नांवावर चालविले. हालीहि बुर्जेर-गाचे[1] नावावर नजर देऊन चाल-विले पाहिजे.

हजरीस येणार. जोतपूरची मामलत करारात आणून बिजेसिंगाकडील निकाल जाला तर उत्तम नाही तर मारवाडांत धूम करणार. १

माधोसिंगाकडेहि पत्रें पाठविली कीं बाकीचा ऐवज देणें; नाहीतर धूम करितों. त्याणी उत्तर लिहिले कीं सुभेदाराकडे समजावणे. १

खिंडियाचा ऐवज चौथाई बाबती सरदेशमुखी मात्र करून सनद बक्षीस कीजे. १

रांडा वगैरे पाचसे माणूस उंपासी मरते, ते दुवा उपर दराजी करितील (? १

¶*Ramchandra Tukdev sends his daily report from Jaipur, about events in various places.*

No. 100] [*14-11-1765*

पौ छ ३ रजब सुा सीत

* * पौष्य

श्रीमोरया

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामींचे सेवेशीं।

विनंती सेवक मलारजी होळकर कृतानेक विज्ञापना येथील क्षेम तागाईत मार्गश्वर शुध १ प्रतिपदा जाणून साहेबाचे कृपादृष्टिकरून येथास्थित आसो विशेष. राजश्री गणेश संभाजी या प्रांती सरकारतर्फेने होते. त्याउपरी नानाप्रकारे प्रसंग पडले. सेवट दुंडीमुळे केवळ खराबीत आले. आम्ही ये प्रांती आलियावरी येऊन भेटले. त्याचा पुत्र राजश्री विस्वासराव गणेश देशास आले आहेत. ते साहेबाचे दर्शनास येतील. त्याचा गौर करणार स्वामी समर्थ आहेत. शेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Malharji Holkar requests Dadasaheb to entertain in his service Vishvasrao Ganesh, son of Ganesh Sambhaji.*

---

१ बुजरग = मोठे, थोर.

No. 101] [17-12-1765 ?

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक नारो बलाल भुसकुटे कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ ४ माहे रजबपावेतो स्वामीचे प्रतापेकरून सेवकाचे व प्रांत मजकुरचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीची आज्ञापत्रे आली त्यात आज्ञा की प्रगणे नेमावर येथील बंदोबस्त करणे आणि वस्तीहि करणे व होलकराकडे निमे तरफ आहे त्याचीहि जफ्ती करणे म्हणून आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणे प्रगणेमजकुरची होलकराचे तरफेची जप्ती केली. सरकारतर्फेची लावणी आबादीचे डौल केले आहे. दाहावीस गाव नवे अबाद होतील, होलकराचे तर्फेचीहि अबादीचा डौल करितो. होलकर याचे तर्फेची जमा तूर्त सवा दोन अडीच हजाराचा आकार आहे. सरकारतर्फेचाहि बामेपाणी तपा मिळून पाच हजार पावेतो होईल येसा प्रकार आहे. प्रगणा बहुत चांगला आहे. पिकांस उतम येसा प्रांत आहे. परंतु चोरामुळे वस्ती होऊ पावत नाही. चोराचे पारपत्य सिबंदी वेगळे होत नाही. सिबंदीची नेमणूक पहिली सिंद्याकडील तर्फ सरकारात घेतली ते समई पनास प्याद्याची करून दिल्ही होती. अतां दोन तर्फा जाहल्या. याचा बंदोबस्त पनास माणसानी होत नाहीं. इतकी माणसे तो कसबेयाचे ठाणे आणि जकातीचे नाके यावरी व तहसिलेस प्रगणातील लागतात, ठाणेबंदीस लोक राहात नाहींत. तस्कराचा तो बंदोबस्त ठाणेबंदी करून पारपत्य केल्याविना अबादी होत नाही. रयेत वसवास चोराचा खाते यास्तव सिबंदी पाहिजे. त्याची व ठाणेबंदीची यादी आलाहिदा पाठविली आहे. याप्रमाणे सिबंदी असल्याविना चोराचे पारपत्य होऊन लावणीचे डौल होत नाहीं. सांप्रत्य चोरानी उपद्रव मांडिला आहे. मौजे बासद्या पाा मजकूर येथील पाटील यासी धरून नेला आहे. यास्तव याप्रमाणे ठाणेबंदी करून बंदोबस्त करीतो. याची आज्ञा पाठविणार स्वामी समर्थ आहेत. तपे पाणीकाटा फो ड हा त पा सिंद्याचे तर्फेत होता. परंतु सिंद्यानी, प्रगणे उचोद हा माहाल त्याकडे माळव्यातील घाटावर आहे, तिकडे वसुलास सनिध म्हणोन लाविला होता येविसी पूर्वी विनंतीपत्रे सेवेसी लिहिली होतीं त्यावरून तेथील जमीदारास आज्ञापत्र सादर जाहाले त्याजवरून तेथे आमल बसविला. हाली सिंद्याकडील कमाविसदार उचोदास नवे आले. त्याणी राजश्री माहादजी सिंदे याच्या संदा आणिल्या आहेत आणि तपे मजकुरी माणसे पाठऊन खटखट करीतात सरकारचे

सनदेस मानीत नाही यामुळे रयेतीस बेरजा वाटतो. तेणेकरून वस्ती कैसी होती? यास्तव विनंतीपत्र लिहिले आहे. तरी येविसी सिंद्यास ताकीद होऊन त्याचे कमावीसदारास पत्र त्याचे येसे कीं तुम्ही तपे पाणियाची दखलगिरी न करणे. सरकारचे तर्फेने नारो बलाल अमल करितील त्यासी करू देणे. येसे पत्र त्याचे आल्याविना खटखट मिटत नाही व जमीदारास पत्र येसे कीं तपे मजकुरचा अमल सरकारचे तर्फेने नारो बलाल यासी सागितला असे. त्यास तुम्ही रुजू राहून कामकाज मारनिलेचे विद्यमाने करीत जाणे. सिंद्याचे कमावीस-दाराकडे येकंदर न जाणे. गेलिया मुलाजा होणार नाही येसे पष्ट समजोन सरकारचे अमलदारास रुजु राहणे येसे सरकारचे आज्ञापत्रं येकूण दोन पत्र पाहिजे. याची आज्ञा करणार धनी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Naro Ballal reports to Dadasaheb the administration of Nemawar newly taken over from Holkar and Sindia.*

No. 102] [*19-12-1765*

छ १ शाबान उर्फ माघ
सन सीत.

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक रामचंद्र तुकदेव चरणावरी मस्तक ठेऊन सां नमस्कार विनंति विज्ञापना. येथील क्षेम ताा पौश शुध ८ आस्टमी परियेंत साहेबाचे प्रतापेकरून मुाा सवाई जयेनगर येथास्थित असे. यानंतर साहेबी कृपाळु होऊन आज्ञापत्रे * * * ८ सफरचे मितीची सादर * * * * * सेवकास मार्गेस्वर वद्य ५ प्रविष्ट जाली * * * * बहुत आनंद जाला. पत्रीं आज्ञा सादर जाली की भारी फौज मातबर तोफखानियानसी त्या प्रांते खासा स्वारी जलद येत असे. तुम्ही तिकडील वर्तमान वरचेवरी लिहून पाठवीत जाणे म्हणोन आज्ञा सादर जाली. त्यासी येकोन चितास बहुत आनंद जाला. साहेब या प्रांते येणार हा दबाव या मुलकात बहुत पडत चालिला आहे. साहेबाचे प्रतापेकरून सर्व गोष्टी होऊन येतील. साहेबाचे आज्ञेप्रमाणे इकडील वर्तमान वरचेवरी लिहून सादर करीत असो. सांप्रत या प्रांतीचे वर्तमान तरी राजश्री मल्हारजी बावा सुबेदार व राजश्री माहदजी सिंदे पाटील साहेब सर्व फौजेनसी एका विचारे

होऊन झासी प्रांतीचा बंदोबस्त करून दतिया बोडशाची मामलत ठराऊन तेथील निशापात होत आहे. तेथून पुढे भिंड गोहदप्रांते कूच जाले म्हणोन वर्तमान निश्चये आहे. जाट नारहरसिंगजी बराबर आहे. त्याचा बंदोबस्त करून द्यावा हा करार जाला आहे. याजकरिता जोहरमल जाट याजवरी शेह दिल्हा आहे. जाबसाल लागला आहे. पैकियाचा निकाल करून दिलियास सलुख राहील. नाहीतर मुलकात सिरोन धूम करीत असो. त्याजवरोन जाट जोहरमल आपल्या जागा मनसुबियात आहेत. सिखांसी त्याचा पैगाम लागला आहे. गुरुचे सीख सरहिंद प्रांताकडून उतरले होते * * * * * फौज घेऊन पुढे पानिपताकडे * * * * * सीख चालोन आले. याची त्याची लढाई मातबर झाली. उभयेताकडील माणसे बहुत पडली. नजीबखान जागाच आहेत. सीख पार उतरोन गेले. ते जमाव येका जागा करीतात. भारी जमाव करून जाट आपण येक होऊन भारी मनसबा करावा हा विचार त्याचा आहे. जाट जोरमल आगरियात आहेत तेथ सर्व विचार होत आहे. राजश्री सुभेदारसाहेब पातशाह येक होऊन आगरियासी जाणार हा विचार आहे. पातशाह अलीगाहर याजकडून सहफुदीमहमद आले होते ते करारमदार राजश्री सुभेदारसाहेब यांसी करून पातशाहकडे गेले. येका जागा जालियावरी विचार पका करून पातशाह अलीगाहर यानी प्रयागीहून कूच करून दाहा बारा कोस आलीकड साहाराणपुरास आले. तेथूनहि पुढे कूच जाले. कुरा जाहानबादेस दाखल होणार. तेथून भारी मनसुबा करावा हा विचार आहे. नवाब सुज्यायतदऊले लखणुस आहेत व अहमदखान बंगस सर्वांकड पैगाम गेले आहेत. राजश्री सुभेदारसाहेब याची पातशाहची भेटी जालियावरी काये मनसबा होतो, सामील कोठे होतात, ते सविस्तर साहेबाचे शेवेसी लिहीत असो. राजश्री सुभेदार साहेब याचे कूच जाले म्हणोन वर्तमान आहे. निश्चये अर्थ अलिया सविस्तर लिहीत असो. विशेष पा(तशाह) जादा आहे. जाबतेखान सर्व बंदोबस्त * * * * * कड जाणार. जाटानी आपली फौज दिलीकड पाठविली आहे. रतनसिंग जाट ( ) राजे माधोसिंगजी याचेहि सरदेत धूम करीतात याजवरोन याच्या चितातहि त्यासी कजिया करावा येसे आहे. यानी आपली फौज दुलेराये बक्षी व जयेचंद व खानसामा याजबराबर आठ दाह हजार येका जागा करून कानोडेकडे पाठविली आहे. तेथे ठाकूर आनरुधसिंगजी याचा भाऊ रतनसिंग खंगारोत आहे. त्यानी बदमामली दाखविली त्याजवरोन त्यासी कजिथा करोन तेथ आहे. जाटाचेंहे सरदेवरी दबाव देऊन आहेत. पाहवे काये मनसुबा पुढे होईल. राजे माधोसिंगजी

आपले जागा विचार मनसबा आहेत. राजे हरसाहेजी व ठाकूर राजसिंग हमीरदेव दिवान बलचंदचा वर्ग बहुत पेश आहेत. सर्व कारभार त्याजवरी आहे. राजश्री सुभेदाराकडील मामलतीचा जाबसाल भट राजे सदासिवजी ठाकूर शामसिंग हमीरदे याचे विद्यमाने आहे ते निकाल फडशा करितात. साहेबाकडीलहि दबाव उतमप्रकारे पडत चालिला आहे. आज्ञापत्राचा अर्थ हुजूर जाऊन माहराज राजे माधोसिंगजी याचा मुनसी रामाकिसन याचे विद्यमाने निवेदन केला. सत्वर येणार त्यासी राजे माधोसिंगजी बोलिले की आम्ही सर्व प्रकारे मनसुब्यास सादर असो. राजश्री सुभेदार यासी सलुख केला हलकिस्तीचा येवज पावता केला. बाकी साहुकाराकड राहिली. त्याचाहि निकाल करून द्यावयाचा ताकीद ? * * * * * घरोबा सर्व प्रकारे सुभेदारासी * * * त्यासी स्नेहाने आसो. श्रीमंत साहेबाचे शेवेसी ल्याहावे म्हणून आज्ञा केली. त्याप्रमाने साहेबाचे त्याचे सांगितल्याप्रमाणे अर्थ लिहिला आहे. राजे माधोसिंग याचा विचार सर्व प्रकारे ममता संपादून घ्यावयाचा आहे. सर्व विचार साहेबाचे प्रतापाचा आहे. प्रतापेकरून सर्व होईल. राजश्री आचुतराव गणेश व राजश्री खानाजी जाधव दाह हजार फौजेनसी किसनगडानजीक मुकाम करून आहेत. वरकड उदेपूर शाहपुरा रूपनगर येथील मामलत चुकविली. निशापात होत आहे. किसनगडवाला बदमामली करीतो. त्याच्या गावावर दंगा आरंभिला आहे. किसनगडचा बंदोबस्ती पहवरसिंग करून आहे. त्यासी कजिया लागला आहे. गावे मारीतात. त्याजकडील तह बसल्या राजश्री पाटीलबावाकड जातील. मारवाडचा करार दाहा आलाकर्णी चारण करार करून गेले त्याप्रमाणे राजे बिजेसिंगजीनी कबूल केले. सलुखात आहेत. निकाल करून द्यावयाची तरतूद होत आहे. राजश्री अवचुतरावजी अजमेरीस बंदोबस्त करून याजकड दबाव देणार. येक दोन पत्रे आज्ञाधारकास पाठविली. त्यासी राजे माधोसिंगजी याजकडील कारभारी यानी राजश्री सुभेदार याजकड लिहिले आहे. त्याजकडील आज्ञा येईल त्याप्रमाणे वर्तनूक करीन * * * * * * येवजा तगादा करीता वर जाला * * * * * * * सिष्टाचार संपादून घेतील येसे वर्तमान होईल ते सविस्तर साहेबाचे शेवेसी लिहीत असो. जाट नाहरसिंगजी यानी आपले कबिले ढवलपुरी होते तेथून काढोन जयेपुरास पाठविले आहेत. राजश्री सुभेदारसाहेब यानी सरकारतर्फेने राजश्री जगनाथरावजी तेथे होते त्याजसमागमे राजे माधोसिंगजी यासी पत्रे देऊन पाठविले आहेत. कबिले त्याच्या ठिकानी बदनपुऱ्यात ठेऊन गौरसी करावी मनसुब्यास सादर व्हावे , त्याजवरोन जगनाथरावजी जाटाचे कबिले घेऊन जयेपुरास

आले आहेत. कबिले दाखल आलियावरी सर्व अर्थ लिहीत असो. राजश्री जगन्नाथरावजी याची मुलाजमत जाली. भेटी घेऊन नारहरसिंगजी याचे कबिले बासईसनिध आले. तेथून घेऊन यावयासी गेले आहेत. राज्याची भेटी जालियावरी काये सला विचार याजकडील भावगर्भ सर्व लिहीत असो. वरकड लाहोराकडील वर्तमान तरी लाहोरात सिखांचा बंदोबस्त आहे. पठाण खंदारात आहे. तेथ विचार मनसबा करीत असे. सिखांचा बंदोबस्त सरहिंदपावतो उतम जाला. पुढेहि धूम करीत चालिले आहेत. पुढे जे वर्तमान ध्यानास येईल ते लिहीत आसो. आज्ञाधारकास राजश्री सुभेदाराकडून येवज खर्चास देविला त्याचा * * * * * * त्याजकडून येवज पदरी पडे ते करावयासी साहेब धणी समर्थ आहेत. आज्ञाधारक आज्ञेप्रमानेच वर्तणूक करील. श्रुत जाले पाहिजे. विशेष काय लिहीणे. राजश्री जाणोजी भोसले याजकडील वकील आनंदरूप सिष्टाचार घेऊन आले होते. त्यासी सिष्टाचार संपादून राज्यानी माघारे वाटे लाविले. आम्हास बोलाऊन सांगितले की सिष्टाचार मात्र त्यासी वरकड विचार काही नाही ते लिहिले असे. कुफिया अर्थ ध्यानास आल्या लिहीत असो. साहेबाचे शेवेसी विज्ञाप्ति.

¶*The political situation in the North is the subject-matter of this lengthy letter from Malhar Tukdeo at Jaipur to Raghunathrao starting Northward. Reports of the invading Maratha army have greatly enhanced Maratha prestige. Jhansi and Orcha have been reoccupied and the army under Sindia and Holkar, who are happily in complete accord has advanced upon Gohad and propose to join issue with Jawahirmal Jat. The Jat's position being thus jeopardised there is likelihood of his seeking assistance from the Sikhs. The Emperor has expressed a desire to be reinstated in his capital with Maratha help. The Princes of Jaipur and Marwad also happen to be favourably inclined towards the Marathas.*

No. 103] *[1765?*

श्री

श्रियाविराजित राजमान्य राजश्री
मोरोपंत दादा स्वामीचे शेवेसी

पोष्य विठलराव सिवदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन केले पाहिजे विशेष. इकडील वर्तमान

श्रीमंताचे पत्री लिहिले आहे त्यावरून ध्यानास येईल त्याप्रमाणें पुढील तरतूद हिंदुस्तान राहे ते करावे. नाहीतर सर्व घेतला मुलुक जाऊन माळवा राहाणे कठिण जाले आहे. याची पैरवी श्रीमंतास सांगून करवावी. आम्ही सर्व प्रकारे आपले आहो. विस्तार ल्याहावा यैसे नाही. विशेष काये लिहीणे कृपा आसो दीजे हे विनंती.

¶*Vithal Shivdev requests Moropant Dada Phadnis to tender sincere advice to the Peshwa on the grave situation in the North.*

No. 104] [*1765*

पुा २

(पहिला बंद गहाळ.)

पंचवीस हजार रुपये सरकाराचे कारकुनाचे हवाला केले. बाकी पंच्याहत्तर हजार विसा दिवसानी सरकारचे कारकुनाचे पदरी पडतील व दोन लक्षाच्या हुंडी जलदीने येतात. अवरंगाबादेच्या जाल्या आहेत. तो येवज आनंदवलीस पावता करवावा. आम्ही त्रिवर्ग मजलदरमजल जाऊन सुभेदारांची व महादजी सिंदियाची भेट घेऊन येतो. गुता नाही. हे वर्तमान जुजाचे लिहिले हे येकून हजूरची मंडळी लटकेच म्हणोन नानाप्रकारचा मजकूर समजावितील इतराजी स्वामी करतील यामुले दुरुखा शह सरदारावर पडतो. तिकडून परचक्राचे जुज इकडून इतराजी खावंदाची त्यास पुढे नक्षाचा कोण? पूर्ण ईस्वरी क्षोभ तर येसे न करावे. या सरदारावर कृपा करावी. परचक्राकडून कल्यान इछावे याजमधे नक्ष खावंदाचा असे. सुभेदाराकडून किमपि तिलमात्र लक्षात अंतर नाहीं व माहादजी सिंदियाचे लक्ष पूर्ण रक्षावे हेच सुभेदार वडीलपण बोध करीतात. अनमानहि नाही. जलदीने खासा स्वारी कुमकेस यावे तो अर्थ खावंद करनार. रा॥ नारोशंकराचा प्रकार व सर्व वर्तमान रा॥ विष्णुपंत बाबाजी व रा॥ अन्याबानी विनंतीपत्रे लिहिली आहेत त्यावरून श्रुत होईल. कृपा करनार स्वामी समर्थ आहेत हे विज्ञास.

¶*The writer assures Raghunathrao (?) to place confidence in Mahadaji Sindia and Holkar whose loyalty, he says, is above suspicion.*

No. 105] [December 1765

+आमचा मुल्क खराब होतो त्याजवरोन राजश्री सुभेदारसाहेब यानी बहुत समाधानपूर्वक खातरजमा केली आम्ही इकडून जाटाचा मुल्क मारितो. फौजा रवाना केल्या. राजश्री अच्युतराव गणेश व खानाजी जाधव आठ दाहा हजार फौज किसनगडासनिध धूम करून होते. त्यासी ताकीद वरचेवरी पाठविली की तुम्ही जलद राजे माधोसिंगजी याचे फौजेस सामील होऊन बंदोबस्त राखावा. त्याजवरोन अचुतराव गणेश यानी खानाजी जाधव यासी मारवाडचे सरदेवरी ठेऊन आपण याच्या साहित्यास दरमजल इकडे आले. इकडील दबाव भारी देखो(न) जोहरमल जाठ यानी आपला वकील (फ़ाटले) देऊन राज्याकडे पाठविले * * * जाली राजे हरसाहे व ठाकूर राजसिंगजी * * * * माने जाबसाल श्नेहवाद संपादून नवल * * * * खावत यासी घेऊन जाटाकडे गेले दबाव उत्तम प्रकारे देखोन जोहरमल जाट यानी रुरुचे सीख माघारे बिदा केले. आपण काही फौज पाच सात हजार समागमे घेऊन कुंभेरीस गेले. गुरुचे सीख आपल्या मुलकास गेले. नवलसिंग याचे विद्यमाने कारभार विल्हे लागला. राजे माधोसिंगजी याची फौज कानौड नजीक मुकाम करून आहे. येथहि नगदी फौज ठेवावयाचा विचार जाला होता. राजश्री अच्युतरावजी फौजसहवर्तमान फागाई सनिध आले होते. त्यासी सीख माघारे गेले. त्याजवरोन ठाकूर राजसिंगजी याजबराबर हथी, घोडे, सिरपाव, जवाहीर, रकम सिस्टाचार काही मेजमानी पाठविली. तेथूनच सिस्टाचार करून माघारे वाटे लाविले. पुढे भेटीस बोलाविले होते परंतु लस्कर अनिवार, मुल्कात धूम करीत रबी चारितात त्याजवरोन तेथून निरोप देऊ(न) मार्गस्त केले. ते अच्युतरावजी टोंकेसनिध होऊन इंद्रगडाकडे गेले. करोलीहोऊन राजश्री पाटीलबावास सामील होतील. राजश्री सुभेदार साहेब व पाटीलबाबा फौजासहवर्तमान ग्वालेरीपलीकड पंधरा विसा कोसावरी आहेत. गोहदच्या गढ्या च्यार पाच घेतल्या. फौजा सब्धा आगऱ्यापरियेंत धूम कारितात. मुल्क मारितात. जाटाचा मुल्क खालशा करावा. नाहरसिं(ग) याचे साहित्य उत्तम प्रकारे करून त्या * * * * * * बस्त करून * * * * विचार आहे. चमेल उतरोन * * * * * फौजसहवर्तमान सुरजेकडून आलीकड * * * * सत्वर फौजेस सामील होणार. त्याच्या राजश्री सुभेदारसाहेब याच्या भेटी जाल्यावरी सविस्तर आर्थ लिहीत आसो. जाठ

+ पत्र रामचंद्र तुकदेव यांचें.

जोहरमल आपल्या जागा तरतूद करीत असे. फौजा ढवळपुराकडे पाठविल्या आहेत. आगरियाचा बंदोबस्त केला. इकडे आपल्या मुलुकात फिसाद पडल याजकरिता माघारे इकडून गेला. पुढे काय तरतूद आर्थ ध्यानास येईल ते सविस्तर साहेबाचे शेवेसी लिहीत आसो. राजे माधोसिंगजी याच्या मुलुकात बहुत बखेडा गुरूच्या सिखाचा पडला होता. साहेबाचे प्रतापे करून प्रस्तुत दूर जाला वरकड (अपूर्ण)

¶*Ramchandra Tukdev's letter referring to a battle between Jawahirmal Jat and Madhosing in which Maratha aid was solicited by Madhosing.*

No. 106] [*1765 ?*

श्री

सेवेसी विज्ञापना. काल आज्ञा जाली त्याप्राा विस्वासराऊ लक्षुमणविठल सिवदेव यांचे गोटास गेले. तेथून कारकून मध्यस्त किल्यात गेले. त्याचे जाबसालाकरिता मार्गप्रतीक्षा केली. अद्याप जाबसाल आला नाही. परभारी हला करावा तरी बेमानी दिसेल यास्तव करतां नये म्हणून हला आजचा दिवस राहिली. मुहुर्ताचा समयहि टलला. याउपरहि जैसी मर्जी असेल तैसे स्वामीचे आज्ञेप्राा होईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The note refers to an assault on a fort in Malwa.*

No. 107] [*1765 ?*

श्री

[पहिले दोन बंद गहाळ.]

पुरवनी साहेबाचे शेवेसी.

पातशाहकडील वर्तमान तरी पातशाह अलीगोहर कुन्यानजीक घाटपूर तेथ मुकाम करून आहेत. फिरंगी पाच हजार बराबर आहेत. आनखी फिरंगी येणार त्याची मार्गप्रतीक्षा करितात. नवाब सुज्यायदउले आपल्या सुब्यात लखणऊस आहेत त्याचा यावयाचा विचार काही नाही. मातबर सरंजामासिवाये

पुढे कैसे यावे याजकरितां तेथ मुकाम करून आहेत. राजश्री सुभेदार साहेब यासी पेगाम आहे तो आहे. जाबसाल मात्र आहे. फिरंगी सामील जालियावरी पुढे (कू)च करावे हा विचार मात्र आहे. आहमदखान बंगस आपल्या जागाच आहे. सुभेदारासी घरो(बा) बहुत आहे. राजे माधोसिंगजी यासीहि घरोबा बहुत आहे. कागदीपत्री मात्र वरकड प्रसंगी आनकूल येकासी येक हा विचार घडत नाही. वरकड मारवाड प्रांतचिा विचार तरी राजे बिजेसिंगजी आपल्या जागाच आहे. राजश्री खानाजी जाधव यानी नाव गाव मातबर होता तो मारला. पुढे धूम आरंभिली आहे. पाच सात हजार फौज जमा केली आहे. आजमेर राजश्री गोविंद कृष्ण याचे हवाला केली. त्याचा बंदोबस्त जाला आहे. मारवाडची मामलीत निकालात आली नाही. खानाजी जाधव पुढे सिरले आहेत. पुढे काये बंदोबस्त होईल ते लिहीत असो. येथील मामलितीचा विचार तरी हालाकिस्त केली होती त्याप्रा रोख तनखा हुंड्या दिल्हा त्याचा निकाल करून देत आहे. ताकीद दिवान मुसदी यासी बहुत जाली आहे. राजश्री सुभेदारानी साहित्य केले त्याजवरोन विशेष ममता संपादून घ्यावी, कारभार विल्हे लाऊन द्यावा हा विचार आहे. साहेबाचाहि दबाव बहुत पडला आहे. राजश्री माहादजी सिंदे पाटीलबावा यानी बाकीचा तगादा लाविला त्याजवरोन त्याच्या यैवजाची हुंडी पाठविली आहे. त्याचाहि यैवज निकाल करून द्यावयाची तरतूद लागली आहे. मुख्य सलुखे वर्तावे हा विचार आहे. दीर्घसूत्री कारभार. होऊन येईल ते खरे * * * * * सीद होते चरससिग आटक * * * जाऊन. त्यानी धूम केली तेथ * * * लढाई उतम घेतली चरससिंग कामास आला. हे वर्तमान आजी दरबारी यैकिले ते लिहिले आहे. सविस्तर पके वर्तमान तिकडील ध्यानास आलिया साहेबाचे शेवेसी लिहीत असों. साहेबी कृपालु होऊन यैवज राजश्री सुभेदाराकडून देविला तो हातास येत नाही. साहेब कृपालु होऊन सांभाळ करावयासी धणी साहेब समर्थ आहेत. लग्नामुले कर्ज जाले. त्याची वोढी बहुत. सर्व प्रकारे सांभाल केला पाहिजे. बगसिंग चंदले साहेबाचे तरफने येथ खालिता घेऊन आले त्याची भेटी राजे माधोसिंगजी याची करऊन सिस्टाचार सिरपाव देऊन बिदा केले. येथून पुढे जाठाकड जाणार. येका दो रोजात कूच करून गेलियावरी साहेबाचे शेवेसी लिहीत असो. विशेष काय लिहिणे? कृपा वरधीमान केली पाहिजे हे विज्ञापना.

¶*This news-letter describes the situation in Northern India giving movements of various powers—the English, Jats, Rajputs, Sindia, Holkar, and Khanaji Jadhav. It also refers to a skirmish in which one Charassing lost his life.*

4228

No. 108] [End of 1765

श्री

सेवेसी विनंती विशेष इकडील वर्तमान तर श्रीमंत बराणपुराहून कूच करून हांडेयाचे घाटावर नर्मदातीरी आले. मकडाईचे ठाणे हस्तगत केले होते. फिरोन कालीभीत मकडाईवाल्याची व निमे मुल्क ऐसे सरकारात घेऊन मकडाईचे ठाणे फिरोन त्याचे त्यास दिल्हे व जुगराज म्हणोन नर्मदेतच ठाणे चिरेबंदी चांगले मजबूद भिलांकडे होते ते घेऊन सरकारांत ठेविले. राजश्री माहादजी सिंदे याणी नर्मदातीरी भेटी यावे ते आले नाही. राजश्री नारोशंकर याणी पांचलक्ष रुपयाचा भरणा सरकारांत केला. तो ऐवज त्यास द्यावा तो दिल्हा नाही. नारोशंकर येथे करारमदार करून गेले त्याप्रमाणे माहादजी सिंदे यानी चालावे तेहि जाहाले नाही. त्यावरून सिंद्याचे मुलकाची जप्ती करावयास राजश्री खंडेराव बंलाल याजबराबर पांच हजार फौज देऊन रवानगी केली, तों मल्हारजी होलकर यांचे पत्र आले कीं इकडे मोठी मोठी कामे करावयाचीं आहेत, लाहानसाहान कामासाठी गुंतो पडतां तर न पडावे. जवाहीरमल जाट याणे मल्हारबासी लबाडी केली. त्याचे पारिपत्य करणे जरूर. अनयासे माधवसिंगाचा त्याचा बिघाड होता. लडाई परस्परे जाहाली. जाटाची फौज मोडिली. त्यावरून यांसहि थोडेसे बल फावले. त्यास महादजी सिंदे व मालजी होलकर यांस पुढे फौज देऊन जाटावर पाठवावे लागतात. भेटीस नर्मदातीरी पाठवावे तरी इकडील मोठे मसलतीची कामे बुडतात. स्वामहि जवल आल्याने जसी मर्जी असेल त्याप्रमाणे भेटतील. स्वामीबराबर मातबर फौज तोफखाना याचा खर्च असेल याजकरितां येथेहि खर्चाची निकडच. परंतु सावकाराची मैनोती[१] करून कर्ज तीन लक्ष रुपये घेऊन सिरोंजेस भरणा करविला आहे. तेथे स्वार पाठऊन घ्यावे. आणखी उदेपूरवाल्याकडून पांच लक्ष रुपये देविले आहेत तेहि लवकरच प्रविष्ट होतील. त्यावरून मर्जी थोडेसी फिरली. राजश्री विष्णु महादेव व सदासिव गंगाधर व सर्व कारभारी याणी अर्ज करून तूर्त जप्ती राहविली (अपूर्ण)

¶*The letter reports that Raghunathrao who has started north, has been asked to press onward with all possible speed, as hostilities have broken out with the Jats.*

---

१ रोख पैसे देतांना केलेली कपात.

No. 109] [*1-1-1766*

पौ छ १९ रजब सन सीत

श्री

विनंती उपरी. श्रीमंत राजश्री सुभेदार साहेबाचे कूच्य मांघ[१] वद्य ९ बुधवारी जाले. सिंदनदीचे तीरास मुा आहे. राजश्री मालजी होळकर मुा मजकुरी येऊन दाखल होनार; आम्ही समागमे आहोत. प्रस्तुत सरदारासी गोहदचा शह आहे. पांच येऊन रदबदली करितात. रांगडे अंगासी अंग लागल्या-खेरीज देहावर येत नाहीत. थोडकियाच रोजात गोहदेचा प्रकार उरकल. उपरांतिक भदावर कछवावारचा बंदोबस्त कर्तव्यांत आहे. प्रसंगानरूप घडून येईल. तुम्ही झासीचा बंदोबस्त उतम रीतींने राखून बहुत सावधपणे असणे. बुरजाचे काम किती जाले, राहिले किती हे तपसीलवार लिहिणे. हवेलीचे काम पडले झडले नीट करावयाबदल समक्ष सांगितले होते. कारखाना भारी आहे. हवेलीची मरमत[२] येथास्थित करून पूर्ववतप्रमाणे सिध करणे. आनखी जागा लाखलिंप करावयाची ते करणे. शहरची चौकी पाहाराची खबरदारी व दिवसाची मार्गाची चौकी ठेऊन मार्ग सुरळीत चाले. दिवसेंदिवस झासींचे वस्तीची मोठी भरभर आहे. रात्रंदिवस जपून चौकी पाहरियासी कोठे नून्य न पडे तो प्रकार केला पाहिजे. वोडसेकराकडील वर्तमान आणोन लिहीत जाणे. वोडसे झासी-मधे वाटेस खतरा जाला. त्याची तहकिकात खंगारासी सांगोन ठिकाणीं लावावी लागते. शोध पुर्ता करून ठिकाणीं लागे ते करावे. होमाच्या साहित्या-विशाई पूर्वी तुम्ही लिहिले होते, त्याप्रमाणे साहित्य तुम्ही केले असेल. कदाचित काही साहित्य करणे राहिले असेल तर पत्र पावताच होमाचे साहित्य यादीप्रमाणे करून होमहवन करून उरकून घेणे. दिवसेदिवस गोष्ट मागे पडते, ऐसे न करणे. आधी उरकून घेणे. से पनास रुपये दोनशा वरते जरी करेल तरी करून सांग नीटनेटके विध्य होय ते करणे. सामग्री साहित्य आहेच. दक्षणा तूप तील वरी लागतील ते लाऊन तीनशामधे करणे. लक्ष्मणभट तात्या समक्ष सांगणे ते सांगितलेच आहे, त्याप्रो करणे, चुना करावयाची चाके दोन तीन लावणे. येक दुसरे वोडशाहून आलेच असेल. येखादे तुम्ही तयार करणे. काम ज्यारी करणे. बुरुजाचे वगैर तपसीलवार वर्तमान लिहून पाठवणे. शंकर किल्याचा बुरूज भरीव करणे. मोरजंग्याची उतम ठेवणे. काम पुख्त करणे. छ १८ रजब. जे जे काम नवे केले ते आपन सांडस्वार यासी दाखवणे. शहर आबाद लौकर होये ते करणे. चौकी पाहारा स्वारी सिकारी करवीत जाणे हे विनंती.

¶*This appears to be the order of Vishvarav Lakshman to the Governor of Jhansi. He orders some sacrificial fire to be worshipped.*

१ दक्षिणेंतील पौष वा ५. २ दुरुस्ती.

No. 110] [3-1-1766

श्री

सेवेसी धोंडो खंडेराव विज्ञापना ऐसीजे. यथ गतवर्षी पातशाने व फिरंगियाणी सर्वापासून दंड रुा घेतले. ते समई सेवकापासून व समस्त ब्राह्मणापासून जबरदस्तीने रुा घेतले. हे सर्व वर्तमान सेवेसी लेहून पूर्वी तपसीलवार पाठविले होते. सांप्रत येथे फिरंगी आहेत. फिरंगियाकडून नवाब सुज्यातदौला आहे व राजे बलवंतसिंग सर्व मुलुकात अमल करितात. सर्व वसूल करून रुा फिरंगियांसी देतात. श्रीकासीयात्रेस सर्व लोक तिकडून येतात त्यापासून च(व)की व जकात जिलाची (?) बहुत दर असामीस घेतात व बहुत श्रम देतात. ती आपत्य पत्रीं लिहितां पुर्वत नाही. सर्व कासीद सरकारचे यांसी विदित आहे. चवकी पाहारा वगैरे उपद्रव बहुत देतात. यास्तव कृपा करून सर्वास थैल्या पाठवाव्या कीं यात्रेचे निकासीविसी रा धोंडो खंडेराव सांगतील त्याप्रा यात्रेस उपद्रव न लागता सुखरूप जाऊ येऊ देणे. हरयेकविसी सरकारचे वाडियांत राहतात. जे कार्य सांगून पाठवितील ते करून देणे. कोणे गोष्टीविसी उपद्रव लागो न देणे. दंड रुा सर्वापासून घेतले ते याचें विद्यमाने फिरोन देणे. याप्रमाणे पातशाहास व फिरंगियासी व सुज्यातदौला यासी व राजे बलवंतसिंगास याप्रमाणे सिफारसपत्रे पाठविणार स्वामी समर्थ आहेत. खासा स्वारी वराड प्रांती आली म्हणौन येथे अवाई बहुत पडली आहे. राजकारणे सर्वाकडील येऊन सेवकापासी रुजू जालीं आहेत. सुज्यातदौला व राजे वेणीबाहादूर त्याचे दिवाण यांणी स्वामीस थैल्या दिल्ह्या त्या रा गोविंद दादाजी व भोजराज शंकर व आत्माराम रंगनाथ त्रिवर्ग कारकुनासमागमे पूर्वी सेवेसी पाठविल्या आहेत. सेवेसी पावतील. फिरंगियाखेरीज सर्व राजेरजवाडे येऊन सेवकापासी रुजू जाले आहेत. वरचेवर सेवकास मनातील मनोदये लेहून पाठवीत जावा त्याप्रमाणे सर्वासी बोलले जाईल. फिरंगी कलकत्त्यात पूर्वी होते. सांप्रत समुद्रातन फरासीस जाहाजे घेऊन व तोफा घेऊन वीस तीस हजार जमेतसुधा येऊन दाखल जाले आहेत. त्यासी यांसी कजिया लागला आहे. फरासीस लडावयासी जबरदस्त आहेत. फिरंगियाणी मुलूक फार घेतला आहे. सुभे दोन मारून गारत केले आहेत. यास्तव फिरंगियासी बहुत गर्व जाला आहेत. अशात सत्वर खासास्वारी आली तरी उभयेतापैकी येकास हातीं धरून बंगाला सहजात घ्यावा ऐसा मनसुबा सेवकास दिसोन आला. तो लिहिला असे. आथवा नवाबास हती धरून पातशाही बंदोबस्त करावा. पातशाहांत जोर तिलमात्र नाही. आपण दिली तख्त घ्यावे हा योग दिसोन येतो. परंतु आधी बंगाला

सर करावा मग दिली प्रांती जावे. बंगाल्यात सर्व भ्रममात्र आहे. चहूकडून त्रिवर्ग कारकून सांगतील त्याप्रा फौजा बंगाल्यात सरकारच्या आलियावर सहजात बंगाला हातास लागेल. आधी काही फौज कटक प्रांती भोसल्याचा अमल आहे तेथे सिवभट साठ्या त्याजकडून आहे. त्याजपासी वीस हजार फौज सरकारची पाठवावी. खासा स्वारी श्रीकासीचे रोखे यावी. अंतरवेदीतून होलकर सिंदे यांणी यावे म्हणजे सहजात बंगाला हातास लागतो. येथे सेवकास कर्जदार निकड बहुत करितात व चिरंजिवाचा व्रतबंध जरूर केला पाहिजे. या संकटापासून दूर करणार स्वामी समर्थ आहेत. रा पौश वद्य ७ शुक्रवार हे विनंती. कर्जदार बहुत दिक करीत होते म्हणौन सरकारचे कासीद ठेवले होते. रा हुंडी हातास आलियावर कासीद रवाना केले. सेवेसी कलावे हे विनंती.

¶*Dhondo Khanderao reports to the Peshwa the extortion to which the pilgrims at Benares are being subjected by the English, Shuja and Balvantsing and requests him to undertake the conquest of Bengal and Delhi.*

No. 111] [*Written on 25-12-1765*
[*Despatched on 3-1-1766*

श्री

तीर्थरूप राजश्री दादासाहेब
वडिलांचे सेवेसी

आपत्ये धोंडो खंडेराव चरणावर मस्तक ठेऊन सिर साष्टांग नमस्कार विनंती. येथील सेवकाचे वर्तमान ता पौश शुध्य १३ त्रयोदशी मंगलवारपावेतो श्रीकासीमध्ये स्वामीचे आसीर्वादेकरून सुखरूप असे विशेष. कृपा करून आनंदवली नजीक नासिक येथून आसीर्वादपत्र मुजरद कासीद जोडीबराबर सेवकास पाठविले ते श्रीमध्ये मार्गसीर्ष शुध्य पौर्णिमेस पावले. हुंडीपत्र निवल रुो सत्रासे सतर याची हुंडी पावली व पूर्वी रा नागोराम भागवत व वो रो कोनेरभट अयाचित याचे विद्यमाने पत्रे पाठविली तीहि पावली. त्याचे कलमवार जाबसाल कलमे सुमार.

हुंडीचे रुो सतरासे सतर मुदती प्रा सेवकास पावले परतु सावकारानी कर्जाचे व्याजामध्ये नले. बहुत साव-

राजकी वर्तमान सर्वत्र फिरंगी याचा अमल आहे. पातशाहाकडे माणिकपुरी आहे. गाडदी फिरंगी

कारानी मला व वो रा धनराज दीक्षितास श्रम बहुत दिल्हे ते पत्री लिहिता पूर्वत नाही. सेवटी सर्व रुो व्याजात नेले. बाकीचे तीस हजार रुा कर्ज मागावयासी निकड केली ते पत्री कोठवर ल्याहावी? सर्व अजमास देऊन यात्रेसमागमे रा गोविंद दादाजी व भोजराज शंकर व आत्माराम रंगनाथ तिघे कारकून सेवेसी सर्व अजमास हिसेब देऊन पाठविले आहेत व कितेक राजकारणी पत्रे व औशधे कासिराम व्यास वैद्य याची पाठविली आहेत. सेवेसी मागाहून येऊन पावतील. सकल येथील कचेपके सेवकाचे वर्तमान विदित करतील. चिरंजीव साता वर्षाचा जाला आहे त्याचा व्रतबंध जरूर केला पाहिजे. येथे सरकारची आश्रित मंडली बहुत. ब्राह्मण भोजनास व किरकोळी दक्षेणस रुो बहुत लागतील. तीस हजार येथे ब्राह्मण आहेत. च्यार पैसे दक्षणा दिल्ही तरी बहुत रुा लागतील. याखेरीज भोजनखर्च वगैरे खर्च बहुत लागेल. कर्जदार श्रम बहुत देतात व लोक निराले हसतात की सत्वर व्रतबंध कां करीत नाहीत? यास्तव पहिले सेवकाचे अनंत आपराध क्षमा करून सकल संकटापासून दूर करणार स्वामी समर्थ आहेत. कर्जापासून मुक्त करावें व व्रतबंधास जरूर खर्चास पाठविणार स्वामी समर्थ आहेत. सरकारचे वाडियात याकडील तीन हजार आहेत. तुरक-ार तीन च्यार हजार आहेत. फिरंगियाचे कैदेत आहे. श्रीप्रयागी किलेयात अमल फिरंगियांचा आहे. कुरा ज्याहानाबाद वगैरे येथील मुल्हकमात्र पातशाहास फिरंगी याणी भक्षावयासी दिल्हे. ते घेऊन बाहवल्याप्रो पातशाहा आहेत. वरकड अंतरवेदीत रोहिले पठाण आहेत. दिलीकडे पातशाहा जाणार म्हणौन अवाईमात्र आहे. पुढे जाऊ देत नाहीत व फिरंगी जाऊ जाऊ मात्र म्हणतात परंतु इतका जोर नाही. होलकर व सिंदे वगैरे यांणी झासीचा किला घेतला. वरकड बुंदेलखंडातील मामलती करून तिकडेच आहेत. बालाजी गोविंद कालपीस आहेत. कोण्ही अंतरवेदीत येत नाहीत. सर्व मार्ग खासास्वारीचा पाहातात. सुज्यातदौला आयोध्या प्रांती आहे. त्याचे दिवाण बेणीबाहादूर व राजा बलवंतसिंग सर्व फिरंगियाचे दहशतीने आपल्या जागे धरून बसले आहेत. राजा तरी फिरंगियासी पैसे देतो. नवाब आयोधे प्रांती आहे. बाहेर सर्व फिरंगियांपुढें कांही चालत नाही. मनातून स्वामीची इछा करितात. फिरंगीखेरीज करून सर्वांची सूत्रे सेवकापासी आली आहेत. मागाहून त्रिवर्ग कारकून सर्व थैल्या घेऊन येतील. ते विनंती करतील त्याप्रा राजकारणे सेवकाकडे पाठविल्याने

स्वामीचे नाताची मुंज होईल सर्व राजेरजवाडे येतील यास्तव खर्च बहुत लागेल. प्रथम नाताची मुंज आहे. मर्जीस येईल ते पाठवावे कलम १

सरकारकिफायत उतमं होईल. सर्व येश येणे हे स्वामीची कृपामात्र पूर्ण पाहिजे. वरचेवर मनातील मनोदये सेवकास लेहून पाठविला पाहिजे त्याप्रा सर्वासी बोलेले जाईल कलावे कलम १

‿–दोन कलमे लिहिली आहेत मागाहून सर्व तपसीलवार विनंतीपत्रे त्रिवर्ग कारकून घेऊन सेवेसी येतील. त्याचा सांभाळ करणार आपण धणी वडील समर्थ आहेत. सर्व तपसील कोनेरपंतास लिहिला आहे त्यावरून निवेदन होईल. सकल संकटापासून दूर करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काये लिहिणे हे विनंती. फरासिस बंगाल्यात समुद्रातून आले आहेत. त्यासी व फिरंगियांसी लडाई लागली आहे. काये होईल हे न कले. अशात लस्कर येणे होईल तरी उतम आहे. रा पौश वद्य ७ शुक्रवार हे विनंती.

¶*Dhondo Khanderao to Raghunathrao, asking for more money for his son's thread ceremony which, he says, will be much expensive owing to the large number of Brahmins at Benares. The news about the growing power of the English in Bengal and the submissive attitude of the Emperor, Suja and Balvantsing is also communicated by the writer.*

No. 112] [*Recd. 5-1-1766*

पौ छ २३ रजब सनसीत

पौषमास.

श्री

विज्ञापना स्वामीनी पत्रे पाठविली ती पावली. भेलशांच्या वराता जाल्या यामुळे शब्द लाऊन लिा त्यास श्रीमंतास विनंती केली. परंतु आज्ञा जाली कीं ऐवज जाला तर देतील, नाहीतर नाही. त्यावरून केल्या. आता विठल सिवदेव येथें आले आहेत. निशा कसी होते ते जालियावर लेहून पाठवीन.

राजश्री बज्याबाचा मजकूर आपाचे सरंजामाचे गाव पाा भामेर येथे आहेत त्यापैकी तीनगाव जप्त, तीन हजार रुपयाचे करून हणमंतराव तमाजी कारकून सरकारचा पाठविला. आपा आल्यावर काय होईल ते लिहून पाठवीन.

एकूण तीस हजार चुकले, येविसी स्वामीनी लिहिलेल्यावरून उतर पाा ते पावलेंच असेल. चुकले खरे; परंतु सरासरी पाहता तोटा येणार नाहीं. शागीर्दपेशाने बाद देणे त्याची वरात याउपरी पुण्यास होत नाही. कळावें.

कोकण बराणपु(र)चे मजकुराची पत्रे श्रीमंतानी पाहून उत्तरे लिहिली आहेत त्यावरून कळेल.

नीळकंठ महादेव याचा काल जालियाचे वर्तमान लिा ते कळले. सरंजामाचे वगैरे कांही तूर्त घालमेलीचा मजकूर तूर्त काही नाही. बाजद लढाई होईल ते पाहावे.

कृष्णराव पारसनीस सावकाश नाहीं म्हणोन शहरास गेले. तेथें काल जाला असे वर्तमान येथे ऐकिले. चांगला माणूस राज्यांतील गेला. सर्व प्रकारें घरच बुडाले. श्रीसत्ता प्रमाण. हे विज्ञापना.

चिटको मल्हार याचे असामाच मजकूर लिहिला तो कळला. विनंती करून मागाहून लिहून पाठऊं. श्रीनिवासाचार्यें रोजमरेयांचा मजकूर लिहिला तो कळला. मागाहून विनंती करून होईल तें लिहून पाठऊं.

बाबा मोघे याचे वरातेचा मजकूर विनंती करून लिहून पाठवीन.

महिपतराव चिटनीस याचा संरजाम थोरल्या श्रीमंतानी जप्त केला. फौज नाही आली सो इतराजीत आहेत. सर्फराजीहि होईल. तूर्त पेचात आहेत. आमोदचे रुा त्याजकडे येणे ते पुण्याचे खर्चास आहेत. मागाहून काय ठरेल ते लेहून पाठऊ.

¶*Haripant explains to Nana Fadnis remittances of money due from Bhelsa. He also mentions some other items—the death of Krishnarao Parasnis and the confiscation of the Saranjam of Mahipatrao Chitnis.*

No. 113] [*6-1-1766 ?*

श्री

श्रिया विराजित राज-

...न्य राजश्री बाबूरावजी

स्वामींचे सेवसी.

पोष्ये गोपाल मुकुंद कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील ताा पौष वद्य १० पावेतो मुकाम जयपूर येथे सुखरूप असो विशेष. आपणापासून आम्ही निरोप घेऊन येथे आलो. त्यास येथे सर्वास भेटलो. वर्तमानहि सरदाराकडील सांगितले. कागदपत्रहि दाखविले त्यावरून येथे जाबसाल सर्व आपल्याकडील

फकीरबावा करितात. हे राजश्री धोंडो गोविंद याच्या मर्जीस येईना तेव्हां त्याणी भटजीकडील व बोहाराजीकडील सर्व सोडून व आम्हासहि टाकून पेरोजखान येथे मुसाहेब जाहाला आहे त्याकडेस लाविला आणि आम्हासी तफावत ठेऊ लागले. तेव्हा हे वर्तमान भटजीस कलले. ते आम्हास पुसो लागले. आम्ही यास पुसो लागलो. हे न सांगत तेव्हा आम्ही व बावानी विचार केला की कोणीकडून तरी जाबसाल होऊ. परंतु येथे पाहातां धोंडोबानी आपला मतलब करून घ्यावा आणि सरकारी जाबसालास ठिकाण नाही. तेव्हां आम्ही येथे (आज)पर्यंत बसोन खराब होऊन दोनी नाहीतसी दिसते. यास हे वर्तमान श्रीमंत राजश्री दादास लिहोन पाठवावे ते पाठऊ. परंतु तूर्त येथे जवल सरदार असतां लांब पा(ठ)वावे म्हणोन तुम्हास लिहिले आहे. येथील अधिकारी याच्या विचारे जो जाबसाल आम्ही बोलून आलो आहो त्याप्रमाणे या सरदाराच्याच विद्यमाने श्रीमंताकडेहि जाबसाल करणे तो करावा व सरदारहि राजी राखावेसे आहे. त्यास तुम्ही लिहाल त्याप्रमाणे येथे बंदोबस्त करू. याविसीचे वर्तमान राजश्री बापूजी नाईक सेव्यास आम्हीहि लिहिले आहे व राजश्री आपाजपिंतानीहि लिहिले त्याप्रमाणे बंदोबस्त करावा. तेणेकडून सरकारी जाबसाल पटतो. कलावे. सेव्याबाबत रुपये व उंटापाौ आम्ही तेथे द्यावे याप्रमाणे बोलून आलो तेव्हा येथेहि त्याप्रमाणे फकीरबावा व आम्ही मिलोन भटजीस व बोहोराजीस पल्यावर आणून रुपये द्यावे व याप्रमाणे केले असतां हा उतकर्ष साहावेना तेव्हां वकिलानी हा बखेडा केला. मग आम्ही काय करावे? आम्ही येथे आल्यावर रुपये च्यार हजार आपल्या खर्चास घेतले व आम्ही तुम्हाकडे आलो होतो तेव्हा दोन हजार रुपये फकीरबावानी देविले होते. यैसे सारे सा हजार रुपये घेतले आणि जाबसालाचा विचार पाहातां या रितीचा आहे. वरकड याविसीचे वर्तमान तपसीलवार राजश्री आपाजीपंतानी उभयता सरदारास लिहिले त्याप्रमाणे आपणहि बोलून बंदोबस्त करून पाठऊन द्यावा म्हणजे त्याप्रमाणे येथे फकीरबावा व आम्ही उभयता जाबसाल करून घेऊ आणि सर्वहि बंदोबस्त सरदाराच्या मर्जीनरूप व श्रीमंताच्या आज्ञेप्रमाणे बंदोबस्त करू. कलावे बहुत काये लिहिणे. आपणास लिहिले आहे. या जाबसालास आलस करू नये. कृपा लोभ करीत गेले पाहिजे हे विनंती.

सेवेसी आपाजी नारायेण कृतानेक साष्टांग न विनती.   निलेनी लिा आहे याचा बदोबस्त

कागद चिटणीसाकडे कलू देऊ नये.

¶*Gopal Mukund to Baburao (Phadnis?) writing from Jaipur complains against Dhondo Govind, Peshwa's agent at the same place. The actual point in dispute is not clearly mentioned; nor can the letter be properly dated.*

4236

No. 114] [24-1-1764

पौ छ २८ शाबान

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक विठल सिवदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुशल ताा छ १२ माहे साबान स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. स्वामीनी कृपा करून येक दोन पत्रे पाठविली होती त्याची उत्तरे आली कीं येदाचे साल स्वारी करून येणे. याप्रसंगी राहाणे योग्य नाही. त्यावरून दौलतीस उपयोगी व स्वामीची मरजी जाणून राहिलो. जे सेवा धण्याच्या पुणे होईल ते खरे. परंतु गतवर्षी मोगलावर सेवा जाली ते स्वामीस विदित आहे. आमची सरफराजी करावी ते उलटा सरंजाम काढला. मग चाकरीमेहेनत कोणी करावी येसे नवते. परंतु दौलतेवर पेच स्वामी चिरंजीव रक्षावी येसे जाणून सेवेस आलो. गतवर्षाचा भरतीस येदांचा येवज गेला. कर्जहि मिलत नाही. तरी फौज जमा जाली ते परस्परे सेवेसी विदित होईल. तीन हजार निवड फौज जमा जाली. गैरवलणे रोजमऱ्यास पैसा नाही. स्वामीची कृपा असल्यास ईश्वर प्रांत[1] लाविला पुढ पाये दृष्टीस पडतील तो सुदीन असे. चिरंजीव नरसिंगराव स्वामीपासी आहे. स्वामी कृपा करीतात त्याहावे येसे नाही. सेवेसी शृत होय हे विज्ञापना.

¶*Vithalrao Shivdeo pleads his inability to undertake a new expedition as he has not been fairly treated.*

No. 115] [5-2-1766 ?

श्री

श्रीमंत राजश्री बावा स्वामीचे सेवेसः।.

स्नो सदाशिव बलाल सां नमस्कार विनंती येथील. कुशल ताा माघ वाा १० बुधवार मुाा फरुखाबाद येथास्थित असे. स्वामीची आज्ञा घेऊन उदेपुरी कर्ज येणेबदल स्वामीची ताकीद राा गोविंद कृष्ण याचे नावे व प्रधानाचे नावे नेली होती. त्यास राा गोविंद कृष्ण तर तेथे नवते. प्रधानास पत्र देऊन येक आसामीवर तीस हजार रुपये होते, पैकीं दाहा हजार त्याणें

---

१ शेवट.

देऊं केले. त्यामध नकद व जिनस मिलोन रुपये ३००० रोख दिल्हे; व सात हजार रुपयाकरितां येक राऊत त्याणी ठेऊन घेतला. आम्ही जलदी करून नवाब कायेमखाजीकडे आलों. मागून चिरंजीव वासदेव स्वामीचे शेवेसी येऊन ताकीद दुसरी रा। गोविंद कृष्ण यांचे नावे पाठविली होती. इतकें वर्तमान आले. त्याउपरी उदेपुरीहून येक रुपया न आला. पंनास हजार रुपये मुदल येणें; परंतु याप्रकारचे वर्तमान तेथील आहे. स्वामींस विदित व्हावे याजकरितां लिहिले आसे. दुसरे वर्तमान स्वामींनी व राजश्री पंत प्रधान स्वामींनी नवाबास पत्रें लिहिलीं. त्यामध्यें शेवकाची सोयरेधायरे येसी पूर्वी लिहिली होती; त्याप्रो। राजश्री नारो शंकर याणी लिहिले कीं श्रीमंताचे सोयरे आहेत त्यावरून दोनशे स्वारांचे दोन आमीर येमुनापावेतो नगारा शुत्री[1] व अस्पी[2] येसे सामोरे आले. शेवकानेही जरूर जाणोन पंनास साठ राऊत नवे चाकर ठेऊन, नगारा अस्पी व निशान भगवे करून नव गाऊ येमुनापार आपले अंमलात आहें, तेथून येमुनेचे दक्षणतीरी त्यांची भेटी जाली. त्याउपरी च्यार पांच मजल आमचे तैनातीमधे फरुखाबादपावेतो आलों. दोन कोश शहर राहिलें. तेंव्हा प्रधान बक्षीश श हजारी मनसबदार त्याचा भाऊ व सलाबतखान व्याही येसे दोघे आणीक सामोरे आले. त्यास प्रथम दिवशी महमूदखान कुल अखतियार दिवाण आहे त्यांची भेटी जाली. मेजमानी निराळी आली. त्याउपरी वसंत पंचमीस उतम मुहूर्त होता, ते दिवशी नवाबाची भेटी जाली. तेंव्हा नवाबहि उठोन भेटले. बहुत कृपा करून सर्व वर्तमान पुसिले. त्यास शेवकाने स्वामीचे जुबानी सांगितले की मोठा वास्ता येथे यावयाचा, श्रीमंत राजश्री बाबाहीं तुमचे येखलास वृद्धि व्हावी बदल येजमानास विनंती करून पाठविले. त्यावरून स्वामींसी बहुत खूश जाले. तेच दिवशीं मेजमानी नवाबाची आली. आता कांहीं खर्चाची तजवीज त्याणी केली आहे तेही आज उद्या येईल, त्याउपरी लिहिले जाईल. परंतु स्वामीकडील मुनशीनें कांही अधिक उणे आमचा मरातब लिहिला होता, त्यास हस्तदोश सांगून गोष्ट उडविली. आतां मसवदा पाठविला आहे त्याप्रो। लिहिलें पाहिजे कीं श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे लिहिल्यासी व स्वामीचे लिहिल्यासी येकवाक्यता दिसोन येईल. पहिले स्वामींनी शमशेरखानाचे नावे पत्र सरकारचे देविले होते, त्यास शमशेरखान आता घरीं बसले. कारभार कुल अखतियार महमूदखानाचा आहे. स्वामीचे येक पत्र नवाबास व येक पत्र महमूदखानाचे नावे येसी दोन थैलीत घालून लाखोट्यावर मोहर करून खुलाच पाठविला पाहिजे.

---

१ उंटावरचा   २ घोड्यावरचा, (फारसी) अस्प = अश्व.

डीग येथे वाचून पाहून लाऊन देऊं. परंतु दोनही पत्रे खुलींच पाठविलीं पाहिजेत. व चिरंजीव वासदेवपंत रायाजी पवार याजपाशीं होते ते गंगेकडेस आहेत कीं स्वामीचे शेवेसीं आहेत हे लिहिलें पाहिजे. विशेश काये लिहिणे कृपा वृधि केली पाहिजे हे विनंती.

¶*Letter from Sadashiv Ballal, who appears also in the regime of Bajirao and who is mentioned as being related to the Peshwa by marriage and who is sent on a mission to the Bangash Nawab of Farrukhabad. The paper mentions the hospitable reception given to the embassy by the Nawab. The addressee Bawa may be Gangadhar Yashwant Chandrachud.*

No. 116] [*10-2-1766*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री गोपालराव गणेश कादार
पा नेमावर स्वामी गोसावी यासी

सेवक नारो शंकर कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहिणे विशेष. तुम्हाकडून पा मजकूरचा ऐवज येत नाही म्हणौन विदित(जाहाले) तरी साल गुाची बाकी सनवात(?) बाकी सुधां साल मजकूरचा ऐवज झाडियानिसी चिरंजीव राजश्री विश्वासराऊ याजकडे भरणे. याउपरी दिरंग लाविलिया उतम नाही. रा छ २९ साबान बहुत काये लिा हे विनंती.

¶*Naro Shankar asks Gopalrao Ganesh Barve to pay off the dues to Vishwasrao Lakshman without any delay.*

No. 117] [*Date of Receipt 12-2-1766*

पौा छ रमजान सन सित
फालगुन अशेरचा मुकाम

श्री

शेवेसी विज्ञापना. मनसबियांचे प्रकार अगोधर शेवेसी लिहिलेच आहेत. स्वकार्य साधून पैसा मिलणे आणि बंदोबस्त होणे. मनसबे तीन, येक पातशाहास अपल्यापासी आणून दिलीस तख्तावर कायम करावे, मग जाटाकडील

4239

रोहिल्याकडील वगैरे मुलुख खालसा आहे तो सोडऊन मुलुक पैसा मिळेल तो निमेनिम घ्यावा, आपला मुलुक साबीक दस्तुर सोडवावा हे काम थोर व लौकिकाचे आहे त्याची तजवीजहि केली असे. मोगलाई कारभार सुस्ती बहुत, दिवस थोडे राहिले, बनोन येईल त्यास चुकत नाही. परंतु तूर्त पैसा नाही व आपली कामे डौलाखाली होतील ते मात्र करावी वरकड, बंदोबस्त जालिया सहजात होतील. दुसरे कार्य आहमदखान बंगस व हाफीज उभयेतास नतीजा देऊन आंतरवेद सोडवावी. आर्थसाधन होईल ते करावे. हे कार्य जरूरीचे आस्ताहि बुंधेलखंडचे कामामुळे आजपर्यंत गुता जाला. प्रस्तुत ग्वालेर प्रांतात गोहदे-नजीक आलो. पछोरचा निर्गम केला. गोहदकराचा जाबसाल लागला आहे. येथील व भिंडेचा मजकूर उरकोन हरयेक मनसबा कर्तव्य. हांगामाचे दिवस घरच्याच कामात गेले. हेहि करणे आगत्य जाणून सरकारी मुलुक कमबेश येका क्रोडीचा सुरलित जाला. उभे राहावयासी आपल्या लोकास ठिकाणे मुस्तकीम जाली. झासी मोट व किरकोली व मजबुत ठाणी उपयोगी बहुत सुटली. काही तहाने आली. कोण्ही बदमामली केली त्यासी तोफा लाऊन पारपत्य पुरते करून स्थल हस्तगत केले. यणेप्रमाणे तमाम बंदोबस्त देखील डंघाईचा जाला. श्रीनगरचे ठाणे मात्र हस्तगत होणे तेथेहि प्रस्तुत राजश्री गंगाधर गोविंद त्याज-समागमे तोफाची रवानगी केली आसे. बुंधेलखंडात छावणी व आलीकडे साल आखरीस आले तेव्हा जागा कायेम होऊन सरकारच्या मामलेदाराचा आमल करून दिल्हा. येवजाचाहि दारमदार त्यांचे मारफातीनें ठहराऊन जिमा यांचा केला असे. आम्ही यावछक्ति श्रमसाहास करून पूर्ववतप्रा जागा सोडऊन देखील ठाणे जात सुरलित करून दिल्हे. यावर मनास आणून बंदोबस्त करणे. करारापमाणे पैसा घेणे येख्तियार खावंदांचा आहे. या कार्यामुळे आंतरवेदचे बंगस वगैरे कामास दिवसगत लागली. आत:पर गोहदचे काम करून हरयेक थोर मनसबा करावा या तजविजींत असो. तिसरे काम जवाहीरसिंगाचे. तूर्त तोच रूख आहे. आणि पैशाचीहि जागा याप्रा दुसरी नाही. येविसी राजे माधोसिंग यांची पत्रे वारंवार येतात. ते आनकूल व नजीबखानास तो फारच इष्ट त्याचे सरलभाव पहिल्यापासून आहेत. येकदोन वेळा विनंती पत्री लिहिली आसे. नाहरसिंग आपल्यापासी. हे त्यांचे घरातील मूल व सर्व जाट यांसी राजी राजकारणे राखितात. उपयोगी आहेत. त्याजकडून आपला येवज कराराचा येणे. पुढे ही पैशास ठिकाण जाला पाहिजे. या लक्षावरी तिकडून पातशाहाकडील जाबसालहि तेथेच आणविला. त्याजला आगरे हस्तगत करणे चहुकडून तजवीज करीतच आसो. गोहदेचे काम करून चमेल उतरता म्हणजे

सर्व निदर्शनास येईल त्याप्रमाणे जाटाचे पारपत्याची तजवीज केली जाईल. पैशाची जागा यासारखी दुसरी नाही. जसे नेट पडेल तसा पैसा आकारून येईल. येकूण तीन मनसबे आहेत. सरकार कामामुळे इकडे गुंता पडून दिवस थोडे राहिले. श्रीइछेने व खावंदाचे पुण्यप्रतापेकरून राहिल्या दिवसात यावच्छक्ति होईल त्यांत आंतर होणार नाही. शेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶Gangadhar Yeshwant explains the three objects that directed the policy of his master, Malharrao Holkar, in the North after the disaster of Panipat. The first, that has now been achieved, was the reconquest of Bundelkhand which offered a sure basis to strike further North. To reduce the growing power of the Jat and punish the treacherous Rohillas are the other two aims which now engage his attention.

No. 118] [*Recd. 12-2-1766*

पौ छ २ रमजान सन
सीत सितैन फाल्गुन मुा अशेर

श्री

सेवेसी विज्ञापना. खासा स्वारी दो महिनिया अलीकडे हिंदुस्थानात येते, खर्चास लौकर असिरीच्या सुमारे पाठवावे, आम्ही छावणी कोठे करावी, च्यार रुपये आकार कोणे ठिकाणी होऊन सविस्तरे ल्याहावे. सारांश आर्थसाधन होऊन कासी प्रयाग व सो[१]बीक मुलुक हस्तगत व्हावा, मातबर तोफखाना जंगी सामान आहे. आपली पत्रें न आल्यामुळे तिकडील मजकूर ध्यानास येत नाही अथ:पर सर्वदा पत्र पाठवीत जावी म्हणौन आज्ञा. ऐसियासी खासा स्वारी जलद यावयाचे विदितच होते. आत:पर दिवस राहिले नाहीत. भोसल्यांकडील वगैरे ते प्रांतीचे गुंत्याकरितां फालगूण मास लागेल. पुढे छावणी कर्तव्य नर्मदे-अलीकडे येमुनाचेमलपावेतो जागा आपली कौलीच आहे. कोण्ही किरकोळी राहिले असतील ते येताना सरल होतील. चितास येईल तेथें छावणी करावी. देशीहून गुंता उरकल्यासारखे सोईप्रमाणें छावणीचीहि योजना होईल. ऐवजाचा मजकूर तर एक दोन वेळा सेवेसी लिहिला आहे. आल्यादिवसापासून लढाई खेरीज आठवडा लाटला नाहीं. फौजा व तोफखानियाचा खर्च भारी.

---

१ पूर्वील.

माहालाचा ऐवज व कांहीं स्वारीपैकी मिलोन स्वारीखर्च पुरा पडता प्रयास जाला. मागील देशी नालबंदीबाबद येवज लोकाचा देणे. सिवाय हलीं बुंदेलखंडात छावणी करून अलीकडे साल अखेरीस आले. केवळ कर्जासी संमध. एक स्वामीकार्यावर दृष्ट देऊन नाना प्रकारच्या आफती सोसून मुलुक जागा कायम केल्या. संस्थानिकाकडे कांही दारमदार केला. त्यापैकीं घासदाणियाचा मात्र ऐवज घेऊन वरकड जिमा मामलेदाराचा करून देत गेलो. खाईखती दंड समान यामुळें पैसा कारस्थानीने कराराप्रमाणे देतील. निकस करावयासी कमी केली नाहीं. पैसा उत्पन्न होऊन रवाना करणे यापेक्षां विशेष काय ? यावर मामलेदारांनीं निकड करून कराराप्रमाणें ऐवज घेऊन सरकारात पावता करावा येविसी ताकीद केली आहे व हाजुरीहूनहि व्हावी. वरकडहि तजविजीस अंतर जाले नाहीं. सर्व खावंदाचे ध्यानांत आहे. उदेपूर येवजी दहा लक्ष देविले. त्यापैकीं एक लक्ष रुपये सरकारांत रवाना जालियाची पत्रे आली. फिरूनहि ताकीद करीतच आहो. आगमागे त्या ऐवजास खता नाहीं. शह दूर पडल्या-मुळे येवज निपजतो तो परभारेंच जातो. सकारांतूनहि ताकीद असावी. गोविंदपंत सरकारचे मामलेदार सालस जाणोन त्याजवर इतबार दिल्हा. इकडून कोण्ही ठेविल्यानें फितूर होईल या अंदेशे बोल्ह लागल यास्तव त्याच्या मनोगतान-रूप नेमणूक वगैरे करून देऊन रवानगी केली. सर्व फरशा करोन घेतो म्हणून करार केला आस्तां परिणाम या प्रकारचा जाला. त्याचे पुत्र हुजूर आले ते तो ऐवज आम्हाकडे दिल्हा म्हणतात. त्यास आमचा प्रा पुढे व रामपुरियाचे तालुके त्याजकडे इजारा त्याचा ऐवज दरसालचा झाडून द्यावा, त्याची बाकी दाहा रोजांत निर्गम करून द्यावयाचा करार करून गेले असतां निमे पैसा दिल्हा नाहीं आणि हली नजरेच्या ऐवजातून पैसा वसूलात न आला. लाख रुपये मात्र सरकारांत पाठविले. सारांश त्याजवर शह पडल्याने पैसा येईल. वरकड थोर मनसबे घडोन आलिया मुलकाचा वगैरे बंदोबस्त होऊन पैश्यास जागा होईल. मातबर तोफखाना जंगी सामान सहवर्तमान स्वारी हिंदुस्थानांत येणे विहि(त)च आहे. इकडील वृत पैदरपै शेवेसी लिहीत गेलो. पुढेहि जाले वर्तमान वरचेवर विनंती पत्रें रवाना होतील. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Gangadhar Yeshvant in reply to Raghunathrao says that he may encamp anywhere in the North upto the Chambal as the whole province has been brought under subjection and that he (the writer) has issued instructions to all Mamledars to collect the revenue dues and to pay them into the Government treasury.*

4242

No. 119] [19-2-1766

श्री

शेवेसी त्रिंबक कृष्ण दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना येसीजे. बातमीचे वर्तमान तरी जवारसिंग जाठ छ ६ रमजानीं कुंभेरीहून कूच केले. भरतपुरी आलेयानंतरी भरतपुरचे बागांत वाग होता त्याची सिकार करून वाग मारला आणि सायंकाळीं किला दाखल जाहला. किल्याचा बंदोबस्त करविला आणि छ ७ रोजीं दीडप्रहर दिवसास कूच करून कुंभेरीस गेले. सबब की मुलनामोर्सीम याची बिदा केली नवती आणि वागाचे सिकारीकरिता जलद आला. वागास मारून माघारा गेला. हतीची लडाई करणार होता. याजकरितां माजोरी हती तयार करून आणिले परंतु लडाई केली नाही. जलद गेले. आणि येक जोडी हतीची मात्र थोडीशी लडविली, नी गेलेत. शिकार खेळत वाटेन गेले. सायंकाळीं दिवस मावळतां कुंभेरीचे किलेयांत दाखल जाहले. लोकांचे मजुरे होऊन दोन घटका बसोन जणानखानेयात गेले. ते सकाळचे तीन घटका दिवसास उठले. रात्रीस गिलज्याकडील बातमीचे पत्र आले तें प्रातःकाळीं वाचिले. त्याचा मजकूर की गिलज्या बियास नदीवर आहे. सीक लागले आहेत. आणि शहानें नजीबखान रोहिल्यास खलते पाठविले कीं सात वर्षाचा पैका घेऊन येणें. त्यास नजीबखान याणे आपले जागां विचार करीतां पैका तो नाहीं आणि रिकामे जातां बरें होणार नाहीं. याजकरिता रामेरयाचे घांट येमुनापार थोडीसी फौज मात्र उतरली आणि शहास लिहिले की येतों. याजप्रमाणे तेथील वर्तमान आले आहे. जाठाचे वकील दिलीस पावले आणि महंत शडुल पडवल येथें आहे. याजप्रमाणें तिकडील वर्तमान आहे. यानंतरी जवारसिंग सकाळीं उठोन घोडी फेरली आणि दरबार जाहला. दानसाहा वगैरे मजुरेयांस आले. मजुरे होऊन जाठाने किलेयाची मरामत जलद करवितो आहे. आणि किलेयात घांसदाणा वगैरे सरंजाम जलद करविला आहे. याजप्रमाणें साहेबांस कळावें. शेवकाजवळ कासीद नाहींत तरी पाठवावयाची आज्ञा करावी, आणि खर्चासही नाहीं तरी साहेबीं पाठवावयास आज्ञा करणार धणी समर्थ आहेत. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञाप्ति. रा छ ९ रमजान.

¶*Trimbak Krishna Kanitkar, the Peshwa's agent at Bharatpur, quoting a diary kept by Javahirsing Jat, describing his favourite pastime of hunting. Incidentally the writer reports the contents of a letter from the Abdali to the Jat Raja.*

No. 120] [22-2-1766

पैा छ १२ रमजान सन सीत

श्री

विज्ञापना[+] श्रीमंत राजश्री दादासाहेब हिंदुस्थानांत गेले. पूर्वी लिा आहे. श्रीमंताच्या व मोगलाच्या भेटी याच तलावर जाल्या. काल येकादसीस श्रीमंत मोगलाचे डेऱ्यास गेले होते. आज नवाब येथे येणार. परस्पर रसायण चांगले जाले. पंधरा लक्षांची जागीर मोगलास दिल्ही. माहाल मागाहून लिहून पां. दोन च्यार मुकाम येथे होतील. तदोतर घाट चढोन वरती फौज येईल. श्रीमंताचे मानस विसाजीपंत बिनी याजसमागमे फौज लाऊन आपण गंगाति(रा)स जावे. कोकणात वसईकडे जावे असे आहे. घडेल ते लिहून पाठऊ. हे विज्ञापना.

¶*Haripant Phadke writes about an interview between the Peshwa and the Nizam and the departure of Raghunathrao to the North.*

No. 121] [28-2-1766

पैा छ २७ सवाल.

मुा

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे शेवेसी

विनंती. सेवक रामचंद तुकदेव चेरणावरी मस्तक ठेऊन साा नमस्कार विनंती विज्ञापना. येथील क्षेम ताा फालगुण वद्य ४ चतोर्थीपरियेंत साहेबाचे प्रतापेकरून मुा सवाई जयेनगर येथास्थित असे. यानंतर * * * * आज्ञापत्री * * * * * * * बहुत होतो. त्यासी परस्परे वर्तमान आले कीं राजश्री जाणोजी भोसले येऊन भेटिले. इकडील बंदोबस्त उतम जाला येकोन चितास बहुत आनंद जाला. साहेब पूर्ण प्रतापी आहेत. साहेबाचे प्रेतापेकरून सर्व गोष्टी होऊन येतील. या प्रांती यावयाचा दबाव बहुत पडत चालिला आहे तर कृपाळु होऊन सविस्तर अर्थ लिहून सांभाळ करावयासी साहेब धणी समर्थ आहेत. वरकड या प्रांतीचे वर्तमान तरी गुरुचे सीख दसासिंग व तारासिंग व शामसिंग येसे चार पाच सरदार यानी पंचवीस हजार फौज जमा

+ सबंधपत्र हरीपंत फडक्याचे हातचें.

करून पाणिपतासनिध नजीबखान रोहिले यांसी युध्यप्रंसग करून त्यासी दबाऊन थोडीबहुत मामलत करून पुढे दिलीकडे आले. जाट जोहरमल याजकडील पैगाम त्यासी होताच रामकीसन अहीर पुढे पाठऊन फौजेस खर्चास द्यावयाचा कराररमदार करून पुढे येऊन येका विचारे मनसुबा भारी करावा हा डौल धरून त्यासी घरोबा केला. त्याजवरून गुरुचे सीख फौजसुधा दिली प्रांती धामधूम करून पुढे रेवाडीकड येऊन रेवाडी खालशा केली. खनते लाऊन गाव खानोन लोकाचा बहुत तसनस केली. राजे नागरमल बहुत दुख पावले. त्याची जाहगीर, काही उपाये चालिला नाही. येथून पुढे जयेपूर प्रांतात सिरोन धूम केली. * * * * * येऊन सामील जाले. याच्या त्याच्या भेटी * * * * * * * * * * व जयेचंद खानसामा पंधरा हजार फौजेनसी * * स लागले होते. त्यानी इकडील दबाव पडला त्याजवरोन पटाईत ठाकोर रतनसिंग खंगारोत यासी पैगाम लाऊन त्यासी आपलेसे करून गड्याचा असरा धरून मोर्चेबंदी करून सिखाचे फौजेवरी शेह देऊन त्याच्या मुकाबिल्यास सात आठ कोसी होते. सिखाची फौज भारी त्यानी मुलखात धूम बहुत केली. त्याजवरोन राजे माधोसिंगजी यानी राजश्री सुभेदारसाहेब व राजश्री माहादजी सिंदे पाटील साहेब याजकड पैगाम लाविले.

(*Incomplete*)

* * * *

¶Ramchandra Tukdeo reports that the Sikhs defeated Najib and have advanced as far as Delhi, pillaging Madhosing's territory round Rewadi on the way. The Rajputs while strengthening themselves in their forts have called in Sindia and Holkar to their succour.

No. 122] [*19-3-1766*

पौ छ ९ सवाल

श्री

सेवेसी सदासिव गंगाधर कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल चैत्र अधिक शुध्ध ९ पर्यंत मुकाम सिरोंज स्वामीचे कृपावलोकने सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जालो ते मजल दरमजल मुकाम मजकुरी आलो. येथूनहि दर मजल राजश्री माहादजी सिंदे यास आणावयासी जात असो. ऐसियासी सिंद्याकडून रा सिवाजी विठल आले ते मुकाम मजकुरी भेटले. यानी तेथील मजकूर सांगितला कीं श्रीमंतानी जसी केली होती ते तेथ कळली नाही. परंतु सिंद्याचा भाव सर्व प्रकारें श्रीमंताच्या लक्षाव्यतिरिक्त नाहीं.

क्षेपनिक्षेप भेटीस येत होते. त्यास राजश्री माहादजीबावाचे लग्न फाल्गुन वद्य ९ स जाले. उपरांतिक यावे तो जाट तीस हजार फौजेनसी रूपहासावर अल्याचे वर्तमान आले. रा सुभेदाराकडून तावजी कदम दोन तीन हजार फौजेनसी बातमी करिता गेले होते. त्यासी जाटासी गाठ पडली. त्यानी कदमास सारिले. सेदोनसे माणूस पडले. त्यावरून सुभेदारानी तीाा राजश्री तात्या व सिंद्याकडून बाजी नरसी यासमागमे बारा तेरा हजार फौज देऊन रवाना करून आपणहि गोहदपासोन पाच सा कोस पुढे गेले. राजश्री माहादजीबावास आत्याग्रहे राहाविले कीं आठा रोजात जाटाकडील मजकूर कैसा घडोन येतो त्याजसारिखी तुमची श्रीमंताकडे रवानगी करू येैसे बोलून राहविले त्याजवरून राहिले. सुभेदारांचे लक्षहि स्वामीचरणी विशेष. श्रीमंतानी सत्वर यावे येसे बोलतात म्हणून कितेक तपसिले सांगितले. त्याहीवर आम्ही भारी मजला करून दिवस न लागता सत्वर जाऊन पोहचतो. तेथे गेल्यानंतर स्वामीचे पुण्यप्रतापेकरून सिंद्याकडील व राजश्री सुभेदाराकडील जाबसाल अमलात आणून सिंद्यास सेवेसी घेऊन येतो. वरकड वर्तमान राजश्री विष्णुपंतानी विस्तारे लेखन केले आहे त्याजवरून ध्यानास होईल. स्वामी अवतारस्वरूप पुण्यवान तेजाने दाबाने मनसबे चितात धरले ते सेवटास जातात. स्वामीनी आज्ञा केली त्या प्राा जाऊन राजश्री मल्हारजी बावाची मर्जी स्वामीसी ठीक राखितो आणि सिंदे घेऊन येतो. दुसरे आम्ही आज्ञप्रो आहो. कोणी काही वाकडे समजावितील तेणेकरून मर्जी फिरेल त्यास वाकडे समजावितील ते चितात न आणावे. सेवक पदरचे असोन जेणेकरून मर्जी प्रसन्न राहे आणि दाबाने कार्य होये येसी चाकरी बज्याऊन आणू. शेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Sadasiv Gangadhar writes to Raghunathrao of a set-back given by the Jats to a Maratha contingent in consequence of which another strong army has been dispatched without delay to the spot.*

No. 123] [*19-3-1766*

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती शेवक नारो शंकर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ ७ सवाल पावेतो साहेबाच्या कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित आसे विशेष.

4246

साहेबी दोन तीन आज्ञापत्रे सादर केली की जलद येऊन खासा स्वारास सामील होणे, आणि सिंदे येत आसिले तरी घेऊन येणे आणि नसिले येत तरी तैसेच येणे. त्या आज्ञेप्रमाणे निघून मोगलसराईस दाखल जाहालो तो राजश्री मल्हारजी होलकर याजकडून भिकाजीपंत कारकून व सिंदे याजकडून बाबूराव राम यैसे उभयेता न्याहावयासी आले. त्याजवरी राजश्री विष्णू महादेव आपली आज्ञा घेऊन आजीच मुकाम मजकुरी आले. त्याजपासीहि जावयाची आज्ञा होती, त्याजवरून मारनिले व आम्ही कुचये करून उभयेता सरदार याजकडे गेला. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Naro Shankar to Raghunathrao informing him of his arrival at Mogalsarai according to his orders.*

No. 124] [*21-3-1766*

पौा छ ९ सवाल

श्री

श्रीमंत रो दादासाहेब समर्थाच्या पदांबुज्याप्रति

आज्ञाधारक कृष्णराव गोविंद साा नमस्कार विज्ञापना. ताा अधिक शुध ९ सिरोंजीहून कूच करून पुढे गेलो जाणोन येसिजे. स्वामीची आज्ञा घेऊन त्रिवर्ग शणवारी स्वार जालो तो मजल दरमजल अष्टमीस पावलो. मार्गी भुपालवालियाचा मुलक वैरान, गिरासियाचा हगामा फार. समर्थाचे पुण्यप्रतापेकरून येथवर सुखरूप पावलो. पुढे जे अद्रुष्टि आसल होईल ते लिाा जाईल. राा सिवाजी विठल सिंदियाकडून आले त्यानी सविस्तर वर्तमान पाा माहादजी बावाचे वर्तनुकेचे सर्व सांगितले की माहादजी सिंदियाचे लक्ष स्वामीचे पायाविरहित दुसरे नाही. च्यार दिवस माहादजीबावानी लग्न केलेयामुळे अटकाव जाला. लग्न जालियावर राा मालजी पाा होलकर व गंगाधरपंत तात्या याजला समागमे देऊन माहादजी सिंदियासी सुभेदाराने रवाना केले. येक मजल कूच करून आले दुसर रोजी कूच करावे तो ठाखर ? फौज सुभेदाराकडून जाटाचे फौजवर गेली होती ती फौज जाटानी माघारे घातली दोन तीनसे माणूस मेले व जखमी जाले. हे वर्तमान आलियावर पंधरा हजार फौज सुभेदाराकडील रवाना जाली. राा गंगाधरपंत तात्यास फौज देऊन बाजी नरसिंह सिंदियाकडून फौज घेऊन गेले. हलदीचे अंग माहादजी सिंदियाचे म्हणोन सुभेदारनी जाऊ न दिल. स्वामीच्या पुन्यप्रतापेकडून हे वेल फार करनी गंगाधरपंतास येश येईल म्हणजे सर्व बंदोबस्त हिंदुस्थानचा सिंदे व होलकर व स्वामीचा आहे. स्वामीनी आसीर्वाद व कृपा अवलोकनेने

लक्ष या वेळेस या सरादाराविशई श्रीविस्वरापासी ममतेपुरस्कर ध्यानात मागावे. तेणेकडून फते होईल. येवज सिंदियाकडील पाच लक्षाची तजवीज झाली. पैकी सवा लक्ष सुभेदाराकडून कर्ज घेतले. पावणेच्यार लक्ष रुपये उजिनी वगैर महालावर नेमुनिक केली. येकून पाचा लक्षाची निशा कागदी विष्णुपंत बावाचे गुमास्तियासी लेहून पाठविली. त्यास विष्णुपंताच्या गुमास्तियाची निशा ठीक जाली व पत्र ठीक आले म्हणजे साडेतीन लक्ष रुो विष्णुपंतानी सरकारात दोन नगद व दिढाची वरात दिधले ते वजा होऊन दीढ लक्ष रुपये बाकी सरकारात विष्णुपंत देतील. परंतु या येवजाचा निकाल माहादजी सिंदियाचे भेटी आती नेमस्त होईल. गुंता नाही. पाच लक्ष रुपये रा नारो शंकर नानासहि देतात. माहादजी अन्येन शरण असेत. सुभेदाराचे माहादजी सिंदियाचे मानस की श्रीमंतानी जलदीने कुमक करावी. खावंधेच्या पुन्यप्रतापेकरून येश येईल. तर खावंदानी कूच दरकूच लांब मजलीने कुमक करावी. यावेलेस उपेक्षा न करावी. तीन लक्ष रुपये सुभेदारानी सिरोंजेवर जमा करविल. येथे येवज न पटला म्हणोन दोन लक्षाची हुंडिया इंदुराहून अवरंगाबादेच्या आणविल्या व येक लक्ष रुपये सिरोंजवर देविले. त्यापैकी (अपूर्ण)

¶*Krishnarao Govind assures Raghoba of Mahadaji's fealty.*

No. 125] [*21-3-1766?*

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री दादा
साहेब स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक आपाजी गणेश कृतानेक साां नमस्कार विनंती विज्ञापना. येथील ताा आधिक शुध दशमी मुकाम नजीक वीसनगर माहाराजाचे कृपावलोकनेकरून सुखरूप आसो. विज्ञापना ऐसीजे. इकडें आल्यातागाईत जाले वर्तमान वरचेवर सेवेसी विनंती लिहिलीच आहे. प्रथमपासून आमचा विचार की सरकार सनदेप्रमाणे रा गोपालरायानी वर्तणूक केल्यास, आपल्यापासून अंतर पडो न द्यावें म्हणोन राजश्री सेनाखासखेल समशेरबाहादूर याची पत्रे आली कीं गोपालराव आमदाबादचे जाबसालास येतात, तुम्ही येणे. त्यास आम्ही इकडे आलों. मागे त्यानी महमदाबादचे मुकामी आमचे फौजेवर घालविलें. त्याजवर त्यास अहंता जाली की याचे पक्षपाती गायेकवाड आहेत. त्यासीच कंबर बांधल्यास आपले कार्य जाले यैसा कोता अंदेशा करून, वीसनगरास येऊन

बाबीस सामील जाल. त्याजकडील सलुख अगोधर जाल्यात आला होता. इतक्यांत त्याजला भर भरिला की गायेकवाडास येथून उठऊन देतो. याजप्रकारें येक मास काढिला. आज लढाईस येतो, उदईक येतो ऐस्याप्रकारें कोटाचे आश्रयानें आहेत. काही भानगडीचाहि जाबसाल घालितात; परंतु बोलण्यात विश्वास पडोन तहास येत नाही. बाबीस ज्याअर्थे सामील जाले तोहि अर्थ नाही. सालमारचा वसूल झाडून नेला. शहरची खराबी बहुता प्रकारे केली. बाबीसी त्यासी रहष्य राहाते ऐसे नाही. मास पक्षात तहास येतील, परंतु मामलतीची खराबी जाली. सरकारात रसद भरणा केला तो पैसा वसुलात न आला. अलीकडील हसे दीड लक्षाचे सरकारात यैवज देणे तो यैवज इकडील अमल दखल न जाल्यानें न पावला. सेवेत अंतर दिसोन येईल म्हणोन सेवेसी विनंती लिहिली असे. गोपालराव बोलतात, अंतस्ताची पत्रे आम्हास आहेत की यास अंमल न द्यावा. राजश्री सेनाखासखेल यानी पत्रें पाहाण्यास मागितली परंतु पाठविली नाहीत. आम्ही फौजसुधा येथेच आहो. सिबंदीचा पेच भारी. विस्तार लिहिता परिहार दिसेल. मासपक्षास माहाराजाचे प्रतापे गोपालरावहि तहास येतील. सर्व प्रकारे निर्वाह करणार माहाराज समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापि.

¶*Appaji Ganesh exposes to Dadasaheb the treacherous conduct of Gopalrao Barve, who had colluded with Babi, thereby ruining the Peshwa's interest.*

No. 126] [*23-3-1766*

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रामचंद्र तुकदेव चरणावरी मस्तक ठेऊन सा। नमस्कार विनंती विज्ञापना. येथील क्षेम ता। चैत्र अधिक शुध १२ द्वादसीपरियेंत साहेबाचे प्रतापेकरून मु॥ सवाई जयेनगर येथास्थित असे. यानंतर बहुत दिवस जाले. आज्ञापत्र सादर होऊन सांप्रत आज्ञापत्री सांभाल न जाला. याजकरिता चिंतातूर असो. तरी सदैव कृपालु होऊन आज्ञापत्री कुशलवृत लिहून सांभाल करावयाविसी साहेब धणी समर्थ आहेत. वरकड या प्रांतीचे वर्तमान तरी राजश्री सुभेदारसाहेब यानी सरकारच्या फौजा राजश्री सुलतानजी लांबहाते व मकाजी लांबहाते व राजश्री संताजी वाबले पंधरा सोला हजार फौज जाटाचे मुलकात धूम करावयासी पाठविले होते. नजीबखान रोहिले याणी मनसबा करून त्याचीहि

फौज येका जागा मेळऊन पारचा मुलुक बंदोबस्तात आणावा या विचारावरी फौजा रवाना केल्या. त्यानी मुलकात सिरोन आगऱ्यापरियेंत धूम केली. ज्याटास ढवळपुरापलीकडून डीगेपरियेंत गावे मारिली. ढवळपुराजवळ जमाव करून होते. मुलकाचा उपद्रव देखोन जाट जोहरमल यानी सिखाची फौज सात आठ हजार आपल्याजवळ ठेऊन घेतली होती त्याची खातरजमा करून खर्चाची बेहबुदी केली. बुनगे त्याचे बेढ्या च्या (?) सहागडानजीक ठेऊन सड्या फौजा करून काही तोफखाना बराबर घेऊन भरतपुरीहून फौजेच्या मुकाबिल्यास आले. ढवळपुरापासोन सात आठ कोसावरी याचा सरकारचे फौजेचा मुकाबिला जाला. सिखाची फौज पुढे मुकाबिल्यास नमूद जाली. त्याजवरी सरकारच्या फौजानी चालोन घेतले. सिखाची फौज मोडिली. सेपनास माणूस ठार जाया सिखाचे जाले. सीख पाठमोर होऊन काढाव काढोन तोफखानियावरी जोहरमल जाटाचे नजीक निघोन आले. सरकारच्या फौजा निघाले जाणून चालोन आले. त्यासी सीख आड बाजूस जाटाचे होऊन तोफखानियाचा मुकाबिला जाला. जाटाची फौज सीख येक होऊन तोफखानियाचा मार मुकाबिल्यास देऊन चालोन घेतले. तोफखानियाचा मार उतम दिल्हा. तेथ लढाई उतम जाली. अस्तमान होयास आला. मार तोफखानियाचा भारी देखोन सरकारच्या फौजा निघाल्या. निघते वेळेस (अपूर्ण).

¶*The first part of a news-letter by Ramchandra Tukdev reporting to Dadasaheb a battle between the Jats and the Marathas near Dholpur. [In continuation of this read the following letter.]*

No. 127] *[March 1766*

(पहिला बंद गहाळ.)

+ श्री

पुरवनी साहेबाचे शेवेसी

जाटाचे फोजेने दाटी केली याजकरिता सरकारची फौज काही ढवळपुराकड आली ते उतम. राजश्री सुलतानजी लांबहाते यासी जखम काहीसी लागली. इकडे फौज निघाली ते सांभाळून मजुबुतीने आली. काही फौज तिकड चेमलकड चालचूक होऊन निघाली त्याचा थोडाबहुत गलाटा जाला. बेहडमधे फसली ते जमीदारानी दाटी केली. दोनचारसे घोडे गेले. दोनशे च्यारसे माणूस ठार जाया झाले. फौज सांभाळून ढवळपुरानजीक आहे हे वर्तमान राजश्री सुभेदारसाहेब यांसी श्रुत होताच त्यानी गोहदनजीक मुकामीहून कूच केले.

+ Concluding portion of letter No. 126.

पुढे फौजा राजश्री माहदजी सिंदे पाटील साहेब याणी व राजश्री गंगाधरपंत तात्या भारी फौजेनसी स्वार होऊन जलद गेले ते जाऊन पावले असतील. राजश्री सुभेदारसाहेब याचा कान दुखतो याजकरिता मागे आहेत हेहि दरकूच जातील. याची त्याची लढाई मातबर होईल. साहेबहि दरकूच येतात हाहि दबाव बहुत पडला. पुढे लढाईचा काये मनसुबा होतो ते सविस्तर वर्तमान साहेबाचे शेवेसी लिहीत असे. चैत्र आधिक शुध ३ तथा चतोर्थीस युध्य प्रसंग जाला. जे वर्तमान ध्यानास आले ते पके अर्थ मनास आणून शेवेसी लिहीत आहे. पुढे जे वर्तमान वरचेवरी येईल ते सविस्तर लिहीत असो. साहेबाचा अगमणाचा विचार ध्यानास आणून माहराज राजे माधोसिंगजी यानी सविस्तर स्नेहचे भावगर्भ मनास आणून लिहून खलिता साहेबाचे शेवसी आपल्या वाकेच्या कासीदजोड्याबराबर त्यानी आपल्या वकीलाजवल पाठविला आहे तो प्रविस्ट होईल. सविस्तर अर्थ निवेदन होईल. साहेबाचा दबाव उतम पडत चालला आहे. पुढे याजकडील भावगर्भ जे मनास येतील जे बोलतील ते सविस्तर लिहीत असो. सारांश राजे माधोसिंगजी मजपासी बहुत पेश. राजे हरसाहेजी व ठाकूर राजसिंगजी व राजश्री सुभेदाराकडील कारभारात भट राजा सदासिवजी आहेत व दिवानी कारभार नैनसुख दिवान नवे मुतसदी उभे केले त्यासी सांगितला आहे. त्याजवरी सर्व येख्तियार आहे. ब्रक्षी दुलेराये कानोडेनजीक होते ते राज्याची फौज सर्व जयेपूर दाखल जाली. पुढें याजकडील जे वर्तमान ध्यानास येईल ते लिहीत असो. गुरुचे सिखाचे वकील येथहि आहेत. त्यासी करार जाला त्याचा तगादा करितात. गुरुचे सिखाची फौज माघारे गेली ते सरहिंद उतरोन गेली. त्याच्या दबावाकरिता नजीबखान रोहिले दिलीहून नोरलाची सरायेवरी पडले होते ते खासे मागे रामड्याचे घाटास गेले तेथ त्या प्रांती आपल्या जमावानसी आहेत. दिलीत पातशाहाजादा आहे. पातशाह अलीगोहर घाटपूर ? पडले आहेत तेथच मुकाम करून आहेत. दाहाबारा हजार फिरंगी समागमे आहेत. तेथच त्याचा विचार मनसुबा करून आहेत. वरकड मारवाडप्रांतीचे वर्तमान तरी राजे बिजेसिंगजी याची फौज पिधावा नजीक आहे. राजश्री खानाजी जाधव अजमेरीनजीक आहे. सारांश आपल्या आपल्या जागास आहेत. राजश्री आचुतराव हडोती नजीक होते ते दरमजल फौजेकडे गेले. पुढे जो अर्थ ध्यानास येईल ते सविस्तर लिहीत असो. मुलाचे लग्नाचे काये योजून आले ते वर्तमान पेसजी साहेबाचे शेवेसी लिहिले आहेच. राजे माधोसिंगजी यासीहि वर्तमान सांगितले. त्यानी मान्य केले आहे की लग्नाचे साहित्याची सिधता करून देतो. साहेबाचे प्रतापेकरून जे कार्य होऊन येईल ते

लिहीत असो. वैशाखमासी जरूर कर्तव्य. पुढे सिहस्त याजकरिता कृपाळु होऊन काही खर्चाचा गौर होये लग्नसिध करावयासी साहेब धणी समर्थ आहेत. विशेष काय लिहिणे. कृपा वृधिमान केली पाहिजे हे विज्ञाप्ति.

¶*Ramchandra Tukdeo's letter to Raghunathrao: refers to the defeat suffered by a contingent of the Maratha army at the hands of the Jat. Sindia and Holkar immediately moved on towards Gohad to retrieve the position. The Rajput princes are quite friendly to Maratha interests and may be relied upon in a campaign against the Jat*

No. 128] [*2-4-1766*

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक रामचंद्र तुकदेव चरणावरी मस्तक ठेऊन साा नमस्कार विनंती विज्ञापना. येथील क्षेम ताा चैत्र अधिक वद्य ७ सप्तमी परियेंत साहेबाचे प्रतापेकरून मुाा सवाई जयेनगर येथास्थित असे. यानंतर बहुत दिवस जाले आज्ञापत्र सादर होऊन सांप्रत आज्ञापत्री सांभाल न जाला याजकरिता चिंतातूर बहुत असो. काली अस्तमानी चेनराये कायेत माहराजाकडील त्याची पत्रे आली. तेथ वर्तमान ध्यानास आले की खासा स्वारी सुरजेसनिध दाखल जाली. दरकूच पाठवावयाचा विचार जाला. त्यासी हे वर्तमान माहराजास श्रुत जालियावर साहेबाचे शेवेसी टिका व सिष्टाचार बहुमान पाठवावयाची ताकीद बहुत विशेष जाली. साहेब या प्रांते सनिध येत चालिले असोन या दिवसात आज्ञापत्री वरचेवर सांभाल होत नाही तरी राजदरबारी * * * * * * * * * * * * * जन कैसे धरतील? येथील * * * * * * * * * साहेबाकडील गौरसी * * * * * * * * साहेब कृपाळु होऊन यासी दबवारी पडल. साहेब सनिध असोन पत्रद्वारे सांभाळ होत नाही याजकरिता चिंता बहुत लागली आहे. तरी कृपाळु होऊन सविस्तर भावगर्भ लिहून सांभाल करावयासी साहेब धणी समर्थ आहेत. वरकड याप्रांतीचे वर्तमान तरी राजश्री सुभेदार साहेब ग्वालेरीनजीक मुकाम करून आहेत. कानास वेथा फार जाली याजकरिता श्रमी होते. सांप्रत काही समाधान आहे. बुनगे ग्वालेरीस ठेऊन येका दो रोजात फौजेत जाणार येसे वर्तमान आहे. राजश्री माहदजी सिंदे पाटील साहेब व राजश्री गंगाधरपंत तात्या सर्व सड्या फौजा घेऊन जाटाचे

मुकाबिल्यास गेले आहेत. ते चमलेपासोन दोन तीन कोसावरी कवारी नदीवरी मुकाम करून आहेत. काही फौज ढवलपुरी आहे. जाट जोहरमल व गुरूचे सीख ढवलपुरापासोन दो कोसावरी आपल्या फौज तोफखानियानसीं मुकाम करून आहे. जाटाची फौज काही चमेल उतरोन आलीकड आली होती. ते वरचेवरी माघारी फिरोन गेली. त्याचा विचार चमेल उतरोन आलीकड यावे हा होता. परंतु दबाव भारी पडला याजकरिता तेथच मुकाम करून आहेत. फौज त्याजपासी तीस हजार गुरूचे सीख मिलोन आहे. चमेलचा घाटाची मजबुती करून असावे या विचारात आहे. सरकारच्या फौजा अलीकड बसोन आहेत. पुढे जो विचार लढाईचा मजकूर ध्यानास येईल ते वर्तमान सविस्तर साहेबाचे शेवेसी लिहीत असो. साहेब दरकूच येत आहेत हे वर्तमान दाटी आहे. इभरत भारी बसली आहे. साहेबाचे प्रतापेकरून सर्व गोष्टी होऊन येतील. वरकड येथील वर्तमान तरी राजे माधोसिंगजी आपल्या जागा विचार मनसुब्यांत आहेत. जाटाचा याचाहि आपणामधे बखेडाच आहे. फौज याजपासी जमा जाली ते तैसीच आहे. येक समरू फिरंगी हजार बारासे लोकानसी होता ते याजपासोन गेला. बहुत प्रकारे समाधान केले परंतु राहिला नाही. कानोडेकडे फौज होती तेहि याजपासी आली. आपल्या जागा सावधान मजबुती करीत आहेत. प्रस्तुत याजपासी कारभारी राजे हरसाहेजी व ठाकूर राजसिंग उभयेता बहुत पेश आहेत. राजश्री सुभेदाराकडील कारभारात भट राजे सदासिवजी आहेत. दिवानी कारभारास नैनसुख दिवान * * (नवा) उभा केला त्याजवरी सर्व कारभार आहे. बक्षी मुलेराये त्यावरी फौजेचा कारभार आहे. वरकड मुत्सदी आपल्या आपल्या कामावरी जे आहेत तेसे आहेत. प्रस्तुत राजे विचार तरतुदीत बहुत आहेत. सिखारीचा इस्क जो आहे तोच आहे. नित्य सिकारीस जात आहेत. राजे बिजेसिंगजी जोतपुरी आहेत. त्याची फौज अजमेरीपलीकड दाह कोसावरी पिधावन येथ मुकाम करून आहे. राजश्री खानाजी जाधव अजमेरीसनिध आहेत. राजे माधोसिंग याजकडे पैगाम राजे रामसिंग याचे विद्यमाने लाविला आहे. दोघ भले माणूश मानिकराव मकाजी चव्हाण पाठविले आहेत ते रामसिंगजी राजे याजपासी उतरले आहेत धातुपोशान करीतात. पुढे मनसुबा ध्यानास येईल ते लिहीत असो. राजे बिजेसिंगजी याजकडील जाबसाल लागला आहे. काये ठराऊ होईल ते सविस्तर साहेबाचे शेवेसी लिहीत असो. वरकड राजेरजवाडे आपल्याआपल्या जागाच आहेत. दिलीकडील विचार तरी नजीबखान रोहिले पानिपतानजीक रामड्याचे घाटी मुकाम करून आहेत. तिकडील पैका वसूल कारितात. पातशाह आलीग्वार आपल्या

4253

जागाच आहे. हफीज रहिमत, दुंदेखान आपल्या मुलुकात आहे. जाटासी त्याचा पैगाम आहे. ते पातशाहास सामील होत नाही. दबाव पडल्या पाहवें. अहमदखान सुज्यादऊले आपल्या सुब्यात आहे. पातशाहचे पैगाम सर्वासी आहेत. परंतु कोन्ही मनसुब्यांत तन देत नाहीत. फिरंगी येणार. त्याजपासी लाला साहेबराये आहे. तो पटन्यास आला म्हणोन वर्तमान आहे. फिरंगी कांहीं पटन्यास आले. पुढें येणार. फिरंगी सामील जालियावरी काये मनसुबा करतील ते सविस्तर लिहीत असो. गुरूचे सीख माघारे गेले, ते आपल्या मुलकास गेले. पाचसात हजार फौज जाटापासी आहे ते मात्र आहे. राजे माधोसिंगजी याजपासी भले माणूस बखतसिंग घासदाणा ठराविला त्याचे वसुलास आले ते याजपासी आहेत. काही निकाल करून देविला. निरोप त्यासी जालिया सविस्तर साहेबाचे शेवेसी लिहीत असो. साहेबाचे दबावावरी जो अर्थ ध्यानास येईल ते वर्तमान वरचेवरी साहेबाचे शेवेसी लिहित असो. आज्ञाधारक साहेबाचे आहे. आज्ञेप्रमाणेच वर्तणूक होईल. मुलाचे लग्नाचे योजून आले. चैत्र वद्य १० लग्न करणे जरूर त्यासी राजे माधोसिंगजी यानी काही साहित्य करून देविली आहे. त्याचा निकाल करून सत्वर येथून निरोप घेऊन शेवेसी येत असो. याजकडील सिष्टाचार टिका याची तयारी होत आहे. लग्नसंधि समीप आली. त्यासी साहेबाची आज्ञा सादर होईल त्याप्रमाने वर्तनूक होईल. विशेष काये लिहिणे. लोभाची वृधि करावयासी साहेब धणी समर्थ आहेत हे विज्ञाप्ति.

¶*An important news-letter from Jaipur written by Ramchandra Tukdev to Raghunathrao, reviewing the position and activities of the various chiefs beyond the river Chambal and communicating the same for the information of the addressee who was proceeding to the North and who was then encamping near Sironj.*

No. 129] [*5-4-1766*

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे शेवेसी

विनंती. सेवक मलारजी होलकर कृतानेक विज्ञापना. येथील क्षेम तागाईत आधिक कृष्ण १२ द्वादशी साहेबाचे कृपाद्रिष्टीकरून येथास्थित आसे विशेष. स्वामीकडून पत्र आले ते * * सवाली पावोन लिहिला अभिप्राय सविस्तर आवगत जाला. भेट व्हावी तुमचे आमचे विचारे मनसबियाची योजना होऊन

उचित तेच ठरल म्हणून पत्री आज्ञा. येसियासी खावंदाचे मर्जीसिवाये विशेष जोड कोणती? मनोदयाप्रमाणेच सर्व गोष्टी होऊन येतील. राजश्री गंगाधर * * * * * * * * उदईक येतील. आम्ही सुरजपुरचे मुकामीहून कूच करून आज मंदवारी केणचेसराईस आलो. सत्वरीच भेटीचा लाभ होईल. शेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Malharrao Holkar to Dadasaheb that he is encamped at Keneche Sarai and will be glad to discuss future projects in a personal interview with the latter.*

No. 130] [*17-3-1763?*

श्री

विज्ञापना. सविस्तर कालचे पत्री लिहिले आहे. रा सिदापासेट याची भेटी घेतली. आपले पत्र त्यासी दिल्हे. सविस्तर वर्तमान, मायेममतेची भाषणे केली. त्यानी उतर दिल्हे कीं रसदेचा भरणा आम्हांपासी * * * करा यैसे करिता चालीस पनास हजारापावेतो मदत करू. आम्हीं लाखापावेतो कार्य करावे लागेल, यैसे युक्तीने भाषण केले; तेव्हा उतर दिल्हे कीं तुमचा भरणा आमचे हते जाहला; काम आडू देणार नाही. आपणासी बहुत श्नेह करितो. उश्रमा केला कीं नानासाहेब असता हे संततर का करितात, त्याचा पर्या सांगणे तो सांगितला. उदईक त्याचा जाब घेऊन पाठवितो. रा अविचतराव यानी आपणास व रा जिजाबास लिहिले आहे कीं हुंडी करून पाठवणे. हुंडणावल रावसाहेब देतील. जैसे आपल्या विचारास येईल तैसे करावे. दुसरे पुढील मामलतीचा आजमास ध्यानात आणून रा बाजीपंत फडनीस याचे हाती लिहून पाठवणे. मख्ता करणे अथवा कमावीस करणे दोन्हीहि डौल पाठवावी. येविशई रावजीनीहि लिहिले आहे. कारकुनाचे हते कचपके काम घेतात यैसे सालसीचे पत्र आधी पाठवणे. रावसाहेब त्याची भीड येथे व श्रीमंत पंत प्रधान दोहीहि दरबारी आहे. दोहीहि * * पुढे कामकाज पडेल. तूर्त दादासाहेबाची मर्जी रा * * * बहुत पत्री लिहीत गेलो. कारण दरबारचा रंग पाहिला. आपला दिवस प्रथम आहे. येकदा सालसी (?) पडल्या दोन कामात अंतरहि केले तर चालते यैसे आहे. उंबरावगिरीची रवाणगी जाहली. आपणासहि श्रीमंत नानासाहेबी पत्र लिहिले कीं येक विचार चालावे; ठाणे त्याचे स्वाधीन करावे. त्यासी परभारा रा

बालाजी विस्वनाथ याजकडे आहे. त्याजला जैसे लिहिले असेल तैसे करितील. खलासी तालुकाची साल आइंदेपासून कमावीस किसनप्रसाद निा उमरावगीर याजकडे सांगून तुम्हांस पत्र दिल्हे आहे. जो च्यार ल्हा रसदेचा भरणा करील, त्याची कमावीस. असो ते गोष्टी पुढेच आहे. रोहिले जाटाची दाटी फारसी येथे आहे; तर सविस्तर वर्तमान लिहिले पाहिजे. होलकराची याची बीद येका दो रोजानी * * दादासाहेब होलकर सिंदेची रवाणगी त्या प्रांती करून आपण देशास जावे. आठादाहा दिवसात पडशा होऊन देशास मजल दरमजल जातात. रा केदारजी सिंदे यासी सरदारीची वस्त्रे व सिके पहिले दिल्हे; त्यासी दिवाण पाहिजे. केदारजी सिंदे रा अविचतराव यासी मागतात. दादासाहेब देऊ म्हणतात. मागे रविवार गेला ते दिवसी वस्त्रे रावजी द्यावी. वस्त्रे आणावयासी जामदारखानी पंत पाठविले. मागती दादासाहेब म्हणाले की आजी मुहूर्त नाही. मग तैसेच राहिले. दादासाहेबाचा मतलब कोन्हासहि कलत नाही. रावजीचे घाटत आहे. माहादजी सिंदे यानी वडीलपणें राहावे तो कैसा राहतो? रा गंगाधरपंत तात्याचा येक ठराव जाहला म्हणजे हा काय करील न कले. माहादजी सिंदेचे, होलकर तात्याचे येक चित यैसे वर्तमान आहे. रावजीची धालमेल दोन च्यारदा जाहली. समई दादासाहेब मागे घेतात. अगोधर अववे कबूल करितात, यैसा रंग येथील आहे. रा गोपालराव गो(विंद) अमदाबादेस होते. रा आपाजी गणेश याजपासून साडेसात * * ल्हा घेऊन मामलत गुजरातची व ठाणी सर्व देऊन आ(पण) मजल दरमजल नासिकास आले. तेथे राहिले हे वर्तमान दादासाहेबास कलल. त्यानी येथून कारभारास लिहून गोपालराव यासी कैद केले. त्याचे भाऊ गोविंदपंत चुलतेसह कुटुंब कैद केले. घोडी उंटे हती वस्तभाव लुटून घेतली. गोपालराव यासी धोडपच्या किलेवरी घातले. वरकड नाशकात कैद आहेत. लक्षमण दिगंबर इकडे येत होते. मार्गात लुटले गेले. आता उदेपुरी आहेत. काल फिरल्या काही राहात नाही. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना. देशास जावयाची सोय नाही. अजून आपले चरण धरले की चाकरी करून अन्न घेऊन मग जावे. ते तर न जाहले. देशास जाणे प्राप्त जाहले. आपली आज्ञा शिरसावंद्य याची शरम असल्यास आजहि आम्हीं आज्ञांकित आहे हे विज्ञापना. मिती. चैत्र सुध २ गुरूवासर.

¶*The letter reports that Raghunathrao was proposing to dispatch soon Holkar and Sindia on to the fight, himself returning to the Deccan. Kedarji has been appointed to Sindia's estates. Gopalrao Barve who submitted to Apaji Ganesh has been confined and his baggage confiscated.*

4256

No. 131] [*13-4-1766*

श्री

विनंती सेवक विष्णु माहादेव व सदासिव गंगाधर कृतानेक सां नमस्कार विज्ञापनां. येथील कुशल ताा चैत्र शुध्ध ४ भानुवासर च्यार घडी दिवस असतां मुकाम करहरी नजीक झासी दोन कोस स्वामीचे कृपावलोकने सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. सांडणीस्वारासमागमे आज्ञापत्रें पाठविली तें मुकाम मजकुरी मुकाम होतांच पावली. पत्रीं आज्ञा कीं राजश्री सुभेदारांस आज रविवारी भेटीचा मुहूर्त आहे तर घेऊन येणे. ऐसियासी आजची मजल दाहाबारा कोसाची जाली. मजलीस येतां दिवस थोडा राहिला. त्याजवर वोंडसे येथून समीप नाही. सा कोसी पला, याकरितां उदईक भेटीचा मुहुर्तहि आहे. अगाऊ राजश्री माहादजी सिंदे दर्शनास येतील. तदोतर राजश्री सुभेदारहि भेटीस येतील. मुहुर्त उतमच आहे. त्याजवर स्वामीची आज्ञा येईल तदनुसार वर्तणूक केली जाईल. राजश्री सुभेदाराच्या कानास तिडिक बहुत आहे. शरीर स्वस्थ नाहीं. फौजेत उभे राहून भेट घ्यावी यैसें शरीरी सामर्थ नाहीं. यास्तव त्यांचा भेटीचा प्रकाराविसी रा चिंतोपत तात्यास लिहिले ते विनंती करतील, त्यावरून आज्ञा करावी. सांडस्वार फिरोन माघारे जलद रवाना करावयासीं आज्ञा करावी. शेवेसी शृत होये हे विज्ञाप्ति.

¶*Vishnu Mahadeo and Sadashiv Gangadhar fix the day of the meeting of Mahadji Sindia and Malharrao Holkar with Raghunathrao.*

No. 132] [*13-4-1766*

पौ छ २९ जिल्काद सीत चैत्र.

श्री

श्रीमंत राजश्री दादा

साहेब स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक नारो बलाल भुसकुटे कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ ३ माहे जिलकादपावेतो सेवकाचे व प्रगणे याचे वर्तमान यथास्थित असें विशेष. स्वामीचे आज्ञापत्र सेवकास आले ते सिरी वंदिले. तेथे आज्ञा

की प्रगणे बढवा सिंदि यांजकडे होता तेसमई सिंद्याकडून रा बाजी अनंत यांजकडे मामलत होती तेव्हां पाऊण लाख असी हजारपावेतो सिबंदीसुधा वसूल होत होते. सेवकासहि ठावका आहे. त्यांस रामचंद्रबावा व राणोजी सिंदे यांणी बढवे याचे राज्य घेतले तेसमई राजा किसेरसिंग होता. त्याणें दंगा केला होता. प्रगणा दोन तीन वरसे उज्याड केला परंतु रामचंद्रबावा यांणी प्रगणेयाची आशा सोडून तीन वर्षें राज्याचे पारपत्य केले. जेथे गेले तेथे त्या प्रगणेयांचे पारपत्य केले तेव्हां राजे खराब जाले आणि सिबंदीं तीन वर्षे आंगावर देऊन नक्ष केला. तेव्हां राजे गांव खाऊन राहात होते. अता श्रीमंत नानासाहेब कैलासवासी जालियापासून येके गावचा पाटीलदेखील अमलासी गोष्ट सांगतो. बडवेकर रजपूत राजे यांणी शंभर राऊत व प्यादे दोनसे याप्रमाणे राज्यापासी सरंजाम तूर्त आहे आणि सरकारचे कमाविसदार यापासी पनास पाऊणसे प्यादे व पांच सात राऊत राहातात याप्रमाणे बढवे याचे जाले आहे. बाजी अनंत याच्या वेलेस राजे हात बांधून राहात होते ते वेलेस तेरा हजार रुपये सिबंदी खर्च रामचंद्रबावासारिखा चवकस त्याणी नेमून दिल्ही होती. आता पांच हजार सिबंदी साल तमाम नेमणूक आहे. त्यात सेवकाने काय करावे? येविसी सेवकाने अनंतवलीस विनंती केली होती की बढवे व खांडवे येथे सिबंदी कमी आहे तेव्हां आज्ञ जाली होती की त्या प्रांती आलियावरी नेमणूक पाहून तेथील मजकूर मनास आणून नेमणूक करून देऊ. त्यास स्वामीनी हा प्रांत सर्व पाहिला आहे. बढवे यास तों पहिली सिबंदी राजश्री रामचंद्रबावाचे वेलेची आहे त्याप्रमाणें जालियास थोडा बहुत बंदोबस्त होईल. आता स्वामीनी राजेयाचे हक करून दिल्हे आहे. आतां सालमजकुरी प्रगणे बढवे वस्थी होत आहे. स्वामीचे प्रतापे पांच वर्षे येक जफ्त असलियास वस्ती होऊन प्रगणा आबाद राहील. गुदस्ता रा गोपालराऊ याच्या अमलात पो बडवे व खांडवे येथील रयत आफरातफरी जाली त्यामुळे प्रगणें खराबीखाली आले होते. आता सेवकाने मागती आबादी उतम केली आहे. पो मजकुरी दोन्ही माहाल मिलोन नव्या आसाम्या पाचसे घरे नवे आणिले आणि पों कानापूर तो दरोबस्त उज्याड जाहाला होता त्यांस आता सालमजकुरी चोवीस गाव वस्ती केले आहेत. येक अमल असलियाणें जमाबंदीहि उतम होईल आणि प्रगणेहि आबाद राहातील. सेवक तो आता वस्तीस आणि चोराचे पारपत्यास लागलो आहे. स्वामीचे प्रतापे आबादी होईल आणि चोराचेहि पारपत्य होईल. स्वामीनी सर्व सेवकाचा बंदोबस्त करून दिल्हे. वरकड पो पुनासे व सिकणीमध्ये मोठे चोराचे घर आहे. हा प्रगणा सरकारांत घेतल्यास चोराचे पुरते पारपत्य होईल आणि सिबंदीहि कमती लागेल

असे आहे. मीं सेवेसी विनंती केली होती. त्यास आपली आज्ञा जाली की तूर्त होत नाही. सिंदे यांची भेट जालियावरी करून घेऊ म्हणून आज्ञा जाली आहे. यास्तव सेवेसी विनंती लिा आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Naro Ballal Bhuskute narrates to Raghunathrao his difficulties at Barwaha, reminding him of the former arrangements made by Ramachandra Baba and Ranoji Sindia and requesting him to adjust them suitably to the times.*

No. 133] [*14-4-1766*

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

आज्ञांकित गोविंदराव कोनेर च्येरणावर मस्तक ठेऊन सां नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम ताा चैत्र शुध ५ पंचमी मुकाम नजीक झांसी धर्मप्रताप साहेबाचा जाणून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. काल राजश्री सुभेदार यानी बारा कोसाचे कूच करून मुकाम मजकुरास आले की साहेबाची भेट सोमवारी घ्यावी. त्यास साहेबाचे आज्ञापत्र आले की कूच करून पुढे गेलो. तर तुम्ही राजश्री सुभेदारास सांगून मुकामास येणे. त्यास काल मुकाम भारी जाला म्हणून गाजोदीखान याचा आटाला व बाजार तो आला नाहीं. मागे गडीबदल तोफखाना व फौज राहिली तेहि आले नाहीत. तदनंतर राजश्री सुभेदाराचे शरीरास समाधान नाही. यास्तव राा कृष्णराव गोविंद यांनीं विनंती करावयासाठी राजश्री सुभेदारानी साहेबाचे सेवेसी पाा आणि साहेबी कूच केले त्याजवरून राजश्री सुभेदार बहुत श्रमी जाले कीं आम्ही खावंदाजवल आलो. तदनंतर शरिरास समाधान नाही. दुसरे कूच भारी केला आणि खावंदानी कूच केला तर तेच धणी आहेत, कृपाच करतील. तर साहेबी कृपाळू होऊन राजश्री सुभेदारास समाधानाचे पत्र पाठवावे कीं लवकर येणे. तुम्हासाठी मुकाम केला असे आज्ञापत्र साहेबी सादर करावे. राजश्री सुभेदारानी राजश्री कृष्णुराव व रो सदासिव गंगाधर आम्हास बोलाऊन सांगितले की तुम्ही येताच खावंदाचे आज्ञेवरून कूच दरकूच खावंदाकडे आलो असता साहेबी कूच केले. याजवास्तव कष्टी बहुत जाले तर साहेब समाधानाचे पत्र पाा धणी समर्थ आहेत सेवेसी श्रुत हो हे विज्ञाप्ति.

¶*Govind Koner requests Raghoba to halt until Holkar catches him up as the latter is hurt at being left behind.*

No. 134] [15-4-1766?

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
साहेबाचे सेवेसी.

विनंती सेवक बालाजी कृष्ण साष्टांग नमस्कार विज्ञापन्हा. ता। छ ५ जिलकाद मु॥ वोडसे स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. पा। मजकूर तपशिलवार वर्तमान रा। सिवापानी लिहिले आहे त्यावरून सेवेसी श्रुत होईल. सारांश गोस्ट हेच झासीवाले डोहाणा करितात. मी झासीस गेलों. स्वामीचे आज्ञापत्र त्यास दिल्हे त्यावरून बहुतसा आमचा आदर केला आणि गोड गोस्टी बोलिले. आपण सर्व प्रकारे साहित्य करू. धण्याची आज्ञा आम्हास मस्तकी आहे यैसे सिस्टाचार बोलिले. तुम्हा कामकाज पडेल तेव्हा आपणास लिहिणे जे सामान, स्वार, प्यादे लागतील ते देऊ. त्यास सांप्रत त्याणी या प्रकारचे फंद माडिले तरी काये चिंता आहे ? स्वामीचे पुण्यप्रतापे सर्व गोस्टी होतील. जे लबाडी करितील त्यांचे पारपत्य स्वामी करितीलच. झासीकराच्या मते आपणास मुदई जाहाले आहेत. यासी येथे राहो न द्यावे. राजा आजी येक महिना बाहीर निघाला आहे. पुण्यास येऊन स्वामीच्या हाते आपला बंदोबस्त करून घ्यावा. त्यास झासीकरानी अटकाविला आहे. तेथे गेलियाने आपणास बाधक होईल. सेवेसी श्रुत व्हावे यास्त(व) विनंती लिहिली आहे. आतां रा। नारो शंकर तेथे आहेत. त्यास उतम प्रकारे ताकीद करावी आणि त्यांचे पत्र त्याच्या कारभारियासी ये ते गोस्ट जाहाली म्हणजे सर्व स्वामीचे आज्ञेप्रमाणे कामकाज घडोन येईल. येथे पाच सातसे माणसे व से दोनसे स्वार ठेविले. पुढेहि ठेवीत आहो. परतापसा मिसर याणे येक गाव जालिला तें चालीस पनास गुरे जलाली व माणसे दाहा वीस जलाली. पुढेहि गावगना सें दोनसे यैसे खालशाचे गावी घेत आहे. या(ज्या ?)स्त सिबंदी ठेवणे जरूर जाहाले. बहुत काये लिहू. सेवसी श्रुत होये विज्ञाप्ती.

¶*Balaji Krishna to Raghunathrao, describing how he was received at Jhansi and further saying that though temporary trouble has arisen there he would set it right. He requests the addressee to write to Naro Shankar in that connection.*

4260

No. 135] [17-4-1766

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे शेवेसी.

विनंती सेवक बाळाजी गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ ७ जिलकाद स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीची आज्ञापत्रे पेसजी सादर जाहाली कीं तुम्ही येकजण सत्वर हुजूर येणे. त्यावरून चिरंजीव राजश्री गंगाधरपंत याची रवानगी स्वामीकडे केली आहे. उदैक येथून कूच करून सेवेसी येऊन पावतील. सविस्तर निवेदन करितील. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Balaji Govind sends Gangadharpant to Raghunathrao and informs him accordingly.*

No. 136] [21-4-1766

पौा छ ११ जिलकाद
सोमवार मध्यमरात्र

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक नारो शंकर. सां। नमस्कार विज्ञापना. सेवकाचे वर्तमान येथास्थित आसे. कृपालुपणे स्वकीय लेखनास आज्ञा करीत आसावी. यानंतर स्वामीची आज्ञा सुक्रवारचे रात्रीस घेऊन स्वार जालो. दिवस उगवता रा। सुभेदाराचे मु॥ नजीक आलो. तेथूनहि कूच होऊन बिमरी नजीक मु॥ जाला. दुसरे मजलीस सिदू नदी पार जाणार तों शनवारी प्रहर रात्रपर्यंत लस्करात दाखल जालो. रा। सुभेदारास वर्तमान कळलिया दुसरे रोजीं रविवारी मु॥ करून संधाकालपर्यंत दरबार जाला. रा। गंगाधरपंत तात्यानी बहुताप्रकारे बोध करून आम्हीहि आज्ञेप्रमाणे बोलणे ते बोलिलो. तेव्हा निश्चये केला की कूच करून माघारे यावे. दुसरे रोजी सोमवारी कूच करून मोजे चिरोळा नजीक दतिया येथे मु॥ जाला. उदईक मंगळवारी कूच करून येथून आबलीपाहीकर आथवा कामद येथे याचा मु॥ होईल. तेथून भांडेर कोस पाचसा राहील. सरकारचा मु॥ भांडेरीसच व्हावा. तेथे भेटीचा योग जालियावरी मग मनसबा करून जिकडे कूच करणे ते करावे. उभयेता सरदार आपले आज्ञेप्रमाणे लांब

4261

मजलीने सेवेसी येत आसे. आमची फौज जुज्यातीवरी होती. आम्ही सडे से दोनसे स्वारानसी लस्करात आलो. फौज वैरणीयाचेमुळे ठेविली होती. सरकारचे फौजेच कूच जालियावरी सत्वरच येऊन सेवेसी हाजर होतील. येथून ताकीद फारच केली आहे. सिंदियानी काहीच पैका न दिल्हा याजमुळे खर्चाची वोढी ते श्री जाणे. दोन आडीच महिने रोजमरा फौजस व शागिर्द पेशास नाही. सिंदियाचा यैवजाचा भरवसा मोठा की तूर्त काही तरी देतील. परंतु त्यानी निष्ठुरता फारच फारच केली. ईस्वर स्थित कैसी राखील हे न कले. सर्व संकट स्वामी चरणे दूर होतील. भेटीस तेथेच भांडेरीस यावे किंवा मधे योग घडल याची आज्ञा करावा. त्याप्रमाणे योग घडल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Naro Shankar informs Raghunathrao how he persuaded both Sindia and Holkar to meet Raghoba near Bhander and how they readily consented to it. He, however, complains against Sindia for not paying the dues which the writer required for the expenses of the campaign.*

No. 137] [*21-4-1766*

श्री

साहेबाचे सेवेसी गोविंदराव कोनेर च्येरणावर मस्तक ठेऊन सां नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम ताा चैत्र शुध द्वादसी सोमवार मुकाम चिरोला येथे सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशष. साहेबाची आज्ञा घेऊन निघालो ते रविवारी राजश्री सुभेदाराजवल पावलो. वर्तमान सर्व राजश्री सुभेदारास सांगितले. तदनंतर राजश्री नारो शंकर व राजश्री विष्णु माहादेव येसे राजश्री गंगाधर येशवंत यास घेऊन राा सुभेदाराजवल जाऊन निश्चय केला कीं उदईक सोमवारी कूच करून सा सात कोस जावे त्यास आज मुकाम मजकुरी आले. उदईक कूच होऊन साहेबापासून तीच कोसावर राहतील. साहेबाच्या आज्ञावरून वर्तणूक करतील. परंतु राजश्री सुभेदाराजवल आज्ञेवरून वर्तमान सांगितले याजवरून संतोश पावले की साहेबाचा रूख गोहेदेकडे जाणा येणेकरून शेत्रु भयाभीत होईल. सर्व गोष्टी घडतील. श्रीमंतास येश येईल. चिंता नाही. सेवेसी श्रुत होये.

¶*Govind Koner reports the proposed meeting between Malharrao Holkar and Raghunathrao.*

4262

No. 138]   [24-4-1766

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री दादासाहेब
स्वामीचे शेवेसी

शेवक राजा बद्रीनाथराव कृतानेक सा. नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता. छ १४ माहे जिलकादपावेतो माहाराजांचे कृपाकटाक्षेकडून येथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तर पातशाहाचे कूच होऊन प्रयागास गेले. फिरंगियाही आनखी समुदाये बंगाल्याहून आनविला आहे. तो आलियावर जे होणे ते होईल. हाफिजरहमत पुत्राचे बोलाविलियावरून पातशाहकडे गेले. मुलाजमत केली. नजीबखानाविशई बहुता प्रकारें अर्जमारूज+ केली. आनी-काही येकांत च्यार घटका पावेतो पातशाहास सांगितले कीं दिल्लीस चालावे, रोहिले पठाण सर्व चाकरीस हजर होतील. फिरंग्याकडे डौल न द्यावा, आम्हा-कडे पाहवे, त्यांचे मसल्हतीवर न जावे, आमचा हात धरावा, सर्व खर्चवेच व सलतनतचा बंदोबस्त चालऊ, ऐसे बहुता प्रकारें विनविले. पातशाहानी त्याचा विश्वास न केला. पितापुत्रास रुखसत केले. आपण दरकूच प्रयागाकडे गेले. फिरंग्याही पातशाचे बहुतप्रकारें समाधान केले आहे कीं आम्ही वर्षा-काल प्रयागी करितो तों वर बंगाल्याहून आनखी फौज येत आहे. प्रस्तुत आपण तेथेंच बसावे. नवाब वजिरासहि बोलावणे गेले आहे. त्यांही पुरातन लोकास आस्ता देऊन नवे लोक ठेवितात. समुदाये आलियावर हजूर येईल. प्रस्तुत मालीक मुलक माहराज आहेत जे चित्तावरी धरतील तें सहजांत होईल. स्वामीचा प्रताप थोर आहे. दुस्टाचा संव्हारच होईल. शेवेसी श्रुत होय. बहुत काय लिहिणें कृपा वृद्धि केली पाहिजे हे विज्ञप्ति.

¶*Badrinath informs Dadasaheb of an interview between the Emperor and Hafij Rahmat in which the latter requested the Emperor to rely on him and Najibbkhan for support and to return to Delhi. The Emperor rejected it and went to Allahabad to seek protection from the English.*

No. 139]   [21-4-1766

श्री

शेवेसी विज्ञापना. स्वामीचे आज्ञापत्र रविवारचे दिवसीच स्वामीनी रा। केले ते सोमवारी दोन प्रहरा दिवसा मुकाम चिरोला नजीक दतिया येथे पावले. तेथ

+ शिफारस श्रुत केली.

आज्ञा की राजश्री सुभेदारास घेऊन लौकर यावे. त्यास आज्ञेप्रमाणे राजश्री सुभेदारास व राजश्री माहादजी सिंदे यासी घेऊन सा कोस मुकाम मजकुरा आलो. उदईक मंगलवारी आबली पाबीकर आथवा कामद प्रांत भांडेर येथु सांत कोस तेथे मुकाम होईल. तेथून भांडेर च्यार कोस राहाते. तदो स्वामीची आज्ञा येईल त्याप्रमाणे वर्तणूक करू. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Gangadhar Yashvant communicates to Raghunathrao his arrival at Chirola near Datia with Mahadji Sindia and the Holkar.*

No. 140] [*22-4-1766*

श्री

सेवेसी विष्णु महादेव व सदासिव गंगाधर कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. स्वामीनी रविवारचे दिवसचे आज्ञापत्र पाठविले त्यात आज्ञा कीं वोडश्यावर बहुत मुकाम जाहले. यास्तव वैरण लांब गेली. दोन्ही लस्करें येक जालियां वैरणीचा पेंच पडेल. सबब वेत्रवतीच्या पाणियावरच मुकाम नेमिला. तेथें अवघ्यांनीं यावें, यैसी पत्रीं आज्ञा. ऐसियास राजश्री सुभेदारांचे शरीरी वेथा कानास तिडीक बहुत यैसेहि असतां खावंदास भेटावे यास्तव बिल्हेरीहून बारा कोसाचे कूच केले. सोमवारी मुहूर्त आहे ते दिवसीं भेटावें. त्यास बारा कोसाचें कूच केले. त्या श्रमाने बहुत हैराणगत जाली. कान बहुत तिडकूं लागला. पूर्वापासून या सरदाराची रीत यैसी कीं जवळ आल्यास भेटी व्हावी. मग कूच मुकाम मनसबा जे करणे तें करावें. त्यास वैरणीच्या पेंचामुळें स्वामीनी कूच केले, लांब कूच यांचे जालें. शरीर स्वस्थ नाहीं. थोर कुचामुळे काहाली अधिक जाली. यास्तव येथें आज मुकाम झांसीनजीक जाला. सरदारांचे भेटीचा विस्तार सविस्तरे राजश्री कृष्णराव गोविंद यांसी विनंती करावयास्तव शेवेसी रवाना केले. रात्रौ ते पावले अस्तील. विनंती करितील त्यांवरून मनन होईल. बिल्हेरीकरांनी झासीचा व कऱ्हेरियाचा रस्ता कळूं दिल्हा नवता आणि थोडासा मुलुक सरकारचा दाबिला, ताकीद केलीया न सोडला. यास्तव दहा हजार फौज थोर तोफा चिरंजीव राजश्री कृष्णराव गंगाधर याजबराबर देऊन गढीस रवाना केले. गढीस मोर्चे दिल्हे तें काम सरकारचेंच. त्याचा शह फार लांब पडल्यास च्यार दिवस अधीक लागतील. हे काम सरकारचे आस्तां राजश्री सुभेदारांचे नेट यास्तव ते गांव घेणेच आहे. स्वामीच्या प्रतापें लौकर येईल. रा कृष्णरायानी विनंती केली असेल त्याची उत्तराची आज्ञा सत्वर करावी. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Vishnu Mahadev and Sadashiv Gangadhar (son of Gangadhar Yashvant Chandrachud) report to Raghunathrao the illness of Malharrao Holkar who in spite of ill-health hurried to meet his master.*

No. 141] [2-5-1766

पौ छ २२ जिल्काद सीत

चैत्र मुा सिमथर

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री दादासाहेब

स्वामीचे सेवेसी

विज्ञापना यैसी जें. जुगा किला घेतला, सरकारांत ठेविला, शिबंदीची वगैरे नेमणूक करून दिल्ही; परंतु किल्याचा येक बुरूज निपट पडिला आहे, त्यासी बांधिल्याविना किल्यास दगा आहे. बांधावयासी सरकारची आज्ञा तों नाहीं; परंतु कार्याकारण कामकाज पडेल तें केलेंच पाहिजे; यास्तव तूर्त काम चालतें केलें. यैवज कमबेश दोन हजार लागतील त्याची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. बुरुजाचें काम किती म्हणावें तरी लांबी साडेवीस हात व उंची साडे-पंधरा हात व रुंदी सवातीन हात या प्रमाणें काम आहे. किल्यास दारू सिसें व गला नेहमी जकिरा ठेवावयाची आज्ञा हजार रुपयाची जाली होती, त्याप्रमाणें दारू व शिसें व गला किल्यांत भरून दिल्हा व शंभरपावेतों रुपये नेमणुकेशिवाय लागले. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. किले निसबतीचा मजकूर सविस्तर राजश्री येसाजी शंकर यांणीं लिहिला आहे त्यावरून विदित होईल. सेवेसी श्रुत होये हें विज्ञाप्ति.

¶*A request to Dadasaheb for funds to put the fort of Juga in a state of defence, is made in this letter.*

No. 142] [2-5-1766

पौ छ १८ जिल्हेज सायंकाळ

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री

विश्वासरावजी स्वामींचे शेवेसी

पो चिंतो विठल व आबाजी महादेव व चिंतो आनंत कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २२ जिलकाद मुा जनस्थान आपले कृपेकरून येथास्थित असे विशेष. आपण एकदोन पत्रे पाठविली ती पावोन सर्व अर्थ

ध्यानांत आला. आपणाकडील राजश्री गोविंदपंत पहिल्याने आले ते वेळेस उभयता श्रीमंताची गाठ घालून दिल्ही आणि आतांहि मारनिले तेथे आहेत त्याचे साहित्यास अंतर करीत नाहीं. हिंदुस्थानाचा प्रकार आपण लिहिला, त्यास श्रीमंतानीं सिंदे होळकर याची रवानगी केली आहे. उजनीस इंदुरास आठा पंधरा दिवशी जातील. मग तेथून तयारी करून हिंदुस्थानात येतील. आपले ठाई उभयता श्रीमंताची कृपाच आहे. रसदेचा प्रकार आपण थोडाबहुत निकाल काढला. आपणास तेथील प्रसंगामुळें वोढच आहे. त्यामुळे चाळीस पंनास हजार रुपये आपणाकडे आहेत त्यास त्यासाठीं गोविंदपंतास तगादा करितात ऐसे आहे. त्यास युक्तीने पाहतां फौजा तिकडे नसतां आपण बंदोबस्त राखिला आहे हे फार आहे. परंतु दरबारी मदार प्रस्तुत रुपयावरी आहे. याप्रो मजकूर आहे. बहुत काय लिहिणे? लोभ करावा हे विनंती.

¶*Vishwasrao Lakshman is informed by Chinto Vithal and two others that Sindia and Holkar have been ordered to proceed to the North by the Peshwa. He is assured by the writers of the full confidence in him of both the Peshwa and Raghunathrao.*

No. 143] [*17-5-1766*

पौ छ १९ जिल्काद

श्री

श्रीमंत माहराज राजश्री दादासाहेब स्वामीचे शेवेसी शेवक राजा बद्रीनाथराव कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा छ ७ माहे जिलकाद पावेतो माहाराजांचे कृपाकटाक्षे आनंदरूप असे विशेष. दोन पत्रे मयेआखबरात[१] शेवेसी पाठविलीं होती; पावली आसतील. प्रत्योतरें सरफराज[२] न जालो. निरंतर आज्ञापत्री सनाथ करीत असिले पाहिजे. पातशाही फर्मान शेवेसी पाटविला असे. कासीद मार्गांत आजारी असतां पावयास देर जाली. आतां प्रतिउत्तर आले म्हणजे आज्ञेप्रमाणे वर्तणूक होईल. तेथून पातशाहानी शेवकास आज्ञापिले आहे कीं निरंतर श्रीमंतजीचे वर्तमान व पुढें आमचे सलतनतेचा बंदोबस्त त्यांजवांचून कोण करणार, काये तरतूद करणार हे सर्व लिहित जाणे. आम्ही तर आजपावेतो त्यांचेच भरवसियावर असोंत. यैसे निरंतर स्वामीचे निजध्यास राखून विस्तारपूर्वक येथील बातनी येत असे. स्वामी केवल सदासिव आवतार

---

१ बातमीपत्राबरोबर. २ भाग्यवान.

आहेत. सर्व दुष्टाच पारपत्य होऊन धर्मराज्य करतील. पातशाह कुन्याजवळ ज्यरीदे[1] मुकाम करून आहेत. छावणीचा निश्चये प्रयागचा जाला. फिरंग्यासी रात्रंदिवस माहाराजांकडील सलाहि येतची मसलहत असे. इकडून सरकारचे वकीलहि लवकरच मुलाजमत हासील करतील. नवाब वजीर आपले मुलकांत असे. सिखानी नजीबखानावर चढाई केली असे. जाटाकडे सीख होते यांजला जयसिंगाची पत्रे आली कीं तुम्ही इकडे राहून काये केले? रोहिल्याचे पारपत्या-निमित्य तुम्हास वारंवार लिहिले ते न केले; यैसियास आतां आम्ही इकडे आलो. तुम्ही याचे मुलकांतून होत येणे. नजीबखां सरहंदचे जिल्ह्यांत असे. सीखासी लडाई भारी आहे. बहुत पेचांत असे. सुलतानखानास व आपला आसबाब[2] दिल्लीस जो होता तो सर्व बोलावून घेतला. पातशाहास लिहून पाठविले कीं प्रस्तुत मजला जिवाचे येऊन पडले आहे. तुम्ही आपले मातुश्री व पुत्र व सलातीन व किला वगैरेचा बंदोबस्त करणे. आमासी दिलीस संमध नाहीं. त्याजवरून पातशाहानी मुसवीखानास दोन हजार मोगल व कांहीं श्वार प्यादे देऊन रवाना केले. मातुश्रीस खर्चास व बंगल्याहून सोन्यारुप्याची पात्रें अनिली व्होती व कांहीं ज्यवाहीर वस्त्रें वगैरे पाटविली. मातुश्रीस लिहून पाटविले कीं प्रस्तुत छावणी प्रयागची मोर केली असे. स्वामीचे आगमनाचा प्रकार लिहिला आहे कीं सलतनतेचा[3] बंदोबस्त पुढें कोन्हे रीतीने करितात हे पहावे यैसे लिहील आहे. हाफीजरहमत व आहमद-खानाही मुलाजमत हासील केली. जाटाकडून वकील पातशाहकडे जाऊन कैरनील[4] नामक फिरंग्याचे विद्यमाने मुलाजमत केली. नजरन्याज जे पाटविली होती ते त्याचेच माने गुजरली. याणी लिहिले होते कीं आतां आम्हास काय आज्ञा आहे. भावार्थ लिहिल्याचा यैकिल्यांत येतो कीं फिरंग्यासी यैक्यता करून पातशाहसह वजीर व फिरंगी आपले पत्त्यावर असावे येसो दिसोन येते. तेथून ज्यबाब जाला नाहीं. रोहिल्याचे पारपत्य परस्परेच होत असें. स्वामीचे शेवेसी तकलीफ होणारच नाहीं. शेवेसी श्रुत होय. बहुत काय लिहिणे. वरकड सविस्तर वर्तमान रो गंगाधर विश्वनाथ वकील हजूर विनंती करतील हे विज्ञापना.

¶*Badrinathrao writes to Dadasaheb that full reliance was placed in the addressee by the Emperor. The writer also refers to an encounter between the Sikhs and the Rohillas in which the latter were thrown into confusion and their leader Najibkhan was obliged to leave his protege the Emperor to his fate.*

---

१ सडे. २ चीजवस्त. ३ दौलतीचा. ४ कार्नक.?

 4267

No. 144] [June 1766?

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामी समर्थांच्या पादांबुज्याप्रति

आज्ञाधारक कृष्णराव गोविंद, साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे. राजश्री आन्याबास फौज शुद्धां असमाधान शरीर स्वस्थ नसतांहि रवाना करून कितेक कामकाजें बाकी राहिली होतीं म्हणोन, इदुरीं राहून कार्याची निर्गम करून मजल दरमजल अन्याबास सामील बाकी फौज सुद्धां जालों. दाहा हजार फौज समागमें असे. परंतु मार्गी अन्याबाचा फारच वाखा जाला. निराशाच जाली होती. परंतु समर्थांच्या पुण्यप्रतापेंकडून आराम जाला म्हणोन कूच दरकूच मजला करून चापानेरास आज शनवारीं पावलों. मार्गी चापानेरकरानें लोकांस फारच पीडा केली म्हणोन शहे दिधला. वरचेवर पारपत्य करून लौकरच हजूर येऊन पोंह(च)तों. मुलाज(मत) जालिया सर्वप्रकार निवे(द)न केला जाईल. खावंदाचे मर्जीप्रमाणें वर्तणूक केली जाईल. राजश्री मालराव होलकरहि उजिनीस फौजसुद्धां आले, मागाहून कांहीं लोकांची बाकी समजावीश राहिली म्हणोन अटकाविले. तेहि निर्गम करून लौकरच फौजेंत येऊन सामील होतील; आणिक यजमानासहवर्त(मान) हजूर सरफराज होतील. सेवेसी श्रत होय हे विज्ञापना.

¶*Krishnarao Govind writes to Raghunathrao that he is marching with all possible haste to effect a junction with the main army.*

No. 145] [After the middle of 1666

नकल

श्री

सेवेसी विज्ञापना राजश्री गोविंद शामराव व विठलराव सिवदेव बालाजी गोविंद यांची निल्ये पत्रे येतात कीं याउपर फौज लौकर येऊन आमची कुमक होत नाही तर किले राहात नाहीं. अमल उठेल. सरदाराची रवानगी करावी तर भोसले सिंदे यांचे घरी रोज उठोन लोकांचा दंगाच आहे. होलकराची सरदारी तर नवाच बंदोबस्त होणे आहे. त्यावरून तूर्त छावणीस बुदलखंड अगर जाटवाडेयांत जयनगरचे मार्गे जाऊन छावणी करावी ही आवाई घालून कोट्यावर शह देऊन तूर्त माघारे कूच केले. फौजेचा प्रकार म्हणावा तर सिंदे भोसले गवगवा.

हुजरातीस दोन वर्षे नालबंदी नाही. तमाम लोक उठोन जातात. जातील ते जातील; राहातील ते राहातील. दोन वर्षे पैसा नाहीं. याउपर लोकावर सख्ती चालत नाहीं. छावणीस पैका म्हणावा तरी भोसले सुधा चालीस पंनास पाहिजेत. तूर्त मिळण्याचा प्रकार कलतच आहे. जर होलकराची फौज लवकर आठ च्यार दिवसांत जमा होऊन छावणीस गेली तर पाच सात मजली माघारे जाऊन फिरोन देसी येतील. नाही तरी इकडे छावणीच होईलसे दिसते. छावणी याउपर जाहाल्याने खराबीच आहे. मागाहून होईल वर्तमान ते लेहून पाठवीन. भोसले यास खर्चाचा ताण मोठाच. सरकारांतून थोडे बहुत देतात त्याणे गुजरान होत नाहीं. माघारे फिरल्यामुळें त्याची फौज राहाणार नाहीं. उठोन जातीलसे दिसते. कलावे हे विज्ञापना.

¶*The writer complains about the monetary difficulties of the Maratha Sardars. "The Sindia and the Bhonsle are in no way better", he adds. "They are always pressed for money by the army."*

No. 146] [*20-6-1765*

श्री

श्रीमंत् राजश्री दादासा-
हेब स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक माहादाजी सिंदे कृतानेक विज्ञापना ताा छ १ मोहरम मुा नजीक मकुंदबारी स्वामीच्या कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीनी आज्ञापत्र पाठविले, तेथे आज्ञा कीं खासा स्वारी नर्मदाउतरातिरी दाखल जाली म्हणजे तुम्ही हुजूर रिकाबेत हजीर होणे म्हणौन. ऐसियासी खासा स्वारी इकडे येणार त्यावरून बहुत संतोष जाहाला. स्वारी कधी येणार हे आज्ञापत्रीं लिहिले पाहिजे. स्वारी इकडे आल्यानंतर आज्ञा होईल त्याप्रमाणे सेवेसी हजीर होऊं. वरकड इकडील कितेक वर्तमान राजश्री नारोपंत नाना यास लिा आहे. सविस्तर सेवेसी निवेदन करतील त्यावरून श्रुत होईल. राजश्री नारोपंत नाना व विष्णु माहादेव विनंती करतील ते मान्य करून बंदोबस्त करून देणार स्वामी धणी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Mahadji Sindia to Raghunathrao, promising that he is preparing himself for a campaign and would soon join him.*

4269

No. 147] [9-6-1766

पो छ १ मोहरम

श्री

श्रीमंत राजश्री राऊ साहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवेसीं नारो श्रीनिवास कृतानेक सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत जेष्ट सुध २ मुकाम भांडेर जाणोन स्वकुशललेखनास आज्ञा जाली पाहिजे. वरकड येथील वर्तमान तर काल भिंडेहून वाणी आले ते सांगत होते कीं जाटाची फौज भदावांत उतरली. पिनाट येथें ठाणें घातलें यैसें सांगत होते. दुसरे जाटाचे कागद गुजरास आले त्याजवरून गुजराकडून भगवंतासिंग जाणार यैसे वर्तमान आहे. सेवेसीं कलावें. दुसरे येथील ग्रहस्त काल पिंपरव्यास कूच करून गेले. आज येथें येतील कलावें. सायरेचा मजकूर स्वामीस दोन च्यार वेलां लिहिला आहे. प्रस्तु अ म या नी च्यारपांच रुपये येतात हें खरें लटकें राजश्री अपाजीपंत येथील फडणीस विनंती करितील त्याजवरून कलेल. सेवेसीं तरकारी पाठविली बितपशील.

८८७ वांगी वजन	८८३ भाजी वजन
२९ काकड्या सुमार	८८॥. मिरसेंगा
व फुलें कमल	२० खरबुजें

येणेप्रमाणे सेवेसीं पाठविलीं आहेत सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *The occupation of some Maratha outposts by the Jats is reported by Naro Shrinivas to Vishwasrav Lakshman.*

No. 148] [3-7-1766

पो छ २९ सफर सन सबा
मुा नजीक गोहद

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे शेवेसी

विनंती शेवक आज्ञाधारक दादो उधव चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २९ माहे मोहरमपर्यंत स्वामीचे कृपाकटाक्षेकरून

शेवकाचें व तालुके हायचे वर्तमान यथास्थित असे विशेष. [पुढील किती ओळींचा मजकूर फाटला कळत नाहीं.]

राणोजी सिंदे हवालदार किले सातारा यासी देवाज्ञा जाली. येविषईचा व पुढील बंदोबस्ताचा सविस्तर मजकर पूर्वी शेवेसी लेखन केलाच आहे. सांप्रत मारनिल्हेचे पुत्र धोंडजी सिंदे याचे नावे पुणियाहून श्रीमंत राजश्री रावसाहेबी किल्याचे बंदोबस्ताविसी सनद पाठविली आहे. म्हणून किले सातारा येथून पत्र आले होते व शेवेसीहि किलेमारीहून पत्र आली ती शेवेसी रवाना केली आहेत त्यावरून विदित होईल. कलम १

किले पुरंधर राजश्री नारो आपाजी यांचे स्वाधीन श्रीमंत राजश्री राऊसाहेबानी करून वस्त्रें दिल्ही; आणि रामचंद्र त्रिंबक यांस समाधानाचे पत्र पाठविले होते की तुम्ही चिंता न करणें, लोक सुधा तुम्हास सोलापुरास लौकरच रवाना करितों म्हणून. परंतु सोलापूरचा किला हस्तगत जालियावर मारनिल्हे आज्ञेप्रो तेथे चाकरी करितील. तों पावेतो पुरंधरीच चाकरी करीत आहेत त्याप्रो घ्यावी म्हणून श्रीमंत रावसाहेबास शेवकाने विनंतीपत्र लिा आहे व याचअन्वयें रामचंद्र त्रिंबक यासहि लिहिले आहे. लक्ष प्रकारें सदरहू अन्वयेंच घडोन येईल. उतरहि मागाहून जालियावर शेवेसी सविस्तर लिहून पाठवीन. कलम १

किले सोलापूरची आजपावेतों मसलतच पडली होती. आलीकडे राजश्री बाबूराव सदासिव यांचा तहरह ठरला आहे. किला लौकरच हस्तगत होईल म्हणजे राजश्री रामचंद्र त्रिंबक याची रवानगी किल्यास करितो. मारनिल्हेनी रामचंद्र त्रिंबक यास सोलापुरास न पाठवावे म्हणून मुदा सारे मुद्यांत शिरे घातला आहे. याचा निकाल दरबारी कोणे रीतीचा होतो तो मनास आणून शेवेसी लेखन करीन, परंतु आज्ञेप्रमाणे रामचंद्र त्रिंबक यांचीच रवानगी होईल. कलम १

किले पुरंधरास वस्तवानी होती त्यापैकी आनंदवलीस आणावयाचा ठराव पेशजी जाहला आहे त्याप्रमाणे वस्तवानी आला नाही म्हणून श्रीमंत रावसाहेबास येक दोन विनंतीपत्रे लिहिली होती. हाली वस्तवानी रवाना करणार. लौकरच येईल म्हणून रामचंद्र त्रिंबक याचे पत्र आले आहे. कलम १

प्रो आमोद येथे भडोचकर मोगलाने दंगा फार केला. मुल्क तमाम उजाड जाला म्हणोन वर्तमान आले आहे. येविषईचा मार सेवेसी पूर्वी लिहिलाच आहे. व विठल हरि याजकडेस दीड लक्ष रुपये रसद करार केली होती त्या प्रो मजकुरी दंगा जाहला व बंद पडली. आकार कमी

जाहला व भामेर परगणियाची जमाबंदी पर्जन्याचे आफ्तीमुळे कमी आली, सबब ऐवज द्यावयास मारनिल्हे 'मागे सरले. यास्तव हरदू माहालचा आकार मनास आणून त्या अजमासे रसद घेऊन विठल हरीकडे मामलत सांगावी न सांगावी' येविषईची आज्ञा जाली पाहिजे म्हणून पूर्वी विनंतीपत्रें शेवेसी पाठविली आहेत त्याची उत्तरे पाठविणार स्वामी समर्थ आहेत. कलम १

गंगापूरचे मुकामी तालुके हाये येथील बेगमीस इतलाख+ ऐवज द्यावयाचा नेमिला आहे तो द्यावा म्हणून श्रीमंत राजश्री रावसाहेबास विनंती केली होती. ते समई आज्ञा जाली की प्रो आमोद व प्रो भामेर येथील रसदेचा ऐवज तालुकियास द्यावासा पूर्वीच ठराव जाहाला आहे म्हणून आज्ञा जाहली. त्याजवरून विनंती केली कीं हरदू परगणियाचा ऐवज आनंदवलीस द्यावा व किल्यास स्वामीकडे विनंती करून नेमणुकेप्रो ऐवजाची बेगमी करून द्यावी ऐसी मजला आज्ञा आहे म्हणून विनंती केली. त्याजवरून पुणियास गेलियावर बेगमी करून देऊ म्हणोन आज्ञा केली. अलीकडेस पुणियाचे मुकामीहून विठल हरि टकले यास पत्र सादर जाहाले आहे की प्रो आमोद व भामेर येथील भरणा करावयास तुम्ही हुजूर येणे. त्यावरून फिरोन विनंतीपत्र पुणियास लिहिलें शेवकासमक्ष आज्ञा जाली होती की सरकारचे जासूद आशेरीस आहेत, त्याजकडेस पत्रे पाठवीत जाणे तेथून हुजूर येतील. त्याजवरून आजपावेतो दाहाबारा पत्रे आशेरीस रवाना केली व दोन जोड्या साविस्तर लेहून मुजरद हुजर पाठविल्या, परंतु उतरे येत नाही. शेवकलोकास खावंदानी कृपा करून पत्राची उतरे पाठविलियास सर्वावर दबाव पडोन कामकाजाचे बंदोबस्तास संशय राहात नाही, तरी कृपा करून उत्तरें पाठविणार स्वामी समर्थ आहेत. कलम १

किले भामेर राजश्री महिपतराव आवजी चिटणीस याजकडून छ १ जिल्हेजी सरकारात येऊन राजश्री बालाजी बाबूराव याचे स्वाधीन जाला. तेथे लोकांचा भरणा तालुके मुल्हेर प्रो पनास माणूस व येथून नामजाद पाउणसे माणूस येकूण सवासे माणूस नेहमी रवाना केले व हवालदार व सबनीस फडणीस कारखाननीस दफ्तरदार यांची नेमणूक करून किल्यास * * * * स्त चांगला केला आहे. शेवेसी श्रुत होय. कलम १

इकडील तालुकियाचा बंदोबस्त यथास्थित करून आषाढमासी पुणियास जाऊन सन सीतचा इतलाख ऐवज तालुके हायेचा येणे तो व पेस्तर साल सन सबा सितैनचा नेमणूक ऐवज द्यावयाचा ठरेल त्याप्रमाणे श्रीमंत राजश्री

+ नक्की, पृथक्.

आहें. उत्तर आलें नाहीं. सारांश श्रीमंत रावसाहेबांची मर्जी हरदू माहालचा ऐवज किले हायचे बेगमीस देवावा ऐसी दिसत्ये. येविषईची आज्ञा येईल त्याप्रो वर्तणक करीन. कलम १

रावसाहेबाजवळून नेमून घेऊन ऐवज वसूल करून आणऊन आज्ञेप्रों आनंद-वलीस पावता करितो. कलम १

येणेप्रमाणे नव कलमे शेवेसी लिहिली आहेत. याची उतरे पाठविणार स्वाम खावंद आहेत. किले हाये येथील तालुकदारास बंदोबस्ताविषई सरकारची आज्ञापत्रें सादर जाहली ती रा केसो गोविंद याणी परभारी रवाना करून उतरे आणऊन शेवेसी रवाना केली आहेत, वरकड सर्व तालुकदाराही किल्याचा बंदोबस्त यथास्थित राखोन सावध आहेत. रा गणेश विठल याणी सातारियाहून पत्रें पाठविली ती सेवेसी रवाना केली आहेत, त्याचीहि उतरें सादर होवयास आज्ञा जाली पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*A full and explanatory news-letter by Dado Udhav to Dadasaheb, answering nine items of dispute referring more or less to the estrangement between the Peshwa and his uncle.*

No. 149] [*29-7-1766?*

पौ छ २१ सफर

श्री

श्रीमंत राजश्री राव

साहेबाचे सेवेसी

विनंती सेवक महिपत शंकर कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २१ माहे सफर दोन प्रहर दिवस स्वामीकृपेकरून येथास्थित आसे विशेष. जवाहिरसिंग यानी रामपुरियाची आवाई घालून राजश्री बालाजी गोविंद याजवर दाहा पंधरा हजार फौज दगा करून पाठविली आहे. आगोधर जवारसिंगाने राजश्री बालाजीपंतास लिा होते कीं फौजसुधा चाकरीस येणे. त्यास ते न आले म्हणून दगा करून फौज पाठविली म्हणून बाजारी वर्तमान आहे. कोचेस पत्र आज वर्तमान यैकिल्यावर पाठविले. तेथून तथ्य वर्तमान आलियावर सेवेसी लेहून पाठऊ. यैकिले वर्तमान लिा आसे. बहुत काये लिहिणे? सिमथरीहून पत्र बाजिनस आले आहे त्याजवरूनहि कलेल. फौज बालाजीपंताची घेरली आहे. हे तहकीकच आहे. कोचेत ठाणे बसले. लढाई दोही फौजेची होत आहे. कृपा लोभ आसो दीजे हे विज्ञाप्ति.

¶*Mahipat Shankar reports to Vishvasrao Lakshman the treacherous attack of Jawahirsing against Balaji Govind Kher.*

No. 150] [6-8-1766 ?

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब साहेबाचे
शेवसीं

विनंती शेवके मानाजी सिंदे दंडवत विज्ञापना तागाईत छ २९ सफरपर्यंत साहेबाचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित आसे. यानंतरे आज्ञापत्री सादर जाहाले बहुत संतोष जाहाला. येथे माहादजी सिंदे याजकडील सेवा घडावी तो प्रकार लिहिला, ऐसियासी कार्य करणे तो विचार धणियाणी ध्यानात आणिलाच होता. दोन वर्षे काम केले, आज्ञेत राहिले(लो) ते जगप्रसिद्ध आहे. आम्हापासून सेवा घडणे त्यास दोन मास जाहाले. भाषणात मनस्वीपण करावे तरी ईश्वर परिणाम लावील, धण्याचे पुण्य उपयोगी पडल तेच खरे. आम्ही आपले चितात दृढनिश्चय येकच केला आहे. खावंदाचे चेरणापासी येकनिष्ठता आहे तरी माहाराजाच्या वरदहस्तेकरून कार्यभाग सिद्धीस जाईल. फौजेची तरतूद आजपर्येंत पाच सात हजारपर्यंत जाहाली आहे. पुढें करीतच आहो. येवढ्या आठा दिवसात प्रस्थान करावे हे मानस आहे. राजश्री बालाजी गोविंद व बहिरो अनंत व विस्वासराव लक्ष्मण व आन्यत्रास स्वामी आज्ञापत्रे सादर जाहालीच आहेत, ते सामील होऊन वर्तणूक करतील. आम्हीहि पत्रे त्याजकडे वरचेवरी रवाना करीतच आसतो. राजश्री जनार्दन विठल बराणपुराच्या रोके गेले. राजश्री बालाजी गोविंद ते येकत्र जाहाले. वरचेवरी आम्हीहि पथके रवाना करितो. माहादजी सिंदे उज्यनीस आहेत. पागा माहालोमाहाल चारणीस पाठविल्या आहेत. बारगीर नाहीत. माहालकरी जमीदार रुजू जाहाले नाहीत. च्यारसे रावतानिसी शेहरात आहेत. लोक गपा फौजेविसी मारितात. आमची ब्रातमी येणेप्रो आली. सेवसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Manaji Sindia assures Raghunathrao of his full support and informs him of his preparations and those of Balaji Govind, Bahiro Anant and Vishvasrao Lakshman whom he expects to join at once.*

No. 151] [8-8-1766 ?

पौ छ १ रौवल

श्री

यादी कामाची येणेप्रो विनंती करून करावे.—

१ सरदारास व देसीं पत्रें लिहिणें लवकरच येत ऐसे.

१ जाटाकडे बातमीस माणसे पाठवावी. दिनचर्येचे वर्तमान आणवणें. खर्चास द्यावें. विलंब न करावा.

१ लोकांस रोजमुरा द्यावा. तूर्त स्वारी पाठवावी अथवा पायची माणसे कुंभेरां[1] पाठऊन रामनगरकर गव (?) मोकुमसिंगानें जाळले; गढियास वेध आहे, दूर करावा. त्याचीं माणसें एके दो गांवी असतील ते मारिल्यानें दुंडी[2] मिटेल.

१ रा. चिमणाजी मोरेश्वर यास पत्र ल्याहावें. चंदेरावगैरे कोठेब्याकडील बोभाट मिटे ऐसे करावे.

१ वोडसेकर देवीसिंग भटाचार्यास वस्त्रें द्यावीं. मतलबाचा कांगद द्यावा. येक कारकून देऊन निश्चय करून आणवावा. कारकून नेहमी वाकफकार तेथें असावी. खबरदारी वाईट कळल.

१ तूर्त गलबलीचा प्रसंग आहे, याकरितां जमीदार हाताखाले घ्यावे. रोजमुरा द्यावा. चाकरी घ्यावी.

उदगावकर	जिबनेकर	नानरेकर चाकर सिवाय
१	१	रायसिंग हणजीतसिंग
बुदसिंग धंदेरे	अजितरायास	१
आबरकर	व पदमसिंगास	पहिलासिंग
१	पत्र ल्याहावें	१
	मयापूर	
	१	

सदरहू चाकरीस बोलाऊन वोलें[3] बर्तरीक[4] पोटास देऊन ठेवावे.

१ सरदार सर्व बोलाऊन खातरजमा करून घ्यावी. किल्यात ठेवणे. त्यांची नेमणूक याद करून ठीक करावी. किल्यांत कतवारं[5] असेल ते दूर करावे. नेहमी ठेवणे ते करार करून सरदाराचे लोक येकूण नेमणूक करून पकी करून ठेवावे, म्हणजे खातरजमा जाली.

लोकाचीं कुटुंबे शहरात आपले आज्ञेची वाट पहात बसली आहेत. त्यास सेपंनास स्वार माणूस देऊन घाटावर पोहचवावी. क्षणक्षणाचा गुंता वारावा. उपेक्षा न करावा. समयास या गोष्टी घडोन येणार नाहींत. विनंती करावी, करणे न करणे येख्तियार स्वामीचा. जाट येतो याचा निश्चय गिरमाजी पंताच्या पत्रावरून कळलाच असे. बुधीस वैर न करावे.

---

१ कुंभेर (?). २ दुंडी=दंगा. ३ वोल = जामीन. ४ यथामार्ग.
५ एक जात.

१ किल्यांत जकीरा[१] यादीप्रो करावा. लाकूडफाटे व तृण सिसे वगैरे जिनस कांही सुभेत आहे तो जमा करावा, आईते वेळेस काही होणार नाहीं.

१ माणसे जदीद[२] ठेवावी. त्यास पोटास द्यावयास अविछिन पैसा पाऊन दिलखुलाशीने चौकीपाहारा स्वारीसिकारीस हुशार राहतील, तैसेच आपले सिलेदार व पागा वगैरे सर्व लोक दोन महिने अछरजी पवार वगैरे यास पैसा पावला नाहीं, याचा शोध मनास आणून, आज्ञा करावी. सुभेतांमधे[३] दिल्हे न दिल्हे, दोन दिवस अधिक उणे जाले त्याचे कठिण नाहीं, असा देताच सर्व गोष्टी कामाच्या असेत. तुम्हापासी आहे वा नाहीं हे सिबंदीस म्हटलेयानें माणूस बेहिमत होते, राहावे न राहावें, संदेह प्राप्त होतो. हे गोष्टीचा बंदोबस्त केला पाहिजे. आधी हे गोष्टी व किल्याचा जकीरा करावा. उपेक्षा नसावी.

१ एक एक काम ध्यानास आणून याजवर एकएक ग्रहस्त नेमून सरबरा करणे ते करावी.

१ श्रीमंत राजश्री त्र्यंबकरावमामा याचीं पत्रें आली. त्यांचा सरंजाम करावा. पत्राचे जाब डंघाईतून पाठवावा.

१ राजश्री बाळाजीपंताचे खबरीस माणसे पाठवावीं.

१ करेरियाची मजबुती करवावी. गिरमाजीपंताचे पत्राचा भाव ध्यानात आणून कर्तव्यता करावी. जाटास पोकळच अजी ताा सापडले. ज्या गढ्यांचा भरवसा त्यानी आपणच गोळी न वाजवितां ठाणी कायम करीत आला. रामपुरा गोपाळपुरा, इंद्रुखि, बिलाव, आमायेन, जालौन, कोंच, आंकोडी वगैरे जागा कालपीदेखील सुटली. आश्चर्यच जाले. सिकू (?) त्याचा बसून चुकला. जमीदारानी मरावें, जमीन न द्यावी, त्यानी शस्त्रे सोडिली, ऐकून अपूर्वच वाटतें. आपण मजबुतीस प्रेत्नास चुकों नये. श्री उत्तम करील. सावधानीस आळस नसावा.

१ दरवाजापुढील रेवणी[+] खरखरी करवावी. जागा कार्याची असे.

१ समयास खर्चास मागेपुढें घेतल्या काम नासेल. विनंती केली, रागास न यावें.

सदरहू मतलब तूर्त आठवले ते विनंती केली. परिसोन योग्य वाटेल ते करावें. न वाटे ते न करावें.

¶*A memo of important and comprehensive suggestions made (probably to Raghunathrao) during his expedition against the Jats in 1767. The paper explains several imperfections of Maratha garrisons in Bundelkhand.*

---

१ सांठा. २ नवी. ३ सुबर्त्तेत. + किल्ल्याच्या दरवाजापुढील मातीचा उतरता ढीग पाय न निसरेसा करावा.

No. 152] [Recd. on 19-8-1766?

पौ छ १२ रोवल बंद ३

श्री

ताजाकलम. वर्तमान लिहिल्यावरी जाटास गुजर व दतियेवाल्याकडील धानतराय दिवाण भेटून जवाहीरसिंगास दभो व असमपूर येथें मुा करऊन जमीदाराच्या चितात यांचा अमल उठऊन द्यावा याअर्थें बाह्यात न दर्शवितां ठाणेयास उपद्रव मांडला असे. जमीदार भर हाच देतात कीं, झासी घेतल्यावर आपणच ठाणी सुटतील. या मजकुरास्तव च्यार दिवस मुा केला असे. आजी उद्यां मनसबा दृढ करून येणार. या प्रांतचे दंडी तितके जाऊन भेटले असेत. सरदारांस रामकिसन महंत चेमल उतरला चैत्रमासीं, त्या दिवसादारभ्य पत्रांचा सेतु केला परंतु यावयास प्रथम दिवसच असे. ते आश्विन कार्तिक मासीं येणार तों इकडें दरोबस्त अमल जाट करितो. कालपी प्रांत व कछवाधार व भदावर व तोंवरधार व सिकरवार, दंडरोली, खितोली कुल जाटाचा अमल जाला. कोण्ही उपराला न करी. त्यास सांप्रत मोकले रान पाहून प्रसर दिवसेंदिवस करित येतो. येका दों दिवसीं आम्हांसी गांठ घालितो. माहाराजांचे प्रतापेकरून त्यासी झुंज होईल, ते परस्परें श्रवण होईल. कस्त महन(ती)स चुकणार नाही. उपराला जाला पाहिजे. सामान सरंजाम सर्व नवीन प्रसंगानरूप केला आहे. पहिल्या सरंजामाप्राा नाही. खर्च तोफांचा बहुत आहे. असो; आपला प्रताप समर्थ असे. उपेक्षा हिंदुस्तानची न करावी. मातबर स्थलें ग्वालेर झासी नामी जागा राहिल्या. पुन्हा आपणास पूर्ववतप्रमाणें अमल करावयास, राज्यास शासन करावयास अशक्य नाही. जाटाचा दुराग्रह स्थलांचाच बहुत असे. ताल मनसबा लिा म्हणोन क्रोध न करावा. यास मागें पायबंद असता तर इकडे पाय न ठेविता. निरांकुश गर्वारूढ अतिशय उन्मतपणें या प्रांतात असे. दाहा वीस हजार फौज सरदार येते तरी जाटास विचार पडता, तो प्रकार कांहीच त्याच्या नजरेस येईना. राा बालाजीपंतास इतबार दर्शऊन दगा केला. ते टलोन व्यत्रवतीपार राज्यांचे आश्रय गेले. आम्हांस आश्रय स्वामीचे चरण किंवा ईस्वर (ईश्वरावर ?) भार देऊन स्थल खावंदाची जागा राखून असों. उपराला करावयास स्वाम समर्थ असेत. प्रांतात जमिदारानी कुल दुंडी केली. अमलास कोण्ही पुसत नाही. ठाणी आजीताा रक्षून कर्ज खाऊन खावंदाचा नक्ष राखिला असे. पुढें राहणे स्वामीचे प्रतापच असे. दुसरें जाणत नाही.

¶*This is a postscript of a letter addressed to Raghunathrao which is unfortunately missing. The writer gives some idea of the preparations that he had made to conduct operations against the Jats in the North. The writer feels confident of vanquishing them.*

4277

No. 153] [28-10-1766?

छ २३ जौवल

श्री

श्रीमंत स्वामीचे शेवेसी

विनंती. उतु(डि?)ण्यांची गढी घेऊन फौज दभव्याकडे गेली म्हणौन लिहिलें, त्यास स्वामी दैववान आहेत. दभवा महुमोहनी सर्व माहाल सुटतील. चिंता नाही. जाटाचा रेच पुर्ता माधोसिंगाने मोडिला हेहि ।। अव्याक्षेपो भविष्यंत्या: कार्यसिद्धेर्हि लक्षणं ।।१।। ऐसे आहे. दोनी संतोषाची वर्तमाने राजश्री बालाजीपंतबाबा याजला लिहावी. हे विनंती.

¶*The writer reports the defeat of the Jats at the hands of Madhosing of Jainagar.*

No. 154] [Recd. 2-12-1766

पो छ २९ जाखर

श्री

श्रीमंत स्वामीचे शेवेसी

पोष्य उभयतांचे साष्टांग नमस्कार विनंती ऐसी जे. राजश्री सिंद्याकडून भदावर कछवाधार दोन्ही संस्थानच्या सनदा स्वामीस आल्या हे संतोषाचे वृत्त स्वामीनी कृपा करून स्मरणपूर्वक लिहिले त्याजवरून बहुत आनंद जाहाला. दोन्ही आनंदाचे प्रीतिसंगमी मानस मज्जनोन्मज्जन पावले असे. बहुत काये लिहिजे? कृपा वर्धमान केली पाहिजे हे विनंती.

¶*The writers express their delight on hearing of the submission of the two provinces Bhadavar and Kachhvadhar by Sindia to the Peshwa.*

No. 155] [19-12-1766

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्री

कृष्णराव बलाल गोसावी यासी

सेवक रघुनाथ बाजीराव नमस्कार. सुा सबा सितैन मया व अलफ. तुम्ही विनंतीपत्र पाठविलें ते पावलें. श्रीमंत रावसाहेब स्वामीकडील लक्ष फार राखितात.

फौज व ऐवज काही स्वामीकडे पाठवावा हे याचे मानस होतें. परंतु थोडी फौज पाठविल्यानें हिंदुस्थानी फौज थोडी आली म्हणतील व ऐवजाची सोये आहे नाही ते स्वामीस कलत आहे, म्हणून विस्तारें लिहिलें ते विदित जाले. ऐशास चिरंजीव इकडील कालजी करितात हे उचितच आहे. ती दौलत व ही दौलत निराली नाही; येकच आहे. इकडे थोडासा मसलतचा प्रकार बनला होता. खर्चाची वोढ च्यारपाच लक्ष पावेतों चिरंजीवानी पाठवावे, परंतु तेथेंहि वोढीचा प्रकार. त्यास त्यांचा इलाज कायें? प्रस्तुत इकडील वर्तमान तरी, गोहदेहून कूच केलियाचे पेशजी लिहिले आहे. तेथून कूच करोन जाटाचे शहावरी आलो. त्याचे राजकारण सलुखाचे लागले. केवल बिघाड करावा तरी दुतर्फा खराबी. यास्तव इकडूनहि सलुखाचाच प्रकार केला. त्याजकडील महंत रामकिसन व उमरावगीर गोसांवी हुजूर येऊन मुलाजमत केली. तोहि भेटेल. प्रातीचा विचार काही नाही. चाकरी करीन म्हणतो. लाख पंनास हजार रुपयाचे वित्त, जवाहीर, हाती, घोडें वगैरे मात्र नजराणा येईल. सरकार मनसब्यासहि उपयोगी पडतील. यामागें काही मसलतीमुले वोढीचा प्रकार जाला होता. पुढें श्रीकृपेकरून काही तऱ्ही सोये पडेल. जाणिजे छ १६ रजेब.

¶*Raghunathrao writes to Krishnarao Ballal that he is pleased to hear of the great regard shown to him by the Peshwa. He encloses his programme in the North and refers to the negotiations which he was holding with the Jats.*

No. 156] [*20-12-1766 ?*

श्री

सेवेसी आज्ञाधारक बालाजी गोविंद कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा मार्गसीर्ष वाा ४ पावेतो येथास्थित आसे विशेष. पाा भेलसे वगैरेच्या सनदा तयार जाल्या त्या सनदा राा खंडो माहादेव याजवळ पाठविल्या आहेत. सिके करून द्यावयास आज्ञा करावी. शेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Balaji Govind sends sanads for Bhilsa and other places and requests the Peshwa to issue them.*

No. 157] [*23-12-1766*

श्री

श्रीमंत राजश्री दादा साहेब स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक मालराव होळकर कृतानेक विज्ञापना. येथील कुशल तागाईत मार्गशीर्ष बद्य ७ मुकाम इंदूर येथास्थित असें विशेष. छ १८ जमादिलाखरचे

आज्ञापत्र सादर जालें तें उत्तम समयीं प्रविष्ट होऊन संतोषावाप्ति जाली. जाते-समयीं फौज रवाना करितों, आम्हीहि मागाहून सत्वरींच येतों म्हणून बोललें असतां जलद फौज येत नाहीं. जाट ढवलपुरास आला हें प्रसंगी तुमची फौज तुम्ही असावें म्हणून जलद फौज यावयासी आज्ञा केली. ऐशियास आम्ही साहेबापासोन आज्ञा घेऊन दरमजल इंदुरास आलों. येथें आलियावर आधीं स्वामीशीं ऐवजाचा करार करून आलें. धनी मोहीमशीर. समयोचित ऐवज पावला पाहिजे, यामुळें आठपंधरा दिवस त्या तजविजीस लागले. कोण्हेही प्रकारें ऐवज वाटें लाऊन फौजेचे रवानगीस लागलों. सरंजामी फौजेवर सोयीस नाहीं. इतलाखी शिवाय भरणा न होय. निकडीचे समयीं स्वामीपाशीं फौज पाठवणें तें मनांत भरून सेवाचाकरी घडे ऐसी पाठवणें. यामुळें नवी फौज ठेविली. मागील लोकांचा राडा, येक दिवस चैन नाहीं. तशांत आठपंधरा दिवस राजश्री गंगाधरपंत तात्यास समाधान नाहींसें जालें. चहूंकडून येक प्रकार मागील लोकांचीं तीन सालें जालीं. त्यांचा हिशेब करून समाधानाप्रमाणें देणें. त्यांसीं करोड रुपये पाहिजेत. घर पाहतां माहलचा ऐवज स्वारींत नेऊन भाक्षिला. कांहीं चांदवड नालंबदी वगैरे खर्च सावकारी कर्ज घेऊन केला त्याचें रदकर्जी पावला, बाकी मागील सावकारांची देणें. पुढें तीन सालां समजावीस व हली फौज रवाना करणें. त्यांची नालंबदी व नवी फौज बा। स्वारीची येणें. जुनी नवी त्यासी नालबंदी येकूण मुबलग पैसा पाहिजे. ती वर्षीचें ओझें येक समयीं पडलें. या काळांत तीर्थस्वरूपांस कैलासवास जाला. ईश्वरसत्ता प्रमाण. त्यानीं आम्हांविशी सर्वप्रकारें स्वामीस निरऊन समक्ष हातीं देऊन आपण निधन पावले. ते येकनिष्ट स्वामीसेवा यावच्छक्ति केली. पुण्यवान प्रतापी, खावंदांनीं त्यांचें ठायीं अकृत्रिम लोभ केला, त्यांचा आशीर्वाद आमचे पदरीं आणि सर्व प्रकारें स्वामीचें अभय पूर्णत्वें मग आम्हांस चिंता काय आहे? बहुत दिवसांचे राड्यामुळें च्यार दिवस बखेडा जाला. तथापि आम्ही सर्व निकडी सोसून रवानगीची फौज देशींची उत्तम निशा पडे ऐशी ठेऊन त्यास नालबंदी देऊन राजश्री सदाशिव गंगाधर यांची रवानगी केली. एथून सुमुहूर्तें स्वार जाले. अत:पर दरमजल सेवेसी अविलंबें येतील. वरकडहि लोकांचे मागील निर्गत बहुतेक झाली. कांहीं राहिली तेहि होईल. ज्याची समजोती पडली त्यासी नालबंदी देऊन आज्ञा दिल्ही. जलद फिरोन यावयाचे करार केले आहेत ते सत्वरीच श्रीइच्छेनें येऊन पावतील. खांवदांचे पुण्यप्रवाहे तीर्थस्वरूपांचे आशीर्वादें यावर कांहीं अगाध न पडतां फौज तों अतिसत्वरच येऊन पावती आणि आमचे स्वारीचेहि योजनेंत लागलों. यंदा लोकांचा बखेडा फार जाहला, त्याचा विस्तार काय

लिहावा? लोकांनीं कांहीं विचार ठेवला नाहीं. प्रस्तुत स्वामीचे कृपेकरून फौजेची रवानगी होऊन पुढील कामहि चालीस लागलें. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶*Malrao Holkar assures Raghoba that he is making every effort to send his strong and well equipped contingent to the addressee, the delay having been due to various domestic and financial causes.*

No. 158] [*23-12-1766*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी.

विज्ञापना. ताजा कलम वदंता ऐकिली कीं खासी स्वारी चमेलीजवळ जाऊन जोहरमल जाट याजकडील वकील येऊन सेवेंत शरण येऊन राजश्री नारो शंकर राजेबाहादर यास घेऊन जाऊन सख्य करून राजश्री सुलतानजी लांभाते वगैरे सरदार सोडून आणिले. त्यास मार्गशीर्ष वद्य ७ राजश्री मालेराव होळकर यांणीं खुशालीचा तोफखाना ज्यारी केला. त्याजवरून त्याजकडील लोक वगैरे संतोष पावले कीं श्रीमंत साहेब या प्रांतीं आले म्हणोन सर्वांची स्थीत राहिली. नाहीं तर या मुल्कांत दुंडी होती. परंतु श्रीमंत साहेब पुण्यवान येशस्वी; येणेंकरून सर्व पादाक्रांत संस्थानिक होऊन शरण आले. येणेंकरून आनंदमय सर्व जाहाला. माझी वकिली जोहारमल जाट याजकडे सरकारांतून आहे. त्यास तिकडील कामें-काजें पडलीं आहेत. सेवेंत चाकरी करून दाखवितों. सांप्रत हेहि साहेब-चाकरी आहे. मजला उजूर नाहीं. त्यास साहेबी मजवर कृपा करून उर्जित करावें; आणि प्रस्तुत राजश्री सेव्याजी ऐतोले यास ताकीदपत्र पाठवावें. पृथ्वींत लौकिक जाहाला कीं साहेबी सरकार बिज्यागड येथील मोकासा सरकारांत खालसा ठेऊन कमावीस सांगितली. त्यास साहेबी सेवकाचा बंदोबस्त करून द्यावा, तदनंतर मातबर कामें घ्यावी. पूर्वी हिंदुस्थानांत मातबर कामें घेऊन चालविलें. पुढेंहि साहेब ऊर्जित करणार धनी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञाप्ति.

¶*The writer, a Maratha Vakil with the Jats, bestows fulsome congratulations upon Raghunathrao for the success of his expedition which had in reality proved ruinous.*

No. 159] [1766?

श्री

सेवेसी विज्ञापना यैसीजे. जाटाकडील आज बातमीचे वर्तमान आलें. त्यास रूपराम[१] यास आपले साधनानिमित्य रवाना केलें आहें. त्यास निक्षूण ताकीद केली आहे की त्वरेने जाऊन श्रीमंतांचे साधन करावें. दानसाहा त्याजवल होता त्यासीहि कजिया होऊन त्यास निरोप दिल्हा. याप्रो गोसांवी यांकडे वर्तमान आलें, त्यावरून सेवेसीं लिहिलें असे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The letter reports that the Jat Raja has sent Rupram to negotiate a peace with Raghunathrao, having expelled Danasha, the main source of trouble.*

No. 160] [1766

श्री

अपत्येंसमान मोरो बाबूराव साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशललेखन करीत असिले पाहिजे विशेष. गोहदकर राणे याजकडील मामलतीचे जाबसालाच्या करारामदारास्तव वकील हुजूर बोलवावा म्हणोन पेशजी पत्रे आली होती; व हाली त्याचे बोलणें कीं प्रस्तुत या प्रांती धामधूम आहे. या प्रसंगी सरकारचाकरी करून धन्याची मर्जी संपादून घ्यावयाचे हेच दिवस आहेत; तर वकील हुजूर पाठवावा म्हणौन आज्ञापत्र आलियासी वकील शेवेसी रवाना करूं. करारमदार ठरेल त्याप्रो फौजसुधां आज्ञा होईल त्यासमागमे येकनिष्ठेने चाकरी करूं. या प्रांतातील इतर स्थलाच्या फौजा चाकरीस येतात त्यांचें बंदोबस्त करून दिल्हे आहेत त्याप्रमाणे आम्हावर कृपा करून, करारमदार करून दिल्यास शेवाचाकरी करूं व नजरनियाजहि जीवनमाफक आज्ञा होईल त्याप्रमाणे बंदोबस्त स्वामीच्या मर्जीनरूप करूं म्हणौन मारनिल्हे याचा संकेत आहे; व सदासिव गोविंद याचे मुखजबानी वर्तमान यैकोन त्याचे वकिलास बलावणेयाचें पत्र सरकारचे दिल्यास उतम आहे. पालेगार हाताखाली आलियाने सरकार उपयोगी आहेत. मारनिलेकडील कारकुनानी आपणास पत्र द्यावें म्हणून सागितले, त्यावरून पत्र लिहिले आहे. उचित दिसेल ते करावें. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Moro Baburao writes about the submission of the Rana of Gohad and his desire to send his envoys to effect an agreement with the Marathas.*

---

१ कटारी ?

No. 161] [1766

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक गणेश संभाजी सो॥ नमस्कार विज्ञापना. ता॥ छ २६ माहे सेवाल मो॥ लस्कर * * * * दाखल असे विज्ञापना येसीजे. हुजूर येणे येशास * * * * * * * फौज समागमे * * * * * * * होते. स्वारी * * * * * * * तेव्हाच * * * * * * कामगारी गळी * * * * * * * याजकरिता गुंतोन * * * याजपासी दीढ वर्ष आहे. काम सांगितले तें करावें लागलें. त्याचे कर्ज मागे घेतला येवज तो देणे तैसाच राहिला. हेहि सरमंदगी.+ कार्यास पाठविलें तिकडे जाणे प्राप्त जाहालें. यामध्ये साहेबसेवा घडोन येते; यास्तव इकडे आलो. नाही तरी मालव्यात चरणापासी हाजीर जाहलो असतों. गुता गली पडिला होता याचा बंदोबस्ताकरिता गुतलो होतो. हाली याच्या लस्करास सामील जाहालो आहें. काजकाम जाहाले ते यांस समजाऊन देऊन यांचा निरोप घेऊन सेवेसी सत्वरच हाजीर होतो. मजविसी साहेबास कितेक सांगणारानी सांगितले असेल त्यास मी आपले कितेक वृत सेवेसी सविस्तर विदित करीन. साहेब धणी मायेबाप माझा निवाडा करणार स्वामी समर्थ आहेत. जबरदस्तीने ठेऊन घेऊन तिकडे पाठविले. माझा उपाये काये? केव्हा चरण पाहेन ही मजला उत्कंठा * * * * * हे कागदपत्र यांस समजा * * * * पोहोचतो. पहिले आज्ञा * * * * * * * सवाली येका * * * * पावले श्रुत * * * * विज्ञापना.

¶*Ganesh Sambhaji who had gone over to Shuja-ud-daula after the disaster of Panipat is seeking to regain Raghunathrao's favour by offering his submission.*

No. 162] [1766?

३

(सुरवातीचे बंद गहाळ)

पार पाडणार धणी समर्थ आहेत. सेवकलोकीं आलें वर्तमान लिहावें. फौजा पाठऊन परचक्र निवारण स्वराज्याचे पालण करणे येख्तयार खावंदाचा आहे. निदान जाणून लि॥ असे. वरकड सविस्तर आर्थ रा॥ गोविंद रघुनाथ सेवेसी श्रुत करितील.

+ लज्जा, संकोच.

२.

तपसिले ! असो. दुसरे जवाहीरसिंग जाट पुष्करावर जाऊन बिजेसिंग राठोड मारवाडकर याच्या त्याच्या भेटी होऊन येक जाले. राजे माधोसिंग यासीं खेरकशा[1] प्रथम जाटाने केला. परंतु सांप्रत तिकडील सलुख करावे, सर्व येक जागा होऊन दक्षणी मुलकाची जप्ती करावी, मालवा सुधा हस्तगत करावा, य प्रांती गोहदकर यास पत्रे लिहिली आहेत, इकडील प्रांतात येकंदर परिल्वो[2] त्याचा जालाच होता. राजेरजवाडे त्यास पत्रे लिहून मागती गोहदकर सुधा फौज इकडे येणार हा परिछिन मनसबा आहे तथ्य बातमी आली आणि सांप्रत मुलकातील द्रिष्टोत्पतीत अनुभवसिध वर्तमान आहे ते सेवेसी लिा आसे. धण्याचे प्रतापे संकट निवारण होईल तेव्हा खरे. फौजेच्या व सिबंदीच्या खर्चाखाले येऊन पुढे सुभेता नाहीसा जाला, यामुळें संकट मोठे प्राप्त आहे. लिहिता विस्तार. आम्हीं कायवाङ्मनेकरून येकनिष्ठ सेवेस आंतर करीत नाही.

¶*News-letter informing of Jawahirsing's march to Pushkar, his meeting with Bijesing of Marwad and the general rising of the chiefs against Marathas.*

No. 163] [*1766-67?*

पौ छ २७ सफर

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेबाचे सेवेसी

विनंती. सेवक महिपत शंकर कृतानेक साा नमस्कार विनंती उपरी. एथील कुशल ताा छ २७ माहे सफर स्वामीकृपेकरून येथास्थित असे विशेष. कोटरियास माणूस खबरीसाठी पाठविले होते, तेथील वर्तमान याप्रो आले जे राजश्री बालाजीपंत सुखरूप जलालपुरी आहेत. सुज्यातदवला मुसानगर घाटमपूर येथे आलियाचे वर्तमान आहे. येरामडोरियास ठाणे गुजराचे गेले होते. तेथील लोकानी ठाणे बसून दिल्हे नाही. बहुत काये लिहिणे ? राजश्री गोविंद शामराज याजकडील सोधा (?) खबरीस गेला होता तो येथे आला, त्याणे वर्तमान सांगितले कीं सुज्यातदवला व फिरंगी सा पलटणे येसी आली आहेत. राजश्री त्रिंबकरावमामाहि त्या फौजेबराबरी आहेत म्हणून सांगितले. दुहिरी वर्तमान आले म्हणून सेवेसी लिा आहे. कृपा लोभ आसो दीजे हे विज्ञाप्ति.

¶*Mahipatrao Shankar writes to Vishvasrao Lakshman that Shuja is reported to have reached Musanagar with six platoons of English troops and that the attack of the Gujars on Yeramdori has failed.*

---

१ कज्या, तंटा. २ प्रसार.

No. 164] [1-2-1767

" छ ९ रमजान

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक त्रिंबक कृष्ण करंदीकर सां नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुशल ताा. माघ शुा ३ मुा कसबे भडगाव प्रां खानेदश. स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान यथास्तित जाणून स्वकीये कुशललेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. आम्ही आलियापासून कृपापत्र येऊन सांभाल न जाला. तरी ऐसे न करावें. सदैव पत्री सांभाल करावा. आम्ही कुटुंबाखेरीज नाही. राजश्री धोंडाबा नाो गोगले याजकडे प्रां भडगाव येथील बाबतीचा रसदेचा यैवज रुपये २२०० बाविससे आम्ही ठेवून आलो होतो. तो येवज त्यानी सेवेसी प्रविष्ट केलाच असेल. जाब त्यानी घेतला असेल. नसला घेतला तर देविला पाहिजे. गालेरची पत्रे पौष शु २ ची आली. श्रीमंत राजश्री दादासाहेब गोहदेचे मोरचे राजश्री महादजी सिंदे याचे विद्यमाने सलूख ठराऊन उठविले. पलीकडील जाठ जव्हारसिंग ढोलपुरास चमेलीपरतीरी आले. त्याचे मोहऱ्यावर अलीकडे चमेलीच्या श्रीमंत राजश्री दादासाहेब मुकाम करून राहिले. राजश्री उमरावगीर गोसावी याचे विद्यमाने व राजश्री नारो शंकर याचे विद्यमाने भेटी व्हाव्या यैसे ठरले होतें. परंतु जाठाचे चितांत कोण्ही संशये घातला कीं गोसावी श्रीमंतास भेदला आहे. तुम्हास दगा आहे. त्याजवरून येक दिवस रात्रौ जाटाने गोसावियाचे पथकावर हाला केली. फौज झाडून लुटली. जूज जाहाले. पाच सातसे माणूस पडले. गोसावी अमरावगीर, अनुपगीर, मीरजागीर येसे तीघे सरदार तीनसे स्वारानिसी पलोन श्रीमंताचे लस्करात चमेल उतरून आले. हा प्रकार मार्गसीर वद्य ७ सप्तमी अष्टमी इतका जाला. हे अलीकडे आले म्हणोन जाट दुसरे दिवसी कूच करून भर्तपूर येथे गेला. श्रीमंतानी कूच केले ते करोली (अपूर्ण)

¶*Trimbak Krishna reports to Nana Fadnis that Dadasaheb gave up the siege of Gohad and came to an understanding with the Rana. A meeting arranged between Jawahirmal and Dada was ineffective owing to the former's suspicion of the fidelity of his Gosavi allies who were routed and who had taken shelter with the Marathas.*

4285

No. 165] [*2-2-1767*

श्री

सेवक गोपाल चक्रधर विज्ञापना यैसीजे. अठाविसाव्ये साबानी जवाहिरसिंगानी वृंदावनाहून कूच केला ते गोवर्धनावर येऊन लस्करचा मुकाम जाहला. आपण निंबगावास सासुरवाडीस मेजमानीस गेले तेथें भोजन केले. बिजेराम सालेयाने पांचशत रुो व कापड रुपेयाचे ताटांत ठेवून जाटास नजर केले. जवाहीरसिंगानी घेतले नाही. रात्रौ निंबगावीच राहिले. साले याचे बाईकोवर कृपा फार केली. सदैव करीत असतात. तेथून येकूणतिसाव्ये साबानी कूच केला. लस्कर सुधा दीढ प्रहर दिवसी डीग दाखल जाहाले. उपरी रतनसिंग वृंदावनी राहिले होते तेहि डिगेत दाखल जाले. लस्कर सायरी[१] कुंभेर दरवाजियावर पडले आहे. आपणहि डिगेहून दोहूंचहूं दिवसी बाहेर निघणार. उपरी गिलच्याची बातनी तर बिवा(या) नदीवरच आसे. परंतु याची बातनी मधून येत असत्ये. ठिकाणी नाही. माहाराजानी करून घ्यावी. उपरी जाटानी तबेलियाचे घोडे पाहिले. येक घोडा भुपालसिंग बाहादूरसिंग वैरवाला याचे लेकास दिला. वेरवाला व मुसेखान फरुखनगरवाला हे दोघे डिगेचे पके किलेयात कैद आसेत. उपरी स्वामीचे लस्करची बातनी जाटास आली जे लस्कर खिचीवाडेयास गेले, ते समई गोहदकराचा येक ब्राह्मण होता त्यास इषारा जाली जे काम करणे, तरी स्वामीनी ग्वाल्हेर जिल्हेयात फौज चांगली दाहा हजारपर्यंत ठेवावी. नाही तर गोहदकर प्रांतात दंगा करील जाणावे. उपरी जाटाने आपले खलबती लोकांस मटले जे श्रीमंत व माधवसिंग वगैरे सर्वासी मी बिगाड केला. आतां अबदाली आला तरी रोहिलेयासी मी येकवाक्यता करितो, जे रोहिले याची व आमची येकत्र मामलत चुकेल आणि हरकोणी येकासी सलूखहि ठेवावा तो यासीच ठेऊ असे मटले. परंतु चितातून दगाबाजीच आहे. रोहिलेयाचीहि दगाबाजी आहे. उपरी सीख आपणामध्ये फुटले. मयासिंग शाहस भेटला व चरसासिंग डोगरास गेला. जसासिंग पळाला या जखमी आहे असी खबर सिखाची आहे. उपरी जवाहिरसिंग पहिले रमजानी स्वारीनसी पके किलेयांत गेले. गिरदनवाई[२] किला पाहून उपरी शहरपना हृ गिरदनवाई पाहिला. जागजागा मरंमत करावयास सांगितली आणि मुलना मोसम नवलखा बागेंत उतराला, त्याचे येथे जाऊन घटिका येक बसून मग स्वारीनसी येऊन वाडेयांत दाखल जाले. मुलना मोसमाने जाटास नजर यक हती व येक घोडा पोषाक आठ यैसे नजर केले. याणी घेतले नाही. उपरी जाटानीहि मुलन्यासाठी हती १

१ लष्कराची रांग. २ तटबंदी.

व पालखी १ व घोडा १ यैसे तीन . द्यावयास तयार केले आहे. बिदा-करिता वेलेस देणार. येकादाहू दिवशी बिदाहि करणार जाणावे. उपरी रणजितसिंग किशोरीचा लेक कुंभेर तालुकेयाचा डिगेत दाखल जाला. गंगा-प्रसाद राधाकुंडी होता तो डिगेस आला. उपरी शाहकडून पुर्जा आला जे बियास व सतलुज दोहू नदी याचे दुआबेयात माछिवाडे याजवल दाहा कोसावर आहे. फौज माछिवाडियावरती आहे. उपरी सीख काही भेटले. काही पलाले आहेत. ते शाहचे पाठीवर आले आसेत. मार्गे उपद्रव फार करितात सबब शाहास पायबंद बसला आसे. नजीबखानहि काही फतुरांत आहे आसी बातनी येथे आली. उपरी महंत येमुना पार जवरटपरावर आहे व तोफखाना येमुना आलाड महंताचे बराबरीने जात आसे. बलमगडावर तोफा राहतील. उपरी जाट डिगेंत पंचमी करून शष्टी या सप्तमीस कूच करून कुंभेरीस जातील. तेथून मुलेनमजकुरास बिदा करितील. जाणावे. उपरी दक्षणी देशास गेले म्हणून या मुलखांत आवई पडली आहे, तरी माहाराजानी सडी फौज पनास हजारपर्यंत सरहदेवर आसो द्यावी. समयावर उतरून तडाका द्याया यावर आसो द्यावी. उपरी नजीबखानाचा तोफखाना येमुनापार उतरला. रोहिलाहि जमा झाला आहे तोहि उतरणार. त्यावर गिलच्या दाव भारी करितो आहे. जाणावे. माहाराजानी तिकडील मामलती घेऊन स्वामीनी गनीमी कावा घालून येखा दिसा मुलूख झोडावा. तमाम रुजू होतील जाणावे. सारांश मर्जीस येईल तसे करावें. सेवेसी श्रुत होय हे विनंती. रा छ २ रमजान सोमवार प्रात:काल मुा डीग.

¶*Gopal Chakradhar gives a report detailing the activities of the Rohilas and the Jats and the advent of Abdali into the Punjab and the harassment he has suffered from the Sikhs.*

No. 166] [5-1-1761 ?

पौ छ ६ साबान

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे

सेवेसी

विनंती सेवक अपाजी मैराल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ ४ माहे साबान मुा का दभुवा महाराजांचे प्रतापे येथास्थित जाणोन स्वकीये निजानंदलेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. इकडील वर्तमान इंदरुखीस येथून कायेत व च्यार माणसें पाठविली होती त्याचें काल प्रात:कालचें पत्र लिहिले ते आस्तमिती पावलें. त्यांत आर्थ दानसा साहाजार फौजेनसी इंदरुखीचे पेलतिरीं

+ पत्र.

अहे. येलतिरीं दोनसे स्वार आहेत. फौजेत बोलवा हेच की काहारेवर जावे. पुढे जावे. परंतु आलीकडे जरूर येतील. माणसे स्वार पो त्यासाठीं नदीचे गांवी व काहारेस आले आहेत. काहारवाल्या राजानें लढाईचा सरंजाम केला आहे. रामपुरेकर राज्यास व गुजरास बोलावणी आली आहेत. याप्रमाणे तूर्त वर्तमान आहे. आसपास पाचापाच सात सात कोस लुटितात, तेनेकरून गांव उज्याड जाले आहेत. आपले तालक्याचे गांव तसि बतीस उज्याड जाले आहेत. तमाम लोकानी दहशते खाली आहे. जाटाकडील वकील रूपराम कटारी याचा पुतण्या रो गंगाधरपंतबाबाजवळ आला आहे. जाबसाल की पहुजयांतिरीं तुम्ही असावें, त्या तिरी आम्ही असावे. तुमचा आमचा सलुक. याणी जाबसाल केला कीं सिंदपार तुम्ही राहाणें आलीकडे आम्ही राहूं येसे जाबसाल आहेत. ठरावात येईल ते मागाहून सेवेसी लिहूं. सेवेसीं श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Appaji Mairal informs Vishvasrao Lakshman of the inroads made by Jat Dansa and the ruler of Kahar. The terms of agreement provisionally proposed by both are also given.*

No. 167] [*7-1-1767?*

श्री

सेवेसी गोपाल चक्रधर विज्ञापना येसीजे. समरू व दानसा ऐसे व छत्रसिंग मलकापुरियाहून कुंभेरीस रवाना केले. मनुलाल व छत्रसिंग चवाण व किरपाराम पुरोहित भरथपुरास गेले. सिवनाथ पिनाहटेस गेले. बालानंद बैरागी बिदा होऊन आपले भिक्षाटणास गेले. फौज फार करून बतर्फ केली व गैरफौज आपलेले घरास लोक लागले. जव्हाहिरसिंग सडे सात-हजार फौज व काही तोफखाना जलेबी येसे जमातेनसी आहेत. आदितवारी सिंकंदरे याचे बागेत जाऊन भोजन केले आणि नवाडियात बसून यमुनेमध्ये सेरं[१] करीत येऊन किले दाखल जाले. उपरी दुंदेखान बिसोलीत असेत. त्याकडून वकील शेखमहमद आशक व गणेश वेदांती येसे काही जिनस कस्तुरी व चवरे व शाल व काही कुत्री, बाज, घोडी येसे घेऊन येऊन फुरुकाबादेस पुरुषोत्तम महादेव याजपासी दाखल जाले. उपरी रतनसिंगजी(नी) परशरामगीर पलविला म्हणून जवाहीरसिंगाची मर्जी त्यावर फार क्रुध जाहली आहे. सिवनाथ बक्षी अटेरीकडेस गेला आहे. बुंदेलियाचे फौजेस दबाव, परंतु ती फौज सावध

१ सेर = सहल, पाहणी.

ठेवावी. प्रयागाकडील कांहीं फौज आलमचंदाचे सरादेस येऊन सात कोसावर उतरले असेत. नजीबखान रामडेयाचे घाटी असे. उपर मुलना मोसिंम व जैकिसनदास हे दोघे हाफीज रहमानकडून धुंदेखानानी पाठविले आहेत ते इटावियात असेत. तेहि पुरुषोत्तम माहादेव समागमे स्वामीजवळ येणार. नजीबखानाकडील डाक आगरे याहून पुढे स्वामीचे लस्करास गेला. हरसुख कटारे यासमागमे मोहबतसिंग जेपुराकडून येथे आले असेत. जोतपुरियाकडून वकील सिरपाव घेऊन आला होता, त्यासमागमे वकील देऊन जाटानी बिदा केले. रूपराम कटारे यास स्वामीकडेस रवाना करावयास मुकरा जाटानी केला असे. स्वामीचे पत्र सांडणीस्वाराचे हस्तें आले मंजे चरणाजवल येईल. त्याचा गुमास्ताच जैसुख स्वामीजवळ पुढेच आला आहे. जाणावे. उपरी सोमवारी जवाहीरसिंगानी डेरे येमुनेपार रामबागेत केले. गंगास्नानास जाणार. लस्कर समागमेचे पार उतरले. गंगाप्रसाद याजपासी आहेत, परंतु त्यावर यांची बेमर्जी आहे. नवलासिंग जाटाचा भाऊ भरथपुरास गेले. जवाहीरसिंग गंगास्नानास जाणार परंतु यांचे काही कळत नाही. मुडरायेलचे घाटी जाटाचे लोक नाकेयावर आहेत. जाणावे. मंगलवारी जाट कूच करून येमुनेपार उतरून सहादाबादेस गेले. जाणावे श्रुत होये हे विनंती. छ ६ साबान बुधवार मुकाम येमुनापार.

¶*Gopal Chakradhar in this letter reports movements of Jawahirsing Jat and gives full details of the situation.*

No. 168] *[1-1-1768 ?*

पौ छ ८ रमजान

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री विश्वासरावजी स्वामीचे सेवेसी

पोष्य चिंतो बिठल व चिंतो अनंत व आबाजी माहादेव साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागाईत छ १० साबान जाणोन स्वकीय लिहीत गेलें पाहिजे. विशेष आपण पत्र पाठविलें तें पावोन संतोष जाला. हिंदुस्थान प्रांतीं फौजा लौकर रवाना होतील तरी उत्तम आहे; श्रीमतांस विनंती करून हें करवावें म्हणोन लिहिलें तें कळलें. यैसियासी हिंदुस्थान प्रांतीं फौजा त्वरित पोंहचाव्या म्हणोन शिंदे होळकर यांचा कारभाराचा बंदोबस्त श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामींनीं पुण्यांत करून त्यांचे रवानगीची तरतूद करविली

आहे, ते हिंदुस्थान प्रांतीं येणार आहेत. कळावें. सदैव पत्र पाठऊन तोषवीत जावे. पुणियाकडील वृत्त सविस्तर राजश्री गोविंद रघुनाथ व नारो नीलकंठ लिहितील त्यावरून कळेल. बहुत काय लिहिणें ? कृपेची वृद्धि करावी हें विनंती.

¶*Chinto Vithal and other Karbharis from Poona assure Vishvasrao Lakshman, who has been soliciting the Poona Darbar to take steps against the growing menace of the Jats and others, that forces under Sindia and Holkar would be despatched towards the North at an early date.*

No. 169] [*11-1-1767?*

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती शेवक विश्वासराव लक्ष्मण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापि. ता छ १० माहे साबान मुाा किली झासी येथे स्वामीचे कृपावलोकनेकरून शेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जालो ते छ १ साबानी किले मजकुरी दाखल जालो. इकडील वर्तमान तर स्वामीचे कूच गोहोदचे मुकामी(हून) जाल्यापासून रांगड्यानी नजरा (फिरविल्या.) दुंडी आरंभिली. अष्टभया ओडसेकर यासी सिरोपस्थाई ठहरेलिकर पज्यनसिंग होऊन फारच धूम मांडिली. सरकार अमलाचे गाव रोज उठोन मारीतात. हिंदुपत डंगाईवाले आपल्या मेंड्यावर येऊन बसले. यानीहि बदनजर धरून अष्टभयास गुडघा देऊन बखेडा कारितात या प्रकारचे वर्तमान आहे. आम्ही येका दो रोजी फौजेसह बाहेर निघोन याचे पारिपत्याची पैरवी करितो. स्वामीच्या पुण्यप्रतापे करून सर्व येथास्थित होईल. परंतु रांगडे कोतांदेसी आहेत. सदैव न्यून पाहून बखेडा करावयाच्या विचारांत आहेत. ठहरोलीकर सिरोपस्थाई होऊन महुराणीपुत्रऱ्याकडे गांव मारून धूम करीतो. त्याचे पारिपत्य जाल्याविना बंद बसत नाहीं. पेशजी राजश्री उभयेता सरदारांच्या फौजा या प्रांतात आल्या असतां ठहरोलीकरास कांही तंबी जाली नाही. अस्पर्शच राहून गर्वारूढ जाले. खंडणी वोडशेकरानी त्याजवर घातली. त्याचाहि निर्गम काही करावयाचे मानस नाहीं असा प्रकार आहे. याउपरी त्याचे पारिपत्याचे पैरवीत आहो. स्वामीचे प्रतापेकरून होईल तेथवर कस्त सरकारकामास करावयास अंतर होणार नाही. विदित जाले पाहिजे. सेवकास नित्य आज्ञापत्रेकरून संतोषवावयासी * * * करीत आसावी. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Vishvasrao Lakshman to Dadasaheb, reporting the troubles created by the chiefs of Bundelkhand and his own efforts to put them down.*

No. 170] [12-1-1767?

पो छ १८ साबान

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री दादा साहेब
स्वामीचे शेवेशी

विज्ञापना. उजनीस आल्यावर राजश्री महादजी सिंदे याचें पत्र आलें तें बजिन्नस पाठविलें आहे. दुसरें पत्र त्याचें व होलकराचें आज शुा १३ त्रयोदशीस आले. त्यांत मजकूर इतकाच कीं तुम्ही लौकर आम्हाजवळ येणे. सिंध्याकडील अर्थ मनोदयानरूप आमचे सिध्धीस पावला यैसा अर्थ तुमचे बोलणियांत कलला तर जे होणे ते होईल; नाहीं तर समक्षच अर्थ कलेल. त्यास, येथें तूर्त कांहीं. बखेडा न करितां उभयतां सरदारापावेतो एकदा जावे हा निश्चयेकरून येथून कूच केले. दरमजल जात असो. तेथें गेल्यानंतर जे वर्तमान होईल तो अर्थ साद्यंत विनंती केला जाईल. सांरांष मनसबा विलग पडल्यासारिखा खावंदानीं उपराला चांगला केल्यानेंच परिणाम लागेल. सरकारचा नक्ष राहील, तेच खावंद करतील. भरंवसा पूर्ण असे. श्रुत होय हे विज्ञापना.

पहिले त्याचा प्रकार तो होता; आतां केवल रुक्ष पत्रें लिहितात याचा अभिमान स्वामीस असावा हे विज्ञाप्ति.

¶*The writer informs Raghunathrao that he was proceeding to the camp of Sindia and Holkar and requests support in his project. The purport of the letter is not clear.*

No. 171] [17-1-1767?

पो छ १६ साबान

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे शेवसी

विनंती सेवक आपाजी मैराळ कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ताा छ १४ माहे साबान मुा कसबे दभुवा स्वामीचे प्रतापे कुशलरूप जाणोन स्वकीय कुशल-लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. इकडील वर्तमान सांप्रत जाटाची फौज काथ्यावर आली. कृपाराम पुरोहित तीन हजार फौज घेऊन दानसास मदत जाले. येथें दहा बारा हजार जाटाची फौज जमा जाली. राा गंगाधरपंताची फौज सडी

झाली आहे. दोन अडीच हजार स्वार आहेत. रात्रौ घोड्यावर जीन ठेऊन असतात. दिवसा अर्धी फौज तयार असते. पाहऱ्याप्रमाणे तयार असतात. जाटाची जबरदस्ती भारी आहे. पठ्ठूजचा मेडा करू म्हणतात. आपले सिंद्चा मेडा म्हणतात. याप्रमाणे भानगड न बनली तेव्हां जाट कूच करून पुढें आले. यार्णी जाबसाल केला कीं, जबरदस्तीनें घ्याल त्यास सुखरूप घेणे. आमच्याने लिखापढी करून देवत नाहीं. त्यावरते पुढें येणार ऐसे वर्तमान आहे. रा श्रीपतराव येथें आले होते. त्याचे रुो आम्हास देणे. त्याचा तगादा भारी केला. आम्ही त्याची खातरजमा बहुत प्रकारें केली. दंगा मिटल्यावर तुमचा सल्लूक करू ऐसे समाधान केलें. आज कूच करून गंगाधर-पंताचे लष्करांत गेले. काल येथें बैराग्याचे शाळेंत राहिले होते. इकडील गाव दरोबस्त उजाड झाले आहेत. जाटाची दहशत भारी आहे. आपले ठाण्याची बंदोबस्ती चांगली आहे. महाराजांचे प्रतापें काही चिंता नाहीं. बहुत काय लिहिणे हे विज्ञाप्ति. काहारवाल्या राज्यानें दोन हजार प्यादा जमा केला आहे. लढावयाचा सरंजाम आहे. त्यांची फौज काहारेवर येणार. यावर जैसे वर्तमान होईल तैसे शेवेसी लिहून पाठवूं. सेवेशी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Appaji Mairal to Vishvasrao Lakshman reporting the opposition of the Jats and the encounter which Gangadharpant Chandrachud had with them.*

No. 172] [*January 1767*

श्री

राजश्री महिपतराव लक्ष्मण व सखाराम
हरि व कुकाजी सिवराम गो

सुा सबा सितैन मयां व अलफ. भेलशाचे गावांत सरकारचे निशान दाखल जाले. तोफा वगैरे वस्तभाव समसेरखान नेऊ म्हणतात. त्यास तोफा दारूगोलीविसीं आज्ञा होईल त्याप्रों वर्तणूक करू म्हणौन लिा त्यास जे आज्ञा करणे ते सविस्तर नागोराव विठल यांजपासी केली आहे. ते सांगतील त्याप्रो वर्तणूक करणे. तोफासिवाय वस्तभाव त्यास नेऊ देणे. तोफाचा प्रकार तरी पठारी वगैरे तीन ठाणी आहेत ती सरकारचे लोकाचे हवाली होऊन कबजे आली म्हणजे तोफा घेऊन जाणे. ती तिन्ही ठाणी हस्तगत होत, कबजा येत तोपर्यंत तोफा देत नाही ऐसे सांगणें. परंतु ठाण्यास अडथळा न होय ते करणे. तिन्ही ठाण्याकरितां तोफा अटकवून ठेविल्या. वरकड काही गुंता नाही.

तिन्ही ठाणी सरकारांत दाखल जालियावर तोफास गुता नाही ऐसे त्यास भासेसें करणे. तिन्ही ठाणी हस्तगत जाहालियावर तोफाविसी आज्ञा होईल त्याप्रो करणे. तोफा व चांगल्या जेजाला असतील त्या तिन्ही ठाण्याचे निमित्य करून अटकाऊन ठेवणे. नागोराव विठल याजपासी जो प्रकार सांगितला आहे तो जाहिराणा होऊन न देणें. जाहिराणा जालियाने ठाण्यास हिसका बसेल ते फटकाल. याजकरितां ठाणे हस्तगत करून तोफा व जेजाला तिन्ही ठाण्याचे निमित्याने अटकावणे. नाकारी तोफा असेल त्यांस नेऊ देणे. दारू गोळीहि नेऊ देणे. चांगल्या तोफा असतील त्या मात्र लिहिल्याप्रों तिन्हीं ठाण्याचे निमित्याने अटकावणें. हा मंत्र गुप्त राखणे. तोफा नेऊ लागतील तेव्हां लस्करात वरकड ठाण्याचे निमित्याने अटकावणें. तोफा वगैरे वस्तभाव नेऊं देणे म्हणौन त्याचे मारफतीने तुम्हास पत्रें सादर होत आहेत. परंतु या पत्राप्रों वर्तणूक करणे. आंतून गुप्त पत्र पाठविलें हें किमपि जाहीर होऊं न देणे. सारांश ठाणे हस्तगत व्हावयास दिकत न पडता जितकी तजवीज तोफाविसी होईल ते करणे. दिकतच देऊ लागली तरी जाऊ देणे. सोमवार मध्यानरात्र.

¶*This is a confidential letter addressed to Mahipatrao Lakshman and Sakharam Hari asking them to follow the instructions contained in it in preference to those in other open letters regarding the disposal of other articles, but not the guns, which are to be retained.*

No. 173] [*26-3-1769*

पौं छ १७ जिलकाद

श्री

**राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री वासुदेवपंत-
बापू व रा यादवरावभाऊ व राजश्री गोपाळराव-
दाजी स्वामींचे सेवेसी**

पो गोविंद रघुनाथ व हरि चिंतामण सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल फाल्गुण वा दशमी जाणून स्वकीये लेखन करीत असिले पाहिजे. कासीदाबरोबर छ २९ साबानचे पाठविले ते छ ३ सवाली पावले. सविस्तर वर्तमान विदित जाहाले. रा बाळाजी गोविंद यांनीं तर सोनेस मोर्चे लाऊन बसले. आपल्याकडील फौज रा यादो हरीस फौजप्याद तोफा देऊन त्याचे कुमकेस पाठविले. सेवटी कार्य न होतां दानसा जाटाकडील सरदार याजकडे गढईवाल्यानें अनुसंधान लाऊन जाटाची फौज व गुजर कछवे वगैरे पांचसात

हजार फौज चालून आली. रा बाळाजी गोविंद उभयतां बंधु होते. जुजाचें तोंड लागतांच अधीच दहशत खालीच होती; पळाले; बुणगे लुटले गेले. मग यादवरावजीवर जुंज पडले. यानी च्यार घटका थोपून जुंज घेऊन तोफ व बाजार सर्व संभाळून मोटेस आले. माणूस फार पडले त्यामुळे मागती दुंडी जाहली. वसुलात खलेल जाहले. याजकरितां लिहिले कीं कसर रुो पूर्वी पाठविले. बावनी हजाराची वरात पाठविली. संकटे ते रुो देतो. राहिले अठेताळीस हजार ते माफ श्रीमंतास व मुत्सदियासी वर्तमान निवेदन करून करवणे. ऐसे करितां मर्जीस न ये तर तुम्हास यजमानानी पत्रे रा बाबाजी प्रल्हाद व रा अवचितराव व रा त्र्यंबकराव सिवदेव याजवरी दिल्ही आहेत. जरूर जाणून ज्याजपासून कार्य होईल त्याजपासून लागू होऊन करून सरकारची वोड वारणे. त्रिवर्ग कार्य न करीत तर मातबर तुम्ही तेथे कोण्ही सावकार करून लाख पनास हजार रुो वेसीत दे ऐसा करणे. आम्ही तुमचा बोज पार पाडूं. तूर्त येथें रुो नाहीं. सर्व सावकारापासून घेतले. कोण्ही राहिला नाहीं, याजकरितां लिहिलें. दुसरे फडणीस मजमदार याचे हाते कामकाज कचेपके घेतो. अजमास वगैरे सर्व हिसेब करविला आहे. पाठऊन देऊं. दरबारचा भरवसा तुमचा आहे. तुम्हास खर्चास पाठऊन देऊं. यंदा गुदस्तासहि जमा कमी पडते. दुंडीमुळे खर्च भारी, जमा थोडी. आजपावेतो कर्जासीच गाठ. न घ्यावे तर नक्ष राहत नाहीं. याजकरितां करणे जाहला. मोटचे ठाणे आपल्याकडे राहे ते करणे, खर्च पडला तर करणे, ठाणे खालसा राहे ते करणे म्हणून बहुत विस्तारें लिहिले. त्यासी रा बाळाजी गोविंद आपेशी ठाऊक असतां त्याची कुमक काशास केली? तुम्ही आपल्या ठिकाणी होतां तेव्हां तुमचा भ्रम बहुत होता. इतके करून फारच हलकाई जाहली. एक गोष्ट बहुत केली कीं भाऊनी तोफ व बाजार संभाळून मर्दुमीचे लढाई देता देतां घेऊन मोटेस आले, इतक्याने थोडाबहुत नक्ष राहिला. दरबारांत वर्तमान सांगितले. तोफ सांभाळून आणिले याजमुळे उपर राहिले. आता तर आब राखून जे करणे ते दूरवर दृष्ट ठेऊन करीत जावे. कोण्हाचा इतबार न धरावा. दानसा जाट थोरल्या जाटाचे विपरीत वर्तमान ऐकून कुंभेरीस जाणार म्हणून लिहिले. थोरला जाट+ वारल्यानें मोठी सुभेता जाहली. रोहिले गुजर वगैरे याचा त्याजइतका भारीपणा नाहीं. श्रीने शत्रु परभाराच विल्हे लाविला. आतांही कछवाधारांत जाल तर बहुत सावधतेने जावें. रा बाळाजी गोविंदानी दोनदा आपेश घेऊन पळाले. इतक्यानें त्याजला सरकारचा ऐवजाचा तगादा फारसा नाहीं. आपण आंगावर

+ जवाहीरसिंगाचा मृत्यु जुलै १७६८ त झाला.

कर्जवाम करूनच रुपये सरकारांतही दिल्हे. ठाणी राखिली, चाकरी केली, आब राखिला, ऐसे असतां पंनास हजार रुो माफ करा म्हटल्या रा बापूस बहुत दुःख वाटेल. एक रुपया करारात कमी होणार नाही. वर्तमान सर्व ऐकिले परंतु कराराप्रमाणें भरा. ज्यासी ऐवज देविला त्यासी पावता करणे. मागती उत्तर केले कीं आज्ञेप्रो रुो देऊं, परंतु दोन महिने वागविल्यानें रुो देऊं, अंतर होणार नाहीं. तेहि गोष्ट न रुचली. बोलिले की रुो भरा मग सांगाल ते ऐकू. बहुत रदबदल जाहली. त्याचे मतें बाकीचे रुो वाइद्यास द्यावे मग श्रीमंत रा नाना व दादा उभयतां फडनिसास विनंती केली. बहुत मायेंत घेऊन केली. त्यानी उत्तर दिल्हे कीं माफीची गोष्ट श्रीमंत रावसाहेब ऐकणार नाहींत. निभाऊन घेणे येविशई विनंती श्रीमंतास करूं. परंतु रुो येजमानास लिहून सत्वर आणवावे. जेणेकरून दरबारांत यतोटी (सचोटी?) तुमची राहे, पुढें आमचे हाते मातबर कामकाज होय तो अर्थ केल्याने उत्तम. तुमचे मुलकाचे वर्तमान, दुंडीचा प्रकार, सर्व श्रीमंतास विदित आहे. परंतु रुा एक कमी न करावा. वाइद्याप्रो रुा द्यावे हेच श्रीमंताचे मानस. तथापि रदबदलीस चुकणार नाहीं. आपण लिहिले कीं जाबसालास लांब पंथ; दोन महिने पाहिजेत; याजकरितां तेथेंच रुोची तजवीज करून देणे. त्यासी रा अवचितराव पंचोपाल्यानी स्वाराचे पसतीस हजार रुो नेमणूक, दोन साले जाहलीं एक रुा न दिल्हा. दिल्हा असता तर तोच रुो तुम्हास अजी देतों. तुम्ही सालसी (?) राखिली. तथापि मी बेरोजगार, अतां येथें कर्ज कोण्ही देत नाहीं. या समई मजपासीं एक रुा नाहीं. बहुत विनंती केली परंतु पष्टच उतर दिल्हे. तैसेच रा त्र्यंबकराव सिवदेव यानी उत्तर केले कीं अखेरसाल आलें, आतां रुपयाची वोढ आहे. तूर्त कार्य होत नाहीं. आमचे मनांत रावजीचे कार्य करावें, परंतु संकटें उत्तर केले त्याचें कर्ज देणे. चाळीस हजार तुम्ही लिहिले. ते म्हणतात पंनास हजार आमचे देणे. आम्ही उत्तर केलें कीं वाजबी जे असेल त्याचा निकाल तीन वाइदे करून वर्षास एक वाइदा प्रो ऐवज भरू. अतां तुमचा रुा ठेवीत नाहीं. तुमचे देणेची काळजी बहुत आहे. रावजीस सर्व प्रो भरवंसा तुमचा आहे. ऐसे बहुत प्रो ममतेत घेऊन जाबसाल केला. त्याचीही कृपा विशेष आहे. रा संक्राजीपंतहि बहुत ग्रहस्त त्यानेहि बहुत सांगितले. प्रस्तुत हात चालत नाहीं. पुढें आपल्या कार्यास अंतर करणार नाहीं. त्याजलाहि फेरांत श्रीमंती आणिले आहे कीं, तुमची जहागीर किती, चाकरी किती लोकानसी करितां? हजरी गणती तुमची काय आहे? जाहगिरीचा कचा आकार दाखवणे, ऐसे कितेक जाबसाल घातले आहेत, त्यामुळे श्रमी. चाकरी करून फलादेश श्रीमंती या प्रकारचा केला म्हणून श्रमी.

4295

आणिखी येथें महिना पंधरा दिवस लागतील. रा बाजी लवाद (?) परगणियांत गेले. त्याची सावकारी खरी. परंतु सालमजकूरी पेचात आहे. दुसरे मातबर सावकार कोण होतो ? सर्व मातबरी तुम्हापासून, आम्ही किंमात्र. यंदाची सतोटी दरबारांत तुमची राहील. पुढें मामलत नेमस्त ठराऊन रसदेची एकदोन किस्त भरल्या मग लोकामध्यें मातबरी होऊन येईल. अतां तुम्हीच अवचितरावजीस लिहिले कीं इकडे हुंडी जाहली, ऐवजास ठिकाणा नाहीं, दरबारची सतोटी राहिली पाहिजे, तर तुम्ही पंनास हजार रुपये कर्ज दाखल देणे. त्यावरून रावजींनी निषेध केला कीं मजला रुपये मिळत नाहीं, तेव्हां आम्ही कोणत्या भिस्तीवर द्यावे ? पुढील सालीं देतील तर भरवसा पुढील सालाचा कोणास ? दरबार एक प्राच, ऐसे निषेधाचेच उत्तर केले. उदंड बोध केला. न ऐकिले. उतरहि दिल्हे आहे. बापू, येथील या प्रकारचे वर्तमान. वाइदा पौर्णिमेचा जाहला. द्वितीयेस वरात पंनासाहजाराची कामरसकर वगैरे सावकार याची छ १९ रमजानी दिल्ही ते त्यानी काल दाखविली. वाइदा जाहला, रुो द्या. तेंव्हां उत्तर केलें कीं, श्रीमंत नानाफडणीस यांसी विनंती केली. ते सांगतील महिना दोन महिनेयानीं वागऊन घ्याल तर रुो देऊं, ऐवज खरा आहे. त्यानीं उतर केलें कीं हे वर्तमान त्यासी सांगू, आम्हास दुसरे ठिकाणी देतील. रागे भरून गेले. काय जाबसाल होईल पाहावे. आमची अबरू कैसी राहील नकळे. हुंडीचा ऐवजाचा अद्यापि प्रथम दिवस आहे. त्या सावकाराचा तगादा. पंचमी जाहाल्यावरी सर्व येऊन तगादा करतील. ग्वालेरकरासी पंचमीचाच करार. तुम्ही लिहिलें कीं येथून ऐवज येणें नाहीं म्हणून तेथें देविला; त्याची हे गति. जर तुम्ही ऐवज पाठवीत नाहीं तर आमची भार्त[१] राहत नाहीं. आम्ही चाकर लोक एकदां फट म्हणल्या तुम्हांसच संकट. शत्रू उशा पायत्या लागले आहेत. आम्ही तो आपल्या वचनावर गोष्टी केली. अतां ऐसे लिहितां तेव्हां आम्हीच फजीत व्हावें हे तुमचे मानस आहे कीं काय? दरबारखर्चास तर ठिकाणाहि नाहीं. त्याचे कांहीं लिहिलेच नाहीं. तुम्हास कासीद आतां पाठवायासी अनुकूल पडत नाहीं. दोन दोन महिने होतात तरी कासीद येत नाहीं ऐसे करिता एवढी मामलत; कासिदास हजार पाचसे रुो खर्च जाला तर भारी नाहीं. परंतु पंधरावे दिवसीं वर्तमान तेथील येंथें, येथील तेथें ऐसें असिलें पाहिजे. याची तरतूद कांहीच नाहीं. तिळगूळ सरकारात जरूर पाठवणे म्हणून जोडी पाठविली; सनदा वगैरे पाठऊन दोन सवादोन महिने जाले; उतर

---

१ स्थित.

4296

न ये, तेथे वरकड गोष्टीची आशा काय? बापू हे तुम्हांस योग्य नाही. आ
आब राहिलिया तुमचाच आहे. याउपरी बाकीचा ऐवज व ग्वालेरकर
बाकी राहिली. एकूण सदुसस्ट हजार रुाची हुंडी करून सत्वर पाठ
तुम्ही तेथील सावकारास खोक्यांविशयी ताकीत करीत नाहींत. रुपये भरले
भरले हेहि कळत नाहीं. चार पाच महिने जाहले; खोकी आणवीत नाहं
काय म्हणावें? आतां खोकी आणणे, व्याज पैकियाचें घेणे. या उपरी त्याज
हुंड्या न करणे. लाखा रुाची एकावर हुंडी केली, काय म्हणावें? बटा लार
पांच हजार किंवा सात हजार घेईल न कळे व तोटा काय पहावा? जर टाळार
कराल, रुा गोपाळ रावजीची बुधी ऐसे वोढावेसें करून न्यावे चालतच ड
ह्या गोष्टी तूर्त चालेल परंतु पुढें मातबर कार्यास अपाय आहे. आम्हा लोक
अबरू फार नाहीं. चाकर लोक जेथवर येजमानाचे कल्याण तेथवरी करी
आहे. ऐसे पहिले लिहिले असते तर इतके काशास लागते? चाकरी वे
तुम्ही भूषणच देत आला, आतां हे लिहितां, तेव्हा आम्हीच निमकह
तुम्ही सर्व यजमानाचे * * माफ करावा म्हणतां आम्ही चाकरीत नाही. बापू, एकनिष्ठ चाकरी करून हा शब्द पदरास येतो ऐसे दिसते. परंतु आम्ही एकनिष्ठ वर्ततो यास[१] श्री साक्ष असे. रात्रदिवस यजमानाचे अभीष्टचिंतन करून आहो. वासुदेव मुरार सावकार खोटा. रुा अद्याप न दिल्हा त्यामुळे येथें सावकारांत पत राहिली नाहीं. खोट्या हुंड्या ऐसे म्हणतात. शहरास कारकून पाठविला आहे. सरकारचीं ताकीदपत्रें व जोडी जासुदाची पाठविली आहे. येसें * * करितां काय होईल ते पहावें. सावकारी पती काहीसी केली होती हुंड्याचा रुा न आला त्यामुलें खोटे जाहलों. एक रुा कोण्ही देत नाहीं. याजकरितां ऐवज बाकीचा व दरबारी खर्चाचा सत्वर पाठवावा दोनदा करून पाठवावा. या उपरी आम्हावर शब्द न ठेवावे. सर्व तुम्हास खोलून लिहिले आहे. याउपरी तुमची इच्छा. माझी मातबरी तुम्ही राखाल. वाढवा तरी वाढेल; नाही तर कलतच आहे. तुमची थोर पथारी. शत्रु भारी, याजकरितां जीवावरी कर्जवाम करून सरकारची सतोटी राखिल्या सर्व पार पडेल. इतके लिहिले, रागास न यावे. ज्यात कल्याण ते लिहिले. उतर पाठवणे हे विनंती.

¶*This letter contains details regarding the financial administration of certain districts in Bundelkhand and the reverse sustained by Balaji Govind against the Jats led by Danashah, brother-in-law of Nawalsing and regent after the death of Jawahir. (See No. 208 below.)*

---

१ हुंडीबरोबर असलेलें शिफारसपत्र.

No. 174] [7-4-1768

पौ छ १९ जिल्हेज प्रात:काल

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री विश्वासरावजी
स्वामीचे सेवेसी

पोष्य माहादाजी बल्लाल साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ १९ जिल्कादपर्यंत पुण्यात वर्तमान येथास्थित असे विशेष. आपण पत्र पाठविले ते पावोन लिहिले वर्तमान कलले. पत्रीं लिहिलें की या प्रांती गडबड आहे, यामुले मुलकांतील वसूल यावयासी दीसगत लागते म्हणोन लिहिले ते कलले. इकडून त्या प्रांतास सिंदे होलकर यांची रवानगी फौजसुधां जाहाली असे. लौकरच येऊन पोहचतील. वरकड इकडील सविस्तर राजश्री गोविंदपंत व हरिपंत लिहितील त्यावरून कलो येईल. बहुत काये लिहिणे? लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Mahadaji Ballal informs Vishvasrao Lakshman that Sindia and Holkar have been despatched to the North to quell disturbances which the addressee had reported.*

No. 175] [27-4-1767

पौ छ १३ जिल्हेज
मुाा झासी

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक गोविंद रघुनाथ साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल चैत्र वद्य १४ सोमवार मुकाम नागाझोकर जाणून स्वकीये लेखन करीत गेलें पाहिजे विशेष. पधरा वीस रोज जाहाले आपणाकडून पत्र येऊन वर्तमान कलत नाहीं, यैसें न पाहिजे. हुंडी आद्यापि आली नाही. रावजी तगादामुले श्रमी, याजकरितां लिहिलें आहे. श्रीकाशीयात्रेहून वेदमूर्ति गणेशभट अणखी कितेक आले त्याचें साहित्य यथास्थित न जाहालें. त्याजला स्वार मिळाले नाहींत. त्यानी श्रीमंत बाबासाहेबास विस्तारें सांगितलें. त्यावरून मुत्छद्यासी म्हणाले

कीं विस्वासराव याजपासीं डोईजड खटपटा माणूस नाहीं. जातीनें मेहनती नाहींत. मातबर कारभार कैसा चालेल. याजबराबर दोन हजार फौज नेमून दिल्ही येसे तो रतवा व मोहूचे ठाणें गमावलें. त्याचा उपराला केला नाहीं. तेथें ठोक माणूस नित्य स्वारीसिकारी करी यैसा पाहिजे. त्याची योजना करा यैसें बहुत बोलिले. त्याजवरी काय परंतु रतव्यास मोच्यें लागून पंधरा वीस रोज जाहले. उपराला न केला. तेव्हां बोभाट आला. याजकरितां पांचसें स्वार त्याजबराबर येक मर्द माणूस देऊन मुलुकांत स्वारीसिकारी करून चार रुपा पैदाहि करील. मुलकांत तापहि राहील. रावसाहेब हा समये चाकरी करून दाखवयाचा आहे. खावंद अल्पकर्णी, मुत्सदी व सर्व जी जी म्हणतात. फडनिसीचा नित्य बोभाट येतो त्यावरून रागें भरतात. आपल्यास लिहिणे कीं येक तरी अनुसंधान पुरतें राखिलें पाहिजे. दुसरें अखेरसाल आहे. पुढें मामलतीचा बंदोबस्त * * रुपाखेरीज होत नाहीं. आपण म्हणतील माम-लतीचा तह करावा. सनदापत्रें घेऊन पाठविल्या रुपयांची * * * पाठऊं. त्यासी दादा साहेबाचे घरची मामलत अर्धा रुपा देतात. असो; याची तरतूद आपण केलीच असेल. सूचनार्थ लिहित गेलों. वडिलानी तर मामलत टाकिली. तुम्ही त्याचे ममतेत असिल्या साहित्य करितील, यैसें मानस कालच्या बोलण्यावरून लिहिण्यावरून दिसतें. तुम्ही त्यांचेच अनुसंधानें असावें. मुख्य गोष्ट कोन्हीहि साहित्यास असों. रुपा दोन तीन मोठे पाहिजेत. याची तरतूद करावी. वरचेवर वर्तमान लिहित जावें. मुलकांत स्वारीसिकारी जरूर करीत असावें. कोन्ही तुमची तारीफ लिहित अथवा कारकूनमंडली सालसी लिहित म्हणजे श्रीमंत संतुष्ट आहेत. त्यांचे मनांत दुसरा भाव नाहीं. तुम्ही सावध-तेनें वर्तनूक करावी. तुमचा लौकिक असावा म्हणजे दादासाहेबांस परम संतोष. आपण लिहिलें होतें कीं सनदापत्रे घेऊन येणे. जो ठराव ठरा(वा)ल त्याप्रमाणें अस्विन मासीं रुपये पावते करूं. त्यासी रावजी येथें दरबारांत ताल नाहीं. आता बोलतील ते चौ घटिका नाहीं. धण्यास रुपा पाहिजे, याजकरितां खोलून लिहिलें आहे. राजश्री सिदापासेहास बहुत ममतेचा कागद पाठवा. मुत्सदी-यासीहि पत्रें पाठवावीं. अजुणहि वडिलाचा सर्वांस वसवस आहे. तुम्ही रुपा सिध केले आणि वडिलाचेच हाते बंदोबस्त केल्यानें बहुतच उत्तम होऊन येईल. राजश्री अवचितराव ममतेंत आहेत. ज्यात उत्तम दिसेल तें करावें. राजश्री गणेश संभाजी डोई हलवितात; परंतु त्यासी कोन्ही सांगत नाहीं. चार रुपा अधिक उणे करावयासी मात्र उभे करितील; खोलून लिहिलें रागास न यावें. कारकुनाचें हाते कचेपके लिहिणें घ्यावें. नालबंदी वगैरे थोडे बहुत देऊन राजी

4299

राखावें. त्याचें पत्र श्रीमंतास पाठवावें. राजश्री उमरावगीर गोसावी याजला श्रीमंत दादासाहेबीं कोच वगैरे सरंजाम देतों म्हणून बोलत असतां गोसावी यानी नानासाहेबाची आज्ञा घेऊन उदईक चालणार. सत्वरीच आपणापासी येतील. भेटीनंतर सर्व कळेल.

¶Govind Raghunath exhorts Vishvasrao Lakshman to exert himself in the discharge of his duties in order that he might not incur the displeasure of the Peshwa.

No. 176] *[27-4-1767*

पौ छ १३ जिल्हेज
सन सबा सितैन

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
यादोराव भाऊ व राजश्री बापू स्वामीचे सेवेसी

पोष्य गोविंद रघुनाथ साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागाईत छ २७ जिलकाद मुकाम नगझोकर जाणून स्वकीये लेखन करीत जावें विशेष. सविस्तर वर्तमान मुख्य पत्रावरून कळेल. तीन च्यार महिने जाहले, महुराणीपुऱ्याकडेच कालक्षेप केला, दुसरेकडे समाचार घेतला नाहीं. रतवा वगैरे ठाणीं जाटानें घेतलीं त्याचा उपराला न केला. त्यामुळें सरदारांत नालस्ती जाहली, यैसें न पाहिजे. दोन च्यारशें स्वार पाठविले असते तर ठाणीं न जातीं. असो; या उपरी तरी पांचशें स्वार याजबराबर येक मर्द शाहाणा माणूस देऊन मुलकांत फिरे यैसें करावें. अवघ्यांनीं येकें ठिकाणीं बसोन राहावें उत्तम नाहीं. पुढीले बंदाबस्ताचा विचार द्रव्य पाहिजे; त्याची तजवीज थोडीबहुत अगोदर जाहाली पाहिजे. तुम्ही तरतूद करीतच असाल. माझें ज्ञान अधिक आहे ऐसें नाहीं. दुसरें कारकुनाचे हातें कचेंपकें कामकाज घ्यावें, त्याची दरबारांत मातबरी आहे. वडील करीत होते तो प्रकार आणखी तुमचा आणखी वडिलानी त्याचे हातें न घेतलें त्याचें फल दोन किले मागतात; तेव्हां हिशेबाची मखलाशी करूं यैसें वर्तमान आहे, याजकरितां वारंवार लिहितो. आम्ही येथें राहावें म्हणून आज्ञा तर कोणे रीतीनें राहावें त्याची सोय करून पाठवावी. कासीद जोड्या पांच चाकर ठेऊन पाठवावें. पुढें कागदपत्र पाठवावेयाचे काम बहुत आहे, याजकरितां लिहिलें. बहुत काय लिहिणें? कृपा असों दीजे हें विनंती.

4300

राजश्री गोपाळराव स्वामीस साष्टांग नमस्कार लिा हे विनंती

विज्ञापना. राजकी वर्तमान राजश्री तुकोजी होळकर व राजश्री तात्या येऊन भेटले. दादीसाहेब नव मुलुक दिल्हा तो मागतात; पहिले मुलकावर नजर द्यावी यैसा जाबसाल घातला. त्यांनीं उत्तर केलें कीं नवाजुना सरंजामात येक खेडें द्यावयासी आनुकूल पडत नाहीं. नजरेबदल च्यार रुपये ठरवाल ते देऊं. जर आमचेनें चाकरी न होये हे परीक्षा पाहून मग अवघाच घ्या. आम्ही साहेबचाकरी करावयासी सिद्ध असतां आम्ही सरंजाम कैसा द्यावा? याची त्याची बहुत अड पडली आहे. दादासाहेबीं त्याचे मुलकाचे जप्तीस येथून आयतोळे व राजश्री आनंदराव गोपाळ यैसे खरगोणबत्तिशी व खानदेश येथें पाठविले; त्यासी आनंदराव गोपाळ हंडेचे मार्गे गेला. आयतोळा सेंदुरडेचे घाटें गेला. लोकांनीं झामडाझामड थोडी बहुत केली, संभाळून गेले. खरगोण बत्तिशींत बनाजी मतकर व बुळेचे पथक आगोदरच आहिल्याबाईनें पाठविलें होतें. हें गेल्यावरी यांनीं जाबसाल घातला कीं दादासाहेबीं सनदा देऊन पाठविलें, तुम्ही मुलुक ठाणें खाली करून द्या; त्यावरून मतकर यांनीं उत्तर केलें कीं आमचे खावंदाचें लिहिणें आणा मग घ्या, तोंवर देत नाहीं. दुसरे दिवशीं तयारी करून त्याजवरी गेले. त्याचें याचें जुंज जाहलें. बुळ्यानी आयतोळा मोडला, जखमी जाहला; कोन्ही म्हणतो मृत्य पावला; हें वर्तमान ऐकून श्रीमंत बहुत क्रुद्ध. अहिल्याबाईनें तीन च्यार हजार पागा व पांच हजार प्यादा तोफखाना घेऊन इंदुरीं बसले आहेत. होळकर शिंदे भोसले सर्व येकवटले आहेत; याचें त्याचें रहस्य कैसें होईल तें पाहावें. इंदुरास जावें ऐसें श्रीमंत दादासाहेबाचें मानस आहे. अहिल्याबाई म्हणते येक रुपया मजपाशीं नाहीं. कारभारियास म्हणती मुलुक तुमचा, फौज तुमची; दरबार राखणें तर तुम्ही चित्तास येईल तें करा; दरबार राखा; मजला कशाचीहि आशा नाहीं. त्यांच्या घरात दामुश्याण+ आहे. नजर दाहा लाखापासून पंधरा वीस काल पंचविसापावेतों बोलिल परंतु ठरलें नाहीं. दादासाहेबाचें चितांत नवा मुलुक दिल्हा तो निश्चयरूप घ्यावा. शिवाय नजर मातबर घ्यावी. परस्परें चित्त शुद्ध नाहीं. शिंदेचेहीं सरदारींत खुल जाहालें आहे. केदारजी शिंदे यांसीं वस्त्रें दिल्हीं; फौज त्याजकडे, कारभारी त्याजकडे. माहादजी शिंदे यांनीं वडीलपणा मात्र असावी. राजश्री बाजी नरसिंह व राघोबा पागे माहादजी शिंदे हे येकत्र आहेत. माहादजी शिंदे होळकर येक. आता होळकरानी उजवी बाजू टाकून डावीकडे उतरले आहेत. पांच साहा हजार फौज आहे यैसें वर्तमान आहे. पुढें जें ठरेल ते मागाहून

+ द्वामुष्यायण = दुफळी.

4301

िाा पाठऊं. फौज भारी; या मुलकाचा सत्यनास जाहाला. येथून येक दोन रोजां कूच होऊन इंदुरास जाणार. राजश्री अनंदराव गोपाळ गेले. याचें बुल्याचे जुंज जालें. दोघेहि कायम राहिले, म्हणून कालपासून वर्तमान आलें आहे. आमचे खर्चाची अबाल आहे. जर आम्हास च्यार दिवस येथें ठेवणें तर खर्चाजी बेगमी करावी. मी आज्ञांकित, मजला उजूर नाहीं. माा याचे मतें वडिलाचें ममतेंत मामलतीचा वगैरे सर्व बंदोबस्त होऊन येईल. दुसरा करील त्याला अंतर आहे. सविस्तर लिहिलें आपल्याकडील वरचेवर लिहित असिलें पाहिजे. बहुत काय लिहिणें हें विज्ञापना. दादासाहेबांपाशीं कोण्हाचाहि वकर[1] नाहीं; बहुतच मर्जी कठिण जाहली आहे. तुम्ही राजश्री श्रीपतराव याजकडील सायेर काहाडलें त्यामुळें परम विषम वाटलें. त्यासी वडिलांनीं लिहिलें आहे कीं तुम्ही आपल्या रुपयांची वाट रावजीपाशीं करून घेऊन येणें; येथें रुपये मिळणार नाही. पुढें रोजगाराची चिंता न करावी यैसें लिहिलें आहे. तुम्ही त्याचें समाधान करून मायेत घेतल्या उत्तम आहे. च्यार माणसें पदरीं असिलें कार्याचीं आहेत. खंडोजी कोतवाल याजला तुम्ही ठेऊन नफा काय? त्याजवरी मोठा राग आहे; हे विज्ञापना.

¶*Govind Raghunath reprimands Yadavrao and Bapuji, two officers, for having lost two Maratha outposts to the Jat by their laxity and urges them to be more active. He further gives news about the disposal of jagirs of the Holkar and Sindia. Serious differences cropped up between Holkar and Raghoba as the latter demanded back the territory newly granted to Holkar. As regards Sindia's jagir, Kedarji has been invested with all powers and is to work under the nominal headship of Mahadji Sindia.*

No. 177] *[2-5-1767?*

श्री

श्रीखंडोबा

साहेबाची शेवेशी. आज्ञाधारक तुकोजी होळकर कृतानेक विज्ञापना. साहेबानीं आज्ञापत्र पाठविले ते पावोन सिरसा वंदिले. राजश्री विठ्ठलराव सिवदेव उमदेतुल मुलुकबहादर यांस माधोभयाच्या गढ्यांवर रवाना केले असे. तुम्ही फौजतोफखानासुद्धा जाऊन सांगतील त्याप्रमाणें सरकार कामकाज करणे

---

[1] वजन.

म्हणून आज्ञा. त्यास राजश्री विठ्ठलराव तात्या आद्यापि येथें आले नाहींत. आलियावरी ते आम्ही येकत्र होऊन साहेबाचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक होईल. माधोभयाची पाहडगांउची गढीस आलो; येथें पाणी नाहीं म्हणून येलचे जवल वेत्रवती तीरी फौजेचा मुक्काम केला. गढी येथून दीड दोन कोस आहे. मोर्च्यास व तोफांचा लाग पहावयासी गेलो. राजश्री तात्या आलियावर सांगतील तशी तजवीज करूं. शेवेशी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Tukoji Holkar writes that he will join Vithal Shivdev's forces as soon as the latter arrives and proceed against the fortified posts of Madho bhayya.*

No. 178] [*2-5-1767 ?*

श्री

सेवेसीं जयवंतराव येशवंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. छ २ जिल्हेज दीड प्रहर दिवसपर्यंत स्वामीच्या पुण्यप्रतापेंकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. काल संध्याकालीं पाहाडगावास येऊन पोहोंचलो. कालच तोफा लावणार होतों, परंतु रात्र जाहली याजमुळें लावल्या नाहींत. प्रातःकालींच तोफा लाऊन पेठ घेतली. ठाण्यास मोर्चे लाविले आहेत. राजश्री माहादजी सिंदे याची फौज दाहा हजार पाा म्हणोन लिाा. त्यास फौज जलदीनें येऊन पोहचे येविसीं आज्ञा जाहली पाहिजे. गढी चुनेगची आहे. तोफाची मारगिरी केली आहे. गढी सर लवकरच होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Jaywantrao Yashwant Panse requisitions Mahadji's forces in order to invest Pahadgam.*

No. 179] [*12-5-1767*

पाो छ २६ जिल्हेज सन सबा

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री विश्वास-
रावजी साहेबाचे सेवेसी

पोष्य चिंतो विठल व आबाजी माहादेव साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागाईत छ १३ जिल्हेज जाणोन स्वकीय लिहीत जावें विशेष.

---

* Near the river Betwa in Malwa.

आपण पत्र पाठविलें तें पावलें. ते प्रांतीं फौजा जाटाच्या उतरल्याचें वगैरें वर्तमान लिहिलें तें कळलें. यैसियासी फौजा उतरल्या त्यांचें पारिपत्य (करावें) म्हणोन हजुरातून फौजाचे रवानगी(ची) (तर)तूद ठरली आहे. होळकर व आणीक फौज लौकर (येऊन) पावेल. वरकड मजकूर राजश्री गोविंदराव लिहितील त्यावरून सविस्तर कळेल. येका गोसावियामुळें पेंच पडला हें खरें. परंतु दुसऱ्या गोसाव्याची खातरजमा राजश्री नानांनीं करून घेऊन अजिंठेचा किला त्यास देविला आहे. मशारनिलेनी पका बंदोबस्त पाहिला असेल, तरी हे गोष्ट घडवली आहे. सदैव पत्र पाठऊन संतोषवीत जावें. सरकार मर्जीचा आशय समक्षच आपल्यास कळलाच आहे व हालीहि मशारनिलेस सांगितला असे. हे विस्तारें लिहितील त्यावरून कळेल. सारांश खावंदाचे मर्जीप्रमाणें वर्तावें यांत सर्व प्रकारें श्रेयस्कर असे. बहुत काय लिहिणें कृपेची वृद्धि करावी हे विनंती.

¶Chinto Vithal and Abaji Mahadev inform Vishvasrao Lakshman that schemes are being concerted and will soon be put into action to checkmate the activities of the Jats.

No. 180] *[18-5-1767*

पौ छ ७ मोहरम
जेष्ठ मास वा।
जासूद जथे

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक त्रिंबक नारायेण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ १९ माहे जिल्हेजपावेतो स्वामीचे कृपाकटाक्षेकरून सेवकाचे व शहर बराणपुरचे वर्तमान येथास्थित आसे विशेष. पेशजी आज्ञापत्र सादर जाहाले होते त्यांजवरून श्रीमंत राजश्री दादासाहेब यांजकडील बातमीस डांक बसविली आहे तिचे वर्तमान छ १७ माहे मजकुरी डांकीची बातमी कलमवार बतपसील :

माहादजी सिंदे व केदारजी सिंदे या उभयेतात फूट पडोन केदारजी सिंदे दोन तीन हजार फौजेनसी

आंतरवेदीतील वर्तमान तर जाटाच्या फौजा व दुंदेखान रोहिले दि॥ नजीबखान याच्या फौजा येकून

अवचितराऊ कारभारी यैसे श्रीमंताजवळ आलाहिदा राहिले. श्रीमंतानी सरदारीचे कामकाज केदारजी सिंदे यांचे निसबतीस लाविले. बाजी नरसिंह व राघोबा पागे व पोतनीस व रहिमबेग यांस आटकेंत ठेऊन माहा जेरतलब केले आहेत. काही रुपये घ्यावे हे मानस आहे. रहिमबेग याजकडे दोन ठाणी आहेत, ते सरकारात घ्यावी व काही पैका घ्यावा हा मनसबा आहे. पुढें कसा मनसबा ठरेल ते कलेल. येक दो रोजी जैसे वर्तमान येईल तैसे लेखन करू. कलम १

श्रीमंत राजश्री दादासाहेब खासा स्वारीसुधा माघारा परतोन सिरोंज पावेतो जावे; आणि जाटाच्या फौजा व रोहिले याच्या फौजा माघारा परतून गेल्यास होलकर यांस पुढे हिंदुस्थानांत रवाना करावे; आणि आपण खासा स्वारीनसी माघारा परतून बडव्याचे घाटीणे देसी यावे, यैसे मनसबा आहे. तत्रापि रोहिले व जाट माघारा न गेल्यास खासा स्वारी ते प्रांती जाऊन छावणी करावी हाहि मनसबा आहे. कलम १

वीस हजार सिवाये पायदेल येमुना उतरून आलीकडे गोहेदनजीक आले. ग्वालेरीस मोर्चे लावावे यैसे वर्तमान आले. त्याजवरून श्रीमंत राजश्री दादासाहेब देवासियाहून गुजराथेस जाणार होते, तो मनसबा येकीकडेस ठेऊन परतून हिंदुस्थानात जावे यैसा मनसबा करून कूच केला. येक मजल पुढें गेले. कलम १

पूर्वी विनंती पत्र लिहिले होते की तुकोजी होलकर यांस छ ४ जिल्हेजी वस्त्रे दिल्ही. नवी जागीर पौ सा माहाल सरकारांत घेऊन नजर दाहा लक्ष रुपये करार केले. त्या उपरी हाली मनसबा ठरला की गंगाधर येशवंत व विष्णु माहादेव या उभयताचे विद्यमाने नजर पंधरा लक्ष रुो द्यावे आणि दरोबस्त नवा जुणा सरंजाम पैकी सिरोंज व खरगोन व देवपूर तर्फ तीन माहाल सरकारात द्यावे. बाकी पूर्ववतप्रमाणे करार करावे. यैसे श्रीमंताजवळ ठराऊन आहिल्याबाईकडे इंदुरास गेले. तेथून करार ठराऊन आले म्हणजे सदरहू लिहिल्याप्रमाणे ठरेल. पूर्वी जाले ते राहिले. कलम १

येकून च्यार कलमे सदरहू सेवेसी लेखन केली आहे त्याजवरून निवेदन होईल. पुढे डाकेचे वर्तमान जैसे येत जाईल तैसे सेवेसी विनंती लिहित जाऊ. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापि.

¶*Trimbak Narayan gives Vishvasrao Lakshman news of the movements of Raghunathrao. The letter refers to the disagreement between Mahadaji and Kedarji Sindias, the investiture of Tukoji Holkar and other matters.*

4305

No. 181] [21-5-1767

पौ छ ७ मोहरम
सन समान

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब
स्वामीचे सो

विनंती सेवक गोविंद रघुनाथ सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल वैशाख वद्य ८ गुरुवार मुा ना जेपालपूर जाणून स्वकीये निजानंद लिहित असिले पाहिजे विशेष. आज्ञापत्र छ ३ जिल्हेजचे पाठविले, पावोन सविस्तर विदित जाहले. श्रीमंत नानासाहेबाचे होते ते त्यासी दिल्हे. ते समई बहुत बोलिले कीं आम्हास पत्र काशास लिहितो ? आम्ही कोण ते कोण; आम्ही वाचीत नाहीं. त्याचे आमचे नाते काय ? समई उतर येकनिस्ठेच करावे; परंतु रुचत नाही. समीप मकारपूर्वक यानी आज्य घेऊनच बसले आहेत. तैसेच उतर पत्राचे मागिता, परिछिन बोलले की मी त्याजला लिहित नाही. तेव्हांहि दाट रदलबदल केली. मर्जी बहुतच दिक जाहली. जाब न दिल्हा. साहित्यकारानी मर्जी आपल्याविशाई बहुत पाषाणतुल्य केली. तिलमात्र द्रवाचा लेश नाही. नित्य अनुसंधान आपलेच. काल आम्हांस म्हणाले कीं बेहडाकरिता तुम्हांस ठेऊन घेतले होते. त्यासी बेहडा परभारा झासीस गेला, त्याचे उतरहि आले; तुम्ही काशास राहाता ? तुम्ही जाणे; तथापि तुमचे येजमानाची आज्ञा असेल तैसे करणे. राहा अथवा जा; तुम्हांस आज्ञा दिल्ही. आम्हीं उतर केले कीं पहिले आपण ठेऊन घेतले हे रावसाहेबास लिा. त्यानी उतर लिहिले कीं नानासाहेबापासी असणे. आम्ही लिहू तेव्हा येणे. आता आपली आज्ञा यैसी जाहली त्यासी लिहितो. त्याची आज्ञा येईल त्याप्रों करीन. त्यानी आपल्यापासी राहा म्हटले तर आहे. बोलाविले तर आपले आज्ञा घेऊन जाईन. उतर केले कीं तुमच्या विचारास येईल ते करणे. दुसरे बेहडा परभारे गेला. नानासाहेबास दाखविला नाही. त्यामुले बहुतच श्रमी; इतके अवचितरायानें केलें. दरबार खर्च बारा हजार का दिल्हे ? आम्ही पहिले पंधरा हजार देविले होते. मग हे काशास दिल्हे ? यैसी कर्मे तुम्ही परभारा करिता, यांत तुमचे बरे कसे होईल. आम्हांस बेहडा दाखविला असता तर त्यांतून काही गोळा घेतला नसता. आतां बेहडाचे द्रुपछनवे (?) जाहले. रावजीवर व तुम्हावरी बहुत श्रमी; तो विस्तार पत्री लिहिता येत नाही. पत्राचे उतर न दिल्हे. राा रावजीस पत्र दिल्हे, त्याचे उत्तर त्यानी लिहिले त्यावरून कलेल. रावजीस सिंदेची कारभाराची वस्त्रे जाहली. कारभार

करूं लागले. हे परम वडिलास असह्य. रावजींनी घेतली तेव्हा त्यासी पुसोन जे केले ते केले. यैसे असता मनास येईल तैसे घरी बोलतात. तुमचा व * * चा नाद अस्टौ प्रहर आहे. परम संतापभूत होतात. दादासाहेबाची मर्जी दोन दिवस कायम आहे यैसे नाही. * * * * * * * * * * * नवे जाहले कोणते? राजश्री बाजी नरसिह व राघोबा पागेकरी व पोतनीस राघोबा त्रिवर्ग दादासाहेबापासी आहेत. त्यानी मुख्यासी बोलो घातली कीं पूर्ववतप्रो कारभार चालू द्यावा. माहादजी सिंदे याची सरदारकी जैसी आहे तैसी असावी. नजर मागतील ते आम्हास कबूल आहे. मुख्य म्हणाले की दाहा लाख रुपये देणे. त्रिवर्गानी मान्य केले. त्याची निशा पाहिजे, त्यासी त्रिवर्ग नानासाहेबापासी येऊन वर्तमान सांगितले. निशा आपण साहेबास द्यावी. आम्हीं रुो आपणास देऊ. यासिवाये अडीच लाख रुो तुमची बाकी आहे तेहि देऊं. दिवाणगिरीची वस्त्रे आपण घ्यावी. आपल्या तरफेने आम्हीं कारभार चालऊ. अकारपूर्वकास पटकी खामखा द्यावी. आपल्या निशा वेगळी दादासाहेबाची निशा होत नाहीं. तेव्हा नानासाहेबी कबूल केले. ते आपले घरास गेले. दादासाहेब तर मतलबी फार; रुो येतात ते घ्यावे, पुढे जे होणार ते हो, यैसा विचार घाटला आहे. हे वर्तमान रावजीसहि कळले आहे. येका दो दिवसात काय ठरेल ते पाहावे. मागाहून सविस्तर लिहू. दरबारात किमपहि (अपूर्ण.)

श्रीमंत दादासाहेबाचे पत्र रा मामाचे नावचे पाठविले ते घेऊन उतर पाठवणे हे विज्ञापना. सो पांडुरंग शंकर सा नमस्कार विज्ञापना.

¶*Govind Raghunath to Vishwasrao Lakshman, narrating the conversation he had with Nanasaheb (Naro Shankar) and the latter's displeasure with the conduct of the addressee. The letter contains disposals made by Dadasaheb regarding the affair of Mahadji Sindia.*

No. 182] *[7-6-1767*

छ ९ मोहरम

श्री

श्रीमंत राजश्री राऊ

साहेब साहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक देवाजी शामराऊ निा माहादजी सिंदे सां नमस्कार विनंती. विनवावया प्रार्थना यैसीजे. श्वामीचा निरोप घेऊन श्वार जाहलों ते का इंदापुरास

पावलों. राजेश्री गोविंद सिवराम तात्या निघोन पुढें हिंदुस्थानास गेले. त्याची आमची येका दो रोजाचे आंतर पडलें. आपणहि माघून त्यास आटोपून जातों. हिंदुस्थानचे वर्तमान तर राजश्री बाजी नरसिंहे याजकडून पत्रें आलीं; त्यांत मजकूर लिा कीं श्रीमंत राजश्री दादासाहेबानी केदारजी सिंदे तुकोजी सिंदे याचे पुत्र यासी सरदारीचीं वस्त्रें दिल्हीं; आणि दिवाण अच्युतराव गंणेश व मुजमु विष्णु माहादेव यासी व कारभारी गणोजी कदम यैसे ठरले; व जुने मडळ माहदजी बावासुधा राहिले, यैसे वर्तमान जाहले. तेव्हा बाजी नरसिह याचे कर्ज बारा लक्ष रुा सरदारीकडे, तेव्हा केदारजी सिंदे यासी रुा मागो लागलें. तेव्हा श्रीमंतानी त्याजवर हला केली. त्यास त्याचा याचा जुजाचा प्रसंग मांडला. तिसरा प्रहर परियेत तट पडला. मग महिपतराऊ पानसे मधेस्तीत येऊन बाजी नरसिंह यास श्रीमंताकडे घेऊन गेले. तेव्हां श्रीमंत बोलले की तुम्ही यैसा बखेडा मधे करितां तर उतम नाही; तुम्ही आम्हापासी आमच्या लस्करांत राहणें यैसे बोलिले. त्यावरून बाजी नरसिह आपल्या लोकासुधा श्रीमंतापासी राहिले आहेत; व राजश्री माहदजी सिंदेहि आपल्या डेरियात आहेत. याप्रमाणे वर्तमान जाहलें. पुढेंहि जे होईल ते वरचेवर सेवेसी लिा जाईल. होलकराचा मजकूर तर राजश्री तुकोजी होलकर यासी सरदारीची वस्त्रे दिल्ही. राा गंगोबा तात्याहि या मसलतीत आहेत. रुा काही थोडेबहुत दिल्हे याप्रोा वर्तमान जाहलें. लस्करास गेलियावर जाहले वर्तमान सेवेसी लिा जाईल. बाजी नरसिह याची मुलेमनुशें श्वामीचे आज्ञेवरून काा इंदापुरास घेऊन आलों होतो. त्यास आतां तिकडील प्रसंग तो या प्रकारचा यैकून त्यानी दहसेत खाली कीं पूर्ववतप्रमाणेंच होईल कीं काये, याजमुले ते येथून मागती जावयाचा प्रकार करणार. आपण त्यास सांगितले कीं श्रीमंताची आज्ञा येईल त्याप्रो वर्तणूक करणे, म्हणून राहविलीं. त्यांस काये आज्ञा, राहावे किंवा येथून जावे हे दोहींतून येक आज्ञा करावी, त्याप्रो वर्तणूक करतील. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Devaji Shamrao communicates to the Peshwa details about the investiture of Kedarji Sindia and Tukoji Holkar in their office by Raghunathrao. Baji Narsinh thereupon demanded from Kedarji the repayment of 12 lacs due to him. This action Raghunathrao resented and sent his forces against him. They were however reconciled by Mahipatrao Panse and Baji Narsinh was asked to remain with Raghunathrao in his camp.*

4308

No. 183] [14-6-1767

पो छ १६ मोहरम

सन समान जेष्ठ मास.

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

बाळाजी जनार्दन स्वामी गोसावी यासी

पो रघुनाथ बाजीराव नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीय लिहिणे विशेष. मालराव होळकर मृत्यु पावले त्यांचे दौलतीचा बंदोबस्त राजश्री तुकाजी होळकर यास सोपून त्यासच सरदारीची वस्त्रे येथे दिल्ही आसेत. जो बंदोबस्त होणे तो येथून जाला. तुम्हाकडून यांचे माहालास कोठे कोठे जफ्त्या गेल्या आहेत म्हणौन विदित जाले. यैसियासी याचे माहालास तुम्हाकडील जफ्ती गेली आसेल ती उठवणे. यांचे माहालास व गावखेडियास देखील मशारनिलेकडील कारकुनाचे गावखेडियास कोणेविसी उपसर्ग न करणे. जफ्त्या केल्या आसाल त्या उठवणे. याचे माहालास व याचे निसबतीचे कारकुनाचे गावास देखील उपसर्ग न करणे. जफ्ती केली असेल ते उठऊन नेणे. बहुत काये लिहिणे ? छ १ मोहरम हे विनंती.[१]

¶*Raghunathrao to Nana Fadnis, referring to the death of Malrao Holkar and the subsequent bestowal of the Sardarship on Tukoji Holkar. The writer asks the addressee to release the Mahals of the Holkar that may have been confiscated.*

No. 184] [21-6-1767

पौ छ १७ सफर

श्री

श्रीमंत राजश्री रावजी स्वामीचे

शेवेसी

पोष्य गणेश शंकर कृतानेक सा। नमस्कार विनंती. येथील कुशल तो जेष्ट वद्य दशमी मु॥ आनंदवली सुखरूप असो विशेष. आपणाकडून पत्र येऊन समाचार वर्तमान कळत नाही तरी यैसे न करावे. येणारासमागमे पत्र पाठऊन

---

१ सबंध पत्र राघोबाच्या हातचें आहे.

सांभाळ केला पो॰ यानंतर खासा स्वारी मांडवगडावरून सिंदे होळकर यास निरोप देऊन मजल दरमजल जेष्ट वद्य दशमीस आनंदवलीस दाखल जाहाले. राजश्री अवचितराव यास सिंद्याची दिवाणगिरीची मुताल्की सागितली. दिवाणगिरी राजश्री नानास दिल्ही. तीन किले नानाकडे आहेत पैकी सरकारात घ्यावा याप्रा करार ठरून वस्त्रे जाली. रावजी, आपले मामलतीविसी श्रीमंतास आर्ज केला की रसद आडीच लाख रुा घेऊन मामलत करार करून देवावी. त्यास श्रीमंतानी आच्युतरावजीस सागितले की झासी व करेरा दोन्ही किलेयास सरकारचा लोक दोन दोनसे घ्यावे आणि मामलत करार करून देतो. त्यास अच्युतरावजी आडीच लाख म्हणत होतो. मग सिंद्यास निरोप जाहाला तेव्हा आच्युतरावजीसहि निरोप जाहाला ते गेले. राजश्री गोविंदरावजीस येथे ठेविले. दरबार खर्च पाठविला त्याजपैकी काही बहुत करून पावला. थोडा बहुत लोकाचा देणे आहे. मग राजश्री गोविंदराव व बाजीपंत फडणीस आम्ही कृष्णाजी गोपाल यैसे मिलोन मामलत करार करून घ्यावयाचे मसलतीमध्ये होतो. त्यास आम्हास श्रीमंतानी बोलाऊन सांगितले की साडे तीन लाख रसद करार करणे आणि लोक किल्यावर घ्यावे. याप्रो होत असिले तरी मामलत ठेऊं, नाही तरी दुसऱ्यास सांगू. त्याजवरून श्रीमंतापासी जाऊन तीन लाख रुा याचा करार केला. त्यास श्रीमंतानी आपले हाते याद ल्होन तीन लाख, लाख श्रावण मास, लाख भाद्रपद, लाख आस्विन, तीन हफ्ते करार करून दिल्हे. साल गुा सिबंदी जाजती दिल्ही ती साल मजकूर करून दिल्ही. बेहड्याप्रो करार केली आणि किल्यावर लोक घ्यावे हा करार करून दिल्हा. लोकाविसी रावजीनी कबूल केलेच होते. न करावे तरी मर्जी रक्षत नाहीं. म्हणून करार * * मामलतीची सनद घेऊन पाठविली आहे तरी कराराप्रो यैवज मुदतीचे आधी येऊन पावता होय तो अर्थ करावा. नाही मामलत करवे तरी तैसेच लिहोन पाठवावे. दुसरा मामलेदार करितील. रा गोविंदराव येथे येकले. त्याजपासी कासीदजोड्या चार पाच आसाव्या त्या नाहीत. व दरबारखर्च लोकाची बाकी गुाची व साल मजकूरची लोकासी बोलोन ठेविले. परंतु त्याचा यैवज व रसदेचा यैवज याप्रो लौकर पाठविल्याने आमची गोविंदराव याची पत राहेल किंवा जाबसाल काय तो करून सत्वर पाठवावा त्याप्रो करू. वरकड दरबारचा प्रकार तो आपणास विदित आहे. श्रीमंत राजश्री नाना आम्हावर बहुत क्रोधायमान जाहाले की माझी मामलतीची घालमेल केली. ती तुम्हीच केली यैसे बहुत आम्हावर श्रमी जाले. त्यास आम्ही

त्याजकडून तुटक. याजउपरी आमचा अभिमान आपणास आहे. रा नाना भालेगावास निरोप घेऊन गेले कळावे. श्रीमंत रावसाहेब कर्नाटकांतून स्वारी चांगली करून आले, पनास लाख रुो खंडण्या सस्थानाच्या व वीस लाखाचा मुल्क याप्रो स्वारी करून पुण्यास दाखल जाले. याच्या त्याच्या भेटी याउपरी होणार. कळावे बहुत काय लिहिणे कृपा असो दीजे. रसदेची तरतूद सत्वर करून पाा हे विनंती.

¶*Ganesh Shankar reports the new arrangements made by Raghunathrao for the administration of Jhansi and the adjacent territory. He also adds that the Peshwa has returned to his capital after a most successful expedition into the Karnatak.*

No. 185] *[27-6-1767*

श्री

चिरंजीव राजमान्य राजश्री अच्युतरावजी याप्रति

विश्वासराव लक्ष्मण कृतानेक असीर्वाद उपरी. येथील क्षेम ताा छ २९ माहे मोहरम मुाा झासी जाणोन स्वकीय लिहीत असिले पाा विशेष. श्रीमंत राजश्री दादासाहेब व तीर्थरूपजी नर्मदा उतरोण मजल दरमजल देशासी चालिले. तुम्ही राजश्री गोविंदराऊ रघुनाथ याजला सरकारच्या मुतसदियांसी येकवाक्यता करून देऊन उभयेतापासून बिदा होऊण इंदुरच्या मुकामीहूण पत्र लिहिले ते पावले. वर्तमान सविस्तर कळूं आले. दरबारचा बंदोबस्त कांहीच न जाला. आमचा विश्वास तुमचे ठाई पूर्वीपासूण. तुम्ही सला दिधली कीं लस्करात राहूण काळहरण न करावे. त्यापेक्षा झासींत राहूण सरकार कामावर असल्या उतम आहे. वडिलाही मामलत सेर सालची आकारून ज्यास्त वराता केल्या. आनखी आजपर्येंत करीत जातात. काादार वराताच्या मारे पळत फिरतात. आम्हासी कोठे बोलावयासी ठिकाण नाही. झासीत येऊन फसलो. यास्तव आजपर्येंत कर्जवाम घेऊन किले फौज पोसून सरकारचा नक्ष राखिला. आम्ही रात्रंदिवस अर्थेप्राणे कष्ट भोगूण वडिलाच्या मर्जीस येकहि प्रकार न आला. निरापराधी आसतां नाही त्या गोष्टी चितावर घेऊन आपण श्रमी होऊन आम्हासी श्रमदायेक पत्रे लिहितात. आम्हासी झांसीची मामलतीचे प्रयोजन काये? येक तर प्राप्त नाही. कर्जदार जालो. दुसरे नावलौकिक की वडिलाचे मरजीप्रमाणे चालत नाहीत. हकनाहक जनापवाद करावा नाही. मामलत त्याची त्याजकडे असता येजमानसाहेबांसी वडिलांहि विनंती केली की झांसीची मामलत आम्हासी लागत नाही. अपुल्या अंगावरील वोझे उतरोन अम्हावर टाकिले. तेच मामलत करिते तरी आमचा अग्रये नव्हता. आसो. तुम्ही अपुलासा येत्न

बहुत केला. थारेस गोष्ट न लागली. वडिलांची मरजी रक्षूण दिवाणगिरी मुतलकी केली. बिदा जाले. दरबारी तुम्हाप्रमाणे आमचे ममतेचा दुसरा को आहे? असो. दैवयोगे जे होणे ते होईल. लाहनमोठे सर्वांही वडिलांची कृ संपादिली. आम्ही झांसीस अल्यामुळे व्येर्थ बुडालों. घरभार (?) कोन्हासहि जाला. तुम्ही या प्रांती सत्वर येणे. सर्व वाकीफ[१] जाल्यावर कळू येई परिहार कोठवर ल्याहावा? जाटरोहिल्यांची फौज या प्रांती आली. अनुपगी सिमथरासी गुजराची पाठ निघाला. उमरावगीर झासीत ठेऊण घेतल किल्याची सेज[२] केली. तो राजश्री बालाजी गोविंद याही वकील पाठऊन रोहिल्या तह केला की उभयेता गोसावियासी आम्ही या प्रांती राहू देत नाही. तुम माघारे जावे. उभयेपक्षी वच्यनप्रमाण जाल्यावर रोहिले जाट माघारे स्वस्थळा गेले. उपरांतिक आपण भदावर, कछवाधार गोसावियांची दूर करून बालाजीपंताचे नावे संदा पा. गोसावी बेइमानीस येऊन फौजबंदी करून गु वगैरे शामील केले. तेव्हा रा बालाजीपंती गुमाणसिंग व खुमाणसिंग व पुर सानी निा हिंदुपत ढंगाईकर जमा करून उभयेपक्षी युध्यासी अता सज्य जा आजउद्याकडे युध्यप्रसंग व्हावा. उमरावगीर गोसावी बंधूचा उत्कर्श पाहू आम्ही जागीर देत होतो ती न घेता मवासी करून पोट भरावे. दुष्टासी दु बुध्य उपजेल, सर्पासी दूध पाजल्या अमृत होत नाही. वडिलास यांचे गुणानुव ठाऊक असता आमचे जिदीमुळे[३] न करणे ते चितावर ध्यावे. अभिमान नकुं मानसाचा धरावा ते वडीलच आहेत. आम्हासी त्यांचे पायासी आंतर नाह मागेहि केले नाही. पुढेहि करनार नाही. परिनामी वडिलास कळून ध्याना आनोन देऊ. आसो. उमरावगीर गोसावी आमचे अमित्र. आष्टभया गुजर त्याही दुंदी करून मुल्क मारला. त्याचे येथे कुटुंबे ठेऊन आम्हासी स्प आरंभिली. बहुत प्रकारे समजाऊण सांगितले. अद्यापवर सांगतो. आम्हावर तुफान तुतियां[५] करून वडिलासी पत्रे लिहितो. जाटरोहिल्याची फौज येकायेकी पिनाहट भदावरची जागा तेथे खासा जवाहीरमल आला. सब्या फौजा घाट उतरोन सिंदआल्याड आल्यावर अनुपगीर गोसावी नवाब सुजायेदवलापासी गेला. उमरावगिराचे पारपत्यासी जाटरोहिल्याची फौज रोहिरा झांसीपासून चोवीस कोसावर फौज आल्याची बातमी आली. उमरावगिरामुळे बुंधेलखंड प्रांत बुडाला. आम्हासी मिळोन राहत नाही. आमचे अमित्र त्यासी मिळोन आमचे आनहित करावे ऐसा वडिलाही मुदई करून पाठविला. याजमुळे मुलकाची जोत बुडाली. पुढे काये होणार ते पाहावे. जागीर घेऊण झासीत राहावे,

१ माहीत. २ तर्तूद. ३ आग्रह, भीड. ४ लहान. ५ खोटेपणा—तोतया.

येक विच्यारे काम करावे, ते त्याजला अनकूल पडत नाही. मग जागीर आम्ही कोनासी द्यावी? प्रस्तुत मुलूक पडला. दंदीदंद करतो. ज्यन्मांतरीचा दोर उभा राहिला आहे. आम्ही झासीची आशा वडिलाचे रागामुळे राखीत नाही. मग मोटेची आशा कोणासी आहे? उमरावगीर बदमामलीस आला. मवासी करून जाटरोहिल्याचे धाके तोंड दडपीत फिरतो. आमचे नाव बद करितो हे अपूर्व. तुम्ही गोसावियांचा संग्रये केला म्हणजे बुंधेलखंड बुडाला. कछवाधारेत गढ्या मात्र राहिल्या. बरकड मुलूक उज्याड जाला. जाटरोहिल्यामुळे झासीपर्यंत जागा उज्याड जाली. पायेरवा गोसावियाचा होऊन चुकला. इत:पर डोळेझाक न करिता सिंदे होलकर या प्रांती येऊन बंदोबस्त करणे तो सत्वर करावा. मुख्य श्रीमंत रा दादासाहेबासी विनंतीपत्र लिहूण पाठवावी की अनुपगीर जात राहिला. उमरावगिरामुळे उपद्रव रात्रंदिवस आहे. याचा संग्रह करणे तो हुजूर ठेऊन करावा. या प्रांती उपयोगी नाही. आम्ही वडिलास पत्र ल्याहावे ते उलटे समजतात. यास्तव तुम्हासी लिहिणे ते ल्याहावे. तुम्ही वडिलाचे मरजीप्रमाणे लक्ष राखून अहात, यास्तव अनमान ल्याहावयासी कराल तर या प्रांतीचा दंगा मिटनार नाही. उभयेतां सरदार या प्रांती राहूण पारपत्य न जाले तर लवकिक नाही. गोसावियांसी बोलाऊण घेणे म्हणजे जाटरोहिले माघारे अपुल्या स्थळासी जातील. मुलूक वस्ती होऊन कमबेश जोर्त+ होईल. आज या मनसब्यासी चुकल्या या प्रांती वाट चालनार नाही. प्रस्तुत दंगल भारी आहे. उतम जानाल ते करणे. [अपूर्ण]

¶*Vishwasrao Lakshman to Achyutrao, the newly appointed Diwan of Sindia : writes a graphic account of the troubles that had arisen in Bundelkhand in consequence of the return of Raghunathrao having left behind many sources of disorder and the intrigues started by the Gosawi brothers with the help of the Jats and the Rohillas.*

No. 186] [*June 1767*

२

[पहिला बंद गहाळ आहे.]

तस्मात दिसून येते जे श्रीमंताचा विश्वास पाटीलबावाकडे ममता खचित आहे. आपल्याकडे बाह्यात्कारे बोलने दिसते. त्यास हरकूबाई व रा कृष्णाजी मुरार बोलले जे आसे होणार नाहीं. उभयेतां सरदाराच्या कामाकाजाच्या व बोलन्याचालन्याच्या कडसन्या सर्व श्रीमंताच्या ध्यानात आहेत. तत्रापि आपला निश्चेये सुभेदारापासून जे चाल आहे कीं श्रीमंताच्या पायांखेरीज आपले

+ लावणी.

दुसरे दैवतच नाहीं; तेच आपले खचित आसावें. यांतच आपले कल्यान आहे. आनीख कल्पना श्रीमंताच्या चितांत कीं बायेकांचा मनसबा कसा सेवटास जाईल; या आर्जीत तेथे विचार आसेल तर हरकूबाई बोलली जे हे संदह आपण घेऊ नयेत बाईकडून तेथील आज्ञेप्रमाणें वर्तणूक, घडेल हे त्यांच्या ध्यानांत आहे. मुख्ये येथीलहि लक्षे त्यांचे आज्ञेवरच आहे. आसीबाई व हरकूबाई व कृष्णाजी मुरार त्रिवर्गांची बोलनी जाली. तदोतर मींहि दरबारीच होतों. हरकूबाई व कृष्णाजी मुरार बाहेर येऊन मजला बोलाऊन बोलले जे दोणतीण पत्रे तुम्हीं आम्हीं बसून लिहिली; परंतु अद्याप त्या मजकुरांची उतरे काहींच आली नाहीत. येथे तों हे बोलायास आले आहेत. याणीं. तो सरकारच्या मर्जीचे धोरण धरून बोलले पाहिजे; आणि बाईचे मानस केवल सिंद्याच्या बोलन्यावर विश्वास खचित आहे आस नाहीं; आणि सिंद्यांकडील बालाराव[1] बोलायास मातबर आले आहेत, यांसी वांकून बोलतील हाहि खमीरें[2] येथील नाहीं. बाई ही सुबेदाराची सून होये. तुकोजीबावाहि तिचे हतचा बसविला होये. याणीं हरयेकविसीं हेलना करावी आणि बाई करून घेईल आसें होणार नाहीं. येक श्रीमंताची मर्जी खचितपणे कसी आहे ते मात्र पाहावी. ते धणीं, त्यांचे ममतेने जे कर्तव्ये तें करावें. केवल सिंद्याच्या बायेकांस पाटीलबावानी जसे केले तसे करून घेणार हे नव्हेत. सिंदेहि आपले जागचे व हेहि आपले घरचे. श्रीमंताच्या पुन्येप्रतापेकरून शककर्ती कामेच याणींहि पहेले केली आहेत; आणि पुढेंहि मरेतोंवर तेच धारणा यांची आहे. केवल त्यांचे वोंजलीनें पाणी पितील आसे होणार नाहीं. येक श्रीमंताचे आज्ञेचे आंकित आहेत. आसीं बहुत प्रकारें कृष्णाजी मुरार याणीं भाषणे केलीं. आपल्याकडील उतरान्वये यांसी बोलावे आसे याचे मानस; येविसीं पेशजीहि सेवेसी विनंती लिहिली आहे. उतर श्रीमंतास विचारून काये आज्ञा ते यावी. बाईसहि श्रीमंताचे व आपले पत्र यावें. कारभान्यांपैकीं कृष्णाजी मुरार याचे ठाई विश्वास बाईचा फार आहे. हरयेक येकांतीच्या सल्यामसलतीत मारनिले व हरकूबाई हे फार आसतात. सेवेसी श्रुत्य होये. इतके श्रीमंताचे पत्रीं लिहिले नाहीं. आपण समजाऊन सांगतील. यैकिले कचे वर्तमान सेवेसी लिहिले आसे. न्यून्ये पूर्ण करनार स्वामी समर्थ.

¶*This is a fragmentary but important letter addressed probably to Nana Fadnis reporting to the Peshwa at Poona the spirited attitude of Ahalyabai Holkar against the insinuations of Mahadji Sindia and possibly of Raghunathrao. Very possibly the question discussed in the letter refers to the instalment of Tukoji to the Holkar estate after the death of Malrao Holkar on 27th March 1767, setting aside his mother Ahalyabai.*

---

१ सिंद्याचा कारभारी बालाराव गोविंद. २ खंबीर=भरंवसा, निश्चय,

No. 187] [29-7-1767 ?

श्री

राजश्री रावजी स्वामीचे शेवेसी

विनंती. तागाईत छ २ रबिलौवल प्रहर दिवसपर्यंत वर्तमान यथास्थित असें विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान सविस्तर कलले. पथरगडपैकी शिलक रुपये होते :

६०००० महमदशाई
६०००० नजीबशाई
१२००००

येक लाख वीस हजार रुपये होते ते महमदशाईस दाहा रुपये व नजीबशाईस पांच रुपये येणेंप्रमाणें बटा करार करून बाळापा नाईक मिरजगांवकर यास दिल्हे. न्याहार गुजर यास निरोप दिल्हा. हत्ती अंबारीसमवेत दिल्हा. शिरपेंच दिल्हा. पहिली चिठी आपणांस पाठविली ते बाजीपंताजवळ असेल, व हल्ली ही चिठी आबरोबाचे जाबसालाविशी लिहिली आहे, त्याजवरून कळेल. नदीस येथील पाणी फार आलें. होळकर इकडे कूच करून आले. उदयिक कुचाचा मजकूर आहे. मैराल केशव याचा हिशेब दतियाचा आज विल्हेस लागावयास निघाला आहे. येकूण पन्नास हजार रुपायाची निशा करून दिल्ही म्हणोन गोविंद रायाजीनीं दादास सांगितलें. त्यांणीं तो कांहीं मला पुसलें नाही. मोघमच आहे. रोहिल्याचा जाबसाल येतो येतो असाच आहे. अझून सुज्यातदौल्या-पासून हाफीज निघाला नाहीं. किर्दी तटल्याच आहेत. बहुत काय लिहिणें; लोभ करीत असिलें पाहिजे, हें विनंती.

¶*The paper addressed to Vishvasrao Lakshman refers to financial transactions in the Pathargad district and mentions how the negotiations with the Rohillas were being delayed.*

No. 188] [15-8-1767

पौ छ २० माहे राखर
सन समान

श्री

श्रीमंत राजश्रीरावसाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक चिमणाजी मोरेश्वर कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा छ १९ रावल मंदवासर मो सागर स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. कृपापत्र सादर जाहाले तेथें आज्ञा कीं, वोडशास दोन दिवस राहिला ही गोष्ट उतम नाही. यैसियासी गुरुवारी रात्रौ पुजासमई स्वामीची आज्ञा घेऊन

भृगुवारी प्रात:कालीच निघोन वोडशास आलो. राज्याची भेट घेतली. तेच-समई त्यासी भाषण करणे ते करून मुसाहेब दाऊजी इजतराय व बाजपेई यैसे समागमे घेऊन आज मंदवारी सागरास आलो. राज्याचे बोलण्याचे प्रमाण नाही, याजकरितां रावराजे व दिवाण तीर्थराजपंत अजुर्दे आहेत. त्यास येथें सर्व मिलोन याचे विचारे करार ठरला की उभयतानी वोडशास सडे जावें. राज्याचे प्रमाण करून करार पट लिहून द्यावी, तुम्ही उभयता व चिमणाजीपंत यैसे कराल ते प्रमाण. आपण येथून कोणे गोष्टीची घालमेल करणार नाही. कोणास जागीर देणे आगर काढणे ते याच्या विचारें करावें, परभारे न करावे, यैसा विचार ठरला आहे. त्यास उदैक रविवारी आम्ही महूस जातो. हे उभयता सडे वोडशास जातील आणि सोमवारी तेथून बिदा होऊन आम्हाकडे येतील, याप्रा करार केला आहे. वोडशास गेल्यावर बोलल्याप्रा ठरले म्हणजे हजार दोन हजार जागीरदार वगैरे भीड घेऊन उभय सामील राहातील. दिवसगतीवर टाकले तरी स्वामीचे प्रतापें सेवकापासून जे सेवा होणे ते होईल. याची आमची सामीलता राहिल्यास उपयोगी आहे. सर्वासी दावा करणें तेव्हा यासी सूत राखावे. तहनामा उभय पक्षी मोहरा होऊन ठरेल त्याची नकल सेवकाकडे पाठवावी. ठाणें जागा सुटेल त्याचा तह पुर्ता बांधावा. त्या समई कजिया कार्याचा नाही. अष्टभ्यापैकी लुधोरा व तोडी मात्र राज्याकडे, बिजना धुरबाई टहरोली व पाहाडी हे जागा आपल्या हिशात याप्रों हें सांगतात. याचा तह कागदी पत्रीं येथास्थित करावा. बिजना आपल्या हिशात आहे, राज्याकडे नाहीं. तहनाम्यात अष्टभ्याचे ठाणे याचा झाडा लिहावा. राजेयासी स्वामीनी ताकीद लिहून रावराजे व तीर्थराजपंत याची बिदा सत्वर करीत ते करावे. उदैक रविवारी महूस पावल्यावर तिकडील सविस्तर सेवेसी लिहू. याचे राक्षसी मायेत येत नाही. सरकार मतलबास अनकूल पडेल तोच प्रकार होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Chimnaji Moreshwar reports to the Peshwa that he will succeed in effecting a treaty with the Raja of Orcha though he appears to be vacillating in his views.*

No. 189] [*10-8-1768*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री विश्वासरावजी
स्वामीचे सेवेसी

पो बालाजी शंकर सा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता अधिक श्रावण वद्य त्रयोदसी मुकाम पुणे येथास्थित असो विशेष. आपण पत्र छ १९

सफरचे पाठविले ते पावले. सविस्तर आर्थ कलला. येसेच निरंतर पत्र पाठऊन संतोषवीत असावे. यानंतर जाटाकडील फौज दानसा वगैरे फिरंगी येऊन आटेर व कछवा व धारे येऊन अमल बसाविला. पुढे झासीकडे येणार. त्याचे आवाईने रांगड्यानी अमलास खलेल करितात व कितेक गुजर वगैरे भेटले म्हणून लिहिले ते कलले. श्रीमंतांसहि निवेदन केले. त्यास आज्ञा झाली की किल्याकोटाचा बंदोबस्त राखून सरकार चाकरी करून दाखविल्यास उतम आहे. याप्रो आज्ञा जाली आहे. त्यास आपण किले कोटचा बंदोबस्त करून सरकारचा नक्ष राखालच येविषई भरवसा आपला आहे. सरकारच्या फौजा हुजरात व सिंदे होलकर याजला निरोपहि हिंदुस्थानात जावयासी दिल्हा आहे. ते लौकरच येऊन पोहोचतील. यानंतर सरकारची बाकी सालगुाची राहिली आहे ती व वराताची बाकी आहे ती आद्याप आली नाही व सालमजकुरची रसदहि आली नाही व कारकुनास रसदेच्या जाबसालाविसीहि कांहीं लिहिले नाही. येथे तो सरकारची निकड बहुत आहे व आपणास वारंवार पत्रे गेली. परंतु त्याचे काहीच उतर न आले, तरी येवज गुाची बाकी व सालमजकुरचे रसदेचा येवजाचा ठराव होऊन पैकी तूर्त येवज याप्रो दिल्यास पुढे बोलावयासी जागा होईल. तोंडचा जाबसाल आतापर्यंत जाहला. पुढे निभाव या जाबसालाने होणार नाहीं. तरी काये तजवीज ती करून सत्वर लेहोन पाठवणे. सालगुा वरात ग्वालेरकर याची पैकी बाकी साडेसत्रा हजार राहिली आहे. त्यासाठी रा गोविंदपंत व हरिपंत यास तीन रोज उपवासी बसविले होते. मग राजश्री नानाफडणीस याणी ग्वालेरकरांस सांगितले की श्रावणेपुर्णिमेपर्यंत पत्रे व येवज येणार आहे म्हणून मारनिले सांगतात, तोपर्यंत धीर धरणे. याप्रो सांगून त्यास उठविले. याप्रो येथें ताकीद आहे. तुम्हाकडून तो येवज येत नाही. कारकुनास उपद्रव याप्रो होत आहे. मागील बाकीचा येवज व सालमजकुरचा येवज येईल तरी मामलत राहेल, नाही तरी येथे मामलतीवर उभे राहिले आहेत. मामलत तुमचे हातची जाईल येसे समजोन जे कर्तव्य ते करावे. बहुत काये लिहिणे. कृपा लोभ असो दिल्हा पो हे विनंति.

¶*Balaji Shankar writes to Vishwasrao Lakshman that the Peshwa expects him to hold his position against the encroachments of the Jat. He further requests him to carry out the stipulated financial agreement for the province of Jhansi lest the province be transferred to other hands.*

4317

No. 190] [22 August 1767

श्री

विज्ञापना. श्रीमंतास पत्र व मुत्छदियासी पत्रे पाठविली ते प्रविष्ट करून उत्तर घेऊन पाठविली आहेत. सिंदे होळकर याचे घरात कजिया लागला आहे. तथापि याची ताकीदपत्रे वरचेवर जातात. दुसरे दतियवाले व वोडसेकर यासी खंडणीच्या येवजाविशई वगैरे ताकीदपत्रे घेऊन पाठविली ते पाहून त्यासी द्यावी. तैसेच हिंदुपत व गुमानसिंग व मानसिंग यासी दुरखुरुवाला हटेसिंग याजविशई * * पत्रे घेतली येकूण पाच थैल्या व * * पत्रे येसे घेऊन पाठविले आहे. सावकार अनुपगीर गोसावी याने लुटला. त्यासीहि ताकीदपत्र की वस्तभाव * * * असेल ते माघारी देणे म्हणून घेऊन पाठविले. दुसरे कैलासवासी मल्हारजी होलकर याचे छत्रीस जाहगीर अधिक पडली ते सरकारातून तुम्हाकडे जप्तीस सांगितली आहे त्याची सनद व रा तुकोजी होलकर यासी ताकीदपत्र येसी घेऊन पाठविली * सर्व पत्राची याददास्त अलाहिदा पाठविली * पत्रे पाहून घेणे. तुम्ही लिहिले कीं कमावीसदार * * येत घेतले उतम आहे. कोन्हीहि प्रा दरबारात येवज थोडाबहुत पाठविल्या उतम आहे. किरकोळ दरबारखर्च करिता येवज थोडा बहुत जरूर पाठवणे. आपण म्हणतील कीं किरकोळ दरबार खर्च काशास पाहिजे, तर मजला कांही त्यात आशा नाही. माझी आशा आपल्या चरणापासी आहे. परंतु हे दरबार कालची माणसावर दृष्टि नाही याजकरिता जरूर जाणून लिहिले. आपणहि माहीतच आहेत. फार काय लिहू ? राजकी वर्तमान, पहिले रा गोविंद सिवराम याजला श्रीमंत रावसाहेबी श्रीमंत दादासाहेबाकडे पाठविले होते. मतलब की सातारा जुनर नगर वगैरे किले दादासाहेबकडे ते द्यावे. आपण पुण्यात येऊन कारभार करावा. श्रीमंत नानाप्रा आम्ही श्रीमंत भाऊसाहेब कारभार करीत होते त्याप्रा करू येसे मतलब घातले. त्यात याचे चितात येकंदर न आला. मग गोविंद सिवराम रावसाहेबाकडे गेले. तेथून चित्तशुद्धि उभयताची नाही. परस्परे विरुधाच्या गोष्टी. त्यासी श्रीमंत रावसाहेब श्रावण वद्य पंचमी मुहूर्ते बाहेर डेरेदाखल जाहले. फौज पाचसात हजार घेऊन इकडे येणार म्हणून येकून श्रीमंत दादासाहेबी वद्य सप्तमीस कूच करून गंगापार मुकाम केला. तेथे चार दिवस राहून तेथून पंचवटिकेस मुकाम केला. फौज धरितात. गाडदी पाचसात हजार ठेविले. तोफखाना बराबर घेतला. पंचवटीहून कूच करून नांदूर येथे मुकाम केला. तेथून काल कूच करून दारणासांगवी येथे मुकाम केला. रा

गोविंद सिवराम मागती आला आहे. अद्यापि त्याची याची चित्तशुद्धि नाही. विस्वतोमुखी कटाक्ष वाढेल येसे आहे. काल बातमी आली की रावसाहेब चतुर्थीकरिता पुणेदाखल जाहले. यांचेहि दारणासांगवीवर दाहापाच मुकाम आहेत. याचा त्याचा कलह वाढेल येसे दिसते. याजला किला येकहि देणे नाही. पुढें वर्तमान होईल ते मागाहून लिहू पाठऊन. वडिलाकडील वर्तमान तर वडील मालगावी होते. दादासाहेबी येकदोनदा शागीर्द पाठविले कीं किला कबूल केला तो खाली करून देणे. ते गोष्टी त्यानी न येकिली. श्रीमंत रागें भरले त्यावरून मालेगावीहून कूच करून * * * स येऊन किले दाखल जाहाले. श्रीमंत रावसाहेबकडे * * लाविले. त्यानीहि याचे चार मतलब कबूल केले. येक किला द्यावा व तीन लाखाची जाहागीर द्यावी येसे कागदीपत्री केले. रावसाहेबाची यावयाची दाटी जाहली, तेव्हा दादासाहेबी रा चिंतोपंत तात्यासी वडिलाकडे पाठऊन * च मतलब जे असतील ते कबूल करून त्यासी घेऊन * * * तेव्हां मतलब कीं किले न मागावे. पहिली जाहागीर होती ते मागती सरकारात घेतली ते माघारी द्यावी. पूर्वीप्रा ममता करावी, रावसाहेब इतराजी होतील तो पेच आपण सोसावा, तुमचा त्याचा स्नेह जाहला तर पाहिल्याप्रो रावसाहेब ममता करीत येसे करावे. दुसरे झासी प्रांती प्रतिनिधिबा जाहगीर आमची आम्हास द्यावी. रामसर जाहगीर आम्हाकडे बहाल, शंभरा स्वारा-नसी चाकरी हुजूर करू येसे मतलब घातले, ते सर्व कबूल करून यादीवर करार करून दिल्हा. मग तात्यासी घेऊन श्रावण वद्य त्रयोदसीस आणिले. दादासाहे-बाची भेटी घेतली. दादासाहेब बहुत संतोश करून भेटले. रा दादाजीपंतदादा आम्ही रा बापूकडे गेलो. दादानी बहुत रदबदल केली. परंतु त्यानी पहिले बोलिले तेच सिध केले. आम्हास तीन लाख रा नारो शंकर देत असता आम्ही दोन लाख रुपये तुम्हापासून घेतो. मागती रदबदल करिता काय म्हणावे? पंचवीस हजार सूट ध्यावी म्हणून येक मास मोघम ठेविली. परंतु रदबदल न चालली. कबूल केले. रा मोरोबादादा फडनीस याचे विद्यमाने कबूल केले. त्याजला बहुत ममतेत घेतले आहे. स्वारीचा कारभार मोरोबादादाकडेच आहे. श्रीमंत नानाफडणीस याजकडे येथील कारभार, परंतु रा बाबाजीपंती नानाचे मनोधारण राखून त्याची आज्ञा की रा मोरोबादादाकडेच जाबसाल करणे. आता त्याचे विद्यमाने बोलत आहे. रुाची निशा सरकारात पाहिजे. त्यासी बाबाजीपंत दादानी सांगितले की रुा येतील, चिंता नाही. श्रीमंत रावसाहेब बोलिले कीं तुमची निशा आहे. त्यानी उत्तर केले की वाड्यास रुपये येतील अंतर होणार नाही. तुम्ही बोलता करारापा रुा आणवणे. बाबाजीपंतदादानी साहित्य बहुत

केले याचे वचन प्रमाण माणून कागपत्राची आज्ञा जाहली, मखलासी जाहली, मखलासीच्या दोन यादी जाहल्या. येकावरी देणे जाहले. येका यादीवरी आज होईल, म्हणजे कागदपत्र दोती दिवसात करून घेतो. कारकुनाचा हिसका फडनीस व मजमदार व चिटनीस याचा पडेल. रुा आपल्यापासी नाही. श्रीमंत दादासाहेबाच्या दरबारापेक्षा हे दरबार भारी. सर्वास रुा पाहिजे. चार पाच जण कारभारी मातबरच. याजवेगले मुत्छदी दुसरे शागीर्दपेशा चोपदार वगैरे मामलत जाहल्यावरी ते पहिल्याप्रा सर्वास पाहिजे. पंचवीस हजाराने पुरी पडेलसे दिसत नाही. श्रीमंत बापू प्रस्थान भारी. कोन्ही पाचापावेतो दिल्हे तर घेतच नाहीत. घेतले तर सरकारात देतात. त्याचे भारी प्रस्थान सर्व आपल्या ध्यानातच आहे. पनासा हजाराची वरात द्यावी म्हणून विनंती केली. रुा यावयासी दिकत फार पडती. झासी शहर जाटाच्या दंग्यामुले उजाड. हुंडीची दिकत पडती. त्यावरून श्रीमंती पनासा हजाराची वरात रा गोविंद शामराजकडे किले ग्वालेरीचे खर्चास देविले. ते पौष वद्य पक्षी द्यावे. बाकी येवज येथे भरवसा ठरला. बाबाजीपंत दादानी बहुत साहित्य केले येसे असता तुम्ही येकदा त्यासी न लिहिले त्यावरून तुमचे कार्यात सोबत असता त्याजला पत्र लिहिले नाही. ते बहुत श्रमी परंतु तुम्ही त्याचे बहुत प्रा समाधान केले. तुम्हास येसें पाहिजे. तुम्हीच लिहिले की रा चिमणाजी मोरेश्वर व माहादाजी नाइकास मोहुराणीपुरा व डाकरोण सांगितली. तुम्हावरच रसदेची येवजाची हुंडी घेऊन पाठवितो, तुम्ही सर्व प्रा आगत्यवाद धरून कार्य करावे. येसे असता त्याची मामलत काहडिली ते रिकामे झासीस बसले. मागील निकाल करून न दिला म्हणून त्याचे ग्रहस्तानी लिहिले होते. आपण तर पत्री काही लिहिले नाही. मग सत्यमिथ्य न कळे. बाबाजीपंत हती माणूस मोठ्या कार्यास उपयोगी पडेल यात संदेह नाही. दरबारी सतोटी चांगली. आम्ही तुमच्या कल्याणाचे सोबती उत्तम जाणून सविस्तर लिहिले. रा चिमणाजी मोरेस्वर व नाईक याचे हते कामकाज स्वरूपानुरूप घ्यावे हे उतम, नाही तर मागील फडशा चौघाप्रमाणे करून द्यावा. यातहि बाबाजीपंतदादाचे समाधान. येथें श्रीमंत नारोशंकर नानानी यासी सांगून दोनचारदा पाठविले की तुम्ही विश्वासराव याचे जाबसालात न बोलणे. तुमचा आमचा स्नेह बहुता दिवसाचा येसे असता हे गोष्टी योग्य नाही. यानी उत्तर केले की मजला त्याने झासीहून लिहिले दरबारात जाबसालात आलो, आता टाकून राहावे तर योग्य नाही. विश्वासराव याजकडील जाबसाल केला तरी तुमचाच आहे. रा बाबाजीपंतदादाची पद्धत या प्रकारची आहे. त्याजला बहुत ममतेने लिहिणे. रुा तुम्ही करार केला त्याप्रमाणे पावता करीन येसे लिहिणे पाहिजे. त्यानी मुजरद

अजुरदार जोडी करून पाठविली त्यास सर्व लिहिलेच असेल. ते जोडी अद्यापि आली नाही. याजकरिता त्याला बहुत ममतेने लिहिणे. सनदापत्रे घेऊन सत्वरीच रवाना करितो. रसदेचे येवजपैकी पनास हजार व दरबारखर्चा बाा पंचवीस हजार तूर्त पत्रदर्शणी रवाणा करावें. वरात पावल्यावर पनासा हजाराची रसीद पाठऊन देणे. राहिले पनास हजार ते माघ सुध पर्क्षी येथे येऊन पोहोचे येसे करणे. सनदपत्र हातास आल्यावर हुंड्या बाा येवज भरावा लागतो. मागाहून सविस्तर लिहू. आपण खातरजमेकारण आपली ममता. दुसरे दतियाकडील येवजे घेणे अगत्य याजकरिता येतील. मधे काय ठरते पाहवे. रावजीस ममता बहुत आपली. तुम्हाकरिताहि त्याजवरी बहुत श्रमी. येसे असताहि त्याची निष्ठेत किमपि अंतर नाही. जर उगेच मुख्यापासी असिल्या सर्वाध्यक्ष आहेत चिंता नाही. सुभेता जाहल्या रसदेची तजविजेत जरूर असावे. वरचेवर वर्तमानपत्रे श्रीमंत दादासाहेबास लिहीत जावी म्हणजे त्याजला फौजेचे वर्तमान कलेल. मुख्यास पत्र व रा लक्ष्मणपंतभाऊ यासी पत्र लिहीत जावे. तेहि आपल्या ममतेत आहे. सिदापासेट यासीहि व रा आबाजी महादेव यासीहि बहुमानाचे पत्रे लिहीत, जावी. वरचेवर वर्तमान लिहीत जावे. आम्हास काय आज्ञा याजबराबर देशास जावे कीं काय ? आम्हास देशास जाता कर्जदाराचा उपद्रव म्हणून आपले पाय धरून इकडे राहिलो. आता आपण आज्ञा करितील त्याप्राा वर्तनुक करू. आपली आज्ञा ये तोवर जिकडे लस्कर जाईल तिकडे जाऊ. नानासाहेबासी आज्ञा दिल्ही कीं जा, वकालतीस ठेविले असिले तर राहा, आम्ही नको म्हणत नाही. सविस्तर वर्तमान लिहिले आहे. उत्तर सत्वर पाठवणे. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.

रा मोरो गंगाधर येथे आले. श्रीमंतास भेटले. त्याजला वर्तमान पुसणाराणी बहुत पुसिले. त्यानी उत्तर दिल्हे कीं ते महूकडे गेले. आम्हावरी ममताच करीत होते. यानी उत्तर येसे केले कलावे. ग्रहस्तपणास अंतर नाही. रा गोविंद महादेव यासी पत्र ममतेचे जरूर लिहिणे. हे विज्ञापना.

(पुढील सुमारे १५ ओळी मजकूर गैरउपयोगी म्हणून घेतला नाहीं.)

¶*News-letter from the Peshwa's Court at Poona to Vishvasrao Lakshman by his agent with the Peshwa. The most important item is the growing dissension between the Peshwa and his uncle who has been asked to deliver the forts in his possession. The writer also mentions the names of Moroba Dada, Sakharam Bapu and Nana Fadnis as the Peshwa's confidential advisers.*

4321

No. 191] [*Recd. 25-9-1767*

पौ छ १ जमादिलौवल सन
समान सितैन.

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री विश्वास
रावजी स्वामीचे सेवेसी

पोष्य चिंतो विठल कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणऊन स्वकीये लिहीत असिलें पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. झांशी प्रांतीचा मजकूर लिहिला कीं, जाटाकडील फौज येऊन भिंडभदावरचा अमल उठविला याजमुळें तमाम रजवाडे यांणीं नजरा फिरवल्या आहेत. त्यास मातबर फौज आणिल्या बंदोबस्त होईल म्हणोन लिहिलें व सरकारची आज्ञा कीं, रसदेची तरतूद लौकरच करून पाठवितों म्हणऊन लिहिलें. यैशास सरकारांत यैवजाची वोढ आहे, तरी रसदेची तरतूद लौकर करून यैवज रवाना करावा. फौजहि तिकडे लौकरच येईल. श्रीमंताची स्वारी बाहेर निघाली. याउपरी तिकडे फौज लौकरच येऊन पोहचेल. तुम्ही रसदेची तरतूद लौकर करून यैवज पाठविल्यास श्रीमंताची मर्जी येथास्तित राहेल. शिंदे होलकर यांजला ताकीद जाली आहे हे लौकरच फौजसुधां त्या प्रांतास येतील; बंदोबस्त होईल. यैवजाची तरतूद जाल्यास तुमचा बंदोबस्त येथून राहील. सविस्तर राजश्री गोविंद रघुनाथ लिहितील त्याजवरून कळेल. बहुत काय लिहिणें, लोभ करावा हें विनंती.

¶*Chinto Vithal from Poona writes to Vishvasrao Lakshman that forces would soon be despatched to the North to punish the Jats and others who are creating disturbances in Maratha territories. A request is made to send to Poona amounts of revenue due from the addressee.*

No. 192] [*1-11-1767*

श्री

सेवेसी धोंडो खंडेराव विज्ञापना ऐसीजे. राजकी वर्तमान वरचेवर इंग्रजाकडील व जाटाकडील व रोहिले व पठान व सुज्यातदौला वगैरे यांजकडील लेहून

पाठवावे, याप्रो सेवकास आज्ञापत्र आले त्यावरून सेवेसी तपसीलवार लेहून पाठविलें आहे. तपसील कलम सुमार

इंग्रज तूर्त मुख्य सरदार कलकत्यांत आहे. त्याचा नायेब तूर्त पातशाहापासी श्री प्रयागी कर्नाल बोकर[1] म्हणोन मातबर सरदार आहे. आणखीहि लाहान मोठे सरदार बहुत प्रयागी आहेत. सर्व मिलोन पंधरा हजार गाडदी व गोरे मिलोन आहेत. पातशाहा त्याचे आज्ञेत आहे, पुढे जाऊ शकत नाहीत. अहमदखान पठाण आपले स्थलावर आहे. नजीबखान रोहिला दिली प्रांती आहे. सुज्यातदौला आपले फौजेनिसी अयोध्ये लखनऊ प्रांती आहे. इंग्रजासी दबून आहे. इंग्रजापुढें सांप्रत कांहीं नवाबाचे चालत नाहीं. इंग्रज सत्यवादी आहेत. जो सुज्यातदौलास मुलूक दिल्हा आहे तो घेऊन सुजातदौला उगाच आहे. राजे बलवंतसिंग कराराप्रो सुजातदौल्यास रुो देतात, परंतु नवाबास बहुत भीत असतात. नवाबाचा राग बहुत बलवंतसिंगावर आहे. बलवंतसिंग इंग्रजाचे बलानें आहे. इंग्रज सत्यवादी आहेत. स्वामीसी बहुत श्नेह करावा म्हणौन इच्छितात. आपल्यासी श्नेह करून पातशास पुढे घेऊन जाऊन दिलीस बसवावे हे इंग्रजाचे मनात बहुत आहे. याप्रो रा निलो गोपाल वकील यानी ठरविले होते, परंतु आपली स्वारी देशास गेली

जाट जवाहीरमल याने बहुत लबाडी केली. सरकारचा अमल कालपी व रायेपूर वगैरे बुंदेलखंड येथील अमल उठविला. काही फौज ये प्रांती (ठेऊ)न खुद जाट अगऱ्यास गेला. सांप्रत जाटासी व माधोसिंग जयेपूरकरासी विरोध बहुत वाढला आहे. जाटानें सर्वासी विरोध सांप्रत केला आहे. सरकारचे अमलात बहुत उपद्रव केला आहे. याचे पारपत्य येऊन सीघ्र करावे. हे कार्य जरूर आहे. सर्व कचे वर्तमान रा त्रिंबकराव विश्वनाथ पाहून गेले आहेत. ते सेवेसी निवेदन करतील. त्यावरून सर्व श्रुत होईल कलम १

रा त्रिंबकराव मामा आद्यापि छत्रपुरी आहेत हे ऐकिले त्यासी हे बहुत उत्तम आहे. स्वामीनी या प्रांती सत्वर यावें. सर्व बुंदले व आपली फौज मिलोन सहजामधे सलाबतीने मागती कालपी वगैरे अमल बसेल. पुढे रोहिले जाटाचे पारपत्य. त्यासी तूर्त माधोसिंगासी जाटाने सिकस्त खाली आहे. त्यासी माधोसिंगासी आपला सलूख आहे. * * * तिकडून बलावावे. रा नारो शंकरासमागमे फौज देऊन माधोसिंगास ते प्रांतीहून जयेपुराहून जाटावर पायेबंद द्यावा, बुंदेलखंडांतून अमल बसवीत आपण

---

१ बेकर.

यास्तव तो विचार ते समई राहिला व आबदाली लाहोराहून माघारा काबलास गेला. सिखानी त्यासी बहुत हैरान केले. आबदाली क्षोपनिशेप विलायेतेस गेला यात संदेह किमपि नाहीं. श्रीमध्यें सावकारी बहुत लिहिली आली आहेत की, सिखानी त्यासी हैरान बहुत केले व त्यासीहि खबर गेली की, इंग्रज समागमे घेऊन श्रीमंत मजवर लढावयासी येतात हेहि ऐकोन व सिखानी हैरान केले व फौज न राही, सर्व पेचामुळें तो इलाइतीस गेला. तूर्त आबदाली ये प्रांती येत नाहीं. हे रान रिकामे आहे, यास्तव आपण सीघ्र कटी फौज व तोफखाना उत्तम घेऊन सत्वर येऊन फिरंगियासी श्नेह करून जाटाचे पारिपत्य उतम प्रकारे करावे. जाटाने बहुत लबाडी केली आहे. सर्वासी वैर केले आहे. नजीबखानासी व जाटासी पहिलेपासून वैरच आहे. फिरंगीयासीहि सांप्रत वैर केले आहे. फिरंगी म्हणतात की, आम्ही पातशाहास घेऊन दिलीस जाऊ. जाट म्हणतो की, येकटे पातशाहास पाठवा. तुम्हीं फौज घेऊन न येणे. जर तुम्ही याल तरी लढाई होईल. यास्तव फिरंगी पुढे जाऊ सकत नाहीत. इंग्रज हे म्हणतात की जे समई श्रीमंत येतील ते समई तुम्हांस नेऊन दिलीस बसऊ. याप्रो सर्व इंग्रजाचे कारभारी बोलतात. यास्तव आपण प्रथम इंग्रजाकडे वकील खासास्वारीनिसी यावे. निलोपंतास पुढें इंग्रजाकडे पाठवावे. इंग्रजाची फौज पातशाहास घेऊन स्वामीपासी येईल. पातशाहास घेऊन जाटाचे पारपत्य करून पातशाहा दिलीस बसऊन मागती लाहोरपर्यंत गेल्यास पेंच नाही. मुख्य गोष्ट अबदाली येत नाहीं व इंग्रजासी श्नेह जालाच आहे. आपण सत्वर देशास गेले म्हणौन इंग्रजाच्या भेटी राहिल्या. नाही तरी आपले भेटीस मुख्य साहेब कलकत्याहून रा। निलोपंत घेऊन येत होते. मकसुदाबादेपावेतो आला. तेथे आपले वर्तमान गेले की, आपण दक्षेणेस गेले. त्यावरून तो मुख्य साहेब मागती माघारा गेला. तेसमई आबदाली येणार हेहि भये होते. रुाहि स्वामीस इंग्रज देता, परंतु तो मनस(?) गेला. सांप्रत जाटाचे प्रथम पारपत्य करणे व पातशाहास दिलीस नेऊन बसवणे हेच गोष्ट आहे. याप्रो इंग्रज करावयासी तयार आहेत. स्वामीसी श्नेह करावयास इंग्रज तयार आहेत. जे समई आपण रा। निलो गोपाल यांसी पाठवितील ते समई इंग्रजाची फौज आपल्यापासी येईल, यांत किमपि संदेह नाही. रा। निलोपंत मात्र प्रथम इंग्रजाकडे पाठवावे. ये प्रांती इंग्रजाचे दरबारांत रा। निलोपंत बहुत आपले कृपेकरून मान्य झाले आहेत. यास्तव प्रथम आपण येणार ते समई पूर्वी मारनिलेस पुढे पाठवावे. मागाहून

रा निळो गोपाल पाठवावे. त्याचे विद्यमाने पहिलेपासून करार याप्रो जाला आहे की श्रीमंतानी आम्ही येकत्र होऊन पातशाही बंदोबस्त करावा. त्याप्रो निळोपंत ठीक करतील. सांप्रत निळोपंत स्वामीकडे इंग्रजाची वस्त्रे व हर्ती घेऊन गेले आहेत. नागपूरचे मार्गे देशास गेले आहेत. त्यासी इंग्रजासी सर्व सलुखाच्या गोष्टी जाल्या आहेत. कळावे. कलम १

स्वामीची खासा स्वारी येई तो इतकियांत काळपीवर इंग्रजाची भेट करून पुढे त्या वाटेने जाऊन जाटाचे पारपत्य करावे. याप्राा सर्व इंग्रजाचे कारभारी व सर्व राजेरजवाडे म्हणतात. यास्तव सेवेसी लेहून पाठविले असे कलम १

तीन कलमे राजकी वर्तमान सेवेसी सुचले ते लेहून पाठविले आहे. याप्राा स्वामीचे मर्जीस येईल तरी बहुत उतम आहे. श्रीकासी व श्रीप्रयाग व श्रीगया सहजामध्ये आपल्यास येतील. जेसमई आपला व इंग्रजाचा स्नेह जाला तेसमई सहजामध्ये ज्याप्राो पूर्वी लाहोरचे साली हरिद्वार परगणा पातशाहापासून मागोन घेतला त्याप्राो पातशाहा आपल्यास त्रिस्थली देईल व इंग्रज आपल्यास त्रिस्थली देतील यांत किमपि संदेह नाहीं. मुख्य गोष्ट राजा बळवंतसिंग आपल्यासी बहुत येकनिष्ठ आहे. हे वर्तमान सर्व वो रा धनराज दीक्षित सांगतील व रा निळो गोपाल सांगतील. सुज्यातदौल्यास किमपि जोर राहिला नाहीं. नावमात्र नवाब आहे. जे फिरंगी सांगतील ते करील. त्यासी राजे बळवंतसिंगासी बहुत अकस बहुता दिवसापासून आहे व अंतरवेद तरी पातशाहास दिल्ही आहे. जेसमई पातशाहास आपण इंग्र(ज) मिळोन नेऊन दिलीस बसवितील तेसमई सहजच आपल्यास अंतरवेद येईल व किला इंग्रज आपल्यास देतील. याप्राा सर्व गोष्टी निळोपंतानी इंग्रजासी केल्या आहेत. त्रिस्थली कलमात लेहून दिल्ही आहे त्यावर इंग्रजानी करार केला आहे. जेसमई दिल्लीत आपण व इंग्रज जातील ते समई त्रिस्थली आपली जाली यांत किमपि संदेह नाही. परंतु स्वामीनी कटी फौज व तोफखाना घेऊन सत्वर यावे. हुजरात उतम घेऊन यावे. हुजराती सिवाये कार्यहोत नाही यैसे सर्व म्हणतात व आपलेहि अनुभवास आले आहे. यास्तव जरूर हुजराती फौज फार घेऊन यावी व तोफखाना बहुत उतम घेऊन यावा. सारांश श्रीकासीतील मोठे थोर थोर तपश्वी हेच म्हणतात की, आपली फते व्हावी यास्तव श्रीकासीत धर्महि जरूर पाठवावा व अनुष्टानें पाठवावी. सेवकास कर्जदार बहुत हैरान करितात ती आपती पत्री कोठवर ल्याहावी ? दररोज कर्जदार

धरणे बसतात. भोजनाची आपत्य आहे. आपण कृपाकरून जे जे रुो पाठवितात ते ते रुो व्याजामध्ये जातात. मजवर प्राणसंकट आहे. यास्तव कृपा करून मजला कर्जापासून येकदा मुक्त करणार आपण समर्थ आहेत. सर्व अजमास वो रा व्यंकटराम शास्त्रीबावा समागमे पाठविला आहे व सर्व कचे वर्तमान ते सांगतील त्यावरून कळो येईल. येंदा श्रीगंगेस पूर बहुत आला. सरकारचे दोन्ही वाडे गंगातीरी. त्यासी श्रीगंगाजळ बहुत चढले तेणेकरून श्रीगंगातीरी जे काम होते त्याचे मोठे मोठे पाथर निघोन गेले, त्याची मरामत[१] जरूर केली पाहिजे व कर्जदार बहुत हैरान करितात व पोटखर्चाची आपत्य बहुत आहे, यास्तव कृपा करून सेवकास सकल संकटापासून दूर करणार स्वामीखेरीज मला दुसरे कोण्ही नाहीं. चिरंजिवास नवऱ्या येतात. यास्तव जे मर्जीस येईल ते चिरंजिवाचे लग्नास पाठवावे. आधी कर्ज वारावे मग लग्नास खर्च पाठवावा. कां? कर्जदार लग्न करूं देणार नाहीत. मर्जीस येईल ते करावे. रा कार्तिक शुध्य १० रविवार हे विज्ञापना.

¶Dhondo Khanderao writes to Dadasaheb from Benares describing the state of affairs in the North, particularly how the English were gradually coming into prominence, how they were desirous of having an alliance with the Peshwa, how it was possible to secure the three holy places of the Hindus to the Peshwa through the influence of the English, how Shuja's power was on the wane and how Ahmadshah, much disheartened, had left India for good. The writer tries to impress on Dadasaheb the necessity of deputing Nilo Gopal as Vakil to the English. Lastly he asks for money for his expenses at Benares.

No. 193] [*Recd. 15-11-1767?*

छ २२ जमादिलाखर रविवार

श्री

सेवेसी[+] विज्ञाति. राजश्री अंताजी माणकेश्वर याचे पुत्र राजश्री बहिरो अनंत फौजसुधा येथे आम्हासमागमे आहेत. त्यास यानी व याच्या लोकानी येक दोन वेला लडाई नजीबखान याची फौज प्यादे बाहेर निघाले होते ते समई

---

१ दुरुस्ती. + पत्र सिंधाकडील दिसतें.

उतम प्रकारे केली. नजीबखान याचा मोड करून खंदकापावेतो घालविले ते समई रोहिल्याचे माणूस फार मारले गेले व याजकडीलहि लोक जखमी व ठारहि पडले. घोडी जखमी व ठार काही पडली. मारनिले समागमे माणूस फार चांगले आहे, त्याप्रो कामकाज उतम केले. स्वामीस विदित व्हावे याजकरिता विनंती लिहिली असे. सेवेसी श्रृत होये हे विज्ञाप्ति.

¶*A skirmish between Bahiro Anant and Najibkhan is described in this letter.*

No. 194] [*30-11-1767*

पौ छ ६ साबान

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक गोविंद रघुनाथ सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल मार्गेस्वर सुध ९ नवमी सोमवार मुा पुणे जाणून स्वकीये निजानंद लिहीत आसिले पाहिजे विशेष. कासीदजोडी याजबराबर आज्ञापत्र छ १७ जावलचे पाठविले ते छ १८ जाखरी मुकाम मजकुरी पावले. सविस्तर वर्तमान विदित जाहाले. श्रीमंत दादासाहेबास व त्याजकडील मुत्सदीयासी पत्रे पाठविली ते पावली; ते श्रीमंताकडे आनंदवलीस रवाणा करावी त्यात यैवजाचा मजकूर म्हणून न पाठविली. कारण मामलतीचा जाबसाल श्रीमंत रावसाहेबाकडे लागला. त्याचे मनात विषम वाटेल कीं मागे यैवज न पाठविला, आता पाठविला म्हणून तैसीच ठेविली. त्यासी पत्रे लिहिणे ते आपली लीनता, त्याची स्तुति यैसी लिहीत जावी. आपण लिहितीलच. म्या ल्याहावे यैसे नाही. तुम्ही हुंड्या सुमार ७ येकूण रुपये साठ हजाराच्या पाठविल्या त्या पावल्या. त्यासी हुंड्या अवरंगाबादेच्या सरकारात यवज येथे पाहिजे. येथे दोन सवा दोन रुा दर सेकडा हुंडणावल पडती. त्यासी हुंड्या येथे भुकणजी हरिपंत याचे दुकानी रा बाबाजी प्रल्हाद याचे मारफतीने दिल्हा त्या हुंड्या शहरास पाठविल्या. वासुदेव मुरार याजवर हुंड्या होत्या. त्यानी हुंड्या कबूल केल्या, परंतु उतर दिल्हे कीं येका महिनियात रुा देईन. वाइदा तुमचा जाहला खरा, परंतु वागऊन घ्याल तर देतो. तेव्हां कबूल करून हुंड्या ठेऊन रुा देईन, तेव्हा सकारन+ घेतल्या त्याचा जाब दोन दिवस जाहले आला. वासुदेव मुरार सावकार खरा, परंतु मातबरी थोडकी म्हणून चार दिवस अधिक म्हणतो. हुंड्या पुढे करणे त्या बहुत

+ स्वीकारून.

(शोध) * * करून करीत जाव्या. आपण लिहिले की यैवज पाठविला * * * * तिचा डौल कोणीकडे होतो, पुरता शोध मनास आणून आपली मामलतीची बलकटी करून मग देणे तर द्यावी. मुत्छदी मातबर साधवा की सेट सर्वप्रा आपल्या ममतेत श्रीमंतापासी राहील यैसे कितेक तपसिले लिहिले. त्यासी उभयेता श्रीमंताचे रहस्य होऊन केलेले कराराप्रा श्रीमंत रावसाहेबाचे हस्तगत जाहले. पस्तीस लाखार्ची निश्या करून दिल्ही. दुसरे पाचा लाखार्ची जाहागीर दिल्ही. उभयताचे चित सुध होऊन श्रीमंत रावसाहेबी त्याची आज्ञा कार्तिक सुध नवमीस घेऊन त्रयोदसीस पुण्यास दाखल जाहले. आम्हास श्रीमंत दादासाहेबी आज्ञा केली की मामलतीचा जाबसाल केला तो तपसील अजुर्दा कासिदाबराबर पत्रे लिहून पाठविली ते पावलीच असतील. दोन लाख रुा रसद निदान द्यावी; तयात येक रुा कमी होत नाही. आम्ही तेथे उदंड रदबदल केली. सेवटी जाबसाल तैसाच राहिला. श्रीमंत कूच करून पुणेस आले. आम्हींहि त्याजबराबर पुण्यास आलो. श्रीमंत सकारामपंत बापू त्रिंबकास गेले, ते परभारा सासवडास गेले. आनंदवलीस आमचे जाबसालात श्रीमंत राजश्री मोरोबादादा फडनीस व गुरुजी होते. येथे आम्हावरी तुम्हीं पूर्वी रा बाबाजीपंत दादास लिहिले होते ते श्रीमंत रा नाना फडनीस यासी बोलत होते. आम्हीं येथे आल्यावर रा बाबाजीपंताची भेटी घेतली. त्याची स्थिति पाहिली तर आपल्याकडे ममता बहुत देखिली. दरबारातहि त्याची भीड व तोहि आधिक मातबर माणूस दरबारात सर्वास इतबार हे बोलतील ते प्रमाण. आपलीहि आज्ञा आम्हांस होती कीं तुम्हीं ते मिलोन जाबसाल करणे. त्यावरून त्याचे विद्यमानें श्रीमंत रा नानाची भेटी घेतली. आपल्याकडील सविस्तर वर्तमान निवेदन केले. त्यानी येकांती बसोन सर्व यैकिले. नानाची ममता आपल्या ठाई बहुत देखिली. दोन लाखात काही कमी करावे यैसे रा बाबाजीपंताचे मानस, त्यानी नानास मायेत घेऊन सांगितले, त्यावरून नानानी श्रीमंत रावसाहेबास विनंती केली. त्यानी रा बापूचा उजूर केला तेव्हां नानानी उतर केले कीं बापूस येऊ द्या; रदबदल करून पाहू; नाही तर जाब साल ठरलाच * * * * कार्तिक वद्य त्रयोदसीस आले. दुसरे दिवसी सावकार तेथे आहे त्यासी हुंड्याचे खोकेचा तगादा सख्त करून खोकी आणून घेणे. हुंडीला दिकत कोठे पाहिली नव्हती; याजकारिता खोके+ जरूर आणणे. रुपये पदरी पडतील तेव्हा पावतीचा जाब पाठऊन देऊ. कलले पाहिजे हे विज्ञापना.

¶*Govind Raghunath to Vishwasrao Lakshman from Poona, giving news of the surrender of Dadasaheb to the Peshwa and the complications about his settlement.*

+ हुंडी दिल्यासंबंधीं सूचनापत्र.

No. 194A] [*23-12-1767*

पौ छ ६ साबान
सन समान पौष

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक बाजी गोविंद. कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ता छ १ साबानपावेतो वर्तमान येथास्तित असे विशेष. आज्ञापत्र सादर जाहाले तेथे आज्ञा की श्रीमंत राजश्री भाऊसाहेब याणी पाणिपतचे स्वारीतून लाख रुपयाची वरात राजश्री नारोशंकर राजेबहादर यास गोविंद बलाल याजवर दिल्ही होती. त्यास राजश्री बालाजी गोविंद याजकडील मामलत विल्हेस लागली तेव्हा याचा फडशा कसकसा जाहाला आहे तो लेहून पाठवणे. त्यास राजश्री गंगाधर गोविंद यास लस्करात याणी तगादा केला तेव्हा त्याणी सांगितले, की ज्या येवजावर तुम्ही वरात घेतली तो येवज आम्ही दिलीसच भरणा केला होता. खर्च घालून का घेतले नाही येसे असोन आम्ही काहीं खर्च हिसेबी घालून सरकारातून मजुरा घेतले आणि तुम्हास देत नाही येसे नाही. याउपर सरकारातून देवितील तर नवी वरात सालमजकुरचे रसदेचे येवजी घ्यावी. वरातेप्रो येवज पावेल. याप्रो सालजाब करून येवज आपणाकडे लागू करू दिल्हा नाही, यैसे वर्तमान आइकिले * * * * कारातून कांहींच फडशा जाहला नाही. बरकड हिंदुस्तान-देखील मालवा येथे नवे माहाल सरंजाम कोणास दिल्हे, बाकी माहाल सरकारात कोणते राहिले याचा झाडा आकारून लेहून पाठवणे. त्यास झासी व बुंदेलखंड हे तो दोन्ही बेहडे पहिलेच पाठविले आहेत. बाकी मालवापैकी महाल सोडविले त्याचा झाडा.

किता माहाल सरंजामास गेले.

२ पा भेलसे व बलखेडा खासगीकडे

१ सिरोंज होलकराकडे

१ देवरी गौरझाबरे धोंडो दत्तात्रेय याकडे

१ उचाड सिवाजी विठल याकडे

१ अहीरवाडा दीड लक्षाची जहागीर नारोशंकर. झाडा अलाहिदाच आहे.

पा बासोदे सुनेरा वेंकाजी विस्वनाथ याजकडे आहे. सरंजाम बहिरोपंतास द्यावायाचा, करार मारनिलेचे फाजील पनास हजार त्या मामलतीवर आहे.

अहीरवाडेयापैकी येक लक्ष तेरा हजार रुाचे गाव याची मात श्रीधर बलाल याजकडे आहे. अमल नारोशंकर सुरलित चालो देत नाही. पंचवीस हजार रसद घेतली, पो दाहा-

4329

१ चंदेरी पो फुटगाव कटोती बा
तीस हजाराचे खासगीकडे

—

७

ता झासी पो येलंच माहालचे गाव नारोशंकर याजकडे दिल्हे. मोटेचे ठाणे आपणाकडे दिल्हे आहे येसे गैरवाका समजावितील तर दिल्हे नाही, तो तालुका निरालाच आहे. कलावे.

येणे प्रा हे विज्ञापना

हजार रदकर्ज दिल्हे. बाकीचे त्यांच फाजील व ठाणियाची सिबंदी अजमासे पंधरावीस देणेच निघेल. कलावे.

सदरहू प्रो कांहीं घालमेल जाहाली नाही.

¶*Assignment of territory in the North subsequent to the battle of Panipat is reported to Nana Fadnis by Baji Govind.*

No. 195] [*30-12-1767*

[पहिला बंद गहाळ आहे.]

बाधून दिल्ही. रुा नव दाहा लाख अकार करून दिल्हा. कमाविसदारापासून वसूल घेतला तोहि सर्व ध्यानात आहे. यैसे असता माझे वराताचे रुा देत नाहीत तर तुम्हांस रुा सुटतो यैसे नाही. तुम्ही सिबंदी मनमाने तैसी लिहिता. सर्व बातनी मजला तेथून आली आहे. चिंता काय? मजला तुम्हास फजित बहुत प्रा करणे आहे. रा आबचितराव याचे रुा नसता रुा खर्ची घातले, यावेगले पनास हजार रुा त्यासी अंतस्थ दिल्हे. त्यानी तुम्ही मिलोन माझे मात्र घर बुडविले आणि आपले स्वहित केले, परंतु मी जितक्यानी मौजा करून रुा मिलविला तो कदापि जिरू देणार नाही. ते काय भुलले आहेत. तुम्ही म्हणाल झासीचे किल्यात बसलो तर मनावरी धरीत नाही. जे दिवसी धरीन तेच दिवसी झासी घेईन. मजला अगाधी नाही. जर माझे वरातेचे रुा दिल्हे तर मजला तुम्हासी संमधहि नाही. मी दीढा कोसावरून गेलो. झासीकडे पाहिले नाही. यैसा कितेक मुदईपणाच्या गोस्टी बोलतात. करावयासी प्रसंगोपात चुकणार नाहीत. याजकरिता याचा विचार पोख्त करून जे कर्तव्य ते करावे. रा बालाजी शंकर हेहि बहुत आपल्या ममतेत आहेत. आपल्याकार्यास बहुत शोबतात. मुरबीच आहेत. याजला जे लिहिणे स्वकीये ते लिहीत जावे. आम्हावरी बहुत कृपा करितात. आपणहि ल्याहावे. तैसेच रा दादा फडनिसासहि स्वामीचे वर्तमान तपसिलवार लिहीत जावे. ते ममतेत घेतले आहेत.

आपण म्हणतील हुंडीपैकी दरबार खर्च जो केला त्यासी संकट जाणून रुा द्यावेसे जाहले. पहिले याद लिहिली तूर्त द्यायाची त्यासिवाये तीन श्रीमंतास अजि देणे आले. हुंडीचा यैवज आल्यावरी हे जाऊन बाकी सरकारात भरू. दरबार खर्चाचा यैवज मुबदला पडला तो यैवज सत्वर पाठविला पाहिजे. दरबारात सर्व मुसाहेब+, ज्यासी न बोलावे तोच शत्रस्थानी होतो यैसे वर्तमान आहे. सविस्तर महिपतराव सागेल. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना. सूध दशमी बुधवार.

¶*A mutilated letter, referring to affairs of Jhansi and complaining of the officials working in Bundelkhand. The handwriting appears to be that of Govind Raghunath whose letters have been printed above.*

No. 196] [*November 1767*

श्री

विज्ञापना. सनदपत्र रसद कबूल केल्यावर होईल; परंतु फडनीस मजमदार व कितेक मुत्छदी येकांतात पेश आहेत. त्याजला जैसा माणूस आपल्या ममतेत असेल त्याजला दिल्हे पाहिजे. याजकरिता दरबार खर्चास तूर्त दाहाबारा हजार रुा पाठऊन देणे. येंदा पंचवीस हजारावर दरबारखर्च पुरी पडणार नाहीं. रा सकारामबापू हे प्रस्तान भारी यैसे आहे, याचे पुर्ते मनन करून उतर पाठवावे; ये गोस्टीस हैगई न करावी. मी येकनिस्ट, मजपासून अंतर पडणार नाही हे पूर्ण ध्यानात असो द्यावे. मजला मागणे तर मी आपल्यापासून हजारो घेईन. मजला कर्जापासून दूर करणार आपण समर्थ आहेत. आपल्या उर्जिताची नित्य इछा, दुसरे नाही. दरबार खर्चाची जरूर तजवीज करून पाठवावी. रसदेचा यैवज लाख रुपये आधी रवाना करावे, मग पत्र वाचावे. वरकड रा नारो नीलकंठ यानी लिहिले त्याजवरून कलेल. रा आपाजी गणेश याजकडे गुजरात सालमजकूर करार जाहली. तेथील रसद साडेच्यार लाख रुा येणे. त्यापैकी मागील कर्जात रुा दोन लाख देऊन, अडीच लाख रुा रसद ठराऊन, रुाची निशा करून घेतली. सनदा येका दो रोजा येतील. रा बाळाजी गोविंदाकडील मजकूर, प्रस्तुत त्याजला लुटले, याजकरिता तूर्त रसद मागत नाहीत. पुण्यास गेल्यावरी मागावी यैसे आहे. बाळाजी गोविंद गुमान खुमान वगैर तिकडील जमीदार मिळऊन कालपी प्रांते येणार. येथे श्रीमंतास लिहिले होते त्यावरून श्रीमंती तुम्हांस पत्र लिहिले आहे कीं तुम्हीं बालाजी गोविंदास सामील होऊन जाटानी सोडविली ठाणी ते माघारी घेणे म्हणून लिहिले. बालाजीपंत पाठवून देतील. तुम्ही उंडिणा वगैरे ठाणी कलेल तैसे करून हस्तगत करावी.

+ मुसाहेब=सोबती, मित्र.

छत्रीबा जाजती गाव गेले आहेत, त्याची सनद घेऊन, गंगाजी जासुदाबराबर पाठविली ते पावलीच असेल. अमलात आल्या करावें. रा गंगाधरपंत तात्याहि त्या प्रांतास येणार. तूर्त जाटाची ठाणी असतील. च्यार दिवस तातड न करणे. मागाहून सविस्तर लिहीन. सनदेचे ताबे सर्व आहेत. चिंता नाही. सूचनार्थ लिा. पाचा हजाराची पावतीची पोहच पाठविली, ते रा चिंतो विठल यांसी दिल्ही. पावतीचाहि कागद घेऊन पाठवितो. रा चिंतोपंत तात्या व चिंतोपंत दादा व आबा आपल्या साहित्यास उतम आहेत. आंम्ही त्याचे आर्जव टाकिले नाही. कलले पाा. आपल्याकडील व जाटाकडील वर्तमान सर्व लिहिणे. उभयेताचा श्नेह बाह्यात्कारे जाहला, अंतरयामी दिसत नाही. तूर्त जाहले ते खरे, पुढे होईल ते लिहू. राजेबहादरहि रावसाहेबाबराबर पुण्यास जाणार. पत्रे जरूर लिहित जाणे. हिसेब त्याजकडील पाठवणे. त्यानी हुजरून ताकीद व खिजमतगार काहडणार. हिसेब आम्हापासी असता तर जाबसालास कदापि न चुकतो. तथापि करीतच आहे. आधार पाहिजे. हिसेब जरूर लिहिण्यास पाठवणे. त्याचे जाहागिरीस वाटे न जाणे. येथून कमाविसदार पाठवणार. हे विज्ञापना.

¶*This is probably the second sheet of a letter giving news about the reverse of Balaji Govind and the aggression of the Jats in Bundelkhand.*

No. 197] [*14-2-1766 ?*

श्रीमंत राजेश्री दादासाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती पो खंडेराव रघुनाथ कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा छ ४ माहे रमजान मुाा उजेन साहेबाचे प्रतापेकरून सुखरूप असो विशेष. इकडील वर्तमान ताजे येसे जे. पादशाह अलीगोहर व सुजादवला वजीर हे व बिशनसिंग सरदार फिरंग्याचा बेचालीस हजार फिरंग्यानसी समागमे आहे येसे जमयतनसी कोरडा जहानाबाद दाखल जालेत. पुढे मनसुबा येसा कीं येंदा तखतावर बसावे व अहमदखान यासी (पुढें एक ओळ मजकूर फाटला आहे.) अहमदखानापासी (अर्धी ओळ फाटली आहे.) नास हजार सीख बोलाविले. त्यास तेहि येऊन जाटाचे फौजेत शामील जाले व कोटपुतळी मारली व ज़ुजास सिध जाला आहे व राा सुभेदार व राा माहादजी सिंदे हे गोहदेवर आहे. अद्यापि गढी हस्तगत जाली नाही व किला परंडाचा हस्तगत याचे हस्तगत जाला व तेथील किलेदारास धरले व किल्यातून येक लक्षाचे तर गला व येका

लक्षाची जिनसी येसी त्यांतून निघाली. .पादशाहाचा याजकडे आला व फरमान अनला त्यात लिा की जर तुम्ही पादशाही चाकर * * * ऊन आम्हा शामील होणे, नाही तर

¶*Dadasaheb is informed that the Jats have been joined by the Sikhs and are reported to have sacked Kotputli. Gohad continues to be invested by Sindia and Holkar.*

No. 198] [*1767?*

श्री

विज्ञापना. राजश्री बालाजी गोविंद याजकडे गुलसराईच्या ठाण्यास तोफा कांहीं भेलशापैकीं देवाव्या म्हणून पेसजी किल्ल्यास असतां विनंती केली होती. त्यावरून आज्ञा जाहाली होती कीं दप्तरचा झाडा काढावा. पाहून देऊं. त्या वरून हल्ली भेलशाचे तोफाचा व झासीचे तोफाचा झाडा दप्तरचा आलाहिदा शेवेशी पाठविला आहे. पाहून आज्ञा करणे ते करावी. गुलसराई गाजुद्दीखान यास न द्यावी हे आपले मनातहि आहे व पत्रे गेली म्हणून सांगितले होते. त्यास हल्ली अपाजीपंत विनंती करितील. पत्रे द्यावयाची असतील ती द्यावी. हे विज्ञापना.

¶*This is a letter describing the artillery equipment for Gulsarai.*

No. 199] [*1769*

श्री

सेवेसी विज्ञापना चिठी पाठविली ते पावली. डिगेस उदईक तीन हजार फौज पाठऊन कोसाभरावर उभे राहोन पुढे राऊत पाठऊन बातमी राखवणे म्हणोन आज्ञेप्रमाणे प्रात:कालीच रवाना करीतो. आतां रातची चौकी पुढे पाठविली आहे. कहीबराबरीहि फौज पाठवावयाची तेहि पाठऊ. आज्ञेप्रमाणे बंदोबस्ती करितो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञासि.

¶*Instructions, that a contingent of three thousand should march in advance for Dig are being given effect to, says the writer.*

4333

No. 200] [2-2-1768

पौ छ २८ सवाल सन समान

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
विस्वास रावजी स्वामीचे सेवेसी

पोष्य बालाजी शंकर कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागायत छ १२ रमजान पावेतों मुकाम पुणें जाणोन स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे विशेष. इकडील वर्तमान तरी राजश्री माहादजी सिंदे येथें आले. त्यास राजश्री बाजी नरसी व राघोराम याजकडे त्याचे डौलाचा कारभार करार जाहाला. या उपरी राजश्री तुकोजी होलकर व सिंदे यांसी निरोप जाहाला. येका दो रोजीं निघोन जातील. आपल्याविसीं श्रीमंतानीं उभयेतां सरदारांस व कारभारियास ताकीद समक्ष जाहाली आहे कीं, झांसी प्रांतीचा बंदोबस्त वगैरे उपराला करीत जावें याप्रमाणें सांगितलें आहे. यानंतरी तुमचे ठाई श्रीमंतांनीं ममता फार आहे. आम्ही तुमचेविषई येकांतीं बहुत प्रकारें समजाविलें आहे कीं हे येकनिष्ठ स्वामींचे पायापासीं आहेत. स्वामीखेरीज यांस दुसरा आश्रा नाहीं. त्यावरून श्रीमंत कृपावंत होऊन आपला खास पोशाख तुम्हांकारणें दिल्हा आहे. वरकड कितेक मजकूर राजश्री गोविंदपंत व हरिपंत यासी सांगितला आहे ते आपणांस सविस्तर लिहितील त्यावरून कळेल. त्यास प्रस्तुत राजश्री हरिपंत फडके व अच्युतराव व आम्ही त्रिवर्ग येकत्र बसलो होतों ते समई तुम्हांकडील मामलेतेची गोष्ट हरिपंतानी काढली कीं, फडणिसी व मजमुचीं वेतनें पेशजीचीं राहिलीं तीं देखील अद्याप येत नाहीं व आलीकडे काम काज फडणिसीचें व मजमूचें सुरलीत घेत नाहीं. येविशीं अच्युतरावजीस बहुत निषध केला कीं असे तुम्ही कितीक रोज कराल? येक दिवस तरी आमचा येईल. तेव्हां जें असेल तें समजून घेऊं. चिंता काय आहे? व आम्हासहि त्याणी शब्द लावला की, आम्हीं लग्नाचे गडबडीमुळें आठ पंधरा दिवस घरीं होतो ते समई परभारें राजश्री मोरोबा दादा व तुम्हीं मिळोन साल मजकुरीं कारभार विल्हे लाविला. बरें; बाजत बरसात पेस्तर घडोन येईल ते खरे. या प्रकारचीं त्याणी भाषणे केलीं त्यावरून आपणास जाहालें वर्तमान सविस्तर लिहिलें आहे. त्यास आम्ही तों सर्व प्रकारें तुमचेच आहें. परंतु येथें दरबारांत फडणिसीचें वळण भारीच आहे. प्रस्तुत कारभारी राजश्री नाना फडणीस यांजवर सर्व येकत्यार आहे. त्याणी जें सांगावें ते प्रमाण. यास्तव हरिपंत व ते येकच. दुसरा विचार किमपि नाहीं. यास्तव आपणांस सूचना लिहिली आहे. तरी जेणेकरून

फडणीस रजाबद राहतो अर्थ करावा. मागील वेतन फडणिसीचे व मजमूचे राहिलीं आहेत त्यास गुा राजश्री अच्युतरावाचे विद्यमाने आपण करारमदार केला आहे त्याप्रमाणें यैवज पावता करावा. मुख्य गोष्ट फडणीस व मुजमदार यासी राजी राखावें यांतच उत्तम आहे. विशेष लिहावेसें नाहीं. येविषई तुमचे कारकून लिहीतच असतील. राजश्री गोविंदपंत व हरिपंत हे उभयेतां आपल्याकडील कामाकाजास फार सावधपणें आहेत. राजश्री आपाजी माहादेव सफरे आपणांजवळ आहेत त्याचें सर्व प्रकारें चालवीत जावें. त्याचे घरीं खर्चाविनें हैरान आहेत. खर्चाची बेगमी करून दिली पाहिजे. लांबचा पला यास्तव सूचना लिहिली आहे. गणपतराव याचा आपला गुदस्तां करार जाला आहे, त्याप्रमाणें ऐवज वेतनाचा पाठऊन द्यावा. जरूर स्मरणपूर्वक पाठवावा. बहुत काये लिहिणें कृपा केली पाहिजे, हे विनंती.

¶*Balaji Shankar supplies Vishvasrao Lakshman news from the court of the Peshwa that it has been decided to send troops to the North to put down the rebels. He makes a suggestion to the addressee to keep Nana Fadnis contented as he has acquired great influence with the Peshwa.*

No. 201] [*15-2-1768*

पौ छ १२ सवाल सन
समान

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
विश्वासरावजी स्वामीचे शेवेसी

पोष्य बाळाजी शंकर साा नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २९ रमजान दोन प्रहर दिवस मुाा पुणे वर्तमान यथास्थित असे विशेष. मोटेचा किला राजश्री नारो शंकर यास पेशजी देविला होता. या कामाबाा सरकारचे खिजमतगार दिल्हे आहेत. त्यास हली श्रीमंताची आज्ञा जाली कीं किला मारनिलेकडे न देणे. सरकारचे हुजरे तेथे गेले आहेत त्यास जाब देऊन माघारे पाठवणे कीं दुसरी आज्ञापत्र जालियावर देऊ म्हणोन लिहिणे. किला आपणाकडे असो द्यावा. या कामाबद्दल कासीदजोडी अर्जुरा[१] साठ रुा करून जलदीने सोळावे दिवसीं तुम्हाजवळ पोहचावे याप्रोा पाठविले आहेत. तर लिहिल्या-

---

\+ येथून पुढील अक्षर निराळ्या वळणाचें. १ मुद्दाम.

प्रमाणे करणे. निक्षूण आज्ञा जाली आहे. इकडील वर्तमान तर होळकर व सिंदे येथून रवाना जाले. रा गंगाधर यशंवत व बाजी नरसी मागें राहिले होते तेहि आजी निरोप घेऊन गेले. तुम्हास कलावें. किला आपणाकडे जरूर ठेवणे. बहुत काये लिहिणे, कृपा केली पाहिजे, हे विनंती. राजश्री गोविंदपंत सविस्तर लिहितील त्यावरून कळेल. हे विनंती. तुम्हाकडे पनास हजार रुपये वरात पेशजी जाली आहे त्याप्रो ते रुो पावते करून कबज पाठवणे. दुसरी फाल्गुन वद्ये प्रतिपदेची वरात जाली. त्यास गोविंदपंत येथे आहेत त्याची अबरू राहणार नाहीं. तर ऐवजाची तर्तूद आधी करून पाो. सरकारात करार प्रो उतरावे, येणेकरून उत्तम आहे. सारांश ऐवजा(ची) तर्तूद आधी करावी हे विनंती.

¶Balaji Shankar from Poona writes to Vishvasrao that the stronghold of Mot has been retained for the addressee. Sindia and Holkar have received orders to march to the North, adds the writer.

No. 202] *[28-2-1768?*

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक नारो देवजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम ताा छ ९ माहे शवाल मुाा मलारगंज नजीक सेवढे प्रांत बुंदेलखंड येथे कुशलरूप असो. यानंतर आपणापासून भुपालचे मुकामीहून आज्ञा घेऊन श्रीउजनीस गेलो. तेथें राजश्री बालाजीपंतास आपली पत्रे देऊन सार्धपक्ष त्याजपासी होतो. यानंतर आम्हास कछवाधारचे फडणिसीचे ताकीदपत्र राजश्री विश्वासरावजीस देऊन प्रांत मारचे फडनिसीवर पाठविले. त्यावरोन फिरोन ये प्रांती आलो. झासीत येक मास होतो. सबब की राजश्री रावजीची फौज व राजश्री बालाजीपंत बाबाची फौज दानसाह जाटाकडील याचे सैन्याने परावृत केले, त्यामुळे रावजीकडील दोन तीनसे माणसे कामास आली. च्यारसे जखमी जाली. त्यानंतर फिरोन फौजेची उस्तवारी करोन भिंडभदावर कछवाहधार येथील अमल करावयासी फौज तीन हजार पाठविली. तेथे राजश्री बालाजीपंत बावा सैन्यासह आधीच आले. त्यानी

दखलगिरी केली. इतक्यात हेहि फौज पधंराविसा दिवसाचे अंतरे गेली. सनदा ताज्या व ताकिदी दाखविल्या. त्यासी त्यानी उतर केले की आमचा पैका या जागेवर आहे. जोपावेतो आमचा पैका वसूल जाला नाही तोपावेतो आम्ही दुसऱ्यास दखलगिरी करो देणार नाहीं. यैशा रदबदलीस वीस रोज जाले. इतक्यात श्रीमान राजश्री माहादजीबावा सिंदे यांची सनद राजश्री बालाजीपंतास आली व राजश्री विश्वासरावजीचे नावे ताकीदपत्र कीं, आमल याजला देणे. त्याजवरोन यानी अमल सुरलीतपणे त्याजला देऊन हे आपले झासीचे मुलकात आले. थोरला जाटाचा मोड जाला म्हणोन आमलहि चालीस लागला. देसचे फौजचाहि दबाव पडला आहे. सारांश आम्ही फडनिसीविषई राजश्री गंगाधरपंतास पुसिले त्यासी म्हणालेत की, राजश्री नानाचे पत्र आमचे नावे आणावे म्हणजे फडनिसीचे काम तुमचे हातून घेऊं, यैसी उतरे केली. तेव्हा त्याजपासी काय म्हणोन राहावे? विश्वासरावजीचे सैन्यातच आहो. खर्चाची आब्राल फार आहे; तश्यातहि धण्याचे पुण्य समर्थ आहे. बरे; आपला जाबसाल ये तोपर्यंत तो देसी येता येत नाही. या उपरी जे आज्ञा येईल.—(अपूर्ण)

¶*Naro Devaji probably addressing Naro Shankar reports encounters in Bundelkhand against Jat Danashah, the regent of Bharatpur. See No. 173 above.*

No. 203] [*29-2-1768 ?*

पौ छ १० सवाल

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीजीचे सेवेसी

आज्ञाधारक सीताराम गोपाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ता। फाल्गुण शुध ७ मु। बनगाव न+। छेत्रपूर जाणोन स्वकीय स्वानंद इछितो विशेष. आपली आज्ञा घेऊन स्वार जालो ते छत्रपुरास आलो. राजे हिंदुपत पर्णियात होते तेथे जात होते. त्यास राजश्री खरगराव दिवान गुदर गोपाळदासजी बनगावात राहतात. त्याचे घरी लग्न होते. येथे येऊन याची भेट घेतली. वर्तमान कुल सांगितले. पत्र देखून बहुत संतोष जाले. आठा दिवस परियेंत लग्नाचे उत्छावमुळे बोलने जाले नाही. सुटीत जाले तेव्हा गोष्टमात जाली. श्रीमंत नानासाहेबाच्या स्नेहाच्या गोष्टी बहुत सांगितल्या. बहुतच आप्तकी व घरोबा सांगितला. श्रीमंत दादासाहेब वैकुंठवासी याचे स्नेहाचा विचार व करारमदार सांगितला. त्याचा विस्तार पत्री कोठवर ल्याहावा? बहुत प्रमाणिक येकवचनी व हरिभक्त निष्ठा चांगली आहे व राजाहि याचा लेहणग्रस्त(?) आहे.

+ नजीक.

वडिलाचप्रमाणे याची मर्यादा चालवीत आहे. याचा भाऊ केसरीसिंग त्यास मुसाहेबीचा किताब आहे. उभयेता बंधूचे श्वाधीन राज्य आहे. येसा प्रसंग पाहून यासच जाबसाल जो कर्तव्याचा तो केला. सरकारचे मतलबाची याद होती त्याची गोष्टमात ध्यानास आणून उभयेता बंधूंनी ठराव करून तहनामा सेवेसी पाठविला आहे. त्याचे मणन करून उतर पाठविले पाहिजे. याचप्रमाणे नकल राजे मजकुराकडे धनसिंग कुवर याचा त्याजपासी देऊन पाठविली आहे. राजे श्रीनगरचे पाहडात सिकारीस गेले आहेत. तेथ भेट गोष्ट उतम प्रकारे होत नाही म्हणोन मजला न पाठविले. आपणापासी ठेऊन घेतले. तिकडील उतर आले म्हणजे (अपूर्ण).

¶*Sitaram Gopal reports his visit to Kharagrao, Diwan of Raja Hindupat, and their friendly talks.*

No. 204] [*1-4-1766 ?*

पौ छ २८ सवाल मुा वोडसे

श्री

पुरवणी सेवेसी विज्ञापना

छ २० रोजीं ढवलपूरची बातमी आली. ढवलपूर जवाहिरमलानें घेतलें. च्यारपांचसें घोडे व तीनच्यार हाती यैसें त्यास सांपडलें. राजश्री सुलतानजी लांबहाते हस्तगत जाले. याप्रमाणे बातमी आली व त्याच्या फौजा चंभळेपार उतरल्या. कांहीं सीक व कांहीं फौज त्याची यैसे आलीकडे उतरल्या आहेत. गोहदकर जाट सडेस्वारीनें जवाहिरमलाकडे गेला. त्याच्या याच्या भेटी जाल्या. त्यास त्याचा विचार दिसोन आला कीं, शहरावरी जाऊन आवई करावी व गढ्या आमच्या सुटल्या आहेत त्याजवर जाऊन दंगा करावा. गोहदवाल्यानें परवांचे दिवसीं येक गांव आमच्या तालुक्याचा मारला. पुढेंहि त्याच्या चित्तांत दंगा करावयाची उमेद भारी आहे. त्यासी विनंती हेच की, खासा स्वारी इकडील शाहावरी सत्वर येऊन पोंहचल्यास त्याचा उपद्रव होणार नाही. ठाण्याची बंदोबस्ती जितकी करावयाची त्यास कांहीं चुकत नाहीं. परंतु आपला इकडील शह चुकला तरी रांगडे आवई घालून उपद्रव बहुत करितील; यास्तव वारंवार विनंती केली जाते. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*News-letter reporting that Jawahirmal Jat has occupied Dholpur and Lambhate (Holkar's sardar) is taken prisoner.*

No. 205] [5-4-1768 ?

श्री

सेवेसी विनंती सेवक तुकाजी होलकर कृतानेक विज्ञापना. येथील कुशल तागायत छ १७ जिलकाद मुकाम मौजे सांगवी गंगातीर परगणें चांदवड येथास्थित आसे विशेष. स्वामीकडून पत्र आलें तें प्रविष्ट होऊन बहुत संतोष जाला. जैपुरीहून रामचंद्र तुकदेव वकील याची पत्रें आलीं ते बजिनस पाठविलीं आहेत. जाटानें सीख मदत आणिले आहेत याजकरितां देशीहून फौजा जलद जाऊन पोंहचाव्या, तर तुम्ही दरमजल पुढें जाणें म्हणून आज्ञा व वाकिलाच्याहि पत्राचा भाव सर्व कलला. यैसियास स्वामीचे आज्ञेप्रमाणें आम्ही स्वार होऊन काऱ्होल्यास आलों. तेथून विनंतीपत्र सेवेसीं मार्गस्त केलें. त्याचें उतर आद्यापिवर आलें नाहीं. आनंदवलीस जावयाविसीं साहेबीं आज्ञा केली. त्यास राजश्री माहादजी सिंदे व राजश्री कृष्णराव आले पाहिजेत, यास्तव इकडून राजश्री माहादबास पत्रें गेलीं व राजश्री पंत मशारनिलेनिसीं स्वामीस विनंती पत्र पाठविलें आहे. तर साहेबीं उभयेतांस सत्वर मार्गस्त करून द्यावें. ते आले म्हणजे आनंदवलीस जाऊन तेथें श्रीमंत राजश्री दादासाहेबांची भेटी घेऊन पुढें जाऊं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Tukoji Holkar informs the Peshwa that he would start northwards as soon as Sindia and Krishnarao join him.*

No. 206] [18-5-1768

पौ छ २८ सवाल

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
विश्वासराव स्वामीचे सेवेसी

पोष्य बाळाजी जनार्दन साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागाईत छ १ रमजान पावेतों येथास्थित असें विशेष. तुम्ही राजश्री हरि चिंतामण याजबराबर पत्र पाठविलें तें पावलें व हल्ली येक पत्र आलें तें पाऊन सविस्तर वर्तमान कळों आलें, व पूर्वी राजश्री गोविंद विश्वनाथ येथें होते त्यांनीं सविस्तर मजकूर सांगितलाच होता व आपण जाटाचा व हुंडीचा व रसदेचा मजकूर लिहिला तो सर्व कळला. ऐशियास रसदेचे कारमदाराविशी श्रीमंतांपाशीं बहुत रदबदल करून करार केला. वाइद्याप्रमाणें ऐवज सरकारांत पावल्यास

सचोटी वाढून श्रीमंतांची कृपा विशेष होईल; येविशीचा सविस्तर मजकूर उभयतां लिहितां कळों येईल. जाटाचा मजकूर तर श्रीमंतांचे प्रतापेंकरून पराभवातें पावला आहे. येथून सरदारांची रवानगी जाहाली आहे तेही मातबर फौजेनशीं लौकरच येऊन पोंहचतील. आल्यावर तुमचे प्रांताचा बंदोबस्त करून देतील. तुमचा बंदोबस्त करून द्यावा येविशी श्रीमंतांनीं सरदारांस रुबरू सांगितले आहे. +पूर्वस्नेहाचें विस्मरण नसावें. बहुत काय लिहिणे लोभ असों दीजे हें विनंती.

¶*Balaji Janardan writes to Vishvasrao of Jhansi not to be remiss as regards payment of amounts due from districts under him. He further informs that troops have been sent to chastise the Jat.*

No. 207] [*7-6-1768*

पो छ २२ मोहरम

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक अपाजी मेराल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता २१ माहे मोहरम मुा ठाणे दभुवा स्वामीचे प्रतापे कुशलरूप जाणोन स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. जाटाकडील वर्तमान भिंडेस लागले होते. पाचच्यार सुरंग लावले. कारेगर न जाले. विटावियावर नवाब सुज्यातदोलाकडून उमरावगीर गोंसांवी व आनुपगीर गोंसांवी वगेरे फौज वीज हाजार परियेंत आले. त्यामुळें भिंडवाल्यास हिमत आली. आधी गडबडले होते, परंतु हे फौज आली हे ऐकोण शाबुतीने उतम प्रकारें लढले. समरूस गोळी लागली, परंतु जिवंत आहे. त्यावर जाटानी पांचच्यार सुरंग आणखी चालवले. त्यांत तीन सुरंग कारेगर जाले. हला करून भिंड जाटाने घेतली. तदनंतर फौज तेथेच आहे. भिंडचा बंदाबस्त करतात. कांही जाटाचे स्वार घेऊन गौरें[1] इद्रुखीस आले होते. काथ्याची गढी घेतली. काहारवाल्या राजास पत्रें आली कीं चाकरीस येणें. यांचा जाबसाल गेला कीं आम्ही आपले स्थळावर आहों. येथूनच जे चाकरी सांगाल ते करूं. राजा आपले शाबितीनें लढावयाचा सरंजाम करून आहे. नवाब सुज्यातदोला गंगा उतरणार, दिलीस जाणार. पातशहा तख्ती बसवून पातशाही बंदोबस्त करावा याच्या विचारांत आहेत.

+ येथून पुढील अक्षर खाशाचें. १ गौर = गवार = बंडखोर, पुंड.

विटाविर्यावर फौज आली होती, त्यानी दोड करून जाटाची जागा पेरोजाबाद आग्र्याआलीकडे बारा कोस आहे, सुकराबादेपासून पांच कोस आहे. विटाविया-पासून अठरा कोसाची दोड करून शहर मारले. जाटास तिकडेहि उपसर्ग लागला आहे. आटेर भिंड दोन्ही स्थळे मातबर गेली. कहार सेवटें इकडे यावयाची अवाई दाट आहे. या उपरी काये वर्तमान होईल ते पाहावे. आम्ही आपले ठाणियाची बंदोबस्ती उतम केली आहे. स्वामीचा प्रताप समर्थ आहे. इकडील चिंता न करावी. किसनसिंग जाट फौज घेऊन या प्रांती येणार हे आवाई दाट आहे. त्यामुळे रयेत गांवावर टरत नाही. आधीच गांव तमाम पळाले होते. आम्ही आलियावर दाहापाच गांवची रयेत बोलावून खातरी करून बसविले. आज भिंडेचे वर्तमान यैकोन फिरोन गडबडलें. कांही केल्या धीर पुरत नाही. जोतपार्त+ करावयाचे दिवस चालले. गलबा या रितीच्या. गुजरानी दुंडी मांडलीच आहे. यांचा उपद्रव भारी आहे. याचा मजकूर पूर्वी स्वामीस विनंती लिहिली आहे, त्याची आज्ञा अलिया त्याप्रमाणे पेरवी करून सेवेसी लिहूं. वरकड वर्तमान धन्याचे प्रतापें येथास्थित असे. बहुत काय लिहिणे, कृपेची वृद्धि करावी हे विज्ञापना. दिवाण ध्यानतराव सेंवढियाहून कूच करून जाटाकडे काल गेले. कळावे. उडिन्यास व महुमोहनीस आम्ही पत्रें लिहिलीं आहेत. आपले खबरदारीने ठाण्याचा बंदोबस्त करावा. बातमी खबर वरचेवर परस्पर लिहीत जावी म्हणोन त्यास लिहिले आहे. हे विज्ञापना.

¶*Apaji Mairal to Vishvasrao Lakshman describing the attack on Bhind led by the Jats. He also reports the intention of Shuja-ud-daula to go to Delhi and to administer the territory of the Emperor. The writer intimates how the whole rural population was terror-stricken on account of an impending attack by Kisansing Jat.*

No. 208] [*8-6-1768*

पो छ २३ मोहरम

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक आपाजी मैराळ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ २२ मोहरम दोन प्रहर परियेंत स्वामीचे कृपाकटाक्षें कुशलरूप जाणून स्वकीये कुशल लिहावयासी आज्ञा केली पाहिजे विसेष. भिंडेस माणसें दोन होती ते

+ लावणी.

आज आलीं. तिकडील वर्तमान भिंडेस दाहा सुरुंग लागले होते त्यांत च्यार नासले, साहा कारेगर ज़ाले. त्यानीं गढीच बसली. तेव्हां छत्रसाल याचे बहादरीनें आंतील लोक निघोन गेले. जाटाचे फौजेत सरदार दानसा व समरु व मोहकमसिंग वगैरे आहेत. त्यांचा सांडणीस्वार आपले माणसांचे रुबरू जवाहीरसिंगाकडे गेला की भिंड आम्ही घेतली. या उपरी आज्ञा होईल तरी काळपीकडे जाऊ. आण आज्ञा होईल तरी झासीकडे जाऊं. तिकडील जाबाची मार्गप्रतीक्षा आहे. गवार जाटाकडे चाकरीस हजर जाले आहेत. माहाराजासिंग जाऊन जाटाची भीड आणोन केथा व अमान दोही ठिकाणी ठाणी बसली. कांही भीड सांप्रत फौज तीन होत्या एक उमरीस व दुसरी नद्गुखीस तिसरी टोळी इद्रुखीस या प्रमाणे तीन टोळ्या त्रिस्थळी आहेत. खासा दानसा सडा भिंडेहून पलीकडे आटेरीस गेला. तिकडून जाटाचा बंधु रतनसा आला आहे. त्यास पुढें घ्यावयास गेले आहेत. रतनसा आटेर व भिंड या दोही स्थळास पाठविले आहेत. याप्रमाणे वर्तमान तहकीक माणसे लस्करांत होतीं, आपले दृष्टीने पाहून आली त्याप्रमाणे सेवेसी लिहिले आहे. गोहदवाला राण्याची भीड हजार प्यादा व तीनसे स्वार माधोराम सरदार आहे. एकूण गोहदवाले व गौर त्यास मिळाले आहेत. प्रांत भिंडेपासून दरोबस्त उद्वश जाला आहे. फौज दानसा बरोबर भारी आहे. वसि तोफा आहेत. जाटाचे खातरेत कोण्हीच नाहीं, आण त्याप्रमाणेंच आहे. त्यास कोण्ही सन्मुख व्हावयास नाही. कहारेस स्वार आले होते ते कहारवाल्यानें काढून दिले. लढायाचा सरंजाम करून आहेत. यांजस यावयाची मोठी धमक आहे. कनरगडाचाही बंदोबस्त करीत आहेत. सेवढे उज्याड जाले आहे. आम्ही आपले ठाणियाचा बंदोबस्त उत्तम प्रकारे केला आहे. भीड चांगली जमा केली आहे. याहीवर आम्हास प्यावयाचे प्रयोजन लागेल तेव्हां सेवसी लिहूं. तरी पत्र पावतांच आमची कुमक से दोनसे माणसें पाठऊन करावी. धणी समर्थ आहेत, तेथे कुमकीस कमी काय आहे? सेवेसी सूचना लिहिली आहे. भिंडेकडून माणसें आली हें सांगतात की गोसावी याची फौज व कोण्हीच आले नाहीं ते वर्तमान अवघे खोटे दिसतें. आमचे माणूस गोसावीयाचे लस्करांत गेले आहे, त्यास च्यार दिवस जाले अद्याप आले नाहीं. तस्मात विटवियाजवर फौज आली नाहीं. तिकडून जाब माणसें आलियावर तथ्य खबर सुज्यातदौलाकडील कळेल तेव्हां सेवेसी लिहूं. यानंतर या तिही टोळ्यात बातमीस माणसें आहेतच. जैसे जैसे वर्तमान येत जाईल तैसे सेवेसी लिहूं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Appaji Mairal reports to Vishvasrao Lakshman inroads of the Jats into the Maratha possessions of Bhind and others in Bundelkhand.*

4342

No. 209] *[9-6-1768*

पौ छ २९ मोहरम
सन तिसा सितैन

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक अपाजी मैराल कृतानेक सां नमस्कार विज्ञापना ताा छ २३ मोहरम मुकाम दभुवा साहेबाचे प्रतापे कुशलरूप जाणोन स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. गुजरानी या परगण्यात मोठी धूम मांडली आहे. स्वार प्यादे येऊन गावास उपसर्ग देतात. गाडे पाठऊन लाकडे भरून नेतात. इतके दिवस नदी उतरोन आलीकडे येत नव्हते. काल वीस पंचवीस गाड्या व शंभर प्यादे येऊन परेछास सरकारचा बाग आहे तेथील बोरी तोडून बागाची तसनस केली. तेथील माळी रडत अला व गांवकरी यांणींही खंगोर[१] पाठविला. त्यावरून येथून शंभर तुबकदार[२] पाठविले त्यांची कार्यसिधि होऊन गाडे जोतून[३] जात होते तो आपली भीड[४] पोहचली. त्याणी गाडे पाठीसी देऊन पुढें लढाईस उभे राहिले. आपली भीड भारी देखून गाड्याचे बैल सोडून नेऊ लागले. गाडे टाकोण दिले. तेथे तरवार चालली. दोन सिपाई गुजराकडील ठार पडले. कांही जखमी जाले. आपलीकडील एक जमातदार जखमी आहे. दोघे ठार पडताच गुजराची भीड निघाली. आपले लोकांनी बैल वळोन आणले. कांही बैल पळोन गेले. वीस बैल येथे आणले. बैल चांगले आहेत. बिसुनासिंगाचे घरू[५] आहित. या दहशतीमुळें तमाम नदीअलीकडील पलीकडील गांव पळोन येथे आले व येथीलहि लोक पळून गेले, ऐसी त्यांची दहशत. असो जे जाले ते उत्तम जाले. यावर त्याचे पत्र आले अथवा कोणी भला माणूस आला तरी बैल द्यावे लागतील इतकाच नक्ष जाला. भय दाखऊन प्रीति संपादावी. याउपरी त्यांचा उपसर्ग फारसा होणार नाहीं. जाले वर्तमान सेवेसी लिहिले आहे. जाटाचे फौजेचे वर्तमान पयदरपय[६] सेवेसी लिहिले आहे त्यावरून ध्यानास आले असेल. सांप्रत इद्रुखीस जमाव आहे. काहारेस येणार. आज वर्तमान आलियावर सेवेसी लिहूं. यावर भीमसेन जमातदार खानदेशी जमातसुधां येथे आहे, यासी आज्ञापत्र सादर करावें की आपाजीपंताजवळ राहून ते सांगतील त्याचे आज्ञेप्रमाणें चाकरी कर्णे, याप्रमाणे जरूर चिठी लिहिली पाहिजे. येविसी कालहि विज्ञापना

---

१ खंगार = जळकी वीट, लक्षणेनें लाचारी. २ तुबक–बंदूख, बंदूकवाले. ३ जोडून. ४ जमाव. ५ घराऊ, घरच. ६ वारंवार.

4343

लिहिली आहे कळावें. मल्हारनगरचे ग्रहस्थ स्थळ सोडून अन्यत्र स्थळीं गंतव्य केले म्हणोन रात्रौ ऐकिले. त्याचे शोधास माणूस पाठविले आहे. सत्य मिथ्या वर्तमान आलियावर लिहून पाठऊ. वरकड वर्तमान स्वामीचे कृपाकटाक्षे यथास्थित असे. स्वामींनी आपले साद्यंत सेवकास लिहून कृपोतरी तोषवावे. बहुत काय लिहिणे कृपेची वृधि करावी हे विज्ञापना.

माहाराजांचे सेवेसी आज्ञांकित शामराव नीळकंठ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. साहेबांचे प्रतापे ठाणे मजकुरी आनंदरूप असो. निरंतर आज्ञापत्रीं सेवकास. तोषवावें सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Appaji Mairal reports disturbances created by the Gujars in the district of Dabhuva.*

No. 210] [*11-6-1768*

पौ छ २७ मोहरम

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक आपाजी मैराल कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ताा छ २५ मोहरम अडीच प्रहर दिवसपरियेंत स्वामीचे प्रतापें कुशलरूप जाणोन स्वकीये कुशल लेखनज्ञा केली पाहिजे विशेष. आज बिसुनसिंग गुजर स्वार होऊन फत्तेपुरास गेला. जाटाकडे जातो. दीडदोनसे स्वार व तीनसेपरियेंत बरकंदाज समागमे आहेत. कळावें. आज रा नानाजीपंत वगैरे मंडळी येथे आली. येथपरियेंत सुखरूप पावले. उदईक मऊस जातील. आम्ही रुपसा चोधऱ्यास बोलावून आणले होतें व येसाजीपंतासहि पत्र लिहिले होतें की तुम्ही सरकारचे लोक आले होते त्यांस गढीत न घेतले, गोळी वाजविली हे उतम न केले. असो. याउपरी खावंदासी रुजू होऊन ठाणे गढीत घेऊन आपला हिसेब दाखवून वाजवी रुा यानी घेतला तो सरकारांत मागावा, सरकार देईल परंतु हे गोष्ट तुम्हापासून काही न जावी. त्यावर त्याणीं लिहिलें की आमचा हिसेब पाहून रुपये देवावे. मी ठाणें खालीं करून देतो. तूर्त सिबंदीच्या कैद्यांत मी आहे येसे कितेक प्रकारें लिहिले होते. त्यानंतर आज हे आले. बाळकृष्णपंत आले. याची व त्याची भेट करवून गढीतहि प्रवेश होईल. वरकड वर्तमान येथास्थित असे. जाटाचे बातमीचे पत्र प्रात:काली सेवेसी लिहिले आहे त्यावरून ध्यानास येईल. स्वामीची आज्ञा आली की वरचेवर जाटाची खबर उडीना व महु येथे पाववीत जाणे. त्यास आज्ञेप्रमाणे वरचेवर त्यांस वर्तमान लिहित आसों. त्यावर

गोसांवी पंधरा हाजार फौज घेऊन आले होते. आग्रयास जाऊन बेगम तेथें होती ते वर्तमान स्वामीस विदितच आहे. तीस घेऊन गेले. गोसांवी यांचा ऐवज तेथें होता तो घेऊन गेले. पंधरा उंट खजाना वगैरे घेऊन गेले. हे वर्तमान आगऱ्याकडून शिपाई आले त्याणी सांगितले त्यावरून सेवेसी लिहिले असे. सत्यमिथ्या ईश्वर जाणे. गोसावी फिरोन माघारे गेले हे वर्तमान सत्य. याउपरी जाटाची फौज निश्चयेरूप या प्रांती येणार. सांप्रत जाटाचे खातरेत काल्पी, झाशी, ग्वालेर हे किले काहीच नाहीत. गर्व बहुत धरला आहे. ईश्वर गर्वाचे परमार्जन करणार समर्थ आहे. वरकड वर्तमान खावंदाचे कृपेनें येथास्थित असे. बहुत काय लिंहिणे कृपेची वृद्धि करावी हे विज्ञाप्ति.

¶*Appaji Mairal writes to Vishvasrao Lakshman, supplying him with news about the trouble created by the Jats.*

No. 211] *[16-6-1768 ?*

पौ छ १ सफर

श्री

विज्ञापना येथील वर्तमान छ ३० मोहरम गुरुवार प्रहर रात्र मागील मुा भांडर स्वाम प्रतापे यथास्थित असे. जाटाकटील वगैरे बातमी अगोधर दोनतीन वर्तमाने आली परंतु एकहि तथ्य न पडे म्हणोन सेवेसी न लिहिले ? सांप्रत दभवी याचें पत्र रातोरात बिल्हेटीसं आले ते बजिनस पाा आहे त्याजवरून कळेल. गढीस जाजती माणसे पाा. आज्ञा कर्तव्य ते करावी. मरजी खावंदाची. दारू-गोळी वगैरे साहित्यही पाहिजे. कळावें बहुत काय लिहिणें हे विज्ञाप्ति. भांडेरहि अगोधरच उज्याड जाहली, काजी पटा सर्व पळोन गेला. त्याचा भरवसा होता. त्याचा प्रकार तूर्त तैसा. येथें राहणे तर माणसे नाकेबंदीस व बातमीस पाा त्याची काय आज्ञा? जैसी आज्ञा तैसे केले जाईल. हे विज्ञाप्ति.

¶*The writer sends news about the Jats at Bhander.*

No. 212] *[25-6-1768*

पौ छ १० सफर

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब
स्वामीचे शेवेसी

सेवक गणेश माहादेव व बाजी विठल कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन आपले कृपेकरून क्षेमरूप असो विशेष.

राजश्री गोपाल राऊ गणेश याची फौज इकडे येऊन तांडवच्या नाल्यावर मुकाम केला आहे. मौजे बामरोलीचीं पेवें वगैरे वस्तभाव नेली, आणिक येक दोन गांव लुटून गेले. छ ९ सफर मंदवारी मुकाम मजकुरीं येऊन याप्रमाणें लूट-मार केली. पुढें काये करितात हें कलत नाहीं. सेवेसी श्रुत होये. यानंतर मौजे पाहाडगाव येलचेकडील त्यास मौहकमसिंग माधवसिंगाचा भाऊ हा येऊन बिसनसिंगाची वगैरे भीड समागमें आणून मौजे मजकुरीं मोर्चे लाविले आहेत. बजिनस पत्र आलें यास्तव शेवेसी लिहिलें असे. बातमी मिथ्या नाहीं. पाहाडगांव व सेरसा व पुछ याजवर फार दांत आहे. उंपद्रव करउतां चुकत नाहींत. सांप्रत पाहाडगांवास लागले आहेत. काय होईल तें पहावें. आपली खासा स्वारी अथवा फौजच येऊन मोर्चे उठऊन दिल्ह्यास उत्तम आहे. या उपरि धन्यांचे मर्जीस येईल तें खरें. आपण न यावे. स्वारी पाठऊन मोर्च्ये उठवावे. उपराळा न जाला तर पाहाडगांव घेतात, यांत संशय नाहीं. पाहाडगाव त्याजला मिलाल्यास सेरस यास उपद्रव देतील. आम्ही खबरदारी करावयाची ते केलीच आहे; परंतु आपला उपराळा जाला पाहिजे, याजकरितां विनंती लिहिली असे. जाटाच्या लस्करची बातमी आजी शनवारीं आली. फौज परावरांवर आहे. फत्तेपूरचा खंड जाला, तूर्त तीन हाजार रुपये घेतले. माधव गुजर त्यांजपासींच आहे. आमचे माणूस पाहून आले; दोन च्यार हजार फौज आणून ठाणी घ्यावीं या मतलबास गेला. जाटानी यांजला आश्वासन दिल्हे कीं फौज देतों, त्या आश्रयावर पाहाडगांवास लागला आसे. सारांश फौज पाठऊन मोर्चे उठऊन द्यावे, म्हणिजे दबाव पडोन दुसरा उपद्रव लागणार नाहीं, सेवेसीं कलावें. बहुत काय लिहिणें. राजश्री गंगाधरपंत सैदाच्या कोठड्यास आहेत. कृपा वृधीतें पावीजे हे विनंती.

¶*Ganesh Mahadeo and Baji Vithal give news about the raids effected by Gopalrao Ganesh, Muhkamsing and the Jat and ask Vishvasrao Lakshman to take measures to repel them.*

No. 213] [*28-6-1768*

पौ छ २२ सफर सन
तिसा
आषाढ

श्री

सेवेसी रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ १२ सफर मुकाम आनंदवल्ली वर्तमान येथास्थित असें विशेष

तालुके पटा येथील च्यार किल्ले राजश्री रामचंद्र नारायण यांजकडे होते ते मशारनिलेनीं श्रीमंत राजश्री दादासाहेब यांच्या आज्ञेप्रमाणें आमच्या हवालीं केलें. कोणे गोष्टीविषयीं दिकत घेतली नाहीं. मशारनिल्हेस लोकांनीं तलबेकरितां आडविले याजकरितां तूर्त आम्ही रुपये ३५०० साडे तीन हजार दिल्हे आहेत. मशारनिले स्वामीच्या पदरचे आहेत. सेवेसी येऊन विनंती करितां अवगत होईल. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶*Ramchandra Ganesh and Visaji Biniwale report that they have taken charge of forts in Taluka Pata from Ramchandra Narayan.*

No. 213A] *[30-6-1768*

· छ १४ सफर तिसा आषाढ सनदा लिहिणें.

श्री

याद तालुके मोल्हेर तीर्थस्वरुप राजश्री दादासाहेबांकडे होता तो हाली सरकारांतून रा। लक्षुमण विश्वनाथ याकडे सांगितला असे. सुा तिसा शितैन मया व अलफ किले बितपशिल.

१ मोल्हेर

१ चौलेर

१ न्हावा

१ पिसोला

१ भामेर

१ देहेर

६

येकूण साहा किले देखील किल्याचे जाहागिरी सुधा माारनिलेकडे सांगितले असत. यांचे हवाली करणे म्हणोन सनदा.

१ रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण

१ सर्वोत्तम शंकर व दिनकर माहादेव

२

दोन सनदा व मारनिलेचे नावाची यक यकूण तीन देणे.

येविशी जमीदारास पत्रें
१ जाहागीर किले मोल्हेर साल्हेर
१ जाहागीर किले न्हावा पिसोला
१ जाहागीर किले देहेर
——
३
तीन पत्रें अमल सुरलीत देणे म्हणोन +देणे.

सदरहू तालुक्याची मजमू व दिवाणगी धोंडो गोविंद यांस सांगितली असे. यांचे हातून कामकाज घेऊन चाकरी घेत जाणे. तैनात पेस्तर करार केली जाईल म्हणोन सनद देणे+.

¶*The Peshwa Madhavrao transfers the administration of some forts released by Raghunathrao to Lakshman Vishvanath and issues sanads to that effect.*

No. 214] [*13-8-1768*

पौ छ १७ जावल तिसा

श्री

**श्रीमंत राजश्री पंतप्राधान स्वामी
चे सेवेसी**

विनंती शेवक विश्वसराव लक्ष्मण कृतानेक सास्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ २९ रावल मु झांसी स्वामीच्या कृपाकटाक्षें वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीनी कृपाळु होऊन आज्ञापत्र शेवकास सादर केले ते उतमसमई पावोन सिरसा वंदिले. तेथे आज्ञा जे सालगुदस्त सन समान च्यार सदे पौ बाकी यैवज येणे राहिला तो पाठऊन देणे व वरातदारांचा बोभाट आहे तोहि यैवज पावता करणे. साल मार सन तिसा च्यार सदेचा ठहराव करून घेऊन भरणां करावयासी कारकून पाठवणे यैसी आज्ञा जाहाली. त्यास बाकीचा यैवज सेवेसी या पूर्वीच प्रविष्ट केला असता, परंतु इकडील प्रसंग आट आदीकरून शत्रूच्या दंग्याकरितां कठिण पडला, स्वस्थता नाहीं, यामुळें किले व ठाणी व मुलुकाचे संरक्षण करितां प्रयास मातबर. फौजा या प्रांती नाहीत यामुले प्रांतातील पैका सुरलीत येऊ पावला नाहीं. रुपयांची वोढ विशेष पडली यास्तव सेवेसी

+ ही सर्व याद नाना फडणिसाच्या हातची असून शेवटचा 'देणें' हा शब्द खुद्द माधवरावाच्या हातचा आहे.

यैवज न पावला. वरातदारांचाहि यैवज शेष बाकी या प्रकाराकरितांच राहिला. येथील प्रसंग ल्याहावा असा आर्थ नाहीं. संकटावर संकटेच प्राप्त, उपाय कोणता करावा? तशांत राजश्री गोपालराव गणेश आले, याणी मुलुकाची खराबी बहुत केली तो विस्तार कोठपर्यंत ल्याहावा? या प्रकारें दंगा गतवर्षापासून आजपर्यंत पुरवला. शेवकापासून जेथपावेतो बंदोबस्त होऊन आला त्यासी अंतर केले नाहीं. मोठ्या अरिष्टास येत्न नसे. येविसीचे साद्यंत सेवेसी पहिल्यापासून गोविंद रघुनाथ व हरि चिंतामण निवेदन करीत गेले आहेत. साल मारच्या रसदेविसी आज्ञा जाहाली, त्यास येथून कारकून शेवेसी पाठविले आहेत. सत्वरच पोहचतील. कितेक विज्ञापना करावयाची ते निवेदन करून खावंदाची आज्ञा होईल त्याप्रो वर्तणूक करितील. मुख्य अर्थ स्वामीनी शेवकावर कृपालु होऊन इकडील प्रसंगानरूप रसदेची आज्ञा करून ठहराव करून देविला पाहिजे. त्या प्रो यैवज शेवेसी हफ्तेबंदीप्रो प्रविष्ट करून देऊ. बाकीच्या यैवजाचा भरणा करावयासी कारकुनासी सांगितले आहे तोहि यैवज भरतील. वरातदारांची कबजे कारकुनाबराबर पाठविली आहेत. शेवेसी प्रविष्ट होतील. सर्व प्रकारे शेवकाची निष्ठा स्वामीचरणा सिवाय नाही. कितेक विनंती करणे ते शेवेसी उभयता वकील करितां विदित होईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Vishvasrao Lakshman explains to the Peshwa his difficulties in realizing the estimated revenue of his districts.*

No. 215] [*23-9-1768?*

स्वदस्तुर खुाची नकल छ ११ जमादिलावल

श्रीमसुदा

स्वामीचे कृपालु होऊन स्वहस्ताक्षरें शेवकास आज्ञापत्र लेखन केले ते सुसमई सादर होऊन सिरसा वंदिले. बहुत आनंद जाला. रसदेचा करार सरकारातून करून दिल्हाच आहे. विजयादशमीच्या मुहुर्तें डेरा दाखल होऊन खास स्वारी हिंदुस्थानांत सत्वर येणार, हरामजादगी करीत असतील त्याचे पारपत्य केले जाईल, तुम्ही खातरजमा राहोन आमल करणे म्हणोन आभयेयुक्त आज्ञा. यैसियासी मामलियेतीचे वृत्त तरी स्वामीची आज्ञा घेऊन झासीस आलो, मामलियेतीचे हार्द पाहतां भदावर कछवाधार दोनी प्रांत गेले. त्यामुळे मुल्क हलका राहिला. तोहि उभयतां सरदाराच्या फौजा झासी घ्यावयास मिळाल्या होत्या तेव्हां आगदीच बेचिराख जाहला. त्याची लावणी व्हावी यानिमित्य

बीजेखवाई[1] देऊन लावणी केली. तथापि आकार पहाता जमेपेक्षा खर्च भारी. त्याहीमध्यें जाटाच्या दंग्यामुळे मुलकाची खराबीच होत आली. खासा जवाहीरमल जाट आला तेव्हां राजश्री बाळाजी गोविंद याजकडून काल्पी वगैरे मुलुक गेला. तसाच या मामलियापैकी दतिया शेवट याचे वाटणीपैकी माहाल ठाण्यासुधा गेले. दंग्यामुळे जाजती सिबंदी व जकिरा करावा लागला हाहि खर्च भारी पडला. दुसरे सालगुदस्ता कमाविसदाराकडून तीर्थस्वरूप राजश्री नारोपंत नाना याणी रदकर्जाचे येवजी वसूल घेतला यामुळे कर्जे वगैरे काढून फौजेस वगैरे खर्च करावा येवंच सालगुदस्ताचे हिसेबी फाजील पडले आणि येथील प्रसंग तरी जाटानें व्यापिलें व उपराळ्यास सरदाराची उपेक्षा. येशा संकटातहि आज्ञेचे सरक्षण करावे, पुढे निभावणी करणार धणीच आहेत, हे जाणोन राजश्री गोविंद रघुनाथ याजला लिहिले आहे. त्यास माानी रसदेविसी आर्ज करितील ते ध्यानारूड करून शेवकाचा तराणोपाय होये ते करणार स्वामी खावंद आहेत. वगवसील स्वामीचे पायाखेरीज दुसरा नाही. खासा स्वारी हिंदुस्थानात आलियावर सरकारचा मुल्क राहोन राजेरजवाडे सरकारात खंडण्या देतील. सरकाराची फौज आल्याखेरीज प्रांतातील आमल राहाणार नाही. चहूकडून रजवाड्यानी व जाटानीं व्याप्त केले आहे. तथापि गेली ठाणी सोडवाल याचे प्रयेत्नास व किले ठाणी याचे संरक्षणास आर्थेप्राणे सेवककाडोन अंतर होणार नाही. सर्व प्रकारें सेवकाचे संकट परिहार करून पालण करणार धनी समर्थ आहे.

¶*Vishvasrao Lakshman reports the serious situation in the North resulting from the inroads of the Jats.*

No. 216] [*22-10-1768?*

श्री

राजश्री हैबतराव मुलिक
गोसावी यांस

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो विसाजी कृष्ण आसीर्वाद सुाा तिसा सितेन मया व अलफ. आमचा कार्तिक श्रुध्ध चतुर्थी रविवारचा मुकाम रांजण-

---

१ बीज व खावटी, पेरायला व खाण्याला धान्य.

गांवचा आहें. तेथून दुसरे दिवसी सोमवारी कूच करून मजल दरमजल पुढे जाणार आहों. तुम्हीं सामानसुधां तयार व्हावें. रविवारीं रांजणगावचे मुकामी येणें. घडीचा दिरंग न करणें पत्र पावतांच येणें. याजउपरि विलंब लाविल्यास कार्यास येणार नाहीं जाणिजे. छ १० जमादिलाकर बहुत काय लिहिणें.

श्रीसिद्धेश्वर-
चरणीं तत्पर
विसाजी कृष्ण
निरंतर

मोर्तब
सुद.

¶*Visaji Krishna on his way to the North orders Haibatrao Mulik to join his army without delay.*

No. 217] [*12-11-1768*

पौा छ १ रजब

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब
स्वामीचे सेवेसी

विगंती सेवक आपाजी मैराळ, कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ ६ जमादिलाकरपावेतो मुक्काम कसबे विजपूर स्वामींचे कृपाकटाक्षें आनंदरूप जाणोन स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. इकडे गुजरानें गांवगांव माणसें पाठऊन गांवास उपद्रव माडला. यास्तव आम्हीं मऊकडून येथें आलों असों; यावर जाठाची फौज भिंडेस आली. तें वर्तमान पूर्वी सेवेसी लिहिले होतें, त्याजवरून ध्यानास आलें असेल. हाल्लीं हजार स्वार इंद्रुखसि आले, पुढें कहारेस येणार त्या दहशतीनें चहूंकडे चौघे लबाडीस प्रवर्तले आहेत. त्यास कृपावंत होऊन राजश्री भाऊंची रवानगी इकडे सत्वर केली पाहिजे. विनाफौजेखेरीज इकडे बंदोबस्त नाहीं. दतियेवाल्यानीं गांव दाबले आहेत. गुजर गडबड करीतच आहेत. सांप्रत जाठांचेहि सर्वांस वारें लागलें आहे. तरी भाऊंस

सत्वर पाठवावें. कंचे कपेवर पैसा घेतला पाहिजे. परभारें वसूल चालला त्यास येक दोन वेळ सेवेसी विज्ञापना लिहिली. याउपरी क्षेपनिक्षेप फौज पाठवावी. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

¶*Appaji Mairal solicits succour from Vishvasrao Lakshman in order to check the activities of local jamindars and the Jats.*

No. 218] [*19-11-1768?*

पो छ १२ रजब

श्री

श्रियाविराजित राजमान्य राजश्री
आपा स्वामींचे सेवेसी

पोष्य सदासिव बलाल कृतानेक सां नमस्कार विनंती येथील कुशल ताा कार्तिक सुध १० माा सिरसा येथे आसो विशेष. आपले येणे झासीस जाले यैसे यैकोन परम हर्ष जाला तो श्री जाणे. येथील वर्तमान तपसिले पूर्वी श्रीमंताचे पत्री लिाा आहे व हलीचे पत्री लिाा आहे त्यावरून विदित होईल. कल्याणाने बहुतच सरकारी जागियासी कजिया आरंभिला आहे. सिरसा व गिदोसा दोनी गाव जाळिले. लुटिले. अकरासे दरगावी रुाा दंड घेतले. आशाढ मासी गुरे नेली ते सोडिली नाहीत. आमखेड्यात व बंगल्यात सालमारी जमीन दाबली. शंभर रुपयाची खरीपाची सिवाये उजारी पेरली आहे, जमीन पंच्याहतर बिघे या प्राा करून सांप्रत दंडिली आरंभिली आहे. आम्हांपासी फौज नाही जे त्याचे पारपत्य करावे. त्याची पत्रे आली त्याची नकल व असेल+ पेसजी पाा होती व हली राजश्री गंगाधरपंताचे पत्र आणून त्यास पाा त्याची नकल पाा आहे. स्वामी आले आतां आम्ही काळजी करीत नाही. त्याचे पारपत्य आपण करितील. तूर्त अमल बंद जाला आहे. भीडा जमा करितो. आमखेड्यात येऊन अर्धा कोसावर राहिला आहे. शंभर स्वार आहेत, माणूस चारसे आहे. कलावें विदित जालें पाहिजे. हगामात हा दंगा केला आहे. हरामखोर जाट रोहिला हाच आहे. फतेपुरास आम्ही पत्र भीडेकरिता राजश्री जनार्दनपंत आपास लिाा त्यांचे उत्तर आले ते पाा आहे, त्यावरून विदित होईल. कृपा लोभ असो दिजे हे विनंती.

\+ अस्सल.

राजश्री यादोराव भाऊ स्वामीस सां. नमस्कार. सविस्तर येजमानाचे व राजश्री आपांचे पत्री लिा आहे त्यावरून कलेल. आपण वराता केल्या, काम चालीस लागले तो हा प्रकार यैसा जाला. कलावे लोभ असो दिजे हे विनंती. पत्राचा मार्ग पाहतो हे विनंती.

¶[*Sadashiv Ballal complains to Appa about the marauding activities of Kalyan in the districts belonging to the Peshwa. Yado Rao Bhau is mentioned above in letter No. 173.*

No. 219] [*25-11-1768 ?*

पो छ २८ रजब कार्तिक

श्री

राजश्री रामचंद्रपंत गोसावी यांसी

ℒ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित तुकोजी होलकर दंडवत विनंति उपरी. येथिल कुशेल जाणून स्वकीय लेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले ते पावोन लेखनान्वये अवगत जाला. सांप्रत आपलेकडून पत्र येऊन वर्तमान कलत नाहीं. प्रस्तुत मुक्काम कोठे, नर्मदातीरी कधी जाणार, आम्हीही कार्तिक पोर्णिमेस गंगा उतरोन दरमजल येत असो. आमची भेटी जालियावरी हिंदुस्थानांतील मातबर मनसबे राजकारणे कर्तव्य ते आपले आमचे विचारे होतील, तिकडील नवल विशेष वर्तमान आले आसेल ते ल्याहावे म्हणोन लिहिले. यैसियासी आम्ही वाफगांवीहून स्वार जालियावरी श्रीतुलजापूर दर्शनास गेलो. तिकडून परभारे खेपार जावे, परंतु राजश्री नारो शंकर याजकडील इंद्राईकर किल्लेदारानीं चांदवडाआसपास गडबड केली होती त्यामुळें फिरून तेथें येणे लागले.[1] तेथील बंदोबस्ताकरितां कांहीं मुक्काम ते स्थली होते. तद्नंतर कूच करून दरमजल थालनेरपर्यंत येऊन दाखल जालो. फौजहि जमा जाली. राहिलीसाहिली येत आहे. आठा चोरोजांत लोक सर्व जमा होतील. येथून लौकरीच महेश्वरी जातो. तेथून तीर्थरूप मातुश्री बाईची भेटी घेऊन पलीकडे मालवे प्रांतीं जावयाचे करितो. तोपावेतो आपणहि येतील. आपली आमची भेटी जालियावरी हिंदुस्थानांतून उचित मनसबे तेच योजना होईल. तिकडील राजेरजवाडे यानीं आपलाले जागा जमाव करून मजबूद आहेत.

---

१ शिक्का तुकोजीचा येथें आहे.

तिकडे गेल्यावरी ज्यानी जैशा वर्तणुकी केल्या आस्तील ते आपलाले आचरणा-(न)रूप फलही श्रीसतेने पावतील. सर्वदा पत्रीं संतोषवीत असावे. रवाना छ १४ माहे रजब बहुत काय लिहिणे हे विनंति.

मोर्तब
सुद.

¶*Tukoji Holkar to Ramchandra Ganesh: writes that he would soon be marching to take up his command in the North.*

No. 220] [*5-12-1768*

छ २६ रजब सन
तिसा

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब
स्वामीचे शेवशीं

विनंति सेवक आपाजी मैराळ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. कार्तिक वा। १२ इंदुवासरपरियेंत स्वामीचे प्रतापें दभुवियांत कुशलरूप जाणोन स्वकीये निजानंदलेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. इकडील वर्तमान राजश्री गंगाधर गोविंद सुपें कछोरकर बुणग्यांत होते. सडी फौज पुढें एक मजल होती. गौराचे गांव मेहरा वगैरे जाळले लुटले. त्यासी परस्परें गांवांतून लढाया जाल्या. त्यावर गौरानी जमाव केला. दोन हाजार फौज जाटाची इदरुखीस आली. वरकडहि हजारबारासें जमा जाले आहेत. तीन हजार परियेंत इंदरुखीस जमाव जाला, त्यामुळें गंगाधरपंत बुणग्यासुद्धां माघारे कोचेस आले. सडी फौज पुढें आहे. पहावें; त्यांचा यांचा मुकाबला[१] होईल किंवा मोघमच राहातील. मुकाबला होऊन परमेश्वरें यांसी येश दिल्हिया उत्तम आहे. कदांचित माघारे पाय दिल्हा तरी मोठे कठिण आहे. गवार गर्दी करावयास चुकणार नाहींत. इतक्याच वर्तमानेंकरून तमाम हरामखोरांच्या नजरा फिरल्या. गुजराचे गांव प्यादे स्वार येऊन धूम करितात. महते(?)धरून नेतात. यैसा विचार

---

१ युद्ध, लढाई, झुंज.

आहे. आपल्यास वर्तमान कळावें म्हणोन लिहिलें असे. महाराजांचे प्रतापें सर्व अरिष्टें निर्शण होतील. गकारपूर्वक माघारे आले, येणेकरून फार गडबड आहे. आपलीकडील गढ्याचा बंदोबस्त येथास्तित आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति.

¶*Appaji Mairal's letter describing how the Jat's activities against the Marathas encourage local tribes, such as the Gujars and Gavars, to rise against Maratha rule.*

No. 221] [*6-12-1768*

नकल

श्री

चिरंजीव राजमान्य राजश्री नारायणराव बल्लाळ यासी माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणे विशेष. पा। नेवासे पा। देहे बितपसील

२ सखुबाई सिंदी याजकडे सरंजामास देहे
 १ मौजे वाघाली दरोबस्त
 १ मनेरे चिंचोली जागिरीचा आमल
 —
 २

३ भागिर्थीबाई व सगुणाबाई सिंदी यांजकडे
 १ मौजे करंदी दरोबस्त.
 १ मौजे भाके जागिरीचा आमल
 १ मौजे दडगाव स्वराज्याचा आमल
 खा। जागीर करून
 —
 ३

—
५

येकूण पाच गाव येथील सदरहू आमल सरंजामास चालत आहे. त्याची जप्ती सालमारी सरकारात करून कमावीस तुम्हास सांगितली असे. तरी पाच गावचा आमल सदरहू लिहिल्याप्रमाणे चौकसीने करून कचा आकार होईल तो सरकारात पावता करून जाब घेणे. जाणिजे छ २९ रजब सु॥ तिसा सितैन मया व आलफ बहुत काय लिहीणे हे आसीर्वाद.

¶*The Peshwa orders the confiscation of villages assigned to the ladies of the Sindia family and makes them over to his brother.*

No. 222] *[21-12-1768*

पौ छ १३ साबान सन तिसा.

श्रीगजानन

श्रीमंत राजश्री राऊसाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक आपाजी मैराळ, विज्ञापना. येथील वृत्त तागायत छ ११ साबान गुरुवासर ठाणें दभुवा कुशलरूप असो विशेष. आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. तेथं आज्ञा जे:—सिंदे, होळकर उज्जनीस आले. लौकरीच या प्रांतासी येणार. सर्व बंदोबस्त करून दिल्हा जाईल म्हणोन आज्ञापिलें, उत्तम असे. इकडील वर्तमान तरी जाठाची फौज इंदुरखी आलीकडे पार होऊन आली. कहारेहून दोन कोसावर गोपालपूरचे बडेगाऊ म्हणोन आहे तेथें आली. राजश्री गंगाधरपंताचा जाठाचा कोसाचा तफावत आहे. जाठाचा गंगाधरपंताचा सलूक एकदोन रोजांत होणार. जाठाचे वकील गंगाधरपंताचेथें आहेत. गंगाधरपंताचे वकील जाठाचे लष्करांत आहे. भानगड लागली आहे. सलूक लौकरीच होईल. दुसरें वर्तमान ऐकितों जे, बाळाजी गोविंद यांचा सलूक जाठांनीं केल्यावरी झांसीच्या मुलकांत धामधूम करावी हा मसनबा आहे म्हणोन ऐकितों. सत्यमिथ्य न कळे. दभुव्याहून जाठाची फौज सहा कोसावरी आहे. जाठाच्या दहशेतीनें झाडून गांव उज्याड जाले. एक गांवांत वस्ती राहिली नाहीं. तेव्हां रुपया पैसा वसूल होणें कळतच आहे. आम्ही ठाण्याठाणेचा बंदोबस्त केला आहे. नवीन शिबंदी ठेविली असे. माणसें बातमीस पाठवि(ली) आहेत. वर्तमान आलियावरी सेवेसी लिहून पाठऊं. फौज पांच सहा कोसावरी आहे. कोणे वेळेसी काये होईल न कळे. आमची खबर बखर घेत जावी. बहुत काय लिहिणें कृपा लोभ असो द्यावी हे विज्ञाप्ति.

¶*Appaji Mairal reports from Dabhuva the aggressive activities of the Jats in the vicinity of his district and the conciliatory attitude entertained by Balaji and Gangadhar Govind.*

No. 223] *[30-12-1768*

पौ छ २२ साबान सन तिसा.

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री रावजी स्वामीचे सेवेसी.

पोष्य सदासिव बलाल सां नमस्कार विनंती उपरी येथील क्षेम ताा छ २० साबान मो दरावर येथे राजश्री गंगाधरपंत बाबा याचे लस्करात आसो विशेष. आपले आज्ञेवरून येथे आलो त्यास च्यार रोज येथे होते. रूपराम कटोर याचे

पत्र व राजश्री गंगाधरपंत बाबाचे पत्र येसी दोनी पत्रे आपण पा। त्यास रूपराम तो आगोदर येक रोज काथाबोहत येथे गेला. त्यास समागमे राजश्री आपाजी लक्षुमण यास घेऊन गेला जे दानसाजवल ठहराऊ. त्यास त्याजकडे पत्र स्वामीचे पारसी पा। आहे. उतर आले नाही. जाटानी तमाम गांवगना स्वार पांच पांच पा। आहेत जे पोली वेऊन येणे. आमलात बखेडा केला होता. आमचे गावीहि स्वार आले होते. उठवावे तरी तहात तफावत पडेल व जाटाची फौज काथ्यावर पडली होती त्यास आजी छ मा।री दानसा कूच करून इंदुखीस गेला. समागमे आपाजीपंत यास रूपराम घेऊन गेला आहे. ठहराव आद्याप जाला नाहीं, परंतु सेंध नदीची हद ठरेल येसे दिसते. दुसरे वर्तमान त्याचे आहे जे रा। गिरमाजीपंत यास कछवाधार येथे ठेवावे, तहसील त्याणी कछवाधारची करावी. रा। आपाजीपंतास रूपरामाने घेऊन भरथपुरास जावे, तेथे ठहरेल त्याप्रा। त्याणी याणी चालावे, याप्रा। रूपराम करार करून गेला आहे निर्वेध जाले नाही. दुसरे वर्तमान उठले आहे जे नजीबखान व सीख यांची लडाई जाली. नजीबखान मोडिला येसे वर्तमान आहे. दानसाहि सडा भरथपुरास जाणार येसे वर्तमान आहे, पाहावे. फौज इंदुखी व भिंड येथे सोडून जाणार. आगोधर स्वामीस पत्रे लि।। त्याच दिवसी जाटाचे स्वार गावगना आले. त्याच दिवसी आम्ही लस्करात रात्री आलो. त्यास येथील वर्तमानासाठी पत्रे न पाठविली. हे वर्तमान याप्रा। जाल्याचे लि।। आहे. आम्ही उदईक सुक्रवारी सिरशास जातो. स्वार त्याचे उठवितो. जेथवर पैसा उगवेल तेथवर उगऊन स्वारास देतो. आजपर्यंत जाट व रामपुरेवाला पुरविला आहे. आमचा आपराध नाही. स्वार कजिया करितील तरी काम सरकारचे नासेल. त्यास पत्र साफ लिहावे जे जो पैसा उगवेल तो घेणे. रोजमरेयाविसी व बराताविसी कजिया न करणे. जर काम करून देतील तरी उठोन येतो. बेआबरूचे आम्ही सोसणार नाही. सरकारी काम होईल ते करून देऊ, बिगाड करणार नाही. फतेपुरास राजा रघुनाथसिंग यास उतम प्रकारें ताकीद येथून घेऊन रा। गुंडोपंताकडे पाठविले आहे. आपली फौज आद्याप तरी बाहेर काढून परगणेयात फिरावें, फौजेचे पोट भरेल. रिणाईत स्वरूपी फौज ठेऊन काय उपयोगी आहे ? स्वामीनी आम्हास पत्र लि।। त्यास उतम मातबर किताब देऊन पत्र लि।. आपले दरबारी आल्यास किताब मातबर मेलविला. कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

¶*The raiding activities of the Jats are reported by Sadashiv Ballal to Vishvasrao Lakshman. Attempts are being made to patch up an understanding with them making the River Sindh as the boundary line.*

4357

No. 224] [2-3-1769

पौ छ २७ जिल्काद.

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री विश्वासराव स्वामीचे शेवेशी.

पोष्य कृष्णराव बल्लाळ, साष्टांग नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये लिहीत गेले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहालें. जाटाचा मजकूर लिहिला तो कळला. दानसा जाट यानें फौजबंदी करून, मुलखात धुंदी फार करितो. याजकरितां फौजा येऊन पोंहचल्यास उत्तम आहे म्हणून लिहिलें. येशास श्रीमंतांनीं तमाम सरदार यांच्या रवानग्या केल्या आहेत. सत्वरीच येऊन पोंहचतील. आम्हीं सर्व प्रकारें आपले असों. तिकडील वर्तमान वरच्यावर लिहीत जावें. रवाना छ २२ सवाल. बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे. हे विनंती.

¶*Krishnarao Ballal informs Vishvasrao Lakshman that the sardars Sindia and Holkar have been despatched to put an end to the Jats' activities.*

No. 225] [1768 ?

श्रीगणराज

राजश्री गंगाधरपंत तात्या स्वामीचे शेवेसी

विनंती उपरी. आपणांकडील गोष्टी निर्गमांत येत नाहीं यास्तव श्रीमंतानीं बहुतां प्रकारें रागें भरून सांगोन पाठविले होते. आम्ही विनंति सांगोन पाठविली जे. आजी यावे (फाटलें) आपण क्षमा केली तसी आजीचा दिवस क्षमा करावी. आजीचे दिवसांत निर्गम करून देवितों म्हणून सांगोन पाठविलें आहे. आपणासहि ज्यापक्षी श्रीमंतांची मर्जी रक्षिणे त्यापक्षी दिवसगत लाऊन फाइदा काय ? यास्तव आजीचे दिवसांत निर्गम होय ते करावें. आपण उतर लिहितील त्याप्रमाणें श्रीमंतास विनंति करूं. बहुत काय लिहिणें हे विनंति.

¶*Gangadhar Yashwant Chandrachud is advised to have his affair settled without delay as the Peshwa was most insistant on the matter.*

No. 226] [1768 ;

श्री

स्वामीचे शेवेसी विज्ञापना. जाटाचे फौजेचे वर्तमान आलें. भिंडेसच आहे. भिंड अद्यापि खाली जाली नाहीं; आणि सुजादौलाची फौज अनुपगीर उमरावगीर वगैरे दाहा हजार फौज जाजमऊचा घाट उतरून कनोजेस येऊन आगऱ्याचे रोखे कूच केला. मग कोठेहि जात. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This is a report about the conjoint movements of the Jats and Shuja-ud-daula into Maratha territory.*

4358

No. 227] *[1768?*

पुरवणी श्रीमंत बापू स्वामी.

शहर खराब; जाटाणी जातेसमई निराश्या जाणून लुटिलें. यास्तव लहान थोर रयतीची दिलबारी करून सत्वरीच कौले लाऊन माहालानची ठाणी बसवावी लागतात. स्वामीचे प्रतापेकडून सर्व कार्यभाग होईल. परंतु राजश्री रामाजीपंत व रामजीराऊ थोरात खटे जाले; म्हणतात कीं आम्ही खावंदाचे कार्यभागास रात्रंदिवस मेहनत करितों की श्रमसाहये खावंद कृपाळु होऊन करतील. आम्ही श्रमेकरून स्थळें घेतो त्याचें कामकाज आमच्या हातून घेऊन लौकिकास अधिकोत्तर वाढवितील. ते आम्ही मरावे मारावे आणि भलताच मामिलत करून रसद देतो. खावंद त्याजवर कृपा करितात. त्यास त्यांचा हेत आहे कीं च्यार रुपये माहालचे घेणे जाले तरी आम्हांसच आज्ञा केलिया सरकारकिफायेत आणि साहेब नक्षहि ऐसी दोन्ही कार्ये करीत जाऊं. ऐसा अम्हाजवळ उभेयतानीं परिहार सांगितला तो सविस्तर सेवेसी श्रुत होय. थोरातांचे पथक केवळच थोडे. उभयेतांचे सामान समानपक्ष असते तरी फार मुल्रुक सुटला असता. या प्रांती दर ठाणियास जाटाकडील वगैरे मवासे ठाणीं याणी मातबर जमाव व सरंजाम पोख्ता. त्याजकरितां इलाजें तजविजेणे कार्य करावें लागते. बहुत काय लिहिणे, लोभ असो दीजे हे विज्ञाप्ति.

¶*A mutilated paper addressed to Sakharam Bapu describing the troubles created by the Jats.*

No. 228] *[1768*

श्रीमार्तंडभैरव

स्वामीचे सेवेसी सा। नमस्कार विनंती उपर श्रीमंत राजश्री माहादजी बावा सिंदे यानी श्रीमंत मातुश्री सकुबाई सिंदे यास श्रीगोंदियात स्वहस्ताक्षरी करार करून येक लक्ष सवा सततीसा रुपयेची नेमणूक गाव करून दिल्हा व त्याची याद सेवेसी पाठविली आहे हे पावलियाचे उतर पा। हे विनंती.

¶*Mahadaji Sindia assigns a village in pargana Shrigonda towards the maintenance of Sakhubai Shinde, wife of Jayappa.*

4359

No. 229] [30-1-1769

पौ छ २ जिल्काद तिसा
फाल्गुन सदरहू प्रो पत्रे
लिहिणे

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
बालाजी जनार्दन स्वामी गोसांवी यांसी

पो. माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणे विशेष. राघो राम हे राजश्री माहादजी सिंदे याचे चाकर असोन त्याजवरच फौज घेऊन चालोन आले. त्यास लढाई होऊन राघो राम मारले गेले. त्याजकडे महादजी सिंदे याचा हिसेब व पैका येणे व हरामखोरी केली सबब

बाबूराव कासी व राघो राम याचे घर बागणीनजीक इसालमपुरी आहे. कलम १	नानाजी विठल पालेकर याचे घर चांभारगोद्यांत आहे कलम १

येकूण दोनी घरें पत्र पावतांच जफ्त करवणे. सदरहू दोही घरातील वस्तभाव जरा+बाजरा कोठे तर्फ१रीक होऊ न देणे. दोहो घराची जफ्ती जलदीने करणे. जाणिजे छ २१ रमजान सुा तिसा सितैन मया व अलफ बहुत काय लिहीणे हे विनंती.

¶*Peshwa Madhavrao orders the confiscation of the property of Ragho Ram who marched against Mahadji Sindia, his master, but suffered death in the affray.*

No. 230] [4-2-1769

पोष्य छ २८ सवाल
तिसा सितैन माघ मास

श्री

श्रीमंत राजश्री बालाजीपंत नाना स्वामीचे सेवेसी

पौष्य विश्वासराव लक्ष्मण सां नमस्कार विनंती येथील कुशल ताा छ २६ रमजान मुा ब्रासी वर्तमान येथास्थित असे विशेष. आलीकडे स्वामीकडून पत्र येऊन सांभाल होत नाहीं तेणेकरून चित सचिंत असे. तरी याप्रो निष्ठुरता न करावी. आम्हास सर्वप्रकारे आधार स्वामीचा दुसरा अर्थ आपल्यासीं नाहीं. सर्वस्वे आमची बाजू दरबारी आपण राखिली, त्याचा विसर पडेल येसे

+ यत्किंचित. १ अफरातफर.

होणार नाही परंतु समयोचित पैका तेथे न्यावयाकरितां गैरमर्जीचा अर्थ ध्यानात असलिया क्षमा करून पार पाडणार आपणच आहेत. पैक्याटक्याची तजवीज येक दोन वेळ केली तितक्याच संधींत जाट वगैरे शत्रू याची दुंडी मागती साल मारी होऊन प्रांतात गडबड जाहाली. राजेरजवाडे यानी फितूर करून अमलांत खलेल पाडली. फौजा या प्रांती आज दोन अडीच वर्षे न आल्या. यामुले मवास वगैरे याणी दंगा करून हा प्रकार केला तो अर्थ लिहितां विस्तार दिसतो. फौजाची मार्गप्रतीक्षा करितां दिवसगत लोटली. अद्यापहि विलंबच दिसतो. येकवेल फौजासहित सरदार येऊन मवासाचे पारपत्य होते तरीच स्थित राहाती. धामधुमेमुळे खर्चाखाले कर्जाच्या पेचात बहुत आलो. रसदेच्या येवजाच्या रवानगीस येशी नानाप्रकारे संकटे पडत गेली. वोडसे दतियेकर याजकडून-हि खंडणीचे येवजी पैकाटका आला नाही. वोडसेकर राजे हाटेसिंग सरदारानी स्थापिले होते त्यास अष्टभया त्याचे भाऊबंद याणी गमनीपण करून राज्यास न दबता ग्रहभेदकरून हटेसिंग राजियास काढून देऊन वोडशाची जागा बलाविली आहे. पाचसात हजार बरकंदाज व काही स्वार येसे जमा करून दुसरा राजा स्थापणार. येशा रांगडियाच्या नजरा फिरोन गेल्या आहेत. दक्षणी फौजाची दहशात नाहीं यामुले मनमानेसारिखी वर्तणूक करितात. देशाकडील फौजाची वरतन पाहाता आपसामध्ये राज्ये वाटू लागले. नाही तर पहिल्यापासून येथील इतल्याखेरीज राज्याची स्थापना होत नव्हती. येथून वोडसे दोकोसावर, तेथील प्रकार या रितीचा. हटेसिंग पलोन दतियास गेला. त्याणे दतियेकर सामील करून दंगा करावा या विचारात आहे. वोडशांतील नूतन हरामखोर हेहि धामधुमेस चुकणार नाहींत. सांप्रत समीपच्या दुंडीमुलें रात्रंदिवस जपावे लागते. हे येक प्रकार अधिकोतरच जाला. येसी संकटावर संकटेच आहेत. फौजाची रवानगी या प्रांतास न होये या गोष्टीस आमचा (दुसरा बंद गहाळ).

¶*Vishvasrao Lakshman pleads his inability to send amcunts of revenue from his province owing to the ravages of the rebellious Bundela Chiefs. He makes an appeal to Balajipant Nana to send troops and restore order.*

No. 231] [*21-3-1769*

पौ छ २७ जिलकाद फालगुन मास

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री नाना स्वामी-

चे सेवेसी

पोष्य रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा छ १२ जिलकाद मुाा मौजे पंचगूस गोदा उतरतीर यथास्थित

असे विशेष. श्रीमंतानी आमचे स्वारीकडील लोकास खर्चास चालीस हजार रुा देविले आहेत. त्याची वरात आलाहिदा तोफखाने याजकडील कारकुनाबरोबर पाठविली आहे. त्यास सदरहू यैवजपैकी तोफखान्यास वीस हजार रुा देविले आहेत त्याप्रा त्यास द्यावे. बाकी वीस हजार रुा राहिले ते रा सिदापासेट वीरकर यास उच्यापतीचे यैवजी देविले आहेत त्यास द्यावे. येणेप्रा चालीस हजार रुा तूर्त पावत ऐसे करावे. बहुत काये लिहिणे लोभ केला पाहिजे हे विनंती.

¶Ramchandra Ganesh and Visaji Krishna request Nana Fadnis to make payments due to the arsenal and to Sidapaset Virker out of the sum allotted by the Peshwa for their campaign.

No. 232] *[19-4-1769?*

छ १४ जिल्हेज

श्रीशंकर

यादी गोहदकर राणा छत्रसिंग यास ताकीद पत्र कीं, कपूरसिंग गुजर जमीदार सरकारचा आमल सालबसाल ता राजश्री सिवाजी विठलराऊ व राजश्री बहिरो अनंत याजकडील आमलाचा पैका सरकारांतून देऊन रुजू असतां तुम्ही सन समानांत राजश्री बहिरो अनंत याजकडील तालुके नुराबाद वगैरे मुलुक जबरदस्तीनें घेतला, तेव्हां गुजर मजकूर यांसी दबाऊन इमान प्रमाण देऊन नुराबादेस भेटीस बोलाविलें. त्यास त्याणें आपला पुत्र गोपालसिंग व रामपंत दिवाण यैसा भेटीस पाठविला त्यास तुम्ही दगा करून धरिलें. पागा वगैरे सरंजाम त्याचा सर्व लुटून घेतला, दोघास कैदेत घातलें, त्यास रामपंत कारभारी कैदेंत मृत्य पावला. त्याचे पुत्रास तसदी देतां यैसें हुजूर विदित जालें. यैसियास कपूरसिंगाकडे तुमचा लांछर्या+ काये असे? हालीं हें पत्र सादर केलें असे व या कामास राजश्री कारकून व हुजूरे पाठविले आहेत. तरी कपुरसिंगाचे पुत्रास वस्तभाव, घोडीं, उंटें वगैरे सुधां सोडून देणे. फिरोन बोभाट येऊं न देणें म्हणून पत्र द्यावें.

छ ११ जिल्हेज.

¶Orders are issued to Rana Chatrasing of Gohad to release from custody the son of Kapursing Zamindar of Nurabad.

\+ भानगड.

No. 233] [14-5-1769

पो छ ८ रबिलावल

सन सबैन

श्रीभार्गवप्रसन्न

श्रीमंत राजश्री बाळाजी पंतनाना

स्वामीचे सेवेसी

पोष्य त्रिंबकराव शिवदेवे[1] मुकाम भोवरासे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागाईत छ ७ माहे मोहरम जाणून स्वकीये कुशललेखनआज्ञा केली पाहिजे विशेष.. बहुत दिवस जाहाले स्वामीचे पत्र येऊन सांभाल जाहला नाहीं, यास्तव चित्त उदास आहे तर ऐसे नसावें. सदैव पत्रद्वारें आनंदविलें पाहिजे. यानंतर दोनच्यार पत्रें सेवेसी लिहिलीं परंतु येकाहि पत्राचे उत्तर आलें नाहीं हें अपूर्व आहे. आम्ही तों आपलें ध्यान निरंतर करीत आहों. सर्व प्रकारें आमची चिंता तुम्हास आहे. वरकड इकडील वर्तमान तर शिंदे होळकर उदेपुराकडे आहेत. उभयतांचे चित्त शुद्ध नाहीं. इतक्यांत राजश्री रामचंद्रपंत तात्या आले तर उभयताचें रहस्य होऊन सरकार कामें होतील. जाट देवाज्ञा जाहाला, कळावें. आम्ही च्यार मास या प्रांतें राहून गुदस्तां अहिरानी व बुधले यानीं दुंडीकरून हरामखोरी केली होती त्यांचें पारपत्य करून ठाणीं बाधोन व दतिया वगैरे घेऊन राजश्री धोंडो दत्तात्रय यांचे जाहगिरीचीं होतीं तीं त्याचे कमाविसदारांचे स्वाधीन केलीं. फौजा या प्रांतांत आल्या म्हणजे आम्हीहि त्यांस सामल होऊं. उपरांतिक होईल प्रकार तो सेवेसी लेहून पाठऊं. सदैव आलिया माणसांसमागमें पत्रद्वारें सांभाळ केला पाहिजे. बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हें विनंती.

¶*This letter of Trimbak Shivdev refers to the differences between Sindia and Holkar and the death of Jawahirmal Jat.*

No. 234] [16-5-1769

पो छ ७ रावल

सन सबैन

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री बाळाजीपंत नाना

स्वामीचे सेवेसी

पोष्य माधरोव[2] सिवदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल ताा छ ९ मोहरम मुकाम किले मल्हारगड नजिक कुरवाई येथें आपले

१ ओढेकर. २ ओढेकर.

कृपेंकरून संतोषरूप जाणून, स्वकीये कुशल लेखन करीत असावें विशेष. मालवे प्रांतीं आलों तों येथें माहलोमाहलीं भिला भुम्याचे व रागडे गिराशे यांचे दंगे यामुळे दरोबस्त माहालांची खराबी. कांहीं दिवस माहली राहून बंदोबस्त केला. तीर्थस्वरूप राजश्री त्रिंबकराव नाना अगोधरच भोवरासे प्रांती आले होते. इकडेहि आहीर व बुंधेले मवास यांचा दंगा, गुदस्तापासोन दुंडी करून मुलकाची खराबी केली. यास्तव तीर्थस्वरूपानी आम्हास बोलाविले, तेव्हां हे प्रांती आलों. येथे आल्यानंतर दोन्ही पतके येकत्र होऊन मवासांचे पारपत्य केले. दोन गढ्या मातबर अडचणींत होत्या त्या घेऊन, मुकाम मजकुरास आलों. राजश्री माहादजी सिंदे राणे रतनसिंग याचे साह्यास उदेपुरास गेले. मागाहून राजश्री तुकोजी होलकर दोन च्यार हजार फौजेनसी गेले. वरकड त्यांची फौज व राजश्री नारो गणेश खेचीवाड्याचे मेडावर आहेत. राजश्री रामचंद्र गणेश नर्मदातीरास आल्याचे वर्तमान आहे. हे प्रांतीं आले म्हणजे त्यांसी जाऊन सामील होऊन स्वामीकार्ये करून. सरदारी वोढगस्त. भिला भाबराचे दंग्यामुळें माहाल खराब. यैवजास ठिकाण नाहीं. कर्जावामासी गाठ आमचा सर्व प्रकारें निर्वाह करणार आपण आहेत. सर्व प्रकारें भरवसा आपला आहे. वरकड दादोबा विनंती करतील, त्यावरून कळो येईल. सदैव पत्रीं सांभाळीत जावे. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*In this letter referring to the chaotic conditions in Malwa and Bundelkhand where Maratha officers found it difficult to collect revenue Madhaorao Shivdev reports Sindia to have gone to Udaipur to assist the Rana where he was later to be joined by Holkar.*

No. 235] [*21-5-1769*

नकल

श्री

चिरंजीव राजमान्य राजश्री नारयणराव बल्लाळ यासी माधवराव बल्लाळ प्रधान आशीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष. सखुबाई व सगुणाबाई व भागार्थीबाई सिंदी यांचा सरंजाम जफ्त केला. भागीर्थीबाई आपली वाटणी घेत नाही यास्तव भागिर्थीबाईची तक्षीम जफ्तीत राखून सखुबाई व सगुणाबाईचा सरंजाम तक्षिमे प्रा। मोकला करून मोकलिकीची पत्रे आलाहिदा सादर केलीच आहेत. तरी सखुबाई व सगुणाबाईचे तक्षिमेच्या

सरंजामाची तुम्ही वैसूल काय घेतला असेल तो सिलेदाराचे रुजुवातीने हुजूर लेहून पाठवणें. जाणीजे छ १४ मोहरम सुा तिसा सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे आसीर्वाद.

¶*Madhavrao Balal issues instructions to his brother to restore to Sakhubai and Sagunabai their confiscated property. Sagunabai was the wife of Jotyaji and Bhagirthibai of Dattaji Sindia.*

No. 236] [*27-5-1769*

पैाा छ १४ सफर सबैन

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी.

विनंती शेवक जगंनाथ नारायण मुकाम किले आसेर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायेत छ २० माहे मोहरमपर्यंत स्वामीचे कृपेवरून सेवकाचे व किलेमजकूरचे वर्तमान येथास्थित असे विशेष. साल मजकुरी सवगाईची आफत पडली येणेकरून रयेत खराब व सालाबाद आबराईच्या निमे भाग तीन हजार सरकारांत येतो त्या प्रोाच तीन हजार रयेतीस हिसा येतो त्यास साल मजकुरी आंबराई बिलकूल गेली. हे आफत रयतीचे माथा पडलियानंतरी राजश्री रामचंद्र गणेश व राजश्री विसाजी कृष्ण यांजसमागमें हुजरून फौज देऊन हिंदुस्थानांत रवानगी केली. त्यास मारनिले आसेर परगण्यात येऊन बारा मुकाम करून (पहिले प्र) * * * बहादरपुरातर्फेत त्रिवरतापीतीरीचा * * * * * * * पधरा अठरा हजार * * * * * * * जे ते जैनाबादरावेर आसेर * * * * * * * * कही करून येणार त्यास बहादरपुरा * * * * रयतीनें कडबी झाडून विकली. दाहा वीस पुले बैलाकरितां ठेविली ते नेल्याने आवतीचे बैल वाचत नाही. तेव्हां रयेत तजावजा होईल. पेस्तर सालची लावणी बुडेल, याकरितां चिठ्या कराव्या त्या आम्हावर कराव्या म्हणोन विनंती केली. त्या प्रो कबूल करून चिठ्या केल्या तेव्हा शहराहून कडबी विकत घेऊन दिल्ही. पागा व तोफखाना मिलोन अडीच हजार दिल्ही. तेथून कूच करून लालबागात राहिले. येक मुकाम करून पुढे जावे त्यास राजश्री नारोशंकर वगैरे किरकोल मिलोन दोन तीन हजार फौज मागे राहिली. त्याविसी पांच मुकाम लालबागांत जाले. तेथून चिठ्या जाल्या त्याप्रो दोन हजार अडीच हजार विकत घेऊन दिल्ही. तेथून कूच करून व सिराबाद बोरीवर गेले तेथे जंगल यास्तव जैनाबादेवर

कही केली. तेथून सिवलेवर मुकाम केले. तोफखान्याचे बैलास कही नाही याकरितां बैलास कडबीची तर्तूद करून ठेविली होती. फौज मुकामावर येताच चिठ्या मनस्वी जाल्या. तोफखाना व पागास किरकोल किरकोल दिल्ही व फौजेने गावगना आसपासचे गावची कडबी होती ते झाडून आणिली असतां दुसरा मुकाम करून सिवलेवर राहिले. गावात रयेतीचे घरांत सिरोन कडबी व भूस जे असेल ते जबदस्तीने न्यावें हा मनसबा केला तेव्हा आम्ही तेथून निघोन किल्यास आलो. मागाहून रात्रौ चिठी गावची आली की घरांत सिरोन कडबी व भूस होते ते नेले. याखेरीज फौजेचा मुकाम जेथे जाला तेथून दोही बाजूस तीन तीन कोसी गांव होते. त्यास रखवालीस राऊत आणिले. त्यास दररोज दरावती खुराक रुा अर्धा व रोज रुा येक येणे · प्रो हा खर्च व भेटी बिनी व पायेमाली मौजे सिवल मातबर बागायेत तेथे बागात फौजेचे मुकाम जाले, तेणेकरून दरोबस्त बागायेत लुटली गेली * सालमजकुरी सर्व प्रा रयतीची हलाखी आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Jagannath Narayan describes to Nana Fadnis the woeful condition of the ryots in his district as a result of the passage of Maratha troops marching northward under Visaji Krishna and Ramchandra Ganesh and Naro Shankar.*

No. 237] [*31-5-1769*

पो छ १२ रबिलावल सबैन.

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य शिवाजी विठल कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरी येथील कुशल तागायत छ २४ मोहरम मुकाम ग्वालेर जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असिले पाहिजे. बहुत दिवस पत्र येऊन सांभाल होत नाहीं तरी ऐसें नसावें. सदैव पत्र पाठऊन सांभालीत जावें. यानंतर इकडील वर्तमान आम्ही या प्रांते आल्यास दीड वर्ष जाहालें. ग्वालेर प्रांतीं जमीदार लाहाण थोर यानी बहुत लबाड्या केल्या, त्यांचीं थोडींबहुत पारपत्यें केलीं. परंतु विना गोहदकर जाट व चमलेपारचे थोरले जाट यांचे पारपत्य केल्याखेरीज इकडील बंदोबस्त होतो ऐसे नाहीं. रतनसिंग जाट वारला, तेसमई सरदार मालव्यांत आले होते ते समईहि होतों. आम्ही बहुता प्रकारें लिहिले परंतु येणें न जाहालें. आम्ही थोडीबहुत खटपट आपल्या सामानानरूप केली, परंतु मागून उपराळा न होयें ऐसें जाणून सल्लक

करून मांघारें चमलेपार लाविले. प्रस्तुत आम्ही ग्वालीरीस आलों असो. राजश्री रामचंद्रपंत तात्या फोजेसह आले आहेत. अत:पर मातबरच कामें होऊन येतील. समीप आल्यास आम्ही त्याजकडे जाऊं. परंतु येक छावणी आमची जाहाली. आतां यांचे आगमनामुळें दुसरी छावणी करणें प्राप्त जाहाली. छावणीमुळें बहुत पेंचांत आलों. पूर्वीपासून सरदारी वोढगस्त. कर्जासी समध आहे हें सविस्तर आपणांस निवेदन केलें आहे. पूर्वीपासून या सरदारीची उभारणी आपले घरची आहे हें आपण जाणतच आहे. पुढेंही सर्व प्रकारें आश्रा आपलाच आहे. उपरोधिक ल्याहावेसे नाहीं. आणकईचे मसलतीची मखलासी आपले हातची आहे. सा महिनियानी रुपये द्यावयाचा करार त्यास दीड वरिष जाहालें. कर्जदारानी बहुत गवगवा केला आहे, यास्तव तो ऐवज सत्वर देविला पाहिजे. वरकड कितेक विनंति करणे ते राजश्री लक्ष्मण खंडेराव व अनंदराव विनायेक करितील ती मान्य करावी. माहालसमधी वगैरे जाबसाल देसचे बहुत आहेत, त्याजविसी विनंति मान्य करून सर्व बंदोबस्त करून दिल्हा पाहिजे. सर्व सरदारीचा अभिमान आपणास आहे, विस्तारे ल्याहावेसें नाहीं. सदैव पत्रद्वारें सांभालीत असिले पाहिजे. बहुत काय लिहिणें कृपा लोभ कीजे हे विनंति.

¶*Shivaji Vithal Vinchurkar to Nana Fadnis, writing from Gwalior, reports the aggressions of the Jats and the consequent embarrassment of his finances.*

No. 238] [*3-6-1769*

श्री

राजश्री रामचंद्रपंत व विसाजीपंत गोसांवी
यासी

८ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो तुकोजी होळकर दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जावें विशेष. आम्ही कोट्याकडे गेलो, सिंदे उदेपुरास आले, हे तपसिले वर्तमान पेशजी लिहिलेच आहे. येथे आल्यावर राजश्री माहादजी सिंदे यांसी सांगितले जे तुम्ही अद्यापि मोरचे लाविले नाहीत, दिवस पावसाला आला. पुढे जाटाचे राजकारण उपस्थित जाले तर दोन हजार फौज तुमची व दोन हजार आमची येथे ठेऊन कूच करून जाऊ. उदेपुरचा घासदाणा मना जाला म्हणजे सहजात काम होईल, मुल्लक जतींत येईल. राजश्री रामचंद्रपतहि आले. ते व आपण येकत्र होऊन जाऊ यैसे

सांगितले, ते त्यांच्या चितास आले नाहीं. तुम्हीं इकडे याल, जबरदस्तीने देखाल ते कराल यैसे मनांत आणून व यैवजास ठिकाण नाहीं व आमचा भाऊपणा राखावा, येअर्थी आम्हास सांगितले जे अरिसिंहाचे राजकारण करावे. आम्ही सांगितले जे तुम्ही राजश्री त्रिंबकजी इंगले यांचे विद्यमाने बेलभंडार आरिसिंहास दिल्हा त्याचे विद्यमाने करावें, अथवा मिरजा रहिमबेग याचे विद्यमाने मामलत केली त्यास सांगून करावे. तेव्हा आणप्रमाण केली जे ते गोष्ट राहिली. तुम्ही करणें. तेव्हा आम्हापासी वकील त्याचे होते ते गावांत पाठऊन जाबसाल आणविला. तेव्हा सिंदे यानी कराररयाद करून दिल्ही. पंचवीस सरकार व दाहा सरदार येकूण पसतीस ठरले. यादी आम्ही गावात पाठऊन करार केला. मागती बदलले. दुसऱ्याने पुन्हा आणखी मुदा घातला त्याचीहि तडजोड केली, त्यास कायेम जाले नाहीत. येक गोष्ट येक घटका नाहीं. तो विस्तार पत्री कोठवर लिहावा? निदान त्याचे आमचे कोणे तरेने ठीक पडले नाही. मग आम्ही वैशाख वद्ये १३ त्रयोदसीस कूच केले. मजल दरमजल आपले फौजत येतो. आपण कोणे ठिकाणी आहेत, भेटीचा योग कोठे होईल हे तपसिले लिहावे. दोन जोड्या येथून पाठविल्या आहेत परंतु येकहि जाब येत नाहीं. तर तपसिले ल्याहावे. रा छ २७ माहे मोहरम बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Tukoji Holkar writes to Ramchandra Ganesh Kanade and Visaji Krishna Binivale, communicating his plans and expressing his disagreement with Mahadji Sindia, with whom he finds himself unable to co-operate. Trimbakji Ingle is the father of Ambaji.*

No. 239] *[8-6-1769*

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे
सेवेसी.

पोष्य दादो मल्हार कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागाइत ज्येष्ट शुद्ध ५ जाणोन स्वामीचे कृपेकरून येथास्थित असें विशेष. इकडील वर्तमान तर शिंदे उदेपुराकडे गेले. होलकर कोट्याकडे गेले यास्तव सिंदे श्रीमंतास लिहीत गेले, त्याजवरून आज्ञापत्रें येत गेलीं जें उभयेतां येक

करणें. त्याजवरून होळकर यास येथें आणिलें. बहुत प्रकार सांगून पाहिलें परंतु कोणेंहि प्रकारें ठीक पडलें नाहीं. तूर्त सरकारचा ऐवज येत होता तो घेणें त्याचे मर्जीस आला नाहीं. येविषयीं तपासिलें वर्तमान श्रीमंतांचे पत्रीं लिहिलें आहे त्याजवरून कळेल, व चिरंजीव राजश्री गबाजी सांगेल त्याजवरून कळेल. सारांश आम्ही स्वामीचे आहों. सर्व प्रकारें भरवसा स्वामीचा आहे. तर सर्वदां पत्रीं सांभाळ करावा. व चिरंजीव तेथें आहे. परामृश केला पाहिजे. तेथून पत्रें वरचेवर स्वामीस येतीं परंतु श्रीमंत वराड प्रांतीं; तिकडे प्रसंग पडला. पुण्याकडे कोणी आले नाहीं. चिरंजीव विनंती करतील तें श्रीमंतांची मर्जी पाहून समजाऊन सांगून उत्तर पाठवावयास आज्ञा जाली पाहिजे. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हें विनंति.

¶*Dado Malhar reports to Nana that the differences between Sindia and Holkar have not yet been made up and that Sindia was encamped near Udepur.*

No. 240] [*11-6-1769*

पो छ २० सफर जेष्ट मास नकल

छ मजकूर

श्री

चिरंजीव राजमान्य राजश्री नारायणराव बल्लाळ यांस माधवराव बल्लाळ प्रधान आसार्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहिणे विशेष. मौजे करदी पा नेवासे दरोबस्त भागीरथीबाई सिंदे याजकडे पेशजीपासोन आहे. त्याची जफ्ती गुदस्त केली होती ते मोकळी करून पत्र लिहिले आहे. तरी मौजे मजकुरची जफ्ती उठवणें. जत्फीमुळे वसूल घेतला असेल तो याचे गुजारतीने रुजू करून लिहिणे. याजउपरी मौजे मजकुरी दखलगिरी न करणे. जाणिजे. छ ६ सफर सुा सबैन मया व अलफ. बहुत काय लिहीणे हे आसीर्वाद.

¶*Madhavrao Ballal restores the village of Karadi to Bhagirthibai Sindia, wife of Dattaji.*

No. 241] [*12-7-1769*

पौ छ ११ जाखर सबैन

श्री

श्रीमंत राजश्री नाना फडनीस स्वामीचे शेवेसी

सेवक धोंडो दत्तात्रय सां नमस्कार विनंती येथील क्षेम ताा आषाढ शुध्द ९ मुकाम नजीक भवरासे जाणन स्वकीय कुशललेखन करावयासी आज्ञा केली

पाहिजे विशेष. बहुत दिवस जाहाले परंतु आपणाकडून पत्र येऊन सांभाल होत नाही. तरी येसे नसावे. सदैव पत्र पाठऊन परामृश करीत आसिले पो. यानंतर इकडील राजकी वर्तमान तरी भुपालची खंडणी जाहाली व रातगडची खंडणी जाहाली. प्रस्तुत कुरबाईचे बोलणे लागले आहे. होलकर नजीक आले आहेत. याच्या भेटी जाहालियावर मनसबा होईल तो लिहून पाठऊ. सिंदे उदेपुरास आहेत. सेवेसी कलावे म्हणोन लिहिले आहे. बहुत काये लिहिणे कृपा लोभ करीत असिले पाहिजे हे विनंती.

¶*Dhondo Dattatraya reports that the work of realizing tribute was being pushed on. Sindia is encamped near Udaipur while Holkar is soon expected, writes he.*

No. 242] [*25-7-1769*

छ २१ रबिलोवल आषाढ सन सबैन.

श्री

यादी भुपालकराकडील ताकीदपत्रे सुा सबैन मया व अलफ.

१ रामचेंद्र गणेश व विसाजी कृष्ण यास पत्रे की तुम्हास तीन पत्रे पाठविली त्याप्रा भुपालकराचा तालुकियात उपद्रव केला नसल. घेतला वसूल माघारा दिल्हा आसल. सांप्रत समसरखान हजुरून तुम्हाकडे पाठविले आहेत. माारनिलेनी हजूर नजरणा ठराऊन ऐवज सरकारात दिल्हा आहे. तुम्ही कोणे गोष्टीचा उपद्रव न देणे. ऐवज घेतला आसल तो क्षेपनिक्षप माघारा देणे म्हणून पत्रे.

भुपालकराचे तालुक्यास उपद्रव न लावणे म्हणून पेशजी तुम्हास येक दोन पत्रे सादर केली आहेत. हाली समसेरखान तुम्हाकडे आले आहित तर कोणेविसी उपद्रव न लावणे म्हणून पत्र.

१ नजरणाचा ऐवज सरकारात पावला म्हणून भुपालकरास पत्रें. समसेरखान माा आलीयारखान याजकडून येकेवीस हजार रु. पोता पावले म्हणून पत्रे.

येकवीस हजार रुपयाचे कापड सरकारात घेतले त्याचा जाब द्यावा.

येकूण दोन पत्रे देणे.

¶*The Peshwa sends instructions to Ramchandra Ganesh and Visaji Krishna to return the amounts recovered from the territory of the Bhopal State as the prince had readily paid the tribute levied.*

No. 243 [27-7-1769

पो छ[१] २८ राखर

सबैन श्रावण.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी.

विनंती शेवक गणेश विश्वनाथे[२] व विनायक मोरेश्वर कृतानेक सां नमस्कार विज्ञापना ता। छ २३ रोवल मुकाम टक प्रांत खेचीवाडा स्वामीचे कृपावलोकनें शेवकांचे वर्तमान येथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तरी उभयेता सरदार हुसंगाबादेस नर्मदा उतरोन भूपालच्या तालुक्यांत आले. भूपालची खंडणी एक लक्ष जाहली. रातगडची खंडणी पंचवीस हजार जाली. एकून दोनी मिळोन सवा लक्ष खंडणी जाहली. वसूलहि आला. तेथून दरमजल कुरवाईस आले. कुरवाई-कराकडे बाकी येणे होती त्याचा वसूल श्रीमंत राजश्री दादासाहेब याणी राजश्री त्रिंबकराव सिवदेव याजकडे द्यावयाचा करार करून त्रिंबकराव सिवदेव याजपासून ऐवज सरकारात घेऊन वोली त्याचे हवाली केल्या होत्या, त्या वोली आजपावेतो त्रिंबकराव याजवल होत्या. त्यास त्याचे बाकीचा फडशा करून वोली सोडाव्या ऐसा ठराव जाला आहे. राजश्री बाळाजी गोविंद बुंदले सेर मोहुच्या मुकामी भूपाल तालुक्यांत येऊन भेटले. अद्याप मामलतीचा ठराव जाहला नाहीं, परंतु लवकरच मामलतीचा फडशा होईल. रसद सात लक्ष पावेतो सरकारचे बोलण्यात आहे. ठरता कोठपावेतो ठरेल ते पाहावे. तेहि पाच पावेतो बोलतात. राजश्री तुकोजी होळकर याणी सोपारास खेचिवाड्यात नारोगणेश याजवळ फौज ठेऊन आपण दोन हजार फौजेनसी सडे उदेपुरास गेले होते. त्यास तेथे तुकोजी होळकर याणी राजे आरसी आतील याचा पक्ष धरला व महादजी सिंदे याणीं बाहेरील राजे रतनसिंग याचा पक्ष धरिला. तेव्हां उभयेतां सरदाराचे न बने. याजकरितां तुकोजी होळकर तेथून निघाले. दरमजल येऊन भवरासे येथील मुकामी भेटले. नारो गणेश सोपारासच फौजसुधा आहेत. त्याणी खेचीचे खंडणीचा ठराव केला होता, परंतु वसूल न होय याजकरितां सरदाराची छावणी खेचिवाड्यांत होईल. खेचीचे पारपत्य जाहलियावर पुढे जाटवाड्यांत होळकर सिंदे सुधा जावे हा मनसबा आहे. महादजी सिंदे उदेपुरासच आहेत. हली ऐकण्यात आले आहे कीं राजे आरसी याजकडे उदेपूरची खंडणी चौसष्ट लक्ष करार जाली. याखेरीज रतनसिंगास सवा लक्षाचा

---

१ पैवस्ती नाना फडणिसाच्या हातची. २ बेहेरे.

पटा व महादजी सिंदे यास पाच लक्षाचा पटा द्यावा या प्रमाणें करार जाहला म्हणोन वर्तमान आले आहे. परंतु सरकारांत लिहिले आले नाहीं. येथून कारकून पाठविला आहे त्याचे लिहिले आलियावर लेहून पाठऊं. फौजेची खडी गणती छ २४ सफरी रातगडचे मुकामी घेऊन उभयेतां सरदारानी श्रीमंताचे लाखोट्यांत घालून आलाहिदा तेरजे पाठविली आहेत त्यावरून विदित होईल. मागाहून होईल ते लेहून पाठवीत जाऊं. आज्ञेप्रमाणें वर्तणूक होईल. राजश्री विश्वासराव लक्ष्मण याचे कागद झासीहून आजच आले. आठाचोहो दिवशी येऊन भेटतील. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Ganesh Vishvanath and Vinayak Moreshwar send to Nana Fadnis a detailed report of the activities of Sindia and Holkar after they had crossed into Malwa. Bhupal, Ratgad and other minor places have, the writer says, agreed to pay the tribute and that unpleasantness has marred the cordial relations between Sindia and Holkar, the two having espoused the cause of rival claimants to the Udaipur Throne, from whom a tribute of sixty-four lacs was fixed to be recovered.

No. 244] *[30-9-1769*

पौ छ ६ जाखर आस्विन

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री तात्या व बाबा
स्वामीचे शेवेसी.

पो कासी नरसी कृतानेक साष्टांग नमस्कार विनती. येथील क्षेम जाणौन स्वकीये कुशललेखन आज्ञा केली पाहिजे विशेष. सरकारात हुंडी पहिली पाठविली होती त्यामध्ये आगरेयाची हुंडी रुपये १३९१ तेरासे येक्याणव होती ते चोरीस गेली. त्याची पेटा आणून सेवसी पाठविली आहेत. रुपये तेरासे येक्याणव रुपये घ्यावे. वीस पत्रे व कासीद सागरास च्यार महिने पाठविले तेव्हा मोठे संकटे आली. कलेले पाहिजे. झासी प्रांते मोठी धूम लुटावयाची हाकिमाने मांडिली आहे. याचप्रमाणे सर्व जागां आहे. कोणास इतबार नाही. मामलत न राहे. आंतरवेदीत पठाण रोहिले याणी निकडीने वसूल घेत आहेत. आधा रुपया खरिफाचे जमिनीस घेतला. मोठी धूम सर्व जाहाली आहे. काये

आंतरवेद[1] काये यापार येकसेचं जाहाले आहे. त्रिबक राम पावलेच आसतील. पहिला यैवज पाठविला आहे. उतर अद्याप न आले. बहुत काये लिहावे? कृपा करीत जावी. मिती आश्विन सुध १ हे विनंती.

¶*Kasi Narsi in forwarding the amount of his charge describes the general disorder created by the Pathans and the Rohillas in the Doab.*

No. 245] [*2-10-1769*

पौ छ १२ रजबू

सन सबैन.

श्री

सेवेसी गणेश विश्वनाथ व विनायेक मोरेश्वर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १ जमादिलाखरपर्यंत मुाा राघोगड पाा खेचीवाडा वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीनी पत्र पाठविले ते पावले. पत्री आज्ञा की, वरचेवर पत्रे पाठवीत जाणें. ऐश्यास, च्यारपाच पत्रे पेशजी शेवेसी रवाना केली आहेत. आताहि आज्ञेप्रो आठादाहा दिवसी पत्रे रवाना करीत जाऊं. इकडील वर्तमान राघोगडास मोरचे लाविले आहेत. मोर्चे लाविल्यानंतर पाचसाहा दिवसी राजा होलकराकडे आला आहे. सल्याचा मजकूर पडला आहे. लवकरच सला होईल. राजश्री तुकोजी होलकर फौजसुधा बरोबरच आहेत. येथील कारभार उरकला म्हणजे जाटवाड्यांत जाणार. राजश्री माहादजी सिंदे उदेपुरास होते, त्याणी तेथील खंडणी करून, कूच करून, इकडे यावयास निघाले. खंडणी साठ लाख रुपये केले ऐसे ऐकिण्यात आहे. मागाहून सविस्तर खंडणीचा मजकूर लेहून पाठऊ. राा बालाजी गोविंद बुंदेले याची मामलत विल्हेस लागली. पावणेसात लाख रुपये रसद घेतली. श्रीमंत राजश्री दादासाहेब याणी बेहेडा करून दिल्हा होता त्यापैकीं दोन अडीच लाख रुपये खर्च कमी करून बेहेडा सालमजकुरी करून दिल्हा, त्याची नकल आलाहिदा सरकारात पाठविली आहे त्याजवरून सर्व कलेल. मातबर कार्य येकाधे अद्याप जाहाले नाही. स्वारीसंमंधे येक लाख रुपये भुपालची खंडणी व पंचवीस हजार रातगडची खंडणी व साा चंदेरी येथील पंधरा हजार रुपये इतकी कामे मात्र जाहाली. याचाहि यैवज घेतला हा सालाबादचाच आहे. नवाच असे काही नाही. वरकड नवल विशेष लिहिजेसे नाही. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Ganesh Viswanath and Vinayak Moreshwar communicate that the Maratha forces have besieged the fort of Raghogad. Settlement of the tribute to be collected from the Raja of Udaipur and other chiefs are other matters alluded to.*

---

१ इकडील (यमुनेअलीकडील) पार.

No. 240] [*3-10-1769*

पो छ २ जाखर सबैन

श्री

सेवेसी नारो नरसी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येसीजे. येथील वर्तमान ताा छ २९ राखरपर्येंत येथास्थित असे विशेष. इकडील सविस्तर वर्तमान कचपक लिहीतच असतो, त्याजवरून सेवेसी श्रुत होत असल. हाली येथील वर्तमान येणेप्रमाणे आहे.

आंतरवेदीत उतरून आले याजकरिता जाटाचे मामलतीस हिसका बसोन हाताचे पायावर घालोन समग्र च्यार मासपर्येंत बोलतच येत आहेत. परंतु काहीच आमलात पैका सरकारात येता दिसत नाही. हा कालपर्येंत मामलेतीस जागा नाही. ज्या कारभारात बडाल ती गोष्ट काही सुधरत नाही. सर्व धण्याचे पुण्येकरून होऊन येईल हे प्रमाण कलम १

नवलसिंग जाटान तो सर्वासी आंतरयामी आनुसंधान बांधोन मामलतीचे बोलण दीर्घसूत्रावर पाडले आहे. नजीबखान आदीकरून पारचे रोहिले पठाणाची सुत्रे आहेत जे सर्वानी येकत्र होऊन येक वेला दक्षणियासी लढाई द्यावी, त्यात जे ठरल ते पुढे पाहोन घ्यावे, येसा तो मनसबे घाटीत आहेत. सध्या यमुनेच घाट दक्षण तीराचे राखून जाट आहे. कलम १

पेशजी राजश्री माहादजी सिंदे याणी साफच सांगितले होते जे जाटाची मामलेत करून उपरात आंतरवेदीत उतरणे. जोपर्येंत जायेकदेसी मनसबा करून येकल्या सरदाराचे समत घेऊन नजीबखानाचे येकोन आंतरवेदीत आले, तेणेकरून जाटाची मामलतहि जाली नाही आण जवल कशाब(?) होता तो राहिला. याजकरिता फारच गोष्ट मनसब्यास कमी पडली. येक शायास दरशेन नाही. येणेप्रमाणे कलम. १

अंतरवेदीत उतरलेसारखे सर्वानी येक विचार करून जाटाचे मुलुकाची जफ्ती करून मातबर ठाणी तीन च्यार होती तीहि घेतली नाहीत. बाबूराव हरि बराबर फौज देऊन जफ्ती करविली. त्यास जफ्तीचा येवज आजपर्येंत लाख दोन लाख रुपये आले नाहीत. जफ्तीचा मजकूर तर या रितीचा जाला. येणेप्रमाणे कलम १

पारचे रोहिले व आहमदखान पठाण याजकडून पेशजी वकील आले होते त्याचे बोलणेत काही थोडाबहुत पैका देऊन सरकारचा मुलुक दाबला आहे तो सोडावा, आण स्नेह करून सर्वतोपरी दोस्तगिरी करावी म्हणून त्या वकिलाबरोबर सरकारचा कारकून व होलकराकडील व सिंदेकडील बालाराव

टाची मामलत होत नाही आण तुम्ही पैलकडे जाल तेव्हा सर्व गोष्टींने मनसब्यास धका बसल आण कोणा-वरच दाब बसणार नाही. उपरांत प्रस्ताई पडाल. हाली त्याच गोष्टी रूपास आल्या. विनाजाटाची माम-लत जालेखेरीज दुसरा कोणी बदत नाही. ज्यापक्षी हे जाणून न केले याचा दोश कोणास लावावयाचा ? आन्वय खावंदाचे मर्जीस आलाच असल. कलम १

गाजुदीखान आले होते. सरकार काजकामात पडोन काही आपला बंदो बस्त करून घ्यावा. परंतु सध्या नजीब-खानाचे व त्याचे आंतरयामी चुरुस, आण सरकारकाम तरी याणी काय करणे आहे हे जाणून त्यास निरोप दिल्हा. ते फर्काबादेस पठाणाकडे जाणार. कलम १

रणजितसिंग जाटहि आजपर्यंत समागमे आहेत. पेशजी बोलत होता जे आपले जीवारामाचे बरोबर पाचसात हजार फौज व तोफा देणे. आपण अंतरवेदींत उतरून मुलुकाची जफ्ती करून आमल बसऊन दाहापंधरा लक्ष रुपये मेलऊन देतो. परंतु ती गोष्ट कोणीच मान्य न केली. जलदाई करून आंतरवेदींत उतरले. याज-करिता सर्व गोष्टी बिघाडात गेल्या. कलम १

सुज्यातदौला याजकडून उमराव-गीर गोसावी दोन तीन हजार व दोन कारकून येसे त्या त्रिवर्गाकिडे रवाना केले. आधीं पारच्या रोहिल्याकडे गेले. तो मागाहून कोणाकोणाची पत्रे व नजीबखानाचे लिहिले गेले जे तुम्ही हारयेक गोष्टीचा तहरह न करणे. तूर्त काही चिंता नाही. दम धरून केलिया सर्व गोष्टी तुमचे मनोदयानुरूप होतील, येसे वरचेवर लिहिले जाते. याजस्तव तिकडेहि काही गाठ पडली नाही. रोहिले व पठाण यानी साफच स्वाल-जाब केला जो सर्वांनी तुमचा मुलुक दाबला आहे. त्यास आम्हीच काही आधी मुलुक सोडणार नाही. नजीब-खान वगैरे यानी मुलुक दाबला आहे तो सोडतील तेव्हा आपणहि सोडू, तोपरयंत केवळ आम्ही मुलुक सोडू आथवा खंडणी देऊ ही तो गोष्ट घडणार नाही. येसे बोलोन बालाराव वगैरेयास निरोप दिल्हा. ते येथ येऊन दाखल जाहाले. पाहता अंती नजीबखानाच्या या रितीच्या कटकव्या आहेत. याचे विचारे सरकारात पैका तो न यावा म्हणजे सहजच आवध्या गोष्टी साधतील. या रितीचे मनसबे आहेत. कलम १

सद्या सरकारफौजस पोटास नाही. कर्जेहि मिलत नाही. आजपर्यंत पाच-सात लक्ष रुपये कर्ज करून चालविले. बुंदेलचे मामलेतपोो तूर्त कर्जदाखल कासी नरसी याजकडून दोन लाखांच्या चिठ्या आणविल्या आहेत. परंतु त्या चिठ्या पटून पैका येता दिसत नाही. पोटाचाहि गवगवा आहे. कलम १

4375

पलटणे फिरंगियाची येत आहेत म्हणोन वर्तमान आहे. परंतु इकडे येतो किंवा पठाणाकडे जातो हे पाहावे. येणेप्रमाण वर्तमान आहे. कलम १

तूर्त मनसबा नजीबखानाचे विचारे करून केला आहे. ज्यापक्षी जाटाची मामलत होत नाही आण आंतरवेदींत पैकाहि मिलत नाही, तेव्हा येथून दाहा बारा हजार परयेंत तुम्ही फौज पाठवणे व आपलीहि पाच सात हजार फौज दिलीस आहे ती समागम देऊन जाटाचे मुलुक दिलीपासोन आसपास आहे तो जफ्ती करून जाटास जकड बसल म्हणजे सहजच मामलेत करून तहरह करील आण चौहूकडे कुफराणाहि करणार नाही, येसा इत्यर्थ करून हुजराथ पथके आनंदराव गणेश निा नारो शंकराचे व शिंदे होलकर मिलोन पाच साहा हजार फौज रवाना करीत आहेत. दिलीजवल येमुना उतरावी येणेप्रमाणे सध्या ठरावले आहे. याचा परिणाम काये लागतो पाहावा. कलम १

नजीबखान जोपर्येंत आहे तोपर्यंत पैका मिलत नाही आण कोणी सरकारस्नेहहि करीत नाहीत. हा मोठा मनाचा खोटा आहे. सर्वकड चालकपण करीतच आहे आण होतोनाही लागलेच आहे. कलम १

जाटाचे लढाईची गोष्ट मोठी ईस्वर दिली असता मनसब्यास कोताई करून कशास जागा नाहीसा केला? जरीकरिता मानमार्ग पाहून जाटासी मामलेत केली असती म्हणजे सर्व गोष्टी सुधरत्या आण पैकाहि कार्याकारण येऊन फौजची उस्तवारी होती. आण दुसरा पोख्त मनसबा करून पेकाहि मेलता. तो मजकूर काहीच येथ नाही. राजकारणेची सुत्रे येथ अधिक आगले मसलतीस दिसत ते सेवेसी लिहीत जातो. केवळ मी आपले शाहापण दाखवीत नाही. यात सर्व पुण्ये धण्याचे कलम १

जसे वर्तमान येथे दृष्टीस पडते ते सेवेसी लिहीत असतो. त्याहीमधे स्वामीची आज्ञा सिरसा जाणून कार्याकारणच वृत लिहितो. कोणाची नालेशी लिहीत नाही. परंतु ज्यापक्षी मनसब्यात पडत जाते तेव्हां बातनी सविस्तर लिहिणे त्याची गोष्ट सहजच तपसील येतो. परंतु आज्ञा आपली मानून संकलितच मोघम आतां लिहीत आहे. याजउपरी आधिक आगले वर्तमान होईल ते सेवेसी लिहीन. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Naro Narsi sends to the Peshwa a detailed report of the Maratha expedition in the North. He expresses his apprehension that the course of action pursued by the Generals on the strength of the advice of Najibkhan is misleading and ruinous. It was, he says, impolitic to penetrate into the Doab before finally crushing the Jats' power.*

No. 247] [19-10-1769 ?

पौ छ २९ जाखर

श्री

शेवेसीं माहादाजी बल्लाळ+ साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ १८ जमादिलाखर मुकाम कसबे चामारी वर्तमान येथास्थित असे विशेष. आपण पत्र छ ३ जमादिलाखरचें पाठविलें तें छ १९ रोजीं पावलें. लिहिला मजकूर कळला " तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब याणी परगणे नेमावर वगैरे पंच तालुके राजश्री माहादजी सिंदे यास सरजाम दिल्हा. त्याची सनद छ २१ रबिलाखरीं नारो बलाल भुसकुटे याचे नांवें दिल्ही. त्याणी आपले तर्फेनें संताजी वाबळे यास दिल्हे, त्याजकडून स्वार व प्यादे व कारकून छ १३ जमादिलावलीं माहालीं दाखल जाहले, म्हणोन नारो बलाल याचीं पत्रें येथें आलीं. ऐशास तुम्ही तेथें आहां. सरदार सर्व प्रकारें इकडील लक्षांत निखालस, म्हणोन तुम्ही वरचेवर लिहीत असतां, हे माहाल त्यानी दिल्हे कसे? व सिंदे याणी घेतले काय म्हणून? माहली आमलदार जाईतों तुम्ही याचा बंदोबस्त केला नाहीं काय निमित्य? कदाचित तुमचें कोणी न आइकत असे म्हणावें तरी तुम्ही तेथें राहून करितां तें काय? तुमचें कांहींच न चालतें, व वर्तमान वरेचवर लिहून हुजूर ल्याहावें तेंही तुम्ही न लिहिलें; तस्मात हे गोष्ट तुम्हांस कळली नाहीं. सरदारानी तुम्हांस न कळतां पत्रें घेतलींसें दिसतें. उघड माहालची गोष्ट तुम्हांस कळली नाहीं, तेव्हां ते आंतून बारीक राजकारणे करीत असतील ते कळतील कसी? त्याणी मनस्वी वर्तणूक करीत असावें, त्याचे वर्तमान लिहो नये, तेव्हां तुम्ही तेथें राहून करणे काय? असो सिंद्यानी माहाल घेऊन अमलदार पाठविले कसे याचे त्यासी बोलून माहालीं कोणी गेले आहेत त्यास माघारे आणवणे आणि जाहाल वर्तमान लेहून पाठवणे. मनस्वी वर्तणूक करावी, तुम्हास कळों नये, याचें त्याजवळ बरे रीतीनें बोलून बंदोबस्त करणें. तुम्हांस बंदोबस्त न होय असें असल्यास हुजूर लेहून पाठवणे, येथून बंदोबस्त केला जाईल, म्हणोन आज्ञा केली. यैशास नेमावर पंच माहालच्या सनदा याणी घेऊन वाबले यास पाठविले. आम्हास कळतांच आम्ही पाटीलबावासी प्रसंग केला की, अशा गोष्टी करितां तेव्हां तुम्हांजवळ राहाणें यांत आमचें स्वरूप नाहीं. त्याजवरून अमलसे गलबलले. तेव्हा बोलिले कीं, नेमावर पंच माहाल पहिल्यापासून सरंजाम आमचा. गोहदेचे सालीं दादानी आमचे गळां पडून खासगत स्नानसंध्येसाठीं नर्बदातीरचे माहाल

+ फडके.

मागून घेतले ते आम्ही दिल्हे. आमचे मते याजवर त्यांची सत्ता आहे. याजकरितां ज्यास दिल्हे त्याजपासून मागोन घ्यावे हा अर्थ चितांत आणून मागोन घेतले. आतां तुम्ही धोडपेचे सालापासून पूर्वपीठिका सांगितली ते कळली. हें आम्हांस समजलें नाही. म्हणून तात्काळ त्याणी वाबल्यास सोडचिठ्या दिल्ह्या. त्या नारो बलाल याकडे पाठऊन दिल्ह्या व वाबले याकडील कोणी गेले होते त्याणी वाबले याचे पत्राचा आक्षेप केला. त्यावरून नारोपंतानी आम्हास लेहून पाठविले त्यावरून आम्ही सांगून पाठविले कीं, वाबल्याकडील प्रहस्त आले असतील त्यास आधीं समजून सांगणें, पाटीलबावाचे पत्र दाखिवणे, नच आइकत तर बेलाशक गोली वाजिवणें. त्यावरून त्याणी गोली वाजविली. वाबल्याकडील येक ब्राम्हण व दोन च्यार सिपाई जखमी जाले. त्याजकडीलहि दोन तीन जखमी जाले. सेवटी वाबल्याकडील उठोन आले. आम्ही त्यास बरे रीतीनें माकूल[१] केलें. पाटीलबावानी पत्र दिल्हें असतां तुम्ही कां लबाडी केली? बहुत प्रकारें बोललों. पाटीलबावानी वाबल्यास फजित केलें. याहून अधिक काय करावें? आम्ही आपले सामर्थापेक्षां स्वामीचे पुण्येकडून फार करितो. चुकीच्या गोष्टी म्हटले तर आमच्या पदोपदी आहेत. न चुकों येविसीं प्रतिज्ञा नाहीं. हें वर्तमान कललें तेच समई जाबसाल होऊन गेले. हालीं स्वामीचें पत्र आलें त्यावरून जाला प्रकार लिहिला असे. चुकेल ते वरचेवर आज्ञा करीत जावी. येथाज्ञाने होईल त्यास अंतर करणार नाहीं. विदित जालें पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadaji Balal writes to the Peshwa that Mahadaji Sindia has agreed to forego his claims to Nemawar district and has instructed his officers to that effect. The paper contains a strong reprimand from the Peshwa, and makes it clear that the Peshwa was now able to exact implicit obedience from powerful Sardars like Sindia.*

No. 248] [*October 1769*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
निलोबा गोसावी यासी

श्रा रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण कृतानेक आसीर्वाद विनंति उपरा. येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही पत्र पाठविलें

---

१ माकूल केले—समजूत घातली.

ते पावले. राजेश्री प्रिथ्वीसिंगजी यास टिका गुदराणिला. लाला चेनराय यांचे बोलणे सुदासिवभटजीसी जाहाले. धरसोड करून जाबसाल करितात. समक्ष जाबसाल जाहालियावर बोलण्याचे भाव लेहू व लौकरच येऊ म्हणून व दबाव जयनगरप्रांते यावयाचा घातल्यासी फौजेचा व काही नख्तीचा जाबसाल बनेल, पत्रेहि राज्यास व कारभारी भटजी व जसवंतसिंग यास पाठवावयाविसीं विस्तारें लिहिले ते अवगत जाहालें. ऐसियास टिका गुदराणिला उतम केलें. फौजेचा व स्वारीचे खंडणीचा जाबसाल तुम्ही बोललांच असाल. त्यास खंडणी त्याणी पोख्त द्यावी व फौज कनिष्टपक्षी दाहा हजार तरी येक मातबर सरदार बरोबर कुमकेस पाठवावी व टिक्याची नजर पोख्त करार करावी म्हणून श्रीमंताचे पत्र आम्हास आले आहे तर टिक्याची नजराणीहि पोख्त करार करावा. याप्रो तीनहि मजकूर त्यांचे कारभारियासी बोलून पक्के करून सदासिव भटजीस समागमें घेऊन यावे. * * * * जाबसाल * * * * विदित करून *. सदर * उतम घडे ते करावे. * * * न जाबसाल न करावा आमचीहि स्वारी सत्वरच तिकडे येत असे. तुमचे बोलण्याप्रमाणे सदरहू तीनहि जाबसाल अमलात लौकर आणिले तरी उतम. दिरंगावर घातल्यास आमची स्वारी त्याचे प्रांतात येऊन मुलकास तसदी भारी होईल हे त्यास स्पष्ट सांगणे. इकडील वर्तमान तरी खेचीकडील कामाचा फडचा जाहाला. दोन लक्ष पासष्ट हजाराचा मुलूक अरुण टंक बारखेडे वगैरे ठाणी सरकारात घेतली. सवातीन लक्ष नख्त द्यावे त्यात काही मुलूक पट लाऊन घ्यावा व काही भरणा हती घोडे वगैरे व कांहीं नख्त या प्रो जाहाले. निशापाती जाहाली. अतपर येथून कूच करून दरमजल तिकडे चंमेल उतरून येत असो. तुम्ही सदरहूप्रमाणे बोलोन सदासिवभटजीस घेऊन लौकर यावयाचे करणे. येथून कूच होऊन जयनगर प्रांतेच येण्याचा निश्चय जाहलियावर मागाहून सविस्तर लेहून पाठविला जाईल. राजे प्रिथ्वीसिंगजी व सदासिवभट व जसवंतसिंग यांस पत्रे पाठवावी म्हणून लिा त्याप्रो पत्रे पाठविली असेत.

¶*Ramchandra Ganesh and Visaji Krishna write concerning Prithvising and Chenrai of Jainagar and the settlement of their monetary affairs.*

No. 249] [*1769?*

श्री

पुरवणी राजश्री विस्वासराव रावजी स्वामीचे सेवेसी

राजश्री सदासिव गंगाधर अन्याबा जयेपुरीहून करोलीनजीक गेले. बरोबर शामसिंग होता. आम्हासहि पत्र लिा कीं तुम्ही फौज घेऊन येणे. आम्हाकडे

तुम्हास पत्रे लिा म्हणून पत्र लिा होते. त्यासी पत्रे सा महिने लिहीत गेलो; परंतु ते गर्भश्रीमंत. त्याचे ध्यानात आमचा मजकूर कोठें असे. त्यासी उतरे लेहून पाठविली. ते कूच करून जाटाचे फौजेत सामील व्हावया गेले. जाटाची फौज जावली डीग याचे मध्ये असें. हे संकट जाणून पत्र लिा असे. पंत मारनिले विनंती करून आमचे कार्यास विलंब लागणार नाहीं. चौ दिवसाचे कार्य असे यास्तवं फौज आम्हाकडेच जाटाचे मुलकात उतरावी. दोनच रोज आमचें कार्य होऊन येईल. मग आपला उदेग करावा. विस्तारे काये लेहून? पूर्वीपासून आपण साहित्य करीतच आले. असो; आणखी कोण्हास ल्याहावें? आम्हीहि साहस करावयाचे ते करून आठ महिने हेहि ढकलिले. याजउपर आपले मरजीस विचारास येईल तेप्रमाणे असे. सेवटी सिमतर गुजराचे ठीक जाले तरी तो व आणखी कांही फौज इकडे निदान रवाना करावी. आधी उतम पक्ष आम्ही विनंती लिा तेच करावीं. फौजेस आपले गुंता पडणार नाही. बहुत इकडे कळले पाा. लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती. स्वामींनी आमची विनंती मान्ये खामखा करून आपसामध्ये कजिया एकंदर न करावा. राजश्री बाळाजीपंतासहि आम्ही लिहिले आहे व स्वामीसहि लिा असे. उभयेतां कजिया करून कोणाचे हातीं काही लागणार नाहीं. त्याचाहि पैका मामलती-वरीलच आहे. त्याचा निर्गमाचा विचार करावा. आपण बंदोबस्त करावा. ह्मी येणे हेहि मुस्कीलच असे. जमीदारापासून त्यांसी फौज जाटाचे पारपात्यस्तव इकडेच पाठवावी. हे महद कार्य असे. अविलंबे गुंता उरकेल येविसी विस्तारे कोठवर लेहून? लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶*Letter addressed to Vishwasrao Lakshman from some of his subordinates, reporting how Sadashiv Gangadhar was coming in the way of the writer.*

No. 250] *[1769?*

श्री

सेवेसी पुरवणी. फौजा येकत्र जाल्याचे वर्तमान आल्यानंतरी आम्हास बहुत आग्रह करून नवलसिंगानी राहाविले व मानसरूपहि येथून परवाचे दिवसी भरतपुरास बोलाऊन नेला आहे. तोहि उदईक येथे येईल आल्यानंतरी सर्व कळेल. सर्वतोमुखी दक्षण्यास थोडे बहुत द्यावे, न दिल्ह्यास सारे सरदार येक जाले आहेत, पारपत्य करितील यसी दहशत बालगितात. पाहावे, जाटाचा कारभार लबाड. मानसरूप आल्यावर सर्व कळेल. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The writer says that on getting news of the advance of the united forces of the Maratha generals the Jat has expressed willingness to make liberal concessions.*

No. 251] [1769

श्री

विनंती उपरी. श्रीमंताची पत्रे व आपली चिठी पाठविली ती पावली. पत्रे पाहून आमचे ठेऊन आपले पाठविले आहेत. चिठीत मजकूर लिहिला की सुज्यातदौलाकडे येका खाशाने सडे जांवे. वर्तमानासारिखे सर्वांनी मागून जावे उतम आहे, म्हणून लिहिले. यैसियास आगऱ्याचे मुकामी पलीकडे आम्ही सुचविले होते की, आधी फरोकाबादेकडे सेह द्यावा. हे गडबडले होते. भेटून गुंज फोडून मग दिलीकडे येतो. तूर्त तीन मजली इकडे आलो. अता * हिला ते भारी जाले आसो. उद्याचे मजलीहून जो विचार करणे तो करून जनाने पुढे जावे. आगाऊ बालाजी गोविंदास पत्रे पाठऊन ते फौज सर्व आणवावी. जो जाईल त्यास सामील * * * * * काये लिहिणे हे विनंती.

¶*Visaji Krishna reports the moves and the counter-moves in his campaign in the North.*

No. 252] [Recd. 8-2-1770 ?

छ + ११ सवाल सबैन माघ

हा महमद हुसेन सांडणीस्वार

श्री

सेवेसी विज्ञापना माहादजी सिंदे याचे व रामचंद्र गणेश यांचें बनत नाहीं. मसलतींत पेंच पडतात. यास्तव माहादजी सिंदे याजकडे येथून गणोजी कदम यास रवाना केले. त्याणी जाऊन माहादजी सिंदे यास म'कूल करून मारवाडाकडे गेले आहेत त्यास माघारे आणून रामचंद्र गणेश याचें व होलकराचें व सिंदे याचे ठीक करून द्यावें आणि त्रिवर्गानी काम बनवावें या डौलानें पाठविले आहेत. धोत्रजोडे पुण्यांतील आले होते ते मर्जीस न पडत यास्तव निमोणे देऊन जनोबा दामले यास पैठणास रवाना केला, याणे तेथें राहून धोत्रजोडे पाठवावे. नव्या तोफा वोतवावयासी बाला

¶*Owing to a disagreement with Ramchandra Ganesh, Mahadji left the main army and marched towards Marwar. An attempt is being made to harmonize their differences in order that they may act in concert. (The paper is mutilated.)*

+ पैवस्ती नाना फडणीसाच्या हातची.

No. 253] [9-4-1770?

श्री

श्रीमंत राजश्री तात्यासाहेब व राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

पोष्य आबाजी रघुनाथे[1] कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागाईत चैत्र शुद्ध १४ जाणून स्वानंदवैभव लेहावयासी लेखकास आज्ञा करणार धणी समर्थ आहेत विशेष. प्रां मजकूरचें वर्तमान तर राजे गुमानसिंगजी यांच्या शरिरास वेथा पांच च्यार महिने जाली. कांही उपाय चालिला नाहीं. त्यांचा काल जाला. त्याज करितां नजरेचे रुपये पांच हजार यावयासी विलंब लागला. राजेमजकुरांचा काल जालियावर त्यांचा पुत्र वडील महाराऊ उमेदसिंग राजीं बसला. वर्षी बाराचा आसे. त्यानें पूर्वीं राजश्री भोपतसिंग मामा फौजदार होते त्यांस दूर करून हाली फौजदारी राजश्री जालमसिंगजी झाले यांसी सांगितली आहे. त्यावरून त्यासहि नित्य तगादा करितां आतांसी रुपयांची निशा त्यांनी देविली आहे. रुपये पांच हाजार रोकड करून राजश्री विष्णुपंतबाबा याचे गुमास्ते राजश्री यादवराव तुकदेव याच्या मारफतीनें खेतसी धरमसी यांचे दुकानीं जमा केले आहेत. बहुत दिवस लागले म्हणून रागास न यावें. येथें आणिक उपाय नाहीं, त्याजकरितां आंतर पडलें, ते माफ करतील. चिटी द्यावयाची आज्ञा करवितील. सर्व प्रकारें आज्ञांकित आहों. सेवेसी श्रुत व्हावें. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ करावा हे विज्ञाप्ति.

¶*Abaji Raghunath explains that the delay in sending the Nazar of Rs. 5,000 from Gumansing was due to his death and the subsequent disorder in his Court.*

No. 254] [28-4-1770

पौ छ २९ सफर
ईहीदे

श्री

सेवेसी बाबुराव केशव साष्टांग नमस्कार विज्ञापना ता छ १९ मोहरम मुा काो सोनई प्रा अंतरवेद वर्तमान येथास्थित असे विशेष. नवलसिंग जाटाचे लडाईत

---

१ सिंद्यांचा चिटणीस काय ?

जखमी व ठार जाहाले त्याचे तेरीज आलाहिदा सेवेसी रवाना केले आहे. त्यावरू(न) सर्व विदित होईल. हुजरातचे नाव(नि)सीवार व पथके याचे याचे मोघम लिहिले आहे. उभयता सरदाराकडील याखेरीज आहे ते मागाहून पाठवितो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Baburao Keshav submits a list of casualties in a battle with Navalsing Jat.*

No. 255] [*4-5-1770*

पौ छ १३ सफर सन इहिदे

श्रीशंकर

सेवेसी नारो नरसी कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता। ७ मोहरम जाणौन मुा। हासियागंज आंतरवेद नजीक मथुरा येमुना उतर तीर येथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान वरचेवर तपसीलवार लिहीतच असतो. हलीचा मनसबा सिंदे होलकर व उभयेता हुजरात फौज व नजीबखानसुदा आंतरवेदीत आहेत. पुढे जाटाचा मुल्लक जफ्त करावा व बंगस व रोहिल याणी सरकारचा मुल्लक दाबला आहे तोहि जफ्त करावा यैसे ठराऊन जफ्तीस बाबुराव हरि व गणेश विठल हजारपर्यंत फौज देऊन आठ दाहा कोशाचे अजमाने पुढे जफ्ती बसवीत जावी मागाहून आपणहि जावे येणेप्राणे तूर्त निछेये केला आहे. जाठाची मामलेत होऊन श्नेह होवे यैसे जाठाचे मानस आहे. परंतु हे जारी भारले आहेत. मामलेत करीत नाहीत. ज्यापक्षी मामलेत न करीत तेव्हा केवल जफ्तीनच पैका फार मिलल हेहि कललेच आहे. सर्वाचे मतेकरून जाटासी श्नेह करून तूर्त पैका देईल तो घ्यावा म्हणजे फौजेची उस्तवारी होऊन येईल आण मनसब्यात बलहि पडेल. ते न करिता होलकर याचे मनसब्यास लागोन नजीबखानास विचारून मसलत केलिया कार्य सिधीस जाईल हे कलतच आहे. येका नजीबखानाच्या भेटीमुळे सर्वा लहानथोराकडील राजकारणे तुटली. तेव्हा पुढील मोठ्या मनसब्यास जक बसल यैसे दिसते. त्याहिमध्यें सर्वतोपरी धणियाचे पुण्ये आहे. प्रस्तुत सर्वाचे मते जाठाची मामलेत करून येमुना दक्षणतीरीच असावे. सर्वाची राजकारणे राखावी. पुढे बाजतबरसात जाहालेवर ज्या रीतीने सोईस पडल ते करून आंतवेदीतील मुल्लकहि सोडवावा. या मनसब्यास वहाली

करीत आहेत. यास विरोध पडत जात आहे. परिणामास काय जाइल हे नं कले. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. येथिल वैवाट आवघी सर्व आनन्वित. पूर्वीप्रमाा रंगास आली आसे दिसते हे विज्ञापना.

¶*Naro Narsi communicates that armies of Sindia and Holkar have advanced into the Doab where they are accompanied by Najibkhan. While most of the Generals are inclined to treat favourably with the Jat, Holkar under the influence of Najib has rejected the proposal and is contemplating a plan of action which is ill-advised and holds no chance of success.*

No. 256] [*17-5-1770*

पौ छ २९ सफर इहिदे

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

पो रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील वर्तमान ताा छ २० मोहरम (मुकाम सोनई पाा जबार प्राा अंतरवेद येथास्थित असे विशेष. आपण पत्र पाठविले ते पावोन बहुत संतोष जाहाला. लिहिला मजकूर कलो आला. मकरसंक्रमणाचे तील शर्करायुक्त पाठविले ते पावले. अत्यादरें स्वीकारिले. बहुत काये लिहिणे लोभ करावा हे विनंती.

¶*Ramchandra Ganesh and Visaji Krishna acknowledge to Nana Fadnis the customary present of sesamum seeds.*

No. 257] [*17-5-1770*

पो छ २९ सफर इहिदे

श्री

सेवेसी विज्ञापना ताा छ २० मोहरम स्वामीचे कृपेकडून येथास्थित असे विशेष. येथील वर्तमान नाजिबखान समागमे आहेत. जाठाकडील मामलतीचा मजकूर

---

१ परगणे.

आजपर्यंत ठीक नव्हता. त्यांस सांप्रतकाली जाठानेच मामलत करावी असे त्याचे चितांत येऊन कृष्णसिंग वकील, च्यार महिने येथे होता त्याणे बलोन चालोन येथील मजकूर आइकोन डिगेस गेले आहेत. आज उद्या येतील. यैसी लक्ष खंडणी व मुल्लक नवा घेतला आहे तो सोडावा वगैरे किरकोल जाबस्वाल याची याद लिहून दिल्ही ते नेली आहे. त्यास तेथे नवलसिंगानेहि मान्य केले आहे. साठ पासष्ट लाख देखील दरबारखर्च करार व्हावे * * * (मुलु)क सोडावासा ठरेल असा मजकूर आहे. करार होईल त्याप्रमाणे सेवेसी लिहून पाठऊ. कराराहि जालियास सेवटास जाणे फार कठीण. सरदाराचे नित्य नवे हिस्के फार बसतात. होलकराचे मते मामलत करू नये. सिंद्यांचे मते करावी * * * हुजूर आहेत. सरदारांसी बोलत नाहीं. असे आहे. नित्य रुसवे नित्य समजावीस. याप्रो दिनच्यर्या जात आहे. तिनी सरदार यांत. पैक्याची वोढ भारी, पैसा नाही. यामुले मात्र सेवटास जाईलसे आहे. जाठाचे मुलकाची जमी कांही जाली आहे. परंतु पैशाचे ठिकाण नाहीं. गाजुदीखान न बोलवितां भेटीस आले. समागमे आहेत. नजिबखान होलकराकडे, गाजुदीखान सिंद्याकडे आहेत. जाठाचे खंडणीपैकी चौथाई नजिबखानास द्यावी लागेलसे दिसते. हे काम जालियावर सरकारचा मुल्लक पठाणानी दाबला आहे तो सोडवावयाचा आहे. पठाणाचे वकील आले आहेत. सलुखाने सोडिलियास फार उतम. नाहीतर जुंजावे लागेल. सुज्यादौले याजकडे रा। पुरुषोतम माहादेव गेले होते. त्याचे वकील त्रिंबकदास घेऊन आले आहेत. पुढे त्यांचीहि भेट व्हावीसी इरादा आहे. त्याची भेट जालियास गंगापारचे रोहिले पठाण मुलूक सहजेच सोडून देतील असाहि मनसबा आहे. पुढे होईल त्याप्रमाणे लिहून पाठऊं. छावणीहि अंतरवे-दीतच होईलसे दिसते. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Terms to be granted to the Jat are discussed. While the Marathas demand eighty lacs Navalsing is ready to concede sixty-five. After the Jat is disposed of, the Maratha army is to march into Rohilkhand.*

No. 258] [*30-5-1770*

पो छ २९ रोवल इहिदे.

श्री

सेवेसीं बाबूराव केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ ४ सफर मु॥ प्रो सोनई प्रांत अंतर्वेद स्वामीचे कृपेकरून यथास्थित असे विशेष. येथील वर्तमान जाटाचे खंडणीचा करार पासष्ट लाख देखील

दरबारखर्च मिळून जाला आहे. हासेबंदीचा ठराव होणें थोडासा राहिला आहे. तीसपर्यंत दोनतीन महिन्यांत येतील. वरकड पुढे मुदतीप्रमाणे घ्यावे असा एक दोन रोजांत निश्चय व्हावासा आहे. परंतु सरकारांतून मामलत जालियामुळें होळकर अेजुर्दे आहेत, ते काय वोढतील परिणाम कसा होईल हें पाहावें. सिंदे याचें मत मामलत करावयाचें आहे. हें कार्य जालियावर पठाणाकडील पहिले महाल सलुखानें सोडावेसे आहेत. पुढें होईल तें सेवेसी लिहून. सेवेसीं श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Baburao Keshav Thakur reports that the Jat who has been reduced to submission agrees to a levy of sixty-five lakhs on his territory. The Maratha army is now heading towards the Rohilla country.*

No. 259] *[15-6-1770*

बंद २

वर्तमान अवरंगाबाद

ता। छ २० सफर

वार्ता आली आहे श्रीमंत माधोराऊजीस हयेदर नायेकाचे पत्र आले की सुला केलिया उतम आहे. हयेदर नाइकाचे लशकरांत माहाग फार जाले आहे म्हणऊन सुला करनार आहे. काही अगत्य जाणून पैका कबूल करील.

या दिवसांत अवरंगाबादेचे अधिकारी यानी फार दरवाजियावर ताकीद केली आहे व पत्रे लशकरची हरकारे आनितात त्या खतास रोबरो आपले नेऊन वर्तमान मनास आनितात. येथून कोन्ही खतपत्र लशकरास किंवा नासकास लिहितात, त्याजला जाऊ देत नाही. अवघी साहुकार लोकास व हरकारी यास ताकीद केली आहे की लशकरचे वर्तमान नासकास कोन्ही न लिहीत जाणे. लशकरात अवघे वकिलास ताकीद जाली. वर्तमान नवाब साहेबाचे दरबारचे न लिहीत जाणे. कदांचित जाहीर जाले तर प्रतिस्टा राहणार नाही. यावरून गरीब लोक फार भये वागवीत आहेत. दिलीकडील वर्तमान छ १ सफरचे आले. जाटानें सिखासी करारमदार केला की तेवीस लेक्ष रूपये याचा मुलुक त्याजला आपले जागिरीतून द्यावा. त्याही आपले फौजेनसी येऊन दिलीत नजीबखानास मारावे. त्यावरून सखि[१] दिलीपासून चालसा कोसावर आपले फौजेनसी आले आहेत. नजीबखानाने दोन फौजा केल्या आहे. येक फौज व आपण सिकाचे तोंडावर उतरला. येक फौज लेकास जाटाचे वाटेवर पाठविले.

¶*News from Aurangabad and also from the North about the skirmishes between the Jats and the Sikhs is communicated to the Peshwa. A treaty between the Peshwa and Haidar is also referred to.*

---

१ सिख.

No. 260] *[16-6-1770*

पौ छ २३ रावल इहिदे

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री नानाफडनीस स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक नारो नरसी कृतानेक सा। नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान तागाईत छ २१ सफर जाणून मुा। रामगड प्रां अंतरवेद कृपाकटाक्षेकरून येथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान वरचेवर तपसीलवार सेवेसी लिहीतच असतो. त्याजवरून श्रुत होत असल. हालीचे वृत जाटाचें मामलतीचा मजकूर ठराव पासष्ट लक्षपर्यंत होऊन कबुलात याददेखील जाली आण सरदार येकंदर होऊन निशापत्री करावयाचे वेलेस कृष्णसिंग वकील बोलो लागला जे जफ्तीमुले वसूल व पायेमली रुो वीस लक्ष वजा करावे, पंधरावीसपर्यंत सा महिन्याचे मुदतीने घ्यावे; बाकी राहेल तो येवज सालेसाल नवलसिंगाचे जातीवर पुढे घ्यावा. येणेप्रो। बोलताच ही गोष्ट कोणाचे चितास येईना. पेशजी बोलोन ठराव जाहाला येक आण कराससमई याप्रमाणे बोलो लागला तेव्हा मामलेतिचा तह सहजच राहिला आण या मामलेतीस मातबराकडील कारभारियाणी गुडगा दिला म्हणोन ही गोष्ट विलग पडली. येवडे मामलेतिची ही गोष्ट जाहली. पैका सद्या येत नाही तेव्हा वरकड मजकूर कललाच आहे. येथील कारभार सर्व लाहानथोर येणेप्रमाणे आहे. प्रस्तुत जाटाचा मुलुक आंतरवेदीतील याची जफ्ती करीत आहेत. वीस माहालपर्यंत नजीबखानाचीच खासगत जफ्ती आहे. वरकड मुलुक पेंढारी याणी लुटला. तमाम वसाडी मुलकाची आहे. जफ्तीमुले पैका यावयाचा कलतच आहे. सद्या नारो गणेश व बाबूराव यादव याचे नादी लागोन नजीबखानाचे मसलतीने चालत आहेत. पुढे काये परिणाम लागल तो पाहावा. येकव्या नजीबखानाचे विचारे सर्व आणुसंधाने तुटत आहेत. येसे आसोन नजीबखानामुळे सरकारात काही नफाहि नाही. ज्यास असल त्यास आसो येथे मातबर लोक वर्तमान जे बोलतात ते मी कार्यकारण आज्ञेप्रमाणे लिहीत असतो. कोणाचे गुणदोश लिहीत नाही. सर्व जे होणे जाणे ते धणियाचे पुणेकरून होते. सविस्तर वृत श्रीमंतास विनंती पत्री लिहिले आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Naro Narsi writes that the Jat prince who had originally agreed to a tribute of sixty-five lacs now declines to accede to it on various flimsy grounds. He further complains that affairs are being unduly protracted owing to the mediation of Najibkhan who is interested in frustrating Maratha designs.

No. 261] [Recd. 2-7-1770

पौ छ ८ रबिलोवल इहिदे.

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत असिलें पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री विष्णु माहादेव याजकडील ऐवजाविशी लिहिलें त्याचा जाब अलाहिदां पत्रीं लिहिला आहे त्याजवरून कळेल. ईकडील वर्तमान नवलसिंग जाट यांची आमची लढाई जाहाल्याचे वृत्त तपशिलवार पेशजीं लिहिलें आहे त्याजवरून कळलेंच असेल. अलीकडे आम्ही मथुरेवर येऊन यमुनातीरीं मुकाम केला. नवलसिंगाकडील वकील येऊन खंडणीचा प्रकार बोलत होता; तत्रापि जाबसाल सोईचा न करी यास्तव येमुना उतरोन अंतरवेदींत आलों. मुलकांत जप्तीस फौज पाठविली तेव्हां पनास पंचावनलक्षपर्यंत बोलों लागले. त्याजवर आम्ही सरकारतर्फेचा करार पाऊण करोड ऐन खंडणी व सरकारचा मुलुक सोडणें वगैरें कलमें ठराऊन याद करार करून वकिलाबा पाठविली आहे. त्याचें तर्फेनें रदबदली आहे. दोचहूं दिवसांत तेथून वकील येऊन पका करार होईल आणि अमलांत येईल तें मागाहून लेहून पाठऊं. नजीबखान व गाजुदीखान आमचे समागमेंच आहेत. सुज्याअतदौला व पातशाहा यांजकडील वकील आले आहेत, भेटी लौकरच होतीलसें वाटतें. दुंदेखान व आफज रहमतखान व अहंमदखान बंगस यांजकडीलहि वकील आले आहेत. प्रस्तुत प्रजन्यकाळ नजीक आला आणि मोठमोठे मनसबे करणे. दिवस थोडके राहिले. यास्तव या प्रांतीं यंदा छावण्या करावया लागतात. पुढें श्रीकृपेनें घडणें तें घडेल. आपल्यास कळावें यास्तव लिहिलें असें. बहुत काय लिहिणें? लोभ करावा हे विनंती.

¶*Ramchandra Ganesh and Visaji Krishna report their activities in the Doab after having overcome the Jats' resistance. Envoys from the Rohilla chiefs are pouring in Maratha camp with solicitations for peace and friendly understanding*

No. 262] [7-7-1770

पौ छ ११ जोवल इहिदे.

श्रीवरद

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

पो पुरुषोतम माहादेव कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ १३ माहे रोवल मुा फरुकाबाद श्रीभागीरथीतीर जाणोन स्वकीये लेखन

करीत असिले पो विशेष. बहुत दिवस जाले आपणाकडील वृत कलत नाही म्हणोन चित सांचित असे. तर आलिया मनुशाबराबर सदैव पत्री अनंदवीत असावे. इकडील वर्तमान तर प्रस्तुत सरदार त्रिवर्ग परगणे कोल प्रां अंतरवेद येथे छावणी करणार. जाटाकडील मुल्क तमाम उज्याड केला. मामलत आद्याप जाली नाही. होईल ते वृत मागाहून लिहू. तूर्त आम्हास नवाब सुज्यातदौले यांकडे पाठविले आहे. त्याचा वकील राये त्रिंबकदासहि समागमे आहे. श्रीगंगापार लखनऊस जाऊ. येथे फरुकाबादेस नवाब आहमदखान याचीहि भेट घेऊन जाऊ. काही सरकार कामे उपयोगी असतील ते करून मागती लौकरीच लस्करास सरदारापासी येऊं. ते वृत सविस्तर लिहू. आहमदखान व हाफीज रहमतखा व दुंदेखा हे येकत्र जाले आहेत. नजीबखान आपले फौजेस शामील आहे. शुजाऊदौले पातशाहा फिरंगी हेहि सूत्र आपलेकडेच आहे. श्रीकृपेने सरकारकामे उतम होतील ते सविस्तर लिहू. विस्तारे विनंतिपत्रे श्रीमंत स्वामीचे सो पाठविली आहेत त्यावरून विदित होईल. उतरी सनाथ करीत असावे. सेवक पदरचे जाणून सदैव पत्रामृती कृपा करून परामृश केला पाहिजे. पूर्वी पत्रें वरचेवर पाठविली. परंतु उतरी सनाथ न केले. तर ऐसे न करावे. सरकारचेहि पत्रोतरी कृतार्थ करणार अपण समर्थ अहेत. स्वामी-सेवा केली व पुढें करूं ते परस्परें श्रीमंताचे मनी बिंबेल व कृपा होईल तो सुदिन. सविस्तर चिरंजीव देवराऊ सो विनंति करील. दर्शनलाभ होये तो सुदिन. कृपा केली पाहिजे हे विनंति.

¶*Purushottam Mahadeo informs Nana Phadnis that the Jat's power has been broken and negotiations with other chiefs of the North have been opened.*

No. 263] [*18-2-1771*

श्री

श्रीमंत राजश्री नाना श्वामी-
चे सेवेसी

पो रामचंद्र[१] सामराज सां नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम ता फाल्गुण शुध्ध चतोर्थी चद्रवासर मुा सिराले येथे श्वामीचे कृपेकरून सुखरूप असो विशेष अलीकडे श्वामी कृपालु होऊन पत्र येऊन साभाल होत नाही. याजउपरी यैसे न

---

१ सुभेदार सिरवल.

करावे. सदैव पत्र पाठऊन सेवकाचा साभाळ केला पाा विशेष. चिरंजीव राजश्री रघुनाथराव बापूकडून गालियेरीकरून पत्रे वरचेवर येतात की अगर सारभोम याने घेऊन ठाणे बसविले. मथुरा येथे नवलसिंग जाटास मोडोन तेथे बदोबस्त पाताशाहानी केला. इटावे घेतले. अतरवेदींत कुरा जाहनाबाद कुल अमल सुज्यातदवलियाने बैसविला. मेरट पाा सरकारचा घेतला. गोहदकर जाट पाहातशाहास जाऊन भेटला. काही नजर देऊन गोहद गालियेर प्रांत येथील जाहगिरी परवाने पातशाही घेऊन आला. दाहा हजार फौज पंचवीस हजार तुफकदार[1] जमा होऊन सिकरबार तुवरधार गालियेरी नजीक दंगा माडला आहे. नुराबाद व कुलथ पाहाडीगाव नजीक गालियेरपर्येत ठाणी बसविली आहेत. दतियेकर राजे यानी उच्याड प्राा ठाणी घेऊन अमल बसविला. पंचमाहाल उद्वस, या दहशतीने जाले. आमचा किला मात्र रक्षोन जिवावर चिरंजीव राजश्री रघुनाथराव आहेत. दक्षणेंतून फौज राजश्री तुकोजी होलकर व माहादजी सिंदे जाऊन उपराला करून चमेलीअलीकडे तऱ्ही बदोबस्त राखावा ते काही घडोन येत नाही. किलियास नेमणूक बेहाडा येक लक्ष पाच हजार त्याजपैकी इसनेपासून सलास अर्बापावेतो दरसाल तीस हजार रुाे अताजी माणकेश्वर याचे जफ्तीपैकी तीस हजार रुाे अकार बाकी सवा दोन लक्ष रुाे लोकाचे बेगमीस नाही. लोकानी गवगवा केला आहे. श्वामीखेरीज आम्हास त्राता कोण आहे. याजस्तव राजश्री होलकर व सिंदे त्याजला पत्रे आपले नावे द्यावे की, गालियेर प्रांते उभयेता सरदार येकदिल होऊन गोहदकर जाटाचे पारपत्ये करणे यैसे पत्र द्यावे की, झासीकडे उमरावगिरी गोसावी याचा दगा तिकडे माडिला आहे. तेथेहि जाऊन उपराला करून गोसावी यांचे पारपत्ये करणे यैसे पत्र द्यावे की, राजश्री रघुनाथ रामचंद्र गालियेर किलियावर आहेत. त्यास तुम्ही खासा उभयेता जाऊन उपराला करून गोहदकर जाट व दतीयेकर राजियांचे पारपत्ये करून सरकारचा नक्ष झासी प्राते गालियेर प्रातेदेखील राजरजवाडियाचे करून सेवा येकनिस्टेने करून दाखवणे यैसे दिल्हे पाा. श्वामीनी श्रीमंत असताना राजश्री लक्षुमण नाईक चाबुकश्वार याजकडे वरात लक्ष रुपयांची चैत्र मासचे वाइदियाची आपणच श्रीमतास विनती करून देविली होती या मजकुरास राजश्री सखारामपत बापू वाकिफा आहेत. आपण नेट धरून कार्य केले येविसी लक्षुमण नाइकास रुबरू ताकीद पुणियात आम्ही सनिध असता ताकीद केलीच होती. यैसियास चैत्र मास च्योवीस दिवस राहिला. यैसियास आपण येविसी

---

[1] बंदुखवाले. तुफंग = A Musket.

4390

ताकीदपत्र राजश्री लक्षुमण नाईक चाबुकश्वार यांस देविले पा. तो यैवज राजश्री रघुनाथ रामचंद्र याजला त्याचे पिते रामचंद्र सामराज याजकडे यैवज देणे यैसे पत्र ताकीद देविली पा. येणेकरून येथे कर्जदारापासी आबरू राहील. श्वामीनी मनावर घेतालियाने आमची स्थित राहील. याजस्तव दया करून ताकीदपत्र पाठविले पा. आणीख कितेक विस्तारे कोठवर पत्री ल्याहावे? सिरवल येथे असो परतु उभीयाने अन्न खाते. सर्व प्रकारे आमचा निभाव करणार श्वामी समर्थ आहेत. चिरंजीव राजश्री सिदोपत जबानी वर्तमान सागता विदित होईल. चिरंजीव रघुनाथराव बापू आमचे लेक गालियेरीस आहेत याजलाहि हिमत धरून कामकाज किले मजकूरचे करीत जाणे यैसे पत्र दिले पा. मी सेवक पदरचा असे. उतर पा. कृपा असो देणे. हे विनंती.[1]

¶*Ramchandra Shamraj communicates to (Nana Fadnis) Nanasaheb the import of letters that he received from Raghunathrao Bapu from Gwalior, dealing with the activities of the various powers in the North including Navalsing Jat, Shuja-ud-daula and the Emperor. He further requests the addressee to write to both Sindia and Holkar requesting them to help Raghunathrao Bapu at Gwalior against the Northern powers which he regrets they have not rendered up till then.*

No. 264] [*15-3-1771*

पौ छ २७ जिलकाद फालगुन
इहिदे सबैन

श्री

श्रीमंत राजश्री रामचंद्रपंत तात्या
तथा राजश्री विसाजीपंत दादा

* * * * * * * *

तेथे तोफा चांगल्या आहेत * * * तोफा होत्या त्या सुज्यातदौला याणी किल्ला घेतला तेसमई नेल्या. येथे तोफा आहेत त्या चागल्या नाहीत याजकरितां दोन तोफा चांगल्या दलदार पंचरसी सवा सवा मणाचे गोल्याच्या घ्यावयाची परवानगी जाल्यास तेथून आणवू. परगणे सोगनपूर नगदपटी व ताा भरे ह * * गापूर चक्रनगर व सहसो येविसी विनंती करावयासी राजश्री दवाजीपंत आहेतच तोफाचे * * * * * * यास्तव लिहिले. यावर आपली मर्जी. बहुत काये लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶*Artillery is requisitioned from Ramchandra Ganesh and Visaji Krishna to invest a fortress. The paper is mutilated.*

---

१ याच मजकुराचें सखाराम बापूच्या नांवचेंहि पत्र आहे.

No. 265] [17-3-1771

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बाबूरावजी[1] स्वामीचे सेवेसी

पोष्य महादाजी बलाळे[2] साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागाईत चैत्र शुद्ध १ जाणून स्वकीय लेखन केलें पाहिजे. विशेष. आपणांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं ऐसे नसावें. निरंतर पत्रीं कुशलाल्य वृत्त व राजकीय लेहून संतोषावाप्ति करीत जावी. सांप्रतचें वर्तमान राजश्री विसाजीपंत दादा व महादजीबावा शिंदे वगैरें सरदारांनीं सनदा करून दिल्ली घेऊन बंदोबस्त केला. हें दादांचें पत्र सरकारांत आलें व आपलें पत्र घरास आलें त्यावरून कळलें. हें यश मोठें आलें. श्रीमंतांचें मानसहि ऐसेंच होतें म्हणून वारंवार पत्रीं आज्ञा जात होती, असें असतां राजश्री रामचंद्रपंत तात्यास अनुकूल पडलें. दादाच यां यशाचे विभागी होते. मुख्य साहेबकामावर निष्ठा सुदृढ तेथेंच यश; पुढें पातशाही बंदोबस्त होणें अमीर उमराव साबिकदस्तूर आपआपले पदावर आरूढ होऊन पुर्ता बंदोबस्त जाहला. त्यांत सरकारकिफायेत द्रव्य व मुलकाचा लाभ तोहि मनसबा करितीलच. कधीं कधीं पत्रद्वारां आपणांकडून वर्तमान कळत जावें, विदित असें. तिकडील वर्तमान वरचेवर लिहीत जाणें. आपलें घरचीं मनुष्यें समस्त सुखरूप आहेत. वरकड वृत राजश्री लक्ष्मणपंतीं लिहिलें आहे त्यावरून कळेल. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजें हें विनंती.

¶*This letter of Mahadaji Ballal Guruji refers to Maratha victories in the North and compliments Visaji Krishna and others on their brilliant achievements.*

No. 266] [17-3-1771

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री बाबुरावजी स्वामी-
चे सेवेसी

पाो रामचद्र शिवदेव सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा चैत्र शुध १ जाणून स्वकीय लेखन केले पाहिजे विशेष. आपण गेल्यादारभ्य पत्र-

---

१ ठाकूर. २ गुरुजी करकरे.

द्वारा साभाल होत नाही तरी यैसे नसावें. घरी पत्र येतच आहेत त्याजबरोबर स्मरण पुरस्कर आमचाहि परामर्श करावा उचित आहे. राजश्री विसाजीपंत दादा यानी व श्रीमंत राजश्री माहादजीबावा सिंदे याणी सारे सरदार मतांत मेळऊन येक विचारे दिलीचा बंदोबस्त किल्यासुध्रा केला म्हणौन कळले. तर ही महत्कृत्यें खावंदाची सेवकाचे हाते घडावी हे फळ स्वामी सेवेवर येकनिष्ट तिकडे आहे. पुढें पातशाही बंदोबस्त होऊन पातशाह स्थापून येक्या सूत्रें सारे मंडळ वर्तऊन सरकारकिफायत करणे ह्या गोष्टी खावंदाचे प्रतापे घडून यश येकनिष्ट सेवकाकडेच आहे. वरचेवर कृपापत्री संतोशवीत जावे. बहुत काये लिहीणे लोभ कीजे हे विनंती.

¶*The writer Ramchandra Shivdev notes with delight the success achieved by Visajipant and Mahadji Sindia and the capture of Delhi.*

No. 267] [*1-5-1771 ?*

श्री

सेवेसी विनंति सेवक भवानीशंकर जनार्दन करद्वये जोडून सा। नमस्कार विनंति विज्ञापना. तां। छ १५ माहे मोहरम रोज बुधवार पावेतो मु॥ आलकचंद भागीर्थीतीर येथे नवाबाच्या लस्करात आसो. यानंतरी आजचे वर्तमान तरी प्राथःकाली महमद इलचखान पातशा याजकडे गेले होते. साहींकाली नवाबाची स्वारी पातशायाच्या डेऱ्यास गेली. मेजवानी होऊन तमाशा जाला. दोन प्रहर रात्री फिरोन आपल्या डेऱ्यास आले. प्राथःकाली सोलावे तारखेस पेशखान्याचे डेरे पातशायाच्या पेशखान्याच्या डेऱ्याचे पुढे सज्यातपुरानजीक पा। व तोफखान्याचेहि कूच जाले. उदईक उभयेताचे कूच आहे. कोरड्याचा रोख धरला आहे. समागमे फिरंगी व इनायेतखान वगैरे सर्व आहेत या उपरी जे वर्तमान ठरल ते लेहून पाठऊ. बहुत काये लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*Bhavanishankar Janardan, a news-writer, sends information from the Emperor's camp about the Emperor and Inayetkhan and their departure for Delhi.*

No. 268] [*16-5-1771*

श्री

श्रीमत राजश्री विसाजीपंत
दादा स्वामीचे सेवेसी

साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान तागायत छ ३० मोहरम गुरुवार येथील सवा प्रहर दिवस मुक्काम पलवल येथास्थित असे विशेष. स्वामीनीं

4393

बुधवारची चिठी तिसरे प्रहराची लेहून पावते आज सकाल चौ घटिका दिवसा पावली. त्यासी येथील वर्तमान फरिदाबादेचे मुक्कामीहून सोमवारी रात्रीं पत्र लेहून आपले कासीद जोडी दोन पत्रे घेऊन आली त्याबराबर पाठवात्रे असे. ते काल तिसरे प्रहरपर्येंत न पावले, अपूर्व असे. दोन जोडी कासीद होते. त्याज उपर काल आम्ही मुद्दाम मवेती जोडी पत्र लेहून दोन प्रहरा बुधवारीं रवाना केली * * म्हणून ताकीद करून येथील वर्तमान सविस्तर लिहिले असे. त्याजवरून वर्तमान कळले असेल. त्याजवर आपली जोडी आणखी मंगलवारची पत्रें घेऊन आली. त्याजबराबर रात्री काल पत्र लेहून उत्तर पाा असे त्याजवरून विदित होईल. येथें सुलतानजी लांबाते व भिऊबा नाना होलकराची पथके स्वार च्यारहजार अला असे व सिंदेयाजकडील बहिरजी ताकपीर व कुशाबा व आणखी सरदार कदीम सर्व चार हजार फौज आली असे. तात्यासी माघारे घेऊन जावे हाच निश्चय असे. राजश्री तात्यानीं बहुत सालजाब केले. तुम्हासी कजिया आमचा काये असे? राजश्री विसाजीपंत आम्हास सरकारचे पत्र न देतां देसास येणें. आमचे ठायीं निक्रशच करून आमची रवानगी केली ते येऊन घेऊन जातील तरी येऊन उभयतां सरदारानीं व दादानीं यावे हे साल जाब केले. कालही मुाा करीत नव्हते परंतु लांबाते याकडील सकाल कारकून पत्रें आम्हास घेऊन आले त्या नकला सेवेसी पाठविल्या असेत त्याजवरून मुाा केला. सुलतानजी लांबाते व ताकपीर चार घटिका दिवसांत सकाल आले. कदम व भिऊबानाना वगैरे काल दो प्रहरा आले. तात्पर्य उभयेता सरदारानीं येथें यावे यासीं घेऊन जावे हा करार ठरला असे. येथें आमचा येत्न काये असे? आम्ही मात्र अटकून राहिलो. मुलुक उजाड करितात. पलवल कसबा लुटला. राजा तुलसीराम जाटाकडील उदेक जातो म्हणतो. आम्हांसहि निरोप देईनांत. मार्गाचे कठीण. बुनगे बहुत असे. रात्री रोजचा रोज घोडी चोर नेतात * * राजश्री धोंडो दत्तात्रय याजकडील स्वार अगदी. न * त्रिंबकराव नानाकडील स्वार आले ते कोठें राहातात कळत नाहीं. त्यासी चिठी त्याची पाठवावी. गोविंदपंतास धवलपुरास पावून येणें व आणखी सेंभर स्वार चांगले नेमून पाठवावें. येथून सुटो तेव्हां पुढें जाऊंन निभाव भगवंत अधीन असे. यासी सरदार घेऊन येत असेत. स्वामीही सर्वज्ञ असेती. कालगती ध्यानास आणून सर्व आपले आज्ञेत वर्तेत याप्रमाणें योग बनलिया सौरस घडोन स्वामीकार्ये होऊन ये तेच स्वामी करतील. विस्तारे काये लेहूं. लोभ असो दिला पाहिजे हे विनंति.

¶*The letter refers to a squabble among Maratha generals.*

4394

No. 269] '[23-5-1771

पौ छ १९ रोवल
इसने

श्रीशंकर

शेवेसी नारो नरसी कृतानेक सां नमस्कार विनंती यैसी जे. येथील वर्तमान ताा छ ७ सफरपर्यंत मुा हिंडण नदी येथास्थित असे विशेष. इकडील वरचेवर सविस्तर वृत सेवेसी लिहीतच असतो. त्याजवरून * * * * रामचंद्रपंतास हुजूर पाठवीत होते. यैशास सिंदे व होळकर याणी तूर्त ठेऊन घेतले. माारनिले दिलीपासोन वीस कोसी हुजूर यावयाबाा आले होते; परंतु तेथून उभयेता सरदारानी आणिलें. याजकरितां विसाजीपंत रुष्ट होऊन दिलीहून हुजराथ फौजसुदा कूच करून हिंडण नदीवर दिलीपासोन सातआठ कोसी आले आहेत. आपआपलेत फूट प्रत्येक्ष लौकिकात आली. उभयेता म्हराठे सरदार यासींहि बिघटली आण दिलीचा शाह सोडोन आले; याजकरितां जफ्ती सुक्रतालाचे आसपास होती ती जाबतेखानाने उठविली. पुढे मनसब्यास गोष्ट अवघड पडल. सद्या पातशा येतां दिसत नाही. सुज्यायेतदौला तो माघारा गेला. आपला पुत्र पाच हजार फौजेनिसी दिला आहे. इंग्रजानेहि आपला सरदार येक दिला आहे. सारांश तो काही जलद येता दिसत नाही. दुमेरपर्यंत आला तरी उतम. हे उभयेता म्हराटे सरदार ज्या कारभारात नाहीत, तेव्हा परिणाम काही विसाजीपंताच्या केल्यावर लागत नाही, यैसे मनसबेचे वतीने जन बोलतात. सारांश भावविना सिंदे होळकर याचे खेरीज कोणी लहानमोठा काही बोलत नाहीत. रामचंद्र गणेशाकारिता या उभयेतांसी विरूध विसाजीपंतानी धरलिया फळ नाही. विसाजीपंतास तूर्त ग्रहस्तानी पाच च्यार जण आहेत यानी चुकाविले आहे; याजकरिता मनसबा नासतो म्हणोन संकलित श्रीमंता व स्वामीस लिहिले आहे. सेवटास कारभार नासतो आण बदनक्ष होतो. आजपर्यंत याच ग्रहस्तानी येकमेकास आपरोक्ष चडी लाऊन नाश केला. कश्यासच जागा नाहीसा केला; आण पुढेहि तैसेच कर्तव्य करीत आहेत हे सेवेसी कळावे म्हणोन लिाा आसे. याचा विस्तार फारच आहे; परंतु नालिशा वारंवार मी कशास लेहू. येवडी थोरपणे धणियानी ज्यास दिली आहेत ते अवेवस्त कारभार मनसबा करितात. मी तो बातमी लिहिणार, परंतु बातमी लिहिणे तेव्हा सहजच सर्व आर्थ आधिक आगले जसी करणीत येतात ते लिहिलेच पाहिजेत. सेवकास समाधान वाटत नाही. चेरण ज्या दिवसी द्रिष्टीस पडतील तोच दिवस मजला धन्य आहे. घरी मुलास वाळवेकर थोरात तसदी देतो म्हणोन घरचे पत्र

मजला आले. यैशास ते कोणी पुण्यात आसले तरी माहाराजानी आज्ञा करून आथवा येक ताकीदपत्र वालवेस सादर करऊन मुलास कोणी काडीमात्र उपसर्ग न देत ते करणार महाराज समर्थ आहेत. निक्षूण ताकीदपत्र सादर वालवेस करवावे जे नारो नरसी कुलकर्णी मौजे बाहे हे सरकार चाकर याच्या घरी मुलाबालास कोणते येक गोष्टीचा उपद्रव केलिया कार्यास येणार नाही. तरीच घरचा बच्याव लेकराचा होईल, निदान जाणून सेवेसी विनंती केली असे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Naro Narsinh Kulkarni, the Peshwa's agent at Delhi, reports recriminations among Maratha Generals and expresses fear that this would lead to a complete failure of the expedition.*

No. 270] [*Recd. on 12-6-1772*

पा छ १० रबिलावल ज्येष्ठ सन सल्लास
पु सेवेसी विज्ञापना

श्री

शाहाकडून नवाब इसामुदाखान व सुजादवल्याकडून येलजखान व अनुपगीर गोसावी आले आहेत. ते त्रिवर्ग पातशाहनी पाठविले आहेत. रा दादोचे[1] व त्याचे बलणे जाहले. त्याजवर तोफाहि देशाकडे रवाना जाहल्या. पातशाहाहि येका दो रोजानी कूच करून येतील. सुजादवलेयाजकडे महिरजी ताकपीर व बालाराव गोविंद गेले होते तेहि आले. समागमे गोसावी व येलजखान आणिले आहेत. आद्याप निश्चये ठरला नाही. जापतेखानाची मुलेमाणसे तेथेच आहेत. जापतेखान फाहाडात आहे. हाफीज व दुंदेखान याचे वाकिल आले आहेत त्यां(चें) बोलणेचालणे जाहाले नाही. थोरले काम वजिराकडून निश्चये कामाकाजाचा करार जाहालियावर फिरकोली सर्व होऊन येतील. दौ चौ रोजात काय तो मनसबा होईल. परंतु स्नेहाचा प्रकार आहे. रा पाटीलबावा व सुजादवले पगडीभाई जाहले. येथे (प)गडी पाठविली होती. सरदचो[2] सुभा पातशाहानी मोगल ओलीस दिल्हा आहे. पथरगडची वस्ताभाव निघाली ती निमे पातशाहास दिली. बाकी राहिली ती सरकारात निम व निमे सरदाराकडे दिली. हाती व नगदी व जवाहीर हे राहिले आहे. पातशा रुपये मागता(त)

---

१ विसाजी कृष्ण. २ सरहिंदचा.

त्यासहि दो लाख रुपये द्यावेसारिखे करार जाहला आहे. माहाराजाचे प्रतापे-करून सर्व गोष्टी हा कालपर्यंत चांगल्या आहेत, पुढेही उ(त)मच होतील. वरकड बारीक मोठे वर्तमान वकील शेवेसी लिहीत असतील त्याजवरून श्रुत होईल. रा पाटीलबावास रा राघो महार यास सरकारची पत्रें येवजाविसी ताकीद पाठ(वा)वी व सिष्टाचारी येक पत्र राघो मल्हार यास. ते म्हणतात की आम्ही चाकरी करितो परंतु धण्याचे पत्र कधी येत नाही. याजकरितां आगत्य कृपा करून पत्र पाठवावे. सर्व कारभार तेच करितात. पाटीलबावा व दिवाणजी येकरूप आहेत. येवजाचा करारमदार देतो म्हणू(न) त्याणीच केला आहे. याजकरीतां पत्र अगत्य पाठवावे. येवज पाठऊन देणे व नरसिंगराऊ राम याची रवानगी करून पाठवणें म्हणून समाधानार्थ पत्र पाठवावयासी आज्ञा केली पाहिजे. मजला आज्ञा कराल ती रागे भरूनच केली पाहिजे तरी काम होईल. येथील वर्तमानें परभारे कळतच असतील. परंतु आपले आज्ञेखेरीज कोणी नाही. हिंदुस्तानांतहि दबाव माहाराजाचा भारीच आहे. व सरदाराचाहि दबाव चांगला आहे. कोणेविसीची फिकीर नाही. हुंड्या पावलियावर कृपा करून उत्तर पाठवावयास आज्ञा जाहली पाहिजे. वरचेवर ताकीद पाठवावी म्हणजे येवज हातास येईल. तेथील ताकीद आल्याखेरीज येथे कोणी बोलणार नाही. स्वामीचा पायासिवाय दुसरीकडे चित्त नाही. परंतु लढल्याचे [1]डोही पडलो आहे. स्वामी सेवा होऊन धण्याचे पाये दृष्टीस पडतील तो सुदीन असे. हुंडीच्या चिठ्या १० दाहा आहेत. हिंदवी तीन व गुजराथी सात येकून दाहा चिठ्या पावतील. कासीद उद्या घेऊन सेवेसी येतील. यास काही इनाम द्यावयाची आज्ञा केली पाहिजे. चोवीसा रोजाचा करार आहे. कराराप्रमाणे पावतील. श्रुत होये हे विज्ञापना.

¶*An important letter, the first sheet of which is unfortunately missing, mentions that envoys from the Emperor, from Shuja-ud-Daula and Hafiz Rahmat and other Rohilla chiefs have arrived in Maratha camp to negotiate terms of peace. Spoils from Pathargarh have been divided between the Emperor and the victors. The writer makes a special reference to the valuable services of Mahadaji Sindia. The writer appears to be a co-officer of Visaji Krishna Binivale.*

---

१ डाही=डाव, डाही पडणें, संकटात पडणें.

No. 271] *[15-6-1771*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बालाजीपंत दादा स्वामींचे सेवेसी

पो भास्कर बलाल सा नमस्कार विनंति उपरी येथील कुशल ता छ १ रावल मु पा इस्लामनगर यथास्थित असो विशेष. रा उमाजीपंतासमागमे पत्रे पाठविली ती पावलीं व ताकीदपत्रें पा तीहि पावली. आपले लिहिल्याअन्वयेच वर्तणूक करीत आहो. राजेश्वरास पा त्यास पूर्वीच पा असते तरी हरयेक जागा ठेंविला असता. प्रस्तुत आम्हाजवलच आहे. इकडील वर्तमान तर सांप्रत इकडील होलकर सिंदे याजकडील चारणकस पथके तमाम इकडे आली त्याणी लुटून पस्त केले आणि गंगातिरी चालले व तमाम घाटोघाटी उभयतांकडील पथके आली आहेत व आपल्या फौजा संभलेवरून गणमुक्तेश्वरचे सुमारे जाणार. होलकराची फौज गंगातिरी पोहोचली येसी वर्तमाने नानाप्रकारची रांगडे उठवितात. कोणी पैसा येक देत नाही. अत:पर इकडे गर्दीचा प्रसंग दिसतो. इकडे राहोन नफा दिसत नाही. यास्तव आपणास ताबडतोब लिा आहे. आपण लिा होते की रोहिलेयाची मामलत बिघडली. येशास मामलत जाल्याखेरीज तिनहि लस्करे पार उतरतील कीं काय? कोणी म्हणतात की राजश्री दादो मल्हार सुजातदौले याजकडे जाणार येसेहि बोलतात. त्यास कसे काये ते पत्र पावतांच लेहून पाठवावे त्यासारिखे करू. बरेलीकडील आमची बातमी आली त्यात लिा आहे की च्यार हजार फौजेनसी वीस दिवस जाले जाबतेखान सुजातदौलेयास भेटलाच होता. हाफीज रहिमत येक हजार फौजेनसी भेटावयास येतो हे वर्तमान कलल्यावर शाबादनजीक शाजाहापूर येथून कूच करून गोपा महूस सुजातदौले गेले. तीन रोज राहिले. हाफीज रहिमत येऊन लस्करात मुा केला आणि राहिले आहेत हे बातमी आणऊन बेइलाज जाणून माघारे लस्करात आले. भेटी जाल्या. परंतु चित्त शुद्ध नाही. जाबतेखानास सांगितले की पादशाचा व आमचा मिलाफ जालियावर तुझे कबिले सोडऊ याप्रो सांगितले. रोहिले हानिमध्येच आहेत. रोजदररोज सेदीडसे मरतात. याजमुले कोणी त्याजवल चाकर नोकर होते तेहि पलोन फरकाबाद वगैरे जागाजागा आले. कोणी आहेत त्यास दुखणी लागली आहेत येसे वर्तमान आहे. आपणाकडील वर्तमान कळावे यास्तव मुजरद लिहिले आहे. पत्र पावताच उतर देऊन मार्गस्त करावे त्यासारखे आम्हीहि गंगापार उतरून जाऊ अथवा महिनापंधरा रोज मुरादाबादेस मुकाम व्हावयाचे असिले तरी तैसेच ल्याहावे किंवा छावणीचा प्रकार असला तरी तैसेच ल्याहावे. त्यासारीखे वर्तणूक करू. पा मझोला (?) वगैरेविसी पादशाही

सनदा आल्या आहेत व सरकारचेहि पत्र आले त्यास राजारामपंताचे गर्गशामुळे ठाणेहि जागाजागा बसलीच नव्हती व होळकर सिंदे याणी जबरदस्तीने दाखला मोकाबेलाहि दिल्हा नाही. यास्तव निःकारण श्रम जाणून त्यांचे हवाले केले. सिबंदी कांहीं मागत होतो. त्यास ते हरामजादे प्रसंग पाहोन देत नाही येसे भाषण केले. होळकर सिंदे याच्या सनदा आल्या नाहीत. त्याही एकादो रोजी येतील. खलस पडलियास्तव येक पैसा वसूलहि कोणी देत नाही, या रितीचे वर्तमान आहे. कलावे बहुत काय लिा? आपले पत्र येईल त्याप्रा वर्तणूक करू. कृपालोभ करावा हे विनंति.

सा बाबाजी जगन्नाथ सा नमस्कार विनंती लिा परिसोन लोभ असो दीजे.

¶*Bhaskar Ballal reports the victorious advance of Sindia and Holkar on Ganamukteshwar thus forcing the Rohilla chiefs to fall back upon Farukabad. The Rohillas being thus defeated and disheartened cannot agree to a united plan of action.*

No. 272] [*11-8-1771?*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य
राजश्री बाबूरावजी स्वामीचे सेवेसी

पोष्ये राघो शंकर कृतानेक सा ना विनंती. येथील कुशल ता छ २९ राखर मुा पुणे क्षेम असो विशेष. आपणाकडील बहुत दिवस पत्र येऊन सांभाल होत नाही तरी यैसे नसावे, सदैव पत्रद्वारे सांभालीत असावे. यानंतर इकडील वर्तमान तर श्रीमंत कटोरेयास गंगातीरी स्वामीसंनिध आहेत. प्रस्तुत प्रकृति चांगली जाहे. वरकड हिंदुस्थानची पत्रें होळकर व सिंदे यांची श्रीमंतास आली की राजश्री रामचंद्र गणेश यास सर्व फौज सरदार राजी हो * * याजकडे आले सा जरीपटका व सिकेकटार याजकडे दिल्हे. त्यावरून श्रीमंताही कटोरेयाहून सरदारास पत्रे पाठविली आहेत की रा विसाजी कृष्ण याजकडे जरीपटका व कटार असता तुम्ही फिरोन त्याजकडे दिल्ही हे गोष्ट काये? याउपरी रामचंद्र गणेश याणी हुजूर यावे, विसाजीपंत दादाही तेथें असावे याप्रो येथे सर्व कारभारियाचे व श्रीमंताचे चित आहे. येविसी हलीहि येथून पत्रे गेली आहेत, मग काये ठरते ते पाहावे. आम्ही श्रीमंतापासी * * * * * * आहो परंतु काही योग घडोन येत नाही. येथील हुजूरचा प्रकार आपणास विदितच आहे. याजकरितां पेशजी राजश्री लक्ष्मणपंत बर्वे गेले त्याजबा येणार

श्रीमंत सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्ना येशवंतराव भोसले कृतानेक दंडवत विनंती. राजश्री खंडोजी सिंदे व मानाजी सिंदे व राणोजी सिंदे हे रा आबाजीपंत याणी आमचे ताबीन चाकरीस केले होते. येसियासी याचे घोडे बोरीचे बारीस भिलाचें युध्य जालें तेथें तीर लागोन पडले. राजश्री अंबाजीपंतास सांगितले आहे; तर घोडी उगवे ते केले पाहिजे. विदित जालें; विशेष काये लिहिणें. कृपा असों दीजे हे विज्ञाप्ति.

बाा छ २१ रमजान सरखेल व सेनापती व उदाजी चव्हाण.

¶*Yashvantrao Bhonsle requests the Peshwa to compensate the Sardars for the loss of horses in a skirmish with the Bhils. Ranoji Sindia is mentioned here as being under Yashvantrao (Yesaji Bhonsle—Shahu's illegitimate son) on the recommendation of Ambajipant Purandare.*

No. 29] [*21-8-1720 ?*

छ ९ जिल्काद

श्रीशंकरदातासमर्थ

माहाराज राजश्री राऊसाहेब स्वामीचे सेवेसी

सेवक आज्ञांकित दिगंबर मल्हार कृतानेक विज्ञापना. येथील क्षेम ताा छ २७ माहे शौवाल स्वामीचे कृपादृष्टीकरून असे विशेष. आज्ञापत्र जासुदासमागमे पाठविलें ते पाऊन संतोष जाला. मुचलका ये तोपर्यंत हतियांचा येवज तटून ठेववने म्हणून आज्ञा. येसियास पूर्वी मुचलकियाची नकल आली होती व नवाब

निजामुलमुलक याना नवाब येवजखाजीस जवाब लिहिला होता त्याची नकल येसी सेवेसी पाठविले होते. प्रविष्ट होऊन वर्तमान विदित जाले असेल. त्या जवाबाच्या हरजवाब आणीक येवजखांजी (खालचा अर्धा भाग गहाळ) उतरेकडील वर्तमान अद्यापि तसेच आहे. नवाब निजाममुलकयास पातशाहाजीनी लिहिलें आहे कीं, तुम्हावाचून हजूरचा बंदोबस्त अपेतर[1] आहे. हे तो कर्नाटकच्या मोहिमेस अटकले आहेत. मुबारजखानास व दिलावरखानास लिहिली पाठविली आहेत कीं, बादजबरसात येऊन सामील होणे. येसे वर्तमान आहे. विदित जाले पाहिजे हे विनंती. दादो हरीनें पैका न दिल्हा व सखोपंताकडील पनास रुा त्याचाहि वाट न जाली. खर्चाची तसदी आहे. स्वामीस सेवकाचा अभिमान सर्व प्रकारे आहेच. विनंती मात्र लिहावी. स्वामी पारपत्य करणार समर्थ आहेत हे विनंती.

¶*The letter refers to the movements of the Nizam, whom the emperor wishes to go to Delhi and improve the state of affairs.*

No. 30] *[11-5-1722*

शाहू रुमाल १

रो रोजकीर्दी.

माहे शाबान जेष्ट मास सुा इसने

तारीख ६ रोज जेष्ठ शुध सप्तमी भृगुवासर

पत्रे चिटनिसी

किा राजपत्र राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान यांस जे. चांदाचे निमे राज्य राजश्री कानोजी भासले यांणी चांदेकरापासून लिहून घेतले होते. त्यास सन अशरीनामध्यें त्याणी राा बाजीराऊ माहादेव याजबाा हुजूर लिहिलें कीं आपलें राज्य आपणास बाहाल करावे. आपण नजर रुपये १००००० येक लक्ष व सरदेशमुखी रुपये १०००० येकूण येक लक्ष दाहा हजार

त्यावरून स्वामीनी राा कानोजी भोसले यास आज्ञा करून त्याचा कथला वारून चांदेकराचे राज्य चांदेकरास बाहाल करून सदरहू रुपये

नजर	सरदेशमुखी
१०००००	१००००

यो येकलक्ष दाहा हाजार त्याकडे करार केली. त्यापैकी बाजीराऊ माहादेव याचे गुजारतीनें वसूल जाला बाा हिसेब रुपये ६५००० बाकी रुा ४५००० राहिले

---

१ दोषयुक्त, worst.

4493

त्यापैकी बाकी बाजीराऊ यानी त्यास सोड दिल्ही रुपये ९००० बाकी ४०००० चालीस हजार रुपये राहिले तो यैवज वसूल होऊन हुजूर आला पाहिजे, याकरितां तुम्हास आज्ञा केली असे व चांदेकरास सदरहू यैवज तुम्हाकडे देणे म्हणून पत्र लिहिले आहे तरी तुम्ही त्याजपासून यैवजाचे निर्वाह करून घेणे. याखेरीज सन इहिदेचा चौथाईचा तह करून चिरंजीव फतेसिंग भोसले व कानोजी भोसले याकडील कमाविशदार चांदेयास पाठविले. त्यास हुजूरचा यैवज चौथाई व सरदेशमुखी बाकी राहिला आहे, त्याचा वसूल घेणे. कदाचित कानोजी भोसले याणी फौजेच्या बले वसूल नेला ऐसे चांदेकर म्हणतील तर त्याणी घासदाणा घेतला असेल तो सरकारच्या यैवजांत मजुरा पडतो ऐसे नाहीं. तुम्ही सन अशरीनची बाकी व सन इहिदेचा यैवज बिलाकुसूर वसूल घेणें प्रा॥

¶*King Shahu asks Bajirao to realize from the chief of Chanda the balance of the contribution levied last year.*

No. 31] [*22-11-1722*

पौ छ २४ सफर जाबसूद छ २९ सफर.

श्रीशंकर

तीर्थरूप माहाराज मातोश्री आईसाहेब वडिलांचे
सेवेसी

बालकें त्रिंबकराऊ दाभाडे सेनाखासखेल दंडवत विनंती विज्ञापना यैसिजे. माहाराजांचे कृपेकरून कार्तिक कृष्ण नवमीपावेतो येथास्थित असो. यानंतर बहुत दिवस जाहाले. वडिलीं लेकराचा पत्र पाठऊन परामृश न केला. तेणे-करून चिताचे समाधान नाही. लेकरू सर्वस्वे अन्याईच आहे; परंतु वडिलानी त्याजवर निष्ठुरता धरालिया त्यास दुसरा जीवनउपाये आहे येसें नाही; तरी कृपा करून आज्ञापत्रीं सनाथ केलें पाहिजे. येथील कितेक वृत रा॥ नाईक यास सांगितले आहे ते वडिलांचे सेवेसी निवेदन करतील तो अर्थ माहाराज चितांत आणून लेकराचें ऊर्जित करणार वडील समर्थ आहेत. मजला पायाखेरीज तारणार दुसरा नाही. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना

¶*Trimbakrao Dabhade requests the Queen Mother (Tarabai) to show kindness to the writer and not neglect him. The bearer Naik, he adds, will communicate personally all that the writer has to say.*

No. 32] [3-1-1733

श्री जयती

अपत्यें नानानें साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम तागायत छ २७ रजब मुकाम कसबे पुणे येथास्थित असे विनंती. स्वामीची आसीर्वादपत्रें छ १६ रजबचीं मौजे रुई रामेश्वरचे मुकामचीं पाठविलीं तीं पावोन वर्तमान कळलें. पुढेंहि स्वामीचें व नवाबाचें दर्शन जालियावरचें वर्तमान लेहून पाठवावयाची आज्ञा केली पाहिजे. जकातीयांस दस्तकें करार दूर करून यादी पाठविली तेणेप्रमाणे जकातीचे कमाविसदारास बोलाऊन पष्ट यैवजाविसीं ताकीद केली असे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Nanasaheb requests the Peshwa to send him a communication regarding the latter's interview with the Nizam. Where is Rui Rameshwar? (See No. 104 further on.)*

No. 33] [9-9-1724?

श्री

विनंति उपरी. राजश्री आनंदराऊ तुम्हापासून आले ते नवाबाकडे गेले. तेथून येथें आले. तुमचे वर्तमान कळले. त्यास नवाबानीं सांगितले कीं तुम्ही तेथेंच राहाणें. कदाचित तो[१] निघोन चालिला तरी ते क्षणीं खबर पाठविणें. नवाब स्वार होऊन येतो. तरी वरचेवर वर्तमान लिहून पाठविणें. जर तो सकाळ तेथेंच राहिला, तरी तेथेंच येतील. हे विनंति. तुम्ही जे वाट सांगितली त्याच मार्गें ते येतील. तुम्ही त्याचे पाठीवर गेला तरी राहून लिहून पाठविणें हे विनंति.

त्याचा त्यानींच मनसुबा केला. आम्ही बोलिलो नाहीं. परंतु जे वाट तुमची होती ते नेमिली. हे विनंति.

¶*Bajirao's own hand: addressed probably to his brother or some intimate Sardar to whom Anandrao Sumant was sent from Satara who then proceeded to interview the Nizam. This probably refers to the battle of Sakarkhedla where Mubarizkhan was defeated by Nizam-ul-mulk.*

---

१ मुबारीजखान.

4495

No. 34] [9-9-1724

श्री

विनंती उपरी. मोगल साखरखेडलियांत शिरला म्हणून तुम्ही सांगोन पाठविलें. यैसियास, जरी त्यामधें झुंजायाची धमक असती तर गावांत न शिरता. दहशत खादली तरीच गांवाचा आश्रा धरिला. याउपरी तोंड देईल न दे हा भरवसा नाहीं. रातबिराती पलावयाची तजवीज करतील कीं काय हें नकळे. तरी तुम्ही चौकशीनें राहोन खबरदारीनें खबर बरोबरी[1] पावीत जाणे. आम्ही आजी नवाबास सांगोन येथेंच मुकाम करविला. तुम्ही तेथेंच राहाणें. याउपरी करोलांचा[2] मजकूर तुम्ही येमाजी धुमालास रात्रींचे तजविजेस पाठविलें, परंतु त्यास निघतां आले नाहीं, याजकरितां राहिले म्हणून यैकिलें. तरी आजी मागती लाग लाऊन त्यास आणवणें. रात्रीं कालीं राजश्री रंभाजी निंबाळकर याजकडे कांहीं मऱ्हाठे आलें म्हणून यैकलें. तर सत्यमिथ्या लेहून पाठविणें. करोलाची तजवीज अगत्य करणें. संपन्नास राऊत त्यांतून निघोन येतील तेव्हां राहिल्याची अवसाने खता होतील. आणि कितेकांचीं राजकारणें लागतील. याजकरितां हें कार्य अगत्य करणें. त्याचा मुद्दा जो तुम्ही कबूल कराल तो मान्य असे. त्याप्रमाणें करऊन देऊं. परंतु अगत्य तेवढें अगदीं तजवीजीनें येत तें करणें. हें विनंति.

¶*The writer asks for strict vigilance being kept on the movements of the Nizam.*

No. 35] [1724 ?

श्रीराम

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री केशोपंत गोसावी यासी

सेवक बापूजी श्रीपत नमस्कार विनंती येथील कुशल जाणून स्वकीये लिहिणे विशेष. तुम्ही पत्र पाठविलें तें प्रविष्ट जालें. पुण्याच्या कोटाच्या व शाहार दरवाजियाच्या किल्या आवध्या रा हरिपंताजवल आहेत. त्यांतून शाहार दरवाजियाच्या किल्या आपल्याकडे देवाव्या म्हणून लिहिले. यैसियासी शाहार दरवाजियाच्या किल्या येकापासी आण कोटाच्या दरवाजियाच्या किल्या येकापासी

---

१ वरचेवर. २ बंदुकवाले.

4496

असाव्या असा अर्थ नाही. त्याहीमध्यें सालगुदस्ता ठाणें राजश्री पिलाजी जाधवराऊ याकडे होतें. तेव्हा शाहारदरवाजियाच्या किल्या तुम्हाजवल व कोटाच्या किल्ल्या राजश्री संभाजी जाधव याजकडे होत्या की काये हे लेहून पाठवणें. ठाण्यात बरकंदाज आहेत त्यांची हजिरी गैरहजिरी तुम्हास मनास आणीत जाणे व पैका येईल तो दामाशाईनें देत जाणें म्हणून राजश्री आपानी आज्ञा करून बिरशास (?) पत्र दिल्हें आहे म्हणून लिहिलें. यैसियास ठाणे राजश्री पिलाजी जाधवराऊ याजकडे होतें, त्याचा रुसवा जाला याकारितां ठाणें राजश्री पंतीं व आपानीं चिरंजीव राजश्री नारोपंत याच्या हवाला केलें. यैसे असतां तुम्ही बरकंदाजाची हजिरी गैरहजिरी आपण मनास आणून व पैका वाटून देणें तो आपण देऊन म्हणून बिरशास कागद करून घेतला यावरून अपूर्व वाटलें. हे गोष्ट तुम्हास उचित होती यैसा अर्थ नाहीं. बरे तुमच्या विचारास आलें तें तुम्ही केलें. आंम्ही तुम्हास शब्द काशास लाऊ ? परंतु हे गोष्टी तुम्हा योग्य नव्हती. याउपरी तुम्ही बरखंदाजाची हजिरी गैरहजिरी मनास आणणार व पैका येईल तो दामाशाईनें वाटून देणार आणि शाहारच्या किल्या आपल्या हवाला करून घेणार तेव्हा चिरंजिवानी काये करून असावें ? हा अर्थ कांहीं तुम्ही मनांत आणिलात कीं नाहीं हें कलत नाहीं. सारांश गोष्टी ठाणे रा। पिलाजी जाधव याचें निसबत होते, त्याणी रुसवा केला, याकरिता चिरंजीव रा। नारो-पंताचें हवाला ठाणें राजश्री पंती केलें आहे. निमित्य कीं हेहि त्यांचेच निसबतीचे. गुदस्ता जेयाप्रमाणें राजश्री संभाजी जाधव याजकडे कोटाचे व शाहार किल्या व तोपची यांची देखरेख चाकरी हजिरी गैरहजिरी यैवज मालवज दामाशाई देणें व गस्त पाहारा कोटाची व शाहारची त्याजकडे होती त्याप्रमाणें चिरंजिव नारोपंतीं करावी, यैसी राजश्री पंताची आज्ञा आहे. त्याप्रमाणें करितील. तुम्ही कांहीं यांत मन घालावें यैसें नाहीं. येविशी विशेष काये लिहिणे. लोभ असो दीजे हे विनंती. अंमल राजश्री संभाजी जाधव याजकडे होता त्याप्रमाणे करितील तुम्ही काही मन न घालणे हे विनंती. ठाणें रा। पिलाजी जाधव याचें निसबतीचे आणि राजश्री नारोबाहि पहिलेपासून त्यांचेच निसबतीचें, याकरितां केलें हे विनंती.

¶*Bapuji Shripat, officer of Poona-Saswad region, writes to one Kesopant why he should interfere in the arrangements for guarding the fort and gates of Poona and why he should not hand over the keys. The letter gives an interesting account of the wall of Poona and its connection with the brothers Pilaji and Sambhaji Jadhav.*

No. 36] [17-3-1725?

श्री

राजश्री व्यासो भुजबलराव

उमेदतुमुलुक गोसावी यासी

§ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्ये श्री फतेसिंग भोसले दंडवत विनंति उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करणे विशेष. तुम्ही पत्र पाठविले पावोन वर्तमान विदित जाले. जलगांवीहून कूच करून बारामतीवरून कन्हेरी पिंपरीवरी जातों. तेथून सेलगांवावरून इंदापूर प्रांते जाऊन, भीमातीरीं येक दोन मुकामे करून, लोकांचा मार्ग पाहातो. लोकास ताकीद करून रवाना करावे म्हणून लिहिलें. तरी लोकास ताकीद करून रवाना केले आहेत. येऊन पोचले असतील, पोचतील. तरी तुम्ही पत्रदर्शनी कूच दरकूच जाणें. बालेघाट प्रांतीचे सरदार बांडगर व पांढरे व राजश्री माधवराव पिंगले व राजश्री फिरंगोजी निंबालकर येकत्र होऊन फौजबंदी करणें. राजश्री प्रधानपंताचा आग्रह कीं, तुम्ही त्यास सामील व्हावे येविसीं येथहि राजश्री अंबाजीपंतास पत्र आलें आहे. तरी तुम्ही आपले खर्चावेचाची अनकूलता पाहून जे गोष्टीनें आपले अकलेस दगा न होये तें करणें. जेणेकडून आपले फौजेचें संरक्षण होऊन वोड न पडे ते करावें. येविसी तुम्हास पूर्वी जें लिहिणें तें लिहिलेंच आहे. राजश्री प्रधानपंत व निजामनमुलुक कदाचित दक्षण प्रांतीं जावयाचा विचार करितील तरी ते कांही आपले चवथाईचा तह केलियावेगल जाणार नाही. तरी तुम्हीहि येविसी आपला विचार पाहून जे गोष्टीनें तुमचा त्याचा बनाव होऊन उस्तवारी होये, च्यार टके मिलेत, ते गोष्ट करणें. दक्षणप्रांते न गेले, आणखेकडे जातील, तरी जो विचार कराल तो बरा दढतर करून जावे, येविसी बहुत ल्याहावे तरी सूज्ञ असा. रा छ १२ रजब बहुत काय लिहिणे हे विनंती §

¶*Fatesing Bhonsle instructs his Sardar Vyas Bhujbal to act with circumspection.*

No. 37] [28-3-1725?

श्रीमलारीमार्तंडभैरवाये नमा

श्रीभीमाशंकर

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

सेवक आज्ञाधारक नरसो कुसाजी साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल फालगुण बहुल १२ द्वादसी जाणौन स्वकीये स्वानंदवैभवलेखन आज्ञा

केली पाहिजे. आपणास नवाब साहेबीं स्वामीच्या दर्शनास पाठविले आहे. आपण शुक्रवारीं चाकणेस आलो. स्वामीचे जाणे श्रीजीस जाले. आजी वर्तमान यैकिले की तळेगावांस येणे जालें. तळेगावीं मुकाम आहे किंवा पुण्यास त्वरेनें जाणें होईल हे कृपा करून आज्ञा करावी. आपणहि सत्वर दर्शनास येतों. भेटीनंतर परस्परें वर्तमान कळों येईल. श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामी प्रतिपदेकारणे येणार म्हणोन वार्ता आहे, त्याचेहि सविस्तर वर्तमान लिहिले पाहिजे. बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे हे विज्ञापना.

¶*Narso Tukaji deputed by the Nizam seeks an interview with Chimaji Appa.*

No. 38] [*31-5-1725*

नकल

श्री

पूर्वील राजपत्र राजमुद्रासहित शाहूमहाराज यांचे व बाजीराव बलाल प्रधान व श्रीनिवास परशराम प्रतिनिधि यांचे सिक्क्यासुधा त्याचा तर्जुमा.

स्वति श्रीराज्याभिषेक शके ५२ विश्वावसु संवछरे अधिक आशाढ शुा १ इंदुवासरे क्षत्रियकुलावंतस श्रीमंत स्वामी राजा शाहू छत्रपति राजश्री उतरदेशाधिकारी वर्तमान भावी माहासंस्थानी शोभासंपन्नयुक्त राहाणारे देवस्थाने मालव देश दक्षणदेशचे राहाणार प्रधान सिंदे व होळकर व पंडित माहाराष्ट्र देशाचे व देवदैत्य यासी आज्ञा करितो. सिसोदे आमचे चुलतबंधु हाटसिव्ह याचे अवरस पुत्र व्याघ्रजित सत्तावंत देश मेवाळ येथें पिंपळगावीं राहाणार ते रसज्ञविनयगुणेकरून मीमांसादिशास्त्रसंपन्न सत्पुरूष येकान्वय उत्पन्न प्रभु त्यास याजवर अनेक उपद्रव दूर करण्यास सर्वांनी सर्वकाल यास अखेर करून रक्षण करावे याकरिता आज्ञापत्र लिहिलें व अष्टप्रधान याणी सदैव प्रतिवर्षी बंधुपेक्षा उत्कृष्ट संभाळावे. हें आमचें वाक्य रक्षण करावें. प्रतिवर्षी नवीन पत्राचा अक्षेप न करावा हेंच पत्र प्रिय मानावे. पिपले संस्थान लक्ष रुपयाचे आहे तेथे च्यार वर्ण राहातात याजकरिता आम्ही उपद्रव दूर करितो. या गावची मर्यादा सीमा खंडण करू नये. जो करील त्याचे पूर्वज नर्काप्रति पावतील. यवन याणी उपद्रव केल्यास डुकर भक्षिल्यासारिखे होईल हे आज्ञापत्र अधी पाहून वागावे. मोर्तब असे.

¶*King Shahu issues instructions to all powers in the North concerned to extend protection to Hatsinh, a certain cousin of his, residing at Pimpalgaon, a village granted to him as a Saranjam.*

4499

No. 39] [1732?

श्री

विनंति उपरी पूर्वी बांडे गायेकवाड यांचें युध्य जालें. त्यावर रा। उदाजी पोंवार कृष्णाजी पोंवार परभू येकत्र होऊन पाटण्यावर आहेत. रघोजी बांड सांगाते आहेत. दमाजी गायेकवाड फिरोन यांवर येतों. यांउपर रा। रंभाजी निंबालकर वगैरे पाचसाहजार फौज कासारबारीनें उतरली. कवडियावर रवाना केली यैसी वार्ता आहे. पाहावें. उत्तरेकडील वर्तमान तों स्वामीस विदित असेल. हे विनंति.

¶*This appears to be addressed to Bajirao reporting the fights in Gujarat between the Bande and the Gaikwad and other Sardars.*

No. 40] [4-5-1727

छ २३ रमजान

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंति स्वामीनी आज्ञापत्र पाठविले तेथें आज्ञा जे मुलकांत बाकी कदमाकडील व पिलाजी गायकवाड याजकडील वगैरे जबरदस्तीनें वसूल करणे. स्वार पाहिजेत तर पाठऊन देऊन. त्यास रोजमरा देणे. बाकीसाकी राहिली आहे ते वसूल करणे. प्रस्तुत बराणपुरचा सुभा तीन च्यार हजार फौजेनसी मुलकात आला आहे. त्याजबरोबर राजश्री चिमणाजी दामोदर व धीराजी पवारहि आहेत. गोविंद सिंधेश्वर जाऊन सामील जाहाले आहेत, गोविंदपंताच्या चितांत गनिमाकडील ठाणी आहेत यासी उपसर्ग द्यावा. फौज प्रस्तुत थालनेर परगणियांत आहे तेथून कूच करून बेटावद परगणियांत मौजे पास्टे ठाणे ढमढेरियाचे आहे, त्यासी खटखट करून घ्यावे; तेथून आमलगावचे ठाणे प्रा। जलोद येथे दाभाडियाकडील आहे तेहि घ्यावे. आमच्याहि ठाणियाचे कितेक ग्रहस्तास सईल्य आहे. गोविंदपंतहि आम्हासी घासाघस करितो. प्रस्तुत तांब्र ह्या मुलकांत आहे तों स्वार न पाठवावे. पुणियासी गेलियावर राजश्री त्रिंबकरायाबरोबर जमाव देऊन रवाना करावे. राजश्री दलपतराय ठोके याजवर जिल्हेदार आवरंगाबादेहून आला आहे. तो व राजश्री मानाजी जाधव येक होऊन, कास्टीचें ठाणे ठोकियाचें आहे तें पाडून टाकावें, याजकरितां उभयेता गावास मोर्चे लाविले आहेत. दलपतराव पलोन गेला आहे. त्याणेंहि मुलकांत प्रलय बहुतच केला होता. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*The Peshwa is asked to delay sending a detachment to recover tribute held back by Pilaji Gaikwad and Kadam as the Nizam's army is reported to be advancing upon Khandesh.*

No. 41] [25-5-1727

श्री

राजश्री बाजी पंडित प्रधान
गोसांवी यांसी

⸎ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री कान्होजी आंगरे सरखेल रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल-लेखन केले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले तें प्रविष्ट होऊनू सविस्तर कलों आले. कल्याण भिंवडीचे यैवजपैकीं बाकी राहिली आहे तेविशीं कितेक विस्तारें लिहिलें तरी आपण जो अर्थ लिहिला तो उचितच. गतवर्षी दक्षणप्रांतीचा मनसबा त्या प्रकारीचा जाहाला. यावर्षी तो अवघाच कसाला मोगलाचे प्रवाही गुंतोन तेच गोष्ट परिणामास न्यावी लागली. त्यामुलें रुपया कोठून येईल, आणि कबुलात तो मनसबियामुलें भारीच जाहाली. येक यशोधन मात्र मेलविले. उतरोतर श्रीने यैशाच यशांचे पात्र करावे. वरकड आपणाकडील यैवज येथील वोढीमुलें राहिला. त्याचा तपसील आम्ही ल्याहावा तरी आपणास न. कलेसें काय असे. मुलकी वर्तमानहि आपण आईकतच असतील. जेथें पाच ताा यावे तेथं एका रुपयास भ्रांत जाहाली तेणेकरून आमचीहि हलाखी जाहाली आहे ते पत्रीं काय ल्याहावी ? श्रीकृपेनें आपली आमची भेटी जाहाल्यावरी सविस्तर कलेल तोपर्यंत जे ल्याहावें ते परिहार यैसेच दिसेल. अन्यथा आपणापेक्षा इष्टमित्र सुहृत्संमधी दुसरे कोण आहेत ? याचा साक्ष श्री असे. हाली आपल्या लिहिल्यावरून रुा २००० दोन हजार पाठविले आहेत. घेतले पाहिजेत. राहिला यैवज आपणाकडील तोहि प्रविष्ट करून जाणिजे. रा छ १४ माहे सौवाल बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Kanhoji Angria sends Bajirao 2,000 rupees pleading his inability to send more.*

No. 42] [8-7-1727

श्री

राजमान्ये राजश्री गोविंद कृष्ण मुतालिक
देशमुखी प्रांत श्रीवर्धन गोसावी यांसी.

सेवक चिमणाजी बलाल नमस्कार सुाा समान अशरीन मया अलफ. श्रीहरिहरेश्वरी ब्राह्मण अतिरुद्र श्रावणमासी करितील यासी येणेप्रमाणें साहित्ये करून देणें. ब्राह्मण असामी २२ बावीस भात कैली :—.

		नख्त	रुो
१॥≈	ब्राह्मण दर असामीस	११	ब्राह्मणास दर असामीस रुा
	८१॥ येकूण		॥ यो तुपास

॥≈ देवाच्या नैवेद्यास

———

१॥।

देवापासी दिवियास

तेल ॥। सेंर दाहा

२॥ दक्षणा देवास

२ नित्य दक्षणा

।॥। समाप्तीचे दिवसीं दक्षणा।

—

२॥

१ किरकोळ उपसाहित्यास

———

ा उत्तरेश्वर येथे ब्राह्मण अनुष्टा- नास असामी १ १४॥।

येकूण

भात मण	नख्त रुा
॥१॥।	।॥। तुपास
नैवेद्यास	।॥। दक्षणा
॥१	—
	१
⌣मण	तेल सेर
२॥	॥॥५

येकूण भात येक खंडी साडेसतरा मण व यैन रुा साडेपंधरा व तेल सेर पंधरा येणेप्रमाणें देणें. येथून ब्राह्मणाची याद पाठविली आहे. याखेरीज तीर्थरूप राजश्री राऊ याकडून ब्राह्मणाची याद आली तरी येथील यादींत जे ब्राह्मण असतील ते अनुस्ठानास लावणें. दुसरे ब्राह्मण न लावणें. राजश्री राऊ याचे यादी आली तऱ्ही तुम्हीं हे यादीखेरीज दुसरा ब्राह्मण न लावणे. ब्राह्मणाची यादी अलाहिदा पाठविली असे जाणिजे. याखेरीज श्रीकालभैरव येथे अनुस्टानास ब्राह्मण यासी भात मण ॥१॥ दीड मण व रुा तुपास ।॥। निमे येणेप्रमाणें देणें जाणिजे. ब्राह्मणास पाने व सुपारी लागल ती देत जाणे. जाणिजे. अनुस्टानाच्या ब्राह्मणास नारेल १० दाहा देणे. अनुस्टानाखेरीज ब्राह्मण असामी २६ सवीस आहेत यासी दर असामीस भात॥३ तीन मण प्रमाणे तीन खंडी अठरा मण भात देणे जाणिजे. छ २९ जिल्काद.

¶*Chimaji Appa instructs Govind Krishna, his agent at Shrivardhan, as regards the number of Brahmins to be engaged in a certain Anushthan and fixes their remuneration for the same.*

4502

No. 43] [14-9-1727 ?

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ
व ताा राजश्री आपा स्वामीचे
सेवेसी

आपत्ये मल्हार तुकदेव कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. स्वामीच्या आसीर्वादेकरून ताा छ ९ सफर परियेंत कुशल असो विशेष. दरबारीचें वर्तमान वरच्यावर स्वामीचे सेवेसी लेहून पाठविले आहे त्यावरून विदित जाले आसेल. विजयादशमीस राजश्री सिदोजीराऊ निंबालकर सरलस्कर यास सरलस्कर दिल्हें. बहुमान वस्त्रें हती मोतियाची जोंडी दिल्ही. स्वामीस वर्तमान कलावें याकरितां लिहिलें असे. राा रघोजी कदम आसलियास[1] आले होते. पुढे राजश्री नरसीपंत पाठविले. हा प्रसंग उरकला याकरितां आसलियाहून माघारे जाणार, गेले असतील. याउपरी दसरा जाला; स्वामीनी सातारियांस आले पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Letter from Malhar Tukdeo to the Peshwa : intimates that the dignity of Sarlashkar was conferred upon Sidojirao.*

No. 44] [After September 1727

श्री

श्रियासह चिरंजाव विजइभव राजश्री बाबा यासी प्रति येसूबाई आसीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन करीत गेले पाहिजे विशेष. कसबे सासवड येथील कुलकर्ण्याचा व कर्यात मारचा देशकुलकर्णाचा कथला पुरंदरे-याचा व अत्रेयाचा लागला होता. तो इनसाफ राजश्री ' स्वामीनी काा मारच्या गोतमुखें केला. पुरंदरे खरे जाले. अत्रे खोटे जाले. यैसियास राजश्री आबाजीपंत आपले भेटीस आले आहेत, तरी सर्वप्रकारें याचा अगत्यवाद धरून राजश्री स्वामीनी निवाडा केलियाप्रमाणें साहित्यपत्रें देविलीं पाहिजेत, कोणेविषई अनमान केला न पाहिजे. बहुत काये लिहिणे, लोभ असो दीजे हा आशीर्वाद.

¶*Yesubai, mother of Sachiv Naro Shankar, asks for the execution of the orders passed on the dispute between the Atres and the Purandares.*

---

१ आसलें शिरवळजवळ.

No. 45] *[5-10-1727*

श्रीजयती ·

राजश्री बाजीराव पंडित प्रधान
गोसावी यासीं

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नेहांकित खंडेराव दाभाडे सेनापति रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करीत गेले पाहिजे विशेष. तुम्ही लोणीवरी आलियावरी रा। अंताजी मलार पाठविले; त्याणीं सविस्तर सांगितलें. त्याजबा। आपली आमची भेटी व्हावी म्हणून चाकणेकडे यावेंसे सांगोन पाठविलेंच आहे. त्यास हाली राजश्री आऊजी निलकंठ आज गुरुवारीं दोंप्रहरानंतर येथे आले. याजवरून विचार पाहतां याउपरी दिसगत लावावीसें नाही. जे कर्म करणें तें त्वरेनें करावे. त्यास आम्ही तुम्ही भेटोन विचार करावा लागतो; तरी तुम्ही पाबलाकडे न जातां चाकणेचे रोखें लस्कर रवाना करून, उदईक तुम्हीं व राजश्री अंबाजीपंत येथेंच येणें. आमची वेथाहि दृष्टीस पडेल. आनखी पांचसात भातेनें[१] विचार आहेत. तेहि तुम्हीं आम्हीं येकत्र होऊन करून विचारें आमचें यावयाचे जालें तरी येऊन. आम्ही जावें लागते, वेथेनें अनमान केलियानें कार्याची गोष्टी नाहीं. हा विस्तार मानिलेस सांगितला आहे. ते लिहितील त्यावरून कलेल. आपण येथे येऊन जो विचार तुमचे आमचे विचारे होईल तो करून विलंबावरी घालायाचे नाहीं. कलले पाहिजे. बहुत काय लिहिणें. रा। छ ३० सफर लोभ असो दीजे, बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Khanderao Dabhade requests Bajirao Peshwa to come to him without any loss of time to hold consultations regarding future action.*

No. 46] *[11-10-1727?*

श्री

राजश्री राघो अनंत
गोसावी यांसीं

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री कान्होजी आंगरे सरखेल रामराम उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करणे. यानंतर तुम्ही

---

१ प्रकारें.

पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊनु सविस्तर कलो आलें. स्वार व्हावयाचा निश्चय केला होता; त्यास गनिमाचे सेल्तीस्तव राहाणे होऊनु चिरंजीव राजश्री सेखोजी आंगरे व राजश्री आपाजी माणकेस्वर यास पा आहेत. त्याचे भेटीनंतर सावंत कललेच असेल. मुख्य गोष्ट फौजसमेत आजीच्या उद्याच्या दिवसात येऊन पोहचावें. पुढे आम्ही राजश्री बाजीराऊ याचे विचारावितिरिक्त नाहीं. जाणिजे. रा छ ६ रालोवल बहुत काये लिहिणे.

¶*Kanhoji Angria gives an assurance to Ragho Anant that he espouses the cause of the Peshwa.*

No. 47] [*22-10-1727*

श्री

राजमान्य राजश्री गोविंद कृष्ण मुतालिक दिा देशमुखी प्रांत दंडाराजपुरी गोसावी यांसी

सेवक चिमणाजी बलाल नमस्कार सुा समान आशरीन मया अलफ. वेदमूर्ति गोविंदभट करमरकर वास्तव्य श्रीहरिहरेश्वर यास तुम्हाकडून सालमजकुरी देसमुखीच्या येवजी भात मण पाच मण बारुले मापे देविले आहेत. याप्रमाणे भट मारनिलेस पावऊन, पावलियाचे कबज घेऊन, हिसेब खर्च लिहिणे. त्रिंबक विश्वनाथ श्रीवर्धनी तुम्हापासी लिहिणार, हुजरून नेमून दिले आहेत. त्याप्रा त्याच्या हातें लिहिण्याचें प्रयोजन घेणें. दुसरियास ठेवाल तर न ठेवणें. ते तुम्ही येका मते कार्य प्रयोजन करीत जाणें. त्रिंबक विस्वनाथास दुसरेकडे पाठवाल तर न पाठवणे. जाणीजे.

छ १७ रबिलोवल.

¶*Chimnaji Ballal orders Govind Krishna, vice-deshmukh of Danda-Rajpuri, to exact work from Trimbak Vishvanath who has been appointed from Poona.*

No. 48] [*26-10-1727*

श्री

+राजश्री बाजीराव पंडित प्रधान

गोसावी यांसी

ℒ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित फतेसिंग भोसले दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत

+ पाठीवर शिक्का फत्तेसिंगाचा.

असले पाहिजे विशेष. प्रस्तुत बातमीचें वर्तमान आलें आहे कीं, निजामनमुळुक यांचे कूच भागानगरीहून होऊन तीन मजला आला. आवाई तो शाहरास जावयाची आहे; परंतु त्याचा विचार कोणास कलतो येसे नाही. ये गोस्टीचा विचार आपण काये केला आहे ? रा बाबूराऊ वकीलहि आले आहेत. त्यास सविस्तर वृत कललेच असेल तेहि मनास आणून या पत्राचे उतर पाठविले पाहिजे. छ २१ रबिलावल बहुत काये लिंहिणे लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶*Fatesing after intimating to Bajirao the movements of the Nizam inquires what subsequent steps he proposes to take.*

No. 49] [*24-11-1727*

पौ छ २१ रबिलाखर
ऊर्फ मार्गसीर्ष.

श्री

पुा चिरंजीव राजश्री नाना यासी आसीर्वाद उपर

येशवंतराव पवार अद्याप येत नाही, त्यास सत्वर पाठवावे म्हणून लिहिले ते कलले. रवाना जाहाले. गेलेच असतील.

बहिरजी बाबर व भवानजी ताकपीर व बालोजी पलांडे यास पाठवावे म्हणून लिहिले ते कलले. ऐशियास रवाना जाहाले. येऊन पोहचतील.

सरकारच्या पागानीं लौकर यावे तेहि येत नाहीं; तरी त्यास ताकीद करून पाठवावे म्हणून लिहिलें तें कलले. ऐशियास येथे सदासिवपंतास ताकीद केली असे. जे राहिली असेल ते येऊन पोहचल. त्याचा कारकूनहि येईल.

बहिरजी बोरगे याची नेमणूक इकडे असतां घरच्या कजियाकरितां राहिले तरी चाकरीचे दिवसांत कजिया घेऊन बसतील, तरी कसे कामास येईल. याजकरितां त्यास पाठवावे म्हणून लिहिले ते कलले. ऐशियास त्यास ताकीद केली. गेले. येऊन पोहचतील.

तोफखान्याकडील करोल वगैरे सरंजाम पाठवावा म्हणून लिहिले ते कलले. ऐशियास रवाना जाहाले. तेथें पोहचले असतील.

सितोले नाहावीकर वगैरे याचे ऐवजाची नेमणूक करून स्वामीकडे पाठविले. त्यास ऐवज पावला कीं नाहीं म्हणून लिहिलें तें कलले. ऐशियास त्यास यैवज देऊन निरोप दिल्हा ते येऊन पोहचतील.

येणेप्रो कलमे साहा रा छ १९ रबिलाखर बहुत काये लिहिणे हे आसीर्वाद.

¶*A paper addressed to Nanasaheb containing queries and replies given to them upon various topics.*

No. 50] [1727?

श्री

आसीर्वाद उपरी. गुजराथची सनद द्यावी यैसा विचार दरबारी जाहला आहे. त्यास सांप्रत आम्ही तुळजापुरास जात आहो. तिकडून आलियावरी जैसा विचार कर्तव्य तैसा करून अगर अनकूल पडेल तरी निरोप जाहालियास आटपून येऊन. यानंतर राजश्री उदाजी पवार हे कंठाजी कदम याजवल कटकट करितात म्हणून कलले. यैसियास अल्पासाठी कटकट करावी यैसा अर्थ नाहीं. तुम्हास काही गुजरातेंत जाणें नाहीं. त्यासहि तुमच्या मुलकांत येणे नाहीं; आणि उगीच अल्पासाठीं कलह काये निमित्य करावा ? जवलपास असतील तरी तुम्हीं त्याजकडे येक शाहाणे मनुश्य पाठऊन ते आपल्या विचारांत अनुमतांत येत तें करणें. राजश्री उदाजी पवार यास सांगून याची त्याची कटकट न होय ते केलें पाहिजे. + अवलकटीसी[१] कटकट केली हे कोण शाहाणपण आहे; तरी तुम्ही अगत्यरूप दोनच्यार पत्रे त्याकडे सेवटी भला माणूस पाठऊन ते आपले जागा मुलकांत सुखरूप राहात, पवाराचे राऊताचे अगर आपले राऊताचे वाटे न जात ते करणे. तुम्ही त्याचे वाटेस पवार न जात ते करणे. ह्या सरदाऱ्या मातबर आहेत. हे क्षुल(क) दावे करावे हें पाजीपणाचें कर्म आहे. सेवटीं पुरतें कार्य साधेल तेव्हां जें करणें तें करावें. परिछिन ताकीद करणें. लोभ असो दीजे हा आसीर्वाद. हाच कागद त्यास दाखवणें हा आसीर्वाद.

¶*The Peshwa writes to Chimaji Appa to warn Kanthaji Kadam and Udaji Pawar against acting inimically towards each other.*

No. 51] [14-2-1728

छ १९ रजब

श्री

श्रीमंत राजश्री राऊ स्वामीचें सेवेसी

पोष्य भिवराऊ कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ १४ रजब मुकाम मौजे पिपलकुटे पाा आबलनेर जाणून स्वकीय ल्याहावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. काली मौजे बोरकुड येथील मुकामीहून पत्र पाठविलें आहे, त्यांत लिहिलें आहे की करवंदीच्या बारीनें जावयाचा विचार केला आहे, म्हणून लिहिले आहे. त्यास आजी छ मजकुरी राजश्री दमाजी सोनवणी याचे स्वार आजणठेयाच्या प्रांताकडून आले त्याणी बातमीचें वर्तमान सांगितले कीं,

---

+ बाजीरावाचें अक्षर. १ आरंभीं व ?

नबाब आजणठ्यास आला होता, तो माघारे येक मजल गेला. समागमे राजश्री चंद्रसेन वगैरे मराठी फौज तीन साडेतीन हजार आहे; व आपल्या कटकांतील बातमीस जोडे गेले होते तेहि आले. त्याणीं हेंच वर्तमान सांगितलें. याकरितां मागती विचार केला कीं, धुलकोटच्या घाटें जावें. उदईक कूच करून जलोद परगणयांतून तापी उतरून जातो. पुढे जे घडोन येईल ते खरे. स्वामीस कळावे याकरितां लिहिलें असे. राजश्री दमाजी सोनवणी आजी मुकामी आले. त्यानी सविस्तर वर्तमान विदित केले. त्यास नवाबाचा रोख कांहीं घाटाखाले यावे हा नाहीं, याकरितां जलोदावरून आगवदा(?) वरून बारी चढून जावे हा विचार केला आहे. वडिलास कळावे म्हणून लिहिले आहे. आमचे किरकोळ लोक आसतील ते पाठविले पाहिजे व राजश्री गोविंदपंत व संताजी मोरे यास लोकर सामील होयेत ते केले पाहिजे हे विनंती.

¶*Bhivrao reports the manœuvres of his army in Khandesh and the movements of the Nizam.*

No. 52] [*25-2-1728 ?*

श्री

राजश्री बाजीराऊ पंडित
प्रधान गोसावी यांसी

⸙ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री कान्होजी आंगरे सरखेल रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन केलें पाहिजे. यानंतर चाकणेच्या वतनाचा सर्व प्रकारे अभिमान धरून, स्थापना करावयाचे तुम्ही कबूल केले आहे. त्यास आन्यथा होते यैसे नाहीं, हा भरवसा आहे. प्रस्तुत किलेदाराचा आपला गर्गशा होऊन स्थलास आपण वेढा घातला आहे. यैशास पाहातां अर्थी स्वल्पाचा विशय आणि मोगलाईच्या तहास अंतर दिसोन येते, हे गोष्टी उचित नाही. कलह वारेसें होत असेल तरी करावें. निमित्य कीं सर्व आपण जाणतात. त्याहीमधें स्वऱ्यातील (स्वराज्यातील?) सनदापत्रा तुम्ही करून देऊन, वतनाचा अभिमान धरिला. तिकडूनहि आमचा बोलबाला व्हावा, हें तुम्हास अगत्यच आहे. येप्रसंगी आमच्या लिहिल्यावरून वेढा उठविला यैसे जाहाले तरी वतनाचे अभिमानपूर्वक साध्य तुम्ही करणार त्याचें सार्थक झालेंसे होईल. पुढे सिनाजीची (?) बोली तों

+ अक्षर वेगळें.

सातारियाचे मुकामी आपली आमची जाहाली आहे, त्याप्रमाणें आम्हाकडील वतनाचा अमल स्थलांत अमलदार बसोन चालिला म्हणजे त्यास अंतर होणार नाही. सध्या वेढा उठऊन तह आमचे विद्यमाने करावा. तुमचे आमचे विचारें जसे होईल तसेच करून, नागोजी वगैरा वादी वेढ्यास आहेत. गावात सुलतानजी कडू व काजी यांच्या हवेल्या होत्या त्या बलात्कारे जाऊनु जालिल्या आणि स्वछंदे वर्ततात. आपण तो त्यास कैद करावयाचे निश्चयात्मक भाशण केलें होतें. परिणाम असा दिसतो. यांत विस्तार काय ल्याहावा? याजउपरी तुमच्या उचितास येईल तें केलें पाहिजे. बहुत काये लिहिणे रा छ २९ रजब हे विनंती.

¶*Kanhoji Angria's letter to the Peshwa. Kanhoji being anxious to occupy his Vatan in pargana Chakan offers himself to act as mediator between the Peshwa and the commandant of Chakan. Chakan was at this time under the rule of the Nizam.*

No. 53] [*14-3-1728?*

पौ छ १४ साबान

श्री

तीर्थरूप राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

अपत्ये माहादाजी अंबाजी कृतानेक सास्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान ता छ १३ साबान गुरुवार परियेंत मुकाम सासवड येथास्थित असे विशेष. आम्ही राजश्री देवजी सोमवंसी याजकडे गेलो होतो. त्यास मारानिले राजश्री स्वामीचे आज्ञेप्रमाणें कुल फौज घेऊन हुजूर गेले. काली बुधवारी तरडगाव पा फलटण येथे गेले; आजी गुरुवारी कृष्णातीरी जाऊन मुकाम करितील. उदईक अगर परवा राजदर्शन होईल. दोन हजार घोडे आहे; आणिकहि पाच सातसे जमा होणे आहे. स्वामीस वर्तमान कलावे याकारितां लिहिले असे. याउपरी आम्हास राजश्री स्वामीनी आज्ञा केली होती की तुम्ही सोमवसी यासी सातारियाकडे वाटे लावणे, आणि राजश्री चिमाजीपंत कोकणप्रांते उतरतात, येवेलेस तुम्हीहि चाकरीस असावे हें उचित आहे; तरी त्याजकडे जाणे. त्यावरून आम्ही स्वामीकडे यावयास्तव काली सासवडास आलो. स्वामी बाहेर निघाले कीं काये? पुढे जावयाचा विचार कैसा आहे तो लिहिला पाहिजे. आज्ञापत्र आलें म्हणजे सेवेसी येतो. सेवेसी शृत होये हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ambaji writes to Chimaji Appa that as per order received from the Peshwa, he has despatched Deoji Somvamsi with his forces to Satara.*

No. 54] [*14-9-1728*

राजमंडळ रोजकीर्द सुा तिसां माहे सफर.

तेरीख २० माहे सफर भाद्रपद बहुल सप्तमी मंदवासरे भाद्रपद बहुल पंचमी गुरुवासर चिटणिसी पत्र धर्मोजी बलवंतराऊ देवकाते यास पत्र जें, पो वसमत सरकार नांदेड हा माहाल अजम खाने आलम यास मोगलाईकडून जागीर आहे. त्यास तुम्ही चौथाईखेरीज जाजती वसूल घेता धामधूम करता. गतवर्सी संभाजी राजेयाकडील वसूल जाहला आहे तो मजरा देत नाही, म्हणून विदित जाहले; तर निज़ामनमुलकाकड तह जाहला आहे जे रा संभाजी राजेयांचा वसूल जाहाला आहे तो मजरा द्यावा येैसा तह आहे, त्याप्रमाणें त्याकडील वसूल मजरा देऊन बाकी राहिला यैवज गुदस्ताचा वसूल घेणे व सालमजकुरीहि हिसबु चौथाई प्रा घेणे. जाजती तगादा न करणे म्हणून पत्र १

¶*King Shahu orders Dharmoji Balvant Deokate not to exact more than what is due as chauth from the pargana Vasmat. He also asks him to remit the dues of Sambhaji of Kolhapur who is entitled to receive them according to the terms of the treaty with the Nizam.*

No. 55] [*7-10-1728*

श्री

तहनामा राजश्री बाजीराव पंडित प्रधान यांसी सवाई संताजी भोसले सुहूर सन तिसा अशरीन मया अलफ राजश्री चिमणाजीपंत फौज सहवर्तमान रेवा उतर तिरी स्वारीस जात आहेत. त्यास आपण फौजेनसी सामील होऊन. येैशास आमचा माहाल मुकासे आहेत त्यास तुमचे फौजेनें उपसर्ग न लावावा. आम्ही तुमचे मुकासियांत उपसर्ग न लावावा. वर्तावे कलमे बीा पुढें परमुलकीं गेलियावर येणें तहप्रमाणें

मालवा मुकासा तुमचा आहे त्यांत आम्ही उपसर्ग न द्यावा कलम १

राजपत्राचे आमचे जे मुकासे आहेत त्यास तुम्ही उपसर्ग न द्यावा कलम १

परमुलकी गेलियावर फौजेमुलें जो टका आकाराल त्यापैकी दिवाण वाटा दर सदे रुा २० वीस काढून बाकी रुा ८० राहातील ते फौजेवर गणतीवर वाटून द्यावे कलम १

सदरहू प्रा उभयतानी वर्तोन येक विचारे मनसबा करावा छ १४ रबिलोवल.

¶*The paper mentions the articles of treaty concluded between Bajirao I and Sawai Santaji Bhosle.*

No. 56] [17-10-1728 ?

श्री

राजश्री कान्होजी आंगरे
काका गोसावी यासीं

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री बाजीराऊ बलाल प्रधान आसीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहिले पाहिजे विशेष. दताजी गबाजी प्रभु याचा व नार प्रभु याचा ता पेण येथील देशकुलकर्णाचा कजिया लागला आहे. ऐशास पेसजी आपण हरदुजणाची मनसुफी करून निमे दताजी प्रभूस व निमे नार प्रभूस वतन दिल्हें. यास दताजी प्रभु कबूल नाहीं. नार प्रभु निमे वतन चालवीत आहे म्हणौन कलो आले; तरी पुरातन वत(न)दाराचा लोप करून निमेप्रा दोघास द्यावें हे गोष्टी उचित नाहीं याउपर हे पत्र लिहिलें असे. तरी पूर्वील पत्रें दताजी प्रभुजवलील आपणाजवल आहेत ती मनास आणून बरहक इनसाफ करून दताजीप्रभूची वतनावरी स्थापना केली पाहिजे. जाणीजे रा छ २४ रालावल बहुत काये लिहिणे; लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶*Bajirao Ballal writes to Kanhoji Angria to bestow an hereditary office of "Desha-Kulkarna" on Dattaji Prabhu.*

No. 57] [10-11-1731

श्री.

सहश्रायु चिरंजीव राजश्री वासुदेव जोसी यासी प्रीतिपूर्वक रामचं(द्र) जोसी आसीर्वाद उपरी. येथील कुशल ता कार्तिक बहुल अष्टमी सौम्यवार पावेतो मो जंजिरे कुलाबा सुखरूप असो विशेष. तुम्ही पत्र पाठविले तेथें लिहिलें कीं रा चिमाजीपंत यास वधूचे विचारणेस रा नारोपंत याची कन्या कुलाबास आहे. तेथें जाऊन वधूचा निश्चय करून लेहून पाठवणें; व येविसीं गंगाजान्हवी मातुश्री राधाबाई याही सांगितले होते, त्यावरून आम्ही कुलाबास येऊन, वधूचा निश्चय करून, मार्गसीर्ष मासी वद्यपक्षी (स)तमी अष्टमीस निश्च(य) केला असे. त्ये दिवसी वधूसहि येकादश चंद्र आहे, येविसी राजश्री सरखेल यांही मातुश्रीस पत्र पाठविलें आहे त्यावरून कलेल. व वधू तेथे घेऊन यावी लागत्ये येसियासी येथून साहित्य

होणे ते होईल. त्यासिवाये जें साहित्य लागेल ते तुम्हास करावे लागते, याकरितां हें पत्र लिा असे; तर तुम्ही साहित्याचे विचारणेत असणे. येविसी बहुत काय लिहिणे हे आसीर्वाद. हे पत्राचे प्रतिउतर येई तो आम्ही येथेच आहो; तर सत्वर प्रतिउतर पाठवणे हे आसिर्वाद.

हेंा गणजोसी याचे आसीर्वाद लिखितार्थ परिसीजे हे आसीर्वाद.

¶*Ramchandra Joshi informs Vasudeo Joshi that he, as directed by Radhabai, has fixed upon a suitable bride for Chimajipant and asks him to make proper arrangements to receive her, on her way to Poona.*

No. 58] *[21-12-1728*

राजमंडल माहे जमादिलोवल. रोजकीर्दी
सुा तिसा अशरीन.

तेरीख ३० रोज

राजश्री मदनसिंग भोसले यासी वेतनात सालीना
रुा १०५०० विले करून दिल्हे बिताा
४९३५।। सालमजकुरी ठरविले
२५०० प्रधानपंत दरमाहा रुपये ५००
१५०० प्रतिनिधि ,, रु. ३००
९३५।। सचिवपंत
१०५०० पेस्तर सालाची विले

¶*Rs. 10,500 are sanctioned for the expenses of Madansing Bhonsle, illegitimate son of Sambhaji I.*

[22-10-1728

राजमंडल रोजकीर्दी सुा तिसा असरीन माहे रबिलोवल छ २९ कार्तिक शुध प्रतिपदा. भोमवार किता पत्रें चिटनिसी

राजश्री भगवंतराऊ रामचंद्र पंडित आमात्य यास जाबत की तुम्ही विनंतीपत्र पाठविले पावोनं लिहिला अर्थ कळला. गगनगडास पावलेत. उतम जाले. राजश्री शिवरामपंत रामाजी गणेश स्वामीसंनिध आहेत. तुमचे लिहिल्याचे पारपत्य स्वामी करितील म्हणून. १

¶*A reply is sent to Bhagvantrao Amatya assuring him of the King's sympathies.*

No. 59] [December 1728

श्रीजेयती

चिरंजीव राजश्री दादोबास आसीर्वाद उपरी हती सारे अठरा पाडाव. दो[१] पवार व होलकर लस्कारांत आले, तुम्हास कलावे, म्हणून लिहिले असे. तुम्ही माहाराज राजश्री स्वामीस विनंती करून श्रुत करणे हे आसीर्वाद.

¶*Chimaji Appa asks Malhar Tukdev (Dadoba) Purandare to announce to the King the victory over Dayabahadar in which 18 elephants were captured.*

No. 60] [1729-30

श्री

राजश्री भोजराव गोसावी
यासीं

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्ये श्री नारो मल्हार दिमत राजश्री राणोजी सिंदे आसीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल जाणून गोसावियानीं आपले कुशल लिहीत आसिले पाहिजे विशेष. गोसावियाकडील वर्तमान कांही कलत नव्हते. त्यास आपण इंदुरास आले म्हणून विदित जाले. त्यावरून बहुत समाधान जालें. ऐसियासी आमचें वर्तमान तरी नवलाईचा किला घेऊन ठाणें बसिलें आहे. किलियाकरिता राजश्री नरभेसिंग उजनीहून स्वार होऊन कसबे मजकुरास आले आहेत. आजपावेतो त्याच्या आमच्या सलुखाच्या वार्ता होत आहेत. तो किला मागत आहे; परंतु आपणांस येजमानाची आज्ञा आहे कीं, किला न देणें. किल्यांत सामान ठेऊन जतन करणे, ऐसी आज्ञा आहे. त्यास आम्हीं नरभेसिंगास उतर दिल्ही कीं खावंदाचे आज्ञेखेरीज आपण किला देत नाहीं. त्याजवरून त्यानी उजनीहून तोफा वगैरे सरंजाम आणिला आहे. त्याच्या चिताचा भावगर्भ कलत नाहीं. येक दो दिवसा पा। चाली लाऊन कूच करून गेला तरी उतम आहे. जर किलियांस मोर्चे लाविलें तरी आपणाकडे पत्र पाठऊ ते समई गोसावियानीं स्वार होऊन आले पाहिजे; यांकरिता आगोधर सूचना मात्र लिहिलीं असे. कललें पाहिजे. बहुत काये लिहिणें. लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Naro Malhar in the service of Ranoji Sindia requests Bhojrao to render assistance to him, in case Narbhesing from Ujjain attacks the new outpost of Navlai.*

---

१ पत्र चिमाजी आपाचें.

[23-9-1728

रा रोजकीर्द सुा तिसा

तेरीख २९ रोज

नजर राजश्री स्वामीनी आपले स्वहस्ताकरून वाघ मारिला. यास्तव जेजालबा(र)दार यानी हवी करून वाघ घराजवळ आणून (त्या)स दावला. यासी स्वामीनी गोळी मारून मारिला. त्यासी बकसीस रुा ५०० पाचसे. दाहा हातेच्या अंतरे सोडिला.

¶*King Shahu rewards men who helped him in hunting a tigar whom he killed.*

[17-9-1728

रा रोजकीर्द

माहे सफर सुा तिसा अशरीन

तेरीख २३ रोज.

राजश्री कानोजी अंगरे यासी पत्र जे तुम्हास जाहज हस्तगत जाहलें आहे. त्यांत स्वामीचा विभाग यावा त्यापैकी काही जिनस पुतल्या वगैरे व रुपैल व संतम्या व अश्रेफी जिनस रवाना करणें व घोडा दिल्हा होता तो परतून दिल्हा त्याचा मुबदला उतम अरबी पाठवणे. या कामास हुजरे

५० बहिरो नरसिंह.

२९ फतेमहबमद रिकीबदार.

मोा श्री.

हस्ताक्षर पत्रे.

¶*King Shahu demands his share of the cargo obtained in the ship captured by Kanhoji Angria.*

No. 61] [*17-12-1734*

श्री

राजश्री चिमणाजीपंत

आपा गोसांवी यासीं

श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील क्षेम ताा छ २ माहे शाबान मुकाम अमदनगर

---

१. चांदीचें नाणें. २. मोहोर.

नजीक असेरगड जाणऊन स्वकीये कुशललेखन आज्ञा केली पाहिजे विशेष. आम्हीं बऱ्हाणपुरीहून कूच करून आजी येथें आलों. राजश्री संभाजी भोसले व राजश्री संताजी मोरे अद्याप सामील जाहाले नाहीत. येकां दो दिवसा येतील. रा। येद्याजी संतकर यांस पत्र पाठविलें तेहि येतील. याउपरी मजल दरमजल रेवापार होऊनजाऊन जें वर्तमान होईल ते लिहून पाठऊन. राजश्री मल्हारजी होलकर व राजश्री सिंदे याजकडील पत्रे आली ती पाठविली आहेत, त्याजवरून विदित होईल. त्याजकडील वर्तमान आले कीं बडवाई प्रांत मालवा येथे मोर्चे देऊन जेर करून खंडणी घेतली म्हणऊन आले. कागदीपत्रीं नाही. नर्मदापार होऊन गेलियानंतर सविस्तर वर्तमान परकीयें फौजेचे व आपले आद्यंत लेहून पाठवितो. आमचेविशी कांही चिंता केली न पाहिजे. खावंदाचे पुण्यप्रतापेंकरून येश संपादून फौजहि जतन करून आणून. वरकड वर्तमान राजश्री तुबाजीपंत यानीं लिहिलें आहे त्यावरून विदित होईल. विशेष काये लिहिणे. कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Pilaji Jadhav from Ahmednagar communicates to Chimaji Appa that Malharrao Holkar and Ranoji Sindia assaulted Badwai and exacted tribute from its ruler.*

No. 62] [*1728-29 ?*

श्री.

यादी चंदावरकरास पत्र पाहिजे कीं, चिरंजीव शामकुवरबाई येंडाईत यांस तुम्ही फौजेच्या साहित्यानिमित्य गतवर्षी येथें पाठविलें. त्यांचे भेटीनंतर सकल अर्थ कळों आला. त्या प्रांतें फौज पाठवावी हें अगत्य. परंतु राजकारणप्रसंगमुळें चहूकडे फौजा गेल्या. ऐशास सिरे प्रांतीचा जिल्हा राजश्री नारोराम मंत्री याचे स्वाधीन आहे. त्याचे तर्फेने राजश्री नीलकंठ बलाल फौजनसी पाठविले आहेत. हे सिरे प्रांतीचा बंदोबस्त करितील. तुम्हास फौजेचे प्रयोजन असिलें तरी यांस लिहिणें. तुमचे आज्ञेप्रों फौज घेऊन येऊन कार्यभाग करितील. फौजेचें साहित्य सर्वप्रकारें तुम्ही करणें. सविस्तर अर्थ चिरंजीव शामकुवरबाई लिहितील त्यावरून कळो येईल म्हणून.

¶*The Raja of Tanjore is informed of the despatch of force under Nilkanth Ballal who had been ordered to defend the province of Shira.*

No. 63] [*14-9-1722**

तह्नामा मऱ्हाठेयांत व फिरंगियांत पहिला सल्लुक चालत होता. त्यास दरम्यानें गुप्तगोई[१] जाली, त्याकरितां सलुकाचा बिघाड होऊन फिरंगी कुलाब्रियावरी चढोन आले, हे देखोन मऱ्हाठेयाच्या लस्करच्या फौजा आल्या. लढाईचा प्रसंग आरंभला. त्यास लढाईनें दुतर्फा खराबी व मुलुक वसत नाही व सावकारी बंदरें पडोन गैरफायदा दुतर्फा होतो, हें जाणोन पूर्वी जे कटकट होऊन गेली ते गेली. हाली सलुकाचा तह करावा यैसे जाले. तेसमई राजश्री बाजीराऊ प्रधान व राजश्री खंडेराऊ दाभाडे मऱ्हाटेतर्फेचे व राजश्री कान्होजी आंग्रे सरखेल व संतोन (?) विजा(र)ई गोवे जनराल व वसई अजम अंतुन काडदीन फरोईस् जनराल दबताल? अमास? अगोस्तीन द ध र ह रा म (?) प्रीमदेर जनराल व अजम अंतोन करनेर अलकास कपितान मोर आदिकरून मातबर फिरंगी याचे समेत तह केला.

(पत्राचे पाठीमागील बाजूवरील मजकूर.)

माहाराज राजश्री छत्रपति स्वामी यांचे सेवेसी तह सल्लुक मऱ्हाठेयाचा व फिरंगी याचा राजश्री बाजी राऊ प्रधान याणी सिनोर फरसीस्व द्रुजेदेस पाये येकात्र विजरेल व कपितान जनराल देइंद यासी मौजे वरसोली प्रा चेऊल येथील मुकामी तह केला.

कलमी करीत जाणे
दिगर पाठवी.

¶*This letter gives an account of a treaty of peace concluded between th Portuguese and the Marathas in 1722.*

No. 64] [*12-1-172*

श्रीगजानन

राजश्री बाबा गोसावी
यासी

श्रीमंत अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्ये श्री रघोजी कदमराव दंडवत विनंती. येथील क्षेम पौश कृष्ण नवमी भाणुवासर मुकाम रणाले कुशलरूप जाणून स्वकीये श्रानंदलेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. 'दिवस जाले,

---

१ संभाषण.

* *See* Surendranath Sen's Studies in Indian History, p. 90.

आपल्याकडोन पत्र येऊन परामृश होत नाहीं यास्तव चित सापेक्षित असे ; तरी सदैव आलिया वार्तिकासमागमे पत्र पाठऊन सांभाल करावयां आपण सर्वत्न आहेत. याउपरी चिरंजीव सटवाजी कदम यासी जमावसुधां आपल्यांकडे पाठविले आहे ते पोहचले आसतील. चिरंजीव राजश्री माधवराव कदम पहिलेपासोन आपल्यापासी आहेत. त्यासी आमचा सर्व प्रकार अभिमान पूर्वीपासोन आपल्यास आहे, निर्व्हा करून उर्जित करावया आपण समर्थ आहेत. विस्तारें ल्याहावे यैसे नाहीं. बहुत काये लिहिणे. कृपा लोभ सदोदित वृधिमान कीजे हे विनंती.

¶*Raghoji Kadam asks the addressee to take a personal interest in the advancement of his relatives accompanying him in his expedition.*

No. 65] [*January 1729*

श्री

पुरवणी राजश्री चिमणाजी पंत
आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. या प्रांतीचें वर्तमान तरी गतवर्षीच्या धामधुमेमुळें कुणब्यानी गांवावर राहून कीर्दी करावी असा अर्थ नव्हता, परंतु कुणब्यानें जसा मुदा घातला तसा त्यास कौल दिल्हा त्यावरून कुणबी गांवावर राहून कीर्दी जीवनमाफीक केली. पर्जन्य जे समयीं पडावा तेव्हां न पडोन पिकें घालविलीं, आणि पुढें पडोन पिकें घालविलीं हे वर्तमान स्वामीस या प्रांते असतांच विदित जालें व स्वामीनीहि दृष्टीनें पाहिले. त्याउपरी राजश्री स्वामी कार्तिकमासी साताराहून या प्रांते माहालसहवर्तमान आले. मौजे कोन्हाले खुर्द प्रांत सुपे येथील मुकामीहून माहाल तुळजापुराकडे गेले. आणि राजश्री स्वामीनी तेथून कूच करून निंबुतावर आले. निबुताहून वाल्हे, वाल्याहून जेजुरी, जेजूरीहून सासवड, तेथून पुणे, पुणाहून तलेगांव, तेथून लोहगड, तिकडून फिरोन येऊन चिंचवडावर मुकाम येक करून सिवापुराकडे जाऊन, तिकडून सिरवलावरून मागता निबुंतावर आले. तेथून कूच करून माहाल तुळजापूरीहून फिरोन येऊन मांडवेनजीक माहादेव येथे मुकाम केला होता, त्या मुकामास गेले. या प्रांते येक महिना होते. यामुले मुलकाचा बहुतच तसनस जाला. ते वर्तमान पत्रीं ल्याहावें असा अर्थ नाहीं. स्वारीखर्चेहि बहुतच पडिला व कुणब्यास वेट बिगार फारच पडली. दोन च्यारसें वेटे वोझ्यास लागत. याखेरीज किरकोळ साहित्य मुकामाचे मुकामी करावे लागे. जे समयीं जे मागेत ते सिध करावे लागत होतें. त्याची स्वारी या प्रांतातून गेलियावर राजश्री फतेसिंग

भोसले स्वारीस जातेसमयी या प्रांतातून गेले. त्यानी गावगना दोन दोन अडी अडी-चसें रुा घासदाणा घेतला. तैसेच राा साबाजी नाईक निंबालकर यानी व रंभाजी जानोजी निंबालकर यानी पाटसतर्फेत घासदाण्याचे मनमाने तैसे रोखे केले, व प्रस्तुतहि गांवगना रोखे वरचेवर करितात व राजश्री त्र्यंबकराऊ दाभाडे फौजसह-वर्तमान या प्रांतांतून सातारियास गेले. त्यानीहि घांसदाणे घेतले. असे अव-घ्यानी मिळोन मुलकाचा पाटावरोंटा मांडिला आहे. राजश्री पंत प्रधान व आपण उभयेताहि स्वारीस गेले, मागे मुलकाचा असा विचार जाला. पुढे मागता राजश्री स्वामी माहालसहवर्तमान माहीयात्रेकारणे येतात. साहित्य करणें म्हणून साताराहून वरचेवर राजश्री नानाची पत्रें येतात. या प्रांते आलियावर कोटकोटे जातील आणि कितेक दिवस मुकाम होईल हे कलत नाही. गतवर्षी स्वामीनी आज्ञा केली जे कुणब्यानें जसें जो म्हणेल तसे त्याचे समाधान करणें, पुढे सर्वप्रकारें त्याचें चालऊन, त्यावरून जसा ज्यानें मुदा घातला तसें त्याचे यैक्रिलें. त्यास येन्दां स्वामीनी खासुदगी वरषापेक्षा अधिकच केली आहे. त्याचे तगादे लागले आहेत. मुलकाचा विचार ये स्तितीचा जाला आहे. स्वामी खावंद आहेत. सविस्तर वर्तमान कळावें याकरितां लिहिलें असे. प्रस्तुत आम्ही जेजूरीस राहून तल्याचे काम चालवीत आहो व राजश्रीचे स्वारीचे साहित्य करीत आहो. राजश्री स्वामीचे स्वारी समागमे दीडमास होतों. खर्चवेच बहुतच पडिला. दोन हजार रुा नजरचे घेतले व किरकोलहि दोन हजार तीन हजार रुा लागले. सडी स्वारी होती तिचा प्रसंग असा. पुढे माघमासी माहालसहवर्तमान येत आहेत तो विचार आपणास कललाच आहे. खर्चवेच काय पडेल तो कलत नाहीं. जानोजी निंबालकर यानी पाटस तर्फेत गावगना रोखे करून पाटीलास खंडणीस येणें म्हणून जासूद पाठविले त्यावरून येविसी राजश्री नानानी त्यास पत्र लिहिलें होतें त्याचे उत्तर त्यानीं लिहिलें जे, आपण रोखापत्र कोठें केला नाहीं, पुढें करणार नाहीं, असें उत्तर पाठविलें आणि रोखे तो करितात. विदित जालें पाहिजे. राजश्री विसाजीपंत व मल्हारपंत व राा कृष्णराऊ यासी स्वामिनी पत्रें पाठविली तीं त्याची त्या प्रविस्ट करून उत्तर आणून पाठविली आहे ती व वरकड लोकानी आपलाले घरास पत्रें पाठविली होती, त्याचे घरास प्रावोन त्यांचा जाब आणून पाठविलियावरी कृपाभिवृद्धि केली पाहिजे हे विनंती.

¶*The writer reports to Chimaji Appa the hardships caused to the ryots by the tours of Shahu and his Sardars. The letter is important from various points of view. The writer appears to be Bapuji Shripat, the officer in charge of the Poona District.*

No. 66] [7-2-1729

राजमंडल रोजकीर्दी सुाा तिसा

माहे रजब

तेरीख १९ रोज मुाा सित्रापूर काा ३

खंडग्वाते.

चिटनिसीपत्र राा प्रधान पंत व सरलस्कर यासी पत्रे वराड चांदे देवगड या प्रांती तुम्ही गेलेस. यैसियासी तो जिल्हा राा प्रतिनिधीचा आहे; त्यासी तुम्हास या प्रांती न जावे म्हणोन आज्ञा केली असता तुम्ही गेलेस हे उच (उचित?) न केले. प्रांतास धामधूम न करणे म्हणोन पत्रें

१ राणोजी भोंसले यासी पत्रे जे श्रीनिवास पंडित प्रतिनिधियासी सामेल होणे.

१ प्रधानपंतास.

२

चिमणाजी बलाल यासी पत्र जे तुमचे सबनिसी लस्करची श्रीनिवास यादव यासी सांगितली आहे

¶*King Shahu asks Bajirao to stop all depredations in Berar which, he says, is assigned to the Pratinidhi.*

No. 66A]

किाा पत्रे प्रधानपंत व सरलस्कर यासी पत्र जे. वराडतून चांदे देवगड प्रांतास तुम्हीं फौज घेऊन गेला यामुलें निजामनमुलुक भागानगर प्रांतीहून कूच करून विपर्यास चितांत मानिले आहेत, तरी येणेकरून सख्य कैसे चालते असे नाहीं. तुम्हासं वराड व चांदे व देवगड या प्रांती नव जाणे म्ह(णो)न तुम्हास अज्ञा केली असता तुम्ही जावे हें काही सख्य राहते असे नाहीं. तरी तुम्ही धामधूम न करणे. उतरेकडील संदभ्र तुम्ही चितांत अणाल तरी तो विचार कललाच आहे तरी सख्याचा विचार मनास आणून जो विचार कर्तव्य तो करणे. म्हणोन

१ प्रधानं

१ सरलस्कर.

¶*King Shahu asks Bajirao not to take his forces into the districts of Berar, Chanda and Devgad as this action conflicts with the terms of the settlement effected with the Nizam.*

No. 67

Received on 27-4-1729

छ ९ सवाल

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

सेवक कृष्णराव माहादेव कृा ना वि॥, येथील कुशल जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पा॥ विशेष. हबाजी (?) राव खानविलकर हे नामांकित सरदार जातीनें मर्द त्याचे चालीस पनास माणूस जमाव आहे. ते रा॥ कानोजी आंगरे सरखेल याजकडे चाकर आहे. त्यास त्याणी तो पक्ष सोडून स्वामीचे पदरी पडोन, आपले ऊर्जित करून घ्यावे या उदेशें, तीर्थस्वरूप रामचंद्रपंत दादा असत त्याजकडेस राजकारण लाविलें, त्यावरून तीर्थरूपीं त्यास अस्वासन देऊन पांचसे रुपये खर्चास देविले. त्यास या मार्गेच त्याणी येऊन पदरीं पडावे त्यास मध्यें निजामनमुलुक यांचा बिघाड होऊन धामधूम जाहाली याजमुलें आजपर्यंत आले नाहींत. हली त्याणी आम्हाकडे आपली माणसेच पत्रें पा॥ आहेत, की पूर्वी रा॥ रामचंद्रपंत याणीं वचन दिल्हें होते त्याचा प्रसंग असा जाहाला. या उपरी या दरबारीं आपला निभाव होत नाहीं. आपण अंगीकार करितील तरी स्वामीचे पदरी पडो; नाहीं तरी येथून तो निघोन बाटावरी जाऊ. मग कांहीं तऱ्ही हो यैसे लि॥ आहे. आणि येका दो दिवसी कबिला व लोक देखील निघोन वाडेघोडे-याकडे जाणार आहेत; ते परिछिन्न तपे बाडियास जातात. जरी स्वामी पदरीं घेतील तरी उतम; नाही तरी दुसरेकडे जातील. असे माणूस हातचे जाऊ देऊं नये. तरी येविसी कांय आज्ञा ते केली पा॥. स्वामी आज्ञा करितील त्या प्रा॥ वर्तणूक करून आपण आठा दिवसीं स्वार होऊन भेटीस येतो. वडिलास कलावे म्हा॥ लि॥ असे. हिसेबास येका दोन दिवस विलंब लागले याकरितां आठ दिवस राहाणे जाहाले; व रा॥ पिलाजी जाधव याणी दवण मारली याकरितां फिरंगियांचा व आमचा बिघाड जाहाला. आम्ही सरदेवर आहो. आमची मिठाची व किराणियाची तारवे आटकाविली आहेत. त्यास पत्र पा॥ आहे. सोडून दिली तर उतम; नाहीं तर थोडेबहुत त्यास नतीजा द्यावा लागतो. वडिलास कलले पा॥. वरकड रा॥ पिलाजी जाधव व खंडोजी माणकर यास ताकीदपत्र पा॥ पाहिजे की दवणे आलाकड फिरंगाणाचे वाटेस जावयास प्रयोजन नाही, यैसे परिछिन्नवादे

ताकीद पाठविली पा. नाहीं तर उपसर्गामुले थोरले कामास धका बसेल! भेटी-नंतर सर्व निवेदन केले जाईल. ताकीदपत्रें आगत्य पाठविलीं पा. बहुत काय लिा? लोभ असो दिा पा हे विा

¶*Krishnarao Mahadeo recommends to the Peshwa Habajirao Khanvilker who had left the service of Kanhoji Angria and requests him (addressee) to entertain him into his service.*

No. 68] [30-4-1729?

श्रीराम

राजश्री चिमणाजी पंडित
गोसांवी यासीं

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री खंडेराऊ दाभाडे सेनापति दंडवत विनंति उपरी. येथील कुशल जाणौन, स्वकीये कुशल लिहिलें पाहिजे विशेष. बहुत दिवस जाले, तुम्हाकडून पत्र येऊन वर्तमान कलत नवते; परंतु सांप्रत पाबलाकडे आलेस म्हणोन राजश्री गोविंद कृष्ण याणी सांगितले, त्याजवरून बहुत समाधान जाले. ऐसियासीं कोठपर्यंत गेले होतेस, मनसबा कोणे रीतीचा जाला, राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान कोणीकडे आहेत, व राजश्री पिलाजी गायेकुवाड कोठे आहेत, हें व आपणासमागमें फौज किती आहे हे सविस्तर वृत कळावें याजकरितां हें पत्र लिहिलें असे; तरी सविस्तर जालें वर्तमान तपसीलवार लिहिलें पाहिजे. जाणीजे. रा छ १२ माहे सोवाल. बहुत काय लिहिणें. राजश्री उदाजी पवार कोणे मनसबियावर कोणे ठिकाणीं ठेविले हें लिहिलें पाहिजे. बहुत काय लिहिणे? कृपा असो दिल्ही पाहिजे हे विनंती.

¶*Khanderao Dabhade's letter making kindly inquiries about the movements and activities of Chimaji Appa, Bajirao, Pilaji Gaikwad and Udaji Pawar.*

No. 69] [15-5-1729

श्री

श्रीमत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

पोष्य बापूजी श्रीपत कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल वैशाख बहुल चतोर्दसी गुरुवारीपरियेंत स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. स्वामीनी पत्र पाठविलें तें छ २२ रमजानीं अस्टमीस पावले. तेथें आज्ञा जे,

नवाबाची आज्ञा घेऊन स्वार जालो, मजल दरमजल येऊन म्हणून, लाविले त्यावरून समाधान जाले. पुणियांत राहावे लागते या(करि)तां राहाते घर व सदर व सोपा व कारकुनास घर कोटांत तयार करणे. साहित्याविसी रा। रामचंद्रपत व संभाजी जाधव व सिंहीगडकरास पत्रें पाठविलीं आहेत. तुम्हीहि त्यास पत्रें पाठऊन साहित्ये आणऊन घरें लिहिलप्रा। तयार होत ते करणे म्हणून लिहिले. यैसियास मृगास अवकाश दाहा दिवसांचा उरला. सांप्रत स्वामीचें पत्र आलें. रामचंद्रपंत कल्याणांत आहेत त्याकडून साहित्य कधी येईल? अवकाश नाही. अगोधर राजश्री अपानी अम्हास लिहिले जे, राजश्री पंती पुणियांत राहावयास घर चालीस हात लांब व नव हात रुंद धारणाचे याप्रमाणें तयार करवणें म्हणून लिहिले. यैसियास लाकूड तो या प्रांते नाहीं, परंतु तरतूद करून आज्ञेप्रमाणे घर तयार करविले. सांप्रत स्वामीनी यैसी आज्ञा केली त्यास या प्रांते लाकूड येकंदर नाही हे स्वामीस विदितच आहे आणि आवकाशहि नाहीं, त्याहीमधे स्वामीचे आज्ञेप्रमाणे राजश्री रामचंद्रपंत व संभाजी जाधव व सिंहीगडकरास पत्रें पाठविलीं आहेत. साहित्ये होऊन येईल. त्यास अंतर होणार नाही. पागा पुणियांतील व पाटसातील तयार करविल्या आहेत. स्वामीनी आज्ञा केली की राहते घर पासस्ट हात लांब (व) पसतीस हात रुंद व सदरेच घर पनास हात लांब त्यामाफीक राही व दोन सोंफे पनास हात लांब त्यास येक येक वोसरी व याखेरीज कारकुनाचीं घरें याप्रा। तयार करणें म्हणौन आज्ञा केली. अवकाश तो मृगास आठा रोजाचा उरला. यामधें लाकडाचें साहित्य होऊन घरें कैसी सिध होतील? आगोदर उघाड दिवसांत आज्ञा केली असती तर जेथवरी तरतूद होती तेथवर करितो. याउपरी लाकडाचें साहित्य जाहालें तरी जे होईल ते करून. शेवशी श्रुत होय हे विनंती. मालजी केरोजी जासूद यास दाहा रुपये देविले ते आज्ञेप्रमाणें दिल्हे. हे विनंती.

¶*Bapuji Shripat writes to the Peshwa, returning from a visit to the Nizam about the difficulties of quickly building a residence for him in Poona.*

No. 70] [30-7-1729

श्री

श्रीसकल तीर्थस्वरूप राजश्री
बाजीराव व राजश्री आपास्वामी
वडिलांचे सेवेसी

आपत्यासमान गंगाधरानें चरणावर मस्तक ठेऊन सिर सां। नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम ता।। छ १४ माहे मोहरमपरियेंत वडिलांचे कृपावलोकने-

करून समस्त सुखरूप असों. आपणांकडील सुकशंतोष त्यावयांसी आज्ञा करीत असिले पाहिजे. विशेष. पूर्वी घोडे दोन सरकारचे घेऊन स्वामीच्या दर्शनास गेलो होतों. परंतु दर्शन न जाले. मातुश्रीबाईचें दर्शन सातारियाचे मोकामीं जाले, त्याजवळ सविस्तर वर्तमान विदित केलें. यैसियासी दुसरे दिवसी राजश्री आपा यांकडून संतोषाचे वर्तमानपत्रें आली. येकूणीस हती पाडाव जाहाले यैसी पत्रें आली ' त्याउपर आम्ही मातुश्रीपासी बोलिलो कीं आमचे मुख्यांहीं घोडे पाठविले त्याचा पायगुण उत्तम आहे. काल घोडें पैवस्ता होताच अज फतेची खबर आली. याउपर दोन हती आमचे खावंदास देणें. त्याजवर मातुश्री बोलिली कीं लस्करें यावयाचा हंगाम जाहाला म्हणजे आम्हास सूचना लेहून पाठवणें. येक हती द्यावयाचा विचार करून निश्चये आहे. त्याजवर आपण निरोप घेऊन राजपुरीस आलो. सदरहू बोली जाली ते हुजूर विदित केली. त्याजवर साहेब बोलिले कीं आम्हास हतीची कमी काय आहे. आमात्याहि+ पाठविला तर थोरपण त्याचेच आहे यैसे बोलिले. यैसियास सांप्रत आपण उभयेता विजई होऊन आलेत. मातुश्रीनं मागील बोली विदित केलीच असेल. तदनरूप वर्तणूक जाली पाहिजे. नाहींतर मातुश्रीचे वचन अप्रमाण व आम्ही मध्यें बोलिलो तें लटीक यैसे दिसोन येईल. वरकड यांसी थोरथोरांकडून हती येतात. मागें अरकटाहून हती आला व गेले सालीं सरखेल यांकडून हती आला व सांप्रत अरकटाहून दुसरे हती दोन येत असेत. यैसा विचार आहे. ये जागां हती दिल्हेयान बरेपणच आहे. हा आपला वतनी जागा आहे. आमचे मुख्य कोणे गोष्टीची लालूच धरितात यैसे नाही. हती पाठविलेयान महत्व उभयेपक्षी आहे. पूर्वी आपणाकडून हती आला होता तो मृत्यु पावला. याकरितां अगत्यरूप हती दिला पाहिजे. येविसी बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती. १०००००

¶Gangadhar, probably a relation of Govind Krishna (see No. 42 above), to the Peshwa and Chimaji Appa, asking for an elephant for the Sidi of Janjira which has been promised by the mother of the Peshwa as a gift for the glorious triumph achieved by the Peshwa in the North.

No, 71] [11-12-1729?

श्री

राजश्री आपा गोसांवियाचे शेवेसी

७ श्रीमत उत्तमगुणमंडित राजमान्यविराजित श्री रयोजी कदमराऊ व सवाई कठसिंग कदमराऊ दंडवत विनंती. येथील क्षेम आपुल्या कृपादस्टी-

+ म्हणजे प्रधान—पेशवे.

करून ता॥ पौष शुध्द २ परियेंत येथास्थित असे. गोसाविंयाणी निजानंदवैभव सदैव येणारा समागमे लेख(ना)ज्ञा करीत आसिले पाहिजे. सांप्रत आपणाकडून पत्र येऊन वृत कळों येत नाहीं, येणेकरून चित उद्विग्न आहे. कृपा करून पत्र-द्वारा सांभाळास अंतराये केला न पाजे. गोसांवियाची आज्ञा घेऊन आलो. मागाहून सवेच श्रीमंत पंतप्रधान सेनेसहवर्तमान दरकूच आले. आपण कुली सेनेची आज्ञेवरून सिधता करून कूच करून करवंदपरियंत गेलो. तेथें श्रीमंत पंताकडून पत्रें घेऊन कारकून आले. मागाहूनहि येकदोन पत्रें टाकोटाक आली. आज्ञा कीं, श्रीमंत मातुश्री बाई व राजश्री राऊ सेनापति यास पत्रें व कारकून पाठविले आहेत. तुम्ही त्यासी भेटणे. समाधान कर्तव्यता ते मनोदयानरूप करितील. आज्ञेवरून माघारे कूच करून याच्या भेटी घ्याव्या. सर्व प्रकारें भरवसा आपला आहे. आपणहि येक पत्र आपलेविषीं लेहावयाचे ते पूर्वीहि लि॥ आसेल. सांप्रत कृपा करून अवस्यमेव लिहिलिया उतम गोस्ट आहे. सेवक पदरींचे असो. दुसरा अर्थ नाहीं. या प्रांते राजश्री आवजी कवडे याणी मुलकांत जो काही प्रसंग केला तो परस्परें गोसांवियासी न कलेसे नाही. आपणहि विस्तारे लेहावे हा अर्थ नाहीं. मुलकांतील वृत सर्व कलेल. वार्तिकहि मुखवचने श्रृत करता विदित होईल. बहुत काये लिहिणे, कृपा असो दिधली पाहिजे, हे विनंती.

¶*Raghoji Kadamrav and Sawai Kanthasing Kadamrav inform Chimaji Appa of their march up to Karwand, a place where the Peshwa, with his armu. was also camping.*

No. 72] [*1729?*

श्री

राजश्री पंत प्रधान
गोसावी यासीं

श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो॥ येशवंत-राऊ भोसले दंडवत विनंती. येथील कुशल जाणऊन स्वकीये कुशललेखन आज्ञा केली पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले तेथें आज्ञा की उदाजी चव्हाण पाजवर फौज हुजुरीची व रा॥ अंबाजीपंत व रा॥ पिलाजी जाधव थैसे रवाना केले आहेत; तरी तुम्ही फौजेनसी जाऊन सामील होणे. त्यास आज्ञेप्रा॥ जाऊन;

परंतु आम्हीं गावास आलियावर शरिरास फार वेथा जाली आहे. अद्यापिवर उतार वेथेस जाला नाही, याजकरिता आपलियासी कलावे म्हणोन लिा असे. बहुत काये लिा कृपा लोभ असो दीजे हे विनंति.

¶*Yeshwantrao Bhonsle (Shahu's illegitimate son ?) writes to the Peshwa that his illness prevents him from joining the expedition of Ambajipant and Pilaji Jadhav against Udaji Chavan.*

No. 73] [*November 1730*

[पहिला बंद गाहाळ.]

२

याचें चित शास्वत नाही. वरकड कांहींच विचार नवता. बरे, श्रीसमर्थ. आम्हीहि फार विचारांत आसो. आवघियाचा कल्प येक तुम्हावरी आहे. बरे श्रीसमर्थ. राजश्री स्वामीचे पुण्यप्रभावे करणाराची काली तोंडे जाली, आतांहि होतील. दीपचंद आजनठे फर्दापूरचे वाटमाथा परयेंत गेले. . तेथून माघारे आणिले. काली गयाजखानाजवल येऊन राहिले. आजी भेटीस गेले. च्यार पाच घटका खलवत जाले. बागजी राणाकडील मृत्य पावला. आजनठेवरी हे +जरिदे आले आहेत. त्यास काये बोली जाली ते कलले नाही. आजी अस्तमान जाला. उद्या शोध करून लिहू. स्वामी फार खबरदार आसिले पाहिजे. याच रोखे न येणें. या आठा दिवसांत आवघे वृत कलल. कांहीं याचे विचार तजवीज आनुमात्र कोणास कलत नाहीं. काये विचार करितो. आपणाकडील जोडे बातमी वरचेवरी पाठवणे. दिनचर्याच होईल ते लिहू. बहुत काय लिहिणे ? कृपालोभ आसो दीजे हे विनंती.

बातमीस जासूद आपल्याकडून आले म्हणजे आम्ही वरचेवरी वर्तमान लिहीत जाऊन. परंतु मुजरद जासूद रवाना करावयासी आम्हाजवल जासूद जोडिया नाहीं आणि खर्चासहि द्यावयासी नाही. कळले पाहिजे हे विनंती.

¶*A fragmentary letter communicating the visit of Dipchand with the Nizam. Dipchand was an ambassador of Sawai Jaisingh. (See Nos. 66, 67 and 74 of selection 10.)*

+सडे.

No. 74] [20-6-1730?

श्रीशंकर

श्रीमत आखंडित लक्ष्मीप्रसन
राजमान्य विराजित राजश्री कृष्णजी
कदम गोसावी यास व ता राजश्री
गोविंदपंत स्वामीजीचे सेवेसी

सेवक कृष्णराऊ आसीरवाद व सां नमस्कार विनंती उपरी येथील क्षेम ता छ १४ जिल्हेज जानऊन स्वकुशललेखनाज्ञा कीजे. यानंतर कृपा करून पत्र पाठविलें तें पावलें. वाचून परम समाधान जालें. लिहिलियाप्रमाने सर्व वर्तमान नवाबसाहेबास सांगितले. म्हणो लागले आपन आपले करारास आंतर पडो देनार नाहीं. परंतु त्याचे करारास आंतर पडते की, आपल्यास न पुसत गेले. भेटीचा बेत राहून गेला. आपन समाधानें सर्व वर्तमान निवेदन केलें. म्हनो लागले कीं, आपन जो श्नेह रावसाहेबासी केला आहे, त्यामधे कदाप कृत्रमता होनार नाहीं; याकरितां स्वामीनीहि सर्व प्रकार हंगामावर सत्वर बजमियेत माकूल सत्वर आले पाहिजे. ईस्वर इछेने येथल्या करारास आंतर नाहीं. मुलुकगिरीची वेल आतां होती. बरे, ईस्वर कुशल केलिया सर्व आनकूल होईल. पुन्य रावसाहेबाचें समर्थ आहे तर स्वामीजी आलिया सर्व आनकूल होईल. आपली कुड मात्र येथें आहे, जीव स्वामीपासी आहे. कलले पाहिजे. पहिले हाजीजी याची वासना रावसाहेबापासी येयाची होती. आपासाहेबी सर्व प्रकारे कबूल करून पत्र हाजीस लिहिले होते. त्यास स्वामी सर्व वाकीफ आहेत. त्यास जाने सईन्याचे त्वरेने जाले. त्यास आता हाजीची वासना बहुत आहे की, जेथे आपासाहेब आहेत तेथे यावे, आनी या मुलकाचा बंदोबस्त विचार करावयास हाजीजीनेहि आपासाहेबास पत्र लिहिले आहे तर याचे उतर बहुत खुलासियाने लिहिविले पाहिजे. किफलानीयाने वर्तमान लिहिले त्यावरून कलो आले. तुम्ही खातरजमा राखोन येणे. हाजी तेथे आलीसमागमे आसलिया बहुत कामाचे मनुश आहे. स्वामीजीस ल्याहावे यैसे नाही. देवजी व मुस्तफीदखा खोलवडावर आहेत. मुस्तफीदखान खराब जाला. माहाराजाच्या फौजेने बांडेयाचे मानस फार मारली. बाहीर तमाम लुटली यैसे वर्तमान आहे. हाजूरचें वर्तमान येथापुरव आहे. शामराऊजीच्या जिनसेचे दुरजनसिंग यास जाऊन सांगितले. तो म्हनतो कीं आपल्या लोकाहीं काही आनली नाही. कलले पाहिजे. आपन पदरचे सेवक आहे. सर्व प्रकारे आपली चिंता आसू दिधली पाहिजे.

आजी रावसाहे(ब) व आपासाहेब यास जे सांगने तें सांगितलें पाहिजे. ह्याजीच्या पत्राचें उतर पाठविलें पाहिजे. ब्रहुत काये लिहिने कृपा असो दीजी हे विनंती.

राजश्री जिवाजीपंत स्वामीजीसचे सेवसी सा। नमस्कार कृपा आसू दीजे.

राजश्री शामराऊजीचे सेवसी सा। नमस्कार. दूर गेले म्हनऊन विसर पडला. आपन पदरचे सेवक आसू. कृपा आसू दीजे.

राजश्री बापूजीपंत व रामाजीपंत व लमबोधरपत व दवाजापत समस्त मडलीस सा। नमस्कार. कृपा आसू दीजे.

¶*News-letter from the camp of the Nizam written by one named Krishnarao to Krishnaji Kadam. The letter mentions the cordiality and respect the Nizam entertains for Bajirao.*

No. 75] [*22-10-1731*

वडणी रूमाल ३९९

छ २९ रोवल इसने सलासीन

छ १ जौवल पत्र दिल्हे की तुमची आमची बोली पाटसचे मुकामी राजश्री तुकोजी पवार याचेविसी जाहली होती, त्याप्रो जमावानसी मारनिलेस तुम्हाकडे पाठविले आहेत. त्यास मालव्याचा तह जाला आहे त्यापैकीं पवाराचा वांटा येक-वीस रुपये पांच चवल आहे, त्यापैकीं मारनिलेस दर सदें रुपये ७ सात देविले आहेत, तरी पवारांचा यैवजी सदरहू रु५ये पावणे. पर मुलकी आकार होईल व स्वारी सिकारीमुळें जमा होईल त्यास चौथाई सरकारचा यैवज काढून बाकी दामाशाई प्रो देत जाणे. म्हणून पत्र १

¶*The Peshwa writes to Malharrao Holkar, fixing the share of Tukoji Pawar in the division of Malwa. The total share of the Pawars was Rs. 21-10-0 out of 100. Tukoji was one of the three Pawar brothers and so his share was one-third of 21.*

No. 76] [*Recd. 16-10-1730?*

छ १४ राखर

श्री

राजश्री चिमाजीराव

गोसावी यांसी

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो नागसावंत भोसले सरदेसाई पां कुडाल व माहालानिहाय रामराम विनंति येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. वेदमूर्ति राजश्री नरसिंहभट यांसमागमे पत्रें आलीं प्रविस्ट होऊन राजश्री राव प्रधान यांचे आगमन

आठचौ दिवसांत स्वस्थलास होणार आहे, ते आलेनंतर मुजरद बोलावयास पाठवितों. वरकड सर्वविसीं आपणास अवश्यक आहे, आपले समाधान असों देणे, म्हणून कित्येक ममतापुरस्कर लिहिलें त्यावरून बहुत संतोष वाटला. आम्ही राजश्री राव व आपण उभयेतां बंधूंची जोड संपादिली आहे, तेव्हां चित्ताचा द्रुढ निश्चय असोन समाधानच आहीं. मुख्य गोष्ट जे उभयेताच्या दर्शनाची उत्कंठा विसेष आहे, दर्शन वडेल तो सुदिन. मागा राजश्री पांडुरंग भिमाजी व राजश्री येसाजी रंगाजी यांबरोबर कित्येक हितोपदेश सांगोन पाठविला. श्रीपंढरीचे यात्रोदेशे येऊन दर्शनयोग घडावा ऐसी उभयेतांची श्नेहोत्तरें श्रवण जाहालीं. तदारम्य दर्शनाची उत्कंठा चितांत होऊन यात्रेच्या दिवसांची प्रतीक्षा करून सर्व तयारी केली. निघावे तो उभयतांचे आगमन स्वस्थली न जाहाले, याकरितां आपले उत्तर येऊन येथून निघोन यावें हा हेतु राजश्री येसाजी रंगाजी मागां आलेपासून आपणाकडे गुंतला आहे, आमची वंशपरंपरागत कोठे चालोन जाऊन कोणाचें दर्शन घेतलें नाहीं, कोणाचें म्हणविलें नाही, हें परस्पर आपणास श्रुत असेलच. श्रीनें उभयतांच्या दर्शनाची उत्कंठा लाविली. दर्शनाविरहित अन्यत्र काही सुचेना. आपण उभयेता स्वाभिमानी दिग्वजई पुरूष अशां पुरुषांस पाहावें, त्यांसी श्नेहभाव असावा, हा चित्ताचा द्रुढ निश्चय आहे. येतद्विषईचा कित्येक अर्थ सांगोन राजश्री पांडुरंग भिमाजो व राजश्री रामकृस्ण पुंडलीक यांसी पाठविले आहेत, हे सविस्तर निवेदन करितील, तें ध्यानास आणून उत्तरें देऊन सत्वर रवाना केले पाहिजे. यानंतर पुर्वणीपत्रीं आपण आजरेचा मजकूर लिहिला तरी सौभाग्यवती मनाबाई घोरपडी यांसी ज्याप्रकारें सांगणें तें सांगोन ठिकाणास देविली आहे. ये गोस्टीविसीं आपण लिहावें असें नाहीं, आजरेकडे यांचा उपसर्ग न बाधावा, यास्तवच त्यांस कितेक साक्षेपेकरून ठिकाणीं ठेविली हे परिणामी तरी आपल्या निदर्शनास येईल. बहुत काय लिा सदैव लोभ असो दिल्हा पाहिजे. पत्रावर शिक्का आहे.

¶*Nagsavant Bhonsle of Kudal to Chimaji Appa, requesting a personal visit at Poona with the Peshwa and the addressee together. The letter shows how the writer was impressed with the exploits of the Peshwa and his brother.*

No. 77] [*31-10-1730*

छ ६ जाावल

श्रीनरसिंह प्रसन

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे शेवेसी

सेवक धोंडो गोविंद साा नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ताा छ २९ राखर मुाा लशकर जाणोऊन स्वामीनी आपले स्वानंद लिहीत गेले पाहिजे.

स्वामींनी ढमढेरियाचे तलेगावीहून पत्र पाठविले ते छ २७ माहे मजकुरी पावले. यैसियास सविस्तर वर्तमान रा गणेशपंती शेवेसी लिहिले त्यावरून कलो येईल. पुरवन्या आक्षरशा मनास आणिल्या पाहिजे. विशेश. आपणास स्वामीकडे रा केले तेव्हा ह्या गोस्टी सप्नीहि नवत्या. आपणा माव यास अविद्या संभाजी राजियाच्या अमलासारखी उपजली. आताहि त्याची फलश्रुत पहिल्यासारखीच होईल. निमित्य येंदाहि पहिल्यासारखा उपक्रम इकडून आहे. ईश्वरजीस आपराध सोसत नाही. यास भरवसा कीं कठाजी व गाईकवाड वगैरे मिळून चाळीस पनास जमा होतील. यैसियास इकडे काही गुजरात नाही की लुटतील याकरिता पाहुणे थोडकेच येतील. येता बेरजेचे मोजले दाह पाच हजार, तेव्हा याचे डोले उघडतील. परसतुत हे त्यावर येत नाही. थोडाकसा फितवा घरचाहि आहे. श्रीपतरायाची अर्जीहि वरचेवरी येत आहे ती आपणासी करार केले, दरमियान अबदुलरहीमखान मान्ये केले. रा सदासिवपंतादेखता मुकबला जाला. यैसे असता बेयेमानीवर आला. रुणानुबंध. हली स्वामींनी सहस्राप्रकारे सावध होऊन राजश्रीसहि जे लिहिणें तें लिहिले पाहिजे. यानें युक्त मांडली कीं स्वामीच नाव पुढें करून राजियास बाउंली+ देऊन मग राज्यास धका द्यावा. संभाजीसी खर व्हावे हे सत्य. तिल(तुल)तुल्य मिथ्या नाही. राजश्रीस बहुता प्रकारे लिहून सावध कीजे. सुमंतानी बोलता तो पूर्वे दिवसी बोलून गेले. आता त्यास दरशन दुर्लभ जाले. आता त्यासहि बहुतक पस्तावा जाला. इतकियावरीहि प्रसग पाहून साधकबाधकतेस चुकणारे नाही. निमित्या याची बुध्रि अशाशवत; काही विपरीत अढललिया तेथ युक्त (यो)जली जाईल. आता येथून सावध असिले पाजे. येथ लाहण धरून थोरपावेतो याचे नावें कस्टी. प्राक्तन विचित्र येंदाहि उपडून शूल खांदियावरी घेताती. फलश्रुत तैसी होईल. बातमीहि वरचेवरी वेत जाणे. येथून याचा उपाये पोख्त मनाजोगा मजबुतीनें कीजे. वरकड जवल अपूर्व जे होईल माघून लिा जाईल. बहुत काये लिा हे विनंती.

¶*Dhondo Govind, probably from the Nizam's camp, reports to the Peshwa the intrigues that Sambhaji was carrying on with the Nizam against Shahu. The writer gives a warning to the Peshwa to be on his guard against these intrigues.*

+ बाहुली देणें = दुष्कृत्यास प्रवृत्त करणें. संभाजीस खेळवून शाहूस धक्का देणें असा अर्थ.

No. 78] [1730

श्रीजयति

अपत्ये सा। नमस्कार विनंती. राजश्री मनसाराम पुरोहित सवाईजीकडिल आले ते येथे आले त्यांस जागा जुगा देऊन राहिले, कर्तव्य तें करून राहविले आहे. त्यास राजश्री स्वामी श्रीस येतील तेव्हां समीप पडतें, न भेटतां विरूध दिसतें, म्हणून राजश्री अंबाजीपंत यास याचा विचार कैसा करावासे लिहिलें आहे, तेथून उतर येईल त्याप्रा। विचार करऊन रा। गिरीराऊ राजश्री दादोरायाचे ज्यामात यांचें पत्र पुरोहितास आलें कीं तुम्हीं परभारे पुण्यास कां गेलेस? तेथे जाऊन वस्तभाव विल्हेस लाविता की काये? राजश्रीस विशाद आला म्हणून लिहिले. ते पत्र यांणी आम्हास दाखविलें. हा अर्थ विस्तारे विदित व्हावा म्हणून लिहिला जाहे जे आज्ञा कर्तव्य ते केली पाहिजे. सेवेसी शृत होये हे विज्ञापना.

¶*The writer requests orders about the interview to be arranged for Mansaram Purohit, the ambassador of Sawai Jaisingh, with Shahu.*

No. 79] [19-4-1726?

श्री

तीर्थरूप राजश्री तात्या वडिलांचे सेवेसी

आपत्ये आपाने व सदासिवानें साष्टांग नमस्कार विनंती. वडिलांचे आसीर्वादे-करून ता। छ २७ साबान सुखरूप असो. कितेक वर्तमान राजश्री उदबानी लिहिले आहे त्यावरून कलो येईल. आपल्यास कोण्ही विचार सांगतील की इकडील कार्यभाग करून मग तिकडे जाणे तरी जावे; तरी सांप्रत आजी बातमी आली तेथें कांही अवधी राहिली नाहीं. निश्चयरूप तो याजवर येऊन याची त्याची गाठी पडते. सामान आहे तें व(डि)लांचे वडीलास विदित आहे. आधी हा उपराळा करून हे कार्यसिधि करावी. ईश्वर येश देईल यांत संदेह नाहीं. सडी फौज आपण घेऊन पुढें चालावें. दो ती मजलीचें कृत्य आहे. याउपर वर्तमान आपणांस वरचेवरी ल्याहावें ऐसी संधि राहिली नाहीं. दाहा वाथ्यांनी याची त्याची गांठी दो दिसांत पडते हे सर्व लज्या वडिलांस आहे. कंठाजी हे पुढें आले, यैसे यैकोनच दाहोदेवर आला. ये जातीचे वर्तमान आहे. हें वर्तमान येजमानांचे आज्ञेवरून सेवेसी लिहिले आहे. संकट दिसते ते आपण निवारण करणार आहेत. पत्र वाचून फाडून टाकिले पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*If the writers Appa and Sadashiv be taken respectively to be Dhondopant Purandare and the eldest son of Ambaji Purandare, the letter appears to be addressed from Gujarat to Poona, describing the difficult position to which the Peshwa's armies were being driven.*

No. 80] [18-3-1731 ?

छ २० रमजान

श्री

श्रीमंत राजश्री चिमणाजीपंत आपा
स्वामीचे सेवेसी

सेवक कृष्णराऊ माहादेव कृतानेक साष्टाग नमस्कार विनंती. येथील कुशल जाणून स्वकीयें लेखनाज्ञा केली पाहिजे विसष. आम्ही जवार रामनगर प्रांतें जाण्हार, यैशास जवारकरांनी मखबुल अलम याचे भरवसियावर मोठासा आव धरिला आहे. त्यास मुलींच नीट केल्यावर पुढें फारसा येत्न लागत नाहीं. याजकारणें आपण येक पत्र मखबुल अलम यास पाठवावे कीं जवार, रामनगर, पेठ, वासदे कृष्णराऊ यास जिला दिल्हा आहे. त्यामधे जवारकरांनी दंगा आरंभिला आहे आणि तुम्ही त्यांची मदत करितां हे गोष्ट कार्यास कैसी येईल ? नाहक तुमचे आमचे श्नेहामध्यें अंतर पडोन लाभावेगला बिरंग होऊन येईल यामधें जिव काये आहे ? सारांश आमची दोस्ती व्याहात असाल तर जवारकराची मदत न करणें. याजमधें नेक जाणाल ते गोष्ट करणे; यैसे त्यास पत्र पाठऊन मखबुल अलम त्याची मदत न करीत म्हणजे जवारकर सहजेच हलके पडोन नीट वाटेस येतील. जवारकर नीट आल्यावर त्या प्रांतीचा कजियाच वारतो. मखबुल अलम यानी मदत पाठविली हे सथ्य मिथ्या म्हणावे तर चिरंजीव माहादजीपंताचे पत्र पाठविले आहे त्यावरून विदित होईल. कलले पाहिजे. बहुत काय लिहिणे कृपा लोभ असो दिजे हे विनंती.

¶*Krishnarao Mahadeo requests Chimaji Appa to write to Makhbul Alam not to render any help to the Chief of Jawhar who is laying waste the province assigned to the writer.*

No. 81] [5-4-1731

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीजीचे सेवेसी

सेवक दादाजी गणेश सा। नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम ता। चैइत्र सुध १० सोमवारपावेतों येथास्थित आसे विशेष. राजश्री आपाजीपंत हे ग्रहस्त थोर नवाब हमीदुलाखान याजकडून आणीकहि ग्रहस्ताकडून मातबर होऊन स्वामीकडे आले आहेत. याविशाई मुजरदजोडी पाठविली आहे त्याजबरोबर

वामीस विज्ञापना लिहिली आहे. हेहि आज स्वामीकडेच रवाना जाले आहेत, तर ासी येकांती वर्तमान विचारावे. सर्व वर्तमान विदित करितील, याचा विवेक रून पारपत्य करणार श्वामी समर्थ आहे. यासहि संतोशऊन श्वामी रवाना रणार समर्थ आहेत. सेवकास जे आज्ञा येईल तेणेप्रमाने वर्तनूक केली जाईल. हुत ल्याहावे यैसे नाही. स्वामी सर्वज्ञ आहे हे विज्ञापना.

¶Dadaji Ganesh writes to the Peshwa that the latter must deal severely, on etting full intelligence from Apajipant deputed by Hamidkhan and other nportant personages. This appears to refer to some intrigues at the Court f Hyderabad.

---

o. 82] *[20-6-1731*

छ ६ मोहरम

श्री

राजश्री चिमणाजीपंत

गोसावी यासी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री दावलजीराव ..मवंसी सरलस्कर दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीये कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष. दाभाडियाचें व आपले युध्य जालें. त्रिंबकराव दाभाडे पडले, आपणास येश आले, हे परस्परे वर्तमान यैकोन समाधान जालें; परंतु आपण पत्र न पाठविले हे उचित नसे. वरकड आमचे वर्तमान तर राजश्री प्रधानपंताचे पत्रीं लिहिले आहे त्यावरून कलेल. राजश्री फतेसिंगबावा व आम्ही कूच दरकूच राजश्री स्वामीच्या दर्शनास येत असो. अविलंबेच भेटी होईल. भेटीनंतर तपसिलें वृत्त परस्परे निवेदन होईल. कलले पाहिजे. रा छ २९ जिल्हेज बहुत काये लिहिणे. लोभ असो दीजे हे विनंती.

¶Dawaljirao Somawansi in a letter to Chimaji Appa congratulates him upon the success won over Trimbakrao Dabhade by the Peshwa's troops.

No. 83] *[3-7-1731 ?*

छ ९ मोहरम

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

सेवक कृष्णराव माहादेव सां नमस्कार विनंती. येथील कुशल जाणौन स्वकीये स्वानंदलेखनआज्ञा करीत असिले पाहिजे विशेष. रामनगरकराकडे मक्त्याचा

यैवज येणे. त्यास आपली स्वारी त्या प्रांती जाली तेव्हा अडऊन वसूल करावा तों रा दुर्जनसिग याचा भाईचारा, त्यास विशाद वाटेल, यास्तव गैर्गुदर केली. त्याणी मान्य केले कीं, अखेरसाली पैका देतो. यैसी बोली करून रा दुर्जनसिग याणी हवाला घेतला म्हणौन यैवज राहिला. हाली माणसे पाठविली. त्यास जाब प्रतिउतर पाठविले, ते स्वामीकडे बजिनस पाठविले आसे. त्यावरून कलेल. प्रात तों अगदीं वैराण, राजा गंभीरगडी जाऊन राहिला आसे. वसुलास माणसे जातात त्यास मानीत नाही. बळास आले आहेत. आम्हास तो खर्चाविसी लोकानी गवगवा केला आहे. पुढे रामनगरकरासी कटकट केल्यावाचून पैका येत नाही, तरी स्वामीनी रामनगरकरास ताकीदपत्रें व दोन हुजरे पाठविले पाहिजे की, पत्रदर्शनी पैका पदरी घालणे, नाही तरी श्रमी व्हाल, यैसी ताकीद पाठविली पाहिजे. आम्ही स्वामीचा निरोप घेऊन आलो. त्यास इकडील बदोबस्त करून लौकरच यावे तों इकडे येऊन कटकट पडली. खर्चावीण लोक हैराण, वसुलाची खलखल पडली, यास्तव दिसगत जाली. रा नार प्रभूचे लस्कर रामनगरकर कोली व पेठकर कोली याणी लुटून नेंले, यावरून बहुतच मगरूर जाले आहेत. मानीत नाही. यैसा विचार आहे. स्वामीस कलावे म्हणून लिहिले आसे. आपणाकडील सविस्तर लिहिले पाहिजे. उदैक त्रितीयेस फौज तिकड रवाना करून पंचमी सप्तमी इतके चासेस येतो. भेटीनंतर सविस्तर विनेदन होईल. हे विनंती.

¶*Krishnarao Mahadeo Joshi requests the Peshwa to warn the prince of Ramnagar against the danger of not paying the tribute immediately.*

No. 84] [*7-11-1731*

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वमीचे सेवेसी.

विनंती. सेवक केसो विश्वनाथ साष्टांग नमस्कार विनंति. तागाईत कार्तिक वदी पंचमी रविवारपावेतो स्वामीचे कृपादृष्टिकरून सेवकाचे व या प्रांतीचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीची आज्ञा पुणाचे मुकामी घेऊन राजश्री गणपतरायाचें दर्शनास सासवडास गेलो. आपलें पत्र त्यास दिल्हे. त्यावरून नेरचे सालमजकुरचे ताकीदरोखे त्याणी देऊन आपणास आज्ञा दिल्ही, आण

---

१ चालढकल

आम्हास आज्ञा केली, की परागणे मजकुरी दाभाडे याची दुई आहे. त्यास दरबारी प्रसंग निवडेल आण पायाशुध जालियावर दाभाडे याजकडील लोकानी खलेल न करावी येसे मातुश्री उमाबाईचे कागदपत्र घेऊन पाठवितो येसी राजश्री गणपतरायानी आज्ञा केली. त्यावरून आपण स्वार होऊन गंगातीरास येवलियास आलो. पुढे पाटणेयास येऊन नेरास जावे त्यास दलपतराव टोके याचा उपद्रव; दर गाव कोकण खेडेयापासून कोणी वाटेचा वाटसरू मनुश्य कोणी सुखरूप जाऊ न पावे. असा प्रसंग देखोन आपण पंधरा दिवस येवलीयास राहिलो. त्याउपर नबाब निजामनमुलुक यांचे अवरंगाबादेहून कूच होऊन खानदेश प्रांते आले. या योगेकरून आपण पाटणेयास आलो. नवाब निजामनमुलुक याचे आगमनाचे वर्तमान आलहिदा पुरवणी लिहिली आहे त्यावरून श्रुत होईल. दलपतराव टोके याणी या प्रांतामध्ये बहुत तसनस करून मुलकाची खराबी करून टकापैसा घेतला. नेर परगणेयांचहि दोचौ गावीची गुरे ढोरं आणिली. येक दोन गांव मारिले. हे वर्तमान पूर्वीच सेवेसी निवेदन केले आहे. पिलाजी गायेकवाड नेरास येऊन बांधारे फोडिले. परगणेयात तसनस करून परगणे याची खंडणी करून हैबतपाटिलाचा जातरोखा लेहून घेतला. हे वर्तमान हैबत पाटील याणी सेवेसी पूर्वी लिहिले होतें त्यावरून सेवेसी श्रुत आहे. यास सालमजकुरी दरबारी निखालस कारभार निवडला असेल. आण दाभाडेयांची दुई या माहालाची उटेल तर सुरलित प्रसंग होईल, आण टका पैसा वसूल होऊन आपला धंदा सुरलित चालेल. दाभाडेयांचा व आपला परस्परे स्नेह परस्परे जाला असिला तर पिलाजी गायेकवाडास पत्र की हैबत पाटीलाचा रोखा पत्र घेतला असेल तो फिरोन देणे, आण दलपतराव टोके यास पत्र की परगणेयाचे वाटेस न जाणे. येसी दोघास दाभाडे यांची पत्रे पाहिजेत आण राजश्री फतेसिंगबावा यांचे सरंजामाचे हे परगणे आहेत हे त्याचे स्वाधीन करावे असा पूर्वी विचार होता, त्याचे स्वाधीन केले असिले तर सहजच हा प्रसंग राहिला. येविसी आज्ञा करणे ते केली पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विनंती.

¶*Keso Vishwanath to Chimaji Appa, requesting to be informed whether a reconciliation with the Dabhade has been effected or not : otherwise the Parganas of Khandesh which have been suffering from the troubles created by Dalpatrao Toke, will not yield the revenue peaceably.*

4534

No. 85] [1731

शाहूदप्तर

रूमाल नं. ११

राजमंडल

सुा इहिदे
सला सीन

राजश्री संभाजी राजे छ १ रमजान फाल्गुन सुध द्वितीया मंदवारी दर्शण होऊन भेटी जाल्या ते छ २० शौवाल चैत्र बहुल सप्तमी मंदवासरे ते दिवसी चंद्रोदयी स्वार होऊल कोडोलीवर गेले.

¶*This note mentions the visit of Sambhaji and his stay with Shahu from 27th February to 17th April 1731.*

No. 86] [29-1-1732?

छ १४ शाबान

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामींचे सेवेसी.

विनंती. आज्ञाधारक शामजी कृष्ण व अंताजी हरि सा नमस्कार विनंती. येथलि कुशल ताा छ १२ साबान मंदवार येथास्थित असे. यानंतर आजी माहाराज राजश्री स्वामी येऊन पलटणास मुकाम जाला. राजश्री माहादाजीपंत बाा आहेत. आम्ही कारखाना जेथें केला आहे तेथेंच राजश्री माहादाजीपंत राहिले आहेत. स्वामीस कलावें. व मौजे पाबल येथील वेठे वगैरे तुलाराम व येंकोजी जासूद याजबाा पाा ते पावले. ताा

वेठे		किता	सामान
८	कुणबी	२९	पोलपाट
६	माहार	७४	लाटणी
२	गुरव	३१	ठाणवी
२	कुंभार		
१८		१३४	

येकून आठरा माणसे व येकसेचौतीस सुतारकाम पावले. बहुत काये लिहिणे, कृपा विधीतें पात्रिली पाा हे विनंती.

¶*The arrival of King Shahu at Phaltan accompanied by Mahadajipant is reported to Chimaji Appa by Shamji Krishna and Antaji Hari who also acknowledge receipt of articles with the labourers.*

No. 87] [27-7-1732

छ १६ सफर

श्री

श्रीमन्माहाराज राजश्रीं पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक राणोजी सिंदे कृतानेक विज्ञापना. ता। छ १९ सफर गुरुवार स्वामीच्या कृपावलोकने सेवकाचे वर्तमान येथास्थित आसे विशेष. आज्ञापत्र सादर जाहाले तेथे आज्ञा कीं पाटसासी आलेस विनंती पत्र न पाठविलें. यैसियासी भीमेवरी आलो तो नदीस पाणी पूर आला. टोकरेयावरी लस्कर न उतरे, तेव्हां पेडगांवीची नाऊ आणविली. च्यार पांच रोज उतरावयासी लागले. पाटसासी दाखल होतांच विनंतिपत्र सेवेसी पाठविले आहे; पावलें असेल. येथें वैरणमुळें मोठा गलांटा जाहाला असे. विकत पाकत कांही तरतूद करून आठां रोजांची बेगमी करून ठेवितो. पुढें खावंद जे तरतूद करणे ते करितील. आम्हीहि लवकरीच सेवेसी येतो. विदित जाहाले पाहिजे हे विज्ञाप्ति.

¶*Ranoji Sindia in his letter to the Peshwa explains the difficulties that he and his forces met with while crossing the river Bhima which was in high floods.*

No. 88] [3-10-1732?

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवसी

सेवक मोरसेटी करंजे सा। दंडवत विनंती. ता। छ २४ रबिलाखर स्वामीचे कृपेकरून वर्तमान येथास्थित असे विशेश. रा। नरसिंगराऊ ढमढेरे हे बुंधेलखंडांत पडिले. त्याचे भाऊ माहादजी ढमढेरे गतवरसी गुजराथेस गायेकवाड याजकडे गेले होते. सांप्रतहि तिकडेच जात होते. त्यास आम्ही सांगितले कीं श्रीमंत राजश्री पंत स्वामीस पुसिले वेगले नव जाणे. त्याणी निरोप दिल्हा तरी जाणे. म्हणऊन राहाऊन सेवेसी पत्र लिहिले असे. यांचेविसी आज्ञा करणे ते केली पाहिजे. हुजूर बोलाविले तरी उतर आलियावरी सेवेसी पाठऊन देऊन. सेवेसी शृत होये हे विनंती.

¶*Morshet Karanje writes to Chimaji Appa that Narasingrao Dhamdhere died in Bundelkhand and his brother Mahadaji Dhamdhere is waiting for order from the Peshwa as to what he should do further.*

No. 89] [31-10-1732

श्री

तहनामा चंदावरकर बोली विद्यमान राजश्री रामचंद्र नाईक पंडित सुा सलास सलासीन मया अलफ. खासगत बोली रामचंद्र नाईक यासीं:

नालबंदी सा लक्ष पैकी तीन लक्ष रुपये यास हुंडणावल जे पडेल ते वजा करून बाकीच्या हुंड्या अवरंगाबाद अथवा भागानगर येथे आणून द्याव्या. १

बाकी तीन लक्ष रुपये उरले ते आपले वकिलाचे हवाली करावे. १

चंदीप्रांत हस्तगत जालियावर तेथील धंदा तुम्हास सांगून. कलम १

चंदावरकराबा जो थैवज ये * चा दा ही जा तेथे * * * * * * देऊन. कलम १

चंदावरकरास पत्रे व हि * * ठवणे तो रा कासीबा नाईक याचे विद्यमाने पाठऊन त्याणी आमचे मायेत वर्तावे म्हणजे सदरहुप्रो केले जाईल. १

चंदावरकराचा कारभार सिधीस गेल्यानंतर तुमचा परामर्श करणे तो करून. अंतर होणार नाही. कलम १

येकून पाच कलमे करार केली असत; याप्रों तुम्ही आम्हीं वर्तावे. छ २२ जमादिलोवल.

¶*This is a document containing articles agreed to by the Peshwa with Ramchandra Naik Pandit for administering the province of Ginjee. The paper proves that the subject of Taniore was at the time uppermost in the Peshwa's mind.*

No. 90] [19-11-1732

श्री

गंगाभागीरथीसमान

मातुश्री राधाबाई यासी

श्मो सिऊबाई क्षेम विनंती उपर. येथील क्षेम तागायत मार्गशीर्ष शुध १४ जाणोन स्वकीय लेखण करविलें पाहिजे विशेष. राउ तांब्राच्या भेटीस जातात म्हणोन यैकिले. यैसियास तांब्राचे भेटीस न जावें हा विचार सर्वांचा आहे. तुम्ही म्हणाल कीं पेशवाईच्या पदाचा महिमा यैसा आहे कीं राजश्री आज्ञा करि-

ील तें करावें. तें तों खरेंच आहे, परंतु ये वेळेस पाठवितात हे गोष्ट राजकी ाहीं. तांब्रानें राजश्रीस दोन कोट रुपये देऊं केले आहेत या लोभास्तव राजश्री ाठवितात यैसे सर्वतोमुखीं आहे. तुम्ही म्हणाल कीं मागें दाभाड्याचे वेलेस ैसी फौज कार्यास आली तैसी आतांहि येईल; यैसें आहे कीं तो अर्थ आतां ाहीं. लोक बहुत श्रमी आहेत, यैसियास बहुत प्रकारें याचें जाणे न होये तें ्त्तम आहे. कदांचित जाणे जरूर जालें तर राजश्री चिमाजी आपाची फौज ाणिवणें. त्यांची फौज आलियावाचून यांस जाऊं न देने. ते हे येकत्र ालियावर काये विचार करणे तो करतील, परंतु उतावली करून जाऊं न देनें. ाउपर कृष्णराव पुन्यास आलेयाची समजावीस करावी हें तुम्हांस उचित आहे. ःष्णरायाचें डौल होते ते तुमचे पदरचेच होते. यांत तुमच्या विच्यारास येईल करणें. तुम्हीं म्हणाल कीं आपले हातीं काये आहे तर तुम्हीं चितावर व्याल र अवघेच होईल बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶Shiubai Chaskar apprehends danger in Bajirao's going to interview ıe Nizam. The King had asked Bajirao to go and visit the Nizam. The riter requests Radhabai to postpone the visit until Chimaji Appa is sent ır and is asked to accompany Bajirao with his army

---

lo. 91] *[19-11-1732*

श्रीराम

श्रीमंत चिरंजीव विजईभव राजश्री
पंत प्रधान यांस

सिऊबाई कृतानेक आसीर्वाद उपर येथील क्षेम तागायत मार्गशीर्ष शुध १४ ाणोन श्वकीये लेखणार्थ आज्ञा करविली पाहिजे विशेष. सांप्रत यैकतों कीं तांब्राचे टीस श्वारी होणार तर जणांत बोली तों यैसी आहे कीं दोन कोटी रुपये तांब्र जश्रीस देतात, याजकरितां राजश्री तुम्हास पाठावेतात तर विश्वतोमुखीं आहे कीं ्ही भेटीस सहसा न जावें. राजश्री चिमाजी आपा इकडे होते त्याबरोबर ाची * * * फौज होती तेव्हां आनंदरायानी गोस्ट विलंबाखालें तली. फौज दूर जातांच त्यानी भेटीची निकट केली. यैसियास सहश्र वाटे टीस जाणें न होय ते गोष्ट उतम आहे. कदाचित जाणें जरूर जाले तर जश्री चिमाजी आपाची फौज आपणांजवल अनऊन आपली जिव्हालियाची फौज

जेथून द्रढतर विचार करून जाण जा़ल तर जावें. निंबालकर व तुरुकताजखा तुम्हांस न्यावयास येणार होते. त्यासी त्यांचा तुमचा घरोबा याजकरितां न पाठविले. तुम्हांस कांहीं गोष्टीचा भेद कलेल म्हणोन ते न आले. बहुत काय लिहिणे हा आसीर्वाद.

¶Shiubai asks the Peshwa to put off the interview arranged between him and the Nizam by the orders of the King who had asked him to proceed and receive a sum of 2 crores of rupees promised by the Nizam to the King. Shiubai further requests him to have by his side Chimaji Appa and his army if he needs must go.

No. 92] *[1732?*

श्रीजयती

अपत्ये सा। नमस्कार विनंती. चाणकेस किलेदार नवा आला तो मखबर आलमाचे व थोराताचे स्वार व सिबंदीचे प्यादे घेऊन येऊन किल्यात जाणा आहे. जुना किलेदार त्याचे हवाला किला करीत नाही, त्यामुले मुलकात ते धुंदी करणार हे वर्तमान पूर्वी सेवेसी लिहिले आहे. येविसी काये विचार ते आज्ञा केली पाहिजे. रा। गोविंद कृष्णाचे पत्रावरून पुरंदर, लोहगड, कोरीगड घनगडकरी पाऊणसे माणूस आम्ही पाठविले आहे, तेथे बाबलियाचे स्वार आहेत. आणखी गरज लागली तरी ठेऊसे गोविंद कृष्णानी लिहिले होते. पुढे काये आज्ञा ते करावी तदनुसार वर्तणूक करून. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶The letter informs the Peshwa that a detachment has been posted in the vicinity of Chakan to prevent the quarrel between the old kiladar of Chakan and his successor—both officers of the Nizam—spreading into Maratha territory. Chakan at this time was under the Nizam's rule.

No. 93] *[2-6-1732?*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
तथा राजश्री आपा स्वामीचे सेवेसीं

विनंती सेवक केसो विस्वनाथ साष्टांग नमस्कार विनंती. ता। जेस्ठ वदी पंचमीपावेतो स्वामीचे कृपादस्टीकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असें विशेष.

4539

पूर्वी या प्रांतीचें सविस्तर वर्तमान सेवेसी विनंतीपत्रें पाठविली, त्यांची प्रतिउतरें पुणाचे मुकामीहून आज्ञापत्रें सादर जाली त्यावरून समाधान जालें. सांप्रत या प्रांतीचें वर्तमान तर नवाब निजामनमुलुक अवरंगाबाजेस गेलियानंतर राजश्री भावसिंगराऊ ठोके मौजे पिंपलगाऊ खैराचे पा। लोहनेर येथे येऊन राहिले. उदाजी पवार बागलाणेयाहून गंगातिरास गेले. पिलाजी गायेकवाड नासिकयात्रा करून पाटोदे पा।यात आलें हे वर्तमान तिकडून सेवेसीं लिहिली जातच असतील. दलपतराऊ ठोके आभोणियाकडून येऊन गालणे पा।यात नजीक दाभाडी पिंपलगाऊ आहे तें राणोजी जगदला याणे बांधिले होते, जागा मुर्स्तैद[१] जाली होती, त्यात दरवाजेयाजवली येऊन येकायेकी सिरला, आण ते जागा बलाऊन खंदक खणावयासी काम लाविलें आहे. वडगाऊ देखील ते अवघे येकत्र होऊन मुलकात उतपात मांडिला. निंबाईत, गालणा कुल मुलकात ताप घालून नवेसिरे खंडणिया केल्या, आण मारामार मुलकांत आरंभिली आहे. मौजे पाटणें का। वडेल पा। गालणा हेहि गाव आपले मुकासे म्हणतो. मातुश्री उमाबाईने आपणास दिले आहेत. पाटणेकर पाटील येकजण जाऊन पहिले भेटला. सेपनास रुपये घासदाणा दिला. आण गावास आला. दुसरें दिवसीं धावणी करून तीन गाडे व बारा बैल वलून नेले. तीनच्यार माणसे जखमी केली आण तीन हजार रुपये सन इहिदेची खंडणी मागतो. मुकासा आपणास दिला आहे म्हणतो. येकंदर दरवाजेबाहिर माणूस येऊ देत नाही. पाटणकरास पैका द्यावयासी मिलत नाही आण त्यास त्याच्यानें भेटवत नाही. भेटलियानें तो गावात सिरणार आणि गाव लुटणार. गावात गावकरानी दीडसे बरखंदाज चाकर ठेऊन च्यार पाहार रात दिवस मोरचेबंदी करून, प्रजनकाल, कोठे जावयासी जागा नाही, याकरतां हिमत धरून राहिले आहेत. दलपतचे ठाणे दबाडीजवली कोसावर बैसले आहे. बागाइताची लावणी उसाची बुडाली. हाली कमोद पेरावी तर हे गत आरंभली आहे. स्वामी रागास येतील कीं हकीकती लिहितात. परंतु जाले वर्तमान सेवेसी श्रुत हावे याकरिता लिहिले आहे. राजश्री नारो राम मंत्री याचा गाव वडेल तोहि मुकासा आपलाच म्हणतो. तेथील पाटील भेटला याची खंडणी दुसरी करून कैदेत ठेविला आहे. सेवेसी श्रुत होये हे विनंती.

¶*Keso Vishwanath gives news to the Peshwa about the movements of Nizam-ul-mulk, Bhavsingrav Thoke, Udaji Pawar and Pilaji Gaikwad. The writer also informs the Peshwa about the trouble created by Dalpatrao Thoke in the vicinity of the villages Pimpalgaon and Patne.*

---

१ तयार, कायम.

No. 94] [2-4-1733?

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
विसाजीपंत दाजी स्वामीचे सो

पोष्य गोविंद बळाल कृतानेक साष्टांग नमस्कार. विनंती ताा छ २७ सवाल पर्यंत पाा गुरसराई येथे राा हिरदेशजींचे लस्करामध्ये सुखरूप असो. या नंतर दोन पत्रीं सविस्तर वर्तमान श्रीमत राजश्री आपासाहेबास लिहिलें होतें तें पावले असेल. हलीहि सविस्तर वर्तमान लिहिलें आहे, त्यांत प्रतिउत्तरे ज्याप्राा याद पाठविली आहे त्याप्राा ताकिदी सत्वर पाठवणे. सर्वदा पत्रीं सांभाळ करणें आपलें वर्तमान सविस्तर लिहिले पाहिजे. तुमचे भरवसेयावर कितेक राजकारणें येथें करून लिहून पाठवितो. जे राजकारण कामाचे असेल तेच करून, वाऊगे सहसा करणार नाहीं. ज्यामध्ये खावंदाचे कार्य होईल तेच करून. खावंदाचे नाव समर्थ आहे याजकरितां आम्हाजवळ कितेक राजकारणे येत आहेत. तुम्ही जेवढा बोज घाल तितका कार्यास येईल. चाकरी होऊन येईल तेव्हा खरी. बहुत काये लिहिणे? ज्या ज्या प्राा आमचे पत्र तुम्हाजवळ पावले त्याप्राा प्रतिउतरे सत्वर पाठवीत जाणे. बहुत काये लिहिणे कृपा करणे हे विनंती.

राा माहादाजी आबाजी व शामजी नाईक, माहादाजी नाईक, धोंडोबा, निबाजीपंत यास नमस्कार राा कृष्णाजीपंत रामाजीपंत अंताजी यास साा नमस्कार.

* * देवबावास राघोपंतास नमस्कार.

¶*Govind Ballal assures the Peshwa (Bajirao) that the trust placed in him will not be belied and that the duties assigned to him will be properly discharged and the interest of the Peshwa carefully secured.*

No. 95] [2-6-1733
रुजू

श्री

तीर्थस्वरूप माहाराज राजश्री
आबासाहेबांचे सेवेसी

अपत्ये फतेसिंग कृतानिक दंडवत विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २९ जिल्हेजपर्यंत माहाराजांचे आसीर्वादे येथास्तित असे. येथील वर्तमान वरचेवरी सेवेशी लेहून पाठविलेंच आहे. त्याजवरून विदित जाले असेल. रायेगडचे

राजकारण आले त्याची रवानगी पैका देऊन केली. ते शामलान छपा घालून टका पैका घेऊन गेला हें वर्तमान पूर्वी लिहिलेच आहे. त्याउपरी लोक आले होते त्यांचे समाधान करून मागती पाठविले आहेत. पैका द्यावयास नाहीं तेव्हा लोकांची कडी उसनी घेऊन पांचहजाराचा ऐवज मात्र पाठविला. राहिला ऐवज हालीप्रो द्यावा लागतो तरी तो ऐवज त्वरेनें पाठवावा म्हणजे रायेगड फते होतो यात संशये नाही. लोकांचे व खर्चाचे साहित्य करितों म्हणोन वरचेवर आज्ञापत्रें आलीं परंतु लोक न आले. येथील लोकांचे भरोसे म्हणावे तरी दांडियास दीडसे माणूस होते त्याजवरी पंचवीस लोक हबसियाकडील येऊन मारामार केली. येकानीहि अवसान धरिले नाहीं. तैसेच रायेगडचा पैका पावावयास दोनसे माणूस दिल्हे त्याजवरी पनास पावणसें येऊन छपा घातला. आवघे लोक पळाले. द्रव्य ते घेऊन गेले. ऐसा प्रसंग लोकांचा. या भरोसियावर राहावे तरी आपल्या जीवास पाणी घालून राहावे लागते. राहावयास अवसान न पुरे. परंतु माहाराजाची आज्ञा, इलाज नाही. मुख्य गोष्टी जंजिरा हातास आल्याखेरीज आले ते कांहीं कार्याचें नाहीं. त्यास सेखजीचे विचारे जुझोन भांडोन जंजिरा येत नाही, शकटभेद करावा लागतो. त्यास खानजादा आहे, त्याचे नांव मात्र पुढे करावे. किले आरमार मुलूक त्याचे स्वाधीन करावा. त्यामुळें आपण लोक आवघे आपले जमा करितो आणि जंजिरे आवघे घेतो. घेतल्यावरी आपण तों चाकर जालोच आहे. देखीलजंजिरे माहाराजाचे पदरी घालितो. लोक जमा करावयास पैका लागेल तो द्यावा. यैसी बोली अंतस्ते केली, क्रिया दिल्ही. बाह्यात्कारे खानजादा पुढे करावा, रायेगड देखील रायेगडचा जिल्हा तूर्त माहाराजानी घ्यावा, ऐसा विचार केला. खानजाद्यासी बोली लोक जमा करून जंजिरे हस्तगत करावे, माहाराजाचे म्हणावावे ऐसी केली आहे. पुढे होईल ते खरें. सेखजीचें सर्व साहित्य टक्यापैक्यानसी करावें लागतें, तरी माहाराजानी पैक्याची बेगमी करून मनसुबा सिधीस पाविला पाहिजे. राजश्री सेखोजी आंगरे सरखेल आले. त्यांचे स्वाधीन अरमार केले, त्यास श्रावण पौर्णिमेपर्यंत अरमार चालत नाहीं ऐसे आम्हास समजाऊन सारे आरमार कुलाबियास घेऊन गेले. कोळी व सफरी होते ते जंजिरियात जातील, दगा करितील ऐसे सांगोन त्यासहि घेऊन गेले. आम्हांस तो दर्यातील कारबार वाकीफ नाही. त्यांचे सांगितले प्रमाण मानिले आणि हाली जंजिरियाहून गलबते खाडींत येऊन उत्पात करितात. आम्ही किनारा तमासा पाहातो. हा इतका प्रसंग सरखेलीनी केला, त्यामुले गलबते खाडींत जाऊन हबसी सामानपूर होत चालिला आहे. याचा उपाये सेखजीने विचार काढिला आहे तो केल्याविना होत नाही. आम्ही सेखजीचें सूत्रें आलों. पुढेंहि त्याचेंच

मतें जें करणे ते करावे लागते. रायेगड देखील जिल्हा आपले हातास येतेच आहे. सविस्तर अर्थ महाराजानी ध्यानास आणून आज्ञा कर्तव्य ते केली पाहिजे. सेखजीचे साहित्य पैक्यानी करावे लागते. याची बेगमी माहाराजानी करावी. राजश्री श्रीनिवासपंडित प्रतिनिधि रायगडाखाले पाचाडास आले. त्यास आम्हा-कडीलहि राजकारण त्याजवलच पाठविले आहे. आधी हें करावे. हें नव्हे तेव्हा आपणाकडे सूत्र असेल तें सूत्रें कार्य फते करून येथे यावे म्हणून आम्ही त्यास लिहिले आहे. माहाराजानीहि तैसेच आज्ञापत्र त्यांस पाठऊन तेथील कार्य जालियावरी येथे येतसे करावे. ते येथे आलियावरी त्यांचे आम्हा उभयतांचे विचारे माहाराजाची आज्ञा येईल तदनुसार मनसुबा विल्हेस लाऊन. मंडणगड व बाणकोट सरखेल याणी घेतला आहे ते व आरमार आणून सेखजीचे स्वाधीन करावे लागते. त्यास माहाराजानी सरखलीस आज्ञापत्र पाठवावे जे आरमार व किले आम्ही सांगो त्याचे स्वाधीन करणे ऐसे पाठविले पाहिजे. पैका आधी आधी पाठवावा; नाही तर हा मनसुबा हातीचा जातो. आमचे विचारें तो हा मनसुबा उत्तम आहे. हे केल्याने पुढे आवघेच हातास लागते. यात माहाराज आज्ञा करितील तें प्रमाण. जरी आमचे जीवाचे अगत्य असेल तरी पैका आधी पाठवावा. प्रतिनिधि येथे येतसे करावे. या पत्राचे उत्तर अविलंबे सादर करणार साहेब धणी आहेत * हे विज्ञाप्ति

¶*Fatesing Bhonsle requisitions funds from Shahu for the capture of Raygad. He accuses Sekhoji Angria of having handicapped him in his action by sending away the navy to which he attributes his failure.*

No. 96] [*Recd. 8-6-1733* ?

छ ६ मोहर.

श्री

पुा तीर्थरूप राजश्री राऊ

स्वामी वडिलाचे सेवेसीं

विनंती. जगतराज याजकडील थानसिंग वर्षास येत आहे. त्याची रजबदल आहे जे, हती येक द्यावा. ऐसियास सुभानजी जठार याजबाबत हती उसना घेऊन थानसिंगाबरोबर पाठविला आहे. स्वामीस वर्तमान कलावे म्हणून लिहिले आहे. हिरदेशास हतीन पूर्वी दिल्ही होती, व यास हती दिल्हा नव्हता,

म्हणून हती उसना घेऊन पाठविला असे. गोविंद बलाल तेथे आले आहेत. जगतराजाच्या हतीविसी विनंती करितील तरी येथून हती पाठविला असता दुसरा पाठवासा नाही. बहुत+ काये लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Chimaji from Bundelkhand informs Bajirao that an elephant has been presented to Jagatraj Bundele.*

No. 97] [*29-6-1733*

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री अपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. राजश्री राणोजी घोरपडे याजकडील मजकूर छ २४ माहरम परियेंत जाला तो पूर्वी लेहून पाठविला त्यावरून विदित जाले असेल. घोरपडियास परिछिन कलले की राजश्री संभाजी राजे आपली समजावीस करीत नाहीत; तेव्हा बहुता दिवसांचा सरंजाम, सेनापतीचे नाव, दोन्ही गोष्टी टाकून इकडे येऊन राहवे. त्यास वलण नाही. दुसरी गोष्टी नाहीं. उदाजी चव्हाण याच्या सरंजामात जीव नाही येसा विचार करून छ २ मोहरमी अंतस्थे राजकारण लावलें कीं तुम्ही जितका सरंजाम घ्याल तितका घेऊन सांगाल चाकरी ते करून आपाजी सितोले याची व आमची समजावीस करून घ्यावी येसा मुदा सांगोन पाठविला. त्यावरून छ २६ मोहरमी गुरुवारी धारराऊ यादव घोरपडे यांच्या घरास बोली करावयास गेले आहेत. राजश्री स्वामी आजी छ मारी प्राथ:-काली बोलिले की उभयेताची बोली लागली आहे. समजावीस होईल. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विनंती.

¶*Chimaji is informed that the proposal of Ranoji Ghorpade taking service with Shahu is under consideration. Ranoji Ghorpade became dissatisfied in the service of Sambhaji of Kolhapur and was making overtures to the King of Satara.*

No. 98] [*23-8-1733*

तालीक.

श्री

सेवेसी विज्ञापना. स्वामीच्या कृपावलोकनेकरून ताा श्रावण वद्य दशमी गुरुवार मुाा कलबरगे सेवकाचे वर्तमान येथास्थित असे. पूर्वी विनंतीपत्र सेवेसी

+ पत्र चिमाजी आपाचें आहे.

वरचेवरी लिहिली आहेत. त्यास नवाबास पाच सात दिवस फारच बरे वाटत नाही. येकंदर दरबार नाहीं. काल बुधवारीं येक घटका खलबतांत निघाले होते, त्यास हबसियाकडील मसुदे नीट करून ल्याहावयासी दिल्हे. आज रुकसत करणार. जालियानंतर मजल दरमजल येतो. नाकावाटें पाणी व डोल: येक यावाटें पाणी गलतें, तेणेकरून श्रमी आहेत. आजी रुकसत करणार तर करितील अगर उद्या बरकड भला मनुष्य येतो. समागमे त्याची तयारी कुल करविली. बरकंदाज त्या समागमे स्वार त्यास खर्चास देविले. निरोपासाठींच खोलंबलो असो. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer informs Bajirao from the camp of Nizam-ul-mulk at Kalburga that the Nizam was for a few days past suffering from cold and that as soon as the writer is permitted to return he would do so.*

No. 99] [*Received 15th October 1734*

छ २८ जोविल

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ ः

तथा राजश्री आपा स्वामीचे सेवेसीं

विनंती. राजश्री फतेसिंगबावा बोलिले कीं उतरेकडील मन(स)बा जो करणे (तो) राजश्री पंतप्रधान याणी व आम्ही एक विचारे करावा. येविसीच्या कितेक गोष्टी तेहि आम्हासी बोलिले व आम्हीहि त्यासी बोलिलो व त्यांच्या सांगितल्या-वरून आम्ही बाहेर फौज जमा करून निघतो. आमचा कांही तुंम्हाखेरीज दुसरा विचार नाहीं. तरी पुढें राजश्री प्रधानपंत काय करितात, आम्हास कोणता विचार सांगतात हें तपसिलें तुम्ही लेहून उतर अणवणें व गोवलकोट (व)गैरे कोकण प्रांतीचा विचार राजश्री प्रधानपंताच्या विचारें होते कीं राजश्रीपासून आम्ही मागोन घ्यावे, (पु)ढे जे करणे ते आम्ही व तुम्हीं येक विचारे करूं ऐसे बोलिले होते. त्यावरून प्रस्तुत आम्ही राजश्रीसी रदबदल घातली आहे. तो प्रांत जर राजश्रीनी आमचे स्वाधीन केला तरी त्याचा विचार काय हेहि लेहून आणवणे म्हणून आम्हास सांगितले. तरी याचा विचार स्वामीनी ध्यानात आणू(न) उतरें त्यास दाखवावया योग्य जीं लिहिणें तीं ल्याहावी. व आम्हास काय लिहिणें तें ल्याहावें. राजश्री फतेसिंगबावा व राजश्री प्रतिनिधि

मुलु(ख)गीरीस जातात. लक्ष प्रकारे तो दक्षणप्रांते जातील. न बने तरी उतरेकडे जातील, ऐसे आहे. स्वामीस कळावे याकरितां लिहिले असे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Balaji Bajirao supplies Bajirao and Chimaji Appa with details of happenings at the Court of Shahu and adds that Fatesing Bhonsle and Pratinidhi will march with their forces either towards the South or the North to capture new places.*

No. 100] [*Recd. 23-11-1733*

पा छ २६ जमादिलाखर

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व
तथा राजश्री आपा स्वामींचे सेवेसी

विनंती उपरी. राजश्री संभूसिंग जाधवराव यांस आणावयास पहिले राजश्री स्वामीनी हुजरे पाठविले होते. यैशा(स) प्रस्तुत राजश्री नारबावानीं राजश्रीस विनंती करून येथें न आणावे. यैसे करून, त्यास मुलूकगिरीस जावयाची आज्ञा मागितली. त्यावरून राजश्रीनी आज्ञा केली की, कर्नाटक प्रांते मुलूकगिरीस जावें. अलीकडे उपसर्ग करूं नये, आणि गोवलकोटचे मसलतीचे राऊत पाठऊन द्यावे. यैसे बोलोन करार करून त्यांस मुलूकगिरीस जावयाची आज्ञा बावास सांगितली. विदित व्हावें म्हणून लिहिलें असें. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Bajirao and Chimaji Appa are informed of King Shahu's orders asking Shambhusing Jadhav to be sent on an expedition into the Karnatak.*

No. 101] [*16-12-1733*

छ २० रजब

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक जानकोजी सिंदे कृतानेक सां। दडवत विनंती येथील कुशल ता। मार्गेशीर्ष वद्य सप्तमी, भानुवासरपावेतों स्वामीच्या कृपाद्रिष्टीकरून सेवकाचें

वर्तमान येथास्थित असे विशेष. *स्वामी सातारियास आले.* चरण पाहावे हा हेत बहुत आहे. आमचेंहि म्हतारपण. येकवेळ स्वामीच्या पायांवरी द्रिष्टी पडली म्हणजे या शरिराचें सार्थक जालें. अकाश (अवकाश ?) करून त्वरितच सेवेसीं येतों. त्यानंतर स्वामीच्या कृपेनें सर्व गोस्टीचें अनकूल जालें. कोणे गोष्टीचें स्वामीनी न्यून्य केलें नाहीं. परंतु कनेरखड वतनाचा गाव स्वामीनीं आपणाकडे करून द्यावा म्हणून पूर्वी विज्ञापना केली होती आणि स्वामीनीहि ते गोष्ट चितांत धरिलीच आहे. परंतु योग घडोन आला नाहीं. तरी वतनाचा गाव आणि गावीचें दैन्य फिटत नाही. याकरितां लौकिकांत अम्हास बरें दिसत नाहीं की, स्वामी सिरीं असतां हे गोष्टीचा अर्ज करीत नाही. स्वामी अमचे सिरीं असतां गावांचे दैन्य फिटत नाहीं ऐसे आहे. तरी स्वामीनी कृपालु होऊन गावीच्या सनदा आपणाकडे करून घेतल्यानें थोर गोष्टी होईल. येविशई स्वामी समर्थ आहेत. सेवेसी विदित होये. स्वामीनीं माहाल मुकासे बहुतच दिल्हे आहेत, परंतु वतनाचा गाव केल्यानें म्हातारपणीं आपली कामना पूर्ण होईल. विदित होये हे विज्ञाप्ति. घरी वस्त्रांची बेगमी पाहिजे. पागोटी २ व साड्या ३ येकून पांच सनगे देणार स्वामी समर्थ आहेत. हे विज्ञाप्ति.

¶*Jankoji Sindia requests the Peshwa to get his hereditary village Kanherkhed assigned to him and adds that while the addressee has conferred many favours on the writer, it would not be right that he should not have his own hereditary village in his possession. The writer is the father of Ranoji Sindia, the founder of Gwalior State.*

No. 102] [*December 1732 ?*

श्री

आसीर्वाद उपरी. भेटीचा दिवस उद्याचा पाहिलाच आहे. आजी च्यार घटका रात्रीस मुहूर्त उतमच आहे. म्हणावयास आजी वर्ज वार मात्र आहे. त्यास आपले विचारे काये ते लिहून पाठवणे. +हा आसीर्वाद. सिदबास व हिरोजीबावास मात्र तातड फार आहे. हा आसीर्वाद.

¶*Bajirao asks the addressee's opinion as to the most suitable day for a visit (with whom ?).*

+ यापुढील मजकूर थोरल्या बाजीरावाच्या हातचा.

No. 103] [1733?

श्री

सेवेसी विज्ञापना. वोडसे दतिया येथे बाकी राहिला ऐवज सुरंजेस पाठवावयाची वडिलांची आज्ञा होती, त्यास सुरंजेस पैका पाठवावयाचा निभाव आपणास होत नाहीं, म्हणून येथें रा। रंगोपंत व रामाजीपंत आहेत याणी विनंती आपल्या खावंदाचे आज्ञेप्रा। केली. तैसेच वोडशाचे राज्यानें बालाजी माहादेव संस्थानी गेले होते त्यांस सांगितले, त्याणी लेहून पाठविले, त्यावरून अगत्यास पैका हाताखालें घालावा याकरितां आमचे येणे या प्रांतें जाल्यावरी पैका अणविला. दतियाचा हिसेब बजिनस पाठविला असे, त्यावरून विदित होईल. वोडशाचा यैवज वसूल येऊन त्रेपन हजार रुपये बाकी राहिले आहेत. तेहि अणावयास त्यांची माणसे गेली आहेत. आल्यावरी घेऊन हेहि सविस्तर पहिले लिहिलेच आहे. हली विदित व्हावें म्हणून लिहिलें असे. †शेवेसी श्रत जाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*The writer Chimaji Appa reports having despatched treasure from Orchha to Sironj as ordered. It appears to be addressed to Bajirao.*

No. 104] [1-1-1733?

श्रीजयति

अपत्ये नानाने सा। नमस्कार विनंति येथील क्षेम ता। छ २९ रजब मु। पुणे येथास्थित असे विनंती. सांप्रत स्वामीकडून आसीर्वादपत्र येऊन वर्तमान कलत नाही. उडते वर्तमान नवाबाची व स्वामीची भेटी जालीसे आइकतो. परंतु भेटीनंतर पत्रें आधी येतील हें खरेंच आहे. तथापि वर्तमान तथ्य आणि सत्वर यावें म्हणून विनंतीपत्र लेहून सेवेसी पाठविलें आहे. तरी सत्वर प्रस्तुत कोठें मुकाम आहे, काये वर्तमान ते सविस्तर लेखन कराया आज्ञा करून उतरे लौकर येत ते गोष्टी केली पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The Peshwa's son Nana inquires of his father about the meeting reported to have taken place between the addressee and the Nizam. (See No. 32 above.)*

---

† This line in Chimaji Appa's hand.

No. 105] [23-2-1734

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक जिवाजी गणेश साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २ सफरपर्यंत स्वामींचे कृपेकरून वर्तमान येथास्थित असें विशेष. तोफा वगैरे सामान कारकून बराबर देऊन स्वामीचे आज्ञेप्रमाणे जवल्याकडे रवाना केले. त्यास मोगल माघारा फिरला, असिउंबरीहून स्वामीचे कूच होणार म्हणोन वर्तमान ऐकिले. त्यावरून सामान जेथे गेले असेल तेथेंच राहावयाविसी कारकुनास पत्र लेहून स्वामीकडे विनंतीपत्र लिहिले आहे. तरी पुढे सामान पाठवावे किंवा माघारें पुण्यास आणावें येविसीं काये आज्ञा ते करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Jivaji Ganesh solicits instructions from the Peshwa as to whether the guns, etc., that have been despatched to Javla should be called back, in view of the news that the Nizam had retreated.*

No. 106] [9-5-1734

श्री

राजमान्य राजश्री राघो केशव
गुमस्ते सरदेशमुख पाा वालुंज
गोसावी यासीं

सेवक चिमणाजी बलाल नमस्कार. सुाा सन आर्बा सलासैन मया अलफ. तुम्हीं पूर्वी पत्र पाठविले पावोन वर्तमान विदित जाहाले. राऊत पाठविले पाहिजेत म्हणोन लिहिले. यैशास तीर्थरूप राजश्री रायांची स्वारी खानदेशात जाहाली याजनिमित्य न पाठविलें. तुम्हास राऊताचे जरूरच प्रयोजन असेल तरी राजश्री राऊ माघारे गंगेवर येतील ते समई पत्र पाठवणे. राऊत पाहिजेत ते पाठऊन देतील. पाा मजकूरपैकी वसूल होईल तो वरचेवर पाठवीत जाणें. तूर्त यैवज जमा जाहाला असेल तो पत्रदर्शनी पाठवणें. पाा मजकुरपैकी आजी तागायेत वसूल काय जाहाला असेल तो तपसीलवार लेहून पाठवणें. जाणिजे. छ १६ जिल्हेज. या कामास भिकाजी गोल्या जासुद पाा यास रूाा ५ पांच आदा करणें. जाणिजे. आज्ञा प्रमाण.

बार

¶*Chimaji Ballal writes to Ragho Keshav of Walunj to transmit the amount of revenue so far collected.*

No. 107] [21-5-1734

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामींचे सेवेसी.

आज्ञाधारक लक्ष्मण विस्वनाथ सां नमस्कार विनंती येथील वर्तमान ताा छ २८ जिल्हेजपर्यंत यथास्थित असे विशेष. आपण लोकाविसी आज्ञा केली त्यास लोकांचा प्रेत्न करितों, परंतु आगोठीचे दिवस याकरितां कोण्ही पाये घेत नाहीं. हलीं धोंडजी जाधव याचे दिमतींचे लोक आसामी १० दाहा करार केले. त्याची तैनात. दरमाहे रुा ६४ चौसष्ट याखेरीज दर आसामीस दर माहे अडिसेरी केली ८॥१॥ साडेसात पाइली प्रो॥ बोली करून धोंडजी जाधव व गोपाल विस्वनाथ सेवेसी लोकासमेत पाठविले आहेत. पुढें जे मिलतील ते वरचेवर ठेऊन पाठवितो. यास येक महिना चौसष्ट रुा पदरी घालोन आपणाकडे पाठविले आहेत. यांजपासोन सेवा घेतली पाहिजे. लोक मिलत नाहीं. महिना भारी पडतो. कबूल करून पाठवावे येसी आज्ञा जाहली तरी प्रेत्न करून जमा होतील ते वरचेवर पाठऊन. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Laxman Vishvanath to Chimaji Appa, urging the scarcity of men for military service and sending ten men with their wages being fixed.*

No. 108] [16-8-1734

छ १ राा्खर

श्रीशंकर

श्रीमंत राजेश्री राऊ
स्वामीचे शेवेशी

पोश्ये बाबूजी जोशी साा नमस्कार विनंती उपरी. येथील वर्तमान स्वामीचे आशीर्वादेकरून श्रावण वदी १४ शुक्रवारपावेतो सुखरूप असो विशेष. कालीच दिनानाथजीचीं पत्रें मथुरेहून आली. लग्न करून मथुरेस आले. धोंडो गोविंद दिलीत आहेत. स्वामीनी आज्ञा केली आहे त्याचे प्रेत्नात आहेत. सत्वरीच धोंडो गोविंद याची पत्रे येतील. विशेष दिनानाथजी मथुरेस आले. तेथे राजेश्री वृजनाथजी राजे जयसिंगजी यांचे पुरोहित परंतु सांप्रत काळांत वृजनाथजी यांची चाल फार आहे. त्यानी स्वामीस पत्र लिहिलें आहे आणि

येक पत्र आम्हासहि लिहिले की, गुदस्ता महलारजी होळकर व राणोजी सिंद यानी मुलकांत धामधूम केली त्यामुळे राजे बहुत अंजुरदे जाले. पुढे सलूख करावा असें त्याचे चितांत आहे. याकरितां बृजनाथजी यानी दिनानाथजी यास मथुरेस राहून घेतले, आणि पत्रे आम्हाकडे पाठविली. त्याशी स्वामीचे विचारें सलुख करावा असें आलें तर येक पत्र राजे जयसिंग व येक पत्र आयामलजीस ल्याहवी कीं, आपले तर्फेने दिनानाथजी तुम्हाकडे पाठविले आहेत. आम्हाकडील वर्तमान सांगतील. येक मातबर माणूस दिनानाथजीबरोबर आम्हाकडे पाठवणे. परस्पर वर्तमान विदित होईल. आपण लिहिताना इतकेच ल्याहवें. स्वामीची आपली भेटी व्हावी अशी वासना आहे तर भेटीचा मजकूर ल्याहवा. सारांश गोष्ट मातबर माणूस आहेत. त्यांचा स्नेह असावा आणि कोणेके समई कार्यहि होऊन येईल. बृजनाथ दीक्षित व त्यांचे तीर्थरूप प्रभाकर दीक्षित यानी स्वामीस पत्र लिहिले आहे तें पत्र वाचन समाधानपूर्वक उभयतांस पत्र ल्याहवी. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Babuji Joshi reports Jaising having deputed one Dinanath to open peace-talks with the Peshwa.*

No. 109] [2-9-1734

श्री

राजश्री बाजीराव पंडित प्रधान गोसांवी यांसी,

ॐ श्रीसकलगुणालंकर्ण अखंडितलक्षुमीअलंकृत राजमान्य श्रो फतेसिंग भोसले दंडवत विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये लेखन केलें पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले, पावोन साकल्य वर्तमान कलों अलें. कोकरियाचा मजकूर लिहिला कीं, पहिले सरदारीच्या आरंभापासून कोकरे आपले पदरी असतां, ते सरदारी व हे विभक्त आहे यैसे नसतां, त्याची बोली करून ठेवावे यैसे नाहीं. येविशीं कितेक प्रकारें श्रम चितात आणून विस्तारें पत्र लिहिलें. यैसियास, कोकरे तो पहिले आम्हाकडेच बहुत दिवस होते. तेहि गोष्टीवरी त्याची बोली प्रस्तुत पडिली यैसें नाहीं. अनायासें त्या मार्गें सुपियास येतां मार्गी त्याची भेटी जाली. ते आपल्या वतनाकरितां बहुतसे श्रमी जाले. तेव्हां ते गोष्टीचें त्यास अस्वासन दिल्हे तेहि आपल्याच भरवसियावरी दिल्हे की, आमचे वचन जे स्थलीं गुंतले त्याचा अभिमान आपण मन:पूर्वक धरितील. यावरून त्यांस आस्वासन देऊन राजश्री स्वामीस विनंतीपत्र लेहून तेथूनहि उत्तरें आणविलीं. पुढें त्याची

बोलीचाली करून ठेवावे तो आपले पत्र स्वहस्ताक्षरचे बहुत श्रमाचे अलें. , तरा आपणांपेक्षा आम्हांस आणीक जोडी काये आहे ? केवल येथूनच आज्ञा द्यावी तरी लौकिक येक प्रकार दिसतो. याकारितां आपण त्याची समजावीश करून नेले पाहिजेत. वतनाचेविशई त्याहावें तरी ते तुमचे पदरीच आहेत. मनावरी धरून त्याच्या वतनाचाहि परिणाम लाविला पाहिजे. आपल्याजवली कोकरें असिले तरी आम्हाजवलीच आहेत यैसें जाणोन लिहिलें आसे. येविशीं विस्तार ल्याहावा यैसें काये आहे ? त्रिंबक विस्वनाथ याचा जाब आपण लिहिला; तरी प्रस्तुत तेहि आपल्याकडे अले आहेत. त्यांस जे सांगावयाचे ते सांगोन जेणेकडून सद्या कार्यभाग चालता होये तो अर्थ करविला पाहिजे. दोनी हजार रुपयेविशई येकदोन पत्रें पाठविलीं परंतु आद्यापि कार्यें होऊन येत नाहीं. येथे तो आणीक दुसरा उपाये आहे यैसें नाहीं. वोढीत वोढी ध्यानात आणून पैका पाठविला पाहिजे. वरकड कितेक अर्थ अलाहिदा पुरवणीत लिहिला आहे यावरून कलो येईल. रवाना छ १४ रविलाखर. बहुत काये लिहिणे, लोभ आसो दिल्हा पाहिजे, हे विनंती.

¶*Fatesing Bhonsle in a most conciliatory tone assures Peshwa Bajirao of his readiness to settle the affair of Kokre and not to hurt the addressee's feelings.*

No. 110] [*21-10-1734 ?*

श्री

श्रीकृष्ण

श्रीमंत राजश्री पंत

प्रधान यांप्रति

नारायण दीक्षित आनेक आसीर्वाद उपरी येथील क्षेम कार्तिक शुध शष्टी जाणऊन स्वकीये कुशल लेखन करणे विशेष. पूर्वी काशीवासास प्रयाण करितों म्हणून तुम्हास पत्र लिहून पाठविलें होतें. त्याचे प्रत्योतर आलें ते पावोन वर्तमान कळो आलें. आमचे काशीस जाणे होईल हा भरोंसा तुमच्या चितांत नव्हता, परंतु श्रीइच्छा प्रेरणा यैसीच जाली की सत्वरी काशीवास करावा. चिरंजीव दीक्षितानी बहुत येत्न केला कीं आम्ही राहावे त्यास श्रीची आज्ञा प्रमाण. उत्कंठा विशेष जाली, यास्तव स्वार होऊन कार्तिक शुध सप्तमीस गेलो. यैसिवाय पूर्वी तुम्ही कितीक गोष्टी मजजवळ बोलिलेत ते तुमचे चितांत स्मरण असावे म्हणून हें पत्र लिहिलें असे. चिरंजीवाची तुमची भेटी होईल, परपस्परे कितीक कलेल.

हरभटास बराबर न्यावयाचा विचार होता; परंतु पाहता दीक्षित येथे येकले, तुम्ही त्या प्रांती दूर, जवल कोन्हीच नाही, येसे त्यास वाटेल. आजपावेतो गर्भवासान्यायेच होते यास्तव हरभटांस यांजवळ ठेविले आहे. आम्ही काशींत परलोकसाधनास जातो. मागे चिरंजीव येथे आहे. जनापवाद येसा न व्हावा की ते करीत होते ते काहीच यांच्याने न होये, तरी ज्यात मजपेक्षा अधिकोतर गोष्टी होये तो अर्थ करणे. मी जातेसमई आपले तेज याजवळ ठेविले असे. मजपेक्षा यांचा बहुमान चालवीत जाणे. मी काशीत तुमचें शुभचिंतन करीन व हे येथे करितील. बहुत काये लिहिणे हे आसीर्वाद.

¶Narayan Dikshit Patankar, the revered Guru of the Peshwa family, who proceeded to Benares finally in Shake 1656, informs the Peshwa of his intention to retire to Benares to spend the rest of his life there. He charges the Peshwa with the care of his son Vasudeo Dikshit left behind with Harbhat.

No. 111] *[9-11-1734*

पौ छ २७ जाखर

श्री

श्रीमंत राजश्री राऊ
स्वामीचे सेवेसी

पोष्ये अंबाजी त्रिबक कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २३ जमादिलाखर जाणून स्वकीये कुशललेखन करावया आज्ञा केली पाहिजे विशेष. आजी छ मारी त्रितीये प्रहरी राजश्री फतेसिंगबावा यानी आपल्या घरास बोलाऊन नेऊन वर्तमान सांगितले कीं राजश्री पंतप्रधान याचा मुकाम आंबीवर जाला. राजश्री आपाजीपंत+ याच्या घरास भोजनास गेले. त्यास मानाजी कोकरे राजश्री पंतप्रधान याचे भेटीस गेले. त्याची भेटी घेतली. समागमे राजश्री अपाजीपंत याच्या वाडियात घेऊन गेले आणि मानाजी कोकरे याची इजती ज्या गोस्टी आम्हास बोलों नयेत त्या बोलिले. त्याच्या घोडिया देखील सामान दोन नेल्या येसा कितेक वर्तमान सांगितले. बहुत श्रमी जाले तो विस्तार पत्री ल्याहावासा नाही. त्यास आम्ही बहुताप्रकारें समाधान करून सांगितले कीं हे गोष्टी राजश्री पंत प्रधान याजपासून होणार नाहीं; परंतु त्यानी खरीच म्हणून सांगितली. त्यास स्वामी ते येसा प्रसंग

+ आपाजी बाजीराव आंबीकर.

करणार नाहीत हा आमचा निशा आहे. कदाचित वेळेचा गुण, गोष्टी जाली असिली तरी स्वामिनी राजश्री फतेसिंगबावास समाधानपत्र बहुतप्रकारें ल्याहावे आणि देखील सामान दोन्ही घोडी पाठऊन द्यावी. येविसी अनमान सहसा केला न पाहिजे. स्वामीनी घोडी पत्रदर्शनी आम्हाजवल पाठऊन द्यावी. घोडी चांगली असिली तरी ठेऊ नयेत. श्नेहास अंतर करू नये. सर्वासी द्वेष कार्यास येत नाही, याकरिता स्वामीनी घोडी पत्र पावताच पाठविली पाहिजे. स्वामीजवल रदबदल कोण्ही मनुष्य करावयास नाही; याकरितां स्वामीनीच विचार करून घोडी पाठविली पाहिजेत. कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Ambaji Trimbak remonstrates with Bajirao against the high-handed act the Peshwa had perpetrated in taking away forcibly all the horses of Manaji Kokre, probably belonging to Fatesing Bhonsle. Ambaji advises Bajirao not to incur enmity with all by such unjust deeds. (See No. 109 above.)*

No. 112] [*September 1734*

श्री

राजश्री बाजीराव पंडित
प्रधान गोसावी यासी

ऽ सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री फतेसिंग भोसले दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लेखन केले पाहिजे विशेष. राजश्री त्र्यंबक विस्वनाथ यांची रवानगी वराड प्रांते केली. त्याणी जातेसमई राजश्री अनंदराव पडित सुमंत याची भेटी घेऊन त्याणी बदोबस्त परवाने नवाबास आर्ज करून करविले ते सिध जाले आहेत. ते त्रिंबकपंत घेऊन वराडांत जातील. परंतु त्रिंबक विस्वनाथ याणी तेथून मुजरत माणूस पाठविलें की, नवाबास पत्रे वरचेवरी पाठऊन कागदीपत्री आपली कुमक करणें. यैसियास नवाबास विना आपल्या पत्रावितरिक्त आगत्यवाद बहुत होतो यैसे नाही. तरी आपण पारसी पत्र थैली आमचेविशी नवाबास लेहून दिल्ही पाहिजे म्हणिजे परवाने जलदीने होऊन कामकाज चालेल. आपल्यास विस्तार ल्याहावा तरी आमचेविशी आगत्य मनापासून आहे. ज्याप्रकारे आमची बाजू शेर होये तो आर्थ आपण पहिलेपासून करीतच आहेत. पत्री परिहार ल्याहावा तरी मनेमन साक्ष आसे. सत्वर नवाबास पत्र लेहून दिल्हे पाहिजे. हे पत्र करून देविले पाहिजे. बहुत काय? लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Fatesing Bhonsle requests the Peshwa so to arrange matters with the Nizam as would enable Trimbak Vishvanath to realize dues from Berar smoothly. This Trimbak Vishvanath appears to be Pethe.*

No. 113] [25-12-1734

श्री

पुरवणी राजश्री शंकराजी केशव
गोसावी यासी

सुा खमस सलासैन मया व अलफ. राजश्री मानाजी आंगरे याणी राऊताचे-विसी लिहिले आहे. त्यास विचारे पाहातां राऊत त्यास दिल्हियाने दाणादुणा चेऊल सुभाचा जमा करितील. यामुळे त्यासमागमीच्या लोकाची बेगमी होऊन त्या जाग्यासहि गला कार्यास येईल. नाही तर तेथील बेगमीचे संकटच आहे. दुसरी गोष्ट मानाजी आंगरे यांचे साहित्य करणे हेहि आवश्यक. यास्तव राऊत पाठवावे, ऐसा विचार चितांत येऊन तुम्हास लिहिले आहे. तरी पनास राऊत धायेभोराचे त्याजकडे पाठवणें. पधरा दिवस राऊत त्याचे म्हणून ते तेथे राहातील. पधरा दिवसानंतर आणिले जातील. राऊत पाठविल्याने लौकिक होईल म्हणावा तरी लौकिक साहित्यविसी राहिलासारिखा नाहीं. मारनिलेचे साहित्य इकडून होते हे तो लोकास कलून गेलेच आहे. पंनास राऊत धाये-भोराचे अगदीच पाठवणें. पुढे आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करणें. जाणिजे छ १० साबान.

¶Shankraji Keshav is instructed to send a detachment to the succour of Manaji Angria. "As the Peshwa's partizanship with the latter is now a thing of common knowledge, there is no need of hedging about it," he remarks.

No. 114] [31-12-1734 ?

श्री

राजश्री पंत प्रधान
गोसावी याचे शेवेसी

ꣳ श्रीमंत प्रौढप्रतापतेजदिनकर खडेस्वरी सदायेशंवत राजयामुद्रा-विराजित राजमान्य श्नो रघोजी कदमराऊ व सवाई कठसिंग कदमराऊ दंडवत विनंती. येथील क्षेम आपुल्या कृपादस्टीकरोन ताा माव शुध सप्तमीपरियेत येथास्थित आसे. स्वकुशलनिजानंदवैभव आलियासमागमे सदैव लेखाज्ञा करीत आसिले पाा विशेष. कृपा करून आज्ञापत्रें पाठविली सकल अभिप्राये शृत जाला. कितेक प्रकारे ममता धरून पत्रार्थ कीं, श्रीमंत मातुश्रीबाई व राजश्री राऊ सेनपति यांजकडे पत्रे व कारकून तुम्हाविषी सांगावयाचें ते सांगितले आहे.

आपरोक्ष पत्रें पा। आसेती, लक्ष प्रकारें भेटी घेऊन कृपा संपादून घेणे. आज्ञेप्रमाणे फौजेसहवर्तमान- दरकूच करून रामेश्वर देवलीयासी पौष कृष्ण तृतीया भौमवासरी भेटी जाल्या. बहुत प्रकारें पूर्ववतप्रमाणे समाधान कर्तव्यता करून बहुमान केला. राजश्री पंत छयावणीस पर्जन्य काली आलिया आपण हे येकत्र होऊन येक्या विचारे मनोदयानरूप पूर्ववतप्रमाणे निकाल करून द्यावयाचा तो आवश्यक करून देऊन कितेक ऊर्जिताचा अभिप्राये वचनोत्तरी समाधान केले. सर्वस्वी ऊर्जित करणार स्वामी समर्थ आसतां आपणास चिंता काये? सर्व प्रकारें पदरी असोत. आठ च्यार दिवस मुकाम करून सर्वांच्या भेटी घेतल्या. त्याच प्रसंगी राजश्री सिवाजी बाजी प्रभु कितेक अर्थ पत्री लिा. स्वमुखे वचनोक्ती सविस्तर सांगितला. अभिप्राये श्रुत जाला. आपरोक्ष आपली व राजश्री आपा यांची ममतापुरस्कर साहित्यपत्रे प्रसंगोचित पावली असतां कितेक ऊर्जितार्थ सिवाजी बाजी याणी सांगितला. आज्ञा कीं राजश्री गोविंदराऊ फौजेसहवर्तमान भेटीनंतर रवानगी करून कौली मामली मुलकास काडीमात्र उपसर्ग न देतां पाठवणे. आपली निष्ठा चरणासी ऊर्जित करणार स्वामी हा पूर्ण भरवसा ध्यानास आसतां मातुश्रीबाई याची आज्ञा घेऊन फौजेसह स्वस्थळासी आलों. चिरंजीव यांची रवानगी करावी,. त्यासी मुख्य ताम्र शहरी बैसोन राहिले. या प्रांते जिलेदार फौजा येणार बातमिया जोड्या रवाना केल्या आसेती. आपली आज्ञाप्रमाणे वर्तणूक कर्तव्य ते करून सेवेसी श्रुत होये. सकल आर्थ सिवाजी बाजी सो लिा त्याजवरून श्रुत होईल. सर्व प्रकारें वडील आहात. विशेषात्कारे लेहावे हा आर्थ नाहीं. बहुत काये लिहिणे कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Raghoji Kadam and Sawai Katsing thank the Peshwa for mediating on their behalf with Dabhades as a result of which they were well received by Dabhades who promised them extension of patronage.*

No. 115] [*1734?*

श्री

विनंती उपरी. आम्ही श्रीमंत रा आपास मातुश्रीबाईसमागमे जातों म्हणून विनंती केली. याननंतर चार घटिका रात्रीपर्यंत रंगमहालात उभयेतापासी बसलो होतो. परंतु मागती आपांहिं आज्ञा काहीच न केली. उभयेता उठोन येकांतास गेले. मग मी सध्येकारणे घरास आलो. यैसीयासी आम्ही आपले तयारीस लागावें न लागावें याचा विचार रा आपास पुसोन आम्हास सांगितला पाहिजे. हे विनंती.

¶*The writer wishes to have commands as to whether he should prepare to accompany Bajirao's mother (probably in her pilgrimage to Benares).*

No. 116] [1734?

श्रीमंगलमूर्ति

माहाराज राजश्री चिमणाजीपंत
आपा साहेबु

॥ श्रीउतम उपमायोग्य रमाप्रसन माहाराज राजमान्य याविराजित राजश्री सेवेस आज्ञाधारक नारायेणजी निकम दंडवत विनंती उपर. विनवावयास पार्थना ऐसीजे, स्वामीणी मुलकाच्या सनदा दिधल्या त्यासी आपण विज्ञापना केली कीं दोन हजार राउतांची सरंजामी करून दिधली पाहिजे. त्यासी स्वामी बोलिले कीं आवंदाच सालीं तुम्ही धीर करणे. पुढें तुमची उस्तवारी करून मुलकाचा अमल बसऊन देऊन. तेंच वचण आपण सिरी वंदिले. आज्ञा घेऊन गावास आलो. त्यासी सांप्रत्य स्वामीचे पत्र आमच्या नावे व सकोजी निकम याच्या नावें आले कीं राजश्री पिलाजी जाधवराऊ व हुजूरची पतके रवाना केली आहेत, याजबराबर तुम्ही जाणे. त्यासी आज्ञे-प्रमाणें सकोजी निकम तों रवाना होतील आणि आमची रवानगी तों स्वामीनी उरुबरु बोलाऊन सवता उभारणी करून पाठवितील, तेव्हा जाऊन, ऐसी विनंती पूर्वीपासून पायासी केली आहे तेणेप्रमाणे केली पाहिजे. यानंतर स्वामींने एक पत्र रानोजी सिंदियासी दिधले होते कीं दोनसे राऊताचा जमाव आहे; याजला बरोबर घेऊन जाणे. त्यासी आपण आलों. रानोजी सिंदीयास पत्र लिहिले. त्याचे उतर आले की आमचे कूच दरकूच आहे. गाठ पडत नाहीं. मग ते तजवीज राहिली. आतां दोनसे राऊत राजश्री पिलाजी जाधवराऊ यांजबराबर पाठऊन त्यासी स्वामीणी मुलुक दिधला आहे. त्याची दखलगिरी करतील, तर एक पत्र जाधवरायासी व स्वामीचे हुजरातचा मुख्य जो रवाना कराल त्यास पत्रे लिहिली पाहिजेत कीं, राजश्री नारायणजी निकम याचे दोनसे राऊत पाठविले आहेत याची खर्चाची बेगमी करणे आणि यांचा महाल मुलकात गेलियासी अमल बसऊन टका पैसा वसूल होय ते करणे. ऐसे पत्र लिहिले पाहिजे व हिरदेशा व जगतराज यांसी पत्रे दिधली पाहिजे व भदावरच्या राजियासी एक पत्र दिधले पाहिजे कीं नारायणजी निकम यासी मुलूक दिधला आहे तर यांचा अमल सुरळीत चालवणे. इतकियावर स्वामी जैसें आज्ञा करतील तैसी आज्ञा करून. सेवेसी श्रुत होय हे विनंती.

¶*Narayanji Nikam to Chimaji Appa, requesting a separate assignment for his troops in Bundelkhand.*

4557

No. 117] [1734?

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसीं

विनंती शेवक विसाजी भिकाजी कृतानेक नमस्कार विनंती विशेष. मातुश्री उमाबाईने आम्हास बोलाऊन नेऊन सांगितले कीं चिरंजीव बाबूराऊ सेनाखासखेल याणीं बहुत फंद आरंभले. जे कर्म कर्तव्य तेहि करूं लागले, जे न कर्तव्य तेहि करू लागले; म्हणून त्यास बोलाऊन आणून सांगितले कीं जे न करावे ते तुम्ही करू लागलेस तर हे गोष्ट कार्याची नाही. त्याजवरून त्यानी उतर दिल्हे की खासकेलीचे पद आपले आहे. मग आपणास राग आला म्हणून त्याला उतर दिल्हे कीं तुझे पद काये जे असेल ते सातारियास जाऊन खरे करून घेणे, येसे म्हणून बाहेर घातले. येसियासी राजश्री दुर्जनसिंग व कृष्णराऊ माहादेऊ त्यास मिलोन बंड उभे करितात, म्हणून मातुश्रीने आम्हास आज्ञा केली कीं तुम्ही पत्र रायास लेहून बंड उभे न राहे आणि तो फजित पावे तो अर्थ करणे. त्यावरून सेवेसी विनंती पत्र लिा आहे. राा बाबूराव दाभाडे याणी राजश्री दुर्जनसिंग व राजश्री कृष्णराऊ माहादेऊ यास वस्त्रे देऊन त्याजकडे राजश्री संताजी दाभाडे व राजश्री विलठलपंत पाा आहेत. येसियासी श्वामीनी त्यास फजित करून माघारे लावणे, आण दुरजनसिंग व कृष्णराऊ माहादेऊ हे उभयेता त्यास साहित्यास न मिलत ते केले पाहिजे. इतके कर्म मातुश्रीने स्वामीचे भरोसियावर केले असता फिरोन हे बंड उभे राहू लागले, तर कृष्णराऊ दुरजनसिंग यास बोलाऊन आणून सांगणे कीं या मनसबियात मिलता, परंतु हे गोष्ट कार्या नाहीं म्हणून श्वामीनी त्यास सांगितले पाहिजे. बहुत काय लिहिणे, कृपा असो दीजे हे विज्ञापना.

¶*Visaji Bhikaji, Peshwa's agent with Dabhade, to Bajirao: writes that Umabai desires the addressee to bring round her son Baburao Senakhaskhel, who was behaving badly and causing endless trouble.*

No. 118] [9-1-1730?

श्री

चिरंजीव सौभाग्यवती रखमाबाई यासी मातुश्री राधाबाई आसीर्वाद. उपरी, तुम्ही पत्र पाठविले ते पावले. पावोन बहुत समाधान जाहाले. येसेच निरंतर पत्र पाठवीत जाणे. आम्ही माघ सुध द्वितीयापरियेंत सस्त सुखरूप असो.

काही चिंता न करणे. तुमचे माहेरची सुखरूप आहेत. राजश्री विसाजीपंत व सौभाग्यवती वेणूबाई व राजश्री त्रिंबकराव सुखरूप आहेत. काही चिंता न करणे. सौभाग्यवती कासीबाई सातारासच आहेत. तुम्हास कलावे म्हणून लिहिले आहे. बहुत लिहिणे नलगे. लोभ आसो दीजे हे आसीर्वाद.

हेच जिवबाईस क्षेम लिहितार्थ परिसीजे. चिरंजीव राजश्री चिमाजी व सौभाग्यवती रखमाबाईची जतन करणे. तम्हास कलेल तैसी लिहिले आहे. हे विनंती.

¶*Radhabai's letter to Rakhmabai, wife of Chimaji Appa, informing her that her father, brothers and others were doing well. Rakhmabai came from the family of the Pethes.*

No. 119] *[19-3-1735?*

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसीं

विनंती सेवक आज्ञाधारक खंडोजी माणकर मो किले मानगड चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग दंडवत विज्ञापना. ता। छ ५ जिलकादपावेतो स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकाचें व प्रांत मजकूरचें वर्तमान यथास्थित असे. यानंतर स्वामीचे आज्ञापत्र सादर जालें तेथें आज्ञा कीं, किले मजकूरचें दास्तानपैकी गला फरोक्त केला हें वर्तमान माहाराज राजश्री छत्रपति स्वामीस विदित जाहलें, त्याजवरून तहकीकातीबदल हुजरे आले आहेत तर त्याचे बहुत प्रकारें समाधान करून प्रत्योतर लेहून रवाना करणे येसी आज्ञा. आज्ञाप्रमाणे वर्तणूक करून, अंतर होणार नाहीं व सेवकापासून गल्याची घालमेल जाली नाहीं व गैरजिनसाची घालमेल जाहली नाहीं. जी दास्ताने किलेयावर आज ता। जाली आहेत त्याजपैकी येकदाणा खर्च करीत नाहीं. येथील कुल कारभार अंतरगर्भ राजश्री शंकराजीपंत यासी विदित आहे. स्वामीचे सेवेसी लिहिला आहे त्या विदित होईल. वरकड खरिदी गला वगैरे जिनस याचा हिसेब राजश्री मा।रनिलेनी सांगितल्याप्रमाणे तयार करून दिल्हा. सेवेसी श्रुत होय विशेष. राजश्री होनाजी बलकवडे यांहीं पत्र लिहिले कीं शामलाचा वेढा बिरवाडीस येतो, तुम्ही उपरालेयासी येणे म्हणून लिहिलें, त्यावरून आपण जमावसुधां किले घोसाला येथें गेलों. लोक जमाव आहे तो स्वामीचे सेवेसी हजिरी पाठविली आहे त्याजवरून विदित

होईल. तोफाबराबर लोक पाठविले आहेत त्याची बेगमी करून रवाना केले पाहिजे. येथे शामल क्षणक्षणा वलवल करितो. जमाव असावा बेगमी करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय. कृपा वर्धमान केली पाहिजे हे विज्ञापना.

¶Khandoji Mankar assures the Peshwa that no corn stored at Fort Mangad had been misappropriated and that what was done was known to Shankraji-pant. The writer adds that the Sidi was creating trouble towards Birwadi and Ghosala and requests reinforcements to prevent his aggression.

No. 120] *[5-4-1735 ?*

श्री

सेवेसी सेवक शंकराजी दत्तात्रेय कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. कृपा करून पत्र रंगोजी व सालोजी समागमें आणिक दोघे यैसे चौघे हरकारे पावले. बहुत संतोश जाला. पहिले च्यार माणसें आलीं होतीं त्या समागमें सविस्तर वर्तमान लिहून सेवेसीं पाठविलें आहें. पावले असेल सांप्रती नवीन वर्तमान

१

नवाब छ ९ जिलकादीं कसबे बनोसी प्रांत सोंदें येथें येऊन वरदान दिवाल्याची तेथें येऊन राहिले. १० मोकाम केले. देश सोंधेकराचा बहुत लुटिला. कहीखालें नाश फार जाला. त्यावरी सोंधेकराचा वकील येऊन भेटला. दोनी घोडे आरबी व दोनीसे होन नकद व कांहीं कापड यैसें तेथील राज्यानें भेटी पाठविली व त्याचे वकिलानें दोनी मोहरा भेटी ऐसे दिधलें. नवाबानें घेतले. दोघा वकिलांस सिरोपाव व येकास श्याल यैसे दिधलें. आतां त्याची खंडणीची बोली लागली आहे. लक्ष होन परियंत मागत आहेत. तेहि अडीच लक्ष रुपये परियंत देत आहेत. कांहीं अधिक उणे विले लागले. दरबार खर्च समेत लक्ष दोन विले लागले.

२

बिदनूरचे तीन लक्ष होन चुकले. पनास हजार खर्च दरबार यैसे येथील पैका आणायास त्याचीं माणसें गेलीं आहेत. दोनी हत्ती पांच घोडे व येक हजार होन भेटी पाठविली होती ते घेतली. त्यावरी जिनस दोनी रंग दोन्हीकडे यैसी सकलाद व लवंगा जायफल जायपत्री वेलदोडे दालचिनी व कितेक प्रकारची लवणशाख फिरंगी व स्पटिकाचीं पात्रें व नाना प्रकारचे पदार्थ स्पटिकाचे व समुद्रांतील मेवा बहुता प्रकारचा व तरबूज खरबूज आननास व गोड चिंच व गूळ वोखदाचा

मुशेंजर[1] अनेक पदार्थ दाहा हजार रुपयांचा पावता केला. नित्य मेवा व लवण शाखा नवला पदार्थ येत आहे. नवाब घेत आहेत. आग्रह नाहीं. श्नेह फार जाला. पैका तरी विशेश नाहीं. उपचार बहुत केला. चंदन मलागर आगर बहुत उत्तम फारसा दिधला. तेथील पैका येतोंवर मोकाम आहेत.

३

चंदरसेन व सुलतानजी या सैन्यांतून पांच सात कोसावरी आहेत. झाडी फार, पाणी फटकाल, माणसांस रोग जाले. घोडी जाया जालीं. झाडी कापून वाट करावी तेव्हां सैन्य चालतें. बिदनूरचा पैका यावा व सोंध्याचा पैका निस्चयें-करून मध्येस्त कोन्ही मातबर घेऊन येथून जावें.

४

रभाजी निंबालकराचे पुत्र व डौलाखान व वोगलाखान तुरुकताजखानाचा जावई व नवाबाची फौज यैसे कितूरचा देसाई पळाला त्याकडे गेले आहेत. त्याचे कितेक गांव मारले, माणसें मारली, गढीया घेतल्या, धामधूम बहुत केली. हे वर्तमान नवाबास कळतांच संतोश जाला. आणिक त्यास लिहिलें आहे कीं देश उध्वस करणें; तो येऊन रुजू होय तो विचार करणें.

५

...गपटणचें कांहीं चुकले नाहीं. कोटी होन माग(त) आहेत. पंचवीस तीस-परियंत वकील त्यांचे देऊं म्हणत आहेत. इकडून निर्गम करून त्याच वाटे जाणार.

६

वीस दिवस जाले. नवाबास नजोला[2] जाला आहे. बाहिर बसत नाहींत. येकांत खालीं बसोन कार्येभाग करीत आहेत. लोकांचे कामकाज निघत नाहीं. आपले घरचें काम करीत आहेत. इकडील उदक बहुत बाधक आहे.

७

वजारतखान दिवाण यास कांहीं पदार्थ आणावयास गोवा बंदरास पाठविले त्याचाहि दंडक पुरातन तेथील फिरंगियास आहे. त्यास जाणें आगत्यच होतें. नवाबानें १५ हजार रुपये समागमे दिधले, पदार्थ आणविले.

---

१ वेलबुट्टीदार रेशमी कापड. २ डोळ्याचा रोग.

८

योगिराजपंत येथें आहेत. नवाब दरबार करूं लागलेयावरी ते आले आहेत त्या कामाची वाट होईल. राजश्री राऊ सुमंत छ १९ जिलकादीं सैन्याजवळी उतरले. आदित्यवारीं छ १८ जिलकादीं नवाबाची भेटी निश्चयें आहे. आतां याच्या कामाचीहि वाट होईल. दरबार सुस्त फार. काम निघत नाहीं. छ १६ शुक्रवारीं राऊ सुमंताची नवाबाची भेटी जाली, ९ मोहरा नजर केल्या, बहुत कृपा केली.

९

उदाजी चव्हाण चंदरसेनासमागमे गेले आहेत. सैन्यांत नाहींत. त्यास जागिरीचे परवाने आद्याप जाले नाहींत. फौज त्यांची उठोन जाते. तेहि खर्चावीण कष्टी आहेत.

१०

बिदनूर सोंध्याचे लोक प्यादे झाडीमध्यें लस्कराजवळी येऊन कहीस माणसें जात आहेत, त्याचीं नाशिकें कापून नेत आहेत. फौज जाऊन कही भरून आणीत आहे. ताकीद फार जाली परंतु बिदनूर सोंध्यांची माणसें सांपडत नाहींत. दग्याने काम करून जात आहेत.

११

राणांत चंदन फार आहे. नवाबाचे लस्करांत दोनी लक्ष रुपयाचा चंदन आला असेल. खासा नवाबानें पांच गाडे भरून आणिले. लहान थोर कोन्ही घर चंदन आणीत नाहीं यैसे नाहीं. मिरे, वाला, चंदन, नारेल बहुत लुटी जाली आहे. राणांत झाडी किराणाच आवघा आहे.

१२

जानबा निंबालकर परगणे कितुरच्या जमीदारावरी गेले आहेत. तेथें छ २० जिलकादीं थोर जूज जालें. जानबानें २५० माणूस प्यादे कापून काढिले. गावाबाहीर जूज जालें, राऊत पलोन गावांत गेले. पनास गोळे तोपाचे यावरी सोडिले. कोणास लागले नाहींत. व २० घोडीं याकडील पटयाचे जखमा जाल्या. च्यार ठार पडले. कांहीं माणसें जखमी जालीं. यश थोडे आलें. कितुरच्या पेठा जालिल्या. नवाबाजवळी यांचा लौकिक फार जाला. नवाबास संतोश जाला. नवाबाचा जमतदार सरमस्तखान याचा भाऊ दाऊदखान सिमग्याचे दिवसांत निवर्तला. त्यावरी छ १४ जिल्कादी दोघे पुतणे दाहा बारा

वरशाचे यास येकायेकीं वेथा जाली. येकेच दिवशीं तीन प्रहराचे आंतरे करून दोघे मुले निवर्तले. नवाबानें त्याचें बहुत समाधान केलें. सिरोपाव दिधला.

१३

दिलावरखान व त्याचे दोघे भाऊ सिऱ्याचे किलेदार व दिवाण हे छ २२ जिलकादी नवाबास भेटले. पांच मोहरा वडिलानें व पांच पांच रुपये दोघानी नजर केले ते घेतले.

१४

देवगडचा राजा बादलशाहा याचा लेक नवाबाचे समागमें पैकियाकरितां वोल सरमस्तखानाजवळी होता. त्याचा पैका झाडा जाला. त्याची नवाबाची छ २२ जिलकादीं भेटी पहिली जाली. पांच मोहरा नजर केल्या.

१५

सोंध्याचे रुपये येक लक्षाची साहुकारी निशा जाली. बाकी रुपयाची निशा वाईदा केला. बिदनूरचा पैका आणायास स्वार गेले आहेत. साहुकाराचे गुमास्ते गेले आहेत. राजश्री राऊ सुमंत गोकर्णमाभलेस्वरास यात्रेस निरोप घेऊन बिदनूरकराचे स्वार प्यादे घेऊन जाणार आहेत.

१६

परगणे कितुरचा जमीदार दोनी लक्ष रुपये कबूल करून पलोन गेला. त्यावरी जानोजी निंबालकर जाऊन पेठा जालिल्या. माणसें मारलीं. नकश केला. आता तेथीलहि पेगाम लक्षा रुपयाचा आला आहे नवाब कबूल करीत नाहींत. पाहावे काये निश्चय होईल.

१७

अबदुल नबीचा लेक आंध झाला आहे. त्यावरी नवाबाची बहुत कृपा आहे. आपला पुत्र त्यास म्हणत आहेत. त्याने आर्जी लिहून दिधली कीं हत्ती घोडे मालमालीयेत जे आहे ते नवाबाची आहे. २५ लक्ष, तीस लक्ष, पंधरा लक्ष आपण देतों. जे पाहिजे ते आज्ञा करावी. त्यावरी सर्वहि पैका पदार्थ क्षमा केला. कृपा फार केली. आबदुल मजीद बंकापुरचा दांडगा आहे. याने कांहीं विवेक केला नाहीं. देश फार नाश झाला. त्यावरी नवाबाचा रागहि आहे.

रवाना छ २२ जिलकाद कसबे बनोसीपासून रवाना केले. विनंती.

¶*News-letter giving detailed information of the Nizam's expedition into Karnatak. The letter contains several items of news. The Chieftain of Sonda has been subdued and forced to seek for terms. Bidnur State has agreed to a levy of 3 lacs and several rare articles including curious vessels, spices, sandalwood, have been presented to the Nizam. The turbulent Desai of Kittur is being pursued by a company under Janba Nimbalkar.*

4563

No. 121] [*2-5-1735 ?*

पौ जेष्ट शुध ४

श्री

राजश्री भगवंत भैरव गुा राजश्री बाबूजी
नाा मो औरंगाबाद गोसावी यांसीं

ॐ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो पिलाजी जाधवराऊ रामराम उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिहिणे विशेष. आम्ही फौजेनसी देवगड प्रांते नागपुरानजीक आलों असो. मजल दरमजल वासिमच्या घाटे आंवढ्या नागनाथावरून देशास जावया येत असो. येशास औरंगाबादवासी येवन कोठे आहेत, काय वर्तमान ते आम्हास वरचेवरी कलावें लागतें. येशास तुम्हाकडून अजुन्याच्या दोन जोड्या पत्रें घेऊन आल्या होत्या त्या तुमच्या तुम्हाकडे पाठविल्या आहेत; व पुण्याहून पत्रे घेऊन दोन जोड्या सरकारच्या लस्करास आल्या होत्या त्याहि पत्रें देऊन दोन जोड्या रवाना केल्या आहेत. यामधें येक जोडी पत्रें घेऊन पुण्यास जाणे आणि येक जोडी तुम्हाज़वल राहणे म्हणून सांगितले आहे. तरी तुम्ही दिन प्रतिदिनीचें वर्तमान जे नवाबाकडील असेल ते वरचेवरी लेहून पाठवणे. सरकारची जोडी पाा आहे याबाा व यासिवाये आणखी जोडी लागतील त्यास अजुरा मान्य करून बातमी तहकीक मनास आणून लिहून पाठवीत जाणे. या कार्यास हैगे येकंदर न करणे. तुम्ही जोडी जे पत्र देऊन रवाना कराल ते वासीमच्या घाटे आवंढ्याचे मार्गे पाठवीत जाणे म्हणजे गाठ पडल. तुम्ही जोडी रवाना कराल ते भलत्या मार्गे जाईल येसे न करणें. जाणिजे छ १९ जिल्हेज. बहुत काय लिहिणे.

¶*Pilaji Jadhav to Bhagwant Bahirao, asking news of the movements of the Nizam for the information of Bajirao.*

No. 122] [*9-5-1735 ?*

छ २६ जिल्हेज

श्री

राजश्री पंत प्रधान गोसावी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो संताजी जाधव दंडवत विनंती उपरी येथील कुसल जाणून स्वकीयें कुशललेखन करावयास आज्ञा केली पाहिजे विशेष. गोसावियानी पत्र पाठविलें तें पावलें. तेथें लिहिलें कीं राजश्री माहादाजी पंत याज-बरोबर फौज देऊन राजश्री आवजी कवडे याच्या कुमकेस पाठविले आहेत तर

तुम्ही फौजेसहवर्तमान जाऊन सामील होणें म्हणून लिहिलें. त्यावरून आपण फौजेसहवर्तमान छ २० माहे जिल्हेजी मुकाम मौजे भारमकोलम येथें पंत मशारनुलेयास सामील जालों. आपणांस कळावें म्हणून लिहिलें आहे. कळलें पाहिजे बहुत काय लिहिणें हे विनंती.

¶Santaji Jadhav writes he has joined Mahadajipant at Bharamkolam.

No. 123] [11-5-1735 ?

छ २ मोहरम

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ व तथा
राजश्री आपा स्वामी वडिलांचे सेवेसी

आपत्ये माहादजी अंबाजी कृतानेक सास्टांग नमस्कार विनंती. आम्ही स्वामीच्या आसीर्वादेकरून ताा छ २९ जिल्हेज मुकाम राहुरीपरियेंत सुखरूप असो विशेष. आम्ही खानदेशप्रांते गिर(णा) नदीपरियेंत गेलो होतो. राजश्री आवजी कवडे याकडील लोक तमाम उठोन चालिले; कोणी धर धरीनात. यास्तव त्याणी आम्हापासी कांहीं राऊत मागितले. त्यांवरून आम्ही सेसवासे राऊत त्याजपासी ठेऊन माघारे आलो, तो आवबाच्या लोकानी फारच गवगवा केला; तेव्हा आमच्या राऊतास आवजी कवडे याणी निरोप दिल्हा; आणि आम्हास पत्र लिहिले की आमचे राऊत कुल चालिले. याउपर हे राऊत येवढेच ठेऊन काही कार्यंहि होणे नाही; यास्तव निरोप दिल्हा. आम्हीहि मागाहून लौकरीच येतो म्हणून पत्र लिहिले आणि राऊतास निरोप दिल्हा. ते बारापाव्याच्या सिऊरावर आम्हापासी आले. आम्हीहि मजल दरमजल आजी राहुरीस आलो. सत्वरीच सेवेसी येतो. स्वामीनी नवाबाच्या लस्करात वकिलास पत्र लेहून बातमीस जासूद पाठविले होते ते आजी छ मारी आले. पत्र स्वामीच्या नावे होते. लाखोटा आम्ही फोडून पाहून सेवेसी पत्र पाठविले असे. विदित जाले पाहिजे. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

¶Mahadaji Ambaji supplies the Peshwa and Chimaji Appa news received from the Court of the Nizam and reports on the turbulent conduct of the troops in the service of Avji Kavade.

No. 124] [23-5-1735?

छ ११ मोहरम
(जाब) सुद

श्री

श्रीमत राजश्री आपा
स्वामीचे शेवेसी.

विनंती सेवक मल्हार दादाजी सां नमस्कार विनंती ता छ ८ मोहरमपर्यंत सकल वर्तमान यथास्थित असें विशेष. ये प्रांतीचा आमल मोगलाईचा बंद करावा, वसूल घ्यावा, येविषी श्रीमंत राजश्री पंत प्रधान याणी आज्ञा केली त्यावरून चांदवड पा याची बोली केली व नासिकची बोली करावयास सदासिव कासी यांस येथे बोलाविले आहे. डोहणा न होता दिवाण काम करून सेवेसी लिहोन पाठऊन. वरकडहि माहालाचे तपसीलवार वर्तमान लिहोन सेवेसी पाठविले आहे त्यावरून विदित जाले आसेल. सदासिव कासी नासिक परगणियाची बोली करावयास येथे येणार तों येसजी बलकवडे याणी छ ९ मिनहूस दोन तीनसे माणसानसी रात्रौ येऊन आबदूल आजीजखान यांचे पागेवर घातले. त्याचे बारगीर पंनास पाऊणसे खबरदार गढीचे आश्रियानें होते त्याणी हत्यार धरिले. यांचे त्यांचे युध्य जाले. येसजीकडील लोक गैरहवी[+] आडचणीस पडिले. मोगलाकडील बारगिरानी मोडून घातलें. वीस पंचवीस माणूस व खासा येसजी ठार पडिले. वरकड लोक पलोन किलियास गेले. काहीं गढीमध्ये बारगीरानी कोंडिले. तों सदासिव कासी आपले घरीं होते. त्यास वर्तमान कलताच धावोन जाऊन बारगिरास दटाऊन लोक कोंडिले होते ते सोडून दिधले. हे सविस्तर काल सेवेसी लिहोन पाठविले आहे त्यावरून निवेदन जालेंच आसेल. येसजीनें हे गोष्ट करावयाची नवती. आम्ही रसायेणावर घालून सदासिवपंतास येथे बोलाविले काये आणि त्याणी दंगा आरंभिला. उतम न केले. सेवटासहि गोष्ट न गेली. बरे जे होऊन गेलें त्यास उपाये नाहीं. स्वामीचे चितांत सदासिवपंतापासून अपाये जाला येसे भासेल, तरी त्यांजपासून आंतर न पडले. दहशतीमुले सदासिवपंत कुली पागा व हती घेऊन आंधुरटे येथे गेला आहे. नासीक क्षेत्रीचे ब्राम्हण व व्यापारी उदमी लोक भय मानून गलबलले आहेत. कदांचित नासिकावर फौज रवाना होईल तरी सहसा न करावी. चौ युगाचे क्षेत्र ब्राम्हणाचे आहे. कृपालु होऊन आभयपत्र शहरचे लोकास पाठविले पाहिजे व सदासिव कासी याजवर कृपालु होऊन आज्ञापत्र समाधानपूर्वक पाठविल्यास ते आम्हापासीं येऊन परगाणियाची बंदोबस्ती होईल. दिवाण काम होऊन येईल

+ हवी=वाटाड्या; गैरहवी=वाट चुकून.

विदित होये. : राजश्री रायानी सदासिवपंतास दोन पत्रें पाठविली. त्यावरून ते कामाकाजांत होते. परंतु दरमियानें हे गोष्ट जालीनिमित्य भयाभीत आहेत. हे विनंती.

¶Malhar Dadaji to Chimajiappa, communicating details of the raid upon Nasik by Yesji Balkavde.

No. 125] [*26-5-1735 ?*

छ १९ मोहोरम

श्री

श्रीमंत विराजित राजमान्या सिरोमणी
प्रतापदिनकर खंडेस्वरी सदा यशवत
राजपूजित राजमान्य राजश्री
राऊ प्रधान स्वामीचे सेवेसीं

सेवक शंकराजी दत्तात्रय कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. पहिले सविस्तर वर्तमान लिहिलें आहे. सेवेसी प्रविस्ट जालें असेल. सांप्रती नवाब बुऱ्हाणपुरीहून दरकूच कासारीचे घाटास आले. छ १४ मोहरमी घांट चढून पुढें जातील. छ १७ अवरंगाबादेस प्रवेश होतील. नवाब साहबांस * * * * * केली कीं आपणांस लिहून पाठवणे. दोनी मजकूर जरूर आहेत. कोन्ही जासूद बातनी खबरेस येतील म्हणऊन मार्गप्रतीक्षा केली. त्यावरी आजी आणिक ताकीद केली कीं सत्वर पुढील जाब आणवणें; याकरितां आगत्य जालें, याकरितां अजुरदार पाठविला आहे. येक मजकूर कीं राजश्री आवजी कवडे यास कमाविसदारी देऊन देश्यास न पाठवणें. आणिक भले माणूस आपले संगतीस बहुत आहेत. आजिपरियंत पैका देश्यांतील विशेश घेत गेलेत परंतु या प्रकारचे कोण्ही पाठविलें नवतें. अमील नवाबाचे वाजबी पैका (न देत.) * * लिहून पाठवणें, त्या समागमें सजावल देऊन पैका पावे येसी ताकीद करून बोभाट येऊ न देऊ. आउजी कवडे येऊन दोनी हजार फौज आणून देशलुटीकरितां रयेतीस उपसर्ग बहुत लागतो. कमाविशदार म्हणजे संभर पनास राऊतासी यावें त्याचा (विवेक) * * दिधला जाईल तरी याचें उत्तर काये आपले विचारास येईल तैसा लिहून नवाबास पत्र व सेवकासहि त्याच प्रकारें लिहिलें पाहिजे. दुसरा मजकूर माळव्यांत परगणे शाहाजाहापूर व आणीक पांच परगणे नवाबास जागीर आहे. फौजा जाऊन परगणे उद्वस केले. आतां

4567

कौल देऊन आयाद करावें, यैसियास आपणांकडील मोकासा सरदेसमुखी कुलबाब येक निस्चयेंकरून दिधलियानें पेका दोनीतीनीदां करून देत जाऊं. येक भला माणूस तेथें पनास राऊतासी येऊन कोणाचा उपसर्ग लागूं न देत यैसें करावें. हें वर्तमान राजश्री पिलाजी जाधव यास माळव्यांत असतां पत्रें याविशईं लिहिलीं, त्यानी उत्तर पाठविले कीं देश्यास आलियाउपरी आपले भेटीनंतर विचारून या कामाचें पारपत्य केलें जाईल. आतां तेहि आले आहेत. याचा विवेक करून नवाबास लिहिलें पाहिजे. हें नवाबास अगत्य आहे. बहुत प्रकारें दोन्ही कामांस नवाबानें सांगितलें आहे, आगत्य जाणौऊनु आजुरदार कासीद या कामास पाठविले आहे. नवाबाचें सामाधान होये यैसें उत्तर पाठविलें पाहिजे. थोर काम काहीं नाहीं. याच्यानें निर्वाह न जालियानें सहजच फौजा पाठविल्या जातील. राजश्री पिलाजी जाधव याचे लस्कर नवाबाचें लस्करजवली उतरलें. कांहीं संदेह कोन्हेविशः नवता, सुखरूप घाट चढून गेले. परस्परें पत्रें आलीं. उत्तरें गेलीं. संतोष जाला. राजश्री राऊ सुमंत अवरंगाबादेस आहेत. नवाबाची भेटी घेतली. राजश्री रघूजी भोसले संभर दोनीसें राऊतानिसीं कुरे मांगरूळ त्या प्रांतींच फिरत आहेत. त्याचे मोकासे कमाविस * * * चालत आहे, आडताला नाहीं. नवाब आतां त्याचे वाटे जात नाहीं. विज्यापूरचा सुबा मिर्जा आली वारले. त्याचे पुत्रास प्रस्तुत समाधानपत्रें पाठविलीं आहेत, परंतु आणिक कोणास तजवीज करितील. सदारतखान मोंगल पहिले संगमनेरी होता, व रघुनाथपंत पवाराकडे पहिले होता. या दोघांस सातारियास काहीं मजकूर सांगोन पत्रें देऊन पाठविले. राजश्री राऊ सुमंताचे चित्तास न आलें. त्यास राहविलें. नवाबाची व राऊजीची भेटी जाली. यावरी जो विचार करावयाचा तो करितील. मुकरबखान, खान आलम, गोपाळसिंग, हिरजुलाखान, हफीजुदीखान, व मऱ्हाट संपूर्ण आणिक सरदार सर्वहि छावणीस निरोप दिधले. आतां फौज थोडी जवली आहे. छावणी निस्चये नाहीं. पाऊस लागला तरी आवरंगाबादेसच करितील. नवीन वर्तमान लिहून पाठवितो. अजुरा कासिदास देऊन त्याजवली आजुऱ्यांचे पत्र आहे तें फिराऊन घेतलें पाहिजे. भापकरासहि कमावीश देऊन न पाठवावें, यैसें पत्र सातारियास पाठविलें आहे. वाजवी कमावीश करायास पनास शंभर राउतानिसीं भले माणूस पाठविले पाहिजेत. यामधें नबाबाची रजावंदी आहे. विशेष काय लिहिणें हे विनंति.

¶*Shankaraji Dattatraya to the Peshwa : gives the movements of the Nizam, who, he says, desires that his jagir estate in Malwa should not be molested by Maratha soldiers. The writer gives further news about the Nizam's doing and sends a protest against Avji Kavade's plundering activities in Berar.*

No. 126] [21-6-1735

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री पंतप्रधान व तथा
राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

पोष्ये सदासिव नाईक जोसी सा। नमस्कार विनंती उपर. येथील क्षेम स्वामीचे कृपेकरून आषाढ सुध १३ पवितो सहकुटुंब सुखरूप आसो विशेष. बहुत दिवस जाहाले, स्वामीकडून पत्रें येत नाहीं. तर पत्रें पाठऊन सांभाल करीत गेले पाहिजे. उपर, चिरंजीव बाबूजी मातोश्रीस घेऊन जयेनगरास आले. पंधरा-वीस मुकामे होतील. मग तेथून स्वार होऊन श्रीस येतील. स्वामीचे पुण्यकडून आजतागाईत त्याचा निर्वाह जाहाला. माघारे फिरोन जात होते, परंतु मातोश्री पुन्यवान याजकरिता म्हणून सर्व गोस्ट नीट पडली. पुढेहि त्याचेच पुन्यानें येथे येतील. उपर, उभयेता चिरंजीव तेथे नाहींत याजकरिता स्वामीस ल्याहावे तर स्वामी धणीच आहे. सर्व प्रकारे चिंता स्वामीस आहे. ल्याहावे यैसे नाहीं बहुत काये लिहिणे हे विनंती.

पोष्ये आबाजी व गोविंदजी याचे सास्टांग नमस्कार.

¶*Sadashiv Naik Joshi writes to the Peshwa and his brother Chimaji Appa that Radhabai, accompanied by Babuji Naik, has come to Jainagar from which place, he adds, she will proceed to Benares in about a fortnight.*

No. 127] [July 1735

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामी
साहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक कानोजी माणकर नामजाद मो। किले तलागड च्यरणी मस्तक ठेऊन राम राम विनंती, येथील (फाटले आहे) * हे सफरपावेतो साहेबाचे कृपादृष्टीकरून वर्तमान येथास्तित असे विशेष. किले घोसालागडाहून राजश्री संताजी मोहिते हवालदार याचें पत्र आलें; तेथें लिहिले कीं किले मजकुरास पालत

करावयासी शामलाकडून भगत कसबे मजकूर याजकडे आला होता त्यासी भगत मजकुराचा कबिला किला आणिला. याचा बाप कसबे मजकुरी गुराजवळ होता, त्याजवळ येऊन पुसो लागला जे देवास (स) कायें खर्चवेच पडल तो देऊन वर (फाटलें) डी देवाची रजावंदी करून किला हातास येई येसी गोष्ट करणें. त्यावरून भगत मजकूर याणे जाब दिला कीं आमच्यानें (फाटले * *) होत नाहीं. आम्ही वतनदार; देव आमचे आज्ञेत नाहीं; तेव्हां तो उठोन गेला. भगतानें त्याजला पुसिले कीं शामल काय मुद्यावर आहे? तेव्हा त्याणें सांगितलें कीं तळागड अगर घोसाळागड अगर बिरवाडी तिही जागातून येका जागा देव मंजाऊन देवाचा कौल घेऊन जंजिरेयात सि(ड्या) केल्या आहेत त्या बळेच लाऊन येक जागा फते करावी येसे सांगितले. मग उठोन गेला. यासी धरावे तर खाली भगत एकटा होता यामुळें धरावयास फावले नाहीं. येसे वर्तमान घोसाळागडाहून लेहून पाठविलें. त्यावरून सेवेसी लिहिले आहे. आम्ही किले मजकुरी तो रातीचे निजत नाहीं. च्यारी प्रहर चौकी पहारा करीत असो. खबरदारी करीत असो व किले घोसाळागडचे गडकरीहि खबरदारी करून चौकी पहारा करीत आहेत. साहेबाचे अंनाचा प्रताप आहे तेथे चिंता नसे. परयेंतु सरंजाम करणार साहेब आहेत. हे विज्ञापना.

¶*Kanhoji Mankar reports to Chimaji Appa the endeavours of the Sidi to capture the Fort of Ghosala and assures him that all precautions are being taken against the danger.*

No. 128] [*10-7-1735*

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
तथा राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती शेवक सदाशिव बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विनवावया प्रार्थना येसीजे. येथील कुशल श्रावण शुध द्वितीया मुकाम सवाई जयेपूरपावेतों स्वामीचे कृपादृष्टीनें यथास्थित असे विशेष. राजश्री व्याद्यागीराम प्रधान

राणाजीचे यांजसमागमें येथवर आलों. आजपावेतों उदेपुरीहून येंक मास जाला कीं ब्यारिदासजीचा आमचा वाटेंत बहुत श्नेह अतिशये जाला, सबब कीं शेवकास स्वामीकार्यावर द्रष्टि यामुलें जैसी त्यांची रजाबंदी त्याप्रमाणेंच आर्जव करून बहुतच कृपावंत करून घेतले. शेवटीं येथें कितेक साधकबाधक गोष्टी सांगून निदानची गोष्ट सांगितली कीं विजयादसमी जालियावर फौजा येतील, मग तुम्ही पट्टा घाल तेव्हां येश तुमचें हातचें परिछिन गेलें. जर राजश्री पंतप्रधान स्वामीसीं श्नेह पूर्ववत येथास्थित राखणें तर फौजा जोंवर आल्या नाहींत तवर सनदा देणें, म्हणजे परस्परें श्नेहाची वृधि आहे व तुमचे प्रधानपणास कांहीं कधीं खतरा नाहीं. यैसी रदबदल जालियावर त्याही उत्तर दिल्हें कीं मजलाहि भरंवसा रायांचाच आहे. मजला मुदई नखजी धाभाई जबरदस्त व तुमचे फौजाचे सरदारांचे अनुमत धाभाईकडे आहे त्यास फौजा तुमचे अखतियारांत नाहीं. उलटे तुम्हांस निरोप देणें म्हणोन बुंदीवर सांगितले. त्यास रायापासून तुम्ही बलकटी करून आणवणे कीं फौजा येतांच सरहदेवर तुम्ही जाऊन फौजांचा उपद्रव न होयें. पट्टा येथून उदेपुरास जातांच सनदा करून देतो कीं विजयादशमी अगोधर सनदा रायापासीं पावेत यैसें करितो. यैसा करारमदार निश्चयात्मक जाला. पांच महिने उदेपुरी होतों तेव्हां राणाजीस ज्या गोष्टीनें त्यास सधान ते गोष्टीने रजावंद ठेविलें. तेव्हां राजश्री ब्याहारिदास बाहेर मुलकगिरीस होते. अता दो महिन्यामधें याचीहि रजाबंदी बहुतच करून कार्यावर आणिले. घरची फूट होती. जर आजपावेतों साहित्यपत्र लटकेच लौकिक पदार्थें लिहिते तऱ्ही यांची त्रिधा जाली आसती. त्यास फौजाचे सरदारांहीं पत्र देखील न लिहितां उलटे आम्हांस निरोप देणें म्हणोन सांगितलें. स्वामीचे पुण्यें आजपावेतों शब्दज्ञान मात्र कथनी सांगून कितेक प्रकारे भये प्रीत दर्शऊन तीर्थरूप मातुश्रीबाई व राजश्री बाबूजी नाईक याणीहि आमची मातबरी सांगितली. तेव्हां आमचे बोलण्यास खरे मानिलें. येथें सवाई जयेसिंगापासीं आम्हांस राजश्री ब्याहारीदासजीही भेटविले. बहुत सनमानेकरून आदर मान केला. आमची मातबरी व शरीरसंमद निवेदन केला. तेव्हां सवाइजीही येकांती खिलवती दोन तीन केल्या. तो अर्थ निराळे पत्रावरून श्रुत होईल. त्याचे उत्तर पत्र पावतांच सत्वर सेवकास लिहिलें पाहिजे की तैसी वर्तणूक करीन. शेवेसीं श्रुत होय हे विनंती.

¶*Sadashiv Balal informs the Peshwa that he has succeeded in persuading Biharidas, the Minister of Udaipur, to the desirability of coming to a definite agreement with the Peshwa.*

No. 129 [16-7-1735

नकल

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजेश्री आंताजी मल्हार सुभेदार
प्रो गंगाथडी गोसावी यासीं

सेवक बाजीराव बलाल प्रधान नमस्कार. सुहुा सीत सलासेन मया अलफ. वेदमूर्ति राजेश्री चिंतामण भट हिंगणे तीर्थउपाध्ये नासीककर यास धर्मादाव वर्षासन रुपये.

२५ पेशजीप्रमाणे
१५ ज्यास्ती साल मारी
———
४०

येकूण च्यालीस रूपये देविले असे. पो मार पौ पावते करीत जाणे जाणिजे छ ६ रबिलावल. आज्ञा प्रमाण लेखन सीमा

बार.

¶*Bajirao Ballal to Antaji Malhar Barve, Subhedar of the Nasik District, fixing a cash annuity of Rs. 40 upon Chintaman Bhat Hingne.*

No. 130] [5-8-1735?

पौ छ ९ रबिलाखर

श्री.

राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान दाजी-
गोसावी यांसी

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो मानाजी आंगरे रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत गेले पाहिजे. पत्र पाठविले ते पावोन लिहिला अभिप्राव कलो आला. रुपयांविशी कितेक प्रबोधें लेखन केले की याउपरी पैकेयाचा जाब पष्ट लेहून पाठवणें, त्यासारखे ऐवजाचा वसूल करून घ्यावा लागेल, म्हणोन लिहिलें. ऐसियास

येविशी आपले पत्र अगोधर आले होते त्याचा जाब लिहिला आहे. त्याजवरून कळो आले असेल. ऐवजाची तरतूद केली आहे. मागाहून रुपये रवाना करितो, याजमध्ये सौशय सर्वथा नाही. याउपरी जो ऐवज चढतो तो आम्हासच भारी हे गोष्ट येथार्थ मानून असत्य पदार्थात जो येत्न केला आहे तो ऐवज व भले माणूस आपणाकडे पाठऊन देऊन. वरकड कितेक अर्थ आहेत तेहि आपणास अवगत होतील. आपण लिहिले की, याउपरी जो बिचार असेल तो पष्ट लेहून पाठवणे. ऐसियास आपणाविरहित आम्हास दुसरे गत्यंतर नाही. आमचे सर्व संकट आपणावरी आहे; ऐसे असतां आम्ही उतर काये ल्याहावे? गोवलकोटास लोक पाठवावयाचा अर्थ आपणास लेहून गेला आहे, त्यावरून आपण जो सिधांत करितील त्या प्रो वर्तणूक होईल. बहुत काये लिहिणे? कृपा असो दीजे. रा छ २६ माहे रबिलोवल हे विनंती.

¶*Manaji Angre informs Peshwa Bajirao that he was fully obedient to the addressee's wishes, that he would soon send the amount and the account as instructed and that he would send succours to Gowalkot.*

No. 131] [*8-8-1735*

श्रीशंकर

श्रीमंत महाराज राजश्री पंतप्रधान,

तथा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

पोष्य सदासिव नाईक जोसी सा। नमस्कार विनंती. उपरी, स्वामीचे कृपेकरून भाद्रपद सुध १ पावतो श्रीकासीत सर्व सुखरूप आसो विशेष. स्वामीकडून पत्रे आली होती त्याचे जाब पूर्वी पाठविले त्यावरून वर्तमान स्वामीस विदित जाहाले आसेल. उपर, हाली चिरंजीव बाबूजी नाईकाकडून पत्रे आंबेरीहून श्रावण सुध ३ येची आली, त्यात वर्तमान लिहिले की, राजेश्री राजाधिराज याजपासी सुखरूप आहो. कृपा राजाधिराज करितेत. दिलीस आयामलजी गेले आहेत, तेथील बंदोबस्ती करून पत्रे आली म्हणजे आपण सत्वरीच स्वार होऊन मातोश्रीसहवर्तमान श्रीस येतो. येक मास लागेल. येसी पत्रे आली. स्वामीस तर पत्रे वरचेवर तिकडून येतच आसतील. परंतु कळले वर्तमान लिहिले आसे. उपर, स्वामीनी ब्रम्हपुरीविसी लिहिले होते. त्यास, ब्राम्हणपुरीस जागा फार पाहिजे. ज्या स्थळात आठदाहा वरे होते तैसा जागा

येकायेकी मिलत नाही. तलासात आहो. मिलाला म्हणजे घेऊन स्वामीस लिहून पाठऊ. गावात मसाला मिलत नाही. गावातील आधिकारी घाट बांधतो. हकिमीमुले सर्व मसाला तो घेतो. घराचे दुणे मोल जाहाले आहे. ागर लोक फार आले त्यामुले घर माघ जाहाली. उपर स्वामीनी लिहिले की, शासमेधी घाट घेतला आहे त्याचा पैका लागला आसेल तो लिहून पाठवणे. यावरून पूर्वी पत्रें लिहिली आहेत. वर्तमान सर्व लिहिले आसे. उपर, बाग धकालेस्वराजवल घेतली आहे. गावात आहे. त्यास चौफेर दिवाल पकी ातली. आत स्थले काही जाहाली, काही होणे आहेत. येका पंगतीस च्यार जार पात्रे ब्राम्हणभोजन होईल यैसी जागा आहे. परंतु तयार जाहाली नाही. ार्तिक मासी काम लाऊन तयार करू. घाट बांधावयाविसी आज्ञा आली होती. ासीत स्थले तीन आहेत: पंचगंगा, मनकर्णिका, दशासमेध. या घाटी ब्राह्मण ऊन स्नाने करितेत. दोन स्थले स्वामीची जाहाली. पंचगंगेचा घाट ीपतराऊ यानी बांधिला. आता यैसे स्थल नाही की जेथे ब्राह्मण येऊन नाने करीत यैसे स्थल नाही. याजकरिता उद्योग न केला. येक स्थल ह्मनाल घाट बांधावयाचे आहे ते काम हाली होत नाही. ते सर्व वर्तमान ातोश्री व चिरंजीव बाबूजी नाईक आल्याउपर त्यास सांगू. त्याउपर स्वामीची ांची भेटी जाहालियाउपर सर्व निवेदन करतील. मातोश्रीचे आंबेरीहून निघणे सरा जाहालियाउपर होईल यैसे दिसते. मातोश्री पुन्यवान आहे. स्वामीचे ाद्रुस्ट विचित(त्र?) आहे तेणेकरून चिंता वाटत नाही. यात्रा सुखरूप ऊन आपले स्थलास जातील. चिरंजीव बाबूजी तेथे नाही म्हणून चिंता करावी री स्वामी धणी आहेत. धंदा स्वामीचा आहे, तेथें आम्ही चिंता करावी यैसे ाये आहे? भाईजी नाईक, शामजी नाईक, नारायेणजी स्वामीजवल आहेत. ास पुढे धंदा करावयाची (करावयाची) आज्ञा केली पाहिजे; त्याप्रमाणे र्तणूक करतील.

¶*Sadashiv Naik Joshi, from Benares, writes to Bajirao Ballal, among other pics, about the programme of the Peshwa's mother, who is at this me on a pilgrimage, and about some buildings and ghats to be erected for e use of pilgrims at that holy city.*

No. 132. [*About Sept. 1735*

श्री

विनंती उपरी. चिठी पाठविली पावली. नरवरीहून राजश्री सवाइजीकडील दीक्षित व मुनसी ग्वालेरीस आले आहेत. त्यांस आणावयास स्वार पनास

पाठवावयाविसी आज्ञा केली आहे, याचे उतर पाठविले पाहिजे म्हणून लिा यैसियासी ग्वालेरीस जावयास दोन दिवस लागतील. राउतास दाणापाणी मिलाला पाहिजे. पनास राऊतांचा निभाव कैसा होईल. आणि राऊतहि जावयास आनमान करितात. यैसियासीं कासीदाजवल कागद द्यावे आणि बलजी आला आहे त्याची माणसे व राऊत देऊन त्यांस आणावे. राऊताचा निभाव वाटेचा होत नाही. च्यार दिवस राऊत खातील काये? वाटेस राहातील कैसे? याकरितां तुम्हीं कबूल न करणें. बलजीकडे सांगोन उंबरखानास पत्र देऊन लस्करांत येतसे करवणे हे विनंती. घोड्यामध्यें काहीं जीव राहिला नाहीं हे विनंती.

Arrangement to bring Sawai Jaising's envoys in the Maratha Camp is discussed. The writer expresses his unwillingness to send his men to Gwalior as the roads are unsafe.

No. 133] [*23-9-1735*

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व
तथा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती राजश्री त्रिंबकराऊ सोमवंसी यासी सरलस्करची वस्त्रे छ १६ जमादिलावली मंगलवारी प्राथ:काली दिल्ही. आम्हासही त्याजबराबर मजमूची वस्त्रे दिल्ही. वरकड ताबिनातचे कारकून पहिले होते त्यास करार करून वस्त्रे देवावयाची परवानगी सांगितली आहे. राजश्री आनंदराऊ रघुनाथ पेसजीचे दिवाण यासीहि दिवाणगिरीची वस्त्रे द्यावी म्हणून राजश्री बोलिले. देतील. वरकड नजर व कर्ज वगैरे दिवाणचे देणे रुपये ८०००० असी हजार करार जाहले. सरलस्करचा सरंजाम पहिले राजश्री दावलजी सोमवंसी यासी होता त्याप्रमाणे द्यावा व जुने साडेतीन माहाल माधवराऊ सोमवसी देवजी सोमवंसी याचे पुत्र याच्या नावे द्यावा यैसा करार जाहला आहे. अनंदराऊ सोमवसी यासी त्या सरंजामपैकी निमे सरंजाम द्यावा, काही नजर देतो म्हणून राजश्री यासी कोणी मध्यस्त बोलतात, परंतु अद्याप काही उतर प्रत्योतर जाहले नाही. देवजी सोमवंसी यासी सांगोन काही आनंदराऊ सोमवंसी याचीहि समजावीस करावी यैसे आम्हापासी आजी मंगलवारी पाहाटे राजश्री बोलिले. जाले वर्तमान

स्वामीस कलावे याकरिता लिहिले असे. पुढे होईल वर्तमान ते लेहून पाठऊ. विदित जाहले पाहिजे. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Bajirao and Chimaji are informed that the robes of the office of Sarlashkar were conferred on Trimbak Rao Somvanshi. The question of granting him Saranjam is still undecided.*

No. 134] [*1-10-1735*

पो २९ जमादिलाकर
मुा धुगाव ताा खेड

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
तथा राजश्री आपा स्वामीचे सेवेसीं

विनंती शेवक सदाशिव बलाल साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल स्वामीकृपेनें आश्विन वदी येकादसी मुकाम सवाई जयेनगरपावेतों येथास्थित असे. येथून आजच राजश्री ब्याहारीदास यासमागमे उदेपुरास कूच दरकूच स्वार होऊन गेलो. तेथून पव्याचे कार्याचे सविस्तर लिहितों. विशश तीर्थरूप मातुश्रीसमागमे मथुरेपावेतों होतों. तेथें वर्तमान आयेकिलें कीं महमदखान बंगश पांच हजार स्वारानसी आहे. कितेक लोकांही वसवास घातला बदल मजला मातुश्रीबाईने आगऱ्यापावेतों समागमे नेलें. तेथे राये शिवदास आयामलजीचे बंधु सुभेदारीचे नायेब होते. त्याणी शेवकासी बहुत स्नेह केला व त्यांचे बंधु राये नारायेणदासजी ते तर मातुश्रीबाईसमागमें शेवटपावेतों माहाराजाधिराज सवाईजीनें दिल्हे आहेत. त्यांचे ब्याही राये हरपरसाद बंगशाचे दिवाण त्याजला आलिकडे बोलाऊन शेवकास भेटविलें कीं हेहि रायाचे शरीरसंमंधी आहेत व मातुश्रीसमागमें राजश्री बाबूजी नाईक शेवटपावेतों दिल्हे आहेत व यास तुमचे खावंदापावेतोंच रायांही आज्ञा केली आहे कीं नवाबापावेतों जाणें. पुढें कांहीं चिंता नाहीं व येक थैली होती ते महमदखानाचे नांव घालून आम्हांकडून तयार करविली तेहि त्यास दाखविली. त्याउपरि हरपरसाद तों त्यांचे सोयरेच. दुसरें स्वामीचे सर्वांस अगत्य तेच घडीस आम्हांस येमुनापार उतरून नववाचे भेटीस घेऊन गेले. राजश्री दीनानाथजीसहि नाइकांहीं समागमें दिल्हें. जाऊन नवाबाची भेटी घेतली, व जुबानी स्नेह व कितेक

संभाशण स्वामीचे तरफेनें सांगितलें. पुढें भरंवसा नवाबाचा आहे म्हणोन सांगितलें; तेव्हां बहुत संतोशी जाले कीं रायांहीं आम्हांस स्मरण करून पत्र लिहिलें व आमचे भरवसियावर पाठविलें. तर त्यांची मातुश्री व आमची दोन नाहींत. तेच घडीस आपले तालुकियापावेतों फौजदारांस कुरेजाहानाबादपावेतों ताकिदा लिहून पाठविल्या, व आम्हांस आज्ञा केली. तुम्ही जाऊन मातुश्रीस घेऊन पार उतरणे. तेव्हां निरोप घेऊन मागती मातुश्रीचे शेवेसीं वर्तमान सांगोन विजयादशमीचे मुहूर्ते यमुना पार उतरून मुकाम केला. दुसरे दिवसीं हरपरसाद दिवाण याजबरोबर हजार रुपये नकद व पांच साशाचीं वस्त्रें बादली मातुश्रीकारणे पाठविली व राजश्री बाबूजी नाईकास समागमें घेऊन नवाबाचे भेटीस घेऊन गेलो. नाइकासीही श्नेहाचीं उत्तरें च्यार घटकापावेतों स्वामीचाच स्तुतिवाद नवाबाही केला. त्याउपरी रुखसत केले. मातुश्रीबाई व राजश्री बाबूजी नाईक पलीकडे येक मजल गेले. तंवर आम्हांस आपल्याजवल ठेऊन घेतले, व स्वामीचे पत्राचे उत्तर लिहिविलें व येकांतीं खिलवतींत च्यार घटका दिवाणास आधीं येऊ न दिल्हें. नवाब व मीच दोघे बसलों. मोठा मजकूर या वरशीं सादतखानास बोलाऊन आपले लोक नर्मदा न उतरेत यैसा मनसुबा करावा तर सादतखानाने च्यार सुबे व दोन करोड रुपये नख्त व मीरबक्षी हुजूरची यैसे मुदे घातले. त्यास खानदौराचे व आणिक अमिराचे अंत्र उडवावें तें कांहींच होत नाहीं; तेव्हां खानदौराचा भाऊ व आम्हांस मालव्यात पाठवितील तर रायासी आम्हांसी सलूक आहेच. परंतु माझे खास जागीरींत चौथाई माफ करावी; वरकड कुल आमल सालाबाद करितात तैसा करावा व राऊ व आम्ही येकचित जाल्यावर कितेक मवास आहेत, तोडून जें मिलेल तें निमेनिम वाटून घेऊं, यैसे आगत्यरूप रायास समजाऊन सांगणें व याचें उत्तर आम्हांस तुम्हीच घेऊन येणे. उदेपुरीं अटकाव जाला तऱ्ही येकवेल भेटीस येणे म्हणोन नवाबांहीं सांगितलें. त्यांचे समधानास्तव आम्ही सर्व मान्य करून पत्राचें उत्तर घेऊन येमुना उतरून आगऱ्यास आलों. नवाबाची थैली स्वामीचे शेवेसीं रवाना केली आहे. पावलियाचें उत्तर शेवकास लिहिलें पाहिजे व नवाबासहि उत्तर जें लिहावयाचें असेल तें लिहून मसवदा शेवकापासीं पाठविला पाहिजे. आलीकडे आगऱ्यांत आलों तों राये शिवदास याणी च्यार घटका खिलबत केले कीं रायांचा पुण्यप्रताप यैसा जाला आहे कीं हस्तनापूरचें राज्य घेऊन छत्रपतीस देतील तर आज अनकूल आहे. कितेक मनसुबे आहेत. लिहावयाचे नाहींत; परंतु स्वामीचे भेटीस दिसगत लागतील, बदल पत्रीं जरूर जाणोन लिहिलें आहे. जर स्वामीचें आगमन यावर्शीं या प्रांतें होईल

तर राये शिवदासजीचे मनोगत यैसे आहे कीं चुडामन जाटाचा पुत्र माहाराजांहीं बेदखल केला आहे तो बाहेर बाहेर फिरतो, त्याचे आधीन कुल जाट आहेत व मजपासीं फौज मातबर पठाण लोक आहेत. राऊ वचन प्रमाण देऊन शेवटपावेतों चालवितील तर जें स्थल मातबर म्हणतील तें आम्ही आधीं रायांस घेऊन देऊं. रायापासीं पैका सरंजाम कांहीं मागत नाहीं. परंतु पुढें आम्हांस जागा पाहिजे. हातचें न सोडावें, प्रतीत यावयास यैसा मनसुबा मान्य करितों. तर याचें उत्तर शेवकास लिहावें व त्यांचे पत्राची उत्तरें लिहावी. राये नारायणदासजी व राये शिवदासजी दोघेहि स्वामीचे श्नेहाची इच्छा करितात. त्यांचें मनोगत कीं स्वामीचे समागमें राहावें, या प्रांतीचें उमदें काम आपले हाते घ्यावें. पत्रें उभयेतांहि स्वामीसेवेसीं लिहिली आहेत. त्यांची उत्तरें कृपा करून लिहिलीं पाहिजेत. तेथून स्वार होऊन येथे सवाई जयेपुरास आलों. माहाराजाधिराज यांची भेटी घेतली तों याणी मागती पहिली बोलीप्रमाणें आज्ञा केली कीं रायांचे उत्तर आलें कीं नाहीं? या आठा दाहा रोजांत आले तर उत्तम नाहीं तर सादतखानास हजूर बोलाविलें आहे तो आलियानें आणिक मनसुबा होईल. तऱ्ही रायांस आमचें आगत्य असावें कीं माझा अकृत्रिम श्नेह आहे. जर सादतखान आले तर त्यास पराभवातें पाववितीलच, या मधेंहि आमचें समाधान आहे. परंतु जर आपली सुब्याची बाहाली राहून पैका येकवटच घरांत येतो हे किफायेत रायांची मोठी आहे. मागती दुसरे वर्शीं चित्तास आलें तर मान्य करावें न आलें तर न करावें यैसें यांचें मानस आहे. जालें वर्तमान शेवेसीं श्रृत करावें. त्याहीवर जे आज्ञा येईल तेणेंप्रमाणे वर्तणूक करूं. सांप्रत आज ताजें वर्तमान हस्तनापुरीहून आले कीं पृथ्वीपतीहि दोन सुबे सादतखानास द्यावेसे करून दोन करोड रुपये खजानाहि द्यावा आणि बंदोबस्तीस पाठवावें. त्यास लक्ष्मीनारायेण वकील सादतखान यास वस्त्रें खिलवत शेमशेर देऊन रवाना केलें, तो सादतखानापासीं पोंहचला. तेथून स्वार होणार आहेत. हुजूर सत्वरीच येतील इतकें वर्तमान तहकीक आहे. शेवक आजच कूच करून ब्याहारीदासजी समागमें उदेपुरास जातो. शेवेसी श्रृत होय हे विनंती. कार्तिक शुध प्रतिपदेपासून खर्चाचे रुपये ८५० साडे आठशें स्वामी कृपा करून देतात ते राजश्री नारायेणजी दिमत राजश्री बाबूजी नाईक याजपासी आज्ञा द्यावयाची स्वामी करितीलच. श्रृत होय हे विनंती.

¶*An important document wherein the writer reports confidential talks he had had with several important personages and princes in the North. Practically everybody says, the writer is favourably disposed towards the Peshwa and anxious to help him in his march upon Delhi. The letter also refers to the pilgrimage of the Peshwa's mother.*

4578

No. 135] [1-10-1735 ?

श्री.

श्रीमंत राजश्री आपा
साहेब स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक राणोजी सिंदे कृतानेक विज्ञापना. ताा छ २४ जमादिलोवल मुाा वडगांव संनिध ढौकेश्वर स्वामीच्या कृपावलोकने सेवकाचें वर्तमान येथास्थित असे. यानंतरी आमचे लोक जमा जाहाले. नवीहि फौज आणखी ठेविली. याउपरी कूच दरकूच जातो. सेवेसी कलावें म्हणऊन लिहिले आसे. विशेष, राजश्री मल्हारजी होलकर यांजकडे सोनवणी राहूकर गुदस्ता होते. तीनसे स्वाराची बोली करून पनास स्वार आणिले. बांब्याचे जावाई आत म्हणऊन हती दिल्हा. येंदा बोली करून सेवट त्याजकडे आले नाहीत. हती स्वामीचा घेऊन दुसरीकडे जाऊ न द्यावे. त्याणीं नालबंदी आणिली आहे. धातुपोशण स्वामीसीहि कदाचित बोली करितील तरी न करावी. त्यापासून हती बिलाकुसूर घ्यावा. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Ranoji Sindia from Vadgaon communicates to Chimaji Appa that with a fresh addition of men to his forces he is advancing on his march.*

No. 136] [3-10-1735

पाा छ २९ जमादिलावल

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोसी कृाा नाा विनंति येथील कुशल ताा छ २६ जमादिलौवल मुाा कसबे पनवेली जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामींनी पत्रें पाठविली ती काली येथील मुकामी पावली. किले कर्नालियास शामलाचे लोक आहेत ते गेलियावेगल इकडे यावयाचे न करणे व कल्याणास गेले असाल तरी तेथील कामकाज करून पनवेलीस लौकर येणे म्हणून लिहिले, तरी आम्हीं कल्याणास गेलो होतो, तेथे दोन तीन दिवस राहून तिकडील कामकाज विल्हे लाऊन येथे छ २३ जमादिलौवली येथे आलो. किले मजकुरीहून शामलाचे लोक जावयाचा विचार तरी किलेदार लोकास निरोप द्यावयास सिद्ध आहे त्यासीं आम्ही बोली केली तेविसी दुसरा विचार त्याचा नाही, परंतु राजश्री मानाजी

आंगरे यांचे पत्र आणविले ते त्याणी पाठविलें नाही व बंदराबंदरावरी त्याचे लोक आहेत तेहि उठोन गेले नाहीत; आणि नित्य उठोन त्यांचा उपसर्ग लागतो. कटकट करितां किलेदार यांणी श्रमी होऊन आम्हास व राजश्री हरिसिंग यांस लेहून पाठविलें, त्यास हरिसिंग व त्रिंबकराव काली प्रात:काली येथे आले. त्यास हरिसिंग यांसमागमे किलेदारास बहुत प्रकारे समाधानाच्या गोष्टी सांगोन पाठविले आहेत. ते फिरोन आजी अगर उद्यां येतील. शामलाचे लोक घालवावयास किलेदारापासून अनमान आहे यैसे नाहीं, परंतु राजश्री मानाजी आंगरे याजकडून लोक बंदरावरी आहेत ते गेले व किरकोली उपसर्ग करितात तो राहिल्यावरी लोक जातील. कळावे याकरिता लिहिले असे. बहुत काये लिा लोभ करीत गेले पाहिजे. हे विनंति.

¶*Vasudev Joshi to the Peshwa from Panvel reports the steps taken for evacuating the Fort of Karnala by the Sidi's Soldiers.*

No. 137] [*30-10-1735*

पाा छ २४ जमादिलाखर

श्री

पुरवणी राजश्री राऊ व ताा राजश्री
आपा स्वामींचे सेवेसी

विनती उपरी. स्वामीचा निश्चये आसा आहे कीं, राजश्री स्वामीस कार्याचा प्रसंग पडेल ते समई आम्हास आज्ञा करितील तेव्हां सर्वस्व देऊन राजश्री स्वामीस संतोषी करून घेऊन. हा निश्चये स्वामीचा. त्यास हा प्रसंग सांप्रत आसा आला आहे की, राजश्री पिलाजी जाधवराऊ खासा पनासा स्वारान्सी आले म्हणिजे स्वामीनी सर्वस्व दिल्हेसे होऊन राजश्री स्वामी संतोषी होतील. बहुतांस बरे वाटेल आणि स्वामीची स्वारीस जावयाची मोकलीक होईल. याकरिता स्वामीनी राजश्री पिलाजी जाधवराऊ यास आगत्य पाठऊन द्यावे. येविसी विलंब लावावा आगर दुसरा विचार चितात आणावासा नाहीं. हा प्रसंग कसोटीचा आला आहे. याकारितां स्वामीनी राजश्री स्वामीची आज्ञा पाठऊन राजश्री पिलाजी जाधवराऊ यास पाठऊन द्यावे. यामुले स्वामीचे जितके आनहित होईल तितके मान्य करून राजश्री पिलाजी जाधवराऊ यांस पाठऊन द्यावे. आम्ही स्वामीस ल्याहावे तरी आपले सामर्थ्य काये ? स्वामीस सर्व मनसबे चितांत येत आहेत. हा समये राजश्री स्वामीची आज्ञा मान्य करावयाचा आहे. पुढे

आसा प्रसंग पडणार नाही. तरी स्वामीनी राजश्री पिलाजी जाधवराऊ यास पाठऊ(न) द्यावे. विदित जाले पाहिजे. बहुत काय लिहिणे सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Bajirao and Chimaji Appa are urged by the writer to send Pilaji Jadhav without any hesitation, and thus please the King.*

No. 138] [*Recd. 30-10-1735*

पाा छ २४ जमादिलाखर.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व ताा
राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. उपरी, राजश्री स्वामींनी राजश्री पिलाजी जाधवराऊ याचेविसी स्वामीस पत्र लिहिले आहे. त्यास स्वदस्तुरे पाच वली लिहिला आहेत त्यामध्यें अवघा मजकूर आहे. तरी स्वामीनी राजश्री पिलाजी जाधवराऊ यास पाठऊन द्यावे. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Shahu's desire, that Pilaji Jadhavrao should be sent soon, is communicated to the Peshwa.*

No. 139] [*Oct, 1735*

श्री

पुा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंति उपरी आपली दोन तीन पत्रे आली कीं बंदर देऊन तह करावा. येशास वोढून धरिलियाखेरीज कामास येत नाही. तहहि करणे तरी दम धरून तजविजेने केला पाहिजे. याकरितां येक पत्र पाठवावे कीं बंदरचा मजकूर कर्णालकर चालतील तरी हे गोष्ट होत नाही, बंदर आलाहिदाच आहे, येसे लिहिले पाहिजे म्हणजे त्याजकडील कोण्ही मध्यस्त आला तर दाखवायास कार्यास येईल. आम्ही तो बंदर देऊन निःसंशये तह ज्ञाला तरी करीतच आहो. परंतु आपण पत्र पाठविले पाहिजे, बहु+त काये लिहिणे लोभ केला पाहिजे हे विनंति.

¶*Vasudev Joshi to Chimaji Appa, referring to some treaty under discussion about the port, and the Fort of Karnala.*

+ पत्र वासुदेव जोशाचें,

No. 140] [10-11-1735

श्री

श्रीमंत राजश्री राऊ स्वामींचे सेवेसी

पोष्ये भिवराऊ कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता। छ ९ रजब मुकाम का। कुंभारी गंगा उतरतीर जाणून स्वकीये लेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. आजी छ मजकूरी माहूरीच्या मुकामीहून स्वामीचे पत्र आले तेथें लिहिले की आजी बातरी खोपरीचा मुकाम आहे. छ ६ रजबचा मुकाम मदनेस्वरच्या नांदुरावरी मुकाम आहे म्हणून लिहिले. यैसियासी काली आपली चिठी आली त्यामधे लिहिले होते की माहुरीहून गंगेच्या तीरास मुकाम छ ९ रजबचा आहे. त्यावरून आमचा मुकाम गंगेच्या काठी जाला तों आजी पत्रे आले की बातरी खोपरीचा मुकाम जाला तेव्हा आपण पुढे कूच करून कसे जावे ? आजी दोन दिवस घोडियासी गवताची काडी मिलत नाही यैसे संकट येऊन प्राप्त जाले. स्वामीची तो आज्ञा पाच कोस सा कोस उजवे हाते जाणे. याकरिता उदईक कूच करून पुढें जात होतो ते येथेच गंगेच्या काठी मुकाम करून राहिलो आणि हे पत्र स्वामीस लिहिले आहे. तरी आपणास या प्रांते कितेक दिवस गुंता पडेल ते ल्याहावयासी आज्ञा करावी; त्यासारिखा आमचा कूच मु(का)म करावा लागला. आमचे विचारे आपला मुकाम गंगेवरी, गंगेवरून विंचुरावरी, तेथून कोकणबारी, तेथून चंदनपुरी, आमचा मुकाम तगेवरी, तेथून अदरसूल नगरसूलच्या वोढियावरी, तेथून राजापुरच्या घाटे माणिकपुजच्या वोढियावरी, तेथून आज्ञेप्रमाणे वर्तणूक करून, यैसा विचार आमचे विचारे आहे. कलले पाहिजे. हे पत्र आजी प्रहर रात्री आवसीस लेहून पाठविले आहे. हे पत्र पावताच जासूदाचा जोडा तेथे ठेऊन दुसरे जासूद देऊन उतर छ ६ रजबी सांजेस पावे ते केले पाहिजे. पत्राचे उतर सत्वर पाठविलें पाहिजे. आम्ही येथे मार्ग लक्षीत राहिलो आहें. सेवेसी श्रुत होय. बहुत काये लिहिणे ? कृपा लोभ असो दिजे. राजश्री सटवोजी जाधव व रा। राणोजी भोसले यास व आम्हास पोटास नाहीं. वैरणहि नाहीं. आमची सरदारी नवी. यामध्यें जे आज्ञा करणें ते सत्वर केली पाहिजे. आमचे जाणेहि दूर आहे हे विज्ञाप्त.

¶*Baji Bhivrao writes to the Peshwa news about his movements in the vicinity of the river Godavari and suggests the route to be taken for the march.*

4582

No. 141] [15-11-1735

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

पोष्य बाजी भिवराऊ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशललेखन करावया आज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जाहलों ते मजल दरमजल कूच करून अजी छ १० रजेबी मौजे मलगाव पा निंबाईत प्रांत खानदेश गीरनदीवरून येऊन मुकाम केला आहे. प्रात:काली येथून कूच करून चिखलवाहाल उजवी घालून मुकाम होईल. श्रीमंत राजश्री राऊ चांदवडची बारी उतरोन पुढें येतील. आम्हीं तिकडे कागदपत्र पाठवणें ते राऊतासमागमें व जोडेहि पाठविले त्यांसमागमें पाठविले आहेत. त्यांची उतरें जैसीं येतील तैसी वर्तणूक करून. भेटीस यावयाची आज्ञा जाहली तरी भेटीस जाऊन पुढें जावयाची आज्ञा जाहलियास पुढें जावयाचे करून. स्वामीस कलावें म्हणून लिहिलें असे. स्वामीनी वरीचेवरी कुशलार्थलेखन करावया आज्ञा केली पाहिजे. चिरंजीव राजश्री चिमणाजी व दादोबा याचा सांभाल केला पाहिजे. बहुत काये लिहिणे कृपा लोभ आसों दिजे. राजश्री पंताजीपंत याचे हातून सेवा घेऊन त्याचें चालविले पाहिजे. कृपा आसो दिजे हे विनंती.

¶*Baji Bhivrao reports his movements and those of Bajirao to Chimaji Appa.*

No. 142] [17-11-1735

पैवस्ती छ २९ साबान

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान तथा राजश्री
आपा स्वामीचे सेवेसीं

विनंती शेवक सदासिव बलाल साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल मार्गेश्वर शुध त्रयोदसी मुकाम उदेपूरपावेतों स्वामीचे कृपाद्रष्टीनें येथास्थित असे विशेश. स्वामीचें पत्र पूर्वी येक जोडी व दुसरी जोडी बराबर राजश्री मलारजी होलकर व राजश्री राणोजी सिंदे यांची थैस्या दोन जोड्या पत्रें राणाजी व राजश्री ब्याहारीदास प्रधान यांचे नांवें आलीं ते जयेनगरचे मुकामी पावलीं

राजश्री ब्याहारीदासजीस पत्रें दिल्हीं. त्यासमागमे येथें येऊन राणाजीची भेटी घेऊन पत्राची उत्तरें मागितलीं कीं आतां येक साफ उत्तर देणे. येक वर्श जालें, येथे बसून फायेदा काय? खावंदाचे कार्य होतां राहणें उचित आहे, यैसे बहुताप्रकारे गोर्ष्टीनें भये प्रीत दर्शऊन आज्ञा मागितली. त्यास राणाजी व ब्याहारीदास येकांती विचार करून आम्हांस दुसरे दिवसीं उत्तर दिल्हें कीं तुम्हांस इतके दिवस राहाविलें तर कार्यें करून मार्गस्थ करून. केसरीसिंग राऊत याचे सेनापति आहेत त्यांस हुजूर बोलाविलें आहे. ते आलियावर कार्याची वाट करून म्हणोन उत्तर दिल्हें. परंतु अंतस्थ शोध घेतां कळो आलें कीं सावंतसिंग स्वामीसेवेसीं आमचे मार्गें पाठविला आहे. त्याचे उत्तर स्वामी काये सावतसिंगासीं बोलतील त्याप्रमाणे अमल करितील. बहुधा सावंतसिंग स्वामीचे शेवेसीं रदबदल विनंती करील कीं पट्याचे ऐवज रुपयेच घेत जाणें तर पट्यावांचून स्वामीस पैक्याचा नफा नाहीं. पैका येक दोन वर्शें देतील. पटा जाला तर वर्शोवर्श चालेल. येविशई स्वामीचे शेवेसीं सावंतसिंग येतांच त्यास बऱ्या रीतीनें दबून च्यार गोष्टी सांगितल्या पाहिजेत. येथें स्वामीचे नांवावर सर्व गर्भगलित आहेत. तेथून सावंतसिंगाचे लिहिलें सत्वर यास आलियानें कार्याचा निर्गम करितील, तोपावेतों टालाटाल करितात. ब्याहारीदास व तखतसिंग माहाराजा मार्गेश्वर शुध सष्टीस दिवाणापासून आज्ञा घेऊन शहराबाहेर डेरे देऊन राहिले आहेत. दो चौ रोजांत बाहेर जातील. आम्हांस सांगून पाठवितील कीं तुम्ही अगर तुमचा नायेब फौजेंत देणे. त्यास आम्हांस तर पट्याचे जाबसालावांचून बाहेर निघणे नाहीं. पटा न देतील तर रुखसती घेऊन बाहेर फौजेंत राजश्री मल्हारजी होलकर याजपासीं येऊं. त्यास स्वामीचें ताकीदपत्र सरदारांचे नांवें आलें पाहिजे कीं सदासिव बलाल तुम्हांपासीं आले तर फौजेचा शह जसा सांगतील तसा देऊन पट्याचें कार्यें करून घेणें. येविशई स्वामीनीं रुबरू सरदारांस सांगितलेंच असेल. शेवकानें तीन हजार रुपये कर्ज खाऊन यांस रोजमराहि मागितला नाहीं. आतां देऊं म्हणतात. देतील तर उत्तम; नाहीं तर स्वामीकार्यावर द्रिष्टी देऊन यांसी च्यार गोष्टी पस्ट सांगून आपली फौजेची आमदनी होतांच फौजेंत जाऊं. चमत्कारावांचून यांचे डोले उघडणार नाहींत. जालें वर्तमान शेवेसीं श्रुत व्हावेबद्दल विनंती केली असे. विदित होय हे विनंती.

¶*Sadashiv Balal, Peshwa's envoy, reports the procrastinating attitude of the Rana of Udaipur in arriving at a definite agreement with him.*

4584

No. 143] [17-11-1735

श्रीशंकर

श्रीसकलगुणसंपन सदा राजमान्याविराजित
राजश्री बापूजीपंत स्वामीचे सेवेसी

पोष्ये सदादिव बलाल साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल मार्गेश्वर शुध १३ पावेतों उदेपुरीं येथास्थित असे विशेष. येथील वर्तमान सविस्तर येजमान स्वामीचे पत्रीं आहे व कितेक सेख महमद इसमाईल जुबानी सांगतील. आपल्या प्रेत्नास चुकलों नाहीं. कांहीं गतवर्शी सरदारांहीं अंतर केलें, कांहीं यावर्शी ब्याहारीदासजीहीं टाळाटाळ आजपावेतों केली. अंतस्थ यांचा मुदा दिसोन आला कीं सावंतसिंग पाठविला आहे त्याजबरोबर सांगून पाठविलें कीं नकद सालबसाल येजमानास द्यावे आणि पटा न द्यावा. तर सावंतसिंग तेथें पोहचतांच फजित केला पाहिजे कीं परभारें तोच यांस लिहील कीं आतां पव्यास दिरंग न लावणें. यैसें लिहिलें सावतसिंगाचें घेऊन आम्हापैकींच पाठविलें पाहिजे. या वर्शी पटा खामखा देतील. परंतु फौजेचा शह बसून आमचे लिहिल्यांत सरदार राहातील तर निःसंशय कार्य होईल. आमचे तलबेचे रुपये कार्तिक शुध प्रतिपदेस ८५० साडे आठशें यजमान स्वामी देतात ते पहिले विनंतीपत्र लिहिलें आहे तर स्वामीनी अर्ज करून नारायेणजी दिमत बाबूजी नाईक यांचे हवाला केलें पाहिजेत. सेख महमद इसमाईल याणें मेहनत बहुत केली. घोडे हिकमत आकलीनें आणिले. कार्याचें मनुश आहे, मागती यांस नवाबाचें बोलावणें येईल तेव्हां येजमान पाठवितील. स्वामीचा स्तुतिवाद करीत आहेत. वरकड वर्तमान सेखजी सांगतां केलो येईल. सादतखान हुजूर जातां जातां अडारूचा जमीदार भगवंतसिंग पांचशें स्वारानसीं चढोन सादतखानावर गेला. त्याणें बहुत माणसें मारिली. निदानी जमाव मोठा मारला गेला. गर्दीत मालमता बहुत होती ते लुटली गेली. सवाईजीवर चढाई आहे यैसी वदंता आहे. येजमान स्वामीचें येणें होईल तर मोठा दबाव पडेल व सवाई व राणाजी बहुत राजी होतील. यावर इच्छा कृपा लोभ कीजे, हे विनंती. राजश्री धोंडोपंत स्वामीस नमस्कार.

¶*The Rana of Udaipur while expressing readiness to pay tribute to the Marathas was unwilling to sign a treaty to that effect and sent one Sawantsing to plead on his behalf. Sadashiv Balal asks Bapujipant to advise the Peshwa not to entertain the proposal but to press for a written agreement. The letter incidentally refers to the defeat of Bhagwantsing Adaru by Sadatkhan.*

No. 144] [28-11-1735?

पौ छ १ साबान

श्री

सेवेसीं शंकराजी दत्तात्रय कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. कृपा करून पत्र पाठविले. उत्तम समई पावोन अभिप्राऊ कळों आला. नवाब छ २३ रजबीं शहरीहून कूच करून हरसुलाजवळी राहिले. दुसरे दिवसीं फुलमरीपासी तिसरे दिवशीं पालीपासी राहिले. आणि सेलवडास जाणार. बुनग्यांत गेलियावरी काये तजवीज करितील पाहावें. बोली तरी यैसी आहे कीं वराड प्रांतें जाऊन तैसेच याचा पुत्र कटालेकडे(?) गेला आहे त्यास भेटी घेऊन कर्णाटकाकडे जाणार. दुसरा विचार जरी उत्तरेकडून काही यास उपद्रव असलियानें बुऱ्हाणपुराकडे जातील. कांहीं दिवस आज नवे फरदापूर प्रांतीं राहतील. याहीवर पाहावें कीं काये तजवीज करितील. राजश्री राऊ प्रधान तरी नरबदेजवळी पावले. येथून राजश्री पिलाजी जाधवाचे पुत्र व बाजी भीमराव व मल्हारजी होळकर व राणोजी सिंदे व आनंदराऊ पवार यांस माळव्यांत बुंदेलखंडाकडे रवाना पुढें केले. आपणहि कांहीं दिवस सोनगडी राहून नरबादापार जाणार. बुणग्यांत गेलियावरी जें वर्तमान नवीन असेल तें सेवेसीं लिहून येक जोडी ठेऊन घेतली आहे हे विनंती.

राजश्री रत्नाकर व आम्ही येक ग्रहस्थास तीनशें रुपयांस मध्यें जामीन आलों. ते रुपये अंगावर पडले आहेत. रत्नाकरपंत तरी थोर माणूस येथें नाहीत. आम्हावर तगादा जाला आहे, स्वामी समर्थ आहेत. काही कृपा केली पाहिजे. राजश्री राऊ सुमंतास मागतां येत नाहीं. याच आगोधरच वर्जिले होतें. आश्रय स्वामीचा आहे. समर्थ साहेब आहेत हे विनंती.

¶*Letter of Shankaraji Dattatraya informs that the Nizam is very likely projecting an expedition into Karnatak.*

No. 145] [9-12-1735?

श्रीवरद

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक शामजी गोविंद दिा राजश्री बाबूराऊ मलारी सां नमस्कार विनंती येथील कुशल ताा पौष शुा ६ भोमवारपर्यंत स्वामीचे कृपादृष्टीकरून

सेवकाचे वर्तमान येथास्थित असे. यानंतर इकडील वर्तमान तर नवाब गाजंनव्याकडून फिरोन जाफराबादेवर आले आहेत. रूख नांदेडचा आहे. कर्नाटकास पठाणाचा फितुर जाहला आहे यास्तव तिकडे जाणार. त्याहीवर नाम (यापुढील एक ओळ फाटली आहे) स्वार ब्राह्मणपुरास रवाना केले व अहिंमदगयासखां यास हजार दोन फौजेनसी शहरचे रखवालीस पाठविले. तेहि जाऊन दाखल जाले. सैदलस्करखां यास आज्ञा आहे कीं हजार दीढ हजार फौजेनसी संगमनेर, नासीक, बागलाण वगैरेचे बिगेदानीस व मखबुल आलम याचे मदतीस जुनरास जाणे. त्यावरून हेहि छ १९ साबानी येथून कूच करणार आहेत. सेवेसी विदित व्हावे बा लिा असे. श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीनी लस्करातून रथ रा बाबूजी ना याचा व सरकारचे दोन बैल दाई बाार पाठविले. आज्ञापत्र सादर जाले कीं रथाचे पटे वगैरे सामान तुटले आहे ते कुल धड करून पुणियास रवाना करणे. त्यावरून हाली रथास पटे नवे चढऊन व बैलास झुली व रथास घटाटोप पडदे खारवियाचे करून वगैरे सामान दाघदोजी करून रथ सेविसी रवाना केला आहे. रथाचे जुने पटे व बैलाच्या जुन्या झुली रथवानाने आपला जिमा केला आहे सरकारांत जाबसाल करील. दाई बाार दोन बैल आले होते तेहि वलीमूढ व येक गोणीसुध पाठविले आहेत. लस्करीहून रथाबाार खर्चास रुो १० दाहा दिधले होते; त्यापैकी आठ रुो खर्च जाले त्याची झडती रथवान देईल, दोन रुो राहिले ते शहरी खर्च आजवर लागला; त्यापैकी मिन्हा देऊन याददास्त कुल घासदाणा जानवरे वगैरे लागवडीची याददास्त रुो ८०।= ऐसी रुो सा आणे याची बजिनस आलाहिदा पाठविली आहे त्यावरून तपसीलवार विदित होईल. सदरहू ऐसी रुो सा आणे रा बाबूरावजीचे हिसेबी जमा करणार स्वामी समर्थ आहेत. रथाबाार खर्चास रुो २० वीस दिधले आहेत. तेथें पावलियावर सदरहूचा खर्च मनास आणिला पाहिजे. पूर्वी अजूरदार माणसाबाार उदयेपूरच्या हुंड्याचेविसी विनंती लिहिली आहे कीं कबजा आल्या नाहींत. त्यास कबजावाचून रुो तो साहुकार देत नाहीं. आणि स्वामीनी पहिले येक चिठी ७९०० ची केली, त्या प्रो रुो आपणापासून दिल्हे. हाली दुसरी चिठी रुो १२६०४ ची आली आहे त्यास विनंती (फाटलें * * *) त्यास आज्ञापत्र येईल त्याप्रमाणें वर्तणूक करीन. उतर सत्वर सादर (फाटलें * * * *) श्रीसमर्थ आहेत. सेवेसी विदित होय हे विज्ञप्ति.

¶*News-letter from the Court of the Nizam by Shamji Govind describing a wheeled carriage and bullocks ordered by the Peshwa.*

4587

No. 146] [25-12-1765 ?

पौ छ १४ रजब

श्रीगजानन

राा यादोपंत स्वामी गोा

विनंती. उपर, किले मोट पौष शुध १४ बुधवारी प्रहर दिवस राहतां निशाण चढले. श्रीपतराऊ दाखल जाले. त्याची चिठी आली. त्यास दीडसे माणूस भरवसीयासी देसची येसी मोटचे किल्यास श्रीपतरायाजवळ पावते करणे. तेथील समाचार वरचेवर घेत जाणे. विलारीचे पारपत्याचे उपायांत आहो. होईल तेव्हां खरे. गुजर मधें विघ्न करीत आहेत. बहुत काय लिहिणे ? शंकर किल्याचे बुरुजाचे काम धडका चालवणे. हवेलीचेहि करणे. छ १३ रजब ब्रहस्पतवार. हे विनंती.

¶*The news of the capture of the Fort of Mot is communicated to Yadopant.*

No. 147] [26-12-1735

श्री

+श्रीकृष्ण

चिरंजीव बाजीराव प्रधान तथा चिमाजी आपा यांप्रति नारायण दीक्षित यांचे अनेक आशिर्वाद. उपरि, येथील क्षेम पौष वद्य ९ नवमी जाणान आपलें कुशळ सविस्तर लिहित जाणे विशेष. येथील वर्तमान तरि मातुश्री राधाबाई कार्तिक शुद्ध द्वादशीस श्रीस आली. त्रयोदशीपासून तीर्थविध आरंभिला. तो सर्व करून पौष वद्य पंचमीस स्वार होउन गयेस गेली. येथें जो धर्म जाहाला तो पत्रीं लिहितां येत नाहिं. परस्पर लोक सांगतां कळों येईल. आम्हास पुशिलें परंतु नाहिं. पंचवीसांतीसांमध्यें तर उत्तम धर्म होता. लोकोत्तर कीर्त होती परंतु इश्वरास कर्तव्य तें जाहालें. माहाराष्ट्र ब्राह्मणास येक कपर्दिका कोणास पावली नाहिं व चीत्तपावनांस उत्तम प्रति पांचासातास दाहापर्यंत पावले. वरकडास येकदोन पाविले. दाहांपांचांस कपर्दिकाहि पावलि नाहिं. व येक कराडि बायको माहादाजीपंताची माय आलि होती तिणें आपल्ये ज्ञातीस सर्वास दाहदाह रुपये पाविले. वरकड सर्व ज्ञातींस तीन तीन रूपये पाविले हें तुम्हास

+ सबंध पत्र बालबोधींत लिहिलेलें आहे.

परस्पर कळेलच. यानंतर बाईचा धर्मामध्ये आपण मन घालुन धर्म करवावा तर आपणास काशी सोडून देशास जावें लागेल, यास्तव आपण बोलिलो नाहीं. आमचा विद्यार्थी शिवभट तुम्हाकडे पाठविला आहे, तर यास रीण दोनचार शत रूपये जाहाले आहेत. तर याचा परामृश करून रीण फीटेल ऐसे करून श्रीस फीरोन लौकर येइल ऐसें करणें? वरकड वर्तमान येथील सविस्तर शिऊबा मुखवचनें सांगतां कळों येईल हे आशिर्वाद.

¶*Narayan Dikshit complains to Bajirao Ballal and Chimaji Appa that Radhabai, the Peshwa's mother, when she distributed Dakshana to the Brahmins of Benares, made an unfair discrimination between their different sects.*

No. 148] [*Dec. 1735*

श्रीशंकर

राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान

गोसावी यांसी

ॐ सकलगुणालंकरण अखंडीतलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकीत सुलतानजीराऊ निंबाळकर दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन करीत गेले पाहिजे विशेष. बहुत दिवस जाले. गोसावीयांकडील पत्र येऊन कुशल वृत कलत नाही. याजकरितां चित सापेक्षीत आहे तरी स्वकीये लेखन करून पाठविले पाहिजे, तेणेकरून बहुत संतोषावाप्ति होईल. प्रस्तुत आपण कोणे स्थलीं आहेत. राजपुरीकडे आपल्या फौजा गेल्या आहेत त्या मनसबियाचें काय वर्तमान व उतर प्रांतें गोसावियाकडील फौज होळकर व राजश्री राणोजी सिंदे व राजश्री पिलाजी जाधव वगैरे गेले होते हे फिरोन आले कीं काय व वरकडहि त्याप्रांतीचे सविस्तर वृत्त लिहिले पाहिजे. आम्हाकडील वर्तमान तरी प्रस्तुत आंबाड प्रांतें आहो छावणीकरितां बिडास जाऊन गोसावीयांसी कलावे म्हणून लिहिले असे. निरंतर पत्रे पाठऊन स्नेहाभिवृधि होय ते गोष्टी केली पाहिजे. विशेष काय लिहिणे कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Sultanji Nimbalkar requests Bajirao Peshwa to write to him in reply about his activities and further desires to know the whereabouts of Holkar, Ranoji Sindia and Pilaji Jadhav who with their forces have proceeded towards the North.*

No. 149] [Dec. 1735

श्री

विनंती यैसिजे. आपली पत्रे व माहाडच्या पत्रांच्या नकला पाठविल्या त्या पावल्या. यैसियास हे साकल्य वर्तमान सातारियास राजश्री दादोबास ल्याहावे, ते राजश्री स्वामीस विदित करीतील. राजश्री स्वामीकडून हुजरे आले तरी त्यांस जाब द्यावा कीं फौजा जाऊन पोहचल्या. राजश्री पिलाजी जाधवराऊ यांस रवाना केले, आपणहि जातों हे ल्याहावें. आम्हाकडे हुजरे आले तरी आम्ही इकडे लेहू, जे फौजा जाऊन युध्य प्रसंग जाला. गनीम नामोरम जाला. आपणहि जलदीने जाऊन पोहचतो यैसे लेहून देऊ. याउपरी आपण बाहीर निघावें यैसें नाही. आम्ही आजी सोमवारी नांदेडीहून कूच करून गाऱ्हेयाचे व कोपरे याचे नदीपलीकडे जाऊन राहिलो. दो चहू रोजा आणखी काही वर्तमान यावयाचे ते येईल. मग आम्हास आज्ञा होईल त्याप्राा वर्तणूक करून. माहाडासहि पत्रें ल्याहावी. लोकाची दीलभरी होई आणि उमेद धरीत यैसे ल्याहावें. यानंतर राा लक्ष्मण रघुनाथ तेथे आहेत आम्हाकडून पत्रें येतील ती विदित करितील. तिकडूनहि जे आज्ञा आपली होईल ते आम्हास लिहितील. पुण्यात येऊन राहिलो अथवा नांदेडी राहिलो तरी इतकी आज्ञा असोन घरीच राहिलो म्हणतील, याजकरितां कोपरे गोऱ्हेयावरी राहिलों. विदित जाले पाहिजे हे विनंती.

¶*Letter addressed probably to Chimaji Appa asking him to inform the King that forces had arrived at Mahad and that the campaign was being seriously opened.*

No. 150] [1735

श्री

पुरवणी तीर्थरुप राजश्री राऊ व
तथा राजश्री अपा स्वामीचे सेवेसी

विनंती स्वामीनी लिहिले की सेनापतीकडील मजकूर कैसा जाहला ते लिहिणे म्हणून लिहिले. यैसियासी बाबूराव दाभाडे याजकडील मजकूर तर बदफैली व बदमामली, त्याच्या बोलिल्याची शाश्वतता नाही. मनास वाटेल तैसी वर्तणूक करावी, सिलेदारास सरजाम मनमाने तैसा वाटून फौज ठेविली, पुढे मुलकात जाऊन डोहाणा[१] करावा, गायेकवाडासी कजिया करावा, सेनापतीस म्हणतात की लक्षा

---

१ दंगा, धुंदी.

रुपयाचा तुमचा सरजाम तेवढ्यावर तुम्ही चितास येईल ते करा. वरकड सेनाखासखेलीच्या सरंजामासी तुम्हास समध नाही. यैसे मुदाईची वर्तणूक करीतात म्हणून राजश्री स्वामी बोलिले. त्यावर प्रतिनिधि बोलिले की त्याचे वर्तणूकेचा विचार कळला, याउपरी बंदोबस्त करणे तो साहेबी करावा. यैसे बोलिल्यावर राजश्री बोलिले की सेनापति बहुत भला माणूस आहे व साहेबकांमाचा आहे. जे घटकेस खावंदाचा हुकूम होईल ते घटकेस जेथे असेल तेथून येईल हा भरवसा आहे. आणि बाबूरायाचा कोणेहि गोष्टीचा विस्वास नाही. यैसे बोलिल्यावर राजश्री बोलिले की बाबूराऊ यासी हुजूर बोलवावे. ते येतात की नाहीत हे कळलियावर जे करणे ते करावे. त्यावर दुसरे दिवसी राजश्री येशवंतराऊ पोतेनीस यासी बाबूरायाचे वर्तमान पुसिले. त्याणी सांगितले की आपणास उमाबाईसी अगर सेनापतीसी समध नाही. माहाराजाची मोहीम मसलत करणे ते आम्ही करू व साहेबी सांगणे आम्हासच सांगावे, वरकडासी गरज नाही यैसे म्हणतात व माहाराजाच्या पायावितरिक्त दुसरा अवलंब धरीत नाहीत. सेनापतीचा व मातुश्रीचा कारभार त्याच्या चितास येत नाही, यैसे सांगितले. त्यावरून राजश्रींनी पुसिले की अता हुजूर यावयासी पत्रे पाठविली तरी येतील की न येत? त्यावरून येसवंतराऊ बोलिले की लक्षप्रकारे येतील. त्यावर राजश्री बोलिले की तुम्ही जाऊन त्यास घेऊन येणे. त्यावर येसवंतराऊ बोलिले की आम्हीच जावे यैसे काये आहे? माहाराजा हर कोणी पाठविलियानी येतील. त्यावरून येसवंतराऊ याचे पुतणे बाबाजी व त्रिंबक विष्णु हुजूरे यैसे त्यास अणावयासी पाठविले असेत. स्वामीस कळावे याकरिता लिहिले असे. सेवेसी श्रुत होये हे विनंती.

¶*The measures contemplated at the Court of Shahu to stop the mischievous activities of Baburao Dabhade are reported to Bajirao and Chimaji.*

No. 151] [*1736*

श्री

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री
रामाजी प्रभु गोसांवी यासी

श्रा। व्यंकटराऊ नारायेण आसीर्वाद. येथील कुशल जाणून स्वकीये लिहिणे विशेष. राजश्री रायानी पत्र पाठविलें तेथे लिहिलें कीं देशचीं पत्रें घरची आमची आली ती मार्गाचे दुस्तरतेकरिता न पाठविली. त्याचा अभिप्राय लिहिला तो कळला. अशास पत्रे आली असतील तीं जतन ठेवणें आणि तिकडे पुन्हा पत्रें

राजश्री राऊ रवाना करितील त्याबा। स्मरणपूर्वक आमचे नावें चिरंजिवास पत्र लिहिणे की आम्ही मारवाडांत रा। मल्हारबा व राजश्री राणबा बा। सुखरूप आहो हे लिहिणें. तेथील पुन्हा पत्रें आलीं तरी त्याचा अभिप्राय लिहिला पाहिजे. तुम्हीं पत्र लिहाल ते राजश्री अमृतराऊ याच्या पत्रात घालून चिरंजिवास प्रविष्ट होये ते करणे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Vyankatrao Narayan requests Ramaji Prabhu to write to his son that he (the writer) is safe in Marwad with Sindia and Holkar.*

No. 152] *[1735*

श्रीशंकर

पुर्वणी श्रीमंत राजेश्री आपा स्वामी विनंती उपरी. आवजी कवडे माहोर प्रांतास गेले. त्यांकडे आज्ञापत्र ठाकोठाक पाठवावे कीं तुम्ही पत्रदर्शनी बराणपुरापलीकडे धुळकोठावर जाऊन बडवाईस मातोश्रीकडे जासूदजोडी पाठवावी कीं आपण बराणपुरानजीक आलों. स्वामींनी आवजी कवडे यांस पत्रें पाठवावीं, सत्वर बराणपुरनजीक जावें. बंदोबस्ती पूर्वींच करायाची होती ते तों न जाली याउपरी तरीं सत्वर रवानगी करावी. जासूदजोड्या पांच सात चाकर ठेवल्या. वरचेवर वर्तमान पावीत करूं. बहुत काय लिहिणे कृपा असों द्यावीं हे विनंती.

श्रीमंत राजेश्री नाना स्वामींचे शेवेसी. सा। नमस्कार. कृपा असों द्यावी हे विनंती.

¶*Babuji Naik requests Chimaji Appa to write to Awji Kawade to proceed to Dhulkot near Burhanpur to keep everything properly arranged for the mother of the Peshwa who was on a pilgrimage for Benares.*

No. 153] *[3-1-1736*

श्री

यादी तिळगूळ रवाना लस्कर तीर्थरूप राजश्री राऊ यांकडे सु॥ सीत सलासैन मया अलफ छ ३० साबान

किता

१ खासा	१ जानोजी ढमढरे
१ सौ कासीबाई	१ दादजी सितोळे

१ तुबाजी अनंत
१ बाबूराव मल्हार
१ आयाबा
१ बापूजी भीमसेन
१ धोंडो गोविंद
१ शुभराऊ
१ बलवंतराव
१ रामचंद्रभट पुराणिक
१ विसाजी राम फडनीस
१ रामाजी मल्हार चिटनीस
१ त्रिबकभट कर्वे
१ शामजी ना।
१ धोंडोपत पोतनीस
१ राघो कृष्ण
१ बापूजी मेघशाम
१ त्रिबक शकर
१ मोरो बलाल
१ तिमाजीपंत
१ बाजीराऊ दामोदर
१ वेंकटराव नारायेण

२२

१ आबाजी ना। जोसी
१ त्रिबकराऊ व गोविंदराऊ

दिा अनंदराव पवार
१ खासा
१ जगदेवराव पवार
१ सिवाजी शंकर
१ देवजी बंडगर

दिा तुकोजी पवार
१ दिा खासा
१ जिवाजी पवार

१ सिदोजी राऊत
१ सुभानजी सेलार
१ हिरोजी पाटणकर व धारराव
१ धारराव निबालकर
१ येशवंतराव वागमोडे
१ विठोजी सिंगाडे
१ खंडोजी धुमाल
१ निबाजी सूर्यवसी
१ राणोजी भोइटे
१ जागोजी व जावजी भोइटे
१ भिकाजी कोकरे
१ परशराम सितोले
१ संताजी चितलकर
१ राणोजी निबालकर
१ बोधलोजी यादव
१ सयाजी रणदिवे
१ दर्याजी काले
१ दुर्जनसिंग
१ संभाजी भोसले
१ येशवंतराव भोसले
१ जानराऊ समसेर
१ धनाजीचंद
१ खंडेराव बरगे

२५

१ नाईकजी पाटकर
१ फिरंगोजी सिंदे
१ मल्हारजी ढमढेरे

निा बांडे
१ कठाजी कदम
१ गोजाजी कदम

दिा राणोजी सिंदे
१ खासा

१ मानाजी पवार
१ खंडोपंत

दिा मल्हारजी होलकर
१ खासा
१ भोजराव बारगल
१ खंडेराव होलकर
१ संताजी वाग
१ विठोजी बुले
१ गंगाजी भागवत
१ गंगाधर येसवंत
१ दादो
१ मोरो ......
१ रामाजी यादव
१ बापूजी त्रिंबक
१ निलो केशव
१ खंडोजी समसेर

१३

१ रामचंद्रजी
१ जायाजी सिंदे
१ साबाजी सिंदे
१ राणोजी जाबूलकर
१ रतोजी सिंदे
१ लाहूजी मोरे
१ संताजी भगत
१ कानोजी डोबले
१ जोत्याजी भोसले
१ तुकोजी भोइटे
१ सखोजी जाचक

१२
१ खंडो गोमाजी
१ अंताजी रुद्र

¶*This list of prominent Sardars commanding under Bajirao will be helpful in determining their movements and dates. The list is prepared for distributing the customary sweets on the occasion of the Sankrant.*

No. 154] [*6-1-1736*

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

पोष्य कृष्णराव माहादेव सा। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ ३ रमजानपावेतो स्वामीचे कृपेन येथास्थित असे विशेष. स्वामीचे पत्र जासूदाबराबर आलें तेथें आज्ञा कीं जमावसुदां पत्रदर्शनीं पुण्यास येणें. त्यास जमाव तो सारे राऊत नरसिंगराव घोरपडे याजबराबर श्रीमंत राजश्री रायासमागमें देऊन

आपण चौ रावतानसी सडे आलों. कांहीं काय होत म्हणून आज जुनरास गेलो. आंबेगाव तर्फेत आमचे लोकांसी व जुनरकरांसी कटकट जाली आहे त्याचेहि सल्य करून येका दो दिवसां चासेस येऊ. फाल्गुण मासी योजलें तर चिरंजिवाचा वृतबंद करून पुन्हा श्रीमंत राजश्री रायांकडे जावें. ज्या कार्याकरितां निरोप घेऊन आलों ते कार्य करून व्रतबंधहि संपादून जावे ऐसा हेत आहे. यांत घडोन येईल ते खरें. आपणास राजश्रीचें पत्र आहे. आपण भेटीस येऊन तेव्हां घेऊन येऊन. भेटीनंतर सविस्तर वर्तमान निवेदन करून विदित होये. बहुत काय लिहिणे कृपा लोभ असो दिजे हे विनंती.

¶*Krishnarao Mahadeo to Chimaji Appa : writes to the latter that he would repair to the latter's presence immediately after celebrating his son's thread-ceremony.*

No. 155] [*18-1-1736*

श्री

श्रीमंत तीर्थस्वरुप राजश्री
पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

आपत्ये भिकाजी सिंदे सा। दंडवत विनंति येथील वर्तमान ता। छ १९ रमजान मुकाम लस्कर किले ग्वालेर स्वामीचे कृपादस्टीकरून येथास्थित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र छ ८ साबानीचे आले. पावोन बहुत समाधान जाले. आमचे वर्तमान तरी आज्ञेप्रमाणे सेवा करून सुखे आहो. वरकड इकडील वृत राजश्री बाजी भिवराऊ याणी सेवेसी लिंहिले आहे त्यावरून विदित होईल * सेवेसी शृत होये * हे विनंति.

¶*Bhikaji Sindia, who from the form of the address appears to be an illegitimate son of the Peshwa family, writes from Gwalior about his own welfare. He is working under Baji Bhivrao.*

No. 156] [*22-1-1736*

नकल

श्री

सेवेसी विनंती विज्ञापना ता। छ १९ रमजान गुरुवार राक्षीतागडीचा घांट उतरून कृष्णातिरीं डेरे केले. बेलगावचा किला बंकापूरच्या पठाणानी पर्जन्य-कालांत घेतला आहे त्यासी सोडावयाकरितां हे चालिले आहेत. जर ये(क) दोन

दिवसात पत्रे बंकापूरकरांची आलीं तर पुढें न जातील. नाही तर बंकापूरपर्यंत जातील. बंकापूरकर पठाणाबा दाहा बारा हजार फौज जमा केली आहे. त्रि * * * तील किंवा युध्यास उभे राहातील. गुतीचा किला दिधला. अबदलाखानाच्या पुत्रास नवाबाची किलेदारी सांगितली. इकडील * * * * * करून मग विज्यापुराकडे * * * * * * * जाणे तिकडे जातील. सारा * * * * * * * * धानाच्या राजकारणावर जे * * * * * * * सारांश याचा इतबार नाही सा * * * * * * छ २० रमजानी नवाब राक्षीतागडीचे * * * * कृष्णानदी उतरून सावनूर बाकापुराकडे कूच केले. नित्य चौदा कोस करून चालत आहे. कर्नाटकचे पठाणास लिहिले आहे कीं, बंकापूर प्रांतास यावें. धारूर व नांदेड इकडीलहि फौजा बोलाविल्या आहेत. बेलगांव घेतील. बिदनूरचा पैका घेतील. त्यावर काये विचार करितील तो लेहून पाठऊं. राजश्री पंतप्रधान दिलीस पावले. भेटी सार्वभौमा जाली. दमाजी गायेकवाड यानी नवाबास लिहिले आहे की, जैसिंगाची भेटी जयेनगरी जाली. दोवे मिलोन दिलीस गेले. दमाजीने चालीस मोहरा व सात थाने उंच जरी बादली नवाबास पाठविली. लौकरीच पंतप्रधानास निरोप देणार. उज्जेनचा सुभा * * गिरा तेथे देणार. खर्चास बा * * * * आहेत. फार बहुमान केला * * * * * * रा आला होता. शाहाजादा * * * * * * कडे पाठवणार. नवाब * * * * * बेत भापकराचे व धारुरा-कडील * * * * * ची दोन जुझे जाली. दोनी कार्य * * * पहिले. भापकर उदगिरीकडे गेला. जासूद बातमीचे जोडे वरचेवरी पा(ठवीत) जावे. वर्तमान कलेल. नीलप्रभुहि मोगलईत येतो. वकील पत्रे आलीं. कौल देणार आहेत. हिंदुराव घोरपडे यांचा पैगाम आहे. लस्करात महर्घ फार आहे. चणे बारा सेर, कणीक दाहा सेर, तांदूल नव सेर, तूप अडीच सेर. बाहीर मार्गे राहात चालिली. पोंहचत नाही. सडी फौज मात्र जात आहे. जासूद पाठवीत जाणे. हे विज्ञापना.

¶*News-letter to the Peshwa from the camp of the Nizam, detailing his movements.*

No. 157] [*24-1-1736* ?
छ ९ जिलकाद

श्री

तीर्थस्वरूप राजश्री राऊ स्वामीचे सेवेसी

आपत्ये मल्हार तुकदेव कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. स्वामींच्या आसीर्वादेकरून ता। छ २१ रमजान मु॥ पालीपरियेंत कुषल असो विशेष.

स्वामीनी आसीर्वाद पत्र पाठविले, प्रविष्ट होऊन बहुत समाधान जाले. यानंतर राजश्री स्वामीनी चिरंजीव राजश्री माहदोबा यांस फौज आणावयास तीर्थरूप राजश्री आपाकडे व राजश्री सरलस्कर यांजकडे रवाना केले आहे; विदित जाले पाहिजे. दरबारीचें वर्तमान सविस्तर तीर्थरूप राजश्री आपा स्वामी लिहितील त्यावरून विदित होईल. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Malhar Tukdeo writes to the Peshwa that Mahadoba Purandare is sent by the King to Chimaji Appa and Sarlashkar to bring them with the forces.*

No. 158] [*About Jan. 1736*

[मागील बंद गहाळ.] वगैरे देऊन कर्नुलास सादतखां वगैरे पठाणाकडे सुला करावयास पाठविले आहेत. आपण त्याजकडील जाबसाल येईतोवर कलबुरगिया-नजीक मुकाम करून आहेत. येक वर्तमान नवाबास शरीरी सावकाश नाही म्हणून आहे. सत्यमिथ्या न कले. वरकड गयासखा व हाजी महमदअलीखा कोतवाल दोघेजणास देवाज्ञा जाली हे वर्तमान पूर्वी सेवेसी विनंतीपत्रीं लिहिलेच आहे. भुचरमल साहुकार वारले. शहरचे दोघेजण मोहरे मातबर गेले. सैद जमालखा येथेच आहेत. नवाबाचो कृपा जाहिरीत तर आहे. याजसाठी जागिरा नवाबानी मुकरर करून डौल दसखत केले आहे म्हणून वर्तमान आहे. सैदलस्करखां तीनच्यार हजार फौजेनसी येथून कूच करून मखबुल अलमाचे कुमकेस जावया गंगेवर नजीक टोंके गेले आहेत. दोनच्यार रोज गंगानजीक मुकाम आहे. उप्रांत पारनेरावरून जुनरास जातील. अलम शोहरत हेच आहे कीं, जुनरानजीक गढी आपले तर्फेची होत आहे ते तोडावी, मग माहोली-कडील उपराला करावा यैसी आहे. दुसरे, नवाबाही मखबुल आलम व सैदलस्करखा बमयेफौज जुनर प्रांतास मुकरर केले आहेत याचा अर्थ सेवसी विदितच असेल. श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामी कुकसी मवासी जागा मोडून पुढें मजल दरमजल डोंगरपूर वगैरे मार्गे राणाजीचे मुलकाचे रोखे जात आहेत. मुख्य स्थलास बाबाजी गणेश यास रवाना केले. सादतखा याकडे इंद्रप्रस्थास जासूदपत्रे पाठविली आहेत. माहादेवभट सवाईकडे रवाना केले. या प्रकारचे वर्तमान राजश्री बाबूरावजीनी लिहिले आहे. कुकसीपलीकडील मुकामची पत्रे पौष शुध ९ ची आली त्यावरून सेवेसी विनंतीपत्रीं लिहिलें आहे. स्वामीकडेहि पत्रे आलीच असतील. सैदलस्करखां याणी शहरचे रखवालीस खोजे निजमुदीखां हजार दोन फौजेनसी ठेविले आहेत. मुतवसलखां दिलीस नबाबाचे जावई गेले होते त्यास नवाबानी समाधानाचें पत्र लिहोन बोलाविले.

त्यावरून दिलीहून पातशाहाची आज्ञा घेऊन आले. काली शहरांत दाखल जाहाले. समागमे फौजहि पाचसातसे स्वार आहेत. नवाबास लिहिली जातील याची उतरे येतील त्याप्रो ठेवितील तेथे राहातील. हाजीजी कोतवाल वारले, यामुले नवाबास शहरची फिकर फार पडली आहे. अद्याप दुसरा कोतवाल मुकरर केला नाही. सिदी हिलाल चौकातील चाहुडीवर आहे त्यासच नवाबाचे पत्र आले आहे की, जोवर कोतवाल मुकरर होये तोवर खबरदार राहाणे म्हणून आज्ञा आली आहे. उदयेपुरबाबत हुंड्याचे कबजाबदल कासद अजुरदार लस्करास श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीकडे पाठविला आहे तोहि यावयाचा राहला आहे. आलीकडे [फाटले] सेवेसी विनंतीपत्री [पुढील बंद गहाळ]

¶*This news-letter from Aurangabad, the first and the concluding portions of which are unfortunately missing, refers to the movements of the Peshwa, the Nizam and Said Lashkarkhan. The Nizam, wavering as to what attitude he should hold with regard to Bajirao's aggressive move, seems to have written to Sadatkhan, asking his advice.*

No. 159] [*14-2-1736 ?*

श्री

श्रीमंत राजश्री राऊ स्वमांचे सेवेसी

विनंती सेवक सिवाजी त्र्यंबक सा। नमस्कार विनंती. येथील कुशल ता। फाल्गुण शुध चतुर्दशी मु। अटेर येथास्थित असें विशेष. आज्ञा घेऊन स्वार जाहलो ते छ १० शवाली आटेरीस पोहचलो. राजश्री मतीराज यांची भेटी जाहली. रुपयाविशई बहुतसी ताकीद केली. त्यासी दोन दिवस राज्यास समाधान नवते. गरमी जाहली होती त्याजकरिता आटकाव जाहला. बोली होऊन द्वितीयेस आम्हास रवाना करितील. रुपयाची तजवीज होत आहे. प्रस्तुत येथे तमाम गावची रयेत येऊन बोभाट केला की फौज मौहुवर आली आनी भदावरचे गाव लुटत जात आहेत. त्याजवरून बहुतसे श्रमी जाहाले. आम्हास बोलाऊन वर्तमान पुसिले. आम्ही बहुता प्रकारे सांगितले तर आपण बहुतासी ताकीद केली पाहिजे की भदावरच्या गावास उपद्रव येकंदर न देणे. द्वितीयेस आम्हास रवानगीचा निश्चय केला आहे. वरकड वर्तमान भेटीनंतर सेवेसी निवेदन केले जाईल. कृपा असों दीजे ही विनंती. मागाकोली सामर्थ्य जबानी सांगता कलो येईल.

¶*Siwaji Trimbak (Odhekar ?) requests the Peshwa to issue orders to his forces to cease plundering the ryots of Bhadavar as the prince is prepared to pay the stipulated tribute.*

No. 160] [Feb. 1736

राजश्री चिमणाजी पंत गोसावी यासीं

·॥ऽ

सकलगुणालंकरण अखडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो चंद्रसेन जाधवराऊ दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणऊन स्वकीये कुशललेखन केले पाहिजे विशेष. राऊलीं पत्रें पाठविलीं तें प्रविष्ट होऊन लेखनार्थ सविस्तरे अवगत जाले. राजश्री रायाचे वर्तमान लोणवाडा डोंगरपूर येथील खंडणी करून मवास * सरदेस गेले. राजश्री राणाजीनी केशरीसिंगास पाठविले होते. राजश्री राणाजीचा भेटीचा हेत उतकट होता, यानिमित्य कुली फौजे शाहापुरियास वाटे लाऊन साता आठी हजारास्वारानसी राजश्री राऊ रा राणाजीचे भेटीस गेले. याची भेटी जालियावरी राजश्री सवाई जयेसिंगजीहि भेटी होईल म्हणून लिहिले त्यावरून परम संतोष जाला. आणखीहि राजश्रीकडील वर्तमान येईल ते वरचेवरी लिहीत गेले पाहिजे. इकडील वर्तमान तरी सावणूरकर व कडपेकर येऊन भेटले. सोंधे बिदणूरकरांचाहि तह जाला. येथून कूच करून बसवा-पटणास जाताती. तेथें श्रीरंगपटणाकरांचा व आरकाटकरा * बोली मोकरर करून त्वरेनेच छावणी करावयास त्याच प्रांते जाणार. सदईव आपले वृत विस्तारे पत्री लेख करून पत्रें पाठऊन श्नेहाभिवृधि करीत गेले पाहिजे. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶Chandrasen Jadhav notes the news communicated to him by Chimaji Appa about the interviews between Bajirao and the Rajput princes and writes to him (Chimaji Appa) news of the Nizam's movements in the South about Sondha, Bidnur, Savanur and Kadappa.

No. 161] [Feb. 1736 ?

श्री

राजश्री चिमाजीराऊ आपा गोसावी यांसी

श्रीमंत अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो जानोजी निंबालकर कृतानेक दंडवत विनंती उपर. येथील क्षेम जाणोन गोसावियानी आपलें निजानंद लिहीत आज्ञा केली पाहिजे. यानंतर राजेश्री राऊ प्रधान याणी कृपा करून सिमगा खेलावयासी पुणियासी यावें म्हणोन पत्रें पाठविली. यैसियास राजश्री आम्हावरी मेहेरबानी करिताती हे तमाम दुनिया जाणत आहे. आम्ही कायावाचा-

मनेकडून येकनिष्ठता धरून आहोंत हे मनोमन साक्ष आहे. परंतु सांप्रत नवाबाची मर्जी नाजूक हरयेक विचारें निमित्य पाहताती. पूर्वी फौज पाठविली त्याजकरितां रोज विपरीत चर्चा करावयासी अंतर करीत नाहीत. तीर्थस्वरूप राजश्री बाबासाहिबांस बालेघाटी राहावयाची आज्ञा केली. आज्ञेप्रमाणे तेथे होते. ते प्रांतीच्या रयेतीने कडबियाचा बोभाट नेला: त्याजवरून तीर्थस्वरूपजीस बोलाविले आहे. हेही जाताती तेथें काय विपरीत मानितील हे न कले. याजकरितां तपसिलें वृत राजश्री राऊ * * * यासी व गोसावी यासी लिहिलें आहे. आम्हास तेथें यावयासी उजूर नव्हता परंतु याप्रकारचा परियाये आहे. बहुत काय लिहिणे कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Janoji Nimbalker to Chimaji Appa—in reply to an invitation from the Peshwa to come and to take part in the Shimga festivities, regrets his inability to attend owing to the fact that his absence might be misinterpreted by the Nizam who had already begun to suspect his attitude.*

No. 162] [*1-3-1736?*

श्री

पुरवणी श्रीमत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती उपरी. रा संताजी आटोले फौजसमेत येऊन या प्रांती राहिले. त्याणी लोणारच्या तलियास सोमवती आमवाशेची यात्रा मिळाली होती, त्यातील जालनापूरकर शाहूकार चौदा आसामी धरून नेऊन म्हणतात की, पटीची बाकी राहिली ते देणे. यैसियास पटीच्या कजिया पूर्वी पडिला तेसमई आपण जमिदारास व आमिलास सांगून विल्हे लाऊन दिल्हे. यैसे असता हाली पटीची बाकी राहिली म्हणोन साहुकारास तगादा करितात. लुटी करितात. त्यामुले येथे नवाबास वर्तमान कलले. ते फौज रवाना करीत होते परंतु आपण सांगून राहविली आणि आपली पत्रे पाठविली. यैसे आसता साहूकार सोडितील तरी उतम. नाहीतरी कजिया आहे. तरी स्वामीनी कृपा करून संताजी आटोले यांसी ताकीदपत्र पाठऊन साहुकार सुटता तें केले पाहिजे. त्याची वाजबी बाकी राहिली असे तरी जमिदारापासी मागावी. साहुकारासी संमध काये आहे? विदित होये हे[१] विनती.

¶*Baji Bhivrao asks the Peshwa to recall Santaji Atole from the territory of Lonar.*

---

१ पत्र बाजी भिवरावाचें ?

No. 163] [2-3-1736 ?

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक धोंडो त्र्यंबक सा। नमस्कार विज्ञापना. विनवया प्रार्थना यैसीजे. येथील क्षेम ता। छ २९ माहे सवालपावेतो सेवकाचे व का। कडुसीचे वर्तमान माहाराजाच्या कृपादृष्टीकरून येथास्थित असे विशेष श्रीमंत राजेश्री सेनापतीचे बुनगें लस्करातून तलेगावास रोज जाते. ग्रैसियास हती सेतात घालितात; उंटे घालितात; बागाईतात सिरोन धामधुम करितात. याउपर सेनापतीची स्वारी येणे आहे येविशी आज्ञा करणार स्वामी खावंद आहेत. रा। माहदाजी गोविंदास मौजे तुरकडी दिल्ही. त्याणी आधी गुराचे स्थल राखिले गुराखी मारिले. उतरेस रा। कृष्णराऊ माहादेव याणी राखिलें मौजे सायगावीचे राजश्री त्र्यंबकराऊ मामा याणी राखिले. कडुसीच्या लोकानी गुरे कोणिकडे चारावी लाकूडफाटे कोणत्या रानातून आणावी. वस्तीच्या कारभारास भोवरगावीच्या सिवारावाचून गति नाहीं. सेवेसी विदित जाले पाहिजे. आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी शृत होये हे विज्ञापना.

¶*Dhondo Trimbak, complains to the Peshwa against Dabhade's men molesting the ryots.*

No. 164] [28-3-1736
छ ६ मोहरम

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री
राऊ स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. राजश्री आवजी निलकंठ चिटणीस यांस पूर्वीपासून शरीरी सावकाश नव्हतें. त्यांस प्रस्तुत चैत्र वद्य त्रयोदसीं रविवारीं देवआज्ञा जाली, स्वामीस विदित व्हावें याकरितां लिहिलें आहे हे विनंती.

¶*Bajirao Peshwa is informed of the death of Avji Nilkanth Chitnis, father of Mahipatrao.*

No. 165] [6-5-1736

श्रीशंकर.

श्रीमंत राजश्री आप

स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक मलार दादाजी साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ ९ मोहरमपावेतों स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकाचें व ये प्रांतींचें वर्तमान यथास्थित असे. यानंतर तुळाजी व भवानजी जासूद याबरोबर स्वामीचें आज्ञापत्र सादर जालें तें मस्तकीं वंदून संतोष जाला. राउताचें प्रयोजन आहे तर आपले जमावाचे राऊत जे असतील ते पाठऊन देणे. श्रीकृपेने कार्यसिधी लौकरच होऊन, राउतास माघारे पाठऊन म्हणून पत्री आज्ञा केली. त्यास राऊत सेवेसी पाठवावे; परंतु आजिवर कोठें कामकाज चालत न होतें. सांप्रत तहसील तलबेचा प्रसंग मोंगल आपले जबरदस्तीनें यैवज नेतो. आमचें काम स्वाराविरहित चालत नाहीं. माहालोमाहालीं कांहीं पाठविले आहेत. थोडेबहुत आम्हांजवळ आहेत ते रवाना करावे, तर राजश्री कुवरबहादर याचा काल छ २ मोहरमी सोमवारी जाला. आम्हांस हरयेकविसीं तो जागा थाग्यास होता. जुनरकर मोंगल जतीकरितां फौज पाठविले ते ग्रहस्त स्वामीस विदित आहे. आपलें शरीर अशक्त; कोण समय कैसा येईल न कले. यास्तव राऊत पाठवावया आनकूल जालें नाहीं. दाहावीस पाठवावे तर काये कार्याचे? विदित जालें पाहिजे. कुवरबहादर यास च्यार दिवस वेथा जाली. आकस्मात कमरेखालीं जीव गेला. दिसेदीस व्यापोन देवाज्ञा पावले. श्रीनें मोठा नाश केला. भारी माणूस होतें. मृत्यास उपाय नाहीं. राजश्री फतेसिंग व गोपालपंत यास स्वामी विरहित आश्रय दुसरा नाहीं. कृपाळु होऊन उभयतांस समाधानाचें पत्र पाठवावया आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. थोरले नवाब याणी पठाण आपले मायेत घेऊन येकचित करून माघारे फिरले. छावणीस नांदेड खंदारानजिक येणार. सैद लस्करखां पाथरी परबनीकडे होते; त्यास आजणठ्याचे सराईस जावयाची आज्ञा नवाबाची आली. त्यावरून ते फौजेनसी आजणठ्यास जाऊन राहणार म्हणून खबर आहे. निवेदन जालें पाहिजे. निंबालकर वगैरे मराठी फौज सैदलस्करखान यासमागमें राहवयाची आज्ञा जाली आहे. विदित होये; आंवदा इकडे चारापाणी नाहीं. धान्य साडेपाच पायली धारण जाली आहे. लोक बहुत हैराण आसत. राऊत पाठविले नाहीं म्हणून इतराजी केली न पाहिजे. शेवेसी शृत होये हे विनंती.

¶*Malhar Dadaji Barve reports to Chimaji Appa the death of Kuvar Bahadur, a friendly chief who was of great help and well disposed.*

4602

No. 166 *[18-5-1736*

श्री

श्रीमंत राजश्री आपा
साहेबाचे सेवेसी

विनंती सेवक आज्ञाधारक शंकराजी निकम साष्टांग दंडवत विज्ञापना येसीजे येथील कुशल तागाईत छ १७ मोहरम मुा। नाऊ प्रा। वैजापूर क्षेम असे. यानंतर स्वामिनी आज्ञापत्र पाठविले तेथे लिा। कीं प्रा। येरूलचे पाटीलकीचे वतन राजश्री स्वामीचे आहे तेथें सदाशिव खंडेराव गुमस्ता पाठविला आहे. हा बैसवणें म्हणोन स्वामिनी स्वमुखें सांगितलें होतें व आज्ञापत्रे ही आली होती हे गोष्ट खरीच. परंतु आपले सामर्थ्य थोडे आणि वोझें ठेविले मोठे. त्याची गत कैसी करावी? आपणाजवल कुल लहान मोठे से पाऊणसे स्वार आणि येरूळांत पाचसे स्वार व हजार बरकंदाज हमेषा जिल्हेदाराचे तैनातीचे सामान राहते. यासिवाय येरूळास व शहरास सा कोसाची तफावत. जे घडीस आपण तेथे दंगा करूं ते घडीस आपल्या अमलास खलेल होऊन आपणामागें फौजा लागतील आणि येकहि काम सुधे होणार नाहीं. राजश्री स्वामीनी नवाबास पत्रें लिहिलीं होतीं. तेथें वकिलाचे व त्याचे जाबसाल जाहाले कीं आजि तुम्हास येरूलची पाटीलकी दिल्ही म्हणजे पुढें दौलताबादहि आमचीच आहे तेहि द्याल म्हणाल ते आपणाच्याने कैसी देवत्ये ! ऐशा बोल्या जाहल्या. येरुलचा अर्मान म्हणतो कीं आपणास नवाबाचा हुकूम आणून देणे आणि पाटीलकी करणे. नाहींतरी तुम्ही खटखट कराल तरी सुखरूप करणे आपणहि तयार आहों. ऐशा गोष्टी सांगितल्या. त्यावरून आपण आपला गुमस्ता उठऊन आणीत हातो. त्याची आपली बोली फारशी जाली की तुम्ही या कुणबियाची पाठ राखोन याचे घर न बुडवणे. समर्थासी वैर लाऊन याचा निभाव होणार नाहीं हे पष्ट समजणें. एका कसबियामुले सारा परगणा व कसबा तुम्ही बुडवाल ऐशा कितीक गोष्टी जाहल्या. त्यावरून फौजदारानें करार केला होता की श्रीमंत राजश्री पंतप्रधान मुलुकगिरीहून येतील तेसमई आपण गोकुलजीस नेऊन त्याचे हवाले करूं. मग त्याचे चित्तास येईल तो करोत. त्यास गोकुलजीस वैशाखमासी देवाज्ञा जाली. आतां त्याचा लेक आहे तो मोगलाचे हाती आहे. तेथें आपला जोर पोहोचोन येवढ्या सामान हातीं येतो असें नाहीं आणि केवल हद (यापुढील बंद अनुपलब्ध.)

¶*Shankaraji Nikam intimates the refusal of the Nizam's officer to recognise the claim of King Shahu to the Patilki vatan of Ellore on the ground that such a recognition is likely to serve as an excuse towards claiming the Daulatabad district itself.*

No. 167] [30-5-1736?

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री आपा साहेबांचे शेवेसी

आज्ञांकित सिवाजी राम कृतानेक सां नमस्कार विज्ञापणा. येथील शेवकाच वर्तमान ता छ २९ मोहरमपावेतो स्वामीचे कृपादृष्टीकडून यथास्छित असे. यानंतर स्वामी सेवकावर कृपाळू होऊन जासुदाबरोबर आज्ञापत्र सादर जाले तें सिरसा वंदन केले. तेथें अज्ञा कीं श्रीबाणलिंगे पेसजी मातुश्री बाईसाहेब श्रीवाराणसी यात्रेस गेली ते समई राघो विठ्ठल याजपासी बढवियांत हावाले केली होती ते बढवाहून येतील ते हजराहजीर पुणियांस रवाना करणे म्हणून आज्ञापत्र सादर जाले. त्यास, आज्ञेप्रा बढवाहून रा बाजी अनंत यानी श्रीबाणलिंगे पाठविलीं ते येथून हजाराहजीर पुणियांस रवाना केलीं आहेत रा राऊ स्वामी शरोंजेस [तीन अक्षरें फाटलेलीं] चे वर्तमान आले आहे. पुढे हस्तनापूरच जाबसाल आल्यावर देशास यतील. मालव्यांत छावणीस ठेवणे यांस ठेवतील यैसे वर्तमान आहे. नासरजंग वराडात आस्टी अमनेरावर आहेत. विदित होये हे विज्ञाप्ति.

¶*Siwaji Ram informs Chimaji Appa that the Peshwa, who is at this time at Sironj, will start homewards as soon as he completes the negotiations with the Emperor at Delhi. The writer also gives the news that Nasarjung is at Asti-Amner in Berar.*

No. 168] [May 1736

श्री

पुा राजश्री चिमाजीपंत
आपा गोसावी यासी

विनंती उपर राजश्री रायाकडील वर्तमान लिा ते कळों आले. यैसियांस उतरेकडील मनसबियानुरूप तिकडे छावणीचा विचार जाला तरी चिरंजीव आपांविषई राजश्री रायांस लिहिलें पाहिजे. मातुश्री बाई येरुलास आली. आठाचो रोजी पुणियांस येतील म्हणोन लिा. यैसियास आपले लिा प्रो श्रीची यात्रा सिधी करून पुणियास आलीच असतील. पुणियास आलियानंतर संतोषवृत लेहून पाठविले पाहिजे. विशेष काये लिहिणे. कृपा केली पाहिजे, हे विनंती.

¶*An inquiry regarding Peshwa's mother who is returning from her pilgrimage.*

No. 169] [21-6-1736 ?

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक जिवाजी गणेश[1] साष्टांग नमस्कार विनंती. येथलि वर्तमान ता। छ २२ सफरपर्यंत स्वामीचे कृपेकरून यथास्थित असे विशेष. पा। आकोलें रा। विठोजी थोरात दिनकरराव यांजकडे सरंजाम आहे. त्यास तेथे कमाविसदार आमलास पाठविला आहे. त्यासी कोण्ही काजिया करील तरी त्यास ताकीद करावी, याविसीं स्वामीनी राजश्री हरी दामोदर थांस आज्ञा केली होती. त्यास मारनिले लस्करांत स्वारी समागमे आहेत. प्रस्तुत मातुश्री उमाबाई दाभाडे बाहेर निघाली. त्याणी सुरतसिंग जमातदार जमावसुधा पा। मजकुरीं पाठविले आहेत. ते परगणियांत धामधूम करितात. कमाविसदारासीं कटकट करणार म्हणून वर्तमान आले त्यावरून स्वामीस विनंती लिहिली आहे; तरी त्यास तंबी करावयास शंभर राऊत पाठवावयास आज्ञा केली पाहिजे व मातुश्री उमाबाई यांसहि पत्र पाठऊन त्याजकडील राऊत ऊठोन जात तो अर्थ करणार स्वामी समर्थ आहेत. स्वामिकडील कमाविसदारावर त्यांचा शह न पोहचे ते करणार स्वाम खावंद आहेत. विदित जाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*Jiwaji Ganesh complains to the Peshwa that Umabai and her servants are troubling the Kamavisdar of Paragana Akole which is given in grant to Vithoji Thorat for maintenance of troops.*

No. 170] [8-9-1736 ?
छ २४ जावल

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ व तथा
राजश्री अपा स्वामींचे सेवेसी

अपत्ये महादाजी अंबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ता। छ १३ जमादिलौवल पावेतों स्वामीचे आसीर्वादे वर्तमान येथास्थित असे विशेष. कृष्णाजी मोरे हुजरे याणे वर्तमान हुजूर राजश्री स्वामीपासी सांगितले,

---

१ खासगीवाले.

कीं आपण रा। पांडुरंग नाईक जुनरकर याजपासी कर्ज नख्त रुपये येक हजार व कापड येक हजार रुपयाचें घेतलें, आणि राजश्री बाबूराऊ दाभाडे सेनाखासखेल यास दिल्हें. त्यापैकी पाडाव नाईक यास नख्त हजार रुपये वारिले. बाकी हजार रुपये कापडाचे राहिले, त्यास याणें हजार रुपये सेनाखासखेल याजपासी मागितले. त्यास त्याणी नेम केला की मातुश्री उमाबाई नबापुरास गेलियावरी देऊ. त्यावरी आपण पैकियाबदल नबापुरास जाणार होतो. पैका तेथून आणू याचे वारावे यैसे होते. प्रस्तुत हरकत नाईक मारानी केली जे राजश्री बापूजी मेघशाम याजपासी वर्तमान सांगून मजला धरावयास माणसे घातली व घरी चौक्या बसविल्या. घरी टिपऱ्या माणसास घालून घोडी पिढी व माणसे याचा अनर्थ मांडिला आहे आणि वस्तभाव घेतली. कुडक्याची जोडी येक व चिरा येक व आंगडे वगैरे वस्तभाव घेतली. इतका आपणावरी नाहक जुल्मम रा। बापुजीपंती केला आहे, त्याचें पारपत्य महाराजानीं केलें पाहिजे म्हणून सांगितले, त्यावरून राजश्री स्वामीनी आज्ञा केली कीं याचे घरची चौकी उठऊन याची वस्तभाव घेतली असेल ती याची यास देवणे; आणि याच माणसास घरी उपद्रव द्यावयास प्रयोजन नाही. कृस्णाजी मार नबापुरास जाऊन पैका वसूल करून आणि तोवरी यास तगादा करावयास प्रयोजन नाही. म्हणून आज्ञा केली त्यावरून हें पत्र स्वामीस लिहिले आहे. तरी रा। बापूजीपंतास आज्ञा करून यास तगादा होऊ न द्यावा. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ambaji communicates to the Peshwa and Chimaji Appa an order issued by the King asking Bapujipant to desist from troubling Krishnaji Dabhade who has taken a loan from Pandurang Naik of Junnar and advanced it to the Dabhades. The paper is interesting in shewing what trivial complaints from personal servants Shahu used to entertain.*

No. 171] *[10-10-1736?*

पा। छ १९ जाकर

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ तथा
राजश्री आपा स्वामीचे शेवेसी

विनंति राजश्री फत्तेसिंग बावा व राजश्री प्रतिनिधि याचा स्वारीस जाण्याचे सिधांताचे वर्तमान पहिलें आपल्या लिहिलें आहे त्यावरून विदित जाहाले असेल. प्रस्तुत राजश्री नारबा व राजश्री रामाजी[1] दामोदर आले, यैसियासी राजश्री

१ फतेसिंगाचा कारभारी, उपनांव गाडगीळ.

नारबावाच्या चित्तात कांहीं या उभयतानीं बाहेर निघावे यैसे नाहीं. निमित्य कीं हे कर्नाटक प्रांते जातील आणि कुल राजकारणे व त्या मुलकचा तालुका त्याजकडे लागेल. यस्तव त्यांचे जाणे न होय तरी उत्तम. निजामउल्मुल्क याचा शह टळला आगर त्याचा आपला येक विचार जाहाला तर राजश्री कुसोंजी व येसोंजी भोसले यासी घ्यावे आणिक टोल्या टोल्या फौज एक दोन चव्हाण व संभुसिंग व सोमवंशी ऐसे येकत्र करावे आणि आपण जावे, यैसा विचार बावाचा आहे. यास्तव उभयेताचा विचार जाहाला आहे हा मोडावा, व राजश्री सुमंताचा विचार तर हे कोणीहि दक्षिण प्रांतास न जात आणि निजामन-उल्मुल्क गेला तर आपण मात्र जावे आणि इकडील उपर शब्दीं दाखऊन जे साधेल ते साधावे यैसा विचार आहे. राजश्री रामाजी दामोदर याच्याहि विचारांत हे गोष्ट येत नाहीं. कांकीं बाहेर निघोन पांच चार लक्ष रुपये कर्ज करावे, फौज ठेवावी आणि आपले फौजेनें राजश्री प्रतिनिधी साजरे करावे. बरे ते तऱ्ही आपल्या विचारें वर्ततील तरी हाहि अनुभव एक दोन वेला कलला आहे. यासी येथें मात्र मनमानेसारखे खरे लटके बोलोन घेऊन जातील आणि तेथें गेलियावर स्वछंदेकरून मनसबे करितील. हा विचार कांहीं उत्तम नाहीं. उगेच कर्ज-दार व्हावे आणि त्याचे स्वाधीन वर्तोन घरास यावे हें उत्तम नाहीं. ऐसा विचार दिवाणाचा आहे. तदनरुपे राजश्री फत्तेसिंग बावास सांगितले. सा(रां)उष त्याचा जावयाचा सिधांत सत्वरीच जाहाला होता, त्यास विचार पडला. हे अद्याप राजश्री स्वामीस जावयाविसी पुसिले नाहीं. घरचे घरीच उत्वाटहि जाहाला व उपशमहि होतो आहे. स्वामीस विदित व्हावे यास्तव लिहिले आहे. राजश्री रामाजी दामोदर यासी राजश्री प्रतिनिधींहीं बोलाविले होते. त्यास बहुता-प्रकारे ममतापुरस्कर भाषण केले कीं तुम्ही आमचे अहां. राजश्री फत्तेसिंग-बावास उत्तेजन द्यावे, बाहेर निघावे, फौज मोडली व घरी बसल्यानें कोणी पुसतो यैसे नाहीं. मुलकांत जावे, चार रुपये मेलवावे, फौजेची उस्तवारी करावी, लौकिक करावा, यांत उत्तम आहे यैसे कित्येक तपसिले भाषण केले. त्याचे उत्तर दिवाणानीं दिल्हे कीं आपण विचार सांगितला हा उत्तम, परंतु आजी बाहेर निघावे तेव्हां चारपांच लक्ष रुपये कर्ज करावे, फौज ठेवावी, मातबर फौज असल्याविना बाहेर निघालांत त्याचे सार्थक काये व कित्येक लोकांचे व सरदारांचे मुद्दे कबूल करावे, सर्वस्वास उदार होऊन फौज जमा करावी, मुलकांत जाऊन द्रव्य मिळेल न मिळेल हे कांहीं कलत नाहीं. तथापि उदेग करावा, फलदाता परमेश्वर ऐसे म्हणावे, त्यास आम्हास काये? आम्ही सिपाई. राजश्री स्वामी तैसेच.

---

१ शाहूचे रक्षापुत्र.

तुम्हीं अम्हास, त्याणी उस्तवारी करावी आणि आपण कां न करावी? तरी कोकण-तल हाटी (?) व कऱ्हाड प्रांतीं पांच गांव त्यास देऊन समजाविसी करावी आणि बराबर न्यावे ऐसे बोलिले. त्यावरून प्रतिनिधि बहुत श्रमी जाहाले. त्यावर रामाजीपंत बोलिले कीं बरे आम्ही फार बोलिलो ऐसे आपणास वाटले असिले तरी कांहीं तोडमोड करणें ते करावी परतु केवल कांहीं दिल्याविना राजश्री फत्तेसिंगबावाजी समजावीस होत नाहीं ऐसे बोलिले. जालें वर्तमान स्वामीस विदित व्हावे यास्तव लिहिले असे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

पैवस्ति छ. १९ जमादिलाखर

¶*Letter to Bajirao from Purandare communicating how Pratinidhi's plans of leading an expedition into the Karnatak have met with disapproval at Shahu's Court.*

No. 172] [*11-11-1735*

श्री

श्रीमंत राजश्री राऊ स्वामीचे सेवेसी

पोष्ये बाजी भिवराऊ कृतानेक सां नमस्कार विनंती येथील कुशल ता। छ ९ रजब जाणून स्वकीये ल्याहावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. काली छ ८ रजबी मौजे नांदगाव साकोरे येथील मुकामीं स्वामीचें पत्र आले त्याचे प्रतिउत्तर स्वामीस लिहिलें. त्यात आजीचा मुकाम मलगावचा करून गीर नदीवरी राहातो म्हणून लिहिलें आहे; परंतु मागती विचार केला की स्वामी मागें राहिले आपण पुढें जावें ऐसे * * * * * * * वरीच * * * * नारबावाचा गाव आम्ही उदंड ताकीद केली तरी लस्करचा मुकाम लेकाचे लस्कर बापाचे गावीहून जाऊ नये याकारिता तेथून कूच करून पंचनदी म्हणून नदी नांदगावीहून पचमेस आपले लस्करच्या रोखे दीड दोन कोस मौजे पिपहाले पा। निबाईत येथें मुकाम करून राहिलो आहो. उदईक कूच करून मलगाव उजवा टाकून गीर नदीवरी मुकाम करून राहून. स्वामीचे लस्कर मालेगावी येऊन राहिल्यावरी जैसी आज्ञा येईल त्याप्रमाणे वर्तणूक करून. बहुत काये लिहिणे कृपा लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶*Baji Bhivrao writes to Bajirao Peshwa about his movements.*

No. 173] [*8-11-1736*

श्री

सुदर रामजी का। वाई

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ६३ नलनाम सवत्सरे कार्तिक बहुल प्रतिपदा इदुवासरे क्षत्रियेकुलावतेस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामी याणी देशमुख

देशपांडे पा सुलतानपूर सा नंदुरबार प्रा खानदेश यासी आज्ञा केली. ऐसीजे. साहोत्रियाचे वतन राजश्री नारो शंकर सचिव यास दिल्हें होतें. ते मृत्यु पावले. हाली त्याचे पुत्र राजश्री चिमणाजी नारायेण सचिव याचे चालवणें अवश्यक जाणोन याजवरी स्वामी कृपाळु होऊन पूर्ववतप्रमाणे साहोत्रियाचे वतन यास अजरामऱ्हामत करून दिल्हें असे. तरी तुम्ही पा मजकुरचा चौथाईचा आकार देखील जकात व कमाविस बाबा होईल त्यापैकी दर सदे साहोत्राप्रा पाडित मारनिलेकडे वसूल सुरलित देणे. जाणिजे लेखनालंकार

रुजू सुरू	संमत	सां	संमत
निवीस	सुमंत	मंत्री	सरकार
बार सुद	सुरू सुद	बार बार	बार बार

¶*King Shahu renews the grant of Sahotra in the name of Chimnaji Narayan, son of Naro Shankar, on the latter's death.*

No. 174] [*16-11-1736*

पौ छ ९ साबान

श्री

श्रीमंत राजश्री पंत-
प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती आज्ञाधारक येसाजी बावाजी चौकी इसरवाड कृतानेक सा नमस्कार विनंती ता कार्तिक वदी ९ पावेतो सेवकाचे वर्तमान येथास्थित आसे विशेष. राजश्री बाबुराऊ दाभाडे सेनाखासखेल याणीं आपलें घर इसरवाडास लुटिलें होतें. त्यावरून स्वामीची पूर्वी पत्रें खलोजी जासुदासमागमें पाठविली होतीं. तेसमई येथें फौजेचा गवगवा पडला होता याजकरितां जाबसाल न होये. त्यावर हली स्वामीची ताकीदपत्रें सादर जालियावर निकाल करून दिल्हा. गला वगैरे वस्तभाव याची निशा प्रा रायेपुरचे जमिदाराकडून करविली. स्वामीच्या प्रतापेकडून निकाल निघाला. सविस्तर खलोजी जासूद जबानी सांगता श्रुत होईल. स्वामीची आज्ञा होती कीं जासुदास रुपये १० दाहा देणे, आज्ञेप्रमाणे पावते केले. सेवेसी विज्ञाप्ति.

¶*Yesaji Bawaji of Isarwad writes to the Peshwa that a complaint against Baburao Dabhade has been satisfactorily decided in his favour.*

No. 175] [*20-11-1736*

श्रीराम

राजश्री बाजीराव पंडित
प्रधान गोसांवी यासी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रा यशवंतराऊ दाभाडे सेनापति दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीये लेखन करीत

असिलें पाहिजे विशेष. आपले वारीसिंगवे येथील मुकामीचें पत्र छ २४ रजबचे आलें, तें येथें छ २६ मिनहूस प्रविष्ट होऊन भावगर्भ कळों आला. मजल दरमजल कोंकणबारीनें उतरोन धुळ्याचे रोखे येतो. उभयेपक्षीं भेटीचा योग घडे ते करावे म्हणोन लिहिलें तें कळले. यैशास राजश्री संभाजी भोसले व रा विसाजी भिकाजी आले आहेत. त्यांच्या मुखवचने आद्यंत निवेदन जालें. याजउपरी आपला मुकाम कोठे आहे, आम्ही कोणत्या रोखें यावे ते लिहिले पाहिजे ; त्यासारिखे आम्हीहि स्वार होऊन येतो. जाणीजे रा छ २७ रजबु बहुत काय लिहिणें, लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Yeshwantrao Dabhade in his letter to the Peshwa inquires of the latter's whereabouts and wants to know where he should meet.*

No. 176] [*24-11-1736 ?*

नकल

श्री

सेवेसी विज्ञापना ताा छ १ साबान मौजे दानपूर पाा धाडरोख जाफराबाद मुाा लस्करपर्येंत वडिलांचे असीर्वादेंकरून सुखें असो विशेष. नवाबसाहेब बुनगियांत आले छ ३० रजबी कूच केलें. भापकरास राजश्री जिवाजी पांढरे यानी लुटिलें. भापकर पांच स्वारानसीं पंढरपुराअसपास गोग्रहण करीत चालिले होते त्यानी येऊन मोडून लुटिलें. भापकराचे पुत्रास जखमा लागल्या आहेत. जिव रक्षून पिता पुत्र पळाले. राजश्री सुलतानजीराव निंबालकर पांच कोसावर उतरले आहेत. त्यास सांडणीस्वाराबरोबर आज्ञा केली कीं जेथें त्रुण पुस्कल लागेल तेथे तुम्हास दर्शनास बोलाऊं. शैन्यापलीकडे दाहा कोस उतरले. अंधास बुनग्यापर्येंत समागमे आणिलें होते त्यास आज्ञा दिधली. त्यास आपले अंगावरील येक दुशाल आपले हस्तीं पांघरविली व तीन वस्त्रें बहुत उतम त्याचे घरास पाठविलीं व त्यास शहर औरंगाबादेस जावयास आज्ञा दिधली. अनवरखानाचे शरिरास समाधान पडत नव्हतें यास्तव त्यांस बऱ्हानपुरास जावयास आज्ञा दिधली. यैवज-खानाचे हवेलीसी पाडणे म्हणून सैदलस्करखानास आज्ञा केली आहे व सेखुमालखानास लिहिले कीं तुमचे पित्यास हे हवेली शुभदाईक जाहली नाहीं. तुम्हावरहि हे अरिष्ट आले होते तरी तुम्ही आणके ठिकाणी राहाणे व ते हवेली पाडू देणे. हफीजुदीखान सालेरमोलेरकडे गेले. राजश्री पंत प्रधान नर्मदा उतरले म्हणून वर्तमान असे. येथे आता बातमीचा जोडा उरला (नाहीं). असे आणखी जोडे येतील तर उतम आहे. सेवेसी श्रुत होयें हे विज्ञाप्ति.

¶*The letter giving news from the Nizam's Camp refers to a petty quarrel between Pandhare and Bhapkar and in addition mentions some orders issued by the Nizam to several of his Sardars.*

No. 177] [26-11-1736 ?

श्री

श्रीमंत महाराज श्री देव
स्वामीचे शेवेशी

चरणरज बाजीराऊ बलाळ साष्टांग नमस्कार विनंती. स्वामीचे कृपेकरून मार्गशीर्ष शुध पंचमीपर्यंत कुशळ असे विशाष. राजश्री गोपाळ उधव यास यावर्षी धंदा अनकूल जाला नाही यास्तव समागमे स्वारीस घेतले.आहेत. याणी लोकाचे कर्जवाम देणे आहे. यास्तव कर्जदार घरी उपद्रो देतील यैशास याचे सर्वप्रकारे अगत्य स्वामीस आहेच परंतु स्मरणार्थ लिहिले आहे. कर्जदाराचा तगादा याचे घरी न लागे ते करायासी स्वामी समर्थ आहेती. सेवेसी श्रृत होय हे विज्ञाप्ति.

¶*The Peshwa requests the Deo of Chinchvad to see that the creditors of one Gopal Udhao do not harass his men at home in his absence when he is accompanying the writer in his campaign.*

No. 178] [पो 30-11-1736

छ ७ शाबान.

श्रीशंकर.

राजश्री चिमणाजी पंडित गोसावी यांसी

॥ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत रोजमान्य स्ने॥ सुलतानजीराऊ निंबालकर दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुषललेखन करीत गेले पाहिजे विशेष. चिरंजीव दुर्गाबाईचे लग्न मार्गसीर्ष वद्य पंचमी शनिवारी नेमस्त केले आहे. तरी गोसावी यानीं सहपरिवारें येऊन मंडप शोभिवंत केला पाहिजे. बहुत काय लिहिणे, कृपा असो दिल्ही पाहिजे, हे विनंती .

¶*Sultanjirao Nimbalkar invites Chimaji Appa to the wedding ceremony of his daughter Durgabai.*

No. 179] [12-12-1736 ?

पौ छ २१ साबान

श्री

राजेश्री चिमणाजी पंडित गोसावी यांसी

॥ सकलगुणअलंकरण अखंडितलक्षुमीअलंकृत राजमान्य स्ने॥ फतेसिंग भोसले दंडवत विनंती येथील कुशल जाणऊन स्वकीये लेखन करीत असावें विशेष.

आपण पत्र पाठविलें तेथें लिहिलें कीं, सदाशिव दामोदर याच्या मामाल्यास कोण तो परियाय आपण लिहावा, आपले वचन प्रमाण, वचनास अंतर नाही, ऐसें द्विवार त्रिवार हेच गोष्टी लिहिली. अशास आम्हाकडून वचनास अंतर पडेल न पडे हें मनोमन साक्षच असेल. त्याहिमध्यें केवल वचन आमचें आपल्यासी जाहले अगर रा आवजी कवडे यांसी तऱ्ही जाहालें आसते आणि वचनास अंतराय होता तेव्हा आपण लिहिलें हे उचितच होतें. तो प्रसंग काही जाहला नाही आणि आम्हासहि हा मामला अंत्रगत नाही. असें असोन लिहिलें याजवरून अपूर्व भासलें आशास आपला आमचा श्नेह अकृत्रिपणें वर्तत आला आहे. त्यामध्यें किल्मिश नसावें (हा) उत्तम पक्ष आहे. त्याहींवर चाकर कार्याचा म्हणून ठेविला, कार्याचा नव्हे दूर केला, या गोस्टीस केवल उभय पक्षीच्या श्नेहास विपर्यास यावा हे गोस्टी उत्तम आहे ऐसी नाही. या उपरी आवजी कवडे यांस परिछिन्नवादे पत्र लिहून आम्हाकडील मुलकांत खलेल न करीत असे केलिया श्नेह दिन प्रतीनें अभिवृधच आहे. यावरी आपण सूज्ञच आहां. आत्मकार्यावरी द्रिष्टी देऊन मैत्रीस वैशंम्य योजावे हे जाणतेपणास उचित नाही. जाणिजे छ १९ शाबान बहुत काये लिहिणें लोभ असो दीजे. आवजी कवाडियास पत्र देवावे ही (विनंती)

¶*Fatesing Bhonsle to Chimaji Appa, declaring that Sadashiv Damodar was employed by the writer and he had every power to dismiss him. This should not interfere with their cordial relations in any way.*

No. 180] [*1736 ?*

[आरंभींचा मजकूर फाटला आहे.]

घाबरे आहेत. आपणहि राणाजीच्या सरहदेवर जाऊन बसतील. आबेर (अंमेर) जयपुरी कोणास ठेऊन निघणार. आपण आलो म्हणून यैसे लिहितील. कोठे फौज आली यैकले तेव्हा जीव ठिकाणास येईल; तोपर्यंत राज्याची फौज मिलेल. त्यात गेलियावरी चित स्वस्थ होईल. राजश्री बाबाहि येऊन पोहचले. आजी उदिया जयपुरी दाखल होतील. आपण तो घोडियानसी निघाले तेव्हां पत्रें लिहिली. मागून हती वगैर सरंजाम येऊन पोहचले. तेथून निघोन राणाचे हाडोदेंस येऊन पोहचले. आज उदिया येऊन पोहचतील. चौ दिवसा येऊन पावतील. मूल सुखरूप आवये आले. बजिनस राजश्री बाबाचे पत्र पाठविले आहे त्याजवरून विदित होणार. राजश्री धोंडाजीपंती पत्र लिहिले त्याजवरून विदित होणार हे विनंती.

¶*This refers to Jaipur and Northern India. The letter being mutilated it is difficult to fix it in time and circumstance. Dhondajiram was Maratha agent at Jaipur during Nadir Shah's invasion.*

No: 181] [1736 ?

श्री

सेवेसी विनंती. रात्री स्वामीस विनंती केली आहे त्या प्रा सुरज उजवी घालून जावे यात सर्व गोष्टी उतम आहेत. सवाईजी दूर पडतात त्याचा मुलुक वाचतो. येथून ग्रहस्त त्याजकडे गेले आहेत त्याची प्रतेस्ठा राहेल. ज्या कार्यासाठीं गेले आहेत त्या कार्याचा विचार होणे तो होऊन उभय पक्षी समाधान राहेल. राये नारायेणदास समधान पावले येसे आहे. यात स्वामीच्या चितास येईल ते उतम आहे. आम्हास गोष्टी सुचली ते सेवेसी विनंती केली आहे हे विनंती.

¶*The writer suggests that the Peshwa should take an easterly route so as not to molest the territory of Sawai Jaysing.*

No. 182] [1736

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री
आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. राजश्री स्वामीच्या पत्राचे उतर लेहून पाठवावे की, राजश्री रामचंद्र हरि याचे व यांजकडील लोकाचे कबिले नोदणीस वगैरे गावी होते याकरिता येथून गेले आणि राजश्री संभाजी राजे यानी पत्र महाराजास पाठविलें. माहाराजानीं आम्हास आज्ञा केली. त्यावरून पाच स्वार व कारकून मानिलेकडे पाठविला आहे. रामचंद्र हरि जमावानसी उठोन येतील. याप्रमाणे पत्र लेहून पाठविले पाहिजे. स्वामीनी आगत्यरूप राजश्री रामचंद्र हरि व फौज आगत्य आणविली पाहिजे. सेवसी श्रुत होये विज्ञापना.

¶*King Shahu asks Chimaji Appa to recall Ramchandra Hari with his forces from the territory of Sambhaji, King of Kolhapur.*

No. 183] [1736 ?

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री आपा
स्वामीचे शेवेसी

आज्ञाधारक राघो कृष्ण कृतानेक सीरसाा नमस्कार विज्ञापना. विनवावया प्रार्थना येसीजे. स्वामीचें आज्ञापत्र आलें तेथें आज्ञा केली कीं, राजश्री आवजी कवडे यास आज्ञाकर्तव्य ते केली आहे, तरी तुम्ही स्वार होऊन त्यास सामील

होणें. त्यास आज्ञेप्रमाणे स्वार होऊन कासारबारीनें जातो. आम्ही तर चाकरीस बेउजूर राजश्री आवजी कवडे यासी आहो. पोटास देवणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Ragho Krishna writes to Chimaji Appa that in obedience to an order from him, he starts on his march to join Awaji Kawade

No. 184] [*1736*

श्री

राजश्री चिमाजी आपा
गोसावी यासी

श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये स्नो आनंदराऊ सोमवंशी दंडवत विनंती विसेष येथील कुशल जाणोनु गोसावियानीं स्वानंदवैभव लेखने संतोशावाप्ति केली पाहिजे. उपर कृपा करून पत्र पाठविले ते पावोन लेखनार्थ अवगत जाला. भेटीस येणे म्हणोनु लिहिले. यैसियास पूर्वी राजश्री रायानीं पत्र लिहिलें होतें कीं आपण सतरुशीहून आलियावर बोलाऊ तेव्हा येणे म्हणौनु लिहिले होते. प्रस्तुत दोन च्यार दिवस जवलियामध्ये आहो. राजश्री आलियावर भेटीस येऊन. आपणाखेरीज दुसरे आम्हास कोण आहे? वडिलपणे जे आमचे बरे होईल ते करावे. बहुत काये लिहिणे? कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

¶Anandrao Somwamsi in his letter to Chimaji Appa gives an explanation for not paying a visit to him.

No. 185] [*1736 ?*

श्री

राजश्री दादबा[+] दाजी
गोसावी यासी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो आनंदराऊ पवार रामराम विनंति येथील कुशल जाणौन स्वकीये कुशल लिहीत गेलें पाहिजे विशेष. आपलें पत्र पावलें व राजश्री पंत प्रधान स्वामीचें पत्रहि पावलें. सारांश गोष्टी राजश्री बाजी भिवराऊ यांची रवानगी राहिली म्हणोन लिहिले; तरी

+ मल्हार तुकदेव पुरंदरे.

आम्हासी मान्य केले होते की त्यांस पाठवावें. सहश (?) दोन्हीं मातबर देश तैसा ये गोष्टीचे संकट प्राप्त जालें. सविस्तर वृत राजश्री रायांचे पत्रीं लिहिलें आहे त्यावरून विदित होईल. आम्ही तो स्वार होऊन गेलो. कस्त करावयास चुकत नाही. फलदाता ईस्वर आहे. आपणाकडील वर्तमान वरचेवरी आम्हाकडे पाठवीत गेले पाहिजे. या पत्राची उत्तरे सत्वर आम्हाकडे पाठविजे. जामुदास अंतर पडे ते न कीजे. गंगातीरी पात्रेत ते कीजे. बहुत काये लिहिणे? कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Anandrao Pawar writes to Dadoba Daji that he set out on his march and regrets Baji Bhivrao not being sent for his aid.*

No. 186] [*1737 ?*

[पहिला बंद गाहळ.]

चा आहे. मनसुबा खराच आहे. ते तो स्वामीनी केलाच आहे. महमदखान बंगस पातशाचे तरफेने खानदवरानी पाठविले. त्यानी रा सवाईचे फौजेचा मोहला घेतात वगैरे फौज पाहतात. येक विचार हाहि आहे की आपले लस्कर फिरून माघारे चालले म्हणजे बंगस आपल्या गावास जाईल. रा राजामलहि जयेपुरास जाईल. आपल्या जायाचा मार्ग लक्षितात. उभयेता तो तिलपतेवर आहेत. तेहि मार्ग लक्षितात. स्वामीची फौज फिरता आपल्या ठिकाणास जातील. येथे वर्तमान की फौज फिरून देसास जात आहे. राजामलजी आम्हास म्हणो लागले जे तुम्ही आपलेविसी लिहिणे. रा म्हणतील राहणे जाणे त्याप्रमाणे वर्तणूक करणे त्यावरून विनंती लिा तर उतर पाठविले पाहिजे.

¶*The second sheet of a letter referring to the movements of Bangash and Sawai Jaysing.*

No. 187] [*1736 ?*

श्री

सा। नमस्कार विनती उपर आज छ १२ प्रहर दिवस आ॥. बाजराव स्वारा तयार करविली. निजामुदीनाचे दरगाहास जानार. भूपतीहि जानार होतेत परतु राहलेत. परवा छ १४ शुक्रवारी भूपति आनी वजीर स्वार होऊन खिजराबादेस येनार आसेत. सरदार दक्षनी त्या दिवसी कूच करून देशास जातील तर सलूक नाही तर युध करनार. युधाक्रात निच्यया

¶*A despatch informing that the Emperor is determined to launch an attack against Maratha troops should they refuse to withdraw.*

No. 188] [1736?

श्री

विनंती उपरि. सैद यादगारआली व सेदमहमद अजम याचे पुतणे भावाचे लेख(क?) सैद फैजआली दोन तीन दिवस आम्हाकडे येतात कीं आमचे वरचे आपणासी बोलावें. परंतु प्रसंग पाहून त्यासी सिष्टाचार करून मार्गस्त करीत गेलो. आज त्यास सर्वांस आणून बसविलें, म्हणोन हे आम्हांकडे येऊन बहुत बजिदी करितात कीं आजचा दिवस तसदी न करावी. आज त्यास गावात जाऊं द्यावें. ऐवजाची वाट करून देतो. आम्हीं साफ जाब दिल्हा, परंतु त्यांची बहुत बजीदी आहे, यास्तव आजचा दिवस त्यास तसदी न करावी, ताकीद करावी. उदेक निर्गम करून देतील. उदेक निर्गम न करीत तर आपलें फल पावतील, परंतु आज केवल त्याचे आबरू न घ्यावी. आजची तसदी मना करावी. आम्हीं लिहिलें म्हणोन आज तसदी न केली असें त्यासहि कलावें; उदईक आपले विचारास येईल तें करावीं. सरकारकामाविसीं आम्ही ल्याहावेसें नाहीं. परंतु याचे बजिदीकारितां लिहिलें असे. आम्हाकडे आले. आम्हीं लिहिलें म्हणोन त्याजवरही बेमरजी न कारितां आजचा दिवस तसदी मना करावी. कललें पाहिजे. विशेष काय लिहिणें. लोभ कीजे. मोघम चौकी ठेवावी उदेक जें करणें तें करावें हे विनंती.

¶*The writer pleads to his superior to stop persecuting Said Yadgar Ali and Said Faiz Ali for a day more. They promise to adjust the matter within a day.*

No. 189] [April 1737

श्री

शेवसी विज्ञापना, राजश्री जगतराजजी व सभासिंग ऐसे आपले फौजेनसी आम्हाजवळ आहेत. हिमतराऊ सैदाच्या कोठड्यापर्यंत समागमे होते. आम्ही पुढें अल्यावरी ते मागें राहिले. आपल्या मुलकांत आहेत. राजश्री हिरदेसा मोतुमोव्हास आहेत. विदित जाले पाहिजे. भारतीचंद उभयता राज्याचे सावत्रभाऊ, लष्करांत आलेच होते. त्यांस बरें वाटत नव्हते म्हणोन पाढोरचे मुकामीहून घरास गेले. तेथें फारच बरें वाटेनासें जाले आणि देवाज्ञा जाली. त्याचे स्त्रीनें अग्निप्रवेश केला. भारतीचंद बरे शहाणे माणूस होते. जगतराजजी यांचा लोभ त्याचेठायीं विशेष होता. यास बहुत श्रम जाहले. याचे वर्तमान कळावें म्हणून लिहिलें असे हे विज्ञापना.

¶*Baji Bhivrao reports the death of Bharatichand, the step-brother of Sabhasing and Jagatraj.*

No. 190] [1736

श्रीशंकर

पुरवणी राजश्री बाजीराव पंडित प्रधान
गोसांवी यासी

विनंती उपरी राजश्री स्वामीचे आज्ञेवरून नवाब निजामनमुलुक याचे मुलाजमतीचा[1] प्रसंग राजश्री आनंदराव पंडित सुमंत याचे विद्येमानेकरून संपादिला. येशास नाचणगावावरी राजश्री सुलतानजी निंबालकर याकडे हती व घोडे मालमालियेत गेली आहे ते फिरून आह्मास प्राप्त व्हायचा आपण अभिमान धरून राजश्री स्वामीस विनंती करून येक पत्र नवाबास व येक पत्र राजश्री राव सुमंत यास व दोघे हुजरे येणेप्रमाणे अविलंबे पाठविलियाने बिसाद सारी येईल. येविशी विस्तारे ल्याहवेसे नाही. आपले पदरीचे पूर्वीपासून आहो. आपले आज्ञेनरूप वर्तणूक करून. सुज्ञाप्रति विशेष कार्ये लिहिणे हे विनंती.

¶*A Sardar requests Bajirao to intercede on his behalf with the Nizam to get back the writer's horses and elephants taken away by Sultanji Nimbalkar.*

No. 191] [1736-37 ?

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत-
प्रधान साहेब साहेबाचे सेवेसी

विज्ञापना. आम्ही गंगातीर प्रांतें आलो तो राजश्री आपाजी सोमंत्रसी सरलस्कर यानी तीन च्यार हजार फौज जमा करून सोनपेटेवर येऊन कजिया केला आणि तैसेच धामधूम करीतच खंदार प्रांतें व नांदेड प्रांते जाऊन मुलुक चारून घासदाणे घेतले. निर्मल प्रांतापावेतो जाऊन माहूर प्रांतें आले. गत-वरसी राजश्री रघोजी भासले याचे फौजेसी व सरलस्करासी हरशामर्श जाला होता. त्यास राजश्री रघोजी भोसले याजकडील फौज राजश्री जानोजी भोसले व निंबाजी वंझाल व तुलजोपंत व करंडे पांच सात हजार येऊन दारविऱ्यांसी बेशकरायाचे मोर्चे लाविले. बेशकराऊ तो माहूरी होता. त्यास माहूरचा मोगल अबदूल बादीखान येवजखानाचा लेक बेशकराऊ येसे हजारा स्वारानिसी सरलस्करास सामील जाले व लक्षुमण गावडे व सेकोजी सावंत हेहि सरलस्करासमागमे होते. येसे येकत्र होऊन राजश्री रघोजी भोसले यांचे फौजवर चालोण गेले. दारविया-

[1] भेटीचा.

पासून साता कोसावर गेलियावर राजश्री रघोजी भोसलें यांची फ़ौज मोर्चे उठऊन तेहि पुढे चालोण आले. कसबे चिंचोलीवर युध्यप्रसंग जाला. राजश्री रघोजी भोसले यांचे फौजेणें सरलस्कर व बेशकराऊ व मोगल यांसी मायारें सारून गावात घातलें आणि भोवताले कोंडून उभे राहिले. मग सरलस्कर यानी सलूक केला. माहूरकर मोगलाणें व बेशकराऊ यानी पडली घोडियाचे व माहुरचे मामलेतीचे रुा पाऊन लक्ष देऊन ते माहुरास गेले. सरलस्कर वासीम परगाणियांत आहेत. राजश्री रघोजी भोसले यांची फौज तो वराड प्रांते गेली आहे. सेवेसी वर्तमान कलावे म्हणून लिहिले असे. वालकोंडकर मकरबखान गतवरसी मृत्य पावला आहे, त्याजपासी खजाणा आहे, याजकरितां नवाबसाहेब वालकोडियावर गेले आहेत. रोज युध्येप्रसंग होत आहे. राजश्री सुलतानजीराऊ निंबालकर व जानोजीराऊ निंबालकर हे उभेता राजश्री रघोजी भोसले यांचे फौजेवर व राजश्री सरलस्करावर रवाना केले आहेत ते जोडी परल्या पूर्णेचें कांठीं अवंधनजीक मुकाम करून राहिले आहेत. माहुरचे मोगलाचें कुमकेस बक्षीस वगैरे व राजश्री मालोजी नाईकाचे पुत्र व बहिरजी सरगर थैसे पांच हजार रा केले आहेत ते माहुरास दाखल जाले आहेत. माहूरकर मोगल व ते येकत्र होऊन भाम राजश्री कान्होजी भोसले यांची जागा तेथे जाऊन ते जागा हस्तगत करणार आहेत व आणिक जागा जागा ठाणी कान्होजी भोसले यांची आहेत ते कुल घ्यावी हा मनसुबा आहे. सेवेसी श्रृत होये. वालकोंडकर तो अद्याप सलुकावर येऊन भेटत नाहीत. मकरबखानाचा भाऊ नबीसाहेब आहे तो दोन हजार फौज दखणी व पांच हजार प्यादा वगैरे संरजाम करून बैसला आहे. गावापासोन च्यार कोसपावेतो पाणी नाही. चऊ कोसावरून जुंझास फौजा जातात. निरमलकर येलमी नवाबास जाऊन भेटले. तमाम फौजा वलकोडियावर जमा होऊन जाणार आहेत. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*News of a heavy engagement between Raghuji Bhonsle and the Sarlashkar at Chincholi is communicated to the Peshwa by Avji Kavde in whose hand the whole letter is written. The writer was present in the action. This episode is quite a new addition to history.*

No. 192] *[11-1-1737*

पौ छ १९ सवाल

श्री

श्रीमन्माहराज राजश्री

आपासाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक राणोजी सिंदे कृतानेक विज्ञापना. सेवकाचे वर्तमान ताा छ २० रमजान मुकाम भेलसें स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्थित असे विशेष.

माहराज राजश्री पंत प्रधान स्वामीचे आगमन सेनेसहवर्तमान या प्रांते होऊन सेवकास दर्शनलाभ छ १४ रमजानी मुकाम मजकुरी जाला; तेणे करून संतोश जाला. वरकड साकल्य वृत श्रीमंतानी आपणास लिहिले असेल, त्यावरून अवगत होईल. सेवेसी श्रृत होय हे विज्ञाप्ति.

¶*Ranoji Sindia informs Chimaji Appa of the arrival of Bajirao at Bhelsa and of the writer's meeting with him.*

No. 193] [*14-1-1737* ?

छ २२ रमजान

श्री

अपत्यें चरणावरी मस्तक ठेऊन सां दंडवत प्रा विनंती ता छ ९ शाबान पावेतो वर्तमान कुशल असे विशेष. आशीर्वाद पत्र पा ते प्रा होऊन समाधान जाहालें. लोकांस पोटास मात्र तूर्त देणे, मागाहून बेगमी करून पाठऊनू म्हणोन आज्ञापिले, तरी बेगमी सत्वर होऊनु आली तरी उतम आहे. वरकड सविस्तर रा आणाजी नाचें पत्री लिा आहे त्यावरून विदित होईल. सौं उभयता मातुश्रीनी ब्राम्हण बाइको खुद मजकडेस पाठविली, तिजबराबरी निरोप सांगेन पा जे तुम्ही या प्रांती येऊन उपद्रव केला येणेकरून आम्हास हे अवस्था प्राप्त जाहाली. या उपरी विचारेकरून आमचा सुटकेचा अर्थ करिता की नाहीं तें आम्हास साफ सांगोन पाठवणे. त्यासारिखा आम्ही दखला (देखला) विचार करून. याउपरी आम्हास कल सोसवत नाही; आणि आमचा सुधा विचार दिसत नाहीं. तुमच्या उतराचा मात्र मार्ग पाहातो म्हणोन. त्यावरून आम्ही उभयतास बहुत प्रकारे धीर भरवसा देऊन सांगोन पा तुम्ही उतावली करून भलती गोष्ट कराल तरी न करणें. तुम्हास तीर्थरूपांच्या पायाची शफत असे. आम्हीहि विचारेच करून जे करणे ते करून. व काही खर्चासहि पाठविले. बाइकोने वर्तमान सांगितलें कीं कानोजी साटम याची गर्दान मारिली. तथ्य वर्तमान भ्रांत नाहीं. जयरामभट म्हणून आमचा ओलखीचा ब्राम्हण ठिकाणाहून बावड्यास आला. त्याणेहि हें वर्तमान साटमास मारिल्याचे सांगितले. त्यास आम्ही येथे आणून खरेखुरे पुसिले. त्याणे आम्हाजवलहि हेच सांगितले. पूर्वीचे राजकारण विध्वंसले. यवनास पुसले इत्यादिक वर्तमान तथ्य भटाने सांगितले. नाइकाच्या समाधानास्तव धातुपोषणार्थ खबरीस माणसे पाठविली आहेत. परंतु वर्तमान खरे यैसा आवर्त मांडला आहे. आंगरा दर्शनास जात नाहीं हे खरे, यैसेहि भट सांगत होता. पुढे लक्ष गोष्टींची गोष्ट जीव सुटोन येत तो विचार हरतऱ्हेने करावा. नाहीतर उपर राहात नाही. आणखी एखादा राजकारणाचा प्रसंग आढला तथा(पि) होऊन

आल्याविना कोण्या तोंडे आपणास ल्याहावा ? गाखजी (?) आम्ही आहो आर्थे-प्राणे सिधीस सजून आला तरी नेऊन ते समई लेहून पाठऊ. परंतु जिवंत आहो तो येत्नास चुकत नाही. येश स्वामीचे आहे. बहुत काय लिहू? कृपा असावी हें विज्ञापना.

¶*This is probably Raghunath Hari's letter to the Peshwa referring to the domestic quarrels of the Angrias. The letter mentions the news of the murder of Satam.*

No. 194] [*16-1-1737*

श्री

श्रीमंत महाराज राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक आज्ञाधारक धोंडो माहादेव कृतानेक सां नमस्कार विनंती. स्वामीचे कृपावलोकनकरून ता। छ २९ रमजान पौष वद्य द्वादसी रविवारपवेतो बऱ्हाणपुरी येथास्थित आसो विशेष. राजश्री दिनानाथजी येथून स्वार जाले ते-समई सेवकाने विनंतीपत्र लिहिले होते व कितेक वृत मुखवचने भेटनंती राजश्री दिनाना(थ)जीही निवेदन केले आसावे. राजश्री गणेशपंत कुंटे यांचा अद्याप भोग सरत नाहीं. नवाबाचा परवाना दुसरा व सजावल पाठवावयाची तजवीज येथे रा। दिनानाथजी आसताच अनवरखांजीचे विद्यमाने नेमस्त जाहालें. त्यामागे कितेक लोकानी भरी उभरी घालून सजावल निघू देत नाही. दरम्यानच इशकिली काढितात परंतु माहाराजांचा प्रताप थोर, सेवकानेहि येत्न करितां आळस करीत नाही. या आठा चौ दिवसांत परवाना व सजावल तयार होऊन रवानगी व्हावीसी दिसते. बऱ्हाणपुरी इतकाच उद्योग धरून राहिलो. याचे साहेतेस श्रीची कृपा व खावंदाचे पुन्य समर्थ आहे. त्याच आश्रयाने तलास व कितेक लोकाच्या दरबारी खुशामती करितो की हरयेक प्रकारे रा। गणेसपंत बमयेकबिले नवाबाचे हजूर येत. येथे आलियानें वाजवी गैरवाजवी निवडोन सुटका होईल. परंतु काही भोगाची जात बाकी राहिली म्हणौन दरबारीहून सत्वर काम होऊन येत नाही. सेवेसी विदित व्हावे म्हणून लिहिले आसे. मुख्य ताम्राचे कूच रमजान आखेर जालिया कूच होणार. मग नर्मदातीर या देवगड चांदियाचे रोखे जावे ऐसीहि बोली आइकतो व सेंभर मुकामे येथेच करून राहावे हेहि चर्चा आहे. जैसे साद्यंत कळो येईल तैसे मागाहून चांदरात जालियावर सेवेसी लिहून पाठवीन. तूर्त जाले वर्तमान धण्यास कळावे म्हणून लिहिले आसे. सैदजमालुदीखान च्यार पाच हजारानसी खानदेस प्रांते तै केले (?) रावेरीस जाऊन राहिले. फौज जमा होते. राजश्री

आवजी कवडे धुळ्याकडे आहेत. तेहि आपले कामकाज जिकडील तिकडे विल्हे लाऊन सावधपणे राहातात. फारसे जाले तर वराड प्रांतेंहि कितेक कार्यभाग आहेत ते विल्हेस लावावयासी जातील यैसे दिसते. श्रुत जाले पाहिजे हे विज्ञाप्ति.

¶*A news-letter from the Court of the Nizam, gives his intended movements.*

No. 195] [*8-2-1737.?*

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

सेवक बिठल विश्वनाथ सा। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। माघ वद्य षष्ठी मंगलवार मु॥ गोन्हे आपले कृपेकरून आमचे वर्तमान येथास्थित असे विशेष. जवारकरानी तमाम रामनगराची खराबी केली. [१] फौज घेऊन जवारकर जाऊन गंभीरगडाखाली धरमपुरावर (फौ?)ज बसली आहे. जवारकराबरांबर पाचसे स्वार हजार दीड हजार पायेचे माणूसबा। कोली व सिबंदी मिलोन आहेत. रामनगरचा मुलुक तमाम खराब केला. त्याजमुले तमाम अमल बुडाला. याउभयताचे कलीमुळे पेठेचाहि मार्ग मुतलख बंद जाला. उदमी बेपारी बंद जाले. रामनगरचे कारकून आपले तर्फेचे रानोरानात लागले. रामनगरची मदत अभिमान धरून कराल तर उतम आहे. रामनगरकरानी पत्र लि॥ आहे ते पाठविले आहे तेथील हकीकत हरकूल हिरोजी चा। सेवेसी निवेदन करितील त्यावरून कलेल व गंभीरगडाखाली लढाई जाली. रामनगरीयानीं जवारकराचे लोक दाहा बावीस माणूस मारिले. येक दोन घोडेहि जाया केले. जवारकराकडील कोन्ही मातबर माणूस कामास आला आहे. येथून शिपाई आम्ही सोध करावयासी पाठविले आहेत. समाचार मागाहून लिहून पाठऊन व आपली फौज जवारकराबराबर आहे. रामनगरहि मुलुक आपला व जवारहि आपली. त्याजमधे रामनगरीयासी बोलावयासी जागा जाली आहे की तुमची फौज मदत देऊन आमचा मुलुक मारविता आणि सरदेसमुखीचा व चवथाईचा टकापैका मागता हे गोष्ट उचित नाही त्यासी स्वामीनी रामनगरी * चा अभिमान काही तरी धरून त्याचा उपराला अथवा जवारकरास पत्रे दटाऊन लिहावी की रामनगरचे रा। सरदेसमु॥ * * * * * * जार घेऊन याजउपर रामनगरचा

---

१ तपशीलवार.

मुलुक न मारणे. जवारकरानी मखबूल आलम यासी हात बांधिला आहे कीं मोगलाची ठाणी रामनगरपावेतो बसऊन देतो येसा फितवा करून मोगलाई फौज बराबर आणिली आहे. त्यास आपल्यास या उभयताचा कलह वारल्यावाचून कितेक कामकाज होणे ते होत नाही; या करिता जो विचार कलेल तो करून त्याच्या सख्याचा विचार, अथवा जबरदस्तीनें जो आपले सांगितले न मानी त्यास नतीजा द्यावा, तेव्हा आपला ऐवज उगवेल. हे गोष्ट होत नाही तेव्हा आपल्या ऐवजासच जागा नाही. पुढें कामकाज कसे होईल ऐसा विचार आहे, याकारितां सेवेशी लिा आहे; तर चितांत जो विचार उतम दिसेल तो करून आज्ञा करावी. याप्राा वर्तोन सविस्तर हिरोजी चौधरी निवेदन करितील हे विज्ञापना.

¶*Vithal Vishwanath reports to Chimaji Appa the depredations committed by the Chief of Jawhar in the territory of Ramnagar and requests to take steps to stop them.*

No. 196] [*1-3-1737?*

श्री

श्रीमंत महाराज राजश्री

पंत प्रधान स्वामीचे शेवेसी

आज्ञाधारक मानाजी पायगुडे दंडवत विनंति. येथील कुशल तागायत फाल्गुन सुध दशमीपावेतो सुखरूप असो विशेष. काली फौजा आलियावरी चमलीच्या नजीक गाव मारिले. गुरें ढोरें लुटिलीं. याउपरी आगरे येथील उरा बाग, तेथे जाट पाच हजार फौज आहे व कमरदीखान दिलीहून निघणार. शादतखान आगरे येथें उतरायास येतात. उभयेताची भेटी होऊन गनिमावरी जावें येसे वर्तमान राहागिराचें[१] यैकतों. यैकिलें वर्तमान सेवेसीं लिहिलें आहे. साहेब सर्वजाण आहेत. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना. आम्हांस ज्याप्रमाणें आज्ञा होईल त्याप्रमाणे वर्तणूक करून हे विज्ञापना.

सेवेसीं बाजी नारायण साष्टांग नमस्कार विज्ञापना.

सेवेसीं रावो कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान राजश्री मानाजी पायगुडे याणी सेवेसीं लिहिलें आहे. सेवेसी शृत होय हे विज्ञापना.

¶*Manaji Paygude informs the Peshwa that Kamruddinkhan and Sadatkhan will start the campaign against the Marathas after effecting a junction of their forces.*

---

१ वाटसरू, प्रवासी.

No. 197] [3-4-1737

श्री

सौभाग्यादिसंपन्न मातुश्री
बगुबाई वडिलांचे सेवेसी

अपत्यें कृष्णरायें सां नमस्कार विनंती उपर. येथील वर्तमान ताा चैत्र शुध्ध पोर्णिमापावतों वडलांचे आसीर्वादें येथास्थित असे विशेष. बहुत दिवस आपणा-कडील आसीर्वादपत्र येऊन वर्तमान कलत नाही, याकरितां चिंता निर्माण जाली आहे. प्रस्तुत सादतखां याचे युध्याचें वर्तमान बहुतच विज्वर ऐकोन चित स्वस्त नाही; तर आपले कुशलतेचे वर्तमान लेखन केलें पाहिजे कीं समाधान होय. आमचें वर्तमान तर पूर्वी सेवेसी लिाा आहे. अलिकडील विशेष इतकेच कीं छ ७ जिल्हेजी आम्हास मनसबेस उभें करून सिरपाव दिल्हा. जागिरीचा परवाना दोंचो रोजां हातास येईल. कलावे म्हणून लिहिलें असे. बहुतसे लिहिणे लोभ असो देणे हे विनंती.

¶*Krishnarao Chaskar makes anxious inquiries about Bagubai's welfare since stray reports of heavy fighting in the North have reached him. This lady seems at this time to have gone North, probably on a pilgrimage. Bagubai may probably be his mother.*

No. 198] [17-4-1737

श्री

नकल भाईजी नाईक याचें पत्र इंदोरीहून बनाम भगवंत भैरव चैत्र वदी ७ चें आलें. शहरीं चैत्र वद्य १४ रविवारीं दाखल जालें. त्यांत मजमून श्रीमंत राजश्री यजमान स्वामी आगरेयानजीक आठ कोस फौजेसहवर्तमान आहेत. राजश्री पिलाजी जाधवराऊ व मलारजी होलकर व राणोजीं सिंदे व हुजरात थैसीर्सा फौज दाहा बारा हजार निवडोन येमुनेपार हतीवर जीन घालून घोडीं तरोन पार गेले आणि दोन शहरें उत्तम लुटलीं. तेथून सादतखान चौ पाचा कोसावर सनिधच होते. त्यास फौजेचें वर्तमान श्रुत जालें कीं गनिम समीप आले. त्या उपरी त्यांजकडील मशारनिलेचा भाचा मनसूर आलीखान पंधरा हजार बलकी वीस हजार फौजेनसी यांजवर आले. त्यास मऱ्हाटी फौज तमाम बेफाम होती, परंतु सरदार सावध होऊन, कोणी जीन ठेविलें, कोणी ठेवीत होते, तों मोंगलासी गाठ पडली. युध उत्तम रीतीनें जाले. तांब्राचे दात खटे केले. युध्यांत माणूस

उभयपक्षी हजार बाराशें पडिलें. कोणी जखमी कोणी ठार जालें. मागती सरदार तमाम सावरोन फौजेसमेत येमुना उतरोन श्रीमंताजवळ आले. त्या उपरी बुनगें निवडून बुंधेल्याचे पांचशें स्वार बराबर देऊन मालवियांत लाविले, सुरजेस दाखल जाले. श्रीमंत स्वारी सडी फौज पनास पंचावन हजारानसी आगरेयानजीक आठा कोसावर आहेत. सलाबत तांब्रावर गालब आहे. जयेसिंग अभेसिंग वगैरे राजपूत आगरेयानजीक आले आहेत. खानदौरा सादतखान वगैरे आगरीयास दाखल जाले यैसें वर्तमान आहे. मालवियांतील आमल तों जारीच आहे. पुढें युधप्रसंगहि मोठा व्हावासा आहे. पाहावें श्री काये करील. मुख्य गोष्टी येमुनापारची लडाई दग्याची जाली. परतु श्रीनें तमाम सरदार व मातबर माणूस तेवढें सलाबत माघारें आणिलें. आणि लहान सहान लुटारे जाया जाले. याउपर उपर श्रीमंताकडीलच विस्वतोमुखीं आहे कललें पाहिजे. येणेंप्रमाणें भायजी नाईकाचे पत्राची नकल शहरींहून आली असे.

¶*News-letter reporting Bajirao's doings in the vicinity of Delhi along with those of Pilaji Jadhao, Ranoji Sindia and Malharrao Holkar.*

No. 199] [*24-4-1737*

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान साहेबांचे शेवेशी

विनंती सेवक राणोजी भोसले सेवेसी विज्ञापना येथील कुशल ताा छ मोहर(म) मुकाम कोटरा[+] साहेबांचे कृपेकडून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. विशेष साहेबी सोमावलीच्या मुकामीहून राजश्री जनार्दनपंत यांस पत्र पाठविलें ते पावोन सविस्तर कललें. बुलगे वेऊन आटेरीकडे यावयाची आज्ञा जाली त्याप्राा स्वार होऊन यावें तरी राजश्री हिरदेसाह व राजश्री जगतराज फौजसुधा समागमे वेऊन यावयाची आज्ञा. त्यास राा हिरदेसाह माहूस आहेत. त्यास आणावयास राा माहासिंग पाठविले आहेत ते यावे लागतात. तूर्त त्यास भारतीचंद याचा अवरोध जाहला आहे. आज्ञेप्राा त्यास समागमे आणावे लागतें. त्यास टाकून यावें तरी

+ बुंदेलखंडांत.

बुलग्याचा निभाव जाहाला पाहिजे. हा अर्थ सविस्तर राजश्री विसाजीपंती पत्रीं लिहिला आहे त्यावरून विदित होईल. तरी चितारूढ करून आज्ञा कर्तव्य ते करणार साहेब धणी आहेत. विदित जाले पाहिजे हे विनंती+

¶*Ranoji Bhosle of the Nagpur family to the Peshwa giving reasons why he cannot at once join the addressee as desired.*

No. 200] [*24-4-1737*

[आरंभींचा भाग गहाळ आहे.]

घेऊन चंदेरीच्या मुलकातून येत होते त्यांस मार्गी सोहजना म्हणून गाव चंदेरीचा आहे तेथे गावकरानी कासिदास लुटून कागदपत्र सारे घेतले. येक दिवस गावीं कागद मागावयास राहिले. परंतु गावकरानी हरामजादगी करून दिल्हे नाहीं. तेव्हा तेथून निघोन आम्हाजवळ लहचुरा प्रा घोडसे धसाण नदीवरी सुरोंजेहून निघाले ते साहावे रोजी पावले. लस्करांतून निघाल्यास बारावे रोजी दाखल जाले. कागदपत्र तो काही पावले नाहीं त्यावरून वर्तमान काहींच कललें नाहीं. जबानी स्वामीचा मुक़ाम अमके जागा आहे. दिलीपर्यंत स्वारी जाऊन पुरे जालले. दिलीहून फौज बाहेर निघाली त्यासी युध्यप्रसंग बरासा जाहाला. मोगल मारून धुडाऊन दिलींत घातले. मातबर मोगल जिवेच पाच च्यार मारिले. स्वामीची फते होऊन जयेनगराकडे लालसोटावरी येणे जाहाले इतके मात्र जबानी सांगितल्यावरून कललें. कागदी कार्ये आज्ञा केली होती ते कलावी म्हणून राजश्री जगतराजाचे व आम्ही आपणाकडील स्वार पत्रे देऊन गावास पाठविले आहेत. पत्रे आलियावरी वर्तमान कलेल. आज्ञेनरूप वर्तणूक करून. आम्ही लहचुऱ्यावरी होतो तेथून छ ४ मोहरमीं कूच करून कोटरा नागंज यावरी धसाण नदीवरी मुकाम केला. येथून मजल दरमजल कूच करून धामोणीच्या रोखें जात असो. पुढे (अपूर्ण.)

¶*This is a mutilated letter, referring to the expedition of Bajirao against Delhi.*

+ हा मजकूर बालबोधींत खाशाच्या हातचा.

No. 201] [*25-4-1737*

छ ९ मोहर

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ

वडिलांचे सेवेसी.

अपत्ये जनार्दनानें साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ता। छ ९ मोहरम वडिलाचे आर्सावादें येथास्थित असे विशेष. संस्थान दतिया येथील साल-मजकुरचे खंडणीपैकीं बाकी राहिला यैवज व सालगुदस्तांची बाकी राहिली होती तो यैवज यैसा झाडियानसीं पावला. सेवेसी विदित व्हावें म्हणून लिहिलें असे. पा। पंचोखरा येथील लोहरसिंगाकडील पैका येणे आहे. त्यांस रा। रंगोपंत व रामाजीपंत हे उभयेतां येथें आहेत. रामाजपिंत याचे भाऊ गंगाधर कृष्ण पंचोखऱ्यास लोहरसिंगाजवल आहेत. त्यास वडिलीं पत्र पाठऊन पैका येईसा केला पाहिजे व सुकलारी, गुजरोला, पछोर वगैरे येथील पैका आला नाहीं, त्यांसहि ताकीद होऊन पैका येई तो केला पाहिजे. शेवेसी श्रुत जाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*Janardan Ballal writes to Bajirao Peshwa that the amount of tribute from Datiya together with previous balance has been received.*

No. 202] [*1-5-1737*

छ १९ मोहरम जाबसूद

श्री

स्वस्ति श्रीमद्‌भगवद्‌भजनतत्परायेणांत:करण गोब्राह्मणप्रतिपालक राजमान राजश्री.

आपा याप्रति

श्नेहाभिलाषी देवराऊ कचेश्वर कृतानेक आसीरवाद उपरी. येथील कुशल वैशाख सुध त्रयोदसी मुा। राजुरी जाणौन स्वकीय लिहिणे विशेष. बहुत दिवस जाले. पत्र पाठऊन परामर्श केला नाही. याउपरी सदैव येणारा मनुष्यासमागमे पत्रद्वारे सांभाल करीत असिले पाहिजे. आपण राजश्री बाबूराऊ मल्हार देशपांडिये पा। चाकण यांच्या घरीं लग्नानिमित्य येथे आलों होतो. लग्न सिध करून उदैक स्वार होऊन सातारियाकडे जाऊं. बहुत काय लिा। * कृपा असों दीजे. राजश्री रायाकडील कुशल वृत लेहून पाठविले पाहिजे हे आसीरवाद.

¶*Devrao Kacheshwar to Chimaji Appa, inquiring after the welfare and movements of Bajirao.*

No. 203] [5-5-1737 ?

॥ श्रीशंकर प्रा ॥

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्ये रा
बाजीराऊ पंडित प्रधान स्वामी गोसावी यांसी

पोष्य जगनाथराऊ कृष्ण कृतानेक नमस्कार विनंती. अत्रत्य कुषल तागाईत छ १९ मोहरम वास्तव्य सवाई जयपूर जाणून स्वकुषलोदंत लेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपली पत्रे राजाधिराज राजश्री सवाईजी यांसी आली, परंतु एकवारहि स्मरणपुरसर पत्रार्थी स्वानंद न केले. ऐसियासी हे गोस्टी पूर्व स्नेहापासून बहुत दूर असे. आमची जागीर कोट्याप्रांती आहे. तीर्थरूप राजश्री दादा स्वामीनी येक ताकीदपत्र आपले पाठविलें त्यासी ते जोडी मार्गी गुम जाहली. याकरितां ते पत्र न पावले व हे लोक जोरेवितरिक्त मार्गावरी येतील हे तों कळतच आहे. येदअर्थी राजश्री मल्हारजी होलकर यांसी रवाना करितेसमई आपण रुबरुहि ताकीद आम्हाविशई करित व येक ताकीदपत्र महाराव दुरजनसाल याचे नावे पाठऊन दिधली पाहिजे की बिलाकसूर जागिरीचा टका पावता करणे. नाहीतरी उतम प्रकारे निषा करून घेतले जाईल. या प्रकारचीं पत्रें आपली आलियाने काही मार्गावरी येतील. वरकड वृत्त तीर्थरूप दादा स्वामीस लिहिले असे, विदित होईल. सारांष, सदैव हरप्रसंगी स्मरणपत्रीं स्वानंदऊन पूर्वस्नेहाची अभिवृधिता होये ते अर्थ केले पाहिजे. राजाधिराज सवाइजीनी प्रत्योतरें पाठविली आहेत त्यावरून सकर्ला प्रसंग अवगत होईल. बहुत काय लिहिणें, कृपालोभ असो देणें, हे विनंती.

¶*Jagannathrao Krishna requests Bajirao that orders be issued to allow him the unrestricted enjoyment of his Jajir in the province of Kotah.*

No. 204] [2-7-1737 ?

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
साहेब साहेबाचे सेवेसी

विनंती आज्ञाधारक आंवजी कवडे दंडवत विज्ञापना येथील सेवक लोकाचे वर्तमान ताा छ १९ माहे रावल मुकाम पाा मनाटे सांा माहोर साहेबाचे कृपाकटाक्षेकडून येथास्थित असे विशेष. साहेबी आज्ञापत्र सादर केले तेथे अज्ञा केली जे तुह्मी व राजेश्री सरलश्कर येक होऊन वराड प्रांतें जाऊन धामधूम करणार,

वराड प्रांतीचा जिल्हा राजश्री राघोजी भोसले यांचा आहे ते मोहिमेसे गेले आहेत तुह्मी वराड प्रांतें न जाणें, ह्मणून अज्ञापत्री आज्ञा केली. सेवकास वचन प्रमाण सेवकास आज्ञा नस्ता दुसरियाचे तालुकियांत जावयासी काये प्रयोजण आहे? बेकैदी वर्तनूक सहसा सेवकापासून होणार नाहीं. अह्मास वराडप्रांते जाऊन धामधूम करावयासी दरकार काये आहे? आह्मी जापल्या सरदेशमुखीच्याच तालुकियांचे माहलांत आहोत. येंदा मुलुकावर मोठीसी तांबरीयाची अफत पडली आहे. रयतेमधे काही हाल राहिला नाही. वरशास राजश्री रघोजी भोसले याजकडील फौज व राजश्री फतेसिंगबावाकडील फौज व राजश्री सरलश्कर यांची फौज सालबसाल मुलकांत येऊन धामधूम होती. याजकारितां कुल मुलुक उज्याड होऊन गेला आहे. तीन वरसे कमाविसदारास पैसा सरदेशमुखीचा वसूल येत नाही. साहुकाराची देणी रसदेची राहिली होती. याजकरितां अवंदा माहूर प्रांतें जाऊन माहालोमहाल फिरोन चुकवती मात्र केली आहे. कागदपत्र करून दिल्हे आहेत व काही महाल माहूर सरकारपैकी व वासिम सरकारपैकी व मेहकर सरकारपैकी चालिवणे राहिले आहेत. तेहि थोडियांच दिवसात विल्हे लाऊन खानदेश प्रांतें जातो. वरशास राजश्री राघोजी भोसले याजकडील फौज येऊन आमच्या सरदेशमुखीच्या तालुकियांत येऊन मनमाने तैसे घासदाणे घेतात. त्यास वासिमपावेतो अवंदा आले होते. आम्ही गंगातीर प्रांतें येताच ते साहिबाच्या पुन्य प्रतापेकडून मावारे सरोन आपल्या जिल्हियांतच गेले. अलीकडें येऊं पावले नाहींत. सर्व प्रताप साहेबाचे पायांचा आहे. दुसरें आज्ञापत्र छ १४ रावल येऊन पोहाचलें. तेथें आज्ञा केली जे तुह्मीं पाा खंदार व बदमपूर येथे जाऊन धामधूम करून पैसा घेतात. दुसरियांचे तालुकियांत तुह्मास धामधूम करून पैसा घ्यावयासी प्रयोजण काये आहे म्हणून आज्ञापत्री आज्ञा केली त्यास ते यथार्थच असे. बदमपूर कोणीकडे आहे तिकडे तो आह्मी गेलोच नाही. तैसे खंदारावरहि गेलो नाहींत. पालीम परगाणियांतून मात्र परब्रणी लोहगावांत गेलो. आह्मी कोठें न जाता नस्ते बोभाट साहेबापासी येतात. साहेबासी चहूकडून नस्ते बोभाट येतात त्याजवरून अज्ञापत्रे सादर होतात. आह्मी तो तिलतुल्ये वावगी वर्तनूक करीत नाहीत हे जासूदासच साहेबी पुसावे. जासूदच सेवेसी श्रुत करितां विदित होईल. विशेष काये लिहिणें हे विज्ञापना.

¶*In explanation to the Peshwa's reprimand that he should cease carrying on raids in the districts of Raghuji Bhonsle, Avji Kavade writes that the rebuke is undeserved and uncalled for inasmuch as the writer never moved out of his province.*

4628

No. 205 [19-7-1737?

छ १० रालाखर

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री

आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी छ २ रबिलाखरी रा माहादाबा नाईक तांबवेकर यांचे मनुष्ये पुणियाहून येथे आले. त्याणे वर्तमान सांगितले कीं तीर्थरूप राजश्री राऊ स्वामी श्रावण शुद्ध प्रतिपदेस पुणियास येणार म्हणून; तीर्थरुपांचें आगमन पुणियास कधीं जालें किंवा कोणे दिवशीं होणार तें लिहिलें पाहिजे सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Nana inquires of Chimaji whether Bajirao had arrived at Poona or if not, when he was going to do so.*

No. 206] [30-12-1737

पौ छ १९ सवाल.

श्री

राजश्री आपा साहेबाचे सेवेसी

॥ श्रीमंत सकलगुणपरिपूर्ण अखंडितलक्षुमीअलंकृत राजमान्य विनंती. सेवक सिवाजी गायिकवाड मुकाम भलसा कृतानेक दंडवत विनंती. उपरी, येथील क्षेम ताा छ १८ माहे रमजानपावेतो साहेबाचे कृपेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. वर्तमान तरी साहेबाची आज्ञा घेऊन स्वार जहालो ते तुबडीनजीक भुपालचे मुकामी फौजेस सामील जहालो. मार्गी येतेसमई किलिजखान तोंडावर अला त्यामुलें आम्हास यावयासी फार निकड जाहाली. कारकून गिरमाजीपंत व भिवाजीपंत घरास गेले होते व तिकडील स्वारहि दोन-तीनसे नालबंदी घेऊन गेले होते, ऐसे मोगलामुलें त्याचें येणें न जाहालें. ते घरींच राहिले आहेत. ते साहेबाकडे येतील. तरी त्यांचेपासून चाकरी घेऊन त्यांचे चालविले पाहिजे. वरकड मौजे तांदली येथे चिरंजीव मालजी गाईकवाड ठेविले आहेत. त्याचें खर्चाविचाचे कांहीं साहित्य केलें नव्हते. पुण्यामध्य जें वर्तमान जाहालें तें परस्परें साहेबास श्रुत जाहालेंच असेल. साहबाचें नावावरी फौज ठेऊन चाकरीवरी मजल दरमजल येऊन पोहाचलो. मागे खर्चाची अबाल आहे. तरी चिंरजिवाची खर्चावेचाची खबर घेणार साहेब खावंद आहेत. त्याची खर्चाविण अबाल न होये तें केले पाहिजे. बहुत काये लिहिणें, कृपावृधि केली पाहिजे, हे विनंती.

¶*Shivaji Gaikwad, writing from Bhelsa, informs Chimaji Appa that he joined the Peshwa's army at Bhopal, before which he encountered an opposition at the hands of Kilijkhan,*

No. 207] [30-12-1737

पत्र पाठविलें आहे * * जालें असल. त्यावर नूतन वर्तमान तरी नवाब सुज्यायतखान अलजपूरचा सुबा यासी व राजश्री रघोजी भोंसले यासी युध-प्रसंग थुगांवपाशीं जाला. युध्यें मोठें जालें. तिनि प्रहर लडाई जाली. सेवटीं पायेउतारा रघोजी भोंसले होऊन अडेहत्याराची लडाई निकराची जाली. सुजायेत खान वगैरे आणीक सरदार धरिले. फौज तमाम लुटली. हें वर्तमान येथें नवाब नासरजंग याजपाशीं आलें. त्याउपर छ ८ रमजानीं[1] खलबत जालें. त्या खलबतांत मजकूर कीं, सुज्यायतखानाची हे अवस्ता जाली. त्यास नवाबानी नासरजंगास बोलाविलें. त्यास राजश्री चिमाजीआपा तापीतीरीं येऊन उतरले आहेत. इकडे वऱ्हाड प्रांतांत राजश्री रघोजी भोंसले यांजवळ पंधरा सोळा हजार स्वार, त्यास याच्या परामृशास सुज्यायेतखान होते. त्याचा विचार या प्रकारचा जाला. रघोजी भोंसले प्रस्तुत निरोपद्रव जाले. नासरजंग बाहेर निघालियानें राजश्री दमाजी गायकवाडहि व चिमाजी आपा येक होतील; रघोजी भोंसलेही येतील. येसी फौज स्वार चाळीस हजार पावेतों जमा होईल. नासरजंग येथून कूच केल्यानें औरंगाबादेकडे हे फौज येऊन उपद्रव देतील. मग काये विचार? कदाचित रघोजी भोंसले याजवर धावल्यानें खुद अगर फौज पाठविल्यानें येक फौज ते बुडाली. दुसऱ्याहि फौजेनें सिकस्त खादलियानें पुरताच बदनक्ष होईल. येक तो हें दुसरें रघोजी भोंसले यावर फौज पाठविली आणि नवाबानी हजूर बोलाविलें तर मग आम्ही इकडेच गुंतलों; मग तिकडे जाणें कैसें होतें. ? विना रघोजीचें पारपत्य केलियाविगळें फौजेस फिरतां नये. जरी पारपत्य न करितां फौज फिरली तरी पुरता पसार होईल. येसा विचार होतां होतां शेवटीं नासरजंग म्हनतात कीं बाहेर निघावें. अबदुलाखान व अनवरुलाखान म्हणतात कीं प्रस्तुत न निघावें. सुज्यायेतखानाचें वर्तमान नवाबास कळलियावर उत्तर येईल त्याप्रमाणें वर्तणूक करावी. येशा विचारांत आहेत. अद्याप गोस्ट ठहरली नाहीं. मागून वर्तमान होईल तें लेहून. तीर्थरूपजीकडून पत्र छ[2] २९ शाबानचे पोंहवानालीयाचे मुकामचें आले. नवाबांनी बाहीरबुनगे कुली अलाहिदे करून राये सोनगड सात कोस आहे तेथें पाठविलें. जरारे होऊन राहिले आहेत. राजश्री मल्हारजी होळकर व रानोजी शिंदे व पोवार सांप्रत शाहाजापुर प्रांतींचे आहेत. हा काळवरी निवाबानी मालवियांतील ठानी आदिकरून सिरोंज कमाविसदाराचें वाटें गेले नाहीत.

---

(१) २०-१२-१७३७. (२) ७-१२-१७३७.

4630

आतां मीरमानीखां मृत्य पावला आहे, यावर काय मनसुबा करतील हें पाहावें. नवाब[१] नासरजंगानी पूर्वींहि पत्र आपणास लिहिलें आहे व आतांहि यानीं आपल्या पत्राचें उत्तर सेवेसी लिहिलें आहे विदित होईल. अनवरुलाखानाचा जाब मागून सेवेसी पाठवीन. विदित होय. छ २ रमजानचें पत्र शहरांत नवाबाचें लस्करची आली त्यास नवाबासी राजश्री पंतप्रधानासी चाळीस कोसाची तफावत आहे. नवाबास सादतखानाची फौज दाहा हजार नवाब निजामनमुलुक यास सामील जाली. येथेंही याजवळ वीस हजार पंचवीस हजार फौज आहे. नवाबाच्या आज्ञेप्रमाणें वर्ततात. आतां बिगाडांत * * * ? कांहीं संदेह नाहीं देश्याकडे सातारियाकडे तों हाकालपर्यंत कांहीं या गोष्टीची चर्चा नाहीं. राजश्री स्वामी खुशालसीर खेळतात. खरें जें होईल तें पाहावें. बहुत काय लिहिणें कृपा लोभ असों दीजे हे विनंति.

¶*News-letter reporting the action between Raghuji Bhonsle and Sujayatkhan, Nawab of Elichpur, at Thugaon (in Berar), the victory of the former over the latter and the consequent depressing effect upon Nasarjang, who is asked by his father to proceed to Malwa.*

No. 208] [*1737 ?*

श्री

सेवेसी विज्ञापना. राजश्री राऊ लछीमनजी गनीहून कोठड्याच्या तलावरी भेटीस आलें भेटी जाहाली. त्यावरी रा सदानंद व हिमतराऊ व आणखी डेऱ्यास येऊन त्याविशी म्हणों लागलें कीं, त्यास लाखा दिडा लाखाची जागा दिल्ही आहे. त्यावरी त्याची समजावीस करणें म्हणून आम्हास बोलले. त्यास आम्ही पष्ट सांगितलें कीं, आमच्यानें समजावीश खावंदा निराली होत नाहीं म्हणोन म्हटल्यावरून हिमतराऊ बहुतसे श्रमी जाहाले. हें वृत पेशजी सेवेसी लिहिलें होतें त्यावरून विदित जाहालेंच असेल. प्रस्तुत लछीमनराऊ आम्हांजवळ आहेत. परस्पर त्यांची त्याची बोली होते परंतु यैकत नाहीं. रा जगतराज याणी राजश्री हिरदेसाह यास लिहिलें होतें की यांचे समजाविशीचें काये ? त्यावरून हिरदेसाह यांणी लिहून पाठविलें आहे कीं, राऊ लछीमन यांची समजावीस करणें म्हणून पत्र पाठविले आहे परंतु अद्याप काही निवडले नाहीं. राऊ लछीमन

---

१ येथून अक्षर वेगळें.

यांची निष्ठा स्वामीच्या पायासी आहे. ज्याप्रमाणें आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करावी हाच याचा निश्चये. बोलीचा सिधांत जाहाला म्हणजे सेवेसी लिहून पाठऊन देऊन. विदित जालें पाहिजे. शेवेसी शृत जाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*The terms on which one Lachmansing is to be taken into employ are discussed. The letter appears to be from Baji Bhivrao to the Peshwa.*

No. 209] [*4-4-1737*]

श्री

सहश्रायु चिरंजीव राजश्री नाना यांप्रति कृष्णराव माहादेव कृतानेक आसीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल ता। चैत्र शुद्ध १५ जाणून स्वकीय लेखन कीजे विशेष. बहुत दिवस तुम्हाकडील वृत कल नाहीं याजकरितां चित स्वस्त नव्हते. तों काली वर्तमान ऐकिलें कीं सादखां भडभुंजे याचे युद्ध जालें तें वर्तमान बहुतच विपरीत ऐकिलें. तपसिलवार श्रीमंत राजश्री रायांचे पत्री लि। असे. त्याजवरून कलले तर आपले कुशलतेचे सविस्तर लेहून पाठविजे कीं समाधान होय. चिरंजीव माधवराऊ पाटणकर व आम्हाकडील मंडली यांचे वर्तमान लिहिजे. इकडून सहसा न येणे बहुतच लिहिणे. कृपा लोभ असो दीजे आसीर्वाद.

¶*Krishnarao Mahadeo in a letter to Balaji Bajirao refers to a battle with Sadatkhan Bhadbhunja.*

No. 210] [*1737?*]

श्री

श्रीमंत राजाधिराजमान्ये राजश्री
राऊ प्रधान स्वामीचे सो।

श्रो। तुलजोजी सर्ज्याराऊ घाटगे दंडवत विनंती उपरी. येथील क्षेम जाणौन स्वानंदलेखनआज्ञा निरोपिली पाहिजे विशेष. स्वामी येंदा शैन्यसमुदाये उतर प्रांते मोहिमेस जाऊन तिकडील अमित्र शरणांगत स्वामीचे प्रतापें होऊन दिग्मंडली दिग्विजये विस्तारोन कीर्तिघोश मिरवला तो विस्तार पत्रीं लिहितां पुरवेना. भूमं-

डली विश्वतोमुखें स्वामीचें प्रतापवर्णन होतें तें श्रवणी परिसोन बहुत संतोष निरंतर पावतों. मोहीम सिधीस पावऊन पुनरागमन जाहालें. ऐकोन साद्यंत वृत प्रवीत[१] व्हावा या अर्थे शेवेसी पत्रलेखन केले आहे. तदनंतर गतवरषीं स्वामीनी पत्रीं आज्ञा निरोपिली होती जें राजश्री व्यंकटराऊ दक्षणप्रांते मोहि(मेस) येतात तरी सेह दोनिसेह राऊत व प्यादे जमावानिसी * ता अविलंबे करून अगमन होतांच बोलाऊ पाठवितील त्यासमागमे जाणे म्हणौन पत्र पाठविलें. त्याजवरून दोनिसेह राऊत चागले अढलाचे भले भले कबलाती व पोख्त्या बोल्या त्याच्या कर्तुत्वायोग्य करून स्वामीचे आज्ञेप्रमाणे राजश्री व्यंकटरायाचा मार्ग समग्र तीन च्यारी महिने पाहिला. शेवट त्यांचे अगमन ये प्रांते जाहले. परंतु त्यानी पत्र पाठऊन समागमे अम्हास न नेहतां गेले. सिबंदीचा खर्च च्यारी महिनेचा बेमोईने[२] होऊन तगादा डोईवरी ध्यावासा जाहला. बरे स्वामीचे पुण्यप्रतापे त्याचाहि निर्गम होईल. स्वामीचे अगमन जाहलें ऐकोन अगोदर मुजरद राजश्री बलीराम-पंत पाठविले आहेत. त्यास येंदा काये आज्ञा निरोपाल तदनरूप सेह दोनिसेहे राऊत व हशम च्यारी पांचसेहपावेतों अज्ञेप्रमाणे ठेऊं. लोक जे सोबतीस ठेवावे ते अढलाचे चांगले ठेवावे लागतात. त्यांच्या बकशिश्या व पोख्त्या बोल्या निवडून काये ते उतर मारनुलेसमागमे पाठविलें पाहिजे. महत्वायोग्य बहुमान करून सेवा घेतली पाहिजे. येविशई विशदार्थे लिहिणें नलगे. सर्व विशीचे अगत्य स्वामीस आहे. उतराचा मार्ग लक्षितो. उतर येतांच तदनरूप वर्तणूक करूं. सेवेसी श्रुत जाहाले पाहिजे (हे विनंती).

¶*Tuljoji Ghatge (of Kagal?) congratulates the Peshwa on his victories in the North and expresses his readiness to join service the moment the addressee would undertake a new venture.*

No. 211] [*13-2-1738?*

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामींचे सेवेसी

विनंती सेवक मलार दादाजी सां नमस्कार विनंती. ताा छ ४ जिलकादपर्यंत सेवकाचे व ये प्रांतीचें वर्तमान स्वामीचे कृपादृष्टीकरून येथास्थित असें विशेष.

---

१ प्रख्यात. २ व्यर्थ,

कृपालु होऊन छ २३ रमजानचें पत्र भेलश्याचे मुकामीहून पाठविलें ते पावोन बहुत संतोष जाला. यैसेच निरंतर कृपापत्र पाठऊन सेवकास संतोषवीत गेलें पाहिजे. ये प्रांतीचे वर्तमान तर स्वामीस विदितच आहे. धंदा थोडाबहुत चालत आहे. राजश्री आपा ये प्रांते आहेत. आमचा उपराला सर्व प्रकारे करीतच आहे. आमचे शरिराचे वर्तमान तर वेथा अद्याप निशेष जाली नाहीं. उठ्या बसावयाची मात्र ताकत आहे. स्नानसंध्या करून स्वामीचे यशाची वृधि इच्छितों. श्रीभगवान दिवसेदिवस उत्कर्ष करील. सेवेसी विदित होये हे विनंती.

¶*Malhar Dadaji in a letter to the Peshwa expresses his joy at the receipt of a letter from him, and wishes him prosperity.*

No. 212] [24-2-1738 ?

पौ छ २० जिलकाद

श्री

राजश्री चिमणाजी पंडित आपा

गोसावी यासी

सकलगुणालकर्ण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो। फत्तेसिंग भोसले दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन केले पाहिजे विशेष. आपणाकडील कितेक अर्थ बोलणे तो अजम सेखमिराजी व राजश्री महादाजीपंत व राजश्री त्रिंबकराऊ धायेगुडे याणी सांगितला त्याप्रमाणे मान्य करून प्रत्योतर उभयेताजवली सांगितले आहे. उभयेता आपणास लिहितील त्यावरून कलेल. आपल्या व आमच्या श्नेहांत दुसरा विचार आहे यैसे नाहीं. येविशीं मनेमन साक्ष आसें. छ १९ जिलकाद बहुत काये लिहिणें लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Fatesing Bhonsle assures Chimaji Appa of his sincere friendship and support.*

No. 213] [11-3-1738

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे शेवेसी

सेवक कृष्णराव माहादेव साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल चैत्र शुध द्वितीया मंदवासर येथास्थित असे विशेष. स्वामीनी श्रीमंत राजश्री पंत

प्रधान याचें पत्र पाठविलें तें पावलें. वरकड आम्हाकडील वर्तमान तर नवाब नासरजंग यांचा निरोप घेऊन वर्ष प्रतिपदेस घरास आलों. स्वामीस कलावे म्हणोन लिहिलें असे. आमची घोडी तरंगली आहेत. थोडी असुदी जाहली म्हणजे आठा चहूं दिसी श्रीत्रिअयोगिणीस दर्शनास येऊन तिकडून स्वामीचे भेटीस येऊन. कलले पाहिजे. बहुत काये लिहिणे. कृपा लोभ असो दिला पाहिजे हे विनंती.

¶*Krishnarao Mahadeo writes to Chimaji Appa that he has returned home after taking leave of Nawab Nasarjang and intends to meet the addressee soon.*

No. 214] [*11-3-1738*

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. चईत्र शुध द्वितीया शनवारी राजश्री स्वामिनी बोलाऊन नेऊन आज्ञा केली. हरिभक्तपरायेण सुमेरगिरी गोसावी महंत थोर आहेत. लक्षापति यांस आम्ही पालखी दिल्ही. त्याचा खर्चास येक गाव दरोबस्त द्यावासा केला आहे तरी तुम्ही राजश्री चिमणाजीपंत आपास पत्र लेहून आपले जिल्हेमध्ये येक गाऊ नेमून लेहून आणवणें. आम्हीहि आपलें पत्र लेहून देतो. तुम्हीहि पत्र देणें यैसी आज्ञा केली. तें समई राजश्री दताजी वैद्य व भास्कर वैद्य उभयेताजवल मात्र होते. आणीक कोण्ही नवते. राजश्री स्वामिनी गोसावियाची स्तुत बहुत केली. उभयेतानीं साहित्य पुरविलें कीं, गोसावी थोर सावकार राज्यांत आहे. समयास कार्यास येईल. त्यास गाव दिल्हा पाहिजे. राजश्री स्वामी बोलिले की आमचें पत्र गेलियावरी राजश्री चिमाजी आपाहि गाव देतील. त्यावर मागती बोलिले की, गाव डोंगरकाठाडी द्यावा. ज्या गावाला जमीन फार आसेल आणि गला नसेल, च्यारसे रुपये वसूल येत आसेल आसा गाव पाहून द्यावा. भटाब्राह्मणास उदंड गाव दिल्हे आहेत. याकरितां गोसावी यास आगत्य देणे. यैसे पत्र लेहून पाठवणे. आम्ही आपले पत्र देतो इतका मजकूर जाला. आम्ही घरास आलो. यापरी राजश्री स्वामी पत्र लिहितील तेंसमई मजलाहि पत्र लेहून द्यावें लागेल. स्वामीस वर्तमान कलावे याकरितां

---

१ मोकळी.

लिहिले आसे. गाव द्यावा लागतो याकरितां स्वामी पुणे व जुनर प्रांते गाव निवडून ठेऊन लेहून पाठविलें पाहिजे. राजश्री स्वामीची मरजी राहात नाही, विदित जाले याकरितां स्वामी पुणे व जुनर प्राते गाव निवडून ठेऊन लेहून पाठविले पाहिजे. राजश्री स्वामीस पत्र लेहून पाठवितील. स्वामीचे उतर येईल तेव्हा जे विनंती करावयाची ते करून परंतु गाव निवडून ठेवला पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Chimaji Appa is informed by his agent at Satara of the King's desire of granting a village in inam to Sumergiri Gosavi for the expenses of the honour of palanquin conferred on him.*

No. 215] [*8-4-1738?*

श्री

पुा तीर्थरूप राजश्री राऊ
स्वामी वडिलाचे सेवेसी

विनंता उपरी छ २६ जिल्हेजी चाकणेचा वेढा उठोन ते व जानोजी निंबालकर व जुनरीहून मकबूलअलमाची फौज ऐसे हजार बारासे राऊत व तोफखाना ऐसे कालोखास येऊन वेढा घातला आहे. मुलकामध्ये खेड ताा व चाकण तर्फेस घासदाण्याचे रोखे केले आहेत व वैरणकाडी व टोपल्या कवाडे ऐसे नाना प्रकारीचे उपद्रव मांडला आहे. त्याकडे आम्ही शाहाजी नाइकास पत्रें देऊन पाठविलें आहेत. च्यार गोष्टी विचाराच्या सांगतील. आयेकिल्या तरी उतमच आहे; नाहींतरी ये गोष्टींची पेहरवी करणार स्वामी वडील आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Balaji Bajirao writes to his father the Peshwa, that an arrangement should be made to punish Janoji Nimbalkar and Makbul Alam of Junnar, who with their forces are harassing the people in the villages of Taluka Khed and Chakan.*

No. 216] [*27-5-1738?*

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

पो चिमणाजी भीमराऊ व शंकराजी केशव कृा साा नाा विनंती ताा छ १८ सफर जाणून कुशलरूप असो विशेष. स्वामीनी राा होनाजी बलकवडे तीनसे

जमावानिसी आम्हाकडे पाठविले. त्यास रा विठलपंती दोन च्यार पत्रें पाठविलीं होती कीं स्थलाचा लाग केला आहे जमाव खर्चाचे अनकूल करून पाठवावें. त्यावरून तें वृत्त आम्ही सेवेसी लिहिले होते. स्वामीची आज्ञा रा होनाजी बलकवडे यासहि होती जरी साधेस असले तरी साधून घ्यावे व खर्चाचे पाठविले त्यावरून आम्ही येथून रा माहादाजीपंत यास त्याच्या समागमे देऊन रा विठलपंत याजकडे पाठविले. त्याची व त्याची भेटी जाली. त्याचे पत्र आलें तें बजिन्नस सेवेसी पाठविलें आहे त्यावरून निवेदन होईल. त्यास तूर्त कांहीं लोक तेथे गुंतवावे यैसे नाहीं. भेदावाचून कार्य होतें यैसे नाहीं. यास्तव राजश्री होनाजी बलकवडे यास आम्ही पत्र पाठऊन आपणाकडे बोलाऊन आणविले. पत्र पावतांच ते येतील. येथील भरती जाली पहिजे. सेवेसी कलावें म्हणून लिहिले असे, कृपा केली पाहिजे हे विज्ञापना. तेथील वृत्त सविस्तर मकाजीनें यैकिलें तो सेवेसी निवेदन होईल. गनीम सावध असतां लगटानें कार्यसिधि होईल यैसे नाही. यास्तव तूर्त राहाविले असे. वरील लाग अगदी नाही. कृपा केली पाहिजे हे विनंति.

¶*Chimnaji Bhivrao and Shankaraji Keshav report how they are trying seduction to obtain information of the enemy's weak points.*

No. 217] [*Recd. 23-7-1738*?

छ १६ रा लाखर

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. उपरी चववे लोहार व येक सुतार व पांचजण विसाडी यैसे स्वामीनी हुजऱ्यासमागमें पाठविले ते गोरवाडचे मुकामी आले. आकिवाटच्या मोर्च्याचे कामावर राजश्री स्वामीनी ठेविले ते आठदाहा रोज होते. तेहि न पुसतच पलोन गेले. स्वामीस कलावें यास्तव लिहिलें आहे. विदित जालें पाहिजे. * सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Chimaji Appa is informed that certain artisans sent by him have, without permission, left Akiwat, where they were employed by King Shahu.*

No. 218] [*28-10-1738*?

श्रीराम

राजश्री बाजीराव पंडित

प्रधान गोसावी यासी

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो येशवंतराव भाडे सेनापति दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करीते

असिले पाहिजे विशेष. गोसावियाणी पत्र पाठविलें प्रविष्ट होऊन संतोष पावलो. तेथे कितेक निजामनमुलुक याच्या हतगर्वाचा उद्योग धरून लिहिलें. यैशास येतद्विषईचा भावगर्भ राजश्री नारो गंगाधर यांचे भेटीअंती चितांत आणून आपणास प्रत्योतर लेहून मुजरद जासुदजोडी रवाना केली आहे. पत्रार्थ कललाच असेल. तदनुसार भेटीचा निश्चये करून ल्याहावें. भेटी होऊन परस्परे कर्तव्यार्थ तो चितानुरूप करून स्वामीकार्य संपादिले जाईल. प्रस्तुत कोणे स्थली मुकाम आहे, कोणते रोखे भेटीचा योग घडेल ते लिहिलें पाहिजे. जाणिजे छ २९ रजबु बहुत काये लिहिणे? लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶*Yashwantrao Dabhade requests the Peshwa to fix up a day for their meeting to consider how the Nizam is to be brought to his knees.*

No. 219] [*3-12-1738?*

श्री

श्रीमंत राजश्री रामचंद्रपंत
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक राघो नारायेण मो दंतिवरे सास्टांग नमस्कार विनंती. ताा छ २ रमजान मध्यानरात्रपर्येत स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. स्वामीनी राऊत पाठविले व राा रामाजी गणेश यासीं पत्र लिहिलें कीं तोफा कोठें जाल्या जाल्या ते वर्तमान लिहिणे. यैशास तोफा वसईस कोटावर व फिरंगी याचे अरमार चालीस गलबत व फरकते अकरा आली त्यावर तोफा जाल्या यैसे वर्तमान पापडीहून कागदीं आले. त्याणी सांगितले त्यावरून सेवेसी लिहिले असे. सेवेसी श्रुत होये सेवेसी विज्ञापना.

सेवेसी विज्ञापना.

¶*Ragho Narayan reports to Ramchandrapant Baba the arrival of the Portuguese fleet at Bassein and their firing.*

No. 220] [*1738?*

श्री

विनंती उपरी. तुम्ही दोन चिठ्या पाठविल्या त्या पावल्या. फिरंगियाचीं गलबतें व गुराब ४४ चवेताळीस केळवें माहीम येथें आलीं. त्यापैकी गलबत १ बंदरीं लागोन केळवियास लोक २७ सत्तावीस माणूस उतरले म्हणोन तुम्ही

लिहिले. या अजमासावरून बत्तिस सिबाडी च्यार गुराबा मिळोन सात आठसें माणूस असेल. तुम्ही लोकांविशी राजश्री खंडोबास पाठवणें म्हणून लिहिलें त्याजवरून खंडोबास जमावसुद्धां भोज्यन करून पाठवितों. येथून लोक पाठवावें तरी पहिले मोर्चे होते त्या होऊन बंदरावर मोर्चा १ व तोफां लागू करावयाबद्दल मोर्चा १ यैसें दोन मोर्चे जाजती घातले; आणि दोनच्यार दिवसांमध्यें इकडून कूच खणोन मोर्चे पुढें चालविलें. असें असतां आमचे लोकांपैकी दोनसें माणूस तुम्हाकडे पाठविलें तें अद्याप तुम्ही पाठविलें नाहीं. नवे लोक कानडे आले ते वरचेवर तुम्हाकडे पाठविले, आतां दुसरे लोक पाठवावया त्यास अनुकूल पडत नाही. राऊत पाहिजेत तरी लेहून पाठवणें. च्यालीस पन्नास राऊत पाठऊन देऊं. यैवजाविशी लिहिलें तरी आम्हाजवळ रुपया असोन आम्ही न पाठऊं यैसें तुमचें चित्तांत येतें कीं काय ? आरबास रोजमुरा द्यावा लागतो म्हणून तुम्ही लिहिलें त्याजवरून आम्ही खाजगत खर्चाचे रुपये होते ते घालून हजार रुपयांची भरती करून पाठविले. आम्ही कल्याणास रुपयांबद्दल मुजरद जासूद पाठविला आहे, तो आलियावर पाठऊन देऊं. येथील राउतांस व लोकांस रोजमुरा द्यावयास यैवज नाही. आम्हास सा हजार रुपये गोवरीहोन देविलें ते अद्याप आले नाहीं, यैसी येथील खर्चाची हैराणगत जाहाली आहे. रुपया असोन तुम्हास लटकें लिहावें यैसें नाहीं. तोफेविशी लिहिलें तरी संध्याकालची तांदुळवाडी-बाबत तोफ पाठऊन देतों. लोकाचा अर्थ लिहिला त्यावरून कळेल. राऊत शंभर पर्यंत पाहिजेत तरी पाठऊं. मार्गी राउताची डाख ठेवणें. वर्तमान कळ-लियावर उपराळियास चुकणार नाहीं. बाजीराव बेलोसे यांचीं पत्रें पावलीं. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

¶*The writer Malhar Hari says he has no funds and cannot send any. He acknowledges news of the arrival of Portuguese ships at Kelve and Mahim.*

No. 221] [*1738 ?*

श्री

ॡा श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती विज्ञापना यैसीजे. आमचे लोक आताच डामाडूळे[1] जाले आहेत कितेकाचे सरदार स्वामीजवळ आहेत. येथे बारगीर घोडी आहेत. ते आठ

---

१ गोंधळलेले.

पंधरा दिवस जालियावर उठोन जावयाच्या गोष्टी सांगतात. तैसेंच आणख कितेक लोकास पाल पडताल नाहीं व साबर घोडी व रोडे[१] यैसा गाल्हाटा आहे. याउपर आम्हास आज्ञा कर्तव्य ते केली पाहिजे. रा. दुर्गोजी काटकर याचे घर जलालें. उट वोझ्यास दोन होते त्यापैकी येते वेळेस कुरकुंबाजवल येक मृत्य पावला व येक होता तो वैशाखी पुर्णीमेस प्रा(ज)न्य पडला ते दिवशी वीज पडली त्यांत उट व येक मुसलमान खिजमतगार मृत्य पावला. दोन तीन माणसे जाया जाली. त्याचा प्रसंग यैसा जाला. त्याबरून रा. माहादाजपिंत त्यास खर्चास रुा. १०० शेंभर देऊन काग(द) लिहून घेविला आहे सेवेसी कलावे म्हणून लिा असे. आम्हाजवळ राऊताचा भरणा दोनसे पंचेतालीस. त्यापैकी रा माहादोबानीं सिंदखेडास राजश्रीचे भाचे[२] गेले त्याजबाा चालीस राऊत धालवडे वगैरे पाठविले व आनंदराव सिरके ३ यशवंतराव रणभोर २ यैसे पांच जण लग्नाबदल निरोप घेऊ(न) स्वामीकडे पाठविले. बाकी दोनसे स्वार आम्हाजवल आहेत. याउपर लोक गवगवा करितात. याकारिता याची तरतूद करणार स्वामी समर्थ आहेत विशेष. नांदणी व कोा राजुरीविसी स्वामीनीं सरदारास दोन च्यार पत्रें पाठविलीं त्यास रक्षण करता दोन स्वाऱ्या जाऊन नांदणीची गुरें आणिलीं होती ते सोडविली. हली रा बालोजी डुबल व सिदोजी थोरात, व भापकर व मिरजकर व जाधवराव यैसे जाऊन पाच सातसें गुरें आणिलीं. मिरजकराकडे तीनसे गेली होती तें बुडविली. यानीहि कितेक बेइमानीच्या गोष्टी सांगितल्या. बालोजीकडील घोडे पडले होते याकरिता दीडसे रुपये खंडणी करून नांदणीहून महिपतराव येऊन गुरे सोडून नेली. आम्ही बहुतप्रकारें सर्वांस सांगितले. गोष्ट मान्य केली नाही. रा माहादोबास लिहिलें, परंतु प्रतापगडचे स्वारीमुले जौबसाल आला नाहीं. आम्ही रुसावा करून यावें तेहि गोष्ट कार्याची नाही. केवल गुरे देऊ. द्यावी तर कार्यास नाही. मग सिरस्ता करू. गुरें सोडविलीं हें यश बालोजीनें घेतलें. याचें पारपत्य करणार स्वामी समर्थ आहेत. वरकड रा वेंकटराव याच्या स्थलास उपद्रव लागला नाहीं. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापी.

¶*Letter addressed to Chimaji Appa by some sardar who explains the disorder of his troops. If Vyankatrao mentioned at the end is that of Ichalkaranji, the affair may refer to some trouble in connection with Sambhaji of Kolhapur.*

---

१ रोडकीं. २ दर्याबाई निंबालकर इचा मुलगा.

4640

No. 222] [February 1739 ?

(आरंभींचा भाग फाटला आहे.)

* कोटीला तुम्ही मजल दरमजल जाणे म्हणून कितेक प्रकारे राजश्री स्वामीनी खास दस्तकाची पत्रे उभयेता श्रीमंतास लिा आहेत. कासिदास आज्ञा केली आहे कीं आठवे दिवसी श्रीमंताचे लस्करात दाखल व्हावे आणि पत्र त्यास प्रविस्ट करावे म्हणून आज्ञा येविसी राजश्री गोविंदरावजीसहि पत्र राजश्री स्वामीनी लिा आहे कीं तुम्ही श्रीमंतास सांगून ताबडतोब मजल दरमजल पुढे जात ते गोस्ट करणे म्हणून पत्र लिा आहे. राजश्री स्वामीचें वचन पूर्वी अवरंगजेब पातशाहा होते त्यासी गुंतले आहे कीं तुम्हावर कोन्ही परचक्र आले तर आपण तुमची कुमक करावी, सर्वस्वे जेथपावेतो होईल तों-परयेंत साहित्य करावें. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The last few lines of a very important letter wherein King Shahu desires the Peshwa to advance rapidly to oppose Nadirshah as he has solemnly promised Aurangzeb assistance, whenever the Empire should find itself in difficulty.*

No. 223] [17-3-1739

छ १९ जिल्हेज

मुा * प्रां खानदेश

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे शेवेसी

विनंती आज्ञाधारक यादव त्रिंबक कमाविसदार पा जेनाबाद वगैरे कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तो धर्म स्वामीचा आहे. कल्याण-वैभवलेखन आज्ञा केली पाहिजे. यानंतर सेवकाचें वर्तमान ता छ १७ जिल्हेज मुा बऱ्हाणपूर क्षेमरूप असों. स्वामीनी आज्ञापत्र पाठविले ते मस्तकीं वंदून परम हर्ष जाहला. आज्ञा जे गुलाल घेऊन हजुर दर्शनास येणें. लाहादे समीप येणें. त्यावरून गुलाल तयार करऊन मार्ग लक्षिला. त्यास हुताशनीस येणे जालें नाहीं. तूर्त मुकाम लस्करचा कोठे आहे? तत्वता न कळे याकरितां भेटीस येणें जाहलें नाहीं. विशेष येथें न्याहालचंद मोतीचंद साऊकार आहेत त्याचें घरी उतरेंहून वर्तमान आलें. त्याच्या गुमास्तियांनी दिलीहून लिहिलें आहे जे फालगुन शुध प्रतिपदेस महमदशाहा कैद होऊन नादरशाहा तख्ती बैसोन द्वाही फिरली. सादतखान भडभुंजे यासी नायेबत दिल्ही. तेथील

वर्तमान या तऱ्हेचें जालें. कितेक तपसीलवार ल्याहावें तरी स्वामीपासी विदित असेल. तेथें आमचें लिहिणें कायें आहे. परंतु विज्ञापना येक आहे जे, या मार्गे आलिया उतम आहे. या स्थलचा विचार येक प्रकार आहे. स्वामीचा जय आहे. आम्हास सुचनें, कीं लक्ष प्रकारें या * * पाहिजे. उंटाविर्सी आज्ञा * * * हेत आणि उबा * * * *

¶*Yadav Trimbak, Kamavisdar of Jainabad, writes news from the North that Mahmadshah has been made a captive and Nadirshah has declared himself Emperor.*

No. 224] [*29-3-1739*

पौ छ २ मोहरम

श्रीराम

श्रीमंत राजश्री रावजी स्वामीचे
सेवेसी

पोष्ये नारो रामचंद्र सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २९ माहे जिल्हेज दोन प्रहर दिवस जाणौन स्वकीये कुशललेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. छ २६ जिल्हेजीचें आज्ञापत्र आलें तेथें दोनसे माणूस चांगले, दारू-गोली सरंजामसुधां वसईस जलदीने पत्रदर्शनीं पाठवणें म्हणौन आज्ञा. यैशास आज्ञेपूर्वीच फिरंगियाची बातमी कलली. त्याजवरून साष्टी वसई मिलोन दोनसे माणूस रवाना केलेंच आहे. आणखीहि रतनगड व कलोलगड वगैरे जागांचे बंदोबस्त राखोन कांहीं लोक आणविले आहेत. आल्यावरी मागाहून तेहि वसईस रवाना करून. गनिमाची बातमी राखोन वरचेवर लेहून पाठवणे म्हणौन आज्ञा जाहाली. त्यास उरणास दोन माहागिऱ्या नेहमी ठेविल्या आहेत. मुंबईहून वरचेवर उरणच्या मार्गे बातमी येतच असत्ये. अधिकोतर कलल्यावर सेवेसी लेहून पाठऊ. बहुत कायें लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*Naro Ramchandra as instructed sends reinforcements to Bassein and promises to send more from the adjoining province.*

No. 225] [*31-3-1739*
नकल

हू

इजत-आसार[१] त्रिंबकपंत बआफियेत बशद दरिविला आंखबर शाहाजाबादेहून आली जे छ १२ जिल्हेजी कासमबेगखान नामे सरदार वीस हजार स्वार नवेकर[२]

---

१ सुप्रतिष्ठित. २ नोकर तहमासकुलीचा.

तहमासकुली जो निजामुलमुल्काचे जबाबस्वालाचे दरमियाने होता त्याणें काबू करून हजरत नवाब साहेब यांचे मसलहतेने तहमासकुलीस व त्याचे लेकास दिल्लींत दाखल होतेवेलेस काबू करून मारून घेतले व नादरशाहास कयेदेंत केले व त्याचे लोक तमाम लस्करचे लोकानीच मारले. तकरीबें[1] दाहा हजार मनुश त्याचे मारले गेले, व मा। शाहा दिल्लींत किल्यामध्यें दाखल जाले. तहाफजल इलाही हाजरत नवाब साहेबाचा बोलबाला व सादतखान त्या लडाईंत मारला गेला. तयेमुरियांची बादशाईत कायेम जाली व तुम्ही लिफाफा ता। छ २६ जिल्हेजी पाठविला तो पावला. हकीकत माल्लुम जाली. आयेदे पयेबीन हकीकत मुफस्सल[2] लेहून पाठवीत जाणे. ताकीद जानणे मोरतब सुद छ २ मोहरम.

¶*News from Delhi reporting the massacre of several of Nadirshah's troops and himself being imprisoned with his son.*

No. 226] [*March 1739*

[आरंभींचा बराच मजकूर फाटण्यांत गेला आहे.]

काल छ १८ रोजी असफज्याहा हतीवर बसोन लश्करापासून कोसावर पेशखाना उभा करून तेथे गेले. तोहमासचा इलची भेटीसि आला. भेट जाहालियावर स्वार होऊन तोहमासचे लश्करास गेले. प्रथम सादतखानापासी जाऊन बसले त्याचा समाचार घेऊन मग तोहमासचे भेटीस गेले. गोष्टमात बोलीचाली होऊन रुकसत जाहाले. येक कुडती व येक पटका व टोपी तीन वस्त्रे खिलत दिधली तेथून स्वार होऊन लश्करास संध्याकाली आले. जाहिरी बोली हेच आहे की, पातशाही बेजाबीत जाली, सरदार कोण्ही कोणास न मानीत, पातशाह खिलाफ * * ई वर्तो लागले, बंदोबस्त तुटला मऱ्हाटियानीं शोखी केली, हे येकोन आम्ही इरादा केला जे, पहिल्यापासून इरानचे पातशाह हिंदुस्थानचे पातशाहीस कायेम करीत आले आहेत यास्तव आम्ही आलो. केवल पातशाही इरादा धरीत नाही. तुमचे पातशाहीचा बंदोबस्त करून जावे. असफज्याहाने उतर दिल्हे की बेहतर पातशाहास दिलीसे नेऊन बसवावे. शाहाजादा (ने) ऊन तुम्ही आम्ही बंदोबस्त करावा (अपूर्ण)

¶*A mutilated letter refers to the visit of Nizam-ul-mulkh to Nadirshah and their discussions.*

---

१ जवळ जवळ. २ सविस्तर.

No. 227] [9-4-1739

श्री

श्रीमंत माहाराज मातुश्री आईसाहेब यांणी राजमान्य राजश्री बाजीराव पंडित प्रधान यासी आज्ञा केली ऐसीजे: तुम्ही विनंतीपत्र पाठविलें तें पावलें. तेथें लिहिलें जे माहाराजानी वडलिपणें पोख्त विचार मनांत आणोन आज्ञा माहराजास व मजला करावी म्हणोन व चिरंजिवास सविस्तर लिहिलें तें कळलें. ऐसियासी येथील मनोदय तुम्हीं यावें आणि चिरंजिवास व तुम्हास उचित तेंच सांगून ज्या गोष्टीनें राज्याची अभिवृध्दि व तुम्हांस श्रेयस्कर असेच चालविण्याविसी आज्ञा करून करवावें; परंतु तुमचे येणें कालेकरून वड़णार आणि यांस क्लेश भोगण्याची सीमा राहिली नाहीं. त्यापक्षीं याचें समाधान तेंच रक्षून तुम्हीं सर्व राज्यभार चालवावा हेंच तुम्हांस योग्य आहे. येविसी सर्व चिरंजिवानीं लिहिलें आहे त्याजवरून कळेल. चिरंजिवा(चें) लक्ष तुमचें ठाई दुसरें नाहीं. तुम्हींहि दुतर्फा किंतु वाढऊ नये हेच चांगले वाटते. विस्तारे काय ल्याहावे? जाणिजे छ ११ मोहरम. बहुत लिहिणे तरी सूज्ञ असा.

¶*Tarabai joins with King Shahu in leaving the whole administration to the care of Bajirao and having full reliance in him.*

No. 228] [10-5-1739

नकल

श्री

राजश्रिया विराजित राजमान्ये राजश्री तुबाजीपंत स्वामी गोसावी यासी

पोष्यें बाजीराव बलाल प्रधान नमस्कार विनंती. उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे. यानंतर येथे काही नाजूक कार्य आहे, यास्तव हशम लोकं पाहिजेत त्यास रा। रेणोराऊ याजसमागमे दोनसे माणूस आहे ते व बावाजी बलकवडे यास पत्र लिहिलें आहे, त्याजकडून निवड माणूस शंभर येकून तीनसे माणूस चांगले लस्करासमागमे आणणें. परंतु मावल्या लोकाजवल तरवारा आहेत, त्याजमुले मावले आलेसे शौरत[1] होईल. यास्तव तरवारेस गेलेफ[2] करून ज्या रीतीने बरकंदाज येतात त्या प्रकारें येत, शौरत येकंदर न होय तें करणें. तीनसेह माणूस अगत्य समागमे घेऊन तुम्ही लौकर येणे जाणिजे.

---

१ प्रसिद्धि, कीर्ति. २ अभ्रा, आवरण.

छ १२ सफर. हें काम थोर उमेद आहे. यास्तव लोक मावळे आलेसे बोभाट होऊ न देतां घेऊन येणें. टाकोटाक शाहाणा माणूस कावनईस पाठऊन लोक टाकोटाक आणवणें आणि स्वार होऊन लौकर येणें. पुढील कालोखे जवळ आले. कालोखियांत काम करावें लागते. ईश्वरइच्छेनें काम जालियास द्रव्ये प्राप्तहि आहे व स्थलहि आहे. संवज्ञा लिहिली आहे. समजून काम करणे. वसई फते जालियाचे वर्तमान तुम्हास कळलेच असेल. आता आपाहि लौकरीच वरते येतील. नासरजंग नांदेडापलीकडे आला आहे. छ १२ सफर दीड प्रहर रात्र पहिली. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Bajirao asks Tubaji Pant to send three hundred picked men to execute an urgent piece of work. Now that Bassein is captured Chimaji Appa also will follow soon, says Bajirao.*

No. 2201 *[12-4-1739*

श्री

श्रीमंत राजश्री आपा
यांप्रति

वासुदेव दीक्षित आसीर्वाद उपरी. येथील क्षेम चैत्र शुध पौर्णिमा गुरुवार जाणऊन स्वकीये कुशल लेखन करणे विशेष. बहुत दिवस आपणाकडील पत्र येऊन वर्तमान कळत नाही. यैसें नसावें. येणारासमागमें कुशल वृत व वसइचें वर्तमान लिहीत असावें. तेणेकरून समाधान. वसईविषीं अनुष्ठानास ब्राम्हण वीस लाविले आहेत. उपाये बहुत केला आहे. श्रीइच्छेनें सत्वरीच हस्तगत होईल. यानंतर श्रीमंत राजश्री राऊ ब्म्हाणपुराजवळ आहेत. खानदेश प्रांते मोगलांची ठाणीं उठऊन आपली बसविली; व याप्रांती रा संकराजी निकम यास आज्ञा आली आहे. अवरंगाबाद गिरदींत अमल बसविला. कोठें-कोठें बसवणें राहिला आहे तोहि सत्वरीच बसेल. गांडापूर वाळूज येथील साडेबात्रीस हजारांवर खंड जाहला. रा मानाजी जाधव यानी हवाला घेतला. रोखा राजश्री रायाचें नावें त्याजपासून घेतला. याप्रकारचें वर्तमान कळावे म्हणून लिहिलें असें. इंद्रप्रस्छांत पश्चमेचा येवन येऊन बसला आहे. शहरांत जनांचा बहुत संव्हार केला. परमदुष्ट हिंदुलोकांचा द्वेष्टा आहे. परिणाम कैसा होईल तो पाहावे. सादतखान आपमरणेंच मेला. कळले पाहिजे. बहुत काये लिहिणें हें आसीर्वाद.

¶*Wasudeo Dikshit supplies Chimaji Appa with the news received from various quarters. He writes that Bajirao is in the vicinity of Burhanpur subjugating territory in Khandesh. The writer also refers to the occupation of Delhi by Nadirshah.*

4645

No. 230] [16-4-1739?

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोसी कृतानेक नमस्कार विनंती, येथील कुशल ताा छ १८ मोहरम जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. राजश्री पिलाजी जाधवराव याजकडे रुो १००० हजार नेमिले आहेत त्यापैकी मारानिलेनी वेदमूर्ति राजश्री जनार्दन देव यांस रुपये १०० येकसे देविलें आहेत. त्यास सदर सेंभर रुपये स्वामीकडे पाठविले आहेत हे घेऊन जनार्दन देव याची वरात आमचे नावे राजश्री पिलाजी जाधवराव याणी दिल्ही आहे ती स्वामीचे दप्तरी असेल ती आम्हाकडे पाठविली पाहिजे, व रुपये याचा जाब पाठविला पाहिजे. लशकरचे वर्तमान लिहिले पाहिजे. बहुत काय लिहिणे? लोभ करीत गेले पाहिजे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi requests the Peshwa to send to him a transfer bill of money drawn in the name of Janardan Deo.*

No. 231] [29-4-1739

श्री

श्रीमंत राजश्री आपा
साहेबाचे सेवेसी

विनंती आज्ञाधारक आवजी कवडे दंडवत विज्ञापना. येथील क्षेम ताा छ १ सफर मुकाम नांदगाव पेठ प्राा वराड साहेबाच्या कृपादृष्टीकरून सेवक लोकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. साहेबी कृपालु होऊन छ २८ जिल्हेजचें आज्ञापत्र सादर केले ते छ २८ मोहरमी कुन्हियाच्या मुकामीं पावले. पावोन सविस्तर आज्ञापत्रीच्या अर्थावरून सेवकलोकास उत्तेजन जालें. मुख्य गोष्टी त्यांचा काल अनकूल, यास्तव इस्वरे यैसा न घडता प्रसंग घडविला. ते गोष्टीचा बदला करावा म्हणऊन सावर धरून वराड प्रांतातून जात होतो. त्यास राजश्री आपाजी सोमवंसी सरलस्करहि येऊन आम्हास भेटोन आटोलियांच्या विचारें त्यांचें आमचें सौरश करून घ्यावे या हेतूनिमित्य ते आम्ही मिळोन नागपूरच्या रोखें चालिलो. हें वर्तमान भास्करराम यानीं यैकताच दुरस्थ बस्तरच्या मुलकांत गेले. वरचेवरी राजश्री सरलस्कर यासीं जाब लिहिले आणि संपादिला अर्थ रक्षून दूर गावीं तोडून गेले. आम्ही त्यांच्या पाठीलागेच जावे तरी सरलस्करच्या विचारें की आम्ही असता हर्शामर्श कामाचा नाही. याजकरतां देवगड प्रांतातून आज्ञेप्रमाणें गढेमंडलियात जाऊन संस्थानिकास शह देऊन

मुलुक सोडावा, पुढे त्यास लक्षून पटणियाकडे जाऊन द्यावे, या विचारे छपारियावर गेलो तो श्रीमंत राजश्री पंत प्रधान साहेबाचें आज्ञापत्र सादर जालें कीं तुम्ही वराडप्रांते येऊन मोगलाई अमलाचा बंदोबस्त करणे, पुढें न जाणे. आज्ञेप्रमाणे रा सरलस्कर आम्ही कुन्हेपरियेंत आलो. आम्हास अमलाचा विचार मनास आणणें यास्तव त्याणी कूच करून श्रीमंताकडे भेटीस गेले. आम्ही वराड प्रांतीचा बंदोबस्त करावा यानिमित्य त्या जिल्हियात असो. इकडील बंदोबस्ताचा अर्थ मनास आणून श्रीमंताच्या दर्शनास जातो. भेटी होऊन जे आज्ञा करितील ते सेवक लोकास प्रमाण आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Avji Kavde to Chimaji Appa that after his defeat by Raghuji Bhonsle he gathered together the remnants of the fugitive army to give Raghuji another battle when he was joined by Appaji Somwansi who advised a conciliatory policy and undertook himself to restore friendly relations with Bhonsle. The two (Kavde and Somwansi) marched towards Nagpur to meet Bhaskarram, Bhonsle's Commander, who however evaded meeting them by striking a retreat into the interior. While Kavde was going towards Garha and Mandla he received a communication from the Peshwa according to which he was going back to Berar.*

No. 232] [*30-4-1739 ?*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे शेवेसी

पोष्य वासुदेव जोसी कृा ना॥ वि॥ येथील कुशल ता॥ छ १ माहे मोहरम जाणून स्वकीय लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. रा॥ विठल सिवदेव यासमागमे स्वार स्वामींनी पाठविले त्याणी येथे आम्हाजवली उतम प्रकारें चाकरी केली. त्या उपरी स्वामीनी रा॥ कृष्णराव याजकडे स्वार देविले त्यावरून विठल सिवदेव यासमागमें स्वार देऊन मा॥रानिलेकडे रवाना केलें. त्यास याणी जाऊन तेथें त्याजवलीहि बरीच चाकरी केली. त्यास त्याचा व राजश्री राणोजी भांडवलकर याचा बनाव न जाहाला याकरितां हे स्वार स्वामीकडे उठोन आले. भांडवलकर व रा॥ मानाजी कोकरे याणीही चाकरी उत्तम केली परंतु बनाव जाला नाही यास्तव आले आहेत. याचे चाकरीस काही बोल लावावा यैसे नाही. सर्वजाण स्वामी आहेत. बहुत काय लिहिणें लोभ करीत गेले पाहिजे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi while commending highly the services of Vithal Shivdeo's contingent reports that its return to the Peshwa's army is due to its differences with Bhandavalkar.*

4647

No. 233] [3-5-1739

श्री

श्रीमतु राजश्री आपास्वामी
साहेबाचे सेवेसी

चरणरज रेणुराय यादव चरणांबुजावरी मस्तक ठेऊन सा॥ नमस्कार विनंती विज्ञापना येसीजे. आज्ञाप्रमाणें राजश्री तुबाजी आनंत वोझरावर होते यांजपासीं अलो. श्रीमंत राजश्री मल्हार दादाजी यांसी भेट जाहली. त्यास यानी सांगितले कीं राजेश्री बाबूजी नाईक व दखनीमिया व नरसीपंत घाटपांडे यास मखबुल आलमाने श्रीमंत राजश्री रायाकडे पाठविले आहे. नाईक स्वार होऊन तापीपुरास गेले. त्याजवरून तुबाजीपंतावार होतो; आनी राजश्री नाईक साहेबाकडे पत्र पाठविलें होते. त्यास काल तेथून नाईक साहेबाचें आज्ञापत्र आलें कीं सत्वर जमाव पायेचा घेऊन येने. टोक्यावरच आहेत. त्यास काले[१] छ ९ सफरी ततक्षनी स्वार होऊन कवोडीयास आलों. आज[२] स्वार होऊन सोल्छर कोकमठानास गेलो. परवा आदितवारी खानखा नाईक साहेबापासी जाऊन पोहचतो. राजश्री गोपिनाथ हजारी व जोरावरसिंग हजारी यांस राजश्री तुबाजीपंती राजश्री नारोपंत कारकून कावनयेचे त्यांचे स्वाधीन करून कावनयेस पाठविले तिकून त्याचे स्थल सनिध आहे. जो प्रेयत्न करने तो ते करतील. श्रीमंत राजश्री रावसाहेबी बुऱ्हानपुराहून चरणरजास आज्ञापत्र पाठविलें तें परवां येथ आलें. त्यांत आज्ञा जे राजश्री बाबुजी नायेकास पायेचा जमावाचे आगत्य आहे. सत्वर जाने (पुढील बंद गहाळ.)

¶*Renurai Yadav to Chimaji Appa, informing him that as directed he (the writer) was proceeding to meet Babuji Naik.*

No. 234] [15-5-1739

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे शेवेसी

विनंती आज्ञाधारक मलार दादाजी सा॥ नमस्कार. विनंती येथील कुशल ता॥ छ १७ सफरपावेतों ये प्रांतीचें व शेवकाचें वर्तमान येथास्थित असे. यानंतर नासरजंग नांदेडास आलियाचें वर्तमान रा॥ शामजी गोविंद याचे औरंगाबादेहून

---

१ गुरुवार. २ शुक्रवार.

पत्र आले त्याची नकल सेवेसी पाठविली आहे त्यावरून विदित होईल. वसई फते जाली, निशाण चढलें म्हणून वर्तमान येकिलें. बहुत संतोष जाला. पुढें तेथील बंदोबस्त करून वरघाटीं यावया विचार आपण केलाच असेल. ये प्रांती स्वामीचें आगमन जालियानें उतम आहे. छ ११ सफरचे स्वामीचे आज्ञापत्र आलें तें पावलें. रा तुबाजी अनंत यास श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीनीं बोलाविलें. येका दो दिवसी कूच करून जातील. विदित होये खानदेश वगैरे खजाना आम्हाजवल येतो तो आम्ही येथून कावनईस पावता करतो त्यास रा बावाजी व बहिरजी बलकवडे घेऊन पुढे स्वामीकडे प्रविष्ट करावय अनमान करितात. रा घेत नाही यास्तव विनंती लिहिणें लागली. कृपाल होऊन येक ताकीदपत्र बलकवडे यास पाठवावयाची आज्ञा केली पाहिजे कं मलारपंत येवज तुम्हाजवल पावता करितील तुम्ही वसईस रवाना करीत जाणें अनमान न करणें. यैसे ताकीदपत्र आलें म्हणजे ते ऊजुर करणार नाहं हे विनंती.

¶*Malhar Dadaji Barve to Chimaji Appa expressing his satisfaction on hearing of the success at Bassein. The writer further requests him to issue strict orders to Balkawde to take the cash to Bassein from Khandesh, which he refuses to do.*

No. 235] [*23-5-1739* ?

छ २९ सफर

श्रीराम

पुरवणी श्रीमंत राजश्री
राऊ स्वामीचे सेवेसी

विज्ञापना. कानोजी नाईक सेलार किले रतनगडास असतात, त्यांचे शरीर-संबंधी कबिलदार लोक पाच सात सरदार मिलोन पांच सातसे माणूस पनाल प्रांती राजश्री छत्रपति स्वामीपासी निकटवर्ती सेवा करून होते. त्यास सांप्रत पनाला किला राणीकडे माहाराजानीं दिल्हा. लोकहि त्याणीच मागितले. परंतु जावयासी रजावंत नाहीं म्हणोन लोकाविसी राणीचे चितांत विपर्यास आला. यामुलें तमाम जमाव कबिलासुधां माहाराजांची आज्ञा घेऊन सरकारतर्फेस येणार. येतांच कबिलियास जागाजुगा असावी म्हणोन कानोजी नाईकास त्याणी पत्र लिहिलं होतें. त्याचा अन्वय मारनिलेनी रतनगडाहून लेहून पाठविला तेच पत्र बजिनस सेवेसी पाठविले आहे. मनास आणून आज्ञा करणें ते करावी त्याप्रमाणें

लोक या प्रांती आलियावर कबिले धांग्यास लाऊन हुजूर दर्शनास येतील. माणूस विस्वासूक पुरातन राज्यांतील येका गाव्याचे आहेत याचा संग्रह खामखा असावा, सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Kanoji Naik Selar and his retinue are recommended for the Peshwa's service probably by Mahipatrao Chitnis, the writer.*

No. 236] [10-8-1739?

श्री

राजश्री पंतप्रधान
गोसावी यासी

ॐ श्रीमंतसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्नो पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती उपरी. येथील कुशल ताा छ १९ जालेवल पावेतो येथास्थित असे विशेष. सटवोजी रणनवरे स्वामीचे सेवेवरी खर्च जाले याच्या मुलामाणसाच·संरक्षण करावे हे आपणास आगत्य आहे. सांप्रत त्याचे पुत्र जानोजी रणनवरे सेवेसी आले आहेत तरी याजविसी राजश्री आपास पत्र देऊन तूर्त खर्चाची बेगमी करावी. आपली येक दोन तटे थोर आसतील ती घेऊन बरोबरी चाकरीस येतील. विशेष काय लिाा कृाा आा दीाा हेाा विाा

¶*Pilaji Jadhao recommends to the notice of the Peshwa Janoji Rannavre who had lost his father Satvoji on Government service.*

No. 237] [1-9-1739

छ ११ जााखर

श्रीगणपतिर्जयती

श्रीमंत राजश्री आपा
साहेबाचे शेवेसी

सेवक कृष्णाजी कदम कृतानेक सां दंडवत विनंती येथील वर्तमान ताा छ जमादिलाखर सनिवारपावतो साहेबाचे मेहेरबानी करून येथास्थित असे विशेष. साहेबीं पत्र पाठविलें तेथें आज्ञा जे त्वरेनें निघोन जाणें. त्यास आज्ञेप्रमाणें बुधवारी घरीहून निघोन लष्करांत राजापुरचे मुकामीं दाखल जाहालों. ते मजल दरमजल कालीं अकुलनेराजनीक राहिलो होतो. आजि सिनेच्या तीरीं मुकामी नेमिला

आहे तेथें जातों. मानाजी पायेगुडेहि येऊन भेटले. म्हालोजी मुठेहि आजी येऊन भेटतील. तीन कोसाच्या अंतरे राहिले आहेत. राजश्री मल्हारजी होलकर व राणोजी सिंदे मंगळवारी छ ४ जमादिलाखरीं भोकरदनाहून कूच करून गेले. आम्हीही नगर डावे टाकून बाबूलसर अगर करंजीच्या घाटें उतरोन जातो. मागील लोक येणार होते याकरितां दोन तीन मजली लहान केल्या, याउपर लांब लांब मजली करून जातों. राणोजी बरगे व खेत्रोजी आनपट वगैरे कितेक समजाविसी घेऊन नस्टाई करून मागे राहिले आहेत. अद्याप आले नाहींत. राहिलेच तरी त्याची नावनिसी मागाहून लेहून पाठवितों त्याप्रो पारपत्य केले पाहिजे. वरकड वर्तमान केदारजी जासूद विनंती करितां श्रुत होईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Krishnaji Kadam informs Chimaji Appa of his having started and of Malharrao Holkar and Ranoji Sindia also having already left.*

No. 238] [*16-9-1739?*

पो छ ३० जमादिलाखर

श्री

पुा तीर्थरूप राजश्री राऊ
व तथा राजश्री आपा स्वामींचे
सेवेसी

विनंती उपरी राजश्री सिदोजी थोरात आपले जमावानसी येथे आले. त्यांस राजश्री नारबावानीं छ २३ जमादिलाखरी प्रात:कालीं होऊन राजश्री स्वामीस भेटविलें. राजश्रीनीं आपले अंगावरिल पासोडी दिल्ही. बावानीं अर्ज केला कीं यास राजश्री फतेसिंगबावाकडे चाकरीस ठेवावयाची आज्ञा करावी. त्यावरून राजश्री स्वामीनीं राजश्री रामजीपंतास आज्ञा केली कीं राजश्री फतेसिंगबावास सांगून यांस चाकरीस ठेवणे. विदित जालें पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Sidoji Thorat is ordered by Shahu to be employed under Fatesing Bhonsle.*

+ २८-८-१७३९.

No. 239] -1739?

पो छ ४ रजब

श्री

श्रीमंत राजश्री राऊ साहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक नारोशंकर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ २७ जमादिलाखर स्वामीच्या कृपाकटाक्षेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असें विशेष. आज्ञापत्र सादर जालें तेथें आज्ञा जें. किल्ले हरीश+ येथील जागिरीचे गांव परगणे पाटोदे येथें आहेत. त्या गांवीच्या अमलास परभारें लोक पाठऊन तगादा न करणे व पेशजीपासून जागिरीकडे गांव असतील त्यांची तहकिकांत करून गांवगन्ना हुजुर लेहून पाठवणें. ऐशियास सेवकापासून अंतर पडणार नाहीं. जागिरीचे गांवाविशी दोन चार वेळां सेवेसी विनंतीपत्रें पाठविलीं परंतु हुजुरून गांवांविशी ताकीदपत्र कमाविसदारास अथवा सनदहि न आली. जागिरीचे गांवांचें तें ठिकाण नाहीं. सरकारांत किल्ला आलियावरी उज्याड गांवचे ठिकाण लाऊन कोल दिलासा देऊन आबादीस लाविलें. दोन च्यार गांवींचा माल जप्त केला असतां आबाजी गोविंद यांणीं पाटील कुळकर्णी यांस तगादा करून जबरदस्तीनें गांवींचा पैका घेऊन खराबीस मेळविलें. किल्याचे खर्चास ऐवज तो पाहिजे म्हणून माहादजी रघुनाथ यास कमावीस सांगितली. मशारनिलेनीं जागिरीचे ऐवजीं रसद दोन हजार किल्याचे बेगमीस दिले. अंबाजीपंतांनीं वसूल नेला. या गृहस्थाचा रुपया एक उगवला नाहीं. आमचे निजबतीस गांव असिले तरी सरकारचेच आहेत व किल्लाहि सरकारचाच आहे. तेथील बेहबुदी धण्यासच करणें येविशीहि विनंती समक्ष सेवेसी आलिया-वरी करून पुढें धण्याचे आज्ञेनुरूप वर्तणूक केली जाईल. सेवकांवरी कृपादृष्टीनें अवलोकन करून आबाजी गोविंद यास येक ताकीदपत्र पाठवावें. जे गांवींचा रुपया घेतला असेल तो माहादाजी रघुनाथ याचे स्वाधीन करणें. तिकडे ऐवज जमा जाहाला तरी सरकारचाच अथवा किल्ले मजकुराकडे जमा जाला तरी सरकार-चाच. स्वामीचे आज्ञेव्यतिरिक्त तिलतुल्य होणार नाहीं. सेवकावरी क्रोध न करावा. ब्राम्हणाचे दोन हजार रुपये फसले आहेत; उगऊन देणार धणी, समर्थ असेत. सदरहु जागिरीचे गांवांविशी सरकारची सनद पाठविल्यानें उज्याड गांवीची वस्ती होईल. आबादी जाहालियावरी स्वामींनीं जिकडे देवावयाचें तिकडे

+ त्रिंबकच्या पश्चिमेस चार मैल.

द्यावें. आज्ञा उल्लंघन करणार कोण आहे? आबाजीपंतीं गांवीचा रुपया नेऊन गांव खराबीस मेळऊन उफराटी आमचीच नालिस हुजुर लेहून पाठविली हेंच अपूर्व आहे. सविस्तर वर्तमान सेवेसी लिहिलें; याजउपरी धण्याचें मर्जीस येईल तेंच प्रमाण. बहुत काय लिहिणें हें विज्ञापना.

¶*Naro Shankar requests Bajirao to reconsider the matter of the villages in Jahagir assigned to the writer under the jurisdiction of the Fort Harish.*

No. 240] [24-9-1739 ?

छ १ रजब

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ

तथा राजश्री आपा स्वामीचे शेवेशी

विनंती उपरी दहिगांवचे ठाणियाचा येत्न आपण बहुतप्रकारें करून राजश्री स्वामींचे मनोरथ सिधीस पात्रात्रे यैसे आहे. त्यास अद्यापि ठाणें कांहीं हस्तगत जालें नाहीं. येथें लोक बोलतात की निंबालकर येकायेकी ठाणें देतील हें होणें नाहीं. ठाणें हस्तगत व्हावयाचे धंदीरच आहे. त्यावरून रा। आम्हास पुसतात की रा। प्रधानपंत दिवसेदिवस मजलदरमजल चालिले. दहिगावचे ठाणेयाचा निर्गम कांही अद्यापि दिसत नाहीं. तस्मात टाला दिल्हा की काये तें न कळे, यैसे बोलतात. तर स्वामीनी दहिगांवचा निर्गम करून राजश्रीचें मानस पुरविलें पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञा.

¶*Letter from Purandare informing the Peshwa of the King's anxiety about the capture of Dahigaon and explains to him as to how the protracted affair has ultimately led the King to doubt the Peshwa's sincerity.*

No. 241] [*24-9-1739 ?*

छ १ रजब

श्री

पुरवणी राजश्री राऊ व ता।

राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. राजश्री संताजी जाधव भोईजकर हुजूर आले आहेत. त्यानीं राजश्री स्वामीजवळी आमचे रुबरु विनंती केली की आमचे परगणे आवजी

कवडे लुटीत आहे, मोजे सिरूर पाा गांडापूर येथील बाजार कुली लुटिला. गावास उपसर्ग दिल्हा. वाडियांतील कोठी ते गावी होती त्याचीहि वस्तभाव जिनस लुटून नेला. सांप्रत पाा अंबेलनेर येथे जाऊन मुलकास उपद्रव केला आहे. बाबती व सरदेशमुखी मनास माने तसी मागताती. साल गुदस्तास पाां आकस करून खंडणी जबरदस्त केली. वसूल घेतला त्यामुलें परगणा खराब जाला. आपला पुत्र येक जमावानसीं चाकरीस ठेविला, त्यापासून चाकरी घेऊन दाम दिल्हा नाही. यैसे साविस्तर वर्तमान हूजूर विदित केलें. त्यावर राजश्री स्वामीनी आम्हास विचारिलें की तुम्ही लोकांचा मुलुक लूटून पैका घेऊन खराब कायेनिमित्य करिता तें सांगणें. त्यास आम्ही उतर दिल्हें कीं परमुलुक, फौज़-खेरीज वसूल देत नाही. राजश्री आवजी कवडे याचे स्वाधीन खानदेसची सरदेशमुखी केली आहे त्यास संताजी जाधव म्हणतात कीं पाा अमलनेर राजश्री आवजी कवडे यानी लुटून खराब केले, तरी महाराजानीं देशमुख व देशपांडिये गावगनाचे मोकदम हुजूर आणून त्यास रुबरु पुसावे कीं परगणेयातील गाव किती मारिले व सिवार कोणे गावीचा चारिला? हे गोष्टी जामीदाराचे गुजरातीनें खरी करून दिल्ही तरी आम्ही जाब करून. सालगुदस्ताचे बाबतीचे तीन हजार रुपये अद्याप दिल्हे नाहीत, रास्ती बाबती व सरदेशमुखीचा वसूल दिल्हियावर परगाणियांत फौज कायेनिमित्य जाईल? इतकी आमची बोली जालियावर त्याज-कडील कारकून बोलिला की पुणाचे मुकामी मल्हितयाची बोली चाली जाली होती. गुाच्या बाबती तीन हजार व सालमजकुरी बाबती सरदेशमुखी मिलोन चवदा हजार येकून सतरा हजार रुपये मागत होते. आम्ही मान्य केले, परंतु येक दिवसीं सावकारी निशा करून मागे लागले. आम्हास निशा होईना. मग ते गोष्टी राहिली. आवजी कवडे यानी आमचा मुळूक केलियावरी आम्हास चाकरी होती यैसे नाही. त्यावर राजश्री स्वामीनीं आज्ञा केली कीं तुम्ही प्रातःकाली दादोबाकेडे जाणे. मनास आणून तुम्हास सांगितलें. त्यास चार दिवस जाले, आले नाहीत. पुढे मजकूर होईल तो लिहून पाठऊन. हे विज्ञापना.

¶*Dadoba Purandare reports to Bajirao and Chimaji the complaint made to the King by Santaji Jadhao of Bhuinj against Awji Kavade plundering the Khandesh territory mercilessly. King Shahu took no action, but referred th complainant to Purandare.*

---

१ पुरंदरे (?)

No. 242] [18-10-1739

श्री

आसीर्वाद उपर. चिरंजीव सौभाग्यवती गोपिकाबाईस तुम्हाकडे पाठवावयाची सिधता मातुश्रीबाईनी करून रवानगी करावी यैसा सिधांत जाला होता. इतकियात संज्ञापूर्वक तुमची चिठी आम्हास आली. त्यावरून मातुश्रीस विनंती करून रवानगी राहाविली असे. छ २९ रजब हे आसीर्वाद.

¶*Letter to Nana by Chimaji informing him of the visit of Gopikabai having been cancelled as intimated.*

No. 243] [23-10-1739 ?

छ १ साबान

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ
तथा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंति उपरी, रहिमान माहात याबराबर राजश्री स्वामी कारणे लांडी हतीण पाठविली. यैशास राजश्री स्वामीनी तहकीक मनास आणिता तख्तगौरी म्हणून लांडी हतीण आहे ती न पाठविली. ही हतीण अटेरीबाबत रा। मानाजी पायेगुडे याजकडे पागेस होती ती पाठविली. स्वामीजवळ उतम हतणी नामांकित म्हणावयास येक लक्ष्मी आणि दुसरी तख्तगौरी यैशा दोन हतणी आहेत त्यापैकी लक्ष्मी स्वामीची स्वामीस असो द्यावी आणि तख्तगौरी येथे आणवावी यैसे रा। स्वामीचे मानस बहुतसे होते. ती गोष्ट घडोन आली नाहीं याकरितां हाली पाठविली लांडी हतीण ती व पूर्वीपैकी घेतली होती ती यैशा दोन्ही हतणी फिरोन स्वामीकडे पाठविल्या आहेत. राजश्री स्वामीनी आपणास पत्र लि।। आहे तेंच पाठविले आहे त्यावरून विदित होईल. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Purandare informs the Peshwa that Shahu has been greatly displeased at the Peshwa's failure to send over to Satara the particular female-elephant named Taktagauri and that Shahu in anger has sent back the two elephants formerly presented to him.*

4655

No. 244] [17-11-1739 ?

छ २६ साबान

श्रीशंकर

राजश्री चिमणाजी पंडि

गोसावी यासी

ॐ सकलगुणालकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री सुलतानजीराऊ निंबालकर दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुषललेखन करीत गेले पाहिजे विशेष. गोसावियानीं पत्र पाठविलें. प्रावष्टि होऊन लेखनार्थ कलो आला. तेथें लिहिलें कीं प्रस्तुत कोठें आहा, मनसबा काय योजिला आहे, हें सविस्तर लिहिलें पाहिजे म्हणून लिहिलें; तरी नवाब नासरजंग शहरींच आहेत, आम्हीहि त्याजपासींच आहों. कललें पाहिजे. सदैव आपणाकडील कुषल वृत लेहून संतोष पावीत गेले पाहिजे. बहुत काय लिहिणें कृपा असों दीजे हे विनंती.

¶*Sultanjirao Nimbalkar communicates to Chimaji Appa that Nasarjang has not yet left Aurangabad.*

No. 245] [30-12-1739 ?

नकल

श्री

पुरवणी राजश्री नाना

स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. दरबारी मजकुर छ १० सवाली रविवारीं रात्रीस जाहला. राजश्री पंत सचिव यानी विनंती केली कीं 'राजश्री पंत प्रधान यानी पा॥ कर्डे रांजणगाऊ येथे गावगना रोखे केले आहेत कीं येक घोडे व पांचसे रुपये दरगावास देणें यैसे रोखे करून गावगना तगादा लाविला आहे. येका दो गावीचे पाटील आम्हाजवल आले आहेत म्हणून विनंती केली. त्यावर राजश्री स्वामीनी राजश्री पंत सचिव यांस पुसिले कीं कर्डे रांजणगांव जिल्हा कोणाचा ? त्यानी उतर दिल्हे कीं जिल्हा आमचा. मग राजश्री स्वामीनी आम्हास पुसिले कीं तुम्ही याच्या जिल्यामध्यें काये म्हणून रोखे करिता ? त्यावर आम्ही विनंती केली कीं आजी वर्तमान यैकिलें; त्यास माहाराजानी राजश्री पंतप्रधान यांस मालवा, दिली, आगरे, प्रयागचा सुभा, पटणचा सुभा, बुंधलखंड इतका मुल्क दिल्हा असतां

कर्डे रांजणगाऊ यामध्यें रोखे करावे ऐसें नाहीं. त्यामधें वर्तमान लेहून पाठऊन तेथून उतर आणऊन विनंती करून. पनास माणूस सदरेस बसले होते तितकेहि बोलिले कीं राजश्री पंत प्रधान कर्डे रांजणगावामध्यें रोखे करणार नाहीत, ऐसे असतां कशावरून राजश्री पंतसचिव बोलतात कलत नाही. इतका मजकूर जाहाला. तरी स्वामीनी हेच पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व ताा राजश्री आपा स्वामिकडे पाठऊन उतर आणऊन पाठऊन दिल्हे पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*A plaint was brought to the King by Sachiv that orders claiming a tribute of Rs. 500 from each village had been issued by the Peshwa to all places in the district of Karde Ranjangaon belonging to him (the Sachiv). The King asked an explanation of the Peshwa's agent. The agent writes to his master to clear up the point.*

No. 246] [*1751 ?*

श्री

सेवेसी केशव जोसी चिपळुणकर विज्ञापना ठाणे कोट साष्टी येथील किल्यास पाया घालतेसमई मुहुर्त आमचे बंधु बालकृष्ण जोसी यांणी दिल्हा. ते समई कोट व पेठ येथील जोतिष व उपाध्येपण आपणास वृत करून द्यावी म्हणोन कैलासवासी आपा स्वामिजवल विनंती केली. आपा स्वामीनी कृपाळु होऊन सदरहू वृत दिल्ही त्यापासून आज चवदा वर्षे कोटातलि वृत चालते व बाहेर चालवीत आलों. प्रस्तुत सन तिसामध्ये पलशा ब्राम्हणाच्या वृत्ति सरकारात अमानत करून गुमास्ते ठेविले त्या वृति मोकल्या जाल्यावरी कसबे ठाणे येथील गुमस्त-गिरी गोपालभट हरडीकर यांसी सांगितली. ते पेठेस मुजाहीम होऊन पेठेची वृत्ति चालो देत नाही. कोटात घर येक ब्राम्हणाचे आहे वरकड अलंगादाखल सिपाईलोक आहेत. आपला काल चालत नाही. कृपाळु होऊन बाहेरलि पेठ आपणाकड सुरलीत चाले ते केल्यानी स्वामीस अभीष्ट इच्छून श्नानसंध्या षट्कर्मे आचरोन राहून येविसी कृपाळु होणार स्वाम समर्थ आहेत हे विज्ञापना.

¶*Keshav Joshi Chiplunkar begs that the Jyotish vatan granted to his family by Chimaji Appa be continued in his name.*

No. 247] [*1739 ?*

श्री

सेवेसी विनंती. नासरजंग यास अवरंगाबादेकडील सुभा जाला. याकरिता जुने अमलि सादतखानाकडील तहगीर जाले. कां बेल्हे येथे सादतखानाकडील

ठाणे होते त्यातील लोक पलोन गेले. ठाणे वोस पडिले आहे. हें वर्तमान येथे कललें त्यावरून सेवेसी लिहिले असे. हे विज्ञापना. आकोले व कोतूल व धांदरफल वगैरे ठाणी होतीं, त्याची गत याच‥ प्रकारची जाली आहे, म्हणोन वर्तमान आले यावरून लिा असे हे विज्ञापना.

¶*A writer communicates to the Peshwa that Nasarjang is appointed as "Subha" of Aurangabad ; hence people of Sadatkhan are deserting their villages.*

No. 248] *[1739 ?*

श्री

+आसीर्वाद उपर. जो विचार सांप्रत प्राप्त जाला आहे त्याची भटी दुरुस्त उतरली पाहिजे, यास्तव तुम्ही लग्नानिमित्य सासवडास जाण्याचा विचार सर्वथा न करणे. धोंडोबा घरी आहेच. लग्न तेच करतील. हे आसीर्वाद.

¶*Chimaji Appa requests Mahadoba Purandare to give up the idea of attending the marriage at Saswad as the complications of the situation need his presence.*

No. 249] *1739*

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री
आपा स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक राघो केशव विज्ञापना येसिजे. माहाराजांचे आज्ञेप्रमाणें सात हजार रुपये शहरीं रा रघुनाथ सिवराव यांचे दुकानीं जमा जाहले. रसिदा त्यांच्या आम्हाजवल आहेत. रसदेचे सरंजामाचा येथें ज्यासी नेम होता तो सावकार सुरतेस गेला. वरकड शहरीं आणखी कोठें पाहावें तर लाहोरास फौजा पलीकडील येवनाच्या आल्या, त्यामुलें हस्तनापुरापासून तमाम शहरें तेथून सावकारा(ची) दुकानें बंद जाहलीं. बऱ्हाणपुर औरंगाबाद येथें हेच गत आहे. सबब आणखी कोठें बाहेर तलास करणें लागला यास्तव दोन दिवस अधिक लागले परंतु श्रीचे दयेनें कार्यभाग होऊन आला. येथून स्वार होऊन मालवियांत गेलों. राजश्री कुसाजी गणेश पुढें गेले आहेत. तिकडेहि खलबलले आहे.

+ पत्र चिमाजी आपाचें महादोबा पुरंदऱ्यास असावें.

कदाचित वसूल त्यांजकडे जाहला असेल तर तो येवज आमचे पदरी पडिला पाहिजे. यास्तव येक ताकीदपत्र वेदमूर्ति रा। गोविंदभट पाठविले आहेत यांचे हवाला केले पाहिजे व परभारें माहाराजाकडे रा। जोतीपंत शहरीहून लिहितील त्यांजकडेहि येक ताकीदपत्र पाठविलें पाहिजे. ते आम्हाकडे पोचते करितील. अथवा उदेपुरास सरकारचे जासूद जात असतीलच. रा। सदाशिवपंतापासीं ताकीदपत्र पोहोचलियास आम्हास पावेल. येविसीं आज्ञा करणे ते करावी हे विज्ञापि.

¶*Ragho Keshav requests Chimaji Appa for funds being supplied to him, as owing to the invasion of Delhi (by Nadirshah) the whole country in the North has been thrown into confusion.*

No. 250] [*1739*

श्रीशंकरद्वरद

विनंती उपरी येथील वर्तमान तरी कनिष्ठ यजमान सोमवारी येथें दाखल जाहालें. तदिनादारभ्य जेष्ठ भयप्रदर्शन पावोन परमनीतिवंत होत्साते वर्ततात. दुवख्ता दरबारी उभयेता बसतात. प्रहर दीडप्रहर तदोत्तर पुस्तकादि अवलोकन होतें. तत्र स्थलीं निसीचा ठाई मात्र गमन होतें. दिवसामध्यें गमन होत नाहींसे दिसतें. तथा(पि) अवसरयुक्त पाहोन क्षण अर्धक्षण होत असेल. येथे कितीकानी कार्य सिधीस न्यावे येतद्विषई बल धरिले होतें; परंतु सांप्रत साधु अवस्था पाहोन गम खादला. कनिष्ठानी सलाबत मुद्रेवरून मात्र घातली आहे. परंतु यत्न सांप्रत नाहीं. सामादिक मंडली प्रस्तुत मरजीवरून परम सुखी आहेत. तुम्हाकडील वर्तमान सविस्तर परस्परे लोक आइकतात; परंतु निकट सहवासी आहेत, त्याची निशा नाहीं. ज्यास पूर्वसंदर्भ विदित नाहीत तें म्हणतात कीं यजमानपुत्राचा मात्र भरवसा आहे. बाकी अतिनिकट सहवासी म्हणतात कीं यथाबीजं तथांकुरं; व अनुभवहि आला आहे हे विनंती. मल्हारी येथे आला. गुरुवारी तेच दिवसी आवसचि घटिके रात्रीस पत्र जेष्ठास दिल्हे. पुस्तक अवलोकन होते, व रामचंद्रभटहि ते समई होते. यानें लाखोटा दिला. तदोत्तर पत्र समाप्त करून कागद वाचिला. अर्ध जाहाला तो घोड्याचे व आणखीहि वर्तमान बाहेरचे दरबारी पुसिलें. मग वसईस गेला होता; व फिरोन राजश्रीकडे गेला हेहि पुसिले. कागद पुरता वाचून पलंगाचे उशीखाली पोरग्याबरोबर ठेविला. त्यावरी तेव्हांच मस्तानीकडे जाऊन वर्तमान साद्यंत सांगितलें. तदोत्तर आपणच बोलिले कीं पुत्र व राजाहि बोलतो. अत:पर कनिष्ठाची

बोलावयाची वाट पाहावी. तेहि बोलिले तरी संगत्यक्ता सुखभत्र करावें ऐसे बोलोन सत्वरी निद्रेस आले. तेथें मातुश्री आली. त्याजवली काही सांगितले नाही. परंतु दुखित मुद्रा दाखविली. व आपानीहि वसईहून राज्याकडे गेला तेथील व भोइव्याबाा घरास तुमच्या आले होते हेहि पुसिले वगैरेहि दरबारी वर्तमान पुसिले कलले पो. मस्तानीहि बहुत श्रमी आहे व काही भयप्रदर्शनहि पावली आहे हे विनंती. व पंढरीचे वर्तमानहि * (अपूर्ण)

¶*The letter refers to Bajirao's love affair with Mastani. The presence of his youn... brother seems to have put some restraint on his behaviour.*

श्री

No. 251] *1731 ?*

यादी पत्रें येणेंप्रमाणें देविले पाहिजेत.

राजश्री जिवाजी पवार यास पत्र कीं तुम्ही राजश्री उदाजी पवार याकडे राहिलेस तरी बहुत उतम गोष्टी केली. सर्व प्रकारे आपले समाधान असो दिजे. तुमच्या साहित्यास चुकणार नाही.

देणे

दस्तके बैलाची

२०० रा उदाजी पवार सुमार

२०० रा आनंदराऊ पवार

४००

सदरहूची दस्तके देविली पाहिजेत, १

गुंदस्ताप्रमाणे देणें +

राजश्री संभाजी पवार यास पत्र की तुम्ही राहूस जाऊन राजश्री मल्हारजी होलकर याचे बहुताप्रकारें समाधान करून मलठणास आणिले हें वर्तमान राजश्री मल्हार बलाल याणी सविस्तर सांगितलें तरी त्यास तुम्ही वडील आहां.

दादजी सोनवणी राहूकर यास वतनाच्या कजियामुलें व गावामुलें टका पैका खर्च पडिला तो साहुकारपासून कर्ज घेतलें तो पैका भाऊबंद देत नाहीं त्यास ताकिदपत्रें द्यावें कीं जो पैका पडला असेल तो रुजू पाहून दामाशाही प्राा देणें. हुजुर बोभाट आला म्हणजे आम्हास बोल नाहीं

देणे +

येमाजी पाचुंदकर पाटील रांजणगाऊकर यास कौल की तुम्ही सुखरूप गावावरी येणें. कोणेविसी तगादा लागणार नाहीं,

देणे +

+ चिमाजी आपाचें हस्ताक्षर.

उभयताचे समाधान करणें. मल्हा॰
बास कष्टी न करणें.

देणें

¶*Letters are addre·--ᵈ ·robably by Chimaji Appa to Jiwaji, Udaji and Sambhaji Pawar.*

No. 252] [*1739?*

श्री

राजश्री चिमाजीपंत आपा
गोसावी यांसी

ॐ श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. मौजे आलंदीस श्रीची यात्रा भरणार, त्यास यात्रा जे स्थली राहाते तेथे जोंधळे आहेत ते अद्यापि जाले नाहींत. यात्रेस आपलेहि जाणे होईल यास्तव अगोधर डेरे देणें, त्यास जागा पुणे वाटेवरी आहे तेथेंच देवावे. आणिखी कोणी सिवारास उपसर्ग करितील. त्यास आगोधर ताकिदीस कोणी पाठऊन दिल्हा पाहिजे. साल मजकूरी गुदस्तास नुकसानी बहुत जाली आहे. दोन कुले पळोन गेली तरी येविसी राजश्री गोविंद कृष्ण यासी पत्र पाठऊन तेथील जीवनमाफीक खंडणी केली पाहिजे. येविसी विस्तारे काये लिहिणे ? कृपा आसो दीजे हे विनंती

¶*Pilaji Jadhav to Chimaji Appa, asking him to make arrangements for the concourse of pilgrims at Alandi.*

No. 253] [*1739?*

श्री

सेवेसी विनंती रा गंगाजी नाईक अणजूरकर बंधूसहवर्तमान मेहनत करीतात ते स्वामीस विदित आहे. यांसी स्वामीनी वतन करून दिल्हे त्याचें कामकाज रयेत निसबतीचे यांचें हाथून घ्यावयाची आज्ञा सर्वास करावी. जे साष्टींत राहातील त्यास व बेलापुरास ज्यांस ठेविले असेल त्यांस व विठल विस्वनाथ यासी यांचेविसी पत्रें द्यावी, म्हणजे याचे विद्यमाने बोलीचाली रयेतीची होत जाईल. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

¶*Gangaji Naik Anjurkar is recommended to the notice of the Peshwa probably by Vasudeo Joshi.*

No. 254] [Prior to 1740

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री
पंत प्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक आंताजी माणकेस्वर साष्टांग नमस्कार विनंती प्रार्थना यैसी जे. स्वामीनी आज्ञापत्र पाठविलें तें उतमसमई पावोन परम समाधान जालें. गोगवलीयाची वस्तभाव रा म्हालोजी मुठे यास सांगोन देवणे म्हणून आज्ञा केली. यैसियास पूर्वी जो करिना कूल जाला आहे तो रा आपा स्वामीस विदित आहे. त्याणी आज्ञा केली त्यावरून आज्ञेप्रा वस्तभाव कुल देऊन रा आपासाहेबासी रुजू केले असेत. याउपरी आपले आज्ञेवरून गोगवलियानी नाना उपद्रव आम्हास दिल्हे तरी फिरोन उतर गोगवलियास देणार नाही. हुकुमाखेरीज येकंदर वर्तणूक होणार नाहीं. सेवकाची सेवा करावयास उमेदवारी असतां येथें बेकैद वर्तणूक होऊ देणार नाही. येथून मागे ज्याप्रा जाली आहे त्याप्रा राजश्री आपासाहेब सेवेसी निवेदन केली असे ते परस्परे सेवेसी निवेदन होईल. सर्व वर्तमान रा आपासाहेबास विदित आहे. स्वामीच्या पायापासी अमर्यादा होवी आणि सेवकास शब्द लागावासे सेवकापासून वर्तणूक होणार नाही. त्याहीमधे स्वामीचे आज्ञापत्र आलें तरी याउपरी आपल्यादेखील कुरणात ताकीद करितो. होनाजी पा याची सर्वस्वे बदल कुरणात लागली तरी कबूल करून त्याचा जो अन्याये होईल तो कबूल करून फिरोन सेवेसी हरयेकविशई सेवेसी बोभाट न ये ती गोष्टी करितो. पुढें आज्ञेखेरीज वर्तणूक न होये व कोठे तिलभर बोभाट न ये ती गोष्टी करितो. आम्ही रा आपासाहेबाच्या हुकमाखेरीज येक घटिकाभर बेकैद वर्तणूक करीत असिलो तरी स्वामीनी पत्र पाठऊन मनास आणावे. त्याचे कबज घेऊन हुजूर पाठवणे म्हणून लिाले तरी याची वस्तभाव कूल पुणाचें मुकामी सर्व मनसुबी होऊन दिल्ही. काडीमात्र आम्हाकडे राहिली नाही. ते वर्तमान रा आपासाहेबास विदित आहे. रा आपा स्वामीच्या आज्ञेखेरीज वर्तणूक करीत नाही. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. पेसजी गोगवलियाचे कबज घेतले आहे ते तुकोजी बाा हुजूर पाठविले असे. याखेरीज काडी राहिली नाही. सेवेसी श्रुत होये.

¶*Antaji Mankeshwar informs the Peshwa that Chimaji Appa knew everything regarding Gongvali (?) and that it was with his consent that everything was done.*

No. 255] 6-1-1740 ?

पा छ २८ सवाल.

श्री

पुरवणी राजश्री राऊ व ता
राजश्री आपा स्वामींचे सेवेसी

विनंती. उपरी, छ १७ सवाली रविवारी राजश्री स्वामीचा मुकाम केलघरीं जाला. आम्ही समागमे होतो. त्यास पांचसा घटिका रात्री जालियावर आंगास कसर आली. याकरि(ता) प्रतापगडास जाणे जालें नाहीं. चाकरीस आंतर पडिले. सुक्रवारी सनवारी धोमोचे मुकामास जाऊन विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Bajirao Ballal and Chimaji Appa are informed of the King's tour to Pratapgad.*

No. 256] [8-1-1740 ?

पा छ १९ सवाल

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा
स्वामींचे सेवेसी

विनंती उपरी चाहुजी ना। व महिमाजी ना। वगैरे नाईकवाडी व चौघेजण लोक किले पुरंधरकर यांचे चित्तांत येथून माघारे गडास जावयाचे नव्हतें. त्यांचें सविस्तर वर्तमान राजश्री त्रिंबक कृष्ण सुभेदार किले मा।र याणी आम्हास सांगितले त्यावरून नाईकवाडी व लोक आम्ही आपल्याजवळ बोलाऊन आणून समाधान करून च्यार गोष्टी सांगितल्या. ते बोलिले की आमचे कितेक सुखदुख आहे ते राजश्री स्वामीस निवेदन करून येथेंच फड घालूं. हें वर्तमान सुभेदारास ठावके आहे म्हणून बोलिले. त्यावरून आम्ही त्यासी नेम केला कीं, श्रीमंत राजश्री आपा स्वामीस सविस्तर लेहून तुमचे पूर्ववत प्रा। जे असेल त्याचें पारपत्य करून देवऊं, न होये तरी उतर येईल ते तुम्हास वाचून दाखऊं. मग तुम्हास राजश्री स्वामीपावेतों मजकूर करणेच असेल तरी सुखे करणे म्हणून सांगितले. त्यावरून चाहूजी ना। वगैरे नाईक व लोक येथून किले मा।रास गेले आणि येथ महिमाजी ना। आहे त्यास सांगून गेले कीं तिकडे कांहीं पारपत्य जालें तर बरे नाहींतर तेथून जें उत्तर येईल त्याचा अर्थ आम्हास सांगून पाठवणें म्हणजे

फिरोन राजश्री स्वामीपासी येऊन मजकूर करूं म्हणून सांगून गेले. त्यानीं आम्हाजवळ आद्येत वर्तमान जें सांगितलें तें स्वामीस लेहावें तर च्यार पांच बंद लागतील; आणि पत्रीं लिहितांहि पुरवत नाही म्हणून संखलित लिहिले आहे, त्याचें सविस्तर वर्तमान सुभेदारास ठावके आहे; तरी स्वामीनी सुभेदारास व नाईकवाडियास बोलाऊन आणून राजश्री बापूजीपंतास बसऊन साकल्य वर्तमान मनास आणून पारपत्य केलें पाहिजे. तेथें जें वर्तमान होईल तें आम्हास लेहून पाठवावें. येथें महिमाजी ना॥ यास वाचून दाखवावे ऐसा नेम केला आहे; तरी पहिल्याप्रमाणें जें चाललें असेल त्याप्रमाणे चालतें करून सविस्तर लेहून पाठवावें. महिमाजी नाईक यास स्वामीनी पत्र पाठऊन द्यावे कीं चाहूजी नाईक वगैरे लोक यास आणून त्याचें समाधान करून वाटे लाऊन येविसी तुम्ही आपले समाधान असो देणें म्हणून स्वामीनी आपलें पत्र व राजश्री बापूजीपंत नाना याचें पत्र समाधानाचें पाठऊन द्यावें. त्यास आम्ही दाखऊ म्हणिजे नालीश होणार नाही. विदित जाले पाहिजे. सेवेसी विज्ञापना.

¶*Purandare to Chimaji Appa, forwarding the complaints of the Naiks of Fort Purandar and advising the addressee to keep the complainants pleased.*

No. 257] [*7-2-1740*?

छ १९ जिल्काद,

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ तथा
राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती, उपरी, संकराजी पा॥ थोरात मौजे मनसर ता॥ महाळुंगे प्रा॥ जुनर यान लेक जोगोजी, उमर वरसें पंचवीस तीस, हा हरसेट होनराव मौजे अवसरी याजव आजी छ १७ जिल्कादीं इदुवारीं प्रातःकालीं गल्यांत कफनी गाळून डोईस रुमा बांधून राजश्री स्वामीसन्निध फिर्यादीस उभा राहिला. आपलें वर्तमान साकल सांगितलें. राजश्री स्वामीनी पुरतें आइकिलें. मग आम्हास बो(ल)ऊन नेऊ आज्ञा केली कीं, याचा कजिया ठाण्यास ताकीद करून वारणे. त्यावरून त्या स्वामीकडे पाठवीत होतों: तो जात नाहीं. त्याचा कजिया पूर्वी स्वामीनी मना आणून इनसाफ केला आहे. इनसाफमुलें हरसेटीने दीडसे रुपये व पनास रुपयां खत याचें त्याजवळ आहे ते द्यावेसें केलें आहे. तो देत नाहीं. द्वाहीस मानी नाहीं म्हणून हा येथवर फिर्यादीस आला. स्वामीकडेहि जात नाहीं. म्हणून

स्वामीस पत्र लिहिलें आहे. तरी हरसेटीस आपल्याजवळ बोलाऊन आणून.दीडसें शा व पनासाचें खत यैसें येथें पाठऊन द्यावें म्हणजे याची समजावीस करून वाटे लाऊ. तोवर यास येथे आम्ही थांबविला आहे. त्याची समजावीस होत नाहीं. तरी वारंवार याणें राजश्री स्वामी पावेतो अतिशये केल्यानें तेहि गोष्टी कार्याची नाहीं यास्तव सेवेसी लिहिलें आहे. विदित जाहलें पाहिजे. याचें उत्तर पाठविलें पाहिजे. सेवेसी विज्ञापना.

¶Chimaji and Bajirao are requested by the Satara Agent to give effect to their decision of the suit of Sankaraji Thorat who complained to the King that though his case had been decided in his favour he has not recovered his claims.

No. 258] [*10-4-1740 ?*

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोसी सा। ना। वि। उपरी येथील कुशल ता। चैत्र वदी १० जाणोन आपले स्वकुशललेखन करावया आज्ञा केली पाहिजे विशेष. थानसिंगा बोलावयास पाठविले होते ते येथे आले आहेत. हतीची चिठी पाठविली आहे. हती आलियावर आज्ञेप्रमाणे त्यास देऊन रवाना करतो. कलले पाहिजे विशेष. इगलाज घोडी निली काली पसविली सिंगी जाहाली. ते काढवावी लागत्ये त्यास कोणत्या घोडियासी काढवावी ते लिहिले पाहिजे, बहुत काये लिहिणे लोभ करीत गेले पाहिजे हे विनंति.

¶Vasudeo Joshi informs Chimaii Appa that he would soon send the elephant as ordered.

No. 259] [*4-9-1740 ?*
पौ छ २४ जमादिलाखर.

श्री

राजश्री पंत प्रधान
गोसावी यासी

श्रीमंत सकलगुणालंकरण आखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहां पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील क्षेम जाणून स्वकीये कुशल

लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आज्ञापत्र पाठविलें प्रविष्ट जालें. तेथें आज्ञा कीं राजेश्री सुमंत व राजश्री माहादाजीपंत आले. याणी सविस्तर सांगितल्यावरून कलले. यैसियास तुम्ही पत्र पावतोंच स्वार होऊन येणें. राजश्री सटवोजी जाधव यासहि समागमे घेऊन येणें म्हणून आज्ञा. यैसियास आमचेच यावचे जरूर प्रयोजन आहे यैसे नाहीं. राजश्री बाबूराऊ सेवेसी आहेत, त्याणी सविस्तर निवेदन केलेच आसेल. त्याजपासीच जे आज्ञा कर्तव्य ते केली पाहिजे. आज्ञेनरूप वर्तणूक करून. यानंतर आमचा मुकाम मौजे सवेदणे येथें होता, तेथून आजी ब्रहस्पतवारी कूच करून मौजे पारगाव घोडनदी तीर येथे केला आहे. आपणास कळावे याजकरिता लिा आसे. विशेष काये लिहिणे ? कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Pilaji Jadhav declines to join the Peshwa as he feels his presence can be dispensed with.*

No. 260

याद दास्त नाकेबंदी प्यादे छ ४ मोहरम.

२ दरवाजा बावाबंगाली.
१ राजे मा.
१ सेख दाऊत.
२ दरवाजा मगलगंज.
१ मानिकजी.
१ भाईखा.
२ दरवाजा सरजापुरा.
१ नंदराम.
१ अमदाद.
२ दरवाजा दिली.
१ भिकाजी परदेसी
१ मखदुमजी.
२ दरवाजा पारनेर.
१ ज्यान मा.
१ वजर मा.

२ दरवाजा मालीवाडा.

१ दावलजी.

१ मा हुसेन.

दरवाजा झेंडेबाजार.

जानमहमद वलद मखन.

¶*This is an order stationing guards at the various gates after a battle. It apparently refers to Bajirao's time.*

No. 261]

श्री

पुा श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेशी

विज्ञापना छ २६ मोहरमी मुरादखान व जवारकर या दोघासी युध्यें भातखलियांत जाले. तेथें मोगलाकडील सरदार मातबर सैदजमान व हिमतखान हे कामास आले. याखेरीज सिपाई व आपलेकडील स्वामीचे पुण्येप्रतापिकरून सर्व लोक सुखरूप असेत. मोगल किलेयाभोंवता जागाजागा फौजसुधां बैसला आहे राऊत व पाये लोक स्वामीनी लौकर पाठवावयाची आज्ञा करावी. +सैद्रजमनं मातबर सरदार पालकीचा खावंद होता व हिमतखान सरदार होता. मातबरांत दोघ ठार जाले. याखेरीज पाच माणूस दुसरे ठार जाहाले. लोकानी शेर्त केली. पुडेहि खावंदाचे पुन्य प्रताप आहे; तरी आणिखीहि दुसरी लढाई घेतो. सेवेसी शृत होये हे विज्ञाप्ति. किले मजकुरी जेजाला तीस पावेतो आहेत परंतु जेजालदाज नाहीं. तीन च्यार जेजाला फुटल्या. आणाडी माणसापासोन जेजाला भराव्या याजकरिता जेजाला फुटतात; तरी तीस च्यालीस पावेतो जेजालदाज पाठवावे व फिरंगाणी गोलंदोज च्यार देविले पाहिजे. सेवेसी शृत होये, मोगलाचे वर्तमान काये, कोठपर्यंत आला आहे, त्याचें वर्तमान सेवकास ल्याहावयाची आज्ञा केली पाहिजे. सेवेसी शृत होय हे विज्ञाप्ति.

¶*The writer reports a successful engagement with the Chief of Jawhar and asks to be supplied with gunners and cannons. This fight deserves to be located in history.*

\+ अक्षर वेगळें.

No. 262]

छ १८ जिल्हेज

श्री

विनंती उपरी सौभाग्यवती कासीबाईस पुणे येथें ठेवणे म्हणून आज्ञा. त्यावरून मातुश्रीबाईस बरे वाटत नव्हते याकरिता बाईसहि येथें ठेविले; व वहिनी हीस यथ ठेविली असते. चिरंजीव राजश्री नानास समागमे नेऊं. हे आसीर्वाद.

¶*Chimaji informs his brother that as per instructions Kashibai and mother would be left behind while his nephew Nana would accompany him (probably to Satara).*

No. 263]

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ व ताा

राजश्री आपा स्वामींचे सेवेसी

अपत्ये मल्हार तुकदेव कृतानेक साा नमस्कार विनंती उपरी. स्वामीच्या आसीर्वादेकरून ताा छ २० जमादिलोवलपरियेंत कुषल असो विशेष. राजश्री मानसिंग दरेकर, सयाजी दरेकर याचे पुत्र याचे चाकरीविसी स्वामीस विनंती केली. स्वामींनी आज्ञा केली कीं पुणियास गेलियावर आज्ञा करून. त्यावरून स्वामींचे सेवेसी पाठविले आहेत. माारनिले आपलें सविस्तर वर्तमान विदित करितील. स्वामींनी याजवरी कृपा करून यास चाकरीस ठेविले पाहिजे. माारनिलेचे वडील यानी पुरातन स्वामीची सेवा केली आहे. स्वामींविगले याचे कोण्ही उर्जित कोण्ही करणार नाहीं. याचा मामला बहुत आफ्तर जाला आहे. स्वामींनी यास आगत्य चाकरीस ठेऊन सेवा घेतली पाहिजे. राजश्री रामाजीपंत कारकून पाठविले आहेत यास आज्ञा केली म्हणिजे स्वामींचे सेवेसी येतील. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Malhar Tukdeo requests the Peshwa to entertain into his service one Mansing Darekar.*

No. 264]

श्री

श्रीमंत राजश्री पंत

प्रधान यांप्रति

स्नेहभिलाषी जगनाथ कचेश्वर कृतानंत आसीर्वाद उपरी. येथील क्षेम ताा छ ७ शाबान जाणऊन आपुले स्वकीये ल्याहावया लेखकासी आज्ञा करीत आसिले

पाहिजे विशेष. रा। कृस्णराऊ याणी मढ तरफेसी आपली फौजदारी[1] नवा अमल घाटोघाटीं बैसवितात यामुळें वाणी वणूज कोण्ही त्या मार्गें येईना, जे दोन फौजदारीचे आमल व येक मोगलाईचा यैसा आपणासी हसील देवत नाही. याविषी रा। नरसीपंत घाटपांडे त्याणी पत्र सौभाग्यादिसंपन्न बाई यासी लिहिलें होतें. पत्र यैकोनी आपणासी सांगितले जे राजश्री पंत प्रधान यासी वर्तमान निवेदन करून त्याचें ताकीदपत्र राजश्री कृष्णराऊ यासी देणे. जेणेकरून बदमामली फैल करणार नाही. आपण येत होतों त्यासी आपण स्वार होऊन दुसऱ्या मुकामासी गेले. याकरिता पत्रीं वर्तमान निवेदन केलें आहे. हें ध्यानासी आणून रा। कृष्णराऊ यासी आपलें पत्र देविले पाहिजे. सूज्ञाप्रति विशेष ल्याहावें यैसा आर्थ नाही. बहुत काये लिहिणे कृपालोभ आसो दीजे हे आसीरवाद.

¶Jagannath Kacheshwar complains to the Peshwa against Krishnarao Joshi for levying a military cess on the province and thus harassing the ryots.

No. 265]

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री

पंत प्रधान स्वामीचे सेवसी

विनंती सेवक विठल सिवदेव सा। नमस्कार विनंती विज्ञाति. स्वामीचे आज्ञेवरून तमाम राऊत घेऊन जवार प्रांते जाऊन रा। कृष्णारायापूर्वी दोही स्थलचा तहरह व्हावयाचा तो जाला. मागून रा। कृष्णाराऊहि आले. आपण कोहिजेस गेले. येका दो रोजा मालशाचा घाटे येतील. आपण कल्याणास आलो. राजश्री वासुदेव जोसी यानी आज्ञा केली. राजमाचीकडे आंग्रे याची स्वारी आली आहे. ते हुसगटून सावल्याचा घाट चढोन जाणें. त्यावरून आज्ञे प्रा। काल घाट चढोन तलेगावीं राहिलो होतो. आज चिंचवडी जीन उतरले आहेत. तिसरा प्रहरा दर्शणास येऊ. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाति.

¶Vithal Shivdeo informs that negotiations have been entered into at Jawhar and that he as instructed by Vasudeo Joshi will proceed to Poona to meet the Peshwa.

---

१ फौजदारी अंमल—प्रांतिक लष्करी अंमलदारानें हाताखालील ऑफिसांत काम करणारे नौकरीकरितां शेंकडा २५ प्रमाणें घ्यावयाचा कर.

No. 266]

पो छ १ सवाल

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

सेवक रायाजी रामाजी साष्टांग दंडवत प्राा विज्ञापना. ताा छ २७ रमजान स्वामीचे कृपादृष्टीकरून वर्तमान यथास्थित असे विसेष. अलंदीचे मुकामी स्वामींनें आज्ञा केली होती कीं राजश्री विठलपंतास बोलाऊन आणने व स्वामीचे पत्रहि त्यास परभारे त्यास गेले होते त्याजवरून चासेस आले आहेत. पुढें भेटीस यावयाची काय आज्ञा ते केली पाहिजे. तेण्हेप्रमाणें वर्तणूक करितील. याचें सर्व वृत्त सेवेसी निवेदन आहे. सर्व प्रकारे निभाव करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Rayaji Ramaji writes that Vithalpant has arrived at Chas and is awaiting orders.*

No. 267]

श्रीराम

श्रीमंत महाराज राजश्री आप
साहेब स्वामीचे सेवेसी

सेवक आज्ञाधारक खंडेराऊ बलाल साष्टांग नमस्कार विनंती विनवावया प्रार्थना येसीजे. येथील कुशल जाणून महाराजे सदैव सेवकावरी कृपावधि केली पाहिजे विशेश. रोजमोरा पाठविला तो जवारकरास दिधले. वरकड वर्तमान येथास्थित आहे. राजश्री रामाजीपंत यांणीं हकनाहक माहाराजाजवल आमची नालश लेहून पाठविली कीं जवारकर कामकाज करीत नाहीं आणि माडीची लाकडे आणितात. त्याजवरून माहाराज इतराज जाले. तर इतके रोज फौज व पायेचे लोक जमावानसी जाऊन चुना भरून आणिला आणि रात्री दिवसा जें कामकाज सांगितलें तें केलें. आणि लाकडाचें वर्तमान तर येक रोज रामाजीपंत व कृष्णाजी नाईक अणजूरकर येसे चुना भरावयासी गेलो होतो ते खाडीपलाड घरें मोडकीं होती. त्यास त्यांनींच सांगितलें कीं हे घरे मोडू नेत जाणे. त्याजवरून कोणे कोणे तीन कोसावरून लाकडें आणिलीं. तेहि येकच दिवस, त्याजउपर येक लाकूड अगर सालवण अगर तांडी अथवा रयेतीस उपद्रव हें सहसा माहाराजाचे दहशतीमुळें

कोणी देऊं शकतो येसे नाहीं आणि नाहक नालश लेहून पाठवितात तर आपला उपाय काय आहे ? आता चुना तर खाडीपलाड होता तो जाला. नव्या भव्या तयार होतात, येक भटी तो सीध चुना जाला आहे. आणि रामाजीपंतानी आजि आपणास सांगितले कीं तुमच्या लोकांस ताकीद करणें कीं लाकडे भटीस तोडून देतील. त्याजवरून आपण जवारकरास सांगितले परंतु ते येकत नाहीत. येसें वर्तमान आहे आणि आपण तो गरीब अनाथ माहाराजांची सेवा यथानशक्त्या करितों. परभारे आमची हकनाहक कोणी नालश लिहितात तर आपला कोणी वसीक नाहीं, तो तरी माहाराजाजवल अर्ज करील. सर्व आश्रय आणि अभिमान आणि इजत आबरू माहाराजासच आहे. ज्या प्रकारे वर्तवाल त्या प्रो वागूं. विशेश ल्याहावे तर येसे आपणाला शक्त काय कीं विनंती पत्र ल्याहावें. आमची घोडी सबर आहे. दीड महिना दिवस बाकी राहिले आणि जाणे दूर या कारणे सेवेसी विनंती लिहिली आहे की येक प्रहराची आज्ञा होईल तर सेवेसी येऊन आणि घोडी रवाना करून पाठऊन आपण तर माहाराजाचे चरण धरून बैसलो आहोत. पुढें सर्व चिंता आपणासच आहे. शाक वांगी पाठविली आहेत ते पावतील. बहुत काय लिहिणे ? कृपा निरंतर असो दिधली पाहिजे हे विज्ञापना.

¶*Khanderao Ballal denies the charges of neglect and highhandedness brought against him.*

No. 268]

छ २७ सवाल

श्री

राजश्री चिमाजीपंत गोसावी यासी

॥ऽ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो संभूसिंग जाधवराऊ दंडवत येथील कुशल जाणऊन स्वकीये कुशललेखन करीत जाणे विशेष. तुम्ही पत्र पाठविलें पावोन वर्तमान विदित जालें. आपण कोणे ठिकाणीं आहा ? कोठें मुकाम आहे म्हणऊन लिहिले तरी मौजे आमणापुरावरी मुकाम आहे. राजश्री त्रिंबकराऊ सोमवंसी सरलस्कर व राजश्री गोरखोजी भापकर आम्ही येकत्र आहो. रा। रामजी बंडगरहि येका दो रोजा येतील. राजश्री स्वामीकडूनहि आणिखी फौज रवाना जाली आहे. तेहि दर मजल चव्हाणावरी जातो. पुढे जे वर्तमान होईल ते लिहून रा। छ २० सवाल बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Shambhusing Jadhav informs Chimaji that he is marching against Chavan and hopes to be soon joined by Somvanshi and Bhapkar.*

No. 269]

श्री

श्रीमंत राजश्री चिमणाजीपंत
आपा स्वामीचे सेवेसी

सेवक कृष्णराऊ माहादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विसेष. स्वामींनें पत्र पाठविलें तें पावले. माहादाजी केशव यास धरून न्यावयास प्रयोजन काय आहे, त्यास सोडून देणे. नित्य उठोन च्यार बोभाट. दाभाड्याचे रोखे घेऊन तुमचे राऊत कलसामधें कडबा जमा करितात. तेथून तुम्हाकडे कडबा चालवीत नाहीं म्हणून त्यासी कलह करितां. जुनर सुभ्यामधें खरिद्या घेतां. पुणें देसामधें घासदाणा घेऊन मोकासदाराचे माणूस त्याचे गावामधें फिरो देत नाहीं. येशा साऱ्या गोष्टी बोभाटासच करितां हे उतम नव्हे. या उपर तरी विचारास येईल तर येसे बोभाट न येत ते करणें. पुढें तुम्हास कितेका गोष्टीची उमेद आहे. याजकारणे येसी वर्तणूक न करितां माहादाजी केशवास निरोप देणे म्हणून स्वामीनें तपसिलें लिहिलें. तर माहादजी केशव यानीं सिरवलीचे बैल अटकाऊन ठेविले. याचा बोभाट राजश्री रायाजवल आम्ही करावा तो शंकराजी केशव याचे आमचे आतपण याजकरितां शंकराजी केशव यासच बोलाऊन सिरवलीचें कमाविसदाराचें पत्र दाविलें. त्यावरून त्याणी कितेक आतपणें भाशण करून माहादाजी केशवास बोल लाऊन लिहिलें. तें पत्र त्याजकडे पाठविलें परंतु याचे विचारास न ये. आमचे बैल तो सुटले पाहिजेत म्हणोन बेल्हे वगैरे दाहागावीचे पाटेल व माहादजी केशव सिरवलीस आणून आमचे बैलाची वाट काय म्हणून आमचे कमाविसदारानीं विचारिलें. येशास बेल्हेकर म्हणू लागले कीं यामधे आमचा अपराध नाहीं. राजश्री रायाचे दस्तक असतां आमची प्रात काय आहे कीं तुमचे बैल अटकावावे? परंतु माहादजी केशवाचे हुकुमावरून अटकाविले. यैसे त्यांनीं सांगितल्यावर परभारे दाहा गावीचे पाटेल जमा जाले होते त्यानी बेल्हेकरास व माहादाजी केशवास बोल लाऊ, आमचे बैल आमचे कमाविसदाराचे स्वाधीन करून, याजपासोन अंतर पडले, सीव सेजारी क्षमा करणे म्हणून तेव्हांच घेऊन गेले. आमचे तो दर्शनच नाहीं. परंतु जाली हकीकत मात्र कलली. हे सत्य मिथ्या स्वामीस भासेल तर परभारे त्याचे भाऊ शंकराजी केशव तेथें आहेत त्यास विचारावें. तेच सांगतील ते प्रमाण. आमचाहि विश्वास त्याजवर आहे. याजकारितां शंकराजी केशव सांगतां सर्व विदित होईल. दाभाड्याचे रोखे तुमचे राऊत कलसामध्यें कडबा जमा करितात. येशास आमचे

राऊतचे दाभाड्याकडे चाकर आहेत. त्याचा मुकाम कलसास होणार म्हणून त्यानी कडबा जमा करावयास आमचे राऊत पाठविले होते. त्यांनीं कडबा जमा केल्यावर त्याचा मुकाम कलसास व्हावा तो न जाला. मांजरीस जाला. कडबा अनामत राहिला हें जाणून आम्ही त्याजवल मागोन घेतला. परंतु तो आणावया-करितां कोण्हासी कलह केला न केला हें तेथील मुजावर पुण्यामध्यें आहे त्यास मसिदीमध्यें घालोन शपत घेऊन विचारावें म्हणजे खरे लटके सर्व कलेल: जुन्नर सुभ्यामध्यें खारिदी घेतां म्हणून लिहिलें तर आमचे मित्र स्वामीजवल बहुत आहेत. याचा परिहार काय म्हणून ल्याहावा? परिहार लिहिल्याही स्वामीची खरीखुरी निशा होऊ देणार नाहीं. पुणे देसामधें घासदाणे घेतां म्हणून लिा तर दुंडलगांवी मात्र मागा दोन मण दाणा घेतला आहे. त्यासिवाय आणिक कोठे घेतला असेल तर स्वामीने गांवचा गांव जमा करून जो गला आम्हाकडे लागेल त्याचा द्विगुण आम्हाजवलोन घ्यावा. वरकड सातमाहाल प्रांते मोकासदारांचे माणूस त्यांचे गांवी फिरो देत नाहीं म्हणून लिा तर आजि-पावेतों खंडण्या जाल्या नाही. मोकासदारांनीं आपला येवज नेला आणि रोज उठोन रयेतीस घसघस आहेच. याजकारणें केवल माणूस त्याचे न फिरावे येसे नाहीं. खंडणी होऊन वसूल बाकी कले तवर कुनब्यास तगादा न करणे म्हणून ताकीद केली आहे. यामधें काय अंतर असेल तें पदरी घेऊन. येशा सर्व गोष्टी बोभाटाच्याच करितां म्हणून लिहिले तर आम्हास स्वामीचें भय नाहीं. स्वहित न कले स्वतंत्रता असती तरी येसी वर्तणूक होणे संकट, परंतु न करितां लौकीक होऊन स्वामीची निशा कोणे प्रकारे होते तें न कले. उमेदवारीचा आशय लिहिला तर याप्रमाणें आमची वर्तणूक होऊन स्वामीच्याच प्रमाणें निशा जालियावर उमेदवारीस नून्य अधिक प्राग्तनास उणे आहे येसे नाहीं. बरें, आपण सर्व प्रकार वडील धणी आहेत. परिहार काय म्हणून ल्याहावा? आम्ही सेवक. सर्व अन्याय आमचा खरा. परंतु खावंद लोकांनीं ईश्वराचें भय धरून अन्याय गैरअन्याय ध्यानास आणावा. केवल दुसरियाच्या सांगितल्यावरून ह्या गोष्टी ध्यानांत आणून आम्हावर इतराजी करावी हे उचित नाहीं. वरकड आम्ही परहार ल्याहाव तर आमचा लौकिक येसा नाहीं की स्वामीस आमचे लिहिलें खरें भासेल. विना आधी हरकोणी आमचा अन्याय केल्याखेरीज आम्ही कोणाचे गला पडत नाहीं. राऊताविसी आज्ञा त्यास राऊत येच घाटे चढोन पेठेजवल यास सामील होतील. आम्ही लवकरीच येतो. जवार

रामनगर उभयता राजे याच्या भेटी करून हुताशनी करणे चासेस येतों. स्वामी वडील आहेत. सर्व अन्याय आमचे क्षमा केली पाहिजे. बहुत काय लिहिणे, कृपा असो दीजे, हे विनंती.

¶*Krishnarao Mahadev Chaskar explains away the numerous charges and complaints brought against him and for which Chimaji Appa asked his explanation.*

No. 270]

श्री

श्रीमंत राजश्री चिमणाजीपंत
स्वामीचे सेवेसी

पो रामचंद्र महादेव कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशललेखन आज्ञा केली पाहिजे. या नंतर रा मोरसेट करंजे यास माणको उमाजी बा व राजश्री फतेसिंग याजकडील जुन्नर सुभ्याच्या जकाती सांगितल्या. त्यास कसबे उंबरे येथील सनद घेतली आहे म्हणोन येकिलें. तरी उंबराची जकात आम्हाकडे आजी बारा तेरा वर्षे आम्हाकडे आहे लो येवज किलास पावत असतो. मध्यें माणको उमाजी यांणी येक वर्ष ताकीदपत्र आपले आणून नवी जाजती जकात बसवावी म्हणोन खटपट करीत होता परंतु चालों दिले नाहीं. याउपरी मोरसेटीनी जुन्नर सुभ्याचा कारभार केला ते वर्षी जबरदस्तीनें वाणियापासून आडीचसे रुपये घेतले. आम्ही कल्याणास होतो तेथून आल्यावर वाणी आम्हाजवल आले. तेव्हा माणको उमाजीस आणून निर्वाह करून घेतला. येशास नवी कानु होते येसे नाहीं. सुदामत इापासून चालत आले आहे त्या प्रो चालऊन जाजती कटकट करितील ते चालणार नाहीं आपणास ते हकीकत लिा यास्तव लिहिले असे. वरकड जासूद पैकियाकरितां पाठविला तरी दो ती दिवसा पाठऊन देतो. को खेड व कडूस व पाबल ती गावाविसी आपण वचन दिले आहे. चितांत येईल तरी सनदा पाठवाव्या. आम्हापासून चाकरी होऊन येते न येते हे पाहावें. आम्हास कोकणांत मानत नाहीं. लोहगडी सीत बहुत, याकरितां ते स्थलीं रहावें लागतें याकरितां आपणांस लिा आहे. राजश्री पंत प्रधान यास विनंती करून आपण सनदा पाठविल्या पाहिजेत. अद्यापि तीन गाव न होत तर खेड कडूस दोन्ही गांव तरी आगत्य आम्हाकडे देविले पाहिजेत. बहुत काय लिहिणे? कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Ramchandra Mahadev to Chimaji Appa writing about certain financial transactions with Morshet Karanje, a banker of Satara.*

No. 271]

श्री

राजश्री पिलाजी जाधव
गोसांवी यांसी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रीा खंडेराऊ दाभाडे सेनापति रामराम. येथील कुशल जाणून स्वकीय लिहिणे विशेष. तेथें जालें वर्तमान बोलीचालीचें तपसिलवार लेहून पत्र पाठविले त्याजवरून साकल्य कललें. तुम्ही लिहिला विचार उतम आहे. त्याप्रमाणेंच सिधांतास नेऊन सत्वर यावयाचा विच्यार करणे. आम्ही राजश्री स्वामीची आज्ञा घेतेसमई बोली केली ते तुम्हास कलावी याजकारतां राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान यांस आलाहिदा पुरवणी लिहिली आहे ते मनास आणून आपले विचारास अंतर न होये यैसे करणे. जाणिजे छ २१ जिलकाद. बहुत काये लिहिणे ?

¶*Khanderao Dabhade writes in reply to Pilaji Jadhav that he agrees with his proposal and implores him to come immediately.*

No. 272]

श्री

राजश्री पंत प्रधान
गोसावी यासी

श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित पिलाजी जाधव दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखनाज्ञा करीत गेले पाहिजे विशेष. आजी ब्रहस्पतवारी वर्तमान यैकिलें कीं राजश्री चिमणाजीपंत बाबा तुळापुरापासी भिवरा उतरोन गेले. जवळियासी जाणार आहेत. तरी आपण सोमवंसियासी पत्र पाठविले पाहिजे कीं आम्ही दसरियासी मुहुर्त करून स्वार होऊन त्या प्रांते येतो. आम्ही येऊ तोवरी रा चिमणाजीपंतास खोळंबिले पाहिजे. बहुत काये लिहिणे. कृपा असो दिजे हे विनंती.

¶*Pilaji Jadhav requests the Peshwa to write to Somwamsi to stop Chimnajipant proceeding till he joins him after " Dussara ".*

No. 273]

श्री

मंत राजश्री आपा
स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक तानाजीराऊ खानवलकर सां दंडवत विज्ञापना. तागायत छ १६ माहे रबिलोवलपर्यंत किले बलवंतगडीं समस्त स्वामीचे कृपाद्रष्टीकरून कुशल असों विशेष. पेसजी जोगे परभू व गोंदजी सुलका सेवेसीं पाठविला होता. त्यास आज्ञापत्र सादर जाहलें कीं पुणेच्या मुकामाहून बेगमी लोकांची केली जाईल व पांच हजार रुपये रोजमरा पाठविला त्यास पावणा महिना दामाशाही लोकास बसली असा विचार आहे. गनिम हमेसा खबरदारीनें गोस्टी सांगतच आहे. लोकांची आबाल आहे. उस्तवारी करणार स्वामी खावंद समर्थ आहेत. विदित होये. यानंतर बावडेस श्रीमंत राजश्री राऊ आमात्य यापासी शंभर माणूस पेसजी आज्ञेप्रमाणें ठविलें होतें. त्यास आणावयाविसीं आज्ञा जाहली व त्यासहि परस्पर लिहिलें आहे म्हणोन आज्ञापिलें. त्यास ते म्हणतात कीं बावडा सिवगड बलवंतगड तिनी जागें आपाच्या पदरीं घातले आहे. याच जाग्यावरून कार्यभाग करणें तो करून. बलवंतगड राजश्री आपाचा आणि बावडा कोणाचा? आम्ही बिलकूल त्याचें पदरीं पडिलों आहों. त्याची आपली भेटी होऊन पुढें कितेक कार्यभाग करणें आहे. लोकास येव्हांच निरोप देत नाहीं. चाकरी म्हणावी तरी बालेकिल्यावरी निमे माणूस नेहमी ठेविलें आहे. आलंग नौबत चौकी पारा हमेशा चाकरी पडते. निमे लोक आपणासनिध पेठेंत चाकरीस ठेविले आहेत. त्याचा स्वामीचा तो श्नेह चालतो. त्यास रोजमरा आजीपर्यंत स्वामी देतच आहेत. आम्ही आज्ञाधारक सेवक येविशीचीं काये आज्ञा कर्तव्य ते केली पाहिजे. सिवगड तों सालपीच्या उरावर आहे. बावडा राजापूर विजयदुर्गचें नाक आहे. बलवंतगडहि संवदल राजापूरच्या माथां आहे. तीन जागावरून पुढें जो जो मनसबा करणें तो स्वामी करणार समर्थ आहेत. येविसीं पेशजीं राजश्री आणाजी नाईक साटम याणीं विनंतीपत्र लिहिलेंच होतें व हली हें विनंतीपत्र सेवेसीं पाठविलें आहे. आज्ञा येईल ते प्रमाण असे. आम्हांपासून सेवाचाकरी म्हणावी तरी बलवंतगडीं राहून स्वामीकार्य घडोन न आलें व बावड्यासहि न जाहलें परंतु स्वामीनी बावडा लोक ठेऊन पंताचें घर जतन केलें हे कीर्ति दिगंती जाहली. लोकाची चाकरी म्हणावी तरी सिवगडीं आम्हांकडील लोक पेसजीं ठार तीन जाहले. जखमी पांच जाहले. हत्यारें गेलीं परंतु इतकें सोसून खस्त खाऊन तेथें मन राहतें. निमित्य हेंच कीं स्वामीचा त्याचा

श्नेह, आदिघर पुरातन समर्थ असेहि असोन श्रीमंत राजश्री भगवंतराऊ आपले स्वमुखें म्हणतात कीं आपण राजश्री आपाचा खरिदी आहे. उतीर्ण या लोकीं होतो यैसें नाहीं, असें सर्वापासीं बोलतात. पुढेंहि कितेक मनसबे त्याच्या आपल्या विचारें होणार. सिधीस इश्वर नेणार. यानिमित्य उपाये नाहीं. आम्ही चाकर लोक आज्ञेप्रमाणे सेवा करावी. आज्ञा होईल ते प्रमाण असे, सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

¶*Tanajirao Khanvilkar of Balvantgad reminds Chimaji Appa of the loyal services rendered by him and requests him to intercede for him and thus settle the differences between the writer and Bhagvantrao Amatya.*

No. 274]

[पत्राचा प्रारंभींचा भाग गहाळ.]

विनंती सेवक रामाजी माहादेव मुा ठाणे साष्टी चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २९ जमादिलाखरपर्यंत स्वामीचे कृपावलोकनेकरून येथील वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री मानाजी आंगरें याणी मोहपंथास गडगा घालोन बंदीस्तीचें काम लाविलें होतें. त्यास स्वामीचे आज्ञेवरून गडगा ढासळून टाकिला. उपरांत मनाजी आंगरे सातारियास गेले. जाऊन सांप्रत पुण्यास आले आहेत. अविलंबेच खाले येण्हार ऐसें वर्तमान आले तों कुलाबियाहून दाहा वीस माणूस व वेठे मोहपंतास येऊन येक चौकी बांधो

येथील. येताच कजिया * * * * होईल यास्तव लोक पाठऊन वन्हीप्रयोग करविला. पुढें ते खाले आल्यावरी बांधावयाचा विचार करितील तरी येविसी आज्ञा ते सिरसा. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Ramaji Mahadeo informs the Peshwa that he according to his orders destroyed the temporary ramparts erected by Manaji Angria who thereupon has proceeded to Satara and will thence go to Poona.*

No. 275] [*1745?*

श्रीविठलराज प्रसन्न

श्रीमंत माहाराज गौब्राह्मणप्रतिपालक

राजश्री स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक नारायेण तुकदेव साा नमस्कार विनंती उपर. येथील क्षेम ताा छ २७ सफर जाणौन स्वकीय लिाा आज्ञा केली पाा विशेष. येथील वर्तमान

4677

बरचेवर जे काही रुबकार जाल ते सेवेसी लिा. प्रस्तुत विठल जगनाथ सेनवई रां नारो राम मंत्री याचे तरफेचा राजश्री नाईकाकडून पैकियाचे सरंजामाबदल येथ आला होता. त्यास यानी साठ हजार रुपयाच्या हुंड्या रां नारो राम मंत्री याचे नाव करून पाठऊन दिधल्या. त्यास विठल जगनाथ रां जवल जाऊन वर्तमान हुंडियाचे सांगितले. मग म्हणू लागले की, अपाजी नाइकाचे रुपये गतवरशीचे नगद किंवा साहुकारी निशा करून द्याल तर सल्ये राहात. नाहीतर सल्ये राहात नाही. अनि हवनूर याची जागीर तेथील गुतल पेट मारली गढीस मोरचे लावले व गुतलची पेट मारली येसी धूम मांडली. अनी यासी त्यासी विरुध जाले. त्यास रा मुरारराव याजवलच आहेत. त्यानी फौज गोला केली. दोन हजार जमा जाली व रा हिंदुरायेहि बारा कोसावर तीन हजार स्वारानसी आले आहेत. ते येका दो रोजा येणार ते आले म्हणजे बाहेर निघोन लडाई करावी येसा निश्चय केला असे. याचे घरची तीन हजार फौज चांगली आहे. व रा मुरारराव व रा हिंदुराव च्यार पाच असे येसे येक होतील. येसीयामधे याची कुमक हरकैसी होती तर काम पोख्त होईल. रा नाईक नवाब असफजाहवरून बहकले असेत. इतके दिवस यासी सल्येच म्हणत होते अनी पैकाहि अनविले अनी आतां फिरले त्यास अता लढाईचा सरंजाम हे करीताती. लढाई होईलसी दिसती, ते बहुत हे थोडे; परंतु हे जिवावर अंगेजणी करतील. श्री येश कोन्हास देईल ते पाहावे. बहुत काये लिा हे विनंती.

¶*A news-letter from Karnatak which needs to be explained.*

No. 276]

श्रीआईआदिपुरुष

सकलगुणालंकरण अखंडित-
लक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री चिमणाजी पंडित स्वामी
गोसांवी यास

पोष्य श्रीनिवास परशराम कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहिले पाहिजे. यानंतर आपण पत्र पाठविलें प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाला. पाडली, कडापूर, सिरगाव यावरी स्वारीपटीचे रोखे आपण केले आहेत ते मनाकरून * * * तसदी न लागे ते करावे. तैसेच चां(भार) व कुंभारहि दोन यास नेऊन राहाविले तेहि सोडून देवावे

4678

म्हणून कितेक लिहिलें तरी अजिपर्यंत आपल्या गावावरी स्वारीपटी व किरकोळ उपद्रवास आम्हाकडून रोखापत्र घेऊन उपद्रव जाला न जाला आपणास कललाच आहे. स्वारीपटीचे परभारे राजश्री नी रोखे करविले आहेत. आम्हाकडून रोखेमात्र करविले. आश्यास आपणहि राजदर्शनास आले.आहेत. विनंती करून जे आज्ञा करितील त्याप्रो विचार होईल. आमचा आग्रह नाही. चांभार कुंभार आम्ही आणिले नाहीत. परस्पर तेथे नेले आसतील. तेथून मनास आणून नेले पाहिजेत. बहुत काये लिहिणें; आपले गावास उपद्रव करावा, पैका मागावा यैसे नाही. परस्परे रोखे राजेश्रीनी करविले. पैका राजे घेणार. आम्ही त्यातील रुपाया वेऊ तरी श्रीचा शफत असे. आपणहि आले आहेत. राजेश्रीहि समीप आहेत. मनाचिठी घेतली पाहिजे. आपले जिलेप्रमाणे इकडे यख्तयार आम्हावर नाही. हा आर्थ आपणास कलोन गेला आहे. निमित्यास मात्र आम्ही असो. कृपा आसो दीजे हे (विनती.)

¶*Shrinivas Parasharam denies having sent orders to exact tribute from villages belonging to the Peshwa. It is the Raja, he declares, who has issued the orders and the addressee should address the King personally to get them withdrawn.*

No. 277]

श्रीआईआदिपुरुष

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य
राजश्री बाजीराऊ पंडित स्वामी गोसावी यांसी

सेवक कृष्णाजी परशराम कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल जाण स्वकीये कुषललेखन करीत गेले पाहिजे विशेष. आपणाकडून पत्र बहुत दिवस वर्तमान कलत नाही. तरी सविस्तरे अर्थ लेहून श्नेहाभिवृधि होये ते केलें पाहिजे. यानंतर पूर्वी आपल्यास दोनच्यार पत्रे पाठविली होती; परंतु चितानरूप प्रसंन घडोन न आला. ऐशियास, आम्ही पूर्वील श्नेह वडिलापासून चालत आला आहे तो स्मरोन अधिकोतर त्या श्नेहाची अभिवृधि पावावी म्हणोन आपल्यास पूर्वी लेख केला होता. परंतु आपण तो अर्थ चितात काणिला नाही, हें श्नेहास उचित नाही. प्रस्तुत चिरंजीव राजश्री अमृतराव याजकडील

---

* यापुढील मजकूर खुद्द श्रीपतरावाच्या हातचा आहे.

जमाव घरींच बैसला आहे, याजकरितां त्याचे चित उद्विग्नता जाहाली, याजकरितां त्याचा जमाव सहवर्तमान आपणाकडे पाठविले आहे. तरी चिरंजीवाचा सर्व प्रकारें अभिमान धरून, आपला चिरंजीव यैसे मानोन यांचे हाते सेवा घेत जाणे. वरकड कितेक अर्थ चिरंजिवास सांगितला आहे; निवेदन करितील तो चितात आणून प्रतिउतर पाठवणे म्हणजे आपले अभिष्टार्थ श्रीकृपेने सिधीस पावेल. आम्ही सर्व प्रकारे साहित्यास अंतर करणार नाही. येतद्विषई राजश्री रुद्राजी कृष्ण यास लिहिले आहे. हे निवेदन करितील त्यावरून कलो येईल. बहुत काये लिहिणे, दया असों दिजे, हे विनंती.

¶*Krishnaji Parshuram Pratinidhi solicits the Peshwa to take in his service his son, Amritrao, whom he has already despatched with a contingent.*

No. 278]

श्री

राजश्री भिवराऊ यांप्रति

सौ कासीबाई कृतानेक नमस्कार विनंती उपरी; येथील कुशल ताा छ १९ साबान जाणून स्वकीये लिहिणे विशेष. आलीकडे तुम्हाकडील पत्र येत नाहीं. यैसे न करणे. आपले वर्तमान लिहीत जाणें. आम्हांस ठेविले आहा त्याप्रोा कुशल आहो. तुम्ही आपले वर्तमान लिहिणे. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*In a formal letter written to Bhivrao, Kashibai, the Peshwa's wife, casually drops in the remark that she is as happy as she can be in the lot which has befallen her, thus, probably, hinting to some estrangement between herself and her husband.*

No. 279]

श्री

तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे शेवेशी

अपत्यें अंताजी नारायण साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा छ २ रबिलाखरपावेतो वर्तमान यथास्तित असे विशेष. छ २४ रबिलौवलचे स्वामीचे आज्ञापत्र आले तेथे आज्ञा कीं, राजश्री स्वामीकडून हती आला आहे तो कैसा आहे, माहातारां[१] अइबदार आहे किंवा ज्वान बेअइब आहे, ते माहातास बोलाऊन

---

१ कांहीं व्यंग असलेला.

आणून परीक्षा करून तपसीलवार लेहून पाठवणे म्हणून आज्ञा. त्याजवरून माहातास आणिले व हती आणिला. आण माहातास पुसिले. त्याणे सांगितले कीं, हतीच्या दोही डोल्यांत फुले आहेत. आणीक काही अइब नाही. हती विसा वरसामध्यें उमर तरणा आहे, यैसे सांगितले त्याजवरून सेवेसी लिहिले आहे; व माहतानेहि हतीचे वर्तमान सेवेसी अर्जदास लिहिली आहे त्याजवरून विदित होईल. श्रीमंत राजश्री नाना याजवल जेव्हा हती आला तेव्हा फुले डोल्यात आहेत ती देखिली, तेव्हा माहातास पुसिले. त्याणे सांगितलें कीं, वोषध केल्याने फुलें बरीं होतील. मग दुसरा माहात नवा चाकर नाना स्वामीनी ठेविला. त्याणेहि कबूल केले की डोले बरे करितो. त्याजवरून वोषधें देऊन हती येथे पाठविला. येथे आम्ही पुसिले तेव्हाहि त्याणे सांगितलें कीं, डोले बरे करितो. त्याजवरून पूर्वी सेवेसी ल्याहावें ते लिहिले नाही. याप्रमाणे वर्तमान आहे. सेवेसी विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Antaji Narayan informs Chimaji Appa that the elephant, sent by King Shahu, is young and, except some curable defect in the eyes, without any fault.*

No. 280 *[1735?]*

श्रीशंकर

श्रीमंत माहाराज राजमान्य राजश्री बाजीरावजी
तथा आपा स्वामीचे सेवेसी

पोष्ये सदासिव नाईक सास्टांग नमस्कार विनंती उपरी येथील क्षेम चैत्र शुध ८ पावेतो सहकुटुंब सुखरूप असो. येथील वर्तमान शामजी नाईक सांगतां विदित होईल. घाटाचा आरंभ करावा तरी येथील अधिकारी याने गंगातीरी काम आरंभिले आहे, तेणेकरून अनकूलता न पडे. महाराजजी, श्रीमनकर्णिकेस घाट सिध जाहाला त्यासारिखे स्थल कोठेहि नाही, त्याघाटासारिखे स्थल आणिखी कोठे नाही. घाट बांधावा आणि ब्राम्हणस्नाने न वत [होत?] तेव्हा वृथा श्रम काये करावा? कासीत ठिकाणे ३: पंचगंगा, श्रीमनकर्णिका, दशासमेध. त्यामध्ये माहाराजाचे दोन ठिकाणी घाट जाहाला; मनकर्णिका, देशासमेध. पंचगंगेस तो स्थल नाही यैसे जाणोन मंदाकीनतीरी बागेस आरंभ केला. ते बाग सिध जाहालियावरी सविस्तर लिहीन. यात्रकरू लोक येतील त्यास राहावयासी जातां राहातील. दोन सहस्र ब्राम्हण येक पंगतीस भोजने होतील. तीन बिघे स्थल आहे. गावासनिध आहे. महिने ६ आरंभ केल्यास जाहाला आहे. दिवसभरी श्रम करितों. शामजी नाईक सर्व विदित करील. चिरंजीव

आबाजी येथे आले. शरिराची अवस्था पाहतां बहुत खेद जाहाला. त्यास उपाये करून रोगमुक्त करून माहाराजांजवली पाठवावा हे चितात आणून दोन महिने अनउदक वर्ज करून तक्रप्रयोग केला. आजी प्रयोग समाप्त जाहाला. रोगहि गेला दिसतो. परंतु शक्तहीन जाहाला आहे. आजीच अनास प्रारंभ केला आहे. दोन महिने शक्ती यावयास लागेल. ईश्वरइच्छा आहे. तरी जेस्ट मासी उभयेतांस रवाना करितो अथवा कार्तिक मासी रवाना करीन. बहुत ल्याहावे तरी शामजी सर्व येथील वर्तमान विदित करील. वेदमूर्ति नारायेण दीक्षित येथे आले. त्यास घर अनकूल करून दिले. ते बहुत कृपा करितेत. त्याच्या पत्रावरून सर्व विदित होईल. हे विनंती.

तीर्थरूप मातुश्री बाईस सास्टांग नमस्कार. आबाजी व भिऊबाईविसी चिंता न करणे. उभयेतांस सत्वरच सेपुत्र[1] करून पाठवितो. हे विनंती.

¶*Sadashiv Naik Joshi, from Benares, writes to the Peshwa and his brother that he has commenced the work of building, a ghat and a house which, when completed, will serve as a lodging house for pilgrims.*

No. 281]

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे शेवेसी

अज्ञाधारक सिवराम कृष्ण सां नमस्कार विनंती. विनवावया प्रार्थना ऐसीजे. ता। छ २९ रजबपावतो सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीनी अज्ञा केली होती त्याजप्रा। इमारितीची कामे जागा जागा चालीस लाविली. गावीचे दरवाजे अगदी व वाडियाचे दरवाजे लाविले. रीहे येथील तुलवटे दीडशे आणून जमा केली. वासेहि पौडखोरियातील गाडे लाऊन आणिले. जागा जागा जेथे जेथे पाहिजेत तेथे जमा करून ठेविले. रंगाचे काम चालत आहे. रा। आपाच्याकडील खोलीबाहीरील गिलावा केला. दिवाणखानियाजवलील खोली स्वामी निजत होते ती कड्या उलगडून नवी तक्षपोसी केली. वरीलहि तक्षपोसी

---

१ सुपुर्द करणें, हवाली, रवाना करणें.

केली. विटा पक्या मुस्तैद[1] जाल्या. प्रस्तुत पुढील भिंतीचे काम चालविले आहे, ते जाले म्हणजे राहाटाच्या हउदाचे, बंगलियाचे भिंतीचे, काम चालवितो. नदीजवलीची भुडकीचेहि काम चालत आहे. विटाचे काम आठा दिवसी चालेल. तूप खा सतरासे रुा पावतो जाले. तेलहि खा केले. हरभर नवे अद्यापि विकत मिलत नाही. पाडहि पडला नाही. बाजरी थोडबहुत खा वरचेवरी करितो. वरकडहि गला थोडाबहुत जो मिलतो तो खा करीतच आहो. पुसे यात्रेमध्ये खा जिनस करावयाची आज्ञा होती. त्यास रुा पाचशे पाठविले होते. परंतु पुसे यात्रेमध्ये काहीयेक जिनस आला नाही. माही यात्रेस येईल. माहीस जिनस खा करितो. गलियाची खा, स्वामीनी आज्ञा फार केली आहे, त्यास आम्हाकडे यैवज काये आहे तो कललाच आहे. राजश्री आयाबाकडे पैसा मागितला तरी देत नाहीत. तुमच्या यैवजात समजा म्हणताती. जो यैवज येईल तो कर्जदारास देऊ यैस म्हणताती. त्यास स्वामीच्या येण्यास दिवसगत लागेसारिखी आसिली तरी पाचसात हजार रुा मुबदला हरकसे देववावे म्हणजे जो जिनस पाहिजे तो जमा होईल. राजश्री अपानी नर्मदेच्यौ तलावरून आज्ञा केली कीं कुल जिनस दाणा, तूप, तेल, कडबा, गवत, नालमेख, तंगनवार, सूत अंबाडीदेखील वरषाची बेगमी घरात जमा करून ठेवणे व सिदोजी राऊत यास घर बांधोन ठेवणे म्हणून आम्हास आज्ञा केली आहे, याजविसी आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. बाग गोप माली याचे हवाला केला. पहिले माली होते, नदीचे बागेचे कमाविसीस लाविले. वाडीयाजवलील विहीरीस पाथरवट लाविले आहेत. येक गज फोडिली आणखी येक गज फोडावी लागते. कुसाचे काम चालिले आहे. नवे घर आखून दिले होते, त्याचे पाये खणोन दगडी पाये भरवितो. लाकडे अवघी घराची जमा जाली आहेत. खांब नाहीत याजकरिता गाडे पाठवून खांब नवे तोडून अणविले आहेत. दौचौ रोजानी आले म्हणजे सुतार लावितो. नारायण गडकरी पाथरवट बागेच्या विहीरीस दोन च्यार थर धोंडियाचे पाहिजेत याजकरिता धोंडे फोडून फाडी पाडवितो. बागेची विहीर फोडावयास अद्यापि पाथरवट लाविले नाही. याउपरी लावितो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Shivram Krishna reports to the Peshwa the progress of the several works, houses and wells and other constructions, and requests him to send money for purchasing provisions.*

---

१ मुस्तेद=सिद्ध, भक्कम.

No. 282]
छ २२ सवाल

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री अपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी, राजश्री आनंदराऊ पंडित सुमंत याची सून धाकटी, राजश्री मोरो शामराज याची कन्या, तीस वेथा ज्वराची जाली होती. उपाये बहुत केला, परंतु वेथा बरी जाली नाही; मृत्य पावली. स्वामीस वर्तमान कळात्रे याकरिता लिहिले असे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Chimaji Appa is informed of the death of the younger daughter-in-law of Anandrao Pandit Sumant.*

No. 283]
छ ६ मोहरम

श्री

पुा राजश्री पंतप्रधान गोसांवी यांसी

विनंती आवंदा उतर प्रांते स्वामीची स्वारी जाली आहे तरी आम्हाकारणे तुरकी घोडा उतम येक व बंदुख १ येक व कुतरी जोडी १ येक येणेप्रमाणे मेलऊन घेऊन आले पाहिजे. विशेष काये लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंति. [मोर्तब सुद]

¶*The Peshwa, who is in the North on an expedition, is requested to secure for the addressee a fine Turkish horse, a gun and a pair of dogs.*

No. 284]

श्री

राजश्री पंतप्रधान गोसांवी यांसी

श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित पिलाजी जाधवराव कृतानेक दंडवत विनंती येथील क्षेम जाणून स्वकीये लेखन आज्ञा केली पाहिजे विशेष. पत्र पाठविले प्रविष्ट जाले. पत्रीं आज्ञा केली कीं अंगुराचा हंगाम आहे. त्यास कनड परगणियांत फकिरी अंगुरे बेदाणा गोड आहेत, ती दो चौ रोजाचे अंतरीयाणे दोन चार डाल्या रोज हंगाम आहे तोवरी येत ते करणे. येसियासी आपण चिरंजीव राजश्री आपा यास आज्ञा केली. त्याणी पत्र पाठविले त्या-

वरून आपले पत्राअगोदर मुजरद कमावीसदारास पत्रे लेहून राऊत रवाना केले दराखांचा हंगाम तो गेला आहे. परंतु आज्ञेप्रमाणे काही कनडेस व काही दौलताबादेस उतम असतील ती सेदोशाची विकत घेऊन चौ रोजाचे अंतरियाने मिलतील ती वरावर रवाना करावयास लिहिले आहे. तिकडून येतील ती आपल्याकडे वरावर रवाना करीत जाऊन. वाटेची निभाऊन येतील, उतम असतील ती आपल्याकडे पाठऊन. वाटेस सडतील त्यास उपाये नाही. आज्ञेप्रमाणे तरतूद उतम प्रकारे करऊन मिलतील ती आणविली आहेत. विदित जाले पाहिजे. विशेष कार्ये लिहिणे कृपा असो दिजे हे विनंती.

¶*Pilaji Jadhav writes to the Peshwa he would be very glad to send him grapes provided they were available.*

No. 285]

छ २८ जालौवल [*Rd. 5-10-1735*?

श्री.

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व तथा
राजश्री आपा स्वामीचे सेवेसी.

विनंती. स्वामीचे जिल्हेंतील चाकरमाने पाटील यांस पूर्वी निरोप दिल्हा त्यावरून ते घरास अगदी झाडून गेले आहेत. यैशास प्रस्तुत राजश्री स्वामीनी आज्ञा केली कीं, चाकरमाने पाटील आणवणे. त्यावरी आपण उत्तर दिल्हें कीं, पाऊसपाणी येनदां गेला म्हणून रयेत तमाम उठली; गांव वोस होऊं लागले. चाकरमाने कोठून येतील? यैसा जाबसाल केला, परंतु आइकत नाहीं. राजश्री बोलिले, यैसी संपादणी केल्याने चाकरमाने मना होत नाहीं. आजी रोखे करून दीपवालीकारणे आणवणे. दसरियापावेतों निरोप दिल्हा होता. त्यास आजी पंधरावीस रोज जाले; अद्यापि हाजीर जाले नाहीं. तरी सत्वर आणवणे म्हणून आज्ञा केली त्यावरून स्वामीस लिहिलें आहे. तरी चाकरमान्या पाटलांस ताकीद करून पाठविले पाहिजेत. त्यांजबरावर दोघे न्हावी व दोघे परीट त्यांचे चाकरीस पाठविले पाहिजेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The writer communicates the desire of King Shahu to the Peshwa and his brother Chimaji Appa that the servants, who have gone on leave, should be asked to present themselves on duty immediately.*

No. 286]

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

सेवक कृष्णराव माहादेव सा। नमस्कार विनंती. येथील कुषल जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे. यानंतर स्वामींनी आज्ञापत्र पाठविले तेथें आज्ञा की, माहाराज राजश्री स्वामींनीं तुम्हाकडील बदकांच्या जोड्या आणविल्या आहेत. याकरिता पेसजी रूबरू सांगितले आहे व हाली बावाजी ठुबा पाठविला आहे. तरी बदकें जोडिया पाठऊन देणे. त्यावरून जोडिया सुमार ३ तीन पाठविल्या अहेत. हुजूर रवाना केल्या पाहिजेत. कृपा लोभ असों दीजे हे विनंती. पांच जोडी पाठवायाची आज्ञा केली. त्यास बदकें कांही कुतरियानें मारिली. बाकी होती त्यापैकीं २ जोडी आम्ही ठेविली, तीन जोडी स्वामीकडे पाठविली असेत. विदित जालें पाहिजें हे विनंती.

¶*Krishnarao Mahadev sends three pairs of ducks for King Shahu.*

No. 287]

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ व तथा राजश्री

आपा स्वामी वडिलांचे सेवेसी

अपत्यें माहादजी अंबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. ता। छ १९ जमादिलोवलपर्यंत स्वामीच्या आसीर्वादेंकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री कुसाजी भोंसले व राजश्री येसाजी भोंसले यांस स्वामीकडून पेणच्या बंदरपैकीं मीठ खंडी २५ पंचवीस पावत असतें, म्हणून मा।रनिलेनी सांगितलें त्यावरून स्वामीस लिहिलें आहे. तरी सालमजकूरपैकीं सदरहू पंचवीस खंडी मीठ पेणच्या कमाविसदारास लेहून देविलें पाहिजे. गुदस्तां देविलें असेल त्याप्रमाणें येनदांहि देविलें पाहिजे. राजश्री मानाजी आंगरे यांसहि राजश्री स्वामीचा हातरोखा अलाहिदा सादर आहे. तरी त्यांजकडील व आपल्याकडील येकूण दुतर्फा पंचवीस खंडी पावत असतें त्याप्रमाणे देविलें पाहिजे. * बहुत काये लिहिणे, कृपा केली पाहिजे, हे विनंती.

¶*Mahadaji Ambaji Purandare requests the Peshwa to issue orders to the Kamavisdar of Pen for the grant of twenty-five Khandis of salt to Yesaji and Kusaji Bhonsle.*

No. 288]

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ व तथा
राजश्री आपा स्वामीचे सेवेसी.

अपत्यें माहादाजी अंबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा छ १७ जमादिलाखरपर्यंत स्वामीच्या आसीर्वादेंकरून येथास्थित असे विशेष. स्वामीनी होसरे [बोसरे ?] २ व दुती २ येकून च्यार पाखरें पाठविलीं ती राजश्री स्वामीकडे नेऊन गुदरलीं. आणीक मिलालीं तरी प्रेत्न करून पाठवावीं म्हणून आज्ञा केली आहे. विदित जाहालें पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ambaji informs the Peshwa that the four birds sent by him have been presented to King Shahu who, the writer adds, would like to have some more of the kind.*

No. 289]

श्री

पुरवणी चिरंजीव राजश्री नाना यासीं आसीर्वाद उपरी. राजश्री स्वामीकडील हुजरे पुणे जुनेर प्रांते चीक काढावयास आले आहेत, येविसीचा अर्थ पहिला लेहून पाठविला परंतु उतर आलें नाहीं; तरी उतर पाठवावे म्हणून लिहिले ते कलले. यैशास येविसीचे उतर पाठविले आहे; पावले असावें अगर पावेल हालीहि लिहिले जातें. हुजरे मुलकातच जावयाचा आग्रह करितात, त्यास उतम पक्ष तो च्यालीस पनास रुपये घेऊन मुलकातून जात असिले तर पनास रुपये देंऊन निरापार करणें. कदाचित हे गोष्टी त्यास मान्य होत नसेल तर जिकडे चीक असेल तिकडे दाहपाच गावी पाठऊन दाहापाच घागरी त्याणी चीक न्यावा. थेर गावास पाऊला व लाहान गावास चवल प्रो तह आहे त्याप्रो घ्यावा. त्याखेरीज तुम्ही त्यास दाहावीस रुपये इनाम देऊ करणे ते त्याणी घ्यावे. वरकड गावास उपसर्ग न द्यावा. मुलकात फिरो नये. बराबर तुम्हीं चोघे खासबारदार देणे. त्याही हुजऱ्यास वरकडे गावी उपद्रव करू देऊ नये. याप्रो बंदोबस्त करून चीक काढावयास पाठवणें राा छ २७ जिल्हेज हे आसीर्वाद.

¶*Nana is asked to arrange that the juice of a certain plant should be sent to the King.*

No. 290]

पौ छ १६ जमादिलाखर

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ
व तथा राजश्री आपा स्वामीचे
सेवेसी.

विनंती. राजश्री स्वामीनी आम्हास आज्ञा केली कीं आमचे खासा स्वारीस व माहालचे स्वारीस हतणी दोन बसावयास नाहींत. आमचे हती आहेत; परंतु आमचे स्वारीयोग्य अथवा माहालचे स्वारी योग्ये गरीब नाही. यास्तव तुम्ही राजश्री पत प्रधान यांस दोन हतणीविषीं लिहिणे. आमची व माहालची स्वारी या दोनी नाजूक, दोही स्वारीयांकडें गरीब हतीणी पाहिजेत. त्या आणिक कोणी मेलऊन देतो यैसे नाहीं. तुम्हीं पेशवे आहां. तुम्ही दोन हतीणी गरीब आमच्या व माहलच्या स्वारीयाल्याख मेलऊन देणे. निदानी पैका मागाल तऱ्ही देऊ यैसें बोलिले, त्यावरून स्वामीस लिहिले आहे. तरी स्वामीच्या चितानरूप होईल तरी हतीणीची तर्तूद करावी. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Shahu requisitions two mild elephants from the Peshwa for himself and for his queens.*

No. 291]

छ १६ रालाखर

श्री

पुा तीर्थरूप राजश्री राऊ
तथा राजश्री आपा स्वामीचे
सेवेसी

विनंती उपरी. गुमठकरांचा पाऊणसें खंडी गला सोडावयाविषीं राजश्री स्वामीचें वचन गुंतले. मग राजश्री स्वामीनी राजश्री संभाजीराजे यांस सांगून पाठविले कीं पाऊणसे खंडी गला गुमठकरांचा अवघा आहे तो जाऊं द्यावा लागतो. त्यास हे गोष्टी त्यानी अमान्ये केली. निमे गला सोडूं, निमे न सोडूं म्हणून राजश्री संभाजीराजे याणी प्रत्योतर सांगून पाठविले. मग राजश्री स्वामीनी आपलें वचन सत्य करावयास्तव

पाऊणसें खंडीपैकीं निमे साडेसततीस खंडी राजश्री संभाजीराजे यांचे विचारें सहजेच सुटला. बाकी निमे साडेसततीस खंडी गल्याचा पैका राजश्री स्वामीनी आपल्यापासून शामरायास देऊं केला. येकूण पाऊणसे खंडीचे वचन सत्य केले. स्वामीस कलावें यास्तव लिहिलें आहे. विदित जालें पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*The Peshwa is informed that the King kept his word to Shamraj by agreeing to pay in cash for the loss which his grain-stores suffered.*

No. 292]

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ व तथा
राजश्री आपा स्वामीचे शेवेसी

अपत्ये माहादाजी अंबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा छ २९ जमादिलवलपरियेंत येथास्थित असे विशेष. राजश्री भगवंतराऊ माहादेव हे राजश्री जिवबा चिटनिवीस याचे मेहुणे. याचे चालवणे मारनिलेस अगत्य. यास्तव स्वामीस पत्र लिहिले असे; तरी येक असामी खंडोजी माणकर याजकडे येक असामी घालून पोख्ता रोजमुरा बांधोन योगक्षेम चाले ते केले पाहिजे. राजश्री जिवबास यांचे परम अवश्यक जाणोन स्वामीसहि त्याणी पत्र लिहिले असे, व आम्हीहि लिहिले आहे; तरी अगत्यरूप लिहिल्याप्रमाणे राजश्री भगवंतराऊ याचे चालविले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विनंती.

¶*The Peshwa is requested to make provision for one Bhagwant Mahadeo, a relation of Jivba Chitnis.*

No. 293]

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व
तथा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती स्वामीनी निंबाजी जासूद याजबराबर पत्रे व राजश्री सुमंताच्या पत्राच्या नकला पाठविल्या त्या पावल्या. लिहिले वर्तमान कलले. स्वामीनी सुमंताची पत्रे पाठविली. त्यापूर्वील येकादो दिवसाची पत्रे मारनिलेची काली

मंगळवारी येथे आली, ती आजी बुधवारी प्राथःकाली नारोपंत डबीर याणी राजश्री स्वामीस वाचून दाखविली. त्याची नकल करून स्वामीकडे पाठविली आहे, त्यावरून कळो येईल. पत्रे वाचून दाखवतेवेळेस आम्हीहि दरबारी होतो. साराऊष सुमंताच्या पत्राचा खुलासा * च की मोगलाचा शोध * * म्हाकडील फौजास त्याप्रांते कोणाचा * * * * यैसे सांगितल्यावर स्वामीची पत्रे आली, त्याचा मजकूर आम्ही विदित केला, की ह्या पत्राचे उपरांतिक पत्रे पुणियासी आली ती येथें आम्हापासी पाठविली. त्याचा मजकूर की, तिरंदाजखान दोन तीन हजार फौजेचा सरदार मातबर होता तो मलारजी होळकर व राणोजी सिंदे याणी लुटिला, व आणीकहि मोगलाची फौज याजवर आली होती त्यापैकी काही घोडी व उंटे घेतली, यैसे इतकेच मात्र वर्तमान विदित केले. राजश्री स्वामी काही बोलिले नाहीत. स्वामीस कळावे याकरिता लिहिले असे. राजश्री सुमंताकडील वर्तमान स्वमीपासी येका दीढा दिवसात डाक चौकीने येत असेल ते येथे ल्याहावया योग्य लिहिले पाहिजे. सेवेसी श्रृत होये हे विनंती.

¶*The writer Purandare reports to the Peshwa the discussion at Satara when news was received that Sindia and Holkar plundered Tirandajkhan.*

No. 294]

पौ छ २७ शाबान

श्री

पुा तीर्थस्वरूप राजश्री आपा

स्वामी वडिलाचे सेवेसी

विनंती. आपण तीर्थरूप राजश्री रायाकडून पत्रे आली ती पाठविली ती पावली. राजश्री स्वामीचे दिल्हे व भोमी मोडला हेहि वर्तमान विदित केले. त्याजवर राजश्री बोलिले की पनास हजार रुपये खंडणी दिल्ही ऐसे सहज स्थितीने बोलिले; व सौभाग्यवती मातुश्रीबाईचीहि पत्रे उद्या परवा दाखवितो. वाडियात जाणे होईल ते दिवसी सविस्तर वर्तमान बाईस सविस्तर वर्तमान विदित करू. रा आनंदराऊ सुमंताची पत्रे दिल्ही. सेवसी श्रृत होय हे विनंती. पूर्वी सुलतानपुर परगणियाचे कोढाले याजवळ जातेसमई सरदेसमुखीचा पैका घेतला ते वर्तमान परस्परेच राजश्रीस कळले होते त्याजवरून आज बोलिले. हे विज्ञापना.

¶*Appa is informed that the news of the defeat of Bhomi (?) was communicated to the King.*

No. 295]

पौ छ २० साबान

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री

आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. स्वामीनी जासुदासमागमे पत्रे पाठविली ती छ १९ शाबानी प्रविष्ट जाली. तेथें आज्ञा लिहिली की राजश्री स्वामीस विनंतीपत्र पाठविले आहे ते राजश्री नारबावा मंत्री यास वाचून दाखऊन ते दरबारास जातील तेव्हा समागमे जाऊन राजश्री स्वामीस पत्र अक्षरशाहा वाचून दाखवणे म्हणून आज्ञा केली. त्यास स्वामीचे पत्र राजश्री बावास होते ते व राजश्री स्वामीचे पत्र वाचून दाखविले, त्यास बावानी उतर दिल्हे की मजकूर उतम आहे; परंतु आता पत्र दाखविले तरी राजश्री स्वामीस येक प्रकार वाटेल. पूर्वी मजकूर जाला ते समई आपण बोलिलो नाही, म्हणून बोलिले असतां मागती बोली पाडावी यैसे नाही, याकरिता पत्र दिल्हे नाही. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The writer informs Chimaji Appa that on the advice of Narbawa Mantri the addressee's letter to the King was not delivered as it would place him in a false position.*

No. 296]

पा छ १९ मोहरम

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ

तथा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. किले लोहगडचे लोक हुजूर राजमंदिराचे कामावरी होते ते पलोन गेले. म्हणून राजश्री स्वामीनी ताकीद केली की, लोहगडकरी सत्वर आणवणे. नाही तरी गडकरी यांचा मुलाहिजा होणार नाहीं. हुजरून मसाला होईल म्हणून आज्ञा केली आहे. तरी स्वामीनी लोहगडकरी यांस पत्र पाठऊन लोक आणून सत्वर पाठऊन द्यावे. विलंब लागला म्हणजे राजश्री स्वामी आम्हास रागास येतील आणि गडकरी यांस मसाला करितील, यास्तव सत्वर लोक सातारियास येऊन पोंहचत ते गोष्टी करावी. विदित जाहाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे + विज्ञापना.

¶*Artisans from Lohgad engaged by the King for the construction of his palace at Satara left work all of a sudden and went back to their village. The writer asks the Peshwa to send back the delinquents to the King who is much offended with their misdemeanour.*

+ पत्र महादाजी अंबाजी यांचें.

No. 297]

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामी-
चे सेवेसी

विनंती सेवक आनंदराऊ रघुनाथ सां नमस्कार विनंती. येथील कुशल जाणौन स्वामीनी आपले स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. येथील वर्तमान राजश्री चिमणोबानी निवेदन केलेच असेल. प्रस्तुत साताराहून हुजरे आम्हास बोलाऊ आले आहेत. आपले हृदगत वर्तमान त्यास सांगितले; आणि येणे घडत नाही येसे म्हटल्यास हे ऐकताती यैसे नाही. आमचा हेत कीं पुन्हा स्वामीचे सेवेसी यावे; स्वकीये अर्थ निवेदन करावा; पुढें जैसी आज्ञा स्वामी करितील तैसी जातीने वर्तुणूक करावी. हुजरे सातारियासी नेल्यावाचून दुसरीकडे जाऊ देत नाहीत. तेथें हुजूर तन्ही आम्ही काये जाबसाल करावा? येक वेल स्वामीच्या पायाचे दर्शन होऊन मग जैसी आज्ञा होईल तैसे वर्तावे. प्रस्तुत ऐकिजेतें कीं आपले आगमन मोरेश्वरचे यात्रेस होणार हें यैकोन संतोष प्राप्त जाला. विस्तार ल्याहावा तरी स्वामी सर्वज्ञ आहेत. कृपावृधि केली पाहिजे हे विनंती.

¶*Anandrao Raghunath explains to Chimaji Appa his difficulties in going to Shahu without having a previous interview with the addressee.*

No. 298]

श्री

सेवेसी विनंती. शाहाजी माने, संभाजी माने रहिमतपुरकर सरकारचे चाकर आहेत. त्यास पत्र पाठवावे जे, चिमणाजी बापूजी याजकडे चाकरीस जाणे. तैसेच जोत्याजी कदम हे फूटअसामदार आहेत. हे इकडे जवलचे आहेत; ते लौकर येतील, त्यास पत्रे पाठवावी. याउपर येमाजीपंतासी आम्हासी तफावत नाही. जे श्वहित दिसेल ते करावे. बोधे बरचे तमाम च्यार दिवस पाठविल्यास स्वामीचे फौजेचा आव राहील. ते फार. आपली फौज जमा नाही. हे विज्ञापना.

¶*Shahaji Mane and Sambhaji Mane of Rahimatpur are ordered to join Chimnaji Bapuji to strengthen the royal army.*

No. 299]

श्री

आसीर्वाद उपरी. कोट्याच्या ऐवजपैकी बाळाजी येशवंत याणी बाबूजी नाईक भिडे याजकडे हुंडी येकूणच्याळीस हजार च्यारसे रुपयाची आली. त्यास तो यैवज सरकारचा किंवा राजश्री राणोजी सिंदे यांजकडील हे ठावके नव्हते आणि तुम्हास तो वसईकडील खर्चाची वोढ जाणून यैवज पाठवणे जरूर जाहाले. तेव्हा राजश्री बाबूजी नाईक यास लिहून बाबूजी नाईक भिडे यास लिहून यैवज घेऊन पाठवणें लागला. यैवज तुम्हाकडे रवाना जाहाला. सांप्रत राजश्री राणोजी सिंदे याचे राऊत सदरहू रुपयाकारितां शहरास जाऊन बाबूजी नाइक भिडे याजपासी कटकट करीत बसले आहेत. त्यास बाबूजी नाईक जोसी याणी कितेक प्रकारे राउतास सांगितले, परंतु आइकत नाहीं. राउतांनी तगादा भिड्यास केला. याजमुले त्याचा तगादा बाबूजी नाईक जोसी यास लागला आहे. त्यास रुपये पावल्याचे कबज राणाजी सिंदे यांचे बाबूजी नाईक याचे नावे गेले पाहिजे. तरी सदरहू रुपयाचा हिसेब राणबा तुम्ही समजून घेऊन त्याचे कबज येकूण-चाळीस हजार चारशाचे बाबूजी नाईक भिडे याचे नावे लिहून बाबूजी नाईक जोसी याजपासी पाठविले पाहिजे. लौकर पाठवावें. हा यैवज तुम्ही त्याचा त्याजकडे दिल्हा असिला तरी उतम जाहाले. कदाचित दिल्हा नसिला तरी त्यास मुबदला यैवज देऊन अगर समजाऊन त्याचे कबज बाबूजी नाईक भिडे याचे नावचें बाबूजी नाईक जोसी याजपासी पाठविलें पाहिजे. लोभ असो दीजे हा आसीर्वाद.

¶Bajirao requests his brother Chimaji to get Ranoji Sindia pass a receipt for forty thousand rupees to Babuji Naik, and pay the amount to Ranoji. The sum was Ranoji's share of tribute from Kota which was spent by the writer for preparations of the Bassein campaign.

No. 300]

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री
आपा स्वामीचे सेवेसी.

विनंती उपरी. राजश्री त्रिंबकराव सोमवंसी सरलस्कर यांजकडील सरंजामा-विसीं हरकोणीकडील ताकीदरोखे स्वामीचे राजश्री देवजी सोमवंसी हिंदुराव

+ कोट्याचे गुळगुळे पंडित.

१ पत्र बाजीरावाचें चिमाजी आपास.

मागावयास पाठवितील तरी न द्यावे. निमित्य काये कीं, जामखेड परगण्याचे ताकीदरोखे त्यांनी द्यावे आणि राजपत्रेहि दुमोहरी अद्यापि जाली नाहीं. ती होतील तेव्हां खरें. आणि जांबखेडचे ताकीद रोखे स्वामीनी आपलेकडे आणविले पाहिजे. पा। जामखेड येथील ताकीदपत्र द्यावे, मग स्वामीनी आपली ताकीदपत्रे द्यावी. राजपत्रे राजश्री पंतसचिव याची तटली आहेत. पा। आबाड येथील आमल सरलस्करचा मोगलानी बद केला आहे. आम्हास ताकीदपत्र सरलस्कर मागतील. आम्ही येथे देणार नाही. स्वामीस पत्र लेहून देऊन, परंतु स्वामीनी ताकीदपत्रे दिल्ही न पाहिजेत. पा। जामखेड स्वामीकडे देत नाहीत, याकरिता लिहिले आसे. राजश्री देवजी सोमवंसी यानी स्वामीकडे जामखेडची सनंद पाठविली आसिली तर उतम जाले. सनद आली नसिली तरी स्वामीनी ताकीद-पत्रे दिल्ही न पाहिजेत. पत्र वाचून फाडून काटावे (टाकावे), दफ्तरी ठेविले न पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.[१]

¶*Dadoba Purandare writes to Chimaji to withhold letters patent from Devaji Somvamsi so long as he has not fulfilled the conditions of his agreement.*

No. 301]

तालीक

श्री

राजश्री महिपत राऊसिंदे
गोसावीं यासी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो॥ बाजीराऊ बलाल प्रधान आसीर्वाद येथील कुशल जाणौन स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष. तुम्ही आपला कितेक अर्थ राजश्री त्रिंबक गोपाळ याजबराबर सागून पाठविला तो याणी सविस्तर निवेदन केला, त्याजवरून कलो आले. यैशास येविसीचे कितेक मा॥रनिलेस सागितले आहे. हे तुम्हास सांगतील ते वचने आमचीच जाणोन त्याप्रो॥ कार्य-भाग करून नक्ष करणे. (सां)प्रत प्रसंग आहे तो तुम्हास कलतच आहे. हेसमई दुष्टास नतीजा देऊन आपला लौकिक करून घ्यावयाचा समये हाच आहे. हे गोष्ट तुम्हास न कलसी काये आहे? तुमचे वडिली पूर्वी या राज्यात श्रम करून आपला लौकिक संपादून नक्ष केला. त्याजमागे तुम्ही या राज्यासी निष्ठा धरून मत्कार्ये केलिया तुमचेच बरे आहे. येविसीचा विस्तार लिहितां लांब आहे. तुम्ही तोलदार फौज धरून अमित्र दंतभग्न करून संतोशाचे वर्तमान वरच्यावरी लिहिणे.

---

१ पत्र दादोबा पुरंदऱ्याचें आहे.

वरकड कबिलियास जागा राहावयास बेगमीचा अर्थ मारनिलेस सांगितला आहे. हे तुम्हास सांगतील त्याप्रा कार्यभाग केलिया आम्ही तुमचे उर्जित करावयास अंतर करणार नाही. तुम्ही फौज धरून त्याचा सरंजाम स्वारीसिकारीमुळे जमा होईल तो आकार करून त्यापैकी चौथाई व सरदेशमुखी दिवाणाचा यैवज राजश्री त्रिंब(क) गोपाल याचे हवाली करून हुजूर पाठवणे. बाकी राहिला यैवज तुम्ही फौजेवरी वाटून घेणे. येविसीचा सविस्तर अर्थ मारनिले तुम्हास सांगतील त्याप्रो वर्तणूक करणे. जाणिजे छ ६ जिल्हेज.

¶*A letter of encouragement to Mahipatrao Sindia from Bajirao. The letter is typical of the Peshwa's ambitions and high spirits. Can this addressee be the son of Nemaji Sindia, once a Senapati of Shahu?*

No. 302]

श्री

राजश्री चिमणाजीपंत आपा
गोसांवी यासी

॥ सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रीा राजसिंग जाधवराव दंडवत विनंती येथील कुषल जाणोन स्वकीये कुषललेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. राजश्री शामराव फौजेनसी या प्रांते आले आहेत त्यास आपले सरकारचे लोकास मासे मारावयाबद्दल मौजे मेढदचे डोहास पाठविले होत. त्यास शामरायांनी आमचे बरकंदाजास धरून नेले. हुजूर तुम्हाकडे पाठविले. आपण सिकारीस माशांबद्दल पाठविले असतां त्याणी धरून हुजूर पाठविले, हे गोष्ट त्याणी आपणा योग्य न केली. हल्ली बरकंदाज गोसावियाकडेच आले आहेत. तर कृपा करून त्यास सोडून देवणे. येविसी अनमान कराल तर तीर्थरूप राजश्री खासेसाहेबांचा शब्द गोसावियास लागेल. यात तुम्ही सर्वज्ञ असा, जो विचार उतम दिसोन येईल तो + केला पाहिजे. बहुत काये लिहिणें? कृपा लोभ असो दिजे हे विनंती.

¶*Rajsing Jadhavrao to Chimaji Appa, complaining against Shamrav for confining men who were sent out by the King for fishing. Rajsing Jadhav appears to be a relative of Shahu, possibly son of Rustumrao Jadhav.*

+ येथून निराळें अक्षर.

4695

No. 303]

श्री

चिरंजीव राजश्री आपा यासी आसीर्वाद उपरी. राजश्री हणमंतराऊ निंबालकर हे येंदा येथे राहिले. त्याणी आपले भाऊ मानाजी निंबालकर पाठविले आहेत. याजवरून सेवा घेऊन हरयेकविसी चालवणे. खानाजी काटे व राणोजी रणनवरे जदीद तुम्हाकडे पाठविले आहेत. याची बोली करून त्याचेहि चालवणें हा आसीर्वाद.

¶*The Peshwa writes to his brother Chimaji Appa to take Manaji Nimbalkar in service in the place of his brother Hanamantrao who was not coming.*

No. 304]

श्री

माहाराज राजश्री छत्र-
पती स्वामीचे सेवेसी

सेवेसी सेवक धोंडो भास्कर कृतानेक विज्ञापना. ताा छ ३ रमजान साहेबाचे कृपादस्टीकरून जंजिरे रत्नागिरीचे वर्तमान येथास्थित असे विशेष. येथील नार्तवानी[1] बहुत आहे. जागा अफाट गनिमाची पालत हमेशा आहे. येथील बेगमी आसिली पाहिजे. सविस्तर वर्तमान कलावे यानिमित्य विठल माहादेऊ पाठविला आहे. विदित करितां श्रुत होईल. हाली याबाा

दारू वजन टके ।-
पाने सुमार १२०००
नारलाचे मोद १०
पलित्यां+ बारास ३
सुपारी वजन ८॥·

येणेंप्रमाणें पाठविले असे. पात्रलियाचा जाब सादर करावयासी साहेब धर्णी आहेत.

¶*Dhondo Bhaskar to the King, sending some cocoanuts, betel-seeds and other articles and communicating the condition of the Ratnagiri fort.*

---

१ दुर्दशा. + मशाली.

No. 305]

जाबसूद

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक नागोराम भागवत चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. ताा छ २४ माहे रमजानपावेतो स्वामीचे कृपादृष्टीकरून ठाणे साष्टी सुखरूप असो विशेष. राजश्री वासुदेव केशव चंदी चंदावराकडून येथे आला आहे. त्यास तो तिकडील त्या प्रांतीचा माहीत आहे. आजपावेतो त्या मुलकांत धंदे मातबर करीत आला आहे. त्यास कडप्यामध्ये हुसेनखान पठाण याणे त्या गृहस्तास नागविले. दंड शो पंधरा हजार घेतले. त्यावरून स्वामीचे भेटीची अपेक्ष्या धरून इकडे येतेसमई मार्गी चोरानी लुटला. इतिकी अवस्ता जाली आहे. त्याचे चितात आहे की सेवेस येऊन तिकडील वर्तमान आजतागायेत जाले ते निवेदन करावे. तिकडे फौज घेऊ(न) जावी आणि पाच सात जागाहि घेऊ द्याव्या. फौजेचा मार्ग उतम काढावा. पुढे गेलियावर जे जे मवास आहेत त्यास युक्तीप्रयुक्तीने शह द्यावा, ते आपलेसे करावे त्याचा विचार ऐसा आहे; वीस पंचवीस लाख पावेतो आशा दाखवितो. कृष्णातीर पार जालियावर फौजेचा खर्च जो लागेल तो आपण पुरवावा हा त्याचा निचय आहे. त्यास स्वामीचे विचारास ही गोष्टी आली तरी त्यास आज्ञापत्र आलियावर सेवेत येईल. आपणास येऊन त्या गृहस्ताने वर्तमान सांगितले, यास्तव सकल वर्तमान सेवेसी लिहिले आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Nagoram Bhagwat introduces one Vasudev Keshav from Tanjore to Chimaji Appa.*

No. 306]

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विज्ञापना नाइकापासी फारसी बोली केली परंतु छतीस रुपये घेतले. येके मितीचे ते देत नाही. त्यास स्वामी आज्ञा करितील त्याप्रमाणे वर्तणूक करून जमाखर्च करूं. येकेतालीसे चौपन रुपये नाइकाकडे अमानत आहेत. दरमाहेच्या देणियास यैवज स्वामीनी पाठविला पाहिजे. वरचेवरी श्रीमंत राजश्री

दादा स्वामीच्या वराता पोतांवरी होतात. त्यास यैवज पाठवावा. वाड्यातील इमारतीचे काम राहावणे म्हणून मातुश्रीबाईचे पत्र रा नारो बलाल याचे नावे आले त्याजवरून इमारतीचे कामकाज थोडेबहुत चालत होते ते राहिले व रानामध्ये कारखाने दो जागा राजश्री येमाजीपंत यांचे जिल्हेमध्ये चालत होते. लाकूड गतवर्शी तोडून ठेविले होते ते येंदा आणवीत होतो. त्यास त्याचे कारभारियानी द्वाही घालून कारखाने अगदी मना केले. काम तो अगदीच राहिले. त्यास श्रीमंत राजश्री दादा स्वामीकडे लस्करात लिहून पाठविले आहे. त्यास राजश्री येमाजीपंताची ताकीदपत्रे आली तरी पाठवितील म्हणजे आम्ही त्याचे कारभारी आहेत, त्यास देऊन मग कारखाने चालतील. प्रस्तुत तो मनारोखे येत तो काम राहिले आहे. ताकीदपत्रे आली म्हणजे कामकाज चालवावे किंवा राहू द्यावे ते स्वामीनी आज्ञा करावी. रानात लाकूड तोडिले आहे ते तेथेच ठेविले तरी जो पैका खर्च जाहला तो बुडतो. येथे काम साप्याचे चालते ते तैसेच राहाते. ऐसियासी स्वामी जे आज्ञा करितील त्याप्रमाणे वर्तणूक करूं. राजश्री नारो बलाल तेथे आहेत ते स्वामीपासी सविस्तर वर्तमान इमारतीचे निवेदन करितील त्याजवरून वेदित होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Adjustment of some money matters with Babuji Naik and the stoppage of repairing work are reported to Chimaji Appa by Purandare.*

No. 307]

Shahu Chhatrapati.

Early Movements and Appointments.

[The Shahu Daftar contains a large number of account slips, similar to those found in the Peshwas' Diaries. Nos. 307 and the following contain entries, selected from these slips, which throw new light upon the early activities of Shahu, Chandrasen Jadhav, Muhkam Singh, Turuk Taj Khan and other historical characters. A study of them will form a fruitful field of enquiry for future investigators.]

[28-12-1708
सुा आशर

राजमंडल

मोहरीर

तनपत्र राजश्री रामचद्र त्रिंबक वाकेनिवीस स्वाम मोगलाईतून देशास आले ते समई तुम्ही खानदेशात स्वामीसनिध आलेत त्यावरी स्वामी कृपाळु होऊन वेतन सालिना देखील

चाकर होनू पाा

१००००

सर्वधारी संवछर पौश सुध त्रयोदसी भोमवासर (ता. २८ डिसेंबर १७०८).

4698

मुा तिसा

राजमंडल

सरंजाम कारकून

राजश्री रामचंद्र पंत वाक्यनिवीस

मौजे पिरदवने ताा संगमेस्वर मुाा देह १

ताा पत्र देखील ल्याहावी

छ १३ रबिलाखर सन इहिदे (31-5-1710)

छ २९ रमजान सन इहिदे (6-11-1710)

ताा चांडवे पाा बिरवाड

१ काबले ताा बिरवाड

१ जिते ताा बिरवाड

२ ताा हवेली पुणे

१ पर्वती

१ गफन उबरे

२

सुभा पनालापैकी

छ २७ रजब सन आशर देहे (21-9-1709)

१ वाडी ताा आस्टे

१ कविठे ताा आस्टे

छ २४ जिलकाद सन इहिदे (3-1-1711)

प्राा पुणे

१ टेकवडी ताा करेपठार

१ बुतकेगाव ताा सांडस

२

[Oct. 1712?

१

राजमंडल रोजकीर्द सुरु इसने

दिाा मजमू माहे रमजान

छ ७

भाश्रित आसामी

दासिवभट उपाध्ये १

रिहराचार्य पंडितराऊ १

दशरथ जोतिसी जोसीराऊ	१
भालचंद्रभट	१
पटवर्धन	३
गंगाधरभट	
विस्वनाथभट	
चिंतामणभट	

३

जिवनभट मुा उपाध्ये	१
वेंकटाचार्ये	१
बालंभट	१
कवींद्र	२
देवदत	
श्रीधर	

शामाचार्ये	१
वैद्य	२
नारोपंत	
व्यंकटपति	
	१९

¶*The above is a list of Pandits and priests entertained by Raja Shahu.*

२

कारकून

नरसिंगराऊ देवाजी	१
दिा मजमू	२
चिंतो बालाजी फडनीस	
रामाजी संभाजी	
जिवाजी कोनेर दिा प्रतिनिधि	१
परशराम बलाल	१

दिा सुरनिसी चिटणिसी ३

बाबूराऊ

सखोकृष्ण

शंकराजी विस्वनाथ

३

दिा दबीरी ४

बाळाजीप्रभु

गोविंद्राऊ पारसनीस

त्र्यंबक गोविंद

नि+ळाजी

बावाजी

४

केशव त्रिंबक मान्य पुरुष १

त्रिंबक विठल खासनीस १

सभासद ४

नीलकंठराऊ

शंकराजी नारायण

मुकुंद लिंगोजी

३

जिवाजी रायाजी

गडनीस २

मेघशाम

आबाजी

उधव रघुनाथ

दिा वाकेनिसी २

शंकराजी त्र्यंबक

चिमणाजी जगजीवन

¶*This paper, although it belongs to a later period, supplies some useful items of information bearing on the first appointments of the ministerial staff by Shahu.*

+ हीं दोन मिळून निळाजी बावाजी असें एकच नांव असावेंसें वाटतें.

16-8-1713

श्री

यादी मजमू दफ्तरी वाकेनिसीचे दाखले बाा आर्वजो+ बरही तपसील.

वाकेनिवीस मंत्री राजश्री रामचंद्र त्रिंबक मंत्री वाकेनिवीस वेतन होनू पाा
१००००

यास सरंजाम आवर्जा वोढत आला ताा सन सबा आशर मशारनिाा कडील वाकेनिसी दूर जालियावर त्याचे पुत्र शंकराजी रामचंद्र याजकडे सरंजाम चालत आला.

कलम १

राजश्री नारोराम राजाज्ञा छ ९ शाबान सन सलास अशर (१६-८-१७१३) पूर्वी सेनापतीकडे होते. हाली स्वामी कृपालु होऊन राजाज्ञा सांगितली. वेतन सालिना देखील चाकर होन पाा

७०००
ज्याजती ३०००
————
१००००

छ जिलकाद सन सबा आशर (आक्टो. १७१६).-स्वामी कृपालु होऊन राजाज्ञा दूर करून वाकेनिसी सांगितली सरजा अवजी

कलम १

दादाजी कान्हो याचे दाखले छ ६ जमादिलाखर सन सलास अशर (३०-६-१७१२) मशारनिले पेशजी रतनागिरीची सबनिसी होती त्यावर उमेद-मुतालीक दिाा वाकेनिसी राजश्री विठल कान्हो मुतालीक दिाा वाकेनिसी सन इहिदे आशर सरंजामाचा अवर्जा छ २१ मोहरम सन सीत आशर (६-१-१७१६) वरात सुलतानजीराव निंबालकर सरलस्कर रुपये १००० येक हजार कलम १

राजश्री विठल कान्हो मुाा दिाा वाकेनिसी मशारनिले देवाज्ञा जाले याकरिता त्याचे पुतणे राा मल्हार विश्वनाथ यास मुतालकी सागितली छ १२ माहे जमादिलोवल सन तिसा आशर (२३-३-१७१९) वेतन सालिना देखिल चाकर होनू पाा माजी प्राा करार

वस्त्रे

१ मदील निमे
१ सेला

मल्हार विश्वनाथ इनाम पेशजी विठल कान्हो यासी होते ते माारनिलेकडे करार छ १७ जिल्हेज सन सलास अशरीन (१८-९-१७२२) वाडा ढोंकबले ताा नेवरे प्राा राजापूर वंश परंदरेने इनाम देहे

मौजे भाट परली ताा हवेली सातारा येथे इनाम जमीन चावर येक १

कलम १

गणेश माहादेव लिहिणार दिाा मत्री मुकासे

+ हिशेबाची वही.

4702

वार होते छ मजकुरी हुजूर सभासदात आसामी घालून विठोजीराऊ सिरके याजकडे पा। वेतन सालिना होनू पा।
७००

यासी जमान माहादाजी गणेश दिमत रत्नशाला दादाजी कान्हो यास वाकनिसीचे निसबतीने राजश्री खंडेराव दाभाडे सेनाखासखेल याजकडे पा। सरंजामी छ २६ साबान सनसीत आशर (१९.८-१७१९) तैनात सालीना देखील चाकर होनू पा।
१०००

जमान माहादाजी गणेश लिहिणार दिा। रत्नशाला

कलम १

२ पा। आकलकोट पैकी पेशजी विठल कान्होकडे मुकासे होते ते दूर करून हाली मशारनिलेकडे करार दो। बाबती * * जाहागीर व शाहेर ता। पा। छ २ सफर सन इहिदे अशरीन (२२-११-१७२०)

१ मौजे सिरवल

१ मौजे बोरगाव पीर

२

१ मौज तुरर ता। सगमेश्वर प्रा। राजापूर छ २ मोहरम सन इहिदे अशरीन (२३-१०.१७२०) दो। बाबती बा। विठल कान्हो.

सदरहू प्रो। दाखले दफ्तरी रुजू असेत. राजश्री पंत प्रधान यानी दाखले आणविले त्यावरून राजश्री कृष्णराव आनंत कारभारी दिा। मा।र याणी कारकून पा। दिल्हे आसेत छ १ सफर सन इहिदे सबैन खरनाम संवछरे (१७-५-१७७१).

(26-8-1713?)

रोजकीर्द शाहू

सुरु अर्बा माहे शाबान

छ १९ प्रतिपदा सह द्वितीया मंगलवार छ मजकुरी स्वामीचे भेटीस तुकोजी गुजर आले. स्वामीची भेटी जाहालियावर स्वामीनी तुकोजी गुजरियाचा बहुमान करून दिल्हे. (पुढे वस्त्रें व हत्यारें यांची यादी आहे.)

१

रोजकीर्द शाहू *27-1-1715*

सुरु खमस माहे सफर

छ २

मु।। सातारा

चिंचवडचे देवास तिलगूल देऊन आले (जासूदांचीं नांवें)

4703

छ ८

मुा निबुतनजिक नीरा

छ १२

मुा जेजुरी

छ १२

मुा जेजुरी

छ २८

मुा चोराचे वाठार नाा नीरा

१

रोजकीर्द शाहू 27-3-1715

सुरू खमस माहे रबिलौवल

छ ७

पोतापैकी रु. ६ ताा बाबूराव दाा पेश(वे?) स्वारीस जात आहे सरदार घेऊन येणे
(त्यांची नांवे) सेखमिरा, चंदाजी जाधव, जाउजी भोइटे, दौलतराव, जगोजी, साबाजी पीर, भानजी माहाडिक (वगैरे)

छ ७

मुा सातारा

छ ९

मुा सातारा

रोजकीर्द शाहू 27-3-1715

सुरु खमस माहे रबिलाखर

छ २ आदितवार

मुा सातारा

पोतापैकी रुपये

बातमी मनसूरखान मिरजेस आला आहे म्हणोन वर्तमान हुजूर आले आहे जाऊन बातमी घेऊन येणे अफराद दिा लबे

२ त्रिंबकजी पोरे (?)
२ आपाजी कदम
—
४८

रोजकीर्द शाहू 5-6-1716

सुरु सब माहे जमादिलाखर

छ २९

मुा रहिमतपूर

जमा नजर

राजश्री बालाजी पंडित प्रधान वस्त्रें (वस्त्रांचा तपसील)	राजश्री नारोराम राजाज्ञा तोडा सोन्याचा कड्या सुमार १९ (वगैरे)

सरदार भेटीस आले यासी वस्त्रें दिली प्रसादी सेले अष्टगोली

१ बालाजी पंडित प्रधान सेला	१ सुलतानजीराव निंबाळकर सरलस्कर सेला
१ नारोराम राजाज्ञा सेला	१ सिदोजी निंबालकर सला.
१ होनाजी अनंत सेनाकर्ते सेला	

¶*The officers mentioned in the above note visited Shahu at Rahimatpur and were presented with robes and ornaments.*

रोजकीर्द शाहू 11-6-1716

सबा अशर मया व अलफ माहे रजब

छ १

मुा सातारा

छ ८

मुा करजे ताा सातारा

पोतापैकीं रुपये राा फलटण जाऊन होळकर घेऊन येणे अफराद

१ (जासुदांची नांवें)

छ २२

मुा सातारा

हजीरी जासूद

राजश्री चिमणाजीपंताकडून पत्रे घेऊन हुजूर आले.

छ २३

मुा सातारा

•पोतापैकी खर्च

दरुनी माहाल पैकी यैत्रज देऊन रा कचेस्वर बावा यासी पत्र देऊन त्यास घेऊन येणे.

मुा सातारा

छ १३ [२२-७-१७१६]

हजीरी वेदमूर्ति रा कचेश्वरबावा यास चाकणाहून घेऊन आले जा+

छ २० [२९-७-१७१६]

मुा सातारा

छ २९

लिंगोजी माने सरनोबती किले वर्धनगड यासी तिवट १ मो

१

रोजकीर्द शाहू *5-12-1716*

सुरु सबा माहे मोहरम

छ १

मुकाम :— रुईचंदूर

हजीरी— बातमी सिदोजी घोरपडे याची घेऊन आले जा दर्याजी नाईक

छ १०

मुा तासवड *14-12-1716*

हजीरी--	पोतापैकी गुा	रघात्रा मसका रु. २०
	चंद्रसेन जाधव याची	सेनापती यास
	बातमी घेऊन हुजूर	पत्रे देऊन जाब
	येणे जासूद दिालबे	घेऊन येणे
	(पुढे जासूद नांवें)	(जासुदांची नांवें)

छ ११

मुा पाली *15-12-1716*

+ जा = जथे.

छ १४

मुा पाडली *18-12-1716*

हजीरी हैबतराव सिंदे याचे जाब घेऊन जासूद आले. (जासूद नांवें)

चंद्रसेन जाधव याचे बातमी जाऊन लस्करातून हुजूर येणे. जथे कृष्णाजी नाईक (जासूद नांवें)

पोतापैकी :—१२ बातमी चंद्रसेन जाधव व मुकमसिंग याचे बातमी घेऊन येणे (जासुदांचीं नांवें)

९॥ कागदी आवरंगाबाद सैयेद वगैरे यास पत्रें मुकसियासी पत्रे देऊन जाब घेऊन येणें (जासुदांचीं नांवें)

२

छ १५

मुा सातारा *19-12-1716*

पोतापैकीं— १२ बातमी चंद्रसेन जाधव व मुकमसिंग याचे बातमी घेऊन येणे (जासुदांचीं नांवें)

छ १७

मुा दुधबाव

हजीरी बातमी सैयेद कागदी घेऊन हुजूर आले जासूद (जासुदांचीं नांवें)

छ २०

मुा सातारा

छ २१

मुा सातारा

खासुदगी खर्चपोता २० गोपालराम सुभेदारास राजपत्रे पोचविण्याबद्दल.

4707

९ मानसिंग मोरे व सुलतानजी निंबाळकर यास राजपत्रें देऊन जाब घेऊन येण्याबद्दल.

६ बाळाजी पंडित प्रधानास राजपत्र देऊन उत्तर घेऊन येण्याबद्दल.

छ २१

मुा सातारा

हजीरी—

चद्रसेन जाधव व मोगल याची बातमी की * * * (?) येऊन सनवारी येऊन मुा केला, त्याची बातमी घेऊन जासूद आले. बातमी मुकमसिग चद्रसेन येऊन निरा नरसीपूर तेथे मुकाम केला म्हणौन वर्तमान जासुदानी सांगितले जाा दर्याजी नाईक.

छ २२

मुा सातारा 26-12-1716

हजीरी

२ बातमी वर्तमान की नजीक पिवली येथे येऊन मुकाम चंद्रसेन वगैरे येऊन मुकाम केला सोमवारी येसे बातमी सांगितली जाा कृष्णाजी नाईक

छ २३

मुा सातारा

हजीरी

चंद्रसेन जाधव म्हसवडनजीक येऊन राहिला म्हणौन जासूद आले चंद्रसेन गोर्खी (गोदल ?) वर येऊन मुकाम केला म्हणौन जासूद (आले)

छ २४

मुा सातारा

हजीरी

बातमी जासूद चंद्रसेन जाधव नजीक म्हसवड कनेरवाडीवर येऊन गुरुवा * * * * होला यैसे वर्तमान घेऊन जासूद आले. जाा दर्याजी नाा पवार बातमी घेऊन जासूद आले कीं सुकुरवारी कूच होईल म्हणौन चंद्रसेन जाधव वगैरे याचे कूच करून कातरखटाव म्हणौन बातमी सांगितली.

छ २५

मुा सातारा *29-12-1716*

छ २६

मुा सातारा

पोतापै.

१२ राजेश्री प्रधानपंत व खंडेराव सेनापति यासी पत्रे देऊन जाब घेऊन येणे.

गोपालरामास राजपत्र पाठविले मानसिंग मोरे व सेनापतीस राजपत्रे पाठविली.

छ २७

मुा सातारा

हजीरी

१२ चंद्रसेन व मुकमसिंग याची बातमी रहिमतपुरी येऊन डेरे केले म्हणौन वर्तमान बातमी सांगितली.

छ २८

मुा सातारा

कागदी लस्कर तुरकताजखान यासी पत्र चद्रोजी जाधवराव यार्णी दिल्हे त्याचा जाब घेऊन येणे.

छ २९

पोतापैकीं ६ गालीबशाह याची बातमी इंदापूर पावेतो जाऊन बातमी गालीबशाहा याची घेऊन येणे.

छ ३०

मुा सातारा

सुभानजी बांडगरास पत्र

पदाजी घाटगे यासी पत्र चंदोजी जाधव याणी दिल्हे की बातमी खबर घोडेविशी कागद तुरकताजखान यासी देऊन जाब घेऊन येणें.

सुलतानजीराव निंबाळकर, होनाजी अनंत व सुभानजी आटोले यास राजपत्रें देऊन जाब घेऊन येणें.

रोजकीर्द शाहू *4-1-1717*

सुरू सबा माहे सफर

छ १ [४-१-१७१७]

हजीरी बातमी मुकमसिंग व चंद्रा याची घेऊन आले कीं माहुलीवर मुा केला यैसी बातमी घेऊन आले

४ पोतापैकीं रुपये

रा बातमी मुकमसिंग याची निंबावरून घेऊन येणे जा दर्याजी

छ २ [५-१-१७१७]

मुा सातारा

हजीरी छ मजकुरी बातमी खबर घेऊन आले कीं कूच करून माघारे आले म्हणोन वर्तमान घेऊन जासूद आले. चंद्रसेन जाधव याची बातमी छ मजकुरी . घेऊन आले की मौजे गोवे येथे येऊन दोन प्रहरी मुक्काम केला.

छ ३ [६-१-१७१७]

हजीरी राजश्री खंडेराव दाभाडे व प्रधान पंत याजकडून पत्रे घेऊन आले त्याणी वर्तमान सांगितले की सिवापूर येथे अले.

बातमी चंद्रसेन जाधव याची बातमी वगैर याची बातमी घेऊन आले की दोनी नगारे जाहाले म्हणौन वर्तमान सांगितले.

रायाजी जाधव, माहादाजी घाटगे, डोंगरोजी यादव, बालोजी सालोखी यास पत्रे पाठविली.

इनाम जासूद यास की खंडेराव जवळ आला म्हणोन पत्रे घेऊन आले त्यासी इनाम

छ ४ [७-१-१७१७]

मुा सातारा

हुजुर पोतापैकी खर्च

४ राजपत्रे रा। खडेराव सेनापति यांसी पत्रे की गनीम माहुलीवर येऊन मुकाम केला आहे तर पत्र पावताच स्वार होऊन येणें.

छ ५ [८-१-१७१७]

मुा सातारा

आबदुल राहे यास पत्र राजपत्र रा। खंडेराव दाभाडे यासी पत्र की आपला मान पाहन मागे (?) व गाठ घालणे म्हणून पत्र.

छ ६ [९-१-१७१७]

सातारा

. पंताजीपंत याने पत्र दिल्हे राजश्री साचव यासा । गुले आले आहे ते राइरेस्वरच्या डोंगरी ठेवणे णौन पत्र दिल्हे. मुकुमसिंग व चंद्रसेनाची खबर स्कर घाटाखाले उतरोन गेले म्हणोन

छ ७ [१०-१-१७१७]

ाजी व माणकोजी बंडगर व सुभेदार यासी पत्रे

छ ८ [११-१-१७१७]

मुा सातारा

बातमी मुकुम व चंद्र की बिंबुर्त+ तेथे जाऊन मुकाम केला म्हणौन.

तिलगुल रा. संभाजी राजे यासी देऊन जाब हुजूर घेऊन येणे बातमी चंद्र व मुकु निबुतनजीक नीरा तेथे मुा केला म्हणोन

छ १० [१३-१-१७१७]

मुा सातारा

सचिवपंताचा जाब की गुले रायरेस्वराच्या डोंगरी ठेवले म्हणौन बातमी. चंद्र व मुकुम लोणी भापकर त्याच्या तलावर जाऊन मोगलाने मुकाम केला म्हणौन

७८ बातमी सभाजी निबालकर याचे लस्कर पावेतो जाऊन बातमी घेऊन येणे

छ १२ [१५-१-१७१७]

मुा सातारा

४ बंडगर यासी पत्रे घेऊन बालाजी जनार्दन याज बाा गेले होते छ मजकुरी परत आले. जाा कृष्णाजी नाा

छ १५ [१८-१-१७१७]

मुा सातारा

बातमी घेऊन आले की निबगाव व्याहलीहून कूच करून गेले म्हणौन

छ १७ [२०-१-१७१७]

मुा सातारा

राजश्री खंडेराव सेनापति यासी पत्र कीं खबरदार राहाणे

+ नीरा स्टेशनजवळ

छ २१ [२४-१-१७१७]

सातारा

४ कागदी आवरंगाबाद यादोराव वगैर पत्रे घेऊन हुजूर आले बातमी सांगितली.

२ बातमी रंभाजी निबालकर व सुलतानजीराव निबालकर याचे उभयेताचे जुज जाहाले, तीन घोडी निबालकर याणी घेतली म्हणौन बातमी सागितली आणि आंबेचे[१] घाटावर गेले थैसे.

१८ आउद तेथे जाऊन बातमी चौकशी घेऊन येणे म्हणून हुजूरचे जासूद रा। केले.

रोजकीर्द शाहू

लग्न राजश्री स्वामी

सुरु इहिदे माहे जमादिलौवल

छ १७ *5-4-1721*

(बंद १४ वा)

तेरीज

	अज,	ब्राम्हण,	जटाधारी,	कलावंते,	वाजंत्री,	बंपुरी,	भांड,
कलावंते	६००	०	०	६००	०	०	०
वाजंत्री व कर्णेकरी	१४६	०	०	०	१४६	०	०.
ब्राम्हण	३	३	०	०	०	०	०
जेठा (?)	२६	०	०	०	०	२६	०
भांड वगैरे	४	०	०	०	०	०	४
सोनवडकर	१०	०	०	०	०	०	०

भाट

१०

१ जोगाईचें आंबे?

[24-4-1721]

राजमंडल सुरू इहिदे

२

लग्नखर्च राजश्री फतेसिंग भोसले माहे रजबु
तेरीख ६ रोज वैशाख शुद्ध अष्टमी भानुवासर

[२९-४-१७२१]

इहिदे अशरीन

राजमंडल रोजकीर्द माहे रजब

दिा मजमू

लग्न रा फतेसिंगबावा भोसले

छ १३ रोज, उलफेपैकी

बावाजी कृष्ण वकील इंगरज

रोजकीर्द शाहू [6-5-1721]

सुरु इहिदे माहे रजब

छ २० भानुवासर

(बंद १ ला)

तैवज खर्च दिा फतेसिंगबावा छ १९ रोजगुदस्ता. रात्री वरात आली. रात्रो खर्च जाला तो छ मजकुरी चिठी दिल्ही. [या बंदातून तत्कालीन गुणीजनांचा गौरव करून त्याना दिलेल्या बक्षिसाच्या याद्या आहेत. त्यावरून तत्कालीन प्रसिद्ध कलावंतिणी, गुरव, वाजंत्री, कर्णेकरी भांड वगैरेच्या नांवनिशा कळतात.]

१०० उलफा[1] राजश्री मुधोजी नाईक निबालकर
असामी १०० यास दर असामीस मोईन
वजन पके. (तपसील)

---

१ शिधा.

रोजकीर्द शाहू 23-1-1728

सुरू समान

माहे जमादिलाखर

छ २२ माघ बहुल अष्टमी नवमी भोमवासर

चिटणिसी

रा जानोजी नाईक निंबालकर यांसी राजपत्रे रा सिदोजी राऊ निंबालकर सरलष्कर यांचे सरजामाचे मुलकात धामधूम न करणें.

[२७-१-१७२८] छ २६

जाब चिटणिसी

नागोजी झुजारराऊ घाटगे जमावानसी बारामतीस राहातात, स्वामीचे सेवेसी निस्टेने वर्ततात, याच्या गावावर माहादजी घाटगे स्वारी करणार. येविसी स्वामीनी ताकीद केली पाहिजे म्हणून चिमणाजी माणकेस्वर व लक्षुमण त्रिंबक यानी पत्रे लिहिली होती त्याचा जाब लिहिला जे, माहादजी घाटगे यास ताकीद केली आहे. गावावर स्वारी करणार नाही म्हणून जाब लिहिले.

१ नागोजी झुजारराव घाटगे
१ चिमणाजी माणकेस्वर
१ लक्षुमण त्रिंबक
१ बावाजी घाटगे

४

येकून पत्रे ४ सिके परवानगी तुळाराम मिरधे चोपदार.

सुरू समान

माहे सफर

[३०-१०-१७२७] छ २९ आश्विन बहुल द्वादसी मंदवासर

लखम गौडा व लदबस (?) प्रभु देसाई पा हुकेरी याचा जाब समाधान पत्र जे, तुम्ही भगवतगडावरी स्वामीची दोहो फिरवली त्यावरून स्वामी संतोसी जाहाले तरी मुसपाखहीस (?) फौज देऊन रवाना करणे. तुमचे मुदेमाफीक चालू (वगैरे).

4715

No. 308]

EXTRACTS FROM THE PESHWAS' DIARIES: BALAJI VISHWANATH.

बाळाजी विश्वनाथाची दिल्लीवर स्वारी.

¶*The following entries are extracted from loose account sheets (Rumals N 222-227 'स्वारीच्या व नवीन उपयोगाच्या कीर्दी' is the heading in the prin Ferist). They pertain to Balaji Vishwanath's expedition to Delh commencing from June 19, 1718, and ending with 9th May 1719. The ent contain many new persons who later came into prominence. They contain the dates of the Peshwas' halts and other points, which will be fo helpful, since so little has so far been known of this expedition. The entries at the same time supply a type, and an early one for that, of a Mara expedition*

श्री

4-3-1717

१/२

सिलकबंद छ १ रबिलाखर ताा छ ७ मिनहू रविवार मुा नजिक बेलगाऊ दिा राजश्री बालाजी विश्वनाथ सुा सबा असर मया अलफ जमा रुपये बाकी सिलक माहे गुा ७२

आपाजी जामदार जमा छ मजकूर स्वारी राजश्री पंतप्रधान पोतापैकी बाा यैवज जखमी याबद्दल ७७

१४९

खर्च रुपये

पोतापैकी रुो

९॥ दिा पागा बारगा(र) जखमी [तपसील]

६७॥ जखमी सिलेदार [,,]

[अपूर्ण]

4716

31-3-1717

सिलकबंद छ २८ रविलाखर ता। छ २९ मिनहू मुकाम सोंधे दि। राजश्री बालाजी विश्वनाथ मु। सबां असर मया अलफ जमा रुा

सिलक गु। आबाजी जामदार ***

जमा छ २९ रोज मजकूर पोतापैकी स्वारी राजश्री पंतप्रधान जखमीबद्दल ***

७७*

¶*This small entry extracted from the Peshwas' accounts reveals a new expedition of Balaji Vishwanath towards Belgaum and Sondhe (Sunda).*

मा पोते स्वारी सु। तिसा

राजश्री पंतप्रधान 19-6-1718

माहे साबान आषाढ (अशर मया व अलफ)

तेरीख १ ते २२	माची किले सातारा
२३	पाचवड
२४	भोईज प्रांत वाई
२५	मौजे मोरवे ता। सिरवल
२६	,, वाल्हे
२७-२९	,, उरली
३०	मु। साईकाली हिंगणगाऊ

28-6-1718

तेरीख १० रोज आशाढ शुध द्वादसी मदवासर मु। माची सातारा जमाई

कर्ज गु। रघुनाथभट पटवरधन कासीकर जमा रुपये

५०० गु। दताबा नाईक

५०० देणे गु। खंडो बलाल.

१०००

4717

खर्च	रुपये
रा खंडो बलाल गुा रघुनाथभट कासीकर रुपये ५००	बाजखर्च रुपये २ कासीद दिलीचे ता नरसोजी जाधव.

तेरीख १३ रोजे आशाढ सुध पूर्णिमा भोमवासर मुा माची सातारा

खर्च	रुा
श्वारी राजश्री विश्वासराऊ बलाल रुा १ गुणाजी पडवल १ राणोजी सिदा १ राणोजी मोरे	श्वारी राजश्री रामचंद्र माहादेव रुा [तपसील]

तेरीख १८ रोज आशाढ बहुल पंचमी रविवासर मुा माची सातारा जमाई

गुा कृष्णाजी ना रुा ९९६ मो ८३ दर १२ ४ यैन १०००	कर्ज गुा रघुनाथभट पटवर्धन रुा ११२९

खर्च	रुा
बहिरो मोरेश्वर मो ४ दर १२॥ यो रुा ५०	दिा फतेसिंग भोसले रुा १०० व्यासराऊ ८९॥ ४०० रा मानसिंग मोरे ४०० रा संताजी जाधवराऊ.
रा शंकराजी मल्हार ता खंडोपंत रुा ५००	९००

तेरीख १० रोज आशाढ बहुल सप्तमी भोमवासर मुां माची किले सातारा

खर्च	रुपये
नारो गंगाधर दिा मजमू ता विनायेक गंगाधर रुपये* मोहरा २ यो २४	

4718

तेरीख २४ रोज आशाढ बहुल येकादसी मंदवासर मुा भोईज प्रांत वाई

खर्च रुो

दिा पिलाजी जाधव रुपये

·।· जासूद

२ सुभानजी मोरे

तेरीख २५

खर्च रुपये

त्र्यंबक सामराज दिा बहीरजी जगथाप रुो १

दिगांबर मल्हार पारसनीस रुो ५

हुजरात यैवज रवाना रा बाजीराव याकडे हुजूरच देणेयास मोहरा बा आनंदभट करवे २५० दर १२ येकूण रुो ३०००

तेरीख २६

जमाई

यैवज सरदेसमुखी बाकी साल गुा गुा सोमवसी बा निबाजी जासूद रुपये

४२८ यैन रुपये

७२ मोहरा ६ दर १२ यो

५००

खर्च रुपये

जासूद रुपये

६ रवाना कुलाबा [तपसील]

२ स्वारी चिमणाजीपंत [,,]

तेरीख २७

खर्च रुपये

पथके रुपये

२ सोनजी वाग

१ संताजी धायेभर

दिा आंबाजी त्रिंबक रुपये १

4719

बाजे खर्च —————————— रुपये

२ श्रीदेव जेजुरी

१ नीलकंठ भट

१ माहारीण वोवालणी

५ तैवज गुा ताबोली

तेरीज

पथके

बाजे खर्च

कारकून

तेरीख २८

खर्च —————————— रुपये

पथके —————— रुपये

१० अनाजी कदम

१५ कालोजी जाधव

गवरभोई स्वारी राजश्री बाजीराऊ

अडीसिरी रुपये २

तेरीज २९ रोज श्रावण सुध प्रतिपदा गुरुवासरे मुा उरली

खर्च —————————— रुपये *19-6-1718*

लोक स्वारी रामचंद्र माहादेव ताा

गणोजी पवार रुो

२

खचरवान हुजरात रुो

२ बडेखान

१ फरीद

———

३

तेरीख ३०

खर्च —————————— रुो

दिा वाकोजी ढमढेरे रुो २

सुा तिसा

माहाल पोते स्वारी (अशर मया व अलफ)

राजश्री पतप्रधान

माहे मोहरम

तेरीख	३	(*15-11-1718*)	मुा गाणोरी प्रा अंतूर
,,	४		,, पाली प्रा फुलबारी
,,	९		,, किरोळे प्रा अंतूर
,,	१३-१८		,, ब्ऱ्हाणपूर
,,	१९		,, नजीक आसिरी
,,	२०-२२		

सुा तिसा

(आशर मया व अलफ)

महाल पोते स्वारी

राजश्री पंत प्रधान

माहे मोहरम

तेरीज ३ रोज मार्गशीर्ष सुध पचमी मंदवासर मुा गाणोरी प्रा अंतूर

जमाई

गुा कृष्णाजी हरि देशमुखी प्रा वराड

गुा अताजी सिवदेऊ रुपये

१९३८

विा नवाब अमिरल उबराव गुा शंकराजीपंत रुपये

१००००

खर्च रुपये

पथके	रुा	किता पथकें
८ मल्हारजी कदम		९ वडजोजी थोरात
८ आनाजी कदम		२५ चंद्रभान माहाडीक
७ बहिरजी जगथाप		२२ जमनाजी माहाडीक
२ आबाजी जाधव		१० रामोजी घाटगे
१ येसाजी सेटगर		३० माहादजी भोसले
२ राणोजी थोरात		६ संताजी कोकरे
१ सुभानजी थो॥		६ कोंडजी यादव
९ रामजी थोरात		३ कुसाजी यादव

१ नारोशर (शंकर ?)
२५ चिमणाजी धायेगुडा
२० फिरंगोजी सेलके
७ राणोजी भोसले
८ खडोजी नरोटे व गोरखोजी सेलके
८ मलजी बेलदार
१ म्हालोजी सिवले
१५ आनंदराऊ पवार
१५ तुकोजी पवार
५ खेलोजी लकडे
७ पदाजी राऊत
३ उखाजी मान
५ तिमाजी राम
११ संताजी चितलकर
१॥ जोगोजी जाधव
१॥ बहिरजी झाबेर
३ बाजी सिंदे
१॥। सुभानजी थोरात व बाजीराव
२ गोंदजी गुरूड
७ संताजी ताकवले
४२ दामाजी माणकेश्वर
१। सुभानजी जगथाप
१ कावजी इगले
१ जावजी

(अपूर्ण)

कारकून रुा

१० विठल केशव
२॥ शंकराजी केशव

तेरीख ४

खर्च रुा

[मागील तारखेच्या जमाखर्चांत आलेलीं नांवें वगळून]

पथके रुपये

२० संताजी धायेभर
१५ असरोजी चिडे
१॥ हिरोजी यादव
२ मकाजी चेरघे
१ येसाजी सेटगे
३० मालोजी निबालकर

पथके रुपये

७ राणोजी भोसले
६ सिदोजी पोळ
१ महमद इसूफ
२ गणपतराव
॥ भैरालजी भोसले
॥॰ खंडोजी सिंदे
१। गोदजी लोटा
।।॰ केरोजी वाडेक(र)
१ संताजी जाधव
३ सखो वेंकटेश

तेरीख ९ रोज मार्गशीर्ष सुध शष्टी इदुवासर मुा किरोले प्रा आंतूर
17-11-1718

जमाई

नवाबाकडील गुा दिगाबर मल्हार रुपये

८४००.

खर्च रुपये

सुभे लस्कर रुपये

४०० दावलजी सोमवसी

२०० पिलाजी जाधव

३०० केरोजी पवार

१७५ संताजी भोसले

१०० तानको आत्माजी

४ विसाजी कृष्ण दिा
कान्होजी भोसले

२५ सताजी जाधव

१००० खडेराऊ दाभाडे

पथके रुपये पथके रुपये

[मागील तारखांत आलेले वगळून] ४० सोनजी वाग

१ नारो शंकर

१० बाजी सितोले

१॥ येशवंतराऊ काकडे

तेरीख १३ रोज मार्गसीर्ष सुध चतुर्दशी भोमवासर मुा ब्र्हाणपूर

खर्च रुपये

सुभे लष्कर	रुो	पथके	रुपये
९०० दावलजी सोमवसी ता मोरोपंत		५० दामाजी माणकेस्वर ता आपाजीपंत	
४५० केरोजी पवार ता माहादाजी बाजी		३० माहादाजी भोसले ता नर्‍हेरपंत	
१५० तानको आत्माजी ता गोपाल शंकर		१५ मोघोजी सेला(र) ता माहादाजीपंत	
२५० संताजी भोसले ता तुको जनार्दन		२० भोजजी उघडे ता सिवाजीपंत	

४ विसाजी कृष्ण ता। नारोपंत
१४०० रा। खंडेराऊ दाभाडे ता। पिलाजी प्रभु
२०० पिलाजी जाधव ता। रामाजी यादव

२९४

किता पथके रुपये
१२ बाजी सितोले ता। सदोपंत
४० सोनजी वाग ता। गंगाजी प्रभु

२॥ नारो शंकर ता। खासा
८ आनाजी कदम ता। लालु
८ राणोजी भोसले ता। गणकोपंत
१५ तुकोजी पवार ता। खंडोपंत
१५ आनंदराऊ पवार ता। खंडोपंत
७ मल्हारजी निकम ता। रत्नाजीपंत
७ बहिरजी जा। ता। त्रिंबकराऊ

(अपूर्ण)

तेरीख १४ .

जमा

जमाई वि। नबाब अमिरल उमराव
जमा पोता रुपये
३९००० यैन रुपये
+२००० गु। सकराजीपंत

+३९०००
रदकर्ज गु।

४२०००

खर्च

पथके रुपये
[मागें येऊन गेलेलीं नांवें वगळून]
८ मल्हारजी कदम ता। जिवाजीपंत

रुपये
सुभे लस्कर रा।
[येऊन गेलेलीं नांवें वगळून]
१४०० रा। सेनापति [खंडेराव दाभाडे]

+ हे दोन्ही आंकडे गिरवले आहेत त्यामुळें नीटसा बोध नाहीं.

२० संताजी धायेभर ताा मुधोपंत

३० जमनाजी माहाडीक ताा गोविंदपंत

२९ चंद्रभान महाडीक ताा गोविंदपंत

१९ जानोजी ढमढेरे ताा बाबुराऊ

७ पदाजी राऊत ताा नारोपंत

३ उखाजी माने ताा नारोपंत

९ कोंडजी यादव ताा नारबा

३ कुसाजी यादव ताा नारबा

९ सखो बापूजी ताा खासा

१९ आसरोजी चाडे ताा रामाजी यादव

१४ परसोजी भोसले देणे मकूबाई

स्वारी राजश्री चिमणाजी दामोधर रुपये ९०

बाजे खर्च रुपये

९ लोक दिा यैवजग्वान

तेरीख १९ (मोहरम)

खर्च रुपये

कारकून रुपये

२०० आउजी नीलकंठ

१२ दिगांबर मल्हार रोजमुरा

दिा बालोजी सिंदे

।· चऱ्हाटे खेचर

दिा केरोजी पवार दिा पालखीस रुा १९०

नारो बाबाजी हरकारा पायेतणास ।।·

रुपये

राजश्री पंतप्रधान

१।· खाा फाटी

१ गुा आनुबाई

।।= खाा काकणे

८= ताा माहादेव

६।÷

दिा राजश्री खंडेराऊ दाभाडे सेनापति होनाजी रुपये गुा ३००

गवरभोई स्वारी राजश्री विश्वासराऊ बलाल रुपये १०

तेरीख १७

खर्च

सुभे लस्कर रुपये	पथके	रुपये
७ मकूबाई दिा परसोजी भो		
	५ तिमाजी राम	
	५० गोविंदराव कृष्ण	
	३ सेख मिरा	
	६५ नारायेणजी ढमढेरे ता नारबा	

तेरीख १९

खर्च	रुा
बाजे खर्च	हरकारे
	१॥ गोविंद नारायेण
८४ नवाबास नजर	१ गोविंद माहादेव
२५ देहनगी विशा राऊ	१ विसाजी राम
	१ विसाजी कृष्ण
	१ अंताजी त्रिमल
	१ वामनाजी केसव

* * * * *

राजश्री चिमाजीकडे हुजूर रवाना
रुपये ८

तेरीख २०

जमाई

विा नवाब	रुपये
	२९४००

तेरीख २२

खर्च	रुपये
श्रीनिवास नरसिह सबनीस	रुा २५

श्री

तेरीज जमाई माहे सफर माहाल पोते स्वारी राजश्री पंतप्रधान सुा तिसा अशर मया अलफ जमा रुपये

२६६०।÷ सिलक माहे गुाा मोहरम

[तपशील]

२२९५७५ माहे मजकूर

१२६९६४ विा नवाब

२७ हासील बाजार

१८४ जमा भेटी

२००० सरदेशमुखी नेमाड

४०० कर्ज गुाा कृष्णभट बाा सोने

२२९५७५

२३२२३५।÷

माहे सफर

तेरीख ७ *(19-1-1719)* गुाा नालस प्राा माळवे

" १९ ०

" २० " मंदसोर

" २५ ०

" २७ ०

" २८ नजिक किले चितोड

हे सफर

तेरीख १९

खर्च रुपये

बाजे खर्च रुपये

१ धर्मादावभट उजनीकर

५ चोपदार दिाा नवाब

२५६

४ कासीद दि॥ राणाजी
२ सिवराम
२ हरसिंग
—
४

—

१६

तेरीख २०

जमाई

वि॥ नवाब रुपये

१९६००

खर्च रुा॥

बाजे खर्च रुपये

२ चोपदार दि॥ महकूबसिंग
२ चोपदार दि॥ नवाब

—

२२।॥≡

तेरीख २८

जमाई

वि॥ नवाब आमिरलउमराव रुपये

२४४६

खर्च रुपये

माहे रबिलोवल

तेरीख १८ मु॥ पाथरटी (?)

" १९ का॥ कोटपुतली

4728

माहे राखर (फालगून)

तेरीख ७–९ (*16-2-1719*) इद्रप्रहस्त येमुना दक्षणतीर

,, ११ दिली

,, १२-२० इंद्रप्रहस्त येमुना दक्षणतीर

माहाळ पोते सुा सन तिसा

स्वारी रा पंतप्रधान माहे राखर

(*18-2-1719*) तेरीख ९ रोज फाल्गुन

सुा १० सौमवासर मुा

इंद्रप्रहस्त एमुना दक्षिणतीर

खर्च रुपये

दिा पथके रुा

	रोजमरा	जखमी	गात्रात
संताजी धायभर	४०	२६	३
चिमणाजीपंत	४१	१५	३
फिरंगोजी सेलके	४०	१५	३
खंडोजी सेलके	८	०	१
सिदोजी पोल	३०	१४	२
जोगोजी थोरात	१२	१०	२
भो(ज)जी उघडे	६०	२३	४
हरि नारायेण	७	०	०
मरजी बेलदार	८	०	०
रामजी थोरात	१०	१०	२
बहिरजी जाा	१५	४	२
राणोजी थोरात	४	६	१
जावजी ढमढेरे	३७	७	२
पदाजी राऊत	१४	५	२
उखाजी माने	५	०	०

अनाजी मदवा	१५	०	२
जानोजी ढमढेरे	२५	१०	२
सोनजी वाघ	६५		३
मानाजी वाघ	३५		२
माणकोजी भोसले	४		०
संताजी चितालकर	२७॥		२
वडजोजी थोरात	२२॥		३
मल्हारजी निकम	१२		२
बाजी कदम	५		०
मल्हारजी कदम	१४		०
मोघोजी सेलार (?)	२०		१
बाजी सितोले	१७		२
आबाजी जाधव	०		०
दामाजी माणकेश्वर	७५		२
असरोजी चाडे	२०		०
सुलतानजी थोरात	१७५		०
कोंडजी यादव	१२		२
खेळोजी लकडे	९		१
खंडोजी नरोटे	१२		२
कुसाजी यादव	६		१
चंद्रभान माहाडिक	३५		४
रामोजी घाटगे	१२		२
तुकोजी पवार	२५		२
आनंदराऊ	२५	७	२
नारायणजी * *	११०	४०	४
संताजी कोकरे (?)	९	५	१
राणोजी भोसले	१४	१०	२
कृष्णसिंग	१६	१०	१
सखो वंकटेश	५०	०	०
मालोजी ना।	६०	१५०	४
वाकोजी पवार	५	०	०
महादजी भोसले	५५	३०	४
हिरोजी यादव	०	२	१

4730

मैराळजी भोसले	०	०	·।·
खंडोजी गाइ(क)वाड	०	०	·।·
जाउजी * *	०	०	·।·
येसवंतराव काकडे	०	०	·।·
मकाजी चोरघे	०	०	·।·
साखरोजी मोरे	०	०	१
सुभानजी * *	०	०	·।·
मानाजी रेवदंड (?)	०	०	·।·
गोदजी गरुड	०	५	·॥·
रामजी बुा	२	२	·।·
सुभानजी पवार	०	२५	·॥·
सिदोजी झांबरे	०	०	·।·
हशम हजारी	०	०	।=
बाजी सिंदे	०	५	।॥·
कावजी बतड (?)	०	०	·।·
मकाजी काला	०	०	·॥·
जोगोजी जाधव	०	४	०
जानोजी जाधव	०	४	·।·
सुभानजी भो	०	६	·॥·
गणपतराऊ	०	०	१
नारो शंकर	३	०	·॥·
गंगाराम	०	०	२
	१३३१	६८३	९३॥=
रामचंद्र करोल	२	२१०७॥=	

सुभे लस्कर	रुपये	२	
सुभे लष्कर रुपये	रोजमरा	जखमी	शहार
पिलाजी जाधव	४०३	१००	१०
सोमवसी	८००	४००	०
केरोजी पवार	८००	३००	५०
रा सेनापति	३५००	१०००	०
संताजी भोसले	८००	४००	०
	६३०३	२२००	६०
	८५६३		

तेरीख ११

खर्च ॥

बाजें खर्च रुपये

२५ इनाम नूरमहमद चोपदार पातशाई

१ इनाम भाट

३० लोक दिा नवाब इनाम

१ आला बकस चोपदार दिा शंकराजीपंत

तेरीख

जमाई

विा नवाब मिा रुा ७२००० वजा १५०० कसूर बाकी ७३५०० पैकीं खोटा १२७ बाकी रुा ७१९५७

पीलखाना

१४॥= शाहारात

४ गवत

१०॥= तादूल

·॥· जखमेस कांदे (?)

२ हसन माहात जखमी

२ काबाडी जखमेस

१ इभ्राम

१ राजेखान

—

२

कारकून रुपये

२० बालाजी माहादेऊ

·।· श्रीनिवासपंत

११॥ रा पंत (तपसील)

—

३१॥

स्वारी राजश्री बाजीराऊ रुपये

८≡ तानजी

८= गोपालजी

८= संताजी मोरे

८= सिदोजी मोरे

८= खंडोजी सावंत

८= येसाजी तरडा

८≡ राणोजी सिंदे

—

१

२ बालोजी गायेकवाड

२ राणोजी सिंदे

—

५

बाजे खर्च रुपये

१ शाहारात फकीर

३ चोपदार गुा तानजी

२ चोपदार गुा नरसू

३॥ खेरात

२॥ तानजी

१ कुसाजी

४० इनाम रुपये

१० जासूद

१५ साड स्वार

१५ चोपदार

४०

५९॥

28-2-1719

माहे राखर

तेरीख १९ रोज फालगुण बहुल

शस्टी मदवासर मुा इंद्रप्रहस्त

येमुना दक्षणतीर

जमाई

नवाब आमिरल उमराऊ रुपये ७५०००

पैकी वजा रुपये

१५०० खजानची दर सदे रुा २

११४ ना पैवस्ता मुा थैलीयात

बाकी जमा रुपये

७३३८६

हासील बाजार गुा बाबूराऊ खुदी टके

६८३

याा रुपये

१।॥

खर्च रुपये

कारकून रुपये
१३७ राजश्री पत [तपसील]
८ सदासिव आबाजी
५ नारो गंगाधर
४ विठल केशव
४ रघोजी माहादेऊ
४ तुको राम
३ बालाजी माहादेऊ
२ बापूजी गणेस
२ नारो बावाजी

सुभे लस्कर रुपये
१६००० रा सेनापति ता खंडोबा
३ सटवोजी जाधव
४०० केरोजी पवार ता नारबा

स्वारी राजश्री बाजीराऊ रुपये
४ खासा कोलसे
२५ कृष्णाजी आनदराऊ
———
२९

राजश्री मदनसिंग रुपये
१५० मातुश्री येसूबाई
१ जगा भीमा(?)भोई
२ तादूल ८१२
१॥ कणीक ८।
•॥• दाली
•।।।= साखर

अपूर्ण.

माहे जमादिलाखर

तेरीख २ (*12-4-1719*)	मुा मोगलाची सराई
,, ४	,, सुरज
,, ५	,, नानकपूर
,, ६	,, सराई सतणारा
,, ७	,, बोरसे पा भेलसा
,, ८	,, सराई दलेलखाना
,, ९	,, तुराईची सराई
,, १०	,, मुन्हाई
,, ११	,, सिहूर
,, १२	,, इछावर
,, १३	,, घाट तुंबडी

तेरीख १४	मुा हाडे नर्मदा दक्षणतीर
,, १५	,, हाडे रेवातीर
,, १६	,, नर्मदा दक्षणतीर
,, १७	,, हांडे
,, १८	,, केलीची सराये
,, १९	,, चारवा
,, २०	,, चारवा नजीक नंदी नेमाड
,, २१-२२	,, रतनपूर
,, २३	,, खाराकोट पा नेमाड
,, २४	,, पिपलोद
,, २५	,, दाऊदनगर प्रा नेमाड
,, २६	,, तापीतीर
,, २७-२९	,, बलं (?) अंबराई बराणपूर

माहे जमादिलाखर

तेरीख ७ रोज वैशाख शुद्ध नवमी भ्रगवार मुा बोरसे पा मेलसा (*17-4-1719*)

खर्च रुपये

सुभे लस्कर कृष्णाजी दाभाडे रुपये ४००

देणे गवरभोई स्वारी राऊ रुपये १३॥

तेरीख १४

खर्च रुपये

राजश्री मदनसिंग रुपये

२० नख्त

१० मातुश्री

१० खासा

तेरीख १९

खर्च रुपये

कारकून

४॥. राजश्री पंत

[तपसील]

१ बाळाजी महादेव सत्वास (?)

१ श्रीनिवासपंत जिवास (?)

स्वारी राजश्री [illegible] देणे

गवर भोई रुपये

१३॥

तेरीख १८

खर्च रुपये

कारकून रुपये

३ रा पंत [तपसील]

॥ नारोशंकर

॥ बापूजी गणेस

॥ सदासिव अंबाजी.

(अपूर्ण)

माहे जमादिलाखर

तेरिख रोज वैशाख बहुल चतोर्दसी गुरुवार मुा बाल आबराई बराणपूर

खर्च *1-5-1719*

रा केरोजी पवार

खासा सुभेदार

१० तिवट विश्वनाथभट

पैकी

६० थिरमे जोडी सेखा

बाब

७०

मलोजी पवार

[तपसील]

राजी पवार

[तपसील]

गो त्रिबक [तपसील]

मल्हारपत [,,]

होनाजी पारखे (?) [,,]

4736

कृष्णाजी पवार

[तपसील]

उदाजी पवार

[तपसील]

माहादाजी राम जमनीस

विस्वनाथभट पैकी तिवट १

येक रुा

७

९७४

तेरीख २९ 9-5-1719

खर्च रुो

बाजि खर्च

१ देणे नुबिया फिरगी

No. 309]

इहिदे अशरीन

रोजकीर्द राजश्री चिमणाजी बल्लाळ

छ ११ साबान रोज मंगळवार मुकाम

जेष्ट मास त्रयोदसी (7-6-1720) हरसूल

छ १२ साबान (8-6-1720) फुलंबरी जवळ मौजे पालीवर नवाब आलमअली खान याचे लस्कराजवळी मुकाम केला.

छ १३ पूर्णिमा (9-6-1720) पालीहून कूच होऊन मौज सावडे(१) प्रा उंडणगाव याचे दक्षणभागी नदीवर मुकाम जाला. छ मा नवाब आलमअलीखान याची व राजश्री राऊ याची भेटी जाली.

छ १६ रावल (*4-1-1721*) नजीक चिखलठाण नवाब निजाम-नमुलुक याची भेट राजश्री पंतप्रधान याची जाली.

¶*These entries for the first year of the Peshwa's regime fill up an important gap and give us his early movements. The first two leave no doubt that the Peshwa participated in the battle of Balapur as an ally of Alamali Khan who opposed the Nizam but was subsequently defeated.*

No. 310]

रोजकीद

छ २ मोहरम सलास अशरीन [*2-9-1722*

मकाजी चौधरी दिा राजश्री चिमणाजी बल्लाळ याची घोडी साल गुा जुनरावरी करीमबेगाचे झुंझी पडिली घोडी २ सदरहू घोड्याचा येवज देशमुख देशपांडे याणी प्राा मजकुरावरी पटी करून रु. ७०० देविले.

छ ३ मोहरम सलास अशरीन *3-9-1722*

राा राघो लक्षुमण हुजूर उमेदवार होते यासी राजश्री संभाजी भोसले याच्या पथकाची मजमू सांगोन पाठविले यासी वेतन देखील चाकर मोईनप्रमाणे सालीना होन १००० येक हजार केले असेत. पैवस्तापासून वजावाटानें व दंडकप्रमाणे पावीत जाणे सनद.

16-12-1722

छ १८ रबिलोवल अशरीन

गणेश संभाजी हुजूर उमेदवार होता त्यासी किले हायेचा सुभा सांगोन राजश्री रामचंद्र महादेव याजकडे पाठविले. तैनात होन पातशाई १००० यास पाववयाची मोईन सालीना रुपये २०० केले आहेत पावति जाणे म्हणून सनद.

13-2-1723

छ १८ जमादिलावल सलास अशरीन माघ बहुल चतुर्थी मुाा बदकशा प्राा झाबवा निजामन्मुलुक याची भेट झाली. छ २४ मजकुरी निजामन्मुलुक याचा निरोप घेऊन दक्षण प्रांती स्वारी.

6-4-1723

छ २१ रजब चैत्र बहुल सप्तमी भोमवासर मुा कसबे दुद्कस प्रा मकडाई

जमा पीलखाना खास गज हती दोस्त महमद रोहिला याचेवरी स्वारी गेली होती, त्यानी पाडाव करून आणिली गुा रंभाजी कदम हती रास १

छ ३० रजब सलास अशरान 25-4-1723

कासीद रा पा बिज्यागडचे कानगो व कमावीसदार हुजूर आणावयास पाठविले त्यास मसाला—

४ शाबान—सलास अशरीन 29-4-1723

कासीद दिा मयाराम वकील दिलीहून आले

पथक्यांत रामचंद्र मल्हार (सुखटणकर) व बाजी भीवराव ही नावें आढळतात.

26-9-1723

७ मोहरम अर्बा अशरीन

भेटी गुा राणाजी शिंदे—

[टीप:—तुकोजी, आनंदराव, उदाजी, कृष्णाजी या पवार मंडळीचीं नावें अर्बा अशरीन सालांत पेशव्याचे ताबीन असल्याबद्दल येतात.]

छ ९ सफर आर्बा अशरीन. 28-10-1723

राजश्री रामचंद्र माहादेऊ यासी कल्याण भिवंडीचा तह लेहून दिल्हा आहे की प्रा कल्याण व भिवंडी साल महाल प्रांत जुनर पौड खोरा व नाणेमावल व आठावीस गाऊ ता पोनमावल येथील बिनमख्ता रुपये ५५००० पंचावन हजार व गला कैली भात खंडी १०० संभर खंडी व तूप माहाल मापे खंडी २ दोन खंडी मख्ता आहे त्यास. सदरहूप्रमाणे पेस्तर सालापासून तीन साले मख्ता करार केला आहे. याखेरीज हुजरून लग्नपटी रु. १८००० आठरा हजार करार केले आहेत.

4739

ाचा वसूल—

अर्बा अशरीन

स्वारी राजश्री पंतप्रधान

सबाल		मुकाम
छ १	[२४-६-१७२३]	मलकापूर
छ २		सिंदखेड
छ ३		जालनापूर
छ ४		टाकसूल
छ ५		पाडिली प्रां पैठण
छ ६		दुर्गवाडी
छ ७-१२		राळनिंब प्रा नेवासे
छ १३		रास्तापूर
छ १४		पिंपळगाऊ प्रा नगर
छ १५		वाळकी पा कडेवळीत
छ १६		देहुलगाव ता चांभारगोंदे
छ १७-१		पेडगाऊ प्रा कडेवलीत
छ १९		पेडगाव प्रा पुणे
छ २०-२९		सुपे

¶*The entries for the year 1723 mark the Peshwa's first advance in Malwa. The Peshwa had a meeting with the Nizam who was then Vazir, and was gratified with presents from the Rohilla Chief of Bhopal.*

No. 311]

अर्बा अशरीन

छ ११ जावल (बाजीराव सातारा सोडतो) *(27-1-1724)*

छ १३ जावल	जेजुरी
छ १५-१७ जाखर	चांदोरी गंगथडी
छ १८-१९ जाखर	तुगाड प्रा चांदवड
छ २० जाखर	आगरे प्रा खानदेश
छ २१ जाखर	वडगाव प्रा गाळण
छ २३ जाखर	आरवी प्रा लळिंग
छ २४ जाखर २६	कुसुंबे

छ २७ जाखर	वडेल पा सोनगीर
छ २८ जाखर	घाटमाथा ?
छ २९ जाखर	लांबकानी. एथे जुज जाहाले.
	(*14-3-1724*)
रजब	
छ ७ पर्यंत	लांबकानी
छ ८	कूच करून
छ १० रजब	नजीक सांगवी पा आहो (?)
छ ११	नजीक घाट
छ १२ रजब	राजापूर पा खरगोण
छ १३ रजब	राजापूर
छ १४ रजब-२९	बडनगर
रमजान अर्बा अशरीन	मुकाम
छ १	महेश्वर
छ २-	जाहागिराबाद नजीक मांडोगड
छ ४	नालसे प्रां माळवा
छ ५	नालसे किलीजखान भेट नवाबाची [*18-5-1724*. [याच वेळीं बाजीराव निजामाच्या भेटींत निजामास मदत करण्याचें बाजीरावाने ठरविलें असावें.]
छ ६-	जाहागिराबाद फिरोन आले
छ ८-	अकबरपूर नर्मदातीर
छ १	खर्गोण अकबरपुराहून कूच करून का मजकुरी आले.

रोजकीर्द ३

छ ४ जिल्काद खमस अशरीन *14-7-1724*

लक्षुमण शंकर याजकडे जाफराबादेची कमावीस होती. सनसलासात होती. त्यास काइमबेग याच्या नावे खर्च रु. ५०० पाचशे नख्त खर्च लिहिले म्हणून त्यास हुजूर आणावयास जासूद पाठविले त्यास मसाला देविला.

4741

छ ७ जिल्काद खमस अशरीन *17-7-1724*

राजश्री रामचंद्र माहादेऊ यासी पत्र की जवार रामनगर वासदे व पेठ हे रा पिलाजी जाधव याजकडे कमावीस दिल्ही आहे व सुरत प्रांत याचे स्वाधीन केला आहे. त्यास याणी आपले तर्फेने खंडोजी मानकर तुम्हाकडे पाठविला आहे याची कुमक करणे स्थळ हस्तगत करणे पुढे कल्याण-भिवडीपासून सुरत पावेतो अमल तुमचा सुरलित चालेल स्थळ हस्तगत करणे त्यासी खर्च वेच लागेल तो तुमची आमची भेट जालियावरी विल्हे करून देऊन म्हणून पत्र १.

छ २३ मोहरम आश्विन शुध येकादशी गुा मुा साखरखेडले.

छ मजकुरी युध्य होऊन मुबारजखान+ मोडिला. *-10-1724*

पोतापैकी रुपये.

पथके जखमी यासी.		किता पथके जखमी	
४	जावजी ढमढेरे	२५	तुकोजी आनंदराऊ पवार
१२	दसभाई सितोळे	१	जानोजी भोसले
३	सुभानजी पाटोळे	२	मानाजी वाग
२	खंडोजी खोमणे	२	सोनजी वाग
८	राणोजी भोसले	३	संताजी निंबालकर
५	दताजी टेकले	७	सखाजी घालवडे
२	संभाजी गाढवे	२	येसाजी निकम
४	लखमोजी गरूड	१	मुधोजी यादव
१	माहादजी गाढवे	१०	आगाजी अहिरेकर
२	वालोजी रणदिवे	१	सटवोजी भोसले
९	नवलोजी काटे	५	निंबाजी भगत
११	तिमाजी साबाजी	८	बाबजी सितोळे
२	सेख अहमद	२	घनश्याम
१	महमद बेग	२	सिदोजी राऊत
११	अपाजी माणकेश्वर	१	पदाजी राऊत

+ ह्याचींच दुसरीं नांवें अमानतखान व कमरजखान अशीं आढळतात.

३ सखोजी निकम	४ सताजी चितळकर
३ जानराऊ ढमढेरे	१२ संताजी धायेभोर
१ बहिरजी सिंदे	२ रामजी पराडा
१ तुकोजी रायेजादे	३ भिकाजी देवकाते
	१० राणोजी सिंदे
	११ सुभानजी सेलार
८९	११४

अनामतखानाकडील सरदार ठार जाहाले छ २३ मोहरम.

१ खासा अमानतखान (मुबारजखान)
१ इभरामखान
२ गलितखान—खासा व लेव
२ दोन खोजे
१ (फारलें)

७

¶*The year 1724 was a busy one for the Peshwa. In January he led an expedition to Khandesh, took Lambkani by storm, crossed the Narbada and entered Malwa. At Nalcha on 18th May 1724 there took place another meeting of great political significance between the Peshwa and the Nizam who, disgusted with the vile court atmosphere, marched south to carve out an independent principality for himself. The interview was a great triumph of the Nizam's genius, for having won over the Peshwa by assenting to the latter's demands he assured himself of an easy victory over his opponent Mubarijkhan.*

No. 312]

स्वारी राजश्री पंतप्रधान खमस अशरीन

स्वारी राजश्री पंतप्रधान बराबर स्वारी राजश्री बाजी भीवराव

(Baji Bhivrao's expedition into Gujarat)

तारीख	मुकाम
छ ८ जमादिलाखर गुरुवार (*11-2-1725*)	मुा बसवपेठ पाा पिटलाद छ मजकुरी रुस्तुम अलीखान लढाईमध्यें ठार झाले.

छ ९ जमादिलाखर	मुा बसो
छ १० जमादिलाखर	मुा गोकल
छ ११-२९ जमादिलाखर	मुा अमदाबाद

[टीप.—बाजी भीवरावचे साबान महिन्यांतील मुकाम खंबायत प्रांतात आहेत.]

स्वारी राजश्री अंबाजी त्रिंबक

छ १ शाबान (*April 1725*)	पा सुथ
छ २ शाबान	मुा तले पा सुथ
छ ३ शाबान	पा सुत
छ ४-८ शाबान	निदकावड पा सुत
छ ९-१५ शाबान	सिराडा सुत
छ १६ शाबान	प्रा झालोद
छ १८-१९ शाबान	परोलिया प्रा झाबवा
छ २२-२४ शाबान	प्रा झाबवा

छ १९ जिल्काद सीत अशरीन *19-7-1725*

रा केसो महादेऊ दिा राजश्री बालाजी विश्वनाथ यासी प्रांत माळवे येथील बाबती व सरदेशमुखी देखील मोगलाईचा आकार व सरकारचे येवज याची कमावीस सांगोन पाठविले यांस वेतन सालीना सदरहू येवज पैकी देविले. रु ३०००

छ १९ जिल्काद सीत अशरीन *19-7-1725*

पथक गोजाजी देवकाते दिा राजश्री चिमणाजी बल्लाळ याचे जमावाचे बेगमीस महाल दिले १।। पा आबझरे प्रां माळवा पा बागोद प्रां गुजराथ महाल .।।. महाल १

4744

जिल्काद सीत अशरीन *July 1725*

सनद बनाम केशो विश्वनाथ मालवा प्रांते त्र्यंबक गंगाधर, केशो महादेऊ, जनाजी भोसले, कृष्णाजी हरि यास पाठविले त्याचे कारभाराचे अमिनीसी पाठविले आहेत. तैनात सालीना होन पाा १५०० पावायाची मोईन मारनिलेकडून घेणे म्हणून सनद रु १०००

राा पत्रार दिाा राजश्री बालाजी विश्वनाथ यासी प्राा गुजराथ सालमजकुरी

मुकासे

१ पाा बाहादुरपुरा
१ पाा सायेखेड
१ पाा हलोल
१ पाा कलोल
१ उंबरट
१ ठासरे
१ गोदरे
१ बडोदरे
१ वडनगर
१ ढवलके
१ धुधुका

११

१ पाा भडोच
१ पाा मोमदाबाद
१ पाा झालवद
१ पाा पेटलाद.

१५

पाा धार प्राा मालवा १ सालगुदस्ता महाल मुकासे होते त्याप्रमाणे करार करून दिल्हे मालवा

सरकार हांडे तिजाई मुकासा

॥ मकडाई
१ राजपिंपळे
१ पंचमोली
१ मांडवी
१ बिसनगर
१ पिरापटण
१ आली
१ मोहन
१ झाबवा
१ कोठडे

९॥

रोजकीर्द

छ १६ जिल्हेज सीत अशरीन R. No. 7.

14-8-1725

किता ताकीदपत्रे राजश्री सटवोजी जाधव यास जवार रामनगर वासदे पेठ येथील बाबती सरदेशमुखीची कमाविे ‍ दगुदस्ता आहे तेणेप्रमाणे करार करून ताकीदपत्रे सादर केली आसे

१ राऊल रामदेऊ राणा संस्थान रामनगर
१ विक्रम पतंगराऊ संस्थान जवार
१ लक्षधीर गणपतराऊ प्रांत पेठ
१ रायेभान राऊल प्रांत वासदे
—
४

छ ९ जिल्हेज शीत अशरीन 7-8-1725

राजश्री कृष्णराऊ माहादेव सुभेदार प्रांत जुनर यास की प्रा मजकूरची मजमू रामचंद्र मल्हार यास सांगोन पाठविले यास वेतन रुा मजमदार माजी प्रा यास पाठवावयाची मोईन पावणे

रदकर्ज देणे रामचंद्र मल्हार यास प्रांत जुनरचे येवजी कृष्णराऊ माहादेऊ याजकडून देविले रुपये

२००० येन रुपये
१६० व्याज येक हजाराचे
———
२१६०

छ १ मोहरम 29-8-1725

१ रा बाजीराऊ प्रधान
२९ पथके दिा बाजीराऊ प्रधा
१ राणोजी भोसले
१ त्रिंबकजी खंडागले
१ वखाजी जाचक

१ खंडोजी खंडागले
१ तुळजाजी जाचक
१ दताजी खंडागळे
१ संताजी गाढवे
१ मालजी भोसले
१ राणोजी बिन बिरोजी भोसले
१ नुरखा
१ जमनाजी माहाडीक

११
१४ ई

२५

यास पत्रे जे राजश्री बाजीराऊ राजश्री कानोजी भोसले यासी आणावयास पाठविले आहेत. यासी तुम्ही भेटणे. कदाचित कानोजी भोसले न भेटले तर तुम्ही भेटणे. तुमचा सरंजाम तुम्हास देतील त्याबा सामील होणे.

छ १३ मोहरम सीत अशरीन *10-9-1725*

तहनामा रा क्रष्णाजी हरि व त्रिंबक गंगाधर व केसो माहादेऊ व जनाजी भोसले याचा तह

प्रा मालवे येथील मोकासे खेरीज इंदूर जो येवज आकार होईल त्यापैकी दरसदे

२५ बाबती
१० सरदेशमुखी
१५ सरकार हुजूर

५०

येकून पनास बाकी पनास रुपये तुम्हास द्यावे हा तह तुमची तुम्ही फौज घेऊन कमावीस केली तरी सदरहू तह चालऊन; नाही तर आम्ही

बुंदेलखंडचे प्रांते दिवाणचे तकसीमेस दरसदे रुपये २० वीस काढावे १

पा इंदूर प्रा मालवा खासगीकडे आहे त्याचा जो आकार देखील घासदाणा पडिले पान होईल त्याची येक तकसीम खर्च करावे. बाकी २ तकसिमा हुजूर पावावे कलम १.

आलिया तुमची फौज पाहून दिवाण बेरीज रुपये ३९ वजा करून बाकी तुमचे फौजेमाफिक गाव देऊन खंड णांचा येवज नख्त व जिनस येईल तो त्यापैकी जिनस लस्करास खर्च करावा. नख्त येईल तो दिवाण बेरिजेस द्यावा.

छ २० मोहरम सीत अशरीन भाद्रपद बहुल सप्तमी भृगुवासर

17-9-1725

मीर फकुरदी अलीखान यास नवाबानी गुजराथेस रा। केले होते. त्यास वाटेत पिलाजी गायेकवाड यानी धरून आणून कैदेत ठेविले आहे. त्यास बिसातीसमेत सोडून देणे.

१ सेनापति

१ पिलाजी गायकवाड

―

२

[टीप.—रघूजी व कंठाजी बिन कमळोजी कदम असें नांव दाखल आहे.]

छ १८ रबिलाखर इंदुवासर सीत अशरीन. 13-12-1725

चिटनिसी पत्रे

राजश्री कंठाजी कदमराव व पिलाजी गायेकवाड यासी पत्रे जे. तुम्ही हमीदखानास सामील न होणे. प्रधानपंताचे फौजेसी कटकट न करणे म्हणून या कामासी पाठविले त्यासी रुपये.

छ २८ रबिलाखर सीत अशरीन 23-12-1725

राजश्री खंडेराऊ दाभाडे सेनापति यास पत्र जे च्यार हजार फौजेनिशी रा। त्रिंबकराऊ यास प्रतिनिधीकडे रा। केले म्हणून लिहिले. उत्तम गोष्ट केली. पवार सोमवंशी याजकडील फौज आली म्हणून लिहिले. तरी त्याजकडे हुजरे

पाठविले आहेत. फौजनिसी राऊ मारानिलेयास सामील होतील. स्वामी द्वादशी इंदुवारी सातारा दाखल जाले. हुजूर यात्रयाचेविशी आज्ञापत्रे सादर केली आहेत हुजूर येणे.

छ २२ जमादिलाखर सीत अशरीन

माघ बहुल नवमी इंदुवार.

छ मजकुरी आबदुल गफर पठाण याची भेट जाहाली.

छ १२ रजब सीत अशरीन

किता देणे कर्जदादन रा त्र्यंबकराऊ दाभाडे यासी उसने होन ९० येकूण रुपये १९०.

छ १४ रमजान सीत अशरीन *6-5-1726*

तुमची विनंतीपत्रे पाऊन वर्तमान कळत नाही, यास्तव सविस्तर अलाहिदा आज्ञा केली आहे, तरी तेथील वर्तमान आद्यंत लिहिणे म्हणून पत्रे.

१ बाजीराऊ प्रधान
१ प्रतिनिधि
१ सरलष्कर
१ सेनाखासखेल
४

सबा अशरीन

स्वारी राजश्री चिमणाजी बलाल माहे सफर आश्विन

छ ७ रोज शुध नवमी भृगुवासर *23-9-1726*

राजश्री उदाजी पवार यासी सादर कीं प्रांत गुजराथ येथील सरदेशमुखी व बाबतीची चिटनिसी मलार गोविंद यांस सांगोन पाठविले आहेत. त्यांस सदरहू धंदा सांगोन सरदेशमुखीची चिटनिसीचे प्रयोजन घेणे. यांस वेतनात सालीना रु. १९०० पंधरासे केले असेती. माहाल मजकुरचे येवजी पावणे म्हणून सनद सादर केली असे १

¶*Malhar Govind is appointed Chitnis to collect the Sardeshmukhi and Babti rights in Gujarat.*

छ २४ सफर सबा अशरी 10-10-1726

राजश्री सखो महादेव नामजाद प्रांत मालवा यासी सनद सादर कीं मालवा प्रांत येथील सरदेशमुखीची मजमु राजश्री रामचंद्र मल्हार यासी सांगितली असे. यासी तैनात सालीना पावायाची मोईन रु. ३००० तीन हजार केले असेत. माहाल मजकुरच्या येवजी पावणे म्हणून सनद १.

¶*Ramachandra Malhar is granted the Mujmu of Sardeshmukhi for Malwa.*

रोजकीर्द

छ ३ रबिलोवल सबा अशरीन. 18-10-1726

नंदलाल मंडलोई इंदूर प्रांत मालवा याची खते सालगुदस्ता स्वारी राजश्री आबाजीपंत याचे गुजारतीची हुजूर होती, ती खते जगनाथ नाईक पुरंदरे याची स्वाधीन करून बोली केली की खताप्रमाणे पैका घेऊन हुजूर पावावा आणि खते ज्याची त्यास द्यावी; नाही तरी खते आणून द्यावी येसी बोली करून मारनिलेचे खत लेहून घेतले आणि त्याचे स्वाधीन खते केली बीतपा रु.

छ १० रबिलोवल सबा अशरीन 25-10-1726

प्रांत मांडोगड येथील तलहटी प्रां॥ मालवा येथील बाबती सरदेशमुखीचा येवज येणेप्रमाणे

फिरंगोजी सेलका — तकसिमा ३

बहिरो राम धायगुडे — तकसिमा २

यासी माहाल मोकासे आहेत तेथील बाबती सरदेशमुखी प्रा॥ बढवा प्रा॥ बागोदे १ प्रा॥ करई १ प्रा॥ महेश्वर १ प्रा॥ धर्मपुरी प्रा॥ बडवाणी प्रा॥ मनावर प्रा॥ बेडोदे प्रा॥ धारगाव.

येणेप्रमाणे माहालचा बाबतीचा येवज व सरदेशमुखीचा येवज सालमजकुरी उभयताकडे पंचादुईच्या हिसेब सनद दिली असे.

१ देशमुख देशपांडे हाय माहाल सदरहू.
१ उभयेताचे नावे

२

ता॥ येवज बहिरो राम धायगुडे याजकडे स्वारी राजश्री आंबाजीपंत मालगुदस्ता होता तो खर्च येणेप्रमाणे.

4750

रोजकीर्द 11-9-1726

छ २५ मोहरम सबा अशरीन भाद्रपद बहुल द्वादसी रविवार देणे समजावीस थके स्वाा अंबाजीपंत सालगुदस्तापैकी

फिरंगोजी सेळके
७३०० येन रुप
७२० कापड
८०२०
यासी
६०१५ बाकी स्वारी राा आंबाजीपंत सालगुाा
४०१२ प्राा आबझेरें
८०० प्राा शाहाजापूर
४८१२
१२०
६०१५
२००५ वरात आबझरे येथील येवज रघोदास याणी हवाला घेतला आहे त्या येवजी
१८४५ येन वरात
१६० बटा
२००५
मानाजी वाग समजावीस आख सुाा रुपये
१०० शाहजापूर
८०० आंबझेरे
९००
२२५ बा
११२५

बहिरो राम धायेगुडे
५२०० येन रुपये
४८० कापड
५६८०
यासी येवज रुपये
७०० आबझरे
२००० शाहाजापूर
२७००
६७५ बटा
३३७५
५०० कापड शाहाज्यापूर
३८७५
१८०५ वरात आबझरे बाा हवाला रावीदास
१६६१ येन रुपये
१४६ बटा
५६८०
शामराऊ त्रिंबक प्राा आंबझरे आख सुाा
४७५ रुपये
१२०
१८०५
५९५

सत्रा अशरीन

रोजकीर्द 21-7-1726

छ २ जिल्हेज श्रावण शुध चतुर्थ गुरुवासर जमा पोता रुपये १३३६१ स्वारी राजश्री अंबाजी त्र्यंबक गुा पिलाजी जाधव.

¶*The interest of the following entry lies in the fact that day after day this entry is repeated. This money probably represents the Chauth realized by Ambaji Trimbak in the expedition of 1725-26.*

छ ३ जिल्हेज	१४१९७॥
छ ४ जिल्हेज	२२११॥
छ ५ जिल्हेज	८८५१
छ ६ जिल्हेज	१७३४८॥
छ ७ जिल्हेज	४७४०
छ ८ जिल्हेज	७७६४॥
छ ९ जिल्हेज	२४१२॥÷
छ १० जिल्हेज	५१॥
छ ११ जिल्हेज	१८६॥
छ १३ जिल्हेज	१०
छ १४ जिल्हेज	१४६६५॥।
छ १५ जिल्हेज	२२२८३॥
छ १६ जिल्हेज	२७९३।
छ १७ जिल्हेज	१३४२४।
छ १८ जिल्हेज	१७९२२।=
छ १९ जिल्हेज	९४०
छ २० जिल्हेज	१०७॥
छ २१ जिल्हेज	१६२८॥।
छ २२ जिल्हेज	१०७।
छ २२ जिल्हेज	२३६२
छ २६ जिल्हेज	३७५॥
छ २७ जिल्हेज	१६८७।
छ २९ जिल्हेज	९६॥

सवाल	जमा स्वारी राजश्री अंबाजी त्र्यंबक
	रु.
छ ११	१५७९
छ १२	३००
छ १३	४५०
छ १४	२६३७॥
छ १५	२३८५॥≈
छ १६	१६३३॥
छ १७	१५०९
छ १८	२३३४
छ १९	२५३
छ २०	५७६१
छ २१	७०
छ २३	६१५॥।
छ २६	२१९९८
छ २८	५१९९॥
छ २९	५१७३

¶*The gradual encroachment of the Marathas on Gujarat and Malwa is manifest from entries for the years 1725 and 1726.*

No. 313]

छ २४ सवाल समान अशरीन *4-6-1727*

सखो महादेव यासी साल गुदस्ता मालवे येथील सुभा सांगितला होता त्यापैकी मारनिलेकडे करार जाले बा हिसेब मारनिले रुपये २०५१०॥ पैकी माफ केले रु. १६६०॥ बाकी रुपये १८८५०.

छ १९ सफर समान अशरीन *24-10-1727*

किता का तलेगावचे मोकदमास पत्र की मोगलाची धामधूम जाली आहे याजकरीता जवळ शह पडिल्यावरी तुम्ही मोगलाचा कौल घेणे आणि गाव राखणे म्हणून

छ १९ सफर समान अशरीन — 24-9-1727

रा सखो माहादेव यास सालगुा प्रांत माळवा येथील मामला सांगितला होता. त्यास हिसेबकितेब करून बाकी निघाली ते सारी माफ केली. सात हजार रुपये करार केले येविसी फारखती लिहून दिल्ही की याउपरी तुम्हास हिसेबकितेबाचा तगादा लावणार नाही. सात हजार करार केले ते द्यावे.

छ २२ सफर समान अशरीन — 27-9-1727

दिमत राणोजी शिंदे बा येवज कमावीस गुा रामचंद्र मल्हार बा हिसेब रुपये.

¶Ramchandra Malhar appears to be associated with Ranoji as early as 27-9-1727.

छ २१ जमादिलाखर समान अशरीन — 22-1-1728

छ मजकुरी रा उदाजी पवार यांची भेट जाली.

छ २९ रजब समान अशरीन — 25-2-1728

फाल्गुन बहुल द्वादसी भानुवासर मुा नजीक पालखेड
मोगलासी जुज जाले

मुकाम		समान अशरीन
छ १ साबान	——	मुा गलनिंब
छ २ साबान		
चैत्र शुा चतुर्थी भानुवासर		मुा गलनिंब
छ ३ साबान	मुा खरडी	

[बाजीरावाचे मुकाम समान अशरीन]

ता.	मुकाम
१	गलनिंब
२	गलनिंब
३	खरडी पाा सेवगाव नजीक पैठण गंगा दक्षण तीर
४	"
५ सौम्यवासर चैत्र शुा ७ (6-4-1728) नजीक मुंगी प्राा सेवगाव	छ मजकुरी तह मोगलासी जाला

६	नजीक मुंगी प्रा सेवगाव
७	” ” ” ”
८	” ” ” ”
९	टाकसरी ” ”
१०	गंगातीर
११	लाखेफळ प्रा सेवगाव
१२	सावखेडे
१३	गळनिंब
१४	जांबगाव गोदा दक्षणतीर
१५	पाचलेगाव प्रा नेवासे
१६	” ”
१७	राहुरी
१८	बारागाव नांदूर
१९	” ”
२०	वावरथ
२३	निघोज प्रा पारनेर
२४	निरगुड
२५	निरगुड
२६	निरगुड
२९	कोथळे

[टीप.—बाजी भीवराव, पिलाजी जाधव, राणोजी शिंदे, गणपत बहिरू यांच्या नांवे रकमा खर्ची पडल्या आहेत. तसेच उदाजी पवार याची भेट जाली असा उल्लेख आहे. यावरून हे लोक पालखेडच्या लढाईत हजर होते हें निर्विवाद होय.

¶*The entries for the year 1728 give among other things important items referring to the battle of Palkhed in which the Nizam was worsted.*

No. 314]

तिसा अशरीन

स्वारी राजश्री चिमणाजी बलाळ

रबिलाखर

छ १७ राखर कार्तिक वा ४ पिंपळस जांबळी प्रा चांदवड		*9-11-1728*
छ १९ राखर	झाडी ? प्रा निंबाईत	
छ २३ राखर	वारी प्रा धुळे	

छ २५ राखर	तोरखेड प्रा नंदुरबार
छ २७ राखर	मदीने प्रा मुलतानपूर
छ २९ राखर	बारी करवंदीचे तांडी नजीकवड
छ २ जावल	मुा राजपुरानजीक
छ ३ जावल	नर्मदा दक्षणतीर
छ ४ जावल	नर्मदा उत्तरतीर नजीक धर्मपुरी
छ ६ जावल	नालछा सरकार मांडवा सुभा माळवा

छ ८ जावल मार्गसीर्ष शु. १० भृगुवासर (*29-11-1728*) मुा आबझिरे

छ ८-११	" "
छ १२	आऊ (राऊ ?)
छ १६	जेपाळपूर
छ २२-२७ जावल	नजीक उजेनी
छ २९ जमादिलावल	उजेनी
छ २२ जमादिलाखरपर्यंत	उजेनी
छ २३ जाखर	कालडोहो
छ २५ जाखर	कायेत
छ २७ जाखर	नजीक शाहजापूर
छ २८ जाखर	सारंगपूर

[टीप.—या महिन्यात जावदे नवलाई धार रतलाम बदनावर या परगण्यातून वसूल केलेल्या रकमा जमा आहेत. कोतवाल उजेनकर याजकडून ५००० त्याचप्रमाणे नंदलाल मंडलोई इंदूरकर याचे नावे लहान मोठ्या रकमा जमा आहेत.]

रजब तिसा अशरीन

छ १७	प्रा बुंदीकोटा
छ २२	बुंदीकोट्याची बारी चढून नदीतीर.

छ २३	मुा वाकीर प्रांत कोटे राजगडचा वसूल
छ ३०	मुकुंददरा

सावान फाल्गुण

छ १	चुकला ? प्रा भानपुरा
छ २-३	भानपुरा
छ ४-९	नजीक रामपुरा
छ ६	देवठे ?
छ १०,	कनोड पा मंदोसर
छ १२	प्रा जावदे नजीक देवले
छ १३	नजीक सुतोडा प्रा माळवे
छ २२	मुा मही
छ २२	मही नदी
छ २७ राणोजी शिंदे यास अफ्तागीर.	
छ २९	अनास नदी
छ ३०	नजीक झालोद.

छ २ जावल तिसा अशरीन

राणोजी शिंदे व मल्हारजी होळकर कहीस गेले होते त्यास मोजे ठिकरी प्रा खर्गोण एथील घासदाणा खंडला. रु. १००

धर्मादाव खासा राजश्रीपंत धर्म रेवातिरी

१८=	राजश्री अपा
।।।	रखमाबाई
८=	जिऊबाई

टीप. —याचप्रमाणे धर्मादाव रकमा मुा उजनी क्षिप्रा तीरी. रखमाबाई चिमाजीची स्त्री वरील स्वारींत नवऱ्याबरोबर आहे.

स्वारी राजश्री चिमणाजी बलाळ

रमजान तिसा अशरीन. *22-3-1729*

छ २	ना दाहोद
छ ३-१२	दाहोद

छ १३ · दाहोदाहून कूच

छ १७ रमजान

मल्हारजी होळकर यास बहुमान

हती बा। राणोजी शिंदे यापैकी देविला — घोडी खा। गु। सिदोजी राऊत यापासून घेऊन देविली.

किमत रु ९००

छ १९ धंडाणे

छ २० खंडाळे ?

छ २१ खो र चें खोब्यावरी

छ २२ बारीचा खोढा

छ २३ जांबूल बोरे

छ २४ गागली नजीक नर्मदातीर

छ २६ नजीक राजपुरा नर्मदा अलीकडे

15-4-1729

छ मजकुरी राजश्री रायास पुत्र जाहला म्हणून पत्रें घेऊन कासीद आला.

छ २७ सेंधव

छ २८ पलसवाडा

छ २९ नजीक करवंदी

सवाल

१ कमखेडे पा। बेटावद

२ मोहाडी प्रा। खानदेश

३ सवदोणे

६ कोकणखेडे

७ इंचूर

८ गंगातीर

९ प्रवरा दक्षणतीर

१० दारवे संगमनेर

११ पिंपल

१२ —

१३	पाबळ
१५	तुळापूर
१६ वैशाख वा ३	मुकाम पुणें

¶*The itinerary of Chimaji Appa given in detail will prove an invaluable asset to a close study of Chimaji's expedition against Daya Bahadar, the Subha of Malwa. The battle of Amzera was fought on 29th November 1728 and ended in a complete overthrow of Daya Bahadar. He was slain and his camp plundered.*

No. 315]

स्वारी राजश्री पंतप्रधान	तिसा अशरीन
तारीख	मुकाम
छ १७ राखर कार्तिक वद्य ४ मंदवासर	तुळजापूर
छ २२ राखर	तुळजापुराहून कूच करून माज सारेले एथें मुकाम
छ २३ राखर	मलिकपेठ
छ २४ राखर	पापरी पा भोसे
छ २५ राखर	करकंब
छ २६ राखर	नीरा नसरापूर
छ २७ राखर	अकलूज
छ २८-२९ राखर	मांडवे पा दहिगाव
छ ६ जमादिलावल [*27-11-1728*]	मौजे चिंचोली ता चांभारगोंदे छ मजकुरी राजश्रीचा निरोप घेऊन निघाले.
छ २९ जावल [*20-12-1728*]	दयाबहादर लुटिला हे फतेची खबर घेऊन राजश्री आपाकडून जासूद आले त्यास रु. ४८.

छ २ जमादिलाखर	का। झरी दुधनातीर.
छ ५ जमादिलाखर	भाडगाव पा। नडसी
छ ७ जाखर	पिंपले पा। वासिम
छ ९ जाखर	पुसोद
छ ११ जाखर	तोडली पा। चिकणी प्रा। माहूर
छ १३ जाखर	नजीक कोलंबे
छ १४ जाखर	मु। कलंब
छ १५ जाखर	आंदोरी (?) अशेरी (?)
छ १६ जाखर	अलमडोंहो (?)
छ १८ जाखर	पा। गिरडमडगांव
छ १९ जाखर	टेकुरडी पा। आष्ट
छ २१ जाखर	टेंभरे
छ २२ जाखर	सोनगाऊ.
छ २३-२७ जाखर	बोरी प्रां देवगड

[रजबचे मुकाम वाडानीं दिलेले आहेत.]

छ १६ रजब [*4-2-1729*]

देणे दि। राजश्री चांद सुलतान राजे संस्थान देवगड

हती दंताळ १

घोडा नीळा १

घोडा बोर १

छ २२ साबान [*12-3-1729*]

मु। नजीक मोहबा छ मजकुरी राजा छत्रसाल याचा पुत्र याची भेट झाली

छ २३ साबान [*13-3-1729*]

मु। धामोरा राजा छत्रसाल याची भेट

जमा छ मजकूर ४९८९॥= बा। येवज मेजवानी छत्रसाल राजे याजकडील मा। आसाराम राजे छत्रसाल यास

हती १

घोडा १

छ २९ साबान *[19-3-1729]*	महोबाहून कूच
छ २ रमजान	मुा नजीक महोबा
छ ३ रमजान	सिंगरावन ना महोबा
छ ५-७ रमजान	ना महोबा खर्च रु १०२५ महायात्रेस लोक गेले त्यास
छ ८ रमजान	ना लष्कर मोगल
छ ९ रमजान	मौ आरी नजीक लष्कर बंगस
छ १० रमजान	ना लष्कर बंगस
छ ११-२९ रमजान	जैतपूर
छ १-६ सवाल	जैतपूर
छ ७ सवाल	ना सुपे
छ १० लवाल	सुपे. छ मजकुरी काईमखान याचे लष्कर लुटिले. हती घेतले खाशाल मोर्चे लाविले. कायमखान शंभर स्वारानिशी पळून गेला.
छ ११ सवाल	रोज गुदस्ता काईमखान बुडऊन छ मजकुरी जैतपुराजवली आंबराईत मुकाम.
छ २२-२९ सवाल	जैतपूर
छ १६ सवाल	रा जगतराऊ याचे डेऱ्यास राजश्री पंतप्रधान गेले तेहां सत्का दिल्हा रु ४००
छ ४ जिल्कादपर्यंत	मुा जैतपूर
छ ५ जिल्काद	दक्षिणेस यावयास प्रस्थान

¶*This itinerary of Bajirao's expedition in Bundelkhand to support Chatrasal, the old Bundela Chief, in his struggle against the imperial forces will be found useful in locating places and personages and fixing dates of important incidents.*

No. 316] *7-6-1728*

९ जिल्काद तिसा अशरीन

प्रा खानदेश येथील बाबतीचा मामला त्रिसाजी कृष्ण पेठे यासी होता त्यास ते मृत्य पावले सबब त्र्यंबकराऊ विश्वनाथ यास मामला करार करून पाठविले.

छ ९ मोहरम तिसा अशरीन

राजश्री कृष्णाजी कदम याणी दाहा हजार फौज वागवावी त्यास सरंजाम मुकासे

१ प्रांत गुजरात निमे

४ किता परगणे

१ पा डबई

१ पा भडोच

१ पा जंबुसर

१ पा सिनर

४

१ प्रा बागडे निमे

१ मेकड निमे

१ सोरट निमे

८ सनदा ८.

23-7-1729

छ ७ मोहरम सलासीन

राणोजी सिंदे यासी पिलाजी जाधव याजकडील सरंजाम दिल्हा त्यास वस्त्रे

८ तिवट १

४९ सेला अष्टगोली

१८ झगा छीटी

७१

24-7-1729

छ ८ मोहरम सलासीन

राजश्री राणोजी शिंदे याजकडे जमावाचे बेगमीस साल गुदस्ता पिलाजी जाधव याजकडे सरंजाम होता त्याप्रमाणे हाली सालमजकुरी मारनिलेकडे देविला असे. सनद सादर मारनिलेच्या नावे मोघम

१

24-7-1729

८ मोहरम सलासीन

किता सनद राणोजी सिंदे यास पालकीची सनद पालकी वागवावी म्हणोन सनद सादर १

८ मोहरम सलासीन

सरंजाम राणोजी सिंदे यासी रा पिलाजी जाधव यासी होता तो त्याकडून दूर करून माारनिलेचे जमेतीचे बेगमीस माहाल मोकासे व गाव दिल्हे बी तपसिल.

१२ मोहरम सलासीन 28-7-1729

श्रावण शुाा पूर्णिमा इंदुवासर

जमा पोता

रुपये

१०० बाा येवज मेजवानी राजश्री खंडेराव दाभाडे सेनापति याजकडील रुपये.

2-8-1729

छ १७ मोहरम सलासीन

राजश्री स्वामीचे भेटीसमई हती नजर केले सालगुदस्ताचे स्वारीपैकी

खासा राजश्री पंतप्रधान छत्रसालाचे मुलकात जाऊन बंगस लुटिला त्याचे पाडाव हती आणिले होते ते रास १३

पैकी

१ हतीण जलाली होती ते वाटेंस राहिली

१ हिरदेशा छत्रसालाचा पुत्र त्यास येतेसमई दिली

१ खंडोजी भोसले सिलेदार बाा स्वारी यासी दिली हतीण

———

३

राजश्री चिमणाजी बलाल स्वारीस मालवियात गेले दया बाहदूर बुडविला त्याचे हती पाडाव जाले रास १८

पैकी

१ हंसराज हती याणे हतीण झालोदचे मुकामी मारिली

१ चितोडच्या राणाजीस हती रास दिल्हा

१ बापजी सितोळे याकडे हती रास दिल्हा होता तो खानदेशात येते समई पाये दुखावला म्हणून खानदेशातच ठेविला रास.

बाकी नजर हाली स्वारी

४ हाली नजरचे समई नजर केले

१ गाडेराऊ हती रास

१ हतीण रास

१ हतीणीचे पिल्ल

१ छावा दंताल

४

६ मागाहून येणे आहेत

१ तुकोजी पवार बा

५ सरलष्कराकडे

६

१०

१ गोरखोजी भापकर यास हती दिल्हा होता तो परगणेयात गेला होता तो पाये दुखावला म्हणून तेथेच ठेविला.

४

१ मल्हारजी होळकर यासी दिल्हा

५

बाकी १३

७ हाली नजरेचे समई

१ गाडेराऊ रास

१ हतीण

१ छावा

१ किता हतीण

१ हती थोरला

१ हतीण

१ —

१ —

१ —

१ —

३ मागाहून येणे आहेत

१३

छ २३ मोहरम सलासीन *8-8-1729*

बदल देणे बेगमी पथके दिमत राजश्री बालाजी बाजीराऊ समजावीस साल-गुदस्ता सन तिसाची रुपये

६०००० फुट सिलेदार व पथके

३०००० घाटगे खंडालकर

९००००

4764

छ ३ रबिलोवल सलासीन 16-9-1729

हती बकसीस ह्या स्वारी राजश्री पंत

१ उदाजी पवार यासी गाडेराऊ

१ मल्हारजी होळकर हंसराज

२

रा। आनंदराऊ पवार यासी हती खा। करून घ्यावयासी चिरंजीव रा। अपाकडून देविले असेत स्वारीमधे

रु ५०००

छ ३ रबिलोवल सलासीन 16-9-1729

सरंजाम राजश्री उदाजी पवार व आनंदराव पवार यासी मोकासे माहाल सालगुदस्ता आहेत त्याप्रमाणे सालमारी करार जमीदाराच्या नावे सनद बि।।

प्रांत माळवा	प्रांत गुजराथ
१ पा। बदनावर	१ पा। भडोच
१ पा। आबझरे	१ पा। झालोत
१ पा। नवलाई	१ पा। छत्र अमोद
१ पा। सुलतानपूर	१ पा। बडनगर
१ पा। बासवाडा	१ पा। बडोदे
१ पा। डोंगरपूर	१ पा। गोदरे
१ पा। धार	१ पा। ढाढरे
१ पा। असुवाडी	१ पा। धुंधके
१ पा। कुसळगड	१ पा। पीरापटण
१ पा। जेपाळपूर	१ पा। बिसनगर
१ पा। अली	१ पा। कलोल
१ पा। मंदसोर	१ पा। व्हालोल
१ पा। उग	१ पा। राजपिंपळे
१ पा। सीतामोहो	१ पा। उंबरठ
१ पा। रतलाम	१ पा। मोमदाबाद

१ पा। महिदपूर
१ पा। शाहजापूर
१ पा। रामपुरा
१ पा। सिरोंज
१ पा। दुराहा
१ पा। सिपारे
१ पा। आलोट
१ पा। खेलचीपूर
१ पाणीयापंचारे
१ पा। कोठडे
१ पा। चोळीसर

सरकार मांडवगड

१ पा। महेश्वर
१ पा। धर्मपुरी
१ पा। बाकानेर
१ पा। ळवाणी
१ पा। दीगठाण
१ पा। झाबवा
१ पा। राजगड
१ पा। उजेनहवेली
१ पा। हवेली
१ पा। देवास
१ पा। इंदूर
१ पा। सुत
१ पा। उचोद
१ पा। कायेथा
१ पा। सुज्यालपूर
१ पा। साकरा
१ पा। देवगड
१ पा। खाचरोद
१ पा। वागबोर
१ पा। पिपळोद
१ पा। करई

4766

१ पा। वाघोडिया
१ पा। कपटबंद
१ पा। पंचमोली
१ पा। मांडवी
१ पा। उबई
१ पा। कोळवडी
१ पा। पेटलाद
१ पा। सायेखेड
१ पा। बाहादुरपूर
१ पा। दाहोद
१ पा। मोहन
१ पा। काठेवाड
१ पा। कछ
१ पा। मारवाड

२६

किता सनदा

१ प्रांत कछ
१ प्रा। मारवाड
१ प्रा। बुंधेलखंड
१ पा। बुंदीकोटा
१ पा। सोरट
१ पा। बागठा

६

सरकार हांडे

१ पाा हिंदोळबारे
१ पाा जांबुलबारे
१ पाा बागोद
१ पाा धरगाव
१ पाा हिमतगड
१ पाा रिंगणोद
१ पाा दाहोद

पाा काठेवाडा मोकास

छ ११ रबिलोवल सलासीन *24-9-1729*

राजश्री पिलाजी जाधवराऊ याचे मुकासे पेशजी सालमजकुरी राणोजी शिंदे याजकडे दिल्हे होते ते हली त्याजकडून दूर करून मारनिलेकडे करार करून ताकीदपत्रे

परगणे

१ फुलमरी	१ हवेली अवरंगाबाद	१ पाा कडसांगवी
१ कनड	१ पाा टाकली	
१ पिपरी	१ पाा उडणगाव	
१ सुतोंडा	१ पाा सिवणे	

¶*Entries in this number deal mostly with the rise of several of the Peshwa's lieutenants into prominence.*

No. 317]

[चिमाजी आप्पाची गुजराथेंतील स्वारीचे कांहीं मुक्काम १७२९-१७३०]

छ १ जमादिलाखर पौष शुा १ गुरुवार (*11-12-1729*)	खारा नाला तापी उत्तरतीर
छ २-४ जााखर	,, ,,
छ ५ जााखर	खारा नाला येक मजल
छ ६-९ जााखर	हातोडा पाा बसराई
छ १० जााखर	सारंगपूर पाा आंकलेसर
छ ११ जााखर	कडकावड नर्मदा दक्षणतीर
छ १२ जााखर	बावापीर नर्मदा उत्तरतीर
छ १४-१७ जााखर	झाडेस्वर पाा भडोच

छ १८-१९ जाखर	मियागाव
छ २० जाखर (मंगळवार संक्रांत)	काा बडोदरे
छ २१ जाखर	हलोल नाा पायागड
छ २२-२४ जाखर	चांपानेर
छ २५ जाखर	पायागड
छ २६-२८ जाखर	चांपानेर

छ साबान [रज्जबचे बंद मिळत नाहींत]

छ १-८ साबान	खाडी
छ ९ साबान	मही उत्तरतीर
छ १२-२६ साबान	पेटलाद
छ २७-२९ साबान	नडियाद
छ ३० साबान	चिकरीगांव पाा नडियाद

[रमजान महिन्याचे बंद मिळत नाहीं.]

सवाल

छ १ सवाल	वलाराणा प्राा ढवलके
छ २-९ सवाल	बिरमगाऊ
छ ११-१३ सवाल	गोदाई प्राा ढवलके
छ १४	बिचवा
छ १५	खाडीवर
छ १६	धिंगडी
छ १७	वारणे
छ १८-२३	गल्याण प्राा खंबाईत
छ २४-२५	साबरमती
छ २६	तारापूर
छ २७-३०	पेटलाद

स्वारी राजश्री चिमणाजी बल्लाळ

छ ९ जाखर सलासीन *19-12-1729*

बदल देणे घोडा लोणंदकर जावजी खंडोजी गोरखोजी सेलके याचे बारामतीचे स्वारीस घोडे पडिले होते ते हली द्यावे यैसे करून राजश्री राऊ याणी चिठी लिहिली त्यावरून अंताजी रुद्र याचे पागेतून घोडा आणून छ मजकुरी दिल्हा कुमाईत रास १.

4768

28-12-1729

छ १८ जमादिछाखर

मांडवगड घेतला म्हणून मल्हारजी होळकर व उदाजी पवार याची पत्रें आली त्यास वस्त्रें

३॥ कासीद दिा मल्हारजी होळकर — तिवट १
७॥ कासीद दिा उदाजी पवार — तिवटे २
२४। कारकून दिा होळकर
गोविंद चिंतामणी — पासोडी तिवट
गंगाधर येशवंत — तिवट

४०॥=

3-1-1730

छ २४ जाखर

बदल देणे बकसिसे किले पायागड

हरि बागल

घोडा हा नारायणजी निकम कडे सोन्याचे

माधवराव माणकेश्वर कडे सोन्याचे.

6-1-1730

छ २७ जाखर

किले पायागडी राजश्री आपा माचीस जाऊन बहुमान केला लोक किले मार यास

घोडा निला बयाजी साखरे

तुरा मोत्याचा हा गणपतराऊ देणे विठोजी साखरे

कलगी देणे बयाजी साखरे कडे सोन्याचे देणे कमलोजी साखरे

शाहु दप्तर रु. नं. ४ — सलासीन

छ २ शाबान फाल्गुण शुा त्रिा॥ २५पातर — (9-2-1730)

पावागडपूर्वी कंठाजी कदमराऊ याजकडे होता तो रा चिमणाजी बल्लाळ याजकड हस्तगत जाहला त्यास किल्ल्या द्रव्य दोनी कोटी

आहे म्हणोन वर्तमान हुजूर कळलें यास्तव द्रव्याची व किलेमजकूरची चौकशी करणे. या कामास मल्हारजी भिडका जामदार पाठविला असे यास रु. ३००

¶*Fort Pāwagad is transferred to the charge of Chimaji Appa from Kānthaji Kadamrao.*

छ २९ साबान

सरदार याचे जाब की तुम्ही विनंतीपत्र पाठविले प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाला. गोरखाजी भापकर याजकडील आवजी कवडे सरकार मेहकर व वासीम वगैरे महाल येथे धामधूम करीतो. रास्ती सरदेशमुखी देत नाही त्यास ताकीद करवणे म्हणून लिहिले त्यावरून त्यास आज्ञापत्र सादर केले असे तर याउपरी तुमच्या महालांत धामधूम करणार नाही म्हणून पत्रे.

१ संताजी आटोळे

१ सुभानजी माहार्णव

¶*Avji Kavde has been ordered to desist from collecting Sardeshmukhi dues in Mehkar and Wasim.*

14-2-1730

छ ७ साबान

राजश्री सेखोजी आंग्रे सरखेल यासी पत्र जे किले सुधागडच्या तनखियास घसघस लाविली आहे यामुळें मुलुखाची खराबी जाली. सुधागड म्हणजे नाजूक स्थळ. शामलाचा शह लागला आहे. तेथील उस्तवारी करावी हे तुम्हास उचित आहे. [पुढील ६ ओळी मजकूर निरुपयोगी अतएव गाळला आहे.]

छ २१ जिल्हेज सलासीन *7-7-1729*

देवगडकर यानी स्वामीसी निष्ठा धरिली आहे, बोलीचालीस आपणाकडील सभ्य मनुष्य पाठऊन तहरह करून ध्यावा येसा

विचार त्याणी केला आहे. याकरितां त्यांच्या देशास उपसर्ग न देणे सभ्य मनुष्य येऊन तहरह होणे तो हुजुरून होईल तुम्ही त्याचे वाटेस न जाणे म्हणून पत्रे

१ रा कान्होजी भोसले

१ रा राणोजी भोसले

—

२

6-7-1729

आषाढ बहुल सप्तमी रविवार.

रा सवाई कटसिंग कदमराऊ याणी पा सोनगीर येथे डोहणा केला.की रा सेनापतीने पा आपणाकडे दिल्हा आहे म्हणून त्यास सेनापतीस हातचिठी सादर केली व कटसिंग यास पत्र देऊन सुभानजी जगथाप व सटवोजी खोरे हुजरे पाठविले यास देविल रुपये १५०

15-12-1730

शाहु दप्तर रुं. न. ४ इहि

छ १५ जमादिलाखर मार्गशीर्ष बहुल द्वितीया

भोमवासर इहिदे सलासीन

राजश्री बाजीराव पंडितप्रधान यासी पत्र जे प्रांत गुजरातपैकी निमे राजश्री चिमणाजी बल्लाल यासी मुकासा दिला होता तो दूर करून हाली रा त्रिंबकराऊ दाभाडे सेनापती याजकडे मुकासा दिला असे. पेशजी निमे येशवंतराव दाभाडे यासी मुकासा आहे त्याप्रा उभयेता वसूल घेतील. तुम्ही प्रात मजकुरी आपली दखलगिरी न करणे म्हणून पत्र चिटणीसी १

¶*Chimnaji Ballal is deprived of the Mokasa of Gujarat, which is hereby transferred to Trimbakrao Dabhade.*

———

प्रांत गुजराथपैकी निमे येशवंतराव दाभाडे सेनाखासखेल याकडे मुकासा आहे तो करार करून बाकी निमे पेशजीचा मुकासेयाकडून दूर करून हाली राजश्री त्रिंबकराव दाभाडे सेनापति याकडे निमे मुकासा व जकाती निमेपैकी निमे मुकासा दिला १

4771

3-10-1730

इहिदे सलासीन
छ १ रबिलाखर

राजश्री श्रीधर गोविंद सुभेदार प्रांत गुजराथ प्रांत मजकुराचा सुभा सांगितला त्यास

त्यास मल्हारजी होळकर याजकडे प्रांत माळवा माळवा येथील दिवाणाच्या ऐवजाखेरीज राजश्री चिमणाजी बल्लाळ याचा ऐवज येणे बाकी तहनामा त्यापैकी देविले रु. १००० खासा.

मारनिलेस सनद दिल्ही की प्रांत गुजराथ येथील बाबती सरदेशमुखीचा सुभा सांगितला त्यास इमाने इतबारे कमावीस करणें. पालखी अफ्तागीर वागवीत जाणे. वेतनाबाा माहालमजकूरपैकी देखील करार रु. ५०००

3-10-1730

राा आपाजी माणकेश्वर यास फौजेसमेत कल्याणभिंवंडी फिरंगाणचे मोहिमेस पाा यास कृष्णराऊ महादेव याजकडून देविले रु. २५०

3-10-1730

मसुदा सरंजाम राजश्री मल्हारजी होळकर सुभा प्रांत माळवा

(ह्यापुढें माळव्यांतील ७४ परगण्याचीं नांवें आहेत).

येणेप्रमाणे मारनिलेकडे सनदा लेहून दिल्ह्या. कुल येख्तिवार मारनिलेकडे सांगितला असे. अमल सुरलित देणे म्हणून पत्रे.

7-10-1730

छ ५ रबिलाखर

राा मल्हारजी होळकर यासी पत्र की तुमचे स्वाधीन माळवा केला प्रांत आहे. त्यास हुजूरचा ऐवज बाबती सरदेशमुखी व तहाप्रमाणे मोकासबाबेची तकसीम हुजूर ऐवज येणे व तहरह मुलकाचा करणे याकरता तुम्हाबराबर मातबर हुजूरचे असले पाहिजे. याजकारिता राजश्री कृष्णाजी हारि यास हुजूरून तुम्हाबराबर

दिल्हे आहेत तर तुम्ही माळवे प्रांतीची खंडणी तहरह याचे विद्यमाने करीत जाणे. यासी पात्रावयाची मोईन रुपये ५००० पाचहजार केले असेत. तरी यासी तुमचे माहाल मजकुरचे येवजी रु. ५००० देणे.

25-10-1730

इहिदे सलासीन

छ २३ राखर

रा कुसाजी गणेश यासी उजेनीस वकिलीच्या प्रयोजनास पाठविले आहेत यास वेतनात सालीना रु १५०० दीड हजार केले असेत. सदरहू रुपये प्रा माळवा येथील माहाल मजकूरच्या येवजपैकी मल्हारजी होळकर याजकडून देविले असेत.

25-11-1730

छ २५ जावल

भावसिंगराऊ ठोके यासी पटी करून दिली रुपये

४०००	प्रा नासिक
१५००	पा वणी
१५००	पा दिंडोरी
३०००	पा चांदवड
१०००	पा गालणा
१०००	पा निंबाईत
५००	चिखलवाहाल
६००	पा झोडगे
४००	तोकडे
४०००	पा भामेर
१२५००	प्रा बागलाण देखील तर्फ व कसबे
३००००	
२५००	

पा ललिंग धुळे.

पेसजी राजश्री सेनापतिकडून मुकासे होते ते हाली करार करून ताकीदपत्रे

१ पा वरवारी प्रा खानदेश

१ पा लोहनेर प्रा खानदेश

१ पा। तिळवण प्रा। बागलाण
१ पा। दहिवले
१ पा। पिंपळे
१ हातगड
१ कनासी पा। बागलण
१ नंदुरबार तिसरा हिसा

८

¶*The entries for the year 1730 refer mostly to Chimaji Appa's activities in Gujarat. In the year following his victory over Dayabahadar he was deputed to Gujarat to consolidate the gains of previous expeditions and effect a permanent understanding with Sarbulandkhan. Starting in the cold weather of 1729 Chimaji, as will be seen from the itinerary, crossed the Tapti at Baba Peer Ford, plundered Dholka and Petlad and wrested the strategical post of Pawagad from Kanthaji Kadam. Another important item among these entries is Shahu's order depriving Chimaji of the Mokasa of Gujarat and transferring it to Trimbakrao Dabhade. This order dated 15th December 1730 issued on the eve of the battle of Dabhoi places the conflict between Dabhade and the Peshwa in a new light. The Senapati appears to be the aggrieved party defending himself against the aggressions of the Peshwa.*

No. 318]

इहिदे सलासीन *29-1-1731*

छ १ साबान

उदाजी पवार व आनंदराव पवार याजकडे पेसजी मुकासे होते ते त्याजकडून दूर करून हाली खासगीकडे ठेऊन कमावीस सालमजकुरी.

२ धोंडो महादेव याजकडे मुकासा
१ पा। जैनाबाद
१ पा। जळगाव

२

१ पा। नेवासे कमावीस
नि॥ जिवाजी गोविंद
१ पा। चिखलवाहाल
नि॥ केसो विश्वनाथ

४

4774

8-4-1731

छ ११ सवाल

राजश्री चिमणाजी दामोदर यासी घोडा बा। नजर राणाजी याजकडील रास १.

इसने सलासीन

छ ६ रबिलाखर आश्विन शु॥ ८ *27-9-1731*

येवज ता। अंताजी माणकेश्वर दि॥ म्हालोजी मुठे याजवळी बा। येवज बाबती सरकार हांडे गिरमाजी वेंकटेश व जगनाथ माणकेश्वर कमावीसदार पा। याजबा। रसदीचे रु २४००

छ २९ रबिलाखर *16-10-1731*

पागा दि॥ राजश्री राणोजी सिंदे यास पत्र कीं रा। रामचंद्र मल्हार हे कामाचे मर्दाने, पूर्वी चाकरी केली व हाली चाकरीची उमेद बहुतसी धरितात याजकरितां कृपाळु होऊन मा।रनिलेस पालखी दिली आहे तरी तुम्ही यांस पालखी खरिदी करून देखील सामान देणे. पालखीस भोई व कितेक खर्च पडेल तो तुम्ही आपले स्वारीपैकी रु॥ १००० येक हजार देणे. खर्च घालून मा।रनिलेकडे पालखीचा खर्च सदरहू रुपये पावीत जाणे. प्रतिवर्षी सदरहूप्रा। पावीत जाणे म्हणून पत्र दिल्हे आसे १

येविसी रा। आपाचे स्वहस्ताक्षराचे पत्र

पालखीची वस्त्रे पाठविली आहेत हे देणे म्हणून १

२

रामचंद्र मलार दि॥ राजश्री राणोजी सिंदे यासी पालकीची वस्त्रे सनगे

१२। तिवट १

२६ सेला अष्टगोली १

१९ गजनी थान साधे १

७॥ गजनी ॥.

६०॥।

छ २९ रबिलाखर

20-10-1731

राजश्री मल्हारजी होळकर व राणोजी सिंदे यास पत्र की राजश्री बाबूजी नाईक जोसी पोतदार याणी आपले तर्फेने पोतदाराच्या प्रयोजनानिमित्य भिकाजी नाईक व बालमुकुंदजी पाठविले आहेत. याजपासून पोतदारीचे प्रयोजन घेणें. कुल-जकात होईल त्यास दरसदे पोतदारी रुा २ दोन पावणे म्हणोन पत्र १

छ २९ राखर

20-10-1731

काा सनद बनाम मल्हारजी होळकर व राणोजी सिंदे प्रांत माळवा प्रांतातील बाबती व सरदेशमुखीचा येवज दरसदे रुा ३५ पसतीस काढावे. त्या येवजी सालमजकुरी येक लाख पाच हजार आम्हास पावते करून उरला येवज तुम्ही उभयेतानी निमे निमे प्रांत वाटून घ्यावा. पेस्तर साली सन सलासात येक लाख दाहा हजार आम्हास पावते करून बाकी येवज निमे निमे घ्यावा. सन आर्बात येक लाख पंचवीस हजार आम्हास द्यावे उरला येवज निमेनिम घेणे. पुढेहि सदरहू तहप्राा चालऊ. वरकड तहनामा करून दिल्हा आहे त्याप्रमाणे वर्तणूक करणे म्हणून हस्ताक्षर पत्र दिल्हे असे.

मल्हारजी होळकर यास सनदा

१ येल्यारीची सनद
१ सालगुदस्ता बाकी माहालोमाहाल आहे त्याचा जाबता पुण्याचे मुकामी आहे बाकी माहालाची तहकीक करून मलारबाकडे देणे म्हणून राणोजी सिंदे यास पत्र
१ किता सनद माहाल
  १ चंदेरी
  १ नरवर
  १ वोडसा
  १ दतिया
  १ बुंदेलखंड तहद कालपी

५

पाच महाल माळव्याखेरीज आहेत
येथील चौथाई दिवाणची काढून उरला
येवज फौजेवर घ्यावा म्हणून सनद
१ उभयताच्या नावे निमे वाटा प्रा-
पूर्वी तहनामा आहे त्याप्रा वर्तावे
१ सबसनद प्रांत माळवा महालानि-
हाय सरद नवाई (?)

१ पा दाहोद
१ पा झालोद
१ पा सुथ
१ पा आली
१ पा डोंगरपूर
१ ———————
१ धामोणी
१ बुंदी कोटा

———

८

तेजकरण मंडलोई
ा इंदूर

तहनामा आपला त्याजवली त्याच
विल्हे

२९ बाबती
१० सरदेशमुखी
३२॥ रा पंत
१०।।।= मल्हारजी होळकर

———

७८।=

यापैकी दिवाणचे लक्ष रुा व सरदारी
पाच हजार कहाडून उरला येवज
निमे राणोजी व निमे होळकर याणी
घ्यावे. पवाराचे साडे येकत्रीस चवल
राहिले त्याचे येवजी कृष्णाजी कदम
वगैरे फौज साहजार आहे त्याणी
घ्यावे म्हणून

इसने सलासीन

छ १ जावल 22-10-1731

राजश्री मल्हारजी होळकर व राणोजी शिंदे यास पत्र की तुमची आमची बोली पाटसचे मुकामी राजश्री तुकोजी पवार याचेविसी जाली होती त्याप्रा जमावानिसी मारनिलेस तुम्हाकडे पाठविले आहेत. त्यास माळव्याचा तह जाला आहे त्यापैकी पवारांचा वाटा येकवीस रुपये पाच चवल आहे त्यापैकी मारनिलेस दरसदे रुपये ७ सात देविले आहेत तरी पवाराच्या येवजी सदरहू रुपये पावणे. परमुलकी आकार होईल व स्वारी सिकारीमुळे जमा होईल त्यास चौथाई सरकारचा येवज काढून बाकी दामाशाई प्रा देत जाणे म्हणोन पत्र १

बा देणे बकसीस तुकोजी पवार बा भेटी राजश्री आपा राणोजी सिंदे याणी सोन्याचे कडे पाटसचे स्वारीस गेले होते ते समई दिल्हे होते ते दिल्हे सुमार १

राजश्री तुकोजी पवार व जिवाजी पवार यास जमावानिसी राजश्री मल्हारजी होळकर याससमागमे मुलुकगिरीस पाठविले त्यास सरंजाम करार करून दिल्हा

[गांवांचीं नांवें गाळलीं आहेत.]

राजश्री राणोजी शिंदे व मल्हारजी होळकर यास पत्र की मारनिलेस कर्जवाम जाले आहे. तुमची यांची स्वारी परमुलुकांत होईल त्यायेवर्ज मारनिलेस तुम्ही आवघे मिळोन रुपये १०००० दाहा हजार पावून मारनिलेचे कर्ज परिहार होये तो अर्थ करणे म्हणोन पत्र १

इसने सलासीन

छ १३ जावल

सरकारचे सिके राणोजी सिंदे याजकडे [illegible] तुमचे विचारे जाले तरी राजश्री मल्हारजी होळकर याजवळी देणे अगर तुम्ही आपणाजवळी ठेऊन सिके करीत जाणे. जेणेकडून तुमचे विचारे कारभार सुरळित चाले ते ते करणे म्हणून पत्र १.

¶*Seals are handed over to Ranoji Sindia.*

छ १० रजब 28-12-1731

बाादेणे घाटबंदिस्त श्रीवाराणसी पेसजीचे देणे होते ते रुपये राजश्री बाबूजी नाईक जोशी यासी प्रां मालवा येथील दिवाणचा यैवजपैकी मल्हारजी होळकर राणोजी शिंदे याजकडून देविले रु. ७०००

¶*Babuji Naik is paid Rs. 7,000 for some repairs at Ben...*

छ १० रजब

मल्हारजी होळकर यासी पत्र की पाा मालवा येथील पडिले पान आकार होईल त्यापैकी तुकोजी पवार जिवाजी पवार यासी दरसदे रु ७ सातप्रमाणे देणे म्हणून पत्र १.

¶*Malharji Holkar is asked to pay 7 per cent. of the Mokasa from Malwa to Tukoji and Jiwaji Pawar.*

छ २१ रजब

राा त्रिंबकराऊ ढमढेरे दिाा राा चिमणाजी बल्लाळ याचा घोडा बारामतीचे जुंजी व श्रीरंगपटणचे स्वारीस घोडी पडली होती त्याची किमत रु १२०० बारासे तुम्हाकडे सरंजामाचे रुपये दाहा हजार करार केले आहेत त्यापैकी देविले रु १२००

¶*Trimbakrao Dhamdhere is paid the price (ten thousand) of the horses which he had lost at Baramati in 1722 and again at Seringapattam.*

No. 319]

सलास सलासीन

छ २ जाखर मार्गशीर्ष शुाा ४ भुगुवासर भिऊगाव पाा वैजापूर

11-11-1732

छ ३	भासली पाा खंडाले
छ ४	नजीक नसरापूर
छ ५	आमोद पाा देहेर गिरना नदी
छ ६	नजीक मेहुणबारे
छ ७	मेहुणबारे

छ ८		पले पा। ब्राबल ?
छ ९-१०		कसबे उत्राण
छ १२		सोनद पा। जलोद
छ १३		साखरे पा। जलोद
छ १४		तापी तीर
छ १५		आंबडे पा। चोपडे
छ १६		ना। साखली पा। यावल
छ १७		फौदपूर पा। सावदे
छ २०		वघत्रणे पा। आसेर
छ २१		आसद पा। खांडवे प्रां नेमाड
छ २२		टाकळी
छ २३		भामगड
छ २५		तोरणे पा। आटोद
छ २८		पचगव्हाण पा। सित्रणी नदी गजाल
रजब		
छ १		हारणखेडे पा। सित्रणी
छ २		नजीक बागडे
छ ३		सुहागपूर
छ ६		हिजोरा पा। गढे
छ ८		फतेपूर प्रा। गढे
छ ९		पनागर पा। बोर
छ १०		रेवातीर
छ ११		रेवा उत्तरतीर
छ १२		टेंभरण रेवा उत्तरतीर
छ १३		सागोना
छ १४		सहजपूर, गौडझांबरे
छ १६		राणीवद
छ १७ पौष वा। ४	*24-12-1732*	हिरदेनगर
छ १८-२८		”
छ २९		नरसिंगगड

साबान

छ १	सीतानगर
छ २-७	हाटे
छ ९	मडयाद
छ १०	हाटीपारा
छ ११	कुडाजणी, ताा पंचमनगर
छ १२	देपूर पाा सोन्हई
छ १३	शाहगड प्राा बुंदेलखंड
छ १४	घोरा पाा खटोला
छ १५	हरगो ? प्राा वोडसे
छ १६-१८	खर्गापूर प्राा वोडसे
छ १९	बेटारामपूर पाा मोहवा
छ २०	नदीधसाळ प्राां बुंदेल
छ २१-२९	रामपूर प्राा बुंदेलखंड

रमजान (फल्गुन)

छ १ 5-2-1733	कचनव ? प्राा वोडसे
छ २-४	नाा टहरोली प्राा वोडसे
छ ५	टहरोली
छ ६	रामनगर नदी वेत्रवती
छ १०-१६	हाडेगाऊ नदी वेत्रवती
छ १७-२१	कुभरा पाा वोडसे
छ २२	जिरोडे
छ २४-२५	उच्याट सिंधु नद
छ २६	पछोरा
छ २८-२९	गुजरोरा प्राां ग्वाल्हेर

सलास सलासीन

सवाल चैत्र

छ १ सौम्यवासर 7-3-1733	सुकलोरा प्राा ग्वालेर
छ २-३	गुजरोला
छ ४-५	सुकलारा

छ ६	रसनाले
छ ७-८	झिकारा पाा भदोरा
छ ९-१०	खितोली
छ ११-१८	गोहद पाा खितोली
छ १९	आलेर
छ २०	नजीक ग्वालेर
छ २३-२४-२५	बारईपनियार पाा ग्वाले
छ २६-२७	नजीक धोत्रा
छ २८-२९	मोहना
जिल्काद वैशाख	
छ १-३	मोहना
छ ४ *8-4-1733*	डोंगरपूर प्राा नरवर
छ ५-७	नाा नरवर
छ ८	चोरपुरा पाा नरवर
छ ९	बारा पाा नरवर
छ १०	डोंगरची सराई पाा नरव
छ १२-१४	येंगरा पाा नरवर
छ १५	नाा राजगड
छ १६-१७	राजगड
छ १८	राई प्राा नरवर
छ १९	बुढा डोंगर पाा नरवर
छ २०	नवी सराई प्राा माळवा
छ २२	मोगलाची सराई प्राा माळवा
छ २३	नजीक सुरोंज
छ २५	मुरया? प्राा सिरोंज
छ २६	बैरागर
छ २७	बारखेडा
छ २८	पारासूर व बदनावर
छ २९	बिलोखा (?) पाा तुलई (?)
छ ३०	कंचनारा

4782

सलास सलासीन

चिमणाजी बल्लाळ

१ जिल्हेज जेष्ट शुा ३ — हळुखेडी

6-5-1733

छ २	आष्टे
छ ३	मंगर्बा ?
छ ४	घाट माळव्याचा
छ ५	नवी सराई काठवणात
छ ६	रेवा दक्षणतीर घाट फाजीलपूर
छ ७	शिरणा पाा कोठडा प्रांा नेमाड
छ ८	सिकरपूर मकडाई
छ ९	रामपुरा मकडाई
छ १	भामगड
छ ११	आमदानगर नाा किले आशर
छ १२	बाग नाा बुराणपूर

¶*The itinerary of Chimaji Appa for the year 1732-1733 would be found helpful in determining the various incidents of his expedition in Bundelkhand of which so little was known up to now. Selections 14 and 15 contain about half a dozen letters which when read along with these entries explain a new phase of Chimaji Appa's activities.*

No. 320]

खमस सलासीन

छ २३ मोहरम — *14-6-1734*

अंताजी माणकेश्वर सिलेदार यास नारो दादाजी याजकडून रसानगी चिठी

गला येक माहीं केली — कडबा सुमार

बारुळे मापे	खंडी	२५०
८१।।।१।।	बाजरी	
८१।।।१।।	हरभरे	

꠸३।।।

Referring to Pilaji Jadhav's expedition into the north during 1734-1735, the entries given below should prove useful in studying the details of the campaign.

[बाळाजी बाजीराव या स्वारींत पिलाजी बरोबर असून शिवाय खालील सरदारहि त्या स्वारींत हजर असल्याचें जमाखर्चावरून दिसतें.]

१ अंताजी माणकेश्वर
२ व्यंकटराव नारायण
३ येद्याजी संतकर
४ भिकाजी शिंदे
५ संताजी मोरे
६ जानराऊ आईतोळे
७ खंडोजी माने इत्यादि

रजब खमस सलासीन मुकाम

छ १	*17-11-1734*	लोहोगाव
छ २		कोरेगाव
छ ३		कोंडपुरी
छ ४		सिरूर घोडनदी
छ ५		वडनेर पा। पारनेर
छ ६		निंबगाव घाण्याचे
छ ७		राहुरी
छ ८		गोदवणी पा। संगमने
छ ९		साहेल पा। वैजापूर
छ १०		पारले पा। खंडाले
छ ११		पिंपरखेड पा। देहर
छ १२		चिंतेगाव पा। चालीस
छ १३		वाघलीबोर प्रां। खान
छ १४		सिदबोल पा। सुतोडा
छ १५		बिलदी ? पा। लोहोर
छ १६		आहडी पा। सेंदुरणी
छ १७		पिंपरी पा। जामनेर
छ १८		शेळ्द पा। बोदवड
छ १९		हांताले
छ २०		नेरल पा। मलकापूर
		खमस स
छ २१ रजब		वडोदे पा। येजलाबांद
छ २२		मानेगाव पा। जलगाव पूर्णा
छ २३		कवढल पा। जलगाऊ

4784

छ २४ आडगाव प्रांत वराड
छ २७ नजीक आनेर तापी तीर
छ २८ मौजे भिलावे पाा पिंपळोद
छ २९ कोठे सालवा पाा मकडई
छ १ रजब

स्वारी राजश्री पंतप्रधान कोठी मुकाम पुणे पैकी जमा

वजन पके
·॥२ दारू कैल २४ (१२ मण)
·१२॥५ सिसे (७॥ मण ५ शेर)

·॥।४॥५ (१९॥ मण ५ शेर)

छ २७ रजब खमस सलासीन

स्वाा राजश्री अपा याणी तिगस्तां धोंडो महादेव याचे तसलमातीस दारू व सिसे ठेविले ते जमा गुाा गोपालपंत

वजन पके
·। १ दारू
८२ सिसेकर्दन गोळ्या

·।२

स्वारी राजश्री पिलाजी जाधवराव खमस सलासीन

साबान पौष
छ १ पेठजन पाा मकडाई सरकार हांडे
छ २ सांगवे नाा चौकी पाा मकडई
छ ३-४ खुदे १ नाा पाा मकडई
छ ५ पाा दुदकस
छ ६ टेंभुरणी
छ ७ बिसोनी
छ ८ खपरीची पाा हुसेनाबाद
छ १० पवारखेडा ?
छ ११ पामली ? रेवातीर सोहाणपूर
छ १२ भडेगाव पाा गढे रेवातीर

छ १३	केतुघन रेवाउत्तरतीर
छ १४	देवरी पा। उदतगड
छ १५	पिपलोणा पा। गडे
छ १६	सिमरिया पा। घेलवाडा ?
छ १७	प्रताप पा। सिलवाणी
छ १८	जैतपूर पा। सिलवणी ?
छ १९	साहपूर पा। सिलवणी ?
छ २१	रातगड निा। यारमहमद
छ २२	हरवास ? नजीक पठारी
छ २३	लसुका पा। उदेपूर प्रा। माळवा
छ २४	नजीक भोवरासे व कुरवाई
छ २५	न्हावीकुड पा। भोवरासे
व्यंकटराव नारायण छ २६	मथाणे पा। आहिरवाडा
छ २७	खेराई पा। आहीरवाडा
छ २८	धाकोणी पा। चेदेरी
छ २९	इदार पा। रणावद
छ ३०	कोठे पा। धंधेले

खमस सलासीन

स्वारी राजश्री पिलाजी जाधवराव

रमजान (माघ)	मुकाम
छ १	आमोला पा। वोडसे
छ २	दरी पा। करया प्रा। वोडसे
छ ३	करई पा। करेरा
छ ४ ५	सभवा पा। करारा प्रांत वोडसे
छ ७	किल्ले झासी पा। वोडसे
छ ८	बरोटा १ पा। दत्ये वेत्रवती तीर
छ ९-१०-११-१२	महेवा पा। वोडसे नदी वेत्रवती
छ १३	कुडारगड ता। डहरोली पा। वोडसे
छ १४	घुराहाट व पुरा ता। जतेरा पा। वोडसे
छ १५-१७	महुझालारी (?) पा। वोडसे
छ १८-१९	था र व बा राणा पा। जरारा पा। वोडसे
छ २१	खर्गापूर पा। वोडसे

छ २२	सोरकी पा खटोला नदी घसाल
छ २३	देऊरबा पा वोडसे
छ २४	घुरा ताजतारा प्रां वोडसे तल्यावरी मुकाम
छ २५	बिजोरा
छ २६	कुडारगड प्रां वोडसे
छ १ २७-३०	सागरतलाव ना लष्कर कमरदीखान

छ ३० मजकुरी कूच करून मोगलामागे उदेतसिंग तल्याआलीकडे येक कोस मुकाम

सवाल फाल्गुन

छ १	उदतसिंग तलाव देणे जखमी रु. १९५
छ २	कुमरोणी (?) भुपालसिंगाची पाा वोडसे
छ ३	भोजला ना झासी
छ ४	कमरेहारी पा वोडसे
छ ५	मंडोलसराई पा वोडसे
छ ६	सोनारी पा उचाड नदी सिंधु
छ ७	नहना प्रा उचाड
छ ८	सिली पा सुकलावरी खैरोणचा घाट
छ ९	कुंभारा पा सुकलारी
छ १०	आरोली पा सुकलारी
छ ११	भोरी सरकार ग्वालेर
छ १२	रहेट पा धोवा
छ १३	कनाख खुर्द पा जापोहटी
छ १४ सवाल	खटे पा पोहरी
छ १५	पोहरी पा नरवर
छ १६	का राजगड पा पोहरी
छ १७	गणेशपूर पा कुलारस
छ १८	हिजरावण पा कुलारस

---

१ लढाईस सुरवात झाली. जखमी सदराखालीं २७-३० या दिवशीं २३८, ३५८॥ इतक्या रकमा पडल्या आहेत.

छ १९-२०	नजीक कालाबाग नदी शेध
छ २१-२२-२३	लसुरा पाा कालाबाग
छ २४	अकरोद पाा कालाबाग
छ २५	चिरोली पाा शाहाडोस
छ २६	कंचनीची सराई
छ २७	नाा बांबोरी ? पाा सिरोज
छ २८	नाा भोवरासे वेत्रवती
छ २९.	नाा काा पठारी पाा भेलसे
जिल्काद चैत्र	
छ १	झील.
छ २	तोडा ताा रातगड
छ ३	पडरिया पाा रातगड
छ ४	वांकोरी पाा गौरझांबरे
छ ५	मेंडली नाा सहजपूर पाा गौरझांबरे
छ ६-८	रसिना ताा मडळी प्राा गडे
छ ९-१	बाह्मणी प्राां गढे
छ १४	केरपानी (करेपानी) चा घाट रेवा दक्षणतीर
छ १५-	सुपले पाा शाहापूर
छ १९	बाह्मणी पाा सिरीनगर
छ २०	नजीक देवनगर
छ २१-२२	सिरीनगर पाा गडे
छ २३	दरगरा ताा धुमा प्राा गढे
छ २४	टोंगरा
छ २५	धुमा
छ २६	लखणादवणा पाा छपोर
छ २७	सहजपूर पाा देवगड
छ २८-३०	छपोर पाा देवगड

खमस सलासीन

स्वारी रा। पिलाजी जाधव

जिल्हेज वैशाख.

छ १–६	छत्रोर पा। देवगड
छ ७	हिवरा पा। सिवणी प्रांत देवगड
छ ८	साला (?) पा। देवगड
छ ९	पेच नदी चवरई पा। देवगड
छ १०	टकारी पा। सिगनगड नदी पेच
छ ११	कातवडी नदी पेच
छ १३-१४	भीमगड प्रा। देवगड
छ १५-१६	दहिगाव पा। भीवगड प्रा। देवगड
छ १८	सांगवी प्रां। देवगड
छ १९	पाटणसांगवी प्रा। देवगड
छ २०-२१	मोपे पा। रामगीर प्रांत देवगड
छ २२	मेजवानी रघूजी भोसले
छ २३	वेहेर प्रां। देवगड
छ २४	कानोली पा। कलेश्वर पा। देवगड
छ २५	सेलू पा। कलेश्वर
छ २६	पोहनेर
छ २७	नाचणगाव प्रा। वराड
छ २८	नदी वर्धा
छ २९	सांगवी व नादूर पा। रायगाव प्रांत वराड

मोहरम

छ १	पिंपरी कलग्याची पा। वराड
छ २	महारूळ ,,
छ ३	तलेगाव राणीचे पा। दारवे आडाण नदी प्रां। वराड
छ ४	पिंपरी पा। कारंजे
छ ५	मंगरूळ पिराचे प्रा। वराड
छ ६	कलंब पा। वासीम
छ ७	ना। नडसी सा। वासीम
छ ८	नडसी

4789

सीत सलासीन

छ ९	डिगरस पूर्णातीर प्रा जिंतूर
छ १०	पाचलेगाव
छ ११	राजेवाडी पा पडतूर
छ १२	विजोड पा पडदूर
	छ मजकुरी मृग निघाला
छ १३	करडगाव पा आंबाड
छ १४ मोहरम	बटाणे पा जालनापूर
छ १५	चिमणगाव पा रोशनगाव
छ १६	भोसे पा पैठण
छ १७	पैठण गोदातीर
छ १८	सेवगाव
छ २०	नारायणडोह पा नगरहवेली
छ २१	रुई पा जलगाव
छ २२	सिरूर पा कर्डे
छ २३	कोरेगाव भीमातीर
छ २४ (५-६-१७३५)	मुा पुणे

खमस सलासीन

१२ सवाल	१०८=	मोगलाई देणे निजमुदी अलीखान सै ग्वालियर कैद केला त्यास सोडून दिल्ह त्यास मेजवानी
		विक्रमजित कोठडेकर
१६ जिल्काल		खर्च खेरीज मुशाहिरा
	१००००	पडते घोडीयात देणे सटवोजी जाधवराव
	४००	,, ,, ,, संताजी मोरे
	६५०	,, ,, बोगोजी घारगे

20-1-1735

छ ६ रमजान

राजश्री चिमणाजी दामोदर यांस मौजे कुरडगांव पा चांदवड येथील बाबतीचा मोकासा आहे. त्याप्रमाणे करार करून ताकीदपत्र

4790

17-8-1735
सीत सलासीन

छ ९ रावर
रामचंद्र मल्हार दिा पागा राणोजी शिंदे यांसा

प्रां माळवा येथील परगणे मोकासे
१ पा दिगठाण
१ सागार
—
२

मौजे नानवीज ता पाटस प्रां पुणे वगैरे येन मुकामा दरोबस्त दिल्हा असे येविसी पत्रें
१ मौजे मा राम
१ बापूजी श्रीपत
—
२

Mokasa is assigned to Ramchandra Malhar.

छ ९ रावर
तुकोजी पवार व जिवाजी पवार यांस माल्गुाप्रमाणे सरंजाम करार

प्रां माळवा मोकासे
१ पा देवासे
१ पा सारंटपूर
१ पा बागोद
१ पा इंगणोद
१ पा बामावाडा चौथाई
१ पा डोंगरपुर निमेची निजाई
—
७

समाईक महाल
।॥ पा कोठडे निम
१ पा नालसे
१ पा डोगाले
।॥ पा बकाणी
।॥ खैरावाद
—
३॥

आनंदराव पवार देखील

किता सनदा मोकासे
। पा नेवासे रा तुकोजी पवार
१ पा जलगाऊ
।॥ राजश्री तुकोजी पवार
।॥ राजश्री जिवाजी पवार
—
१

१ पा चिखलवाहाल
प्रा खानदेश निा
राजश्री जिवाजी पवार

२।

Mokasa assigned to Tukoji and Jivaji Pawar.

छ ११ राखर

सरंजाम राजश्री आनंदराऊ पवार यास सालगुदस्ताप्रमाणे सालमजकुरी ताकीदपत्रे

प्रांत माळवा मुकासे व बाबती व सरदेशमुखी व जकाती देखील माहाल

१ धर्मपुरी

१ पा। कोठडे निमेपैकी
दरसदे रुा। १६ सोळाप्रमाणे

१ पा। नालसे दरसदे रु. १६ प्रो।

१ पा। डोगाले दरसदे रु. १६

१ पा। धार

१ पा। सावेर

१ पा। बदनावर

१ पा। ताळ

१ पा। गंगराड

१ पा। डग

१ पा। सुनेळ

१ पा। खैराबाद निमेपैकी
दरसदे रु. १६ सोळा

१ पा। बकाणी दरसदे रु. १६

।• पा। डोंगरपूर दरसदे रु. १६

•॥। पा। बासवाडा

१४।•

स्वदेशी सरंजाम

•। पा। नेवासे मोकासा व बाबती दो। जकाती

१ पा। जैनाबाद मुकासा देखील जकाती

•॥ मौजे उजनी पिंपळगाव ता। नगर हवेली मोकासा

•॥ मौजे भराडी पा। कर्डे मोकासा

१ मौजे कविठे ता। पाबळ जिल्हे बाब मोगलाई मुकासा दो। सरदेशमुखी

३।•

The Peshwa issues orders to Anandrao Pawar regarding the latter's Saranjam.

¶*Entries for this number contain an itinerary of Pilaji Jadhav's expedition into the North during 1734-1735 and also the Peshwa's orders assigning different portions of the revenue of Malwa to the Pawar brothers.*

4792

No. 321]

स्वारी राजश्री पंतप्रधान

छ २ सवाल 4-2-1736 सीत सलासीन

३९ राजश्री राऊ उदेपूरचे जलमंदीर पाहावयास गेले ते समई

४ खैरात
३० नावाडे
५ मगरीवाले
——
३९

छ ३ सवाल

बा। राणा जगतसिंग घोडे कडे रास २ देणे पागा हुजूर.
भेटी नजर हा। गोपाळसिंग देवळेकर देणे राणाजीस

१ पटा रुप्याचा
१ दुमची रुप्याची
——
२

छ ४ सवाल

१००३४ जमा छ मजकूर
१०००० बा। ऐवज खानदोरा गुजारत आयामलजी येन नख्त तसलमात ऐवजपैकी
३४ भेटी
——
१००३४

खर्च

१००० ता। गणोबा
३०० राणोजी शिंदे
३०० मल्हारजी होळकर
३०० आनंदराव पवार
५० तुकोजी पवार
५० कंठाजी कदम बांडे
——
१०००

छ ९ सवाल

६००० छ मार बा येवज खानदौरा गु आयामल

छ ९ सवाल ४००० छ मार बा येवज खानदौरा गु आयामल

छ १० सवाल १०००

छ ११ सवाल बेहारीदास यानी मेजवानी पाठविली

१००० बा येवज खानदौरा

छ १२ सवाल २००० बा येवज खानदौरा

खर्च रु. ४०० फतेयाबखान दि खानदौरा मेजवानी

छ १३ जिल्काद	३७०००	छ ४ जिल्हेज	७०००
छ १५ जिल्काद	३०००	छ ९ जिल्हेज	६०००
छ २० जिल्काद	३५००	छ ११ जिल्हेज	३०००
छ २१ जिल्काद	२०००	छ १२ जिल्हेज	४०००
छ २२ जिल्काद	५०००	छ १३ जिल्हेज	२०.००
छ २७ जिल्काद	२०००	छ १५ जिल्हेज	२०००
छ २८ जिल्काद	१०००	छ १८ जिल्हेज	१०००
छ १ जिल्हेज	१०००	छ २० जिल्हेज	३०००
		छ २१ जिल्हेज	१०००

सीत सलासीन

छ १ जिल्काद जमा

४९९३ किता जमा छ मजकूर बा मेजवानी

4-3-1736 सवाईजी रुपये ५००० पैकी

The above is a list of amounts received from Khan Dauran in the Peshwa's treasury during the month.

जमा भेटी सवाई जयेसिंग याणा हता दिल्हा त्यास सामान व हाती अनुपगज

किता सामान	किता सामान
१ झूल सकलादी जरी	२ छते जरी किमखापी
१ सिरी (१) सकलादी जरी	२ नाडे सुती
५ तकिये किमखापी	१ झूल खारव्याची
१ बिछाना किमखापी	४ मोहाली पितळी

१ बिछाना खवासखानियांतील गजनीचा
६ पडदे जरी अंबारीचे
१ छत जरी अंबारीचे
२ पंखे जरी सकलादी
२ रेशमी चवार बंद
२ कळस तांब्याचे मुलामा सोनेरी

२२

१ किलावा सुनी लोखंडी कड्या ४
१ गादी गोणपाटी
१ पेटी चर्मीना
४ किता
१ घाट टोप सफेद
१ चादर
१ कटबंधन
१ सांखळी लोखंडी

४

सामान समेत हती रास १ येकूण किमत रु. १००००

किता जमा भेटी बाा सवाई जयसिंग देणे उष्टरखाना उंट नफर रास ३५ येकूण किंमत ३५०० रु.

Sawai Jaising presents an elephant and its accessories and thirty-five camels to the Peshwa.

छ १३ जिल्काद ३७००० जमा मजकूर बाा ऐवज खानदौराकडून आला गुाा आयामल

सति सलासीन

छ ४ जिल्काद

जमा भेटी बाा सवाई जयेसिंग

पालखी

१ दांडी किमखापने मढिली त्याजबरी गादी किमखापी

२२ गोंडे कलाबूचे जोड ११ येकूण बावीस राजगोंडा नाही

२ थोपा बनाती जरदोजी निमे

२ थोपांचे मोहनाळ व्याघ्रमुखी तांब्याचे मुलामा सोनेरी

२ कळस तांब्याचे मुलामा सोन्याचा

८ गठे तांब्याचे मुलामा

किता पालखी जनानी

१ दांडी लाल सकलादेने सेवटपावेतो मढविली असे
१ सोंड गादी किनखापी
१४ गोंडे लाल कलाबूचे जोड ७ येकूण जरी रेशमी राजगोंडा नाही.
३ तकिये किनखापी
२ तकिये
१ उसी

३

४ तकिये किमखापी
२ बगल तकिये
१ पिछाडीचा
१ उशी पायेची

४

१ सुजनी चिकंदोजी
१ तो श क मशरुचा रुजु बिछाना
१ तबकडी व तोची मढीव सकलादी
१ चादर सफेद बिछान्यावरील झाकायाची
१ पिंजरी[1] जरदोजी[2] सकलादी लाल समेत झालर जरी अस्तर किनखापी लाल हासिया उदी किनखापी

२ पडदे पिंजरीचे जरी अस्तर किनखापी उदी
१ घटाटोप पिवळी लाल दुहिरी पाठ १४ येकूण
२ गाद्या दांडीखालच्या जरी किनखापी
२ सोडेचे दांडीचे थैले छिटी येकेरी
४ दोरण्या रेशमी गर्भसुती
४ दाल रेशमी पिंजरीस

६१

सामान समेत पालखी सुमार १

१ बिछाना न्याहाली गजनीची
१ मुरका लाल बनाती अस्तर गजनीचा
१ मंडपी लाकडाची किमखापानें मढिली अस्तर छिटी
१ जाळी जरदोजी मोठी कलाबू
८ खांब लाल बनातेने मढिले
८ खांबास दोरिया रेशमी गर्भसुती
२ गाद्या दांडीखालच्या गजनीच्या
४ दोरण्या सिपायास रेशमी गर्भसुती
२ मोहनाळ थोपांचे तांब्याचे मुलामा सोन्याचा
२ कळस रुप्याचे मुलामा सोनेरी
२ सोंडेस थैले छिटी येकेरी
१ घटाटोप खादीचा येकेरी पाठ
१ तबकडी नवारेने विणली असे

९३

समेत सामान पालखी जनानी सुमार १

सदरहू देणे कारखाना पालख्या

¶*The entry mentions the accessories of a palanquin presented by the Peshwa to Sawai Jaising.*

(1) The canopy over a palkhi. (2) Worked in gold thread.

१४ जिल्काद 17-3-1736

जमा नजर बाा गोपाळासिंग कुरोलीकर बंदुखा सामानसमेत ताा रामजी सुर्वा

प्राा बंदुख कांब्यास सांखली सोनियांची दुहेरी व सिनेपटी सोनियाची व खजिन्यावर मुलामा सोनेरी याखेरीज साज कमरदस्ता बनातेने मढिला देखील सिंगडे व तोस्ताने.

२ तोस्ताने
१ सिंगडा
१ रंजकदानी
१ किचवा (१) रुप्याचा
३ फुल्या रुप्याच्या तोस्तानास
३ कोडे रुप्याचे

१२

सामानसमेत बंदुख येक

प्राा बंदुख पेटीवर व खजिन्यावरी मुलामा सोनेरी साज लाल बनातेने मढिला असे.

२ तोस्ताने
१ सिंगडा

३

सामानसमेत बंदुख १

२

सीत सलासीन

सदरहूस गवसण्या दोन इलोंच्याची[१] येक व खारव्याची येक

List of guns and parts received from Gopalsing of Keroli.

---

१ एक प्रकाचें रेशमी कापड.

छ ८ जिल्हाद 7-4-1736

जमा भेटी बा। रुपराय भगवंतसिंग आडारुचा लेक बाजपक्षी ता। रामचंद्र मिरसिकार नि। दुर्जनसिंग

छ २९ जिल्हेज 30-4-1736

गु। कृष्णाजीपंत भेटी गु। नागोरचा राजा बंदुखा ३

१ प्रा। बंदुख आठा बाराची नळ्या धाकट्या ८ दस्ता बुटेदार काटा व साखळी लोखंडी गलेफ खारव्याचा असे

२ प्रा। बंदुखा दस्तेयावर हस्तिदंताची झाडे व वेल व हतीघोडे व रावे हस्तिदताचे पेंदीवर व सर्ज्या व बंदुखेचे तोंडी मुलामा सोनेरी काटा व साखळी लोखंडी येकास दुसरीस साखळी काटा लोखंडी आहे. गलेफ खारव्याचे दोन असे

३

किता भेट बंदुख बा। दतिया ता। रामजी सुर्वा बंदुख साधी सुमार यासी तपसील

१ सिंगडा

१ रंजकदाणी तोंड हस्तिदंती

३ तोस्ताने

० गलेफ नाही

५

A similar list of guns and their parts presented to the Peshwa by kings of Nagor and Datia.

¶*Entries for this number refer to the grand reception given to the Peshwa by the Rajput Princes and evince the cordiality existing between the Rajputs and the Marathas.*

No. 322]
रुमाल नं. १४

बाजीरावाचे मुकाम

सिलीकबंद पोते श्वारी राजश्री पंतप्रधान सुरू सलास सलासीन मया व अलफ जेष्ट सुध ३ रविवार

२ जिल्हेज जेष्ट शुा ३ रविवार मुा राजापूर बलाराजा *6-5-1733*

३ ६ बुधवार राजपुरी

८ बलाराजा

११ रवि. बलाराजा

१२ इंदु मुा ,,

१३ भोम. बलाराजा

१५ गुरु. बलाराजा

जेष्ट वद्य ४ मुा राजपुरी

सिलिकबंद पोते स्वारी रा पंतप्रधान सुरु आर्बा सलासैन मया व अलफ
छ १९ सफर आषाढ शुा १

३० रवाना मुंबईस

२० कृष्णाजी राम दिा कानोजी सिरके (वगैरे)

———

३०

छ २३ सफर

रामाजी दामोदर दिा फतेसिंग भोसले

[वरील सिलिकबंद २ सफर ते ३० सफरपर्यंतचे आहत. परंतु प्रत्येक बंदावर मुकाम आहेच असे नाहीं. ज्या तारखास मुा आहेत ते बितपसील]

११ सफर आषाढ शुा १२ गुरु. —— बलाराजा

१७ ,, ,, वद्य ३ सौम्य —— राजपुरी

२० ,, ,, ,, ६ शनि —— ,,

२१ ,, ,, ,, ७ —— ,,

२८ ,, ,, अमावास्या —— बलाराजा

३० श्रावण शुा २ भौम —— राजपुरी

4799

सिलिकबंद पोते छ ८ सफर स्वारी रा चिमणाजी बलाल सुा आर्बा सलासीन मया व अलफ आषाढ शुा ९ इंदुवासर मो का पुणें

[वरील सिलिकबंदात छं ८ सफर ते ३० सफरपर्यंतच्या तारखांचे बंद आहेत व त्यात चिमाजीचा मकाम दर तारखेस कसबे पणे असा लिहिलेला आहे]

सिलिकबंद पोते छ १ सफर स्वारी रा पंतप्रधान सुा आर्बा सलासैन मया व अलफ आषाढ शुा २ इंदुवार मुा पुणे

[सिलिकबंद १ सफर ते ३० सफर पर्यंत त्यांत मुा कसबे पुणे म्हटले आहे परंतु त्या वेळीं बाजीराव राजपुरास आहे. अर्थात ही पुणे मुकामची रोजकीर्द दिसते.]

बाजीरावाचे मुकाम

सिलकबंद पोते स्वारी पंतप्रधान

आर्बा सलासीन मार्गसीर्ष

मार्गसीर्ष शुध

४	गुरु	राजपुरी
६	मंद	राजपुरी
७	रजब	कूच होऊन मुा घोसाळे
८	,,	,, ,,
९	,,	,, ,,
१२	,,	पारघाट तळ
१३	,,	केलघर ताा मोढेखोरे
१४	;,	कनेर व शाहू नगर संध्याकाळ

—

राजमंडळ रोजकीर्द

आर्बा सलासीन

दफाते सरंजाम छ ३० रजब

राजश्री रामचंद्र कृष्णराव यास सरजाम येणे प्रा दिल्हे रुा

८६९५॥ प्रा जवार कुलबाब कुलकानू

८६६९॥ प्रा रामनगर ,, ,,

4800

३२७२। प्रा वासदे कुलबाब कालकानू
११६५॥ प्रा पेठ ,, ,,
२९६८॥ प्रा कोहज ,, ,,

२४७७७॥
१४३४३॥ प्रा सात माहाल देखील कमावीस
(पुढे कांहीं तपसील)

येणे प्रा चालीस हजार येकसे सासष्ट रुपयाचा सरंजाम दिल्हा आणि मशारनिलेनी किले कोहज व राऊत पाउणसे व खासा येणे प्रा चाकरी करावी आणि सदरहू सरंजाम खावा. कमजाजती तुमचे तुम्ही समजून घ्यावे किला जतन करून पाउणसे स्वारानसी चाकरी करावी (वगैरे) येविसी पत्रे

१ मशारनिलेस
१ बालाजीराव यास

चिमणाजी आपाचे मुकाम

24-2-1734

राजमंडळ रोजकीर्द स्वारी चिमणाजी बलाल आर्बा सलासीन मया व अलफ माहे सवाल छ १ सवाल फाल्गुन शुा २ रविवार ते २९ सवाल चैत्र शुा १ रविवारपर्यंत चिमाजीचा मुकाम का पुणे असा दिला आहे

बाजीरावाचे मुकाम

15-8-1733

अर्बा सलासीन रबिलोवल श्रावण

१५ रबिलावल श्रावण वद्य १ सौम्य राजपुरी
२ ,,
४ भृगु ,,
१० गुरुवार ,,
११ राजपुरी

२९ रबिलावल राजपुरी

20-2-1734

बाजी भिवरावाचे मुकाम
आर्बा सलासीन माहे रमजान

माघ वद्य १३ सौम्य. मुाा म्होपरे

फाल. शु मंद. २९ रमजान ,,

6-2-1734

सिलिकबंद स्वारी राा बाजी भिवराऊ सुाा आर्बा सलासीन
माघ शुाा १५ सौम्य छ १२ रोज मुाा म्होपरे ताा माहाड

माघ शुाा १५ सौम्य १२ रमजान
ते.
फाल्गुन शुाा १ मंद २९ रमजान
} मुाा म्होपरे नाा माहाड

सिलिकबंद स्वारी कोंकण हद राा बाजी भिवराऊ आर्बा सलासीन फाल्गुन शुाा २ रवि. छ १ सवाल मुाा म्होपरे ताा माहाड

सवाल	फाल्गुन शुाा 24-2-1734	म्होपरे ताा माहाड
१	२	
२	३	नाा डोहो सेडावे
३	४	कूच डोहो सेडावे मुकाम धरमडोह नाा खाडी हुडुल
४	५	सिरगांव ताा
५	६	कोनवल तपे येसवी प्रांं मंडणगड
६	७	गुढेघर तपे व्यसवी
	१	
७	८ सह ९ मंद	डिघी नाा वेलास

८	९ सह १०	नजिक वेलास
९	११	डिघी ना। वेलास समीप बाणकोट
१० ते	१२	
१९	फाल्गुन वद्य ६ भृगु	डिघी
२०, ३० ते	चैत्र शु २	महमदाबाज

बाजीरावाचे मुकाम

26-7-1734

सिलिकबंद पोतें स्वारी पंतप्रधान सुरू खमस सलासीन छ ६ रबिलावल श्रावण शुा ७ भृगुवासर ते ३० रबिलावलपर्यंत

रबिलावल

६,७	पुणें
८	मौजे दहिगांव
९	मौजे निंब
१० श्रावण शु. ११ मंगल	मौजे खेड ना। सातारा
११ ते ३०	सातारा

स्वारी पंतप्रधान खमस सलासीन *9-7-1734*

छ १८ सफर

दफाते लस्करची कुले वगैरे कुले येतात त्यास बसावयास जागा निमाजगिया जवल जागा दिल्हा. पेठेचे नांव विसापूर बाजार शुक्रवार का। पुणे येथे वसविला, त्यास पांचसाला हासिलाचा वगैरे कौल दिल्हा असे. पत्र परसेट व सोमसेट सेटे बाजार स्वारी, याचे नावे दिल्हे असे.

4803

बाजी भिवरावाचे मुकाम

सिलीकबंद स्वारी कोकण बा। रा बाजी भिवराऊ सुरु आर्बा सलासीन मया व अलफ चैत्र शु॥ ३ भौम; जिलकाद मु॥ महमदाबाज ना॥ बाणकोट

जिलकाद चैत्र शु॥ ३ भौम ते २४ जिलकाद चैत्र वद्य १० सह ११ गुरु.	मु॥ महमदाबाज ना॥ बाणकोट

खमस सलासीन

8-2-1735 २९ रमजान माघ वद्य १२ मंदवार

जमा जामदारखाना

जमा भेट सरखेल संभाजी आंगरे मारुफात हैदरफभालदार मु॥ पालीस आली सनगे रुपये

४४० खाशास सनगे (तपसील)

४३७॥ रा आपास (तपसील)

सिलिकबंद स्वारी कोकण हा। रा तुबाजी अनंत सु॥ खमस सलासीन पौष वद्य ६ षष्ठी भृगु. माहे साबान १९

१९ साबान *3-1-1735*	मु॥ भोरकस ता॥ पौड खोरे
२० ,, रविवार	बाळें ता॥ आंतवणें
२१	चेऊल राजकोट
२२, २३	राजकोट
२४, २५	चेऊल
२६, २७, २८, २९, ३०	चेऊल राजकोट

छ २७ साबान *11-1-1735*

खर्च छ मजकूर

१ देणे इनाम बेलदारबद्दल पुन्हा सुरुंगास प्रारंभ केला मसिदीच्या त्याबद्दल.

सिलिकबंद पोते स्वारी पंतप्रधान
खमस सलासेन

छ ९ जिलकाद *23-3-1735*

खर्च रुा

१० वलभदास चौधरी सरकार मांडोगड याजपासून वतन विकत घेतले त्यापैकी दिल्हे

छ १० जिलकाद *24-3-1735*

रवासुदगी

भिवाजी जनार्दन यास किले श्रीवर्धन येथील सबनिसी सांगितली त्यास तैनात सालीना बारमाही रुपये २०० करार केले आहेत त्यापैकी रोजमरा दर माहे रुा १२ प्रा देविले असे. सनद बनाम सुभानजीराव येरुणकर यास

छ २९ जिलकाद *8-4-1735*

खर्च रुा

१०० इमारत तले मुा श्री भीमाशंकर ता वाघोजी तुकोजी जासूद

बाजीरावाचे मुकाम

[' सिलिकबंद स्वारी पंतप्रधान खमस सलासीन' छ १ माहे सवाल फाल्गुन शुा ३ ते २९ माहे सवाल चैत्र शुा १ पर्यंत मा अलिबाग कुलाबा असा दिलेला आहे.]

4805

बाजीरावाचे मुकाम

सिलिकबंद पोते स्वारी रा पंतप्रधान खमस सलासेन

रमजान	पुण्याहून कूच करून कोरीगडा-
२१	खाली मुकाम
२२	किले पाली
२३	अलिबाग
२४	कुलाबा
२७ माघ वद्य ४ सोमवार ते ३० रमजान	कुलाबा.

सिलिकबंद पोते स्वारी पंतप्रधान
सीत सलासीन

छ १८ सफर *29-6-1735*

खर्च रु॥

१०० शामराऊ (भालेराव ?) पारसनीस मृत्य पावले त्याचे क्रीस मोहरा ८

छ २७ सफर *8-7-1735*

५६८ ÷ धर्मादाव पुत्र उछाहाबद्दल (तपशील)

स्वारी पंतप्रधान सीतसलासीन
माहे १ रबिलाखर भाद्रपद

छ ९ रबिलाखर *17-8-1735*

मालजी घुणे यास खत लेहून दिल्हे कीं तुम्हापासून कर्ज घेतले रुपये ३५००० पंचतीस हजार यास व्याज दरमाहे दरसदे रुा १॥ प्रो करार मिति भाद्रपद वद्य ५ शके १६५७ राक्षस नामसंवत्सरे दिल्हे असे.

छ १७ रबिलाखर 25-8-1735

दफाते त्रिंबक सिवदेव येकबोटे वस्ती कसबे पुणे याणी विनंती केली की आपले कुटुंब थोर, जागा नांदणुकेस पुरत नाही तरी स्वामीही कृपा करून कसबे मजकुरी वाडा बांधावयास जागा दिल्ही पाहिजे म्हणून, त्यावरून मनास आणून कसबे मजकुरी वाडा बखलीदाखल जागा बेवारीस होता ते नेमून दिल्ही

[पुढें तपसील]

छ १४ सौवाल 16-2-1736

३००० तलें जेजुरी तल्याच्या कामास निा बापूजी श्रीपत

१६ सौवाल 16-2-1736

८० चिमाई सिंदी सिलेदारीण ईस नारो दादाजी याजकडून गला खंडी २ देविल्या 'वगैरे,'

सिलिकबंद पोते स्वारी पंतप्रधान
सीत सलासीन

छ १० रावल 20-7-1735

खर्च रुा ८= पुत्र उछाहखर्च देणे परटिणीस दाहा दिवसाची पाघरुणे धुवावयास टाकिली त्यास दक्षणा

छ ११ रावल 21-7-1735

खर्च रुा

२८ राजश्री जनार्दनपंतास बिंदल्यास मोहरा
१७७९ पुत्र उछाहखर्च बंद २

छ १४ रावल 24-7-1735

खासुदगी

रुा नारायेण दीक्षित पाटणकर यांस पत्र लेहून दिल्हे की तुम्ही मथुरेसंनिध धर्मकृत्यास दाहा गांव मागितले त्यास तेथे आपला अमल बैसला म्हणजे दाहा गाव तुम्ही मागाल ते इनाम करून देऊ म्हणून १

4807

राजमंडळ रोजकीर्दी
स्वारी पंतप्रधान सीत सलासीन

खासुदगी छ ४ रजबु *9-11-1735*

किले माहुली हे स्थल या ग्रहस्थानी हस्तगत करून दिले म्हणोन यासी येणे प्रो दिले

बालाजी गोविंद यास हे राज्यातील पुरातन सेवक कष्ट मेहनत करून केली, या करितां कृपालु होऊन येणेप्रो (पुढे तपसील)

१ मौजे खातिवली ता। राहुरी प्रां भिवडी हा गांव निमे इनाम दिला.

२ किले मजकूरची सबनिसी वतनी सांगितली आहे वंशपरंपरेने वेतन सालीना रुा ३००

३ या खेरीज तैनात अफ्तागीर १ व पोरगा १

[याच प्रो खंड पाटील बिन कृष्णाजी पाटील झुजारराव, जानजी बिन जोगाजी कराला वगैरे लोकानाहि इनामे बक्षिसे नमूद आहेत]

छ २८ रजबू *3-12-1735*

खासुदगी

गु।। वासुदेव जोसी

१२५ बाजी भिवराव यास पालखी मशारनिलेची वेऊन दिली आणि त्यास मुबदला औरंगाबादेहून खरीदी करून आणून दिल्ही.

सिलिकबंद पोते स्वारी रा। पंतप्रधान सीत सलासीन मया व अलफ

१ गोमाजी मराठे
१ राघोराव दाभणे
१ तुकोजी मराठे
१ सेव्याजी भालिंगे

छ १२ जाखर *18-10-1735*

गोविंद बलाल मुा। रहिली यासी पालखी दिल्ही. रा। पिलाजी जांधवराऊ यासी पत्रे लेहून दिल्हे की तुम्ही त्या प्रांते जाल तेव्हा पालकी व पत्रे देणे. पालकीच्या खर्चास सालीना मोईन बुंदलखंडच्या यैवजपैकी रुा। ७५० नेमणूक करून देणे म्हणून सुबेदारास पत्र.

छ १३ जाखर 19-10-1735

खासुदगी

बाळाजी केशव याजबराबर लोक कर्नाटियास आहेत त्यास रोजमरेयाबद्दल

छ १५ जाखर 20-10-1735

खर्च रुा

२२८८— स्वारी भीमाशंकर

२१७ धर्मादाव

४ श्रीभीमाशंकरापुढें ठेविला
वि॥ राजश्री राव

१० वि॥ सौ कासीबाई

२ वि॥ जिऊबाई

५ बाजी भिवराव

(वगैरे)

सिलिकबंद स्वारी पंतप्रधान सीत सलासीन

छ १५ रमजान 18-1-1736

३ खासगत खर्च वि॥ राजश्री नाना खरेदी आरशी विस्तेव पाडावयाची

छ १३ रमजान

खर्च रुा ५००

सिलिकबंद पोते छ १५ जिल्हेज 16-4-1736

स्वारी रा॥ बाजी भिवराऊ सीत सलासीन

खर्च रुा १७२५ किता देणे बाळाजी बाजीराऊ पडल्या घोडियाचे रुा
ऱ्हडाई बंगसावरी बातमीस पाठविले होते ते दिवसी घोडी,
रास २ यो॥

११०० किता रास १

६२५ किता घोडा रास १

१७२५

स्वारी पंतप्रधान सीतसलासीन

३ जाखर 9-10-1735

खासुदगी

नाइकजी पाटणकर सिलेदार यास बक्षिस कड्याबद्दल मोहरा अहमदाबादी २० दर १२८= प्रो रुा २४२॥

छ १० जाखर 16-10-1735

दफाते होनाजी बलकवडे याजकडील सरदारास येणे प्रा देविले आहे

जागिरे

१ पिलाजी बलकवडे हवालदार किले बिरवाडी

१ मायाजी मराठे हवालदार किले सुरगड

रुमाल

१ जिवाजी दलवी सरनोबत किले सुरगड

स्वारी पंतप्रधान

सीत सलासीन

छ ३० साबान 3-1-1736

१२०० ता विठल सिवदेव रवाना कोंकण

9-1-1736

सिलिकबंद पोते छ ६ रमजान स्वारी पंतप्रधान हा राजश्री बाजी भिवराऊ सीत सलासीन

१० कासीद रवाना महंमदखान बंगस बातमीस

छ १२ रमजान 15-1-1736

१७०० दणे सटवोजी जाधव रोजमुरा रमजान महिन्याचा ता बाबूजी नाईक

छ १३ रमजान 16-1-1736

१७५ अंताजी नारायेण फडनीस देणे बा ता खंडोराव

सिलिकबंद स्वारी पंतप्रधान

सीत सलासीन मोहरम अखेर छ २२

जमा कमावीस पागा दिा जानराऊ ढमढेरे याजकडील राऊत रा तुबाजी अनंत यासमागमे सेवगावचे स्वारीस गेले होते तेसमई आदा होता ते रुजूमुले जमा धरिले रुपये ४॥.

सिलिकबंद पोते स्वारी पंतप्रधान

सीत सलासीन

छ २ माहे मोहरम *3-5-1736*

खर्च रु.

२५ विठल सिवदेव सिलेदार घरास जातेसमई जखमेस खर्चीस

२५२ विठल सिवदेव सिलेदार कडे सोन्याचे तोले २१ दर तोला रुा १२ प्रा बक्षीस खर्च बाा युद्ध सिदीसात

सिलकबंद पोते स्वारी राजश्री पंतप्रधान

सबा सलासेन

छ. ५ सफर *4-6-1736*

रवासुदगी बाा देणे सिलेदार रवाना गोवलकोट मोहरा अमदाबादी येाा रुाा

१५० फिरोजी सेलके आा ५ योा मोहरा १० दर १५

७५ राणोजी बोरगे चिंचनेरकर स्वार २ योा मोहरा ५ दर १५

२२५ १७

छ १९ सफर *18-6-1736*

खर्च .॥. धर्मादाव राजश्री आपास बरे वाटत नाहीं सबब उदईक ब्राह्मणास द्यावयास

4811

छ २१ सफर 20-6-1736

जमा ५०० जमा छ मजकूर कमाविस वासदाणा साल गुा रा रामचंद्र हरि इचलकरंजीस पाठविले होते त्याणी करार केले होंते त्यापैकी

छ २४ सफर 23-6-1736

खर्च २०० पागा दिा हुजूर वा मानाजी कोकरे याचा घोडा बोर रास १ इचलकरंजीचे स्वारीबराबरी रामचंद्र हरि. येथे युध्यामध्यें जखमी जाला तो घेऊन त्याची किंमत मशारनिलेस दिली

।सलिकबंद पोते स्वारी पंतप्रधान

सबा सलासेन ३ जावल 29-8-1736

जमा १३ स्वारी रा भिवराव बाकी सालगुदस्त पा मोहरा १ यो

खर्च रुा

६० सिंगरास दुधाबद्दल सेल्या खरीदी करावयाबद्दल सेल्या सुमार ६० यो.

छ ७ जमादिलावल 2-9-1736

खर्च रुा

६० यादवराव प्रल्हाद रोजमरा येकमाही वकील दिली

१४९।। हशम निा शंकराजी केशव

४४।। दिा कर्णाजी सिंदे ४

६८ दिा आणाजी साटम १३

१८ दिा कृष्णाजीराऊ येरुणकर

७ दिा विठोजी कदम देणे आबाजी बारणे जखमी होते ते मेयत जाले त्यास.......

६ दिा नंदाजीराऊ दुदुसकर देणे आत्माजी सालवी जखमी होता तो मयेत जाला त्यास

६ दिा रामाजी माहादेव देणे नारो बहिरव

१४९॥

दफाते श्रीधर गोविंदापासून कर्ज ३०००१ तीस हजार येक घेतले शके १६५८ भाद्रपद शुा ८

वेदशास्त्रसंपन्न वासुदेव दीक्षित याजपासून कर्ज घेतले १०८०० दाहा हजार आठशे

छ ८ जावल *3-9-1736*

दफाते

खंडोजी फाटक यास किले मनरंजन येथील सरनाइकी सांगोन पाठविले असे म्हणून सुभानजीराऊ येरुणकर नामजाद व कारकून किले राजमाची यास सनद.

छ १६ जावल *11-9-1736*

१०० दिा बावाजी साटम हशम निा संकराजी केशव

छ २६ जावल *21-9-1736*

१००० इमारतखर्च तले श्री जेजुरी अश्विन मास रुा ४००० पैकीं

छ २६ जावल *21-9-1736*

१ धर्मादाय यादोपंत श्री आईआदिपुरुषचे गोरडगांवकर खर्चास

¶*Extracts for this number refer mainly to the campaign against the Sidi of Janjira from 1733-1736 and offer minute and interesting details which certainly will repay a close study.*

No. 323]

सिलिकबंद पोते स्वारी रा। पंतप्रधान
सबा सलासेन

छ ३ जिल्हेज 24-3-1737

खासुदगी रामाजी विश्वासराव सिलेदार याचा घोडा गोवलकोटी मेला सबब मुबदला दिला.

छ ११ जिल्हेज 1-4-1737

१० दि॥ कृष्णाजीराव येरुणकर हशम देणे तुकोजी धामणसा साष्टीचे जुंजात ठार जाला त्याचे क्रियेस रसानगी दिनकर माहादेऊ

छ १४ जिल्हेज 4-4-1737

खर्च रु॥ ४७ लोक दि॥ होनाजी बलकवडे हशम जखमी आसामी ४७ यास खर्चास

छ २२ जिल्हेज 12-4-1737

खर्च रु॥ १००० ता॥ खंडोजी माणकर रवाना वानरे हशमाचे रोजमरे याबद्दल बा॥ बहिरजी जगथाप

छ २५ जिल्हेज 15-4-1737

खर्च रु॥ १५ केसो विश्वनाथ कारकून दि॥ कृष्णराव माहादेव बेलापूरचे कोटात गोळी लागून जखमी जाला सबब खर्चास

सिलिकबंद पोते स्वारी रा। पंतप्रधान
सबा सलासेन

छ १ मोहरम 21-4-1737

खर्च रु॥

४ नरसोजी पाथरवट दहिवडकर चाकर सरकार इमारत ठाणेसाष्टी रसानगी भिकाजी गौडा खर्चास

छ ६ मोहरम *26-4-1737*

खर्च रुा

९९९ हशम निा संकराजी केशव जखमी लोकास. बंद अलाहिदा खासुदगी

हरजी मोरे खासबारदार दिा सोनजी धनवडे हा गोल्याने जखमी होता तो मृत्य पावला साा कफनास सेला साधा.

छ ७ मोहरम *27-4-1737*

खर्च रुा

६०० व्यंकटराव नारायण सिलेदार

३५० रोजमरा चौरोजा

२५० रोजमरा येकमाही

६००

११ गुा रामचंद्र हरि मुा वानरे (पुढें रोजमरे दिलेल्या लोकांचीं नांवे आहेत)

छ ८ मोहरम *28-4-1737*

३६ कमावीस लूट ठाणे सासष्टी पैकी रुा रुा दर ३६ दर रुपयास रुा १ प्राा.

छ ११ मोहरम *1-5-1737*

खर्च रुा

॥ सुभानजी चवाण दिा रामजी सुर्वे खासबारदार मेढ्यावर ठार जाला सबब खर्चास

छ १२ मोहरम *2-5-1737*

खर्च रुा

८८॥ नामजाद घोडबंदर हशम

६२ दिा सुभानजी भोपतराव २०

२१ दिा त्रिंबकजी देसाई दिा खंडोजी माणकर १७

4815

५॥ भवानजी कनाले जमाव अंतोजी सिंदे दिा खंडोजी माणकर

३ खरेदी कोळसे इमारतीकडे कोट ठाणे साष्टी मा। अंताजी गणसेट

४ कासीद तीर्थरूप रा। रायाकडून पत्र घेऊन आले.

रवासुदगी

दिा अंताजी रघुनाथ हशम रुा २९

छ १३ मोहरम वैशाख शुा १५ भौमवार.
3-5-1737

खर्च रुा

१ दिा जिवाजी मोरे दिा रामाजी माहादेव हशम देणे येमनाक मेळ्यावर दुखवला सा। खर्चास

४ सूर्याजी जानेरा दिा लखमाजी कुमटे दिा होनाजी बलकवडे हशम यासी गरनालेची जखम वानरे याचे मोर्च्यात लागली त्यास जखम भारी आहे सबब खर्चास

छ १६ मोहरम *6-5-1737*

१७ हशम धारावीपैकी

छ १८ मोहरम *°-5-1737*

खर्च रुा

३५०० ता। राघोबा दिा आवजी कवडे

२००० दिा आवजी कवडे रोजमोऱ्यापैकी

१००० दिा विठल विस्वनाथ हशम जदीद लोकाबदल

५०० बक्षीस किले तांदुलवाडीचे

३५००

छ २० मोहरम *10-5-1737*

१९ बालाजी गणेश सिलेदार घोडबंदरी आहेत त्याचा रोजमरा

॥॰ लागवड खर्च कढी रूप्याची घडावयास टाकणखार गुा नाना गुजर

छ २१ मोहरम *11-5-1737*

४९॥. गौंडे इमारत ठाणे साष्टी रोजमरा येकमाही पंधरवडा (त्यापुढे सर्व पोर्तुगीज गवंड्याची नांवें आहेत)

छ २२ मोहरम *12-5-1737*

खर्च रुा

९ मोत्याजी बेरड बांधाटीकर वानरेयास भांडी नेता भांड्याखाली तुडवला सबब त्याचे क्रियेस.

९६॥≡. इमारत ठाणे साष्टी प्राा फिर्गाण देणे मजुरी व वेठये व भोई वगैरे इा १६ जिल्हेज ताा छ २१ मोहरम खुर्दी फिरंगाणी.

छ २३ मोहरम *13-5-1737*

४० भेटराजा जवारकर विा * * * पंत * * * याणी तिवट व अस्टगोली १ नेला त्याचे रुा आणून दिले.

छ २५ मोहरम *15-5-1737*

खर्च रुा

२ पागा दिा संभाजी सिंदे वानरेयास जाते समई हरभरे घेतले त्याच्या हिशेबासंबंधीं.

छ २६ मोहरम *16-5-1737*

जमा कर्ज गुा वासुदेव जोसी पेशजी ऐवज मारनिलेकडून देविला होता परंतु जमाखर्च केला नाही सबब हली रुा

२००० रवाना पंताजी मोरेश्वर याजकडे

१००० विश्वनाथ विठल हशम जदीद लोक आणावयासी

छ २७ मोहरम 17-5-1737

खर्च रुा

४३ जखमी धारावीस जाले त्यास खर्चास

६ मुरारजी नाा अणजूरकर दिाा खंडोजी माणकर १

८ दिाा सिवजी नाा अणजूरकर ४

६ दिाा बाबूजी नाा अणजूरकर २

११ दिाा गंगाजी नाा ,, ३

१२ दिाा सोमाजी कुंठे ४

४३

छ २८ मोहरम 18-5-1737

२२ भोई कल्याणकर आा ११ रवाना पुणे

नारो बाबाजी (दादाजी?) यांस बरे वाटत नाही याजकरितां पुण्यास पाठविले साा परभारे रुा २ प्रो रसानगी आबाजी साठ्या जासूद

४५ किले हाये देणे जखमी धारावी बंद अलाहिदा १

छ ३० मोहरम 20-5-1737

खर्च रुा

३० किले मनोहर घेतले म्हणोन लोक दिाा बरवाजी ताकपीर याणी वर्तमान घेऊन आले सबब बक्षीस.

स्वारी राा प्रधान समान सलासीन

जमा छ १४ सफर अखेर जमा जामदारखाना कामावीस लुटीपैकी मुाा ठाणे साष्ट. (नंतर पुढे २०८।। सनगे व १३६६।। रुपये इत्यादि तपसील आहे.)

बाा यैवज कमावीस राजश्री आपा खानदेशात गेले ते समई मोगल लुटला त्यापैकी सनगे आली ते गुाा म्हालोजी मुठे गुाा त्रिंबक हरि लेले कमाविसदार पाा मकडाई.

३४७

स्वारी राजश्री पंतप्रधान

खर्च पोतापैकी मुा पुणे इा छ १ रोज ताा छ ३० मोहरम मिनहू छ १४ सफर रुा १ नुकसान खर्च रा वासुदेव जोसी याजकडून साष्टीहून नाना येऊ लागले ते समई रुा दिल्हे त्या पैकी खोटे निघाले ते

सिलिकबंद पोते स्वारीं पंतप्रधान
समान सलासेन

छ ६ सफर *25-5-1737*

१० सेख दाऊद बेलापुरास ठार जाला त्याचे बाईकोस.

१० कानोजी हिलाल दिा अंबोजी घोरपडा बेलापुरास ठार पडला त्यास.

छ १६ सफर *4-6-1737*

खर्च रुा २२४०।। बक्षीस बाा ठाणे साष्टी बंद अलाहिदे २

छ १७ सफर *5-6-1737*

खर्च रुा

१७८३।= बाा बकसीस ठाणे साष्टीमध्यें रात्रीस आले सबब
१५९० मोहरा १२४ दर १२।।.

१२३३। कडी रुपे रुपये भार १२३३। सदरहूचे
बंद अलाहिदे.

छ २३ सफर *11-6-1737*

दफाते रा पंताजी मोरेश्वर याजकडे किले टकमक येथील बेगमीस पाा मनोरपैकी गाव नेमून दिल्हे देह सुमार २९ (पुढे गावांची नांवे) येविसी सनद व विठल विश्वनाथ यासी पत्र सादर की सदरहू गावी तुम्ही उपसर्ग न देणे.

4819

छ २४ सफर 12-6-1737

नारो माहादेव कानीटकर यांस पत्र लेहून दिल्हे की तुम्हास बरडा येथील कार्य करावयास आज्ञा केली आहे तरी हे कार्य किले खामखा करणे. कार्य जाहालियावरी किलाची व मुलकाचा कारभार तुमचे हातून घेतला जाईल म्हणून सनद.

सिलिक बंद पोते स्वारी पंतप्रधान

समान सलासीन

छ २३ जावल

खर्च रुा २०००० रवाना वसईस रोजमुऱ्यांबद्दल बाा गुणाजी सेणवी.

बाजीरावाचे मुकाम

समान सलासीन 18-8-1737

२ जमाावल	भाद्र शुा ४ इंदु	मुा मोरगांव
३		,,
४		जेजुरी
५		लोणंद
६		निभोरे प्राा फलटण
७		फलटण भेटी राा स्वामी
८	भाद्र शुा १० बुध	,,
९		बुध
१०		खटाव
११		तडसर वांगी
१२		हिंगणगाव
१३		,,
१४		,,
१५	भाद्र वद्य ३ बुध } १४-९-१७३७	उंबरज संनिध
ते		राा स्वामी
२९		

सिलिकबंद पोते स्वारी रा पंतप्रधान

श्री रा बाजी भिवराऊ सुा समान सलासीन

११ जमादिलावल 27-8-1737	चिंचवड
१२	पाटण ताा नाणेमावल
१३	पलसदरी ताा नसरापुर प्रांा कल्याण
१५	कल्याण
१६	मांडवी
१७ ते २८ जाा	पापडी.

सिलिकबंद पोते स्वारी रा पंतप्रधान

समान सलासेन

छ २ जााखर *16-9-1737*

रवासुदगी गवाजी बागूल ठाणे मनोहर येथे साहेब कामावर ठार पडिले त्याचे पुत्र यास १०० रुा सरदेशमुखी प्रांा खानदेश निा महिपतराव कवडे याजकडून देविले.

छ ९ रबिलाखर *26-7-1737*

रवासुदगी बद्दल देणे बालाजी गणेश हशम निा शंकराजी केशव याजकडील हे वसईस साहेब कामावर ठार जाले सबब देविले रुा १०० ठाणे घोडबंदर पंताजी मोरेश्वर याजकडून देविले.

छ १७ जााखर *1-10-1737*

रवासुदगी २९१। सेव्याजी भोइटे सिलेदार बक्षीस कडे मोहरा भार २० मोहरा अवरंगाबादी २० दर १२॥ प्रा गुा वासुदेव जोशी.

छ १८ जााखर *2-10-1737*

रवासुदगी पाथरवट अर्नाल्यास व बेलापुरास आहेत त्यास रोजमरा (पुढे नावे व खर्चाचा तपसील)

4821

छ २२ जाखर 6-10-1737

जमा रुा ५००५ स्वारी बा बाजी भीमराऊ वसईचे स्वारीस गेले ते

५००० जमा वाजगस्त छ ११ व छ १२ जमादिलावली दिल्हे ते

५ कमाविस भेट देशमुख वसईकर

५००५

स्वारी पंतप्रधान

छ १९ रजब 4-11-1737

दफाते हाजी अबास व हाजी कुकरी व हाजी अबदुला आरब हशम सुरतेहून येकसे पंचावन कल्याणास आले आहेत ते माहिमास रा रामचंद्र हरी याजकडे रवाना करणे आणि प्रां कल्याण भिवडी पैकी शामजी कृष्ण यांचे गुजारतीने देणे म्हणून सनद देविले रुा ३००.

छ २० रजबू 3-11-1737

दफाते लक्ष्मण मायाजी कळवेकर दिा गंगांजी ना अणजूरकर यासी खंडोजी माणकर याजकडून साष्टी प्रांते शंभर रुपयाची गाव नेमून देविला रोजमरा नेमणुकेप्रा देत जाणे म्हणून सनद.

सिलिकबंद पोते स्वारी रा पंतप्रधान

समान सलासीन

छ २० साबान 2-12-1737

खासुदगी ६९००० रवाना कोंकण बराबर विठल सिवदेऊ
८००० माहीम निा रामचंद्र हरि याजकडे
४००० तारापूर निा वासुदेव हरि व रघुनाथ हरि
२००० विठल विस्वनाथ याजकडे

२५०० पंताजी मोरेश्वर याजकडे
३०००० ठाणे साष्टी दिा खंडोजी माणकर
२२५०० वसई संकराजी केशव

६९०००

छ २१ साबान *3-12-1737*

रवासुदगी राजश्री खंडोजी माणकर याजकडे साष्टीस बरवाजी ताकपीर याजकडून गोल्या देविल्या २५००० बंदुखेच्या
२००० जेजालांच्या

२७०००

सिलिकबंद पोते छ १४ साबान स्वारी रा
पंतप्रधान समान सलासीन. *26-11-1737*

खर्च रुा
शामराव पारसनीस याची स्त्री सईबाई यासी खर्चास

रवासुदगी
सईबाई शामराव पारसनीस याची स्त्री यासी रुा ५०

स्वारी पंतप्रधान
समान सलासीन

खर्च पोतापैकी माहे सफर
मातुश्रीस बरे वाटत नाही वेथा जाहली सबब (ज्वरशांतीबद्दल उदकशांत व म्हैसीदान वगैरे केल्याच्या नोंदी आहेत).
१ देहनगी देणे जिवाजी न्हावी राजश्री जनार्दनपंताचे चेऊल केले सबब.

स्वारीपंतप्रधान समानसलासीन
२ जिलकाद *11-2-1738*

रवासुदगी खर्च गुा सिवराम कृष्ण
९० छ २ रमजान पाथरवट रवाना किले अर्नाळा ताा
नारो कृष्ण जोग.

२५० ऐवज रा। खंडोजी माणकर याजकडे रवाना साष्टी छ
८ रमजान

६० देणे सुतार रवाना वसई छ २९ रजब

११ फरास बा। स्वारी मातुश्रीबाई भीमाशंकरास गेली त्यास छ २९ रजबू

छ ४ जिलकाद *13-2-1738*

खासुदगी

पिलाजी जाधवराव सिलेदार याचे नातवाचे लग्नाबद्दल दावल रुा। १५००

छ ८ जिलकाद *17-2-1738*

खर्च रुा।

१०० किले आसावा दि॥ विठल विश्वनाथ जमा वाजगस्त येथे गला तारापुराहून लुटीचा पाठविला जिलकाद छ ९ त्यास मजुरी दिली रुा।

जमा पोत।

दफाते किले तांदुलवाडी व किले कालदुर्ग व ठाणे कोट मनोहर हे तीनी जागे रुा। होनाजी बलकवडे याचे स्वाधीन करणें म्हणून विठल विश्वनाथ यास सनद

छ २१ जिलकाद *2-3-1738*

खर्च रुा। (या सदरात धारावीस जखमी झालेल्याना रुा। दिल्याच्या नोंदी आहेत).

छ २५ जिलकाद *6-3-1738*

खासुदगी श्रीपत विठल वकील यांस चि॥ रा। बाळाजी बाजीराऊ मु॥ सातारा याजकडून देविले रुा। ५००

सिलिकबंद पोते स्वारी रा पंतप्रधान
समान सलासीन

छ १ रावल 18-6-1737

खर्च रुा

९ मानाजी अनंत मनवर दिा सिवाजी कृष्ण हशम याची घोडी मुर्धे याचे झुंजात जखमी जाहाली सबब खर्चास

छ ८ रबिलावल 25-6-1737

दफाते रामाजी माहादेव हशम यासी अफ्तागीर दिले त्यास तैनात ९ पाच सिरस्तप्राा पावणे म्हणून सनद खंडोजी माणकर यासी १

स्वरी पंतप्रधान

छ १ सवाल 11-1-1738

खासुदगी

देणे हशम माहिमास ठार जाले त्याचे क्रियेस देविले रुपये
२०० महादाजी केशव
५० गणेश हरि कारकून हशमनिसी
———
२५०

सिलिकबंद पोते छ ६ मोहरम 15-4-1738
स्वारी रा पंतप्रधान समान सलासीन
१२७५ बाजी भिवराऊ रा लग्नास
१००० लग्नास
२७५ रोजमुरा

छ २० मोहरम 29-4-1738

खर्च रुा ४ भिवराव अनंत देणे जखमी

सिलिकबंद पोते स्वारी पंतप्रधान
समान सलासीन

छ २० जिल्हेज 30-3-1738

४४। मजुरी पेंढारी साष्टीच्या माड्या पडिताहेत त्यास आसामी ३९४ दर ८= प्रा रोजमुरा मजुरी

छ २२ जिल्हेज 1-4-1738

१४ गवंडे इमारतं ठाणे कोट साष्टी दिा खंडोजी माणकर रवाना वसईस संकराजी केशव याजकडे अरनालियास पाा त्यास रोजमरा माहे मोहरम

७ इस्तोकरास
७ जुजसोस
—
१४

छ २४ जिल्हेज 3-4-1738

१९७।– रवाना वसई संकराजी केशव याजकडे पाठवावयास खरीदी गला केला गहू जुने कैली बारुले मापे खंडी ३८१।।=

सिलिकबंद पोते स्वारी राजश्री
पंतप्रधान समान सलासीन

छ ३ मोहरम 12-4-1738

खर्च रुा

११० विक्रम पतगराव जवारकर राजे खर्चास

छ ९ मोहरम 14-4-1738

खर्च रुा

ॐ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहपूर्वक कविकलश छंदोगामात्य आसीर्वाद. सुाा सन खमस समानीन आलफ मोरो विठल देशकुलकर्णी प्रांत मजकूर हुजूर येऊनु विदित केले कीं कारकीर्दी राजश्री माहाराजसाहेब व कारकीर्दी राजश्री कैलासवासी स्वामी यांचे कारकीर्दीस देशमुख व देशकुलकर्णी परगणे मजकूर यांचा हक व इनामती दुमाले करून दिवाणात इनामती खंडणीची मोईन होनु पो ४०० च्यारिसे बि ताा

निसबत देशमुख	निाा देशकुलकर्णी
३०५	९५

येकूण च्यारिसे होनु पाा घेत असेत. हकाचे व इनामतीचे दस्त कमतर पडले तरी सदर्हु च्यारीसें होनु जो हक व इनामती दस्त होईल त्याजवरी वांटून दस्त माफीक इनामती खंडणीची बेरीज बैसली, ते देसमुखाचे निसबतीने देशमुखापासून घेताहेत व देशकुलकर्णीयाचे निसबतीने जे बेरीज बैसत असली ते देशकुलकर्णीयापासून घेत असेत. येणेप्रमाणे आजीतागायेत चालत आले आहे. हाली प्राा माा खराब पडले आहे. दस्तमाफीक इनामती खंडणी देशमुखा-

१ हीन, निकृष्ट. २ जोडावरहि हीच मोहोर आहे.

पासून देसमुखांची व देशकुलकर्णीयाची देशकुलकर्णीयांपासून घेतली पाहिजे, म्हणऊन अर्ज केला. ऐसियासि माहाराजसाहेब यांचे कारकीर्दीस व राजश्री कैलासवासी स्वामी यांचे कारकीर्दीस देशमुख देशकुलकर्णी याचा हक व इनामती दुबाले करून इनामती खंडणीची मोइन होनु पा। ४०० च्यारिसे नि।। देशमुख ३०५ तीनसे पांच व नि।। देशकुलकर्णी होनु पा। ९५ पंच्याणवद येकूण होनु पा। चारिसें घेत असेत. हकाचे व इनामतीचे दस्त कमतर पडेल तो सदरहू च्यारिसें होनु जो हक व इनामत दस्त होईल त्याजवरी वांटून दस्त मवाफिक इनामती खंडणीची बेरीज बैसेल ते देसमुखाचे निसबतीने देसमुखापासून घेत जावे. देशकुलकर्णी-याचे निसबतीने जे बैसेल ते देशकुलकर्णीयापासून घेत जावी म्हणून राजाज्ञेची सनद आलाहिदा सादर आहे तेणेप्रमाणे चालवणें. देशाई देशकुलकर्णी यांचा हक व इनामती दुमाला करून दिवाणांत इनामती खंडणीची मोईन च्यारिसे होनु पा। घेत आहेत. येखादे माहाराज साहेबाचे आज्ञापत्र व राजश्री कैलास स्वामीची आज्ञापत्रे असतील ते रुजू घालून हाली राजाज्ञेकडून सनद सादर आहे, तेणे-प्रमाणे वर्तणूक करणे. जाणिजे रा। छ २९ रबिलाखर या पत्राची तालीक लिहून घेऊनु असल सनद देशकुलकर्णी मानइलेकडे परतोन देणे. जाणिजे पा। हुजूर

(पत्राचे मागील बाजूस)

रा। छ ९ रजब सन सीत समानीन अलफ.

विधिरर्थिमनीषाणा- मवधीर्नयवर्त्मनां शेवधिः कार्यसिद्धीनां मुद्रा कलशहस्तगा

¶*This is an order issued by Kavikalash, Minister of Sambhaji, › Babaji Tandeo Subha of Poona allowing certain rights and emoluments to the Deshmukhs and Deshkulakarnis of Poona, that is to say such rights and emoluments as had been already granted by Shahaji Maharaja and Chhatrapati Shivaji. This is the first specimen of the seal of Kavikalash to be discovered and is, as far as is known, unique. It deserves careful study.*

No. 45]

[*1686*?

पुणे जमाव रू. नं. १९४

वालाशान महमद

माज्यम बाबा नूरशाहा

बो मुलांअली बीन मुलांअबला मुलां खिजमती मसीद मौजे भांबवडे प्रा। मोहियाबाद उर्फ पुणे सरकार जुनर सुभे खुज्यस्ते बुनियाद बमोजीब

निशाण व परवाने जाती अमिरलउमराऊ ग्याजदीखान बाहादुर फेरोज्यंग व बेनिजाम व येदिलन इनाम मदद्माशकीर्दी करून तेथील महसूल बरहुकूम दस्तुर अमल इनामदार मजकुर पावेत असे. कलमी सुद.

¶Ghazi-ud-din Khan Feroz Jung is granted lands at Bhambavde (or Bhamburda) near Poona. The grantor is father of Nizam-ul-mulk—and the paper may belong to King Sambhaji's reign.

No. 46] [*1688?*

कोकण रु. नं. ९२९

श्री

मौजे कोतळुक व मौजे मासू ता। वेलब हे दोनी गाव विठोजी सिर्के याची भावजय कासीबाई यास मुकासा राजश्री संभाजी राजे यानी दिल्हा होता. कोतळुकात सिर्के याची पागा येऊन राहिली. दाणेकरी गावगना जाऊन बलात्कारे दाणे खल्यावरून भरून नेईत. कोणाचे न यैकत. मुलकात जबरदस्ती करीत. मौजे मासू हा गाव हरबा देसाई याजकडेस बाधेरितीने खोती होती बावलतुरवटे येथील भात काढून येक वेल दोन वेल नेहले. देसाई याचे माणसासी व सिर्के याचे राऊतासी कटकट जाहाली. सिर्के याचे राऊतानी धर्मा माहार कवटेकर दाणेचे रखवालीस देसाई याजकडून होता, तो मारून पेळ्यात घातला आणि खल्यास व माहारास आग दिल्ही. ते वर्तमान देसाई यास कल्यावर कोतळुकास जाऊन सिर्के याची पागा होती ती मोडून टाकिली, आणि तैसेच संगमेस्वरास राजश्री संभाजी माहाराजापासी जाऊन वर्तमान निवेदन करून सिर्के याजकडे मोकासा काढून प्रांताप्रमाणे सरकारात गाव ठेविले. कलम १

ते समयी हरबा देसाई यास पिलाजीराव चव्हाण देसाई कलबूसकर याणी माहाराजापासी नेऊन उभे करून सिर्के दावा करतील तरी सिर्के यास प्रयोजन नाही. कलम १

कसबे वेलब व मौजे मलण या दान गावच्या सनदा सिर्के याणी मोकासा म्हणोन करून घेतल्या होत्या, ते समयी बहीरवगडास अमल त्रिबक परशराम

आपासाहिब याचा होता तेंव्हा वेलब व मलण हे गाव मातोश्री राधाबाई प्रतिनिधि याजकडे खासगीकडेस हरदू गाव केले. सिर्के याची मोकासिची दखलगिरी होऊ दिल्ही नाही.

कलम
१

¶*A complaint is carried to King Sambhaji against Vithoji Shirke for having devastated the villages granted by the King to Kashibai, sister-in-law of the Shirke. The paper shows that Sambhaji was not in hiding at Sangameshwar at this time.*

No. 47] [*30-9-1689*

रु. नं. ४६१ परत करावयाचे

[फारशी मजकूर] [फारशी सहा सिक्के]

दा। दुर्गोजी रविराऊ पायगुडे देसमुख कर्याती मावल
दा। जैतजी नाईक करंजवणे देसमुख कर्याती मावल

दा। मोरो बलाल देशपाडिये परगणे खेडेबारे
दा। नागोजी नाईक कोडे देशमुख परगणे खेडेबारे (फारशी शिक्का)

(येथें आरंभीं तीन बंद फारसी मजकूर आहे.)

सुरत मजलस अज करार बतारीख २५ शहर जिल्हेज सन ३३ जुलूसवाला मुकाम लस्कर जफर असर मौजे तुलापूर दर किनारे लबी आदा भिवरा वाके आस्त बाहुजूर शरयेत व फजीलतपन्हा हजरत काजी महमद परगणे पुणां व जमी मुसलमाना व जमीदारां सरकार जुनेर सुबे खोजिस्तेबुनियाद करंजवणे व पायेगुडे देसमुखांनी व मोकदमांनी व रयां व पटवारी यानी तरफ कर्याती मावल सुतालिके पा। मजकूर इजहार साख्त कीं देस पांडेगिरी तरफ मजकूर अज कदीम लयांम अबद मुदती जदक लाणियां होनप नामी बुनियाद कुरसी व दर कुरसी व दर कुरसी पिढी दर पिढी पदरानी पिसर बनाम रामाजी विठल अज अहद बारीद वालो बलदे बेदर मुतसरफ असतां बाप फौते रामाजी विठल पिसरांनी बनाम तान्हाजी रांनअज अहुदे देसपांडेगिरी मुदता अहद निजामनमुल्क मुतसरफ असे. तरफ मजकुरीं गपचूप नामे गुमास्ते ठेविले असतां बनाम कृष्णाजी व

विठावा लांडा सेकीन सजोपूर व कलांबे व इडमिडे पाईन किले वैराटगड तरफ वंदन देस पाा कऱ्हाड येथून दोघे भाऊ बमये कबिला मुसाफीरपणे येऊन दर कसबे पुणां सुखवस्ती राहिले. कृष्णाजी व विठावा लाडियाने आपलीं मुले तान्हाजी राम देसपाडे पाा मजकूर यांचे दफ्तरीं शागरीदपणें लेहों घातलीं. अज कृष्णाजी द पिसर बनाम बाळाजी व नामाजी व अज विठोजी येक पिसर नरसावा हुनर निविसींदगी मस्तुद होवयाबदल लिहीत असतां सदरहू तिघें मुलें पैकी विठावाचा मूल नरसावा ठकारानी मौजे डोणजे व मौजे गोऱ्हे खूर्द कर्याती मजकूर पांच कुडवीनें कुलकर्णावरी गुमास्ता ठेविला. कृष्णाजीचा धाकटा लेक बनाम नामाजी लांडा लिहिणार सरंदाज देखोन पेशजी गुमास्ते गपचूप अज तगीर करून नामाजी लांडीयास गुमास्तगिरी देऊनु कर्याती मजकुरास पाठविला असतां हकलाजिमा व सिरस्ता कागद तान्हाजी राम देसपांडीये पिसरानी मोरा तानदेऊ देसपांडिये यांस देत गेला, नजर बदलीली नाहीं. तान्हाजी राम व मोरो तानदेऊ होनप देशपांडिये व नामाजी लांडा गुमास्ता हैयात हाकजा इलाही फौते गुदरोन गेले. बाजद चंदरोज फर्जंदानी नामाजी गुमास्ते बइसीम आपाजी तुकावा अंतावा यादव रंगावा सदरहू दर सरकार सिवाजी भोंसले नौकर शुद यादो नामदेऊ ममलकत मदारूल माहामीं दिवांण संभाजी राजे भोसले दिगर बिराजरांनी आपाजी व अंताजी हर कारबार मुलुकगिरी व लस्कर गईमामले करून बख्तावार होऊनु आपले वतन म्हणऊन जोरावारी करू लागले. दिगर हिमाती निलो सोनदेऊ अज दिवाण सिवाजी राजे भोसले यांचे सगे खे सोइरे सदरहू अमला फैला असतां दिलीहून पातशाही फौजा दक्षणेवरी मोहीम दारी कादा नवाब उमदतुल मुल्क अमिरल उमराय दर कसबे पुणां दाखल. सात रिकेब बाबाजी रांम देसपांडे असतां तमाम मोकदम व रयां कर्याती मावल येऊनु रुजू होऊनु मुलाजमल कौल व सिरपाऊ सरफराजी जाली. हक व लाजिमे व सिरस्ते कागद ताा मजकूर मुतसरफ असतां आपाजी व तुकावा पिसर नामाजी लांडियास मोकदम व पटवारी म्हणत असेत कीं हक व लाजिमा सिरस्ता कागद बाबाजी राम देसपांडिया कर्याती मजकूरचा घेत असतां तुम्हीं आम्हासी नाहक घसघस करिता, तरी हे गोष्टी वाजीब दिसोन येत नाहीं. तो नवाब अमीरलउमराय बमये सुबे मुलाजमत हजरती देहली कूच होऊनु दिलीस गेले. तो सुबे मिर्जाराजा पाईन किले पुरंदर बमयलस्कर घेरा घालून सिकंदा केला ते वख्ती सिवाजी राजे भोसले मुलाजमतीस येऊनु किले व मुल्क दौलत काइरे मुबारक दाखल जाला. तमाम जमिदारानीं व देसमुखांनी व देसपांडे यांनीं व मोकदमानी पाा पुणा व कर्याती मावल व बारा मावले ते वख्ती

हुजूर मिजा राजा सिवाजी राजे अर्ज हसबूल इलतमास करून वतन
ोनू ३००००० तीन लाख बर करार जाले. पैकी अज जुमले वतन कर्याती मावल
ाखल केले ते वख्ती मोरो विठल व बाजी राम देसपांडिये याणीं सिवाजी राजे
ाहेबास अर्ज केला कीं तर्फ कर्याती मावल देसपांडेगिरी अहाद मुदती कदीम
याम आपलिया वडील वडिलांची आहे. पिसर नामाजी ब इसम आपाजी वगैरे
मास्ते आपले आहेत. आपणासी नजर बदलून खुद देसपांडेगिरी आपली म्हणत
ाहेती. तरी साहेबी मेहरवान होऊनु आपणां हुजूर जमीदार बारा मावले व कर्याती
वल बोलाऊनु त्यांचा व आपला इनसाफ करून सनद देसमुखानी व मोकदमानी
पटवारी यानी ताा कर्याती मावल मऱ्हामत केली पाहिजे. त्यावरून इफ्तदाय
माजी लांडा गुमास्ता हकीकत बंदगीस जाहीर केली, त्यावरून सनद दिधली
ये मजमून कीं, हमेशा होत गेला बाजद सिवाजी राजे फौत होऊनु कैलासवास
श तो यादव पिसर नामाजी नौकर सभाजी भोंसले बमय लस्कर सुबे चंदी
करनाटक मुल्क ताखताराज करून जमीदार व पुंड पालेगार यांचे सिरीं तोफ
घेतां दरम्याने यादव नामदेऊ बख्तावार होऊनु मुदमती मबलग नजर बदलों
गली. तों आपले करमदा देसमुख तालेये दिल्हे. अज लस्कर मनसूर ज्यफर
तरके अवलीयां ये दौलत काहिरे मुकाम फरखुंदे बुनियाद अवरंगाबाद असतां
ा गाजुदीखान बाहादूर फेरोज्यंग दर पुणे अमदरफ्त सात रिकेब बाबाजी राम
पांडे तमाम मोकदमानी पाा पुणां व कर्याती मावल मुलाजमत बंदगानी नवाब
हेब कौल सिरपाव व सरफराजी ईवख्त हक व लाजिमे व सिरस्ते कागद
स्तूर साबीक बाबाजी राम देसपांडिये अमल दखल करून मुतसरफ असतां
ापूर व भागानगर फते करून दर सन १०९९ रायात अलीयात बंदगान
रती दिलसुभानी दर मौजे तुलापूर मुकाम जाला. तमाम जमीदारांनी व
मुखानी व देसपांडियानी व मोकदमानी व रयात्ती पाा पुणां व बारा मावले वगैरे
कचेरीवाला रुजू होऊनु अर्बा व अदालत बदरगाहा अस्मानज्याहा दिलसुभानी
जूर करामत गंजूर मुलाजमत होऊनु सिरपाव व कौल सरफराजी जाली, ते वख्तीं
राहा देसमुखानी करजवणे व पायेगुडे कर्याती मावल व मोरो विठल व रामचंद्र
ाजी देसपाडिये होनप ताा मजकूर सिरपाव व कौल सरफराजी जाली. ते वख्ती
ाजी पिसर नामाजी हाजीर होता त्यास कर्याती मावलीचे देसमुख व मोकदम व
वारी म्हणों लागलें कीं, ये सर जमिनेल पातशाह ये जिल्हे येऊनु मुकाम जाला.
ण प्रांतीचे जमीदार जमा जाले आहेत, गरीब व बख्तावार बरोबरी आहे. ती
हावरी जुलूम जाजती होत नाही. होनपांसी वाद सांगा, तुझें होईल, तूं खाणें,

होनपांचे होईल होनप खातील. त्यास आपाजीने जाब दिधला की त्यांचा आपला कथलाच नाहीं. त्यावरून पातशाही सनद देसपाडेगिरी तरफ मजकूर बनाम मोरो विठल व रांमचंद्र बाबाजी मऱ्हामत सेवक व शाहादीनामे बमोहर व बदसखत जमीदारां जुनर व चाकण बारा मावले वगैरे बहजूर पुरनूर बदस्त दारंद बदस्तूर साबिक अदाय अंज्याय कर्याती मजकूर मुतसरफ शाहादीनाम करून दिधला. सदरहूप्रमाणे दरबारीं हकीकत गुदरलीयावरी मोरो विठल व रामचंद्र बाबाजी होनप देसपांडियास कर्याती मावलीच्या देसपांडेपणाचा महजर करून दिधला. अहद मुदतीपासून होनप नांमी जदकलाणी बुनियाद कुरसी व दर कुरसी पिढी व दर पिढी पदरजाती पिसरानी व फरजेंदानी लेकरांचे लेंकरीं हक लाजिमा व सिरस्ता कागद राखोनू कर्याती मावलीची देसपांडेगिरी मुतसरफ असतां पेस्तर अवलादी अफलादी मुतसरफ होऊनु सुखी असणें. बिनाबरा इंच्यंद कलमे बतारीख सुरत मजलसी हर महजर सही.[१]

¶*The Emperor Aurangzeb's settlement of a dispute between the Honap Deshpandes of Poona. It is an interesting document for various reasons.*

No. 48] *[18-11-1689*

जमाव रु. नं. ४७

आलमगीर

श्री सके १६११ सुक्लनाम सवछरे मार्गेश्वर वदी बीज ते दिवसी खत लिखिते धनको नांम मोरो विठल होनप देसपाडिये ता। कर्याती मावल पा। पुणे, रिणको नाम दुर्गोजी पायेगुडे वगैर पायेगुडे व जैतजी करजवणे वगैरे करजवणे देसमुख ता। मजकूर सन हजार १०९९ खत लेहोन दिधले यैसेजे. आपणामधे व सितोलियामधे ता। मजकुरीचे देसमुखीचा वाद मुकाम तुलापूर बदगाहा याचे दरबारी पडिला ते वख्ती वाद सांगोन सनद असनंद करावयाबद्दल तुम्हापासून साहुकाराचं कर्ज काहाडविले, रुपये ३२०० तीन हजार दोनीसे पैकी तकसीम निमे रामचंद्र बाबाजी देसपाडे ता। मजकूर रुपये १६०० बाकी निमे रुपये १६०० तुमचे खासगत ता।

पायेगुडे बमारुफाती	करजवणे बमारुफाती
दुर्गोजी वगैर रुपये	परसोजी व तुळाजी
८००	रुपये ८००

येकूण रुपये सोलासे घेतले असेती. यासी मुदती वरसे पांचा वसूल करून. वसूल करू न सको तरी दरमाहे दरसेदे रुपये ९ येकूण रुपये ८० आसी दरमाहेप्रमाणे

---

१ जोडावर पायगुडे व करंजवणे देशमुख यांचे शिक्के.

बेजनसी देऊन हे पैके घेऊन मग खत दिधले आसे. भरणाची गरज नाही हे लिहिलें सही

पायेगुडे — करजवणे

शिका — सिका

अस्पष्ट — अस्पष्ट

यासी उगवणीस जमान — देउजी पाटील

कृस्णाजी पाटील — मो मौजे भुकूम

मोकदम मौजे सूस

नांगर

येणेप्रमाणे खत लेहोन दिधले आसे. यासी आनेथा करू तरी गौहत्या ब्रह्महत्या व वाराणसीस मात्रागमन केलियासी सफेत आसे. हे लिहिले सही

गोही

मोकदम ता — मोकदम ता॥

पायगुडे — करजवणे

[मराठी मजकुराच्या वर १९/२० ओळी फारशी मजकूर आहे व त्यावर फारशी शिक्का व त्यावर १ फार्शी ओळ आहे.]

¶*A deed executed with reference to a debt contracted by Durgoji Paygude from Vithal Honap Deshpande.*

No. 49] *[18-5-1690*

. भट परबणीकर गोत्र लोहित सूत्र अपस्तंभ वास्तव्य कसबा शाहागड गोदातीर यासी दिल्हे वर्षासन पत्र ऐसीजे. तुम्ही शाहूनगर नजीक किले सातारा येथील मुकामी स्वामीसनीध येउन निवेदन केले जे, माहाराज स्वामी पातशाही सैन्यात होते ते समयी आपले बाप सखंभट स्वामीच्या दर्शनास गेले ते समयी कसबे मजकुरी लक्ष्मीतीर्थ गोदातीर येथील तीर्थ पुरोहितपण करून देहून शालीवाहन शक १६१२ प्रमोद संवत्छरी वैशाक वद्य पंचमीस पत्र करून दिल्हे जे क्षेत्र मजकुरचे तीर्थ पुरोहितपण तुम्हास दिल्हे असे. आम्ही व आमचे वंशपरंपरागत क्षेत्रास येतील त्याचे तीर्थपुरोहित तुम्ही व तुमचे वंशपरंपरेने चालवणे. तुम्हास वर्षासनही करून देऊ म्हणून पत्र करून दिल्हे. त्या उपरी * * (स्वामी) स्वराज्यास आले.

¶*Shahu confirms Parbanikar as priest at Laxmitirth on the Godavari. The letter is mutilated. The original date is here give*

No. 50] [12-12-1690

पुणें जमाव, रु. नं. ३९२.] नकल.

श्री

सिका चवकोनी.

अभयेपत्र स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके १७ प्रमोद नाम संवछरे मार्गसीर्ष बहुल सप्तमी भृगुवासरे रामजी नाो चिव्हे व जनकोजी नाो चिव्हे व सावजी पाा व तुळाजी नाो ढगारे व तुकोजी नाो काळकूड व समस्त कोळी व खंडोजी मिसाळ किले पुरंदर यांसी राजआज्ञा ऐसीजे. तुम्हास पुरंधरगड घ्याव(या)चे काम सांगितले आहे. त्यास तुम्ही विनंती केली की, साहेबाच्या हुकुमाप्रो गड घेऊन देतच अहो. परंतु किल्याचा घेरा अहे तो उकरून खावयासी साहेबी मेहरबान होऊन दिल्हा तरी खाईन. खाइम काम करून देतच अहो म्हणौन सांगितले. त्याजवरून तुम्हास मेहरबान होऊन कौल दिल्हा असे. तुम्ही पुरंदरगड घेऊन देणे. तुम्हास घेरा उकरून खावयाकारणे दिल्हा असे. यास आंतर होणार नाही. या गोष्टीस केदार पुरंदर या देवाची शफत असे. आन्यथा होणार नाही. येविसी आभये असे. छ २० रौवल सुाा इहिदे तिसैन अलफ. आज्ञा प्रमाण. मोर्तब चवकोणी.

¶*King Rajaram directs Ramji Naik Chive and others to capture back the fort of Purandar.*

No. 51] [August 1691

पुणें जमाव, रु. नं. २९०.]

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके १८ प्रजापति नाम संवसर श्रावण बहुल चतु

क्षेत्रियेकुलावतंस श्रीराजाराम छत्रपति याणी

ेशमुख व देशकुलकर्णी व गावकुलकर्णी व (मोकद)म व चौगुले व सेटे ाहाजन व बाजे तपे कानदखोरे यासी दिल्हे अभये पत्र यैसें जे. माा र्जाराऊ जेधे देशमुख ताो रोहिडखोरे हे स्वामीसंनिध चंजीचे मुकामी येऊन ेदित केले की, तपे मजकुरचे वतनदार लोक रयत देखील स्वामी(चे पायासी) येकनिस्ठ आहेती. तरी स्वामीने कृपाळु होऊन वतनदारास वतने पहिले निजामशाही व येदिलशाही याचे कारकीर्दीस चालत होतीं तेणेप्रमाणे चालवावयाची आज्ञा करून अभयेपत्र देवविले पाहिजे म्हणौन. तरी तुम्ही स्वामीचे

पायासी येकनिस्ठ आहा, या गोस्टीवरून स्वामी तुम्हांवरा सताशा आहता. त्या प्रांतीच्या राज्याच्या •कार्यभागास स्वामी(नी राजश्री) रामचंद्रपंत अमात्य व राजश्री शंकराजीपंत सचिव ठेविले आहेती. त्यावरी यख्तियार आहे. तेहि तुमचे वर्तमान मनास आणून वतनाचा निर्वाह करून सनदा दिधल्या असतील त्या स्वामीच्याच सनदा आहेत. त्याप्रमाणे स्वामी चालवितील. आपले समाधान असो देणे. मावळ प्रांत राजश्री शंकराजीपंत सचिव याचे दिमतीचे मुलकात आहे. याकरितां तुम्ही त्यांचे आज्ञेप्रा वर्तणूक करीत जाणे आणि स्वामिकार्य करून आपला मुजरा करून घेणे. पुढे स्वामी त्या प्रांते येतील तेव्हां तुमचे ऊर्जित करितील. अभये असे. जाणिजे. निदेश समक्ष

रुजू. सुरु सुद बार.

¶*Rajaram assures the sardars of Mawal that their vatans would b continued to their heirs and that Ramchandrapant was instructed to tha effect.*

No. 52] [*6-9-1691*

इनाम कमिशन
रु. न. ८२७

श्रीराम

आज्ञापत्र समस्तसेनाधुरंधर राजमान्य राजश्री संताजी घोरपडे सेनापति ताा मोकदमानी व सेटे माहाजन समस्त माहानाडानी कसबे कऱ्हाड सुाा इसने तिसैन अल्फ. सिऊसेट याणे पूर्वी इदलशापासून सरसेटेपण वतन करून घेतले आहे. यैसियासी आमच्या राज्यात नवी वृती दुमाला करावी यैसा दंडक नाही. यानिमित्य त्याचे सरसेटेपण अमानत केले असे; तर तुम्ही त्यास हक येक रुका न देणे. जो हक असेल तो जमा करविला असे. कमाविसदाराच्या गुाने हक जमा करणे. उजूर न करणे. छ २२ जिल्हेज मोर्तब सुद.

¶*Santaji Ghorpade issues orders to all mukadams informing them that the vatan of Shiv Shet has been confiscated and that the dues thereon should not be paid to him.*

No. 53] [27-3-1692

कोंकण जमाव रुमाल नंबर ४९७

पैा छ १५ रमजान असल बा नकल.

श्री

मशरूल अनाम रामाजी बावाजी हवालदार व कारकून वर्तमान व भावी तपे संगमेश्वर प्रांत राजापुर यांसी रामचंद्र नीलकंठ अमात्य सुहुर सन इसने तिसैन अलफ. राजश्री केशव भट बिन दामोदर भट पुरोहित यांच्या मुखे राजश्री संभाजी राजे छत्रपति याणी श्रीरामायेण प्रयोगरूप श्रवण केलें, याकरितां भट गोसांवी यासीं पुत्रपौत्री धारादत्त दान सोळासे लारी दिल्ही आहे. त्याची सनद सन खमस समानीन सीर आहे. त्यामध्यें पंधरासे सवा नव्यासी लारीची ठिकाणें भट गो याचे स्वाधीन करविली आहे. ती त्यांचे दस्त राजभाग होईल तो भट गो याचे वृति पत्राप्रों साल दरसाल खर्च लिहीत जावा, ऐसी आलाहिदा सनद सादर आहे. त्यापैकी भट गोनी ठिकाणें कमावीस करीत असतील ती असतीलच. सनदेपैा जी ठिकाणे कमावीस करीत नसतील ती त्यांचे दुमाले करणे हे कमावीस करितील. त्याचा दस्त जो होईल तो बा सनद ते घेत जातील. मीरजुमले (?) सोलासे लारी बा सनद देविली आहे ती त्यांमधें लारी दाभोली १५८९। याची ठिकाणे देविलीं आहे ती बाकी १०॥। लारीची ठिकाणें भूमि नेमून द्यावी ते तुम्ही माहालीहून ठिकाण नेमून देणे म्हणून सनदेत लिा आहे; तरी सनदेप्रो पावणे अकरा लारीचे ठिकाण भट गो यांचे स्वाधीन करणे. तुम्ही दखल न होणे. जो दस्त होईल तो त्याकडे खर्च लिा जाणीजे छ १६ रजब. या पत्राची तुम्ही ता(ली) क लिहून घेऊन असलपत्र भट गो याजवळ परतोन देणे. जाणिजे छ १८ रजब पार हुजूर मोर्तब असे.

बार सुरू सुद बार

¶*Ramaji Bawaji Hawaldar of the district of Sangameshwar is asked by Ramchandra Nilakanth Amatya to hand over certain landed estates to Keshav Bhat Purohit who performed the story of the Ramayan before Sambhaji Raje Chhatrapati and who received on that account from the King a reward of land yielding a yearly revenue of 1,600 laris.*

+ सादर

No. 54] [3-2-1693
रु. नं. ११४९
कैलासवासी

श्रीमार्तंडभैरव

राजेश्री गंगाजी नारायेण सुभेदार व कारकून वर्तमान भावी सुभा प्रांा पुणे गोसावी यासी

॥ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्ये सेवक शंकराजी नारायेण सचिव सुा सलास तिसैन अलफ. राजश्री म्हालोबा गोसावी वास्तव्ये मौजे जेजुरी यासी वरसासन गला माहाल मापे खंडी येक १ पूर्वीपासून राजश्री स्वामीपासून भोगवटा चालत आला आहे, त्यावरून तुम्हास सनद सादर केली असे, तेणे-प्रमाणे साल दरसाल वउंशपरंपरा चालत आले आहे तेणेप्रमाणे चालवीत जाणे. नूतन पत्राचा आक्षेप न करणे. तालीक लेहून घेऊन असल पत्र भोगवटीयासी मशारुनइलेपासी देणे जाणीजे. छ ७ जमादिलाखर

¶*Shankaraji Narayan Sachiv grants an annual allowance to Mahaloba Gosawi.*

No: 55] [3-3-1693
जमाव रु. नं १५५०

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिशक शके १९ अगिरानाम सवतसरे फालगुण सुध सप्तमी भृगवासरे क्षत्रिये कुलावतस श्रीराजाराम छत्रपति याणी माां खंडोजी बीन दमाजी थोरात देशगावडे प्रा पुणे सां जुनर यासी दिले वृतिपत्र यैसेजे. तुम्हं चंजीचे मुकामी स्वामीसनिध येऊन विनती केली की आपली वृति पुरातन देशगावडकी प्रा पुणे सा जुनर आहे, आपले वडीलवडील वोशपरंपरने वृति अनभावित होत. त्याउपरी मधे भोगवटा काही दिवस राहिला. ऐसियास स्वामी करनाटक प्राते आलियानंतर राजेश्री रामचंद्रपंडित आमात्य व राजेश्री शकराजीपंत सचिव या उभयेतासी वृतीचा प्रसग करून आपली वृति महत्कदीम चालिली होती म्हणऊन उभयेताहि आपली पत्रे करून देऊन वृती चालवावेयास आज्ञा केली, तेणेप्रमाणे आपण देशगावडकीचे वतन अनभवीत आहे आणि या वतनानिमित्य आपण दिवाणात सेरणी उभयेताकडे दिल्ही आहे रुपये ३०००

राजेश्री आमात्यपताकडे दिले	राजेश्री सचिवपताकडे दिले
२०००	१००

येणेप्रमाणे तीन हजार रुपये देउन वृति अनभवीत आहे. तरी वृतीचा विशये स्वामीचे पत्र आसिले पाहिजे यास्तव पत्र उदेशे कर्नाटकात स्वामीच्या पायापासी आलो

आहे. यैसंयास माहाराज धर्मप्रभु प्रजापालक आहेत आपणावरी कृपालु होऊन देशगावडकीचे वृतिपत्र करून द्यावेयास आज्ञा केली पाहिजे म्हणौन स्तुत केले. त्यावरून मनास आणिता तुमची देशगावडकीची वृति पुरातन आसों तरी तुम्ही प्रा पुणे सा जुनर येथील देशगावडकीचे वतन तुम्ही व तुमचे वौशपरंपरेने आनभऊन वतनाची सेवा करून आसणे. या वतनास हक व लाजिमा सालिना मोईन बीा

नख्त दरगावास होन पातशाही १८	घुगरिया दरगावास माहाल मापे मण ८१	तूप दर गावास वजन ८८२
मेढराच्या कलपास कलप माफीक लहान थोर पाहून दर कलपास बकरे १	धणगराच्या मागास अवल दूम सीम पाहोन घोगडे १	लोहकर दर कलपास वजन ८८५ चाभाराच्या दुकानास पायेपोश जोडा १

येकून नख्त दर गावास येक होन पातशाही व घुगरिया दर गावास माहाल मापे येक मण व तूप दर गावास वजन दोनी सेर व मेढराच्या कलपास मेढरू येक व धणगराच्या मागास घोगडे येक व लोहकरी दर कलपास पाच सेर व चाभा-(रा)च्या दुकानास पायोपोश जोडा येक येणेप्रमाणे हक लवाजिमा मोईन करून दिल्ही आसे. सदरहूप्रमाणें हक लवाजिमा घेत जाणे आणि तुमचे पुत्रपौत्रादि वौशपरपरेने वतन आनभऊनु वतनाची सेवा दडकप्रमाणे करीत जाणे. यास कोणी अन्यथा करील त्यास हिदुस कासीत गोहत्यचे पातक व म्लेछास मकेत सवर मारल्याचे पाप. हे जाणूनु तुमची वृत्ति तुम्हास चालवितील व तुम्ही आनभऊन आसणे जाणिजे.

¶*King Rajaram grants a vatan at Junnar to Khandoji bin Damaji Thorat and gives details of rights to be exercised by the grantee.*

No. 56] [*5-3-1693*

सातारा जमाव रु. नं. ७७४ नकल

श्री

स्वास्त श्रीराज्याभिशेक शके १९ अंगिरानाम संवछरे फाल्गुन शुा ८ भानुवासरे क्षेत्रियकुलावतंस श्रीराजाराम छत्रपति याः

देशाधिकारी व लेखक वर्तमान भावी प्रां खटाऊ यासी आज्ञा केली यैसीजे. सिवाजी लावंड याचे विषयी राजश्री संताजी घोरपडे यानी चेंजीचे मुकामी स्वामी-संनिध येऊन विनती केली की सिवाजी लावंड हे देशाहून स्वामीच्या पायासी

येकनिष्ठता धरून कर्नाटक प्राती चेंजीस आले. येऊन स्वामिसेवा येकभावे करीत आहेत यासी नूतन इनाम द्यावे आज्ञा केली पाहिजे म्हणून विदित केलें. त्यावरून स्वामी त्यावर कृपाळु होऊन जिरायतपैकी भूमि चावर १ येक कुलबाब कुलकानु खेरीज हकदार करून दिधलें असे. विशा पांडाचा बिघा या मोजणीप्रों सदरहू भूमि याचे स्वाधीन करणे. पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवणें. या पत्राची प्रति लिहून घेऊन मख्य पत्र इनामदार माारास परतोन देणें जाणिजे. निदेश समक्ष मोर्तब

¶King Rajaram grants inam to Shivaji Lavand of Khatao for his services at Gingee.

No. 57] [*21-5-1693*

पुणें जमाव रु. नं. २६ नकल.

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषक शके १९ श्रीमुखनाम संवसरे वैशाखबहुल त्रयोदसी भानुवासरे क्षत्रियेकुलावतंस श्रीराजाराम छत्रपति याणी राजश्री देशाधिकारी व लेखक वर्तमान भावी सुभा प्रांत मावल यासी आज्ञा

सिका पंत प्रधान — सिका पंत प्रतिनिधि

केली ऐसीजे. आपाजी नामदेव याचे पुत्र नामाजी आपदेव व बंधु अताजी नामदेव व यादव नामदेव उपनाम लांडे देशकुलकर्णी कर्यात मावल हे वतनाची शेवा बहुत यकनिष्टपणे करीत आहेत. आपाजी नामदेव याहीं कर्नाटकांत स्वामीच्या पायापासी येऊन विनंती केली की सदरहू आपण कर्यात मावलचे देशमुख कुलकर्णी वतनाची शेवा करून वृत्ति अनभवीत आहो. असियास या वृत्तीस इनाम गाव नाही. यास्तव इनामाचे उदेश स्वामीपासी आला आहो. माहाराज पुन्य पुरुष प्रज्यापालक कितेक वृत्तीवतास नूतन इनाम करून दिल्हे आहेत. आपणावर कृपाळु होऊन यक गाव इनाम द्यावयाची आज्ञा केली पाहिजे म्हणोन सूत केले. त्यावरून नामाजी आपदेव व माहादाजी आपदेव अंताजी नामदेव व यादव नामदेव देशकुलकर्णी कर्यात मजकूर याजवरी स्वामी दयाळु होऊन इनामदार करून गाव सर्वमान्य दिल्हा असे. हा गाव देशकुलकर्णी मजकूरचे स्वाधीन करून यास व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने इनाम चालवणे. वरषप्रति नुतन पत्राचा आक्षेप करीत न जाणे. या पत्राची तालिक लेहून घेऊन मुख इनामदार मजकुरास परतोन देणे. निदेश समक्ष मोर्तब असे.

¶A village is given by Rajaram Chhatrapati to Apaji Namdeo Lande and his sons for having done service to the State in critical times.

4912

No. 58] [*14-4-1693*

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषक शके १९ श्रीमुखनाम संवत्सरे चैत्र बहुल पंचमी भृगुवासरे क्षत्रियेकुलावतंस श्रीराजाराम छत्रपति याणी पारपत्यगार व लेखक प्रगणे सुपे यासी आज्ञा केली ऐसी जे. तुको त्रिंबक जोतिषी व कुलकर्णी मौजे सुपे खूर्द प्रा मार याणी राजश्री धनाजी जाधवराऊ याबराबरी हुजूर चंजीचे मुकामी येऊन विनती केली की मौजे सुपे प्रा मार येथे पूर्वी आपणास अदल-शाहाचे कारकीर्दीस इनाम जमीन रकम रुके ८६ सा रुक्याची चालत होती. त्यावरी सांप्रत स्वामीच्या राज्यात आपले इनाम चालत नाही, तरी स्वामीने कृपालु होऊ(न) सदरहू आपला इनाम आपले दुमाला करावयाची आज्ञा केली पाहिजे म्हणून विदित केले त्यावरून हे आज्ञापत्र सादर केले असे. जाणिजे निदेश समक्ष

सुरु सुद बार

¶*Rajaram Chhatrapati confers an inam upon Tuko Trimbak Jyotishi (Purandare) of Supa. He accompanied Dhanaji Jadhao to Gingee and requested Rajaram for the inam.*

No. 59] [*27-5-1693*

जमाव, रु. नं. १७८१.] नकल.

श्री

सिका

पत्र वेतन विशेष. मा शंकराजी बाजी प्रभु सभासद सेवक राजमंडल. स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके १९

सिका

श्रीमुखनाम संवत्सरे ज्येष्ठ सुध्ध त्रितीया स्थिरवासरे.

सिका

मानुले देशी रा शंकराजी नारायण याकडे सभासदाची सेवा करीत होते. याउपरी कर्नाटकात स्वामीच्या पायापासी आले. येऊन शेवा येकनिष्टपणे

?१ निराळें वळण ?२ त्याहून निराळे

करीत आहेत. यामुले स्वामीकार्याचे मर्दानें देंखोन याजवरी कृपालु होऊन सभासदातच करार करून सरंजामी केली. कदीम देखील सालिना पा

होनू

२०००

गीं संमत मच्छींद्र ? यकूण दोन हजार बेडेपैकी

ता

१५०० कदीम.

५०० जाजती.

२०००

ता

खा जातीस बेडा १६००.. क्याकर २४ यैन ४००.

१९०	भोई १२	३६	अहुराद	२
२५	ना १	३६	माहलदार	२
१६५	भोई ११	३६	आडेकरी	२
	दर १५ प्रो	२४	छाटेदार	२
			यांो	
		१३२		
		३६	दिवटे	२
		२१	आबदागिऱ्या	१
		२१	मोतदार	१
		२६८		१६

यकूण १॥ बेडा दोन हजार. यास कदीम वेतन दीड हजार व हाली सरंजाम जाजती पाचशे होनू, येणेप्रो रास केले असेती. ड्रा छ मजकुरापासून खा

जातास व चाकर कदीम वेतनाचे जे हाजीर असतील ते बजा जाता उरलेयावर न्याजती वेतनादेखील हाजीर करून लिहिवितील त्या दिवसापासून दरबार शिरस्ता

प्रो वजवटा करून उरले वेतन पावल. जाणिजे निदेश समक्ष.

संमत

मच्छींद्र.

तेरीख १.

सौवाल सुा आर्बा तिसैन.

बाद सुद सुरू सुद बार.

[माथ्यावरील सिका राजाराम छत्रपति यांचा. मधील सिके दोन, पैा येक मोरो नीलकंठ पेशवे याचा व दुसरा प्रतिनिधि राजाराम याचा. असल पत्र बलवंतराव चिटणीस याजपासी सातारियास आहे.]

¶*Allowances are granted to Shankaraji Raji Prabhu for his services in difficult times.*

—

No. 60] *[19-10-1694*

नकल

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषक शके २१ भावा संवत्सरे कार्तिक शुध्ध द्वादसी स्थिर-वासरे क्षेत्रियकुलावतंस श्रीराजाराम छत्रपति स्वामी याणी राजश्री दामाजी अनंत व लिंगोजी शंकर प्रभु मुकाम कसबे बंदर राजापूर यांसी दिल्हें वृत्तिपत्र यैसेजे. स्वामी देशीहून स्वार होऊन कर्नाटक प्रांतें आलियावर स्वामीचा राणीवास दुसरा वाडा यांची रवानगी राजश्री रामचंद्र पंडि(त) अमात्य यांच्या पत्रावरून तुम्ही केली. तांम्राची ठाणी राजापूर प्रांतें बैसली असतां कोठे उमट पडो नेदितां युक्तीनें संकट प्रसंगामध्यें आपलें जाहाज व लोक देऊन समुद्रांतून येकेरीच्या राज्यांतून होनावरास पाठविलें‍त, तीं स्वामीसनिध सुखरूप पावलीं. स्वामीच्या पायांसी येकनिष्ठता धरून राणीवासाची सेवा बहुतप्रकारें केली हे वर्तमान वेदमूर्ति रामभट पटवर्धन व गणोजी झेंडे राणीवासाकडे होते याणी विदित केलें. त्याजवरून तुम्ही स्वामीचे सेवेसी येकनिस्ट आहां, यैसे जाणून तुम्हावरी स्वाम कृपाळु होऊन तुम्हांस वडिलाच्या वौंशपरपरेने चाले यैसे इनाम देऊन चालवावें. हे स्वामीच्या मनात येऊन इनाम दरुत लारी

तेरीख ११ माहे रबिलोवल सुा खम(स)तिसेन अलफ.

¶*King Rajaram rewards the meritorious services of Damaji Anant and Lingoji Shankar Prabhu of Rajapur in arranging at great risk for the safe journey of Tarabai and party from Rajapur to Honavar by sea.*

No. 61] [10-8-1695

रुमाल नं. २८०.

श्री

राजश्री शकराजी माहादेउ सुबेदार व कारकून

प्राा मावले ताा लोहगड गोसावी यासी

॥ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य सेवक शकराजी नारायेण सचिव नमस्कार सुाा सित तिसैन अलफ अपाजी नामदेव याचे पुत्र नामाजी आपदेव व माहादाजी आपदेव व भाऊ अताजी नामदेव व यादो नामदेव देशकुलकर्णी ताा. कर्यात मावल याणी राजश्री छत्रपति स्वामीचे आज्ञापत्र प्रविस्ट केले तेथ आज्ञा की ताा माा देशकुलकर्ण पुरातन नामाजी आपदेव व माहदाजी आपदेव व अताजी नामदेव व यादो नामदेव यांचे सालाबाद चालत आले असता दरम्याने रामचंद्र बाबाजी व मोरो विठल होनप देशकुलकर्णी पाा पुणे याणी मोगलाईत हकीम लोकास व देशांत कितेक लोकांस टका पैका लांच देऊन लटीके गोष्टी उभे करून ताा मारचे देशकुलकर्ण आपले म्हणून महजर करून घेतला आणि हक लाजीम खात आहेत. यैशास पुणे प्रातीचे गाव वीस कर्यात मावला-खाले वसत आहेत. त्या गावीचे देशकुलकर्ण होनपाचे आहे. त्या विसा गावीचा हक लाजीमा तेच घेत आहेत. तरी होनप कर्यात मावलच्या देश कुलकर्णाचा हक घेत असिले तरी होनपाच्या वीस गावीचा हक यांस देवीत जाणे म्हणून आज्ञा. त्यावरून हे आज्ञापत्र तुम्हास लिहिले आहे तरी होनप दरम्याने कर्यात मालकाच्या देशकुलकर्णास दखल होऊन मोगलाचे तर्फेने हक लाजीमा घेत असिले तरी होनपाकडील पुणांचे वीस गाव कर्यात मावलांत आहेत त्यांचा हक लाजीमा आपाजी नामदेव याचे पुत्र नामाजी आपदेव व माहादाजी आपदेव व भाऊ आताजी नामदेव व यादो नामदेव देशकुलकर्णी ताा मार यास देवीत जाणे व वीस गावीचे देशकुलर्णाची सेवाहि घेत जाणे. होनपांचा मुतालीक असेल त्याला दखलगिरी होऊ न देणे, बाहिर घालणे. या पत्राची प्रती लेहोन घेऊन असल पत्र देशकुलकर्णी मार याजवली देणे. छ ९ मोहरम

सुरु सुद

This has reference to No. 57 above.

No. 62] [12-8-1695

श्री

राजश्री शकराजी माहादेव सुभेदार व

कारकून प्रां मावले तो लोहगड गोसावी यांसी

॥ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्ये सेवक शंकराजी नारायेण सचिव नमस्कार सुाा सीत तिसैन अलफ. अपाजी नामदेऊ यांचे पुत्र नामाजी आपदेऊ व

माहादाजी आपदेऊ भाऊ व अंताजी नामदेव व यादो नामदेव लाडे देश-कुलकरणी ता। कर्यात मावल यांहि राजश्री स्वामी यांचे आज्ञापत्र शके २१ भावनाम संवत्सर भाद्रपद शुध द्वितीया भानुवासर तेथे आज्ञा की हे थोर वतनदार, येही येकनिष्टेने स्वामिशेवा बहुत केली, याचे पुत्रपौत्रादि वौश-परंपरेने चालवावे उर्जित करावे हे बहुत अगत्य यैसे जाणून यांसी कर्यात मजकुरी कृपाळु होऊन नूतन इनाम चावर ५ पाच दिधले बितपसील मौजे कोढे चावर १ मौजे आहेर चावर १ मौजे भुकुंब चावर १ मौजे माहालुंगे चावर १ मौजे नादेड चावर लग ^ येकूण चावर पाच दिधले म्हणऊन आज्ञा. आज्ञेप्रमाणे सदरहू देशकुलकर्णी मजकुरावर चावर पाच पांचा गावामध्ये दिधले आहेत, यांपासून देशकुलकर्णाची शेवा घेऊन वौशपरंपरेने चालवणे. कुलबाब कुलकानु हली पटी व पेस्तरपटी खेरीज हकदार व इनामदार दिधला असे. विसा पाडाच्या बिधीयाने सदरहू भूमि याचे स्वाधीन करणे. नवीन पत्राची अपेक्षा न करणे. प्रति लेखन घेऊन दुसरा पत्र देश कुलकर्णी यांसी देणे. सदरहू भूमि अवल दुम सीम जिरात दुमाला करणे छ ११ मोहरम

सुरु सुद बार

¶*Shankaraji Narayan Sachiv orders the Subhedar of Lohgad to respect the rights of the Landes to the dues of the Deshpande vatan in the villages which are enumerated in the paper.*

No. 63] *[13-8-1695*

रुमाल नं. ३८०.

श्री

ॐ मा। अनाम रामचद्र बाबाजी व मोरो विठल होनप ...कर्णी प्रांत पुणें यासी शंकराजी नारायेण सचिव सु॥ सीत तिसैन अलफ. ता। कर्यात मावळ येथील देश कुलकर्ण अंताजी नामदेऊ व यादो नामदेऊ व नामाजी आपाजी व माहादाजी आपाजी याचे पुरातन चालत आलें आहे. यैसे असतां तुम्ही मोगलाई दिवाणांत याचा गैरवाका सांगोन लांच देऊनु ता। मजकूरचे देसकुलकर्णाचा महजर करून घेउनू मोगलाचे तर्फेने कुलकर्ण खात आहा म्हणून हुजूर विदित जालें. तरी आताजी नामदेऊ व यादो नामदेऊ व नामाजी आपाजी व माहादाजी आपाजी यांचे कुलकर्ण सालाबाद चालत आलें असतां तुम्हास कथला करून महजर करून घ्यावयास काये गरज होती? या उपरी मारनिलेचे कुलकर्ण याचे स्वाधीन केले आहे. ते कुलकर्णाची सेवा करून हकलाजिमा व इनामगाव असतील ते

स(म)जावतील. तरी तुम्ही मोगलाचे तर्फेने व ये. तर्फेने येक जरा कथला न करणे. फिरून बोभाट आलिया ताकीद होईल यैसे बरे समजोन लिहिलेप्रमाणें वर्तणूक करणें. छ १२ मोहरम. या उपरी तुम्ही याचे कुलकर्णास खलेल कराल म्हणजे तुमची वृत अमानत होईल यैसे समजणे.

¶*Shankaraji Narayan Sachiv orders the Honaps to desist from molesting the rights of the Landes.*

No. 64] [*15-1-1696*

पो ९ रजब

श्री

राजश्री माहदाजी सामराज
सभासद नामजाद सुभा प्रांत जाऊली गो.

S[1] अखंडितअक्ष्मीअलकृत राजमान्य सेवक रामचंद्र नीलकंठ नमस्कार सुा सीत तिसैन अलफ. रामाजी रघुनाथ हुजूर येऊन विनती केली. आपण राजश्री संताजी घोरपडे सेनापति फौज घेऊन चंजीस राजश्री छत्रपति स्वामीचे मंदतीस गेले, तेव्हा आबरोजी सेडगियाची मजमू होती म्हणऊन बराबरी गेलो. तेथे कष्ट मेहनत केली म्हणऊन राजश्री स्वामी आपणावरी कृपाळु होऊन नूतन इनाम भूमि चावर ·॥· निम-दिल्हा होता, त्यास लस्कर कर्नाटकातून परतून आले, तेव्हा कऱ्हाडी कृस्णा उतरता नदीत कागद बुडाले. तरी स्वामीने कृपा करून सदरहू इनाम आपणास देविला पाहिजे म्हणऊन. त्यावरून हे चंजीस गेले होते, कष्ट मशागती केली, याकरिता यावरी संतोसी होऊन मौजे मजकूरपैकी सदरहू जमिनी-मधून इनाम विसा पाडाच्या बिघाचे मोजणीने जमीन चावर ·।· पाव चावर देविली असे. तरी तुम्ही अवल दुम सीम तीनी प्रती सारख्याच नेमून देणे आणि यास व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवणे. प्रतिवर्षी नूतन पत्राचा अक्षेप करीत नव जाणे. तालीक लेहून घेऊन असल पत्र भोगवटियासी मारनुले जवळी देणे. सदरहू जमीन खेरीज हकदार करून नेमून देणे जाणिजे. छ १९ जमादिलाखर[2] निदेश समक्ष.

¶*Ramchandra Nilakanth orders Mahadaji Shamraj to continue to Ramaji Raghunath the land which he was granted by the King when he had accompanied Santaji Ghorpade to Gingee.*

१ यथ बाजूवर शिक्का वाटोळा—श्री रामचंद्र चरण । नीलकंठ सोनदेव शरण ॥ २ हीं अक्षरें वगेळीं.

No. 65] [1-6-1696

पर्णी जमाव रू. नं. १/४.

ई कौलनामा अज दिवाण आमान जाहागीर खान वालाशान नसर्दीखान जाहागीरदार देहाये तरफ हवेली तां माहार मौजे बाणेरे पा पुणे सुा सीत तिसैन अलफ दादे कौलनामा यैसाजे. तुमचे बाबे देशमुख व देशपाडे पा मजकूर व मोकदम मौजे मजकूर माल्हम केले यैसेजे. मौजे मजकुरी माहाराची हडकी व पाडेवारी महद कदम आहे यैसियासी हा अमल जाहागीर शाहाजी राजे भोसले याचे आमान दादाजी कोंडदेऊ त्यानी कदीम मान्हावडा वेसीपुढें पूर्वेस मुज्याच्य पारा मोहोर होता त्यातून पाट आणिला ते वेलेस माहार पाटांत कातडी वगैरे धूत आसेती. ते पाणी खावयासी कामा नये म्हणऊनू तेथून मान्हवाडा मोडून गावावरता नेरुतेस बहीरवाचे पाठी बसविला. ते वख्ती हडकी कदम मान्हवडीयापासी होती तेच चालत आसे. हाली सांप्रत पाटीयामधे हडकी दबोन गेली आहे. गणेश पाटिया (?) पाडेवारी आपली वाडवडिलाची तालूक चालत आली आहे. सांप्रत तुकोजी गाडे आपले पाडेवारीयाच्या सेतावर उभे राहिले आहेती. तरी साहेबी गीर्दनवाहा गावीचे गोत मौजे माचे थलकरी बलुते याचे तोंडे नफर माचा इनसाफ करितील. तरी यासी गावावरी आणून म्हणऊनू माल्हम केले. बराये मालुमाती खातिरेस आणून तुम्हास कौल दिधला असे. तुमचा निवाडा हडकीचा व पाडेवारीचा हमशाही गीर्दनवाह गांवीचे गोत व मौजे मजकुरीचे थलकरी व बारा बलुते मेलऊनू मनास आणून सालाबाद चालिले आसेल तेणेप्रमाणे हडकी व पाडेवारी तुमचे दुमाले करून आपला खातीरजमा राखोन मौजे मावरी येऊनू पाढरीची व दिवाणीची चाकरी करून आबादान राहाणे. दरीबाब कौल असे. छ १० जिलकाद मोर्तबु सुद.

¶*Permission is granted by Ramchandra Nilakanth to the Mahars of Banere to come and settle in the village, assuring them of State support. The paper mentions previous attempts in the same direction.*

No. 66] [9-9-1696

श्री

अखंडीतलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री शंकराजी माहादेऊ सुभेदार व
कारकून प्रात मावल ता लोहगड गो यासी

सेवक रामचंद्र नीलकंठ नमस्कार सुहुर सन सबा तिसैन व अलफ. रा अंताजी नामदेऊ व रा यादो नामदेऊ लांडे देशकुलकर्णी कर्यात मावल यांस मौजे

खांबगाऊ ताा मजकूर यथ इनाम सेत आहे ते सालाबादप्रमाणें याचा इनाम यास पूर्वीपासुनु कारकीर्दी कैलासवासी स्वामीचे चालिले असेल त्याप्रमाणें बिलाकुसूर चालवणें. जाणिजे छ २१ सफर निदेश[1] समक्ष

¶*Ramchandra Nilkanth grants a field in inam to Antaji Namdeo Lande at Khambgaum.*

No. 67] [*1-10-1696*

[पुणें जमाव, रु. नं. ४९७] तालीक

श्री

स्वति श्रीराज्याभिषेक शके २३ धात्रानाम संवछरे आश्विन बहुल प्रतिपदा गुरुवासरे क्षेत्रियकुलावतंस श्रीराजाराम छत्रपति यानी राजश्री देशाधिकारी व लेखनकर्ते वर्तमान भावी प्रा पुणे यासी अज्ञा केली यैसीजे. चिरंजीव सौ सोयेराबाई[2] यांस येक वतन देऊन चालवणे हे स्वामीस आगत्य. यास्तव मनास आणिता मौजे वाल्हे ताो निर्थडी प्रांत मजकूर येथील पाटिलकी पूर्वी वाल्हेकरापासोन राजश्री कैलासवासी स्वामीनी खरिदी करून घेऊन मातुश्री सकूबाईस दिल्ही होती; आलीकडे सकूबाई ऋमलियावर पाटिलकी दिवाणाचे वतन आहे; ते स्वामीनी वाल्ह्याचे पाटिलकीचे बाईस अजरामर हक करून दिल्हा आसे. तरी बाईचे स्वाधीन करून यांस व यांचे पुत्रपौत्रादि वोंशपरंपरेने सुरक्षित चालवणे. पूर्वी वाल्हेकरानी मातुश्री सावित्रीबाई निंबालकर यांजपासी हायाल होऊन गैरवाका करून पाटिलकीचा कागद त्यांचा करून घेतला आहे, तो रद आसे; वाल्हेकरास या वतनासी सबंध नाहीं यैसे करून बाईस वतन दिल्हे आसे. सुखरूप चालवणे. प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणे. या पत्राची प्रत लेहून घेऊन मुख्य पत्र बाईस परतोन देणे. जाणिजे, निदेश समक्ष.

रुजू.

सुरू सुद बार.

छ २१ रौवल

ताो छ १४ माहे रावल

सुाा सबा तिसैन.

बार सुद.

¶*Rajaram Chhatrapati grants the Patilki vatan of Valhe to his daughter Soyarabai and cancels the right of Valhekars to the same. The paper mentions that the same vatan had been conferred by Shivaji upon his daughter. (See* इ. सं. निंबाळकर हकीकत *P. 24*)

---

१ निराळें अक्षर. 2 Rajaram's daughter married to Nimbalkar Bajaji II.

No. 67A] [1-10-1696

सातारा जमाव रु. नं. ११९३

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके २३ धातृनाम संवत्सरे आश्विन बहुल प्रतिपदा गुरुवासरे क्षेत्रियेकुलावतंस श्रीराजाराम छेत्रपति याणी राजेश्री मुधोजी नाईक बिन बजाजी नाईक निंबालकर यांसी दिल्हे इनामपत्र यैसेजे.

बि ताा

तुम्ही चंदीचे मुकामी स्वामी समीप विनंती केली की पाा फलटण माहाल पूर्वी आदलशाचे कारकीर्दीस पातशाह आली आदलशाह यानी राजेश्री नाईक आपले बाप यास दरोबस्त इनाम दिल्हा होता, आणि दिवाणामधे सेभर स्वार चाकरीस द्यावे यैसा निरवाह केला होता. तरी स्वामीनी तेणेप्रमाणे फलटण माहाल आपणास इनाम देविलीयाने सेभर स्वार दिवाणामधे चाकरीस देऊ म्हणोनु विदित केले. त्यावरून दिवाणामधे सेभर स्वार चाकरीस तुम्ही द्यावे यैसा निछेये करून पाा फलटण माहाल १ येक रास कुल बाब कुल कानु दरोबस्त देखील हली पटी व पेस्तर पटी व जमायेती पाा मजकूर व * * * * * खी व टोकरे निरा नदीचा हसील व झाडझडोरा पडले पानसहित खेरीज हकदार व इनामदार करून माहाल इनाम १

काा विनती तुम्ही केली कीं रो कैलासवासी बजाजी नाईक आपले पिते हे कसबे बावडे पाा इंदापूर येथे क्रमले आहेत, तरी तो गाव आपणास इनाम देविला पाहिजे म्हणोनु विदित केले. त्यावरून तुम्ही थोर घराणियाचे लोक यैसे जाणोन स्वामी तुम्हासी सतोषी होऊन तुम्हावरी कृपा करीत आहेत. तरी पाा फलटण बाा सेभर स्वार दिवाणात चाकरीस देऊनु दर हरसाल चाकरी करून माहाल खाणे व गाव इनाम आपले स्वाधीन करून घेऊनु तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें सुखरूप असेणे. निदेश समक्ष माा

तेरीख १४ माहे रबिलावल

रबिलावल सुाा सबा तिसैन अलफ सुरू सुरूनसी बार बार सुद

¶*King Rajaram grants the Mahal of Phaltan to Mudhoji Naik Nimbalkar of Phaltan.*

No. 68] [27-10-1696

नकल

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके २३ धातृनाम संवत्सरे कार्तिक शुाा १२ भौमवा-वासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजाराम छत्रपति याणीं समस्तराजकार्यधुरंधर

विश्वासनिधि राजमान्य राजश्री रामचंद्र पंडित आमात्य हुकुमतपन्हा यांस आज्ञा केली ऐसीजे. संताजी घोरपडे याणी स्वामीच्या पायासी हरामखोरी केली, याकरितां यास सेनापतिपणाचा कार्यभाग होता तो दूर करून फौज हुजूर आणविली. यावरून राजश्री मकाजी हटकरराऊ देवकाते हे आपले जमावानसी स्वामीसंनिध आले. येकानिष्ठपणे स्वामिसेवा करीत आहेती. याकडील जमावास राजश्री शंकराजी नारायण याणी पहिले मुकासे नेमून दिल्हे आहेती, ते स्वामीने करार करून दिल्हे असेती; व इनामे पहिले स्वामीने दिल्ही आहेती ते चालत आहेती तेप्रमाणें चालवावयाची आज्ञा केली असे.

* * * * * *

* * * * * *

येकूण मुकासा माहाल २ दोनी व गाव २८ अठावीस व इनाम गाव १ येक चालत आसेतील तेणेप्रमाणे बिलाकुसूर चालवणे. घालमेली काही न करणें. बहुत काय लिहिणे तरी तुम्ही सुज्ञ असा. मोर्तब सुद.

जडगिरीवर

मोर्तब मोर्तब.

बार बार बार.

जडगिरीवर

मोर्तब मोर्तब.

¶*Santaji Ghorpade having proved a traitor, Chhatrapati Rajaram removes him from his office as commander-in-chief of the Army and rewards each of the soldiers who rejoined the King's standard.*

[. 69] [11-12-1696

पुणें जमाव, रु. नं. ९१.]

श्री.

अभयेपत्र समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री शंकराजीपंत सचिव ताां सेटी माहाजन व बाजे खुमानी[1] पेठ सिवापूर व रामपूर ताा खेडेबारे सबा तिसैन अलफ. कौलनामा यैसा जे. तुमचे बाबे देशमुख व देशकुलकर्णी ताा मजकूर याणी हुजूर येऊनू विदित केले की, कसबे खेडेबारे येथे मोगलांचे ठाणे आहे, याजकरिता दुतर्फा कसाला पडतो. * * * * तारां नाही. दिलगीर होते. * * * व यास तकवा होत नाही व नवी रयेत * * * कोणी पेठ मजकुरास येत नाही. तरी यास * * निमे घ्यावे, निमे गानिमानी घ्यावे, यैसा कौल जाल्याने पेठ मामूर[2] होईल, म्हणऊनू

१ खूम=लोक. २ सुसम्पन्न.

विदित केले. त्यावरून रयतेवरी व पेठेचे मामुरीवरी नजर देऊनू, जोवरी कसबे मार ठाणे आहे तोवरी, सारा व बैलास होईल त्यास निमे वसूल घ्यावा, येसा तह करून कौल दिल्हा असे. कोणे बाबे शकआंदेशा न धरिता पेठ मामूर करणे. कौल असे. छ २५ जमादि * * पा हुजूर. सारा दुकानाचे व * * * बैलास मोईन आहे त्यास निमे वसूल देऊनू सुखरूप राहणे. पा हुजूर

सुरु सुद बार.

¶*Shankaraji Pant Sachiv assures the rayats of Khede Bare that the Government dues on their lands would be reduced to half as they had been devastated by the Mogal invasion.*

No. 70] [*1696?*

रु. नं. १७०५

उमारवासी कर्ती जागीर तुलोजीराजे सिंदे जागीरदार सुा सन १०९६ तहसील तहवेली विठल गंगाधर सेखदार व पुडीलीक सीतो कारकुन गुमास्ते माईले वसुल मोकरार बेरीज रुपये

१७४॥=

मो येकसे चौऱ्याहत्तरी रुपये दाहा आणे असे.

दिा अताजीराम उदराम

वसूल ब मारफती करोडी रुपये.

१२४॥=

ताा

बमारफती विसाजी रघुनाथ गुमास्ते यादो लिंगदेऊराये व सेख हसन महमद करोडी साा जुनर वसूल रुपये

४॥= केसनद
१५।≡ अहीरे
६८≡ वणपुरी
५ वढाणे

३१।

बमारफती यादो गोपीनाथ गुमास्ते सेख हसन महमद करोडी साा जुनर वसूल रुपये.

१५।= केसनंद
२० वढाणे.
२६ वणपुरी
३१ राजेवाडी
१ अहिरे

९३।=

वसूल बमारफती विठल गंगाधर सेखदार व कारकून गुमास्ते * * *

¶*This paper mentions Tuloji Raje Sindia, who seems to be a prominen character in 1696.*

No. 71] [3-6-1698

श्री

श्रियाविराजित राजश्री अमिलानी पा। हरडो गोसांवी यासी विनंति सेवक अवधुतराये व माहादाजी बाबदेऊ साष्टांग नमस्कार विनंति विशेश कीं वेदमूर्ति राजश्री नारायेणभट थिटे वांईकर यासी वर्सासन प्रतिवारसिक आमचे वेतनाचे हिसेबापैकीं देणे रु. २५ पंचवीस आर्जी आमचे हिसेबी लेहणे. सदरहूप्रमाणें साले दरसाले देत जाणे. नूतन पत्राचा उजूर न कीजे. छ ४ जिल्हेज सन ११०९ रूजू माहादाजी बाबदेऊ.

¶*Avadhut Rai and Mahadaji Babdev give Rs. 25 annually to Narayan Bhat Thite Waikar.*

No. 72] [6-8-1698

ई कौलनामे दिवाण व फौजदार व अमीन बंदर पा। मुर्तजाबाद ऊर्फ चेऊल वगैरे मा। हाये निजामनमुलुक ता। गोविंद कृष्ण देसाई प्रा। मजकूर सु॥ तिसा तिसैन व अलफ. दादे कौलनामा यैसाजे. तुझे बाबे महमदखान व आपाजी अदिकारी व माहादाजी देशपांडिया प्रा। मजकूर याणी इलतिमास[1] केला की शंकराजी दतो फकीर फौत[2] जाहाला. त्याचे मवेसीचा हिसा गोविंद कृष्ण मजकुरानी घेतला अहि म्हणोन साहेबास जाहीर जाहले. यावरून त्याणी शकं धरून रेवदंडेयामध्ये गेला आहे. यैशास नफर मजकूर साहेबाचे कदमाचा उमेदवार आहेती. साहेब मेहरबानीन फर्माऊन कौलु सादर करितील, तरी खजमतेमध्ये हाजीर होईन, तरी साहेबी मेहरबान होऊन कौलु सादर केला पाहिजे म्हणोन इलतिमास केला. बराये इलतिमास खातिरेस आणून तुवा जेतचा शक धरिला आहेसी. ते बाबेच कौल सादर केला असे. तरी बेशक होऊन सुखे येऊन जैसे बाजे जमीदार पातशाही चाकरी करीत आहेती तैसी तूहि चाकरीत असणे. कोणे बाबे शक न धरणे. दरीबाब कौलु असे. छ ९ सफर सने ४२ जुलुस वाला मोर्तब सुद.

¶*Nizam-ul-mulk gives an assurance to Govind Krishna that he would not be molested, if he returned to his vatan from Revdanda where he had been hiding. The district of Cheul was according to this paper under the management of Nizam-ul-mulk during Aurangzeb's regime in the Deccan.*

---

१ अर्ज. २ मर

No. 73] [*25-10-1698*

जमाव रु. नं १६४५ तालिक

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिशेक २५ बहुधान्ये नाम संवछर कार्तिक सुध द्वितिया भौमवासरे क्षेत्रियेकुलावतसे श्रीराजाराम छत्रपति स्वामी याणी

यासी आज्ञा केली यैसीजे. सुभानजी बिन म्हतोजी कालभोर व मोत्याजी बिन धर्मोजी कालभोर हुजूर येऊन विदित केले कीं प्रांत मााची देसमुखी पुरातन आपली महतकेदम[1] चालत आहे. त्यास सितोलियांस मुतालिकीस ठेविले होते. त्यासी ते बलावले आणि गोविंदराव सितोले व मालोजी सितोले पुणां राहून जोरावाराने वतन खात आहेत. यैसियासी स्वामीने पारपत्ये करून आपले वतन आपले दुमाला[2] केले पाहिजे म्हणुन विदित केले. यैसियास गोविंदराव सितोले व मालोजी सितोले पुणां राहून जोरावारीने वतन खात आहेत. हुजूर येऊन रुजू होत नाहीत. यास्तव प्रांत मजकुरची देसमुखी सुभानजी बीन म्हतोजी कालभोर व मोत्याजी बीन धर्मोजी कालभोर यांचे स्वाधीन केली आहे. तरी हे देसमुखीचा कारभार करतील. सितोलियासी करावयासी प्रयोजन नाही. वतनास हकलाजिमा इनामती इसापती पुरातन चालत असेल त्याप्रमाणे चालवणे. मुख्ये पत्राची तालिक घेऊन मुख्ये पत्र देसमुख मजकुराजवली फिरावून देणे.

¶*Rajaram Chhatrapati gives a decision in a dispute between the Sitoles and Kalbhors.*

No. 74] [*19-6-1699*

जमाव रु. नं. १७११.]

श्री

भुवनेश्वर

श्रीसकलगुणमंडित अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्री बालाजी विश्वनाथ सरसुभेदार व कारकून वर्तमान व भावी प्रांत पुणे गोसावी यांप्रति श्रीकराचार्ये पंडितराव आसीर्वाद. राज्याभिषेक शके २५ प्रमाथीनामसंवत्सरे आषाढ शुध प्रतिपदा इंदुवासरे देवस्थान श्रीवास्तव्य मौजे मालसिरस पाा सुपे यासी पूर्वीचे मोईन होन १ व नंदादीपास तेल इतुके करून दिल्हे आहे. परंतु देवास नैवेद्य नाही. हे गोष्टीने देवास उर्जा सांग संपादत नाही. यास्तव हाली मोईन करून

१ फार जुनी. (?) २ ताब्यांत दिलें पाहिजे.

दिल्ही, सालीना मोईन कैली कोठी मापें गहूं ८३।।। पावणेचारी मण देवविले असेती. प्रतिदिवसीं ८८८ निठवे प्रमाणें सालीना सदरहू मोईन प्रा देवपूजकांचे स्वाधीन करणें. तो देवास नैवेद्य दाखवून पूजा चालवील. प्रतिवरसीं नवीन पत्राचा आक्षेप न करणे. मुख्य पत्राचें तालीक लिहून घेऊन मुख्य पत्र भोगवटियास देवपूजकाजवली परतोन देणे. छ २९ मोहरम सुहुर सन मयां आलर्फ+. हे आशिर्वाद.

¶*Balaji Vishvanath Sarsubhedar is asked by Shrikaracharya Panditrao to grant an allowance for the worship and feed of the deity of the temple of Supa.*

No. 75] *[9-11-1699*

कोकण जमाव रुमाल नंबर ५५१ नकल

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिशेक शके २६ प्रमाथीनाम संवत्सरे अश्विन बहुल येकादसी इदुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजाराम छत्रपति याणी राजश्री मुद्राधारी यांसी आज्ञा केली यैसीजे. सावोत्रा हक राजश्री खंडेराव दाभाडे याजकडील जमावाचे बेगमीस दिल्हा होता, तो दूर करून राजश्री शकराजी पडीत सचिव याचे पुत्र राजश्री जनार्दन शंकर यांसी वतन करून दिल्हे आहे. सनदा माहालोमाहाल सादर केल्या आहेत. यैसीयासी किले मजकूरचे तनखीयास खेडी आहेत, तेथे गडकरी याची सेते असतील ते खेरीज करून वरकड याचा सावोत्रा बिलाकुसूर चालवणे, व परमुलकातील दोहोत्राहि याकडे देविला आहे; तरी परमुलुकपैकी खेडी किल्याकडे असतलि तेथील दाहोत्रा मशारनिलेकडे देत जाणे जाणिजे. निदेश समक्ष. मोर्तब रुजू सुरूनिवीस. सूर सूद.

¶*King Rajaram transfers a vatan from Khanderao Dabhade to Janardan Shankar Sachiv.*

No. 76] *[1699?*

अज सरकार माहाराज राजेश्री कान्होजी राजे प्रभानवलीकर साहेब बजानेब सिदोजी नरसिंह सेखदार व वेकाजी जगनाथ कारकून हाल व इस्तबाल देहाये

+ येथून पुढील अक्षरें बालबोधींत आहेत.

पा इंदापूर सरकार जुनर सुबे आवरंगाबाद सुहुर सन मेघात (?) व अलफ. सन ११०९ बिदानदके बाा बदल वरषासन श्री व मेगोवा हरिदास पंढरपूर यास सालीयाना रुपये ३०८

श्रीदेवाचे नेवेध व उपभोगास रुा १२८ * * * हरिदास यास रुा १८८

येकून तीस रुपये साल बसाल देत चाणे. दरहर साल ताजे सनदेचा उजूर न कीजे. नकल घेऊन आवल परवाना हरिदास मास फिराऊन देणे. पा हुजूर रसानगी रुबरू. जाणिजे. मो सुद रुजू सुरनिवीस तेरीख ३० माहे शाबान.

¶*Kanhoji Raje of Prabhanvalhi allows Rs. 30 to be given every year for the Haridas of Pandharpu*

No. 77] [*After 1707*

श्री

यादी सनदा देशमुख सितोले मालोजी नाईक व विठोजी नो निजामशाहापासून मातुश्री गिरजाई आवा याचे कारकीर्दीस देशमुखी दोघा भावानी दोठाई करून घेतली, त्यापासून सनदा बिताा

सनद मलिक आबर याचे मोहरेनसी विठोजी नाईक याच्या नावाची जुनी आहे.

१

त्याउपरी मोगलाई जाली. पहिले शास्ताखान आले त्यावरी छापा माहाराज रा सिवाजी राजे यानी घातला. मग तों सुभा फिरोन गेला. मग मिर्जा राजा आले ते कारकीर्दीस माहाराज छत्रपतिपासी विठोजी नाईक होते. देशपांडे मोगलाईत गेले, देशमुख गेले नाहीत. म्हणून इतराजी करून देशमुखी नारो राघोजीस दिल्ही. मग माहाराज राजश्री सिवाजी राजे यासी सला करून भेटीस आले, तेव्हा विठोजी

निजामशाही बुडालियावर इदिलशाई विज्यापुराखाले प्रगणा जाला ते समई हे उभयेता बंधू याकडे गेले नाहीत, याकरिता पातशाची इतराजी करून घाटगियास वतन दिल्हे. ते समई विठोजी नाईक विज्यापुरास गेले. घाटगियास तगीर करून फर्मान वेतला हिरवा कागद फरमानाचा आहे.

माहाराज राजश्री राजाराम साहेब चंदीचे मुकामी होते तेथे कुणबट जाऊन कजियास उभे राहिले, तेव्हा मातुश्री साखराबाई व गोविंदराव याणी सुभानरायास चंदीस पाठऊन वाद सांगोन कुणबट खोटे केले आणि छत्रपतीची सनद करून घेतली ते

नाइक बराबरी आणून देशमुखी सोडविली ते वेलेस सनदा

१ मिर्जा राजा याची सनद

१ हजी सफीखान पातशाही दिवाण दक्षण त्याची मोहरेनसी सनद.

हजरत अवरगजेब पातशा विज्यापूर भागानगर घेऊन तुलापुरास आले ते वेलेस सनदा करून घेतल्या विा कारकीर्दी मालोजी नाईक व गोविंदराऊ

१ यैन सनद बमोहर दिवाण आा आसतखान

१ हजी सफीखान दिवाण दक्षण याचे मोहरेनसी

१ कुणबट भाडावयास उभे राहिले होते ते इनसाफ पाहून खोटे केले तेव्हा गिर्देनवाई देशमुख गोत याचे मोहरनसी महजर जाला आहे तो

१ यार आली दरोगा कचेरी याचे मोहरेनसी व कानगोद याचे दस्तकानसी सनद

१ पेशकसी करार केली त्यास चौथाई यैवज त्रिवाडीयाची कर्जे घेऊन दिल्हा त्याचे जाब व त्या आलीकडे पैका पावला त्याच्या हुजती बमोहर हाजी सफीखान वगैरे हुजती देशमुख व देशपाडिये याचे नावे व काही खासगताकडे येकूण कलम

१ मुलाजमतसमई नजर मोहरा ९ नव व रुा ९ केले त्याची हुजती सुभानरायाच्या मुलापासी आहत व मोगलाईत माहाराज राजश्री शाहू राजे आले तेव्हा सुभानराव पुढे जाऊन माहाराजास भेटोन वतनाच्या सनदा घेतल्या त्याही त्यांच्या मुलापासी आहेत.

सनदा देसमुख मितोले

दुसरियाने हजरत पातशा अवरगजेब किले कोंढाणा फते करून पुणियात छावणी केली, ते वेलेस लवले व पासिणे दोहीगाव इसाफतीचे होते त्याची सनद तुलापुरी करून घ्यावी तरी तेथे कुणबटाचा कजिया पडला, खर्चासहि नव्हते याकरिता पुणाचे मुकामी मजकूर करून निजामशाही दोन्ही सनदा होत्या त्या दाखऊन आतोबा वागनगिरियास लस्कराबराबर जाऊन दोहीगाव सरसिहान (?) करून इसाफत करून घेतली ते वेलेस सनदा

२ जुन्या निजामशाही

१ हजरत पातशाहाजीची

३

माहाराज राजेश्री शाहू राजे साहेब छत्रपति स्वराज्यास आले तेव्हा कुणबट उभे राहिले ते समई कजिया होऊन कुणबट खोटे जाले. माहाराज राजारामसाहेब याच्या सनदा त्याणी खंडेराऊ दाभाडे याचे साक्षेने करून घेतल्या. ते देखल सिके उतरून माघारे घेतल्या व माहाराजानी आपली सनद करून दिल्ही ते वेलचे कागद सनदपत्र कलम

जाली नील (तान ? तम ?) दरोगीचे
मोहरेनसी
. १ हाजी सर्फाखान दिवाण हक
जालियावरी मात मितखान (मातमल-
तखान ?) दिवाण जाला त्याची सनद
तुलापुरीच करून घेतली

¶*This paper gives a valuable account of the Sitole Deshmukhs and their services to the various Chhatrapatis.*

No. 78] [*1700 ?*]

कानुजाबिता देशमुख मामले चेऊल मुा सन

ब्राम्हणाचे घरी मुंजीलग्न होईल तेथें सभापूजिनी सेला मानाचा आहे कलम १

श्रीकनकेस्वरी कार्तिकी पूर्णिमेचा दिवाणचा दीप लावलियावर आपला दीप लागतो कलम १

कासाराकडील भांडी खरिदी करणे त्यास रास्ति किमत विकत असेल त्यास सेरी चवल कम द्यावा कलम ?

कल्हई करणे तर नवसागर कथील द्यावे. मेहनत त्याची कलम १

श्रावणी पूर्णिमेची कानु

वाळुज काम करीतात त्या दुकानास बेगडी नारेल १ सुपारी ५ द्यावा कलम १

काळ्या सुताच्या पवतियास सुती मामीवार याणी द्याव्या कलम १

श्रावणी चतुर्थी सुध पक्षीची रेसमी रज पटवेकरानी दर दुकानी ाच द्यावे कलम १

समी काम जे पडेल ते रेसीम द्यावे. मेहनत नाही कलम १

ुंभाराकडील कुंभाराने द्यावे.

ांभारानी दर दुकानास जुते पावसाली अगर उन्हाली १ द्यावे कलम १

तेली याजकडे हक तील आगर हर जिनस गालवावे त्यास मेहनत नाही. दर गाण्हास सालीना तेल पाचसेर द्यावे कलम

बाजारची हटवटीस नित्य बागवान व मालिणी बसतील त्यास हरजिनस विकतील त्यास सेव द्यावी कलम १

पसारी वाणी याजकडे दररोज सुपारी व पाने विकील त्यास पाने बारा द्यावी कलम १

दिवालीचा महिना दारू फुलबाजीकर दर दुकानी दररोज फुलबाजी दर जिनस दाहा दाहा दागिने घ्यावे कलम १

श्री अंबा देवालई नवरात्राचा नव दिवस बाजार भरतो त्यास श्रीचा प्रसाद गुरवाने द्यावे. मेवेकरानी मेवा द्यावे. आपली पेठ सबब पंधरा लाहिरी सारे दुकानदार मिलोन द्यावे कलम १

माहार जे गावी असेल त्याणे येक महिना सालास राबणुक करावी कलम १

गावगना लाकुडभारे व गवत सा भारे गाव पाहून द्यावे कलम १

रामराजवाडी मोरथल नवदर येथे पूर्वी कोली मासली बंदरावर वालवीत तेथील बारीक भुसकट माती आपली जागा म्हणोन जमा होय ते वसईस दोनसे दीडसे लाहरीस विके. याजमुले कोलियास हक माफ असे.

मोचेकरीयाने दर दुकानास जोडा १ द्यावा कलम

कोली कोन्हेही जागा असतील तेथे आपली मऱ्हाठी माणसे गेली तर मासली जे लागेल ते देत असेत. कसबियात हमेशा कोलवडी चालेत. कलम १

वेठबेगार गावगना द्यावी कलम १

¶*This paper mentions the perquisites allowed to the Deshmukh of Cheul in the 17th century from villages under his jurisdiction.*

No. 79] [*18-7-1700*

परशुराम त्रिंबक उमदेतुल्मुल्क याचें पत्र काशी रंगनाथ नामजाद व कारकून वर्तमान व भावी प्रा॰ दाभोळ यास, सुहूरसन इहिदे मया व अलफ छ ११ मोहोरमचें यांतील उतारा:—

कासी राहुजी व त्रिंबक राहुजी यांनीं हुजूर येऊन विदित केलें कीं आपले पिते राजश्री रावजी सोमनाथ हे राज्यांतील कदीम सेवक बहुत दिवस कष्ट मेहनत केली. कैलासवासी स्वामींनीं यांजवर कृपा केली. त्याउपरी संभाजी राजे यांचे कारकीर्दीस राहुजी सोमनाथ यांस दस्त केलें, अटकेंत ठेविले होते, त्यावर ते

4930

मृत्य पावल. आम्हां लेकरें चिंचवडास जाऊन राहिलों. आमचें वतन हरि कृष्ण वसिष्ट खाऊं लागला. यास्तव आपण राजश्री रामचंद्रपंत अमात्य यांसनिध येऊन वर्तमान विदित केलें. त्यांनीं वतनाचा विभाग करून दिल्हा. त्याउपरी कैलासवासी स्वामी चंदी प्रांतीहून या वतनी राज्यास आले, तेव्हां सातारचे मुकामीं हरि कृष्ण वसिष्ठ राजश्री संनिध राहून गैरवाका विदित करून वतन चालवितो; तरी स्वामी कृपाळु होऊन आपलें वतन आपले स्वाधीन. करोन आज्ञापत्र देविलें पाहिजे म्हणोन :—त्यावरून हरि कृष्णाचे राजपत्र रद्द करून तुम्हांस हें आज्ञापत्र सादर केलें आहे."

¶*Rahuji Somnath was a trusted official of Shivaji. His sons Kashi and Trimbak lost their vatan and made a complaint to Parasharam Trimbak who restored it to them. This paper will be helpful in tracing this family*

No. 80]

श्रीशंकर

राजश्री बाळाजी विस्वनाथ
नामजाद व कारकून सुभा प्रात
पुणे गोसावी यासी

ऽ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य सेवक बहिरो मोरेश्वर प्रधान नमस्कार. सुा इसने मया अल्फ गंगाजलनिर्मळ वाल्हाई अऊ राजश्री खंडोजी दाभाडे याची मातुश्री यावरी राजश्री छत्रपति कैलासवासी स्वामी कृपाळु होऊन, सन सबा तिसैनात इनाम दिधला आहे. तो चालत आहे. यैसीयास राजश्रीचे पत्राप्रमाणे स्वामीनीं आपले पत्र देविले पाहिजे, म्हणून राऊ मारनिलेनी विदित केले. यावरून तुम्हास अज्ञा केली आहे. सदरहू * * * मजकूर राजश्रीचे पत्राप्रमाणे सर्वमान्य कुलबाब चालवणे, यास व याचे पुत्रपौत्रादि वंशपरपरेने चालवीत जाणे. प्रतिवर्षी नूतन पत्राचे अक्षेप न करणे. या पत्राची प्रती घेऊन असल भोगवटीयास परतून दीजे. छ १४ सफर आज्ञा प्रमाण.

बार सुरू सुद बार

¶*Bahiro Moreshwar Pradhan to Balaji Vishvanath, officer in charge of the Poona District: requests the addressee to grant an inam to Walhabai, mother of Khanderao Dabhade. Balaji Vishvanath is seen here working as an officer under the Peshwa.*

No. 81] [18-8-1701

रु. नं. ६१४ असल ब्रमोजिब नकल

श्रीशंकर

राजश्री माहादाजी शामराज नामजाद व कारकून
वर्तमान भावी प्रांत मावल ता। लोहगड गोसावी यांस

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य सेवक बहिरो मोरेश्वर प्रधान नमस्कार सु॥ इसने मया व अलफ मा॥ राघोजी राऊतराऊ ढमाले देशमुख ता॥ पौडखोरे येही हुजूर येऊन विनंती केली, की आपण स्वामीच्या राज्यात बहुतच कष्ट मेहनत केली. साल गु॥ जावजी बलकवडा याने हरामखोरीचे ढंग करून किले सुधागडाचे असिरा करून तोतयाचा बहाना केला आणि लोक जमाव करून मुलकात स्वारी घालून गाव मारून नेऊ लागला. त्यास नतीजा त्याचे कर्तव्यानरूप जाला. पुढेहि स्वामीचे सेवेसी येकनिष्ठपणे सेवा करून आहो. यैशियास स्वामीनी कृपाळु होऊन नूतन इनाम देविलिया वतनावरी राहून सेवा करू म्हणून विनंती यैसियास देशमुख मजकूरहि पूर्वीपासून राजश्री छेत्रपति स्वामीच्या पायासी निष्टेने वर्ततात्ती. गतवर्षी जाऊजी बलकवडा यास लोकाचा जमाव करून सजा दिल्ही. पुढेहि स्वामीच्या पायासी येकचित वर्तावे यानिमित्य त्यास नूतन भूमि दिधली असे. सदरहू इनामखेरीज इनामदार व हकदार वतनदार खेरीज करून दिल्हे असे. यास व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवीत जाणे. या पत्राची तालीक लिहून घेऊन मुख्य पत्र देशमुखास भोगवटियास देण. दरहरसाला नूतन पत्राची अपेक्षा न करणे. जाणिजे छ २४ रबिलौवल आज्ञाप्रमाण मोर्तब असे.

सिका. बार सुद सुद बार

¶*Bahiro Moreshwar Pradhan writes to Mahadaji Shamraj, officer of the Mawal at Lohgad, to respect certain inam grants made by the king to Raghuji Rautrao Dhamale, Deshmukh of the Paud Valley.*

No. 82] [28-1-1702

रु. नं. ६१४

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके २८ वृषानाम संवत्छरे माघ शुध एकादसी सोमवासरे क्षेत्रियेकुलावंतस श्री राजा सिवछेत्रपति यांणी राजश्री देशाधिकारी लेखक वर्तमान भावी प्रांत मावल तालुके लोहगड यांसी आज्ञा केली यैसीजे,

राघोजी राऊतराव ढमाले देशमुख तो पौडखोरे यांणी प्रतापगडचे मुकामी स्वामीसंनिध येऊन विनंती केली की आपली आजी पुतळाई आवा आर्जोजी राऊतराव याची स्त्री यांस थोरले कैलासवासी राजश्री स्वामीनी साडीचोळीनिमित्य इनाम दिल्हे होते. त्याप्रमाणे त्याचे वेलस चालीलें व राजश्री संभाजी राजे याचे वेलस काही दिवस चालिलें. या उपर पुतळाई आवा मृते पावली. याकरिता गाव अमानत जालें. आलाकडे कैलासवासी राजश्री स्वामी सिहगडास आलें ते प्रसंगी आम्ही त्याजवळ उभे राहोन वर्तमान सागितलें. * * * *

¶*Shivaji II recognises the services of Raghoji Rawutrao Dhamale.*

No. 83] [*15-11-1703*

सातारा जमाव रु. नं. ७६० तालीक

श्री

स्वास्ति श्रीराज्याभिषेक शके ३० सुभानुनाम संवत्सरे कार्तिक बहुल त्रितिय इंदुवासर क्षेत्रियेकुलावतंस श्रीराजा सिवछत्रपति याणी राजश्री. देशाधिकारी व देशलेखक वर्तमान व भावी सुभा प्रांत खटाउ यास आज्ञा केली यैसीजे. सुभानजी घाटगे याचे बाप तिमाजी घाटगे चंजी प्रांते रा अमृतराव निबालकर याबराबरी स्वामी कार्यावरी खर्च झाले. याकरिता सुभानजी घाटगे यावरी कैलासवासी स्वामी कृपाळु होऊनु इनाम जमीन चावर दोन दिल्हा होता त्याप्रमाणें करार करून दिल्हा होता. परंतु येकच गांवी दोन चावर इनाम अनकूल होत नाही म्हणून मानिले येही विनंती केली, त्यावरून मशारनिलेस दोन चावर इनाम दिल्हा तो चालवणे अगत्य याचे कारणे पेशजी दोन चावर इनाम दिल्हा होता, तो दूर करून हली गावगना नेमून दिल्हा आहे. तरी तुम्ही देहाये मजकुरी दोन चावर इनाम मारनिलेस पडी जमीन नेमून देऊन कुलबाब कुलकानु देखील हली पटी व पेस्तर पटी खेरीज हकदार व इनामदार करून यास व याचे पुत्रपौत्रादि वंशपरपेरेने इनाम सुरक्षित चालवीत जाणे. सदरहू जमीन पडीपैकी विसा पाडाचे बिघ्याने आवल दुम सीम च्यार सीम चौ प्रतीने मिलोन दोन चावर नेमून देणे. प्रती वरषी नवीन पत्राचा आक्षेप करीत नव जाणे. या पत्रांची प्रती लेहून घेऊन असल पत्र भोगावटीयासी मारनिलेयापासी देणे. निदेश समक्ष मोर्तब.

¶*King Shivaji II confirms the inam land, granted originally in one village, to Subhanji Ghatge for the services of his father Timaji at Gingee where he suffered death in the cause of his king.*

No. 84] [2-9-1713

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ४० विजईनाम सवछर भाद्रपद वद्य नवमी सौम्यवासरे क्षेत्रियेकुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामीचे सेवेसी. सेवक केशो सामराज मजुमदार राजश्री कालोजी पवार सेवेसी लेहून दिल्हा जमानकदबा थैसाजे. राजश्री यादो शकर यासी राजश्री मालोजी पवार याची मजमू सांगितली यासी जमानाविशई आज्ञा केली. तरी आपण जमान असो. जाये पळेत तरी हजीर करून देऊन. हाजीर न करू तरी याचे निसबतीचा जाब करून. हे जमानपत्र लेहोन दिल्हे सही

लेखनालंकार रुजू

तेरीख २२

माहे साबान सन आर्बा बार सुद बार

¶*This is a security given by Keso Samraji on behalf of Yado Shankar appointed secretary to Maloji Pawar.*

No. 85] [26-2-1704

श्री

राजश्री आणाजी जनार्दन दशाधिकारी वर्तमान व भावी व लेखक प्रा वाई गोसावी यांसी

अखंडितलक्ष्मीआळंकृत राजमान्य सेवक परसराम त्रिंबक प्रतिनिधि नमस्कार सुा खमस मया आलफ. राजश्री दताजी केशवजी नाईक पिसाळ देसमुख पो वाई याणी हुजूर विदित केले, की पेटा मजकूरचे देसमुखीचे वतन पुरातन आपुले वडीलवडिलापासून चालत आले. सिका नागर पानमान इनामती व इसापती हकलाजिमा खात आहो. त्यास मध्ये सूर्याजी पिसाळ याणे चंदीच्या मुकामी राजश्री कैलासवासी स्वामिसनिध जाऊन गैरवाका विदित केला की पाा मारचे देसमुखीचे वतन निमे ।।. आपुले आहे. सिका नागर पानमान वडीलपण आपुले आहे. निमे वतन दताजी केशवजी नाईक याचे आहे. त्याप्रमाणे पत्रे लिहिली पाहिजेत म्हणून, त्यावरून राजश्री कैलासवासी स्वामीनी

रामचंद्र पाडत आमात्य व राजश्री सकराजी पडित सचिव यास पत्रे करून दिली, त्याप्रमाणे उभयेता सरकारकुनानी आपली पत्रे करून दिली, त्या पत्रावरून चारपांच वरेष पावेतो वतनास खलल केलें त्याउपरी राजश्री कैलासवासी स्वामीसी शरीरसबंध करावा येसे करून राजश्री राजा कर्ण याची बहीण आपल्या पुत्रास द्यावी यैसा निश्चय करून मागणी घातली. ये गोष्टीवरून राजश्री कैलासवासी स्वामीनी त्याचा आभिमान धरून आपले निमे वतन काढून सूर्याजी पिसाळ यासी दिल्हे. यैसियास सूर्याजी पिसाळ यास आपल्या वतनासी किमपि समध नाही. याच्या वडिलांनी अगर याणे पूर्वी यैसा कथला केला नाहीं. आवरगजेब पातशाहा तुळापुरास आले ते प्रसगी आपण वतनाच्या परवानियाकरिता लस्करास गेलो. पातशाहापासून वतन बहाल करून घेतले. कागदपत्र परवाने द्यावयाचा पातशाहाचा हुकूम जाहला. ते समई झुलपुकारखान रायेगडची मसलत सुरू करून लस्करास आले, त्याबराबरी सूर्योजी पिसाळहि आला. याणे येऊन आपली भेटी घेतली आणि आपणासी बोलिला कीं आपण तुमचा आहे. तुमच्या वतनाचे कागदपत्र परवाने करणे ते आपण करून घेतो. तुम्ही वतनावर जाणे म्हणोन विश्वास दाखविला. त्यावरून आम्ही आदलशाही कदीम परवाने आमच्या वडिलाचे नावाचे होते ते सूर्याजी पिसाळाचे स्वाधीन केले, आणि ।तनावरी आलो. त्यास सूर्याजीने आमचे परवाने होते ते ठेऊन कृत्रिम आदलशाही ।ाकियाचा डौले रुद्रौ चिमणाजी कानगो विजापुर यास लाच रुपये १२५० साडेबारासे ।ऊन त्याजपासून घेतली आणि त्या डौलांत निमे देशमुखी आपली व निमे दताजी ।ेशवजी नाईक याची यैस लिहून, ते परवाने मुतसदीयास दाखऊन पातशाचे ।वे परवाने करून घेतले, आणि झुलपुकारखान चदीस रवाना जाहाला, त्याबराबरी ।ाऊन राजश्री कैलासवासी स्वामीचे दर्शन घेऊन सोइरिकीचा प्रसग करून ।ापल्या निमे वतनाची पत्रें करून घेऊन कथला माडिला आहे. यैसियास ।वामीधर्मपरायण प्रभु आहेत. आपल्या वतनास कलंक लागला आहे तो दूर ।रून आपले वतन आपणास अजरामऱ्हामत केले पाहिजे म्हणोन विदित केले. ।ावरून मनास आणिता राजश्री रामचंद्रपडित आमात्य व राजश्री सकराजी पडित ।चिव याणी पूर्वी याच्या वतनाचा हमशाई वतनदार व पा मारचे वतनदार ।ाणऊन मुनसफी मनास आणली. गोतमुखे दताजी केशवजी नाईक पिसाळ ।ाचे वतन खरें. सूर्याजी पिसाळ लाइंणी+ गला पडला आहे हे खरे केले, आणिहे स्वामीस विदित केले की सूर्याजी पिसाळ लाइंण+ गळा पडतो. स्वामीनी सारे

+ उगाच.

वतन दताजी केशवजी नाईक पिसाळ याजवर कृपाळु होऊन सूर्याजी पिसाळ यास राजश्री कैलासवासी स्वामीनी निमेदेसमुखीचे वतन पानमान सिका नागर वडीलपण दिल्हे होते ते दूर करून यासच बाहाल करून दिल्हे आहे, तरी तुम्ही दताजी केशवजी नाईक पिसाळ याच्या स्वाधीन सारे देशमुखीचे वतन करून पानमान सिका नांगर व वडीलपण यासच चालवणे. हक व लाजिमा व इनामती गाव व जमीन व इसाफती पहिलेपासून चालिले आहे त्याप्रमाणे दुमाला करून चालवणे आणि त्याच्या हाते देशमुखीचा कार्यभाग वंशपरंपरेनें घेणे. सालदरसाल ताजी सनदेचा उजूर न करणे. या सनदेची तालिक लिहून घेऊन आसल सनद भोगवटीयास देशमुख मारनुलेस परतोन देणे. सूर्याजी पिसाळ याणे रा. कै. स्वामीची चदीचे मुकामी पत्रे करून घेतली व या प्रांतें आलियावरी घेतली त्याप्रा सरकारकुनाची व वरकडाची पत्रे करून घेतली ते कुल रद आसत. त्या पत्रांवरी नवजाणे. याचे माथा शेरणी रुपये ५००० पाच हजार ठेविली आसे. म्हणून माहाराज राजश्री छेत्रपति स्वामीचे आज्ञापत्र सादर आहे त्याप्रमाणे तुम्ही दताजी केशवजी नाईक पिसाळ देशमुख याचे हातून पा मारचे देशमुखीचा कारभार घेत जाणे. पानमान सिका नागर वडीलपण इनामती जमीन व इसाफती गाव व हाकलाजिमा पेसजीपासून चालत आला आहे त्याप्रमाणे यास व याचे पुत्रपौत्रादि वशपरंपरेने चालवीत जाणे. प्रति वर्षी नवीन पत्राचा आक्षेप न करणे. या पत्राची तालिक लिहून घेऊन आसल पत्र भोगवटियास दताजी नाईक यासी परतून देणे. छ ११ जिल्काद. निदेश समक्ष.

¶Parashuram Trimbak Pratinidhi here decides the dispute about the Deshmukhi vatan of Wai, between Dattaji Keshav and Suryaji Pisal—the latter had joined the army of the Emperor and married his son to the sister of Raja Karna (an illegitimate son of Rajaram). The decision was given in favour of Dattaji.

No. 86] *[1704*

पुणे जमाव नं. ८७४

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३२ पार्थिव नामसंवत्सरे आश्विन बहुल त्रयोदसी गुरुवासर क्षत्रियेकुलावतंस श्रीराजा शिव छत्रपती याणी मोकदमानी व रयानी

रा हवेली सुभा प्रात जुन्नर यासी आज्ञा केली येसीजे, साल गुदस्ता राजश्री शेखोजी थोरात याकडे मुकासा आहे त्याप्रमाणे सालमजकुरी करार केले असे तरी तुम्ही मौजे मजकूरचे खंडणीप्रमाणे ऐवज मारनिलेकडे बिनाकसर देणे जाणिजे. लेखनालंकार.

¶*Shivaji II continues the Mokasa granted to Shekhoji Thorat.*

No. 87] [*12-12-1704*

नकल.

श्री

मशरूल अनाम चाफाजी सिंदे पदात पंच हजारी यासी बहिरो मोरेश्वर प्रधान आशीर्वाद सुहूर सन खमस मया व अलफ. तुम्ही या राज्यांत कस्ट मेहणत एकनिष्टपणे केली व हाली लोहगडचे प्रसंगी जमावणसी श्रम केला, याबद्दल तुम्हास बक्षीस घोडा बाा दुपटा पेदस्त किले लोहगड पौ किमत रुा ७५ पचाहतरीत नदर यास खडून दिली असे. यास कोन्ही कथला करावयास प्रयोजन नाहीं. छ २४ रमजान. लखनसीमा.

¶*This short document referring to a period some three years before the accession of King Shahu, mentions Chaphaji Sindia taking part in the capture of Lohgad.*

No. 88] [*8-1-1705*

रु. न. ५८६

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३१ तरण संवछरे पौष बहुल नवमी इंदुवासर क्षत्रियेकुलावंतस श्रीराजा सिवछत्रपति याणी धावजी विसार यासी आज्ञा केली येसीजे.

राजमाचीस तुम्ही असता तो जागां तांब्रास हस्तगत झाला ते गोष्टीची शंका मानून स्वामिकार्य करून दाखवावे हे हेतूने राहिले होतेस, त्यास सांप्रत राजश्री बहिरो पंडित प्रधान याणी तुम्हास लोहगड घ्यावयाची आज्ञा केली. तुम्ही कस्त करून किला घेतला. किलेदार तुम्हास ते लिा वर्तमान पंडित मारनिल्हेनी हुजूर लिा आहे त्याजवरून विदित झाले. येशास तुम्हीहि चागली मेहनत करून लोहगड हास्तगत केला हे काम थोरच केले. तुमचे शेवेचा मुजरां झाला. ये प्रसंगी पंडीत मारनिल्हेनी तुम्हास बकसीस नेमले आहे ते द्यावयाविसी श्वामिनी त्यास आज्ञा केली आहे ते

4937

विल्हे करून देतील. राजमाचविसी कांही शंका मानाल तरी ते गोष्टीचे काये आहे! त्या प्रांतीची भिस्त फार पंडित मशारनिल्हेवरी आहे. श्वामिकार्य ईत्पत्याचे आज्ञेत वर्तोन राजमाची आदी करून आणखी देसदुर्ग साध्य कर्णे आणि विशेष आपला मुजरा करून घेणे. जाणीजे लेखनाज्ञा मोर्तब सूद.

¶Shivaji II recognises and rewards the meritorious services rendered by Dhavaji Visar in capturing the fort of Lohgad.

No. 89] [*19-3-1705*

सातारा रु. नं. १: नकल

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३१ पार्थिवनाम सवत्सरे चैत्र शुध षष्टी इंदुवासर क्षत्रियकुलावतंस श्रीराजा सिवछत्रपति याणी तुमाजी गुलभेला मोघम नामजाद मौजे सिगणापूर यासी आज्ञा केली यैसिजे. माहादाजी गौली पूजक याची माय गिरजाई इणे विदित केले कीं थोरले महाराजाचा सदर सोपा सिखरी आहे तेथे लिंग आहे त्याचे पूजेस व आपल्यास वर्षासन येणेप्रो पावत होते.

पूजा सामग्री

तांदूळ कैली	पाने सुपारी	वर्षासन आपल्यास होन
८२।।।	१८०००	पातशाही १९
सुपारी वजन		
८।।४		

येणेप्रमाणे पावत होतें; सांप्रत पावत नाही, तरी स्वामीने मनास आणून पारपत्य केलें पाहिजे. त्यावरून मनास आणितां माहाराजाचे सदर सोपियांत लिंग आहे त्याची पूजा सांग चालिली पाहिजे. याकरितां पेशजी मोईन जे असेल ते दूर करून हली येणेप्रो मोईन करून दिल्ही आहे.

श्रीचे पूजेस पूजा सामग्री

तांदूल आट सेरी बारुले मापें
८३।।। नैवेद्य दररोज ८८=
निटवे प्रो सालीना

वजन टक बंदी
८४।। तेल नंदादिपास दररोज
८८।।. प्रो

4938

ऽ।।। आक्षता पूजेस सालीना.

ऽ४।।.

ऽऽ९ सुपारी दर हज्यार ऽऽ१ येकूण सालीना

ऽऽ१ काव्य सालीना,

ऽऽ५ धूप दररोज ऽऽऽ१ प्रा। सालीना.

ऽ४।।।५

वर्षासन माहादजी बिन देवजी गौली

पुजारी होन पातशाही १५ सालीना

येकूण कैली कोठी मापें साडेच्यार मण वजन याप्रा पावणेपांच मण पाच सेर व सुपारी नऊ हजार व नख्त होन पंधरा मोईन करून दिल्ही असे. तरी सनद पैवस्ता होय तोवरी पेसजी मो प्रा पावलें असेल ते मजुरा असे. सनद पैवस्तगी पासून सदरहू मोईन प्रा साल दरसाल पावित जाणे. साल दरसाल ताजासनदेचा उजूर न करणें. या पत्राची प्रति लेहून घेऊन असल पत्र पूजक मजकुराजवळ भोगवटीयास परतोन देणे. जाणिजे लेखनालंकर.

¶*King Shivaji II renews the allowance to the mother of Mahadji Gavli of Shingnapur for the care and worship of the deity at that place.*

No. 90] [*13-6-1705*

रु. नं. ५८६ नकल

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३२ पार्थिवनाम सवसरे आशाढ शुध्य त्रितीया सौम्यवासर क्षेत्रियेकुलावतंस श्रीराजा शांहू छेत्रपति याणी धावजी विसार यासी आज्ञा केली येसीजे तुम्हीं राजश्री बहिरो पंडित प्रधान याचे आज्ञेवरून जाऊन कस्तकरून किले राजमाचीं हस्तगत केली हे वर्तमान पंडित मशारनिल्हेनी हुजूर लिहिले त्यावरून तुमचे सेवेचा मजकूर जाला, तरी तुम्ही येकनिष्ठ सेवक तैसाच आहा. पुढेहि हेच रितीने पडित मशारनिल्हेचे आज्ञे प्रा स्वामिकार्य करून आपला विशेष मजरा करून घेणे म्हणजे तुमची सरफरासी होईल जाणिजे. लेखन मोर्तब सूद.

¶*King Shivaji II recognises the valiant services rendered by Dhavji Visar in capturing the fort of Rajmachi.*

+ ।सप :

No. 91] [14-10-1706

?. नं १७०८

श्री

राजश्री नारो कृष्ण नामजाद व कारकुन वर्तमान

व भावी सुभा मावले ता कोरीगड गोसावी यांस

॥ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य सेवक शंकराजी नारायेण सचिव नमस्कार सुा सन सबा मया अलफ. मोरो विठल व रामाजी गोविंद व मुकुंद कान्हो देशपांडे प्रांत पुणे हुजूर आले याणी विदित केले कीं औरंगजेब तुळापुरास आलीयावरी आपण कसबे पुणीयामध्ये राहोन वतनाचा कारभार केला. गनीमाच्या जाचा करिता या राज्यांत यावयास अनकूल पडिले नाही याकरिता स्वामीनी आपले प्राा मजकुरचे देशपांडेपणाचे वतन व हवेलीचे वीस गाव ताा कर्यात मावलाकडे आहे ती देखील ही आपले देशकुलकर्णाचे वतन अमानत केले आहे त्यास हली आपण स्वामीचे शेवेसी आलो आहो. तरी विसागावीचे वतन आपले दुमाले केले पाहिजे म्हणून विदित केले. त्यावरून मनास आणिता रामाजी गोविंद चौथे तकसिमेचे खावद हुजूर आले, परंतु याचे तकसीमदार रामचंद्र बावाजी व मेघशाम विसाजी हे व याचे वडील बावाजीराम व विसाजी त्र्यंबक थोरले राजश्री कैलासवासी स्वामीचे कारकीर्दीपासून गैररुजू आहेत. हलीही हुजूर आले नाहीत, याकरिता त्याच्या दोनी तकसीमा वतन चौथे तकसीमेमध्ये आहे ते अमानात केले असे. उरल्या तकसीमदाराचे वतन विसा गावीचे सालाबाद-प्रमाणें याच्या दुमाला करून या वडील सरणीचा निर्वाह प्राा पुणे देखील हुजूर केला असे तरी हवेलीचे गाव वीस कर्यात मावलाकडे आहे. या गावीचा देश कुलकर्णाचा हक लाजीमा व गावगना इनाम जमीन पानमान भोगवटा साला बादप्रमाणे वंशपरंपरेने यांकडे चालवीत जाणें. साल दरसाल ताजे सनदेचा उजूर न करणें. तालीक लेहून घेऊन असल सनद भोगवटीयास यांजवली परतोन देणे. छ १७ रजब पाा हूजूर.

¶*Shankaraji Sachiv to Naro Krishna : issues orders for restoring the vatan of the province of Poona to the Deshpandes of the place, Moro Vithal Honap and others, for the services they had rendered.*

No. 92] [3-8-1691

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके १८ प्रजापतिनाम संवत्छरे श्रावण बहुल चतुर्दसी इंदुवासरे क्षत्रियेकुलावंतस श्रीराजाराम छत्रपति यांणी

देशमुख व देश कुलकर्णी व गांव कुलकर्णी व मोकदम व चौगुले व सेटे माहाजन व बाजे तपे पौडखोरे यांसी दिल्हें अभयपत्र यैसेजे. माा सर्जाराऊ जेधे

देशमुख ताा रोहिडखोरे हे स्वामिसंनिध चंदीचे मुकाम येऊनु विदित केलें कीं तपे मजकूरचे वतनदार लोक रयेत देखील स्वामीचे पायासीं येकनिष्ठ आहेती तरी स्वामीन कृपाळु होऊनु वतनदारास वतने पहिले निजामशाही व आदीलशाही याचे कारकिर्दीस चालत होतीं तेणे प्राो चालवावयाची आज्ञा करून अभयेपत्र देविले पाहिजे म्हणोन. तरी तुम्ही स्वामीचे पांयासीं येकनिष्ठ आहां या गोष्टी- वरून स्वामी तुम्हावरी संतोसी आहेती. त्या प्रांतीच्या राज्याचे कार्यभागास स्वामीनी राजश्री रामचेंद्रपंत आमात्य व राजश्री शकराजीपंत सचिव ठेविले आहेती त्यावरी यखतियार आहे, तेहि तुमचे वर्तमान मनास आणून वतनाचा निर्वाह करून सनदा दिधल्या असतील त्या स्वामीच्याच सनदा आहेती त्याप्राो स्वामी चालवितील. आपले समाधान असों देणे. मावळ प्रांत राजश्री शंकराजी पंत सचिव यांचे दिमतीचे मुलकात आहे, याकरितां तुम्ही त्यांचे आज्ञेप्राो वर्तणूक करीत जाणे आणि स्वामिकार्ये करून आपला मजुरा करून देवणें. पुढें स्वामी त्या प्रांतें येतील तेंव्हा तुमचे उर्जित करितील. हे अभये असे जाणिजे. निदेश समक्ष मोर्तब असे.

¶*King Rajaram gives an assurance of safety to the Jedhe Deshmukh and the inhabitants of the Rohid mawal.*

No. 93] [*10-4-1707*

रुमाल नं. १६९९
(जा

राजश्री निलो मुरार हवालदार
व कारकून वर्तमान व भावी ता
कर्यात मावल गोसांवी यासी

॥ऽ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य सेवक नारो कृष्ण नामजाद व कारकून सुभा प्रांा मावलें ताा कोरीगड नमस्कार. सुहुर सन सबा मया व अलफ. बाा सनद राजेश्री पंत सचिव छ २९ रजब पैवस्ता छ १५ मोहरम तेथे आज्ञा जे मालजी नरसिंगराऊ व गोविंदराऊ सितोले देशमुख प्राा पुणे याणी हुजुर येऊन विदित केले कीं आपले वतन ताा कर्यात मावल पैकीं पुरातन येणेप्राा आहे बितपसिल

इनाम गाव देह — ताा मजकुराकडे हवेली

१ मौजे पासिणें — पुणांचे वीस गांव आहेत

१ मौजे लवले देखील देशमुखी	तेथील हकलाजिमा व जमीन इनाम व जकाती विस्वे अगलंबे भरें.

२

येकूण इनाम गाव दोनी व हवेली तर्फेचे वीस गाव या * लाकडे आहेत. त्यागावींचा हकलाजिमा आपला आहे. त्यास आपण या राज्यासीं पूर्वीपासून येकनिष्ठेने आहो. पूर्वी औरंगजेब तुलापुरास आलियावरी या प्रांते मोगलाची जबरदस्ती जाली होती, तें समई आपले तकसिमदार सुभानराऊ सितोले यासी राजश्री · कैलासवासी स्वामीसंनीध चंजी प्रांते आपण पाठविले होते. त्यास राजश्री कैलासवासी स्वामीनी आपले वतन दुमाला करून पत्रे आपणास * दिल्ही * तीं पत्रेंहि आपणाजवल आहेत. आपण शेरणी * * दिल्ही आहे तरी स्वामीनी आपले * दुमाले केले पाहिजे म्हणून विनंती केली, त्यावरून मनास आणतां सितोले देशमुख याणी पूर्वीपासून निष्ठेस अंतर केले नाहीं. सुभानराऊ सितोले यांसहि राजश्री कैलासवासी स्वामीसनिध चंजी प्रांते याणी पाठविले होते. त्यास राजश्री कैलासवासी स्वामीनी याचे वतन याचे दुमाले करून यास दुमाले पत्रे दिल्हीं आहेत. याणीं सेरणीहि दिल्ही आहे, याकरिता यांचे वतन याचे दुमाला केलें असे; तरी याचे इनामगाव व हकलाजिमा याचे दुमाले करून वंशपरपरेने चालवित जाणें. प्रतिवर्षी ताजे सनदेचा उजूर न करणे. तालिक लेहून घेऊन असल सनद याजवली भोगवटियास परतोन देणे म्हणून आज्ञा. आज्ञेप्रमाणे यांचे इनामगाव व हकलाजिमा सदरहुप्रमाणे याचे दुमाला केले असे. तरी याचे वतन याचे दुमाला करून वंशपरंपरेनें चालवीत जाणें. प्रतिवर्षी ताजे सनदेचा उजूर न करणे. तालिक लेहून घेऊन असल सनद यांजवली भोगवटियास परतोन देणे. छ १७ माहे मोहरम मोर्तब सुद.

¶*Naro Krishna, Subha of Maval, confers twenty-two villages as vatan upon Malji and Govindrao Sitole.*

No. 94] [*1707*

राजमंडल सरजाम लष्कर

सा॰ राजश्री प्रतिनिधि पंत सुहुर सन सबा मया अलफ

सरजाम दि॥. राजश्री कृष्णराऊ मल्हार उमदेतुलमुलुक प्रसिधगडचे मुकामी सारजाम करार करून दिल्हा.

¶*Krishnarao Malhar Umde-Tul-Mulk is given a saranjam at Prasidhgad.*

No. 95] [8-12-1707

सातारा जमाव रु. नं. ६

श्रीशंकर

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३४ सर्वजितनाम संवत्सर मार्गसीर्ष बहुल येकादसी इंदुवासरे क्षेत्रियेकुलावंतस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामी याणी ता। मोकदम ता। उंबरज सुभा सातारा यासी आज्ञा केली यैसीजे. राजश्री विठल विश्वनाथ घिसास हे स्वामीचे पुरातन सेवक रायेगडा ता। स्वामीपासी येकनिष्टपणे कष्ट मशागत केली व गलगले व ब्रम्हपुरीमध्यें तांब्राच्या सैन्यात स्वामीपासी होते, स्वामी कार्यास आले. स्वामी हिंदुस्थानास लस्कर चालिले त्याबराबर होते. सेरीरेकरून कष्ट मेहनत केली. स्वामीकार्यास तत्पर होऊन स्वामीच्या अभ्युदये होऊन स्वराज्यात आले. यावरी मा।रनिलेवरी कृपाळु होऊन यास इनाम व वंसपरंपरेने पुत्रपौत्री करून मौजे मजकूर दिल्हा असे व पेशजीचे पुरातन हकदार व इनाम जे असेल ते वजा करून मौजे मजकुरचे उत्पन्न जे होईल ते कुल कानु कुल बाब यासी सेफतपूर्वक दिल्हे असे. यास इनामास कोण्ही खलेल करील त्यासी शेफत हिंदु होत्साता करील त्यासी वाराणसीमध्यें गोहत्येचे पातक व म्लेछ होतसाता करील त्यासी मकामध्ये शुकर व थकेली याचे पातक असें. मौजे मजकूर जल स्थल निधि निक्षेप पाशाण चेतु:सीमा परयेंत मा।रनिलेस दिल्हे असे. हे अनभऊन आपले पुत्र पौत्री वंश पंरपरेने त्यासी कोण्ही उपद्रव करावयासि प्रयोजन नाही. प्रतिवर्षी नूतन पत्राचा अक्षेप न करणे. सदरहू पत्राची प्रत लेहून घेऊन असेल पत्र भोगवटीयास मा।रनिलेजवल देणे. जाणिजे छ २४ रमजान सु।। समान मया व अलफ.

¶*King Shahu grants an inam to Vithal Vishvanath Ghisas for his services to the former when in the Emperor's Camp at Galgale and Brahmapuree.*

No. 96] [21-12-1707

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिशेक शके ३४ सर्वजित संवछरे पौष्य शुध अष्टमी रविवासरे क्षेत्रीयेकुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपति श्वामी याणी कृष्णाजी भास्कर व भगवत कासी अत्रे यासी आज्ञा केली यैसी जे. अबाजी त्र्यबक व लक्ष्मुमण गोमाजी पुरधरे श्वामी समागमे सेवा करीत आहेत. यैसे असता याचे कबिले सासवडी होते ते तुम्ही राजश्री सकराजीपंत सचिव याजपासि सागोन किले पुरंधरावरी नेऊन घातले आणि याजपासून सोलासे चालीस रुपये घेतले म्हणून विदित जाले तरी हे हुजूर असता

तुम्हास त्याजपासून पैके घेबावयासी प्रयोजन काये होते. याउपरी सदरहू सोलासे चालीस रुपये तुम्ही घेविले त्याचे दुपट पैके तुम्हापासून घ्यावयाचा निर्वाह करून हे आज्ञापत्र सादर केले आसे. तरी देखत आज्ञापत्र पैके घेऊन हुजूर येणे. हैगै केलियाने मुलाहिजा होणार नाही. ऐसे समजोन लिाप्रमाणे पैके घेऊन येणे दिरग न लावणे

तेरीख ७ सुरु सुद बार

सवाल सुाा समान

¶*Shahu orders Krishnaji Bhaskar and another to release the members of the family of Ambaji Trimbak Purandhare which he had kept in custody, as Ambaji was in attendance on Shahu.*

No. 97] [*7-3-1708*

रु. नं. १७७०

श्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३४ सर्वजितनाम संवछरे फाल्गुण बहुल येकादसी रविवासरे क्षेत्रिय कुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपति श्वामी याणी देसमुख व देसपांडीये ताा कानदखोरे यांसी आज्ञा केली ऐसीजे. ताा माचे सेरीया मौजें * * * * * * बेहीचा हवाला नारोजी बांड यांस सागीतला होता. यैसीयास हली ताउजी पवार कदीम सेरीयाचा हवालदार येउनु श्वारीस आपले वृत विदित केले ते मनास आणून सदरहू नारोजी बांड याजकडून दूर करून हली मारनुलेचे हवाले सेरीया केलीया आहेत. तुम्ही याचे हवाले करणें. हे कीर्दी मामुरी करून श्वामिसेवा करीतील. नारोजी बांडाचे हवाले न करणे. जाणीजे निदेश समक्ष

तेरीख २४ जिल्हेज

जिल्हेज सुाा समान

मया अलफ. बार सुद बार

¶*King Shahu transfers certain fields of Kanadkhore from the possession of Naroji Band to that of Tauji Pawar.*

No. 98] [*19-3-1708*

पुणें जमाव, नं. १६९९.]

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३४ सर्वधारी संवत्सर चत्र शुध नवमी भृगुवासरे क्षत्रियेकुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामी याणी ...

4944

इंदापूर यांसी आज्ञा केली यैसिजे. प्रां मारचे बाबतीपैकी चौथाई राजश्री जयेसिंग जाधवराऊ सेनापति यांकडे चालत आहे. यैसे असता तुम्ही साऱ्या बाबती घेता व ते याखेरीज चौथाई घेतात. यैसे कथले करून मुलुक उद्वस केला म्हणून कळो आलें. तरी हे बरे नव्हे. याउपरी बाबतीपैकीं चौथाई सेनापतीकडे देणें, उरला यैवज बाबती तुम्ही घेणे. जाजती तसवीस न लावणे. जाणिजे. निदेश समक्ष.

सुरु सुद बार.

¶*Shahu orders revenue officials of Indapur to desist from exacting the chowthai, in addition to other dues, which properly belongs to Dhanaji Jadhao Senapati.*

No. 99] [*28-8-1708*

रु. नं. ७०२ नकल

श्री

राजश्री नारो माहादेव गोसावी यांसी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्री हिंदुराव घोरपडे दंडवत विनं(ति) तिसा मया आलफ. तुम्ही तीर्थरूप राजश्री संताजी घोरपडे कैलासवासी याजपासी पूर्वी येकनिष्टेपणे सेवा केली. त्याणी लेकपणे तुमचे सर्वस्व गोमटे करून चालविले. याजकरितां सांप्रत आम्हापासी येऊन आपली माया भावभक्ति येकनिष्टा दर्शऊन आंत:करण सुप्रवर्तीन तुमचे सर्वस्व आभिमान धरून तर्थिरूप कैलासवासी याचे पुत्रपणे जसे होता तदन्वये आमचे पुतणे जाणून तुमचे ऊर्जित करून खासगत कबिलियाचे बेगमीस संपूर्ण राज्याची सरदेसमुखी खासगत वतन आम्हास आहे, त्यापैकी तपे सरदेसमु(खी) आजरा-मरहमत वंशपरंपरेन दिधले आसे. तरी तपे मजकूरची हकलाजिमा व इनामगाव व जकाईत वीस्पट जो सरदे(स)मुखीचा आमल आपले स्वाधीन करून घेऊन यापैकी जो आकार होईल त्याचा श्री स्वामीस दाहिजा देऊन बाकी येवज सुखरूप आनभवणे. आम्हासी व आमचे वंशपरंपरेने येकनिष्टेन वर्तणूक करावयास आंतराये न करणे. जाणीजे. छ २२ माहे जमादिलाकर. बहुत काय लिहिणे नलगे.

¶*Bahirji Hindurao Ghorpade (brother of Santaji) confers the Sardeshmukhi of Ajre to Naro Mahadev who rendered loyal services to Santaji Ghorpade and who, in consequence, was looked upon as his son by the latter.*

No. 100] [26-3-1708
पुणे जमाव नंबर १२१

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३४ सर्वधारी संवत्सर चत्र बहुल प्रतिपदा भृगुवासर क्षत्रिये कुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामी याणी मोकदम मौजे हवेली ताा हवेली प्रात पुणे यासी आज्ञा केली यैसी जे. मुकासा पेसजी मुकासियाकडून दूर करून हाली राजश्री गोविंदराऊ त्रिमल सेनाहफ्तहजारी दिाा राजश्री तिमा(जी) साबाजी यांकडे जमावाच्या बेगमीबदल (दि)ल्हा आसे. तरी तुम्ही माारनलेस रुजू होऊन मुकासबाबेचा यैवज आकारप्रमाणे माारनलेकडे वसूल देणे.

¶Govind Trimal is given the Mokasa of the village of Parvati by Raja Shahu for the maintenance of his troops.

No. 101] [30-3-1708
रु. नं. ३७३

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३४ सर्वधारी संवत्छरे चैत्र बहुल पचमी भोमवासरे क्षत्रियेकुलावतस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामी यानी मोकदमानी ताा निरथडी प्राा पुणे यासी आज्ञा केली यैसिजे. मौजे माार पेशजी राा बलवतराऊ देवकाते याकडे मोकासा आहे तेणें प्राा हली राा धर्माजी बलवतराउ देवकाते याकडे मोकासा करार केला असे, तरी तुम्ही यासी रुंजू होऊन मोकासबाबेचे ऐवज माारनुलेकडे वसूल देणे. निदेश समक्ष.

¶King Shahu confirms the transfer of the Mokasa from Balvantrao Devkate to Dharmaji Devkate.

No. 102] [30-3-1708
पुणें जमाव, रु. नं. २१]

श्री

श्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३४ सर्वधारी संवछरे चैत्र बहुल पंचमी भोमवासरे क्षेत्रियेकुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामी यानी मोकदमानी ताा हवेली पाा पुणे यासी आज्ञा केली यैसीजे. पेशजी सरलस्कराकडे मोकासा आंहे, तेणे

प्रमाणे हली रा हैबतराऊ निंबालकर सरलस्कर याकडे मोकासा करार केला असे तरी, तुम्ही यासी रूजू होऊन मौजे मजकुरीचा मोकासबाबेचा यैवज मारनिलेकडे वसूल देणें. निदेश समक्ष.

बार सुरु सुद बार.

¶*King Shahu confers the Mokasa of a village upon Haibatrao Nimbalkar.*

No. 103] [*24-6-1708*

रु. नं. ३७९ नकल

श्री

श्वस्ति श्रीराज्याभिशेक शके ३५ सर्वधारी सवछरे आषाढ भोहूल ३ गुरुवासरे क्षेत्रियकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी याणी राजश्री हरि यादव देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी प्रां पुणे यासी आज्ञा केली यैसीजे. राजश्री महिमाजी दिनकरराउ काकडे याणी स्वामिसंनिध येऊन विनंती केली जे, इनाम कारकिर्दी मलिकअंबर व हैबतखान व जैनाखानपासून चालत आले आहे त्याप्रो माहाराज राजश्री शाहाजी राजे स्वामींनी भोगवटा मनास आणून आपले पत्र करून दिल्हे, त्याबरहुकूम वृत्ति आनभवीत आलो. त्याउपरी माहाराज राजश्री थोरले कैलासवासी स्वामिनींहि भोगवटा व माहाराज राजश्रीचे पत्र मनास आणून आपले पत्र करून दिल्हे जे इनाम भोगवटा चालिला आहे त्या प्रों मारनिलेस दुमाला केल आसे व इनाम खंडणी माफ केली आसे म्हणोन पत्र सादर केली आहे त्या प्रों आपण आनभवीत आहो. हाली स्वामी कृपाळु होऊन आपली पत्र करून दिल्ही पाहिजे म्हणून विनंति केली. त्यावरी स्वामी कृपाळु होऊन सदरहू पत्रें व जिनस हुजूर आणविली आणि भोगवटाहि मनास आणून सदरहू प्रो इनाम मरामत केले असे व इनाम खंडणी माफ केली भोगवटा चालत आले प्रो चालवीत जाणें. प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न कर्णे. प्रती लेहून घेऊन मुखे पत्र भोगवट्यास मारानिलेपासी देणे. निदेश समक्ष. मो आसे.

सुरु सुद बार

¶*The inam of Mahimaji Dinkarrao Kakde is confirmed by Raja Shahu.*

No. 104] [Dec. 1708

सातारा जमाव १९३७

श्री

कानूजाबिता प्रा हाय

माहाराज राजश्री सिवछत्रपति
आनंद सवछरे सन खमस सबैन
तख्ती बैसले. तह मुल्कचा करून
दिला शके १९९६

मुजेरी जमीन कूल इनामदार अमानत खालसा जमान

	पाटस्थल		मोटस्थल
नैशाकर (होनू) ३ दर बिघा धान्य पेरा		नैशाकर दर बिघा धान्य पेरा	
तिसरे पीक मालवे	६३ खरीफ	होन २॥	६२॥ खरी..
मष्टप (?) दर बिघा	६१॥ रबी	मालवे ॥	६१। रबी
होनू ॥	६४॥		६३॥।
	गला दस सेरी बारूले		गला दस सेरी बारूले

जिराती जमीन

येक पिकी	दु पिकी
६३ अवल वहीत	६२॥ यैन पहिल पीक
६२॥ यैन	६॥। दुसरे पीक
६॥ मोघण	६३।
६३	तूप दर बिघा वजन टकबंदी ६६॥
६२ दुम	
६१॥ सिम	

दफते (?) बाब

रटका	परूस टका	दाणे (?) पछोडी	मूत ताणी
१	१	५	६६
त्रा (?) बदल	भूतफरोसी टके		
५	३		

लग्न टका पाटदाम टके भेटी गाव पाहोन व्हन
१॥ ३ ३ पा २ पा १ पा

वणी टके
२ म्हसी १ गाय
२॥ बैल सिंग कसर
बैलास बकालास

बलुते
९ सुतार ३ लोहार ३ माहार दर नफर ९।८ चाम्हार
२॥ हजाम ३ परीट ३ कुभार १॥ माग दर नफर
२॥ गुरव १॥ तराळ ३ कोळी

खूम

वाणी दुकानदार	(तेली)	१। साळा हान
२ प्रा	२॥ प्रा	१। कासार होन
१॥ प्रा	२ प्रा	१। सोनार होन
१ प्रा	१॥ प्रा	१। मोमीन
		२। निबाळी (?) होन

कोळी उतारे दर होन	बैल सिंगाळ्ठ दर बैलास होन	सेव माळी होन
१	॥	१

येकून जमाई

होन येकून खुर्दा गला दर मणी टके तसेरे
* * ४ ४।६ खा पाढर कण
६॥३ रबी
येकून होन
८॥। खा १०॥।= पा १३८= रबी

खेरीज दर सदे

९ सर देसमुख ९ हकदार
२ देसमुख देसपाड
३ पाटील कुलकर्णी चौ

कारकाद मा राजश्री शंभू छत्रपति

शके १६०२ रौद्र छवछरे

पेसजी प्रा * हकदार * * * ईचा टका माफ

कारकीर्दी मा। राजश्री राजाराम स्वामी
शके १६१० विभव संवछरे

धारा पेशजांचा करार धामधुमेमुळे पाहणी राहिली, सरासरी धारा रयेतेस करून दिला. दर खडीस खा। रा। पा। यों	हकदार
४०	५ सरदेशमुख पेसजी
	६ साहोत्रा नूतन
	५ देसमुख देसपाड
	५ माहाल मजकूर
	१० मसलती पटी चंदी
	३१

इनाम पाटील कुलकर्णी दर चावरी लागले जमिनीस दर चावरी बिघे ८५

कारकीर्दी माहारा(ज) राजश्री
शाहू छत्रपति स्वामी

धारा कदीम करार	इनामदार बाजे
	१० सरदेसमुख
	५ कदीम
	५ ज्याजती
	६ साहोत्रा
	५ देसमुख
	२॥ देसपाड
	२ नाडगौडी
	१। देस चौगल
	५ माहाल मजकर

सके ३५ सर्वधारी सवछरे सुा। तिसा मया अलफ १६३० सवाल पा(सून)च दोन आले.

¶*This paper gives the rates of revenue assessment fixed in the three successive regimes—of Shivaji, Sambhaji and Shahu.*

No. 105] [*1708 ?*

ज. रु. नं. १६६४

सुभानजी पोवार

:॥ श्री

मोहबत व येखलास * * गाह बादज दुवा आ की येथील * * * जाणौनु तुम्ही आपली हमेशा येथ जागीर

शाहमतपन्हा राजजी राजे थोरात याची बमये फाजदारा आहे तर याच जागराच जे गाव असतील त्यास फौजदारी वगैरे कोन्हे बाबे मुजाहिम न होणे, याजला नवाब साहेबी जागीर व फौजदारी दिधली आहे येविशई बहुत लिहिण बाजत नाही. ज्यादा काये लिा हे किताबती.

¶*Subhanji Pawar is ordered to desist from molesting the possessions of Rajji Thorat.*

No. 106] [*14-2-1693*

नकल

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके १९ अंगिरानाम संवछरे माघ वाा चतुर्थी भोमवासरे क्षत्रियकुलावंतस श्री राजाराम छत्रपति यांणी राजश्री देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी सुभा प्रांत कराड यासी आज्ञा केली यैसीजे. सेकोजी मोहिते बीन सावजी मोहिते याचे विषयी राजश्री संताजी घोरपड सेनापति यांणी चंदीचे मुकामी स्वामीसनिध येऊन विनती केली की सेकोजी मोहिते हे स्वामीच्या पायासी येकनिष्टता धरून देसीहून कर्नाटक प्रांतास चंदीस येऊन येकभावे सेवा करीत आहेत यांसी काही भूमि इनाम करून देविली पाहिजे म्हणोन विदित केले, त्यावरून स्वामी याजवर कृपाळु होऊन नुतन इनाम येक रास कुलबाब कुलकानु खेरीज हकदार करून दिल्हा असे. विसा पांडाच्या बिघ्याच्या मोजणीप्रो सदरहू भुमि याचे स्वाधेन करणे व याचे पुत्रपौत्रादि वौंशपरंपरेने चालवणे. या पत्राची प्रती लेहून घेऊन मुख्य पत्र इनामदार माारापासी परतोन देणे. निदेश समक्ष मोर्तब.

तरिख १८ जााखर

सुाा सलास तिसैन.

¶*The services of Sekoji Mohite are rewarded by King Rajaram.*

No. 107] [*9-8-1709*

रु. नं. १७१७

नकल

वाटणी वतन देशमुखी व देशपाडीये पण वगैरे सरकार दौलताबाद वगैरे सके १६३१ विरोधीनाम सवछरे श्रावण शुाा पौर्णिमा सोमवार छ १२ जमादिलाखर

सन हजार १११९ ते दिवसी रजावंदी राजश्री राऊ मानसिंग व राजश्री रावोजी व रो यशवंतराव रो दताजीबावा पिसगण राजश्री राव जगदेव नबिरे? रो दताजी राज जाधव मोकरर जाले बि ताा परगणे २७ सतावीस मोकरार हसील रुपये २०६९४७२।≡।।। पैकी मिन्हा परगणे ६ मोकरा जमा रुा ४४२९०८८=।। बिताा परगणे

¶*This is a division of the vatan of Deshmukhi and Deshpandgiri granted to the various members of the Jadhavs.*

No. 108] [*14-2-1711*

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३७ विक्रति नाम सवत्सरे फाल्गुण शुध अस्टमी सौम्येवासरे क्षेत्रियेकुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामी याणीं राजश्री सुलतानजी जाधव हवालदार व कारकून किले सिहीगड यांसी आज्ञा केली ऐसीजें. नामाजी अपाजी व रामचंद्र यादव लाडे देस कुलकर्णी कर्यात मावले याचे कुलकर्ण व गाव व इसापत इनामत सुदामत पूर्वापर चालत आले असेल त्याप्रमाणे चालवणे. उजूर न करणे जाणिजे. लेखनालंकार.

¶*King Shahu confirms the Kulakarna of Karyat Mawal to Namaji Appaji Lande.*

No. 109] [*7-11-1711*

ज. रु. नं. १६४९.

श्रीशंकर

राजश्री कमाविसदारानी वर्तमान व भावी माहाल सरदेसमुखी सरकार जुनर गोसावी यासी.

॥S अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेो संताजी जाधवराऊ सेनापति सुाा इसने असर मया अलफ. राजश्री म्हलोबा गोसावी व्यास्तव्य माहास्थान मुाा जेजुरी ताा कऱ्हेपठार यासी वराशाशन मोईन प्रतिवर्षी होन पातशाही १० दहा येकूण रुपये तीस धर्मादाव राजश्री राऊ कैलासवासी याजपासून चालत आहे, तेणेप्रमाणे धर्मादाव चालो देणे. जानिजे ताा छ ७ सवाल

¶*Santaji Jadhao continues an annual allowance of ten hons upon Mhaloba Gosawi of Jejuri.*

No. 110] [16-11-1711

ज. रु. नं. १६५९ नकल

श्वस्ति श्रीराज्याभि शके ३८ खरनाम संवछरे कार्तिक बहुल त्रितीया भृगवासरे क्षेत्रियकुलावतस श्रीराजा शाहू छत्रपती स्वामी याणी देसमुख व देसपांडे पा। सुपे बारामती यासी आज्ञा केली यैसीजे. पा। मजकूरचे बाबतीपैकी चौथाई चंद्रशेन जाधव याकडे पेसजी मुकासा होता तो दूर करून हाली राजश्री संताजी जाधवराऊ सेनापति याकडे जमावाचे बेगमीबद्दल मोघम येवजी मुकासा दिल्हा असे. तरी तुम्ही यासी रुजू होऊन सदरहू यैवज मा।इलेकडे वसूल देणे जाणिजे.

¶*Shahu confiscates from Chandrasen Jadhao the Mokasa of Peta Supa and Baramati and confers it upon Santaji Jadhao Senapati. This illustrates the rebellious attitude of Chandrasen which led to his dismissal from the post of Commander-in-Chief.*

No. 111] [23-1-1712

रुमाल नं. ४७

सुरत मजलसी वाके छ २९ जिल्हेज सु।। सन हजार ११११ दर महकम अकी करजवणे व पायेगुडे देशमुखानी व मोकधमानी व रयानी ता। कर्याती मावल प्रा। मोहियाबाद⁺ सरकार जुनर सुभे खुदस्ते बुनियादी महजरनामा यैसाजे. यादो नामदेऊ लाडे पेशकार रामराजा भोसले यास किले कोंढाणा बमै कबिले असता रामचद्र नीलकठ व शकराजी नारायेण मुदसदी सरकार माहिले यांसी साजीसी करून आपणास स्वार व प्यादे पाठऊन किले मा।रावरी नेऊन कैदेत ठेउन कर्यात मा।रीचे देसपाडीयापणाचा यादो मजकुरे महजर करून घेतला आहे, तो आपले रजावदीने जाला नाही, आपणावरी ताजदी सीतम जोर बजोर करून कागद करून घेतला आहे तो बातील असे कुरसी व दर कुरसी कदीम लयाम जतकला रामाजी विठल होनप व अवलादी मोरो विठल होनप देसपाडीये कर्याती मा।र आबा व आभिबा याची मिरासी पिढी दरपिढी काबीज मुदसरफ व सनद असनाद व हुकाम व परवाने जाती व महजर व भोग भोगवटा ताबल असे बमहजर सही मोकदमानी ता। जयेलय.

खउजी बिन विकाजी नाझरे
मोकदम मौजे पलीकु
निशाणी नांगर

भिउजी बिन कुभाजी कजल
मोकदम मौजे येरे
निशाणी नांगर

+ पुणे.

खंडोजी बिन कृस्णाजी पाटील मोकदम मौजे सुस सतजी पा ससार मोकदम

निशाणी नांगर

बालोजी बीन बाजी धावडे बिराद-गर गानी मोकदम मौजे कोंढे

निशाणी नांगर

जनाजी बिन शाहाजी पायगुडे मोकदम मौजे आगळंबे

निशाणी नांगर

माहादाजी बिन सुर्याजी मोकदम मौजे सिव्रणे.

निशाणी नांगर

सताजी बिन देउजी पा मौजे जावधन

निशाणी नांगर

सिदोजी पा ससार मौजे चाते

निशाणी नांगर

हिरोजी पा पाडले मोकदम नागोजी बीन जाउजी कोलेकर निमे मोकदम मौजे माहाळुगे

निशाणी नांगर

गवरोजी बिन बदजी मोकदम मौजे खाबगाव

निशाणी नांगर

सिउजी बिन बालोजी बिरादर मोकदम मौजे नादेड

निशाणी नांगर

बहिरजी बिन कनकाजी पायगुडे मोकदम मौजे कुडिजे

निशाणी नांगर

जावाजी बिन रायाजी पा मौजे नादे

निशाणी नांगर

दा। खंडोजी बिन जैताजी करजवणे देसमुख का। मा।र

फारशी मजकूर

रखमाजी बिन विसाजी करजवणे

कान्होजी बिन बाजी रविराऊ पायगुडे

फारशी मजकूर

दा। दिपाजी बिन दुर्गोजी रविराऊ पायगुडे देसमुख का। मा।र

फारशी मजकुर

गोबी येसाजी देसमुख प्रा। हुउ रुजूच सिबण

फारशी मजकूर

¶*Decision by the Panchayat in a dispute between Yado Namdev Lande and the Honap Deshpandes of Poona about the Deshpande Vatan of Poona. Judgment is given in favour of the Honaps.*

No. 112] [*1-7-1712*

जमाव, रु. नं. १७७२.] A

श्री.

आज्ञापत्र समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री बालाजी पंडित सेनाकर्ते ताहा मोकदम ता। करेपठार सु।। सलास अशर मया अलफ.

मौजे मजकूर पेशजीच्या मोकासियाकडून दूर करून हाली राजश्री अंबाजी त्रिंबक यांस कुलबाब कुलकानू इनाम दिल्हा असे. तरी तुम्ही यास रूजू होऊन मौजे मजकुरचा यैन होईल तो वसूल देणे. दुसरियाकडे येक रुका वसूल न देणे. जाणिजे. छ ७ जमादिलाखर. निदेश समक्ष.

¶*Balaji Pandit Senakarte confers on Ambaji Trimbak a village in inam.*

No. 113] [*6-10-1713*

रु. नं. १७७२

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ४० विजय सवछरे अस्विन बहुल त्रयोदसी भोमवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामी याणी मोकदम करेपठार यासी आज्ञा केली यैसीजे. मौजे मजकूर आबाजी त्रिंबक सबनीस दिमत राजश्री मानसिंग मोरे सेनापति याजकडे वतनाचे ऐवजी मुकासा दिल्हा असे. तरी तुम्ही यासी रुजू होऊनु मुकासबाबेचा ऐवज मारनिलेकडे वसूल देणे. किले पुरंदरास निमे मुकासबाबेचा ऐवज देविला होता तो दूर करून बाबतीचा ऐवज किला कडे करार केले असे +लेखनालंकार.

¶*Shahu confers a Mokasa upon Ambaji Trimbak, who was Sabnis to Mansing More Senapati.*

No. 114] [*9-9-1714*

रुमाल नं. ९६६ पुणें जमाव.

सदरहु चकनामा लेहून दिल्हा यैसाजे ; माहाराज राजश्री छत्रपति स्वामी कृपाळु होऊन खंडोजी बिन येसजी दाभाडयासी राज्याभिशक शके ४७ सतेतालीस शार्वरी सवछेर सुा सन इहिदे अशरीन मया अलफ. यामधे कृपाळु होऊन कसबे मार इनाम चावर १८ येक देविला. अवल दुम सीम तीन प्रती चऊ सिमा पडजमीनपैकी मोजून देणे म्हणऊन आज्ञापत्र छ ११ रमजान गुरुवार सन खमस अशर साली सनद सादर जाहली.

¶*King Shahu grants land in inam to Khandoji Dabhade.*

+ येथून अक्षर वेगळें असें.

[No. 115] [15-2-1715]

रु. नं. ११४९

श्रीशंकर

राजेश्री कमाविसदारानी वर्तमान व भावी
माहाल सरदेसमुखी सरकार जुनर प्रात
पुणे गोसावीं यासी

ℰ अखडितलक्षुमीअलकृत राजमान्ये श्री सताजी जाधवराऊ सुा सन खमस अशर मया अलफ. राजेश्री म्हाळोबा गोसावी वास्तव्य माहास्थल मोकाम जेजोरी ताा कऱ्हेपठार यासी वरशासन मोईन प्रतिवर्षी होन पातशाही १० दाहा येकून रुपये तीस धर्मादाव रो राऊ कैलासवासी यापासून चालत आहे, तेणेप्रमाणे चालवीत जाणे. पत्राची तालीक लेहून घेऊन असल पत्र भोगवटियास गोसावी-यापासी देणे. दर हरसाल ताजे सनदेचा उजूर न करणे. बहुत काये [+]लिहिणे जाणीजे राा छ २१ माहे सेफर हे विनंती.

¶*Santaji Jadhao confers an allowance of ten hons upon Mhaloba Gosavi. Vide No. 109 above.*

No. 116] *[1715?]*

जमाव रु. नं. १६७३.

श्री

॥ℰ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये राजश्री निलोजी हांडे देसमुख व ताा राा विठोजी नाा वाा देसमुख व विसाजी महादेऊ ताा देसमुख व गोविंदराउ वाा देसमुख व कृष्णाजी हरि व त्रिबक हरि देसपांड्ये व आबाजी गोपाल आ देशपांड्ये व नानाजी रघुनाथ आा देसपाड्ये * * देसमुख व देसपाड्ये साा मार मुााा सातारा राहुनु विनंती उपरी येथील क्षेम छ १ जिल्काद पावतो येथास्थित जाणौन तुम्ही आपले वर्तमान निरंतर लिहीत जाणे विशेश तुम्हापासून स्वार जालों ते मजल दर मजल * * अटकावा- करिता आठ च्यार रोज अधिक लागले. छ २४ सवाली सातारियात दाखल जालों. राजश्री पंत साहेबाची मुलाजमत जाली. ते समई आपणावर इतराजी फर्माविली की तुम्ही मवास होऊन राहिले आहा. आमच्या आमलास मानीत नाहीत. यैसे मलई करितां म्हणौन पाचसात रोज तो मुतलख इतराजी खालेच

+ याच अर्थाचे 'राजश्री गंगाजी नारायेण सुभेदार व कारकून व वर्तमान भावी सुभा प्रांा पुणें गोसावी यांसि शंकराजी नारायेण सचिव' याचें पत्र आहे.

होतो. रोज्ञ मुजरियास दुवक्ता जात होतो. नेल कर्मा घोडे वगैरे स्वराज्यात गाव आहेत, तेथील पैशे नेले आहेत ते भरणे, म्हणौनु बहुत इतराजी केली. महसल लाविले. त्यास पाच सात रोज इतराजी खाले होतो. त्यावरी आपले बाबा राजेश्री तीर्थरूप कचेश्वर बावा यानी व रा आयाबा[+] याणी बहुत प्रा सागितले की यास कृपा करून बलाविले आहे. तरी याजवर दया करून याचे मतलब मनास आणून कार्यभाग करून यास बिदा कीजे. त्यावरी छ १ जिल्कादि आपणास प्रधानपंती बोलाऊन सागितलें की काये हकिकत आहे. श्वराज्यात खलेल काये सबब? त्यावरी आपण विनंती केली कीं, श्वराज्यांत जागीर किले जात अमल शंकराजी मल्हार गौली पंचावनहजार रुा जागीर साबिक व बलजागीर * * * करीम बेग व बांदल परवाणे ताकीद निजामन मुलुक याचे मोहरेनसी घेऊन आले. ते अमल श्वराज्यांत करितात. आपण आज्ञाधारक तुमचे तैसे त्याचे. बमोजीब परवाणे आपणास बैसऊन कोण्ही चिठिया घेतल्या व कोण्ही बगरचिठिया अमल करितात. त्या गावास तुमचे ताने मोगलाईची जमाबंदी जागीरदारानी केली. यासिवाय तमाम प्राामधें अमल चौथाईचा आहे. आपल्या प्राामधे मनमाने तैसे अमल होतो. आपणास कोण्ही पुसेना. तमाम प्राा राब जाला. रयतेचे सिरी धणी नाही. साहरांचा[१] मजकूर यास जिरात व बागाईत नाही. जुजबी वसती, त्यास फौजदारास हुकूम आहे. किले सिवनेर नजीक पांच कोसी दक्षणी लोकास येऊं न देणे. याबदल तेथे कोण्ही तुमचा कारभारी बसलिया वाके दाखल होईल. यामधे आपणावरी नु * बाद कमी येईल म्हणौनु येथे बरो देता नये. गुंज्यास नाही. कोठून गोणगोठ येते त्याचा हासील मात्र हासील येते. यावरी येका ब्राम्हणाची गुजरण होईना यैसे आसोन हरघडी साहरावर श्वारी येऊन गुरेढोरे नेतात. प्राामधे श्वारी लष्करे येत जात आहे ते घासदाणे घेतात. यैसा कसाला यामुले मुलीक बसेना. हकदाराचा हक पावेना. तमाम नरबदे-पावेतो तीर्थरूप कैलासवासी याणी बंदोबस्त केला. आण आपले मुलुकची हकीकत यैवजेची आहे. यावरी कृपा करून सागितलें की तुम्ही सनदेचे ताबे आहा. तरी आपण परवासत हालचें अमल निजामनमुलुक याचे मोहरेनिसी आणिला आहे व साबिक फर्मान आहे. येणेप्राा तुम्ही अमल करणे, दिगर लासम व जागीरदार यास आमल न देणे. साहारचे बाबे जाहीर केले तरी तेथील चौथाई व प्राा मजकुरी सिवाये श्वराज्यात ताा आहेत त्यामधे चौथाई प्राा अमल प्रो सनद

+ मुजमदार, १ शहर जुन्नरचा.

घेणे व सरदेसमुखी साहर व प्राा मजकुरी दाहोत्रा प्राा सिवाये चौथाई अमल होईल. श्वराज्यात जागीर किले जातींचा आहे, तेथें आपला अमल होतो तो होईल. श्वराज्याचे बाबे परवाणियाची नकल व यैवजखानाचे लिहिले. साहेबास जासूद घेऊन आला, ते कागद नावेत भिजले तो नविस्ताब जिनस पाठविला आहे व सांगितले की हे लिहिले हालचें. मागेहि येकदोन वेळां सुबियाची खते पाा आहे. यैसे असोन तुम्ही व फौजदार धामधूम करिता. प्राामधे मबलगत फचीका करून श्वराज्यात लूट करितां, याउपरी तुम्हीं व फौजदार प्राामधे श्वराज्यात फौजदारी ताा न करावी व प्यादा न पाठवावा. येक मुचलका देणे, आण बिदा होणे. यास नौदिगर जाली तरी गर्दन मारले जाल. यावर आपण आगरामधे ठाणे मातबर बैसऊन जे अमल सुरलीत चालेल, जो नौदिगर करील तो बांधला येईल, समजोन घेऊ. येणे प्राा रदबदल इंतबाप्रो जाली. हे वर्तमान पुन्हा पुन्हा सांगोन आज्ञा केली की, येणेप्राा मुचलका देणे. याउपरी रदबदल कराल तर परवतावरी ठेऊ. तुम्हास आमचा अमल हलसंर+ वाटतो. यामधे समजणे कीं, आमच्या अमलच्या सनदा फर्मान परवाणे असोन तुम्ही व फौजदार धामधूम करिता ते दरगुजर[१]. आता याप्रोा अमल होये. त्यावरी आपण मागोन घेतले कीं, आपण बाजे माहालीमधे विचारून मुचेलका देऊन. त्यावरी आपण कबूल साहिबासी केले आहे कीं, जो तह होईल तो आधी लेहून पो. तरी येथे या तहाप्राा म्हणतात, तुम्ही साहेबास कुली वाकीफ करून सांगणे. साहेबास सुबियाचे खत व परवाणा श्वराजियांतील आणिला आहे तेणेप्राा अमल होईल व आपलेहि मतलब चौथाई वगैरे यैसे काम होऊन आले आहे. तरी येणेप्राा अमल मान्य करून आम्हास लिाा. येथे कस्टी, पाउसाचे चिखलांत बिन्हाड दुरुस्त नाही. खर्चास नाही. तरी, याचे प्रतिउतर कागद पावलियावरी दुसरे रोजी जाब लेहोन पाा व घोडियाचा मजकूर पुसिला तो सांगितला कीं, सातसे रुाा करीमबेगाकडे आहे. त्याच्या जागिरीत पैका घ्यावा, तो तुम्ही श्वराजात मना करितां, तरी तुम्हीच घेणे. त्यास सिवाये श्वराज्य सातातोा[२] मधे गौऊ त्याचे असती तेथे घेणे. अगर त्याजपासून घेणे. यावेगला तिसरा घोडा मेला त्याचे दोन हजार रुाा यैसे सताविसे रुा घोडेबााव जागीर श्वराज्य घोडे वगैरे जे बरदास्त[३] केले, ते लेहोन देणे. तेणेप्राा पैके हजूर भरणे. आण पुढें जमान देणे की साहार वगैरे अमल व श्वराज्यात येक प्यादा नपा
* * फौजदारी वगैरे अमल न करू. करू तर जमानदाराने

+ हलका, ढिला? १ [दर्गुजर—क्षमा] २ तर्फा. ३ हस्तगत?

ाबू करावा. यैसा प्रसंग. या दुखास काये म्हणौन लेहावे? तुम्ही परभारे ाल करून आमची गोर गाइलिया दुखास काये करावें? आता याचा काये विचार? ाहेबास सांगणे महसल लागुलाऊ. येथे वाघाच्या जबडियांत सोडून दिधले. भाता याचा काये विचार? काये गत आमची करता? आमचा निर्गम होये पैकियाची वाट यैसा जाबू पत्र पावता लेहोन पा. जावसाल येताजाता दहाबारा रोज लागतात. यावेगले तुम्हास ईश्वरे बुध देऊन सत्वर जाब पाठविला पा म्हणजे वांचतो.

¶*Some agent of the Hande Deshmukhs writes from Satara informing them of his interview with the Peshwa and of the offence the latter had taken at the conduct of the Handes. The paper seems to refer to the times of the regime of Nizam-ul-mulk.*

No. 117] [*23-4-1716*

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ४२ दुर्मुखनाम सवत्सरे वैशाख शुध त्रयोदसी इदुवासर क्षत्रियें कुलावतंस श्रीराजा शभु छेत्रपति स्वामी यांणी वेदशास्त्रसंपन्ने राजश्री श्रीधर बिन परमानद कवींद्र निवासकर गोत्र काशेप सूत्र आपस्तभ यासी दिल्हे इनाम पत्र यैसीजे. तुम्ही स्वामीच्या राज्यातील पुरातन आश्रित, तुम्ही स्वामीसनिध विनंती केली की आपण कुटुबवछल आहो. आपला योगक्षेमास येक गाव इनाम करून दिल्हा पाहिजे म्हणून, त्याजवरून तुम्ही स्वामीचे पुरातन आश्रित, बहुत थोर, कवित्वी बहुत निपुण, तुम्हास इनामगाव दिधलीयाने तेथे राहून स्नानसंध्यादि शट्कर्मे आचरोन स्वामीस व स्वामीचे राज्यास कल्याण चिंतून राहाल. याहून श्रेयस्कर काये आहे? यास्तव स्वामी तुम्हावरी कृपालु होऊन नूतन इनाम कुलबाब कुलकानू खेरीज हकदार इनामदार करून मौजे येकोली ताा मलकापूर सुभा मलकापूर हा गाव देहे येक रास इनाम सर्वमान्य करून दिल्हा असे, तरी तुम्ही मौजे मजकूर पूर्व मर्यादेप्राा चतु:सीमा करून आपले स्वाधीन करून घेणे, आणि इनाम तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने अनभऊन सुखरूप राहाणे. सदरहू इनाम स्वामी तुम्हास उतरोतर सुरक्षित चालवितील. जाणिजे निंदेश समक्षे.

¶*King Sambhaji of Kolhapur grants the village of Yekoli in inam to Shridhar, son of the poet Parmanand, for his learning, piety and long and devoted service to the family of the Chhatrapatis.*

No. 118] [19-5-1718

मोगलाई जमाव २०१ नकल

श्री

श्रीमंत मातुश्री राजसबाई साहेब याणी वेदशास्त्रसंपन्न राजश्री देवदत्त परमानद कवींद्र गोत्र काश्यप शाखा तैत्रीये सूत्र आपस्तब यासी आज्ञा केली ऐसी जे, तुम्ही साहेबाच्या राज्यातील पारंपर आश्रित विद्वान भले सिष्ट जाणोन तुम्हास भूदान दिल्याने परम श्रेयेस्कर हे साहेबी चितात आणून विलबी नाम सवत्सरी वैशाख सोमवती अमवाशा पर्वण तद्दिनी धारादत करून मौजे पेदूर ता सिराले प्रात मलकापूर हा गाव तुम्हास कुलबाब कुलकानू हाली पटी व पेस्तर पटी जल तरु पाशाण निधिनिक्षेपसहित खेरीज हकदार व इनामदार करून मौजे मजकूर गाव दिल्हा असे. याप्रमाणे मौजे मजकूर चेतु:समिापूर्वक मर्यादिप्रमाणे तुम्ही आपल्या स्वाधीन करून घेऊन तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रदि वौंशपरंपरेने अन-भऊन स्नानसध्यादिक सत्कर्म आचरोन साहेबाच्या राज्यास कल्याण चितून सुखरूप राहाणे. छ २९ जमादिलाखर सुाा समान आसेर मया व अल्फ. बहुत काये लिहिणे.

¶*Rajasbai, mother of Sambhaji of Kolhapur, grants the village of Pedur in inam to Devadatta, son of the poet Parmanand Kavindra, because he was a pious Brahmin who had long served the family of the Chhatrapatis with devotion. Parmanand was the author of the well- known work entitled the Shivabharat..*

No. 119] [23-9-1718

श्री

॥ॐ माा अनाम नामाजी आपदेव व रामचंद्र यादव लांडे देशकुलकर्णी ताा कर्यात मावल यांसी पंताजी सिवदेऊ. सुाा तिसा अशर मया अलफ. तुम्ही सातारचे मुकामी हुजूर येऊन विनंती केली कीं, आपले वतनाचा अमल या राज्यातून महतकदम सुरलीत चालणे तो चालतच आहे. मोगलाई तर्फेने वतनास होनप देशपांडे प्राा पुणे याणी कथला केला होता. त्यानिमित्य औरंगजेब पादशाह यांजवल त्याचे आपले वाद होऊन ते खोटे केले. पादशाही परवाने व्हावे; त्यास, आपण बेमवसर, दरबारखर्च करावयास टका मिलाला नाहीं. पादशाह मोहीमसीर होते; यानिमित्य परवाने जाले नाहीत. हाली नवाब हसनअलीखान सैद मुकाम औरंगाबाद यांकडे जाऊन हौनप खोटे करून आपले

वतन बाहाल करून घेतलें. परवाने दिवाणी खान अजम ग्यानत खान दक्षणी दिवाण याच्या मोहरेनसी करून दिल्हे आहेत, ते मनास आणून मोगलाई तर्फेने वतन आपले दुमाला करावया अज्ञा केली पाहिजे म्हणून विनंती केली. त्यावरून सैदानी दखणी दिवाणी परवाने आपले मोहरेनसी करून दिल्हे ते मनास आणून वृतीसमंधे तुमचे माथा शेरणी रुपये १५० दीडसे करार करून मोगलाई तर्फेने तुमचे वतन तुमचे दुमाला केले असे. दुतर्फा दिवाणीचा वतनी धंदा चालऊन हकलाजिमा वृतीसमंधें पूर्वापार चालत आला आहे त्याप्रमाणे भोगवटा करून वतन चालवणे. मौजे किरकटवाडी ता। मजकूर हा गाव तुम्हास इनाम आहे तो गाव तुमचे दुमाला केला असे. अलाहिदा गावास अज्ञापत्र सादर केले असे. तरी गावीचा उपभोग तुम्ही करणे. छ ९ जिलकाद.

सुरु सुद बार.

¶Pantaji Shivdeo [illegible] decides a dispute about the Kulakarana Vatan of Mawal in favour of Namaji Apdeo and Ramchandra Yadao Lande and against the Honaps of Poona. The paper contains a few historical facts.

No. 120] *[1-4-1719*

ज. रु. नं. १८८-

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषक शके ४९ विकारी सवत्सर, चइत्र बहुल अष्टमी सौम्यवासर क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी याणी देशपांडिये व मोकदमानी प्रांत इदापूर यासी आज्ञा केली यैसीजे. प्रांत मजकुरची देशमुखी व मोकदमीचे देंहे

कसबा	पेठ	मौजे निरगुडे	कसबे कलस
१	१		

येकूण देहे च्यार व देशमुखी वतन महत कदीम राजश्री स्वामीचे आहे, त्यासी तेथील मुतालिकी पेसजी शकराजी वेदाजी यासी सागितली होती, त्यासी त्याजकडील मुतालिकी दूर करून हाली रा। नारो अपाजी हे हुजूर उमेदवार होते, कामाचे मर्दाने लिहिणार चौकस जाणून यासी प्रांत मजकूरची देशमुखीची व चौ गावीची मोकदमीची मुतालिकी देऊन पाठविले आसेत. तरी तुम्ही यासी

जुवातीने वतून सुधामत हक व लाजिमा चालत आहे तेणेप्रमाणे याजकड देत जाणे. लेखनालंकार.

रुजूसुरु सा.
निवीस मंत्री
सुरुसुद बार बार.

¶*King Shahu appoints Naro Appaji to the office of Mokadam of the Deshmukhs of the villages mentioned in the paper.*

No. 121] [*13-9-1719*

पुणे जमाव १३०

श्री

८ मा अनाम देशमुख व देशपांडीये प्रांत पुणे यांस बालाजी विस्वनाथ प्रधान सुहूर सन अशरैन मया अलफ. बहीरजी वलद मालजी पाटील झांबरा मोकदम कसबे पुणें याणे हुजूर येऊन विदित केलें, कीं आपला मूल पुरुश चिंत पाटील त्यास पुत्र तिघे : वडील तुक पाटील, दुसरा कुमाजी, तिसरा यामाजी. त्यास वडील तुक पाटील त्यास संतान नव्हतें म्हणून त्याणें आपणा धाकटा कुमाजी त्याचा पुत्र सोमाजी होता तो आपणास पुत्र घेतला. तो दैवगतीने मृत्य पावला. त्यावरी मागती तुक पाटील, कुमाजीस म्हाल पाटील दुसरा लेक होता तो मागों लागला. त्यास कुमाजीने तुक पाटिलास जाब दिल्हा जे येक लेक सोमाजी तुजला दिल्हा तो मेला या उपरी येक लेक मजला उरला आहे, तो आपण देत नाही. यैसा जाब दिधलियावरी तुक पाटलानें तिसरा भाऊ यामाजी याचा लेक मालोजी घेतला. त्यावरी लोक बलों लागले कीं धाकटियाच्या घरास वडीलपण गेले. त्याउपरी कुमाजी पाटील याणें तुक पाटिलासी बोली लाविली की आपला लेक म्हाल पाटील आहे तो घेणे. त्यास तुक पाटिलानें जाब दिल्हा कीं आपण जेव्हां तुज्यासीं मागत होतो तेव्हांहि आला नाहीं आता कैसियास पाहिजे ? आपण यामाजीचा लेक माल पाटील घेतला आहे याउपरी आपणांस तुझा लेंक न लगे. यैसा जाब दिल्हा. यैसियास धाकटियाच्या घरास पाटीलकी जाते या करितां कुमाजीनेंहि आपला लेक म्हाल पाटील बलेंच तुक पाटिलास दिल्हा. यैसे दोघां भावांचे दोघे लेक घेऊन आपणास दोघे लेक केले यैसें असतां म्हाल पाटीला-तागाइत हालीं त्याचा नातु वांकोजी बिन तुकोजी पाटील जबरदस्तीनें वडिलपण खात आहे ये गोस्टीचा इनसाफ करून विल्हे लाविले पाहिजे म्हणून विदित केले. त्यावरून हरदो जणांस गोत नेमून दिल्हे त्यास गोतानें निर्वाह केला जे तुक

4962

पाटीलाने कुमाजीचा लेक व यामाजीचा लेक यैसे दोघांचे दोघे लेक आपणास घेतले हे खरे जाले. त्यावरी हरदो जण सिरवलचे मुकामी हुजूर आले तेथें हरदों जणास आज्ञा केली जे सिरपाव व पानमान दोघानी दों ठायी बराबर घ्यावे व होलीची पोली दोघानी बराबर लावावी. इनाम जमीन कास रुके ·।· बारा आहेत ते निमे सा रुके बहिरजीने खावे वरकड हक लाजिमे मोकदमीचे जे असतील ते निमे प्रमाणे हरदो जणानी बराबर घ्यावे. वांकोजीचे भाऊ वांकोजीकडे व बहिरजीचे भाऊ बहिरजीकडे. येणेप्रमाणें तह करून दिधला आसे आणि बहिरजी वलद मालजी पाटील मोकदम निमे कसबे मा। याजकडे सेरणी रुपये १९०१ पंधरासे येक करार करून हुजूर वसूल घेतला असे आणि पाटील मा।रास महजर करून द्यावयाविसीं हें आज्ञापत्र तुम्हास सादर केले असे. तरी तुम्ही बहिरजी वलद मालजी पाटील झांबीरा निमे मोकदम मा।र यास सदरहूप्रमाणे महजर करून देणे. छ १७ जिल्काद पा। हुजूर

बार सुरु सुद बार

¶*A dispute decided by Peshwa Balaji Vishvanath in the case of Bahirji Patil Zambre of Poona.*

No. 122] *[16-9-1720*

मोगलाई जमाव २०१ नकल

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ४७ शार्वरी नाम सवसरे भाद्रपद बहुल दसमी भृगुवासर क्षेत्रियेकुलावतंस श्रीराजा शंभु छेत्रपति स्वामी याणी वेदशास्त्रसपन्ने राजश्री देवदत कविंद्र बिन परमानद कविंद्र गोत्र काशेप शाखा तैतिरिये सूत्र आपस्तब यासी दिल्हे दानपत्र ऐसी जे. तुम्ही स्वामीच्या राज्यातील परंपरागत आश्रित, विद्वान भले सिष्ट, तुमचे सर्व प्रकारे चालवण हे स्वामीस परम आवश्यक. तुम्हास श्रीमंत मातुश्री आईसाहेबी विलंबीनाम संवत्सरी वैशाख सोमवती अमवाशा पर्वकाली मौजे पेतूर ता। सिराले हा गाव धारादत दिल्हा आहे. ऐसियासी तुम्ही बहुत भले सिष्ट विद्यासपन्ने तुमचे चालविल्यानें बहुत श्रेयेस्कर, यास्तव तुम्हास मौजे पेतूर ता। सिराले प्रा। मजकूर हा गाव कुलबाव कुलकानू हाली पटी व पेस्तर पटी जलतरु पाशाण निधिनिक्षेपसहित खेरीज हकदार व इनामदार करून मौजे मा।र धारादत सहिरण्योदक इनाम सर्वमान्य करून दिल्हा असे. तरी तुम्ही मौजे मजकूर पूर्व मर्यादेप्रमाणें चतु:सीमा करून आपले स्वाधीन करून घेणे आणि इनाम तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने अनभऊन सुखरूप राहाणे. निदेश समेक्ष.

¶*King Sambhaji of Kolhapur confirms the inam of the village of Pedur granted by his mother to Devadatta, son of poet Parmanand, for the piety and devotion with which he was serving the State.*

No. 123] [1720?

श्रीभार्गवराम

राजश्री पंत प्रधान स्वामीचे शेवेसी

शेवक पंताजी सिवदेव सा। नमस्कार विनती उपरी. स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जालो ते शुकुरवारी पांडवगडाखाले पावलो. तो चिरंजीव बाजिरायाची पत्रें आली की पूर्वी राणोजी पाठविला आहे. त्याजउपर यैवजाकरिता तगादा निकडीचा लागला. आमवाशे तागाईत पाच हजार रु॥ पावावे यैसा निर्वाह केला. आम्ही लोहगडास पंताजीपंत गेले ते यैवज घेऊन येतील, यैसा राजश्रीचा निशा करून वरातदार रोजमुराचे त्याचे हवाले घातले. आम्हास पत्र पाठविले की यैवज घेऊन येत नाही, रिकामे याल तर इजत राहत नाही. राजश्री म्हणतात की पंताजीपताचे उरास कटारा लाऊन पैके सिपाई घेतील यैसा निस्टूर वादे बोलतात. त्यास आम्ही पांडवगडाखाले राहिलो तेथे जाऊन इजत राहणार नाही. स्वामीकडे पूर्वी राणोजी आलाच आहे, मानाजी सकपाल हाली पाठविला आहे, तरी स्वामीनी इजत राखावयास तूर्त दोन हजार रु॥ पाठवावे. च्यार हजार रु॥ पुर्णिमेअलीकडे पावावे तर आमचा भ्रम राहतो, नाही तर इजत राहत नाही. जेव्हा येखाद्यानें हाती धरून वाढिले तेव्हा प्राण घ्यावा साहजीवदल स्वामीस तो संकट आहेच. स्वामीस ल्याहावेसे नाही. आमची इजत राहे ते करावे. आमचे इजतीची शरम स्वामीची आहे. चातकन्याये पांडवगडाखाले मार्ग लक्षितो. दोन हजाराचा यैवज तूर्त पत्रदर्शनी रवानगी केली पाहिजे. मानाजी सकपाल राजाजी जाधव यास दर रु॥ २ दोन प्रा॥ देविले पाहिजे हे विज्ञापना. स्वामीकडील यैवज आल्याखेरीज पांडवगडास राहणे जाले आहे. हे विज्ञापना.

¶*Pantaji Shivdeo asks the Peshwa Balaji Vishvanath to remit at least 2,000 rupees at once so that he might pay the King's debt and relieve him from a miserable plight.*

No. 124] [19-12-1720

पुणें जमाव, रु. नं. ५४३.

श्री.

राजमुद्रा सिक्का

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ४७ शार्वरी सवत्छरे पौष शुध प्रतिपदा इंदुवासरे क्षेत्रियकुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामी याणी राजश्री कृष्णाजी

---

१ पंताजी शिवदेव सोमण, शाहूचा राजाज्ञा याचें हें स्वदस्तुरचें पत्र बाळाजी विश्वनाथास.

बिन सोमाजी दाभाडे यासी. राजश्री येशवंतराऊ दाभाडे तुमचे पुत्र को बारामतीचे वेढियांत स्वामिकार्यावरी मृत्य पावले, याकारितां तुमचे चालवणे स्वामीस आवशक जाणौन स्वामी तुम्हावरी कृपालु होऊन हाली कुलबाब कुलकानू देखील हाली पटी व पेस्तर पटी खेरीज इनामदार व हाकदार तुम्हांस व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने इनाम करून दिल्हा आसे. तरी तुम्ही चतु:सीमापूर्वक मर्यादेप्रमाणे आपले दुमाले करून घेऊन वंशपरंपरेने आनभऊन सुखरूप राहाणे. लेखनालंकार मोर्तब राजचिन्ह मर्यादेयं विराजते

रुजू सुरु सुा निवीस.

मंत्री.

तेरीख छ २९ सफर सुा इहिदे आशरीन

बार सुद सुरु सुद बार बार

¶*King Shahu confers an inam upon Krishnaji Dabhade in recognition of the services of his son Yashvantrao, who had fallen at the seige of Baramati.*

No. 125] [*9-5-1726*

पर्गो जमाव नं. ९९

श्री

कालनामा अज सुभा राजेश्री संभाजी पवार सेनाहप्तहजारी ता मोकदमानी मौजे दिघी ता हवेली प्रा पुणे सुा सीत आशरीत मया आलफ. तुम्ही हुजूर येऊन आपला हालहवाल जाहीर केला जे सालमजकुरी पाऊस गेला, पीक न जाले यावर पेस्तरसालावर नजर देऊन मोकसबाबेची खडणी मुशकस करणे. आर्जे खातिरेस आणूण खंडणी केली कुलकानू बा मल्हता रुपये

१ यैन खडणी मोकासबाब

२ झुलभुरकी

३ वासदाणा

२ माहाल मजकूर

२ तुडीत जाहल कौलावल

१ तूप
२ राबता माहार
१ भेटी
५ सांडी दिली

७०

सदरहू रुपये सतर देऊन * * * * दूर करणे. कोन्हे बाब आजार लागनार नाही जानिजे. रा छ १७ रमजान.

¶*Sambhaji Pawar is given remission of Government dues for the village of Dighi.*

No. 126] [*1727*

रु. नं. ४५

श्री

ß मा। अनाम बावाजी बिन रायाजी कोंडे तकसीमदार देशमुख ता। खेडेबार यासी नारो शंकर सचिव सु॥ समान आशेरीन मया अलफ. बाजी नाईक व पिराजी नाईक कोडे देशमुख ता। मजकूर याणी सिंहीगडच्या मुकामास येऊन विदित केले की सीसाल सेत थल कास टके ३०० त्यावरी राजश्री थोरले कैलासवासी स्वामी कसबे खेडामध्ये येऊन राहिले ते समयी राजश्री दादाजी कोंडदेऊ सुबेदार नामजाद किले कोंढाणा व माहालानिहाय यानी निमे सेत कास टके १५० दिडसे घेऊन शाहबाग केला.

¶*Naro Shankar mentions how the Shah Bag was planted by Raja Shivaji at Khede Bare.*

No. 127] [*14-10-1728*

पुणें जमाव, रु. नं. १७४०.

श्री

स्वस्ति राज्याभिषेक शके ५५ कीलक सवछरे आश्विन बहुल सप्तमी इंदुवासरे क्षत्रियेकुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामी याणीं समस्तसेनाधुरंधर

4966

विश्वासनिधि राजमान्य राजश्री खंडेराऊ दाभाडे सेनापति यासी आज्ञा केली ऐसिजे. राजश्री देवजी सोमवंशी हिंदुराऊ हे स्वामीचे कदीम सेवक. पूर्वी स्वामीची सेवा याणी बहुतच केली आहे. हालीहि निष्टेने सेवा करीत आहेत. याकरितां याचें चालवणे स्वामीस आगत्य, हा आर्थ तुम्ही जाणतच आहा. ऐशास मारनुलेकडे सरंजाम चालत आहे तो स्वामीनी करार करून दिल्हा आहे. ते स्वामीचे आज्ञेप्रमाणें स्वामी सेवा करितील. तुम्ही त्याच्या सरंजामाचे माहालांत कथला न करणे. तुम्हासहि त्याचा आगत्यवाद आहेच. स्वामीसेवाहि त्याणी सामान्य केली नाही. यास्तव त्याच्या सरंजामात कथला येकंदर न करणे. जाणिजे.

¶*Shahu orders Khanderao Dabhade to desist from molesting the villages granted in saranjam to Devji Somavanshi.*

No. 128] [*Before 1729*

श्रीभार्गवरामचंद्र

यादी रा। कान्होजी आंगरे यास पत्र की तुम्हाकडून बगररजा लोक उठोन आले

सखोजी कदम	बापूजी पदमारा	राणोजी पारधी
१	१	१
सिवजी माहाडीक	लखमोजी पवार	येसजी कोंडा
१	१	१
गोमाजी भोसला		
१		

येणेप्रा॥ सात जण आले. यैसीयास याणी निरोप न घेतां आले हें याजपासून अंतर पडिले. परंतु हे मावल प्रांतीचे मिरासदार राज्यांतील पुरातन चाकर याकरितां याजपासून अंतर पडिले ते क्षमा करून हे पत्र तुम्हास सादर केले असे. तरी यांचे कबिले तेथे आहेत त्यांस निरोप देणे; येविसीं मागती बोभाट येऊ न देणे. जाणिजे पत्र लेहोन १ येक
देणे†

¶*Seven deserters from Kanhoji Angria's service receive a free pardon from the King.*

† i.e. sanctioned.

No. 129] [14-2-1729?

श्री

राजश्री मिठोजी घाटगे गोसावी यासी

॥ऽ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये स्नेहपूर्वक रायेभानजी राजे उपरी येथील कुशल जाणौन स्वकीये कुशल लिही गेले पाहिजे विशश. बहुत दिवस जाले, आपणाकडी काही वर्तमान कलत नाही तरी यैसे न करणे. क्षणक्षणा पत्र पाठऊन स्नेहाअभिवृधि करीत जाणे. सांप्रति राजश्री स्वामीचा आणि आपला शरीरसमध होवायाकरितां वेदमूर्ति रा मुदगळभट उपाध्ये पाठविले आहेत, तरी हे गोस्टी चितीं धरून कार्येसिद्धि केली पाहिजे. वरकड कितेक वर्तमान वेदमूर्ति सांगता कळू येईल. विशश काये लिहिणे तुम्ही सूज्ञ आसा.

¶*Raybhanji to Mithoji Ghatge: informs him that Mudgalbhat has specially been deputed on a mission to bring about a marriage between his family and the King's. The reference may be to the marriage of Fatesingh Bhonsle.*

No. 130] [17-3-1731

रुमाल नं. ३१ [सचिव-जमाव]

श्री

॥ऽ माा अनाम देशमुख व देशकुलकर्णी ताा मुठेखोरे यांसी नारो शंकर सचिव सुहुर सन इहिदे सलासैन मया अलफ. राजश्री स्वामीने किले विशाळगड हस्तगत करावयाविशई राजश्री श्रीनिवास पंडित प्रतिनिधि यासीं आज्ञा केली. त्याणी आपले तर्फेने पदातीहशमाचा जमाव राा अंताजी सिवदेऊ यांसमागमे पाठऊन किले मजकुरास परीघ घातला. त्याचे मदतीस जमाव पाठवावयाविशई राजश्री स्वामीनी आज्ञा केली. त्यावरून जमाव रवाना करावा लागला. त्यास किले सिहगडचा जमाव राा कान्होजीराऊ पासलकर नामजाद किले मजकूर याबाा पाठविला. तेथे युध्यप्रसंग जाला ते समईं राा कान्होजीराऊ व वरकड लोक स्वामिकार्यावरी ठार पडिले व जखमी जाले. त्यावरी राजश्री स्वामी कृपालु होऊन इनाम दिल्हा व सरंजाम केले. त्यामध्ये येसजी अटाला दिाा सुभानजी गुजर नामजाद किले मजकूर याचा लेक कान्होजी अटाला बापाचा मुबदला चाकरीस गेला, तो स्वामिकार्यावरी कामास आला. छ १९ रमजान पाा हुजूर.*

¶*Naro Shankar Sachiv grants certain allowances to the descendants of Yesji Atola.*

\+ पत्राचे पाठीवर जोडावर दोन शिक्के; व बार सुरू सुद बार-हीं अक्षरें. छ १९ पासून हस्ताक्षर निराळें आहे.

No. 131] [27-3-1731

जमाव, रुमाल नं. १६६९. असल बमोजीव नकल

श्री

सिका राजमुद्रा.

स्वस्ति श्रीराज्याभिषक शके ५७ विरोधकृतसंवत्सरे चैत्र शुध प्रतिपदा मंदवासर क्षत्रियेकुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामी यानी संताजी बिन कान्होजी पासलंकर यासी दिल्हे इनामपत्र यैसीजें. तुझा बाप कान्होजी पासलकर किले विशालगडच्या मोरचियास स्वामिकार्यावर ठार जाहाला. याजकरितां तुझें चालवणें अवशक जाणोन तुजवर स्वाम कृपाळु होऊन देहाये ता। मोसेखोरे प्रात मावळे पेसजीच्या मुकासियाकडून दूर करून हालीतून नूतन देहे दोन कुलबाब व कुलकानू हली पटी व पेस्तर पटी खेरीज हकदार व इनामदार तुझे व तुझे पुत्रपौत्रादि वौंशपरपरेने इनाम करून दिले असेत. तरी तू सदर्हु देहाय मजकूर चतु:सीमापूर्वक आपले दुमाले करून घेऊन तूं व तुझे वौंशपरपरेने इनाम आनभऊन सुखरूप राहाणें. लेखनालंकार मोर्तब.

रुजू सुरू- संमत सा। सा।
निविस सुमंत मंत्री सरकार.

तेरीख छ २९ माहे रमजान
सु॥ इहिदे सलासीन मया आलफ.

बार सूद सुरु सूद बार बार बार बार

¶*Shahu grants an inam to Santaji bin Kanhoji Pasalkar on account of his father Kanhoji having died in an action for the King.*

No. 132] [1734

रु. नं. १७७२

श्री

राजमान्य राजश्री बाजीराव पंडित प्रधान यांसी आज्ञा केली यैसी जे. आबाजी त्र्यंबक पुरंदरे यामधें व अत्रे यामधें कसबे सासवड येथील कुलकर्णाचा व कर्यात मजकुरचे देशकुलकर्णाचा कजिया लागला होता त्याचा निवाडा जाला. अंबाजी त्र्यंबक कदीम वतनदार खरे जाले. कसबांचें कुलकर्ण व कर्यातीचे निमे देश

कुलकर्ण पुरंदरे यांस व देशकुलकर्ण निमे अत्रे यांस करार करून दिल्हे असे. वतनसंमधे यांचे माथा शेरणी रुपये २००० दोन हजार अंबाजीपंत याकडे मोकरर केली आहे. हजार रुपये हुजूर पाठवणें हजार रुपये तुम्ही घेणें. +याच्या वतनांचा निवाडा जाला तर यास दोन हजार रुपये २००० सेरनी मुकरर केली आहेत. हे तुम्हास कळावया कारन लिहिले आहे. बत काय लिहिन रा अबाजी पत्त जबानी साग्तलि ते स्वामी वचन जानोन या प्रमान वत्तनु करन बहुत लिहिन त्तर सुदन असा.

¶*King Shahu informs Bajirao of the settlement of the dispute between Ambaji Purandare and Atre and commands that his decrees should be carried out.*

No. 133] [*28-11-1734*

सातारा जमाव, रु. न. १९११.

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपति स्वामीचे सेवेसीं विनंती सेवक येशवंतराऊ दाभाडे सेनापति व बाबूराऊ दाभाडे सेनाखासखेल कृतानेक विज्ञापना. स्वामीनी दहाकाविसी आज्ञा केली की, दहकाचा आकार होईल त्याचा चौथाईचा यैवज हुजूर द्यावा. त्यास, दहकचा आकार यैवज बेरीज रुपये १३९४०० येक लक्ष पस्तीस हजार च्यारसें. पैकी स्वामीनी सोडी दिल्ही रुपये ५०००० पनास हजार. बाकी रुपये ८९४०० पंच्यायैसी हजार च्यारसे रुपये अखेर साली जेस्ठ मासी देऊ. सेवेसी श्रुत होये. सुहुर सन खमस सलासीन मेया अलफ छ १२ रजब. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*An undertaking given by Yashvantrao Dabhade Senapati and his brother Baburao to king Shahu for paying the amount of Dahak (10th portion—a cess) in the following Jestha.*

No. 134] [*1736-37*

श्री

राजश्री गोविंद सामराज नामजाद
देशाधिकारी व कारकून वर्तमान
व भावी सुभा प्रांत मावळे गोसा-
वी यासी.

॥ऽ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्ये सेवक चिमणाजी नारायेण सचिव नमस्कार सुा सबा सलासैन मया व अलफ. सखोशंकर व मोरभट बिन

+ येथून पुढील अक्षरं शाहू महाराजांचे हातचें असे.

नारायेणभट पुराणिक ता। मोसे खोरे याणी किले सिहगडच्या मुकामी येऊन विदित केले की मौजे भवली ता। मुठे खोरे येथील गावकुळकर्णाचे वतन आत्मसंतोषे आपल्या वडिलास देसकुलकर्णी ता। मार यानी विकत दिल्हे. सबब राजश्री सामराज निलकंठ रोजेकर यास ता। मार येथील वतनदारानी गावकुलकर्णाचे गाव सात दिल्हे होते, त्यास त्याचे नातू सामराज माहादेऊ नातवान जाले, याकरिता वतनाचा महजर घेऊन जनाजी राम व बापूजी सूर्याजी देशकुलकर्णी ता। मार याकडे आले. त्यासी बोली केली कीं पुरातन कुलकर्णाचे गाव तुमचे आहेत, आपण कर्जदार आहो, पैका देऊन सोडवणे आणि महजर आपल्याजवल आहे तो घेणे ऐसी बोली केली; आणि गाव सोडविले त्यास पैका द्यावयास पाहिजे, याकरिता उभयेता देशकुळकर्णी यानी आपले वडील नारायेणभट याजपासून दोनिसे रुपये रोख घेऊन मौजे भवाली ता। मार या गावीचे गावकुलकर्ण अत्मसंतोषे विकत दिल्हे आणि खरिदीपत्र व महजर करून सा वर्षे दिल्हा नाही.

¶*Sale-deed confirmed by Chimnaji Narayan Sachiv in favour of Sakho Shankar and others to whom Samrai Mahadeo Rozekar sold his vatan of the Kulakarna of Bhovli.*

No. 135] [*20-9-1740*

नकल

श्री

राजमान्य ....ांगरे सरखेल यासी आज्ञा केली ऐसीजे. प्रल्हाद लिंगोजी व मुरार रामचंद्र प्रभु राजापुरकर याणी विनंती केली की चंदीचे मनवतरापासून आमचे वडिलीं व आम्ही स्वामीसेवा निष्ठेने करीत आहों. कैलासवासी राजाराम साहेब व मातुश्री आईसाहेब याणी सेवेचे श्रम चितांत आणून राजापूर प्रांती गाव व ठिकाणें इनाम करून दिल्हीं आहेत ती राजश्री कान्होजी आंगरे सरखेल यांचे कारकीर्दीपर्यंत अविछिन्न अनभविली. अलीकडे ठिकाणे चालतात, गावमात्र चालत नाहीं. येविसीं आज्ञा होऊन पूर्ववत प्रां। चाले ते करावें म्हणोन त्यावरून मनास आणितां पहिले यांचे वडिलानी श्रम केले व हाली हे स्वामी सन्निध सेवा करीत आहेत. यांचें चालवणें स्वामीस अगत्य जाणोन हें आज्ञापत्र तुम्हांस सादर केलें असे. छ ९ रजब सुहूर सन इहिदे आर्बैन मया व अलफ सुदन असा.

खासा माहाराज कैलासवासी शाहू माहाराज स्वामीचें श्वहस्ताक्षर हातरोख्यांत आहे त्याची नकल.

¶*King Shahu issues instructions to Sambhaji Angria to allow Pralhad Lingoji and Murar Ramchandra Prabhu of Rajapur to enjoy the vatan and inam granted to them for their services to the late king Rajaram at Gingee*

No. 136] [*2-11-1740*

कोंकण जमाव रु. नं. ४४:

ॐ मा। अनाम देशमुख व देशपांडियान प्रांत बेलापूर यांसी बालाजी बाजीराऊ प्रधान सुा। इहिदे आर्बैन मया व अलफ. साल गुदस्ता तीर्थरूप राऊ कैलासवासी जाहालियाचे वर्तमान कुलाबाचे मुकामी वैशाख वा। पंचमीस आले. उत्तरकार्य जाहालियावरी भूमिदान करावयाचा सिधांत शास्त्रता जाहाला, तेव्हा वेदमूर्ति राजश्री हरभट बिन माहादेव पटवर्धन गोत्र कौंडण्य भले वेदशास्त्रसंपन्न पाहोन मौजे चौल ता। पंचनद प्रांत मजकूर पो। जमीन लागवड बिघे ८।१० दाहा उदकदत करून दानपत्र करून हे पत्र तुम्हास सादर केले असे. तरी तुम्ही मौजे मजकूर पो। सदरहू दाहा बिघे जमीन चतु:सीमापूर्वक वेदमूर्तीचे दुमाला करून यांस व याच्या पुत्रपौत्रादि वंशपरपरेने कुलबाब कुलकानू देखील हकदार चालवणे. प्रतिवरसी नूतन पत्राचा आक्षेप न करणे. या पत्राची प्रति लेहून घेऊन हे पत्र वा। जवल परतोन देणे. जाणिजे छ २२ साबान आज्ञाप्रमाण.

¶*Balaji Bajirao grants some land in inam to Harbhat Patwardhan in memory of the Peshwa Bajirao's death.*

No. 137] [*7-3-1747*

छा। ६ रालौवल च्यार घडी दिवस बाकी

श्रीशंकर

तीर्थरूप राजश्री भाऊ स्वामी
वडिलाचे सेवेसी

आपले रघुनाथाने चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ता। छ ५ रबिलौवलपावेतो वडिलाचे असिर्वादेकरून सुखरूप आसो विशेष. साप्रत आपणाकडून पत्र येऊन वर्तमान कलत नाही तरी यैसे नसावे. सदैव पत्र पाठऊन लेकराचा सांभाल करीत गेले पाहिजे. यानंतर येथील मजकूर काल संध्याकाली तीर्थरूप व सारे आम्ही दरबारास गेलो होतो. तीर्थरूपानी वस्त्रे नजर केली. त्यावर आम्ही बाईकडे गेलो तेथे हि वस्त्रे नजर केली. त्यावर घरास आलों. दुसऱ्या दिवसीं पाहटेस दो घटिका दिवसास दरबारास गेलो. त्याजवर तीर्थरूपास वस्त्रे दिली, आम्हास ठेवावयाची आज्ञा जाली. त्याजवर तीर्थरूप फतेसिंगबावाच्या डेरियास गेलो. आम्ही घरास येऊन जेऊन सिकारीस जाणार तो राजश्री आमच्या डेरियाहून चालले. तेव्हा म्या धाऊन

जाऊन अर्ज केला की डेरियास चलावे त्यावर डेरियास आला. तीर्थरूपानी वस्त्र थोडी बहुत व जवाहीर थोडे बहुत नजर केले. लोकास वस्त्रे द्यावीं कीं काय म्हणोन बाबानी पुसलें, त्यावर आम्ही जातों, असे म्हणोन सिकारीस गेले. चिमणगाव पावेतो आम्ही होतो. तेथे यमाजीपंताच्या घरी मुकाम केला. प्रतिनिधिचेहि आजच कूच झाले. तेहि चिमणगावास गेले. उद्या तीर्थरूपाच्या कुच्याची वार्ता आहे, होईलसे वाटते. मग आम्ही राजश्रीच्या लस्करात जाऊ आपणास कलावे म्हणोन लिहिले असे. बहुत काय लिहिणे कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.

¶*Raghunathrao to Sadashivrao : describes how king Shahu visited the tent of Nanasaheb and was presented with robes. The whole letter is in the writer's autograph.*

No. 138] [*1777?*

कोंकण रु. नं. ५२९

श्री

यादी चव्हाण कोंकणराव देसाई व येक देसाई मामले हमजाबाद सुभा दाभोळ तालुके आजणवेल याचे देशमुखीचा हक सरकारात जफ्त आहे तो सन सीत सबैनापासून मोकला करून याचा यास परभारा रयताकडून देणे म्हणोन सनद सादर जाहली. त्याजवरून गावगनाचे खोत सुभास आणून हकाची चौकसी मनास आणिता सर्वानी सागितले, की पहिले पासून यैन जिनसी दर खंडीस गला येक मण व नख्त बाबेस दर रुपयास यक आणा प्रमाणे हक मागापासून चालत आहे. निमे देशमुख व निमे देशकुलकर्णी याप्रमाणें हक जमेस आहे. तुळाजी आंगरे यानी आजणवेल व गोवळकोट घेतल्यावर कैलासवासी शाहू माहाराज याचे भेटीस गेले. ते समयी सिर्के यानी सकवारबाई याजकडून तुळाजी आंगरे यास सांगोन राजाराम याचे वेलेस सिर्के गैरवाका समजाऊन सनद घेतली होती परंतु सनद चालली नाही. सखवारबाई याचे निडेमुले आंगरे यानी कबूल केलें आणि जमीन रयतवर दर खडीस गला आदमण ज्याजती व पेशजीचे हकदारपैकी अदमण येकून दर खंडीस येक मण गला सिर्के यास देविला. बाकी हकदाराकडे आदमण राहिला. सिर्के याचे वर्षे दोन वर्ष मात्र चालले. कैलासवासी नानासाहेब याचे वेलेस चव्हाण व येक देसमुख व सिर्के याचा कजिया जाहला ते वेलेस कान्होजी सिर्के यास दरखंडीस आदमण प्रो करार करून सनदा दिल्ह्या. (अपूर्ण)

¶*This paper mentions the visit of Tulaji Angria to the court of Shahu after having captured Anjanvel and Gowalkot. At this visit Tulaji granted some claims to the Shirkes at the intercession of Rani Sakwarbai which rightly belonged to Chavan Kokanrao.*

No. 139. [12-12-1749?]

पुणें जमाव, नं. १६६०

श्री

सरंजाम राजश्री संभुसिंग जाधवराव इा सन इहिदे सैलासीन.

बेरीज रुपये २५१७७५.

तो

२४८६७५ सरलस्करपैकी सरंजाम राजश्री सिदोजीराव निंबालकर यासी दिला होता, तो होली मशारनिलेस दिला. बेरीज रुपये २५४६७५. पैकी पो आधेगाव ।॰ पाव जानोजी सेवाले .यासी दिला. त्याची बेरीज ६००० बाकी

२५०० सरंजाम राजश्री फतेसिंग भोसले रुपये १९०००. पैकी सिदोजी निंबालकर याच्या पुत्रास पाा आस्टी दिली. बेरीज १६५०० बाकी १००० पाा आस्टीपैकी देह ३

५०० ताा पेडगाव

२५० मौजे हिसरे १

२५० मौजे पांडे १

५००

५०० मौजे डोणगाव ताा कडे १

५०० मौजे मोहू पाा सिरसाल १

२५००

६०० मौजे मालेगांव कर्यात बारामती, मोगलाई तर्फेचा यैवज

२५१७७५

पैकी वजा :

१००० मौजे रावणगाव ताा पेडगाव हरि नारायेण याची कन्या

१००० म॑ज पोथरे ताा इनाम सुजेवर्ती गोसावी

२०००

बाकी सरंजाम मशारनिलेकडे ता मार्गसीर्श पूर्णिमा शुक्रनाम संवत्सर.

	बेरीज	रुपये:
२०७०००	माहाल	१०.
४२७७५	देहाये	६१॥'
२४९७७५		

¶*Details of the Saranjam of Shambhusing Jadhav are given in this paper since 1730 to 1749.*

No. 140] [*28-7-1750*

सुा इहिदे

राजमंडल

सा राजश्री पंत प्रधान

माहे रमजान छ ५ रोज

खास दस्तके

पाा मजकूरपैकी राजश्री संताजी आटोले धुरंधर समसेर बाहादर याजकडे पेशजीपासोन मुकासे आहे, तेणेप्रो साल मारी करार आसे. तरी तुम्ही माारनिलेसी रुजू होऊन मोकासबाबेचा वसूल सुरलीत देणे [पुढें तपशील]

यांजकडे फडणीस रा माणकाजी जिवाजी, जमेनीस यशवतराव दताजी

राजश्री सयाजी आटोले सफेजंगबाहादर दिाा राा सरलस्कर याजकडे पेशजीपसोन जमावाचे बेगमीबदल मुकासा आहे तेणेप्रो सालमारी करार आसे [याची जमेनिसी मल्हार शकर याजकडे]

पाा मजकूरपैकी राजश्री केरोजी आटोले याजकडे पेशजीपासोन जमावाचे बेगमीस मुकासे आहेत त्याप्रो साल मारी करार आसेत.

पेशजीपासोन राजश्री सुलतानजी येशवंतराव गाढवे याजकडे मुकासे आहे तेणेप्रो साल मारी करार आसेत.

राजश्री तुकोजी आटोले सेना बाराहजारी याजकडे जमावाचे बेजमीबदल मुकासा आहे तेणेप्रमाणें सालमजकुरी करार बिताा

[याची जमेनिसी विनाजी रंगाजी याजकडे]

¶*The Peshwa grants mukasas to the Atoles for the maintenance of their contingents.*

No. 141] [31-1-1750

रु. नं. १७८९ तालीक

राजाराम

श्री

सदरहू मज्यालसी बेहुजूर राजश्री बालाजी बाजीराव व सदासिव चिमणाजी उपनाम भट देशमूख दिवे श्रीवर्धन यासी म्हालोजी बीन माणकोजी गाईकवाड पाटील मौजे बहुली ता। मुठेखोरे सु॥ खमसैन मया व अलफ. तुम्हास खरीदीपत्र लेहून दिल्हे यैसे जे. तीर्थरूप माणकोजी बिन बालोजी गायेकवाड देसमुख व संवत नादेड येथे येऊन माहाराज सिव छेत्रपति स्वामीच्या खाशा मुद्बखावर चाकरीस राहिले. प्रथम समध सिंदखेडच्या जाधवासी केला.

(खरीदीपत्राचा तपशील पुढें दिला आहे तो जरुरी नसल्यामुळें गाळला.)

¶*Maloji Gaikwad of Bahuli in a letter to the Peshwa mentions that his father served in the kitchen of Shivaji.*

No. 142] [1755-56

[शके १६७७ ते १६७८]

महादाजी अंबाजी याच्या

कुटुंबांतील मंडळी

सीत खमसैन मया व अलफ

१ राजश्री नाना व सौ बया

१ „ आबा

१ „ भास्करराऊ

१ सौ कासीबाई

१ राजश्री बापू (टोपीस दाल रेशमी) [भास्कररावाचा मुलगा ?]

१ सौ राजूबाई (माहेरास गेली)

१ सौ मथाबाई (छ १८ रावल न्हाण आले)

१ राजश्री बजोबाच्या (कुडक्यास सोने)

१ राजश्री [भास्करराऊ]

सौ कासीबाई

मुलगा [बापू ?]

मुलगी वेणू

१ सौ गंगाबाई

१ मातुश्रीकडे

६३६७॥ सौ बयाचे तुळेस खर्च बा। हिसेब आलाहि (दा) आसे:

१८५८०।॰ सौ बयाचे उतरकार्यास तांबे ताटे वाट्या खरिदी
यात्रा आळंदी

इमारतीकडे खर्च रुपये

४६८३७।÷। इमारत श्रीवटेस्वर काम देवालय याचे

रुपये

१३९००८÷। मजुरी माणसे बा। खतावणी दरमाहा येकंदर आसामी आदा
[पुढे माहेवार खर्च]

१८१७९।।।= पाथरवट आसामी यो दरमाहा येकंधर आदा
[पुढे माहेवार खर्च]

८४४।।≡ गवंडे आसामी येकधर यो दरमाहा

३७०।।= सुतार आदेसुत

४०१।।॰ घिसाडी

३५६।≡। कारकून आसामी २ यो आदा
२०६ जगनाथ नारायण
[तपशील]
१५० रामजी आबाजी

३१७१।।।= खरिदी कोळसे बारमाही खंडी
३१७८३।।।
दर खंडीस रुपये १० प्रमाणे

१५९२।. खरिदी चुना बारमाही खंडी
१७६।।।३।॰
दर खंडीस रुपये ९ प्रमाणे

४।। खरिदी वाळू खंडी ९ दर ॰।।॰

२४२०८।॰ लागवड सरसाल खर्च रुपये
१५६ सोलकीच्या माणसास बकरी या बा। इनाम दर माहा रुा १३ प्रो दरमाही

१४६१।॥· कारेगारास इनाम दिल्हे

[तपशील]

६७॥= मंडपाचे पायाचे मुहूर्तास व देवलाचा मंडप पाडावयासी ता॥ जगनाथपंत नख्त व खुर्दा

९ निमोण्यास विटा १३३०

१२८·।· खाण वाग डोंगर येथे तीन वेल जत्रेस बकरी वगैरे

२॥÷ जेजूरकर सुतार चौचाकी नीट करावयासी आला त्यास तिवट १ यो॥

१३३।· खरिदी बाभळा चौचाकीस व तर्फास खाणीवर ४२

¶*A list of some of the members of the Purandare family and of the charities granted by them to some of the shrines at Saswad and Purandar.*

No. 143] [*7-11-1756*

श्री

नेमनूक संवस्तान श्रीज्ञानेस्वर सु॥ सन सबा खमसेन मया आलफ इ॥ कार्तिक वद्य १ ता॥ कार्तिक शुध १५ सन समान रु॥ १७१५.

ता॥

१२० श्रीनवेद्य तीन ये॥ रु॥.

७३२ देवाच्या कारखान्यास.

७५ पुराणिक रु॥ ६। येक दरमाहे

६० धोंडभट आभिषेक

१९२ वाजंत्री आ॥ ५ ये॥ दरमाहे करार रु॥.

१२ आ॥ ४ दर ३ प्रा॥

४ आ॥ १ महिने

१६

ये॥ दरमाहे.

1978

७२ पखवाजी दरमाहे रुा ६ प्राो यो
३० गुरव पुजारी दरमाहे २॥ प्राा बारमाहे
४८ देऊळ झाडायास आा २ दरमाहे २ बारमाहे
२४ मशालची दरमाहे २ प्राा
४४ पाणका श्रीस आभिसेकास सरंजामास
१२ पंचारतीस तूप बारमाहे रुा
९० नंदादीप बारमाहे
१२५ पोशाख २ रुा.
६२॥ श्रीआशाडी
६२॥ कार्तिकी

१२५

७३२

३०१ गांव निा कमावीस वगैरे खर्च
१७६ प्यादे आा ४ यो आकर माहे दरमाहे ४ प्राा.
१२५ कारकून आा १

३०१

४६६ संत महंत माहापुरुष.
२५ पुरुषोत्तमबावा.
१४४ गीताद्याईबावा माहापुरुष.
२५ नरसीभट.
३० त्रिंबक गोसावी.
१२ सिवराम गोसावी.
१८ गोविंद गोसावी नृतकरी.
१८ गीताद्याईबावाचे भाऊ.
१३० पंढरीस जाता वगैरे खर्च विठोबा गोसावी.
१८ परमहौस नंगा बावा दारकाबाई.
१२ राघोबा गोसावी.
२४ नारोबा गोसावी यांचे पुत्र मोरोबा गोसावी मोझे.
१० सिवराम नारोबा मोझ्याचा सिस.

४६६

६० पुजेचे साहित श्रीस किरकोल साहित्य दरमाहे रुा ५ प्रा यो बारमाहे.

१८ माली फुलें तुलसी श्रीस

१८ हरिगिरी गोसावी नंगा.

१७१५

नेमणूक श्रीक्षेत्री ज्ञानेश्वर येथे गांवपैकी खर्च सतरासे पंधरा रुा करार करावे. बारमाहे करार करावे. करार.

¶*A list of expenditure, under various heads, sanctioned for the temple of Dnyaneshwar at Alandi, for the year commencing 7th November 1756, the total sum allowed amounting to Rs. 1,715.*

No. 144] [*22-6-1758*

रु. नं. १९८९ नकल

श्री

श्रीमंत माहाराज मातु:श्री आईसाहेब याणी राजमान्य राजश्री धोंडो माहादेव सेनाकर्ते यासी आज्ञा केली यैसी जे. तुम्हीं राज्यातील पुरातन मातबर सेवक तुमचे वडील सखोपंत यानी चिरंजीव कैलासवासी शाहू बावा जवल मोगलाईत बहुत श्रम केले यास्तव त्यास शेनाकर्तीचे पद व थोरले वाडियातील मजमू देऊन तेथील येखत्यारीचा कारभार सांगितला. त्याजप्रमाणें तुमचे वडील व तुम्ही करीत गेला. मधें विष्णु नरहर याने साहेबास गैरवाका समजाऊन मजमूची घालमेल करविली त्यावरून तुम्ही निघोन गेला. त्यास मारनिले सरकारचें नुकसान करून पळून गेले. यैसियास तुम्हीं पुरातन सेवक इतबारी तुम्हापासून वावगी वर्तणूक व्हावयाची नाही हे समजोन तुम्हावर कृपाळु होऊन पूर्ववत प्रा मजमूचा धंदा तुम्हांस सांगून हे आज्ञापत्र सादर केले असे.

त्याप्रों भोगवटा चालत आहे.

आसल पत्राप्रों नकल पाहिली. सदासिव तुकदेव बिा गोविद कोंडो सेनाकर्ते छ २० रमजान.

¶*Dhondo Mahadeo Senakarte is given the office of Mujumdar by Tarabai.*

No. 145] [14-2-1693

तालीक

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके १९ अंगिरानाम संवत्सर माघ बहुल पंचमी भोमवासर क्षत्रियकुलावतंस श्रीराजाराम नृपति याणी चांदजीराऊ बिन नागोजीराऊ पाटणकर देशमुख पा पाटण यास दिल्हे वृत्तिपत्र यैसिजे. तुम्ही स्वामीचे पुरातन सेवक सेवा बहुत येकनिष्टेने केली आहे व तुम्ही जमाव घेऊन कर्नाटकांत राजश्री संताजी घोरपडे सेनापति यासमागमे येऊन सेवा करीत आहा. यास्तव स्वामी तुम्हावरी बहुत संतोसी होऊन तुम्हावरी स्वामी कृपाळु होऊन तुम्हास इनाम पूर्वी परगणे पाटणाखाले गाव व इनामदार करून माहाल इनाम दिल्हा असे. तुम्ही माहाल आपले स्वाधीन करून घेऊन लेकराचे लेकरी इनाम अनभऊन सुखरूप असणे. या वृतीस भोसला होऊन इस्कील करील तो भोसल्याचे वंसीचा नव्हे यासी आणिक कोणी अन्यथा करील त्यास धर्म शास्त्रीचे वचन

स्वदत्तां परदत्तां वा यो हरेच्च वसुंधरां ॥
षष्टिवर्षसहस्राणि विष्टायां जायते क्रिमिः ॥ १ ॥

हे पातकें जाणोन तुम्हास इनाम चालवितील. तुम्ही देशमुखीचा सेवा करून सुखें असण जाणिजे. निदेश समक्ष मोर्तब.

तेरीख छ १९

जााखर सुाा सलास सितैन

¶*King Rajaram rewards the services of Chandjirao Patankar.*

No. 146] 1759-60 ?

रुमाल नं. १७१२ जमाव.

नकल.

श्री

राजश्री जगद्वराज राजे संस्थान
श्रीरंगपटण गोसावी यासी

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्रीा बालाजी बाजीराऊ प्रधान आसीर्वाद. उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे. विशेष राजश्री आनंदराव गोपाल यांस संस्थान माार येथील खंडणी सरकारची होईल, त्यासिवाय साल दरसाल रुपये ५००० पाच हजार. खंडेराव

बनाजी दिंमत हैदरनाईक याचे गुजारतीन करार पेशजी सनद राजश्री गोपालराव गोविंद यांनी करून दिल्ही आहे; तरी सदरहु वर्षासन सरकारचे खंडणीसिवाय यास देत जाणे. दरसाल ताजेपत्राचा आक्षेप न करणे. रा छ १९ रजब. सूज्ञाप्रति विशेष काय लिहिणे.

¶*Anandrao Gopal Supekar Deshpande is granted an allowance of Rs. 5,000 by Peshwa Balaji Bajirao.*

No. 147, [Before 1745

रु. नं. १७७२

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री बाबा स्वामीचे सेवेसी

पोष्यें माहादाजी गोविंद सा नमस्कार विनंती येथील कुशळ ताा छ २१ जमादिलावल मुकाम इंद्रप्रस्थ स्वामीच्या कृपावलोकने यथास्थित असे विशेष. कृपा करून पत्र पाठविले तें पावोन परम समाधान जालें. येथील वर्तमान सविस्तर पूर्वी लेहले होतें व सांप्रतहि जे रदबदल जाली ते विस्तारे श्रीमंत स्वामीचे सेवेसी लेहली आहे त्यावरून सविस्तर विदित होईल. याचे उतर ज्या प्रकारें सादर होईल त्याप्रमाणे वर्तणूक करूं. वतनपत्राविशयीं बहुत प्रकारे लेहले त्यास स्वामीच्या आज्ञेप्रमाणे सार्वभौमास अर्ज करून परवाणगी घेऊन याददास्त शुरु केली. हे तयार जाली म्हणजे फर्मानास काम लाऊं. देशपांडीयेपणाची सनद बिना पेशकस होत नाही, यास्तव वीस हजार रुा पेशकस कबूल केला, त्यापैकी चौथाई सध्या द्यावी लागते. याखेरीज सनदेच्या तयारीस मुत्सद्यांस खर्च वेच पडेल. सारांष जैसे बनेल तैसे करून पातशाही सनद करून पाठवितों. याविषयीं कांही चिंता न करावी. चित्रें व अतरहि मेळऊन पाठऊन देतों. वरकडी सर्व यथास्थित आसे. + बहुत काथी लिहिणे कृपा लोभ असों दिजे हे विज्ञप्ति.

¶*Mahadaji Govind (Hingne ?) to Baba (Mahadoba Purandare) informing him of the writer's difficulties in procuring imperial sanads for the Purandare vatans. The paper must be referred to the regime of Peshwa Balajirao and the time of Mahadev Bhat Hingne.*

+ येथून अक्षर वेगळें लिहिलेलें आहे व तें बाळबोधींत आहे.

No. 148] [*1761 ?*

जमाव रु. नं. १६६३

श्री

यादी कृष्णाजी विठल टिपणीस याचे सरचिटणीसीचे वतन पसजापासून असतां अलीकडे चालत नाही. सा मागील कागदपत्र व दाखला भोखवटा पाहोन सरकारांत समजवावें म्हणौन आज्ञा जाली, त्यावरून पंचानी कागदपत्र पाहोन वतन खरे म्हणोन याद ठराविली. पंच आसामी आठ पैकी येक * * श्री धोंडो माहादेव यांणी कागदपत्रांत दिकती आहेत म्हणौन दिकतीची याद लेहून दिली आहे. त्याचे जाबसाल कसे म्हणौन पुसिलें, त्यांची उतरें सुा इसने तिसैन मयां व अलफ

राजिनाम्यांतील दिकती म्हणतात कलमें

रयतेकडील राजिनाम्याचे हातचा त्याचे हातची जेलाची वाटणी असावी ते नाही म्हणतात कलम

१

याचें उतर जैल म्हणजे तपसील ज्याणें राजिनामा लिहिला त्याचे हातचा माहालवार नाही हा दोष म्हणतात, त्यास ज्या माहालचे जमीदार त्या त्यापासून बेरजा भरून लिहून घेतलें व त्याप्रो भोगवटा चालविला व बाजेबाजे वतंदारांजवल कानूजाबते आहेत ते पाहातां त्यातहि दाखला आहे. तेव्हां दोष म्हणतात तें चांगलें नाही. ज्याचे त्याचे हातें लिहिविलें हें वतंदारांस ठाऊक आहे.

हिजरी सन व जुलूस मिळतो, आर्बी सन मिलत नाही म्हणतात कलम

१

याचें उतर राजिनाम्याचा फसली सन असतां हिजरी धरून जुलूस मेळऊन

राजिनाम्याचे वाटणीची येकुणात नाही व दोन बंदाखाली तोंडासी तोंड लाऊन नवे दोन तुकडे जडले, जोडावरील मोहरा शेम विशेम जमिदारांचे निशाण्यांची खातरजमा असावी म्हणतात

कलम

१

याचें उतर येकुणात होऊन राजिनामा पुरा जाला मग माहालदार तपासि(लाच्या) निशाण्या सर्वांच्या जाल्या तेव्हां दुसरे येकुणातीचें प्रयोजन नाही. तुकडे दोन जडल्याचें कारण कल्याण भिवंडी दोन तालुक्याचे दोन देशपांडे असतां येकानी राजिनामा लिहिला होता, सा दुसरे देशपांडे यांणी आपले हातचें अक्षर असावें म्हणौन आक्षेप धरून तुकडा

4983

आर्बी सनात तफावत म्हणतात त्यास तो सन फसली हें कशावरून म्हणावा तर चौधरी प्रा। कल्याण भिवंडी यांचे निवाडपत्रांत दाखल्यास हा राजिनामा बार केला आहे त्यांत फसली लिहिलें आहे व राजिनाम्यांत आर्बी सन अक्षरशाहा लिहिला आहे तो फसलीस मिलतो, तेव्हां फसली सनच प्रमाण. यास जुलूस न मिळावयाचें कारण औरंगजेब पातशाहा तख्तीं बसले तो पहिला जुलूस त्यास कोकणात च्यार जुलूसपर्यंत सिवाजी राजे यांचा अमल पांचवे जुलुसांत मिर्जा राजे जैसिंग व दलेलखान पठाण दिलीहून दक्षणेस येऊन राजेयांसी सलूख केला त समई राजेयांही कोंकणप्रांत त्यांस देऊन आपण व संभाजी राजे दिलीस गेले यास्तव पांचवा जुलूस असतां कोंकणांत अमली पहिला जुलूस धरून चालविला. याप्रों कोंकणप्रांतातील बाजे बाजे जमीदार यांचे महजर आहेत. त्याजवर आर्बी सन फसली सन या राजिनाम्यास जुलूस सुधां मिलण आहे. चालीप्रों फसली सनात व आर्बी सनात व जुलूसात तफावत नाही.

वतनी सर चिटणिशीची म्हणावी तर येकसे नऊ होन मुशारा यावरून सरकाराची चिटणिसी दिसते म्हणतात.

कलम
१

याचे उतर इदला पातशाइत वतनी सरचिटणिशी करून देऊन मुशारा एकसे नऊ होन चालिवला. पुढे लिहून घातला तो तर तुकडा तोंडासी तोंड लाऊन जडला नाहीं सांदाच आहे. दुसरा तुकडा जैलाखालीं तोंडासी तोंड लाऊन जडावयाचें कारण पो। नसरापूर येथील रुसूम येकतीस रुो। तर्फावार वाटणी आगोदर त्या माहालचे कोणी होते, त्याणी लिहिली यावर तर्फ मा। रचे देशक यांचे विचारास ते वांटणी न ये, सा। सदरहू येकतीस रुपयांची वांटणी पुन्हां जमीदारानी आपले समजुतीची आपले तर्फेची केली, तो तुकडा तितकाच येकावर येक जडावा तर आंतील आंगास भिवंडी माहालचे सदराचीं अक्षरें बुजतात. सा। तोंडासीं तोंड लाऊन खाली पटी ते कालींच देऊन वरत्या मोहरा केल्या आहेत. तुकडा नवा नाही. त्याकालचे कानू जाबते त्या माहालचे जमिदारांचे रुसुमाचे आहेत, त्यांत सदरहू वाटणी बार आहे. तेव्हां जमिदारी पत्र त्या वेलेस तुकडा घातला रुसुमाचे जाब त्यासही वांटणी त्याप्रों आहे तेव्हां दोष येत नाही. जमीदाराचे निशाण्याची खातरजमा तर त्यांचे रुसुमाचे जाब त्यास दाखल त्या प्रों भोगवटा चालिला ही खातरजमा याहून दुसरी खातरजमा कसी असावी.

अलंगीर पातशाई अमलांत आज्ञा जाली की आमचे पातशाईत वतनी चिटणीस जुनर व औरंगाबाद येथे आहें त्यांस मुशाहिरा रयत निसबत चालतो त्याप्रों तुम्ही रयत निसबत राजीपणे हक करून घेऊन वतनी मिरासीचें काम करीत जाणें. त्यावरून रयत निसबत हक घेऊन वतन चालले असतां सरकारची चिटणिशी घडत नाही, वतनी खरी. हाली जुनर वगैरे जागां चिटणिशी वतनें चालत आहेत ती सरकारी नव्हेत, तेव्हां हे सरकारची कसी होईल ? यावरून सरकारी असें म्हणतात तें ठीक नाही.

राजिनामा सरकारात न जाता लिहिण्याचे सिरस्त्यास सलाह हकीम म्हणतात व सरकारांत राजिनामा जाणार त्यात शपता घातल्या आहेत तेव्हा हकमाचा यखत्यार राहिला नाही म्हणतात.

याचे उतर इदलशाई कारकीर्दीत सर चिटणिसीचें लिहिणें करीत आले त्याप्रोंच अलंगीर पातशाहा याजकडील अमलदार याजवल चालत होते त्याचे यखत्यारी हुकुमावरून सलाह हकीम राजिनाम्यात जमिदारानी लिहिलें तें ठीक आहे व जमिदारीचीं पत्रें होतात त्यात शपता ल्याहावयार्च चाल आहे.

कल्याण प्रांत विज्यापुराकडे नसतां सरकार आं म्हटले आहे तेव्हां सरकार विज्यापूर किंवा कल्याण कोणतें म्हणावें म्हणतात कलम १

याचें उतर निज्यामशाई मोडून इदलश्याहीं कोकण प्रांत घेतला तेव्हां त्याणी दस्तूर माफक आं म्हटलें हें कल्याणास म्हटलें याचा संशय कां असावा?

पैशाचें कलम ज्याचे हातचा राजिनामा त्याचे हातचे वरतें यावें तसें नाहीं, परंतु शफीखानाच्या परवान्याची नकल काजीचे मोहरनसीं आहे त्यांत दाखला दाखवितात त्यास काजी जसा प्रसंग पडतो त्या साधनास मोहरा करून देतो. असे बहुत वेव्हार दृष्टीस पडले यामुलें प्रमाण धरवत नाही म्हणतात कलम १

याचें उतर जैलाखाली पैशाचें लिहिलें व काजीचे मोहरेनसी नकल दाखवितात त्यास काजीचे मोहरेचे कागद खोटे निघतात यावरून प्रमाण धरवत नाही म्हणतात, त्यास महालवार पटी ज्याची त्याणी लिहिली. पैशाचें कलम सर्वां महालचे सा। सेवटीं लिहिले. काजीचे

मोहरेची नकल प्रमाण नव्हे म्हणावें तर महंमदबाकर व लछीराम यांची असल सनद पुढें जाली त्यांत बार आहे. यावरून इतर काजींचे कोठे खोटेपणा आढलला असला म्हणून यास दोश लावावा असें होईल कीं काय?

भागवेटियातील दिकती म्हणोन लिहिल्या कलमे

राजिनामा जाल्यापासून तिसा वर्षांपुढें भोगवट्याचीं पत्रें आहेत, जाल्या दिवसापासून नाहीत म्हणतात कलम १

याचे उतर बहुतां दिवसाची गोष्ट, दंगे बहुत जाले, त्यांत कागदपत्र गेले तिसा वर्षी आलीकडे दाखवितात तेंव्हा मागील भोगवटा पुरला

राजिनाम्यावर तिसरा जुलुस असतां ता। कोरकडा येथील बागराव देशमुख याणीं हाकाविसी पत्र लिहिले आहे त्यावर तिसरा जुलुस आहे तेंव्हा राजिनाम्या अगोधर रुसूम कोठील असावा म्हणतात कलम १

याचे उतर तिसरा जुलुस राजिनाम्यावर औरंगजेब पातशाहाचा आहे ते कालचे पत्र कोरकडा येथील नाही. पत्रावरील तिसरा जुलूस अलीकडील बहादरशा कोचक पातशाहा औरंगजेबामागें आला त्याचा हें कशावरून म्हणावें तर राजिनाम्याचे कारकीर्दीत गोविंद कृष्णाचें नाव आहे. पुढे कोरकड्याचे पत्र जालें तें त्याचा लेंक विठल गोविंद याचे नावें आहे. यावरून राजिनाम्यावरील तिसरा जुलूस औरंगजेबाचा कोरकड्याचे पत्रावरील जुलूस बाहादरशा याचा याप्रों आहे.

किले कोथलागड येथें वस्तीस असतां कागदपत्र गेल्याचा सुरत महजर जाला आहे त्यांत संशय कीं होते (?) याचे पारपत्यास जाणे आणि बराबर मालमवेसी सनदा पत्रा व कबिला नेणे हें कसें असेल ते असो, दिकत दिसते म्हणतात

कलम १

याचें उतर किले कोथलागड येथील आमिनी करून कुटुंब व माल व मवेसी वगैरे वस्ताभाव कागदपत्रसुधा किले मारीं होते पारपत्यास गेले असे नाही. तेथें काही दिवसानी दंगा होऊन किला माहाराजानीं घेतला ते समई वस्तभाव वतनी कागदपत्र गेले हे वर्तमान सर्व जमिदारांस समजलें, त्यावरून त्यानी सुरत महजर पत्रें गेल्याचा करून दिला आहे.

रसी पत्रातील संशय म्हणतात कलमे

हाजी शफीखान याचे सनदेची नकल काजीचे मोहरेनसी आहे त्यांत सिकेतर व इसाफत. जमिदारांच्या राजिनाम्याप्रो म्हणतात आणि दोनी कलमें राजिनाम्यांत नाहीत. बिनमखता उगवणी सालिना टके ३६ करणे म्हणोन मजकूर त्यास सिके तर इनाम नाहीत. असल सनदा गेल्या म्हणतात त्यांत काय असेल तें असो म्हणतात

कलम १

येक राजिनामा माहालानिहायचे जमिदारांचा म्हणोन त्यांत हे मार नाहीत. ज्या माहाली सिकेतर तेथलि जमिदारानी राजिनामा करून दिला तो बजिनस आहे व इसाफत ता। चोण येथील जमिदारांचा राजिनामा होता तो दंग्यात गेला, परंतु हाजी शफीखानानी सनद दिली त्यांत राजिनाम्याचा उध्धार लिहिला आहे त्या सनदेची नकल काजीनी केली ती खोटी म्हणावी तर हली राजिनामा माहालानिहायचे जमिदारांचा व तर्फ मुरबाड येथील सिलोंतराचा राजिनामा बजिनस आहे, तेव्हा इसाबतीचा चोणचे जमिदारांचा होता तो मात्र गेला, परंतु त्या माहालचे जमिदारांचे रुसुमाचे कानूजाबत्यास गांवचा दाखला आहे यावरून नकल प्रमाण आहे.

सनदा असतां धर्मगददास व करीमबेग याचीं पत्रें करून घेतली आहेत त्यास हाजीशफीखान याचे सनदेचा उधार आहे, वरकडांचे पत्राचा उलेख का नाही म्हणतात

कलम

याचे उतर धर्मगददास व करीमबे हे सुभाचे अमीन त्याही शफखा दक्षणचे दिवाण त्याचे सनदेचा उध्ध आणिला, वरकडांचे पत्रांचा दाखल ते आपले सनदेत का लिहितील हाली सनदा ज्यांचे नांवाच्या आहे त्यांच्या दुसऱ्या दृष्टीस पडल्या स्वच्छ बोलावयासी येईल म्हणता

कलम

याचें उतर सनदात दिकत आसर तर वतन चालून भोगवटा कसा होत जमिदारांजवळ रुसुमाचे जाब त्यां दाखला आहे वसुलबाकीच्या पट आहेत वगैरे दाखले पुरतात याह दुसरा मुकाबला काय म्हणून असाव

नारो भिकाजी आंगरे यांचा का भारी, तो सिवाजी महाराजे यांचे वेळे आंगरे यांचा अमलच नाही तेव नारो भिकाजी कोठून असावे? तश सरदेशमुख अली चवधरी म्हणव होता मग त्याजकडे द(स)रदेसमुर कोठलि म्हणतात कलम

याचे उतर प्रांत मारची देशमुर पहिली अली चौधरी यास होती. पु

पेशकसी दाहाशें येकावन रुपये सरकारांत भरणा जाला असतां दुसरी पत्रें बाकीचे फडशाविसीं आहेत बितपसील

हवाला नारो	सनद दयानत-
भिकाजी रुा	खान रुा
३२९।	४०३।

येकूण सदरहूची लगत मिलत नाही म्हणतात कलम १

याचें उतर पेशकसी करार जाली होती त्यापैकी सन दाहाशें सत्याहातरी-मध्यें तीनशे सवायेकूणतीस रुा देणे राहिले होते, त्याचा हवाला नारो भिकाजीचा होऊन फडशा जाला. उप्रांत त्रेतालिसावे जुलुसामधे येकंदर नजरेच्या वसुलाची रुजुवात होतां दफ्तरीं बाकी चारसे सवातीन रुपये निघाले, तेव्हा कबजा दाखऊन बाकी दूर करवावी तो कबजा गेल्या साा बाकी * * * चेऊल या माहलाकडे सनदा घेतल्या की हकाचे यैवजपैकी निमे या बाकीत घेऊन निमे यैवज सर चिटणिसाचे पोटास देणे. याअन्वये पत्रें घेतलीं आहेत. याप्राो दोनी मार निराले असतां लगत कसी मिलेल? सिवाजी माहाराजांस जाली त्यावरून चौधरी प्राा मारी हे पातशाईत जाऊन दोन रुपये सेकडा निराले करून घेतले. हा दाखला चौधरी यास सर-कारचे निवाड.पत्र करून दिले त्यांत लिहिलें आहे. राजे याजकडून ते समई कोकणचे सरदेशमुखीचा कारभार नारो भिकाजी करीत होते. आंगरे यांजकडील नारो भिकाजी दुसं

सनदा गेल्यावर महंमद बाकर व लछिराम याचें पत्र घेतात त्यात पत्रें गेल्याचा उलेख नाही म्हणतात कलम १

याचें उतर ते वलेस कसें समजोन घेतलें व त्याणी कशा दिल्या याचें कारण दिल्याघेतल्याचें आतां कसें समजेल?

¶*This is a register of questions and answers in a dispute about the Sar Chitnisi Vatan of Krishnaji Vithal Tipnis. The paper proves how minutely an inquiry was conducted in disputes of this kind.*

रु. नं. १७७० *No. 149*] [*9-1-1763*

श्रीगजानन

चिरंजीव विजयेभव राजेश्री माधवराऊ पंवार विस्वासराऊ यांसी प्रति कृष्णाजी पंवार आसीर्वाद उपरी लेहून दिल्हे यैसीजे. तुम्हीं व आम्हीं येकत्र होऊन वाटणीचा

करार हिंगणीच्या मुकामी केला जे, माळव्यातील व देसचा संरजाम श्रीमंत पेशवे यांजकडून आम्हांकडे आहे तो झाडून व राज्याकडील संरजाम विस्वासराईचा तुम्हाकडे आहे तो येकत्र करून निमेनिम तुम्हीं आम्हीं वाटून घ्यावा. यासिवाये हाती घोडी उंटे वस्तभाव बिशाद देखील सुतलीचा तोडा व तुमचे व आमचे कर्ज येकत्र करून शफतपूर्वक वाटून घ्यावें. याखेरीज वतनी पाटिलक्या इनाम जे असतील ते निमेनिम वाटून घ्यावे. सदरहू संरजामपैकीं आजपासोन नुकसानी जाली तरी उभैतांची असे. वाटणी जाल्यावरी ज्याजती संरजाम नवा उभैतांतून येकजणाने मेळविला तरी निमेनिम वाटून घ्यावा. त्यामुळें खर्चवेच पडल तो विभागाप्रमाणें दोघानी घ्यावा. वाटणी जाल्यावर नवे कर्ज होईल तें ज्याचें त्याणी वारावें. तुमच्या कर्जासी आम्हांस समंध नाही, आमचे कर्जासी तुम्हांस संमध नाही. घर भाऊ कजिया करितील त्यांस तुम्हीं व आम्हीं मिळोन समजवावें. विस्वासराईचा संरजाम तुम्हांकडे आहे त्यापैकी चौथाई संरजाम तिर्थस्वरूप रा जिवाजी पवार यांजकडे आहे, तो तुम्हीं आम्हीं मिळोन सोधून वाटून घ्यावा, त्यामुळे खर्च पडल तो वाटणींप्रमाणें निमेनिम द्यावा. माळव्याचे संरजामाचे चाकरीस तुम्ही राऊत विभागाप्रमाणें द्यावे व विस्वासराईच्या संरजामास राऊत आम्हीं विभागाप्रमाणें द्यावे. येणेंप्रमाणें तुमचा व आमचा करार जाला असे. यासी अन्यंथा करील त्यास श्रीची शफत असे. मुळुकगिरी करून घरास आलियावर सदरहू करीण्याप्रमाणें वाटणी करावी हा तुमचा आमचा करार असे. जाणिजे छ २४ माहे जमादिलाखर सके १६८४ * * चित्रभाणु नाम सवछरे पौश वद्ये १० रविवार बहुत काय लिहिणे हा आसीर्वाद, हे लिहिल सही. वाटणी जालिया उपर सरजाम मिळेल तो व सरजामपैकी नुकसानी होईल ते उभयेताची आण हे लिहिल सही.

¶*This paper contains an agreement between Madhaorao and Krishnaji Pawar, dividing their property and acquisitions and determining their responsibility for debts, etc.*

No. 150] [*1808*

रु. नं. १६४१

ओंकार

१ बाबूजी नाईक वोंकार छ १३ रजब सुा सलास सितैन मया व अलफ

१ यादी राजश्री गणपतराव चिंतामण वोंकार यांजकडे सरजाम व असाम्या वगैरे सरकार राजश्री संभाजी व मालोजी जाधवराव सुा तिसैन मयां व अलफ

१ छ १ जाखर सन १२०१ यादी निा राजश्री मोरो चिंतामण वोंकार
१ यादी दफाते पत्रे छ २१ राखर सन १२०० निा राजश्री मोरो चिंतामण वोंकार सुा इहिदे तिसैन मया व अलफ-
१ विनायक चिंतामण वोंकार शके १७२८

¶*This paper contains a few names of the Onkar family with which Bayabai, daughter of Chimaji Appa, was united by marriage*

No. 151] [*21-7-1766*
जमाव, रु. नं. १७७७.]

श्री

तीर्थरूप राजश्री दादासाहेब स्वामी वडिलांचे सेवेसी अपत्ये माधवराव चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २८ मोहरम वडिलांचे आसीर्वादें येथास्थित असे विशेष. राजश्री खंडेराव दाभाडे व कृष्णाजी दाभाडे स्वामी समागमे चाकरीवरी आहेत. त्यास, यांचे मुकासे माहाल व गांव आहेत त्यांची जफ्ती वडिलीं करविली असिली तरी मोकली होऊन माहालचा व गावचा आमल मारनिलेकडे सुदामत चालत आल्याप्रों चाले ते करणार स्वामी समर्थ आहेत. येविसीं कमावीसदारांसहि ताकीद जाली पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The Peshwa Madhavrao writes to Raghunathrao ordering the addressee to remove the attachment of the saranjams of Khanderao and Krishnaji Dabhade, as they were in service.*

No. 152] [*26-1-1771*
रु. नं. १६८०

श्री

यादी बमोजिब तैनातजाबता सको माणकेश्वर पुरंधरे देशपांडे सुा इहिदे सबैन मया व अलफ

खुद जातीस तैनात रुो	नहुमान.
५००० नख्त	१ पालकी
१००० कापड	१ अबदागीर
शागीर्दपेशा	१ चवरी
२ खिजमगार	२ कडी जोड १ सोने

4990

१ दिवट्या | १ चौकडा
२ ब्राम्हण | कारकून सिवरामपंत तैनात सालिना
१ जासुदजोडा | देखील कापड मिलोन २०००

येकूण तैनात जातीस देखील कापड सा हजार व बहुमान व शागी(र्द) पेशा व कारकून याची तैनात दोन हजार येणेप्राो करार केले असे. शाही सिरस्तेप्राा पावल. जाणिजे छ ९ सवाल

¶*Details of the domestic establishment of Sakho Mankeshwar Purandare.*

No. 153] [*1-9-1771*

श्री

चिरंजीव राजमान्य राजश्री नारायणराव यांसी माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद उपरी येथील कुशल जाणौन स्वकीये लिहीत जाणे विशेष. राजश्री माधवराव पवार विश्वासराव व जगजीवन पवार यांजकडील सरंजामाची मजमू पथकाची रंगो[१] त्रिंबक यास पेशजीपासून आहे त्यास ते वृध्ध जाहाले यास्तव श्रीकासीस राहिले आहेत, सबब त्यांचे नातू रा सदासिव बाबुराव याचे नावे मजमू पेशजीप्राो करार करून माधवराव पवार यांचे नावे अलाहिदा सनद सादर केली आहे, त्यास यांजकडील मजमूचा सरंजाम व वेतन दफ्तरी रुजू पाहून पेशजीप्रमाणें चालवणें. सरंजामाविसी गावास व कमावीसदारास पत्रे देणे. रा छ २१ जमादिलवल सुाा इसने सबैन मया व अलफ बहुत काय लिहिणे हे आसीर्वाद

¶*Madhaorao Ballal asks his brother Narayanrao to continue the majmu of the Pawars to Sadashiv Baburao.*

No. 154] [*6-2-1774*

कोंकण जमाव रु. नं. ४४७ नकल

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
विसाजी केशव यांसी

प्रति मातुश्री गंगाबाई आसीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिाा विशेष. तालुके वसई येथील मामलत साल मजकुरी तुम्हाकडून दूर करून

---

१ बोकील.

4991

रा त्रिंबक विनायेक याजकडे साल गुा प्रो सांगितली असे. तरी किले व कोट व जंजिरे जकिरासुधा मारनिल्हेचे हवाली करून कबजा घेणे जाणिजे. छ २४ जिलकाद सुरू अर्बा सबैन मया व अलफ. * बहुत काय लिा हे विनंति

¶*This is an order issued by Gangabai, widow of Narayanrao Peshwa, to Visaji Keshav to hand over the charge of Bassein to Trimbak Vinayak.*

No. 154-A] *[7-10-1758*

पुणें जमाव नं. २६

श्री

श्रीशके १६८० बहुधान्यनाम संवछरे अस्विन शुध ५ पंचमी मंदवासर त दिनी खंडोजी व राणोजी व कासोजी बिन रुपाजी येबिन मलजी पाटील हगवणे गायेकवाड पुरातन वतन मौजे पाचवड प्रा वाई नजीक कृष्णातीर यासी राणाई कोम कृष्णाजी बिन सिदोजी येबिन रत्नोजी जाधव मोकदम मौजे किरकटवाडी ताा कर्यात मावल सुा तिसा खमसैन मयां व अलफ. कारणे तुम्हास खत लेहून दिल्हे (पुढे जमिनीचा तपशील व शेवटीं हकासंबंधी कलमबंदी दिली आहे, ती महत्वाची असल्यामुळें खाली दिली आहे.)

१ नांव नांगर तुम्हाकडे दरोबस्त कलम

१ होलीची पोली तुम्हाकडे कलम

१ तश्रीफ आधी तुम्हांकडे

१ मिरासीचीं सेते पाटीलकीची यापैकीं तीन तक्षिमा जाधव व चवथी तक्षिम तुम्हाकडे कलम

१ पंच्यांग आधी तुम्हाकडे सांगावे कलम

१ अंबिलीची घागर आधी तुमची देवलास यावी. मग जाधवांची यावी

१ नागपंचमीचा मान आधी तुम्हाकडे मग जाधवाकडे उभयतांच्या बायका येकत्र होऊन वारुलास जावें यावें

१ इनाम पासोडी कास टके १० दाहा पैकीं जाधवाकडे टके ७।। साडे सात चवथाई इनाम तुम्हाकडे टके २।। अडीच कलम.

१ मिरासीचा वाडा मोकदमी उजवे बाजूस तुमचा आपणाबरावर.

१ घर म्हैस पालक तुम्हाकडे एक व जाधवांकडे एक.

१ सिरालसेटीचा मान कोठे चालतो कोठे नाहीं. परंतु तुमचे गांवी सिरालसेट जाला तर अधीं तुमचा यावा. मागून जाधवांचा येऊन अनुक्रमें जावें यावें.

अंवसेचे पोलियाचे बैल आधीं तुमचे मागून जाधवांचे.

4992

१ सिलंगणास आपटा पुजावयास समस्तांबरोबर तुम्हीं यावे. आधी तुम्ही मागून जाधव, सिलंगणाचे कलम जाले.

१ दिपवालीचे वोवालणें आधी बलुते तुम्हास वोवालतील मागून जाधवास वोवालतील.

१ टिला विडा आधी तुम्ही घेणे मागून जाधवानी घ्यावा.

१ खोबरियाची वाटी लग्नाची व मुहुर्ताची व लग्नाचा पानाचा खांडवा अधीं तुम्ही घेणे. मागून जाधव घेतील. सदरहू तक्षिमेप्रा घेणें.

१ बकरियाची मुंढी आधीं तुम्हांकडे.

१ दसरियाचा कलश देऊलीं बहिरोबाचा आधीं तुमचा हात लावावा.

१ हळदकुंकू तुमच्या बायकांनीं व जाधवांच्या बायकानी येक होऊन गावांतील हलदकुंकू सवादें घ्यावें. सणाच्या मोल्या आधीं तुम्हाकडे मग जाधवांकडे.

१ चांभाराकडील जोडा पाटीलकीचा हकाचा व पानदळा यैसे २ जोडे दर हरसाल देतील त्यापैकीं अधीं तुम्हीं एक घेणें मग जाधव घेतील. येक सदरहू दोन जोडे तुम्ही येक मागून जाधव घेतील.

¶*The paper mentions the various rights enjoyed by the patil of a village.*

No. 155] [*8-8-1774*

पुणे जमाव रु. नं. ६१६

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारो आपाजी स्वामी गो यासी

पो माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंती. उपरी : येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष. राजश्री मल्हारराव पवार हे तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांच्या समागमे होते; ते बाब मारनिलेचे सरंजामाची जप्ती केली होती, त्यास हाली फौजेसुधा मारनिले आपले फौजेत आले, याजकरितां यांचे सरंजामाची जप्ती मोकली करून हें पत्र लिहिलें असे. तरी मौजे उडवडी ता सांडस प्रां पुणे येथील मोकासा मारनिलेकडे पेसजीपासून चालत आहे त्याची जप्ती उठवणे. जाणिजे. छ १ रजब सु खंमस सबैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Sawai Madhavrao orders the removal of the attachment of the Saranjam belonging to Malharrao Pawar of Dhar, as the latter had reverted to the side of the Peshwa.*

No. 156] 26-3-1776

कागद नंबर ३९९४ पुणे जमाव रु. न १०१७

यादी जिवाजी नाईक बोकड सुरु सीत सबैन मयां व अलफ नेमणूक तालुके सिवनेर.

गाव येक दोनशा रुपयाचा जातीस द्यावा म्हणौन विनंती त्याजवरून पेशजी इतलाख शंभर रुपये तैनातेखेरीज दरसाल पावत होते ते दूर करून सालमजकुरी दोनसे रुपयाचा गाव खेरीज तैनात बसुली बेरिजेचा द्यावयाचा करार केला असे. येणेप्रा कलम १

किले सिवगड व कोथला व गोरखा व बहिरवगड येकूण च्यार किले सरकारांत घ्यावे. त्याजवरील सरदार व लोकास मिलोन बक्षीस रुपये ३००० येकूण तीन हजार रुपये द्यावे म्हणौन विनंती, त्याजवरून सदरहू तीन हजार रुपये सर्वांस च्यारी किले मिलोन द्यावयाचा करार केला असे. येणे प्रा बक्षीस कलम १

संताजी नाईक सिलकंदे व जावजी इष्टा व मायाजी दामसा व धांदवड व वडेकर वगैरे सरदार सरकारचे भयाने फरारी जाहाले आहेत त्याचे राजकारण आपणाकडे लागले तरी सरकारात आणून रुजू करून देऊं त्यास त्यास वाचवावे म्हणौन विनंती, त्यास सदरहू आणून रुजू करावे. त्याणी येकनिष्ठेने वर्तावे म्हणजे त्यास वाचविले जाईल. ते

अफ्तागिरा व दिवट्या दोन आसामी जदीद सालमजकुरी करार करून द्यावे म्हणौन विनंती, त्याजवरून सदरहू दोन आसामी व दिवटास तेल मिलोन सालीना छ १६ सफरपासून रुपये

५० अफ्तागिरा

४५ दिवट्या व तेलाबा मिलोन

९५

२५ अफ्तागिरीचे सामानास येक साल

१२०

येकूण येकसे वीस रुपये करार केले असेत. कलम १

सोन्याचे कडे खाशास येक सेराचे बक्षीस द्यावे म्हणौन विनंती त्याजवरून सोन्याचे कडे येकवीस तोलेयाचे द्यावयाचे करार केला असे. कलम १

सरदार लोक व नाइकवाडी आहेत त्यास बहुमान वस्त्रे माणूस पाहून द्यावी म्हणौन विनंति त्याजवरून रुबरू द्यावयाचा करार केला असे

कलम १

जिवाजी नाो बोकड यास चवरीदार आा १ येकून सालीना रुपये ३० तीस छ १६ सफरपासून व चवरी करावयास येकसाला रुपये १५ पंधरा रुा येणे प्राो करार केला असे. कलम १

4994

भेटीस न येत सरकारचे मुलुख.....
व गडकोट किल्यास उपद्रव करू
लागल्यास सरकारचे स्वारीपुढे तुम्ही
हरोल होऊन पारिपत्य करावे, येणेप्रा
करा केले असे. कलम १

येकूण सात कलमे करार केली असेत जाणिजे छ ९ सफर पा। हुजूर

¶*Jivaji Naik Bokad is rewarded by the Peshwa for his faithful services during difficult times.*

No. 157] [*1781*

यादी कैफियेत वेंकटराव राजे घोरपडे आमचे पणजे कैलासवासी मालोजी राजे घोरपडे यास पेशवे सरकारातून फौजेचे गोटास शहर पुणे येथे जागा दिल्ही त्या जाग्यावर आम्ही पेठ वसाहत सन ११९१ चे साली केली. पुढे सन ११९२ चे साली आम्हास सरकारातून झेंडा दिल्ही.

¶*Peth Ghorpade of Poona City was founded by Maloji Ghorpade's great grandson Vyankatrao Raje Ghorpade in the year 1781.*

No. 158] [*27-5-1783*

रु. नं. १७०९ नकल

श्री

यादी राजश्री महादजी सिंदे याणी कलमे करार करून पाठवावी. सुा सलास समानीन मया व अलफ बि तपसील

आम्हांस सुरतेचे सावकाराचें देणे पंनास हजार रु. आहेत ते त्यास द्यावे लागतात व तुम्हांकडून जाबसाल यावयास येक मास पाहिजे. तेव्हां पंचवीस हजार रुपये दुसरे येथें खर्चास आसावे तरी पाऊण लाख रुपये येथे द्यावे आणि त्यासिवाये वाटखर्चास द्यावे. कलम १

इकडील मसलतीमुळे वोढीचा प्रकार बहुत जाला आहे याजकरितां पनास हजार रुपये सावकाराचे देणे असेत. त्याची माणसें समागमे

आम्ही बडव्यास अथवा तापीतीरीं मर्जीस येईल तेथें राहू तरी आमचे लोक झांसीच्या कराराप्रो ठेवले. आम्हापासून कोणायेकास दूर न करावे. आम्हांस स्वस्थतेने ठेवावे. येविसीं शफतपूर्वक खातरजमेचे पत्र व पत्रांत कुळदेवतेची शफत लेहून पाठवावी व उदी पाठवावी. आम्हीहि पाहिजे तसी खातरजमा करू. कलम १

स्वारी दरमजल इकडे यावी, आपली आमची भेटी जाल्यावर आपले व

आणावी. आपली आमची भेटी जाल्यानंतर पंनास हजाराची तोड पाडून द्यावयास येईल. तूर्त वाटेच्या खर्चास दरमाहा वीस हजार प्रा॥ दुमाहीची तजवीज करून केसो अनंत याजकडे पाठवितो. स्वारी येथून निघाली म्हणजे दरमाहाचा दरमाहा मशारनिले प्रविष्ट करितील येणेप्रा॥ कलम

आमच्या खर्चास पूर्वी झासी तालुका लाऊन दिल्हा होता. सांप्रत खान-देश प्रांती परगणे लाऊन दिल्हे तरी उत्तम आहे अगर हे विचारास न ये तरी झांसीचा तालुका पेशजी लाऊन दिल्हा होता तो कबूल आहे. परंतु आमचें राहाणे मात्र तापी नर्मदा तीरीं होईल तो माहाल आम्हांकडे द्यावा. कलम १

स्वारी येऊन आपली आमची भेटी जाल्यानंतर आपले व आमचे विचारें राहावयाचे स्थलाचा निश्चय होईल ते स्थल खर्चाचे ऐवजात लाऊन द्यावयास येईल. येणे प्रा॥ कलम

ब्रम्हावर्त तीर्थाची जागा आहे. तर त्याचे ऐवजी त्यास दुसरे माहाल लाऊन द्यावे. याचा येत्न जाहाल्यास बिठूर तुम्हीं आपल्याकडे करून घेऊन आम्हांस लाऊन द्यावे. मग आम्हांस झासीचे प्रयोजन नाही. हे जर गोष्ट न घडली तरी येविसी आमचा आग्रह नाही. सहजामध्ये होऊन आल्यास करावे याविसी कांही तातड नाही. कलम १

आमचे विचारें पाहावयाची योजना होईल तेथें राहावे. लोक ठेवण्याचा प्रकार तरी आपण येथे आल्यावर कार्याकारण खर्चाचे अजमासे ठेवणे ते ठेवावे. आपण निःसंशय चितांत न आणावे आम्हांकडून दुसरा अर्थ मागे जाला नाही व पुढेंहि होणार नाही. येविसी श्रीची शफत असे. उदीहि त्रिंबक भवानी यांजबराबर पाठविली आहे. या उपरी आपल्याकडून आम्हांसी दुसरा विचार न व्हावा, येविसी खातरजमा आपल्याकडून जाली पाहिजे येणे प्रा॥ कलम

आम्हाकडील लोक व त्यांची मुले माणसे कैदत असतील व कोण्हाची वतने व घरें व चीजबस्त व गांव व जमीनी वगैरे जफ्त केली असतील त्याची मोकली करावी. आम्हांकडील लोक घरी जातील व घराहून आम्हांकडे येतील त्यास कोणेविसी प्रतिबंध नसावा. कलम १

येविषयी पुण्यास पत्रें लिहून लिहिल्याअन्वये बंदोबस्त करून द्यावयास येईल येणेप्रमाणे कलम.

आम्हांस परगणे तोडून द्यावयाचे विचारास येत नसल्यास आम्हा नख्ती पंचवीस हजार रुपय दरमाहाचे दर-माहा देत जावे. त्यात दिकत नसावी. आम्ही जेथे राहूं तो परगणा आम्हांस द्यावा. त्या परगणियांत बंदोबस्त आमचा असावा. कलम १

ब्रम्हवर्त इंग्रजाकडे आहे सबब तूर्त व्हावयाचें नाही येणे प्रो कलम

खर्चाचे बेगमीस परगणे तोडून द्यावयाची सोय यथास्थित घडून न आल्यास दरमाहा पंचवीस हजार रु. नख्त पावत जातील. त्यांत दिकत पडणार नाही. ज्या स्थली राहावयाचा निश्चय आपले व आमचे विचारे होईल ते स्थल आपले बदोबस्तात राहील. येणेप्रा कलम

येकूण कलमे साहा सदरहू लिा प्रो करार

छ २९ जमादिलाखर
सन सलास समानीन
मुा ग्वालेर वैशाख.

¶*Terms offered by Raghunathrao for his future arrangements through Mahadji Sindia at the time of his intended retirement to Jhansi.*

No. 159] [*1792-1793*

कोकण जमाव रु. ४३२

श्री.

यादी जंजिरे दंडा राजपुरी सरकारात घ्यावयाचे कारस्थान होत आहे, त्यासंमधे कलमे करार करून द्यावयाची सुा सलास तिसैन मया व अलफ मो नारो गोविंद वर्तक.

नक्त	रुो
१५०००	देवस्थानास मुखवटे सोन्याचे व रुप्याचे वस्त्रे मिलोन नवसाबद्दल आजमासे. रुो.
१५०००	कडी सोन्याची.
१५००	मोहनमाला सोन्याच्या.
४५००	कंठ्या मोत्याच्या व सोन्याच्या.

लोकांस पालख्या व आतागिरे व चवऱ्या व दिवट्या करार करून द्याव्या.

१०	पालख्या
१५	आतागिरे
१५	दिवट्या
१०	चवऱ्या
५०	

१५०० चौकडे
५००० कडी रुप्याची.
६०००० नक्त ———— रुो.

———

१०२५००

जंजिरा सरकारात आल्या नंतर दवास नवस व लोकांस कडी कंठ्या नक्त वगैरे मिलोन येक लक्ष दोन हजार पाचसे रुपये दिल्हे जातील. येणे प्रमाणे करार करावे करार.

इनामगांव व जमिनी जंजिरे मजकूर-पैकीं व इकडील कारकून व लोक या कारस्थानांत आहेत त्यांस जंजिरे मजकूर पैकीं जाहागीर सुटेल त्यापैकी अथवा ज्याचे सोयीस जेथे पडेल तेथें दाहा हजार रुपयांची करार करून द्यावी.
कलम १

गाव व जमिनी मिलोन दाहा हजार रुपयाचे इनाम सरकारकाम जाहल्यावर सिा प्रमाणे करार करून दिल्हे जाईल. येणेप्रमाणे करार करावे ———— करार

मसलतीस कारकून व माणसे गेली आहेत व पुढें जातील त्यांस खर्च लागेल तो सरकारातून द्यावा कलम १

तीन च्यारसे रुपयेपर्यंत किरकोळी खर्च जाल्यास मजुरा दिल्हा जाईल येणेप्रमाणे करार करावे करार.

मसलतीस कारकून व लोक आहेत वतनसंमधे वगैरे कामे आहेत त्याचा बंदोबस्त करून द्यावा कलम १

सरकारकाम जाहल्यानंतर लोक हुजूर येतील त्यास बहुमान दाहा पालख्या व पंधरा आतागिरे व पंधरा दिवटे व दाहा चवऱ्या सिा प्रमाणे करार करून दिल्या जातील येणेप्रमाणे करार करावे. करार.

जंजिरे मजकूरी लोक आहेत त्यास हुजूर पाहून तैनात करून चाकरी हुजूर घ्यावी आसामी अजमासे येक हजार १००० कलम १

सरकारकाम जाहल्यावर लोकानी हुजूर यावें. माणूस पाहून तैनात करार करून दिल्ही जाईल. आज्ञा होईल तेथे चाकरी करावी येणेप्रमाणे करार करावा. करार.

मसलतसंमधे ऐवज जाजती लागल्यास त्याचे कारण सरकारात समजाऊं त्याप्रमाणे द्यावा. कलम १

मसलत सिध जाल्यावर स्थले द्यावयासी लोक खातरजमेचे ठेवावे लागतील. असामी ५०० पाचशे जदीद ठेऊ त्याची आज्ञा असावी. त्यास रोजमरा हुजुरून द्यावा
कलम १

जदीद माणूस ठेऊ नये. काम लागेल तेसमई सरकारात विनती करावी. पांचसे माणूस हुजुरून दिले जाईल. येणेप्रमाणे करार करावे करार.

किला सरकारांत आल्यानंतर लोकांची व कारकुनाची वाजवी कामे असतील ती करून दिली जातील येणेप्रमाणे करार करावे करार.

मसलतसंमधे लोकास द्यावयास सरकारातून ऐवज तसलमातीस दिल्हा आहे त्याच्या ओली दाहापर्यंत घाटाखालीं सरकारचे लोकाचे हवाली करून दिल्यावर तसलमातीचे ऐवजाचा जमाखर्च करावा. मजकडे कझ्या नसावा कलम १

तुमचे तसलमातीस येवज दिल्हा आहे त्यास खातरजमेच्या चांगल्या दाहा वोली सरकारात आणून द्याव्या. खातर जमेच्या वोली नसल्यास तुमचे तसलमातिस ऐवज दिल्हा आहे तो तुम्ही सरकारात द्यावा. येणेप्रमाणे करार करावे करार.

कलमें.

येकून आठ कलमे करार करून दिल्ही असेत. तीन माहिन्यांत किला सरकारात आल्यानंतर सदरहू कलमे लिहिल्याप्रमाणें सरकारांतून निभावणी केली जाईल. येणेप्रमाणे करार करावे करार.

¶*A secret agreement entered into by the Peshwa for the capture of Danda Rajpuri from the Sidis.*

No. 160] *Bajirao II*

श्री

सिका.

श्रीपटा धर्मपत्र माहाराज राजश्री लक्षधीरजी. दलपतराव राजेही पूज्य श्री-मुकुंदरामपंत व माधवपंत यांसी सादर केला ऐसा जे. आपणास राज्याभिषेक

श्रीकृपेने जाला. ऐसियासी आपण तुम्हास ग्रामदान वाडगीपाडा जले परगणे पेंठ तो गांव दरोबस्त मोकासा कुलबाब कूलकानू जमे वगैरे वेठबिगार सुध्धां तुमचे जिमे केला असे. रयतीस आबाद करून खात जाणे आणि आभीष्टचिंतन करणे. तुमचे लेकराचे लेकरी खाणे. आपणापासून यास आनसारिखे न करून दरीबाब पटा आसे. रवाना, आश्विन शुध १० रोज प्लवंगनाम संवछरे. मोर्तब.

¶*Maharaj Dalpatrao Raje confers the village of Badgipada upon Mukundrampant on the occasion of the former's coronation. The* प्लवंग *year occurs in Shake 1589, 1649, 1709 and 1769 corresponding to 1697, 1727, 1787, 1847 respectively to one of which this document refers*

No. 161] [*About 1800*]

श्री

चेऊल प्रांताच्या वतनाची हकीकत अडचाश्या वर्षामागील कोण होतें तें दंतकथा ल्याहावी यैसे नाही. आलीकडील देशाईपण व कुलकर्णे दोन्ही वतने आपली होती. त्यास पातेणपरभू यासी गुमस्तगिरी सागितली. ते जबर(द)स्त सातसें कराचली होती. पेण पणवेली कल्याण प्रातें दरवडे घेत. पूर्वी प्रांतात किले नव्हते. पातशाही अमील येत होता तो जमीदाराचे विद्यमाने पैसा घेत होता. त्यास पातेणपरभू याणी ब्राह्मणाचे दोन दोनदा मारे केले. त्याजवर त्यास देसपाडिपण व कुलकर्णे दिल्हे. देसमुखी आपलेकडे राखिली. अधकारी मऱ्हाटा ठाकुर म्हणौन आहेत, त्यास साप्रत काले रा आबाजी माहादेऊ सरसुभेदार तल कोकण याजवेलेचा दाखलाहि कुलकर्णाचा आहे यैसे असोन रा चिमणाजी आऊजी कायेस्त यासी अरमारचा सुभा माहाराज राजश्री कैलासवासी याजकडून होता ते समई खांदेरी वसविली, त्यास बंदर पाहिजे म्हणोन कुलाबा वसविला व याकुतखान याणी उदेरी वसविली, त्यास काही उणी नवंद वर्षे जाली. यात वतनाची साधणूक.

आव्हांसचे+ कुलकर्ण महादाजी विठ्ठल कोंडाजी यैसेच चिमणाजी आउजीचे कारकीर्दीस चालवीत | स्थल वरसोली येथील परभू चिमणाजी आवजी याजपासून चालवीत होते त्यास वरसोलीस येक भाऊ

+ नागावे आगसी येथे बालाजी हरि कुलकर्णी सेणवी होता. त्याचे बुडाले त्याणे महाजनाचे हवाले केले. त्याणे विठोजी याचा लेक बालोजी विठोजी परभु साबाजी तुकाजीचा मामा यास दिल्हे त्याचे बुडाले. त्याचे हे भाचे साबाजी तुकाजी.

होता. त्याचा लेक लाडकोबा चालवीत होता. नागावे आगसी येथील कुलकर्णी रुद्राजी सेणवी याचे, त्यास त्याचे पोटी संतान नाहीं. त्याजवळ विठोजी प्रभु सागीर्द होता, त्यास सेणवी वाराणसीस जाऊं लागला, तेव्हा कागद रुमाल हवाले केले. त्याचा लेक बालाजी विठोजी करीत होता. त्याचे बुडाले त्याची बाइको व लेक आहे. १

सदरहु वतन साप्रत कृष्णाजी व साबाजी तुकाजी बाळाजीचे भाचे रा मानाजी आगरे याचे हिमाइतीने आपण कुलकर्णी म्हणऊं लागले आहेत.

ब्राह्मणगाऊ व कुमटे दोन्ही तर्फाचे हुजदारपण मल्हार परभू पाचसात वर्षे चालवीत होता त्यास त्याचे चिरंजीव रामाजी मल्हार श्रीमत राजश्री बाजीराव प्रधान कैलासवासी याजवल सेवा करू लागले. बालंभट प्रथम उपाध्यायासी धरबंद करून त्याजकडून राजश्री कान्होजी आगरे सरखेल याचा काल जालियावर रा सेखोजी आगरे याजवल रघुनाथजी परभू होते ते समई त्याजवल साक्ष दिल्ही की वतनी दो तर्फाचे कुलकर्णाचे कागद आपल्यापासी होते ते राजक्रातीने गेले. कुलकर्ण आपले वतनी म्हणून साक्ष पुरऊन परभु परभु येक सरखेलीचे पत्र करून घेतले त्या पत्रावर महाराज राजश्री शाहूराजे याचे होता. येक स्थलात होता. महादाजी त्याचा लेक राजपुरीस बाटला त्यास श्रीमंत राजश्री कैलासवासी जजिरा घ्यावयासी गेले. तेव्हा रामाजी मल्हार याणी बाव्यापासून खरीदी खत करून घेतले आणि कुलाबचे मुकामी राऊ गेले तेव्हा कागद साक्ष मोइन्याचे घेतले. वरसोलीचे कुलकर्ण गोपाळजी परभू चालवितो.

श्री गाउ पाली येथे देसपांडे याणी आपले तर्फेने निंलोबा कायेस्त परभु ठेविला तोच कुलकर्णाचे काम चालवीत आहे.

राजश्री त्रिंबकजी हरि याणी रा मानाजी आगरे याचे कारकीर्दीत माहाय व परहुर? तर्फ करून घेतली. १

रामाजी सदला प्रभु याणी रा मानाजी आगरे याचे कारकीर्दीत ता खाडाले येथील कुलकर्ण करून घेतले. १

ता झीराड निलोबा याजकडे जैसे श्रीगाउ पाली चालते त्याप्रा हाही माहाले चालवितो.

घेतले त्या पत्रावर निजामाची पः
करून घेतली त्याजवर पृथ्वीपतीच
घेतली परंतु मुद्रस (?) मुळास (?
जागा नाहीं बातल असे.

¶*An interesting account of the district of Cheul (on the west coast), containing several names of historical personages who were employed there from time to time. It appears to be written during the regime of Bajirao II as Abaji Mahadeo was appointed Sar Subha by him about the year 1800.*

No. 162] [*1804-1805*

रु. नं. १९९३. (सातारा.)

श्री

यादी जमिनी व गांव प्रांत वाई नाना फडणीस याजकडे होते ते हाली श्रीविष्णु बेलबाग येथील सरंजामास नारो रामचंद्र याजकडे सरकारातून सांगितले आहेत. त्यास ठाणे मेणवलीहून हरयेकविशी उपद्रव होतो तो न व्हावा म्हणौन कादार ठाणे मार यांस. सुा खमस मयातैन व आलफ. पत्र १.

¶*The Peshwa issues orders that no opposition should be offered from Menavli to the performance of the proper rites and ceremonies at the Belbag temple belonging to Nana Fadnis.*

No. 163] [*1805-1806*

कोकण जमाव ४३२

श्री

यादी किले जंजिरा प्रांत राजपुरी निा शामल
हबसी हा किला सरकारात घेऊन द्यावा त्या बाा
ठरावाची कलमे सुा सीत मयातैन व अलफ.

जंजिरा सरकारात हस्तगत करून देतील त्यास सरकारात जागा आल्यावर जाहागीर व इनाम वंशपरंपरेने चालवावे. येणेप्रमाणे.

१६००० सरदार सात असामी व
कारकून वगैरे यासी

मसलत न पडतां जंजिरा हस्तगत करून देतील सरदार वगैरे त्यांस येकसाला बक्षीस नख्त रुा
१०००००

जंजिरा हस्तगत जाहल्यावर जंजिऱ्यात घोडी गुरे व ऐन जिनस गला

गांव इनाम कमाल बेरोजि असलेल्याप्रमाणे द्यावे.

१०००० जागा हस्तगत जाहाल्यावर ब्राह्मण व पुण्यांतील बोलणारे कारस्थानी यासी इनामगांव कमाल बेरीजप्रमाणे द्यावे.

२६०००

जंजिरा हस्तगत सरकारात जाहल्यावर. मसलतीस व कारस्थानास ऐवज खर्च दोन लक्षपर्यंत होईल तो व्याज मनोतीसुधां फिटेपावेतो जंजिरा सुधा मामलतीची घालमेल होऊं नये कलम

जागा हस्तगत होईतोपावेतो वसईचे आरमार सरजामसुधां व लोकांस रोजमुरा व सरंजामास पैका लागेल तो वसईकडे न्यावा. जे आरमार आमचे स्वाधीन सांगू त्याठिकाणी असावें कलम

जे लोक सरदार शामलाकडील सरकारात येतील त्याच्या सरदाऱ्या लोकसुधां सरकारात नेहमी चाकरीस ठेऊन सरकारात लोकाची सेरा आहे त्या सिरस्त्याने रोजमरा देऊन चाकरी हुजूर घ्यावी. ते लोक आाा

९५०

व वजनी जिनस व भांडेकुंडे व लाकडी सामान व फरासखाना व नख्त व कापड व जवाहीरखाना व जिनसखान्याचे सामान व बिलोरी सामान जे सापडेल ते दरोबस्त सरकारात द्यावे. त्याचे ऐवजी दारुगोली व सिसे हातेर सुधा सरकारात जंजि[illegible] घेऊन देतील त्यास जिनस निमे द्याव[illegible] त्याऐवजी उक्ता ठराव रुो २००००[illegible] दोन लक्ष देऊन जिनस दरोबस्त सर[illegible]काराात द्यावा. कल[illegible]

कारस्थान करावयासी जजिरा लग[illegible] ठिकाण किले बिरवाडी मामलती सुध[illegible] आम्हाकडे द्य[illegible] [illegible]लम

१

जे सरदार कारस्थानांत जंजिरा हस्तगत करावयाच्या असतील त्यास पालख्या व आबदागिरे व चवऱ्या देऊन बहुमान करावा कलम

¶*A secret agreement for the capture of Danda Rajpuri from the Sidis.*

No. 164] *[1806 ?*
जमाव, रु. नं. १७८१.]

श्री

तीर्थरूप राजश्री नाना वडिलांचे सेवेसी

आपल्ये सदाशिवानें चरणावर मस्तक ठेऊन सां नमस्कार विज्ञापना. तागाईत छ माहे रबिलाखर पावेतों वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री बापू

5003

सेलूकर याणी सांगितलें कीं, नवाब बंदगान यांसीं त्यांचे जेष्ठ पुत्र अलिज्यांहा बाहदुर याणी बदलून फंद करून बेदरास फौज सुधा येऊन तेथून औरंगाबादेस गेले. त्यांचे बंदोबस्ताविषईं नवाब याणी सरकारांत पत्रें पाठविलीं कीं, आपणाकडील सरदार फौजेसहित पाठऊन द्यावें. इकडील सरदार जात आहेत त्याणी व आपणाकडील सरदार याणी येकत्र होऊन आलिज्यांहा यांस हस्तगत करावें. त्यावरून सरकारांतून सन खंमस तिसैनांत राजश्री आबाजी कृष्ण सेलूकर यांस फौजसहित रवाना केलें. त्यांची व नवाबाकडील सरदार यांची भेटी राक्षसभुवनचे मुकामीं होऊन पुढें आवरंगाबादेस जाऊन आलिज्यांहा बाहदुर यांसीं लढाई करून बाहदुर मवसूफ[१] यांस हस्तगत करून भागानगरास घेऊन गेले. ते समईं सेलूकर यांचे डेऱ्यास मेजमानीकरिता नवाबाची स्वारी आली. तेव्हा सेलूकर याणी जवाहीर व हाथी वगैरे जिनस लाख सवा लाख रुपयांचा नवाबास दिल्हा. त्यासमईं मेजमानीचे तर्तुदीवर व कामगारी करून अले सबब मर्जी खूष होऊन नवाब याणी आबाजी कृष्ण यांस चौवडा देऊन पो लोहगांव व सरकार पाथरीपैकी जागीर गांव दिल्हे त्याचा तनखा येणेप्रमाणें रुपये

११६९॥=॥	मौजे नादापूर.
१६२१॥-॥।	मौजे नांदगांव.
९५५ ।॰	मौजे सित्धनाथपूर.
१२७३८=	मौजे [illegible]
५०१९॥=।॰	

येकूण पांच हजार येकोणीस रुपये सवादाहा अणे या तनख्याचे च्यार गांव दिल्हे. त्याची वहिवाट सांल गुदस्तपर्यंत मशारनिलेकडे चालत होती. सन खंमस मयातैनचे सालीं राजश्री महिपतराम याणी च्यान्ही गांवची जप्ती आवल सालींच केली आहे. यास्तव, नबाबाचे सरकारांतून महिपत राम यांस ताकीद होऊन आबाजी कृष्ण सेलूकर यांजकडे चहूं गांवचे जागिरीचा आंमल नवाबाचे सरकारांतून चालता केला पाहिजे. म्हणौन त्याजवरून हें पत्र आपणास लिहिलें असे. तरी सदरीं लिहिल्याप्रमाणें मीरअलम बाहदुर यांसीं बोलून, नवाबाचे सरकारांतून राजे महिपतराम यांस ताकीद होऊन, चहूं गांवची जप्तीची मोकळीक होऊन-आबाजी कृष्ण सेलूकर यांजकडे च्यार गांवचे जागिरीचा आंमल

---

१ मौसूफ–मजकूर; मशारनिल्हे.

नवाबाचे सरकारांतून चालत अल्याप्रमाणें चालता होये तें केलें पाहिजे. तिकडील सरफराजीचे देणें आपणाकडून होईल तितके साहित्य करावें. त्यांचे इछेस येईल तसें करोत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Sadashiv to Nana, requesting the latter to arrange to grant the four villages mentioned in the paper to Abaji Krishna Selukar through the minister of the Nizam Mir Alam and Raja Mahipatram. The paper mentions the important fact that the rebellion of Nizam Ali's eldest son had been crushed with the help of the Marathas. The writer and the addressee cannot be identified.*

No. 164-A] [*19-3-1822*

सेवेसी जवाहिरसिंग जमादार कुरण किले पुरंदर रामराम विनंती विज्ञापना. बंडाचा दंगा का महाड व बिरवाडी येथे जाहाला. त्यावरून बातमीस मी आपल्याकडील बलवंतराव जेधे देशमुख पाठविले. त्यानी बातमी छ २३ रोज जाखरची आणली कीं वाई देशात आसगांवचे ठाणे उधळले व खोदरी लुटले. येलम गावांवर आले. तेथें दगड धोंडा गांवकरी यांनी केला. त्याजवर रविवारी रात्री कोरलखिंडीजवळ मौजे बारसे येथें बंडाचे लोक आले. बारसे डोंगरच्या माथ्यावर आहे. त्यानी दगड लवंडून माघारे फिरविले. मग मोजे व्याहाली लुटली. व्याहाली का भोरापासून च्यार कोस भोर किकवीपासून च्यार कोस. येकूण आठ कोस आहे. पुण्याकडून दोनसे लोक पलटणचे गेले. त्याचा आज सोमवारी हिरडोसीच्या मुक्काम आहे. उदईक घाटांखाली जातील. त्यास बंड एकीकडे नाही. फुटून काहीं वाई देशांत व काहीं भोरच्या लत्यात व काही माहाडाकडे आहेत. यावरून विनंती लिहिली आहे कीं किले पुरंदरचे वेऱ्यात झाडीवाडीत त्यांचे चौकसीस दाहावीस आसामी असावी. साहेबास कळावे. सेवेसी श्रुत होय; हे विज्ञापना.

पौ छ १९ माहे मार्ची सन १८२२ इसवी संध्याकाळचे दोन घटके दिवसास.

¶*Report of Jawahirsingh Jamadar on petty risings in the vicinity of Purandar and the district of Wai.*

No. 165] [*1808-1809*

जमाव, रु. नं. १७४.

श्री

शेवेसी अर्जी सेख याकूब मोकाशी मौजे दहिटणे ता साडस प्रात पुण सु तिसा मयातैन व अलफ. कैलासवासी बाजीरावसाहेब राजपुरी सर करावयास गे ते वेळेस आमचे आजे राजपुरीकर यांचा दरोबस्त कारभार करीत होते. त्या माहाराज छत्रपति यांचा करारनामा नेला. त्यातील मजकूर, दाहा गाव इनाम

किलेदारी व अरमार वगैरे देऊ; तुम्ही किले मुलूक हवाली करावा. त्याहून अधिक मागितले. त्याचा करार श्रीमंतानी करून दिल्हा. त्याजवरून आमचे आजे याणी किले तळा, घोसाला व बिरवाडी वगैरे सात किले व मुलूक हवाली केला. ते वेळेस आमची मुलेमाणसे राजपुरीहून आणून दहिटणेयास ठेऊन दरोबस्त गाव इनाम हवाली केला. पुढें करारप्रमाणे घ्यावे तो आमचे आज्याचा काळ जाहाला, यामुळे तसेच राहिले. येक गाव आम्हाकडे साठ वर्षे चालतो. त्याची हाली च्यार साले का सरकारांतून गोविंदराव सदासिव याजकडे सांगितली आहे. तो ऐवज सिंहीगडाकडे जातो. यामुळे आमचा कुटुंबाचा योगक्षेम चालत नाही. त्यास स्वामीनी कृपाळु होऊन आमचा गाव आम्हाकडे पूर्ववत प्रमाणे चालता केला पाहिजे. राजपुरीकडील पांच गाव पातशाही फर्मान्याचे सोडून सरकारचे लक्ष धरून राहिलो. त्याचा अभिमान धरून स्वामींनी चालविले त्याप्रमाणे चालविणार धनी समर्थ आहेत.

¶*Sekh Yakub of Dahitne applies to Bajirao II to confirm that village to him and his family for services rendered by his grand-father to Peshwa Bajirao I.*

No. 166] *[1809-10*

जमाव रु. नं. १७३४

श्री

जाबता किले व ठाणी येकंदर स्वारी राजश्री पंतप्रधान सुा अशर मया तैन व अलफ

ठिकाणे सुमार

२८ स्वदेशचे वरघाटी किले वगैरे

१ किले सातारा

७ तालुके सिवनेर

१ किले सिवनेर

१ किले हडसर

१ किले चावंड

१ किले जीवधन

१ किले कुंजरगड

१ किले हरिश्चंद्र

१ गढी शहर जुनर

७

१ किले राजमाची

१ माची

१ श्रीवर्धनगड

१ किले मनरंजनगड बाले किला

१ किले घनगड

२ किले पुरंदर व वज्रगड

१ किले पुरंदर

१ किले वज्रगड उर्फ रुद्रमाल

१ किले दाहेगड उर्फ सुंदरगड

१ किले चंदनगड

१ किले नादगिरी उर्फ कल्याणगड
१ किले ताथवडा उर्फ संतोषगड
१ किले सिहींगड
१ किले कोरीगड
१ किले नारायणगड
१ किले चाकण भोईकोट
१ किले प्रतापगड
१ किले विसापूर
१ किले वंदनगड
१ किले परली
१ किले केळजा
१ किले लोहगड
१ किले वैराटगड
१ किले पाडवगड

२८

३९ प्रांत गंगथडी
३ तालुके त्रिंबक
१ किले त्रिंबक
१ किले भास्क
१ किले वाघेरा
३ तालुके कावनई
१ किले कावनई
१ किले त्रिगलवाड
१ किले गडगडा

३

१२ किले रुजु तालुके धोड
१ किले काचणा
१ किले कोल देहेर
१ किले कात्रा
१ किले माणिकपुंज भोईकोट
१ किले दहैरसानी
१ किले कणेरा
१ किले मार्कंडा
१ किले जवळा
१ किले रवला
१ किले अचला
१ किले अहिवंता

१२

४ तालुके पटा
१ किले पटा
१ किले आडगड
१ किले बितिंगा
१ किले आवढा

४

१ किले पेडका पाा कनड फुलंबरी भुईकोट
१ किले हर्ष
१ किले ब्रहुल
१ किले इंद्राई
१ किले रामसेन
१ किले येमगिरी
१ किले सोनगड

२९

६ सरदार याजकडे
१ किले हातगड निा खंडेराव त्रिंबक ढमढेरे
१ किले चांदवड निा होलकर याजकडे
४ बिठलराव नरसिह विचूरकर

१ किले सोनगिरी
१ किले आणकई
१ किले ठणकाई
१ किले राजदेहेर

४

६

३९

१९ प्रांत खानदेश

८ तालुके मुल्हेर माहाली किले आहेत ते

१ किले मुल्हेर
१ किले साल्हेर
१ किले भामेर
१ किले मोरा
१ किले अवरंगड
१ किले हरगड
१ किले न्हावा उर्फ रतनगड
१ किले पिसोला

८

१ किले कणेरा
१ किले देहेर
१ किले कुकरमुढे भोईकोट

११

८ सरदाराकडे निसबतीस

४ दौलतराव सिंदे

१ किले आशर
१ कोट शहर बऱ्हाणपुर
२ पा। हाडे येथील किले
१ किले भुगागड
१ किले कालीभित

२

४

१ ठाणे मालेगाव नि॥ रंगराव नि॥ रंगराव नारायेण राजेबहादर

३ नि॥ होलकर

१ किले गालण
१ ललिग
१ ठाण शेंदवे

१९

प्रांत गुजराथ

१ किले पारनेरा
१ किले डबई
१ शहर आमदाबाद

३

२ नि॥ दौलतराव सिंदे

१ जंजिरे भडोच
१ किले पायगड

२

५

१७ प्रांत हिंदुस्थान

२ तालुके झासी

१ किले झासी
१ किले करेरा

२

७ प्रांत बुंदेलखड

१ ठाणे सागर
१ किले जयसिंगनगर भुई कोट
१ किले हटे भुईकोट
१ किले ठमकसे भुईकोट

१ किले गुलसराई भुईकोट
१ किले तेजगड
१ किले उरई भुईकोट

७

१ किले काल्पी भुईकोट
१ किले मदुसूदनगड पो। अरुण

११

६ सरदाराचे निसबतीस
१ ठाण कोच निा होळकर
३ निा दौलतराव सिंदे
१ किले आजमेर प्रा मारवाड
१ किले ग्वालेर
१ किले खामखेडा पो भेलसे भुईकोट

३

२ निा अनंदराव पवार
१ किले धार
१ किले मांडगण उर्फ सोनगड

२

६

१७

२४ प्रांत कर्नाटक
५ तालुके धारवाड
१ किले धारवा
१ किले पारग
१ किले भिवगड
१ किले वलभगड
१ किले कलानिधि

५

१ किले अजमनगर उर्फ बेळगाव भुईकोट
२ ता। बागलकोट
१ किले बागलकोट
१ किले बदामी
१ शहर विज्यापूर
१ ठाणे मनोळी
१ किले परसगड
१ किले सावनूर
१ ठाणे हावनूर
१ ठाणे जुनी हुबळी
१ ठाणे कुसेगल
१ किले मुत्कवि
१ किले सोनापूर भोईकोट

१८

६ सरदार याजकडे निसबतीस
५ निा चिंतामणराव पांडुरंग
१ ठाणे मिरज
१ किले जाहीपालगड
१ किले राजहंसगड
१ ठाणे जमखेडी
१ ठाणे सबयाव

५

१ किले गजेंद्रगड निा दौलतराव घोरपडे

६

७९ प्रां कोकण
९ तालुके विजयदुर्ग देवगड सुध्धा
१ जंजिरे विजयदुर्ग
१ किले येसवंतगड

१ किले देवगड जंजिरा
१ किले रामगड
१ किले आहालेगड भुइकोट
३ गढ्या
१ राजापूर
१ खारेपाटण
१ कामते
१ किले भगवंतगड

९

५ तालुके रत्नागिरी
१ जंजिरे रत्नागिरी
१ किले जैगड
१ किले पूर्णगड भुइकोट
१ किले भवानगड भोईकोट
१ गढी साठवली

५

१ किले महिमतगड
४ तालुके अंजणवेल
१ किले अंजणवेल
१ किले गोवलकोट
१ किले बहिरवगड
१ किले विजयगड

४

१५ तालुके वसई
१ जंजिरे वसई
१ जंजिरे आर्नाला
१ किले इंद्रगड
१ किले अर्जुनगड
१ किले आसावा
१ किले सेवगा
१ किले गंभीरगड
१ किले बलालगड
१ किले वज्रगड भुईकोट
१ किले डाहाणु
१ कोट तारापूर
१ कोट माहीम
१ कोट केलवे
१ कोट उंबरगाव
१ कोट सिरगाव

१५

७ तालुके सुवर्णदुर्ग
१ जंजिरे सुवर्णदुर्ग
१ किले रसालगड
१ किले पालगड
१ किले मंडणगड
१ किले सुमारगड
१ किले कनकदुर्ग भुईकोट
१ कोट गोवा भुईकोट

७

२ तालुके आवचितगड
१ किले आवचितगड
१ किले सुरगड
१ किले बिरवाडी भुईकोट
४ प्रांत राजपुरी
१ किले तलागड
१ किले घोसालागड
१ किले विश्रामगड उर्फ कुरडु
१ मानगड

४

२ तालुके रेवदंडा
  १ जंजिरे रेवदंडा
  १ किले कोरला

  २

२ प्रांत बेलापूर
  १ किले बेलापूर भोईकोट
  १ किले पारसीक भुईकोट

  २

१ जंजिरे जयदुर्ग उर्फ उदेरी
८ प्रांत कल्याण भिवडी
  १ किले मलंगगड
  १ किले कोथलागड
  १ किले सिदगड
  १ किले बहिरवगड
  १ किले गोरखगड
  १ किले दुर्गाडी
  १ किले घोटवडी
  १ किले भिवंडी

  ८

२ साष्टी प्रांतांतील किले
  किले कर्नाला
  १ किले विकटगड भुईकोट

  २

३ मामले कोहोज
  १ किले कोहोज
  १ किले अशर
  १ टकमक

  ३

३ तालुके रायेगड
  १ किले रायेगड
  १ किले लिगाणा
  १ कोट माहाड

  ३

१ किले माहुली
४ तालुके रतगड
  १ किले रतनग
  १ किले कलोलगड
  १ किले अलंग
  १ किले मदनगड
२ किले दुरग व भोयतगड
२ तालुके सरसगड
  १ किले सरसगड
  १ किले मीरगड

  २

१ किले सिदगड

७९

२०७

तपसील

५६ भोईको
१३७ पाहाडी
१४ जंजिरे

२०७

१७८ सरकारात
२९ सरंजामी सरदार वगैरे यांचे निसबतीस.

२०७

¶This is a list of forts and fortresses in the possession of Peshwa Bajirao II in the year 1809-10.

5011

No. 167] [16-6-1815

सातारा जमाव, रु. नं. १९७४.

राजमंडळ. रोजकीर्द.

स्वारी राजश्री पंत प्रतिनिधि सुा सीत (अशर मयातैन).

माहे रजब छ ७ रोज.

दफाते पत्रे

बाळशेट सोनार सातारकर याजकडून कराड मुकामी टंकसाल चालविली आहे. त्यास टंकसालेच्या रुपयाची चौकसी तुम्ही करावयाची तसी केली. त्यास पुणे सिक्याचे मासल्याप्रमाणे आयालेस सरस रुपया उतरला. असतां रुपयाची चाल चालवीत नाहीं, दिकत करितां म्हणोन हुजूर विदित जाहाले. त्याजवरून हे आज्ञापत्र सादर केले आसे. तरी मासल्यास रुपया चांगला उतरला असता दिकत करावयाचे प्रयोजन काय? याउपरी पेठेत वगैरे चाल देणे घेणे. कोरा रुपया टंकसालेचा चालवीत जाणे. जुना चालविला असतां गुनेगारी घेतली जाईल. याप्रो येकंदर ताकीद करून टंकसालेच्या रुपयाची चाल चालवीत जाणे. येविसी फिरोन बोभाट येऊ न देणे म्हणोन शेटे माहाजन व समस्त सावकार व वाणी उदमी कसबे कराड यांचे नावे ताकीद

पत्र

१.

ता बाळशेट सोनार सातारकर.

¶*Bajirao II writes to the Pratinidhi to desist from rejecting the Rupee coins issued from the mint at Karad by Balshet Sonar.*

No. 168] [1815-16

रु. नं. ५३९ नकलेची नकल

श्री

किले पुरंदर व वज्रगड येथील मामलत मनोहरगीर याजकडे होती त्यास ते मृत्य पावले सा त्याजकडून दूर करून साल मजकुरी दोन्ही किल्याची मामलत आपाजी भगवत याजकडे सांगितली. त्यास किले मारचे बेगमीस साल गुा सन खमस अशर मैयातैनाप्रो साल मारी गला कैली सुा सीत अशर मयातैन व आलफ. [यापुढे तपशील]

¶*Orders are issued appointing Appaji Bhagwant to the mamlat of Purandar in the place of Manohar Gir, deceased.*

No. 168-A]

श्री

यादी मोकासे माजी लोकास खेरीज तैनात

१०४८= किले पुरंधर

१०० फिरंगोजी नाईक नरसाले सरनौबत मौजे खोपवली ता। पाटस

३०० बालोजी नाईक चिव्हे मौजे देउळगाव ता। पाटस

१५० राणोजी नाईक पेटकर मौजे पडवी ता। पाटस

३० येसाजी नाईक चिव्हे मौजे देवढी ता। खेडेबारे

१०० सभाजी नाईक रामोसी मौजे साकुरडे ता। करेपठार

८४८= मालजी गायकवाड मौजे लाईम ता। निरथडी

४० नवलोजी नाईक शेलार मौजे भिवडी ता। करेपठार

८०४८=

२०० किले वजीरगड

१०० सुभानराव माहाले हवालदार मौ। बिवरी ता। सांडस

१०० आपाजी निकम सरनोबत मौजे पिसें ता। करेपठार

२००

¶*The Mokasas of the Purandar district are detailed.*

No. 169] [8-5-1817

पुणे जमाव, रु. नं. ५३५

श्रीगजानन

राजश्री बापू सावंत व गोवर्धनसिंग व महिमाजीराव सिंदे हवालदार किले पुरंदर व वज्रगड व ठाणे माची गोसावी यासी, श्री रामचंद्र चौधरी रामराम विनंती. उपरी किले मार तिन्ही ठिकाणे इंग्रजबाहादर याचे स्वाधीन करून देण्याविसी रुबरू श्रीमंत राजश्री माहाराजांची आज्ञा जाहाली, त्याजवरून हें पत्र तुम्हास लिहिलें आहे. तरी सहस्रपत्राचे जागां हें पत्र जानून हे पत्र पावताच तिन्ही ठिकाणे स्वाधीन करून द्यावी. दुसरे पत्राचा व खुणेचा आक्षेप करू नये. रा। छ २० जाखर सन सबा आशर. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Ramchandra Choudhari informs the Havaldar of Purandar of the Peshwa's orders to hand over the fort to the charge of the English.*

No. 170] [29-9-1817

पुणें जमाव, रु. नं. ५३५

श्रीगजानन

राजश्री गोपाल चिमणाजी जोगलेकर व गोवर्धनसिंग हवालदार किले पुरंदर व वज्रगड व ठाणे माची गोसावी यासी, अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो रामचंद्र चौधरी रामराम विनंती. उपरी, किले माार माचीसुद्धा तिन्ही ठिकाणें आम्हाकडे होती, ती हाली सरकारांतून माहुली मुकामी राजश्री बापू गोखले याचे स्वाधीन जकिन्यासुध्धा करावी म्हणौन रुबरू राजश्री आपाजी भगवंत शेवड्ये याजवल आज्ञा जाहाली. त्याजवरून हे पत्र लिहिले असे. तरी, सदरहू तिन्ही ठिकाणे श्रीमंत राजश्री बापू याजकडील रा। भवानराव जाधव लोकसुध्धा किल्यावर येतील त्याजला वर घेऊन त्याचे स्वाधीन जकिन्यासुध्धा तिन्ही ठिकाणे करून देऊन पावती घेणें. मोजदादीस च्यार दिवस आधिक लागतील, याजकरिता येक कारकून व दोन सिपाई ठेऊन बाकीचे लोकसुध्धा तुम्ही खाली उतरून पुण्यास निघोन येणे. मोजदादीस कारकून राहील त्याणे मोजदाद करून देऊन मोजदाद जाबता व पावती घेऊन पुण्यास येणें, म्हणौन त्यास ताकीद करावी. राा छ १७ जिलकाद सन समान आसेर मयां तैन व आलफ. मुाा पुणे. बहुत काये लिहिणे हे विनंती.

पो छ १८ माहे जिलकाद भाद्रपद वाा ५ शके १७३९ ईश्वरनाम संवछरे सन समान आसेर मयातैन.

¶*Bajirao II orders the Killedar and officers of Purandar to hand over the fort and its ordnance to Bapu Gokhale.*

No. 171] [1819?

जमाव रु. नं. १७७७.

यादी हरिभक्तपरायेण रावजीबावा गोसावी पैठणकर याजकडे संस्थानाचे खर्चास. सन १२२९ फसली बितपसील.

मूळपुरुश श्रीनिंबराज स्वामी, त्याचे पुत्र नारायेण स्वामी, त्याचे पुत्र दादोबा गोसावी याजला श्रीपंढरीचे यात्रेच्या व उत्छहाचे खर्चाकरिता श्रीशाहू राजे याणी श्वराज्य दिल्हे. त्याजवर मोगलाई प्रांत जाल्यावर श्रीमंत बालाजी बाजीराव पंतप्रधान याणी जागीर दिल्ही.

¶*Raoji Bawa Gosavi is given an allowance for the pilgrimage of Pandharpur. His saintly ancestry is mentioned in the paper.*

No. 172] [18-4-1821

पुणे जमाव रु. नं. ६९४

परगणे भिमथडी येथील मामलेदार यास हुकूम जातात त्याचे बारनिसीचे बूक.

[त्यातील उतारे]

तारीख १८ माहे आप्रल सन १८२१ इसवी तुमचे पोण्यांत गावगना सरकार डाकेचे लोक आहेत. त्यास दरसाल कागद घालावयास चांबड्याची तोस्ताने सवाहात लांबीची व त्यास तेल असे गावगना द्यावयाची चाल आहे त्यास ज्या गावी देण्याची चाल असेल त्या गावी पाटील कुलकर्णी यास ताकीद करावी की दरसाल तुम्ही डाकेकडे सामान देता त्या प्रो देत जाणे म्हणोन ताकीद करून सालाबाद प्रो चांबड्याचे वगैरे सामान देवावे म्हणोन पत्र रवाना.

ता. ४ माहे मे तुमचे परगण्यातील रस्तावरचे वगैरे गाव आहेत त्याजपासोन मुचलके सरकारात लिहोन घ्यावे की हरकोणा येकास साहेब लोकसुध्धा बेगार देऊ नये. जो वाजवी पैसा देईल त्यास मजूरदार माणसे आथवा जे लागेल ते द्यावे. बेगार असी कोणी देऊ नये. जो कोणी बेगार देईल त्याजपासोन दोन रु. दंड सरकारात घेतला जाईल. याप्रो दरोबस्त गावापासोन लिहोन घेऊन खुब ताकीद करणे जे बेगार येकंदर कोणासहि देऊं नये म्हणोन.

तारीख २९ माहे मे सन १८२१ इसवी कोली व परवारी पुरंदरकर याजकडील इनाम जमिनी व इनाम मोकासे व शेरियाची पेशवे सरकारांत जफ्ती होती ती सन १२२७ फसलीत लढाई सुरू होण्याचे वख्ती मोकली करून देऊन यादी करून दिल्ही. त्याचा दाखला दफ्तरात नाही याजकरिता इ. इ.

तारीख १३ माहे शपटेंबर सन १८२१ इसवी(पा)सोन हाल सन १२३१ फसलीत कोणी उदमी बेपारी वगैरे कोणी आफिनीची वोझी अगर किरकोल छपाऊन घेऊन जातील आगर येतील त्याची चौकसी तुम्ही खूप ठेऊन कोणी आफीन नेईल त्यास धरून त्याचे आफिनीची जफ्ती करून हुजूर लिहून पाठवणे आणि सदरहू मजकूर गावगना सेठे माहाजन पाटील कुलकर्णी यास जाहीर करणे जे आफीन घेऊन जाईल त्याची बातमी ठेऊन त्याच वेळेस त्याचा मजकूर सरकार ठाणियांत जाहीर करीत जाणे.

ता. २० माहे आक्टोबर सन १८२१ इसवी दरविला कर्नाटक प्रांती तिरपती पाहाडावर श्रीव्यकंटेशर्जीचे यात्रेस लोक येतात त्या लोकानी कानगी[१] व पूजा वगैरे दक्षणा देण्याचे व त्या लोकास बहुमान मर्यादा पोहचण्याचे असे दोन्ही कायेद्याचे हिशोब दोन नंबर पहिला व नंबर दुसरा या प्रमाणे तयार होऊन आले ते तमाम लोकास जाहीर करणे.

---

१ कानगी = नैवेद्य.

ता १४ माहे फेब्रुवारी सन १८२२ इसवी. पो मजकुरात कलालाची दुकाने दारू विकावयाची गावगना आहेत त्यास पेशवे सरकारचे आमलात जी दुकाने होती ती काईम ठेऊन कुपणी सरकारचे आमळांत ज्या गावी नवी दुकाने जाहाली असतील ती झाडून मोडून टाकावयाची ठराऊन हा हुकूम तुम्हास सादर केला असे

ता. १७ माहे मार्च सन १८२२ इसवी दरीविला पो मारी तुम्ही आजपासोन कानडे व कर्नाटक व तैलंग मदरास या मुलुकातील लोक कारकून चाकरीस ठेऊ नये. जर करिता ठेविले असे जाहिरात आलियास तुम्हास बरतर्फ केले जाईल म्हणोन.

ता १५ माहे आप्रेल सन १८२२ इसवी पो मजकुरांत गावगना वतनदार आगर हरकोणी लोकानी सरकार हुकमासिवाये दतपुत्र घेऊ नये. दरम्यान घेतल्यास तो रद करून त्याचे वतन वगैरे सरकारात घेतले जाईल [म्हणून गावगना ताकीद करणे.]

ता ७ माहे मे सन १८२२ इसवी पो मजकुरातून बंदिवान यास तुम्ही हुजूर रवाना करिता, त्यास रस्तेयात पोटास मिलत नाही, उपासी राहतात त्याचा मजकूर जाहिरात आल्यावरून तुम्हास हा हुकूम सादर केला असे. तरी फौजदारीकडे जे बंदिवान हजूर रवाना करावयाचे त्यास दररोज पैसे ६ प्रो पुण्यास पोहोचे तोपर्यंत रस्तेयात रोज लागतील त्या मानाने देत जाणे. आणि त्याचे हिशेबाची याद आलाहिदा करून पो मारचे जमाखर्च हिशेब हुजूर येतात त्यासमागमें पाठवणें. त्या प्रो येवज हुजरून रवाना केला जाईल म्हणोन पत्र.

ता १३ माहे जून सन १८२२ इसवी मौजे वागज तो करेपठार येथील मोकासा चिंतो विठल वगैरे बंधु साहाजण मिलोन आहे त्यास चिंतो विठल याचे दौलतीस कोणी मालक नाही. माधवराव हे दतविधान करून हे दत घेतले नाही म्हणोन त्रिबकराव याची स्त्री उमाबाई याणी सरकारात समजाविले. ऐशियास माधवराव दत्ताची पुरवणी करीत तोपर्यंत चिंतो विठल याचा मौजे मारचे मोकासियाचे अमलांत हिसा आहे तो जफ्त करून ऐवज अमानत ठेऊन हजूर इरसाल करणे म्हणोन पत्र.

ता. २४ माहे शपटंबर सन १८२२ इसवी सातारा येथील बंदिखान्यातून बंदिवान अडतीस आसाम्या पळाल्या त्या आसाम्या धरून द्याव्यां आणि बक्षीस द्यावे म्हणोन जाहीरनामा आला [तो जाहीर करण्याबद्दल हुकूम.]

ता. १९ माहे आगटोबर सन १८२२ इसवी. दक्षणचे बैल लाहान आणि कमकुवत यामुळे फार लागतात सबब म्हैसूरकडचे आणवून नवी उत्पत्ति करावी व बक्षीस मिळवावे या संबधी हुकूम हनराबल गौरनौर कौंसिलबहादुर याचा.

ता. १९ माहे नवंबर सन १८२२ [वरीलप्रमाणेच मजबूद घोड्याच्या निपजी-करता सरकारातून उंची वळू गावोगाव मिळतील अशासंबधी जाहीरनामा].

ता. ११ माहे आप्रेल सन १८२३ इसवी पो मारी रयत लोकाची वगैरे मुलांस गोवर्धन देवी काहाडण्याबद्दल अजम सुसराग्लीन साहेब डाकतर याजकडील कारकून आले आहेत ही खबर सर्वांस जाहीर होण्याकरता हुजूरून जाहीरनामा या पत्रात घालून पाठविला असे. तरी देखत हुकूम याच्या नकला करून दरगांवास येक येक देऊन पो मारचे झाडून गावास जलद महशूर कर्णे म्हणोन पत्र..

ता. ९ माहे मे १८२३. बैलाप्रमाणेंच गाईच्या चांगल्या निपजीकरतां सरकारातून म्हैसुरी गाई विकावयाच्या आहेत त्यासंबधी जाहीरनामा.

ता। १४ माहे जून सन १८२३ इसवी पो मजकुरांत गावगना रयत लोक व हर-कोणी लोक वाघ मारतात त्या वाघाचे दोन्ही कान कापून त्याणी ते कान तुम्हापासी आणोन हजर करावे आणि तुम्ही ते कान घेऊन वाघ लाहान अगर थोर जसा ज्या प्रतीचा वाघ असेल त्याची चौकसी करून ते कान व ज्याणे वाघ मारला याचे नांव व त्यास बक्षीस देण्याबद्दल तुम्ही सरकारात अर्जी लिहून कान हुजूर या म्हणजे ... बक्षिस पैसा रोख तुम्हाकडे पाठविला जाईल ... ज्याणे वाघ मारला असेल त्याचे हातावर ठेवून पावती घेऊन हुजूर पाठवीत जाणे म्हणोन पत्र.

ता। ८ माहे जुलई सन १८२३ इसवी. दरविला पुण्यात इस्पितळ डाकतर साहेब म्हणजे वैद्य याणी आजारी लोक आसतील त्यास मुफत दवा द्यावा येविसी तमाम लोकांस कळावयाकरितां जाहीरनामा सरकारातून केला तो या पत्रात घालून तुम्हाकडे पाठविला आहे, [गावोगाव वाचून दाखविणें म्हणून].

¶*Copies of miscellaneous orders of the early British regime—during the period from 18th April 1821 to 8th July 1823*

No. 173] [*16-7-1821*

श्री

यादी ६..................................मास आषाढ वद्य द्वितीया सोमवार दीडप्रहर दिवसां त्याजी बाजी मोहिते याणी पाच साहा आसामी वरभाऊ मिलोन तरवाराबंदुखा-

5017

सह लेश होऊन वाड्यात सिरोन दरवाजा लाऊन देवीच्या सोप्यात राज्यावर गर्दी केली. जवल कोण्ही नव्हते. दोन भोसले मात्र होते, त्याची नावे भुजंगराव भोसले व आबाजी भोसले होते. ते पुढे आडवे जाहाले त्यास तरवारेचे वार मोहिते याणी करून ठार मारिले. त्या गीर्दीत मोहिते मंडली पो येक आसामीनी पिस्तुलाचा बार राज्याचे उजवे बरगडीत केला. ती गोली डावे बरगडीत राहिली. त्याणी काहिल होऊन पडले. त्यास मोहिते मशारनिले घेऊन बसले. वाड्यात गर्दी जाहली, हे वर्तमान भाऊ माहाराजास कलले. त्याजवरून ते वाड्याजवल गेले तो दरवाजा लागला होता. तेव्हा त्यासी बोलणे केले की तुमचे काय असेल ते सांगावे, त्याजवरून मोहिते मार याचे बोलणे पडले जे, आमचे येकोणतीस हजार रुपये तलब भरून द्यावी व आम्हास कोण्ही दरम्यान देऊन पार करून द्यावे. त्याजवरून भाऊ माहाराज याणी आपलेकडील कारकून सदासिव आनंत बराबर देऊन पार करून दिल्हे. इकडे माहाराज यास बाहेर काढिले, ते भाऊ माहाराज याचे घरी च्यार घट्का बसून नंतर किल्याबाहेर गेले. वाड्यात गेले तेच दिवसी साहा घटका रात्री सोमवारी द्वितीयेस काल जाला. याचे कारण मंत्री यास गाव इनाम होता तो थोरले माहाराज यांचे वडील याणी जफ्त करून मोहिते यास दिल्हा होता. त्याची विनंती मंत्री याणी या माहाराजास राज्याभिषेक जाला ते समई केली की आमचा गाव आम्हास द्यावा. याजवरून सरकारातून गावाची जफ्ती केली त्याची मोकलीक करून घ्यावी म्हणोन मोहिते बोलत होते. सरकारांतून उत्तर जाले जे, तूर्त मोकलीक व्हावयाची नाही. त्याजवरून मोहिते मारनिले याणी दगा केला. शक १७४३ आषाढ वद्य द्वितीया सोमवार सन इसने आशरीन छ १९ शवाल मुा तारीख १६ जुलई सन १८२१ इसवी.

¶*An account of the assassination of King Sambhaji II of Kolhapur by Sayaji Mohite, is narrated in the paper.*

No. 174] [*4-11-1822*

रु. नं. १६५९

श्री

कैफियेत केशव खंडेराव सुा सलास अशरीन मयातैन व अलफ. श्रीमंत कैलासवासी बालाजी बाजीराव प्रधान यानी गावगना जमीन येक चावर दाहा बिघे इनाम देऊन श्रीमंत कैलासवासी शाहू माहाराज छत्रपति यांस विनती करून सदरहू जमीनीचे राजपत्र राजशक ७२ क्रोधननाम ...

छ २१ रमजान सुा सीत आर्बैन मया अलफचे सालाचे करून दिल्हे, त्यापासून जमीन आपणाकडे सुरलीत चालत आहे. सदरहू राजपत्र आमचे आज्याचे नावाचे आहे ते दाखऊन त्याची नकल करून दफ्तरात दिल्ही आहे. संपादक पुरुस गोविंद मल्हार व रामाजी मल्हार याची वशावल

गोविंद मल्हार	रामाजी मल्हार
१	१
यासी पुत्र धोंडो गोविंद यास पुत्र	यासी पुत्र.
ाही नकल	१ खंडेराव राम
	१ बलवंतराव राम
	१ गंगाधर राम
	३
	खंडेराव राम यास पुत्र
	१ गोपाल खंडेराव वर्षे ६६
	१ केशव खंडेराव वर्षे ६० ..... आहेत
	बलवंतराव राम यास पुत्र
	१ गंगाधर बलाल वर्षे ४५
	१ मैराल बलाल वर्षे ४०
	२ हाली आहेत
	गंगाधर राम यास पुत्र वामनराव गंगाधर हाली आहेत वर्षे २०

सदरहू प्रो वंशावल व कैफियत लिहून दिल्ही आहे ती खरी आहे. सर्व भाऊबद विभक्त आहो. जमीनीची वहिवाट आम्ही सर्वत्र येकत्रटपणानी करीत आहो. याखेरीज राजपत्रे व पेशवे सरकारच्या सनदा व जमिनीचा चकनामा होता, परंतु बहुता वर्षाची व्यवस्था याजमुले ठिकाण लागत नाही. येक राजपत्र आम्हाजवल होते हे आणून दाखविले. मिा आश्विन वा ६ शके १७४४ चित्रभानु नाम सवत्सरे हस्ताक्षर केशव खंडेराव

[सनदेतील विशेष गोष्टी]

'रा। गोविंद मल्हार व रामाजी मल्हार प्रभू चेऊलकर'

'इनाम पड जमीन चावर

ता। हवेली पां। पुणेपैकी जमीन चावर येक पड जमीन
·।।· मौजे हडपसर पैकी जमीन बिघे साठ येकून चावर नि।।
·।।· मौजे राहाटणीपैकी जमीन बिघे साठ येकून चावर नि।।

१

८१० मौजे भाजे ता। नाने मावल प्रांत मावले प्रांत मावले पैकी पड जमीन दुफसली जमीन दाहा बिघे

'रामाजी मल्हार चिटणीस याजकडे इनाम राजपत्री'

¶*This paper gives names of certain members of the family of Ramaji Malhar, Chitnis of the Peshwas*

No. 175] [*1822*

सदरहू आठ पत्रे दिल्ही त्याप्रो इनाम दिल्ह्यापासून आजपर्यंत निर्वेध उपभोग आम्ही करीत आहों
संपादिल्यापासून वंशावळ

कृष्णंभट बिन देवभट याचे सहोदर बंधुसुद्धा
१ खुद कृष्णभट
१ गणेशभट
१ श्रीधरभट
१ रामभट

भिकंभट व बहिरवभट बिन वामन भट सहोदर बंधुसुद्धा
१ भिकंभट खुद
१ खुद बहिरभट
१ विष्णुभट

३

तपशील
कृष्णंभट बिन देवभट याचा वंश
१ वडील पुत्र गंगाधर भट यास पुत्र

तपसील
भिकंभट बिन वामनभट याचा वंश यास पुत्र वामन दीक्षित यास पुत्र सदाशिव दीक्षित यास पुत्र यांचे

१ वासुदेव भट याचे नकल
१ वीरेश्वर भट दुसरे पुत्र

३

गंगाधरभट बिन वीरेश्वर भट उपभोग करीत आहो. उंबर वर्ष १०

१ दुसरे पुत्र बापूभट यास पुत्र वडील वैजनाथ भट उपभोग करीत आहो उंबर ४८

१ दुसरे पुत्र कृष्णंभट उपभोग करीत आहे उंबर ४२

कृष्णंभट बिन देवभट याचा वंश
गणेश भट बिन देवभट याचा वंश

१ वडील रघुनाथभट यास पुत्र
१ गोपीनाथ भट वडील पुत्र
१ बचंभट दुसरे पुत्र

२

यास पुत्र

१ गणेशभट बिन गोपीनाथ भट उपभोग करीत आहो उंबर वर्षे ३५

१ मोरभट बिन बचंभट उपभोग करीत आहे. उमर वर्षे २२

२

१ दुसरे लक्ष्मणभट यास पुत्र

१ वामनभट उपभोग करीत आहो उंबर वर्ष ४५

१ विनायकभट उपभोग करीत आहो उंबर वर्ष ४०

१ नीलकंठ भट यास पुत्र सिधेश्वर भट उंबर वर्ष १८

३

१ वडील भास्कर दीक्षित यास पुत्र

१ गोपाळ दीक्षित वडील पुत्र उपभोग करीत आहो उंबर वर्षे ३०

१ दुसरे नारायण दीक्षित उपभोग करीत आहो उंबर वर्षे १३

२

१ दुसरे पुत्र पांडुरंग दीक्षित उपभोग करीत आहो उंबर वर्षे ६२

१ तिसरे पुत्र यज्ञेश्वर दीक्षित यास पुत्र लक्ष्मण दिक्षित उपभोग करीत आहो उंबर वर्षे ३१

१ चौथे पुत्र बालकृष्ण दीक्षित यास पुत्र तीन

१ वडील सदाशिव दीक्षित यास पुत्र

१ विष्णु दीक्षित उंबर १२
१ रामचंद्र दीक्षित उंबर ९
१ बाळकृष्ण दीक्षित उंबर ७ उपभोग करीत आहो

३

१ दुसरे मोरेश्वर दीक्षित उपभोग करीत आहो उंबर १९

१ तिसरे कासीनाथ दीक्षित उपभोग करीत आहो उंबर वर्षे १६

३

गणेशभट बिन देवभट याचा वंश

श्रीधरभट बिन देवभट याचा वंश

१ वडीलपुत्र नारायणभट याचे पुत्र बलवंतराव बिन नारायण भट उपभोग करीत आहो उंबर वर्षे ६७

१ दुसरे हारभट यांची नकल

१ तीसरे जनार्दन यास पुत्र दिनकर भट बिन जनार्दन भट उपभोग करीत आहे उंबर वर्ष ४०

श्रीधर भट यांचा वंश

रामभट बिन देवभट यास पुत्र नारायणभट यास पुत्र बालंभट बिन नारायण भट. पुढें वंश नाही.

बालंभट याची स्त्री जयाबाई याणी आपला हिस्सा श्रीदेवलक्ष्मीनारायण यास दिल्हा तो उपभोग देव करीत आहे. अलाहिदा दानपत्र देवाचे नावे करून दिल्हे. त्याप्रो चालत आहे.

१ पाचवे पुत्र चिंतामण दीक्षित उपभोग करीत आहो उंबर वर्षे ४९

१ भिकंभट बिन वामनभट यांचा वंश

१ बहिरंभट बिन वामनभट यांचा वंश

१ विष्णुभट बिन वामनभट यांचा वंश

० धोंडभट वडील पुत्र यास पुत्र मोरभट यास पुत्र नाही. दुसरे पुत्र बालंभट उपभोग करीत आहो उंबर वर्ष ८९ विष्णुभट यांचा वंश भिकंभट व बहिरंभट बिन वामनभट यांचा वंश

१ अनंत भट बिन साडूभट याचा वंश नाही.

¶*This is a genealogy of the Karve family—the household priests of the Peshwas.*

No. 176] [*24-5-1834*

पुणें जमाव, रु. नं ९३९.] नकल

श्री

यादी समस्त जोसी पुरंदरे व पुजारी देवस्थान किले पुरंदर सन १२४३ फसली. किले मजकूर येथे बालेकिल्यावर श्रीमारुती स्वयंभू प्राचीनचा आहे. त्यास सरकारची नेमणूकहि आहे. हाली चालती. यैसे आसोन हाली साहेब लोक पुण्याहून राहावयास किल्यावर आले आहेत. त्याणी अंबरखाने फोडून राहावयास जागा केल्या आहेत. त्यास, येक अंबरखाना मारुतीजवल आहे. तो फोडून जागा करितात. याजकरिता नायेब जेमादार गोपालराव जाधव यास बोलाऊन

नेऊन सांगितलें की, मारुती येथून काढून टाकावा. नंतर जमादार याणी उतर केले की, मारुतीस नेमणूक सरकारी आहे आणि पूजा पुजारी करितात. त्यास, हे त्यास पुसावे. त्याणी सांगितले की, पुजारी पाा देणे. नंतर जमादार याणी आम्हास त्याजकडे पाा दिल्हे. आमचे व त्याचे बहुत प्रकारे बोलणे जाले; परंतु मानीत नाहीत. आग्रह करून देव काढू म्हणतात. याजकरिता साहेब मेहेरबान होऊन आमचे देवास ढका न लागे आणि उपद्रव नव्हे यैसे जाले पाहिजे.

ही याद लिाा सही मिाा वैशाख वाा २ शके १७५६. ता २४ मे सन १८३४ इसवी.

सही

१ मैराळ जगन्नाथ पुरंदरे दाा त्रिंबक मल्हार पुरंदरे.	१ येमाजी बिन धोंडजी खिरसागर गुरव दाा त्रिंबक मल्हार.
१ गणेश श्रीपत पुरंदरे दाा खुद.	१ जोगू बिन राघोजी खिरसागर गुरव दाा त्रिंबक मल्हार पुरंदरे.
१ त्रिंबक मल्हार पुरंदरे दाा खुद.	

¶*The priests, Joshis and Purandares in charge of the temple of Maruti at the fort of Purandhar pray to the British authorities to prevent any white men from insisting on the removal of the idol.*

No. 177] *[1827-28*

रु. नं. १६९८.

श्री

असल याद दफ्तरी आहे त्याची नकल असे

यादी सरकार श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति स्वामी याचे पाटिलकीचे वतन ताा पाटस प्रांत पुणे येथे मौजे देऊळगांवचे दरोबस्त व मौजे सिरापूर व मौजे वडगाव येथील निमेचे आहे. त्याचे उत्पन्नाची वहिवाट गुमस्ते याणे करावयाची ती सुाा समान अशरीन मया तैन अल्फ कलमें

१ इनाम जमीन	चावर
१। माजे देऊळगावपैकी	
·॥· मोज सिरापूर	चावर १
पौ वजा निमे तक्षिमदार नागपूरकर भोसले	चावर ·॥·
बाकी	चावर
·॥· मौजे वडगांव	चावर १
पौ निमे ताक्षिमदार दरेकर चावर ·॥·	
बाकी	चावर

[वगैरे वगैरे]

¶*A list of inam lands possessed by the Bhonsles who were Patils of Deulgaum and Sirapur.*

No. 178] [22-4-1828

नकल

श्री

इकरार सिदाजा बिन मुकाजी भिताडे जात कुणबी कसब सेत करावयाचे राहणार भिवडी ताा कऱ्हेपठार उमर वर्षे ३० मी सेसन कोडतासमोर कसम करून सत्य सांगतो की, उमाजी रामोसी हा आमचे गावचा. हा बंड करू लागल्यावर सुमारे दोन वर्षे जाहाली. आमचे घरीं येतजात असे. तेव्हां फतू ताबोली आम्हापासी म्हणो लागला की धोंडोपंत बाबा हजार रुपये मागतात असे तुक्या रामोसी याजकडे सांगावे. नंतर दोन तीन रोजानी सूर्य पर्वतावर गेला तेथे तुक्या रामोसी व विठोजी रामोसी होते तेव्हा उमाजी रामोसी जवल बसला होता आणि विठूने माहांकालाचे खालीं पाचसे रुपये माझे पदरी मोजून घातले ते मी घेऊन आपले घरी आणून गुराचे गोठ्यात पुरून ठेविले. नंतर दुसरे दिवसी फतू तांबोली सासवडास गेला होता तो आला, दुपारचा आला. आणि मला पुसले की तुम्हास काम सांगितले त्याचे काय जाहाले. तेव्हा आम्ही त्यास निमे काम जाहाले म्हणोन सांगोन तेच दिवसी फतू व मी रुपये मी+ आपले जवळ घेऊन पुणियास आलो. तेव्हा दोन घटका दिवस होता. बोंबिल विकतात तेथे फतू राहातो त्याचे तेथे उतरलो. त्याणे आम्हास सांगितले की साहा घटका रात्र जाहाल्यावर जाऊ असे फतू बोलला. नंतर पाचसहा घटिका रात्रीस मी व फतू असे धोंडोपंतबाबाचे घरी माडीवर गेला. तेथे बाबा उभे राहिले होते, तेव्हा त्याणी आम्हास माडीवर घेऊन वर गेले. त्यावेली माडीवर जाऊन धोंडोपंतबाबा याचेपुढे रुपये ओतून फत्याबाने फाळ्या लावून धोंडोपतबाबाचे पदरी घातले. त्यापैकी २५ रुपये फत्याबास पाचशापैकी परत दिल्हे. त्या २५ पैकी फत्याबाने मला १० रुपये दिल्हे. नंतर दुसरे दिवसी फत्याबा पेठेस पुरंदरास गेला व मी आपले घरी भिवडीस गेलो आणि दोन तीन रोजानी उमाजीस आम्ही बातमी कलविली की तुम्ही सांगितल्यांप्राो तुमची कामगिरी केली.

कैदी धोंडोपत याचा सवाल :—तुम्ही आला तेव्हा मी. कोणत्या दारावर उभा होतो.

जबाब :—या गोष्टीस दोन वर्षे झाली. आम्ही फतूचे बरोबर सहा घटका रात्रीस गेलो होतो. मी पुण्याचा राहणार नव्हे, मजला काही स्मरण राहिले नाही.

कैदी धोंडोपत याचा सवाल :—तुम्ही आमचे घरी आला तेव्हा आमचे दरवाज्यावर कोणी सिपाई वगैरे होता की नाही ?

+ अनवश्यक.

जबाब :—दरवाज्यावर माणसे वगैरे असतील परंतु आम्ही स्मरण ठेविले नाही.

ही जबानी लिहून दिल्ही सई ता। २२ अप्रेल सन १८२८ इसवी, निा नांगर

Taken and sworn to before me this 22nd April 1828. Signature of John A. Dunlop, Sessions Judge

---

असल बा। नकल रुजू
घोलणार नारो राम भावे
कारकून अदालत पुणे

सई श्रीधर लक्ष्मण शिरस्तेदार
(खालीं इंग्रजी सही लागत नाहीं)

¶*Evidence given by Sidoji Bhintade in the affair of Umaji Naik Ramoshi on 22nd April 1828.*

No. 179] [*7-5-1828*

रु. नं. ४२० नकल

श्री

सरकार दौलतमदार इग्रजबहादूर रिच्यार्ड मिलसाहेब बाहादूर अगटिंग कलकटर सुभा पुणे याणी

बइस्म अर्जुना व मारुती व मल्ह बिन कोंडाजी येबिन भवानजी आडनाव साबले जात कोली वस्ती मजरे चिव्ह्याची वाडी घेरा किले पुरंदर सुा। समान अशरीन मया तैन व अलफ सन १२३१ फसली शके १७५० सर्वधारी नाम संवत्सरे तुम्ही त्रिवर्ग बंधूनी हुजूर पुणे मुकामी येऊन अर्ज केला की आमचा बाप कोडाजी साबला व आणखी कोली हे बंडाचे बातमविर होते. सबब बंडकरी याणी मजरे बहीरवाडी येथे चालून येऊन लढाई केली. त्यांत कोडाजी मजकूर याजला तरवारेच्या जखमा लागल्या. त्या जखमा बऱ्या न होता पुणे मुकामी इसपितलात मयत जाहला. आम्ही तिघे भाऊ लाहान पोरे आहोत. आमचा गुजारा चालावयाकरिता खावंदानी सर्फराज होऊन आम्हास कांही नूतन इनाम जमीन करून दिल्ही पाहिजे

जाणिजे ब तारीख ७ माहे मे सन १८२८

¶*Arjuna and Maruti Sable appeal to Mr. Mill, Acting Collector, for the grant of some inam lands in return for their deceased father's services.*

No. 180] [9-2-1830

रावसाहेब मुषफ़क मेहेर बकर्म फर्माये
दोस्ता विठलराव दिवाणजी सलामत.

७ आजी सौ मेजर जरनेल सर ज्यान मालकम साहेब बाहादूर गौरनर जंजिरे मुंबई. सलाम बादज सलाम खरयतेस अज्याम अके दरिविला सवंत १८९८ चे सालापासून आजपावेतो आठावीस वर्षे तुम्ही गायकवाड सरकारची चाकरी चांगले तऱ्हेने केली व गायकवाड सरकारचे माहाल काठेवाडात आहेत त्याची आबादी चांगली केली. त्यामुळें गायेकवाड सरकारास पेदास्तहि आधिक जाहाली व काठेवाडचे जमीदार यास जी सुकडी मिलत होती व काठे लोकापासून कितीयेक गांव खरेदी केले, ते कर्णेल वाकर साहेब याचे बंदोबस्तात गायकवाड सरकारांत दाखल केले आहेत. त्याजवरून गायकवाड सरकारास ऐसी हजार रुपये दरसाल नफा जाहाला. व गायकवाड सरकारानी जी कामे तुम्हावर ठेविली ती तुम्ही कसी केली व गायकवाड सरकारची चाकरी जी तुम्ही केली व त्याचे आबरूवर निगा ठेवीत होता, ते इंग्रजी सरकारास जाहीर आहे. कर्णेल वाकर साहेब व त्याचे मागे जे रिसिदिंट होते व काठेवाडांत जे इंग्रजी सरदार होते ते तुमची तारीफ करितात. व सिपारसीचे कागदहि त्याणी तुम्हास दिल्हे आहेत. हली फार नाजूक काम पडले होते. त्या वेलेस तुम्ही दोहो सरकारचे फायद्याकरितां जी तुम्ही चाकरी व मेहनत केली त्याजवर व तुमचे चालीवर नजर ठेऊन तुम्हास हुर्मत व कारभार व नेमणूक मिळाली आहे. ती नेमणूक तुमचे मर्तब्याप्रमाणे व दुसरे कारभारी यास मिळाले आहे त्याप्रमाणे आहे. ती तुम्हास मुकरर करून द्यावी आणि ती नेमणूक इंग्रजी सरकारचे बहीदारीने वंशपरंपरेने मिळावी असा इरादा आहे. गायकवाड सरकारांतून तारीख ३१ आगष्ट सन १८२१ या तेरखेस तुम्हास नेमणूक करून दिल्ही. त्याविसी येक सनद व याद तुम्हास मिळाली आहे. व त्यापुढे तारीख १२ आप्रिल सन १८२७ या रोजी इजाफा करून दुसरी सनद करून दिल्ही आहे. परंतु त्याविसी गायकवाड सरकारची यकत्यार ती महकूब करतील तर होतो त्याप्रमाणे त्याणी महकूब केली आहे. परंतु पहिली नेमणूक व जिलिबीकरितां रुपये २६५३ दोन हजार साहासे त्रेपन इंग्रजी सरकारची बाहीदारीने सनद आहे त्याप्रमाणे व येक पागा पासष्ट स्वाराची सन १८०२ चे साली तुम्हास दिल्ही होती. पुढें तुम्ही मल्हारराव गायकवाड याचे फौजसी लढाई केली व चाकरी चांगली केली. सबब कर्णेल वाकर साहेब याचे मार्फतीने सन १८०९ चे साली त्या पागेचे पहिले व जाजती मिलोन येकसे दाहा स्वार केले आहेत,

त्यास ती पागा तुम्हास जसी आहे तसी मुकरार करून दिल्ही आहे. त्यास नेमणूक व पागेचे खर्चास जे गांव हाली आहेत व नख्त मिलत आहे त्यास इंग्रेजी सरकारास जरूर पडेल तर ते गांव व दुसरे नेमून देतील. नख्त पावते त्याचे ऐवजी गांव देतिल, परंतु मोबदला जाहाल्याने तुमचे व तुमचे आवलादीचे काही नुकसान होणार नाही. कृष्णराव विठल यास तुम्ही दत घेतलें ते सयाजीराव महाराज याचे मंजुरीने व्हावयाचे होते. परंतु त्यांचे चालीवरून ते मंजूर करितील असी उमेद नाही व त्यास आम्ही पुसणेहि मुनासब नाही. याकरिता तुमचें अहवालावर व तुमचे उमरीवर नजर करून वाजवी इनसाफाने माळूम होत आहे कीं दताविसी कांहीं शका राहू देणे मुनासब नाही. याकरिता इंग्रजी सरकारांतून कृष्णराव विठल जो तुम्ही दत घेतला ते कबूल करून मुकरर केले आहेत. परंतु दतकाविसी गायकवाड सरकार व इंग्रेजी सरकारांत तुम्ही नजर देऊ नये. इंग्रजी सरकारावर बरदास्तीविसी व मेहेरबानगीविसी जसा तुमचा दावा आहे त्याप्रमाणें कृष्णराव विठल याचा व त्याचे आवलादीचा हाल असे तुम्ही समजावे. काठेवाडांत तुमचा कितीक जमिनीवर व गांवावर दावा आहे तो आम्ही काठेवाडांत जात आहो. वाजबी चौकसीने मुकरार होईल. रवाना तारीख ९ माहे फेब्रुवारी सन (पुढे फाटले आहे)

माल्कम साहेबाची सही इंग्रजी असे.

¶*Sir John Malcolm, the Governor of Bombay, grants an inam to Vithalrao Divanji in recognition of his services to both the Gaikwad and the British Residents at Baroda and confirms the adoption of a son by him.*

No. 181] [*7-11-1843*

श्री

यादी माधवराव बिन हनवंतराव बारवकर पाटील मौजे लोणी प्रा सुपे सुा सन १२५२ फसली याद लिहून दिल्ही ऐसीजे. श्रीमंत माधवराव बलाल पेशवे याणी आमचे आजे वीरसिंगराव बारवकर याणी सोनपतपानपतचे लडाईत कामकाजा करून सरकार उपयोगी पडले म्हणोन जातीचे तैनातीस सरंजाम दिला. * *

[पुढील तपसील गाळला आहे]

¶*Madhavrao Hanvantrao Baravker submits that his grand-father was granted a Saranjam by the Peshwa Madhavrao I for his services at Panipat.*

No. 182] [*1847-48*

नकल

श्री

यादी कैलासवासी श्रीमंत माधवराव साहेब याचा जन्म किले पुरधर येथे जाला, ते समई समस्त किलेकरी कोली व रामोसी व परवारी व कारकून लोक यासी

दाह चावर जमीन दिल्ही ती मौजेवार सुा समान अर्बैन मयातैन व अलफ सन १२९७ फसली चावर बिघेवार बीा [तपसील]

¶*Inams granted to certain individuals at Purandar on the occasion of the birth of the Peshwa Madhavrao II.*

No. 183] [*20-3-1685*

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ११ रक्ताक्षिनाम संवछरे फालगुन बहुल येकादसी भृगुवासरे राजश्री बाबाजी लानदेऊ देशाधिकारी व लेखक प्रात पुणे यासी राजाज्ञा यैसीजे. मोरो विठल देशकुलकर्णी पाा मजकूर हुजूर येऊनु विदित केलें की कारकीर्दी राजश्री महाराजसाहेब व कारकीर्दि राजश्री कैलासवासी साहेब त्याचे कारकीर्दीस देसमुख व देसकुलकर्णी परगणे मजकूर यांचा हक व इनामती दुमाले करून दिवाणांत इनामती खडणीची मोईन होनु पाा ४०० च्यारसें, निसबत देसमुख होनु ३०५ निसबत देसकुलकर्णी होनु ९५ येकूण होनु पाा च्यारसें घेत असेत. हकाचे व इनामतीचे दस्त कमतर पडिले तरी सदरहू च्यारसे होनु जाबक व इनामती दस्त होईल त्याजवरी वाटून दस्त माफीक इनामती खडणीची जे बेरीज बैसेल ते देसमुखाचे निसबतीनें देसमुखापासुनु घेत असेत; व देसकुलकर्णी याचे निसबतीने जे बेरीज बैसत असेल ते देसकुलकर्णीयापासुनु घेत असेत. येणेप्रमाणें अजीतागायेत चालत आले आहे. हलीं परगणे मजकूर खराब पडिले आहे. दस्त थोडका होत आहे, तरी स्वामीनें कृपाळु होऊनु दस्त माफीक इनामती खंडणी देसमुखाची देसमुखापासनु व देसकुलकर्णीयाची देसकुलकर्णीयापासुनु घेतली पाहिजे. म्हणून अर्ज केला तो मनास आणून तुम्हास आज्ञा केली असे. तरी कारकिर्दी महाराज साहेब व कारकिर्दी राजश्री कैलासवासी साहेब त्याचे कारकिर्दीस देसमुख व देशकुलकर्णीयांचा हक व इनामती दुमाले करून इनामती खडणीची मोईन होनु पाना ४०० च्यारसें निा देसमुख ३०५ तीनसें पाच निा देसकुलकर्णी होनु पाा ९५ पंच्याणव येकूण होनु पाा च्यारसें घेत अस ते हकाचे इनामतीचे दस्त कमतर पडलें तरी सदरहू होनु च्यारसे जाहला व इनामती दस्त होईल त्याजवरी वाटून दस्ते माफिक इनामती खडणीची बेरीज बैसेल ते देसमुखाचे निसबतीने देसमुखापासून घेत जाणे. देसकुलकर्णी याचे निसबतीनें बैसेल ते देसकुलकर्णीयापासुनु घेत जाणे. हर दरसाल ताजा सनदेचा उजूर करीत नव जाणे. तालिक घेऊनु असल देसकुलकर्णीयाजवली फिराऊन देणे.

जाणिजे. देसाई व देसकुलकर्णी याचा हक व इनामती दुमाला करून दिवाणातं इनामती खंडणीची मोईन च्यारसें होन पाा घेत आहेत ये बाबे महाराज साहेबाची आज्ञापत्रे व राजश्री कैलासवासी साहेबाची पत्रे आहेत. ते रूजू घालून सदरहू लिहिलेप्रमाणे वर्तनूक करणे. राा छ २४ रबिलाखर. सुहर सन खमस समानीन अलफ निदेश समक्ष

रुजू सुरू सुद बार

This is a decision given by King Sambhaji in a dispute about the payment to be made to Government by the Deshmukh and Deshkulakarni of Poona for the Vatans that they enjoyed.

No. 184] [*7-12-1685*

कर्नाटक जमाव रु. नं. १९८९ नकल

श्रीराम

॥ऽ मशहूरल अनाम राजमान राजश्री तिमाजी नीलकंठ व तिमाजी बालाजी व देशकुलकर्णी याणी पाा हुकेरी गोा रामचंद्र नीलकंठ नमस्कार सुहूर सन सीत समानीन अलफ. रौा[1] मुराररराऊ व तुम्ही देसाई याचे हेजिब हुजूर आमचे भेटीस कुडालीचे मोा आले होते, ते आपले वृती-वतनाचे वर्तमान कितेक सांगितले त्यावरून विदित जाले. देसाई व देशकुलकर्णी यांचे वतनाचे दुमाला पत्रे करून दिल्ही. तेणेच प्रमाणे आलाहिदा मुराररराऊ देशकुलकर्णी पाा मजकूर याचे नावे अभयपत्र व सुभा दुमाला पत्रे व देसाई यास आज्ञापत्र दिधली आहेत, तेणेप्रमाणे वर्तणूक करितील. हली मुराररायास राजश्री वैकुंठवासी स्वामीने वस्त्रे व बकसीस दिल्ही होती, तेण्हेप्रमाणे आम्हीहि कृपाळु होऊन वस्त्रे व बकसीसे देऊन याचे खासा ज्या रिकाबीचे इनामत चावराना आहेत ते कुली दुमाला करून आज्ञा देऊन विलातीस पाठविले आहेत. तुम्ही व मुराररराऊ येकदील होऊन दिवाण शेवावरी तत्पर असणे व हेजीब ज्या रिकाबीचे इनाम याचे खासा आलाहिदा तुम्हाखेरीज आहे, त्यास तुम्हास समध नाही. पेशअजी इस्तकबिल तुमचे व त्याचे वडिलापासून कारकीर्द येदीलशाही व साल गुाा सन खमस ताा तुम्हास तकसीम चालिली नाही. पेस्तरहि ज्या रिकाबीचे इनामतीस तुम्हास

---

१ याठिकाणीं रामचंद्र निळकंठाचा शिका.

तकसिमेस येकंदर निसबत नाही. हे इनाम आलाहिदा फर्मानी मुरारराचे आहे. याचे कार्यभागास व इनामतीस हरकत करून इस्कील कराल म्हणजे तुम्हास ताकीद होईल. एकंदर इनामतीचे वाटे नव जाणे. सदरहू लिहिलेप्रमाणे वर्तणूक करणे. छ २० मोहरम पा हुजूर. लेखन सीमा.

¶*Ramchandra Nilkanth in this paper communicates Sambhaji's decision confirming the orders passed by Shivaji, calling upon Timaji Balaji to desist from encroaching upon the rights of Murarrao. Ramchandrapant was in the employ of Sambhaji at Kudal at this time.*

No. 185] [*30-9-1689*

एजंट रु. १९

(आरंभीं तीन बंद मजकूर फारसी)

सुरत मजलसी अज करार बतारीख २९ शहर जिल्हेज सन ३३ जुलूस वाला मुकाम लस्कर जफर असर[१] मौजे तुळापूर दर किनारे लबी आब भिवरा[२] वाके अस्त बहुजूर शरयेत व फजिलतपन्हा हजरत काजी महमद परगणे पुणा व जमी मुसलमानां व जमीदारां सरकार जुनर सुबे खोजिस्तेबुनियाद करजवणे व पायेगुडे देसमुखानी व मोकदमानी व रयांआ व पटवारीयांनी तरफ कर्याती मावळ मुतालीके पा मजकूर इजाहार साख्त कीं देसपांडेगिरी तरफ मजबूर अज कदीमलयाम अहद मुदती जद लालाणीयां दोन पनामी(?) बुनियाद कुरसी व दर कुरसी पिढी व दर पिढी पदरांनी पिसर बनाम रामाजी विठल अज अहद बारीद वालीबल देहोदर मुतसरफ[३] असतां बाद फौते रामाजी विठल पिसरांनी बनाम तान्हाजी राम अज अहूदे देशपांडेगिरी खुद ता अहद निजामनमुळूक मुतसरफ असे तरफ मजकुरीं गपचूप नामे गुमास्ते ठेविले असतां बनाम कृस्णाजी व विठावा लांडा सेकीन सर्जापूर व कलंबे व इडमीडें पाईन किले वैराटगडी तरफ वंदन देस पा कर्‍हाड येथून दोघे भाऊ बमये काबिला मुसाफीरपणे येऊनु दर कसबे पुणां सुखवस्ती राहिले. कृस्णाजी व विठावा लांडीयाने आपली मुले तान्हाजी राम देसपांडे पा मा यांचे दफ्तरी शागरीदपणे लेहो घेतली. आज कृस्णाजी तुपी सर बनाम बालाजी व नामाजी व अज विठोजी येक पिसर नरसावा हुनरनिवीसीदगी मस्तुद होवयाबदल लिहीत असतां सदरहू तिघे मुलेपैकी विठावाचा मूल नरसावा ठकारांनी मौजे डोणजे व मौजे गोन्हे खुर्द कर्याती मजकूर पांच कुडीवीने

---

१ जफर असर = whom victory follows.

२ दर किनारे लबे आब भिवरा = on the bank of the river Bhima.

३ मुतसरफ = possessing.

कुलकर्णावरी गुमस्ता ठेविला. कृस्णाजीचा धाकटा लेक बनाम नामाजी लांडा लिहिणार सरंदाज देखोन देसी गुमास्ते गपचूप अज तगीर करून नामाजी लांडियास गुमास्तगिरी देऊन कर्याती मजकुरास पाठविला असतां हकलाजिमा व सिरस्ता कागद तान्हाजी राम देसपांडिये व पिसरानी मोरो तानदेऊ देसपांडिये व नामाजी लांडा गुमास्ता हैयात बल जाईल बाईल फौत गुदरोन गेले बाजद चंद्रोज फर्जंदानी नामाजी गुमास्ते ब इसीम आपाजी तुपावा अंतावा यादव रंगावा सदरहू दर सरकार सिवाजी भोसले नौकर शुद यादो नामदेऊ ममलकतमदारूलमाहामी दिवाण संभाजी राजे भोसले दीगर बिराजरांनी आपाजी व अंताजी हर कारबार मुलुकगिरी व लस्कर गई मामले करून बख्तावर होऊन आपले वतन म्हणऊन जोरावारी करू लागले. दिगर हिमाती निलो सोनदेऊ आज दिवाण सिवाजी राजे भोसले यांचे सगे सोयरे सदरहू अमेला[1] फैला असतां दिलीहून पातशाही फौजा दक्षणेतरी मोहीमदारी साब नवाब उमदतुलमुलुक अमीरलउमराये दर कसबे पुणा दाखल सात रीकेबे[2] बाबाजी राम देसपाडे असतां तमाम मोकदम व र्यां कर्याती मावल येऊनु रूजू होऊन मुलाजमत कौल व सिरपाऊ सरफराजी जाली, हक व लाजिमे व सिरस्ते कागद ताा मजकूर मुतसरफ असतां आपाजी व तुकावा पिसरा नामाजी लाडीयास मोकदम व पटवारी म्हणत असत की हक व लाजिमा सिरस्ता कागद बाबाजीराम देसपाडिया कर्याती मजकुरीचा वेत असतां तुम्ही आम्हासी नाहक धसघस करिता तरी हे गोष्टी बाजिब दिसोन येत नाही तो नवाब अमीरलउमराये बमये सुबे मुलाजमत हजरती देहली कुच्य होऊन दिलीस गेले तो सुबे मिर्जा राजा पाईन किले पुरंधर बमयेलस्कर घेरा घालून सिकंदा केला ते वख्तीं सिवाजी राजे भोसले मुलाजमतीस येऊनु किले व मुलूक दौलत साईरे मुबारक दाखल जाला. तमाम जमीदारांनी व देसमुखांनी व देसपांडियांनी व मोकदमानी पाा पुणा व कर्याती मावल व बारा मावले ते वख्ती व हुजूर मिर्जा राजा सिवाजी राजे अर्ज हसबुल इलतमास करून वतन होनु ३००००० तीन लाख बर करार जाले. पैकी अजी दुमले वतन कर्याती मावल दाखल केले ते वख्ती मोरो विठल व बाबाजी राम देसपांडिये याणी सिवाजी राजे साहेबांस अर्ज केला की तर्फ कर्याती मावल देसपांडेगिरी अहद मुदती कदीमलयाम आपलियां वडिल वडिलांची आहे. पिसर नामाजी ब इसम आपाजी वगैरे गुमास्ते आपले आहेत. आपणासी नजर बदलून खुद देसपांडेगिरी आपली म्हणत आहेत, तरी साहेबी मेहरबान होऊनु आपणा हुजूर जमीदार बारा मावले व कर्याती मावल बोलाउनु त्यांचा आपला इनसाफ करून सनद देसमुखानी व मोकदमानी व

---

१ अमला फैला = the high and low servants of Govt.

२ सात रिकेब = who accompanied his stirrup.

पटवारीयांनी ताा कर्याती मावल मन्हामत केली पाहिजे. त्यावरून. इफ्तदाये नामाजी लांडा गुमास्ता हकीकत बंदगीस जाहिर केली त्यावरून सनद दिधली तेथे मजमून कीं

अज रख्तखानें राजेश्री सिवाजी राजे साहेब दामदौलतहू ताा पायगुडे व करजवणे देशमुख व मोकदम व कुलकर्णी व रयां कर्याती मावल परगणे पुणा सुहूर सन तिसा सबैन अलफ. माल्रुम दानद कीं मोरो विठल होनप देशकुलकर्णी कर्यात मजकूर हुजूर येऊनु आपली हकीकत जाहीर केली कीं आपले वडिलवडिलाची मिरासी देशकुलकर्ण तर्फ पुणे बितपसील :—

ताा हवेली देह १२	ताा कर्याती मावल देह ३६	ताा साडस बुाा देह २९
ताा कन्हेपठार देह ४३	ता पाटस देह ४३	ताा निरथडी देह ३७

ताा सांडस खुर्द देह २०

येणेप्रमाणे पिढी दर पिढी कारकिर्दी दर कारकिर्दी देशकुलकर्ण चालत आले आहे. यैसियासी राजश्री माहाराज साहेबांस निजामशाह यांनी परगणे मजकूर मुकासा दिल्हा ते वख्ती तरफ तरफनी माहाराज साहेबी ठाणी ठेऊन हवालदार व कारकून तरफतरफस संतंतर कमावीश करीत असेत. ते वख्ती आपल्या वडिली गुमास्ते तरफतरफेस कारबारास दिल्हे असतां कर्याती मावलास गपचूप पुणाहून पाठविले. त्याणी कितेक दिवस मुतालिकी करीत असतां कागदपत्राचा सिरस्ता आपणाजवली आणून देत असेत. चाकरीचे रवेसीनें आपल्या वडिलासी वर्तत असतां रयेतीस बदसुलूख केला म्हणऊन त्यास दूर करून नामाजी लांडा पुणाहून गुमास्तगिरी देऊनु कर्याती मावलास पाठविला. नामाजी हयात असतां आपला हक व लाजिमा व कागदाचा सिरस्ता आपणास देत गेला. यैसे माहाराज साहेबाचे कारकिर्दीस चालत आले असतां निजामशाही गुदरोन गेली. येदलशाही तरफेने विज्यापुरीहून मुरारी जगदेराऊ सुभा येऊन पुणे जाळून लुटून तलफ केले ते वख्ती दौलतमंगल उर्फ भुलेस्वर येथे मुरारीने किला बांधोन शाहर वसविले. तेथे आपले वडील नादावयासी गेले. कितेक मुदती भुलेस्वरी कारबार पडिला. त्याकरितां कर्याती मावळीं नामाजी लांडा कारबार करीत असे. तो आपला हकलाजिमा व कागदांचा सिरस्ता देत असे. येदिलशाहीतून माहाराज साहेबांस पुणें मुकासा

जाले ते वख्ती साहेबास कर्याती मावल व राजेश्री मंबाजी राजे भोसले यासी साडस खुर्द माहाराज साहेबी आपणापासून मुकासा दिल्हा. साहेबाचे तर्फेनें कर्याती मावलास हवालदार व कारकून आलाहिदे गेले, त्यासी जांग जोडी करून नामाजीनें आपणासी बेइमान होऊन नजर बदलली. यैसी-यासी आपण येऊनु साहेबापासी हकिकती जाहीर केली. तो निलो पोनदेऊ साहेबांचे मझुमदार त्यांणी आपाजीची पाठी राखिली. आपाजीस आपणासी रूजू होऊ देत नाही. तरी साहिबी मेहेरबान होऊनु देशमुख व मोकदम व कुलकर्णी व रयेतीस ताकीद करून खुर्दखत दिल्हे पाहिजे म्हणऊन तुम्ही मालूम केले; त्यावरून तुम्हास बोलाऊन हकीकत लिहिली. तुम्ही सदरहूप्रमाणे सागितली. हली मोरो विठल देशकुलकर्णी यांचे देश-कुलकर्ण कर्याती मावलाचे देसकुलकर्णाचा अमंल यांचे दुमाला करणें. आपाजीस दखल न करणे. याचा हकलाजिमा यांस देणें. तकरार फिर्यादी येऊ न देणे. तालीक घेऊन असल फिराऊनु देणे.

येणेप्रमाणे हकीकत गुदरली तो उदयेभान राहटवडी अज तरफ पातशाही किलेदार किले कोढांणा त्याणे छावणीबदल जमीदारांनी व मोकदमानी व रयानी पा। पुणा व कर्याती मावल वगैरे किले मजकुरी जमा असतां आपाजी बिन नामाजी लांडा हजीर होता. बाबाजी राम देसपांडिये म्हणो लागले कीं तुझा बाप नामाजी आपल्या वडिलांचा गुमास्ता कागदांचा सिरस्ता व हकलाजिमा आमचा आम्हास देत गेला आहे, यैसे असोन फितुराकरितां आमचा कागदांचा सिरस्ता तुजपासी राहोन गेला आहे तो देणे. त्यावरून हली व मवाली किले मजकुरी जमा होते त्या हुजूर पेशमान होऊन आपाजीने आपल्या बदस्तुरें कर्जवणे व पायेगुडे देसमुख व मोकदम कर्याती मजकूर यांचे शाबिदीनिसी कागद लेहोन दिधला तेथे मजमून कीं—

श्री सके १५९७ कीलकनाम संवत्छरे वैशाख शुध प्रतिपदा तददिवसीं राजेश्री बाबाजी राम होनप देसपाडिये पा। पुणा यासी आपाजी नामदेऊ लांडे यांणी लेहोन दिधले कीं आपला बाप नामाजी लांडा तुमच्या वडिली तरफ कर्याती मावलची देसकुलकर्णाची गुमास्तगिरी देऊन ठेविला असतां तुमचा हक व लाजिमा व कागदांचा सिरस्ता तुमच्या वडिलांस देत गेला आहे. आपला बाप नामाजी मरोन गेला. यावरी आपण तुम्हासी नजर बदलून तुमचा हक व लाजिमा व कागदाचा सिरस्ता द्यावा तो दिधला नाही म्हणऊन तुम्ही आपल्या गळां पडोन आपणास पदरी धरिले, ते वख्ती किले सिहगडीचे छयावणीबदल उदयेभान राठौडी

किलेदार त्याणी कर्यांती मावलचे देसमुख कर्जवणे व पायगुडे व मोकदम व कुलकर्णी किलियास बोलाविले होते. त्यास आपण दरम्याने घालून आपला अन्याये मागोन घेऊन जैसा आपला बाप नामाजी तुमच्या वडिली गुमास्ता ठेविला होता, आपणास संतोसे ठेवाल तरी राहोन दूर कराल ते वखती उजूर न करू. हे आपले लिहिले सही.

गोही

जैतजी करजवणे देसमुख कर्यांती मजकूर

कान्होजी धावडा मोकदम मौजे कोंढे कर्यांती मजकूर

रामजी ससर व पिलाजी चाधेरा मोकदम मौजे सुस

खेऊजी व रेखोजी च्विधे मोकदम मौजे आंबेगाव का॥ मा॥

भिकाजी व जाऊजी वाजले मोकदम मौजे आहेर

विठोजी पिंजण मोकदम मौजे किन्हई.

दुर्गोजी पायेगुडे देसमुख कर्यांती मजकूर

विसाजी मोझरा मोकदम मौजे भुकुम कर्यांती मजकूर

ताउजी इगवला व माणकोजी चोधा मोकदम मौजे भुगांव कर्यांती मजकूर

भिकाजी जवलेकर मोकदम मौजे खानापूर

सुभानजी व संभाजी पायेगुडे मोकदम मौजे अगलंबे व कुडीजे.

सदरहूप्रमाणें निवीस्ते आपाजी की पदरमंत (पिदरे मनू) बईसम नामाजी नौकर शुमा बुद मुनकता (?) होऊन गेला तो छयावणीचा कारबार पा॥ पुणा व कर्यांती मावल पडिला. त्याचाहि सरबराह बाबाजी राम देसपांडिये यांणी करून दिधला. पातशाही अमल फैला मोरोजी व बाबाजी राम देसपांडेगिरी खुद पुणांची व कर्यांती मावलीची काबिज मुतसरफ असतां बाजद फितूर मूळूक बदस्त सिवाजी राजे भोसले रयेती हैरांनी पेरोशांनी परागंदा मुळूक वैरान बेच्यराख, सबब पातशाही फौजा दौडी येऊनु मुळूक ताखताराज हमेशा होत गेला. बाजद सिवाजी राजे फौत होऊनु कैलासवास केला. तो यादव पिसर नामाजी नौकर संभाजी भोसले बमये लस्कर सुबे चंदी व कर्नाटक मुळूक ताखताराज करून जमीदार व पुंड पालेगार यांचे सिरी तोफ ठेवतां दरम्याने यादव नामदेऊ बख्तावार होऊन मुदमर्गी मबलग नजर बदलो लागली. तो आपले करमबंद सदुख ताले-ये जिल्हे आज लस्कर मनसुर ज्यफर असर के अवलियाये दौलत काहीरे मुकाम फरखुंदे बुनियाद अवरंगाबाद असतां सुबे गाजुदीखान बहादर फेरोज्यंग दर पुणे अमदरत्फ सातरीकेब बाबाजी राम देसपांडे तमाम मोकदमानी पा॥ पुणा कर्यांती

मावळ मुलाजमत बंदगानी नवाबसाहेब कौल सिरपाव व सरफराजी इवक्त हक व लाजिमे व सिरस्ते कागद बदस्तुर साबिक बाबाजी राम देसपांडिये अमल दखल करून मुतसरफ असतां विज्यापूर व भागानगर फते करून दर सन १०९९ रायात अलियात बंदगान हजरती दिलसुभानी दर मौजे तुळापूर मुकाम जाला. तमाम जमीदारांनी व देसमुखानी व देसपांडियांनी व मोकदमानी व रयानी पाा पुणा व बारा मावळे वगैरे दर कचेरी वाला रुजू होऊनु अर्बाब अदालत बदरगाह अस्मानज्या(ह) दिलसुभानी व हुजूर करामतगफर मुलाजमत होऊन सिरपाऊ व कौल सरफराजी जाली. तेवख्ती हमराहा देसमुखानी करजवणे पायेगुडे कर्याती मावळ व मोरो विठल व रामचंद्र बावाजी देसपांडिये होनप ताा मजकूर सिरपाव व कौल सरफराजी जाली. तेवख्ती आपाजी पिसर नामाजी हजीर होता, त्यास कर्याती मावळचे देसमुख व मोकदम व पटवारी म्हणो लागलें की ये सर-जमीनेत पातशाहा ये जिल्हे येऊन मुकाम जाला. दक्षण प्रांतीचे जमीदार जमा जाले आहेत. गरीब व बख्तावर बरोबरी आहेत. कोण्हावरी मुळूक ज्याजती होत नाही. होनपासीं वाद सांगोन तुझे होईल तू खाणे होनपांचे होईल होनप खातील त्यास आपाजीनें जाब दिधला की त्यांचा आपला कथलाच नाही. त्यावरून पातशाही सनद देसपांडेगिरी तरफ मजकूर बनाम मोरो विठल व रामचंद्र बावाजी मऱ्हामत सेवद व शाहादीनामे बमोहर व बदसखत जमीदारां जुनर व चाकणा व बारा मावळे वगैरे बहादुर पुरनूर बदस्त बरंद बदस्तुर साबिक अदाये अंज्याये कर्याती मजकूर मुतसरफ शाहादीनामा करून दिधला. सदरहूप्रमाणे दरबारीं हकीकत गुदरली. यावरी मोरो विठल व रामचंद्र बावाजी होनप देशपांडियांस कर्याती मावळच्या देशपांडेपणाचा महजर करून दिधला. अहद मुदतीपासून होनप नामीज दकलाणी बुनियाद कुरसी व दर कुरसी पिढी व दर पिढी पदर जाती पिसरांनी व फर्जेदानी लेकरांचे लेकरीं हकलाजिमा व सीरस्ता कागद राखोन कर्याती मावळची देशपांडे-गिरी मुतसरफ असतां पेस्तर अवलादी अफलादी मुतसरफ होऊन सुखी असणे. बिनाबराई चयद कलमे बतरीख सुरत मजलसी ब महजर सही.

¶*This is an old decision given by the Emperor Aurangzeb from his camp at Tulapur (the scene of Sambhaji's execution). The decision refers to a dispute between the two Deshpandes of Poona, Lande and Honap. The paper has pointed references to the vicissitudes through which the Poona District passed during more than half a century.*

No. 186] [*25-1-1635*

अज रखतखानें मसुरल हाजरत राजेश्री मुरारी जगदेवराव दामदौलतहू माा मालोजी नरसिंगराऊ सितोळे देशमुख मामले दौलतमंगल सुाा खमस सलासीन

अलफ मा। दाइमखान मुकासाई मौजे साई मामले मजकूर हुजूर येऊन मालूम केले की मौजे साई येथील मोकदमी देसमुख मजकुराची आहे. तेथे रायाजी सितोळा मुतालिक ठेविला आहे. त्यास आपण मुकासियाचे टकियाचे मागणे लाविले की कानुप्रमाणे आपले पैकें देणे. त्यास तो मूठमर्दी करून सुरलित टका देत नाही म्हणोन देसमुख मजकुरास जाऊन सांगितले की तुमची पटेलगी आहे. तुम्ही आपलिया मुतालिकास ताकीद करून टका देवणे. त्याणेहि खातिरेस आणिले नाही. तरी साहेबी नजर इनाइत करून देसमुख मजकुरास बरजोर तागीद आहाडाहून मुकासियाचे टके कानूप्रमाणें बिलाहुजूर देविले पाहिजेत म्हणोन इलतमेस केली. तरी तुम्ही मौजे मजकुरीचे मोकदम असोन आपलिया मुतालकियास ताकीद करीत नाहींत हे गोष्टी बरी नव्हे. त्याउपरी दाइमखान मुकासियाचे पदरी साईचे टके माफीक कानू त्याचे पदरी घालणें. फिरोन बोभाट आला म्हणजे मुलाहिजा होणार नाही. ताकीद असे. मो. सुद.

तेरीख १९ साबान सन सलास खमसैन व अलफ

¶*Murar Jagdeo, of the Bijapur Court, sends instructions to Maloji Shitole to pay off the Government dues of the village Sai in Doulat Mangal.*

No. 187] [*21-6-1717*

श्रीवडजाई

नकल

१
=
७

महजर श्री सके १६३९ हेमलंबी नाम सवंछरे जेष्ठ बहुल ८ भ्रुगुवासरे सुहुर संन समान मशर मया अलफ तेरीख २२ रजब मु॥ मौजे नादेडे ता॥ कर्यात मावल बिहुजूर हाजीर मज्यालस

राजमुद्रा

वासुदेव अनंत हावालदार कर्यात मावल व खेडेबारे

देशमुख व देशपांडे ता॥ मज * *

दिपाजी बिन दुर्गोजी रविराव पायेगुडे देशमुख ता॥ मजकूर

खंडोजी बिन जैतजी करजवणे भालेराव देशमुख ता॥ मजकूर

कान्होजी बिन बाजी देवराव पायेगुडे देशमुख ता॥ मजकूर

सुभानजी बिन रखमाजी करजवणे अढलराऊ देशमुख का॥ मजकूर

5036

बहिरजी बिन कनकोजी रविराव पायेगुडे देशमुख ता। मजकूर

नामाजी अपदेऊ लांडे देशकुलकर्णी ता। मा।र

लांडे खासनीस नि। पायेगुडे करजावणे देशमुख ता। मजकूर

कसबे पुणे व परगणेकरी

राघो आनंत आत्रे कुलकर्णी मौजे पाडेशर (?) ता। कन्हेपठार.

देवजी मागल सोमवार-पेठ पुणे.

रखमाजी बिन मालजी मते

पाटील मोकदम मौजे खडकवासले ता। मजकूर

मोरसेट सेटे मौजे खडकवासले

मोकदम मौजे कुडिजे

मंडोजी बिन बहिरजी पायेगुडे मोकदम

मालोजी बिन कानोजी पायेगुडे

बि। नामाजी अपदेव लांडे कुलकर्णी मौजे मा।र

बापूजी साठे मोकदम मौजे पिंपल निलख

गबाजी बिन रायाजी काले बिरादर मौजे निबेणे ता। कर्डे (डे ?)

गंगाजी बिन येसजी धावडे मौजे कोंढे

रामजी बिन चिलोजी पा। बाराटे व बिरादर कानोजी बाराटे मौजे कोथरूड

सिवजी बिन सुभानजी पायेगुडे देशमुख ता। मा।र

रामचंद्र यादव लांडे देशकुलकर्णी ता। मजकूर

सिवभट वेव्हारे जोसी व उपाधे व माहाजन का। पुणे

पालोजी बिन जनाजी पायेगुडे मोकदम मौजे आगलंबे

संताजी बिन देवजी वेडे मौजे बावधण खुर्द

कृस्णाजी बिन बापूजी दगडे मोकदम व गोदजी दगडे बिरादर मौजे बावधण बु।

वि। अताजी राम ढेरे कुलकर्णी मौजे मजकूर

कोंडाजी बिन सोनजी कानकाटे मौजे कारेगांव

रखमाजी बिन पदाजी पा। पोकळे मौजे धायेरी

गु। गंगाजी - पाकला कृस्णाजी बिन सिदोजी जाधव व मोकदम मौजे किरकटवाडी

दारसेट (बा, ह, द, ?) बिन दादसेट बारके माहाजन कसबे सासवड

सखाजी बिन चाटजी माझेरे मोकदम मौजे भुकूम

गणोजी बिन परसोजी पा मुरकुटा मौजे बाणेरे

अवजी बिन रुपाजी सासवडा चौधुला व अवटी का सिकरापूर

जाखोजी बिन रायाजी घायेगुडे देशमूख व मोकदम व रखोजी बिन अनसोजी पा मौजे माडवी बु

पदाजी कुऱ्हाडा पाटील मौजे अलदी प्रात चाकण

या हुजूर जाहाला महजर यैसाजे. मौजे नादेडे ता मजकूर येथे कदीम पेठ नव्हती त्यास संकराजी बिन बकाजी फर्जद मोकदम मौजे खावगाव ता मजकूर याची निमे मोकदमी मौजे मजकूरची होती त्याणे स्वसंतोशे पिलाजी बिन चागोजी जाधव यास विकत दिली. त्याचा महजर सन इहिदे आशर मया आलफामधे गोताचा पिलाजी जाधव यासी करून निमे मोकदमीची दिल्हा. भोगवटा आनभवीत असता मौजे मजकुरी पेठ वसवावी हे उमेद धरून सन खमसामध्ये किले सातारच्या मुकामी माहाराज राजेश्री छत्रपति स्वामीचे शेवेसी संबाजी बिन चागोजी जाधव यांणी विनंति केली जे. आपण स्वामीच्या पांयापासी येकनिष्ट सेवा केली आहे व पुढेंहि सेवा करावयाची उमेद धरिली आहे तरी श्वामीनी कृपालु होऊन पेठ वसवावयाची आज्ञा करावी आणि पेठ मजकूरचे सेटेपण व माहाजनकीचे वतन आपणास करून द्यावे म्हणिजे पेठेची वसाहती होऊन वसाहाती होईल म्हणून विनंती केली त्यावरून

छत्रपति स्वामीनी मेहेरबान होऊन मौजे मजकुरी नवी पेठ वसावयाची आज्ञा केली आणि सेटेपणाचे व माहाजनकीचे वतन संभाजी बिन चागोजी जाधव यासी करून देऊन सन खमसात तेरीख छ १४ रमजानी आपले सिकियांनसी वृतिपत्र करून दिल्हे याचा महजर [महजर शब्दावर उा किंवा उमर असा काही मोडी शब्द आहे] जे राज्याभिषक शके ४१ जयेनाम संवछरे भाद्रपद बहुल १ इंदुवासर क्षेत्रियकुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामी यांणीं संभाजी बिन चांगोजी जाधव सेटे माहाजन पेठे मोजे नादेडे ता कर्यात मावल यासी दिल्हे वृतिपत्र यैसीजे. तुम्ही किले साताराच्या मुकामी स्वामीसंनिध येऊन विनंति केली जे अपण स्वामिसेवा येकनिष्टपणे केली पुढेहि करावयाची उमेद धरीत असो तरी श्वामीनी कृपालु होऊन पेठ नादेडाचे सेटेपण व माहाजनपण अपणास वृति करून द्यावी म्हणून विनंति केली. त्यावरून तुम्हावर स्वामी संतोष होऊन सेटे व माहाजनपणाची वृति पेठ नादेडाची दिली असे तुम्ही मौजे मजकुरी पेठ वसऊन आपली वृति वौशपरपरेने अनभवणे. तुमचे माथा सेरणी रुपये १९० दीढसे केले असेत

याचा वसूल हुजूर दऊन अलाहिदा जाब घेणे तेणेप्रमाणे मजुरा पडतील. अणी वतन पुत्रपौत्रादि वौशपरंपरेने आनभऊन सुखरूप राहाणे यैसे छत्रपति स्वामीनी वृतिपत्र करून देऊन जिल्हेचे खावंद राजश्री नारो शंकर सचिव यासी अलाहिदा आज्ञापत्र सादर केले जें ये वृतिच्या भोगवटियासी तुम्ही अपली पत्रे करून देणे यैसे सन खमसात तेरीख छ १४ रमजानी राजश्री पंतसचिव यासी राजपत्र तेथ मजकूर जे राज्याभिषक सके ४१ जयेनाम संवछरे भाद्रपद बहुल १ इंदुवासरे क्षेत्रियाकुळावतंष श्रीराजा छत्रपति स्वामी याणी समस्त राजकार्य-धुरधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री नारो पंडित सचिव यासी आज्ञा केली यैसी जे संभाजी बिन चांगोजी जाधव यावरी स्वामीनी कृपालु होऊन पेठ नादेड येथील सेटे व माहाजनपणाचे वतन करून दिल्हे असे. याजपासून सेरणी रुो १५० दीढसे हुजूर घेतले तरी तुम्ही अपली पत्रे करून देऊन हे वतन वौशपरंपरेने चालवणे. यैसे राजपत्र दिल्हे तेच बदजिनस पडित मशारनिले याजकडील राजश्री पंताजी सिवदेऊ यासी दाखल केले. त्यावरून त्याणी सभाजी जाधव यासी अपले दुमालपत्र सनसमान तेरीख २० करून दिल्हे जे तुम्ही पेठ नादेडा येथील सेटेपण व माहाजनकीचे वतन अनभऊन सुखरूप राहणे यैसे दुमालेपत्र करून देऊन देशमुख देशपांडे यासी अलाहिदा पत्र सादर केले जें संबाजी बिन चांगोजी जाधव यासी रा स्वामीनी कृपालु होऊन मौजे नादेड येथील सेटेपण व माहाजनकीचे वतन करून देऊन अम्हासहि पत्र सादर केले जे यासी दुमालेपत्र करून देणे. यावरून दुमालेपत्र करून देऊन तुम्हास आज्ञापत्र सादर केले असे. तरी या वतनाचा महजर संबाजी बिन चागोजी जाधव यासी करून देणे व काा पुणे येथील सेटे माहाजन यासी हाक असेल त्याप्रमाणे हाक करून देऊन यैसी दिवाणपत्रें संबाजी बिन चांगोजी जाधव याणी अणून मौजे मजकुरी देशमुख देशपांडे व सिवझडे मोकदम व सेटे माहाजन व समाकुल पांडर मेलऊन सदरहू दिवाणपत्रे गोतास दाखल केली आणि गोतास अर्ज केला जे या दोही वतनाचा (मह)जर करून दिल्हा पाहिजे त्यावरून हाजीर मज्यालस गोताने सेरणीची जाब व दिवाणपत्रे दुमालेपत्रे देशमुख देशपांडे याची पत्रें मनास आणून पेठ मौजे नादेडे ताा मजकूर येथील सेटेपणाचा व माहाजनकीची महजर करून दिल्हा आसे. यासी हाक कसबे पुणे येथील सेटियाच्या निझाणानसी व पेठ मजकूरच्या कुलकर्णियाच्या दस्तुरेनसी बदजिनसे जाबता आणून व सेटेयासी रुबरू व माहाजन यास रुबरू पुसोन पुणाच्या सेटियासी व माहाजनासी हाकाप्रमाणे सभाजी बिन चागोजी जाधव यासी हाक करून दिल्हा असे. बाा जाबता तपसील पेठ मजकुरी कुले असतील त्याजवर हाक

माळी दर दुकानास दररोज पाने सुपारी पाच

१

मालियावर हाटवटीस दरपाटीस दररोज हारजिनस मालवे मूठभर येक

१

तेलियावर दिवसास घाणियासी तेल वजन टकबंदी नवटाक ८८८९

१

खाटीक व भाई व खारखंडे व पेढारा यासी यासी अठा दिवसा वजन ०॥। सागोती ८८१।- सवासेर

१

सिंपी अवघे मिळोन चोलिया सुमारी ५ पांच दिपवालीकारणे कलम

साली व कोष्टी व मोमीन यासी वरसास दर घरास येणेप्रमाणे ध्यावे बिा

साली कोष्टी दर घरास अडफले १	मोमीन दर घरास दर वरसास गुंडाले १ येक ध्यावे कलम

१

बकाल दुकानास दर पसारियास सारे दुकान मिळोन दररोज पालीप्रमाणे सपारी वजन टा८८८९

१

परडेनिवे दर आठवड्यास खोबरियाची वाटी १ येक व विडे सुमार ५ पानं पोफलीस घेतले तरी वराडास नाही वराडास घेतली तरी पान पोफलीस नाही येक वेलेस ध्यावे कलम

१

सुतार व कुंभार व परीट व कल्हेकरी व वोतारी व न्हावी वगैरे फुम याजपासून ज्याचे काम त्याचे हातून ध्यावे कलम

मणेरी व अतार व कासार व काचीरी दसरियाकारणे व दिपवालीकारणे येणेप्रमाणे ध्यावे

करंडा गरसोली	तोड
१	१
फणी	नाडापुडी
१	१

बांगड्या सुमार १०८ कलम

१

बुरुड अवघे मिळोन दर वरसास सुपे सुमार ५ पांच कलम

चाभार अवघे मिळोन वरसास जोडा १ येक कलम १

सला (क) तानकरी अवघे मिळोन दर वरसास सागल येक कलम

१

धणगर अवघे मिळोन दर वरसास चवाले १ येक द्यावे कलम

१

पिजारी अवघे मिळोन जेन सुमार १ येक द्यावे कलम

१

मोचेकरी अवघे मिळोन दरवरसास जोडा १ येक कलम

१

गुरवान दरराज पत्रावळा आणून द्याव्या.–दसरा दिपवालीस वाजंत्री वाजवावी कलम

१

तलियाखेरीज तली दसरा दिपवाली सिमगा याची तली रयेतीचे रजावंदीने जीवनमाफक रयेतीचे पाहोन घ्यावे कलम

१

परदेसी कुले येतोल त्याजवरी थलमोड होईल त्याजपासून हाक येणे प्रा घ्यावा बिा

गला हार जिनस येईल त्यास सोलवीस देऊन दर गोणीस कु(दुम) टोली गला कैली अधोली भर घ्यावे

៩៩॥.

तांबोलियावर पाने सुमार येणे प्रा बैलास

१००

सिरभारे खादाडी

५० २५

किरकोल जिनस येईल यास बारा मणाचा गोणीवरील हिसेब करून घ्यावे कलम

१

किरकोल गला हरजिनस येईल यास चौमणाचा हिसेबाप्रमाणे घ्यावे कलम

१

कणे (लोण?) तेल तूप व गूल तमाखू खोबरे हालद खारीक वगैरा जिनस यासी चौपस देऊन दर गोणीस वजन ०॥ सवासेर ៩៩१।.

बोरे व आले दर बैलास वजन ०॥ अडीच सेर

៩៩२॥.

5041

आंबे केळे व निंबे सुमार बैलास मोटेस
१० ५

द्राक्षे बैलास ०॥
ऽऽ१।

चुना व कोळसे वजन येणेप्रमाणे
गाडिया बैलास
ऽ। ऽऽ५

गाढवास मोटेस
ऽऽ२॥ ऽऽ१।

माळवे वांगी व गाजरे व भाजी व कांदे व लसूण वगैरा जिनस येईल त्यास येणे प्रा घ्यावे वजन टकबंदी
बैलास मोटेस
ऽऽ५

ऊस सुमास
गाड्यास बैलास
५ २
सिरभारा १

काबले व चवाली व घोंगडी व नवार व सूत व लोहोकर व खारखंडे वोंवील यासी रुके
बैलास डोईवोझे
ऽ६ ऽ३

खादाडी रुके ऽ१॥

कापडास येईल त्यास येणे प्रा घ्यावे बिा रुके
बैलास घोडियासी
।। ऽ९
डोईवोझीयास खादाडी
ऽ६ ऽ३

कडबा गवत पुळे सुमारी गाडियासी ५
बैलास सिरभारा
२ १

येणेप्रमाणे लाकडासहि घ्यावे कलम
१

पालणूक व जकाता व खरादा व फरोख्त हरबाब पालणूक असे बिा

बैल घरगती बरामत दरामत हरजिनस व किराणा वगैरे तेल तूप व कापड देखील पालणूक आसे कलम
१

दुकान हारजिंनस १ येक दुकान यासी वेव्हीगार व खरीदी व फरोख्त झाडे झाबड माफ कलम
१

गाडा घोडे बहा व बदा व म्हैस व बैल व गाई खरीदी व व फ्रोख्त करितील त्यास जकाती माफ असे कलम
१

येणेप्रमाणे हाक लाजिमा करून देऊन सदरहू महजर करून दिल्हा असे या उपरी पेठ मौजे नादेडे ताा मजकूर येथील सेटेपणाचे व माहाजनकीचे वतन

संबाजी बिन चांगोजी जाधव यासी याचे पुत्र पौत्रादि वौशपरपरेने आनभवून सुखरूप असावे जाला महजर सही

गोही

पिलाजी बिन चांगोजी जाधव व निमे मोकदम मौजे मजकूर

राघोजी बिन खेवजी व माहादाजी बिन गिरजोजी व माणकोजी बिन हासाजी घुले मौजे मजकूर

सिवाजी माहादेव ठकार- जोसी कुलकर्णी मौजे मजकूर

मल्हार माळी बिन गोदमाळी ताटे मौजे केदूर हाली वस्ती मौजे मजकूर

सखोजी बिन विठोजी सोनार मौजे मजकूर

तुकोजी बिन मोराजी पाा घुले निमे मौजे मजकूर

सभाजी बिन हसजी (दसजी?) लगड व माहादजी बिन संताजी लगड व धर्मोजी लगड मौजे मजकूर

सुभानजी बिन कावजी लोहोकरा थलकरी मौजे मजकूर

राममाळी बिन काळमाळी मौजे मजकूर

सेखजी बिन तान्हखान तांबोळी मौजे मजकूर

बलुते

येसजी बिन हा‹जी सुतार डोरला मौजे मजकूर

१

चापाजी बिन तुकाजी लोहार

१

येसजी बिन भागोजी गुरव पांडवे मौजे मजकूर

१

खंडोजी बिन तुकोजी कुंभार

मलोजी बिन येमाजी परीट मौजे मजकूर

१

आबनाक बिन कान्हनाक माहार पाडेवार मौजे मजकूर

आजेनाक बिन कान्हनाक माहार येसकर मौजे मजकूर.

नावराऊत बिन तुकराऊत मांग मौजे मजकूर.

¶*This paper embodies Shahu's orders ... ., the village of Nanded, effected by Sambhaji Changoji Jadhav. The paper is historically important as it explains the political situation of the troublesome times of Shahu's early regime.*

Index to Selection No. 31

Selected Papers from the Jamav Sectio

B—contd.

C

C—contd.

D

D—contd.

J—contd.

K

K—contd.

L

M

—contd.

M—contd.

N

N—contd.

P

P—contd.

R—contd.

S

S—contd.

S—contd.

S—contd.

T

BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.

Selections from the Peshwa Daftar

32

The Private Life of the Later Peshwas

Editor—G. S. SARDESAI, B.A.

Government Central Press, Bombay
1933—Price Rs. 2 As. 5 or 4s. 3d.

(Government do not assume any responsibility for the comments and views expressed by the editor.)

17/933

पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

३२

उत्तरकालीन पेशवे—कौटुंबिक राहणी

[किंमत—२ रुपये ५ आणे किंवा ४ शिलिंग ३ पेन्स]

संपादक—गो. स. सरदेसाई, बी. ए.

गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३३

(या प्रकाशनांतील संपादकीय टीका व मतें यांजबद्दल कोणतीहि
जबाबदारी सरकारावर नाहीं.)

THE PRIVATE LIFE OF THE LATER PESHWAS


This selection is arranged on the model of a preceding one (No. 18) which dealt with the private life of King Shahu and his Peshwas. Personal details about historical characters are always valued by students of history. The record of what may appear to the superficial observer to be trivial incidents, often provides clues to motives and characters of a more intimate nature than formal accounts. To supply this demand, papers more or less of a personal nature are here brought together under the following heads for convenience of study :—

1. Social and ceremonial, Nos. 1–25 ;
2. The Ganapati festival, Nos. 26–30 ;
3. Education, sport, travel, Nos. 31–55 ;
4. Domestic animals, Nos. 56–68 ;
5. Ornaments and jewellery, Nos. 69–113 ;
6. Gopikabai at Gangapur, Nos. 114–143 ;
7. Illness and death of Madhavrao I, Nos. 144–160 with charities made by Ramabai, 190–192 ;
8. Raghunathrao and Madhavrao II, Nos. 161–199 ;
9. Vows, buildings, etc., Nos. 200–213 ;
10. Fire at Shanwar Wada, Nos. 214–223 ;
11. Bajirao II, palaces and gardens, Nos. 224–227.

The papers need hardly any introduction ; they are mostly short and simple and occasionally most entertaining. A discriminating reader will at once detect in them the sharp contrast in the tastes and habits of the different members of the Peshwas' family. While the puritanical Madhavrao I refuses to wear gaily coloured clothes, his uncle Raghunathrao writes for a supply of pretty and well-trained dancing girls ! Apart from such details, however, one is sorry not to come across more matter illustrating the every-day life of the later Peshwas. Thus one would like to know, for instance, what sort of education men and women usually received at that time. The ladies of the Peshwas' family were certainly able to read and write. Sagunabai, who became a widow at the age of ten, seems to have devoted her later life to reading and studying books of epic literature and philosophy, if the long list (No. 42) of manuscripts in her possession at the time of her death can be taken as an indication of her real tastes. A wife of Bajirao II is mentioned as practising handwriting at the age of ten or thereabout, a fact which justifies the inference that the ladies were required to practise reading and writing regularly. Madhavrao even in the midst of a distant campaign is never tired of attending to various details concerning the improvement of the city of Poona, such as the construction of buildings, tanks and water-channels. He is also strict and punctual as regards financial matters. Ali Bahadar,


the grandson of Mastani, although of Mussalman religion, was given Marathi tutors and was brought up exactly like other members of the Peshwas' family. Ladies were given every facility for performing pilgrimages, particularly to distant places like Benares and other holy places in northern India. Brahmin widows are prohibited, says one paper, from adopting a son and heir and the sale of Brahmin girls in marriage is also forbidden (206). Adultery was punished with loss of caste. Wrestling, elephant-fighting, cheeta-hunting, falconry and feats of horsemanship are some of the most popular sports in which the Peshwas and their associates usually indulged. Temples were plentifully constructed and the art of stone-carving seems to have reached great perfection. Painting and decoration were cultivated to a large extent, but portraiture appears to have been introduced at the Peshwas' Court through the instrumentality of Sir Charles Malet, the first British Resident at Poona. Telescopes, watches, cups and saucers, broad-cloth and other fancy articles seem to have been largely imported from Europe. Sadashivrao Bhau is mentioned incidentally as having successfully combated the evil of intoxicating drinks (206). Altogether the papers afford us a picture of the social and religious life of the Peshwas, which, though not perfect, is still of [illegible]

No. 43


श्री


Facsimile of the handwriting of Narayanrao Ballal. (*Died 1773.*)

No. 117




Facsimile of the handwriting of Govind Shivaram Khajgiwale.

No. 150




Facsimile of the handwriting of Manaji Sindia. *(Died in April 1800)*

No. 191



Facsimile of the handwriting of Chinto Vithal Rairikar. *(Died in June 1783)*

No. 265



Facsimile of the handwriting of Mahadaji Ballal Guruji.

No. 1] [7-2-1761

श्री

राजश्री बाळाजी पंत नाना फड....
गोसावी यांसी

ℑ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो सटवोजी जाधवराव दंडवत विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करीत गेले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावोन परम समाधान जालें. सोबतीनें जावयाचा मजकूर लिा तरी बहुत उत्तम आहे. आमची ठाणीं परगणियांतील कायम आहेत. आम्ही बिदा व्हावयास ठाकूर सुरजमलजी याजकडे येऊं तेव्हां तुम्ही आम्ही समागमेच येऊन सोबतीनेंच परगणियात जाऊन. चिंता नाहीं. सर्व गोष्टी आपले घरच्या आहेत. दुसरा अर्थ नाहीं. कळलें पाहिजे. रा छ ३० माहे जमादिलाखर. बहुत काय लिहिणे ? लोभ असो दीजे हे विनंती.

¶Satvoji Jadhav writes to Nana Fadnis agreeing to escort him back to the Deccan after the disaster at Panipat.

No. 2] [5-6-1761

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री दादासाहेब स्वामीचे
सेवेसी

विनंती सेवक आज्ञाधारक गुंडो कासी मुा श्रीगोंदे चरणावर मस्तक ठेऊन सेर सां नमस्कार विज्ञाप्ति. येथील वर्तमान ताा छ १ माहे जिल्कादपावेतो साहेबाच्या कृपावलोकणेकरून येथास्थित असे विशष. येथील वर्तमान यैसजे. छ २८ माहे शवाल तिसरा प्रहरा राजश्री चिंतोबा दिा जनकोजी सिंदे याचें पत्र नबाबाई सिंदे याजला आलें. मथुरेचें मुकामचें पत्र होतें. त्यांत मजकूर यैसा जे, राजश्री जनकोजी सिंदे मलकापूर प्रांत जाटाचा तेथे आहेत म्हनोन वार्ता आहे, ऐसि पत्र आलें. छ २९ माहे शवाल टोकियाहून श्रीमंत राजश्री नानासाहेब याचे पत्र बलवंतराव गोपाल सेनवाई याजला आले. हुजूर बोलाविले आहे, सबब जे राजश्री रामचंद्रबाबा सेनवाई याची ठेव सात लक्ष रुपये गोपाल शंकर याजकडे होतें, त्यासी गोपाल शंकर याणी सिंदियाचा आश्रये करून राहिले यास्तव त्या गोस्टी राहिल्या होत्या. सांप्रत्ये सदासिव रामचंद्र यानी पेसजीचे पैसुन्यें

काहाडून श्रीमंतास विनंती करून बलवंतराव गोपाल याजला हुजूरचे पत्र पाठऊन आनविलें आहे ; व श्रीगोंदे येथीलहि मामलतीचा काही जौबसाल मारनिलेकडे आहें ; यास्तव बोलाविलें आहें. सेवेसी श्रुत्ये होय हे विज्ञापना.

¶*Gundo Kashi to Dadasaheb regarding Chintoba's letter to Nimbabai to the effect that Jankoji Sindia is at Malkapur. He also mentions the letter of Nanasaheb to Balvantrao Shenvi regarding the deposit of the money of Ramchandra Baba with one Gopal Shankar.*

No. 3] [*11-6-1761 ?*

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री दादासाहेब
स्वामीचें सेवेसी

विनंती सेवक आज्ञाधारक गुंडो कासी मुा श्रीगोंदे चरणावर मस्तक ठेऊन साा नमस्कार विज्ञाप्ति. येथील वर्तमान ताा छ ७ माहे जिलकादपावेतों साहेबाच्या कृपावलोकणेकरून येथास्थित असें विशष. निबाब्राई सिंदे याजकडें मौजे अरणगाव दलवी याचें व हिवरें वगैरे दाहा बारा गौची मामलियेती व पाटिलक्या वगैरे होत्या. त्या गावाची जफती राजश्री नारो बापुजी यांचे पुत्र माहादाजी नारायेण यानी केली. सिंदे मजकूर याचे अमलदार व पागा गाव परगावच्या उठोन आल्या. सेवेसी श्रुत्ये होये. श्रीगोंदियात निंबाबाई सिंदे व बलवंतराव गोपाल व पोतनीस व बक्षी व मुजुमदार वगैरे कोन्ही मातबर कुलें होतीं. त्यानी यैवज व चांगली घोडी व वस्तभाव मातबर यैसी रोज दररोज लांबवीत आहेत. येथे ठेवीत नाहींत. येथील धर सुटला आहे. भयचकीत जाली आहेत. जेथे ऐवज तेथें भये आहे यैसे जाणून यैवज जिकडील तिकडे लांबवितात. सेवेसी श्रुत्य होये हे विज्ञापना.

¶*Gundo Kashi reports to Dadasaheb the confiscation by Mahadaji Narayan of the Patilki rights belonging to Nimbabai Sindia, wife of Ranoji. Both this lady and Chimabai, Mahadji's mother, are alive after Panipat.*

No. 4] [*23-6-1761*
छ १३ जिल्काद

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक अज्ञाधारक गुंडो कासी मुा श्रीगोंदे चरणावर मस्तक ठेऊन साा नमस्कार विज्ञाप्ति येथील वर्तमान ताा छ १९ माहे जिल्कादपावेतों साहेबाच्या

1. Social and Ceremonial.

No. 1]

श्री.

श्रियासह चिरंजीव विजईभव राजश्री बालास प्रति कासीबाई आसीर्वाद. येथील क्षेम जाणोन आपणाकडील कुशलवृत लिहीत जाणें. यानंतर अनुबाई आली आहेत ते सविस्तर सांगतील त्यावरून कलो येईल. आम्हास अडथला दोनच्यार दिवसाचा आहे तो उरकून आम्हीहि सत्वरच येतो. पाली आली आहे, हे वाटेस जाल्याने वाटेस राहाणे होईल, याजकरिता राहाणें जाहाले आहे. पाली उरकलियावरी अर्ध घडी येथे राहाणार नाही. आमच्याहि मनात तेच आहे. बहुत काये लिहिणे, लोभ असों देणे, हे आसीर्वाद.

¶*Kashibai writes to her son Balaji that she would return without any undue delay.*

No. 2]

श्री

तीर्थरूप राजश्री नाना ताा

राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

अपत्यें त्रिंबक सदासिव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २१ साबानपर्यंत स्वामीच्या आसीर्वादेंकरून येथास्थित असे विशेष. स्वामींनीं राजश्री स्वामीकारणे नारलीची रोपे ४७ सतेतालीस व धननीचे बंगलीयाचे संदल्याकारणे पारनेरच्या चुन्याच्या हिरव्या कल्या तीन मण पाठविल्या त्या पावल्या. चुन्याच्या कल्या गुजरलियावर धनीन काये भाषण करितील ते लेहून पाठवणे म्हणून आज्ञा. तर चुना गुजरानून काये बोलतील तें सेवेसी मागाहून लेहून पाठऊ. विदित जाले पाहिजे. नारलीचीं रोपें राजश्रीस गुजरानू आणि मागाहून लेहून पाठऊ. विदित जाले पाहिजे. सुपारीची रोपे काही पाठवावी. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Nana Purandare acknowledges receipt of some articles sent by the Peshwa for the king Shahu and his Queen.*

No. [?

श्री

राजश्री पंतप्रधान

गोसावी यांसी

०॥ॐ

श्रीमंत सद्गुणनिधान कृपाविधान प्रतापवरिष्ठाभिधान निरंतरभगवदनुसंधान सावधान श्री माहाराव जानोजी जसवंत निंबाळकर दंडवत विनंती उपरी. येथील क्षेम ता। छ २९ जाखर मु॥ कमलालये जाणोन निजानंदलेखन कीजे विशेष. सांप्रत आपल्या व रा। भाऊसा। व राजश्री रघुनाथराऊजीच्या चरण पुसावयास धोत्रजोडे तीन पाठविले आहेत. येक दिवस यासी चरणस्पर्श करून तदुत्तर ज्यास कृपा करून देणे त्यास दिधले पाहिजे. विशेष लिहिणे हेच विनंती.

¶*Janoji Nimbalker sends three pairs of dhotees for the Peshwa, Sadashivrao Bhau and Raghunathrao. The letter is written in his characteristic ornamental style.*

No. 4] [3-2-1762

श्री

तालीक.

प्रभुवर्य श्रीमंत राजश्री दादा यांप्रति गंगाधरभट व रामशास्त्री आसीर्वाद विनंती. येथील क्षेम ता। माघ शुध नवमीपर्यंत स्वामीच्या कृपेकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. श्रीमंत नारायेणराव यांच्या मौंजीचा विचार करावा म्हणौन पत्र आले, त्यावरून ब्राम्हणसभा करून विचार पाहाता यंदा जेष्ट मासी येक तिथि आहे. परंतु प्रथमांध व अष्टम ब्रहस्पति अभुक्त भोग याप्रो सप्तम वरशाचा प्रकार चौऱ्यांसीच्या श्रावणा वरशापासून पंच्यासीच्या श्रावण मासपर्यंत अष्टम वर्श. त्यांस फालगुण व चैत्र व वैशाख या ती महिनियात मौंजीच्या तिथी आहेत. अष्टम वर्श ब्राम्हणांस मुख्य काल, अष्टम ब्रहस्पतीहि भुक्त भोग होतो. यां(त मुहू)र्त लाभतात. पंच्यासीचे चैत्रामध्ये मिनीचा सूर्य आहे यास्तव प्रशस्थ आहे. ब्रहस्पति अष्टम तरी यंदा जेष्ट मासीहि आहे. आणि पंच्यांसीच्या वैशाख वद्य चतुर्थीपर्यंत अष्टमच. वैशाख वद्य चतुर्थीपुढे नवम ब्रहस्पति होतो. होतांच अस्तंगत होतो. यास्तव पुढे मुहूर्त नाही. याप्रमाणे मुहूर्ताचा विचार वेदशास्त्रसंपन्न राजश्री गोविंद दीक्षित व तथा राजश्री धोंड जोसी श्रीवर्धनकर प्रमुख पंडित गणक यांचे विचारे.

¶*Gangadhar Bhat and Ramshastri give their opinion about the auspicious day for the thread-ceremony of Narayanrao.*

No. 5] [10-2-1762

पौ छ २३ रजब.

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री गंगाधरभट
व रामशास्त्री स्वामीचे सेवेसी

विद्यार्थी रघुनाथ बाजीराव नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष. तुम्ही पत्र पाठविले ते प्रविष्ट जाहाले. चिरंजीव राजश्री नारायेणराव याच्या व्रतबंधाच्या मुहूर्ताचे प्रकार विस्तारे लिहिले ते सविस्तर कळले. ऐशास, मातुश्री बाईजवळ येतद्विषईचा अर्थ सांगावा. त्यांच्या व तुमच्या विचारे निश्चये होईल तों आम्हास लेहून पाठवावा. त्यांच्या व तुमच्या विचारे होईल तोच विचार आमचा आहे. रा छ १९ रजब. बहुत काय लिहिणें? तुम्ही जो निश्चये कराल तो आम्हास मान्य आहे. लौकर थोड्यात गुंता उरकला तरी उतमच आहे. हे विनंती.

¶*Raghunathrao requests Gangadharbhat and Ramshastri to fix, in consultation with Gopikabai, and let him know the auspicious day to celebrate the thread-ceremony of Narayanrao*

No. 6] [After 28-9-1764

श्री

चिरंजीव राजश्री नारायेणराव यांसी प्रति सौ पार्वतीबाई कृतअनेक आसीर्वाद. उपरी, येथील क्षेम जाणोन आपणाकडील निरंतर सविस्तर वृत ल्याहावे. स्वहस्ते पत्र ल्याहावे. वरकड तुम्ही गेलियापासोन अद्यापि कांहीच पत्र लिहित नाही हे अपूर्व असे. यानंतर चिरंजीव सौ रमाबाई यांसी आस्विन सुध सुक्रवारीं त्रितीयेस रजोदर्शन प्राप्त जाले. हे पुत्रलाभ आनंदाचे वृत तुम्हास कळावे म्हणोन लिहिले असे. वरकड तुम्ही तेथे मेवासगिरीत[1] न राहावे. वडिलांचे पायांसीं येकनिष्ठेन असावे. वडिलांचे सेवेस अंतर न करावे. आज्ञेप्रो वर्तणूक करावी. कळावे, बहुत काय लिहिणे, हे आसीर्वाद. सर्व मंडळीस आसीर्वाद. सर्वांनी आपआपले कार्यभागी उतम रीतीने राहावे. * * * प्रकारे वर्तावे, अंतर न करावे. * * * *

¶*Parvatibai writes to Narayanrao asking him to be of good behaviour and to remain obedient to the elders.*

---

१ पुंडपणांत.

No. 7] *[24-6-1765*

पौ छ ९ मोहरम सन

सीत आशाढ मास.

श्री.

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेसीं

आज्ञाधारक सिवाजी बलाल चरणावर मस्तक ठेऊन सां नमस्कार कृतानेक विज्ञापना. ताा छ ९ मोहरमपर्यंत स्वामीचे कृपावलोकनेकरून मुकाम असी येथे क्षेमरूप जाणून स्वकीय लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र छ २९ जिल्हेजचे सादर जाले. तेथे आज्ञा की, चिरंजीव सौभाग्यवती रमाबाई यांचे गर्भाधान अशाढ शुध्ध नवमी गुरुवारी कर्तव्य आहे. तरी तुम्ही सहकुटुंब येणे म्हणून आज्ञा. आज्ञेप्रमाणे निघोन यावेंच. परंतु प्रजन्यकाल, मार्गी नद्या बहुत. गुरुवारीं येऊन पोहचावे. स्वामीचे आज्ञापत्र छ ४ मोहरमी रविवारी च्यार घटका रात्रीस सादर जाले. पुढे अवकाश मध्ये तीन दिवस. मुहूर्ताचे दिवसी स्वामीजवल प्रविष्ट व्हावयास अवकाश नाही यास्तव. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Shivaji Ballal, writing to Raghunathrao, regrets his inability to attend the consummation ceremony of Ramabai, which was to come off on 27th June 1765, as he got the invitation rather late.*

No. 8] *[25-1-1763*

श्री.

श्रीमंत माहाराज सौभाग्यादिसंपन्न मातुश्री बाईसाहेब याणी राजमान्य राजश्री माधवराव पंडित प्रधान यासी आज्ञा केली ऐशीजे. तुम्ही विनंती पत्र पाठविले ते पाऊन लिहिले वर्तमान कलले. तिलशर्करा पाठविली ती प्रविष्ट होऊन स्वीकार केली. याचप्रमाणें निरंतर विनंतीपत्र पाठऊन अपलेकडील वर्तमान लिहीत जाणें. राा छ १० रजब. बहुत लिहिणे तरी सुज्ञ असों.

¶*The Satara (or Kolhapur ?) Chhatrapati's Queen accepts the Sankranta greetings sent by the Peshwa Madhavrao Ballal.*

5048

No. 9] [7-1-1764

पौ छ १४ रजब
सुा आर्बा सितैन.

श्रीमोरया.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक मल्हारजी होलकर कृतानेक विज्ञापना. येथील कुशेल ताा छ ३ माहे रजबपावेतो येथास्थित असे विशेष. राजश्री वासुदेव शामराज याजसमागमे लग्ना बाा आहेर सनगे ताा

१ तिवट आख	१५०	१ किनखाप	३००
१ सेला जाफरखानी[1]	२००	१ मामुदी जरी	१२०
१ पातल पैठणी	२००	१ चोलखण बोदली[2]	१
३	५५०	३	४३५
६			९८५

येकूण सा सनगे, नवसेपंच्यासी आखीं, कृपा करून पाठविली ते स्वीकारली. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Malharrao Holkar acknowledges the receipt of some dresses sent as a present by the Peshwa on the occasion of a marriage.*

No. 10] [1-12-1764

पौ छ २० जाखर
खमस मार्गशीर्ष.

श्री.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बालाजी
जनार्दन स्वामी गोा

पो रघुनाथ बाजीराव नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष. चिरंजीव सौ रमाबाईस कर्नाटकांत न्यावयाकरितां आणावयास राा पांडुरंग कृष्ण याजबरोबर उंटे व तटे घोडी देऊन

---

[1] केशरी. [2] जरतारी.

पाठविले आहे. तरी आणिखी सरंजाम लागेल तो तुम्ही तेथून देऊन रवानगी करणे. रा छ ७ जमादिलाखर सा खमस सितैन मया व अलफ. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Raghunathrao writes to Nana Fadnis about the arrangements to be made to send Ramabai to her husband, the Peshwa, who was at this time in the Karnatak.*

No. 11] [*30-12-1764*

पौ छ ११ रजब सन

खमस पौष मास बा। कासीद.

श्री.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यांसी

पौ रघुनाथ बाजीराव नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणे विशेष. चिरंजीव सौ रमाबाईस आणावयासी रा पांडुरंग कृष्ण गडबोले व राजश्री गोविंद सिवराम याजकडील स्वार पाठविले आहेत. त्यास, रमाबाईचे शरीरास किंचित पीडा उपद्रव जाहाला आहे, पाये दुखतो, म्हणौन तुम्ही लिहिले. त्यास, तूर्त आणावयाचे प्रयोजन नाही. स्वार व पांडुरंग कृष्ण यासी पाठऊन देणे. रा छ ६ रजब. हे विनंती.

¶*Raghunathrao writes to Nana Fadnis that the plan of sending Ramabai to the Karnatak is, for the present, cancelled as she was suffering from some pain in her leg.*

No. 12] [*16-1-1765*

पौ छ ९ साबान खमस

माघ बा। सांडणीस्वार.

श्री.

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यांसी.

विनंती. उपरी, तीर्थस्वरूप सौभाग्यवती पार्वतीबाई व मातुश्री सगुणाबाई यांजकडे शागीर्दपेशाचे लोक खिजमतगार वगैरे आहेत, त्यांस कापड पावले नाही. त्याजवळ गवगवा करितात म्हणौन कळले. त्यास, खिजमतगारांचे कापड द्याव-

याविसीं तुम्हांस पेशजी लिाच आहे. त्याप्रों दिल्हेच असेल. सारांश गोष्ट, त्याजकडे माणसें आहेत त्यांचें कापड वगैरे कार्याकारण असेल ते देत जाणे. किरकोळ गोष्टीचा बोभाट नसावा. तुम्ही करीतच आहां; परंतु येथे ऐकिले त्यावरून लिहिले असे. रा छ २३ रजब. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa asks Nana Fadnis to see that clothing due to the servants of Parvatibai and Sagunabai is given to them and mildly hints that complaints in such petty matters should not arise.*

No. 13] [*4-2-1765*

पौ छ * रमजान
सन खमस फाल्गुन.

श्री.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बाळाजी
जनार्दन स्वामी गोसावी यांसी

पो रघुनाथ बाजीराव नमस्कार विनंती. उपरी, येथील जाणून स्वकीये लिहीत जाणे विशेष. चिरंजीव सौ रमाबाईस आणावयासी पेशजी रो पांडुरंग कृष्ण पाठविले आहेत. त्यास, हाली येथून रो रखमाजी आइतोळे पथकसुधा व ओझ्यास उंट नफर आठ यैसे पाठविले आहे. तर बराबर साहित्य डेरा वगैरे देऊन व पांडुरंग कृष्ण समागमे देऊन सौ रमाबाईची रवानगी सत्वर करणे. रा छ १३ साबान. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Raghunathrao writes to Nana Fadnis to make arrangements for taking Ramabai to Karnatak.*

No. 14] [*1-9-1766*

पौ छ २९ रोविल सन सब्बा.

श्रीशंकर.

चिरंजीव राजश्री माधवराव यांप्रति स्नो

आनंदीबाई आशीरवाद उपरी. येथील कुशल ताा छ १८ माहे रबिलावल जाणोन येथास्थित असे विशेष. तुह्मी पत्र पाा ते पावले. लिहिला मजकूर कळो आला. राजश्री बाळाजी जनार्दन यांसी लिहिले होते, त्यावरून तुम्ही कापड पाठविले ते यादीप्रमाणे पावले. बहुत काये लिहिणे हे आसीर्वाद.

¶*Anandibai acknowledges receipt of a letter and cloth sent to her by Madhavrao.*

No. 15] [21-2-1769

पौ छ १९ सवाल

तिसा माघ मास.

श्रीकृष्णवेणीप्रसन्न

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य
राजश्री रामशास्त्रीबावा यांशि

प्रति बाजीभट्ट चाविरे माहुलीकर साष्टांग नमस्कार विनंती. उपरि, येथील वृत्त माघ वद्य प्रतिपदेपर्यंत अपले कृपेकरून समस्त सुखरूप असों. यानंतरी येथें तुमचा चिरंजिवास वधू माभळेश्वर पुर्षोत्तमभट्ट अग्नहोत्री यांची कन्या वधू अंम्ही व वेदमूर्ति गोपाळ दीक्षित मिळून त्यांशी वचन करून लग्न फाल्गुण शुध्द प्रतिपदा अथवा नवमी या दोंही तिथीतील येक तीथ नेमस्त करूं म्हणऊन त्यांशी करार करून त्यांजला निरोप दिल्हा. परंतु येथें खर्चवेचाचा मजकूर गोपाळ दीक्षितास विचारिला. त्यानी अपलें वृत्त सांगीतले आणि अंम्हासही विदितच आहे जे. त्यांजपाशीं द्रव्य राहतच नाही. तथापि शेंपन्नास रुपयाचा विचार करतील. त्याने हें प्रयोजन सिधीस जातें ऐसा अर्थ नाही. पांचसातशा रुपयाचें प्रयोजन आहे. अंम्हीच हाही विचार करितो, परंतु अमचेही घरीं मुलाचे व मुलीचे लग्न यांतच उद्भवले आहे. याजमुळे आमचाही विचार प्रस्तुत चालेना. यास्तव अपणाकडे सूचना लिहिली असे. तरी कांही साहित्य करून मुलास घेऊन अपणच लग्नास यावें. मणजे काही न्यून दिसणार नाही आणि तुम्ही आलियानें त्या क्षेत्रांतही श्लाघ्यता दिसेल. नाही तरी समग्र पाहुणें मात्र दिसतील. यास्तव अग्नहोत्रसमवेत अगत्य येणे. कदानचित अपणास गुंता बहुतच असला तरी मुलास साहित्य करून पाठवणे. स्थळ उत्तम आहे. अनमान न करावा. कळले पाहिजे. बहुत काय लिहिणे, हे नमस्कार. मुलीचे सूत्रही पाठविलें आहे तें मुलास लाऊन पाहणे. चारसा बोटाचे अंतर असलिया कामावर पडेल. मल्हारभट्टास पुढे पाठवणे. माघून मुल येईल. साहित्यही मल्हारभट्ट आल्यासारखे केले जाईल. +कळावे.

¶*This letter by Bajibhatt informs Ramshastri that the marriage of his son has been settled to come off shortly and earnestly requests his presence for the occasion.*

\+ सबंध पत्र बालबोधींत आहे.

No. 16] [10-5-1769

पौा छ ३ मोहरम.

तिसा वैशाख प्रातःकाल.

श्री

राजश्री बाळाजी जनार्दन स्वामी गोसावी यासी विनंती. उपरी, बृहस्पतिवारीं सायंकाळी घटिका दिवस शेष राहातां मुहूर्त तुम्हास लिहून पाठविला आहे. परंतु त्यास दोष आहे यास्तव बुधवारीं पाहाटेस सा घटका रात्रीचा उज्याडता बृहस्पतिवार तोच चांगला यास्तव तोच मुहूर्त करार जाहाला. उदईक संगमावर मुकाम होईल. परवतीस भोजनाचें सायंकाळचें साहित्य व निद्रेचेंहि तेथेंच करणे. वरकड दाणावैरणीचें साहित्य संगमावर करणें. रा छ २ मोहरम हे विनंती.

¶*The Peshwa requests Nana Fadnis to make arrangements for his evening meal and overnight stay at the Parvati hill.*

No. 17] [29-12-1769

पौा छ १२ रमजान

सबैन.

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री

बाळाजी जनार्दन स्वामी गोसावी यांसि

पो माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष. चिरंजीव राजश्री माधवराव नीलकंठ याची मुंज श्रीत्रिंबकेश्वरी करणहार. त्यास, मुंजीकरिता श्रीत्रिंबकेश्वरी जातील.

सासवडाहू(न) ज्या मार्गे जातील, वस्तीस राहतील, तेथे चौकीपाहाऱ्याविसी दस्तक देणें १.

समागमे पंनास राऊत व पंनास माणूस हशमी त्रिंबकाहून जाऊन येत तोंपावेतों देणें १.

येक हतीण अंबारीची व दोन पालख्या बराबर देणें १.

महिपतराव त्रिंबक याजकडील ऐवज देण्याचे "देणे" यादीवर जाले आहे. त्यास, मारनिलेकडे वृतबंध आहे; सा माघ मासी देणेंयाचे यादीप्रमाणें पावता करणें १.

सदरहूप्रमाणें सरंजाम करून देऊन यांची रवानगी करणें. रा छ ३० शाबान सुा सबैन मया व अलफ. बहुत काये लिहिणे, हे विनंती.

¶*The Peshwa orders that a retinue of 100 men, one female elephant and two palanquins should accompany the Purandares who were going to Trimbak to celebrate the thread-ceremony of Madhavrao Neelkanth Purandare.*

No. 18] [*27-1-1770*

पौ छ २५ जिलकाद
सबैन फाल्गुन

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बाळाजी
जनार्दन स्वामी गोसावी यासी

पो माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणोन स्वकीये लिहीत जाणें विशेष. नाटकसाळाच्या दोघा मुलांची लग्नें येंदा करणे म्हणून * * * * गंगापुराहून राजश्री हरि जिवाजी यांस लिहिले. त्याणी हुजूर लिहिले. ऐशास, गुदस्ताहि नाटकसाळाचे दोघा मुलांची लग्नें जाहाली. त्यास खर्च काये लागला तो मनास आणून त्याप्रों हाली साहित्य देऊन हरि जिवाजी याजकडून लग्नें करवणे. जाणिजे. छ २९ रमजान सुा सबैन मया व अलफ. बहुत काये लिहिणें हे विनंती.

¶*The Peshwa orders that arrangements should be made for the marriages of two illegitimate sons of the Peshwas' household.*

No. 19] [?

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री मोरो हरि
स्वामीचे सेवेसी

सेवक परशराम नारायेण अनगल कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील क्षेम जाणून स्वकीये कुशल लिा असावे विशेष. आपले घरी चिरंजीव कन्येचे

लग्न मार्गेश्वर वद्य ९ चे आहे. शरीरसंमंध श्रीमंत बज्याबा पुरंदरे यांसी केला आहे. तरी कृपा करून येऊन मंडप सोभिवंत केला पाहिजे. बहुत काये लिहिणे, लोभ कीजे, हे विनंती.

¶*Parsharam Narayan Angal invites Moro Hari to attend the marriage of his daughter with Bajyaba Purandare.*

No. 20] [*21-4-1774*

श्री

राजश्री हरिपंत गोसावी यांसी

विनंती. उपरी, चिठी पाठविली ते प्रविष्ट जाहली. मातुश्री गंगाबाईस पुत्र छ ६ सफर रोज गुरुवारी जाला हें संतोषाचे वर्तमान लिहिलें येणेकडून फारच समाधान होऊन आनंदावाप्ति जाहली. ईश्वरे सर्वत्रास छत्र केले. रा छ ९ माहे सफर. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The writer expresses his joy on learning of the birth of Sawai Madhavrao.*

No. 21] [*5-12-1778*

श्री

वेदमूर्ति राजश्री बाळ जोसी मालगुंडकर यांसी

सेवक रघुनाथ बाजीराव प्रधान नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशाळ जाणोन स्वकुशाळ लिहिणें विशेष. तुम्ही पत्र पाठविलें ते पावोन नवऱ्यामुली पाहिल्याचा मजकूर लिहिला तो कळला. ऐशास, लग्न करावयाचा निश्चयच आहे ऐसें नाही. समक्ष नवऱ्यामुली पाहिल्यानंतर बनल्यासारिखे मर्जीस आल्यास निश्चय होईल. सविस्तर जनार्दन मुकुंद व पांडू जेठी यांचे जबानीवरून कळेल. जाणिजे. छ १९ जिलकाद. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Raghunathrao, desirous of taking a new wife, writes to Bal Joshi Malgundkar about the selection of a bride.*

5055

No. 22] [16-11-1798

पौ छ १० जमादिलाखर

श्री

चिरंजीव राजमान्य राजश्री बाबा यासी प्रति जिऊबाई चापेकर अनेक आसीर्वाद येथील कुशल तागाईत कार्तिक शुध्ध ८ पावेतो मुकाम जुनर येथे वर्तमान यथास्थित असे विशेष. चिरंजीव सौ राधाबाई यास पदर घालावयाचे दिवस आहेत, येविसी राघोबास समक्ष सांगितले आहे. विनंती करील त्याप्रमाणे मुहूर्त पाहून पदर घालावयाचें करावें. दिवस राहिले नाहीत. आपण लक्ष प्रकारे यावयाचे करावे म्हणजे आम्हास भेट होईल. कलावे. येविसी अन्याबा याणीहि लिहिले आहे. बहुत काय लिहिणे हे आसीर्वाद.

¶*Jiubai Chapekar invites Peshwa Bajirao to attend the dressing ceremony of Radhabai.*

No. 23] [22-2-1803 ?

श्रीराम

शेवेसी विनंती सेवक जनार्दन नारायण चरणावर मस्तक ठेऊन कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा फाल्गुन शुा १ मंगळवार प्रात:कालपावेतो मुकाम माहाड येथे आपले कृपेकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. मी अंजणवेल व सुवर्णदुर्ग तालुक्याहून माहाड तालुक्यांत येऊन येथे शोध करून आज निघोन तल्याघोसल्यांवरून वसई व कल्याण प्रांतात जातो. काा गोहागर येथे वो राजश्री विनायकभट खरे यांची कन्या वर्ष ६ सरून सात वर्ष आशाड मासीं लागेल. ती मूल चांगल्यात दृष्टीस पडली. तेव्हां वेदशास्त्रसंपन्न राजश्री नीलकंठशास्त्री थते हरणईस होते त्यास दाखविली. त्याणी सांगितले कीं, ही मुलगी श्रीमंत माहाराजास व आपल्यास दाखवावी. त्यावरून पुण्यास रवानगी करून देत होतो तो स्वारी कोपरगावांस निघोन गेली. त्यास कोपरगावास पाठवावे तरी त्याचे म्हणणे पडले कीं, आम्ही गैरमाहीत, अनभस्त. आम्ही तुमचे बरोबर जाऊं, मधी साफ जात नाही. त्यावरून त्यास बरोबर घेतली आहेत. मुलीची मातुश्री गरोदर सात महिन्याची आहेत. त्यास मी हे तालुके पाहून त्यास घेऊन कोपरगावास यावे तरी परवानगीखेरीज येतां न ये. याजकरितां विनंती लिहिली आहे. त्यास श्रीमंत माहाराजास विनंती करून कोपरगांवास येण्याची आज्ञा घेऊन लेहून पाठवावयास आज्ञा जाली पाहिजे म्हणजे सत्वर येतो. आणखी दोन मुली यक सोमण व यक सहस्त्रबुधे

यांच्या नव वर्षाच्या मध्यम प्रतीत आहेत त्या तूर्त आणीत नाहीं. भेटीनंतर त्यांचें स्वरूप वर्णन करीन, नंतर जसी आज्ञा होईल त्याप्रो करीन. कोपरगावास येण्याची परवानगी सत्वर घेऊन आज्ञापत्र पाठविले पाहिजे. नाही तर जसी आज्ञा येईल त्याप्रमाणें करीन. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Janardan Narayan, who, it appears, was touring in the Konkan on a mission of selecting a bride for the Peshwa, writes about a certain girl whom he intends to take to Kopargaon for the latter's approval.*

No. 24] [*21-8-1813*

श्रीगजानन

राजश्री सदासिवपंत व हरि
भगवंत गोसावी यांसी

॥ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो त्रिंबकजी पाटील डेंगले रामराम विनंती उपरी. शुक्रवारचे वाड्यांतील भोजनखर्चाचे साहित्याबद्दल रा। गोविंद केशव बेडेकर याचे हवाली करविले १००० रुो येकहजार चांदवड सदरहु पुणे मु॥ तुम्हाकडून देविले असेत. तरी सदरी लिहिल्याअन्वयें येक हजार रुो चांदवड छापी रा। गोपाल बलाल आपटे यांचे हवाली करून पावती घेऊन पाठऊन देणे. रा। छ २३ साबान सु॥ आर्बा आशर मयातैन व अलफ बहुत काय लिहिणे हे विनंती.

Trimbakj Dengle draws upon Sadashivpant and Hari Bhagwant for the sum of Rs. 1,000 to be spent on dinner expenses at the Shukrawar Palace, Poona.

No. 25] [*30-1-1814*

श्रीगजागजानन

राजश्री सदासिवपंत व हरि भगवंत
गोसावियासी

॥ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो त्रिंबकजी पा। डेंगले रामराम विनंती उपरी. बुधवारचे वाड्यात छपरपलंगाचा घटाटोप मखमली केला आहे, त्यास आस्तर तापत्याचे लाविले ते काढून मखमल लाऊन स्वारी तेथे आली नाही तो तयार करून ठेवणे. सरकारचे स्वारीचा मुकाम आज दहिवडचा जाला.

+ 'गजागजानन' हीं अक्षरें त्रिंबकजीच्या हातचीं आहेत.

उदइक सामवारा कूच हाऊन घाटमाथा अन्नछत्राचे मुकामी जाऊ. तथून मंगळवारी सांगुरण्याचे डोहावर मुकाम होईल. तेथून माघ शुा १३ बुधवारी स्वारी पुणियास येत आहे. त्यास सरकारचे च्यारी वाड्यांत बिछाईत घालून वर चांदण्या धुवट घालाव्या व छतें धुवट बांधून सरकारमर्जीजोगी तयार करावी व गणेशपेठेतील वाड्याची बिछाईत घालून चांदण्या घालाव्या. कोणताही बोभाट न पडे ऐसा बंदोबस्त ठेवावा. पेंढारियाची बातमी काय आली असेल ती लिहून पाठवावी. रा छ ७ सफर साइंकाल मुा दहिवड. बहुत काय लिा हे विनंती.

¶*Trimbakji Dengle from Dahiwad instructs Sadashivpant and Hari Bhagwant to decorate Peshwa's palaces in Poona tastefully.*

2. The Ganapati Festival.

No. 26] [*9-8-1768*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक सुबाजी सेषाद्रि साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ २९ रबिलौवलपर्यंत सेबकाचे व किले कोरीगडचे येथास्थित आसे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र सादर जाले तेथे आज्ञा जे, गणेशचतुर्थीच्या मोहत्सवाकरिता मोरपिसाचे सरकारात प्रयोजन आहे. आमवास्येआलीकडे च्यार रोज येऊन पावे ते करणे म्हणौन आज्ञा. आज्ञेप्रों प्रेत्न करून सेवेसी रा करू. विदित जाले पाहिजे हे विज्ञाप्ति.

¶*Subaji Seshadri, from Korigad, writes to the Peshwa that, as desired by him, he will arrange to send the peacock-feathers required for decoration on the occasion of the Ganpati festival.*

No. 27] [*5-9-1774*

श्री

राजश्री नारो आपाजी स्वामी गो

विनंती. उपरी, पत्र पाठविले ते पावले. गणपति उत्छाहाची याद पावली. अनुष्टानाचे येकवीस ब्राह्मण च्यार दिवस लावणे. कलावंताचे ताफे चागले पांचसात व हरदास जुने बहुतां दिवसांचे सातआठदाहापर्यंत असतील तितके याकरवी उछाह करणे. सालाबादप्रमाणे इतक्यांस बिदाई करणे. विशेष कांही करावयाचे नाही. जाणिजे. छ २८ जाखर सुा खमस सबैन मया व अलफ.

¶*Instructions from Nana Fadnis to Naro Appaji regarding the celebration of the Ganapati festival at the palace of Poona.*

\+ यापुढील मजकुर नाना फडणविसाच्या हातचा.

No. 28] [12-9-1774

पो छ ६ रजब सुा
खमस भाद्रपद मास बाा
रामजी गंगाजी जथे बजाजी नाा

श्री

राजश्री नारो आपाजी स्वामी गो यांसी

विनंती. उपरी, श्रीगणपतीचा उत्साहा होत आहे त्यास ललिताचे दिवसी समारंभ बहुत होत असे तो तसा करावयाचा नाहीं. नित्य हरिकीर्तन होत असते त्याप्रमाणेंच ललिताचे रोजी करून ललिताच्या चार ओव्या म्हणून आर्ती करवावी. खिरापत वाटल्यानंतर स्वस्तपणें बसोन प्रसाद श्रीमंतास वगैरे घेणे ते द्यावे. बंदोबस्त चांगला राखावा. गणपति पोहोचवाल त्या दिवशी पालखींत गणपति घालून समागमे वाजंत्री यांचा एक ताफा देऊन पोहोचवावा. आणखी कांहीं समागमे न देणे. थोडक्यात लिहिल्याप्रमाणें करावे. जाणीजे छ ५ रजबु सुा खमस सबैन मया व अलफ. हे विनंती.

¶*Instructions from Sakharam Bapu to Naro Appaji regarding the celebration of the Ganpati festival.*

No. 29] [29-8-1778

पौ छ ७ सांबान भाद्रपद
तिसा सबैन.

श्री

सेवेसीं मल्हार बलाल साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ ५ साबान-पर्यंत स्वामीचे कृपेकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. पुरंदरी श्रीगणपतीचा उत्साह चतुर्थीपासून काल शुक्रवारपर्यंत यथास्थित जाहला. रात्रौ नित्य श्रीमंत कथेस बसत होते. दीड पावणेदोन प्रहरपर्यंत रात्र कथेस होत असे. काल सा घटिका दिवस शेष राहिला होता, तेव्हां श्रीगणपतीचें प्रस्थान जाहलें. स्वारीसमागमें श्रीमंत गेले होते. पर्जन्याची झड बसली होती, परंतु स्वारी जातेसमई चांगला पर्जन्य उघडला होता. स्वारीस शोभा फारच चांगली आली होती. राजहंस बच्या हती याजवर जरीपटका दिल्हा होता व तेजरावा हतीण सिवापुराहून आणिली होती तिजवर नौबत ठेविली होती. श्रीमंताची मर्जी बहुतच प्रसन्न होती. आज तेजरावा हतीण मागती सिवापुरास रवाना केली. स्वारीचा बंदोबस्त राजश्री बलवंतराव पटवर्धन याणी चांगला केला

होता. आपण श्रीमंताचे पालखी जवळ होते. स्वामीच्या वाड्यापुढील रस्त्याने थोरल्या तल्याकडे स्वारी गेली होती. रजब महिन्याच्या कीर्दी जिनसखाना, जामदारखाना व रत्नशाला ऐशा इा छ १६ रजब ताा छ २९ मिाापर्यंत व वाकेनिसाकडील खर्चाच्या यादी सदरहू तेरखांच्या व येक खिजमतगारांच्या गुजारतीच्या खर्चाची ऐशा यादी व कीर्दी पाठविल्या आहेत. सेवेसीं प्रविष्ट जालियाचें उत्तर आलें पाहिजे. यादी व कीर्दीचे बंद दफ्तरांत स्वारीकडे द्यावयाची आज्ञा जाली पाहिजे. राजश्री बालाजी गोविंद प्रां बुंधेलखंड यांजकडून श्रीमंतास आबवी रंगीन पाच पोशाख येथें राजश्री आपाजी जनार्दन घेऊन आले त्याची किमंत रुो

१५० तिवटें ५ दर ३०
१२५ दुपटे ५ दर २५
१२५ शेले ५ दर २५

४०० १५

येणे प्रो च्यारशें रुपये किमतीची पंधरा सनगें आलीं त्याजवर तिवटा आख घालून त्याची याद आलाहिदा पाठविली आहे. तीं सनगें ३ साबानी कीर्दीस जमा धरावयाची आज्ञा जाली पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Malhar Ballal gives an account of the celebration of the Ganpati festival at Purandar.*

No. 30] [*23-8-1815*

श्री

शेवसा चिंतो वामन देशमुख कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना विशेष. श्रीगणपतीचे उछाहाबद्दल सालमजकूर सन सीत आशर मयातैनचे खर्चाबद्दल ऐवज सरकारांतून पोतापैकीं राजश्री जनार्दन कोंडदेव गाडगील पोतनीस याजकडून देविला ते

रुो

रुो

२५०० खुद आमचे विद्यमाने खर्च व्हावयाचा ते
१५०० श्रीगणपति व ऋधीसिधीच्या वगैरे मूर्ति मृन्मयकरावयाबद्दल
१००० रोशनाईकडे मेणबत्या खरेदी बाा

२५००

२००० आपाजी रामचंद्र आगाशे कारकून दिा जवाहिरखाना याचे व आमचे विद्यमाने खर्च हरिदास व गुणिजन यांस बिदागीस नक्त व सिध्याचे जिनसाचे व कापडाचे खरेदी बाा
७५०० बिदागीबद्दल नख्त व कापड मिळोन
४५०० सिध्याचे जिनसाबद्दल

१२०००

१४५००

येकूण चवदा हजार पांचसे रुपये चांदवड छापी सदरहूप्रमाणे देविले. ते आमचे हवाली जाहाले. छ १७ रमजान श्रावण मास सुा सीत आशर मयातैन व अलफ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Chinto Waman acknowledges the receipt of a sum of Rs. 14,500, sanctioned for the expenses of the annual Ganpati festival.*

---

3. Education, sport, travel.

No. 31]

श्री

विज्ञापना. श्रीमंत राजश्री नारायेणरावसाहेबाचे अक्षर पाहावयास पाठविले आहे. पाहावे. हे विज्ञापना.

¶*Young Narayanrao's handwriting is submitted for the Peshwa's inspection.*

No. 32] [*29-12-1761*

श्री

राजश्री मोकदम मौजे पानवडी गोसावी यांसी

श्रो नीलकंठ माहादेव पुरंधरे आसीर्वाद. सुा इसने सितैन मया व आलफ. राजश्री रामशास्त्री यांची वस्तभाव व कुटुंब येसे मौजे मजकुरी आले आहेत. तरी मौजे मजकूरचा बेरडास ताकीद करून चौकीपाहारा चांगला करीत जाणे. जाणिजे. छ २ माहे जाखर.

¶*Neelkanth Mahadev Purandare orders the Mukadam of Panavdi to look to the safety of Ramshastri's family who had gone to that village with their belongings.*

No. 33] [19-10-1764

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बालाजी
जनार्दन स्वामी गोसावी यांसी

पो। रघुनाथ बाजीराव नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीयें लिहीत जाणे विशेष. पुस्तकाकडील लेखक आा ३ तीन व सदासिव कृष्ण कारकून येकून च्यार आसामी यास पुणेयास येतील त्यास वाडेयात भोजनास घालून कागद व शाई वगैरे सामान लागेल ते देत जाणे. रा। छ २३ रबिलाखर सु॥ खमस सितैन मया व अलफ. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Raghunathrao requests Nana Fadnis that the three scribes who are employed should be provided with writing materials and other necessaries at Poona.*

No. 34] [4-1-1765

पौ॥ छ १८ रजब पौष मास

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बालाजी
जनार्दन स्वामी गोसांवी यांसी

पो॰ष्य नारायणराव बल्लाळ नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीय कुशललेखन करीत जावे विशेष. तीर पाठवावयासी पूर्वी तुम्हास तपसीलवार याद पाठविली. परंतु अद्याप तीर पाठविले नाहीं. याजकरितां हाली तीर आणावयाकरिता फिरंगोजी नवल्या खिजमतगार पाठविला असे. तरी पत्र पावतांच तीर सत्वर पाठवणे व लिखिते वाचावयाकारितां थोर थोर सेपन्नास पावेतो जरूर पाठवणे. आजपर्यंत तीर येतात म्हणून मार्ग पाहिला. परंतु यावयाची अवध चुकली. पत्र गेल्यास बहुत दिवस जाहाले, तेव्हा तुम्हांस कारभारामुळे विसमृत जाली हा निश्चयहि दिसोन आला. यास्तव खिजमतगार या कामगारीस मुजरद पाठविला आहे. तर कारभारामध्ये दोन घटका अवकाश करून पूर्वी लिहिल्याप्रमाणे तीर सत्वर पाठवणे, व लिखितेहि सत्वर पाठवणे. रवाना छ ११ रजब. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Narayanrao Ballal requests Nana Fadnis to send the arrows, which he had asked for long ago, and some Modi handwritings for practising reading.*

No. 35] [19-11-1766 ?

श्री

वडिलांचे सेवेसी अपत्यें आलीबहादर विज्ञापना. येथील क्षेम ता छ ११ माहे सफर मुक्काम पुणे आसीरवादेंकरून सुखरूप असो विशेष. बहुत दिवस जाले, वडिलाकडून आसीरवादपत्र आले नाही. सदैव पत्रे पाठऊन लेकरांचा सांभाल करीत असिले पाहिजे. वडिलासिवाई कोण करणार आहे? लिहिणे सिकवावयासी पंतोजी पाहिजे; त्यास, वडिलाचे वेलेचा येमाजीपंत आहे त्यास तैनात सालिना होती नख्त रुा ५०० व कापड आख १०० येणेप्रमाणे आहे. वडिलानी करार करून देविला पाहिजे. खासी घोडी बसावयाची होती ती मेली. दुसरी खासी घोडी नाही. त्यास वडिलानी खासी घोडी चांगली गरीब देविली पाहिजे. सेवेसी रंगोपंत कारकून पाठविले आहेत, हे सर्व कामकाजाविसी विनंती करितील त्याजवरून विदित होईल. चालविणार वडील आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Ali Bahadar requests the Peshwa to sanction the remuneration for his teacher Yamajipant and to supply him, for riding, a new mare as the old one has died.*

No. 36] [12-12-1766

पौ छ १६ रजब
सबा मार्गसीर्ष

श्री

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यासी

विनंती. उपरी, अलीबाहादर यांजकडील गाडीचा बैल येक मेला. त्यास मुबादला बैल येक तोफखानापैकी पाहून देणें. पांच उंटे त्यांची लस्करांत आली होती तीं माघारी पा॰ असेत. वाटेची बेगमी येथून केली असे. वरकड त्यांजकडील किरकोल कामकाज असेल तें तुम्ही मनास आणून करून देत जाणें. रा छ ९ रजब सुा सबा सितैन मया व अलफ. बहुत काये लिहिणें हे विनंती.

¶*The Peshwa writes to Nana Fadnis, asking him to pay attention to all the requirements of Ali Bahadar.*

5063

No. 37] [23-2-1767

पो छ सवाल सन
सबा सितैन.

श्री

पुा राजश्री बालजी जनार्दन स्वामी गोसावी यांसी

विनंती उपरी,

वो राजश्री मोर जोसी यांस पद्म-पुराणाचे गणपतिसहस्रनाम ल्याहावयाची आज्ञा जाली होती, ते त्याणी लेहून दिल्हे ते पाठविले आहे म्हणौन लिहिले ते कळलें. गणपतिसहस्रनाम येऊन पावलें

सिंव्हाच्या तोंडाचा तोडा करावयाची आज्ञा जाहाली व कडी निमोनियाची पाठविली ते पावली. त्याप्रो, तोडा अंतू सोनार सातारकर याचे हातचा वाटला, त्यासच बोलाविला आहे. त्याजकडून करवितो म्हणौन लिहिले ते कळले. उत्तम आहे.

रा छ २३ रमजान. बहुत काये लिहिणे हे विनंती.

[*The Peshwa acknowledges the receipt of a certain manuscript sent by Nana Fadnis.*

No. 38] [29-10-1769

पौ छ ४ रजब.

श्री

राजश्री मोत्याजीराव विचारे गोसावी यांसी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री विसाजी केशव आसीर्वाद विनंती. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असावें विशेष. श्रीमंत सौभाग्यादिसंपन्न मातुश्री पार्वतीबाई व रमाबाई श्रीगणपति पुळे येथे येणार तेव्हां रत्नागिरीसहि येतील. तरी महादेव पाल व दत पाल आणखी दोनच्यार गलबते सदरहू पाल गोदीतून बाहीर काढून कार्याकारण चालतें सामानाची तरतूद करून रत्नागिरीस आणून बाईसाहेबांस दाखवणे. हकारणी करून तोफांची सरबती करून दाखवणे. दोन वेळा सरबती करणे. रा छ २८ जाखर सुा सबैन मयां व अलफ. बहुत काये लिहिणे, लोभ करावा, हे विनंती.

[*Visaji Keshav writes to Motyajirao Vichare that he should arrange to show, at Ratnagiri, four or five ships and fighting vessels to Ramabai and Parvatibai when they visit that place during their trip to Pule. He further asks that two rounds should be fired from the ships in their presence.*

No. 39] [17-9-1763

श्री

राजश्री नारो आपाजी गोसावी यासी

सुा आबा सितैन मया व अलफ. सरकारची पुस्तकें आहेत, त्याची कारकुनी सदासिव कृष्ण आंबेकर यास आहे. त्यास, त्याजला बोलाऊन आणून, पुस्तकें होतीं किती, त्यापैकी गेली काये, बाकी राहिली किती, हा झाडा पुस्तकांचा काढून लिहून पाठवणे. पिवले पत्राचे भारथ होते ते गेले किंवा राहिले त्याचा शोध काढून लिहून पाठवणें. जाणिजे.

छ ८ रौवल. बहुत काये लिहिणे

¶*Naro Appaji is asked to take stock of the books belonging to the Peshwa's library and to make a detailed report, mentioning therein the number of missing ones.*

No. 40]

श्री

राजश्री बालाजीपंत नाना
गोसावी यांसी

⁂ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो माहादजी सिंदे दंडवत विनंती. उपरी, येथील कुशल जाणौन स्वकीये कुशललेखन करीत असिले पाहिजे विशेष. श्रीमंतास येथे पुस्तकाचे अगत्य आहे. त्यास या कामाकरितां खंडो व्यंकटेश व सदासिव राम शागीर्द पाठविले आहेत. तरी अलाहिदा यादी पाठविली आहे त्याप्रमाणे पुस्तकें व दयाराम भट वैद्य याजकरवीं औषधें केली आहेत तीं व हरणें पुण्यातील व टोक्याहून नेली तीं उभयताबाार सत्वर पाठऊन द्यावी. अगत्य जरूर जाणौन श्रीमंतानी शागीर्द पाठविले आहेत. राा छ २० जावल. बहुत काये लिहिणें, लोभ कीजे, हे विनंती.

¶*Mahadaji Sindia asks Nana Fadnis to send, among other things, certain books which were badly needed by Raghunathrao.*

No. 41] [2-1-1776

पाो छ १० जिलकाद
सीत सबैन

श्री

विनंती. इंग्रजाकडील वकील आला आहे तो श्रीमंताचे भेटीस येईल. त्याच्या टोप्या व आंगरखे पाहून श्रीमंत भयाभीत होतील, यास्तव आगोधर भीट करावे

लागते. ऐशास जामदारखान्यांत व जिनसखान्यात वगर कारखान्यात टोप्या व आंगरखे इंग्रजाचे साजाचे व सोंगाचे पाठऊन द्यावे म्हणौन पत्रीं लिहिले. त्याजवरून टोप्या व कुडत्या मिळोन साडे(स)हा सनगे पाठविली. त्याची याद आलाहिदा पाठविली आहे. सदरहू सनगे महमद रफी सांडणीस्वार दिा पागा हुजूर निा गोविंदराव सदाशिव याजबराबर रवानगीस लिहून पाठविली आहेत. सरकारांत प्रविष्ट जाहालियाचे उतर पाठविले पाहिजे. रवाना छ ९ जिलकाद सोमवार हे विज्ञाप्ति.

¶Some English bonnets and coats were supplied for the wardrobe of the young Peshwa in order to make him accustomed to the English dress so that he might not get frightened at the strange costume of the British envoy when he presents himself before the young Peshwa at Purandar.

No. 42] [*11-1-1784*

श्री

यादी पुस्तके मातुश्री सगुणाबाई यांजकडील पुस्तकशालेकडे जमा. सुा आर्बा समानीन मया व अलफ छ १७ सफर

किता		पत्रे
	अध्यात्म रामायण	
१	बालकांड	७१
१	अयोध्याकांड	६९
१	अरण्यकांड	५१
१	किस्किंदाकांड	५७
१	सुंदरकांड	२९
१	युध्धकांड	९७
१	उतरकांड	७२
७		४४२

किता

१ प्राा पोथी
  १ योग वासिष्ट पत्रे ७२
  १ हरितत्व मुक्तावली ८९
  २

१ कर्णामृत
  १ प्राा शतकमूळ
    दर शतकाची पत्रे ९ प्राो २७

१ प्राा टीकाकर्षणामृत
  १ प्रथम पत्रे ५०
  १ द्वितीय ६४
  १ त्रितीय ६३
  ३ १७७

१ पंचदसी
- १ द्वैत विवेक १०
- १ वाक्य विवेक ३
- १ भूत विवेक १४
- १ तत्व विवेक १६
- १ पंचकोश विवेक १०

९३

- १ चित्र दीप ३९
- १ नाटक दीप ६
- १ ध्यान दीप २२
- १ त्रृप्ति दीप ४४
- १ कूटस्त दीप १२

११९

- १ ब्रम्हनंदापासून विशयानंदपर्यंत पत्र ६७

११ २३९

१ भागवत स्कंद २
- १ द्वितीयाध्याय ३१
- १ येकादश ११९

२ १५०

१ भागवत स्कंद पत्र
- १ प्रथम ८७
- १ द्वितीय ४८
- १ चतुर्थ स्कंद ११७

३ २५२

१ प्रा पोथी लहान
- १ सूर्य नामावली तृटित पत्रे ४
- १ कृष्ण अष्टशत नामस्तोत्र पत्रे ८
- १ देवी अष्टशत नामावली पत्रे ४
- १ सिवाष्टक स्तोत्र पत्रे २
- १ सप्तशतीतील देवीकवच १८
- १ गौरीदशक पत्रे ३
- १ द्रोपदीक्रांतस्तव पत्रे १
- १ भागवतातील दशम स्कंदातील अध्याय पत्रे १२
- १ गजेंद्रमोक्ष भागवतातील पत्रे १६
- १ भागवतातील अध्याय येक ३
- १ भागवतातील प्रथम स्कंदातील अध्याय तिसरा पत्रे ८
- १ गीतेंतील अठरावा अध्याय पत्रें ८
- १ सिव सहश्रनामावली पत्रे १८
- १ भागवतातील दशम स्कंद पैकी अध्याय येक पत्रे १६
- १ रामस्तोत्र अध्यात्मरामायणातील पत्रे ३
- १ विष्णुस्तुति ब्रहन्नारदीतील पत्रे १९
- १ आदित्यरुप्य (?) स्तोत्र बंद ३
- १ रामस्तोत्र बंद २

१८

३

१०

१ वही किनखापी
  १ गणेश सहस्रनाम
  १ विष्णु सहस्रनाम
  १ वासुदेव स्तोत्र
  १ जन्म रहस्य
  १ यम गीता
  १ द्वाधशअध्याई भागवतातील
  १ गीतगोविंद
  —
  ७

१ प्रा जडगिरी बंद बारिका अक्षराचे ताईतातील
  १ भागवत
  १ गीता
  —
  २

१ गीता चित्रासहित पत्रे १२० की
—
७

सामान | सुमार

९ वष्टणे
  ४ खारवा
  ३ ताम्याची
  २ गजनीची
    १ प्रा अस्तर किनखापी
    १ किता
    —
    २
  —
  ९

७॥ फल्या जोड
  ७ प्रा जोड
  १ फली येक
  —
  ८
—
६१॥ फल्या १५

येकूण पुस्तके दाहा व वेष्टणे नऊ व फल्या लाकडी सुमार १५ पंधरा सदरहूप्रो पुस्तकशालेकडे जमा असेत.+

¶*This is a list of books which were in the possession of Sagunabai, wife of Janardan Bajirao. Many similar lists of books have been discovered; this one is fuller than the others, which are therefore not printed here.*

+ सगुणाबाई जनार्दन बाजीरावाची बायको, रामजी अनंत भिडे याची कन्या, लग्न २०-४-१७४४. जनार्दनपंत २१-९-१७४९ रोजीं वारला. त्याचे पश्चात् ही बाई पुष्कळ वर्षें जिवंत असून ती १३-११-१७८३ रोजीं वारली. तेव्हां तिच्या जिंदगीची मोजदाद झाल्यापैकीं ही पुस्तकांची यादी ता. ११-१-१७८४ ची आहे. या यादीवरून त्यावेळीं घरंदाज स्त्रियांचें वाचन व ज्ञान कशा प्रकारचें असावें याचा अंदाज होऊं शकेल. पेशव्यांच्या पोथ्यापुस्तकांचें भांडार मोठें होतें, तेंच हल्लीं भांडारकर इन्स्टिट्यूटमध्यें असावें.

No. 43] [26-3-1767 ?

पौ छ २९ सवाल

फाल्गुन

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बाळाजी
जनार्दन स्वामी गोसावी यासी

पोष्य नारायणराव बलाल नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहिणे विशेष. दाहा बोथाट्या उतम बोंडाच्या बुळ्यासमेत, त्यात दोन आम्हाजोग्या बारा हात लांब आखूड पेराच्या, व दाहा भाले फळी बुळ्यासमेत तयार करून पाठवणे. दोहोंचहू दिवसी घोडी फेरावयास जाण्यामुळे बोथाट्या फार मोडतात. बोथाट्या व भाले सत्वर पाठवणे. रवाना छ २१ सवाल. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Narayanrao asks for some bamboo-sticks from Balaji Janardan, as they get frequently broken in the lance exercises. The whole letter is in his own hand.*

No. 44]

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बाळाजी
जनार्दन स्वामी गोसावी यांसी

पोष्य नारायणराऊ बलाल नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहिणें विशेष. नंदराम बिन भवानी पहिलवान याचे घरीं लग्न आहे याकरितां पुण्यास आला आहे. यास इा छ १ सवाल ता छ १९ मिनहू पावेतो पंधरवडा सिधा सिरस्तेप्रमाणें रुजू पाहून देणें. पुढें सिधा न देणें. गंगापुरास रवाना करणें. रा छ २० माहे रमजान. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Narayanrao Ballal writes to Nana Fadnis about allowance to be given to a certain wrestler who, presumably, was under state patronage.*

No. 45] [8-12-1776

पौ छ २८ सवाल

सन सब

श्री

सेवेसी बाजी बलाल परांजप्ये कृतानक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाइत कार्तिक वद्य १३ रविवारपर्यंत यथास्थित असे विशेष. श्रीमंत राजश्री रावसाहेब यास हती बसावयास डोंगरसाकडून करविला आहे. त्यास येक शेर रेसीम व कलाबतु तोल ९ व गंगावन पांढरे वजन अर्धशेर याप्रमाणे पाहिजे. याजकरितां खंडोजी खंडागला पाठविला आहे, हा विनंती करील. त्यास विनंती लिहिली आहे याप्रमाणे ताकीद करून देविले पाहिजे. हतीस सकलाद पाहिजे ती येथून दोन गज लाल व आद गज हिर्वी येकूण आडीच गज पाठविली आहे, ही डोंगरसा यास देवावी. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Baji Ballal Paranjpye writes about a toy-elephant which was being prepared for the young Peshwa.*

No. 46] [21-1-1765

पौ छ ९ साबान खमस

बा। सांडणीस्वार माघ मार.

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बालाजी
जनार्दन स्वामी गोसावी यांसी

पोष्य माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणें विशेष. गुलकंदाचे प्रयोजन आहे. याजकरितां सांडणीस्वार पा। आहेत. याजबरोबर गुलकंद पके दाहा सेर पाठऊन देणे. सिलकेस असिला तर उतम जाहाले. नसिला तर चांगला पाहून खा। करून पाठऊन देणे. ब्राम्हणोदकाचे गुलाबाकरिता तुम्हांस लिहिले होते; त्यास, तुम्ही लिहिले की, लक्ष्मण कोनेर यास लिहून पा। आहे व दुसरे गुलाबाविसीं वसईस लि। आहे. आला म्हणजे पाठवितो म्हणौन लि। ते कलले. त्यास, ब्राम्हणोदकाचा गुलाब नारो बाबाजी याचे घरी होत असतो. त्याजकडील धोंडो सालगु। लस्करात होते ते सांगत होते. याजकरितां त्यास पत्र लिहिले असे. आणून पाठऊन देणे. वसईहून गुलाब आणविला आहे तो आला म्हणजे पाठऊन देणे. रा। छ २८ रजब बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa asks Nana Fadnis to send some rose-water and ten seers of conserve of roses.*

No. 47] [25-4-1769

पौ छ २० जिल्हेज

तिसा सितैन.

श्री

सेवेसी सदासिव अनंत कृतानेक सा। नमस्कार विज्ञापना. यथील वर्तमान ता। छ १७ जिल्हेज येथास्थित असे विशेष. आवल्याचा मुरांबा वजन पक्के ८। दाहा सेर येकून येक घागर व पंखे दांडींचे दोन, पैकी येकास चांदवा वाल्याचा व येकास किनखापी, झालर ताफ्त्याची पिवली तांबडी दोन प्रकारची, येकून पंखे दोन सेवेसी पाठविले आहेत. पावल्याचे उतर पाठवावयासी आज्ञा केली पाहिजे. स्वामीचे चितात काही दिकत येईल, तरी सरकारचे लांझ्याचे नाही. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Sadashiv Anant requests the Peshwa to accept two fans and one potful of jam made of certain medicinal fruits.*

No. 48] [18-11-1765

पौ छ ११ जाखर

मार्गसीर्ष मास

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री

बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यासी

पो रघुनाथ बाजीराव नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये लिहिणे विशेष. माणकोजी चितारी यास त्रिंबकी चित्रे काढावयास नेहमी आज्ञा केली आहे. त्यास, याचे सामान पुणियात घडोची व रंगाचे खल वगैरे जे असेल त्यास दोन कामाठी वोझियास देऊन त्रिंबकास पोहचाऊन देणे. जाणिजे. छ ४ जाखर. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Raghunathrao asks Nana Fadnis to make arrangements to send Mankoji, a painter, to Trimbak where he had been ordered to execute some work.*

No. 49] [13-1-1766

श्री

श्रीमंत राजश्री दादा स्वामीचे शेवेसी विनंती. सेवक जिवाजी गणेश साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ १ साबानपर्यंत स्वामींचे कृपेकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामींनी कृपा करून आज्ञापत्र सादर केले ते प्रविष्ट होऊन

5071

लेखनार्थश्रवणे संतोष जाहाला. संक्रमणप्रयुक्त तिलशर्करा पाठविली ते पावली. हिराबाग वडगाव येथील समाचार घेत जाणे, बेलाची झाडे यांची निगा करणे, म्हणून आज्ञा. आज्ञेप्रो बागेचा समाचार घेऊन झाडाची निगा करवितों. सदैव पत्रीं कुशालार्थ लेहून आज्ञापत्र सादर करणार स्वामी समर्थ आहेत. त्या प्रांती काही अपूर्व जिनस आसले तरी त्याचे बीज बागेत पेरावयासी पाठवावयाची आज्ञा करावी. आम्हाकडून विनंतीपत्र येत नाही म्हणून स्वामीनी पत्री आज्ञा केली. त्यास, आम्ही विनंतीपत्र लेहून सेवेसी मुजरत पाठवावे तरी दूर देश. स्वामीकडून पत्रें श्रीमंताकडे येतात ती लस्करातून परस्परें उतरें जातात. येथे कोण्ही येत नाही. त्यास, वर्तमान मुजरद येथे लेहून पाठवावयासी आज्ञा केली पाहिजे म्हणजे सेवेसी विनंतीपत्र पाठवीत जाऊ. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Jiwaji Ganesh assures Raghunathrao, who, at this time, was in Northern India, that, as desired by him, his garden at Vadgaon would be properly attended to.*

No. 50] [*5-12-1765*

पैवस्ती छ २२ जावल.

श्री

आज्ञापत्र राजश्री रघुनाथ बाजीराव ता। गुलाबराव खोज्या. सु॥ सीत सितैन मया व अलफ. नारायेणदास वगैरे नटवे असामी साहा आनंदवलीस आहेत त्यांचे प्रयोजन हुजूर असे; तरी नटव्यास हुजूर पाठऊन देणे. जाणिजे. छ २० जावल. आज्ञा प्रमाण.

¶*Raghunathrao orders that the six dancers, who were at Anandvalli, should be sent to him.*

No. 51] [*8-3-1766*

श्री

आज्ञापत्र राजश्री रघुनाथ बाजीराव ता। गुलाबराव खोज्या. सु॥ सीत सितैन मयां व अलफ. तू आज्ञापत्राचे उतराची अर्जी पाठविली ते पावली. कुवरेचा मा।र लिहिला तो कलला. त्यास तिजला ठेऊन घेणे. खासा स्वारी आनंदवली दुसरे जेष्ठ आषाढ मासी येईल. चौदा पंधरा महिन्यांच्या अवकाश आहे, तोपर्यंत तिणे गावयास व नाचावयास शिकोन चांगले तरबेज व्हावे कीं

खासा स्वारी आलयावर गाण नाचण पाहून मर्जी खुष होय ऐसे करावे. ती संतोषाने जाईल तरच निरोप द्यावा म्हणोन लिा होते. याउपरी बहुत तिचे समाधान करून ठेऊन घेणें. वरकड नाटकशाळासहि हुजूर आणावयाचे नाही. त्यांस गायननृत्याचा अभ्यास दिवसेदिवस अधिकोतर करऊन स्वारी येई तोपर्यंत तरबेत व्हावे कीं मर्जी खुष होय ऐसे कसब करवणें. सोमवारी श्रीजवल गायन नृत्य पहिले आज्ञेप्रो करवीत जाणें. जाणिजे छ २६ रमजान.

¶*Instructions are sent to Gulabrao Khoja to train properly the dancing girls who were enjoying the patronage of Raghunathrao.*

No. 52] [*1816*

श्री

विशेष. श्रीमंताची स्वारी दर्शाकरितां फुलगावांस भिमातिरास गेले. जातांना मार्गात रथ उलथून पडल्यामुळे हातास जरब लागली आहे. झाडून मंडळी अज तेथें गेली आहे त्याजमुळ च्यारआठ दिवस तेथे स्वारी राहील की काय? स्वारी आल्यावर मर्जी संतोषाची पाहून विनंती करण्यांत येईल. राजश्री आबास पत्र लिा ते प्रविष्ट केले. आपणास कलावें. लोभ करावा हे विज्ञापना.

¶*The carriage in which the Peshwa was travelling to Phulgaum having turned turtle, the occupant suffered a severe injury to his hand.*

No. 53] [*7-6-1810*

श्री

चिरंजीव राजश्रा ।चमण्या यासी बाजीराव रघुनाथ प्रधान आसीर्वाद उपरी. तुमचे कुलबाब खर्चाची नेमणूक सालीना दोन लक्ष रुपये कुंपिणी इंग्रजबहादूर यांचे विद्यमाने मार्गसीर्ष शुध्द्ध प्रतिपदा सन सबा मयातैनापासोन ठरली आहे. त्यास इा मार्गसीर्ष शुध्ध प्रतिपदा सन सबा मयातैनापासोन कार्तिकअखेर साल मार सन इहिदे आशर मयातैनपावेतो दरसाल दोन लक्ष रुपये पो च्यार साला आठ लक्ष रुपये नेमणूक प्रमाणे तुम्हास पावले.. हाली इा मार्गसीर्ष शुा प्रतिपदा साल मजकूर सन इहिदे आशेर मयातैन ता कार्तिक अखेर पेस्तर साल सन इसने आशर मयातैनपावेतो सालसंमधी खर्चाचे नेमणुकेचे दोन लक्ष रुपये द्यावयाचे. त्यापैकी मार्गसीर्ष व फाल्गुनमासचे हापत्याचे येक लक्ष रुपये तुम्हास पावलें, बाकी येक लक्ष रुपयापैकीं ज्येष्ठ मासचे हापत्याचे रुपये पंनास हजार

५०००० चांदवड पाठविले असत. वेऊन पावलियाचे उतर पाठवावे. रा छ ४ जमादिलोवल सुा इहिदे आशेर मयातैन व आलफ. बहुत काये लिहिणें हे आसीर्वाद.

¶*The Peshwa's brother Chimnaji had an annual allowance of two lacs assigned to him for his personal expenditure. The amount of fifty thousand Rupees, being the third instalment for the year, has been sent herewith.*

No. 54] [*1-5-1815*

पौ छ २१ जोवल
सन खमस आशर मया तैन

श्री

सेवेसी कासी विश्वनाथ वैशपायन मुा सिहीगड सिर साा नमस्कार विज्ञापना. ताा छ २० जौवलपावेतो किले मजकूरचे व शेवकाचे वर्तमान यथास्थित असे. श्रीमंत राजश्री माहाराजाची स्वारी सोमवारी सायंकाली सिवापुरास येणार, यास्तव किल्यापौ तोफा मारावयाची परवानगी जाहल्यास सिवापूरपर्यंत डाक ठेवावी म्हणोन आज्ञापत्र आज सोमवारी सायकाली च्यार घटका दिवसास आले. आज्ञे-प्रमाणे किल्यापैकी दाहा आसामी राा सखोपंत बर्वे व चिमाजी पाटील सरदार याजबराबर देऊन रवाना केले आहेत. जागा जागा डाकेस आसाम्या ठेऊन दोन तीन आसामीनिसी सिवापुरास दाखल होतील. तोफाची आज्ञा होईल त्या-प्रमाणें आवाज काढऊं. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Kasi Vishwanath Vaishampayan from Sinhagad writes about the arrangements he was asked to make in connection with the visit of Shrimant Maharaj to Sivapur.*

No. 55] [*June-July 1817*

श्री

यादी स्वारीबराबर पंढरपुरास सरंजाम
वगैरे घ्यावयाचा ते सुा समान आशर
मयातैन व अलफ. शके १७३९.

मांहे आषाढ मास.

किता.

१ गेला तुपाचा.
२ समया पितली.

केता.

१ राहुटी कनाथा खांब
बदरखासुधा.

१ चंबू पितळी शाईचा.
१ तपेले कल्याच वजन ८८४॥९
१ तपेल पितली कल्याच शेरचा.
१ पातेल ता थोर वजन ८८५॥३.
१ तपेल काले ता थोर.
१ वंगाल.
१ पातेल ता का उभट.
२ घागरी.
२ खोरे कुदळी दांडेसुधां.
१ तपेली पितळी वजन ८८१८१३.
१ तवा लोखंडी.
२ कढई झारा लोखंडी सौ रखमाबाई पो.
१ पळ्या पितळी १ लोखंडी ०
१ वेळणी.
१ कथली सौ यंगाबाई पैकी.
१ विळी.
१ किता.
१ दुरडी व रवळी चवरंग. कावड व पोलपाट लाटणे.
१ काठ्या व पाट व रवी.

---

१ तपेल थोर पाण्यास.
० वेलणी.
२ पातेली पितली लहान २.
१ परात.

१ पालबुर्जी खांबसुधा.
१ कनाथ शेतखान्याची.
१ कटाला ४.

किता जिनस.
१ तां बारीक व मोठे.
१ दाळ तुरीची.
१ कणीक.
१ हिंग, हळद, जिरे, मिरे, धने.
१ मीठ.
१ गूळ व साखर.
१ आंबसोल.
१ भाजी मालवे वगैरे पानेसुधां
१ पीठ हरभरे व जोरीचे.
१ सुपारी सुंठ खडीसाखर.

ांडी रुप्याची ता रावोबा जोसी.
३। लोटीभार साधी १.

भार

ताट.
वाट्या.

¶*Here is a list of provisions, utensils and other articles intended to be taken with the Peshwa to Pandharpur.*

4. Domestic Animals.

No. 56] [*2-4-1793*

पौ छ २ रमज़ान

श्री

श्रीमंत राजश्री ंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक नारो बाबाजी सा नमस्कार विज्ञापना. ता छ २० माहे शाबान पावेतो स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे. यानंतर छ १० माहे मजकुरचे आज्ञापत्र सादर जाले ते छ १९ रोज माहे मजकुरी पावले. तेथे आज्ञा कीं चैत्र शुध अष्टमी बुधवारी आवसी च्यार घटका रात्रीस इकडे तारा पडला. गडगडलें. याप्रो तिकडें जालें न जाले ते लेहून पाठवणे म्हणौन आज्ञा. त्यास वो राजश्री विनायेक जोसी याणी पारनेरीहून लिहिले कीं बुधवारी संध्याकाली दोन घटिका रात्रीसमई मोठा तारा तुटोन अग्नीदिशेकडून आला, परंतु भास मात्र अग्नीदिशेचा. केवल मध्यभागी अदौ देखिला, तेथून नैरूत्यस सनिध उतरला यैसें देखिले. नेत्रास झांपड पडली. दुर्धर तेजोमये देखिला. त्याचे टुकडे दोन जाले. येक टुकडा वर्तुलगोल, दुसरा टुकडा त्यास पिसारा आकाशापासून भूमिपरियेत, सहस्त्रावधी मणुष्यानी पाहिला. आपणहि पाहिला. तदनंतर तोफेच्या आवाजासमान तीन शब्द मोठे जाले. त्यावर मेघगर्जनेसमान गंभीर गर्जन जालें. यैसा निर्घात उल्कापातसहित जाला म्हणौन विनायेक जोसी याणी लिहिले होते; व गंगातीर-प्रांतीहि तारा दोन घटका रात्रीसमई पडला हे सर्वत्रानी पाहिला, परंतु शब्द जाला हे कोण्ही यैकिले न यैकिले. येविसीचें वर्तमान व पर्जन्य गाराचे वर्तमान यापूर्वी हुजूर सेवेसी विनतीपत्र लिहून पाठविलेंच आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Naro Babaji writes to the Peshwa, describing the phenomenon of the fall of a meteor at Parner.*

No. 57] [*1798?*

श्री ४

साष्टांग नमस्कार विनंती. अलीकडे आपणास पत्र पाठवावे त्यास सातारा शहरात देवी बहुत आल्या आहेत आणि देवी आणावयाचा वैद्य सातारा आला होता. आमचे घरी मुलास व चिरंजीव सौ यमुनेस देवी आल्या नवत्या, याजकरितां वैद्यास आणून तोटका केला. मूल दोन व चरंजीव सौ यमुना व आपाजीपंताचा मूल व पुत्र व बाळाजी हरि याचा पुत्र इतक्यास वैद्याने देवी

आणविल्या त्यामुळें पंधरावीस रोज बहुत घाबरे जाहलों. काही सुचेनासे जाहले होते. परंतु आपले अशीर्वादेकरून आरोग्य जाहली. आपणास कळावें म्हणून लिहिलें आहे. फाजलाचा पैका कांही पाा देतो. रागास न यावें. चिरंजीव रामचंद्र सुखरूप आहे. दस्तूर बजिनस पाा आहे कळो येईल. आपणाकडील साध्यांत (साद्यंत) लेहून पाठवावें. बाळाजी धोंडदेव याविसी पेशजी आपण लिहिले. त्यास येथें त्याचा आमचा कजिया जाहला. घोडी, माणसें व कटाळ बाहेर टाकून दिल्ही. सर्व होणे ते जाहले. उपरात तो काही सौरसाचे बोलत होता की लस्करांत कांही आपणापासून दस्ताऐवजी गुतले नाही. आतां मोरोपंताचे माझे समाधान करून द्यावे आणि दुसरा रोजगार हरजागा लाऊन देवावा ऐसे म्हणत होता. परंतु त्याचे बोलणे मात्रागमनी, इतबार काय? पुण्यास तो आल्यावर काहीं कळले नाहीं. तर ल्याहावे. हे विनंती.

¶*This is a private letter from Satara informing that the writer had his children vaccinated as a severe epidemic of small-pox was raging in the city.*

No. 58]

पौ छ १ जमादिलाखर.

श्री.

सेवेसी विज्ञापना. ताा छ २ जमादिलाखर मुकाम नंदवाड त्रितीय प्रहर स्वामीचे कृपेकरून वर्तमान येथास्तित आसे विशेष. दारकोजी जासूद आंबोजी कदम द्विा पिराजी सितोले याजबरोबर आज्ञा आली जे, मुकाम मजकुरी बैल व्याला, त्याची तहकीकात करून लिहोन पाठवणें. त्याजवरून जेथे बैल होता तेथे वीसपंचवीस भले लोकसुधा जाऊन पाहिला. बैल पाणियात बसला होता. दोन माणसे लाऊन उठविला. तो परम श्रमेकरून उठला. च्यार हात लांब जाताच मागती पडिला. प्रसुतकालचे भाव सारे त्याचे देही व द्वारी जाहाले आहेत. काही जारहि तेथें पडिला आहे. प्रसुत होते समई अणिक लोकानी बहुतानी पाहिला, त्याचेहि दाखले पाहिले. प्रत्यक्ष वासरासरिखे स्त्वेर्त[१] होते. कान, डोले, पाय, सारे येथास्तित होते. परंतु जीव नव्हता. निराले होताच जवल कुतरी होती त्याणी खादले. तेथे रक्त पाचसात जागा पडिले आहे. सर्वांनी पाहिलेहि आहे व हाली पाहाता भावनाहि दिसते. परंतु न व्हायाची गोष्टी आहे. मिथ्या आसेल. बैलास वासरू कोठे होणार? याच समई राजश्री बाबा सरनाईक

---

१ पांढरे.

5077

येथे आले आहेत. त्यासहि दाखव(ला) सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. गावची मोजदाद जाहाली. गुरे सारी मोजिली. दाण्याचा आजमास लिहिला असे. लोक आज्ञेप्रो नेमून ठेविले. आताच कूचहि केले हे विज्ञापना.

¶*This letter contains the news, given in detail, of an unnatural phenomenon, namely that of a bullock being delivered of a lifeless calf.*

No. 59]

पौ छ ४ सफर

बा। येमाजी प्यादा.

श्री

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यासी, विनंती. उपरी, घोड्याचा पटा मिनेदार करविला होता तो तयार जाहाला आसिला तरी पाठऊन देणे व जडावाचा पटा व दुमची[१] आहे तीहि पाठवणे. खोटे जवाहिराचा पटा व दुमची येक व खरे जवाहिराचा पटा दुमची येक, येकूण दोनहि जोडे पाठवणे. रा। छ ३ सफर हे विनंती.

¶*The Peshwa asks Nana Fadnis to send certain articles, some of them being jewelled ones, pertaining to the equipment of a horse.*

No. 60] [*19-8-1764*

श्री.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यांसी,

पो माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष. राजश्री खंडेराव बरगे याजकडील पागा असिउंबरीस आहे ते हुजूर आणविली असे. त्यास, गुदस्तां घोडी खराब जाली आहेत. याजकरितां घोड्यास पंधरा दिवस तूप चारऊन कार्याकारण जीन सामान वगैरे सरंजाम करून देऊन कदीम लोक आहेत ते बारगीर वगैरे करार करून

१ घोड्याच्या शेपटीखालून जाणार बंद.

घोडी आपले नजरेने पाहून लस्करात निभावत असी असतील ती घोडी व उंटे व बैल पाठवणे. चौकसीने बंदोबस्त करून पाठवणे. जाणिजे. छ २० सफर. बहुत काये लिहिणे हे विनंती.

पो छ १७ राखर सन खमस
सितैन आस्विन मास. घोडी रास
२४ रवाना केली छ ७ जाखर
बाा (फाटले).

¶*The Peshwa asks Nana Fadnis to send on to the camp a certain detachment of horse after making the animals fit for service. Nana Fadnis is ordered to give to the horses a daily allowance of ghee for a fortnight.*

No. 61] [*26-12-1764*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बालाजी
जनार्दन स्वामी गोसावी यासी

पो रघुनाथ बाजीराव नमस्कार विनती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष. दाहा सेरो(सरा)[१]चा दाल[२] पिवला अडीच, तीन बोटे रुंद कासीचा व गेंदजोड्या[३] दाहा किरमेजी याचे प्रयोजन आहे. तरी दाल व गेंदजोड्या चांगल्या खाशा घोड्यायोग्य पाहून खरेदी करून पाठऊन देणे. सत्वर पाठवणें. रा छ २ रजब सुा खमस सितैन मया व अलफ. बहुत काये लिहिणे हे विनंती.

पो छ ७ रजब सन खमस सितैन पौष. पो रवानगी बाा
जासूद जथे लिंगोजी नाईक नागोजी सटवाजी व मल्हारजी
रघोजी दाहा सरोसराचा दाल व च्यार गेंदजोड्या पो असेत.
छ १३ रजबु रविवार.

¶*Raghunath Bajirao asks Nana Fadnis to send him certain articles pertaining to the equipment of a horse.*

---

१ घोड्याच्या साजापैकीं. २ पट्टा. ३ रेशमी तुरे.

5079

No. 62] [*13-2-1764*

श्री

पौ छ २० साबान आर्बा
माघ बा। जासूद बहिरजी वा।
शेकाजी जथे शिदोजी नाईक.

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसांवी यांसी

विनती. उपरी, वसईहून सकलाद प्रण्यास आली आहे, त्यापैकी सामान हत्तींचे

झुली	सिऱ्या
१५	१०

येणेप्रों पंधरा झुली व दहा सिऱ्या बेतून तयार करून लस्करास पाठऊन देणे. रा। छ १० साबान सुा। आर्बा सितैन मया व अलफ. हे विनंती.

¶*The Peshwa, writing from the camp to Nana Fadnis in Poona, asks him to send some cloth covers and head-pieces for the elephants, made out of the broad cloth brought from Bassein.*

No. 63] [*8-9-1764*

पौ छ २१ रोावल सन
खमस सितैन.

श्री

चिरंजीव राजश्री नारायेणराव यांसी माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जावे विशेष. फीलखान्याकडील सरंजाम :

सकलादी लाखी
५ झुली
५ सिऱ्या[2] झालरसुधा
१०

रेसमी गोंडे[1] फुंदणे
वजन पक्के ०।०१

येणेप्रो दाहा सुमारी व येक सेर वजन तयार करून सांडणी पाठविल्या आहेत यांजबरोबर पाठऊन देणें. सकलादी सामान येथे मिलत नाही, याजकरितां जलदीने तयार करऊन दसरियाचे आगोधर येथे येऊन पोहचे असे रवाना करावे. कदाचित सकलाद जामदारखानियात नसली तर खरेदी करून याच सांडणीवर पाठऊन देणे. सत्वर येऊन पोहचे ते करणे. रा। छ ११ रौवल सुा। खमस सितैन मया व अलफ. बहुत काये लिहिणे हे आसीर्वाद.

¶*The Peshwa asks his brother Narayanrao to send certain articles, made of silk and broad cloth, pertaining to the equipment of elephants.*

---

१ फुन्ना=गोंडा. २ शिरी=हत्तीच्या डोक्यावर टाकण्याचें सुशोभित वस्त्र.

No. 64] [10-3-1769

पाो छ १८ जिलकाद

तिसा बाा देवजी व बावाजी

जासूद जथे कचोजी नाईक.

श्री

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसांवी यांसी

विनंती. उपरी, पुण्याचे आसपास हतीकरितां उस लावावा.

मौजे कोलवडीस	मौजे हडपसर
बिघे ३०	बिघे २०

येणेप्रा दोन्ही गांवी पंनास बिघे उस लावणें. राा छ १ जिलकाद सुा तिसा सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

¶*The Peshwa expresses his desire to Nana Fadnis that sugarcane, for the consumption of elephants. should be planted over 50 bighas of land in the vicinity of Poona.*

No. 65]

पौ छ १८ सवाल.

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बालाजी

जनार्दन स्वामी गोसावी यांसी,

पोष्य नारायणराव बलाल नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीय कुशललेखन करीत जावे विशेष. शामा हरणाचे कातडे रंगऊन खंडोजी पंवार दिमत सिकारखाना याचे स्वाधीन केले आहे, त्याचे प्रयोजन आहे. तरी त्याजवरून कातडे घेऊन सत्वर पाठऊन देणे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Narayanrao Ballal writes to Nana Fadnis asking him to send the dyed skin of a black antelope.*

No. 66] [30-12-1768

पौ छ १९ रमजान
तिसा पौष.

श्री

राजश्री बाळाजी जनार्दन स्वामी गोसावी यांसी,

विनंती. उपरी, सुरतेस शाहाणा माणोस पाठऊन बहिरी[1] २ दोन व शाईन १ यो तीन खरिदी करून आणवणे. रा छ २० साबान सुा तिसा सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

¶*The Peshwa asks Nana Fadnis to send a man to Surat to purchase three falcons.*

No. 67]

श्री

शेवेसी विज्ञांपना. आम्हांकडील चित्याच्या गाड्या जायां जाल्या आहेत. त्यांजला धांवा घालावयासी कारिगर लोहार पाहिजे. त्यास, आपले सरकारांत आहे; दोन दिवस देविला पाहिजे. म्हणिजे गाड्या तयार होतील. व चांभार गाडी बांधणार तोहि देविला पाहिजे. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*This paper contains a request for a blacksmith to prepare bullock carts for Cheetahs to hunt the deer.*

No. 68] [1809-10

श्री

यादी सरकारचे थटीकडील गुरे गुा
त्रिंबकजी डेंगळे सुा आशर मया तैन व अलफ

सुमारी

१० गाई
१२ काल्हवडी
१४ गोऱ्हे

१३ किता
१ पंचकल्याण गाऱ्हा यक बाबुराव कात्रे यांजकडून आला.

१४

[1] बहिरीचीच एक जात.

६ पारड्या
२ रेडे
७ बैल सर
९ म्हसी

———

९७

तपसील :

पुणे मुकामी दुभती व गाभणी सुमारी

वारणसि पाठवावयाची भाकडी वगैरे

९ गाई दुबत्या
३ गाई काल्हवडी गाभण्या.
९ म्हसी
 ३ दुपत्या
 २ गाभण्यां
 —
 ५
३ पारड्या गाभण्या
२ बैल सर
२ गोऱ्हे
२ रेडे.

¶*A list of the state cattle of the Peshwas is given here.*

No. 69]

5. Ornaments and Jewellery.

५

श्री

सेवेसी बालाजी जनार्दन कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता। छ २० जााखरपर्यंत यथास्थित असे. यानंतर, हिऱ्यांचे मालेस मुकेसाच्या[1] गंडेऱ्यामध्यें बांधावयास गणेश हरि यांस सांगितलें आहे, त्याप्रा। माल बांधोन सांडणीस्वाराबरोबर पाठऊन देणे म्हणोन आज्ञा. त्यास, आज्ञेप्रमाणे माल बांधोन साकरू खिजमतगार याजबरोबर कालच गणेश हरि याणी सेवेसी पाठविली आहे. शेवेशी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Nana Fadnis informs the Peshwa that the diamond necklace with the desired improvement in its structure has already been despatched.*

---

१ जर्तारी.

No. 70] [19-12-1762

पोा छ ४ जाखर

सलास.

श्री

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यांसी,

विनंती. उपरी, स्मरणी तेरा मोत्यांची पाठऊन देणें म्हणौन तुम्हांस आज्ञा केली होती त्याजवरून तुम्ही जवाहिरखानापैकी स्मरणी पाठविली तिची किंमत रूपये :

४८०० मोत्यें दाणे १३ एकूण.

॥।॥॰ सोने सूत वजन ८॥१॥॰

४८०० ॥।॰

येकूण अठेचालीससें पाऊण रूपयांचे किमतीची तेरा मोत्यांची स्मरणी पाठविली ती स्वारींत जवाहिरखान्याकडे जमा जाहाली असे. रा छ ३ जमादिलाखर. हे विनंती.

¶*The Peshwa writes to Nana Fadnis, acknowledging the receipt of a rosary composed of thirteen pearls, worth Rs. 4,800-12-0.*

No. 71] [28-1-1764

पोा छ २७ रजब

सन आर्बा सितैन.

श्री

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यांसी

विनंती. उपरी, चिरंजीव राजश्री नारायेणराव यांस अंगठी हिऱ्याची फिरंगोजी खेडकर खिजमतगार याजबरोबर पाठविली आहे. घेऊन पावलियाचे उतर पाठवणे. जवाहिरखान्यात च्यार आंगठ्या जड्याजवल दिल्या आहेत त्या तयार करून सत्वर पाठवणे. रा छ २४ रजब सुा आर्बा सितैन मयां व अलफ. हे विनंती.

¶*The Peshwa sends a diamond ring for his brother Narayanrao.*

No. 72] [26-8-1764

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बालाजी
जनार्दन स्वामी गोसावी यांसी

पो॥ रघुनाथ बाजीराव नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणे विशेष. रत्नशालेपैकी नारोबा गाडगील शागिर्द याचे तसलमातीस दक्षणावर्त शंख देवपूजेत होता तो सालगुा शागिर्दाजवळून हारवला. त्याची किमत शंख सोनेमोतीसुधा याजवळून गुन्हेगारीदाखल रुपये ६० साठ करार करून रोख पोता वसूल घेतले असेत. तर शंख याचे तसलमातीस आहे तो हारवला, सबब खर्च लिहिणे. रा छ २७ सफर सुा खमस सितैन मया व अलफ. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Raghunathrao reports to Nana Fadnis that Rs. 60 have been recovered from a Brahmin servant as the price of a right-side conch-shell lost by him.*

No. 73] [10-12-1766

पो छ १२ रजब सन
सबा सितैन बा॥ सांडणी-
स्वार आबूब.

श्री

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यासी

विनंती. उपरी, खासे कंठीस हिऱ्याची धुगधुगी होती तो हिरा उखलला. याजकरिता आबूबमा सांडणीस्वार याजबा॥ धुगधुगी व हिरा पाठविला आहे. तर जवाहीरखान्यांत देऊन जलदीनें जडऊन याच सांडणीस्वाराबा॥ पाठऊन देणे. व झग्यांचे संज्याबास[1] दर्याई येक हिर्वी व पिवली व लाल येणेप्रों तीन व रेसीम उदी व पारवे दोन रंगाचे पाठऊन देणे. रा छ ७ रजब सुा सबा सितैन मयां व अलफ. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa writes to Nana Fadnis about some repairs to be effected for his necklace.*

---

१ किनारीस.

No. 74] [19-12-1766

पो छ २१ रजब सन
सबा सितैन बाा हयातखान
सांडणीस्वार व मुराद.

श्री

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यांसी,

विनंती. उपरी, पाचेची धुकधुकी पाठविली आहे. इचा सिरपेच फुलासारिखा भवते हिरे लाऊन तयार करून पाठवणे. जरी सरकारात हिरे नसिले तर विकत घेऊन सिरपेच उतम फुलाचा करऊन पाठऊन देणें. सोन्याचा तोडा तरतेरे हिरे लाऊन करविला आहे तोहि तयार करून, सदरहू दोन्ही दागिने पाठऊन देणे. चौकड्याविसी पेशजी लिहिलेच त्याप्रोा चौकडा तुरमुनी गुळधवा रंगाचा पाठवणे. राा विठल विश्राम याजबाबत दुरबीन लाहान तेथे राहिली आहे तेहि पाठवणे. मुरादखान सांडणीस्वार दिाा पागा हुजूर पाा आसे. राा छ १६ रजब सुाा सबा सितैन मया अलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

¶*The Peshwa asks Nana Fadnis to send certain jewelled ornaments and one small spyglass for his use.*

No. 75] [5-1-1767

पौा छ २२ रमजान
माघ मास.
पौा पुणे फाल्गुन शुध्द
४ सन सबा.

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
बालाजी जनार्दन स्वामी गोसांवी यांसी,

पोा रघुनाथ बाजीराव नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लिहीत जाणें विशेष. बालसेट सोनार चाकर सरकार याणें सरकारचा हिरा गमाविला. सबब त्याची बायेकोमुलें पुणियात आहेत ती कैद करून आनंदवलीस राा केशो गोविंद याजकडे पाठऊन देणें. राा छ ४ शाबान सुाा सबा सितैन मया व अलफ. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Raghunathrao asks Nana Fadnis to imprison the wife and children of one Balset, a goldsmith, who had lost one state diamond.*

No. 76] [7-3-1767

पौा छ ९ सवाल फाल्गुन.

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यासी.

पोष्य नारायणराव बलाल नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहिणे विशेष. तुम्ही पांच वाट्या सोन्याच्या व कंठी पाठविली ती पावली. आज सिनरचा मुकाम आहे. उदईक नासिकचा मुकाम आहे. सोमवारी अथवा मंगलवारी गंगापुरास जाऊ. तीर्थरूप राजश्री रावसाहेबाकडील वर्तमान तुम्हांस कलत असेल ते हमेशा लिहीत जाणे. हिंदुस्थानाकडील वर्तमान तर तीर्थरूप सबलगडास आले. उजेनीस येणार म्हणून वदंता आहे. रवाना छ ६ सवाल. बहुत काये लिहिणे हे विनंती व सुरी कातर पाठविली ती पावली हे विनंती.

¶*Narayanrao Ballal writes to Nana Fadnis asking news of Madhavrao and acknowledging receipt of some valuable articles sent.*

No. 77] [11-9-1767

पौा छ १९ राखर.
समान भाद्रपद बाा
येमाजी.

श्री

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गो,

विनंती. उपरी, पुण्यांत स्वारी असतां पाचेचे मणी विकावयास आले होते ते माहाग पडतात साा न घेतले. परंतु मेलास बरे आहेत. त्यास, फिरून शोध करून गवेस आले तर घ्यावे. ज्यापक्षी पहिले किमतीस नच उतरे, तेव्हां अधिकआगले करून खरिदी करून पाठऊन देणे. राा छ १७ राखर. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa writes to Nana Fadnis, asking him to purchase and send some emeralds for him.*

No. 78] [22-9-1767

पौ छ २ जौवल समान

आश्विन बा। मल्हारजी.

श्री

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यांसी,

विनंती. उपरी, पाचेचे मणी पुण्यांत पाहिले होते ते खो करून घेणे म्हणून पूर्वी लिहिले आहे; त्यास, मणी घेतलेच असतील. कदाचित घेतले नसेल तर घेऊन पाठऊन देणे. हिऱ्याचे ताईत चांगले सुमार ५० पंनास फार चांगले पुण्यांत तलाश करून जे मिलतील ते घ्यावे. बाकी शहरास लिहून आणवावे. रा। छ २८ राखर सुा। समान सितैन मया व अलफ. हे विनंती.

¶*The Peshwa asks Nana Fadnis to send 50 diamond ornaments of a particular kind.*

No. 79] [4-3-1769

पौ छ ६ जिलकाद तिसा

फाल्गुन बा। संकराजी रघूजी

जथे बयाजी.

श्री

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसांवी यांसी,

विनंती उपरी. मोत्यांचा चौकडा तीन हजार रुपयांचे किमतीचा पाहिजे. त्यास, सरकारांत सिलकेस असल्यास शोध करून पाठवणें. सिलकेस नसल्यास तीन हजार रुपयास चौकसीनें खो करून पाठऊन देणे. सिलकेचा पाठवाल तर तीन हजार किमतीचाच असल्यास पाठवणे. नसल्यास तीन हजाराचा चांगला खो करून पाहून पाठवणे. रा। छ २४ सवाल. खरा तिही हजाराचा चांगला पाठवणें. बहुत काये लिहिणे? हे विनंती.

¶*The Peshwa asks Nana Fadnis to send a certain pearl ornament, called chaukada (the square) worth Rs. 3,000.*

No. 80] [2-1-1770

पौ छ १७ रमजान सबैन
बा कासीद जथे रायमल
१ भागमल १ राजाराम
—
२

श्री.

राजश्री बालाजी जर्नार्दन स्वामी गोसांवी यांसी

विनंती. उपरी, माणकांचा सिरपेंच मधी हिरा व भोवती माणके तारेने बांधिलीं आहेत तो स्वारीसमागमे आला नाहीं तो व आणखी दागिने स्वारीसमागमे आणावयाचे तयार करविले होते ते तयार जाले असिले तर लस्करांत पाठऊन देणे; व कापडाविसी पेशजी लिहिलें आहे त्याप्रो लौकर रवानगी करणे. नीलाची मूर्ति जवाहिरखान्यांत माणिराम पाथरवट याजकडून करविली आहे ती त्याणे चांगली केली असली तर उतम जाहालें. त्याच्यानें चांगली न होय तर बखतरायाकडून चांगली करवणे. मधी तुम्ही दोन वेला मूर्ति पाहून चांगली सिरा[1] मूर्ति होय असी तयार करवणे. रा छ ४ रमजान. बहुत काय लिहिणे ही विनंती.

¶The Peshwa writing from camp, asks Nana Fadnis to send certain jewelled ornaments to him.

No. 81] [20-1-1770

पौ छ २३ रमजान
पौष मास.

श्री.

शेवेसी बालाजी जनार्दन कृतानक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता छ २१ रमजानपर्यंत येथास्थित असे विशेष. श्रीमंत राजश्री नारायेणरावसाहेब यांस कंठीकरिता मोत्ये खरेदी करून पाठवणे म्हणौन पेशजी लिहिले होते; त्यास, मोत्ये खरेदी न करणे म्हणौन आज्ञा. त्यास, आज्ञेप्रमाणे खरेदी करीत नाहीं. सिंद्याबाबत माल आली आहे त्यापैकीं कंठीची मोत्ये निवडून पाठवणे म्हणौन आज्ञा. त्याजवरून कंठी मोत्याची सिंद्याबाबत जवाहीरपैकीं दागिना १ येक फाजलखान सांडणीस्वार दिमत पागा हुजूर याजबरोबर पाठविली आहे.

---

१ सिरा = उत्तम. नीलाची मूर्ति म्हणजे काय? नील मणीची असावी.

शहतीची याद अलाहिदा आहे. शेवेसी प्रविष्ट जालेयावर उतर पाठवावयास आज्ञा केली पाहिजे. शिद्याकडील मोत्यांत चांगलीं होतीं तीं निवडून पाठविलीं आहेत, परंतु वाईट आहेत. देहनगीस कामास येतील. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Nana Fadnis writes to the Peshwa about the pearls intended for Narayanrao's necklace*

No. 82] [*Recd. 22-1-1772*

पौ छ १६ शौवा०

सुा इसने सबैन.

श्री.

यादी कंठी, धुगधुगीस हिरा तरतेरा[2] दोहीकडून खुला व लोलक तरतरा, मालेस मोत्यें गंडेरीदार ऐसी कंठी आहे ती पाठऊन देणे. दागिन्यात नसलियास कोठे आहे तिचा शोध लाऊन पाठवणे म्हणोन आज्ञा. त्यास, कंठी जवाहीरखान्यात आहे. लोलक हिरा सन आर्बा सितैनात श्रीमंत राजश्री राव यांचे कंठीस लाविला. त्याआलीकडे सौ रमाबाई याजकडे कंठीस आहे. बाकी धुगधुगी व मोत्ये कंठीस लोलक मोतीं याप्रमाणे आहे.

¶*This paper refers to a certain pearl necklace. The details of its design are given.*

No. 8-, [*30-8-1771*

पौ छ २४ जौवल

सन इसने सबैन

श्री

शेवेसीं रामचंद्र नारायेण गोरे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम तागायेत छ १९ जौवल मुकाम मौजे गंगापूर येथास्थित जाणून स्वकीयें

---

१ ? २ पैलू पाडलेला.

कुशल लिहीत जावें विशेष. तुकोजी बागुल व बहिरजी बांदेला जासूद जथे सखोजी नाईक याजबरोबर जवाहीरखान्याचीं वजनें नवीं तोलेवार:

२४	सेंर
१२	आदसेंर
६	पावसेंर
३	तीन तोले
२	दोन तोले
१	येक तोला
॥	अर्धा तोला
४८॥	७

येणेप्रा सात वजनें व कागदाचे दस्ते मोहरदार २ पावले. व नारो कान्हो ठोंसर याजबरोबर मोमबत्या सुमार १०० शंभर पाठविल्या पावल्या. विदित होवे बहुत काये लिहिणे, कृपा लोभ असो द्यावा, हे विनंती.

¶*Ramchandra Narayan Gore acknowledges the receipt, among other things, of seven new weights, of various denominations for the Jewellery Department.*

No. 84] [*1772 ?*

श्री

सेवेसी विज्ञापना

हिरे घासावयाची सहाण पेसर्जी ईश्वरदासानी येथून नेली होती त्याचे दुपटीनें थोर विकाऊ रा मोरो विश्वनाथ यांचे मारुफातीनें आहे. त्याणी हुजूर ल्याहावयास सांगितले त्यावरून पेशजी सेवेसी विनंतीपत्र लिा होते. हलीहि मोरोपंत उतर पुसत असतात, आज्ञा होईल त्याप्रमाणें सांगोन. नाही तर दुसरा घेणार आहे त्यास देतील.

बेलापुरास सालगुा इंग्रजानी भाताचे साटे वृंदावनदास याचे मारुफातीने केले होते, त्याविशी जनरलानी लेहून पाठवावयाबद्दल सांगितले होते याजकरितां पेशजी लिहिले होते. त्याचे उतर आले कीं नाहीं म्हणोन जनरालाची भेट होते ते समई पुसत असतात. यास्तव उतराची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत.

येणेप्रमाणे विदित होणे. हे विनंती.

¶*Reminders, probably from the Peshwa's agent at Bombay, are sent on two subjects, viz. the purchase of a polishing stone for diamonds, and the store of rice at Belapur.*

No. 85]

पौ छ ८ रमजान.

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य रा
गोपालपंत दाजी स्वामीचे सेवेसी

पो नारो नीलकंठ सां नमस्कार विनंती. उपरी. येथील कुशल ताा छ १८ साबान मुाा मासिक जाणून स्वकीयें कुशललेखन करीत गेलें पाहिजे. विशेष कृपा करून पत्र पाठलें ते पावोन संतोष जाला. यैसेच निरंतर पत्री सानंदवीत जावें. श्रीमंतानी साबूचे तांदलाकरितां आपणाकडून सूचनार्थ लिहविले म्हणौन लिाा. त्यास. पेशजी साबूचे तांदूल पाठले होते. त्याउपरी येथून जोडी कोणी आली नाही. परस्पर पुण्याहून जातात. राजश्री मल्हारपंत तात्या लौकरच येणार त्यांजबाार साबूचे तांदूल, सुकेले व केंशर वगैरे फर्मास पाठवितों. रक्तचंदनाचे बीज येथे मिलत नाही. शहरास सांगून पाठविले आहे. तेथून आल्यावर पाठऊ. राा यादोपंत गवांदे याचे पत्र त्याचे घरी लिाा प्रो पावतें केलें. सदैव कृपापत्री सानंदवीत जावे. बहुत काय लिहिणे, कृपा लोभ कीजे, हे विनंती. पेशजी खिकणेलें[१] व साबूचे तांदूल येथून पाठले ते पावल्याचे उतर पाठवावें. हे विनंती.

¶*Naro Nilkanth writes from Nasik to Gopalpant that he would shortly send saffron, sago and other articles for the Peshwa.*

No. 86]

पौ छ २३ रजबु.

श्री

राजश्री गणेशपंत दाजी स्वामीचे शेवेसी, पो त्रिंबक कृष्ण सां नमस्कार विनंती. उपरी, आपणांस व चिरंजीवांस तुमचे फानूस[२] करवणे म्हणून सांगितल्यास पंधरा दिवस जाहाले. तर तयार जाहाले असले तर बरे. नसले तर रात्रीचा कारिगर बसऊन तयार करीन आज गंगाराम सुतारास बोलाऊन आणून चांगले आरसे कल्हईदार आणून मेजाचि कापून लाऊन उदईक प्रातःकाली रवाना करणे. न केल्यास श्रीमंतांस राग बहुत येईल. हे विनंती.

¶*Trimbak Krishna reminds Ganeshpant about sending quickly a lantern, fitted with mirrors, for which, he adds, the Peshwa has waited long.*

---

१ किंकणेल = पिलूच्या झाडाच्या फळापासून काढलेलें तेल. २ कंदील.

No. 87]

श्री

सेवेसी रामचंद्र नारायेण कृतानेक सां नमस्कार विनंती. पिलाजी चावट खिजमतगारं याजबराबर फटाके व बोथाव्या व कातर सुरी पाठविली त्याचे उत्तर श्रीमंत राजश्री नारायेणरावसाहेब याणी लिहिले आहे त्याजवरून कळलेच असेल. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Ramchandra Narayan acknowledges the receipt of a knife, crackers and some other articles sent from Poona.*

No. ८८] [16-6-1764 ?

पौ छ १८ जिल्हेज.

श्री

शेवेसी नारो आपाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. पुण्यातील वैद्यखाना विसाजी राम यांचे निसबतीस आहे, त्यापैकी औषधाचे पेटारे पुरंधरास आणावयाकरितां निवडून ठेविले आहेत, त्यास वोझ्यास कामाठी देऊन रवाना करणे व एक चहादाणी जवाहीरखानापैकी पाठवणे म्हणोन आज्ञा; त्यास, आज्ञेप्रमाणें पेटारेयाचे वोझ्यास च्यार कामाठी देऊन व एक जासूद समागमे देऊन रवाना केले आहेत, व च्याहादाणी जवाहीरखान्यांत नाहीं. सिहीगडास गेली आहे तेथून आणविली आहे. आल्यावर पाठवितो. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Naro Appaji acknowledges the receipt of a letter, asking him to send certain medicine-boxes and one tea-pot to Purandar.*

No. 89] [27-9-1764

पो छ ११ राखर सन

खमसैं सितैन

बा सांडणीस्वार.

श्री

चिरंजीव राजश्री नारायेणराव यांसी माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष. दसरियाकरितां तुम्हांस पोशाक सांडणीस्वाराबराबर पाठविला असे. त्याची याद अलाहिदा आहे त्याप्रो पावल्याचे उत्तर पाठवणे. रा छ १ राखर. हे आसीर्वाद.

¶*The Peshwa sends to his younger brother Narayanrao a dress for the occasion of the Dasara.*

No. 90] [12-9-1764

पो छ २८ सफर
सन खमस सितैन.

श्री

चिरंजीव राजश्री नारायणराऊ यांसी माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जावे विशेष. ब्राह्मणोदक गुलाब जिनसखान्यांत आहे त्यापैकी वजन पके पांच सेंर तुंगांत[1] घालून कामाठियाजवळ देऊन पाठऊन देणे व पेशजी जिनस तेल वगैरे आणविल्याप्रों रवानगी केली असेल. नसेल रवानगी केली तर पत्र पावतांच रवाना करणें. स्वारीसमागमे स्वयंपाकाची वगैरे भांडी आहेत ती जीर्ण(?) जाली व पुण्यातही सिलकेस फार नाहीत. याजकरितां जी उपयोगी भांडी त्याची यादी गोविंद कृष्ण गोखले याजपासून लिहून कल्याणास रामाजी माहादेव यांसी लिहून भांडी लवकर तयार करून पुण्यास आणवणें; या कामास येक कारकून नेहेमी पाठऊन भांडी तयार करून आणावी. जुनी भांडी कावेल[2] उपयोगी नाहींत. असी कोठीस असतील ती कल्याणांस पाठऊन नवी भांडी करून आणावी रा छ १३ सफर सुा खमस सीतैन मया व अलफ. हे आसीर्वाद.

¶*Madhavrao Ballal asks Narayanrao to send him rose-water and certain other articles.*

No. 91] [*23-11-1764*

पो छ १९ जाखर
सन खमस मार्गिसीर्ष
बाा लक्षुमण वाा तुकोजी
व जावजी जधे नारोजी
नाईक.

श्री

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यांसी

विनंती. उपरी, पोशाखी सनगांचें प्रयोजन आहे. ऐशास, मुलतानी छिटें बंगाली मलमल व जामदान्या बंदरी छिटें याचें निमोन्यास रेजें येथून पाठविले आहेत. याप्रो जामदारखान्यांत सिलकेस असतील तर शोध करून

१ बुदली, चंबू.

२ कावल म्हणजे जुनें जळून गेलेलें भांडें.

5094

जा असताल ता पाठऊन दण. नसतील त्याचा पुण्यांत शोध करून खरेदी करून पाठवणें. नच मिळेत तर औरंगाबादेस कागद व निमोने सांडणीस्वाराबा पाठऊन तेथून सदरहू सनगाप्रो तीहीं प्रकारची सनगे शहरातून खरिदी करून आणून सत्वर पाठवणें. रा छ २८ जोवल. निमोन्याचे रेज्याची याद पाठविली आहे त्यावरून कळेल. रा छ २८ छं मार. बहुत काये लिहिणे, हे विनंती.

¶*The Peshwa asks Nana Fadnis to send some pieces of cloth, of three particular varieties, after having got them purchased from Aurangabad in case they were not available in Poona.*

No. 92] [*15-12-1764*

पौ छ २७ जाखर

मार्गसीर्ष मास.

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

बाळाजी जनार्दन स्वामी गो

पो रघुनाथ बाजीराव नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष. दांताचे औशधाचे प्रयोजन असे. तरी दांतास औशध लाविल्यानें दांत काळे न होत आणि दात बरे होत ऐसे औशध वो रा मोरोबा वैद्य याजकडून करऊन सत्वर हुजूर पाठऊन देणे व लाक्षातेलाविसी पेशजी लिहिले आहे त्याप्रमाणे उतम तेल करऊन सत्वर रवाना करणे. रा छ २१ जमादिलाखर सुा खमस सितैन मया व अलफ हे विनंती.

¶*Raghunathrao asks for a dental application prepared by one Moroba Vaidya. "The medicine," Raghunathrao writes, "should be such that it should cure the teeth without black-staining them".*

No. 93] [*28-2-1765*

पौ छ २७ रमजान

फाल्गुन मास.

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

बाळाजी जनार्दन स्वामी गोसांवी यासि,

पो रघुनाथ बाजीराव नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष. सरकारात कमच्याचे[१] प्रयोजन आहे. तरी

१ कमची=A switch.

पंचवीस कमच्या इंग्रेजी हुजूर सिताबीने पाठवणे. रा छ ७ रमजान सुा खमस सितैन मया अलफ. बहुत. काये लिहिणें. कमच्या तयार असल्या तरी उत्तम. नाहीतर (त)यार करून आगर मुंबईहून आणून पाठवणे व वेताच्या छड्या शंभर पाठवणे. छ मजकूर. हे विनंती.

¶*Raghunathrao asks Nana Fadnis to send twenty-five English switches and one hundred canes.*

No. 94] [*1-4-1765*

पौ छ १ जिलकाद खमस
वैशाख. बाा यमाजी.

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बाळाजी
जनार्दन स्वामी गोसावी यांसी

पो माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणे विशेष. खासगीत नेसावयासी धोत्रजोडे पैठणी पाहिजेत त्यास, येथून धोतर मासल्यास पाठविले आहे याप्रमाणे सूत व रेसीम या प्रतीचे लांब हात दाहा व रुंद हात सवादोन येणेप्रमाणे पुण्यात मिळतील तर धोत्रजोडे १० दाहा खरिदी करून पाठऊन देणे. पुण्यात न मिलत तर पैठणाहून आणऊन पाठवून देणे. रा छ १० सवाल. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa asks Nana Fadnis to send ten pairs of dhotis, of Paithan manufacture, required for his personal use.*

No. 95] [*4-12-1766*

पौ छ १२ रजब सन
सबा सितैन बाा आ-
बूबमाा सांडणीस्वार.

श्री

राजश्री बाळाजी जनार्दन स्वामी गोसावी यांसी

विनंती. उपरी, खासे धोत्रजोडे पैठणी जरीच्या कांठाचे कांठास वेल याप्रो निमोणा कागदावर लिहून दिल्हा होता त्यापौ काही तयार होऊन आले आसिले तरी पाठवणे व पुण्यातहि सावकाराजवल असतील तर आणून खरिदी करून पाठवणे. तूर्त येक दोन जे मिलतील ते पाठवणे. रा छ १ रजब सुा सबा सितैन मया व अलफ. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa asks Nana Fadnis to send some pairs of dhotis bordered with gold and silver thread-work.*

No. 96] [30-12-1766 ?

पो छ १३ साबान

सन सबा.

श्री

शेवेसी बगाजी रघुनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २७ रजबु-पावेतो स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित असे विशेष. स्वामीची आज्ञा की, दरमाहा दाहा लेखण्या करून पाठवाव्या. त्यास आज्ञेप्रमाणे माहे रजबच्या दाहा लेखण्या चांगेल्या करून पाठविल्या आहेत. त्या प्रविष्ट जालियावर उतर पाठवावयासी आज्ञा केली पााजे. पुढे दरमाहा लेखण्या पाठविल्या पाहिजेत; त्यास, येथे बोरुची पेरी अगदी नाहीत. त्यास जासुदजोडी येक अथवा सांडणीस्वार याजबाा शंभर पेरी चांगली पाठवावयाची आज्ञा केली पाहिजे. म्हणजे सदरहूप्राो दरमाहा लेखण्या प्रविष्ट करीन. दाहा लेखण्या पाठविल्या आहेत, त्यास पेरी चागली नव्हती, याजकरीता स्वामीनी रागे न भरावे. नलकुटी दोन बासाची चांगली पनास लेखण्या आत राहिसी पाठवावयाची आज्ञा केली पाहिजे म्हणजे आज्ञेप्राो लेखण्या करून सेवेसी पाठवीत जाईन. शेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Bagaji Raghunath writes that, as instructed, he will be regularly sending ten reed-pens every month if the reed sticks are sent him.*

No. 97] [7-12-1768

पौ छ २९ रजबु तिसा

मार्गसीर्ष बाा फतेअली

सांडणीस्वार.

श्री

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसांवी यांसी

विनंती. उपरी, चिरंजीव राजश्री नारायणराव यांजकरितां पोशाकास पैठणी दुपटे, तीन हात रुंद व पांच हात लांब, याप्रों पदरास जर आसवली अथवा

नारली पदराची अथवा साधी आठ बोटे साहा बोटे व किनारा जाफरखानी[1] घडीदार[2] अथवा आसवली अगर नकसी याप्रों सनगे :

२ लाल
२ बनोस
२ गुलाबास
२ हिर्वा
२ केशरी

१०

येकून दाहा दुपटे लिहिल्याप्रों जामदारखान्यांत असल्यास पा. नसले तर नवे पाहून खो करून पाठऊन देणे. रा छ २६ रजब सुा तिसा सितैन मया व अलफ पाहून पाठवणे. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa orders ten pieces of cloth of different varieties, which are mentioned in the letter, for the dress of Narayanrao.*

No. 98] [*25-12-1768*

पौ छ १९ साबान
तिसा मार्गसीर्ष.

श्री

पुा श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विज्ञापना ऐसीजे. आज्ञापत्र सादर जाहालें तेथें आज्ञा कीं, अननासांचें प्रयोजन हुजूर असे. तरी वसईपैकीं च्यार दिवसांआड आठदाहा पाठवीत जाणे म्हणोन. त्यावरून आज्ञेप्रो रवानगी करीत जावी म्हणौन वसईस सेवकाने लेहून पाठविले आहे. सेवेसी रवानगी होत जाईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

[पत्राचे मागील बाजूस "हे विज्ञापना" हीं अक्षरें आहेत.]

¶*The Peshwa is informed that, as desired by him, about ten pine-apples, from Bassein, would be regularly sent to him at the interval of every four days.*

---

१ जाफर=केशर. २ घडी=काठ.

No. 99] [20-1-1769

पो छ २२ रमजान तिसा
बा। फतेअली व आरब मा।
सांडणीस्वार.

श्री

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसांवी यांसी,

विनंती. उपरी, सरकारांत खासे धोत्रजोडे अगदीं नाहींत. त्यास, पैठणी धोत्रजोडे दाहा दर लांब हात अकरा साडेअकरा व रुंद पावणेतीन हात याप्रों सांडणीस्वाराबा। पाठऊन देणे. व कस्तुरी उंच पांच तोले व आसमानी रंगाचे रेसीम दाहा तोले याप्रों पाठऊन देणे. रा। छ ११ रमजान सु॥ तिसा सितैन मया व अलफ. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa asks Nana Fadnis to send ten pairs of dhotis for his personal use and also five tolas of musk and some silk-thread.*

No. 100] [10-3-1769

पौ छ १८ जिलकाद तिसा
फाल्गुन बा। देवजी व बावाजी
नाम्म तथे कचोजी नाईक.

श्री

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यांसी

विनंती. उपरी, तिगस्तां तुमचे घरी मेजमानी जाली तेसमई पागोटें रंगीन केलें होतें. रंग बहुत खुष जाहाला होता. त्या तऱ्हेची पागोटी दोन तीन कारेगर लाऊन तयार करून पाठऊन देणे. व पैठणी हिर्व्या रंगाची तिवटे पोशाकी लांब पंचेतालीस हात याप्रों हिर्वा रंग चांगला गहरा असी पाच तिवटे पाठवणे म्हणौन पेशजी तुम्हांस लिहिले होते. ते पत्र पावले कीं नाहीं कलत नाहीं. पुण्यात असल्यास पा। नाही तर पैठणास लिहून लिहिल्याप्रों तिवटे चांगली सूत बारीक असी पाठऊन देणें. रा। छ १ जिलकाद. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa asks Nana Fadnis to send some turbans of the description given in the letter.*

No. 101] [18-3-1769

पौ छ १८ जिलकाद
तिसा फाल्गुन बा
भिकनखान सांडणीस्वार.

श्री.

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यांसी

विनंती. उपरी, तुम्ही रंगीन पोषाक दोन, येक नाफरमानी[1] व येक केशरी, ऐसे पाठविले ते पावले. ऐशास, दोनहि रंग प्रस्तुत पसंद नाहीत. त्यास या रंगाचे पोषाक हरगीज[2] न करावे. पेशजी लिहिलें आहे कीं, तुमचे येथें मेजवानीस पोषाकी तिवट केले होतें त्याप्रों दोन तीन पोषाक तयार करून पाठऊन देणें. रा छ ९ जिलकाद सुा तिसा सितैन मया व अलफ. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa expresses his disapproval of the gaudy coloured garments sent to him and asks the addressee, Nana Fadnis, to send others of a different variety.*

No. 102] [पौ 27-3-1769

पौ छ १८ जिलकाद
तिसा.

श्री.

शेवेसी रामचंद्र नारायण गोरे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. गंगापुरी खाशांचे उपयोगी साकर चिनी सफेद मिळत नाहीं याजकारितां पांढरी खाशी साकर वजन पके ८२ दोन मण व कोंकबसालें वजन पके ८१ एकूण तीन मण उंटे माघारी येतील याजबराबरी पाठऊन द्यावी. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Ramchandra Narayan Gore asks for fine white sugar for the use of Gopikabai at Gangapur.*

No. 103] [6-4-1769

पौ छ ७ जिल्हेज तिसा
चैत्र बा रुस्तुमखान
सांडणीस्वार.

श्री.

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यासी,

विनंती. उपरी, सोवळ्यांत पांघरावयास दुपटे घुवट लांब सात हात व रुंद तीन हात याप्रों येक पटी मधीं सिवण नाही असे बारीक चांगले मुलाईम[3] दोही

१ जांभळा. २ बिलकूल, कधींहि. ३ मऊ.

पदरांस मात्र गोल जर तीन बोटे रुंद काठास जर नसावी अशा तरेचे पाचसात चंदेरीचे अगर जैनाबादी याप्रों अगर शाहागंडी अथवा पैठणी यांत जे मिळतील ते परंतु बारीक व मुलाईम याप्रो पाठऊन देणे. व गुलाबी चंदन चांगला येक सेर दोन सेर फार चांगला मिळेल तो पाठऊन देणे. रा छ २८ जिलकाद. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa asks Nana Fadnis to send some pieces of cloth of a particular description mentioned in the letter.*

No. 104] [*2-8-1771*

छ २७ राखर

इसने सबैन आषाढ.

श्री.

आसीर्वाद. उपरी, तुम्ही पत्र पाठविले ते पावलें. गंधकाचा अर्क राजश्री बाळाजी नाईक भिडे यांचे घरी होता तो कुपीत घालून पाठविला तो पावला. रा छ २० रबिलाखर. पावसाली टोपी स (क) लादी दुरंगी सकलादीची करून पा म्हणौन पेशजी लिहिले आहे, त्याप्रों व येक सुलतानी सकलादीची याप्रो दोन टोप्या करून जलद पाठऊन द्याव्या रा छ मजकूर. हे आसीर्वाद.

¶*The Peshwa acknowledges the receipt of a phial containing sulphur extract and asks for two caps made of broadcloth, one of them to be rain-proof.*

No. 105] [*5-4-1773*

पौ छ १६ मोहरम

सुा सलास सबैन.

श्री

अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्री
नारो आपाजी गोसावी यांसि

सेवक नारायणराव बलाल प्रधान नमस्कार. सुा सलास सबैन मया व अलफ. तुम्ही पत्र पाठविले ते प्रविष्ट जाहाले. परसू वागमारा खिजमतगार याजबराबर दुर्बीन पाठविली ती पावली. जाणिजे. छ १२ मोहरम. बहुत काय लिहिणे.

¶*The Peshwa, Narayanrao Ballal, informs Naro Appaji that he has received the spyglass sent with a servant.*

No. 106]

श्री

विनंती मीर आनवर. सावली पाहून तसबीर काढावयाची पेटी इंग्रेजाकडील आणिली होती ती आपण सरकारात मागावयास पाठविली, त्याजवरून शोध करून आपणाकडे नवलोजी चव्हाण याजसमागमे पाा आहे. घ्यावी आणि पावती द्यावी. जमा सरकारात धरिली आहे. इग्रेजाचे नावे खर्च लिहिविती. उतर पाा हे विनंती.

¶This paper refers to some crude photographic camera bought from the English.

No. 107]

श्री

राजश्री नारोपंत चक्रदेव स्वामीस

विनंती. उपरी, भगवंतजी चव्हाण खासबारदार दिमत संताजी धसला याजबोर चंबू शाई भरून पाठविला आहे. त्यास बहुत सावधपणे खर्च करणे. आठा दिवसी खर्च जालियावर चंबू पाठवणे म्हणजे आणखी शाई भरून पाठऊ. आज कूचकी मुकाम ते लिहिणे. रा. छ २४ रमजान. बहुत काय लिहिणे हे विनंती. *

¶The writer sends to Naropant Chakradev a small pot filled with ink.

No. 108] [26-8-1799

श्री

यादी जिनस वसईहून रा पुणं.
सुा मयातैन व अलफ छ २४
रोवल श्रावण वाा १० इंदुवासरे सुमार :

	꣸ अजसुमार	केळीं	नारळ	सुपारी	पाने	महाळुंगे
बाबासाहेब	८०७	१००	५	२००	५००	२
आपासाहेब	८०६	१००	५	२००	५००	१
रावसाहेब	८०६	१००	५	२००	५००	१
बाळाजीपंत पटवर्धन	४०२	५०	२	१००	२५०	०
राघोपंत गोडबोले	१७५	२५	०	५०	१००	०
बळवंतराव नागनाथ	५५२	५०	२	१००	४००	०
दादंभट खरे	३७६	२५	१	१००	२५०	०
	३९२४	४५०	२०	९५०	२५००	४

---

* नारोपंत चक्रदेव पेशव्यांचा सरदार, नानाफडणिसाचे वेळचा.

सो यसूने पो						
सौ वहिनीबाई	१७६	२५	।	५०	१००	०
सौ सीताबाई	१५०	२५	›	२५	१००	०
ताई वोकीण	९५	२०	›	२५	५०	०
काकूबाई	९५	२०	›	२५	५०	०
श्रीमंत बापूसाहेब	१४५	२०	०	२५	१००	०
सौ गुंजाबाई	९५	२०	०	२५	५०	०
	४६८०	५८०	२१	११२५	२९५०	४
नारोपंत चक्रदेव	२०१	५०	०	५०	१००	१
	४८८१	६३०	२१	११७५	३०५०	५

¶*This is a list of articles sent from Bassein to Poona to different persons.*

No. 109] [*10-6-1767*

पौ छ १३ मोहरम
समान सीतैन

श्री

आपल्ये नारयेणराव साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ १२ मोहरमपर्यंत यथास्थित असे विशेष. बस्मी साजाकडे दुपटा व तिवट व झगा तयार करावयास सनगे दिल्ही आहेत, त्यास तीन माहिने जाहले, अद्याप सनगे तयार करून दिल्ही नाहीं. त्यास ताकीद करून लौकर सनगे तयार करऊन पाठऊन देणे व गोपाल कारिगार घड्यालाचा याजवळ खासे घड्याल व मातुश्री बाईकडील वाड्याचे घड्याल नीट करावयास दिल्हे ते अद्याप घड्याले तयार होत नाहींत. त्यास ताकीद करून लौकर तयार करऊन पाठऊन देणे. रोजमरा भारी, काम लौकर होत नाहीं, याजकरितां निमे रोजमरा देत जाणे. खासे विडे राहत असी समली वेताची जिनसखान्यात आहेत त्यापैकी गवताची अगर वेताची मढल्या खेरीज असेल ती पाठऊन देणे म्हणोन आज्ञा. त्यास, बस्मी साजाकडील तीन सनगापैकी झगा तयार जाला आहे. तिवट दुपटा तयार होणे आहे तो जाहला म्हणजे पाठऊ. दोन घड्याले गोपाल कारिगर याजकडे आहेत त्यापैकीं मातुश्री बाईचे घड्याल आठपंधरा दिवसीं तयार करून देतो. खासे घड्याल तयार व्हावयास साहा महिने लागतील म्हणोन त्याणे सांगितले. निमे रोजमरा त्यास द्यावा म्हणोन आज्ञा; त्यास, निमे रोजमरा तो घेत नाहीं. मातुश्री बाईचे घड्याल

तयार करून घरास जावयास आज्ञा मागतो. याप्रों त्याचा मजकूर आहे. समली वेताची जिनसखान्यांत येक होती ती पाठविली आहे. पावलियावर उत्तर पाठवावें. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Narayanrao writes to the Peshwa, among other things, about two clocks which were under repairs.*

No. 110] [*1-4-1769*

पौ छ १६ जिल्हेज तिसा

चैत्र बा फतेआली सांडणीस्वार वगैरे.

श्री

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यासी

विनंती. उपरी, गं+जांतील घडाल्याचे भिंग फुटले आहे, याजकरिता तुम्हाकडे पाठविले आहे. तर याचे मेजाचे भिंग सिलकेस असल्यास बसविणें. सिलकेस नसले तर नवे मलवणे. न मिले तर माफजतीने घड्याल जवाहीरखान्यात ठेवणे. रा छ २३ जिल्काद. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Balaji Janardan is asked to fix the glass of the clock, which used to be kept in a case.*

No. 111] [*15-2-1770*

पौ छ २७ सवाल सबैन.

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रामाजी माहादेव चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ १८ माहे सवाल पावेतो स्वामीचे कृपावलोकने करून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीचें आज्ञापत्र घड्यालाविसी सादर जाले कीं, दोन घड्याले दर पनाससाठ रुपयाचे किंमतीचे मुंबईहून खरिदी करून आणोन पाठवणे म्हणोन आज्ञा; त्यावरून कृष्णसेठ सावकार यास मुंबईस पाठऊन.

+ पेटी.

शोध मनास आणितां पनाससाठ रुपयाचे किमतीची मिळत नाहीत. थोर घड्याळे दोन हातभर उंच व लाहान डबीवजा येक येकूण तीन, त्या तिहीची किमत सारखीच, दर साडेतीनसे रुपये पडतात, आणि तेथील सावकारीची रीत खरिदी होऊन पसंद न पडतां माघारी टाकल्यास घेत नाहींत. किमतीचा अजमास लेहून आला या किमतीची घड्याळे मिळत नाहींत. सदरहू भारी किमतीची तीन घड्याळे आहेत. यातील लहान किंवा थोर कोणेप्रतीचे केवढें असावे त्याची आज्ञा करावी. आज्ञेप्रा खरिदी करून पाठवितों. सेवेसी श्रुत होय, हे विज्ञापना.

¶*Ramaji Madhavrao informs the Peshwa that clocks for Rs. 60 each could not be had in Bombay, but that they would cost Rs. 350 each.*

No. 112] [*28-12-1774*

पौ छ २९ सवाल सुा
खमस मार्गसीर्ष.
चिठी लिहिणे.

श्री

राजश्री नारो आपाजी स्वामी गो,

विनंती. उपरी, येथील घड्याळ स्वारीबरोबरौ गेले. याजकरिता नवे घड्याळची येथे ठेविले आहेत. त्यापैकी मयाराम घड्याळची पाा आहे. याचे तसलमातीस दागिने

सुमार :

१ तास कोठी पो देणे. कोठीत चांगला नसल्यास तोफखान्याकडून करून देवणे. पांच शेर वजन.
१ वालुकायंत्र जिनसखान्यापौ चांगले.

—

२

यो दागिने दोन पाठऊन देणे. जाणिजे. छ २४ सवाल सुा खमस सबैन मया व अलफ. हे विनंती.

¶*Naro Appaji is asked to send one sand-glass for measuring time and one gong for striking the hours.*

No. 113] [20-11-1789

पौ छ ४ रौवल

तिसैन बा डाक.

श्री

राजश्री बाळाजी जनार्दन स्वामी गोसावी यांसी विनंती. उपरी, तुम्ही पत्र पाठविले ते पावले. हातघड्याळास नवे भिंग बसऊन रवाना केले ते शाबूद येऊन पोहचले. रा छ २ रौवल सुा तिसैन मया व अलफ. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*A hand-watch, having been fitted with a new glass, is acknowledged in this letter.*

No. 114]

6. Gopikabai of Gangapur.

पौ छ २४ रमजान.

श्री

शेवेसी रामचंद्र नारायण गोरे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. गंगापुरी जिनस पाहिजे त्याची आलाहिदा यादी पाठविली आहे त्याप्रमाणे पाठऊन द्यावा. येथे तेलंग ब्राम्हण पाणके आहेत ते अद्यापि चांगले बरे जाहाले नाहीत. याजकरितां दुसरे तीन पाणके ब्राम्हण पाठवावे व धोंडू भाव्या खाशे चाकरीचा होता तो मृत्य पावला. त्यास, दुसरा ब्राम्हण पाहिजे. याजकरितां विठोबा सोवनी पुण्यांत आहे तो खाशाचे चाकरीत उगवला आहे. तो ज्या कामावरी आहे तेथें दुसरा ठेऊन त्यास येथे पाठऊन द्यावा. तो येईल त्याणेंच लवंगाचा व दालचिनीचा अर्क आणावा. शुद्राजवळ देऊ नये. दोन्ही अर्क येकक शेर ब्राम्हणाकडून काढऊन ब्राम्हणाबराबरी पाठऊन द्यावे म्हणून आज्ञा जाली आहे. विदित होवें. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Ramchandra Narayan Gore writes from Gangapur asking the appointment of some servants on the establishment of Gopikabai.*

No. 115] [10-5-1762

पैा छ २९ सवाल

श्री

शेवेसी रामचंद्र नारायेण गोरे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा छ १९ सवालपावेतो यथास्थित असे विशेष. वेदशास्त्रसंपन्न राजश्री

बापूभट जांबेकर पुराणिक सावताचे वाडीस आहेत त्यांस घोडें माणूस व येक कामाठी ऐसे पाठऊन पुण्यास घेऊन यावें म्हणून आज्ञा जाली. पुराणिकबावांस येक पत्र येथून पाठविलें आहे, हें त्यांस प्रविष्ट करावें व. आपणहि येक पत्र लिहून पाठवावें. श्रीमंत राजश्री दादासाहेबांची शरीरप्रकृति कशी आहे? मौन धरिले आहे म्हणून वर्तमान आइकिलें; त्यावरून आपणास लिहून पाठवायाची आज्ञा जाली. त्यास स्नानसंध्या काय किती करितात तें सविस्तर लिहून पाठवावें. बहुत काय लिहिणें कृपालोभ असों दीजे हे विनंती.

¶*Ramchandra Narayan Gore, on behalf of Gopikabai, makes inquiries about Dadasaheb's health and occupation.*

No. 116] [*Recd. 23-1-1764*

पौ छ १९ रजबु

आर्बा पौष.

श्री

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसांवी यांसी

विनंती. उपरी, तीर्थरूप मातुश्री बाईचे मानस गंगातीर कृष्णातीरी जावयाचे आहे. त्यास न जाण्याविसी विनंती केली. त्यास आज्ञा जाली जे, फरासखान्याचे सामान घोड्याचे सामान तयार करवावे. ऐसियास, खर्चास यैवज पाहिजे. जाणे जाले तर उंट नाहीत, राऊत नाही. हशमी माणूस पाहिजे म्हणौन लिा तें कलले. त्यास, सामान सांगितल्याप्रों करावें. राऊत येथून सेलारांचे साठ नेमिले आहेत. आणखीहि पंनास राऊत नेमून पाठऊ. सेलारांस येथून पत्र पाा आहे. तुम्ही तेथून पत्र पाठऊन घेऊन जाणें. हशमी माणसांविसी विसाजी केशव यास सांगितले आहे. त्याणी कबूल केलें, जे समई पाहिजेत ते समई शंभर माणूस देतों. खर्चवेचाचा प्रकार तर कार्याकारण लागेल ते देणे. न जावे याविसी आम्ही लिहिणे ते लिहून पाठवितों. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa writes to Nana Fadnis asking arrangements being made for Gopikabai's intended journey to the banks of the Ganga and the Krishna.*

No. 117] [25-2-1764

पाा छ २९ शाबान.

श्री

श्रीमंत राजश्री दादा साहेब स्वामीचे सेवेसी

विनंती शेवक गोविंद सिवराम साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २२ साबान स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित आसे, विशेष. जासुदाबराबर छ १९ साबानचे आज्ञापत्र सादर जाले तेथे आज्ञा की, जलालपुरी व दारणासांगवी येथे घरे तयार करविली आहेत, तरी मातुश्री बाईस घेऊन येणे म्हणून. त्यास स्वामीनी उंटे, राहुटिया साहित्य पाठविले त्याजवरून मातुश्री बहुत संतोश जाली. काली सुक्रवारी मुहूर्ते निघोन संगमावर राहिली आहेत. राहावयासी दारणासांगवी आगर जलालपूर येथे स्वामीचे विचारे होईल तेथे राहातील. आपले राहाणे गोवर्धनी जाले तरीहि जलालपुरी राहातील. दारणासांगवीस संगमीं आपले राहाणे जाले तरी मातुश्री गावात, गोविंद कृष्ण याच्या वाडियात राहातील. आता दरमजल येऊन पोहचतात. स्वाम गंगातीरी राहातात, समीप आपण राहावे हे श्रीमंत मातुश्री बाईचे मनात फार होते. हे ईश्वरे सेवटास नेले म्हणून स्वामीवर मातुश्री अति संतोष आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Govind Shivram to Raghunathrao, informing him that, as desired by him, Gopikabai had started from Poona for Jalalpur near Nasik.*

No. 118] [5-3-1764

श्री

सेवेसी लक्ष्मण आपाजी नातू चरणावर मस्तक ठेऊन सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा फाल्गुन शुध्ध त्रितीया इंदुवासर मुाा मौजे नांदूर यथास्थित असे विशेष. श्रीमंत मातुश्री बाई पुणियाहून निघोन दरकूच मुाा मजकुरी आजच दाखल जाली. उदईक शिनरचा मुकाम होईल. पर्वीचे दिवसी दारणासंगमी जातील. मातुश्रीनी (फाटले) त अगर दारणासंगमी गोविंद कृष्ण याचे वाडियांत या दो स्थळांतून येके स्थली राहावे ऐसे स्वामीनी सांगितले होते, ते समई स्वाम त्र्यंबकी होते. प्रस्तुत चावंडसेस स्वारी दाखल जाहाली. याजकरितां मातुश्रीनी कोणे ठिकाणी राहावयास यावे हे आज्ञा सेवकास जाहाली पाहिजे. स्वामीचे मर्जीसिवाय मातुश्रीचा दुसरा विचार किमपि नाही. स्वाम जे स्थळ योजून सांगतील तेथच राहावे ऐसे मानस आहे. परंतु राहावयाचे

स्थळापासून गंगा केवळ निकट अशिली पाहिजे. गंगेहून सोवळ्यानीच घरास यावे, लोकांची दाटी नसावी, इतकी सोय जरूर पाहिजे. जला(ल)पुरी राहावे हेच उभयपक्षी विचारास येईल. ते जागा फार सोयची आहे येविसी विनंती केलीच आहे. स्वामीचे उतर येईल त्याप्रो॥ वर्तणूक होईल. स्वाम जे स्थळ योजून सांगतील त्यासिवाय दुसरे स्थली राहात नाही. याजकरिता स्थल योजून सेवकास पत्री आज्ञा जाली पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Laxman Appaji Natu consults Raghunathrao as to where Gopikabai should stay, whether at Jalalpur or at the confluence of the rivers Godavari and Darna.*

No. 119] [*24-10-1764*

पो छ २८ राखर

सन खमस.

श्री

शेवेसी रामचंद्र नारायण गोरे विनंती. श्रीमंत राजश्री दादासाहेब या प्रांतांतून गेले. आतां इकडे कोणी नाही. आम्ही राहिलों आहो; त्यास, आसपास कोली दंगा करूं लागले. याजकारितां पाऊणशें स्वार राऊत व दुसरें शंभर पाईचें माणूस मावले लोक ऐसे त्याच्या खर्चावेचाची बेगमी करून आम्हाजवल पाठवावे, ऐसी आज्ञा जाली. दुसरें कापड पाहिजे त्याची याद पूर्वी पाठविली आहेच त्याप्रमाणें खरेदी करून पाठऊन द्यावें. त्यास उंटे आपणाजवल असलीं तरी उतमच जाले. नाही तरी आम्हास लिहून पाठवावें; आम्ही पाठऊन देऊं. दुसरें, मातुश्रीस दर महिन्यास तिन दुपटे सोंवल्यात पांघरायासी लागतात. साधे, जरी नाही ऐसे (अपूर्ण).

¶*Ramchandra Narayan Gore, on behalf of Gopikabai, asks for a company of guards for the protection of the establishment at Gangapur. He also reports some other articles required by the lady.*

No. 120] [*23-3-1765*

पौ छ ९ सवा॥७

चैत्र मास.

श्री

शेवेसी रामचंद्र नारायण गोरे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ता॥ चैत्र शुध द्वितीया पावेतों यथास्थित असे विशेष. आपण पत्र पाठविले

तें पावल. वर्तमान श्रीमंत मातुश्रीस निवेदन केलें. त्यास आपण लिहिलें उंटे पाठऊन द्यावी म्हणून. त्यास तीर्थरूप राजश्री कृष्णाजीपंत गोरे याजबराबरी उंटे १० पाठविलीं आहेत व पेशजी दोन; येकूण बारा उंटे पुण्यास आम्हाकडून गेलीं आहेत. श्रीमंत राजश्री नारायणरावसाहिबांस येथें पाठवाल त्यांचे समागमे सौभाग्यवती मातुश्री रमाबाईसहि पाठवावें. त्यांचा नवस देवीचे दर्शनाचा आहे तोहि करितील. आणि श्रीमंत मातुश्री सगुणाबाईसाहेबांसहि पाठवावें. दोन महिने गंगेचीं स्नानें करून जातील, ऐसी आज्ञा जाली आहे. वरकड कितेक मजकूर तीर्थरूपांबराबरी श्रीमंत मातुश्रीनी सांगितले आहेत त्यावरून सविस्तर आपले ध्यानास येईल. वरकड श्रीमंत आदीकरून पुण्याहून आम्हाकडे रवानगी कराल ते समईं शागीर्दपेशा वगैरे खर्च समागमें बहुतच येईल. त्यांच्या रोजमुरेयाची वगैर तरतूद करून द्यावी. आपणाजवळ ऐवज नाही हे आम्हास ठाऊक आहे व नवा वाडा बांधावयास प्रारंभ केला आहे हेहि काम भारी आहे. अद्यापि अर्धे जाले नाही. तेहि असों. आम्हांजवळ सिबंदी वगैर खर्च समेत कोठी दर माहे रुपये ३००० तीन हजारांचा आहे. थोरले श्रीमंतानी ऐवज दर माहे येक हजार प्रमाणें रुपये आठ हजार देविले ते दोन महिन्यांत खर्चोन गेले. काली आपण दोन हजार ऐवज राजश्री बालाजीपंत मांडवगणे यांजकडून देविला तो तेच दिवसी सेठ्याचा ऐवज देणें होता त्यास दिले. आणखी ऐवज किमान पक्ष रुपये १०००० दाहा हजार हर काहीं करून पाठविले पाहिजेत. आता दर माहे रुपये सात आठ हजार लागतील यांत संदेह नाही. श्रीमंतांजवळ सिबंदी नावाप्रमाणें ठेविलीच पाहिजे. कोठींत काही नाही. त्यास, पेशजी याद पाठविली आहे त्याप्रमाण सरकारची कोठी बैल, येक खेप पाठविली म्हणजे काही निश्चिती होईल. लवकर पाठवावे. बहुत काय लिहिणे, कृपावृधि असावी, हे विनंती.

¶*Ramchandra Narayan Gore asks for more money, to be sent from Poona, for the expenses of Gopikabai's establishment at Gangapur, where Narayanrao, Ramabai and Sagunabai were asked to go for a short sojourn.*

No. 121] [*11-5-1765*

पा॥ छ २७ जिलकाद खमस

वैशाख बा॥ हरि भागवत.

श्री.

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

सेवक हरि जिवाजी सा॥ नमस्कार विनंती. उपरी. येथील वर्तमान ता॥ छ २० जिलकादपावेतो मुकाम गंगापुरी सुखरूप असों विशेष. आपली आज्ञा घेऊन

पुणियाहून आलों. श्रीमंतांचे आज्ञेप्रा॥ श्रीमंत मातुश्रीबाई यांस विनंती केली. आम्ही आलो नव्हतो त्याचेपूर्वी मातुश्रीबाईस पाचसात दिवस थोडा थोडा ज्वर येत होता. परंतु आम्ही आलियावरी करार केला कीं, श्रीमंत राजश्री नारायेणराव यांस त्रिंबकची यात्रा जाली नाही ते कर (फाटले) दिवस लागतील. इतकियांत ज्वरहि निघतो. प्रकृतहि बरी होईल. समागमेंच जाऊ. अथवा उंटांचा तोटा आहे तरी श्रीमंत राजश्री नारायणराव यांस व मातुश्री सगुणाबाई व सौ मातुश्री रमाबाई यांस पुढे ला(वा)वे, मागाहून आपण यावें. असा प्रकार केला होता. श्रीमंत राव त्रिंबकेस्वरास जाऊन आले तों मातुश्री बाईस ताप आधिक येऊं लागला. दोनच्यार दिवस फारच आला. आता सांप्रत दोन दिवस उतार आहे. याजकरिता शरीरप्रकृत ठीक होय तों च्यार दिवस राहाणे जालें. वैशाखअखेर येणे होईलसे दिसते. परंतु येथे उंट नाही. कनिस्ट पक्षीं पनास उंटाविना येणे होणार नाहीं. येथे बावीस उंट होते. त्यास, काली आठ उंट कल्याणास पाठविले आहेत. कांही भांडी वगैरे सामान आणविले आहे. त्यास पंधरा दिवस लागतील. बाकी तेराचौदा उंट राहिले आहेत. केवल गाड्यांवरी आगदीच वोझें कसें चालेल? याजकरितां कांही उंटाची सोई जालियास करून पाठवावी. वोझ्याची सोई जालियास अवघीच समागमे येतील. नाही तर श्रीमंत राव व मातुश्री सगुणाबाई व सौ रमाबाई यांस पुढें पाठवावें, मागाहून (फाटलें) रावसाहेब पुणियास पोहोचोन उंटे मावारी येऊन मग याणी यावें, तरी दिवसगत लागत्ये. जेस्ठ अखेर येणे होईल. लस्करें तरी जेस्ठ सुधांत येतीलसें दिसतें. सेवेसी वर्तमान कलावे म्हणून लिा आहे. लस्करें पंढरपुराइतकी आहेत तों मातुश्री पुणियास यावी असी मर्जी लस्करची मजला आज्ञापिली होती. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

¶*Hari Jivaji writes to Nana Fadnis about making arrangements for the journey of Gopikabai, Narayanrao and others from Gangapur to Poona.*

No. 122] [पा॥ *18-5-1765*

पा॥ छ २७ जिलकाद

खमस वैशाख बा॥ हरि

भागवत खिजमतगार.

श्री

राजश्रियाविराजित राजश्री बालाजी जनार्दन

स्वामी गोसांवी यांसी

पो॥ नारायणराव बलाल नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन करीत जाणे विशेष. तुम्हाकडून पत्र येऊन वर्तमान

कळत नाही. तरी सविस्तर वर्तमान, लस्कर कधी येणार वगैरे लिहून पाठवणे. तीर्थरूप मातुश्री बाईसाहेब पुण्यास सत्वरच येणार. वझ्यास उंटे पाठऊन देणे. उंटाखेरीज खोळंबा असे; तरी सत्वर पाठवणे. बहुत काय लिहिणे, हे विनंती. तीर्थरूप मातुश्री काकूबाईस पत्र पाठविले आले आहे. तर तेथून कागदाची रवानगी काकूबाईकडे करणे, हे विनंती.

¶*Narayanrao to Nana Fadnis, asking him to send some camels to carry the luggage of Gopikabai proceeding to Poona.*

No. 123] [*22-5-1765*

पौ छ ६ जिल्हेज.

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यांसी

पोष्य माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये लिहिणे विशेष. इकडील वर्तमान तर आम्ही तुंगभद्रातीरीहून दरकूच रामतीर्थास आलो. इतक्या उपरी सत्वरच पंढरपुराहून सत्वरच पुण्यास येत असो. तीर्थरूप मातुश्री बाई पुण्यास येणार त्यास तेथे वोझ्यास उंटे नाहीत. यास्तव पत्र पावताच तेथे उंटे वगैरे पाठऊन सत्वर पुण्यास येणे होय ते करणे. पत्र पावताच सत्वर सामान रवाना करणे. रा छ १ जिल्हेज. बहुत काये लिहिणे हे विनंती. पुण्यात उंटे लोकाचे घरी असतील अथवा हती असल्यास लवकर पा. हे विनंती.

¶*The whole of this letter is written by the Peshwa himself. It contains the news that the Peshwa, who was on his way home from the Karnatic, would shortly be in Poona via Pandharpur.*

No. 124] [*22-6-1765*

श्री

सेवेसी रामचंद्र नारायेण गोरे सां नमस्कार विनंती. येथील कुशल तागाईत छ २ मोहरमपावेतो वर्तमान येथास्तित असे विशेष. श्रीमंत मातुश्री बाईसाहेब व राजश्री नारायेणरावसाहेब यांच्या पालखीची मेणकापडे फाटली आहेत, उपयोगी नाहीत. पावसात स्वारी (फाटलें). तरी चांगली मेणकापडे पालख्याच्या बेताची सुमार २ दोन पाठऊन द्यावी. येथे फार खोळंबा जाहाला आहे. तरी सत्वर पाठवावयासी आज्ञा करावी. विदित होवे हे विनंती

¶*Ramchandra Narayan Gore asks for two pieces of water-proof oil-cloth required for the palanquins of Gopikabai and Narayanrao.*

No. 125] [*1-11-1768*

पो छ २९ जाखर तिसा.

श्री

शेवेसी रामचंद्र नारायण गोरे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ता। छ २० जाखरपावेतों मुकाम गंगापूर यथास्थित असे विशेष. खराडीचे मुकामीहून छ ९ जाखरी स्वारी निघाली ते छ १७ जाखरी मुकाम मजकुरी पावली. समागमें उंटे कामाठी वगैर ज्याजती आहेत ते येका दों दिवशी पाठऊन देतों. आनंदवलीस श्रीमंत राजश्री दादासाहबांचे राहाणे असे, तेणेंकरून आम्हांजवल सिबंदी थोडी असली तथापि काही वाटत नसे. आतां या प्रांती कोणी नाही. राऊत होते त्यांसहि निरोप दिला. याजकरितां यंदा येथे सिबंदी अधिक पाहिजे. कदाचित गाडदी यांची येक बेरक[1] त्यांची वाद्यांसुधा असेल तरी दबाब बरा राहील व सिबंदीचे लोक व राऊतहि चांगलेच असावे. त्यास श्रीमंतास विनंती करावयाची असली तरी करावी, अगर आपणच अजमास पाहोन जे पाठवायाचे असतील तितके पाठवावे. व रुप्याचा देव्हारा रा। गणेशपंताजवल जवाहिरखान्यात नीट करावयाशी दिला आहे तो व त्याचा चवरंग व च्यार चहूकडील फल्या आहेत त्या न्याहाल चवकीदाराजवल आहेत त्या ऐसे पाठऊन द्यावें म्हणून आज्ञा जाली आहे. लवंगाचा अर्क च्यार तोलेपावेतो पाठवावा. येथं घोडी आहेत ही येथे ठेवावी किंवा कोठे पागेस पाठवावी? या प्रांती प्रस्तुत बाजरी तेरा पाइली, हरभेरे साहा पाइली याप्रमाणे आहे. आपणास लिहून पाठऊन जापसाल आणावा आणि यजमानास दाखवावा याप्रों आज्ञा जाली त्यावरून लिहिलें आहे. आपली आज्ञा येईल त्याप्रमाणे विनंती करूं. राऊत पाठवायाचे ते लवकरच पाठवावे. बहुत काय लिहिणे, कृपावृधि असों द्यावी, हे विनंती.

¶*Ramchandra Narayan Gore requests that a troop of guards should be sent for protecting the establishment of Gopikabai at Gangapur which had recently lost the neighbourhood of Raghobadada's entourage owing to the latter's removal from Anandvalli.*

No. 126] [*17-11-1768*

पौ छ ११ रजबु तिसा

कार्तिक.

श्री.

शेवेसी रामचंद्र नारायण गोरे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ता। छ ६ रजबपावेतो यथास्थित असे विशेष. नारायण गवंड्याकडून

[1] सैन्याची तुकडी.

मुरलीधर कृष्णाची मूर्ति करविली आहे. तिला येथील मर्जीप्रमाणें रंग रोगणी कसा द्यावा तें ठाऊक आहे, याजकरितां नारायण गवंड्यास बलाऊन मूर्तीस रंग बहुत उतम देऊन [१] जिले विशिष्ट येई तो प्रकार करवावा, आणि तयार जाली म्हणजे माफजतीने पाठऊन द्यावी म्हणून आज्ञा जाली आहे. दुसरें, गंगापुरी घर बांधायाचें आपण मान्य केलें आहे. त्यास, सातां खणाचें, दोहीकडील दोन वोसऱ्या व माजघर, याप्रमाणें करावें. भास्करपंतास लिहून पाठवावें. ते करितील. गंगातीरी घर बांधिले तरी उतम कारणीच लागेल. आज्ञा जाली त्याप्रमाणे लिहिलें आहे. विदित होवें. बहुत काय लिहिणे, कृपावृधि असां द्यावी, हे विनंती.

¶*Ramchandra Narayan, on behalf of Gopikabai, writes about painting a model of Murlidhar (Shrikrishna) and about the project of building a house at Gangapur for Gopikabai.*

No. 127] [*Recd. 22-11-1768*

पौ छ ११ रजबु तिसा
कार्तिक

श्री

शेवेसी रामचंद्र नारायण गोरे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. रोंठी श्रीवर्धनी सुपारी बहुत चांगली वजन पकें ८। दाहा शेर व चिकणी खाशी ८८९ ऐशी पंधरा शेर सांडणीस्वाराबराबरी लवकर येऊन पावे तें करावें. खोलंबा जाला आहे. विदित होवें हे विनंती.

¶*Ramchandra Narayan asks for two varieties of betelnuts which were very urgently needed by Gopikabai.*

No. 128] [*23-11-1768*

पौ छ २० रजब सन तिसा.

श्री

शेवेसी रामचंद्र नारायण गोरे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम तागाईत छ १२ रजबपावेतो यथास्थित असे विशेष. सन आर्बीचे सालीं मातुश्रीची स्वारी गंगातीरास आली त्या दिवसापासून आजपावेतों कोठीचें लिहिणें तटले आहे. त्याचें कारण काय म्हणाल तरी पहिल्ये साली स्वारीसमागमें

---

१ जिल्हई.

कारकून गंगाधरपंत आपणाकडील व माणकोपंत व मी ऐसें होतों. वाकनिसाच कोणी नवतें. त्या समई माणकोपंताकडून कोठीचें व वाकनिसाचे तर्फेचे लिहिणे लिहविलें. मग ते आपले घरास गेल्यावर गंगाधरपंतानी दोन महिने फडणिसीचे व कोठीचे व वाकनिशीचे लिहिणे लिहिलें. त्यानंतर हरिपंत फडके आले. त्याणी कोठीचें व वाकनिशीचे लिहिणे लिहूं लागले तें खमस अखेरपावेतों लिहिलें. पुढें स्वारी पुण्यास आली ते समई पांच रुपये दरमाहा करून गरीबसा कारकून चिमणाजी शंकर म्हणून ठेविला. त्याणें च्यारपांच महिने यादबूद राखिली. स्वारी आली ते समई चिमणाजीपंताच्या यादी हरिपंताने ठीक पाहोन समजून घेतल्या. त्यासाली वाकनीस समागमे आले. परंतु शाकभाजी, दक्षणा व किरकोल तेवढे मात्र संभालिलें. कोठीकडील व कारखान्याचे कामकाज (न) संभालिलें. अखेरीस स्वारी पुण्यास गेली. त्यानंतर सन सबांमध्यें रा। लक्ष्मणपंत आपटे यानी श्रीमंतांची परवानगी सांगितली. 'मातुश्रीचे स्वारीचे लिहिणे वाकनीस लिहितील ते लिहू देणे म्हणून मजला सांगितले. ते समई आश्विन माशीं स्वारी आल्यावरी वाकनिसांनी गंगापुरास येऊ तोंपावेतों मार्गी लिहिलें. येथें आल्यावरहि कोठीपैकी सामान घेऊन मुदपाकखर्च मात्र लिहिला. वरकड जमाखर्च हरिपंतच करीत होते. पुढें अखेरीस स्वारी पुण्यास गेल्यावर मुकामी हरिपंत होते. सन समानात स्वारी आली नाही. सालमजकुरी स्वारी आल्यापासून मागती वाकनीस कोठींपैकी सामान घेऊन मुदपाकखर्च लिहितात. वरकड थटी, पागा वगैरे किरकोल हरिपंतच लिहितो. दोघां कारकुनाचे लिहिणें इमारतीसुधां आहे. आजपावेतों मी व त्याणे संभालिलें आहे. परंतु झडत्या जा (अपूर्ण).

¶*Ramchandra Narayan Gore mentions details of the duties of the various clerks who served on the establishment of Gopikabai, at Gangapur, from 1764 onwards. She is mentioned to have visited Poona in 1765.*

No. 129] [*Recd. 12-12-1768*

पो। छ २ साबान तिसा मार्गसीर्ष

ब्रा। लक्ष्मण खासबारदार

श्री

शेवेसी रामचंद्र नारायण गोरे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती.

पिस्ते वजन पक्के ८८९. शालिचा बुरणूस सोवळ्यात पांघरावयाचे उपयोगी, मधून दोरा नसावा, एकपटी, मातुश्री बाईसाहेबाचे पायांचे मेजाचे च्यर्मी जोडे चांगले मृदु सुमार ४ च्यार सरकारचा चांभार जो करीत

रंग काळा अगर तुसी नसावा. वरकड पांढरा पिवळा अगर दुसरे प्रकारचा तलाश करून सुमार १.	असतो त्याजकडून करवून उंटे येतील त्याजबरोबर पाठवावे कलम १.

सदरहूप्रमाणें उंटे येतील यांजबराबरी पाठऊन द्यावे म्हणून आज्ञा जाली आहे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Ramchandra Narayan Gore orders shoes and blankets for the use of Gopikabai.*

No. 130] *[17-1-1769*

पौ छ १४ रमजान
तिसा सितैन.

श्री

शेवेसी रामचंद्र नारायण गोरे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम पौष शुध १० पावेतों यथास्थित असे विशेष. पुण्यामध्यें श्रीमंत मातुश्री बाईसाहेबांचे रंगमाहालांत न्याहालसिंग चवकीदार आहे, त्याजवळ सरकारचे दागिने आहेत. त्यांत पांढरे तांब्याचा आस्तावा आहे, त्याप्रमाणे रुप्याचा नवा तयार करून ब्राह्मणाचे पाय धुतात त्यास पाणी घालावयाशी पाहिजे. त्यास, त्याचे तोटीतून साफ पाणी पडते त्याप्रमाणे रुप्याचा आस्तावा करून पाठऊन द्यावा म्हणून आज्ञा जाली आहे. विदित हावे. बहुत काय लिहिणे, कृपालोभ असों द्यावा, हे विनंती.

¶*Ramchandra Narayan orders a silver water-jug from Poona for Gopikabai.*

No. 131] *[3-2-1769*

श्री

शेवेसी रामचंद्र नारायेण गोरे कृतानेक साष्टांग विनंती. येथील कुशल तागाईत छ २९ रमजानपावेतो मुा गंगापूर सुखरूप असो विशेष. संभाजी वेलोसा खासबारदार याजबरोबर जिनस पाठविला तो पावला. बितपसील:

७२ लवंगा ८८१.	दालचिनीचा अर्क वजन पके ८८१.
७२ येलदोडे ८८१.	उदबत्या सुमार २००.
३६ दालचिनी ८८॥.	मुरलीधर श्रीकृष्णाची मुहूर्त १.
१८ कस्तुरी.	
१९८	

+ पिवळसर तांबडा.

अस्तावा रुप्याचा सुमार १ येकून
वजन तोले २०३. '–

सदरहूप्रमाणें सामान पावले. अस्तावा पुण्यांत आहे त्याप्रमाणे तेवढा तितकेंच पाणी राहे आणि तोटीनें त्याचप्रमाणे पाणी साफ पडे ऐसा नवा रुप्याचा करऊन पाठऊन द्यावा म्हणून आज्ञा जाली. आपण पाठविला तो उतम आहे. परंतु नखशीमुळें धुतां येत नाही; साफ पाहिजे. याजकरितां पुण्यात साधा आहे त्याप्रमाणे करून पाठवावा. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Ramchandra Narayan, from Gangapur, acknowledges the receipt, among other articles, of a model of Murlidhar (Shrikrishna) and a silver water-jug.*

No. 132] [*17-2-1769*

पौ छ १३ सवाल
तिसा सितैन.

श्री

शेवेसी रामचंद्र नारायण गोरे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम माघ शुध १२ पावेतो यथास्थित असे विशेष. पुण्यातील कोटावरची वगैरे जवळची कुणबिणीचे घरें होती ती मोडली गेली. त्यास, आतां पुण्यास मातुश्री बाईसाहेबाची स्वारी आल्यावरी कुणबिणीस घरें पाहिजेत. त्यास, दुसरी घरें वाड्याचे समीप ऐशी बांधोन ठेवायास सांगावें. घरें पंधरापावेतों पाहिजेत. याप्रमाणे लिहून पाठवायाची आज्ञा मजला बहुत दिवस जाली होती. मी विसरलो होतों. आता स्मरण जाहालें, त्यास लिहून पाठविलें आहे. आपली आज्ञा येईल त्याप्रमाणें विनंती करीन. विदित होवें. बहुत काय लिहिणे, कृपालोभाची वृधि असावी, हे विनंती.

¶*Ramchandra Narayan Gore writes from Gangapur that arrangements should be made for building about fifteen new dwellings for the female servants of Gopikabai at Poona, where she intended to go shortly.*

No. 133] [*21-4-1769*

पौ छ १९ जिल्हेज.

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
रामचंद्रपंत गोरे स्वामीचे सेवेसी,

पो बालाजी जनार्दन सां नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल ता छ १३ जिल्हेज जाणून स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही पत्र पाठविले

ते पावले. श्रीमंत मातुश्री बाई यांची स्वारी पुण्यास येणार. त्यास, सामानाची याद पाठविली आहे त्याप्रा पाठऊन द्यावे म्हणून लिहिलेत. त्यास, तुमच्या लिहिल्याप्रमाणे सामान गोविंद बलाल कारकून याजबराबर पाठविलें आहे. त्याची याद आलाहिदा आहे त्याप्रा पावेल. त्रिंबकपंत गोडबोले यासहि समागमे मर्जी असली तर आणावे. बहुत काय लिहिणे, लोभ असो दीजे, हे विनंती.

¶*Nana writes to Ramchandrapant Gore about the arrangement made for the journey of Gopikabai from Gangapur to Poona.*

No. 134] *[4-1-1770*

पा छ ६ रमजान

सबैन.

श्री

शेवेसी रामचंद्र नारायण गोरे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. खाशे चाकरीच्या बाइकांचे मुलांची लग्नें करायाची, त्यापैकी यंदा दोघां मुलांची लग्नें करायाची आज्ञा जाली आहे. त्यास थोडें बहुतानी दोघांची लग्नें करावी. रा चिंतोपंत सहस्त्रबुध्ये व हरिपंत भाव्ये यां दोघांस तेथें नेमून द्यावे म्हणून आज्ञा जाली आहे. विदित होवें. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Ramchandra Narayan Gore communicates Gopikabai's desire that arrangements should be made for the marriages of two of the sons of her female servants.*

No. 135] *[3-5-1769*

पा छ २८ जिल्हेज

सन तिसा.

श्री

सेवेसी हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ २९ जिल्हेज मुा ढासले पा दाभाडी वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तर, श्रीमंत टोक्यास जाऊन गंगापुरास जाणार होते. त्यास, गंगापुरी जावयाचा विचार राहिला. श्रीमंत मातुश्री बाईसाहेब पुण्यास येतात असें जालें. त्यास, आज औरंगाबादेचे आसपास चह्ू कोसांवर मुकाम होईल. तेथून टोक्यास जाऊ. येकाधा मुकाम जाहाला तर जाला, नाही तर दरकूच पुण्यास षष्ठीचे मुहूर्तास येत असेत. कालावें. अधिकोतर लिहिजेसे नाहीं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Hari Ballal writes from Dhasle that the Peshwa, having cut short the programme of his tour, will directly proceed to Poona to meet his mother who was also at this time going there from Gangapur.*

No. 136] [16-11-1772

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी,

पो पांडुरंग कृष्ण गोडबोले कृतानेक साष्टांग नमस्कार .... कुशल ता। छ २० माहे शाबान मुकाम गंगापूर यथास्थित जाणून स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही जासूदजोडीबरोबर पत्र पा। ते पावले. तेथे लिहिले की, श्रीमंताची आज्ञा, मार्गसीर्षापासून पांच हजार रुपये दरमाहाच्या दरमाहा गंगापुरास श्रीमंत मातुश्री बाईसाहेबाकडे खर्चास देविले आहेत. येविसीं विनंती करून सविस्तर उतर पाठवावे. त्यास, लिहिल्याप्रों पत्र वाचून दाखविलें. "अस्तु" म्हणौन उतर जालें. त्यास आपण महिन्याच्या महिन्यास पाच हजार रुपये गंगापुरास पा। जावे. ज्याजती कमी लागल्यास राजश्री रामचंद्रपंत नारळेकर गंगापूरचे कारभारी आपल्यास लिहोन पा। त्याप्रों रवाना करीत जावे. आम्ही आजच निघोन श्रीमंताकडे लस्करात गेलो. कलावे. विशेष वर्तमान ल्याहावयाजोगते नाहीं. येथील स्तीत केवल विदेही जाली आहे ते पत्री काय ल्याहावे? अशांत क्षुद्रोपद्रव न होत असावे. कदाचित येताना आपल्याकडून आल्यास भेटीहि होईल. कलावे. बहुत काये लिहिणे, लोभ करीत असिले पाहिजे, हे विनंती.

¶*Pandurang Krishna Godbole writes to Naro Appaji Tulshibagwale, acknowledging the receipt of a letter mentioning the monthly grant, ordered by the Peshwa, of Rs. 5,000 for the expenses of Gopikabai's establishment at Gangapur.*

No. 137] [28-6-1761

छ २४ जिलकाद
इसने सितैन.

श्री

राजश्री रघुनाथ पंडित गोसांवीं यासि,

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो। रावोजी आंगरे वजारतमाब रामराम विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये लेखनाज्ञा करीत असिले पाहिजे विशेष. छ २० जिलकादचे पत्र जासुदासमागमे आले ते छ २४ भिनहूस तलेगावचे मुकामी पावलें. श्रीमंत नानासाहेबी कैलासवास केला, ईश्वरे

फार अनुचित केले. किलेकोटाची खबरदारी सावधतेने करावी म्हणून लिहिलें. श्रीमंतांचे कैलासवासाचे वर्तमान घाटमाथापुढे आलियावर श्रवण होऊन चितास परमखेद जाला तो कोठपर्यंत ल्याहावा? ईश्वरगतीस उपाये नाहीं. तथाप श्रीमंत सर्वांचे छत्र, आमचा महदाश्रये; यामुळें चिताचे श्रमाचे आवरण होत नाहीं. त्यांचे जागा आमचे प्रतिपालाचे व श्रमपरिहाराचे ओझे आपलेठाई आहे. जंजिरे माहास्थलाची खबरदारी बंदोबस्त आहे त्यापेक्षा दशगुण विशेष असिलाच पाहिजे. आम्ही तलेगावी आलो. आज चिंचवडास मुकाम होईल. उदैक सेवेसी येऊन दर्शन घ्यावें, पुढे आज्ञा होईल त्याप्रो वर्तणूक करून. रा छ २४ जिलकाद. बहुत काये लिहिणे, कृपा वर्धमान असावी, हे विनंती

¶*A letter of condolence, written by Raghoji Angria to Raghunathrao, offering condolence upon the death of the Peshwa Balaji Bajirao.*

No. 138] *[29-6-1761*

पौ छ ३ जिल्हेज

आशाढ इस्ने

श्रीशंभुप्रसन्न.

पुण्यसोल गोपिकाबाई यांसी,

श्रीमन्माहाराज मातुश्री जिजाबाईसाहेब याणी आज्ञा केली यैसीजे. राजश्री बालाजी पंडित प्रधान जेष्ट बहुल शष्ठी भोमवारी निधन पावले म्हणौन निवेदन जाहालें. अशास, ईस्वरे हे गोष्टी बहुत आनुचितच केली. तुम्हास व राजश्री रघुनाथ पंडित व माधवराव यांसी दुखाच्या कोटी जाहल्या. राजश्री सदासिव पंडित व विस्वासराव यांचे ठिकाण न लागले ते चिंतेत निमग्न असतां ईस्वरें हा आघात प्रात केला. होणारास उपाये आहे असें नाहीं. आसी कठिण भावना जाहली असोन साहेबास कलविले नाहीं हे तुम्हास उचित कीं काये? याउपरी विवेके करून शोकाचे परिमार्जन करावे. जाणिजे. छ २९ माहे जिलकाद. बहुत काये लिहिणे.

बार

¶*Jijabai, Rani of Kolhapur, offers her condolences to Gopikabai on the death of her husband, the Peshwa Balaji Bajirao.*

No. 139]

पौा छ २९ मोहरम.

श्री

शेवेशी बालाजी जनार्दन सां नमस्कार विज्ञापना. ता छ ११ मोहरम पावेतो वर्तमान यथास्थित असे विशेष. श्रीमंत राजश्री दादासाहेबांची शरीर-प्रकृत यंदा बरीच होती. पांचसात दिवस जाहाले, पूर्वी रोग जाहाला होता त्याची भावना जाहली आहे; त्यामुले मर्जी ठीक नाही. औषधेंहि ते आपलीच घेत असतात. येक नाटकशाला साता महिन्यांची गरोदर आहे. विदित व्हावे यास्तव लिहिलें आहे. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Nana Fadnis communicates the news that Raghunathrao, for the last week or so, is suffering from a certain disease, the same from which he had suffered before. The whole letter is in Nana's hand written probably to Gopikabai.*

No. 140]

श्रीशंकर.

सेवेसी त्रिंबकराव विस्वनाथ कृतानेक सा नमस्कार विनंती. स्वामीनी आज्ञा केली होती कीं, आरमणी वैद्यास साहित्य कामाठी वगैरे सर्व करून देऊन लौकर पाठवणे. त्याजवरून त्याची तयारी केली होती. तों इतक्यांत पत्रीं आज्ञा आली कीं, न पाठवणे; त्याजवरून तो राहाविला. हकीमजीस आज्ञेप्रा सांगितलें. ते तयार होऊन आजच स्वार होऊन स्वामीकडे येणार. रेवदंडेकर पाद्री यास आज्ञेप्रा सांगितलें. तो लौकरच मुंबईस जाऊन औषधें घेऊन स्वामीकडे परभारा आनंदवलीस येणार. स्वामीस विदित व्हावे यास्तव लिहिले असे. सेवसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Trimbak Vishvanath to Raghunathrao regarding the services of an English physician of Revadanda and a Hakim being requisitioned for treatment at Anandwalli.*

No. 141] [8-3-1767

पौा छ २६ सवाल

सवा हा मल्हारी वगैरे

जासूद जथे कृष्णाजी सितोले.

श्री

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यांसी विनंती. उपरा, आवल्याचा मुरांबा व चवनप्राश याचें प्रयोजन आहे. तर राजश्री बाबा वैद्याचे घरीं शोध

5121

करून तेथें असल्यास पाठऊन देणें. अथवा * * * आवले मोठे आणऊन त्याचें दों प्रकारचा करऊन सत्वर पाठऊन देणे. गोमुत्र्या सिलाजित फार चांगला व सुरबारी हिडेंपैकीं हिडें येक शेर व सिलाजित अदसेर याप्रो पाठऊन देणे. रा छ ७ सवाल सुा सबा सितैन मया व अलफ बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa asks Nana Fadnis to send certain articles of medicine for his use.*

No. 142] [*7-5-1767*

पौ छ ११ जिल्हेज सुा
सबा सितैन वैशाख मास

श्री

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यांसी विनंती. उपरी, तुम्ही पत्र पाठविले ते पावले. शेरखान सांडणीस्वार दिा पागा हुजूर याजबरोबर परवरे सुमार ३०० तीनशे पाठविलीत ती पावली. परवरे पथ्यास पाहिजेत; याजकरितां च्यार पाच रोजाचे अंतराने येऊन पोचत ऐसी पाठवीत जाणे. परवराचे बीज येथे लावावयासी पाहिजे. त्यास, कलमे जगत असिल्यास कलमे पाठवणे; नाही तरी परवराचे बीज पाठवणे. कलमे पाठविलीत तरी येथे आल्यावर जगत ऐसी बहुत माफजतीने पाठवणे. कलमे अथवा बीज पाठवाल, त्यास लावते समई खाली काये घालावे, लावावी कसी, हे मनास अणून लेहून पाठवणें. रा छ ८ जिल्हेज सुा सबा सितैन मया व अलफ. बहुत काये लिहिणे, हे विनंती.

¶*This is a receipt of 300 parwars, a vegetable which Nana Fadnis had sent. Some more are asked for.*

No. 143] [*15-11-1771*

पौ छ १२ साबान सुा
इसने सबैन.

श्री

शेवेसी रामचंद्र नारायण गोरे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल कार्तिक शुध ९ पावेतों यथास्थित असे विशेष. आपण पत्र पाठविले ते पावले. श्रीमंत मातुश्री राधाबाई माई यांशी कार्तिक शुद्ध तृतीयेस मंदवारी देवाज्ञा जाली म्हणून लिहिले ते निवेदन केले. आपणास विदित होये. बहुत काय लिहिणे, कृपा लोभ असों द्यावा, हे विनंती.

¶*Ramchandra Narayan Gore communicates to Gopikabai the news of the death of Radhabai, the second wife of Balaji Bajirao, which took place on 9th November 1771.*

No. 144] [20-7-1772

7. Illness and death of Madhavrao I.

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे शेवेसी·

विनंती सेवक महिपतराव कृष्ण चांदवडकर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ १८ माहे राखर. मुकाम, श्रीवाराणसी येथे स्वामीचे कृपेकरून येथास्थित आसे विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन निघालो ते मजल दरमजल क्षेत्र प्रयागास दाखल होऊन आज्ञेप्रा। तुलेच्या द्रव्याचा धर्म थोडाबहुत सूक्ष्म चौकसी पात्र पाहून केला. मकरमाघश्नान करून श्रीमजकुरी माघअखेरीस पावलो. वेदमूर्ति राजश्री विश्वनाथ भटजी गाडगील व वोमूर्ति राजश्री चिंतामण दीक्षित चितले यांची भेट जाली. येथील धर्माचा विचार बहुत चौकसीने बारिक बारिक शोध ध्यानास आणून उभयेता भटजीचे विचारेकरून स्वामीची आज्ञा जे रीतीची आहे तेच रीतीने घडून येई(ल). क्षेत्र थोर; ब्राम्हण आसंख्यात; क्षुधित मंडली बहुत; त्याजमध्यें पाहून पाहून श्रावण मासापासून आरंभ करीन. गंगापुत्र याणी बहुत उपद्रव आरंभिला आहे. नित्य उठोन धरणीपारणी करू लागले. ब्राम्हण आनिवार दढतर. कोण्हाचे चालेना. राजश्री चेतसिंग राजे याणी व राज्याचे दिवाण राजश्री भाईरामपंत याणी उपराला नाना प्रकारचा केला. परंतु मरावयासी तयार जाले. आम्ही गंगापुत्र, कुटुंबवत्छल, तीर्थाचे स्थाईक, आम्हास धर्माचा अंश द्यावा, घेतल्यासिवाय सोडणार नाही यैसे म्हणो लागले; व श्रीमंत मातुश्री राधाबाई कैलासवासी यांचे आस्तीचा दावा लटका लाऊं लागले. शफतआण क्रियाप्रमाण न मानीत. मग आस्तीचं प्रकार शफतीवर चुकला. उपाये किमपि न चाले. निर्उपाये गोष्ट जाणोन उभयेत भटजी गाडगील व चितले यांचे विद्यमाने थोडासा अंश संकटास्तव देणे प्राप्त जाला. स्वामीस कळावे. यानंतरी कासीराम वैद्य यासी न्यावयासी जोडी सरकारची आली. पत्र वैद्यबावास देऊन बहुत आग्रह केला. कितेक गोष्टी नाना प्रकारच्या नाना युक्तीच्या ते निघेतं आस्या सांगितल्या. परंतु न ऐकेत. वृध्धापकाळ, सेवटसमाप्तीचे दिवस घालवितात आसा विचार आहे. त्यांची पत्रोतरे आली आहेत त्याजवरून सविस्तर आर्थ श्रुत होईल. राजश्री भाईरामपंत बहुत शाहाणे माणूस कारस्थानी, मनसुबेबाज, भले वित्पन्न, ब्राह्मणभक्त, रीतआतपूर्व, आसे आहेत. स्वामीचे ठिकाणी त्यांचा परम हेत. हात जोडून तत्पर आहेत. वैद्यक्रियेत निपुण आसे समस्ताचे मुखे यैकतो. त्याणी येकदोन वेला आम्हास बोलाऊन नेले व आपण येकदोन वेला आले. औषध आम्ही

देतों हे श्रीमताचे उपयोगी पडेल, प्रकृतीस मानून आरोग्यतेस पावतील निभ्रांत यांत संशय नाही आसे आहे, तुम्ही औशध घेऊन श्रीमंताकडे पाठऊन द्यावे, आनुपान सांगतो व पत्र लेहून देतो त्याप्राो घ्यावे म्हणोन सांगितले. परंतु, औशाधाचे काम, देणारा पाचसे कोसावर, ठीक दिसोन येईना. स्वामीची मर्जी विनावैद्य संनिध आसल्याखेरीज, वोखद कसेहि आसो, विस्वासूक कोण्ही कसाहि आसो, परंतु औशध घेणे नाही. हे सेवकास पुर्ते ठाऊक आहे. औशध भारी मोलाचे उगेच पाठऊन द्यावे, तेथे स्वामीजवल उपयोग न पडे, यास्तव प्रतिउतर याच रीतीने करून तूर्त राहविले आहे. परंतु त्यांचा हेत फारच आहे. आज्ञा होईल तरी औशध समागमे घेऊन येईन. पुढे रवाना करावयाची आज्ञा होईल तरी पुढे पाठऊन देईन. जसी आज्ञा होईल तैसे करीन. पत्राचे उत्तराचे मार्गप्रतीक्षेवर त्यांस सांगून तूर्त राहविले आहे. दुसरे त्यांस आज्ञापत्र यावयाविशी आले तरी तेहि श्रीव्यंकटेशाचे यात्रेनिमित्य येऊन येक वेल दर्श (पुढील बंद गहाळ.)

¶*Mahipatrao Krishna Chandvadkar writes to the Peshwa, Madhavrao Ballal, about the charities to be given away at Benares and solicits orders as to whether he should send the medicine prescribed (for the Peshwa) by Bhairampant, the Diwan of Raja Chetsing, who is reputed to be an expert physician and who possesses a high reputation for character and integrity. Chetsing and his Diwan appear in this letter to entertain a great regard for the Peshwa.*

No. 145] [*1-9-1772*

श्री

शेवेशी साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २ जमादिलाखर मुक्काम थेऊर स्वामीचे कृपेकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. श्रीमंताची प्रकृति बरीच आहे. किंचित अमांश जाहाला आहे त्यामुळे पोटांत मुरडा कांहीं होत होता, त्यास वोमूर्ति राजश्री रामचंद्र भट्ट वैद्य याणी पाचक काढा आज भोमवारी प्रातःकाली दिल्हा. औषध रामचंद्रभटच् देत असतात. आपण कधी येतील हे नित्य पुसतात. त्यास भृगुवारी येतील म्हणोन विनंती करितों. शेवेशी श्रुत होय हे विज्ञपाना.

¶*This paper describes the state of health of Madhavrao.*

No. 146] [13-6-1794

श्री

राजश्रीया विराजित रामान्य राजश्री
नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य येशवंतराव त्रिंबक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ १४ जिलकादपावेतों वर्तमान येथास्थित आसे विशेष. आपणांकडून पत्र येऊन परामृश होत नाहीं तर येैसें नसावें. सदैव पत्र पाठऊन सांभाल करीत असावा. आम्हांकडील वर्तमान तर श्रीमंताची प्रकृत दिवसेंदिवस क्षीण आहे. पत्रीं काय ल्याहावें? जो दिवस जाईल तो आपला. कोणे वेलेस घर बुडेल हा भरवसा नाहीं. नाना, ईश्वरें मोठें आरिष्ट आणलें आहे. मी नित्य वाड्यांत असतों. जेवावयास मात्र येतों. सारा वेल तेथें असतों च्यार घटका जवळ नसलें तर म्हणतात कीं, आतां मला सोडूं नको, सेवटीची भेट आहे. आजपावेतों सोबत दिल्ही, आतां कां सोडून जातोस? सारा वेळ हेंच आहे. येक येक भाशण करितात तीं पत्री काय लिहूं! सारांश, आमचा सर्वश्वी आपहार जाला. येक तर उभयतां बंधू गेले. घर बुडालें. दुसरें, यांचे पाय धरले त्याची अवस्था ही. भाऊ वारले त्यास याचें बोलणें कीं, भाऊचें नांव चालवावयाचें, भाऊस पुत्र देऊन भाऊचें संस्थान चालवावयाचें. यास श्रीमंत आन्याबा व बापू देव व सखोपंत ढेरे व सिवरामपंत व सर्वत्र मंडली होती त्याचे देखत आज्ञा जाली. पुढें दिवस ह्या प्रकारें आले आहेत. आम्हांस आश्रा सर्व आपला आहे. आम्ही आपलेस जोडून ठेविले आहे. आपण व राजश्री निलकंठरावजी मिलोन काय करावयाचें तें करावें. श्रीमंतांचें बोलणें आहे त्याप्रमाणें करावें. त्यांत ईश्वर आपल्यास आसीर्वाद देईल आणि उत्तरोत्तर कल्याण करील. नाना, मजवर समय परम कठिण आले आहेत. येक तर घरभंग जाला, येक तर श्रीमंत तात्याचे प्रकृतीनें घालविले. पुढें काय करावें? असो. सर्वश्वी त्राता तुम्ही आहां. सर्व माहितगारी तुम्हांस आहे. भाऊचा स्नेह विसरूं नये. तात्याचे बोलणेप्रमाणें आपण करावें. ह्यांत उत्तम आहे. आशा प्रकृतीस श्रीमंत रावसाहेब व नाना व सर्वत्र परिवार याजवल श्रीमंत तात्यानी आसावें हा हेत सर्वत्रांचा. परंतु जे कालीं ज्या ठाई रुणानुबंध असेल तें घडेल. परंतु नाना, आपण सर्वी सर्वत्रानी येकत्र असावें हें उत्तम आहे. आपणांकडील वर्तमान ल्याहावयास आज्ञा करावी, आम्ही रात्रंदिवस घोरांत आहों. कोणे वेलेस काय होईल कलत नाहीं. आसो देवानें हातचें सोडल्यास मनुष्याचा काय इलाज आहे? बहुत काय लिहिणें, लोभ असावा, हे विनंती.

¶*Yeshvantrao Trimbak, from Sidhatek, writes about the last illness of Haripant Phadke.*

No. 147]

श्री

श्रीमंत राजश्री तात्या स्वामीचे शेवेसी

विनंती. सेवक रामचंद्र कृष्ण भातखंडे मो तले साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २९ माहे जमादिलोवल पावेतो स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित असे. विज्ञापना ऐसीजे. आपली आज्ञा घेऊन जंजिरेयास सरकारची पत्रे घेऊन खाली येऊ लागलो, तेव्हा श्रीमंत सौभाग्यादिसंपन्न वज्रचुडेमंडित पार्वतीबाई व रमाबाईसाहेब याणी आज्ञा केली की, श्रीमंतांचे शरीरी सावकास नाही. याकरिता तुम्ही आगोधर वतनी देव दिवे श्रीवर्धन व श्री येथे जाऊन शोध मनांस आणून होईल वर्तमान ते लेहून पाठवावे म्हणून आज्ञा. आज्ञेप्रमाणे क्षेत्री जाऊन देवास विनंती प्रसाद लाऊन, प्रसाद जाले त्याची याद अलाहिदा श्रीमंताकडे रवाना केली आहे, त्यावरून आपणास विदित होईल. आपण वतनपत्र केलसी तर्फेचे मी असता सिध्ध केले होते. त्यांवर मुख्य श्रीमंतांची स्वताक्षरे व मुद्रा होणे होती, याजकरिता सेवकास पंधरा रोज सेवकास राहाविले होते. त्यास श्रीमंतांची मर्जी यथास्तित नाहीं म्हणून सेवकास निरोप दिल्हा. मी आलियावर काये झाले न जाले ते सेवकास लेहून पाठवावे. आज्ञा जाली म्हणजे मी निघोन येईल. जंजिरयास जावे. सिदी याकूतखान जंजिरकर यांचा व सरकारचा तह जाला होता. त्यांस, सिदी याकूतखान यांचे नावाचे पत्र सरकारचे होते ते घेऊन आम्ही जावे. ऐश्यास, आगोधर आज्ञेप्रमाणे क्षेत्रीं जाऊन येऊ तो दिसगत लागली. त्यांमधें आबदुल रहिम खानजादे यांणी सिदी याकूतखांन यास धारबंद[1] करून आपण तख्तनिसीन जाले. ते पत्र यांस न्यावयाचे उपयोगी नव्हे. मजकूर तोच, मरातीब[2] तो नव्हे. व रिक्तपाणी कसे जावे? यास्तव श्रीमंतास विनंती पत्र लिहिले आहे. तर आपण मजविसी विनंती करून त्यास पत्र व बहुमानाची वस्त्रे वतनसंमंधे व मला जावयाची आज्ञा श्रीमंताजवल विनंती करून रवानगी होई ते करावे. आपणा कारणे मोहेयांचे नारल दोन व ओल्या सुपारीची पेंडे[3] येक पाठविली आहे. कृपा करून घ्यावी. मी आपली विनंती सर्व प्रकारे केली आहे, त्याचे स्मरण स्वामीस असावे. सर्व प्रकारे मी पदरचा आहें. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*As ordered by Parvatibai and Ramabai, Ramchandra Krishna Bhatkhande offers prayers to the family deities of the Peshwas in connection with the illness of Madhavrao Ballal. The letter is addressed to Haripant Phadke.*

---

१ पराभूत. २ पदवी, मायना. ३ घड,

No. 148] [*1-9-1772* ?

श्री

आसीर्वाद विनंती. कालची प्रकृति गंगाधराने सांगितलीच असेल. उत्तम आहे. आजहि प्रकृति उत्तम आहे. प्रात:काली पंचोपचार पूजन देवाचे केले. मर्जी ठीक आहे. औषध राजश्री रामचंद्रभटच देत असतात. पूर्ववत सर्व ठीक आहे. आपणहि द्वादश दिवस जाहाल्यावर येतीलच. विस्तार काय लिहिणार ? तात्या, चिरंजीव कांही चुकला असें आइकिल्यास शासन करावें. तुम्ही आम्हास वडील आहां. आम्ही पढलों मात्र, परंतु वयोवृध्ध व बुध्धीवृध्ध आपण आहा. हे विज्ञापन

¶*The improvement in the health of the Peshwa Madhavrao Ballal is communicated in this letter probably to Haripant Phadk*

No. 149]

श्री

आसीर्वाद विनंती. काल दोन प्रहरानंतर पोटांत थोडेसें [illegible] आज प्रकृति ठीकसी नाही. मध्यमांत कनिष्ठ आहे. ग्लानी आहे. पोटांतहि मध्यमच आहे. तुम्हाकडेस चिठी घेऊन गेला होता त्याचा जाब आला नाही, म्हणोन कोण गेला त्याची चौकसी होत होती. इतर प्रकार सर्व पूर्ववत् आहे. कलावे हे विनंती. पत्राची चौकसी विशेष नाही. साहजिक विचारिले, हे विनंती.

¶*This paper gives news about the illness of the Peshwa, Madhavrao Ballal.*

No. 150]

श्री

सेवेसी विज्ञापना. गोडांबीच्या पाकाविसी राजश्री दताजीपंतास पत्र पाठविले ते त्यांस दिल्हें. त्यास पाकाची वोषधी दिली आहेत. पाक जाला म्हणजे हरि दादाजी डाक चौकीचे खबरदारीस आला होता त्यास ठेविला आहे, त्याजबराबर पाठऊन देतो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The writer reports that, as desired, the medicinal preparation will be sent as soon as it is ready.*

No. 151] [Recd. 7-9-1772?

पो भाद्रपद
शुध येकादशी

॥ श्रीसांबशिवोजयति ॥

श्रीमत्परमहंस परिव्राजकानंद घनेंद्र-
सरस्वतीयतिवर प्रणीतानि नारायण-
स्मरणानि

श्रीमदुमारमणचरणपरिचरणशरणांतःकरणासादितनिखिलपुरुषार्थेषु देवद्विजवर्णाश्रमधर्मपरिपालनापरिगृहीतभगवदंशावतारेषु धर्ममूर्तिषु श्रीमत्सु माधवराव प्रधान पंडितमहाशयेषु सकलाभीष्टदानि संतु विशेष. आपण पत्र पाठविलें तदवलोकनेंकरून आपली शरीरप्रकृति विदित झाली. रोगजन्य-दुःखानुभव मात्र अल्पकाळपर्यंत आहे परंतु अपायचिंता सर्वथा नाही. पूर्वीहि हा अर्थ आपल्यास श्रुत केलाच आहे. पुनः प्रतिज्ञापूर्वक शरीरास सर्वथा अपायचिंता नाही हाच अमचा निश्चय आहे. आसेतुहिमाचल राज्य स्वाधीन करून सार्वभौमपद भोगादृष्ट बलवत्तर आहे. तस्मात् शरीर चिंता न करणें. क्षिप्र आरोग्य होईल. प्रजापरिपालन यथास्थित करणें. किमधिकं महाशयेषु.

¶*Rapid recovery is assured to Madhavrao by a holy person Ghanendra Saraswati.*

No. 152] [19-3-1769

पो छ १७ जिल्काद
तिसा.

श्री

सेवेसी सदासिव अनंत कृतानेक सा। नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता। छ १० जिलकाद येथास्थित असे विशेष. राजश्री बलवंतराव वैद्य याणी फाल्गुन शुध्ध पूर्णिमेस यावयाचा करार केला होता. त्यास, मा।रनिलेचे बाइकोस बरे वाटत नाही; ज्वर फार येतो, यामुले राहिले. स्वामीनी औषधी तेल त्याजकडून करविले होते ते करितात आहेत. दोनतीनसे मोठा गोवऱ्या मेलऊन दिल्या व औषधे दिल्ही. येका दोन रोजी भटी लाविणार आहेत. बाइकोस काही उतार पडिल्यावर पंचमी करून येतील. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप (ना).

¶*This letter refers to one Balwantrao Vaidya, a native physician, who was preparing some medicinal oil for the Peshwa.*

१ सबंध पत्र बालबोधींत आहे. नक्कल मुळाप्रमाणें.

5128

No. 153] [*5-1-1771*

नक्कल.

श्री.

जवाहिरखानापैकी सुाा इहिदे सबैन देणे वैद्यखान्याकडे. सौ आनंदीबाई याजकडे सन सीत सितैनात वोषधाबदल भस्म करावयास मोत्ये पुणियाहून आनंदवलीस पठविली ते सिलकेस वोढत होती. त्यास हाली रामचंद्रभट वैद्य यानी मोत्याचे भस्म करून दिल्हे म्हणौन पत्र पाठविले. त्याजवरून खर्च मोत्ये वजन तोले ६ दर तोला रुपये २० प्रमाणे रुपये १२० येाा मोत्ये दाणे रसानगी यादी सुमारी

६३९

साहाशे पस्तीस मोत्ये राजश्री दादासाहेब याचे स्वारीपैकी जमेस धरून खर्च लिहिणे. छ १८ रमजान.

¶*This paper orders some pearls being burnt to ashes, in order to prepare some medicine for the Peshwa who was ill.*

No. 154] [*8-7-1771*

पौ छ ८ राखर

इसने सबैन आषाढ.

श्री.

चिरंजीव राजश्री नारायणराव यांसी

माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जावे विशेष. अरमाणी वैद्य याजवल तेल करावयास दिल्हे आहे:

१ बालंतशोफा

१ शाहाजिरे

१ अनिसून लस्करांतून आनंदराव जिवाजीकडे पाा होते ते.

—

३

तीन जिनसांचें निरनिराले तेल करविले आहे ते तयार जालें असेल. पाठऊन देणे. धोंडी काला याजवल गंधकाचा अर्क असिला तर पाठवणें. त्याजवल नसल्यास दुसरे जागां असल्यास शोध करून पाठवणे. जंगली पुदिना

आणावयास पुण्यातील कोल्यांस सांगितले होते तोहि पाठवणे. स्वारी समागमे सिकलगर आला नाही तर येक सिकलगर पाठऊन देणे. रा छ २४ रबिलावल हे आसीर्वाद.

¶*The Peshwa asks his brother Narayanrao to send, among other things, three kinds of medicinal oils prepared by an Armani (Armenian ?) physician.*

No. 155] [*13-7-1771*

श्री

राजश्री मोरोपंतदादा गोसावी यांसी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो आनंदराव बापूजी दंडवत विनंती. उपरी, येथील कुशल ताा आशाढ सुध्य प्रतिपदा जाणून आपले कृपेकरून मुाा कटोर येथ सुखरूप आसो. यानंतर आम्हाकडील वर्तमान तर आपली आज्ञा घेऊन निघोलो ते मुकाम मजकुरास सुखरूप पावलो. दरबारचें वर्तमान तर आणखी येक महिना मुकाम येथच होणार. श्रावण मासांत पुणियास स्वारी जावी ऐसे आहे. श्रीमंताची शरीरप्रकृति थेऊरचे मुकामाप्रमाण आहे. तुलेचे साहित्य केले आहे. तुला करणार आहेत. आपणास कलावे यास्तव लिाा असे. बहुत काये लिहिणे, लोभ निरंतर करावा, हे विनंती.

सेवेसी सदासिव मल्हार साां नमस्कार विनंती. उपरी, दरबारचे वर्तमान राजश्री आनंदराव बापूजी लिाा आहे त्याजवरून विदित होईल. तीर्थरूप उभयेता आपणापासी आहेत. त्यास, त्यांचा सांभाल कर्णार आपण आहांत. सर्वश्वें आधार आपले पायासिवाये दुसरा कोणाचा नाही. बहुत काय लिहिणे, लोभ निरंतर करावा, हे विनंती.

¶*Anandrao Bapuji writes to Moropant Dada Fadnis, from Katore, about the health of the Peshwa who had gone to that place for a change.*

No. 156] [*10-10-1772*

श्री.

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्री माधवराव सदासिव गाो यांसी सेवक माधवराव बलाlाल प्रधान नमस्कार. सुाा सलास सबैन मया व अलफ. तुम्ही तिगस्ता सन इहिदेत विनंतीपत्र पाठविले त्यातील मजकूर की, दागतर इष्टुरी व बाजवेल हे दोघे वैद्य बहुत प्रमाणिक. त्यांची स्तुति जनवार्तेकडून व नवाबाच्या मुखे फार ऐकतों. त्यात इष्टुरी बहुत गुणी चांगला माणूस. त्यास श्रीमंतापर्यंत

पाठवाल की काये म्हणोन नवाबास पुसिले. त्याणी उतर केले की, श्रीमंतांचें मर्जी असिली तरी अगत्य पाठऊ, म्हणोन लिहिले ते कळले. ऐशास, वैद्य आणण्याविसी दोनतीन पत्रें तुम्हांस गेली, परंतु येकहि पत्राचा जाबसाल आला नाही. त्यास, वैद्याचा आणावयाचा मजकूर तरी त्यास चाकर ठेऊन आणावें. त्यास रोजमरा दरमाहा शंभर दोनसे निदानी तीनसेपर्यंत करून कबूल होत असल्यास आणावें. नवाब बहुमानार्थ पाठवीत असले तरी आणावयाचे प्रयोजन नाही. वैद्य चाकर राहून येत असला तरी नवाबाची परवानगी पाहिजे; यास्तव पत्र पाठविले आहे ते देणें. चाकर होऊन येत नसल्यास पत्र न देणें. लिहिल्याप्रों चाकर राहून येत असल्यास पत्रदर्शनी त्यास घेऊन तुम्ही जलदीने येणें. जाणिजे. छ १२ रजेब आज्ञा प्रमाण.

¶*The Peshwa asks Madhavrao Sadashiv to send immediately an English Physician, who was serving under the Nizam, if a monthly remuneration of Rs. 300, at the most, was acceptable to him and if he would come into service.*

No. 157] . [*12-5-1772* ?

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री रावसाहेब

याप्रति

आश्रित गंगा विष्णु वैद्य कृतानेक आसीर्वाद विनंती. येथील क्षेम ताा वैशाख शुध १० दशमीपरियेंत माहाराजाचे पुन्यप्रतापेकरून मुाा सवाई जयेनगर येथास्थित असे. यानंतर माहाराजानी कृपालु होऊन आज्ञापत्रे दोन सादर केली, ते प्रविस्ट होऊन् बहुत आनंद जाला. पत्री आज्ञा सादर जाली की, हुजूर येणे. त्यासी हुजूर यावयासी कोन्हे गोस्टीने अंतर नाही. तीन महिन्याचा करार करून आलो होतो, अंतर तरीं बहुत पडले, त्यासी आमचा उपाये काय? येथे दाखल जालियावरी काहीच तरतूद बनोन न आला. माहाराजानी राज्यास खलितापत्रे दिल्ही होती, ते राज्यास प्रविस्ट केली. परंतु स्थलाचीहि तरतूद न जाली. मुलेलेकरे कोठे कोन्हाचे आसरियावरी ठेवावी? बहुत श्रमात परिवारात येऊन पडलो. याजकरिता इतके दिवस लागले. सरदाराकडीलहि काही गौरसी दिसोन न आली. माहाराजानी कृपालु होऊन जलद बोलाविले. त्यासी कलल तैसी तरतूद करून आज्ञेप्रमाणे शेवेसी यावयाचे विचारात आहे. आज्ञेप्रमाणे येऊन पोचतो. मुलालेकरांची स्वस्तता करितो. माहाराजानी याची स्वस्तता होये ते करणार समर्थ आहेत. विस्तारे काये ल्याहावे? आम्ही यावयासी ढील करीत

नाही. जलदीने येऊन पोहचतो. मुलालेकरांची तरतूद राहवयाची न जाली तरी समागमे घेऊन लोकेसी येतो. विशेष काय लिहिणे. लोभवृधी केली पाहिजे, हे आसीर्वाद.

¶*Ganga Vishnu, a physician, assures the Peshwa that, as desired by him, he would try his best to come to him as soon as possible.*

No. 158] [*13-10-1772*

श्री.

राजश्री हरि बलाल फडके यासी

आसीर्वाद. उपरी, येथील कुशल तागायेत छ १९ माहे रजब येथास्थित असे विशेष. वो राजश्री गंगा विष्णु यास न्यावयास चापाजी टिलेकर खिजमतगार याजवल पत्र देऊन पाठविला ते पावलें. त्यास, मशारनिले येथून सोमवारी विजयादशमीच्या मुर्तेकरून रवाना केलें. येऊन पोहोंचलेच असतील. चिरंजीव राजश्री राव यासी ज्वर येतो म्हणौन यैकिलें. त्यास, गंगा विष्णूची मात्रा घेतल्यावर लागलेच पत्र पाठवावें व दुसरे दिवसी प्रकृत कसी आहे ती ल्याहावी व तिसरे दिवसी मात्र प्रकृतीस कसी मानली ती लिहोन पाठवणें. मात्रा दोन दिवस घेऊन मग च्यार दिवस पथ्य मोकलें करावें. पुढें आठा दिवसी फिरोन दोन तीन मात्रा घ्याव्या. भोग सरल्यास गुण येईल यैसे वाटतें. तरी मात्रा घ्यावी. येविसी तुम्ही विनंती करावी, उचित आहे. बहुत काये लिहिणे.

¶*Ganga Vishnu, a native physician, is sent to treat the Peshwa who was suffering from a bad malady.*

No. 159] [*18-11-1772*

श्री

चिरंजीव हरिपंतास आसीर्वाद. आजी बुधवारी सकालच्या दाहा घटका दिवसा श्रीमंताचा काल जाहाला. सौा संपन्न बाईसाहेब समागमें गेली. आताच संध्याकालच्या दो घटका दिवसा नदीहून आम्ही राहुटीस आलो. तुम्हास कलावे म्हणून लिहिले आहे. सावधपणी घरी असावे. संभाजी आबाऱ्याबरोबर कागद व तूप तपलेत घरातील पाठविल्याप्रो पावले. बच्यास प्रातःकाली रवाना करावा. हे आसीर्वाद.

¶*Haripant is informed of the demise of the Peshwa which occurred on Wednesday morning (18th November 1772). It is further stated that Ramabai, Peshwa's wife, followed her husband on his funeral pyre.*

No. 160]

श्री

चिरंजीव राजमान्य राजश्री विठलपंत ठोसर यांसी प्रति हरि जिवाजी बर्वे आसीर्वाद. उपरी, ता॥ माघ शु॥ ८ पावेतो सुखरूप असो विशेष. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. लिहिले वर्तमान कले. श्रीमंत कैलासवासी नाना स्वामी यांच्या अस्ती श्रीयात्रेस पाठविल्या. यात्राहून गयावर्जन होऊन आले त्याचा खर्चवेच कसकसा जाहाला त्याचे येथे प्रयोजन लागले आहे. तरी तुम्हास माहितगिरी आहे. कसकसे असेल ते लेहून पाठवणे म्हणौन लिहिलेत. त्यास, आम्हास तोंडजबानी सई नाही. बहुत दिवस जाहाले. हिसेबकितेब दप्तरीं समजोन कैलासवासी माधवरावसाहेब यांणी घेतले आहेत. आम्हाकडे हिसेबाकितेबाचा गुंता नाही. यात्रेस पाठवावयाची मात्र खटपट केली. नारो केशव बर्वे बहुतां दिवसांचे सिलकी चाकर यांस पाठविले होते. ते हाली नगरास रा॥ लक्ष्मणपंत बर्वे यांजवल आहेत. त्यांस बोलाऊ पाठऊन आणिले म्हणजे ते सर्व सांगतील, किंवा लेहून पाठविणे म्हणजे लेहून पाठवितील. बहुता दिवसांची गोष्ट. आम्हास काही तोंडानें स्मरण नाही. दप्तरी सापडत नाही म्हणौन लिहिलेत त्यास काये म्हणावे ? बहुत काये लिहिणे हे आसीर्वाद.

¶Hari Jiwaji Barve informs, in reply to a query about the expenses of the funeral rites of Peshwa Nanasaheb, that he, after so many years, is unable to state anything definitely from memory.

---

8. Raghunathrao and Madhavrao II.

No. 161] [28-3-1781

पौ छ २ राखर
इहिदे आवसीची
च्यार घटका रात्र.

श्री

राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

विनती विशेष. श्रीमंतांची प्रकृत चांगली आहे. देवींच्या खपल्या हातांवरील व पायांवरच्या पडोन बाकी पंचवीसतीसपर्यंत राहिल्या आहेत; त्याहि पडतील. सौ दुर्गाबाई यांचे निसबतीस सरकारचा खिजमतगार खंडोजी गावडा आहे त्यास त्याणी येथे श्रीमंतांचे समाचाराकरितां पाठविला होता. त्याजबरोबर येक पातल चांगले त्यास व चोली पाठवावयाकरितां उभयेता बाईची आज्ञा जाली. त्यास आम्ही उतर केले की, पातलाचा जिनस येथे नाही. तेव्हां त्यांची आज्ञा

जाली की, तूर्त तीन खण चांगले पाठवावे; मागाहून चोली व पातल अगर दुसरे तऱ्हेचें लुगडें पौ अथवा सेलारी पाठविली पाहिजे; त्याची तर्तूद करून लौकर आणवावी म्हणौन. त्याजवरून तूर्त तीन खण सवाचवीस आंखी पाठविले. पातल व चोली पाठवावयाची असल्यास काय ते उतर पाठवावें त्याप्रो करूं. रा छ २ राखर. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Nana Fadnis is informed from Purandhar about the health of the young Peshwa who, at the time, was suffering from an attack of small-pox.*

No. 162] [*25-3-1794*

श्री

सेवेसी त्रिंबक गणेश कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. ता छ २२ शाबान पावेतो मुकाम आनंदवली साहेबाचे कृपेकरून सेवकाचे व मुकाम मजकुरीचे वर्तमान यथास्थित असे विशेष. शरीर भावनेचा मजकूर लिहिला. त्यास आज ज्वर कमी आहे. प्रकृतहि बरीच आहे. काल ज्वर आला नवता. छ मजकुरी प्रहर दिवसपावेतो प्रातःकालपावेतो शरीरभावना बरीच आहे. मागाहून भावना होत जाईल ती लिहीत जाईन. सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति.

¶*The letter refers to the illness of Anandibai at Anandvalli.*

No. 163] [*1803*

श्री

सेवेसी परशराम खंडेराव राहातेकर चरणी निरंतर मस्तक ठेऊन सां ना विज्ञापना. ता छ सवालपावेतो स्वामीचे चरणप्रतापेकरून मुा चास येथे शेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. काल स्वामीची आज्ञा घेऊन निघालो तो छ मजकुरी प्रातःकाली चासकराच्या वाड्यात येऊन मातुश्री मथुराबाईची भेट घेतली. नंतर बाई बहुत संतोष जाहाली. नंतर उतर जाहाले की माझे श्रीमंत बाबासाहेब खुशाल आहेत? तेव्हां शेवकानेहि बिनंती केली, माहाराज सुखरूप आहेत. बाई चौकी पाहाऱ्यामुले आजपरियेंत भोजन केले नवते, निर्षण (निरशन) करीत होते. नंतर आज शेवकाने सांगितले की आपण उपास करू नये, भोजन करावे. तेव्हा बाई बोलली की श्रीमंताची भेट होईल तेव्हा भोजन करीन. नंतर शेवकाने विनंती केली की महाराजानी आपल्यास पुण्यास न्यावयास पाो त्यापेक्षा भोजन करावे. नंतर बाईची मर्जी संतोष होऊन दोनप्रहरी भोजन जाहाले. बाईचा पुण्यास यावयाचा मुहूर्त मंदवारी प्रातःकालचा आहे. त्या प्रमाणे बाईस घेऊन सेवेसी येतो. सेवेसी श्रुत व्हावे हे विज्ञापना

¶*Parsharam Khanderao Rahatekar reports to the Peshwa how happy Mathurabai, some elderly relative of the addressee, felt at the news of his well-being.*

No. 164] [19-1-1791

पौा छ २६ जावल सन
इहिदे तिसैन पौष मास

श्री

सेवेसी गोविंद कृष्ण गोडबोले कृतानेक साष्टाग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ १४ जावल पावेतो क्षेम असे विशेष. श्रीमंत सौ रमाबाईसाहेब यांस सनगे श्रीमंत मातुश्री आनंदीबाईसाहेब याणी पाठविली ती सनगे याा आख

११६ पातळ सलईदार १
३८। चोळखण २
१८।. २०

१५४। ३८ २
३

तीन सनगे येकसे सवा चौपन आख दुबेर्जी खर्च लिहून महिपती सिंदा खिजमतगार मुाा कोपरगाव याजबरोबर पाठविली आहेत. श्रीमंत सौ भागिर्थीबाई साहेब पुणियास पावल्यावर वाड्यात जाऊन देतील. तेथे सदरहू सनगे येकसे सवा चौपंन आखी दुबेर्जी जमा धरावयास आज्ञा केली पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Govind Krishna Godbole writes about the clothes sent to Poona by Anandibai to be presented to Ramabai.*

No. 165] [19-5-1788

पौा छ १० रमजान सुाा

* * * *

श्री

सेवेसी आपाजी राम सहस्रबुध्ये कृतानेक साा नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा छ १२ साबानपावेतो स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब यास कामिणीचा उपद्रव जाहला आहे. औषध घेत आहेत व श्रीमंत मातुश्रीबाई साहेब याची मातुश्री व चुलत बहीण ऐसी नासिकीहून येथे भेटावयास आली आहेत. आठ दिवस जाहले. पुढे पधरा विसा दिवसी कोकणात रवानगी होणार. इकडे पर्ज्यन्य लागला. गगेस पूर येऊन गेला. वरकड चौकीचे वर्तमान पूर्ववतप्रमाणे स्वामीचे आज्ञेप्रमाणे आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Apaji Ram Sahasrabudhe sends news from Kopargaon about Bajirao and Anandibai. Bajirao was suffering from jaundice.*

5135

No. 166] [13-8-1754

छ १९ जिल्हेज.

श्री

चिरंजीव राजमान्य राजश्री दादा यासी

बालाजी बाजीराऊ प्रधान आसीर्वाद. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणें विशेष. श्रीवज्रयोगिणी देवीची आज्ञा जाली आहे कीं, देवालये बांधणें; त्यास, येकाच्या द्रव्यानें बांधो नये. सर्वापासून भिक्षा मेळऊन देवालये बांधावे म्हणौन आज्ञा जाली. त्यावरून विचार केला कीं, दर राउती येक रुपया व कारकून मंडलीस येक रुपया व पायाचे लोक हशम किलेकरी व ठाणेकरी व माहालाचे प्यादे व शागीर्दपेशा वगैरे लोक यास दर आसामीस अर्धा रुपया घ्यावा. येणेंप्रमाणें निश्चये केला आहे. त्यास, इकडे राऊत कारकून हशम शागीर्दपेशा माहालकरी यांस आज्ञा केली आहे. कराराप्रमाणें यैवज घ्यावयास लागलो आहो. श्रीच्या देवालयास प्रारंभ केला आहे. त्यांस, तुम्हांकडे फौज व शागीर्दपेशा व कारकून माहालकरी आहेत त्यांस सांगोन राउती व कारकुनास येक रुपया व शागीर्दपेशा व हशमी लोक व माहालचे प्यादे वगैरे पाईचे लोक यांस दर आसामीस आर्धा रुपया येणेंप्रमाणें नावनिसीवार झाडा काढूण यैवज जमा करणें. त्या प्रांतातील लाहान मोठे मामलेदार आहेत त्यांजकडील सिबंदी मनास आणून सदरहूप्रमाणें यैवज वसूल करणें. राऊत शागीर्दपेशा वगैरे लोक यांचा रोजमरा देऊ लागावा तेव्हा आसामीपासून नेमणूक प्रो रुपये घ्यावे. बदल मुशाहिरा खर्च घालून घेऊ नयेत. याप्रों करून यैवज जमा करून निराला झाडा राखोन ठेवावा. राजश्री मल्हारबा व राजश्री जयापा व पवार वगैरे मातबर व लाहान मोठे सरंजामी लोक यास याच प्रकारें सांगोन त्याजकडील फौज व लोक मनास आणून सदरहूप्रमाणें यैवज वसूल करून घ्यावा. येकंदर यैवज लिहिल्याप्रों झाडा काढून यैवज जमा करून निराल्या हुंड्या करून यैवज पाठऊन द्यावा. हें कार्य स्मरणपूर्वक आधीं करावें. देवाचे कार्य जरूर करावें लागतें, याजकरितां लिहिलें असे. रा छ २३ सवाल सुा खंमस खंमसैन मयां व अलफ. हे आसीर्वाद.

¶*The Peshwa writes to Raghunathrao to collect contributions for building a temple of Vajrayogini. The Goddess, the Peshwa adds, has expressed her desire, through a medium, that the expense for this work should not be borne by one but should be met by small contributions from many.*

5136

No. 167] [23-12-1766 ?

श्री.

चिरंजीव राजश्री दादा यांप्रति आनूबाई आसीर्वाद. उपर, येथील कुशल तागायेत मार्गसीर्स सुध पूर्णिमापावतों वर्तमान येथास्थित असे विशेष. आपणांकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान काहीच कलत नाही, तेणेकरून चित सापेक्षित आहे. वरचेवर येणाराबरोबर पत्र पाठऊन चित संतोसवीत गेले पाहिजे. इकडील वर्तमान हा कालपर्यंत येथास्थित आहे. हाली चिरंजीव राजश्री माधवराव दक्षण प्रांते कर्नाटक प्रांतात जावयास गेले. बाा आम्हीहि होतों. आज करंजीच्या मुकामीहून निरोप घेऊन घरास जावयास गेलो. कलावे. आपणांकडील आद्यंत वर्तमान लिहिले पाहिजे. आपल्या कल्याणाची मार्गप्रतीक्षा करीत आहों. बहुत काये लिहिणे हे आसीर्वाद.

¶*Anubai Ghorpade writes to Raghunathrao that, leaving the Peshwa at Karanji on his way to Karnatak, she was returning home.*

No. 168] [30-12-1771

श्री.

सेवेसी नारो अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २३ रमजान मुा दहीगाव पाा कात्राबाज वर्तमान यथास्तित असे विशेष. छ २२ रमजानी श्रीमंत सौ मातुश्री रमाबाई व गंगाबाई यांची रवानगी हरिहरेस्वरास जाहाली. बाा विसाजी केशव, रामाजी माहादेव यांस दिल्हे. त्याणी फिरोन पुणियास पोहचाऊन मग कोकणात जावे याजप्रा आज्ञा जाहाली आहे. श्रीमंतांचे स्वारीचे कूच होऊन दरमजल सिधटेकास जावे; पुढे पंढरपुरचा रोख दिसतो. उदईक कात्राबाज मांडवगणास जातील. त्रिंबक विनायेक यास आजच निरोप दिल्हा. ते पुणियास येऊन जाणार. बहुत काय लिहिणे, कृपा केली पाहिजे, हे विज्ञापना.

सेवेसी माहादाजी नारायेण कृतानेक सांा नमस्कार विज्ञापना. कालच रामाजीपंत नानाची पत्रे आली की, सिवाजी केशव यास तहवरजंगाने बिडाजवल लडाई थोडीसी होऊन झांबडाझांबड केली. सिवाजीपंत पलून गेले. याजकरिता राजश्री मुधोजी भोसले यास पुढे रवाना केले. सेनासाहेब सुभेहि अविलंबेच घाट चडोन भेटीस येणार म्हणौन पत्रे आली. श्रीमतांचे मुकाम सिधटेकावर फारसे होणार नाही. पंढरपुराच्या सुमारे जातीलसे दिसते. विदित जाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*This letter refers to Ramabai and Gangabai having started on a pilgrimage to Harihareshwar, a holy place near Shrivardhan on the west coast.*

No. 169] [23-7-1806 ?

श्री

आसीर्वाद. उपरी, श्रावणमासचे दक्षणेचा समारंभ येथास्थित जाला. येकूण साठ हजार ब्राम्हण जाले. दक्षणा येक लक्ष चवऱ्याणव हजार पाचशे साठ रुपये जाहाली. परज्यन्य काल भोमवारापासून लागत आहे. रा श्रावण शुा अष्टमी सौम्यवार. हे आसीर्वाद.

¶*This letter mentions that in the month of Shravana, Rs. 1,94,560 were distributed as dakshana to 60,000 Brahmins.*

No. 170] [24-4-1767 ?

पौ छ ६ जिल्हेज बाा

बायाजी गणजीकडील जासूद.

श्री.

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसांवी यांसी विनंती. उपरी, तुम्ही पत्र पाा ते पावले. शत्रुपराज्ययार्थ सप्तशती व मन्युसूक्त दोन अनुष्ठानास प्रारंभ करून चालती केली म्हणौन लिहिले ते कलले. येक मंडल जाल्यावर समाप्त करावें अथवा संकल्प केला असेल तसे समाप्त करावें. रा छ २४ जिलकाद हे विनंती.

¶*The Peshwa writing to Nana Fadnis refers to certain religious ceremonies which were being performed with the object that they would help to bring about their enemy's defeat.*

No. 171]

श्री.

राजश्री बावाजी सिवदेऊ यांणी श्रीरामेश्वरास कासीच्या कावडी ११ अकरा समागमे रामचंद्रभट यास देऊन पाठविल्या आहेत. त्यास मार्गी मुंजाहीम[१] कोणी न होणे. म्हणऊन पत्रे:

राजश्री मुरारजी घोरपडे यांस पत्र जे, कोणी उपद्रव करील त्यास ताकीद करणे म्हणऊन पत्र. — मार्गीचे दस्तक

दोन पत्रे द्यावी; परवानगी जाली आहे.

लिहिणे.

¶*The letter refers to state permits being issued to one Ramchandrabhat for carrying unmolested from Benares to Rameshwar pitchers of holy water of the Ganges.*

---

१ हर्कत करणारा.

No. 172]

श्री.

विज्ञापना. श्रीमंत तोंड धुऊन आताच गेले. स्नान आता केले नाही. आपणास सांगावे म्हणून मजवल आज्ञा जाहाली की, श्रीमंत नारायणसाहेबाकडून आपण जवल बसून दक्षणा देवावी. त्यास, केव्हा ब्राह्मण आणून बसऊ ते आज्ञा जाहाली पाहिजे. त्याप्रा बंदोबस्त करून ठेवितो. श्रीमंत नारायणरावंही स्नान केले नाही. हे विज्ञापना.

¶*This letter reports that the Peshwa, having not taken his bath, has directed that Narayanrao should give away the dakshana to the Brahmins instead of himself.*

No. 173] [16-8-1761

श्री.

श्रीमंत माहाराज मातुश्री आईसाहेब यांणी राजमान्य राजश्री माधवराव पंडित प्रधान यांसी अज्ञा केली ऐसीजे. हुजरून तुम्हाकारणे श्रावणी पूर्णमेचे पोते सुवर्णाचे येक व रेशमी राखी येक हैबती कदम हुजऱ्या व निंबाजी पांचुगडा व संताजी चवाण जामदार याबराबर देऊन पाठविले आहे. त्याची याद अलाहिदा सादर केली असे. याप्रमाणे घेऊन पावलियाचे विनंतीपत्र लिहून हुजूर पाठवणे. जाणिजे. छ १५ माहे मोहरम सुा इसने सितैन मया अलफ. बहुत लिहिणे तर सूज्ञ आहां.

¶*Tarabai sends to Madhavrao some holy threads of gold and a piece of silk, for being tied round the wrist or arm on the day of full moon of Shravana, the latter as a preservative against evil spirits.*

No. 174] [26-3-1763

पौ छ २१ रमजान
सन सलास सितैन.

श्री.

वेदशास्त्रसंपन राजश्री व्यंकटरामशास्त्री स्वामीचे
सेवेसी

विद्यार्थी रघुनाथ बाजीराव नमस्कार विनंती. उपरी, सूर्यग्रहणसमई शत-गोदानें करणें. दर गोप्रदान रुा चालीसपर्येत गाये व सरंजामसुधा येकून चार हजार रुपये सरकार यैवज पौ खर्च करणें. समयास गाई शत मिलाल्या नाहीं तरी ज्या मिळतील त्या देऊन बाकी रुा नेमणूक प्रा उतम ब्राह्मण चांगले

पाहोन देणे. ग्रहणसमई कुशोसिती मंत्रेकरून नर्मदास्नाने कुशेकरून करवणे. ग्रहणस्पर्शापासून ग्रहण सुटे तोंपर्यंत येक ब्राह्मण लावणें. जितकी स्नाने होतील तीं करवावीं. त्यास दक्षणा पंनास रुा देणे. मंडलेश्वरची अगर कसरावद प्राा पयेकी येक चाहूर प्राा जमीन ग्रहणसमई ब्राह्मणास देणे. दक्षणा शंभर रुपये देणे. उपरागसमई येणेप्रमाणें करून उतर केल्याचे पाठवणे. रुा छ १० रमजान चैत्र शुध द्वादसी शनिवार. हे विनंती.

¶*Raghunathrao orders Vyankatram Shastri for certain religious charities to be bestowed on learned Brahmins at the time of the eclipse of the sun.*

No. 175] [*15-4-1763*

श्री

रा परशराम बलाल दामला यासी

रघुनाथ बाजीराव सुाा सलास सितैन मया व अलफ. श्रीदेवाचे चरणप्रक्षालित जल पाहिजे, त्यास औदुंबराजवलील श्रीगंगेचे उदक आणून गाळून उतम शोडशोपच्यार पूजा करून त्यांतील तीर्थोदकाने दोन चंबू तांब्याचे भरून पाठऊन देणे. जाणिजे छ १० सवाल. सविस्तर केसो गोविंद याचे पत्री लिहिले आहे त्याप्रो जल पाठवणे. छ मजकूर वैशाख शुध त्रयोदसी. सोमवार.

¶*Raghunathrao asks Parsharam Ballal to send him some holy water of the Krishna out of the deity's bath at Audumbar.*

No. 176] [*25-1-1764*

पौ छ २६ रजब्

पौष मास.

श्री

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी
गोसावी यासी

विनती उपरी. श्रीदेवदेश्वर वास्तव्य पर्वती येथील साहित्याची कलमे

चौकीस नेहमी पेशजीपासून पचवीस हशमी लोक असतात. साल मजकुरी जाजती पंधरा येकूण च्यालीस

श्रीदेवदेवेश्वरास पोशाक व लिंगास व लोडास आभ्रे वगैरे सालाबाद पावतात. त्यास साल मजकुरी पोशाक

माणूस द्यावे म्हणून विनंती केली. त्यास सालाबादप्रो पचवीस नेमून देणे. जाजती पंधरा माणूस लोकाचा भरणा असिल्याप्रो देणे. कलम

१

सताजी पारवा खास सरदार नेहमी देवाजवळ आहे, त्यास सिवाजी कानो याणी दूर केला आहे, तरी संताजी मजकूर याजपासून काही अतर पडिले नासिले आणि नाइक दूर केला असिला तरी चौकसी करून अतर नसिल्यास करार करून ठेवावा. कलम

१

वडगावचे बागाकडे व बेला झाडाकडे खिजमतगार आसामी दो नेहमी आहेत. त्यास रोजमरा तुम्ह चाकरीची चौकसी करून शागीर्द पेशाबरोबर देत जाणे. कल

१

। लिंगास मेखला जुन्याप्रो नव्या त्यार करून देणे. लोडास अभ्रे गैरे कार्याकारण पाहून करून देणे. कलम

१

जिनसखानापैकी जिनस पुजेस देवास दरमाहाचा दरमाहा पावेत आहे, त्याप्रो हाली नेमणूकप्रो दरमाहाचा दरमाहा देत जाणे. कलम

१

नव्या मूर्ती करावयाच्या सुमार

१ नारायेण

१ सूर्य

१ स्वामी कार्तिक

—

३

आर्च्या जुन्याची

१ विष्णु

१ गणपति

१ देवी

१ नंदी

—

४

—

७

येकूण सात देवांची पो नवे र्त तयार करून व जुने च्यार येकूण सात देवांची आर्च्या करून स्थापना पूर्ववतप्रो करणे. कलम

१

येणेप्रो साहा कलमे करार करून देविली असेत. सदरहूप्रो करून देणे. रा छ २१ रजब सुा आर्बा सितैन मया व अलफ. हे विनंती.

¶*Assignments towards the worship of Devadeveshwar at the shrine of Parbati are mentioned in this letter.*

No. 177] [2-2-1764

पौ छ १८ साबान.

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्री सदा-
सिव रघुनाथ गोसावी यासी

सेवक माधवराव बलाल प्रधान नमस्कार. सुा आर्बा सितैन मया व अलफ. प्रांा परिंड येथें आश्रित ब्राम्हण आहेत. ज्यांस वर्षासन धर्मादाय व नख्त रुपये व जमीन इनाम व गांव इनाम सेंभर रुपयांवर यैवज ज्याकडे पावेत असेल, त्यांस बोलाऊन आणून सांगावें कीं, खासा स्वारी कर्नाटक प्रांती मसलतीवरी जाहाली आहे. त्यास, शत्रुपराजयार्थ अनुष्टान आपले घरीं स्वकष्टार्जित येजमानकल्याणार्थ करावें म्हणून सांगावें आणि लिहिल्याप्रों उतम प्रकारें अनुष्ठान करवणें. जाणिजे. छ २९ रजेब. आज्ञा प्रमाण

¶*The Peshwa desires that certain Brahmins should perform some religious rites, at their own expense, with a view to invoke divine aid in his encounter against the enemies in the Karnatak.*

No. 178] [3-7-1764

पौ छ ३० मोहरम
खमस.

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बालाजी
जनार्दन स्वामी गो

पोष्य माधवराऊ बलाल प्रधान नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीयें लिहित जाणें विशेष. वेदमूर्ति राजश्री गंगाधरभट कर्वे उपाध्ये यांचे विद्यमानें अनुष्टानें करावयाचीं, त्याचे दक्षणेचा अजमास रुपये:

१०००	मृत्युंजय जप १००००००
१२००	मन्युसूक्त विधानाप्रमाणें १२००
५००	सहस्रचंडी आवर्तनें १०००
२५०	गणपतिसहस्रनाम आवर्तने थेऊरीं १०००
२५०	गणपतिसहस्रनाम मोरेश्वरीं आवर्तनें १०००
३२००	

येकून बतिसशांचा अजमास लिहिला आहे. त्यास, वेदमूर्तीस बोलाऊन आणून लिहिल्याप्रों अनुष्टान करवणें. दक्षणेचा अजमाज लिहिला आहे; त्यास,

दक्षणा व उपसाहित्य मिलोन चहू हजारांपासून पाच हजारपावेतों खर्च करून यथासांग अनुष्टान करवणें. रा। छ ३ मोहरम सुा खमस सितैन मयां व अलफ. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa writes to Nana Fadnis to make arrangements for the performance of certain rites, among them being one which is meant to prevent death.*

No. 179] [*17-12-1764*

पो छ ९ रजब्
खमस पौष

श्री

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी
गोसांवी यासी

विनंती. उपरीः तीर्थस्वरूप सौभाग्यवती मातुश्री पार्व सगुणाबाई यांजकडे धर्मादायाचा खर्च मनस्वी होतो म्हणोन कललें व तुम्हीं येक दोन वेला लिहिलेंच होते; त्यास, ये गोष्टीचा बंदोबस्त करणे. परवानगी सिवाय काहीं न देणे. रा। छ २३ जमादिलाखर. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa, having noted that the expenses for charities incurred on behalf of Parvatibai and Sagunabai have gone to an excess, orders Nana Fadnis to be more strict regarding that item of expenditure.*

No. 180] [*17-12-1764*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बालाजी
जनार्दन स्वामी गोसावी यांस

पोष्य नारायेणराव बलाल नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणौन स्वकीये लिहिणे विशेष. आम्हास काहीं दुष्ट ग्रह आहेत त्यांचा ज्यप करावयास येथे संकल्प करून वेदमूर्ति राजश्री नारायेणभट भाव्ये यांस सुपारी देऊन तुम्हाकडे पुण्यांस पाठविले आहेत. तरी यांचे स्नानसंध्येची व भोजनाची सोय करून वाड्यांत देणे. आणि येक लक्ष ज्यपाचे संख्येची याद वेदमूर्तीजवल

दिल्ही आहे त्याप्रमाणे करवणे. समाप्त जाहाल्यानंतरी वेदमूर्ति राजश्री गंगाधर भट कर्वे उपाध्ये यांचे विद्यमाने दक्षणा देणे. भटजीस प्रारंभी साहित्य सुमार:

१ तांब्या
१ आसनांस घोंगडी
१ गोमुखी
१ रुद्राक्षमाला
१ धोत्रजोडा
—
५

येणे प्रमाणे पांच सुमारी देऊन अनुष्टान येथास्तित करवणे. रा छ २२ जमादिलाखर सुा खमस सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे + विनंती.

¶*Narayanrao Ballal writes to Nana Fadnis requesting him to make the necessary arrangements for a certain kind of worship which is to be performed to counteract the evil influence of some stars under which, he (Narayanrao) believes, he has fallen.*

No. 181] [*11-1-1765*

श्री

राजश्रिया विराजित राजामान्य
राजश्री बाळाजी जनार्दन स्वामी
गोसावी यासी

पो रघुनाथ बाजीराव नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष. वो कोनेरभट यास सिधटेकास अनुष्टान करावयाकरिता पाठविले आहेत. तेथे भटजी अनुष्टान करितील त्यास ब्राह्मणाचे स्वयेंपाकास भांडीं शंभर ब्राह्मणांचा श्वयेपाक होये ऐसीं याचे तसलमातीस लेहून याजकडे पाठऊन देणे व प्यादे अथवा खासबारदार आसामी दाहा अनुष्टान समाप्त होये तो पावेतो देणे. रा छ १८ रजब सुा खमस सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Raghunathrao asks Nana Fadnis to make necessary arrangements in connection with the performance of a certain kind of worship at Sidhatek.*

No. 182] [*21-1-1765*

पौ छ ९ साबान खमस

माघ बाा सांडणीस्वार.

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बालाजी
जनार्दन स्वामी गोसावी यासी

पोष्य माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती. उपरी, येयील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणें विशेष. श्रीहरिहरेश्वर येथे नगारखाना ठेवावा असा नवस आहे याजकरितां तुम्हांस लिहिलें असे. तर नगारखान्याचें साहित्य नौबत नगारे व कर्णे झांज व तुरई याप्रों सरंजाम व नगारची वगैरे पाहिजेत त्याची याद अलाहिदा पाठविली आहे, त्याप्रों सरंजाम करून देणे. पुण्यांत सरंजाम करून द्यावयाचा असेल तो पुण्यांत करून देणे. कोकणांत राजपुरी सुभापैकी देवणे असेल तो तेथे देवणे. माणसे पुण्यांत ठेऊन द्यावी लागतील त्यास नालबंदी रोजमरा द्यावा लागेल तो देऊन रवानगी करणें. पुढें नेहेमी नेमणूक राजश्री नारो त्रिंबक यांजकडे करून देणें. सर्व सरंजाम करून देऊन सुमुहूर्तें-करून नगारखाना देवाजवळ सुरू करणे. राा छ २८ रजब. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa asks Nana Fadnis to make the necessary arrangements for instituting a nagarkhana, i.e. musical band, at the temple of Shree Harihareshwa-*

No. 183] [*19-4-1767*

पो छ २९ जिल्हेज सन सबा

बाा जासूद जथे जोत्याजी नाा

१ मल्हारजी डुबा

१ माणकोजी ताव्या

—

२

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बालाजी
जनार्दन स्वामी गोसावी यासी

पो रघुनाथ बाजीराव नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणें विशेष. आंब्रभोजन ब्राह्मणास येणेप्रो करणें:

५००० पुणे वडगाव बारजे तीन स्थली मिलोन पाच हजार करणे. तीन स्थळांतून सोईस पडेल तेथे करणे.

5145

१००० माहुलीस कृष्णावेणीसंगमी येक सहस्र करणें.
१००० भिमातीरी खेड अथवा तुळापुरी येक सहस्र करणें.

७०००

येणे प्रमाणे सात सहस्र ब्राह्मणास आंब्रभोजन सदरहू लिहिल्या स्थली सरासरी दर आसामीस दक्षणासहित येक रुपया याप्रो सात हजार रुपयात सात सहस्र ब्राह्मणास आंब्रभोजन करणें. रा छ १९ जिलकाद सुा सबा सितैन मयां व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Raghunathrao gives instructions to Nana Fadnis for feeding 7,000 Brahmins, the principal dish being mango-juice.*

No. 184] [*24-8-1767*

पो छ जमादिलौवल
सनसमान

श्री

राजमान्य राजश्री केसो बलाल गोगटे कमाविसदार पो त्रिंबक यासी रघुनाथ बाजीराव नमस्कार सुा समान सितैन मया व आलफ. कसबें मजकूर येथें भुवनेश्वरी देवीजवळ सुखदेवपुरी गोसावी फार वृद्ध आहे आणि ते स्थळीं बहुत दिवस राहातो, यास्तव पोटाबदल दरमाहा रुपंये च्यार रुपये करार करून देऊन हे सनद तुम्हास सादर केली असे. तरी गोसावी मजकूर ते स्थलीं राहील तोंपर्यंत सदरहू च्यार रुपये दरमाहाचा दरमाहा देत जाणें. सदरहू ऐवज माहालचे ऐवजीं मजुरा पडेल. जाणिजे.
छ १८ रबिलौवल आज्ञाप्रमाण.

सदरहू सनद विसाजी हरीचें नावें देणें
सनद लिहिणें.

¶*Raghunath Bajirao orders a stipend of Rs. 4 per month for the maintenance of Sukhadevpuri Gosavi residing at Trimbak.*

No. 185] [*2-12-1768*

पौ छ १७ साबान सन
तिसा मार्गसीर्ष

श्री

राजश्री बाळाजी जनार्दन स्वामी गोसावी यांसी

विनंती. उपर, श्रीक्षेत्र पुळें येथे गणपतीचे अनुष्ठानास चातुर्मास्यांत पांच ब्राम्हण पाठविले होते. ते अनुष्ठानसमाप्ति करून पुण्यास आले आहेत. तर

दर ब्राम्हणास रुपये १२० येकसेवीस, येकून पांचांस साहाशे रुपये दक्षिणा देणे. छ २१ रजब. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶The Peshwa orders Nana Fadnis to pay as dakshina Rs. 120 to each of the five Brahmins who were appointed to perform certain religious rites.

No. 186] [*10-12-1768*

पौ छ ४ साबान
तिसा बा कृष्णाजी खंडोजी
जथे बाबाजी ना

श्री

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यांसी

विनंती. उपरी, सिधटेकास अनुष्ठान करावयाचे :

संततधारेचे अनुष्ठान पंचेतालीस दिवसपर्यंत करावें. सिधिविनायेकास येकवीस सहस्र प्रदक्षणा घालवाव्या.

दोन्ही प्रकार लिहिल्याप्रों चांगले ब्राम्हण पाठऊन करवणे. याखेरीज प्रत्यहीं शंभर ब्राम्हण भोजनास श्रावण मासपर्यंत घालवावयाचे आहेत. त्यास, नासिक, वाई, पुणें या तीही जागांतून येक जागा तुमचे विचार होईल तेथें शंभर ब्राम्हण नित्य भोजनास घालीत जाणें. येक पैसा दक्षणा द्यावी. भोजनास दोनच्यार शाका, कढी, सांबारे, पांढऱ्या पोल्या, साकर, तूप याप्रों घालीत जावे. लिहिल्याप्रों करवणें. रा छ २९ रजब. बहुत काये लिहिणें हे विनंती.

¶The Peshwa writes to Nana Fadnis about the arrangements for the performance of certain religious ceremonies at Sidhatek and adds that one hundred Brahmins should be daily entertained for dinner till the month of Shravan.

No. 187] [*Recd. 12-5-1770*

पौ छ १९ मोहरम सबैन
वैशाख बा कासंबेग
सांडणीस्वार.

श्री

विज्ञापना. आपण सांडणीस्वाराबा श्रीमंतास धुवट सनगें पोशाकी पा ती पावली. सरकारचे पत्रांचे जाब मागाहून पाठवितों. स्वामीनीं वो रामचंद्र

भट दिवेकर यांजवळ सांगितलें. तो मजकूर आपण श्रीमंतांस लिहिला ते पत्र वाचून पाहिले. त्याप्रोच देशास येत आहेत. वैशाखी आमवास्येस ग्रहण आहे. तुलादान करणार. तुंगभद्रातीरी होईलसें दिसते. हे विज्ञापना.

¶*This letter, written to Nana Fadnis, refers to the Peshwa's intention of weighing himself (with silver or gold) on the bank of the Tungabhadra on his return journey from Karnatak.*

No. 188] [*21-2-1770 ?*

पो छ सवाल ह्या सोलापुरचे राऊत

श्री

शवेसा रामचंद्र नारायण गोरे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम माघ वा ११ पावेतो यथास्तित असे विशेष. नित्य ब्राम्हणास कंठ्या देतात, त्यांस पानड्या लावावयासी जवाहिरखान्यांतून खराडीचे मुकामी कंठे दोन आणविले होते, त्यास एका कंठ्यापैकीं पानड्या हिरकण्याच्या सुमार ८९ एकुण वजन तोळे समेत सोनें ७॥२॥। साडेसात तोळे पावणेतीन मासे. या पानड्या आपणाकडे प्रिताजी शेलार याजकडील स्वार आसामी २ दोन याजबराबरी पाठविल्या आहेत, त्यास यांचे हिरे उखळून पानड्या घाट आइते आहेत ते उकाळ्यांत घालून उजळून, मागती हिरकण्या बसऊन खाली पत्रे चांगले घालून, नवें कोंदण करून, दहापाच कारीगर बसऊन, लवकर तयार करऊन पाठऊन द्यावा, म्हणून आज्ञा जाली आहे. जवाहीरखान्यापैकीं दोन कंठे माझे तसलमातीस आहेत त्याची शहतवार+ यादी मजजवळ नाहीं, याजकरितां राजश्री गणेशपंत जवाहिरखान्याचे त्यांस सांगोन शहतवार यादी पाठऊन द्यावयाची आज्ञा करावी. बहुत काय लिहिणें, कृपा लोभ असो दीजे, हे विनंती.

¶*Ramchandra Narayan Gore writes about the necklaces which Gopikabai intended giving away by way of presents to Brahmins.*

No. 189] [*29-5-1772*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्ये राजश्री
बालाजी गोविंद स्वामी गोसावी यासी

पो रघुनाथ बाजीराव नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत जाणें विशेष. श्रीगंगच्या व यमुनेच्या कावडी तुम्ही

+ तपसीलवार?

सालाबाद पाठविता त्या गैरहंगामी येऊन पोह्चतात. तरी ऐसे न करणे. भाद्रपद मासी निवळ पाणी पाहून कावडी भरवणे. सुमार ५० पनास; येमुनेच्या पंचवीस व गंगेच्या पंचवसि, एकूण पनास. त्यास अजुरा रुपये हजार पडत ऐसे करून कार्तिक मार्गेसीर्ष मासी येथे येऊन पोचत ते करणे. रा छ २५ माहे सफर सुा इसने सबैन मया व अलफ.

¶*Raghunath Bajirao gives instructions to Balaji Govind for sending the holy water of the Ganges and the Jumna by the time the Kartik and Margashirsha months arrive.*

No. 190] [*18-11-1772*

श्री

यादी विद्यमान सौभाग्यवती रमाबाई सुा सला.
सबैन मया व अलफ.

१३००	कुणबिणी खासे चाकरीच्या आसामी १३ दर १०० प्रमाणें.
५००	खिजमतगार खासे स्वारीचे ५ आसामी दर १०० प्रमाणें.
९०७५	वाड्यांतील चाकरीचे ब्राम्हण व आचारी दर ५० दर १०० व खिजमतगार दर १०० दर ५०.
३७२५	अग्निहोत्री पुण्यांतील आसामी दर १०० प्रमाणें
१४६००	

¶*Rupees 14,600 were distributed as charities by Ramabai at the time of her going Sati when her husband died (18th November 1772).*

No. 191] [*3-6-1773*

राजमंडळ

स्वारी राजश्री पंतप्रधान सुा सलास

जमा साल मजकूर कमाविस तेजकरा[१] बाा प्रांत वसई
विसाजी केशव याचे अमलाबाा दीड लक्ष रुपये तजक(क)रा करणारानी केला ते जमा रुपये १५००००

---

१ पैशाच्या अफरातफरीमुळें निघालेलें येणें; चोरी.

जमा परभारे रुपये
१५००००

बाकी ताा अखेर साल रुपये

जमा परभारें

छ ११ सौवल अखेर साल. सौवती रमाबाई याणी सहगमनासमई धर्मादाव वगैरे बाा ऐवज देविला त्याच्या यादी आहेत व आलीकडे देणे यादी जाहाल्या त्याची वाटणी रसानगी यादी. प्रां माार विसाजी केशव याचे अमलाबाा दीड लक्ष रुपये तजकरा करणारानी केला, त्यापौ आबाजी यादव याणी येक लक्ष रुपये आपाभट शारंगपाणी याजकडून हवाला दिल्हा ते देविले. रुपये :

६०६५० धर्मादाव

१३००० आश्रित आा ८ याो.

१०००० धोंड जोसी पंचनदीकर.

१५००० मावशा आाा ३.

५०० कृष्णाबाई.

५०० कासीबाई परांजपी.

१००० लक्ष्मीबाई गाडगील.

५०० रामचंद्रभट माईनकर.

१००० आपाभट वैद्य.

५०० रामचंद्रभट लेले कासीकर

५०० शामभट नांदेडकर.

२०० त्रिंबकभट गोडसे.

१००० रामचंद्रभट वैद्य.

१००० जगनाथभट थेऊरकर.

३४५० समस्त ग्रामस्त अग्निहोत्री आा ३६ याो

५०० बालकृष्णभट छत्रे

२००० आपाभट खरे

५०० लक्ष्मणभट दिवेकर

१५०० सिवरामपंत धर्माधिकारी

३०० जगनाथभट तेलंग मेथनकर

२००० चिंतामणभट देव गणपतीचे.

७०० रघुनाथभट चंद्रात्र्ये त्रिंबककर घराबदल रुपये १००० पेसजी पावले रुपये ३०० बाकी हाली

६०६५०

5150

२१९५० बक्षीस रुपये:

११९०० कारकून सिलेदार आा ७
३००० शागीर्द आा ९ याो
२५० दिाा पागा हुजूर आा २
६०० चौकीदार आा २
२२५० आच्यारी आा ८

[अपूर्ण]

¶*This is an incomplete list of charities given away by Ramabai at her Sati.*

No. 192] [*10-8-1773*

माहाल रत्नशाळा झडती.

सुाा सलास.

स्वारी राजश्री पंतप्रधान

खर्च खेरीज मुाा धर्यादाव किता माह रावल छ ११ राज अखेर कैलासवासी सौ रमाबाई याणी छ २१ साबानी सहगमनसमई आपले निाा दागिने वाटिले ते हाली खर्च रसानगी मखलासीची याद. छ २० जोवल सन आर्बा सबैन देणे ब्राम्हणास जडाव दागिने:

२ देणे गोपीनाथ दीक्षित यासी
१ माल मोत्याची बाा खेाा गुाा दामोदरदास पाो * *
३७१०

मोत्ये सुमारी १२१.

१ नथ रासकर्दन पाै याो शाा
२ मोत्ये जोडी थोर
१ पाचमणी

३

२

२ देणे बापूभट घारपुरे याचे स्त्रीस पोहच्या माणिकमण्यामोत्याच्या रासकर्दनपैकी निा मो बाई पौ यो शा

९४ मोत्ये किा रुपये ९४०

४८ माणिकमणी.

६ प्राा रुा २९०

४२ प्राा बजन तोळे १।१।·।।।·.

४८

१०२

१ देणे आमाशास्त्री यांस पोहची मोत्याची जोड १ यो मोत्ये १००, पौ बाा रासकर्दन पौ मोत्ये ९०

१ देणे कृष्णशास्त्री यासी पोहची मोत्याची १ मोत्ये १०० पौ रासकर्दन पौ मोत्ये ९०

१ देणे देव चिंचवडकर यासी कंठा मोत्याचा बाा नीलकंठ नारायण मजमदार पौ छ १९ रमजान ताा राघो कृष्ण कारकून निा पोतनिसी यो शा

२८ सोमासे २ यो

१६ हिरकण्या दर ।

१० चुणी दर ९

२ पाचकिर्डे दर १

२८

२९ पानड्या ९ यो शा

९ हिरे तरतरे दर १ प्रो

८ चुणी

६ प्राा ३ दर २

२ प्राा २ दर १

८

७ पाचकिर्डे

९ लोलक

२ पाचमणी

३ माणिकमणी

--

५

२९

२ ताईत

१ हिरा

१ पाच

२

३९९ मोत्ये सरास

३९७ मोजदाद

२ कमी बा झाला.

३९९

४९४

१ देणे तामसीभट याचे स्त्रीस नथ जडाव मोत्याची रासकर्दन-
पैकी किमत रुपये १६००

शहत.

२ मोत्ये जोडी

१ माणिकमणी

३

२ देणे रामशास्त्री याचे स्त्रीस कंगण्या मोत्याच्या रासकर्दन पौ
घाट सोने वरी मोत्ये

१९२ मोजदाद

७ कमी मोजदाद सईन (?

१९९

२ देणे बालकृष्ण शास्त्री याचे स्त्रीस कगण्या जडाव हिऱ्याच्या रासकर्दनपैकी यो
हिरे शा
४५ हिरे अष्टपैल्ल वगैरे दर २१
९४ हिरकण्या दर ४७

१३६

२ देणे जगोबा देव याचे स्त्रीस घोसबाल्या मोत्याच्या रासकर्दन-पैकी शा
मोत्ये
९० मोजदाद
२ कमी

९२

१ देणे बापूभट जोगलेकर यासीं आंगठी जडाव आंत गणपति. रासकर्दनपौ हिरा चौकी १

१ देणे खंडभट शालग्राम यासी आंगठी जडाव घाट साधा यो किमत ४७॥ रुपये
हिरा चौकी १.

१ देणे नारायण जोसी मालवणकर यासी आंगठी जडाव घाट साधा रासकर्दनपैकी हिरा तरतरा लाहान सुमार १

१ देणे नारायणभट भांडारी यासी आंगठी जडाव रासकर्दनपैकी किमत रुपये २३॥=॥ हिरकणी पान घाट १

६ प्रा आंगठ्या माणकाच्या जडाव दागिने.

१ देणे परशरामभट दांडेकर यासी घाट मिनेगार माणिक चांगले सुमार १ यो

१ देणे मोरभट शालग्राम यासी रासकर्दन पौ माणिकवर्तुल १ यो

१ देणे जनार्दनभट बापट यासी रासकर्दनपैकी घाट साधा माणिकचौकी १ यो

१ देणे आयाचित नारो आपाजी याचे वाड्यातील यासी आंगठी रासकर्दनपैकी शा
१ माणिक पानघाट
१५ हिरकण्या दांडीस

१६

१ देणे जनार्दनभट खरे यासी रासकर्दनपैकी लाहान चांगली चूण सुमार १

१ देणे त्रिंबकभट ढेरे यासी आंगठी रासकर्दनपौ चांगली चूण १

६

१ देणे माहादेवभट कासीकर यांसी आंगठी घाट साधा रासकर्दन पैकी पाच वर्तुल सुमार १

१ देणे दिनकरभट पुरंधरे यासीं वर्तुल तरतरा निा * * पैकी आंगठी घाट साधा नील १

४७ प्राा दागिने कोणास दिल्हे त्याची नावनिसी लागली नाही. बाा मखलासी दागिने ४९ पौ वजा पाटल्या हिऱ्याच्या दूबारा दागिने २ बाकी दागिने

२ गलेसऱ्या दागिने

१ प्राा रासकर्दन पौ किाा रुपये ९६२।–

ाा

२ पानडीस

१ हिरा पानघाट रुपये १९८

[ह्यापुढील एक बंद गहाळ]

बाल्या

पौ काढिली मोत्ये ८ याो रुपये २०० बाकी रुपये १९२९

मोत्ये ३४

२ घोसबाल्या रासकर्दनपैकी शाा

१७ माणिकमणी

२६ मोत्ये दर १३

४३

२ किता बाल्या द्राक्षघोसवजा रासकर्दन पौ मोत्ये

१४ प्राा थोर

४ प्राा लाहान

१८

२ प्राा किता बाल्या शहत
४ मोत्ये थोर वजन तोले ।१॥
२ मोत्ये लाहान ८॥।॥
—
६
२ प्राा किता बाल्या रासकर्दनपैकी रुपये १५१३॥ याो
२ पाचमणी २६
[पुढील बंद गहाळ.]

¶*This is a list of charities given away by Ramabai, wife of the Peshwa Madhavrao Ballal, prior to her going Sati.*

No. 193]
पौ छ ९ साबान
भाद्रपद मास.

श्री

शेवेसी महिपतराव कृष्ण चांदवडकर कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा छ ४ साबानपर्यंत सेवकाचे वर्तमान येथास्थित स्वामीचे कृपेकरून आसे विशेष. कासीतील ब्राह्मणांचीं वर्षासनें वाटायासी स्वामीनी आज्ञा केली, त्याजवरून सिध्धता सेवकाने करावयासी आरंभ केला. तो पुण्यात व चहूकडे वर्तमान जाले की, श्रीमंत कैलावासी उभयेता रावसाहिबाच्या आस्ती घेऊन जातात. म्हणौन गयावल व कासीकर व गंगापुत्र प्रयागवल घरी येऊन आसीर्वाद देऊ लागले की श्रीविश्वेश्वराचे योगेकरून आमचे दैव उघडले. दक्षणेचा वगैरे बंदोबस्त चांगला करून ध्यावा. तेथे गेलीया टंटा न पडे यैसे करावे. यैसे म्हणो लागले आसता आमची पांचाची धारण बसली; गंडस्फाटणच जाले. हे गोष्टीचा आर्थ तेथे गेलियावरी फार कठिण पडतो, तो मजकूर सांगता येत नाही. येथे तरी संभूतहि[१] आस्ती घेऊन जावयाची नाही. याजकरिता माझे वस्तु तरी येकंदर जावयासी पाय घेत नाही. भाद्रपद शुध त्रयोदसीस यात्रा निघणार यास्तव स्वामीस विनंती लिहिली आहे. दुसरा कोण्ही पाठावावयाची मर्जी आसल्यास आज्ञा करावी. आम्ही, दैवहीन ब्राह्मणाचे कार्य घडोन सेवकास यात्रा होईल, म्हणोन स्वामीस आग्रहपुरस्सर विनंती करून आज्ञा घेतली. आसे असता हे पुढे विघ्न आले. ध्यानांत न आणिता गेलो तरी प्रांत

+ तारखेंत कांहीं घोटाळा आहे. १- वार्ता, बातमी.

लागावयाचा नाही. प्राणासी गाठ घालतील. पेशजी स्वामीनी कासीस पाठविले तेव्हा काही नसता आनभव आला आहे, ते स्मरण आद्याप राहिले आहे. सांप्रत असे वर्तमान जाले असता जाण्याचा परिणाम नाही. कृपा करून राहावयाची आज्ञा करावी. शेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

¶*This letter gives a vivid idea of the frightful harassment which the pilgrims, in those times, suffered at the hands of the Brahmin priests of Kashi. Gaya and Prayag.*

No. 194] [*29-3-1781* ?

पौ छ ३ राखर इहिदे.

श्री

राजश्री अमृतराव स्वामीचे सेवेसी

विनंती. उपरी, तुम्ही पत्र पाठविले ते पावले. वेदशास्त्रसंपन्न राजश्री रामशास्त्री याणी वो माहादेवशास्त्री साठे यास पुरंधरास पाठविले आहे. निराले स्थल करून द्यावे, भोजनाचे साहित्य करून द्यावे, स्नानसंध्या करून असतील म्हणोन लिहिले आहे. व देवी श्रीमंतास आल्या ते समई याणीहि काही अनुष्ठान केले आहे, येविसीचा मजकूर लिहिला तो कलला व शास्त्रीबावाचे पत्र तेथे आले होते ते पाहावयासी पाठविले ते पावले. पाहिली. मंत्रशास्त्री आहेत म्हणोन लिहिलेत; त्यास, शत्रूचे पारिपत्य होईल असे सामर्थ व्हावयाजोगे असिल्यास युक्तीने पुसावे किती रोजात इंग्रजाचे पारिपत्य होईल ? असे पुसोन लिहून पाठवावे. तूर्त शास्त्रीबावानी लिहिले आहे त्याप्रमाणे त्याचे साहित्य करून द्यावे. रा छ २ राखेर + हे विनंती.

¶*Nana to Amritrao asking him to provide everything for Mahadeo Shastri and to enquire of him, as he is a Mantra Shastri, as to when the English would be humbled down.*

No. 195] [*12-5-1781*

पो छ १७ जोवल

इहिदे समानीन वैशाख.

श्री

राजश्री नाना स्वामीचे सेवेसी विनंती विशेष.

आपण पत्र पाठविले तें पावले. श्रीमंताची स्वारी पुण्यास जावयासी वैशाख बहुल सप्तमी सोमवारीं आहे व जेजुरीस रविवारी श्रीमार्तंडाचे दर्शनास जाऊन यावे

+ पत्र नाना फडणीसाचें असे.

येविसीचा मजकूर लिहिला तो कळला. ऐशास काल कांहीं ज्वरांश जाल्याची चिठी आपणांस गेलीच आहे. आज संध्याकाली प्रकृत कसी राहात्ये हें पाहतों; त्यासारिखा जेजुरीस जावयाचा विचार. उष्णकालचे दिवस; येका दिवसांत जेजुरीस जाऊन येणें कसें होईल ? यास्तव सोमवारीं खासा स्वारी किल्याखालीं उतरली म्हणजे पंचपदी यात्रा श्रीमंताकडून जेजुरीच्या आगे करऊन विडादक्षणा येका कारकुनाबरोबर देवास पाठवून प्रार्थना करावी, असा प्रकार जाल्यास बरा. उत्तर येईल त्याप्रमाणें करावयास येईल. स्वारी निघावयाचे दिवसी श्रीमंतांस कलवावे, अगोधर कळऊ नये असें पत्री लिहिले होते. त्यास स्वारी निघावयाचे वर्तमान कलतांच बहुत आनंद जाला. त्यांस पत्रापूर्वींच कळले. रा। छ १७ जमादिलावल दीड प्रहर दिवस. या पत्राचा जाब आजच मध्यरात्र तीन प्रहरपर्यंत आला पाहिजे. बहुत काय लिहिणे, लोभ करावा, हे विनंती.

¶*Instructions are sought from Nana Fadnis regarding the Peshwa's journey to Jejuri and Poona from fort Purandar.*

No. 196] [*15-6-1782*

श्री

देवस्थाने श्री हरिहरेश्वर व ग्रामदेव श्रीवर्धन वगैरे यास राजश्री रावसाहेब याचे लग्नाची दक्षणा व वस्त्रे सुा सलास समानीन मयां व आलफ.

पोतापैकी छ ३ रजब गुा अंताजी मल्हार वाकेनीस दक्षणा रुो

१ श्रीहरिहरेश्वर
१ श्रीकालभैरव
१ श्रीउतरेश्वर
१ श्रीमाहादेव
१ श्रीजीवनेश्वर
१ श्रीसोमजाई
१ श्रीकुसुंबदेवी
१ स्थानपुरुष
१ क्षेत्रपाल
१ श्रीलक्ष्मीनारायण
१ श्रीजोगेश्वरी
१ श्रीमाहालक्ष्मी
१ श्रीकालेश्वरी कारल्या

१ श्रीजाखमाता खुजाऱ्याची
१ श्रीकालकाई मेघऱ्याची
१ श्रीभैरव दिव्याचा

१६

जामदारखाना पौ छ २ रजब वस्त्राबाा ताा
येसाजी रामचंद्र भातखंडे कापड आख
४०५ श्री हरिहरेश्वर येथील देवास
१७६ श्रीहरिहरेश्वर
१६४ श्रीकालभैरव
२५ श्रीजोगेश्वरी
२५ श्रीगणपति
१५ श्रीबहिरव

४०५

ताा अदा

१२०	तिवटे	५
१॥≡	खण	१
७१	शेले जाफरखानी	२
३७८	शेले साधे	२
१७	लुगडे	१
५३॥	जामेवार छिटी	१
६१॥	ताफ्ता कद	१
३५॥	छीट बंदरी	१
७॥।÷	खादी पाा	२८≡
४०५		१६८≡

१७५ श्रीवर्धनकर देवास
५० श्रीजीवनेश्वर
५० श्रीलक्ष्मीनारायण
२५ श्रीसोमजाई
२५ श्रीकुसुंबदेवी
२५ श्रीस्थानपुरुष

१७५

यास आदा सनगें १०।=

२०० पा। दिवे येथील देवास

५० श्रीउतरेश्वर

२५ श्रीनागेश्वर

४० श्रीबहिरव

४० श्रीकालेश्वर मौजे कारंजे

१५ श्रीबापदेव

१५ श्रीकालजाई

१५ श्रीजाखमाता खुजारे

२००

यास आदा सनगे १२।।।÷

१२० पा। म्हसाले मौजे अमृतेश्वर येथील देवास

१०० श्रीअमृतेश्वर

१० श्रीबहिरव

१० श्रीनागेश्वर

१२०

यास आदा सनगे ५।।।

९००   ४५८=

¶*A list of the deities at Harihareshwar and Shriwardhan was drawn and rich dresses were sent to their temples on the occasion of the Peshwa's marriage.*

No. 197]   ?2-5-1788

पौ छ १० रमजान सुा तिसा

जेष्ठ

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री नाना यांप्रति

आश्रित लक्ष्मणभट्ट कर्वे यांचे अनेक आशीर्वाद विनंती. येथील क्षेम वैशाख वद्य द्वितीयापर्यंत जाणोन अपुले कुशळ ल्याहावयास आज्ञा केली पाहिजे विशेष. मातुश्रीनी[1] आज्ञा केली की, यंदा मोठे पर्व सूर्यग्रहणासारखे आणि आमचे राशीस

---

१ आनंदीबाई.

आहे. तर तुळा रुप्याची करावी. त्याजवरून पूर्वी पत्र पाठविले व दुसरे पत्र पाठविले तर याचा विचार करोन पत्र पाठवावे यंदा बाईचे पत्रिकेत मृत्युयोग आहे ऐसे आहे. व येथे सांबाचे देवघरांत सोन्याच्या मुहूर्ती तिन आहेत, त्या उग्र आहेत यास्तव ब्राह्मणास द्याव्या ऐसे मानस आहे व भैरवीचे यंत्र ऐशी छतीस सततीस तोळे आहेत. कळावे. द्यावयाची मर्जी फार आहे अथवा पुण्यास पाठवावी व पोवळ्याचा गणपति व पाचेचे मोर पुण्यास पाठवणार आहेत. हे तव पुर्वीच विचारिले आहे. खासगत कामाची विनंती केलीच आहे. ग्रहणोत्त(र) लवकरच दर्शनास येतो. त्या मुहू(र्ती) * * न रुप्याच्या करणार आहेत. त्याची आ(ज्ञा) असावी. याद पाठविली तिचे उत्तरे पाठवावयाची आज्ञा असावी. सुज्ञांप्रति बहुत काय लिहीणे, कृपावृद्धि करावी (हा) आशीर्वाद.

¶*Lakshmanbhat Karve communicates to Nana Anandibai's desire of weighing herself against silver to appease her evil star.*

No. 198] [*8-10-1804*

श्रीयेकनाथप्रा

विष्णु.

श्रीमंत माहाराज राजश्री बाबासाहेब यांसी

प्राति रामचंद्र कृष्ण गोसावी आसीर्वाद विनंती जे. स्वामीनी सासवडचे श्रीस येक दागिना व रुपयाचे उपकर्णेकरितां त्रिंबकजी डेंगळे याजकडून रुो १००० येक हाजार सिका देविला तो आम्हास पावला. मिति आस्विन शुध ५ शके १७२६. हे आशीर्वाद.

¶*A donation by the Peshwa of Rs. 1,000 to the temple of Vishnu at Saswad is acknowledged in this letter.*

No. 199] [*28-7-1815*

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री
बाबासाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती शेवक मोरो नारायण दाबक चरणावरी मस्तक ठेऊन सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीज. श्रावण मासचे उत्छाहानिमित्य ब्राम्हणभोजन

२ पत्र कोप.गांवाहून, सबंध बाल.ोधींत आहे.

वाडा शुक्रवार येथील ईा श्रावण शुा १ प्रतिपदा रविवार ताा शुा पंचमी बुधवार येकूण च्यार रोजा दररोज येक हजार प्रमाणे येकूण च्यार हजार ब्राम्हण-भोजनाचा मक्ता मी कबूल केला, त्याबदल सरकारातून पोतापैकी राजश्री जनार्दन कोंडदेव गाडगीळ याचे विद्यमाने देविले ते चांदवड रुपये २५०० अडीच हजार पावले. सुा सीत आशर मया तैन व अलफ. शके १७३७ युवानाम संवत्सरे आषाढ वाा ७ शुक्रवार. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. हस्ताक्षर रामाजी माहादेव ठोसर.

¶Moro Narayan Dabak passes a receipt to the Peshwa for Rs. 2,500, being the sum for which the writer had undertaken to feed 4,000 Brahmins at a daily dinner during the month of Shravan.

No. 200] [*1764*

9. Vows, Buildings, etc.

पुा आर्बा सितैन

राजमंडळ

स्वारी राजश्री पंतप्रधान

खर्च खेरीज मुशाहिरा

नवस खर्च

जामदारखानापैकी

छ ३० माहे जिलकाद मुकाम पुणे विद्यमान राजश्री बालाजी जनार्दन फडणी इा छ १ जिलकाद ताा छ २ जिल्हेज अखेर छ ७ रोज विाा सौ पार्वतीबाई यान श्रीबहिरी किले सिहगड यास मुखवटा सोन्याचा नेला ते समई ताा हरि विश्वना भावे दुपटा १ याो

आख

८७॥

रत्नशालेपैकी

छ ३० माहे जिलकाद मुकाम पुणे विाा राजश्री बालाजी जनार्दन फडणीस इा छ १ जिलकाद ताा छ ३० मिनहू देणे श्री अंबरीनाथ वास्तव्य किले सिहीगड यास साल गुदस्ता मोगलाच्या दग्यात सेर सोन्याचा मुखवटा नवस केला तो

हालीं दिल्हा विा सौ पार्वतीबाई. पा राजश्री बालाजी जनार्दन फडणीस रसानगी व ताा हरि विश्वनाथ भाव्ये छ ९ रोज

किंमत

रु.

४२०८=

सोने ताा पैकी कड्याचे दर तोला रुाा १६॥ प्राो

रुाा

४००८=

सोने वजन तोले

२३॥।१ मुखवटा-१

।= कुडक्यास

२४।

मोत्ये कुडक्यास सिलकी दागिन्यापैकी रती ४ चव ४॥ किाा

रुाा

२०

मोत्ये

२

¶*Parvatibai fulfils her vows to certain deities at Sinhgad fort.*

~~No. 201~~ [1764?

साा आर्बा

राजमंडळ

स्वारी राजश्री पंतप्रधान
खर्च खाो मुाा नवस खर्च
पोतापैकी

माहे रमजान रुाा

३७५ छ ४ रोज श्रीबलालेस्वरी पांच सहश्र रुपयाचे ब्राह्मणभोजन करावे त्रिंबकेस्वर सरकारात राहावा म्हणौन नवस केला होता, त्याजपैकी भोजन दक्षणेस पाठविले ताा नाथूराम प्यादा.

जामदारखानापैकी

छ २७ जमादिलाखर किले त्रिंबकेस्वर किला फते व्हावा म्हणून त्रिंबक सूर्याजी याणी देवास नवस केले होते, त्याची सनगे दिल्ही, ताा संकराजी त्रिंबक सनगे रुाो

श्री मार्तंड मुकाम जेजुरी सनगे निसबत नारो आपाजी

[सनगांचा तपसील]

सुभा राणोजी बलकवडे सनगे याा

रुाा

३४ श्रीवागजाई

5163

सुभा मोराजी सिंदे खदंडा सनगे रुपये
६८॥ बहिरी थल

२६ श्रीनवलाई
३१॥ वरधान सुरगड
४१। श्रीबाबदेव

१३३॥=	११

श्रीदेव सुभा बहिरजी बलकवडे सनगे रुा

२६ अलगाई
२१।॥= श्रीभवानी कळसाई
२५ काक्षा कावनई

७२।॥=	९

[पुढील येक बंद गहाळ.]

श्री खंडेराव बहिरी नासीकचा नि॥ गंगाधर बलाल सनगे रुपये

⌣————————तेरीज येकंदर सनगे यो रुपये

२५३।॥ श्रीमार्तंड जेजुरी ४॥
१०६ सुभा मोरोजी सिंदे
२३।= भवानी वोतूर
२९ खंडेराव बहिरी नासीक १॥
१३३॥= सुभा राणोजी बलकवडे
७२।॥= सुभा बहिरजी बलकवडे

	६
६१८॥=	३६॥

¶*Clothes, etc., are given as presents to several deities promised in a vow by Trimbak Suryaji for the successful capture of the fort of Trimbakeshwar.*

5164

No. 202] [*1775*

सुा सीत सबैन.

राजमंडळ

स्वारी राजश्री पंतप्रधान

खर्च खेरीज मुशाहिरा

छ १६ जाखर. मुा बापूजी हरि यास कोलवणात कामगारीस पाठविले तेथे सालगुा छ १७ रावली मौज बापघर नजीक किले गंभीरगड येथे अडचणीचे जागा कोलवलणचे स्वारीस मुकाम जाहाला होता, तेथे पर्जन्य फार लागला, सबब नवस श्रीनागेश्वर देव कसबा पुणे रुा

१००

[कोठून द्यावयाचे याचा तपशील

रत्नशाळेपैकी

छ २९ जाखर मुा पुणे सौ दुर्गाबाई यास देवी निघाल्या साा श्रीसीतला देवी वास्तव्य चेऊल यास सौ पार्वतीबाई याणी नवस केला होता तो राा व ताा हरि विश्वनाथ भावे सोने बाा कसर मोजदाद सबैनपैकी दर तोला रुपये १९।= प्रमाणे किंमत रुा

१९४≡॥

सोने वजन तोले

१ प्रतिमा देवीची १

।• द्रिष्टी २ येकूण

१।

छ ३० रमजान मुा पुणे. रायगड किला सरकारात फते व्हावयानिमित्य आपाजी हरि याणी देवास नवस केले होते, त्याचे दागिने करून दिल्हे बाा सनद लस्कर चिठी छ १ सवाल आर्बा सबैन. हाली रुबरू दाखऊन दिल्हे. छ ६ साबान आदा ताा आपाजी [अपूर्ण]

¶*An account of the expenditure for the fulfilment of certain vows is given in this paper.*

राजमंडळ

स्वारी राजश्री पंत प्रा
खर्च खा मुशाहिरा

सुा तिसा सबैन

नवस खर्च

पोतापैकी

माहे रावल रुा

१५६। छ २९ रोज विा राजश्री राव पेशजी कैलासवाशी मातुश्री गंगाबाई याणी देवास नवस केला होता त्यापैकी हाली रुा

१०० बहिरव वास्तव्य बहिरवाडी नजीक किले पुरंदर यास सोन्याचा मुखवटा वाहात्येसमई नख्त शंभर रुा ठेवावयाचा नवस होता त्याप्रा देवापुढे ठेविले रुा छ १३ रावल

५६। श्रीनारायण वास्तव्य नजीक पेठ किले पुरंदर यास दोन महारुद्र करावयाचा नवस होता त्याप्रा दोन माहारुद्र करविले, इा छ १४ रावल ता छ १५ मिा दोन रोजा आभिषेक आनुष्ठान जाहाले त्यास ब्राम्हण-भोजनाचे साहित्य वगैरे खरेदी गुा महिपतराव बापूजी कारकून दि॥ रामचंद्र नारायण प्रा पुणे [सामानाचा तपशील]

माहे जमादिलोवल अखेर रुा

१० छ १३ रोज नवसाचा गोंधळ छ ८ जमादिलोवली वाड्यात घातला त्यास गोंधली यास बिदाई रसानगी यादी

रत्नशालपैकी रुा

छ १८ माहे जमादिलोवल मुा पुणे इा छ ३ जिल्हेज ता छ ९ रबिलाखर-श्रीबहिरव वास्तव्य बहिरववाडी नजीक पुरंदर यास येक हजार रुपयाचे सोन्याचे मुखवट्याचा नवस केला होता तो तयार करून दिल्हा बा पत्र लस्कर ता जिवाजी भंडारा खिजमतगार याजबरोबर पाठविला छ १२ रावल

किंमत रुा १०००

[पुढें तपशील]

सुा समानीन

परभारेपैकी

छ २७ जावल अवल श्री देव नारायण वाा मौजे टाकवली ताा हवेली प्रांत कुडाल यास साल गुदस्ता इंग्रज मुंबईकर हा दुर्बुध्धी धरून संरंजामसुधा कसबे तलेगावापर्यंत चालोन आला होता, त्याचा पराभव व्हावयानिमित्य वो राजश्री अनंतभट पित्रे वाा मौजे मजकूर याचे विद्यमाने श्रीस नवस सरकारातून केला होता, त्यास इंग्रजाचे पारपत्य श्रीकृपेकरून जाहाले सबब रसानगी यादी रुा

७००० श्रीदेवाकडे कारखान्याबाा

८॥ श्रीदेवी मावली मौजे मजकूर.

छ २७ जावल अवल श्रीमार्तंड वास्तव्य जेजुरी यास आर्बा सबैनात नवस केला होता तो हाली राा याद रुा

५०००० श्रीमार्तंडापुढे

५०००० बाजी नारायेण व राघो नारायेण पुरंदरे सासवडकर यासी

रु. १००००००

येक लक्ष रुा तुकोजी होलकर यांजकडे प्राा मालवा येथील बाबती सरदेशमुखीचा ऐवज मागील तीसाल येणे त्यापौ देविले रुा

५७७५० पांडुरंग नारायेण भुसकुटे याणी हवाला घेतला आहे त्यप्रो श्रावण शुाा १ देविले

४२२५० आबाजी नाा वानवले याणी हवाला घेतला आहे त्यापौ जेष्ट शुाा १५ देविले.

१०००००

सदरहू ऐवज हरि बलाल याजकडे पावता [अपूर्ण]

¶*These are account sheets showing the expenses incurred for the fulfilment of certain vows made to deities from time to time. Amongst these is a vow for the success against the English at Talegaon.*

No. 204] [23-11-1769

पौा छ ३ रमजान सबैन.

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बाळाजी
जनार्दन स्वामी गोसावी यांसी

पो माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें विशेष. माहादारेतून धामणीकर वाणी याणें

बाजार व पेठ व गांव माखजन ता। संगमेश्वर येथील वाणी उदमी वगैरे लोक याजवरी भुतें घालोन घराची घरें गुरेसुधा मारिली आहेत म्हणौन विदित जालें. यैशियास, वाणीमजकुराने भुते घालोन गुरे माणसे मारिली वगैरे उपद्रव भुतासंमंधें जाला आहे, त्याची चौकसी करावयाविसी सुभा रत्नागिरीस लेहून पाठऊन बाजारची रयेत वगैरे ज्यास उपद्रव जाला असेल त्यास आणून चौकसी करणें. सदरहूप्रमाणें खरें जाहाल्यास भुताल्याचे पारपत्य करून गुन्हेगारी सरकारात घेणे. ही पुर्ती चौकसी होऊन फडशा होये तोपर्यंत वाणी मजकुरास सरकारातून नवे वतन करून द्यावयाची याद देण्याची जाहाली आहे, ती पत्रें करून न देणे. जाणिजे. छ २३ रजब सुा सबैन मया व अलफ. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa orders Nana Fadnis to institute inquiries regarding a certain grocer who is alleged to have demolished houses and cattle, belonging to other traders, by invoking the aid of evil spirits. The Peshwa moreover adds that the grocer, in case he is proved guilty, should be duly punished.*

No. 205] [*30-7-1770*

श्री

सेवेसी विज्ञापना. स्वामीनी पत्र पाठविलें तेथें आज्ञा कीं "ब्राम्हणाचीं लग्नें कार्तिकमासीं व भ्रतार मृत्य पावलियावर स्त्रियानी दतपुत्र घेणे या दोही गोष्टीची रूढ स्वदेशी नसतां रत्नागिरि तालुकेयांत बालाजी गणेश यांचें लग्न कार्तिक मासीं जाहालें व दिनकर माहादेव यांचे सुनेने दतपुत्र घेतला, याजवरून तेथील अमलदारास काय म्हणावें? कदाचित् संकटविषयास्तव म्हणतील तरी कोणते संकट हे सरकारात लेहून हुजूरचे आज्ञेने कर्तव्य ते करावें ते गोष्ट न जाली. परंतु कांहीं शास्त्रसंमत आहे यास्तव फिरवितां न ये. तथापि ज्या देशीं जी रूढ नाही ते गोष्ट सरकारचे आज्ञेसिवाये व्हावयासी कारण काये? याउपरी तेथील तालुकदारांस लेहून अत:पर याप्रो न होये ऐसा बंदोबस्त करून वर्तमान सरकारांत लेहून पाठवावे" म्हणौन आज्ञा. ऐशास आज्ञेप्रो तालुकदारास लेहून येविसींचा बंदोबस्त करवितों. रा छ ७ राखर इहिदे सबैन हे विज्ञापना.

¶*Orders are issued prohibiting the performance of marriages in the month of Kartik and the adoption of a son by a Brahmin widow, without previous permission from Government.*

No. 206] [5-1-1772

पौ छ ७ सवाल सन
इसने सबैन पौष.

श्री

शवसा रामचंद्र नारायेण गोरे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २९ माहे रमजान मुकाम गंगापूर येथास्थित जाणून स्वकीयें कुशल लिहीत जावें विशेष. समुद्रतीरी व देशामध्यें कितिका स्थली कन्येचा विक्रये करून द्रव्य घेत आहेत. याप्रमाणें आनाचार प्रवृत्त जाला आहे. यास श्रीमंतासारिखे ब्राम्हण प्रभु असतां व तुम्हासारिखे ज्ञाते सनमार्गवर्ती विवेकी मंत्री असतां हा मार्ग अनुचित, योग्य नव्हे. त्यास ह्याअर्थी श्रीमंतास विनंती करून याचा बंदोबस्त करावा. या बंदोबस्ताविशई पेशजी दोनतीन वेल उपक्रम होऊन देशोदेसी सरकारची पत्रे व कारकून प्यादे गेले. परंतु बंदोबस्त न जाला. तरी असा मजकूर कामाचा नाही. हाली श्रीमंतांच्या चितात येथास्थित अनाच्यार राज्यात प्रवृत्त बहुत जाला असे समजाऊन देशोदेसी सरकारची पत्रें व चौकसीस परनिष्ट कारकून चांगले शाहाणे माणूस असे नेमून क्षेपनिक्षेप बंदोबस्त करावा. बंदोबस्त कसा होईल म्हणाल तरी, पेशजी श्रीमंत राजश्री भाऊसाहेब याणी मद्याचा बंदोबस्त केला तो हा कालपर्यंत उतम प्रकारें चालला आहे. याच प्रकारे हा केल्यास होईल. परंतु मनामध्यें हे कार्य करूच असे धरून केल्यास होईल. ज्याणे कन्येचा विक्रये करून द्रव्य घेतले असे चौकसीत आढलल्यास परिछिन्न त्याजपासून राजदंड घेऊन वाली घालावें व मध्ये अंत्यस्थ चौकसदार व हरकोणी घऊन करितील त्याचा बंदोबस्त हुजुरूनच असावा. व नानाप्रकारें श्रीमंतास समजाऊन रदबदली करितील त्यांचे परिछिन्न येकंदर आइको नये. येसे केल्याने प्रभूचें येश बहुत होईल. याप्रमाणें आपणास लिहोन पाठवावयास श्रीमंत मातुश्री बाईसाहेबाची आज्ञा जाली. त्यावरून लिहोन पाठविले आहे. कलावें. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Gopikabai communicates her desire to Nana Fadnis that the Peshwa should be induced to enforce strict prohibition of the practice, then prevalent, of selling away brides, in marriage, by their parents or guardians, in the same way that Sadashivrao Bhau adopted in the case of liquor traffic.*

No. 207] [21-9-1772
तालीक

श्री

वेदशास्त्रसंपंन्न राजश्री पाठकजी यांसीं

विनंती उपरी. सूर्यनारायेणभट तेलंग याणे राही ब्राह्मणं इजपासी पेशजी बदकर्म केले त्याचा मुदा खरा जाला, त्याजवरून याजला तीर्थे करावयाची आज्ञा

जाली होती. त्यांस सात आठ वर्षे जाली. हाली तीर्थाटणे करून आला आहे म्हणून रा॥ केशवराव बलाल याणी लिहिले त्यावरून आपणास लिहिले आहे. सूर्यनारायणभट यास शास्त्रता प्रायश्चित्त देऊन शुद्ध करावा.

ता॥ छ २३ जमादिलाखर सु॥ सलास सबैन मया आलफ. बहुत काय लिहिणे?

¶Shastri Pathakji is asked to take back into caste Surya Narayan, a Telang Brahmin, who had been punished for adultery.

No. 208] *[21-5-1764*

पौ॥ छ २८ जिलकाद खमस
वैशाख बा॥ सांडणीस्वार.

श्री

पु॥ राजश्री बालाजी जनार्दन
स्वामी गोसावी यांसी

विनंती उपरी. पर्वतीचे तल्याचे बागातील बंगला आहे त्यास इमारत जळून भिंती मात्र उभ्या राहिल्या आहेत त्या वाईट दिसतात, यास्तव त्या भिंती पाडून इटा जमा करून ठेवणे आणि जागा हमवार करणे. जुने जोते राहील त्याजवरी चौमोली छपरबंदी बंगला करणे. आत झाडे आहेत त्यास आली बांधून पाणी लाऊन गुलजार करवणें. नीरेचा पूल व पुण्यातील पूल व कलसचा पूल दागदोजी करावयास जाले असतील त्याचा समाचार घेऊन भंगले खचले असेल त्याजवर भटीची माती घालून दुरुस्त करणे. वरचेवरी समाचार घेतल्याने जाया होणार नाहीं याजकरिता लिहिले असे. तरी पर्जन्यापूर्वीच हे काम करवणें. श्रीविष्णूची मुहूर्त वगैरे मुहूर्ती तयार जाहाल्या असिल्या तरी वो॥ राजश्री गंगाधर-भट कर्वे यास मुहूर्त पुसोन स्थापना करवणें. कितेक पर्जन्यकालची कार्ये जरूर करावयाची असतील ती तुम्ही केलीच असतील. राहिली असिली तरी ती करवणे रा॥ छ १९ जिलकाद. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶The Peshwa orders Nana Fadnis from his camp in the Karnatak, to rebuild the bungalow at the Parbati tank, to repair before the rains certain water channels and bridges and to install the images at the Parbati hill, if they be ready. The paper shews how minutely the Peshwa attended to his duty all round.

No. 209]

श्रीगजानन

राजश्री सदासिव भिकाजी व हरि भगवंत गोसावी यासी

ॐ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो त्रिंबकजी पाटील डेंगले रामराम विनंती. उपरी, सरकारवाडा शुक्रवार येथे गची नवी करावयाबदल राजश्री रामचंद्रपंत अणा नगरकर व चिंतोपंत रावजी देशमुख व जनार्दन नारायण देशपांडे व चिमणाजी नारायण व आबा बाम व आम्ही इतक्याचे हवाली रुपये ६००० साहा हजार सरकारातून करविले ते रुपये अणा नगरकर याचे हवाली सदरहूचे विद्यमाने करून आपलेकडील जामदार व कामाचे चौकसीवर नेमून देऊन गचीचे काम सरकारमर्जीप्रमाणें होय तें करावें. सदरहू साहा हजारपेकीं नगरकर यांजकडे पेशजी ऐवज जो दिल्हा असेल तो मजुरा धरून बाकी ऐवज निघेल तो द्यावा. पावती येथे घेऊन यादीवर मखलासी जाली आहे. त्यास आपलेकडील कोणी शहाणा माणूस नेमून देऊन गचीचे कामाची चौकशी ठेवावी आणि ऐवज लिा प्रमाणें भरणा करावा. येमा बनकर याजकडे आंब्याचे पन्हेऱ्याबदल अडतीस हजार रुपये द्यावे म्हणोन लिहून पाठविले आहे त्याप्रमाणे तुम्ही बनकर याजकडे भरणा करून पावती घेऊन पाठऊन देणे. कोलते याणीं आडतिसा पैकीं भरणा केला असेल याची चौकशी करून लिहून पाठवावे त्याप्रमाणें विनंती सरकारांत करूं. आज्ञा होईल तसे लिहूं. कोलते याजकडून सा हजार सिका निकडीने घ्यावा. चांदवड रुपये घ्यावयाची आज्ञा नाहीं. कलावे. रा छ २३ रजब. बहुत काय लिा हे विनंती.

ताजा कलम: साहासे लोक पायदल पुणे मुा थोरले वाड्याचे रखवालीस व च्यारसे लोक पेलघाटास पाठवावयास येकूण हजार ठेवावयाची आज्ञा जाहली. तुम्हास कलावें हे विनंती.

¶*Trimbakji Dengle writes to Sadashiv Bhikaji and Hari Bhagvant about the work of building a new terrace to the Peshwa's palace in Shukrawar Peth.*

No. 210] [26-3-1807

श्री

श्रीमंत राजश्री बाबासाहेब
साहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक मनसाराम लक्षुमण व दाजी सुतार विनंती विज्ञापना ऐसीजे कीं, विश्रामबागेंतील इमारतीचें काम आम्ही कबूल केले त्याचीं कलमें तपसील :

२५००० पूर्वेकडील रस्त्याचे अंगे सोपा दुघाई उत्तरदक्षण खण सुमार: दक्षणेकडे चापेखण दोन व उत्तरेकडे चापेखण येक मधील खण

5171

सात येकूण खण दाहा. पुढील जोत्य दाहा खणाचे व पश्चिमेकडील जोत्य सात खणाचे. मधील भिंत उंची येक मजल्याची, दोही कडील चांदईच्या भिंती दोन. तलमजला करून दुसऱ्या मजल्यात दिवाणखानास रुदार खांब व मेहेरोबी बसऊं. दुसऱ्या मजल्यावर गची करून दोहीकडे दोन बंगले करून त्याजवर गची करूं. याचा मख्ता रुपये पंचवीस हजार कलम १

७००० पुढील सोप्याचे माघे चौकांत दक्षणेकडील दुघाई खण सात दोन मजले करून त्याजवर कवलार करू. दाक्षिणेची भिंत व जोत्य सात खणाचे करू व उतरेकडील सोपा येकघाई दोन मजले खण सात, वर कवलार करूं. मागील भिंत व जोत्य सात खणाचे करू. लाकडी काम दोहीकडील साधे करूं. दिवाणखाना करणार नाही. याचा मख्ता रुपये सातहजार कलम १

४०००० मागील अंगास पश्चमेकडील घर चौघाई, मधील भिंत येक, दोहोकडील चांदया दोन चौकांतील जोत्य सात खणाचे व मागील जोत्य सात खणाचे करूं. तलमजला करून दुसऱ्या मजल्यांत दिवाणखाना करूं, त्यास खांबास रुदार व मेहेराबी बसऊं. मुदपखाची जागा पाटणार नाहीं. बाकीचे दोन मजले दरोबस्त पाटून वर कवलार करूं. गची करणार नाहीं. याचा मख्ता रुपये चालीस हजार कलम १

७२०००

सदरहू बहातर हजार रुपये घेऊन लिहिल्याप्रमाणे काम तयार करून देऊं. खांब लगा व तुलया जोत्य तालीमखान्याच्या मासल्याप्रमाणें करूं. यासी मुदत कार्तिक शुा १५ पावेतो तयार करून देऊं. मिति शके १७२८ क्षयेनाम संवत्सरे, फाल्गुन वाा ३ त्रितीया हे लेहून दिल्हे सही.

हस्तअक्षर रावजी भगवंत पाठक वस्ती कसबे पुणे पेठ सोमवार.

¶*Mansaram Lakshman and Daji Sutar undertake to carry out the construction of the Vishram Bag palace for Rs. 72,000. This paper contains the detailed specifications of the work.*

5172

No. 211] [*2-2-1811*

नकल.

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्री
परशराम खंडेराव गोसावी यांसं

सेवक बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार. सुा इहिदे आशर मयातैन व अलफ. कसबे गुहागर तालुके अजणवेल येथें सरकारचा वाडा नवा बांधावयाचा. त्याचे काम वो राजश्री मोर दीक्षित मराठे वसईकर यांजकडे सांगितलें आहे. त्यास इमारतीचे कामास सुमार :

१६५० लांकडे सागवानी

६५० सोटे सागवानी व खैराचे

५० मोठे

६०० मध्यम

६५०

१००० वासे

१६५०

१५०००० कौले मातीची

१५१६५०

येकूण येक लक्ष येकावन हजार साहासे पनास पैकी लांकडे येक हजार साहासें पनास व कौले येक लक्ष पनास हजार राजश्री चिंतो वामन सिधये कारकून निा दप्तर व गंगाधर बालकृष्ण मराठे याजकडील कारकूनाचे व सरकारचे खिजमतगार याचे गुजारतीने मोर दीक्षित जेथे खुषखरेदी करून बंदरी पाण्याचे काठीं आणून देतील तेथून तालुके वसई येथील सरकारचे नेमणुकेपैकीं आरमार देऊन आरमाराकडील लोकांनीं गलबतावर चढऊन जलमार्गे कसबे मजकूर येथें बंदरी सही करून पाण्याचे काठी उतरून उभयताकडील कारकुनाचे व सरकारचे खिजमतगार याचे गुजारतीने मोजदाद करून मोर दीक्षित मराठे याचे हवाली सदरहू येक लक्ष येकावन हजार साहासे पनास सुमारी करणे. जाणिजे छ ७ मोहरम. आज्ञा प्रमाण मोर्तब असे.

¶*The Peshwa writes to Parshuram Khanderao Rahtekar regarding the building of a new palace at Guhagar.*

No. 212] [2-12-1813

पोंछ ९ मोहरम प्रोष
सन आर्बा आसेर.

श्री

शेवेसी विनंती. सेवक माधवराव बहिरव जोसी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. मार्गसीर्ष शुा ९ गुरुवारपावेतो कोपरगांव येथें आज्ञेवरून आहे. येथील इमारतीचा मजकूर, श्रीगोवर्धन येथील देवळाचे भिंतीचे काम चालत आहें. पहिल्यानें चुना वाईट घातला म्हणून च्यार थर उखळून काढले. हली तोच चुना निमित्यास चाकात घालोन पुन: दगड रचू लागले. चुना चांगला कमाविला नाहीं. रंग आत मेथादीप्रा घालीत नाहीं. या चुन्याने काम करूं नये म्हणोन गणेशपंत निा गंगाधरपंत जोसी याजला सांगितले. न ऐकतां दोन थर तिरोजांत रचले. ऐकेनात, तेव्हा बेटांत चुना नेऊन राजश्री विसाजी देवरावसुधा सर्व मंडलीस दाखविला, आण दृष्टीस पडावा म्हणोन चुना पाठविला आहे. इमारती कामगार यांचे म्हणे, आम्ही मक्तेकरी इमारत उभी करून देऊं. चुन्यांत मसाला, कमावणी आमचे इच्छेस येईल तसे करूं. सर्व इमारतीचे मक्तेकरी गवंडी येकच. पायात चुना असाच पडणार. येथें वाद घालितात. चुना चांगला मसाले घालून पधतीप्रमाणें कमावीत नाहीत. कारखानदार मक्तेकरी कामे करतील, मग मी येथें काय करावें ? चुना पाहून सेवकास आज्ञा व्हावी तसी वर्तणूक करीन. पायांत दगड कोपरगांवचेच खाणीचे येत आहेत. सेवेसी श्रुत व्हावें हे विज्ञापना.

¶*Madhavrao Bahirav Joshi complains to the Peshwa that the contractors were using bad mortar for the building work at Gowardhan.*

No. 213] [4-2-1814

पो छ १८ सफर माघ
सन आर्बा

श्री

माहाराजाचे सेवेसी आज्ञाधारक खंडोजी बंड व जिवाजी भोसले चरणावर मस्तक ठेऊन सा। दंडवत विज्ञापना. ता। माघ शुा १५ पावेतो माहाराजाचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. कसबे नासिक येथील नव्या सरकारवाड्याचे काम पाया भरून भिंतीचे पाये सुधा बहुतकरून तयार जाहाले. करेचे जोते पूर्वेकडील निमे जाहाले व नरम दगडाचेहि चालते जाहाले आहे. लाकडी कारखाना चालता होऊन सुरूदार खांब वगैरे लगा चौकटी तयार होत

आहेत. काम चांगले करीत आहात. सागवानी लाकडे राहुडा घाट तालुके हदगड येथून यावयाची त्यास मामलेदाराकडून देशमुखासी तंटा आहे, याजमुळे घाट चालावयाचा मना होऊन लाकडे यावयाची मना जाहाली आहेत. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Khandoji Band and Jivaji Bhonsle report to the Peshwa that the work of building a new palace at Nasik was progressing well.

---

10. Fire at Shanwar Wada.

No. 214] [*4-4-1808*

श्री

विज्ञापना यैसीजे. वाडा शनवार येथे सोमवारी सायंकाली आवसीचे अर्धी घटके रात्रीस जवाहीर खान्यात खोलीचे दक्षणेचे बाजूस अग्न लागली त्याणे वाडा जाया व्हावा असे होते; परंतु स्वामीचे पुण्यप्रतापे बाहेरील कुमक येऊन पाहोचे तो अग्नि विझविला. किंचित् नाश जाहाला आहे. पाण्याचा पुरावा बंबसुधा आणून जाहाला. इतक्यात राजश्री बापू गोखले वगैरे मंडली येऊन पावली. वाड्यातील बंदोबस्त यथास्थित आहे. सविस्तर मागाहून लिहितो. अग्न दुसरे मजल्यास गेली परंतु विझविली. रा सोमवार पाच घटका रात्र. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶This and the following nine letters give information regarding the fire that broke out in Shanwarwada on 4th April 1808.

No. 215] [*4-4-1808*

श्रीहरि

अपत्ये बापूने दोनी कर जोडून सिर सां ना वि. ता छ ७ सफर इंदुवासर आवसीची आठ घटका रात्र पावेतो वर्तमान उतम असे विशेष. आज आवसीचे अर्ध घटके रात्रीस शनवारचे वाड्यातील जवाहीरखान्याचे खोलीचे कवाड लाऊन कारकून याणी कुलूप लाविले आणि बाहेर होते इतक्यात खोलीत धूर जाहाला, तेव्हा कारकून याणी कुलूप काढून पाहिले तो धुरामुळे आत प्रवेश न होई. व कोठे आग लागली हे समजुतीत न येई. तेव्हा खोलीचे वर्चे मजल्यावरील खिडक्या फोडून वरचे मजल्याचा पेंड फोडून पाणी घातलें, तेव्हा काहीसा धूर कमी जहाला. त्या वेलेस चिरंजीव रो रघुनाथ वाड्यातच होता. त्याणी पाण्याचा पुरावा फारच केला, त्यामुळे आग नरम येऊन अमुक ठिकाणी लागली हे समजुतीत आले. इतक्यात मीहि जाऊन पोचलो. अग्न खोलीचे पस्चमेचे आंगास कडीपाट व येक तुळईस लागली. त्यापाच कड्या निमेसिमे व काही

5175

तुलई यास आच पोचली. नंतर बंब आणून .... पुरावा चोहीकडून केला त्याणे आग दरोबस्त विझली. इतक्यात रा। बापू गोखले व देशमुख व भाऊकडील कारकून वगैर मंडली येऊन पोहोचली. नाश मोठाच व्हावा परंतु श्रीमंत राजश्री माहाराज स्वामीचेच पुण्यप्रतापे काही येक नाश न होता आग विझोन वाड्याचा बच्याव जाहाला. खोलीतील जवाहीर वगैरे जिनस वरचेवर बाहेर काढून ढका न पोचता बंदोबस्ताने ठेविला. खोलीवरील पेंड दरोबस्त खणोन काढून जागा मोकली केली. पेंड काढावयाचे कारण तुलई अगर कडीत आग राहील या अंदेशाने पेंड दरोबस्त काढून तुळ्यावर पाणी घालून संशये निवृत केला. अग्नीची गडबड व्हावयाचे पूर्वी सहज श्रीमंत आपासाहेब याची स्वारी बाहेर गेली होती. हे वर्तमान बाहेर समजल्यावर रा। बापू जेठी याचे घरी आग विझे तोपर्यंत होते. अग्नि शांत जाहाल्याची बातमी गेल्यावर स्वारी वाड्यात आली. गोखले व भाऊकडील कारकून सातघटका रात्र जाहाल्यावर निघोन गेले. अग्न लागल्याची बातमी बाहेर गेल्यावर शहरातील तमासगीर वगैरे दिली दरवाज्याबाहेर मइदानात बहुत जमा जाहाले, त्याजमुले दर्वाजा लाऊन बंदोबस्त करून दिंडी मोकली राखली, याजमुले गलबल होऊ पावली नाही. आत लोक आले होते त्यांचा झाडा झडती चौकसीने बाहेर लाऊन वाड्यातील बंदोबस्त करून रघुनाथ यास वाड्यात ठेऊन मी आताच घरी आलो. उदईक सविस्तर तपसीलवार चौकसी करून लिहितो. येविसीची सूचना आगाव अग्न विझताच लिहिली आहे हे विज्ञापना.

¶*An account of a fire at the Shanwarwada and measures taken to extinguish it is given in this letter.*

No. 216] [*4-4-1808*

श्री

शेवेसी विज्ञापना विशेष. आज सोमवार इंदुवार साइंकाली दिवालागणीस सिरस्त्याप्रमाणे कारखान्यात दिवाबत्तीची वात लाविली, कुलूप घातले, नंतर पाव घटिकेचे अवकाशे आंतून किंचित् धुराचा संशय आला, तेव्हां कुलूप काढिलें तों धुराची गर्दी फार जाहाली. त्यात उड्या घालून कागदपत्र वगैरे बहुत करून दरोबस्त काढिले त्याची बंदोबस्ती बहुत करून राखिला. बंब वगैरे लाऊन आग विझविली. वरचे खोलीत माडीवर जिनस वगैरे होता तो दिवाणखान्यात काढून तेथे पाहारे आपटे व चौधरी याजकडील बसविले आहेत. वरचे खोलीत कडीपाट खोलीवरील फोडून तुलईस आग लागलेली विझविली. अद्यापि पाण्याचा उद्योग चालताच आहे. श्रीमंताचे

पुण्यप्रतापेकरून निर्विघ्न जाहाले. रा मिा शुा ८ इंदुवासर आवशीची प्रहर रात्र. मागाहून व्यवस्थेचा मजकूर लिहितो. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. दिव्यातील वात उंदरानें नेली असा भास होतो. मग काय चरित्र असेल ते नकले. हें विज्ञापना. येविसीचा मार रा अन्याबा सुभेदार याणी लिा आहे तेहि पत्र श्रीमंतास द्यावें.

¶*The fire at the Shanwarwada is further described.*

No. 217] [*5-4-1808*

पाो गुरुवार प्रात:काल

श्री

विज्ञापना विशेष. ताा छ ८ सफर भोमवासर अस्तमान यथास्थित असे विशेष. कालचा जालेला मजकूर काल लिा आहे. आज प्रात:कालापासून जवाहीरखान्याचे लगत उत्तरेची खोलीत रुमाल होते ते काढून जागा नीट करून दरोबस्त कारखाना आत ठेविला. व्यवस्था काही पाहिली नाही. कुलुपें घातली आहेत. पुढे उतर येईल, त्याप्रों कुलुपें काढून व्यवस्ता आज्ञा होईल त्याप्रा करू. कागदपत्र जवाहीर वगैरे रुपेसोने यास अग्नीचा संपर्क नाही. दक्षणेकडील आंगास पश्चिमेकडील कोपऱ्यास कडीपाटाचे खाली येक वितीवर संपर्क जाला. दोनतीन हात कटीपाट व तुलई येका आंगाने दोन तसूं जळाली. त्या कोपऱ्यास काही हरजिनसी आरसे वगैरे काही जळाले व मागील पत्रिका जुन्याचा रुमाल तेथेच होता त्यासहि काही संपर्क जाला. ऐवजाची मात्र मोजदाद केली त्यात येक पिशवीचा अजी ठिकाणा नाही. सिलक अजमासे च्यारशे रुपयेपर्यंत होते. उदईक कारखान्याचे खोलीत वरील पेंड फोडिला, त्याची माती पडली आहे त्याचा छडा उदईक काढितो. काय सापडेल ते सापडो. त्या खोलीस कुलुपे घालून ठेविले आहे. चौकसीस व मेहनतीस कोणी कमी केले नाही. यात दाटी व गलबलीमुळें काय तसनस जाली असेल ती असो. कलावे येसाजी पवार याणी सावकारी दागिने आणून दिल्हे आहेत ते खरे आहेत. कलावे. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*In the fire at Shanwarwada, says the letter, not much damage was done to property or papers.*

No. 218] [*7-4-1808*

श्री

विज्ञापना विशेष. इंदुवार व भोमवार दोन पत्रें दोन रोजची पावोन येथील जाहालेला मार कळो आलाच असेल. आजचा मजकूर. जवाहीरखान्याचे खोलीत वरील पेंडाची माती पडली होती ती काढली. त्याखाली सिलकेची थैली सापडत नाही म्हाा लिा होते ती सापडली व दोन दागिने रुप्याचे लाहान होते

ते सापडले. खोलीचे तळाची माती खरवडून काढून झारेकरी याजकडून धुवविली. त्यात काही पाच च्यार खोटे खडे व सोन्याचे व रुप्याचे रज सांपडले. जालेला मार लिा आहे. काही उंदराचा संभव होतो असें इंदुवारचे पत्रातं लिा आहे असें वाटतें, परंतु तो संदर्भ मिळत नाहीं. कारखान्यांत नेहमी समई लावावयाची तिचे तोंडावर ठेवावयासी दगड तासीव मेजाचा मुदाम केलेला आहे, त्यातून वात जाईल असा काही भास होत नाही, मम ईश्वरचरित्र काय असेल तें नकळे. समई दरवाज्याचे तोंडीं असत्ये तेथून पंधरा हातावर संपर्क जाहाला. कडीपाटाचे खाली वितीदीडवितीवर फळ्या मारिलेल्या आहेत, त्यांजवर बुर्डी पेटारे होते त्यास प्रथम संपर्क होऊन मग कडीपाट्रास व तुळईस संपर्क जाला. त्याचे खालील फळ्यावर आणखी पेटारे आत कापूस व त्याखाली सनगाची बासने वगैरे होतीं त्यांस काही उपद्रव जाला नाही. कळावयाकारिता लिा आहे. इंदुवारचें पत्र पाा तें पावले व राा विनायकपंत आणा वाघ याचे नांवे छतीसशे रुााची चिठी पाा ती पावली. चिठीप्रोा ऐवज आणून घेतों. दागिने करण्याविसी दुसरे पत्र आले म्हाा सोने खाा करून दागिने करावयासीं लाऊ. इंदुवारीं येथील मााराचे पत्र पाो त्याचे उतर ही वेळ पावेतो नाही. त्याजवरून चिंता लाा आहे. कळावे शेवेसी श्रुाा हो. राा शुाा ११ गुरुवार अस्तमान. हे विज्ञापना.

¶*An attempt is made in this letter to account for the fire at Shanwarwada.*

No. 219] [*8-4-1808*

श्री

विज्ञापना विशेष. आपण छ ९ सफर बुधवार साईंकालचे पत्र पाठविले ते भृगुवारी तिसरे प्रहरी पावले, मार समजला. सारांश कचा मजकूर जाहाला त्याचा तपसील लिहून पाठवावा म्हणोन लिा, त्यास कचे मजकुरी पत्रे भोमवार व गुरुवार ऐसी दोन पाा आहेत त्याजवरून मजकूर कळेल. खोलीचे कवाड उघडिले ते वेळेस तेव्हा दिवा सजीव होता किंवा नाही एविसीचे लिहावे म्हणोन लिा. त्यास कवाड उघडून काकड पेटऊन आत नेले ते आत जाताच विझालें. नंतर मशाल आली तोहि मार त्या अन्वयेच जाहाला. समईवरील वात पाहावी तरी गलबलीत समई बाहेर आली त्यामुळे वात पाहाण्याचा विच्यार जाहाला नाही. अग्नीमुळें तसबिरा व च्यार पाच आर्से जाया जाहाले तो मार पेशजीचे पत्री लिा आहे. कळावे. ही गोष्ट जाहाल्यामुळे सरकारात तोंड दाखवावयासी जागा राहिला नाही म्हणौन पत्री, त्यास या गोष्टीस इलाज काय आहे? ते समई मेहनत श्रम केले आहेत ते ईश्वरास ठाऊक आहेत. दोन तुळयाचे कोपरें तीन

ोन हात अजमासे दोन दोन तसू जळालेल्या आहेत व दाहा कड्या जळाल्या. ास तुळयांस खाचा घेऊन लफे बसविले असतां काम चालेल व कड्या तों सऱ्या घालाव्याच लागतील. येविसीचे उतर येईल त्याप्रो करू. दुसऱ्या ळ्या घालूं म्हटले असता बहुत प्रयत्न लागेल. आपलेकडून मार कानावर डोन उतर येईल तेव्हा चित्त स्वस्त होईल. कलावे बहुत काय लिा. मिा ११ सफर भृगुवासर प्रहर रात्र. पत्राची उत्तरे वरचेवर आली पाहिजेत. व्य गोष्ट श्रीहरीने पार पाडिले. लौकरच समजले याजमुळे इतक्या गोष्टी ाल्या, नाही पेक्षा विच्यार कठिणच होता. श्रीमंताचे पुण्य समर्थ. तदनरूप वकर समजोन निर्विघ्न जाले. कलावे श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The fire at Shanwarwada is further described.*

Io. 220] *[13-4-1808*

श्री

विज्ञापना ताा छ १६ सफर पावेतो वर्तमान यथास्थित असे विशेष. जवाहीरन्याचे खोलीच्या जाल्या तोडिल्या होत्या, त्या नव्या करून बसवावयासी शुक्रवारचे वाड्याकडील कारखान्यातील सुतार च्यार आसामी आणिले आहेत. जाल्याचे काम चालले आहे. तुळयास लफे मारावयाचा मार पेशजी लिा आहे त्याचे उतर यावे. तुळया अजीच काढून दुसऱ्या घालावयाचा विचार असल्यास मग लफे मारावयाचे कारण नाही. त्यास येविसीची विनंति करून उतर यावे त्याप्रो काम चालऊ. रुजुवातीचे काम चालविले आहे. आलीकड दोन दिवस पत्र आले नाही, त्याजवरून चित स्वस्थ नाही तर सविस्तर लिहावे. आलीकडे शरीरप्रकृत कसी आहे ते काहीच कलो येत नाहीं, तरी लिा पाा. कलावे बहुत काय लिा. श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Repairs of the Shanwarwada due to damage by fire are suggested in this lette-*

Vo. 221]

श्री

सेवेसी पर्शराम खंडेराव राहातेकर चरणी निरंतर मस्तक ठेऊन साा नमस्कार वेज्ञापना. ताा छ ७ सफर इंदुवारी रात्री सरकारचे जवाहिरखान्यात थोरले ााड्यात साईकाळी अग्नीचा उपद्रव जाहाला. धूर द्रिष्टीस पडताच कारकून ांडली होती त्याणी व शेवकानी आतील कागदपत्र व जवाहीर वगैरे दरोबस्त

काढून बाहेर सोप्यांत ठेऊन चौकी पाहाऱ्याचा बंदोबस्त राजश्री बापू गोखले व आपटे व चौधरी याजकडील पाहारे आहेत व त्याणी आगहि विझवावयाची जलदी केली. सारांष इमारत फार जळाली नाही. लौकरच विझविली. महाराजाचे पुण्यप्रतापेकरून सारे निभाले आहे; परंतु पाण्याने कागद वगैरे भिजले आहेत, त्याचाहि बंदोबस्त, उदैक करितो. सविस्तर मजकुर राजश्री आपाजीपंत आगाशे यांस लिा आहे हे विनंती करतील. शेवेसी शृत व्हावे हे विज्ञापना.

¶*How the fire at Shanwarwada was brought under control is described in this letter.*

No. 222]

श्री

वडिलांचे शेवेसी आपत्ये जनार्दनाने दोनी कर जोडून सिर सां नमस्का विज्ञापना. ताा छ ७ सफर रोज इंदुवार प्रहररात्र सुखरूप असो विशेष. आ अस्तमान होऊन घटका दीडघटका रात्रीचे सुमारे शनवारचे वाड्याती जवाहिरखान्यासच अग्निप्रवेश जाहाला. तेच वेळेस श्रीमंत राजश्री भाऊसाहे व बापूसाहेब गोखले व देशमुख व बाळाजीपंत दादा गोखले यांस जलद वरद कळऊन शुक्रवारचे वाड्यापुढील बंब जमा करून बापूसाहेब खासे वाड्यांत येऊ अग्नीचे शांतवन जाहाले. कोणत्या योगेकडून अगर कशाने लागली या कारण पकेपणे समजत नाही. कारण वाड्यांत मनुष्यहि फार गेले आहे सबब दरवाज्यावर जाणे येणेची बंदी जाहाली यामुळें तसनस काये जाहाल याची पकी बातमी कळत नाही. हा वेळपर्यंत जाहला माार लिहिला आहे च्यार घटकांनी मनुष्य वाड्याबाहेर झाडे घेऊन निघोन गेल्यावर यथंभुत मा लिहितो. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*How the fire at Shanwarwada was extinguished is further explain herein.*

No. 223] [*180*

श्री

विज्ञापना विशेष. आपण छ १० सफर गुरुवारचे पत्र पाठविले तें पाव लिा माार कळला. त्यास आपण लिा मजकुराची पत्रें पेशजी पाठविली आहे त्याजवरून सविस्तर मजकूर कळो आलाच असेल. हालीचें पत्री रुजुवाती काम सुभेदार यास बोलाऊन त्याचे व तुमचे विचारे जामदार यास घेऊन चालव म्हाा लिा. त्याप्रो रुजुवातीचे काम चालवितों. ते वेळचे गलबलीत का

अस्तावस्त जाहाले असेल न कले, असे येथून लिा होते. त्याचे .उतर आजचे पत्री आले जे, कारखान्यात परकी माणूस तुम्ही येऊ दिल्हेच नसेल. जातीनसीच कारभार केला असेल. त्यास ते वेळचा प्रसंग होता तो पत्री लिहिता येत नाही. कोणत्याहि विचारे बाहेर निघो असे जाहाले होते. त्यातहि बंदोबस्ती राखावयाचे तऱ्हेने राखलीच होती. त्यात कोणी गफलत केली असल्यास ह्माडून रुजुवात केल्याखेरीज समजावयाची नाही. कलावे. संशय आला असेल तो दूर करून उतर पाठवावे म्हाा लिहिले, त्यास रुजुवातीचे काम उदईक चालवितो. निकड करण्यास काही कमी करीत नाहीं. परंतु काही अवकाश पाहिजे. आपा, वेळ मोठी कठिण आली होती. समजावयास अणखी ग्राव घटिका जात असती म्हणजे विच्यार मोठा कठिण होता. या समई श्रीने आपणास यश मोठेच दिल्हे. रुमालाचा पेटारा अग्न लागली त्याचे खालीच होता तो काढावयास क्षणमात्र अवकाश जाला असता म्हणजे तोहि निघत नवता, परंतु तोहि अगोधरच निघाला. सारांश प्रसंग पार पडला. नाही पेक्षा उभे राहावयास जागा नवती. ते समई धुळेचा (?) वगैर वाखे जाले ते काही पत्री लिहिता येत नाही. ते दुःख येथे कोणास सांगावयाचे? दुःख पोटात सेरले आहे ते काढून अमृत घालावयाचे दुसरे कोणाकडेस आहे? मिा छ १२ सफर मंदवासर प्रहररात्र शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. रामजी पाटीलहि तेच लेस येऊन पोचले. हाा जामदार याचे रामराम, सविस्तर उभयतानी लिाे आहे, याजवरून कलेल. कलावे हे विनंती.

¶*The fire at Shanwarwada and the consequent trouble are mentioned herein.*

No. 224] **11. Bajirao II—Palaces and Gardens.** [*20-8-1816*

श्री

राजश्री बापूजीपंत बापू गोडबोले
व बालाजीपंत दादा जोगलेकर
गोसावी यासीं

श्नाो राणोजी बिन सटवाजी फुले हाली वस्ती काो पुणे. सुाा सबा असर मया तैन व अलफ ऐसीजे. सरकारातून श्रीगणपतीचे उछाहानिमित फुलाचे काम आपणाकडे सांगितले ते मी कबूल करून आलाहिदां कबुलात निभावणीची लेहून दिल्ही आहे, त्यासमधे ऐवजाचा ठराव :

१ त्यासमधे स्वामीत्वाचा ठराव रुपये १५० दीडशे केला असे.

कलम १

१ सदरहू कारखान्याची निभावणी जाहल्यांवर माळी याचे हिशेब होऊन दरोन दीडशे रुपैवर कसर जाजती येईल त्यांत खर्चवेच वजा करून बाकी राहील ती निमे आमची व निमे आपली. दीडशे रुपयात तोटा आल्यास आम्ही मजुरा माघणार नाहीं.

कलम

सदरहू लिहिल्याप्रमो वर्तणूक करू. हे लिहून दिल्हे सही. मिति श्रावण वा। १२ शके १७३८ धातानाम संवत्सरे हे विनंती.

हस्ताक्षर बापूजी गणेश अभ्यंकर.

¶*This is a contract made with a gardener for supplying flowers during the Ganpati festival at the Peshwa's palace at Poona.*

No. 225] [*1813*

श्री

यादी फळ मेवा व फुलझाडे हरजिनसी बाग बंगला सुा आर्बा अशर मयातैन व अलफ. खरिदी अवरंगाबाद व पुणे

४९७ कौली संतेरी
४० शेव
१०२ सुपारी
१४२ दालिंबी
३०९ द्राक्षी
१०० अंजीर
२९७ पेरू
६ कोटे मेवा
३३६ कोटे शेवंती
८२१ मोतिया
२०० गुलाब
३७२ बोलिया
९७ जुई
१७०० पिवळी जाई १७००
६७८ पांढरी जाई
5182

किता.

२००० पोपये
१५०० हदगा
१००० कन्हेर

४५००

१ गुलछबू वजन पले ५ पाच तख्ते लाहान मोठे सुमार १२
१ कलगा व मखमल तख्ते सुमार ८
१ वाड जासुंदीची लांबी गज सुमार ६००
१ गुलदावरी व गुलटोप याचा हाशा लांबी गज ६००
१ इषकपेचाची ताटी लांबी गज २००

३५८ मदन बाण
१६ बेल
५ गुलपरी
७ कुंद
२५ सोनचाफा
१६ तरगर गेंदा
६ तब्रिमी (?)
२५ अगर
२५ बटमोगरा
१८ रामफल
५ पारिज्यातक
२०० किरकोल

१ द्वणा मर्वा
१ तुलसी
१ पाच

६९४९

जुनी झाडे.

७१ आंबे
३ खिरण्या
१ सिरसी
६४ पेरू ६४
१ चिंच
१ शेत्रगा
२ कौठ
१ गोधनी
१ अश्वत्थ

२ चंदन
२७ गुलाब
८६ मोगरा
६ जुई
२ जाई
१ आवळी
१ नारळी

तपसील मालीयाचा दरमाहा रुपये
१००
१० कारकून
१० दरोगा
१० माल्याचा नाईक
७० माळी आा १४
दरमाहा ५ प्रो रु॥

१००

१ पिंपरी
१ रामफळ
१ पडवळ
५ पारिजातक
८ बकोळी

२८४

¶*This is a list of trees and plants purchased at Poona and Aurangabad for the garden of the Peshwa in 1813.*

No. 226] [*16-4-1815*

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री बाबासाहेब साहेबाचे शेवेसी

आज्ञाधारक जिवाजी बिन कृष्णाजी भुतकर विज्ञापना ऐसीजे. सरकारचे वाड्यांतील रोशनाईचा मख्ता रुपये

२७५ वाडा थोरला
६० वाडा विश्रामबाग
१४० वाडा शुक्रवार

४७५

येकूण च्यारशे पंचाहातर रुपये दरमाहा मख्ता माहे जोवल चैत्रमासापासून तिन्ही वाड्यात ज्या ज्या ठिकाणी दीप लावावयाचे त्या जागां दीप लाऊन. त्याखेरीज काही जागां दीप लावावयाचे राहात असल्यास तेथेहि दीप लावीत जाऊ. चिराख दाने थोरले वाड्यात दोन जागा चौगिर्दी लागतात ती लाऊं. रोशनाईसमंधी तेल व रुई व कापूस व दीप लावणार ब्राम्हण याचा रोजसरा वगैरे खर्च बिलकूल लागेल तो मख्ता करार केला. त्याप्रमाणे तीन वाड्यातील रोशनाईचा बंदोबस्त राखून निभावणी बारा महिने करीन; अंतर पडू देणार नाही. मिा चैत्र शुा ७ शके १७३७ युवानाम संवत्छरे सन खमस अशर मया तैन. शेवसी श्रुत होय हे विज्ञापना. बारमाही मख्ता कबूल केला आहे. त्यास बारा महिन्यांपुढे या कामावर दुसरा कोणी (न) जहाल्यास याच करारा प्रो आम्ही पुढें चालऊ. मिती मजकूर. हास्ताक्षर खुद.

¶*This is a contract for supplying lights in the Peshwa's palaces at Poona undertaken by Jivaji Krishnaji Bhutker.*

No. 227] [*19-8-1807*

श्री

शेवेसी त्रिंबकजी डेंगला चरणावरी मस्तक ठेऊन दंडवत विज्ञापना ऐसीजे. विश्रामबागेतील इमारत हाली जाहाली आहे त्या मागील इमारत नवी करावयाची ती स्वामीनी शेवकास करावयासी आज्ञा केली. त्यास इमारतीचे काम येणेप्रमाणे :—

१ दक्षणेकडील सोपा येकघई दोन मजले करून वर कवलार. भिंतीजवळ डोकीपेक्षा वीतभर उंच याप्रो व दोन मजल्याची पटाई सुधा करून देऊ. कलम.

१ उतरेची भिंत साधी मागील भिंतीप्रमाणे करू तिकडे सोपा नाही * * * *

१ पाये * * * * * प्रमाणे खांदून पाण्यात पुरुषभर दगड टाकून भरीत वर आणू. कलम.

१

१ मधील घर तिघई दोन मजले, दुसरे मजल्यात दिवाणखाना करून वर गची करू. कलम.

१ पश्चमेचा सोपा येकघई दुमजला कडीपाठ सुधा करून वरती कवलार भिंतीजवळ डोकीपेक्षा वीतभर उंच याप्रमाणे करू. कलम.

१ फरस चौकातील तालीमखान्याजवळ फरस आहे त्याप्रो करू व मो * करून देऊ

३

——कलमे ६

सदरहूप्रमाणे काम करून देऊ. याचा मख्ता ७५००० रुपये. पंचाहातर हजार चांदवड जाहाला ते रुा घेऊन इमारतीस लाऊन इमारत तयार करून देईन. मुदत आजपासून साडे नऊ महिन्यांनी वैशाख अखेरीस काम तयार करून देईन. मिति श्रावण वद्य १ शके १७२९ प्रभवनाम संवत्छरे शेवेसी श्रृत होय हे विज्ञा *

¶*Trimbakji Dengla accepts the contract for building the Vishrambag palace for Rs. 75,000. The details of the construction are mentioned in this letter.*

Index to Selection No. 32

The Private life of the Later Peshwas

D

G

H

J

J—contd.

K

L

M

M—contd.

N

P

R

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.

00037062